GOVERNMENT OF INDIA
NATIONAL LIBRARY, CALCUTTA

Class No. Rasa/Mis
491.463
Book No. K521
N. L. 38. V.1
MGIPC—S1—19 LNL/62—27-3-63—100,000.

A
DICTIONARY
of the
MARATHA LANGUAGE

COMPILED BY

Jugunnauth Shastree Kramunnt
Bal Shastree Ghugwe
Gungadhur Shastree Phurke
Ramchundra Shastree Janvakur
Sukha Ram Joshee
Dajee Shastree Shookl
and
Purshee Ram Punt Gorbole
Pundits

In the service of the
Bombay Native Education Society.

VOL: 1.
अ——न

LITHOGRAPHED
At the Press of the Society.

BOMBAY

1829.

महाराष्ट्र भाषेचा कोश.

मुंबईचे शिक्षामंडळीचे आज्ञांकित पंडित.

जगनाथशास्त्री कमवत
बाळशास्त्री घगवे
गंगाधरशास्त्री फडके
रामचंद्रशास्त्री जन्हवेकर
सखारामजोशी
दाजीशास्त्री शुक्ल
आणि
परशुरामपंत गोडबोले

याणीं शिक्षामंडळीचे आज्ञेवरून
हा ग्रंथ केला

तो
शिक्षामंडळीचे छापखान्यांत
छापला



प्रथम भाग

अ——— न

सनइसवी १८२९
शक शालीवाहन १७५१

प्रस्तावना

द्वामहाराष्ट्रभाषेचाकोश.

महाराष्ट्रभाषा म्हणजे महाराष्ट्रदेशीं राहणारे जे देशस्थ ब्राह्मणादिक लोक त्यांची बोलायाची प्राकृतभाषा, तिचा कोश म्हणजे त्याभाषेंत जे शब्द येतात त्यांचा कोश. कोशशब्दाचा सामान्यतः हा अर्थआहे कीं, प्रसंगीं प्रयोगार्थ बाहेर काढायाचा जो अर्थसंघात त्याचे संग्रहाचें सांठवण. राजकीयादि व्यवहारोपयोगी जीं मोहरा, पुनळ्या, होन, रुपये, इत्यादि द्रव्यें त्यांचें सांठवण जें भांडार गृह त्यास जशी कोश ही संज्ञा प्रसिद्ध आहे तशी वाग्व्यवहारोपयोगी जे शब्द तत्संग्रहरूप जो ग्रंथ त्यास ही संज्ञा प्रसिद्ध आहे. राजकीयादि व्यवहारास मुख्यत्वेंकरून आश्रय असें द्रव्य त्याचप्रकारें या वाग्व्यवहारास आश्रय शब्द होत. द्रव्यकोश आणि शब्दकोश यांचें सर्वगोष्टींनीं साधर्म्य आहे परंतु द्रव्यकोश क्षय्य आणि हा अक्षय्य एवढामात्र याकडे विशेष आहे. याजकरितां वाग्व्यवहारकर्ता जो कोणी त्यास शब्दकोश पाहिजे म्हणून ज्याज्या भाषेनें व्यवहार करायाचा त्यात्याभाषेचा कोशावर सर्वांचा आदर अवश्य असावा. यद्यपि जांस त्यात्या भाषांचे कोश व्याकरणाचें ज्ञान नाहीं त्यांचाही वाग्व्यवहार चालतोवरा परंतु कोशव्याकरणाचें जांस ज्ञान आहे त्यांचे आणि यांचे वाग्व्यवहारास फार अंतर आहे. याविषयीं दृष्टांत द्रव्यवान् आणि द्रव्यहीन यांचे प्रापंचिक व्यवहार. असें असतांही आजपर्यंत याभाषेवर कोश व्याकरण करावयास कोणी प्रवृत्त झाला नाहीं हें मनांत आणून सर्वलोकांचे कल्याणार्थ राजकार्यधुरंधर प्रजापालनेकरून हानरबल मोंट स्टुअर्ट एलफिंस्तन साहेब पात्रण आणि गवरनर यांणीं मुंबईतील शिक्षाशाळामंडळीस आज्ञाकरून ह्या ग्रंथ बाळशास्त्रीघगवे, गंगाधरशास्त्रीफडके, सखारामजोशी, दाजीशास्त्रीशुक्ल आणि परशुरामपंत गोडबोले यांचेहातून करायास आरंभिला पुढें त्यांचेचहातून प्रतापसिंह परमकारुणिक हानरबल जनरल सिरजान मालकम साहेब बहादूर पात्रण आणि गवरनर यांणी शेवटास नेला.

याभाषेवर आजपर्यंत कोशव्याकरणादि व्यवस्थापक कांहींच झालें नाहीं हा प्रथमच संस्कार आहे. 'ह्या ग्रंथकरण्याविषयीं बुद्धीस आधार मिळून लोकांचा वाग्व्यवहार तोवरी एकरूप आहे असें जो हीं देशपरत्वें जातिपरत्वें किंबहुना व्यक्तिपरत्वें ही भिन्नभिन्न आहे अशा आधाराचे बलानें जीरत्व

ना

नाकरणाची ती निर्दोष आणि सर्वांस आनंदजनक अशी कशानें होणार परंतु जसा जिनका लोकांचा व्यवहार आदळांत आला तितक्याचें बुद्धीनें आकलनकरून यथामति ह्या ग्रंथ केला आहे हेंमनांत आणून सज्जनानीं दोषदर्शनानें विरसन होतां यांतील गुणलेश असतील ते आदरावे.

या ग्रंथानें भाषागत सर्व अज्ञानाचा नाश होईल असें नाहीं जसें अरुणोदयानें सर्व अंधकाराचा नाश होतो असें नाहीं यत्किंचित्मात्र होतो परंतु तेणेंकरून सकलांधकार नाशकर्त्या जो सूर्य त्याला उदयपावावयास योग्यता होत्ये तसें या ग्रंथानें बुद्धिमान् विद्वान् असे जे थोरलोक त्यांस भाषागत अज्ञानाचा नाश व्हावयाजोगा ग्रंथ करण्यास प्रवृत्त होण्याविषयीं योग्यता येईल.

ही महाराष्ट्रभाषा म्हणजे देशभाषा होय आणि देशभाषांचे वर्तनाचा असा नियम आहे कीं स्वस्वदेशांचे मध्यभागीं शुद्धस्वरूपानें असावें आणि उत्तरोत्तर पर्यंत भागीं तत्तद्देशांतरस्थ भाषांचे मिश्रणानें संकीर्णरूपानें असावें.

महाराष्ट्रदेशाचा मध्यभाग म्हटला असतां प्रायः पुणेप्रांत होतो अतएव पुणेप्रांतीं जे शब्द प्रसिद्ध आहेत ते प्रायः सर्व महाराष्ट्रदेशभर प्रसिद्ध असें समजून ते शब्द प्रांताचे खुणे सांडून लिहिले आहेत, आणि इतर प्रांतींचे शब्द त्या त्या प्रांताची आद्यक्षररूप खूण घालून लिहिले आहेत, ते इतर प्रांत, देश, कोंकण, राजापूर, आणि वाडी हे चार प्रधानें करून धरिले आहेत, त्यांत देशशब्दें करून गंगथडी धरून पंढरपुरचे आसपासचा देश इतका प्रांत विवक्षित आहे. कोंकणशब्दानें मुंबईपासून वाणकोटचे खाडीपावेतों प्रांत विवक्षित आहे. राजापूरशब्दानें वाणकोटचे खाडीपासून प्रायः मालवणपावेतों कोंकणपट्टी इतका प्रांत विवक्षित आहे. वाडीशब्दानें सांवतवाडीचे आसपासचा प्रांत विवक्षित आहे.

जे शब्द व्यवहारीं लोकांचे बोलण्यांत नाहींत आणि प्राकृत ग्रंथांत मात्र आढळतात ते शब्द ग्रंथाची खूण घालून लिहिले आहेत.

हिंदुस्थानाची आणि संस्कृताची जी खूण घातली आहे ती ते ते शब्द त्या त्या भाषेंतून आलेले असें जाणावित्ये. जे कितीएक संस्कृत शब्द साधारण विषय बोलतांनां येतनाहींत परंतु ते शास्त्रीय विषयाचें प्रतिपादन कर्तव्य असतां त्याचा उपयोग आहे म्हणून ते लिहिले आहेत. ही भाषा प्रायः संस्कृत शब्दांचे अपभ्रंश होऊन आलेली आहे अतएव प्रायः संस्कृताचेच अनुरोधानें चालत्ये. म्हणून ज्या अर्थाचा वाचक शब्द या भाषेंत प्रसिद्ध नाहीं तो अर्थ प्रतिपादायाचा असतां त्याविषयीं संस्कृत शब्द योजितात.

या भाषेंत कांहीं शब्द शुद्ध संस्कृत आहेत, जसें पुण्य, पाप, नदी, सूर्य, इत्यादि. कितीएक शब्द संस्कृताचे अपभ्रंश आहेत जसें गांव, घर, दार, लाडू, साकर, चाक, फूल, इत्यादि. आणि कितीएक शुद्ध मराठी आहेत जसें जोंते, पागोटें, डोळा, विस्तव, भात, भाकर, इत्यादि.

या देशां

यादेशींचें राज्य पूर्वी कितीएक वर्षे यवनांकडे त्यामुळें यवनी भाषेंतील दर, तयार, गंज, साल, गुदस्त, इत्यादि कितीएक शब्द या भाषेंत मिसळले आहेत ते राजकीय व्यवहाराचे अनुरोधानें आले म्हणून राजकीय व्यवहारींच प्राधान्येंकरून वर्तमान आणि तेथेंच शोभतात. इतर साधारण व्यवहारीं सरासरी बरे दिसतात परंतु शास्त्रीय व्यवहारादि संबंधी प्रौढ म्हणून जी भाषा तींत तर अगदींच शोभतना हींत याकरितां प्रौढभाषेंत ते शब्द घेऊं नयेत.

तसेंच यादेशांतील लोक हिंदुस्थान, कर्नाटक, गुजराथ, इत्यादि देशांतरीं जातात आणि तेथील लोक ही यादेशांत येतात त्या परस्परांचे परस्परांशीं व्यवहार होतात यामुळें तत्तद्देशभाषेचे कितीएक शब्द या भाषेंत आले आहेत; तेही शब्द प्रौढभाषेंत शोभतनाहींत.

इतर भाषांतरापासून आलेले शब्दांतील कितीएक शब्द वर्णव्यत्यासादिकेंकरून विकृत होऊन अपभ्रंशरूप झाले आहेत, आणि तसेंच कितीएक शब्द मुळचे अर्थाचा संबंधमात्र घेऊन अर्थांतरीं रूढ झाले आहेत.

या भाषेंत इतर भाषांतील जे शब्द आले आहेत ते प्रायः या भाषेचे शब्दाचे मोडीनेंच मोडतात; संस्कृतशब्द हा तसेंच मोडतात परंतु ते संस्कृत शब्द भाषेचे मोडीमुळें विकृत न करितां शुद्धस्वरूपानें लिहिले आहेत.

नाम आणि विशेषण एतद्रूप जे शब्द ते प्रथमाविभक्त्यंत जसें त्यांचें रूप होतें त्यारूपानें लिहिले आहेत.

त्यांतून जा कितीएक शब्दांचा एकवचनी प्रयोग उपलभ्यमान नाहीं ते शब्द अनेकवचनांत रूपानें लिहिले आहेत. जसें आळेपिळे, दिवल्याबावल्या, देव, पिंडोया, इत्यादि. आणि जा चें एकवचनी रूप कदाचित् आलें तर होईल असा संदेह आहे ते एकवचनांत रूपानें लिहून प्रायः अनेकवचनी प्रयोग होतो म्हणून लिहिलें आहे, जसें मुसकी, कोशी, इत्यादि.

जा शब्दांचे प्रथमादि सर्वविभक्तींची उपलब्धि नाहीं प्रथमेवांचून इतर एखादे विभक्तीचीमात्र उपलब्धि आहे त्या शब्दाचें तत्तद्विभक्त्यंत रूप अव्ययाचीं खूण घालून लिहिलें आहे जसें जीरणीस पंचणीस विकोपास, मटूयास, जीवाभावाने, पारगीवारगीनें इत्यादि. परंतु विभक्तींचीं जीं वैकल्पिक इतर रूपें होतात तीं पक्षीं होतील. आणि तत्तद्विभक्तिबोधक जीं करून, वर, ग्वाली इत्यादि अव्ययें आहेत तदंतही पक्षीं प्रयोग होईल. जसें जिरणीस, पंचणीस, विकोपास, मटूयास, याचअर्थी. जिरणीवाली, पंचणीवर, विकोपाला, मटूयाला, इत्यादि किंवा जिरणीवर, विकोपावर, इत्यादि. तसेंच जिवाभावानें याचअर्थी जिवेंभावें जिवेंभावेंकरून इत्यादि. आणि कदाचित् विवक्षावशात प्रथमादि विभक्त्यंतही प्रयोग होईल जसें जिवाभावानें काम केलें म्हणजे सर्व काम व्हावें तसें आलेंनाहीं मग तुझा जि

वाभावासघेउन कायकरावें असला जीवभाव उपयोगीकाय. परम्परांचासमास ज्ञानसनांही विशेषण विशेष्यभावादि संबंधानें एकमेकाशीं नित्यें संबद्ध होउन राहिलेले असेजे दोनदोन किंवा एकशब्द आहेत ते दोनदोनमिळून एकशब्दासारिखे करून लिहिलेआहेत, जसें चांदणीरात्र, खडीसाजीम, खुळखुळीकाढी पहीपाहुणा, ध्यानींमनीं, इत्यादि परंतु त्यांस एकशब्दनाहीं म्हणून त्यांचा व्यस्तव्यवहिनही कदाचित् प्रयोग होईल आणि त्यांचे पूर्वखंडास यथायोग्य विभक्त्यादिकार्येंही होतील. जसें. आजचीरात्र चांदणी आहे कीं काळोखी आहे, खडेसाजमेस तूंभुलूंनको, खुळखुळ्याकाढीचा एवढा गुण आहे. आमचेघरीं पहीनाहींपाहुणानाहीं, मासे ध्यानींनाहींमनींनाहीं इत्यादि.

विशेषशब्द आणि जातिवाचकशब्द हे पुल्लिंगाचेरूपानें लिहिलेआहेत त्यांचीं इतरलिंगांचीं रूपें विशेष्यलिंगानुसार आणि व्यक्तिलिंगानुसार जीं होतात तीं व्याकरणावरून जाणावीं.

जेथें म्हणतात असें लिहिलेंआहे म्हणजे म्हणतात एतद्बोधक स्त्री. अशीरचून लिहिलीआहे तेथें प्रायः असेंसमजावें कीं, त्याशब्दाचा तो अर्थवाच्यनव्हे औपचारिकव्यवहार होतो जेथें सामान्याचे पोटचे एखादे अर्थी अर्थाचेंपर्यवसान विवक्षितआहे तेथें एकआहे एकअसतो किंवा आहे असतो हे शब्द लिहिले आहेत सर्वधातूंचेंरूप णें एतत्प्रत्ययांत लिहिलें आहे.

जाशब्दाचा तच्छब्दाशीं समासकरून अर्थदारबिला आहे जसें जाचेजाचे योगानें उपजीवन होतें तेंतदुपजीवी इत्यादि याशब्दाचा केवलाचा प्रयोग होतनाहीं असें जाणावें.

कितीएकशब्दामधील अक्षरें उच्चारणाचे सपाट्यानें मधल्या अकाराचा लोपहोउन संयुक्त अक्षरासारखीं उच्चारलीं जातात परंतु तेंस्वरूप त्याशब्दाचें प्रशस्तनव्हे असेंसमजून तेशब्द वियुक्त अक्षरांनीं लिहिलेआहेत. कदाचित् संयुक्त अक्षराचेही होतील जसें चतकोर एथें चत्कोर, सागवान एथे साग्वान. मजला एथेमज्ला, विसकळणें एथे विस्कळणें इत्यादि.

जाशब्दांन अकारापुढें हा हेअक्षर येतें तेथें विसर्गाचें आणि हकाराचें साधर्म्यआहे म्हणून विसर्ग पुढेंअसतां जसा रामः देवः इत्यादिस्थलीं विसर्गाचेपूर्वीचा अकार विवृत भासतो तद्वत मागील अकार यत् किंचित् विवृतसादिसतो परंतुतोदीर्घनव्हे. तसेंच आकार, एकार, ओकार, यापुढील जो हकार त्याचेपुढें मागीलस्वराचाध्वनि गंगाः हरेः भानोः इत्यादिस्थलीं विसर्गापुढें जसा भासतो परंतु वस्तुतः तेथें मागीलस्वरनाहीं असेंजाणून महार, लहान, सहाण, वहाण, तहान, जहाज, इत्यादि किं० पाहणें, राहणें, सहणें, मेहनत, मोहर, मोहनफा, पोहची, इत्यादिशब्द यारूपानें अभिमतकेले आहेत, एतद्व्यतिरिक्तस्वरूपाने म्हणजे माहार, लाहान, मेहेनत, मोहोर, अशास्वरूपानें जे कितीएकशब्द लिहिले आहेत तेअभिमतनाहींत परंतु उच्चारणांतीलमात्रांचें अनुसंधान सोडून जे लिहिणारे त्यांचेजे खांतशेतान म्हणून मात्र कितीएक लिहिलेआहेत. कितीएकशब्द अभिमतस्वरूपानें नलिहितां

अन

अनभिमतस्वरूपानें लिहिलेगेलेआहेत ते अभिमतस्वरूपानें आणावे.

या भाषेस संस्कृतभाषेचा अनुरोध आहे म्हणून सांगीतले तीसंस्कृतभाषा बोलणें त्याभाषेचे ग्रंथपढणें ह्याप्रचार बहुतकरून ब्राह्मणांत आहे म्हणून ब्राह्मणाचेबोलण्यांत जेशब्दयेतात आणि त्याचेमुखानें जसे उच्चारहोतात त्यांस याभाषेंत प्राधान्य आहे.

एथें शब्दलोकप्रसिद्ध वर्णक्रमानें लिहिलेआहेत तोक्रम.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ए, ऐ, ओ, औ, क, ख, ग, घ, ङ, (च च) छ, (ज ज) (झ झ) ञ, ट, ठ, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ, ब, भ, म, य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ, क्ष, ज्ञ.

आतां क्ष, आणि ज्ञ, हीं वस्तुतः जोड अक्षरें परंतु लोकव्यवहारानुसार हेवर्ण पृथक्क्रमानुन याक्रमानें लिहिले. श, ष, स, यांचेमागें जेथे विसर्गयेतो असे जे निःशेषनिःसंशय इत्यादि शब्द त्यांचा उच्चार लोकांत निश्शेष, निस्संशय, असा शकारादिविशिष्टहोतो विसर्गविशिष्टहोतनाहीं. संस्कृत व्याकरणावरुन पाहतां विसर्गविशिष्ट आणि शकारादिविशिष्ट ही दोनहीरूपे शुद्ध आहेत परंतु शकारादिविशिष्ट नमी उच्चार सांगतांथापि विसर्गविशिष्ट लिहिण्याचा लोकांत संप्रदाय आहे म्हणून त्याशब्दांचे विसर्गविशिष्ट रूप धरून तदनुरोधानें वर्णक्रमांत जेजें स्थान आलें त्यात्यास्थानी तेतेशब्दलिहिलेआहेत.

ह्क, स्क, ह्क, ह्ख, ह्ग, हीं अक्षरें संस्कृतशब्दांतअसता हकारादिक आणि गाकृत शब्दांत असतां नकारमकारादिक असतांत ही व्यवस्था धरून तद्विशिष्टशब्दवर्णक्रमानुरोधानें त्यात्यास्थानीलिहिले आहेत

लेखांत लाघवयावें म्हणून किंतीएक संकेतानें रचणा लिहिल्याआहेत त्यात्यारचणांचे ज्ञेयअर्थसांगतों

पु० म्हणजे पुल्लिंगी.

स्त्री० म्हणजे स्त्रीलिंगी.

न० म्हणजे नपुंसकलिंगी.

त्रिलिं० ह्मारचण शब्दाला विशेषणत्व आणावितें.

अ० म्हणजे अव्यय.

वि०वि० म्हणजे विधिविशेषण.

अवि०वि० म्हणजे अविकारी विशेषण म्हणजे विशेष्यानुरोधानें लिंगवचन प्रयुक्तजो विकार त्याचा तोहोतनाहीं.

सं० म्हणजे संस्कृत.

हिं० म्हणजे हिंदुस्थानी.

दे॰ म्हणजे देशस्थी किंवा देशविशेषींचा.

को॰ म्हणजे कोंकणी.

रा॰ म्हणजे राजापुरी.

वा॰ म्हणजे वाडीचा. किंवा वाक्य.

ग्रं॰ म्हणजे ग्रंथी.

इ॰ म्हणजे इत्यादि.

किं॰ म्हणजे किंवा.

म्ह॰ हीखूण म्हणजे म्हणतात म्हण, म्हणून, याचार अर्थांनें जाणवितें प्रकरणानुरोधानें तोतो अर्थजाणावा.

ला॰ म्हणजे लाक्षणिक.

प्र॰ हीखूण प्रयोग प्रत्येकीं आणि प्रसिद्ध या अर्थानें जाणवितें.

प्रा॰ म्हणजे प्रायः किंवा प्राकृत.

धा॰ म्हणजे धातु.

यो॰ म्हणजे योगीं.

वि॰ म्हणजे विशेषण.

इ॰वि॰ म्हणजे इत्यादिकांचें विशेषण.

इ॰धा॰वि॰ म्हणजे इत्यादिधातूंचें विशेषण.

इ॰धा॰प्र॰ म्हणजे इत्यादिधातुयोगीं प्रयोग.

इ॰प्र॰ म्हणजे इत्यादियोगीं प्रयोग.

स॰प्र॰ म्हणजे समासीं प्रयोग.

स॰ म्हणजे समास.

उ॰ म्हणजे उदाहरण. किंवा उभयविध. उभयविध म्हणजे मुळचा सकर्मक असून त्या कर्मासच कर्तृत्वमात्रिलें असतां पक्षीं जाचा अकर्मकहीप्रयोग होतो असा जो धातु तो.

अप॰ म्हणजे अपभ्रंश.

जा एकाच शब्दांचे अर्थ कितीएक अव्ययरूप कितीएक विशेषणरूप कितीएक विशेष्यरूप त्यांतहीकांहीं पुल्लिंगीं कांहींस्त्रीलिंगीं कांहींनपुंसकलिंगीं असे आहेत तेथें जा अर्थाचे मागें जो लिंगादिकाचीखूण घातली असेल त्याअर्थी तोशब्द त्यालिंगीं किंवा त्याजातीचा अशाप्रकारें जाणावा आणि त्याखुणेची अनुवृत्ति पुढें दुसऱ्या किंवा तिसऱ्या कोणत्याही अर्थास नसलें जितके अर्थ असतील तितक्या

अर्थी

अर्थी आणावी.

दुर्बलता, अप्रयोजकत्व, इत्यादिमूलक हलकेपणा पदार्थी बोधवायाचा असतां पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी जे शब्द आहेत त्यांचा निर्देश विवक्षावशात् नपुंसकलिंगानें होतो, उदाहरण क्रोधेंग ण गुर्गुरे मगरूपणे केशाशि आलीं भटें.

तसेंच स्थूलत्व, कठोरत्व, इत्यादि धर्ममूलक जेव्हां त्यात्या अर्थी भारीपणा बोधवायाचा असतो तेव्हां तेतेशब्द अन्यलिंगी असतांही त्यांचा निर्देश पुल्लिंगानें होतो जसें हें पागोटें कशाचें थोरला पागोटा झाला.

कोणेकाची पराजयमूलक अपेक्षा, भीतत्व, इत्यादि विषयवर्णनप्रसंगीं डौलानें सामान्यतः त्या त्या अर्थाचा निर्देश स्त्रीलिंगानें करितात, उदाहरण भारी गोष्टी सांगत होता पण चग कशी भ्याली

कितीएक जातिवाचक जे विशेष्य शब्द त्यांजवर विशेषणाचीं रूपें प्रमादानें पडलीं आहे.

शब्दाचे व्युत्पत्तीचीदिशा दाखवायासाठीं पहिल्यापहिल्यानें कितीएक शब्दांवरमात्र व्युत्पत्ति लिहिली आहे वी कुंडली घालून आंत लिहिली आहे.

अ,पु०हा वर्ण सर्व वर्णक्रमामध्यें प्रथम आहे,व्यंजनादि शब्दांचे पूर्वी याचा योग होऊन समास झाला असता तद्भिन्न तत्सदृश किं० त्याचा अभाव किं० त्याचा अभावानें विशिष्ट असे अर्थ विशिष्टांचे होतात.स्वरादि शब्दांमागें योग झाला असतांही अर्थ तेच परंतु एक नकारमध्यें शिरतो; उ० नके जो ब्राह्मण तो अब्राह्मण शूद्रादिक, मानुषाचा जो अभाव तें अमानुष. ज्ञानाचा जो अभाव तें अज्ञान. किं० ज्ञान जास नाहीं तो, यामध्यें अभावार्थी जे शब्द होतात ते नपुंसकलिंग आणि इतर विशेष्य लिंग क्वचित्समामीं तद्विरुद्ध अभावही अर्थ होतो; उ० पथ्यास जें विरुद्ध तें अपथ्य इ०.

अँ:, अ० उँ:.

अँ, अ० औं:.

अईन, पु० आईन.

अऊन, न० आकन.

अंक, पु० एकादि संख्येचीं जीं चिह्नें लिहितात तीं प्र०; २.सं० चिह्न; ३.माडी; ४.समीपदेश.

अंकजाल, न० पंचांग, ग्रह, इ० साधनार्थ जे अंकांस प्रतिवर्षी कांहीं संस्कार सांगीतले आहेत असे अंक कांहीं ग्रंथकारांनीं मांडून ठेविले असतात ते.

अकटविकट, अकटोविकट, वि० सामान्य [illegible] मोठा असून जाचे आकारामध्येंनीटनेटकेपणा कांहींच नाहीं असा जो गृह भांडें पुर्वेत, इ० पदार्थ तो. (दूसरा शब्द [illegible] विकटाकार [illegible])

अकड, स्त्री० अक्कड.

अकडंतिकडं, अ० केवळ ताळ तंत नाहीं अशा प्रकारें बोलणें.भाषणकरणें, इ० कांचें वि०.

अकडबाज, वि० अक्कडबाज.

अंकडा, पु० अंक प्रथमार्थी; २, खिळा, इ० वळवून एकाचे अंकासारिखा जो आकारविशेष केला असतो तो; ३, विंचवाचा जो नांगाडा तो; गाय, बैल, इ० कांचे अंकडे मोडणें स० गाय, इ० खोलदणें

अंकडी, स्त्री० वृक्षाची खांदी, वस्त्र, इ० ओढाया करितां अग्रभागीं वळिवलेला खिळा, इ० मारून, किं० अंगाचा च तादृश अवयव रा खून जी वेढ, इ० कांची काढी केलेली असतो ती.

अकडा, अकढा, वि० कढलेला नव्हे असा जो घृत, दूध, इ० पदार्थ तो.

अकडी, अकढी, वि० अकढा.

अंकणी, स्त्री० आंकणी.

अंकणें, कांहीं एक पदार्थ रेषादि चिन्हानें चिन्हित करणें; २, स्थलादिकांवर चित्र, कोष्टक, इ० रेखानीं उत्पन्न करणें.

अंकन, न० अंकण्याचा जो व्यापार किं० तेणें करून पदार्थावर होतें जें चिन्ह तें.

अकबर, हिं० स्त्री० परराज्यादिकांतील लोकांदिद्वारा येणारी जी बातमी ती

अकबरनवीस, हिं० पु० आपल्यास अकबर लिहावी लागून परराज्यादिकांतजो कोणी नियुक्त असतो तो.

अकबरी, हिं० वि० अकबरासंबंधून पादशाह होता त्यानें केलेली जी मोहोर, रीति, इ० तो.

अकबार, हिं० स्त्री० अकबर.

अकरकीं

अकरकी, अ० अकरीं २ उलट्यापालट्यी (वस्तु अलगदे)

अकरकें, न० अकरांपासून वीसपर्यंत संख्या प्रत्येकीं अकरांपासून वीसपर्यंत संख्यानीं गुणून जें पोरांस लेख शिकिवतात तें.

अकरनकर, ३लिं० जें कराया सांगितलें तद्विरुद्ध कर ण्याचा स्वभाव जाचा तो. अकरणकर्मी

अकरमाशी, ३लिं० क्वचिद्देशीं अकरामाशांचा तोडा अशा संकेतानें जें वजन चालतें तो; २ अकरमाही; ३, पु० दासीपुत्र.

अकरमाही, ३लिं० वर्षाचीं चाकरी घेऊन अकरामहिन्याचें जें वेतन देतात तो.

अकरा, ३लिं० ११.

अकरावा, ३लिं० क्रमानें मोजिलें असतां अकरा या संख्येचा जो विषय होतो तो; २, पु० मेलेल्याचे अकरावे दिवशीं जो वृषोत्सर्गादि विधि करितात तो.

अकरावारुद्र, पु० क्रोधावेशानें केवल आतां हा रवाईल, जाळील, इ० संभावना व्हावया जोगा जाचा आकार झाला आहे असा जो मनुष्यादि त्यास स०.

अकरावें, न० अकरावा द्वितीयार्थी.

अकराळविकराळ, ३लिं० पाहातांच भय वाटावया जोगा विरूप, विलक्षण, राक्षस, प्रेत, इ० कांचें शरीरांचा जो आकार, किं० तद्विशिष्ट शरीरादि तो; २, पिशाचोपद्रवादिकामुळें भयंकर जो मनुष्यादिकांचा शब्द तो.

अकरीं, अ० सोंकट्याचे खेळामध्यें विवक्षित पगापासून अकरावे घरीं.

अकरोड, पु० न० एक फल आहे. अक्रोड

अकर्ता, ३लिं० सं० जाचे अंगीं कर्तृत्व नाहीं तो.

अकर्तृक, ३लिं० सं० जाचा कर्ता क्रियापदाहून बहिर्भूत असत नाहीं असा जो क्रियाभावणें, गमणें, इ० धातु तो.

अकर्म, न० सं० दुष्कर्म.

अकर्मक, ३लिं० सं० जाचा व्यापार आणि फल एकार्थावर राहातात असा जो असणें, राहाणें, इ० धातु तो.

अकर्मी, ३लिं० सं० अकर्मक करितो तो.

अकल्पित, अ० सं० पूर्वी कल्पना, किं० सूचना, इ० झालें नसतां.

अकल्याण, न० सं० कल्याणविरुद्ध जी दशा तें.

अकस, पु० स्त्री० कोणेकाविषयीं जिनकें प्रतिकूल होईल नितकें करावें असा जो कोणेकाचा मनीं भाव असतो तो ती.

अकसखोर, ३लिं० अकस धरण्याचा स्वभाव जाचा तो.

अकसी, ३लिं० अकसखोर.

अकस्मात्, अ० सं० काहीं एक कार्य पुढें व्हावयाचें असतां तत्सूचक जें चिन्हादि होत असतें तें नहोतां हें होईल अशी मनांत संभाव नाही झाली नसतां; उ० गर्जनादि कांहीं नसतां अकस्मात् पर्जन्य पडला.

अकस्मात्, अ० अकस्मात् याचा अपभ्रंश.

अकळतनकळत, अ० भ्रम, मद, इ० कारणामुळें कदाचित् जो तत्वज्ञानाचा अभाव त्यामुळें; उ० मी बुध्या अपराध करणार नाहीं अकळत

नकळत झाला तर क्षमा असावी.

अकळवणी, न० अकालवृष्टि.

अकांचन, ३लिं० सं० निष्कांचन.

अकांत, पु० आकांत.

अकामी, ३ लिं० जाचा कांहीएक उपयोग नाहीं तो.

अकारण, अ० सं० निमित्ता वांचून; उ० तो अकारण मला गांजतो; २, ३लिं० जास कारण नांहीं असा जो स्वतःसिद्ध ईश्वरादि तो.

अकारणी. अ० सं० अकारण प्रथमार्थी; २,३लिं० कारणी नव्हे जो मनुष्यादि पदार्थ तो.

अकार्य, न० सं० करायास अयोग्य जें कर्म तें.

अकाल, पु० सं० अकाळ.

अकालवृष्टि, स्त्री० सं० अकाळवृष्टि.

अकालीन, ३लिं० सं० अकालीं झालेला, आणिलेला, इ० जो पदार्थ तो.

अकाळ, पु० जा कार्यास योग्य नव्हे जो काल तो.

अकाळवृष्टि, स्त्री० अकालीं जी कदाचित् क्वचिन्‌ वृष्टि पडती ती.

अकिंचन, ३लिं० सं० जापाशीं द्रव्यादि पदार्थ कांहींएक नाहीं तो.

अकिंचित्कर, ३लिं० सं० जेणें करून दोषरूप, गुणरूप, फल कांहींच होत नाहीं असा जो मनुष्य, वाक्य, इ० पदार्थ तो.

अंकित, ३लिं० चाकरीचें नातें, उपकाराचा भार, इ० कारणामुळें जो जाची आज्ञा उल्लंघूं शकत नाहीं तो त्याचा; २, जाजवर कांहीं एक चिन्हाचें अंकन केलें आहे तो.

अंकी, ३लिं० तिथ्यादि बोधक अक्षरें न लिहितां केवल अंकांनींच लिहितात जें पंचांगादि तो.

अकीर्त्ति, स्त्री० सं० कोणीकाची दुष्कर्मादि दोषामुळें वाईटपणानें होती जी ख्याति ती.

अकुतोभय, ३लिं० सं० कोणापासून ही जास भय नाहीं तो.

अंकुर, पु० सं० बीज, कंद, वृक्षाचें कांड, इ० कांस वृक्षादि रूपें करून विस्तार होण्यास निदानभूत जो कोमल अवयव फुटतो तो; २, ला० लाहान मुलाचे अंगीं पुढें हा असुक असुक प्रकारचा होईल अशा अर्थाचें ज्ञापक त्याचे चेष्टा भाषणादिकांवरून जें चिन्ह दिसतें त्यास म्ह०.

अंकुरणें. वृक्ष, कंद, इ० कानीं अंकुरयुक्त होणें.

अंकुरित, ३लिं० सं० अंकुरानें विशिष्ट झालें जें बीजादिक तो; २, ला० शरीरादिकाचा गात्रीं दिसूं लागाया जोम्याद शेस आलें जें तारुण्यादिक त्यास म्ह०.

अंकुश, पु० सं० हत्तीस गंडस्थलीं टोंचावें, इ० उपयोगी शस्त्र आहे; २, तशाच आकाराचें शस्त्र काठीचे अग्रीं बसवून जी आंकडी करितात तो.

अंकुशी, ३लिं० जाजवर अंकुशाचें चिन्ह असतें असा जो रुपया, इ० तो.

अकृत्रिम, ३लिं० कृतीनें केलेला नव्हे जो भूमि, अरण्य, इ० पदार्थ तो; २, जामध्यें कपट नाहीं असा जो मनुष्यादिक तो; ३, न० कृत्रिमाचा प्रतिपक्षी जो भाव तें.

अंकोल, पु० स्त्री० एक झाड आहे; २, न० त्याचें जें फळ तें.

अक्कड, स्त्री० शौर्य, चातुर्य, सुरूपता, इ० गुणजनित अभिमानाचा जो आकार त्याला पुरुषादिकांचे बोलणें, चालणें, इ० कांचा ठायीं दिसावा जोगा असतो ती.

अक्कडबाज, वि० जामध्यें अक्कड आहे असा जो मनुष्य, घोडा, इ० तो.

अक्कल, स्त्री० करावें कोणतें नकरावें कोणतें, इ० विचार समजायास कारणभूत जी बुद्धि ती.

अक्कल, —, कडा. — करा, — कारा, — काडा, — काला, — काढा, पु० एक औषधीचें मूल आहे.

अक्कलखाद, अ० अगदीं, परंतु जाणें, नाश होणें, बुडणें, इ० जे नाशफलक धातु त्यांचें वि०; उ० यंदां अक्कलखाद पाऊस गेला.

अक्कल, —, बाज, — वंत, — वान्, वि० चांगली अक्कल आहे जास तो.

अक्कलहुशारीनें, अ० आपली बुद्धि मद्यादि मद, भय, इ० कानीं भांभावलेली नसून यथास्थित असतां खतपत्र, इ० लिहून देणें, इ० कांचें वि०.

अक्काबाई, स्त्री० आकाबाई.

अक्काबाईचा पाया, पुं० आकाबाईचा पाया.

अक्काबाईचा फेरा, पु० आकाबाईचा फेरा.

अक्कतोभय, वि० अकुतोभय.

अक्कस, न० जामध्यें तेल, तिखट, पाल्यांचा भाजा, इ० अमात्विक नीरस पदार्थ बहुत आणि घृतादि सात्विक पदार्थांचा केवल अभाव असें जें अन्नादि भक्ष्य तें.

अक्कसनक्कस, न० अक्कस इ० तें.

अक्का, वि० अकरा.

अक्कावा, पु० वि० अकरावा.

अक्कावारुद्र, पु० अकरावा रुद्र.

अक्कावें, न० अकरावें.

अक्काळविक्काळ, वि० अकराळविकराळ.

अक्की, स्त्री० अरबी.

अक्कीं, अ० अकरीं.

अक्कीत, न० क्रयविक्रयादि व्यवहारीं न्यायतः जितक्याम जितकें द्यावें, घ्यावें, तदपेक्षयाजें अधिक अतएव अन्याय्य जें मूल्य, कि० विक्रेय पदार्थ, इ० तें.

अक्कुसणें, आकसणें.

अक्कें, न० अकरा यांचा समुदाय; २, अकरकें.

अक्कोड, पु० न० अकरोड.

अकृष्टपणें, अ० जाचा जाकर्मावर हात बसला नाहीं तें पाकादि कर्म करितानां जी तारंबळ होती ती नहोतां. कांहीं एक कर्म, कर, हो, इ० कांचें वि०.

अक्लिष्टपणें, अ० अकृष्टपणें.

अक्लेश, अ० क्लेश न पडतां आणि जितकें लाभादि व्हावयाचें त्यामध्यें यत्किंचित न्यूनता न पडतां कांहीं एक लाभ होणें, मिळणें, पिकणें, इ० कांचें वि०; २, कांहीं एक अंश अवशिष्ट नरा हातां. संपदादि बुडणें, भंगणें, नागविणें, शेत, इ० मरणें, इ० कांचें वि०.

अक्साबोकशी, अ० रडण्याचा वेग आटोपेनासा झाल्यामुळें घाबरें व्हावें अशा प्रकारें रडण्याचें वि०

अखंड, वि॰ जा वस्त्र, कागद, इ॰कांचे अनेक तुकडे करण्याची योग्यता असून न फाडितां विशिष्ट राखिलेलें जे वस्त्रादि तो; २, एक संधी जोफळी, तुळई, चिरा, इ॰ पदार्थ तो; ३, अ॰ मध्यें खंड न पडतां सदोदित; उ॰ अखंड हरिहरिवदा.

अँखडणें, अखडणें, आंखडणें.

अखंडदंडायमान, वि॰ पल, घटी, दिवस, वर्ष, इ॰कांनीं जाचा परिछेद होऊन भिन्नभिन्न विभाग होतात त्या विभागांतें अविवक्षित करून जास आदि नाहीं अंत नाहीं अमा जो विशिष्ट काल त्याचें वि॰

अखंडित, वि॰ मध्यें जाचा खंड झाला नाहीं असें जें ज्ञान, संपत्ति, बुद्धि, धर्म, आचार, इ॰ तो.

अखंडितलक्ष्म्यलंकृत, वि॰ निरंतर राज्यादि संपत्तीनें जो विराजित तो, हा शब्द मोठेमोठे प्रतिष्ठित महाराष्ट्र यांस पत्रलिहावयाचें असतां मान्यांत लिहितात.

अँखणें. अंकणें; २, विवक्षित स्थलादि पदार्थ आपला असा ओळखावा म्हणून आपल्या खुणेचा चिन्हानें चिन्हित करणें.

अखर, अ॰ अखेर हितीयार्थी

अखा, वि॰ फोड न करितां सगळ्याचा सगळा तो.

अखाड, पु॰ आषाढाचा अपभ्रंश.

अखाडा, पु॰ आखाडा.

अखाडी, स्त्री॰ दे॰ अखेरी या अर्थी; २. आखाडी.

अखिल, वि॰ सं॰ सर्व.

अखूड, वि॰ आंखूड.

अँखें, न॰ आँखें.

अखेती, स्त्री॰ अक्षय्य तृतीयेचा अपभ्रंश.

अखेर, वि॰ अखेरी झाली जाची तो, चवथडा अखेर झाला, मशारनिलें अखेर झालें, इ॰ कालिक म॰ होतो; २, अ॰ कोणेक कार्यादिकाची शेवटील जी दशा तिचा द्योतक शब्द.

अखेरनौबत, अखेरनौबद, स्त्री॰ नौघड्याचे अखेरीस एक प्रकारचे गतीनें जी नौबद वाजिवतात ती.

अखेरसाल, न॰ वर्षाचा शेवटील जो विभाग तें; २. विवक्षित वर्ष समुदायांतील शेवटील जें वर्ष तें.

अखेरी, स्त्री॰ कोणेक कार्याची; किं॰ पदार्थाची समाप्तीची जी दशा ती; अखेरी मारणें, स॰ गंजिफांचे खेळांत शेवटीं दुसऱ्याचे हातांत गैर हुकूम राहिलेलें जें एकच पान तें आपल्या हुकुमानें मारून घेणें; २, ला॰ जा कार्यास आरंभापासून शेवटपर्यंत कांहीं करावें लागतें तें न करितां शेवटीमात्र, किं॰ तादृश प्रसंगीमात्र करून मुळापासून केल्याचें शोभा फलादि येई असें करणें; याच अर्थी अखेरी संभाळणें, साधणें, इ॰

अखोड, वि॰ जांत कांहीं खोड नाहीं असें जें भाषणादि तो; २. दे॰ आंखूड; २, न॰ पु॰ कों॰ अकोड.

अखूत्यार, वि॰ हिं॰ कोणेका कामाची जाला अखूत्यारी आहे तो; २, पु॰ अखूत्यारी.

अखूत्यारी, स्त्री॰ हिं॰ कोणेक व्यवहाराचा द्यायी अधिक उणे कांहीं करावयाचें झालें असतां ही

धन्याची आज्ञा व्यावयाचें प्रयोजन नाहीं असें जें कोणेकास तत्तद्व्यवहारीं स्वामीची आज्ञा, इ० कांपरून स्वातंत्र्य आलें असतें तो; २, ३ लिं० अख़्त्यारप्रथमार्थी.

अख़री, स्त्री० धान्य, जल, इ० कांची पाहिजे तितकें न मिळावयाजोगी क्वचित् कदाचित् अल्पता होत्ये ती.

अग, पु० सं० पर्वत; अ० स्त्रीस संबोधन व्यावयाचें असतां याचा प्र० होतो. विशेष गौरव गम्यमान असतां; उ० अग सरव्यानो तुम्ही मला सोडून जाऊं नका. अगस्त्रीये मला पाणी दे.

अंग, न० सं० सजीव पदार्थांचा जीवांश पृथक् करून अवशिष्ट जो प्रकृत्यंश तें तसेंच अचेतन मूर्त्तामूर्त्त पदार्थांचा तत्तच्छब्द वाच्यत्वें करून मानिलेला जो जीवांश तो पृथक् करून अवशिष्ट जें सावयवत्वें; २. अवयवीचा जो अवयव तें; ३, एकाच अवयवीचे प्रधान आणि अप्रधान अवयव असतात त्यामध्यें जे अप्रधान अवयव ते प्र०; उ० विवाहामध्यें होम प्रधान अवशिष्ट कर्मे अंगें; ४, कांहीं एक पदार्थांचा खालचा, वरचा, डावा, उजवा, इ० रूप जे अनेक विभाग ते प्र०, उ० पायगोटें पुढल्या अंगें मात्र चांगलें दिसतें; ५, अशक्तपणा, मूळव्याधि, इ० कारणानें जो गुदद्वारा, कि० योनिद्वारा मांसगोल बाहेर पडतो तें; ६, कोणीएक व्यवहार आपण पुरें होऊन न करितां इतर जे करणारे त्यांस अनुमोदन द्यावें, साहित्य करावें, इ० रूप जो त्या व्यवहारावर कोणेकानें आपला कर्तृत्वसंबंध ठेविला असतो तें; उ० या मसलतींत रामाजी पंताचें

पंताचें अंग आहे असें दिसतें; ७, कोणा एकास कांहीं एक व्यवहार करण्याविषयीं आंतून जें कोणेकाचें पाठबळ असतें तें; उ० ही सासू बरोबर भांडत्ये हिला नवऱ्याचें अंग आहे; ८, जेथें कांहीं बरें वाईट झालें असतां आपल्यास झालें असें होतें असा एक आत्मत्वाभिमानविषयभूत पदार्थ मानिला असतो तें; उ० हा दोष माझे अंगीं नाहीं, अंग राखणें, स० कार्याची पोटाग तादृश न करितां. आपले शरीरास आयास न होत असें कांहीं एक कार्याचे ठायीं वर्तणें; अंग मारणें, चोरणें, स० अडचणीचे जाग्यांत शिरावया करितां, कि० आघातादि चुकवाया करितां संकुचित करणें; अंगावर देणें, भरणें, पोषणें, इ० स्थूलीं अष्टमार्थक जें अंग त्या साधनानें असा अर्थ; अंगास येणें स० कोणेक व्यवहार विवक्षित लाभादि न होतां मूलभूत द्रव्यादिकांचा नाश व्हावया जोगा हानि प्रद होणें. वपिशाचानें शरीरांत संचारणें; अंगावर पडणें स० कांहीं एक संसारादि व्यवहार निर्वाह्यत्वें करून आपल्यास प्राप्त होणें; पदरचें द्रव्यादि देऊन जासाठीं जो पदार्थ घेतला तो उपयोग नाहीं सा झाल्यामुळें तो पदार्थ निरुपयुक्तपणें आपल्या जवळ पडला राहाणें; कांहीं लाभ व्हावया करितां बाळगला जो बैल, घोडे, इ० त्यास जो खर्च लागतो तितकेंही त्याचा योगानें उत्पन्न नहोतां तो मूलभूत द्रव्यानें पोसावा लागणें; अंगावर येणें. स० कोणेकास लक्षून क्रोधावेशानें उग्र भाषणादिपूर्वक आता हा मारीलच काय अशा आकारानें युक्त होणें; अंगावर तुटणें, तुटून पडणें, स० अंगावर येणें;

अंग टाकणें स्त्र० कोणेकानें शरीरानें कृश होणें; अंगारखाली घालणें स्त्र० गणिकादिक सामान्य वनिता. क्रि० परकीया कोणेकानें उपभोग्य त्वेंकरून राखणें; अंगीं लागणें स्त्र० शरीर पुष्ट व्हावें म्हणून केलेले भक्षणादि उपचार त्याणी पुष्टिप्रद होणें; अंगास लावणें स्त्र० तेलादिकानें अभ्यंग करणें; अंग काढणें स्त्र० विवक्षित व्यवहार संबंध सोडून एकीकडे होणें; अंगावर खाणें. पिणें. स्त्र० मुलानें आईचा स्तन प्राशन करणें.

अगई, अ० भय, आश्चर्य, यांचा उद्गार, प्रा० स्त्रियांचे भाषणांत याचा प्र०; उ० ग्रं० म्हणे अगई ऐकिलें हि नकधीं अमें पापमा.

अंगकाढू, अंगकाढ्या, ३लिं० कोणेक व्यवहारांतून अंगकाढण्याचा स्वभाव जाचा तो.

अंगचपळाई, स्त्री० कांहीं एक काम करण्याविषयीं शरीरांत जें स्वतःसिद्ध चापल्य असनें तो.

अंगचा, ३लिं० मूलभूत प्रमाण नमतां केवळ आपल्याच मनानें कल्पून रचिला जो काहीं एक अर्थ तो. क्रि० दुसऱ्यानें शिकविलेली नव्हे अशी जी बुद्धि, कल्पना, इ० तो.

अंगचुकार, अंगचुकारू, ३लिं० अंगचोर.

अंगचोर, ३लिं० अंगामध्यें काम, बळ, कला, इ० असून ही कार्यप्रसंगीं चोरण्याचा स्वभाव जाचा तो

अंगज, पु० सं० पुत्र.

अंगजड, ३लिं० आंगजड.

अंगजा, स्त्री० सं० कन्या.

अंगजोर, पु० अंगबळ

अगटी, स्त्री० आगटी.

अंगठा, पु० अंगुष्ठ; कोणेकास अंगठा दाखविणें. म्ह० हिंगो दाखविणें.

अंगडी, स्त्री० अंगुळी; २, अंगुलीयक.

अंगठोळा, पु० लहान मुलाचें हातांत घालावयाचें एक भूषण आहे तो.

अगडतगड, न० लटरफटर; २, अमर्यादजें अधिकउणें भाषण तें.

अगडबगड, न० अगडतगड.

अगडबंब, ३लिं० शरीरानें जो अतिपुष्ट तो, निंदावृत्ति.

अंगडी, अंगडें, न० लाहान मुलाचा आंगरखा तो तें.

अंगण, न० गृहाचापुढें जी मोकळी जागा राखली असते तें; २, युद्धभूमि, नृत्यभूमि, यांसही म्ह०, परंतु प्रा० समासीं प्र०; उ० युद्धांगण, रंगांगण. इ०

अगणित, ३लिं० सं० जाची संख्या अमुक अशी निश्चित केली नाहीं तो; २. जाची संख्या करवत नाहीं असेंजें ईश्वरगुणादि तो.

अगतिक, ३लिं० सं० जा व्यवहार इ० कांची गति कुंठित झाली तो

अगतिकगति, स्त्री० सं० अगतिक झालाजो कांहीं एक व्यवहारादिक त्याचा यथाकथंचित् जो निर्वाह तो; उ० आपण स्वसत्ताकांत गृहीं राहावें नें नाहीं म्हणून दुसऱ्याचे घरीं राहातों ही अगतिकगति.

अगत्य, न० कोणेकाचें हस्तें परहस्तें बरें करावें, क्रि० व्हावें वाईट होऊं नये असा जो कोणेकाचा कोणेकाविषयीं भाव असतो तें; उ० या सुभेदा-

रास सर्वापेक्षां शास्त्रीबाबांचें अगत्य फार आहे; २, कोणकास कोणेकाविषयीं जी साकांक्षता तें; उ० मला तंबाखूचें अगत्य नाहीं, यापेटीस कुलपाचें अगत्य नाहीं: ३, पोटाग; उ० याला पढण्याचें अगत्य नाहीं, याला शेताचें अगत्य आहे; ४. अ० अगत्यपूर्वक.

अगत्यपूर्वक, अ० औदासिन्य टाकून द्यें केलेंच पाहिजे तेथें गेलेंच पाहिजे इ० आकारक बुद्धीनें.

अगत्यवाद, पु० अगत्य प्रथमार्थी.

अगत्यवादी, वि० जाचा अगत्यवाद जास आहे ती त्याचा.

अगत्याचा, वि० अगत्यवादी.

अंगत्वानें, अंगत्वें, अ० तत्स्थानीं तत्प्रतिनिधित्वें करून; उ० मला नफा वल्यास मी आपल्या अंगत्वें दुसरा कोणी पाठविला तर कामास येईल कीं नाहीं.

अंगदशिष्टाई, स्त्री० अंगद सणून वानर होता त्याणें रामाकडून रावणाकडे जाऊन युद्ध नहोतां सामानें सीता द्यावी इ० रूप बोलणें केलें होतें ती; २, ला० कोणा उभयतांची विप्रतिपत्ति असतां कोणी पुरतेपणें न्याय मनास न आणितां उगीच मध्यस्थपणें एकाशीं सामाचें भाषण करूं लागला असतां त्या भाषणास ल०

अगदीं, अगदीँ, अ० विधेयार्थविरुद्धांशाचा ईषन्मात्रही आंत अन्वय नाहीं अशा प्रकारें विवक्षित जो कोणी एक विधि त्याचें वि०; उ० पाऊस अगदीं गेला; तुलास ही पोथी अगदीं दिली, तो अगदीं लहान.

अंगदेवता, स्त्री० कोणेक कर्माची मुख्य देवता तीचा सहवर्त्तमान जो इतर देवता पुजाव्या लागतात त्या प्र०

अंगधटाई, स्त्री० जें कार्य जा युक्तीनें व्हायाचें ती युक्ति मोडून केवळ अंगचा बळानेंच जो प्रयत्न ती.

अंगना, स्त्री० सं० बायको.

अंगधुणें, न० स्त्रियांचें स्नान.

अगप, वि० आगप.

अंगपाँथी, स्त्री० सरकती चे व्यवहारांत सावकारानें आपली सरकत ठेविली असतां सावकारीचे पांथीहून निराळी सरकती संबंधें जी त्याची पांथी असत्ये ती.

अंगपिळा, पु० अंगमोडा.

अगपेण, स्त्री० आगपेण.

अंगप्रस्थान, न० सं० ग्रामांतरादिकांस मुहूर्त्तीनें निघोन जावयाचें असतां कांहीं अडचणीमुळें सुमुहूर्त्तावर आपले गृहांतून निघोन गृहांतरीं जाऊन राहातात तें.

अंगबळ, न० कोणेक कर्माविषयीं अंगधटाई करण्याविषयीं साधन त्वेंकरून विवक्षित जें केवळ अंगचेंच बल तें.

अंगमर्दी, स्त्री० अंगधटाई.

अंगमस्ती, स्त्री० अंगधटाई.

अंगमेहेनत, स्त्री० शेत इ० कांवर शरीरद्वारा जे कष्ट ती.

अंगमोडा, पु० आलस्यादि घालवाया करितां हात, पाय, इ० वांकडे तिकडे करून जो सर्वांगा-

स ताण देतात तो.

अगम्य, वि० सं० जावयास;कि० जाणावयास अशक्य कि० अयोग्य तो.

अगम्या, स्त्री० सं० भगिनी इ० संभोगायास अयोग्य अशा जा धर्मशास्त्रांत स्त्रियापरिगणित आहेत त्या प्र०

अगम्यागमन, न० सं० अगम्या जी स्त्री तीशीं जो संभोग तें.

अगर, अ० हिं० अथवा;२, पु० अगरु;३. दे० आगर.

अंगरखा, पु० कंठापासून गुडघ्यापर्यंत झोकाचा जो गें वस्त्राचें शिवून जें आवरण करितात तो.

अगरबत्ती, स्त्री० हिं० मोठी जी उदबत्ती ती.

अंगरस, पु० वीलें खोबरें, कि० पाला इ० कांचा पाणी न घालतां जो अंगचा च रस काढितात तो.

अंगरास्या, वि० शरीरास आयास न पडे असें अंग राखून काम करण्याचा स्वभाव जाचा तो.

अंगराग, पु० केशर, अरगजा, इ० सुगंधादिद्रव्यांचा अंगास जो लेप करितात तो;व लेपार्थी सिद्ध केलें जें द्रव्य तें.

अगरी, पु० वि० दे० आगरी.

अगरु, पु० चंदनांत एक भेद आहे.

अगरूं, न० तोंडांत जिव्हादिकांस फोड येतात अशी उष्ण विकृति होऊन येती.

अंगरेंटाई, स्त्री० अंगधटाई

अंगरोग, पु० पिशाचोपद्रवानें कि० देवतापराधानें जनित नव्हे असा जो अपथ्यादिकें करून शरीरास रोग उत्पन्न होतो तो.

अंगलट, स्त्री० दे० अंगलोट.

अंगलोट, पु० दे० मनुष्यादिकांचे अंगाची जी देवण तो.

अंगवटा, **अंगवगा**, पु० अंगलट.

अंगवस्त्र, न० नेसायाचे वस्त्रावांचून इतरजें शरीरावर घेतात तें;२, उपभोगार्थ राखिलेली जी वेश्यादि स्त्री तीस ह्न०.

अंगवळण, न० शरीराची जी देवण तें.

अंगवळा, पु० अंगपिळा.

अंगखेटा, पु० भूमीचा धनी, बैल, व अंगमेहनत करणारा, असे तिघांचे तीन घांटे शेतांत असतात त्यांत जो अंगमेहनत करणारा चा घांटा तो.

अंगघात, पु० चालताना अंगाचा वेगानें चलित होतो जो आसपास वायु तो.

अंगवैकल्य, न० विशिष्ट कर्मांचीं प्रधानाहून इतरजीं अंगभूत कर्में त्यांत न्यूनाधिक भाव झाल्यामुळें जें विशिष्टकर्मास वैकल्य येतें तें.

अंगसंग, पु० प्रयोजन नसतां जो कोणेकाचा अंगाचा कोणेकाचे अंगाशीं स्पर्श तो; उ० दूरून बोल अंगसंग कामाचा नाहीं;२, स्त्री पुरुषांचा जो परस्परें उपभोग तो.

अंगसुटका, स्त्री० कोणेक खटल्यापासून विवक्षित लाभ न होणार तर न होवू परंतु मूलद्रव्यादिकांची हानि न होतां जी आपली सुटका ती;२, कांहीं एक व्यवहारांत गुंतला जो त्याची त्यापासून मोकळीक ती; उ० हें काम मीं पत करलें आहे यांतून माझी अंग सुटका झाल्याशिवाय तुझाकडे कसा येऊं.

अगस्ती, पु० एक पुष्पवृक्ष आहे.

अगस्ति, पु० सं० एक ऋषि आहे जो दक्षिण दिशेस नक्षत्ररूपें करून दिसतो.

अगस्त्या, पु० अगस्ता.

अगळ, पु० स्त्री० आगळ.

अगळडाव, पु० आगळडाव.

अगळा, वि० आगळा.

अगळी, अगळीक, स्त्री० आगळीक

अगा, अ० पुरुषास संबोधन द्यायाचें असतां याचा प्र०; २, पु० धोरण; ३, विवक्षितकाळीं विवक्षितकर्म करण्याविषयीं जें चित्तानुसंधान तो; ४, कोणेक गोष्ट कदाचित् झाली तर होईल अशी मनांत एखादे वेळेस जी संभावना झाली असत्ये ती; निषेधविषयीं प्र०.

अंगाई, अ० स्त्रिया मुलांस निजविते समयीं ओव्या म्हणतात त्याचें पालुपद हें असतें; २, स्त्री० मुलांचे भाषेनें निद्रेस म्ह०.

अगाइ, अगाई, अ० अगइ.

अंगांगीभाव, पु० अवयव आणि अवयवानीं आरब्ध जो अवयवी, देहसमुदाय. इ० त्यांचा जो परस्परसंबंध तो.

अगांतुकी, स्त्री० आगंतुकी.

अगांतूक, पु० आगंतुकाचा अपभ्रंश.

अगाध, वि० सं० जाचे खोलपणाचा अंत लागत नाहीं असा जो डोह, उदक, बुद्धि, इ० तो; २, करण्याविषयीं, किं० होण्याविषयीं दुःशक्य जो तो, निषेधविषयीं प्र०; उ० पैकेवानास पाहिजे ती वस्तु मिळवायास काहीं अगाध नाहीं.

अंग

अंगधटाई, स्त्री० आंगधटाई

अगाबानी, स्त्री० बुटीदार एक पांढरें वस्त्र आहे जाचे अंगरखे इ० करितात ती.

अगार, न० सं० गृह; धान्यागार, कोशागार, इ० समास जाणावे.

अंगार, पु० इंगळ.

अंगारक, पु० सं० नवग्रहांतील मंगळ म्हणून एक ग्रह आहे जाचा तारा लाल दिसतो तो.

अंगारकी, स्त्री० सं० मंगळवारीं पडत्येजी संकष्टी चतुर्थी ती.

अंगारा, पु० देवा पुढील धुपारतींतील जो कोळसा, किं० राख भक्तजनप्रसाद रूपानें कपाळीं लाविताततो; २, पिशाचबाधादिनिरसनार्थ स्वाधु. किं० मांत्रिकजन ईश्वराचें स्मरण करून, किं० मंत्रानें अभिमंत्रून धारण करायास जें भस्म देतात तो; ३, जोंधळ्यावर एक रोग पडत असतो जेणेंकरून जोंधळा काळा होतो तो.

अगाव, अ० आगाव.

अंगावरचा, वि० स्तनप्राशन करणारें जें मूल तो.

अगाशी, स्त्री० आगाशी.

अंगिरा, पु० सं० साठा संवत्सरांतील जो साहावा संवत्सर तो.

अंगी, पु० सं० अनेक अवयव मिळून झाला जो एक विशिष्ट पदार्थ तो; २, स्त्री० अंगडें; ३, दे० अंगा.

अंगीकरण, न० सं० अंगीकार.

अंगिकार, अंगीकार, पु० कांहीं एक पदार्थाचें त्याला व्यापारानें आत्मीयताभिमानानें जें विषयी

करण

करण तो; २, पूर्वपक्षदोष, इ० कांचें हें खरें अशा बुद्धीनें जें ग्रहण तो.

अंगिकारणें, अंगीकारणें, अंगीकृत करणें

अंगीकृत, वि० सं० अंगीकार केला आहे जाचा तो.

अंगूर, पु० ओलें द्राक्ष.

अंगुल, न० सं० आरथव रुंदीकडून जोडिलें असतां तीमाला जितकी लांब होती तावद्रूपजें परिमाण. किं० हाताचा बोटाचा रुंदीचें जें परिमाण तें.

अंगुलि, स्त्री० हातास, किं० पायास अग्रभागींप्राय: पांच पांच अवयव असतात ते प्र०.

अंगुलित्राण, न० सं० तीरमारणें इ० समयीं अंगुलींस व्यथा न व्हावी म्हणून कातडयाचा पंजा करून हातांत घालितात तें.

अंगुलिनिर्दिष्ट, वि० सं० अंगुलिनिर्देशानें जो दाखविला तो.

अंगुलिनिर्देश, पु० कोणेक पूर्ववर्ति पदार्थाकडे अंगुल्यग्र करून हा, तो, इ० शब्दानें, किं० संकेतादिकानें जें त्या पदार्थाचें ज्ञापन तो; क्वचित् अंगुलिव्यापार वांचूनही हा ग्रंथ मी करितों इ० रूप शब्दामध्येंच तादृश आकार असतां स्त्री०.

अंगुलिभंग, पु० सं० कोणेकास शाप देते समयीं, किं० अलाय बलाय घेते समयीं स्त्रिया इ० दोहों हातांचीं बोटें एकभागीं मिळवून, किं० कानशिलावर टेकून जो मोडण्याचा व्यापार करितात तो.

अंगुलीयक, न० सं० हातांचे अंगुलींत घालावयाचें वलय

वलय रूप भूषण आहे.

अंगुष्ठ, पु० सं० हात, पाय, यांचा अंगुलिपंक्तीचा शेवटास जो एक एक स्थूल अंगुलि असल्ये ती प्र०

अंगुष्ठपर्व, न० अंगुष्ठाचें जें पेर तें.

अंगूळ, न० अंगुलाचा अपभ्रंश.

अगे, अ० अग.

अगेंमागें, अ० आगेंमागें.

अगो, अ० कों० अगे, परंतु संबोध्यास कांहीं लघुत्वविवक्षित असतां प्र०.

अगोचर, पु० वि० गोचर नव्हे तो.

अगोट, अगोठ, स्त्री० पर्जन्यकालाचा आरंभींचा जो कांहींएक काल तो; २, सर्व पर्जन्यकालास ही सं०.

अगोतली, स्त्री० आगोतली.

अगोदर, अगोधर, अ० विवक्षितक्रियेचा कालाहून पूर्वकाली; उ० अगोदर स्नान मग संध्या; २, कोणीएक मूलभूत आधाराचा बलानें होणारें जें कांहींएक त्यास तादृश आधारत्वें करून पूर्वी; उ० तुला अगोदर नाहीं ज्ञान आणि त्याजला वादांत जिंकणार हें कसें घडेल.

अगोदरचा, वि० अगोदर झालेला, केलेला, इ० तो.

अगोदरील, वि० अगोदरचा

अंगोस्ती, स्त्री० दे० अंगवस्त्र मुख्यार्थी.

अग्न, स्त्री० अग्निशब्दाचा अपभ्रंश.

अग्नि, पु० सं० पंचमहाभूतांतील जें तेजोरूप भूत तो; २, चित्रक; कोणेकावर अग्नीचा पाऊस पडणें, ल० एक समयींच अनेक अनर्थ गुदरणें.

अग्निकण

अग्निकण, पु० सं० ठिणगी.

अग्निकाष्ठ, न० सं० अग्नीनें पेटलेलें जें काष्ठ तें; अग्निकाष्ठें भक्षिणें स्त्री० अग्निप्रवेश करणें.

अग्निकुंड, न० सं० अग्निहोत्रादि संबंधी अग्नि ठेवायाचें जें कुंड असतें तें.

अग्निकुमार, पु० सं० एक रसायन आहे.

अग्निक्रीडा, स्त्री० अतस बाजीनें जी क्रीडा करितात ती.

अग्निपुट, अग्निपुठ, न० मात्रादि करणार्थ तन्न द्रव्यास अग्नीची आंच देऊन जो संस्कार करितात तें.

अग्निप्रवेश, पु० सं० सत्या इ० मरणार्थ जो अग्नींत प्रवेश करितात तो.

अग्निमांद्य, न० सं० रोगादिकें करून जठराग्नीस जें मंदत्व येतें तें.

अग्निमुख, न० सं० एक औषधी-चूर्ण आहे जेणेंकरून क्षुद्बोध होतो.

अग्निष्टोम, पु० एक यज्ञ आहे.

अग्निहोत्र, न० वेदाध्ययनाधिकारी जे ब्राह्मणादिक गृहस्थाश्रमी त्यांनी अग्नी बाळगून नित्य सायंकाळीं प्रातःकाळीं होम करावा इ० रूप कर्म आहे तें.

अग्निहोत्री, पु० सं० अग्निहोत्र आहे जास तो.

अग्न्युत्पात, पु० सं० विद्युदादि अग्नीनें नगरचें नगर जळतें इ० रूप जें अद्भुत होतें त्यास स्त्री०.

अग्या, पुं० आग्या प्रथमार्थी.

अग्यावेताळ, पु० आग्यावेताळ.

अग्र, न० सं० पदार्थमात्राचा जो अंत्यावयव तें; २, विवक्षित पुढला प्रदेश तें; ३ या अर्थी प्रा० समासींअ०; उ० देवालयाचा अग्रभागीं मोठें तळें आहे.

अग्रगण्य, वि० सं० विवक्षित गुणविशिष्ट व्यक्तींचा जो समुदाय त्यांत इतरांहून प्रथम गणनीय स्त्री० श्रेष्ठ तो.

अग्रगामी, वि० सं० जो जाचा पुढें चालणारा तो त्याचा.

अग्रज, वि० सं० आपल्यापेक्षां वडील जें भावंड तो.

अग्रणी, वि० सं० श्रेष्ठ.

अग्रधान्य, न० सं० शरद्ऋतूंत पिकायाचें जें अरगडी, बाजरी, भात, इ० धान्य तें.

अग्रपूजा, स्त्री० सं० सभेमध्ये सर्वापेक्षां विद्या, तप, इ० कें करून जो कोणी श्रेष्ठ त्याची जी प्रथम पूजा करितात ती.

अग्रवर्त्ती, वि० सं० अग्रभागीं जो स्थित तो

अग्रवादी, वि० वादाचा प्रथम उपक्रम करिता तो; उ० या वादांत अग्रवादी कोण प्रतिवादी कोण.

अग्रसर, वि० सं० अग्रेसर.

अग्रहार, अग्राहार, पु० ब्राह्मणाचें कुटुंब पोषणद्वारा ईश्वरप्रीत्यर्थ कोणी राजादिक जी त्यास ग्राम, किं० कांहीं भूमि दान करून देतात तो.

अग्रासन, न० सं० सभा इ० स्थलीं सर्वापेक्षां जो श्रेष्ठ त्यानें बसायाजोगें जें आसन असतें ते.

अग्रिम, वि० सं० विवक्षिताहून पुढचा तो.

अग्रेसर, वि० सं० श्रेष्ठ; २, कांहीं एक कामाचा पुढार घेणारा जो तो.

अग्रोदक, न० सं० हस्त, पाद, वस्त्र, इ० कांचा संमदीनें कचंबलेलें नव्हे असें नदी, इ० कांचें उदक आंत हात न बुडवितां स्वच्छ भांड्यांत भरून आणितात तें.

अग्र्य, वि० सं० अग्रणी.

अघ, न० सं० पाप.

अघटमान, वि० सं० न घडायाजोगें जें तें.

अघटित, वि० सं० हें घडेल अशी संभावना ही जा विषयीं होत नाहीं असें जें कांहीं एक तें: २, लोकोत्तर जें साहसादि कर्म त्यास स०.

अघवा, वि० ग्रं० अवघा.

अघाडा, पुं० आघाडा.

अघाडी, स्त्री० आघाडी.

अंघूळ, स्त्री० स्नान.

अघोर, वि० सं० निघोर: २, पराकाष्ठेचें जें घोर कर्म, अरण्य, रूप, पिशाच, पातक, इ० तें.

अघोरपंथ, पु० सं० अघोरमार्ग.

अघोरपंथी, वि० सं० अघोरमार्गी.

अघोरमार्ग, पु० सं० श्मशानांत राहावें, मद्याचें मांस खावें, इ० रूप आचरणाचें गोंसाव्यामध्यें एकमत आहे तो.

अघोरमार्गी, वि० सं० अघोरमार्गानें वर्तणारा तो.

अघोरी, वि० अघोरमार्गी: २, साहसादिरूप अघोर जें कर्म, किं० तें करण्याचा स्वभाव जाचा तो: ३, वस्त्र, शरीर, इ० मलिन धारण करावें वस्त्रान संध्यादि आचार नीट करूं नये, वस्त्रादि धारण अव्यवस्थित वेडें वांकडें करावें असा जाचा स्वभाव तो, किं० त्याचा स्वभाव, वेष, इ० तो.

अच

अचकटविचकट, वि० बीभत्स जें भाषण, शिव्या इ० तो.

अचूपळ, वि० भारी उत्साती जें मूल इ० तो.

अचंबा, पु० कांहीं एक अद्भुत दर्शनादिकानें बुद्धि थक्क होऊन जावी असा जो अंत:करणांत भाव उत्पन्न होतो तो.

अचंबीत, अ० अचानक.

अचर, वि० स्थावर जो वृक्ष, पर्वत, इ० पदार्थ तो.

अचरपचर, न० अरबट चरबट.

अचरटपचरट, न० अरबट चरबट.

अचळ, पु० सं० पर्वत: २, वि० चळ न व्हे तो.

अंचळ, पु० वस्त्राचा लांबीकडचे जे दोन प्रांतभाग ते प्र०.

अंचवणें, आंचवणें.

अचळ, अ० धक्का इ० कारणानीं इतस्तत: न होतां किं० कांहीं एक विरुद्धादि न पावतां पूर्वीं जसा होता त्याच रूपें स्थित राही असें; उ० हें तोंडीतों डभांडे भरलें आहे अचळ उचलून ठेव, याचा विशेषणवत् करून ही प्रयोग कदाचित् होतो.

अंचळ, पु० अंचळ.

अचळवी, कों० अ० अचळ.

अचळवीवाण, न० पूर्वदिवशीं विरजण घालून मकरसंक्रांतीचे दिवशीं त्यांतील दहीं नकादितां नहालवितां तसेंच नें पावसुडी दह्यांचें जें स्त्रियावाण देतात नें

अंचळी, स्त्री० आंचळी.

अचळोजी, अचळोबा, पु० जो हातानें कांहीं एक

एक कर्म करायाचा नाहीं आणि दुसऱ्यास मात्र बोलावें किंवा रे तूं आळशी तुला कांहीं काम हीत नाहीं इ० रूप स्वभावाचा जो मनुष्य त्यास ल०.

अचाट, वि० लोकसाधारण रीतीचीं जी मर्यादा तीतें उल्लंघून अतिरिक्त विलक्षण जी बुद्धि कल्पना, करणें, बोलणें, खाणें, इ० तो.

अचानक, अ० कांहीं एक होणारें जें कार्य त्यामध्यें अडचण, चूक, इ० रूप प्रतिबंधक, किं० विघातक नयेतां तें तें कार्य सोकर्यानें होण्या करण्याचें वि०; उ० त्या राजानें शत्रूस अचानक धरिलें; त्याणें गोळी मारिली ती अचानक त्या लक्षीं लागली.

अचाल, स्त्री० कांहीं एक कार्याचे निर्वाहास साधनभूत जो पदार्थ त्याचा अलाभामुळें त्या निर्वाहाविषयीं जी अडचण ती.

अचावचा, अचाबचा, वि० ताळतंत नाहीं आणि अतिरिक्त जें भाषण, बोलणें, याचें वि०.

अचिंतित, अ० सं० अकल्पित.

अचिंत्य, वि० सं० मनानें हा इतका इ० रूपें आकलन करायास अशक्य असा जो भगवन्महिमा इ० तो.

अचिर, अ० सं० अल्पकालेंकरून.

अचिरस्थायी, वि० सं० बहुत काल राहाणारा नव्हे तो.

अचूक, अ० ईषन्मात्रही संधान चुकल्यावांचून ग्रंथादिपाठ म्हणणें, येणें, इ०, किं० गोळी, इ० विवक्षित लक्ष्यास लागणें, मारणें, इ० कांचें वि०.

अचूकसंधान, न० गोळी मारणें, प्रश्न सांगणें, तर्क नर्क बांधणें, इ० विषयीं ईषन्मात्रही चुकल्यावांचून कोणेकाचें संधान असतें तें.

अचूकसंधानी, वि० अचूक संधान आहे जाणतो

अचेतन, वि० कळना रहित जो पाषाणादि, किं० मुर्दा इ० तो.

अच्छेर, पु० शेरा चें जें अर्ध तो.

अच्युतफल, न० चूत फलाचा अपभ्रंश.

अज, न० अनेक सदरें वेगळालीं व्हावीं आणि बेरजांचा ताळा पडावा म्हणून सदरवार बेरजांचा एकंदर बेरजेचीजी पंक्ति मांडितात तें.

अज, पु० सं० बोकड; २, ब्रह्मदेव; ३, ईश्वर.

अजगर, पु० केवळ मंद, दंतहीन, निर्विष, असा सर्पांत एक भेद आहे; २, देहप्रारब्धानें काय होणार तें होऊ आपण हात, पाय, इ० अवयवानीं कांहीं एक कर्म करायाचें नाहीं अशी वृत्ति धारण करून जो ईश्वराकडेच लक्ष्य देवून पडला असतो तो; ३, अति आळशी जो मनुष्य त्यास आरोपानें ल०.

अजगरवृत्ति, स्त्री० हितीयार्थक अजगराची जी वृत्ति ती.

अजगूल, वि० कों० कांहीं एक विकृतीनें जाचे नेत्र अधू झाले आहेत असा जो मनुष्यादि तो किं० त्याचे ते तसे नेत्र तो.

अंजन, न० सं० काजळ; २, नेत्रानें स्वच्छ दिसावें, किं० मस्तकांतील शैत्य इ० विकृतीचा निरास व्हावा, किं० भूमींत ठेवलेला पदार्थ दिसावा, इ० रूप विलक्षण नेत्रांत सामर्थ्य यावें म्हणून जें

नेत्रांत औषधादि द्रव्य घालितात तें; ३, नेणें करून नेत्रांस जो उपचार तें; ४, ला० ज्ञानदृष्टि प्राप्त होण्यास साधनजें गुरुकृपा, ईश्वरप्रसाद इ० त्यास स्त्री०.

अजप, अजब, ३लिं० आश्चर्यकारक जी कांहीं गोष्ट इ० तो.

अजम, ३लिं० हिं० महाश्रेष्ठ जो तो; प्रतिष्ठित यवन इ० कांचें नाव पत्रीं लिहावयाचें असतां एतद्विशेषण पूर्वक लिहितात तेथेंच प्र०.

अजमाव, पु० अजमास.

अजमावणें, अजमासणें.

अजमाशी, अजमासी, ३लिं० अजमासानेंच केवळ जाणला तो.

अजमास, पु० कांहीं एक पदार्थनिष्ठ इयत्तेचें स्पष्ट इतकेंच असा निश्चय नहोतां जें ईषदंतरविशिष्ट ज्ञान होतें तो; २, कांहीं एक लक्षणावरून कांहीं एक अर्थाचें केवल निश्चितरूप नव्हे असें जें ज्ञान होतें तो; ३, तादृश ज्ञान उत्पन्न होण्यास साधनभूत जो अंतःकरण व्यापार तो; ४, तदुपयुक्त जें बुद्धिसौष्ठव तो; ५, कांहीं एक व्यवहारांत खर्च किती, जमा किती, इ० कलमें जा कागदावर लिहितात तो.

अजमासणें, अजमासानें जाणणें.

अजमोदा, स्त्री० पु० ओंव्यांत एक भेद आहे.

अजय्य, ३लिं० सं० जिंकावयास जो अशक्य तो.

अजर, ३लिं० सं० जास जरा प्राप्त होत नाहीं असा जो दिव्य देहादि तो.

अजरामर, ३लिं० सं० जास जरा आणि मरण नाहीं असे जे देवादि तो.

अंजलि, पु० स्त्री० सं० कांहीं एक पदार्थ व्यवहारितां, किं० प्रणामार्थ जोडिलेले जें करद्वय तो.

अंजलिपुट, पु० न० अंजलि, तो तें.

अजस्र, न० भारीच मोठा आकार जाचा असा जो मनुष्यशरीरादि पदार्थ त्यास स्त्री०

अजहल्लक्षणा, स्त्री० सं० पदाचा जो शक्यस्वार्थ त्याची विवक्षा असून ही जेथें अर्थांतर विवक्षित असतें अशी जी लक्षणा ती; उ० काकापासून दधि रक्षण कर इ० स्थलीं अजहल्लक्षणा आहे म्हणून दधीला उपद्रव करणारे जे काक, मांजर, इ० त्या सर्वांपासून राखावें असा अर्थ.

अजा, स्त्री० सं० शेळी; २. आदिमाया.

अजा, पु० दे० आजा.

अजागल, अजागळ, ३लिं० अजागलस्तनासारिखा केवल अप्रयोजक स्त्री० कोणतेंच कर्तृत्व जांत नाहीं असा जो मनुष्य, बैल, इ० तो.

अजागलस्तन, पु० एखादे शेळीचे गळ्यास जे स्तनासारिखे दोन अवयव असतात ते प्र०; २, ला० अजागळ.

अजागळी, स्त्री० कों० अर्वाळी प्रथमार्थी.

अजागुरु, पु० दे० आजागुरु.

अजाण, ३लिं० जा व्यवहाराचें जास ज्ञान नाहीं तो त्या व्यवहारीं; २, जो दुसऱ्याचा उपकार जाणत नाहीं तो; ३, जाण नव्हे जो गोमहिष्यादि पशु तो.

अजातशत्रु, ३लिं० सं० दुसऱ्यानें शत्रुत्व केलें तरि आपण त्याशीं विरुद्ध करीत नाहीं अशा स्वभा

स्वभावाचा जो भला मनुष्य इ० तो.

अजापुत्र, पु० सं० बोकड.

अजार, पु० आजार.

अजारी, वि० आजारी.

अजिंक, वि० अजय्य जो वीर, पंडित, इ० तो.

अजित, पु० सं० कोणी कधीं जिंकला नाहीं असा जो ईश्वर तो.

अजित, वि० जाणें याचा योगीं प्र०; अ० कोणेकाचा हातें कोणेकानें पराजित होणें. प्रा० निषेधविषयीं प्र०

अजितपत्र, न० जितपत्र.

अजिन, न० सं० चर्म परंतु प्रावरणाद्यर्थ घेतात जें कृष्णाजिनादि त्याविषयीं लोकांत प्र०

अंजिरी, वि० पिकल्या अंजिराचे रंगासारिखा जो वस्त्रास रंग देतात तो व तद्विशिष्ट जें वस्त्र तो.

अजी, अ० पुरुष, स्त्रिया, यांस महत्त्वानें संबोधन द्यावयाचें असतां याचा प्र०; २. स्त्री० दे० आजी.

अजीं, अ० अगदीं.

अजीबात, अजीबाद, अ० अजीं.

अंजीर, पु० एक फल आहे; २. त्याचें झाड तो.

अजीर्ण, न० भक्षिलेल्या अन्नादिकांचा जठराग्नीनें यथास्थित परिपाक न झाल्यामुळें जी विकृति होत्ये तें.

अजीर्णता, स्त्री० अजीर्ण

अजीर्णविकार, पु० अजीर्णरूपी जो विकार तो.

अजीर्णांश, पु० अल्प स्वल्प जें अजीर्ण तें.

अजुर्दा

अजुर्दा, वि० हिं० विवक्षित कामाची काळजी किं० उत्साह न धरितां उदासीनपणे वागणारा जो तो.

अंजुली, स्त्री० पु० अंजलि शब्दाचा अपभ्रंश.

अजून, अ० अद्यापि.

अजूरदार, पु० हिं० जासूदगिरी, इ० कामाकरितां कांहीं द्रव्य वा यास करून जो गडी करितात तो.

अजूरदारी, स्त्री० अजूरदारपणा.

अजूरा, पु० अजूरदारास देय जें द्रव्य तो.

अजेचीर, न० दे० आजेचीर.

अजेय, वि० सं० जिंकावयास जो अयोग्य किं० अशक्य तो.

अजेसासरा पु० दे० आजेसासरा.

अजेसासू, स्त्री० दे० आजेसासू.

अजोळ, न० दे० आजोळ.

अज्जम, वि० अजम

अज्जी, अ० अजीं.

अज्जीबात, अ० अजीबात.

अज्जुणी, अज्जूण, अज्जून, अ० अजून.

अट, स्त्री० कांहीं एक प्रवृत्त पदार्थाचे किं० व्यवहाराचे वेगास जें प्रतिबंधक कारण तीं: हा सामान्य अर्थ याचा विस्तार कांहीं लिहितों, गाडी, इ० कानीं न चालतां थडकोन राहावें किं० हाराचें कपाट इ० जिनकें पाहिजे तितकें च उघडलें राहावें इ० कारणार्थ जें दगड इ० प्रतिबंधक लाविलें तें; २. वीणा इ० कांचा सूर उंच व्हावा म्हणून दांडावर जी घोडी लाविलेली तीं:

२,अमुक गोष्ट अमुक प्रकारें जर झाली तरच मी हा व्यवहार चालूं देईन इ० रूप जो कोणेकाचा दुराग्रह ती;४,देणें,घेणें,इ० व्यवहारीं सावकार इ० कूळ इ० कांपासून कांहीं एक अर्थी विषयीं नेमकरून घेऊन त्यास अंतर पडलें असतां त्याजवर कांहीं जड ओझें पडावयाजोगा जो लेखादिकांत कांही निर्बंध करून येतात ती;५. घट्ट बसलेला सांधा इ० उचकटावया करितां किं० जड पाषाण इ० ढळवावयाकरितां त्यास वेग उत्पन्न होई असा खिळा,पहार,इ० लावितात ती.

अटक,स्त्री० विवक्षित प्रवृत्तीचा वेग कुंठित व्हावयास कारण जें राजाज्ञा विरोधादिक ती;२.चोरादि अपराधी जनास कारागृहीं ठेवणें इ० रूप जो प्रतिबंध करितात ती;३,अट-चतुर्थार्थी;४. हिंदुदेश आणि यवनदेश यामध्यें मर्यादाभूत एक नदी आहे.

अटकण,न० अडकण.

अटकणें, कोणेकानें कोणेक अधिकरणीं निर्गमाविषयीं कुंठितगति होऊन राहाणें.

अटकळ,स्त्री० अजमास चतुर्थार्थ वर्जकरून.

अटकळणें, अजमासणें;२,अडकळणें.

अटकळपंचविशी,स्त्री० तगदमपट्टी.

अटकाव,अटकावा,पु० अटकप्रथमद्वितीयार्थी;२,अटकेमुळें व्यवहारादिकांस जें कुंठितगतित्व प्राप्त होतें तो.

अटकावणें, अटके असें करणें.

अटकें, न० दे० विड्याचे पानांचें अरवें.

अटखोर,अलिं० अट तृतीयार्थ धरून बसण्याचा स्वभाव जाचा तो.

अटणी,स्त्री० दे० सुवर्णादि धातु अग्निसंयोगानें द्रवरूप करण्याचें जें कर्म ती;२. कांहीं एक अधिकरणा पासून कांहीं एक पदार्थ अंशतः अंशतः निरंतर काढीत असून तें तें अधिकरण तत्तत्पदार्थ न्यूनता विशिष्ट करण्याचा जो व्यापार ती;उ० पर्जन्यानें पृथ्वीवर उदक जें वाढतें तें सूर्यानें शोषणरूप अटणी लाविली आहे त्यामुळें अटलें जातें.

अटणें, दूध,उंसाचा रस.इ० पदार्थ अग्निसंयोगादिकानें जलांश जाऊन घट्ट होई असा करणें;२,अवयव शैथिल्यामुळें मोठ्या आकारानें स्थित जो पदार्थ त्याणें दृढता धरीत धरीत आकुंचित होई असें करणें;उ० दोरास पीळ पडला असतां अटते;नित्य मेहनत केली असतां शरीर अटून बळकट होतें;३,कांहीं एक पदार्थ कार्यांतरीं विनियोग करण्याविषयीं नाहीं असें व्हावयाजोगा विवक्षित कार्याकडे विनियुक्त करणें;४. विवक्षित अधिकरणस्थित प्रा० द्रवरूप पदार्थ सूर्यताप,इ० कारणामुळें न्यून होणें किं० निःशेष होणें;उ० उन्हाळा येतांच गायींचीं दुधें आणि विहिरींचीं जलें अटलीं;याच अर्थी गायी अटल्या इ० रूप तत्तदधिकरणकर्तृक प्र० होतात;५, सुवर्णादि धातु अग्निसंयोगानें द्रवरूप करणें,याचीं उभयविधत्वें करून क्वचित्प्रसिद्धि दिसत्ये स्तव्यून बहुतेक अर्थी सकर्मक लिहिले परंतु अकर्मकता प्रसिद्धतर आहे;६,अडणें या अर्थी कोणी स्त्री०.

अटदार, ३लिं० अटखोर

अटन, न० सं० पर्यटन.

अटपणें, आटपणें.

अटपता, ३लिं० आटपता.

अटपसार, ३लिं० आटपसार.

अटपाअटप, स्त्री० आटपा आटप

अटरफटर, न० कों० लटरफटर.

अटवी, स्त्री० सं० अरण्य.

अटव्यअरण्य, न० गाढ, घोर, जें अरण्य तें.

अटव्यरान, न० अटव्यअरण्य.

अटस, ३लिं० अडस याअर्थीं स्र०

अटळ, ३लिं० विवक्षित स्वस्वकृत्याविषयीं जो कधींही टळत नाहीं असा जो मृत्यु. भाषण, इ० तो.

अटापिटा, पु० कांहींएक कार्य सिद्धीस नेण्याकरितां आमध्यें अनेकप्रकारचे प्रयत्न असतात असा जो सर्व आपली शक्ति खर्चून महा आयास करावा लागतो तो; २. तादृश आयास झाल्यामुळें कर्त्यास जी श्रांतावस्था होत्ये तो; ३, कोणेक अडचणीचा निरसनार्थ अनेकांनीं सर्वशक्ति खर्चून खपत असावें अशी जी अवस्था होत्ये तो.

अटापिटी, स्त्री० अटापिटा.

अटापीट, स्त्री० अटापिटी.

अटाली, अटाळी, स्त्री० उपरि भूमीवर गच्ची करून मोकळें स्थळ करितात ती.

अटींव, ३लिं० अग्निसंयोगानें अटऊन पाहिजे तितकें दाट केलें असें जें दूध, क्षीर, कढी, इ० तो; २. कुस्ती इ० परिश्रमानें घट्ट झालेलें जें शरीर तें.

अटोका, पु० आटोंका,

अटोकाट, ३लिं० आटोकाट.

अटोष, पु० आटोप.

अट्टल; ३लिं० पुरा, परंतु सोदा, चोर, शिनळ, दारूबाज, रांडबाज, शाहाणा, मार्गागमनी, इ० असभ्यगुणविशिष्ट जे त्यांचेंच प्रा० वि०

अट्टहास, पु० सं० कोधाद्यावेशानें मोठ्यानें जें हास्य होतें तो; २, अट्टाहास.

अट्टाहास, पु० कोणेक कार्यसिद्धीविषयीं जीवाचीही आस्थान धरितां जो मोठाच एखादा प्रयत्न करावा लागतो तो.

अट्टीखोर, अट्टीबाज, ३लिं० अटखोर.

अठतीस, ३लिं० ३८.

अठरा, ३लिं० १८.

अठराकाररवाने, पु० राजकीय व्यवहारसंबंधी सैनापत्य इ० अठरा व्यवहाराधिकरणें आहेत ते; २. ला० संसारादिव्यवहारसंबंधीजीं अनेक खटलीं त्यांस स्र०.

अठरारवूम, न० मोठा देश, कि० गांव, इ० कामध्यें ब्राह्मण, वाणी, सोनार, परीट, इ० एक एक जातीचे लोकांचें एक एक प्रकरण अशींजीं अनेकतीं; प्रा० अठरा असतात; उ० या गावांत एक सुकादम नाहीं अठरारवुमाचे अठरावे गळाले आहेत.

अठराधान्यें, न० साळी, गहूं, इ० अठराप्रकारचीं जीं मुख्यधान्ये तीं

अठराधान्याचेंकोडबुळें, अठराधान्याचेंकोडबोळें, न० व्यभिचारिणी, दासी, इ० कांचें जें अपत्य त्यास कि० अनेक जात्यादिकांचा

संकर होऊन विशिष्ट झालें जें जात्यादिक त्यास स्त्र०.

अठरापगडजात, स्त्री० हिंदु आणि मुसलमान या जातींचे पोटचा जा अनेक जाति ती; उ० या यात्रेंत अठरापगडजात मिळाली आहे तेथें सोंयळें ओंवळें काय पुसतां.

अठराबाबू, पु० बाराभाई.

अठराभारवनस्पति, स्त्री० पृथ्वींत यावत् जितकी वनस्पतीची जाति आहे ती.

अठव, पु० आठव.

अठवगिरी, स्त्री० आठवगिरी,

अठवण, स्त्री० आठवण.

अठवणीचा, ३लिं० आठवणीचा.

अठवणूक, स्त्री० आठवणूक.

अठवणें, आठवणें.

अठवर, ३लिं० कों० विवाहयोग्य काल अतिक्रांत होऊन विवाह नहोतां राहिला जो पुरुष किं० स्त्री तो.

अठवें, न० निठवें.

अँठळी, स्त्री० फणसाची बी.

अडायीं, अ० अनाडायीं;२,जांचें नांव घेऊ नये अशीं जीं शरीरांतील गुप्तस्थानें त्यांतील अन्यतमस्थानीं.

अँडी, स्त्री० क्रोधादिकानें भुकुटीचा आसपास जी कपाळाचे कातडीस वळी पडत्ये ती; २, डोक्याचे दिवसांत फकीर हातांत जी नाडयाची सेली घालितात ती.

अडोपहार, अ० अड्डोपहर.

अड्डा

अड्डा, पु० फांशावरील आठपगड्यांचा जो समुदाय तो:

अड्डावन, अड्डावन्न, ३लिं० ५८.

अड्डावीस, ३लिं० २८.

अड्डीं, अ० विवक्षितपगापासून आठवे पगीं.

अड्डेचाळ, अड्डेचाळीस, ३लिं० ४८.

अड्डेताळ, अड्डेताळीस, ३लिं० ४८.

अड्डयेचाळ, अड्डयेचाळीस, ३लिं० ४८.

अड्डयेताळ, अड्डयेताळीस, ३लिं० ४८.

अड्डेहत्तर, अड्डयाहत्तर, ३लिं० ७८.

अड्डयाहात्तर, अड्डयेहत्तर, ३लिं० ७८.

अड्डया, पु० अष्ट संख्यादिचिन्हांकित जें गंजीफांवील पान तें.

अड्डयाण्णव, ३लिं० ९८.

अड्डायशी, अड्डायशीं, अड्डयाशी, ३लिं० ८८.

अंड, पु० वृषण;२, न० अंडें; अंडास लोणी लावणें स्त्र० कोणेकापासून कांहीं कार्य साधून घ्यावयाकरितां त्याचें बहुत आर्जव करणें.

अड, स्त्री० अट,तृतीयचतुर्थार्थी; याचा इतर शब्दाचे मागें योग होऊन कितीएक विशिष्ट शब्द होतात तेथें याचा अर्थ ईषन्यून असा प्रा० होतो; उ० ईषन्यून जो घोडा तो अडघोडा अडधीतर इ०परंतु जे विशेष प्रसिद्ध ते आणि जेथें कांहीं अर्थभेद होतो ते क्रमानें लिहितों.

अंडकटाह, पु० सं० ब्रह्मांडा भोंवतें भूम्यादि अष्ट प्रकृतींचें कवच आहे ती.

अडकण, न० हारादिक जसें बसविलें तसेंच राहावें

हावें

हावें ओंवलेले मणी नगळतां राहावे इ० कारणार्थ प्रतिबंधक खिळा, गांठ, इ० देतात त्याचा योगानें तो तो पदार्थ अडकला जातो तें.

अडकणी, स्त्री० दे० तांदूळ. डाळ. इ० कांचीजी मोठी कणी जी प्रसंगविशेषीं तांदूळ डाळ यांत ही मोजितां येईल अशीजी ती.

अडकणें, अटकणें

अडकत्या, पु० रा० अडकिता.

अडकथा, स्त्री० उपकांत गोष्टीमध्यें त्या अनुसंधानास व्यत्यय यावायोगी जी लहानसान दुसरी गोष्ट निघते ती.

अडकवण, न० अडकण.

अडकळणें, गतिमान् जो पदार्थ त्याणें कांहीं वेग परावृत्त व्हावयाजोगें कांहींएक पदार्थाशीं लागणें; २, जिव्हादोषादिकांमुळें बोलताना मध्येंमध्यें लागणें; ३, कों० अढळणें.

अडका, पु० रुकूयाचा चतुर्थांश तो; स० अडक्याची भवानी तिला सापिक्याचा शेंदूर; जळला तुमचा अडका माझा मूलच लाडका.

अडकाठी, स्त्री० अटकप्रथमार्थी.

अडकाम, न० स्वयंपाक इ० खटल्याचे प्रधानभूत कर्मांहून जीं इतर सडासंमार्जन, भाजाचिरणें, इ० रूप कर्में असतात तें.

अडकामी, वि० अडकाम करण्याचा मात्र उपयोगी असा जो तो.

अडकाव, पु० अटकाव.

अडकावणें, अडके असा करणें; २. न० अडकवण.

अडकिता, पु० सुपारी इ० फोडायाचें एक शस्त्र आहे.

अंडकुली, स्त्री० लहान मुलाचा जो अंडवी.

अंडकूल, न० अंडकुली.

अंडकोश, पु० वृषणाचा भोंवतालें जें आवरण चर्म असतें तें आंतील वृषणासहित.

अडखर्च, पु० संसारादि व्यवहाराचे अन्न, वस्त्र. इ० संबंधीजे नियमित त्याहून जो इतर पानसुपारी, रव्याली खुशाली, इ० संबंधें खर्च होतो तो.

अडखळणें, अडखुळणें, अडकळणें प्रथमार्थी.

अडखोर, वि० अडेल.

अडखोल, न० कों० पुळणवट भूमीस न बांधितां सरासरी खणून विहीर केली असत्ये ती कि० ती विहीर प्रतिवर्षी देपें कोसळून कोसळून भरली असतां अवशिष्ट जी खळी राहत्ये तें.

अडगई, स्त्री० माहालुंग सोलून शिजवून त्यांत दही, हिंग, मीठ, इ० घालून जें तोंडीं लावायास करितात तो.

अडगवणें, भलत्याचरथलीं पसरून अव्यवस्थेनें पडला जो पदार्थ तो तत्तद्योग्यस्थलीं व्यवस्थेनें लाऊन ठेवणें; २, ला० प्रसंगविशेषीं मरणें या अर्थी आरोपानें प्रयोग करितात; उ० सातारी एवढी अडगवली सुणजे मी मोकळा होईन.

अंडगडी, पु० सोंगटी इ० खेळामध्यें आपण मुख्यत्वें खेळून आपले हाताखालीं जे खेळणार एक दोन इ० गडी सर्वांनीं घेतले असतात ते प्र० ला० मुख्यत्वें काम करणारास इतरजे तत्सहायभूत

Mar/491.463/Ka 521 v.1
6.175 dt 5.5.61 R.360/ 2 Vol.
National Library
Calcutta-27.

यभूत असतात त्यांस ल्ल०

अडगल्ली, स्त्री० दे० गांवांत सारे जात येत असतात असे जे थोर रस्ते त्यांपासून एकीकडे जी गल्ली असते ती.

अडगळ, स्त्री० तत्काळीं तत्स्थलीं उपयोग नसतां केवल स्थलाचा अवरोध करून स्थित जो अनेक पदार्थांचा समुदाय ती; २, पु० कों० अडसर.

अडगांव, पु० दे० जामध्यें वाण्याचीं दुकानें वशिष्ट विद्वान् लोकांची वसति व राजकीय व्यवहार इ० नाहीं असा कि० रहदारीचे जे मोठे रस्ते त्यांचे वळणांतील नव्हे असा जो लाहान साहान गांव तो

अडघोडा, पु० दे० केवळ तद्दांतच गणनीय नव्हे प्रसंगविशेषीं मोड्या घोड्यांत मोजाचाचा असा जो तट्टू तो.

अडच, ३ लिं० अडस.

अडचण, स्त्री० समावेशनीय पदार्थास जितका अवकाश पाहिजे तदपेक्षया विवक्षित स्थलीं अवकाशाचा जो संकोच ती. कि० त्या संकोचित स्थलांत स्थित पदार्थास जो दुःस्थितत्वरूप भाव उत्पन्न होतो ती; २. ला० परस्परविरुद्ध अनेक कार्यें एककालीं प्राप्त झाल्यामुळें जी निरुपाय दशा प्राप्त होत्ये ती; ३, कांहीं एक कार्यास साधनभूत जे जितके अनेक पदार्थ लागतात त्यांचा अल्पत्वामुळें कि० त्यांतील कांहींकांचा अभावामुळें कि० प्रतिकूलनिमित्तसत्तामुळें त्या कार्याची दुर्निर्वहता प्राप्त होत्ये ती; ४ कांहीं एक कार्य आवश्यकत्वेंकरून प्राप्त झाल्यामुळें स्वच्छंदता संकोचरूप दशा प्राप्त होत्ये ती.

अडचणणें, मनुष्यादिकानें कार्यादि संबंधि अडचणीनें युक्त होणें.

अडचणूक, स्त्री० अडचण लाक्षणिकार्थी

अडचणें, उ० हस्तादिकांत बांगडी इ० पदार्थ अडचे होणें; २, ओझें इ० आंवळून बांधणें.

अडचीं, स्त्री० कों० गाय इ० कांचें दूध काढत्ये समयीं इकडेतिकडे फिरत्ये लाथा मारत्ये म्हणून प्रतिबंधार्थ तिला अडचण म्हणजे दोहोंकडे दोन बांसे इ० बांधितात ती.

अडच्च, ३ लिं० अडस.

अंडज, ३ लिं० सं० अंडापासून जांची उत्पत्ति होत्ये असे जे पक्षी, सर्प, इ० प्राणी ते प्र०

अडजात, स्त्री० दे० आडजात.

अडण, न० पशुस्त्रियांची जी ओंटी तें; २, स्त्री० सुपाचे शेवटास जी मोठी काठी घालितात ती.

अडणी, स्त्री० शंख कि० भोजनाचें पात्र देवाघाकरितां तिवई सारिखा धातुमय कि० लांकडाचा जो आधारभूत पदार्थ करितात ती.

अडणूक, स्त्री० अडतृतीयार्थी.

अडणें, गतिमान् पदार्थ व्यवहार इ० कानें कांहीं प्रतिबंधकमध्यें आल्यामुळें कुंठितगति होऊन स्तब्ध राहाणें; २, कोणी एक मनुष्यादिकानें अडतृतीयार्थ घेऊन वसणें; ३, घोडा इ० कानें स्वभावदोषामुळें कि० पुढें कांहीं भय दिसल्यामुळें चालतानामध्यें स्तब्ध होणें.

अडत, स्त्री० सराफी इ० व्यवहारांत जे पैसे त आपलें दुकान स्वतंत्र नाहीं तेथें प्रसंगीं आपली हुंडी सकराफी, पाहिजे जिन्नस तो आणवावा, पारखावा, इत्यादर्थ दुसऱ्याचे दुकानीं सोय करून ठेविली असत्ये

सत्ये ती; २, तें कामकाज करण्याबद्दल जें त्या दुकानदारास देय कबूल करतात ती.

अडती, स्त्री० अडणूक; २, अटद्दिनीचा अर्थी.

अडतीस, ३लिं० अठतीस.

अडतें, न० पाहाणें याचा योगीं प्र०, अ० कोणेकाचा कांहींएक व्यवहार अडल्यामुळें त्यास आलेली जी संकटावस्था ती पाहून अंगीं सामर्थ्य असतां निरसन न करितां राहाणें; निषेध असतांच मा० प्र०.

अडत्या, पु० जाचे दुकानीं जानें अडत केली तो त्याचा.

अंडत्रास, पु० अकस्मात् कांहीं एक नय उत्पन्न झाल्यामुळें अंडकुल्यावर उचलाया जोगी जी अवस्था प्राप्त होत्ये ती.

अडथळणें, चाललेल्या व्यवहार इ० कांस अडथळ्यानें युक्त करणें.

अडथळा, पु० प्रवृत्त व्यवहार इ० कांस प्रतिबंध जो राजाज्ञा, इ० कानें होतो तो; कि० तें प्रतिबंधक राजाज्ञादि तो.

अडदांड, ३लिं० दे० कांहीं अडाणी असून दांडगेपणाचा स्वभाव जाचा तो.

अडदाळ, स्त्री० दे० दाळींतली जी अडकणी ती.

अंडधरणी, स्त्री० आंडधरणी.

अडधोतर, न० दे० प्रसंगीं धोबाचें काम कराया-जोगा जो मोठा पंचा तें.

अडनाड, ३लिं० दे० अडनीड.

अडनाव, न० दे० प्रतिव्यक्तीचा नावाहून वेगळें विशिष्ट कुलास जें नाव असतें तें.

अडनीड, अडनेड, ३लिं० दे० संख्या, परिमाण, इ० कमांचीं जीं प्रसिद्ध प्रसिद्ध नियमित शेंकडा, हजार, मण, खंडी, इ० स्थानें त्यांतें सोडून अधली मधलीच जी संख्या, परिमाण, इ० म्हणजे जो हिशेब, इ० कांचे सोईस धड येत नाहीं तो: उ० एक रुपयाचें होईल तें भातनें कि० मणभरनें अडनीडअ करा पायली नेऊं नको; आंत तरी बेस नाहींतर बाहेर तरी बेस मध्येंच अडनीड बसूं नको.

अंडपंचा, पु० केवळ लांबी रुंदीस लाहान जो पंचा तो.

अडपअडप, अ० चोरून मारून शिनळकी करणें, चोरी करणें, इ० कांचें कि० लोकांचा विशेषें करून समजुतीस न यावया जोगें कि० जमेस न यावया-जोगें, कामकाज करणें इ० कित्येकांचें वि०

अडपतादडपता, ३लिं० कोणी बायगी वर्त्तणूक करूं लागला असतां त्यास शिक्षा उपचारें करून वाटेवर आणणारा जो मातापितरें राजा इ० त्यास ल०.

अडपेंठ, स्त्री० दे० चोहों कडून अनेक प्रकारचा माल येऊन जेथें तादृश उदीम होत नाहीं अशी जी लहान पेंठ ती.

अडफोंटा, पु० दे० सुरळीतपणानें बोलून चालून उरायांत आला जो कांहींएक अर्थ तो उराव बिघडाया जोगें जें नवें चउकरून निमित्तवादी, प्रतिवादी, इ० कादितो तो; काढ, फोड, घे, यांचा योगीं प्र०; २, कांहींएक होणार कार्यांत कोणेकानें घातलें जें विघ्न तो, घाल धातूंचा योगीं प्र०.

अडबंक, अडबाँक, ३लिं० दे० कोणत्याही कामाची सोय सांगितली असतां जाचा ध्यानांत येऊं

नये असा केवळ अडाणी असून कांहीं लांदस ही जीतो.

अडबाजू, स्त्री० दे० दृष्टि किं० जाणारा मनुष्य इ० कांचा प्राथमिक जिकडें संचार होतो त्या प्रदेशाहून एकीकडचा पार्श्वातील किं० देशांतर्गत जो प्रदेश तो; प्रा० प्रथमांत प्र० नाहीं.

अडबाप्या, पु० दे० बालत्वगेलें परंतु केवल प्रौढत्व जास आलें नाहीं असा पंधरा सोळा वर्षांचे वयाचा जो पुरुष तो.

अडबायको, स्त्री० दे० दाहा अकरा वर्षांचे वयाची जी मुलगी ती.

अडमड, स्त्री० समीपस्थ पदार्थांस उपद्रव व्हावा-जोगा निश्चलपणें नव्हतां उगीच इतस्ततः अंग परिवर्तन करण्याचा जो व्यापार तो.

अडमडणें, पोर इ० कानें अडमड करणें; २, रा० कोणेकास अडमड करीत असावें असा चाळा लाम-णें.

अडमडा, पु० कों० अंमवळा.

अडमडया, वि० दे० निरंतर अडमड करण्याचा स्वभाव आंचा तो.

अडमळणी, स्त्री० कोणेकापासून कांहीं एक कार्य करून घ्यावयाकरितां आर्जवार्थ जें निकृष्टपणाचे व्यापार करावे लागतात ती.

अडमाप, न० दे० सवातीनशेरी, साडेतीनशेरी, इ० रूप जीं प्रसिद्ध मापें असतात त्या एकाशीं ही बरो-बर न मिळतां मध्यवर्ति प्रमाणाचें पायली अधो-ली इ० माप असतें तें.

अडमार्ग, पु० दे० अडवाट.

अडमुठ्या, वि० दे० अडाणी.

अडमुशी, वि० श्वास निरोध झाल्यामुळें जाचा जीव व्याकुळ झाला तो.

अडमुसणें, अडमुशी होणें.

अडरान, न० दे० जास गांवाची किं० मोठे मार्गाची लगट नाहीं असें जें एकीकडे अरण्य प्राय स्थल तें; २, ला० वादप्रतिवाद प्रसंगीं बोलण्याची रीति सोडून जी वांकडी रीति कोणी स्वीकारितो तें.

अडवट, न० तुळई इ० व्हावयाजोगें तोडलेलें मोठे जें लांकूड तें.

अडवळण, न० विवक्षित स्थलीं जाणें, येणें, या-चा जो मार्ग त्याचे वळणांतला नव्हे जो प्रदेश तें

अडवळणी, वि० अडवळणांत स्थित जो ग्रामा-दि तो.

अडवा, वि० विवक्षित क्षेत्रादिकाचा रुंदीकडे लांबी करून स्थित जो पदार्थ तो; २, उर्ध्वाधर किं० आपल्या समोरचें ही सूत्र सोडून पूर्वपश्चिमदक्षि-णोत्तर इ० किं० आपल्यास वामदक्षिणरूप जीं सू-त्रें त्यांतें स्वदेर्ध्यानें व्यापून स्थित जो पदार्थ तो; अडवा येणें स० कांहीं एक स्थलादि लक्षून गमना-दिकार्यी प्रवृत्त जो त्यास प्रतिबंधकलें करून को-णेकानें मध्यें उपस्थित होणें. याच अर्थी अडवा येणारा जो तिकडील भाषण असतां अडवाजाणें असा प्र० होतो आणि अडवा होणें असा उभय साधारण प्र० याच अर्थी होतो; कोणी शिष्टादि आपल्याकडे येत असतां तत्सत्कारार्थ आपण प्रत्युद्गम करणें हा अर्थ तिन्ही प्रयोगांचा होतो; अ-डवेंयेणें स० गर्भस्थित जें अर्भक त्याणें सरळपणें

बाहेर न पडतां वांकडें होऊन प्रसूति द्वारासीं अडचून राहाणें. स० अडवें आलें असतां कापून काढावें; अडवें पडणें स० उभयतांचा कलहादि निवारणार्थ मध्यें कोणेकानें सामादि करणार्थ उपस्थित होणें; कि० क्रोधावेशादिकानें कांहीं एक कर्मावि षयीं प्रवृत्त जो कोणी त्याचे पुढें तत्क्रोधादि शांत्यर्थ लोटांगणें यालणें, कि० लोळण घेणें; अडवें घेणें स० भाषणांत अडफांदा घेणें; जीभ अडवी घालणें स० चांगलें बोलायास येत असतां लडिवाळपणा इ० कारणासुळें बोबडें बोलणें; देवालय इ० कांस अडवें घालणें स० सरासरी त्यास प्रदक्षिण पडे असें आपण फिरणें: अडवें नेसणें, लावून घेणें इ० स्थलीं स्त्रियांनीं चांगल्या चुण्यानकादितां यथाकथंचित् आच्छादन होई असें वस्त्र नेसणें.

अडवाट, स्त्री० राजमार्गाहून इतर लहान सान जी वाट ती; २. मळलेल्या वाटेचा अजूबाजूचा जो प्रदेश जेथें चाललें असतां कांटा लागेल ही संभावना असत्ये ती.

अडयातिडवा, ३लिं० केवळ उभा नव्हे केवळ आडवा नव्हे असा जो वांकडा तिकडा तो.

अंडवृद्धि. स्त्री० वातोपद्रवानें वृषणास जें स्थूलत्व येतें ती.

अडवें. न० उडवें.

अडवेळ. स्त्री० जो कार्याचा किं० कर्माचा जो मुख्य समय त्याहून जो मागला पुढला समय ती; २. ग० गंमतीनें मुलानीं जेवायाचें तें सूर्यास्तापूर्वी घटिका दोन घटिका दिवस असतां जेवतात तो काळ

काळ.

अडशेरी, स्त्री० चाकर, कुणबीण, इ० कांस पोटासाठीं जें धान्य देतात ती; २, अडीच शेरांचें जें वजन ती.

अडस, ३लिं० विवक्षित छिद्रादिकांत मोठ्या अडचणीनें प्रविष्ट होतो जो कांहीं एक पदार्थ तो, किं० त्या पदार्थाचा प्रवेशास अडचण व्हावा जोगें जें तें अधिकरण तो; २अ० अंबळून, बांधणें इ० कांचें वि०.

अडसट, ३लिं० अडसष्ट.

अडसट्टा, पु० प्रा० अजमास या अर्थी.

अडसणें, दे० शूर्प व्यापारानें तांदूळ इ० धान्य विवक्षितानुरूप करणें.

अडसंधि, स्त्री० दोहों मांड्यांचा मूळप्रदेशीं आंतील संधीचा जा दोन अडचणींचा जागा आहेत त्या प्र०; कारवेंतील कानाचा मागील इ० जा अडचणींचा जागा त्यांसही क्वचित् स०

अडसर, पु० दरवाजा लावला असतां नउघडावा म्हणून जें आडवें लांकूड मागें लाविलेलें तो.

अडसष्ट, ३लिं० ६८.

अडहत्तेर, अडहत्यार. न० बंदूक, पट्टा, तरवार. इ० जीं मुख्य हत्यारें त्याहून इतर जीं कटार. पेषकब्ज, इ० लहान हत्यारें तीं प्र०.

अडहत्तेरी. अडहत्यारी, ३लिं० अडहत्यार मात्र बाळगणारा जो शिपाई तो.

अडाँरव, पु० अजाचा जो रेघ ओढिलेला तो.

अडाणचोट. पु० अडाण्यास निंदावयासीं स०.

अडाणपट्टी, स्त्री० गावांत शेत भात न करितां

इतर

इतर कांहीं उद्योग करून पोट भरून राहाणारी जीं तेली तांबोळी इ० कुळें त्यांपासून कांहीं सर्कार जी पट्टी घेतें ती.

अडाणी, ३लिं० कोणतें कर्म करण्याची हातवटी जास साधत नाहीं असा जो केवळ अकुशल मनुष्यादि तो; २. आ कर्मांत जो अनभ्यस्त तो त्या विषयीं.

अडावा, पु० देणें, घेणें, इ० व्यवहारसंबंधी खतावणी करून उधार घेण्या देण्याची जी कुळार गवार यादि लिहून झाडा काढितात तो.

अडिवाळ, ३लिं० कों० हट्टी, प्रा० पोरांवर व्यवहार.

अडी, स्त्री० अडी प्रथमार्थी.

अडीच, अडीज, ३लिं० अर्धा अगळे जे दोन ते.

अडीचकें, न० शंभरांपर्यंत जो अडचांचा लेखशिकिविनात तें.

अडील, ३लिं० अडेल.

अंडील, ३लिं० नाचा अंड वडविला नाहीं असा जो बैल, टोणगा, इ० तो.

अंडुकली, स्त्री० अंडकुली.

अडुसष्ट, ३लिं० अडसष्ट.

अडुळसा, पु० एक औषधी झाड आहे.

अडू, पु० देवळ, घाट, इ० कांचा चिरेबंदी कामाचे दगड बसविलेले निरवळून येत याजकरितां दोहों दोहों दगडांस जी लोहादिकांची एक एक पट्टी भोंकें पाडून गोकून बसवितात ती; २, सुतारांचें एक औत आहे.

अडेल, ३लिं० द्वितीय तृतीयार्थक जें अडणें तद्विषयीं स्वभाव जाचा तो.

अडोशीपडोशी, ३लिं० जो जो गृहादिकांचे केवळ शेजारी, किं० कांहीं पलिकडे राहाणारा मनुष्य, वृक्ष, शेत, इ० तो त्याचा.

अडोशींपडोशीं, अ० गृहादिकांचें मुख्य स्थलाहून इतर आसपास आडऊड कोना कोंपरा इ० रूप स्थल त्याचाठायीं.

अडोसा, पु० कांहीं एक पदार्थ आड असल्यामुळें प्रदेशास जें अंतर्हितत्व येतें तो.

अड्डा, पु० एक पुरुष आपण नाईक होऊन अनेक भाडेकरी, भोई, जासूद, इ० हातावाखालीं घेऊन जास भाडेकरी इ० कांची गरज लागेल त्यास द्रव्य घेऊन तें तें देत असावें असा जो कारखाना कोणी करितो तो किं० त्या कारखान्याकरितां जें शालादि बांधितात तो; २, कोणेकस्थलीं एक व्यवहार कर्त्ते जे अनेक लोक ते मिळून तद्व्यवहारोपकरणभूत जी सामग्री ती निरंतर यथायोग्य मांडलेली असून जो त्या व्यवहाराचा प्रवृत्तपणा चाललाअसतो तो किं० तें स्थळ; उ० गंगोबा गोसाव्याकडे नेहेमी गाण्याचा अड्डा आहे; २, कोणेक विद्या, कला, इ० कांचा जो कोणी बाणा बाळगतो तो; उ० अरे तूं शिपाइगिरीचा अड्डा बाळगतोस आणि चोर येतांच पळालास का.

अड्डेबाज, ३लिं० अड्डा तृतीयार्थ बाळगतो तो.

अड्डेबाईक, ३लिं० अड्डेबाज.

अड्याल, अ० अलीकडे.

अढळ, ३लिं० ढळून इतस्ततः व्हायाचा नव्हे किं० नष्ट व्हायाचा नव्हे असा शाश्वतभाव पुरलेला चिरास्तंभ इ०, किं० अधिकार इ० तो; २, पु० कों

कपदार्थ किं० गोष्ट कचित्‌स्थलीं आपल्यास आढळल्यामुळें हा एथें आहे इत्याकारक जो बुद्धीचा द्वारां संस्कार झाला असतो तो; २, कोणेक विषयाची हा अमुकस्थलीं आहे इ० रूप जी इंद्रियगोचरता होत्ये तो.

अढळणें. आपण तदर्थ-च चक्षुरादि व्यापार नकरितां साहजिक कांहीं एक विषय-चक्षुरादि ज्ञान विषय होणें.

अढळपद, न० जें कधीं ही ढळत नाहीं असें जें ध्रुवाचें स्थान किं० वैकुंठादि ईश्वर स्थान तें.

अढा, पु० मोठी जी दोरी-ची अढी तो.

अढाळ, ३लिं० कों० आधेयास जे वढें पात्रादिरूप अधिकरण असावें तदपेक्षया अतिशयित जें मोठें पात्र, गृह, इ० तो.

अढी, स्त्री० आंबे इ० फळें पिकवाया करितां वर रवाली गवत इ० घालून जी त्यांची रचना करितात ती; २, सूत, दोरी, इ० कांस कांहीं दूण पडोन त्या मध्यें दुसरी दोरी इ० पदार्थ अडकायाजोगा जो ग्रंथिसारिखा आकार विशेष होतो ती किं० काष्ठ इ० कांभोंवताली गुंडाळलेली दोरी इ० नरुटावी लणून केवळ गांठ न देतां जो त्या सारखा आकार विशेष करितात ती; ३, पायलांब पसरून एकावर एक चढविला असतां जी रचना होत्ये ती; ४, फालगूनी अमावास्येस देवालयांत कोणी ज्योतिषी पुढील वर्षीं काय शुभाशुभ होईल हें जाणायाकरितां अढगधान्यें अढरा खड्यांत घालून पानानीं झाकून ठेवून प्रतिपदेस तीं पाहिलीं असतां तज्ज्ञापक चिन्ह तेथें दृष्टीस पडतें असा भविष्य पाहण्याचा प्रकार आहे ती; ५ शेतांत धान्य ठेवाया करितां कडब्याचें घर करितात ती; ६, कोणेकानें आपलें अप्रिय केलें असतां त्या विषयीं अंतःकरणांत धरिला असतो जो विरुद्ध भाव ती; ७, अंगी प्रथमार्थी.

अढें, न० गृहादिकांचा दोहों पांख्यांचा मध्यें जें लांब लांकूड घातलें असतें तें.

अढेवेढे, पु० कांहीं एक भाषणांत दुसऱ्याचे आकलनांत आपण सांपडूं नये इ० कारणार्थ सरळमार्ग सोडून जे कोणी अडफोटे घेतो ते; २, गान, पुराण इ० कांमध्यें विशोभित दिसायाजोगे अतिरिक्त आणि वांकडे तिकडे जे कोणी सूर घेतो ते.

अढ्याकरवत, पु० जास धरायास दोंहीकडे लांकडा-चा मुठीमात्र लावलेल्या असतात असा जो करवत तो.

अणकुची, स्त्री० शस्त्रादिकांचा अग्रभागचें जें केवळ बारीक टोंक ती.

अणरवर, ३लिं० नारायणपेठी चांगली फर्माशी रव्या रंगाची जी लुगडीं इ० जें वस्त्र तो.

अणरवी, अ० पुनः; उ० एकदां भेटीस गेलों होतों मग अणरवी कशाला जाऊं; २, आणि; ३, विवक्षित कार्यार्थ संख्यापरिमाणादिरूपें करून संगृहीत जो पदार्थ त्याहून केवल भिन्न किं० तदितर तत्सजातीय अधिकरूपानें विवक्षित जो तो; उ० जें सांगायाचें होतें तें सांगितलें अणरवी काय सांगूं; भात वाढलास तितका पुरत नाहीं अणरवी वाढ; ४, भिन्नभिन्न रूपानें स्थित जे ते प्र०, परंतु एकरूपता विवक्षा प्रसंगीं प्र०; उ० काल-चा पूर्वपक्ष अ-

णारी आजचा पूर्वपक्ष अणारी तो आणि हा कांहीं एक नव्हत.

अणरुरणें, क्रि० दुधाचा पान्हा दाटल्यामुळें ओटी, आंचळ. ताठणें.

अणणें, आणणें.

अणवाणी, ३लिं० अनवाणी.

अणिमा, स्त्री० सं० अष्टसिद्धींतील एक सिद्धि आहे, जीनें करून अणुप्राय स्वरूप धरितां येतें ती.

अणी, स्त्री० अणकुची; २, अ० आणि.

अणीक, अ० अणखी.

अणीदार, ३लिं० अणी आहे जास तो शस्त्रादिक तो.

अणीबाणी, स्त्री० आणीबाणी.

अणु, पु० सं० जास अवयव नांहीं असा केवल सूक्ष्म जो पृथिव्यादिकांचा विभाग तो; २, ३लिं० तत्परिमाणक जो केवल सूक्ष्म कांहीं एक पदार्थ तो.

अणुमात्र, ३लिं० सं० ईषन्मात्र.

अणुरेणु, पु० सं० गवाक्षांतून पडलेल्या सूर्यकिरणांतच जांचें प्रत्यक्ष होतें असे जे केवल सूक्ष्म पृथिव्यंश ते प्र०.

अण्णा, पु० पुरुषाचें प्रतिष्ठा नाम आहे.

अंत, पु० सं० मूर्त्तामूर्त्त सर्व पदार्थांची समाप्ति जेथें होत्ये तो प्रदेश; २. प्रध्वंसाभाव; ३, चालले - ल्या कांहीं एक व्यवहारादिकांचा जो परमावधि तो; ४, अ० पर्यंत, विद्या, अध्ययन, इ० कांची इयत्ता विवक्षित अंशावधित्वें करून वर्णनीय असतांच प्रा० समासीं प्र०; उ० याणें भाष्यांत व्याकरण आणि गदाधर्यंत न्याय सटला आहे.

अंत

अंतः अ० सं० आंत; अंतस्थित, अंतर्गत, इ० समासीं प्र० कंचित् याचा उपसर्गी सारिखा दुसऱ्या शब्दाशीं योग झाला असतां अर्थांतरही होतें.

अतएव, अ० सं० याच कारणास्तव.

अंतक, पु० सं० यम; २, जो जाचा संहारकारक तो त्याचा.

अंतःकरण, न० सं० मन; मन, बुद्धि, अहंकार, चित्त, अशा जा चार जीव वृत्ति आहेत त्या प्र०.

अंतःकरणचतुष्टय, न० सं० मन, बुद्धि, अहंकार, चित्त, हीं चार मिळून जें तें.

अतःकारणात्, अ० सं० अतएव.

अंतकाल, पु० सं० मरण समय; स्व० अंतकाला पेक्षां मध्यान्हकाल कठिन आहे; २, कार्यमात्राचा जो उपसंहार समय तो.

अंतकाळ, पु० अंतकाल.

अंतडी, स्त्री० अंतडें.

अंतडें, न० प्राण्याचे पोटांत धातुविशेषाचा दोरी सारिखा अवयव असतो तें.

अतत, अ० कोणेक गोष्टीचा अतिशयितपणाचा अनुभव आला असतां हा उद्गार निघतो; उ० अतत केवढा हो नदीस पुर आला.

अतत्यायी, ३लिं० जाचा क्रोधावेश स्वाधीन नाहीं अतएव क्रोध आला असतां भलतें च साहस करण्याचा स्वभाव जाचा तो.

अंतःपट, पु० विवाहकाळीं वधूवरांचे वसुजींत बटु आणि आचार्य यांचे मध्यें जो वस्त्राचा पडदा धरितात तो.

अंतः

अतःपर, अ०सं० कोणेकगोष्टीविषयीं प्रतिज्ञादि रूपजें भाषण तत्समयाहून अनंतर निरवधि प्रा० निषेधविषयीं प्र०.

अंतपार, पु०सं० कोणेकपदार्थाची इयत्ता समजायास कारणीभूत जो त्याचा पलीकडचा अवधि तो निषेधविषयीं प्र०; उ० ग्रं० गोकुळींचा सुखा अंतपार नाहीं लेखा.

अंतःपुर, न०सं० राजादिकांचा भोग्य स्त्रियांची राहाण्याची जी जागा तें.

अंतःपाती, वि०सं० जा समुदायाचे पोटींच जाची गणना होत्ये तदंतःपाती तो; उ० मी शास्त्री-बावांचा व शिष्यवर्ग तःपाती आहें.

अंतर, न०सं० विवक्षित उभयपदार्थाचा मध्यवर्ति व्यवधायक जें देश, काल, इ० तें; २, विवक्षित प्रमाणादिकांशीं विवक्षित प्रमेयादिक तुल्य होण्यास प्रतिबंधक जो परस्पर न्यूनाधिकभावादिरूपभेद तें; ३, कोणीएक विषयीं केलेल्या नियमांतजी चूक तें, पड, हो, धातूंचा योगीं प्र०; ४, विवक्षित अंकराशींतून जें न्यूनीकरण तें; कोणेकानें कोणेकास अंतर देणें स० आपले सुखदुःखाचे विभागी जे पोष्यवर्गादि त्यांस स्ववियोगादि दुःखांत सोडून जाणें; ५, अंतर्यामः ६, परस्परांचें विवक्षित लेहादि संबंधाचा जो खंड तें; ७, पदार्थमात्राचे आंतला आणि बाहेरला हे जे विवक्षित दोन भाग त्यांतून आंतला जो भाग तें; या अर्थी प्रा० अधिकरणार्थ प्रधान लोकीं प्र०; उ० याचे अंतरीं ज्वर भिनला; पात्रांतरीं वाजति दुग्धधारा; ८, विवक्षिताहून इतर या अर्थी समासींच प्र०; उ० इतर जो देह तें देहांतर, जन्मांतर, इ०.

अंतरंग, वि०सं० आत्मीय कोटिस्थित जे अनेक पदार्थ त्यामध्यें जो अपेक्षां जवळचा तो त्याहून तसेंच कर्म, हिताहित, इ० तो; उ० स्त्रीपेक्षां ही आपले शरीर अंतरंग; सर्कारी कामापेक्षां घरचें काम अंतरंग असतें.

अंतरणें, उ० विवक्षित क्रियादिकमानुरोधानें जा कर्मादिकांचा समय प्राप्त झाला तें कर्मादि न करितां तो समय अतिक्रांत करणें, कि० तें कर्मादिक त्या समयीं न करितां ठेवणें, २, मुकणें; उ० मला बायको अंतरली तरी अंतरे परंतु भगवद्भजन सोडणार नाहीं.

अंतरपाट, पु० अंतःपटाचा अपभ्रंश.

अंतरमाळा, स्त्री० पोटांतील आंतड्यांचे समुदायास भय, शोक, क्षुधा, तृषा, इ० कांचा अतिशय तद्विकृति द्वारा वर्णाचा असतां त्य०, शोक, शोष, बाळ, सुक, इ० धातूंचा योगीं प्र० नित्यें अनेकवचनांत.

अंतरवही, स्त्री० अनुक्रमानें लागत गेलेले जे अनेक स्वामिक भूभाग त्यांचा भेदार्थ मध्यें मध्यें जा अडव्या वह्या असतात त्या प्र०.

अंतरविटाळ, पु० जाचा स्पर्शानें विटाळ व्हावयाचा असा जो शूद्रादिक त्यास साक्षात्स्पर्श न-सतां तत्संबद्ध तृणादि स्पर्शानें जो विटाळ होतो तो.

अंतरसाल, स्त्री० वृक्षादिकांचे सालीचा केवळ बाहेरचा जो भाग तो टाकून आंतली जी साल ती.

अंतरसाक्ष, अंतरसाक्षी, पु० अंतर्यामाचा साक्षी ईश्वर, योगी, इ० किं० आपला आपण तो.

अंतरा, पु० अंतर प्रथमार्थी.

अंतरागमन, न० वादी प्रतिवादी, गुरुशिष्य, पतिस्त्री, इ०कांचा मधून जें कोणेकाचें गमन तें.

अंतरात्मा, पु० सं० जीवात्मा.

अंतराय, पु० विघ्न.

अंतरास्पर्श, पु० कोणीएक पदार्थाचा साक्षात् स्पर्श नहोतां यत्किंचित् द्वारा जो स्पर्श तो.

अंतराळ, न० पृथ्वीरूप जो आधार तद्विना जें आकाशरूप अधिकरण तें.

अंतरित, वि० क्रमप्राप्त असून नत्तत्समयीं अंतरलेलें जें कर्मादिक तो.

अंतरिक्ष, न० सं० अंतराळ; २, अ० अंतराळीं.

अंतर्गडु, पु० कांहीं एक विवक्षित अर्थाची सिद्धि अन्यथाच होत असतां कारण सामग्रीमध्यें अप्रयोजकपणें जो कोणीएक अर्थशिरला असतो त्यास स्त्री०.

अंतर्गत, वि० आंतील.

अंतर्गळ, पु० वातरूप रोग आहे, जेणेंकरून अंडवृद्धि होत्ये तो.

अंतर्गृह, न० पाकशाला, माजघर, इ० रूप गृहाचा आंतला विभाग तें.

अंतर्दाह, पु० स्पर्शवेद्य तादृश संताप नसतां अभ्यंतरींच ज्वर, पित्त, इ० कारणानें दाह असतो तो.

अंतर्दृष्टि, स्त्री० बहिःप्रवण जी चित्तवृत्ति असत्ये तीच निजगुणदोषादि विचार करायास आत्मप्रवण केली ती.

अंतर्धान, न० पूर्वी दृष्ट जो पदार्थ त्याची दृष्टीस न पडायाजोगी गुप्त रूपें करून जी स्थिति तें; २, तादृश स्थितीस कारणभूत जें पडदा, माया पटल. इ० तें.

अंतर्धायक, वि० जेणेंकरून अंतर्धान घडतें तो.

अंतर्ध्यान, न० सं० ध्यानरूप जो समाधि तें.

अंतर्निष्ठ, वि० निवृत्तिमार्गाकडे विशेषेंकरून जाची निष्ठा असत्ये तो; २, समाधिलाग ल्यामुळें प्रापंचिक भान जाचें गेलें तो.

अंतर्बाह्य, अ० आंत आणि बाहेर; उ० कोणताही व्यवहार अंतर्बाह्य पाहिल्यावांचून समजत नाहीं; २, न० अंतर्यीम आणि बाहेरचा जो भाव अशी दोन मिळून तें; उ० या गृहस्थाचें अंतर्बाह्य शुद्ध आहे.

अंतर्भाव, पु० व्यापक धर्मीकांतामध्यें व्याप्य धर्मीकांताची विवक्षित जी अन्यथाभूपतें करून स्थिति असत्ये तो; उ० मनुष्यामध्यें ब्राह्मण शूद्रादि सर्वजातीचा अंतर्भाव होतो; राजास आमंत्रण केलें क्षणजें प्रधानादिकांचा आमंत्रणाचा त्यांत अंतर्भाव होतो; २, मनांतील अभिप्राय.

अंतर्भूत, वि० अंतर्भाव पावला तो.

अंतर्भेद, पु० कोणेक व्यवहाराचें कि० परराज्यादिकांतील अभ्यंतरींचें जें वृत्त तो कि० त्याची शत्रु इ० जे बहिर्भूत त्यांचा द्वारां जी परिस्फुटता तो.

अंतर्मुख, ३लिं० अंतर्निष्ठ परमार्थी.

अंतर्यामि, न्० व्यवहारामध्यें कार्यानुरोधानें स्वीकृत जे साधुत्वादि भाव त्यांहून इतर जे स्वाभाविक साधुत्वासाधुत्वादि भाव तदधिकरणभूत एक अंतःकरणाचा वृत्तिविशेष आहे तें.

अंतर्यामी, पु० अंतर्यामाचा साक्षी जो जीवात्मा किं० ईश्वर तो.

अंतर्लापिका, स्त्री० श्लोकाचा अर्थ लावयाचें मर्म कवानें गुप्त रूपें करून श्लोकांतच ठेविलें असतें अशा जातीचीं श्लोकादि गूढें कवींनीं केलीं असतात तीं प्र०.

अंतर्वेदी, स्त्री० भागीरथी आणि यमुना यांचे मधला जो देश तो.

अंतर्वैरी, पु० मरणारास मरणसमयीं जा पुत्रादिकानें आपल्यास भेटावें अशी इच्छा असत्ये तो तदर्थ आला परंतु कांहीं अंतरायामुळें गांठ जीवंतपणी पडली नाहीं असें झालें असतां त्या पुत्रादिकांस स्त्र०.

अंतर्हित, ३लिं० अंतर्धान पावलेला तो.

अंतर्ज्ञान, न० योग साधन, ईश्वर कृपा, इ० कारणानें दुसऱ्याचें हृदयस्थ जाणावें इ० रूप जी दिव्य ज्ञानशक्ति कोणेकास होत्ये तें.

अंतर्ज्ञानी, ३लिं० अंतर्ज्ञान आहे जास तो.

अतल, न० सप्त पातालांतील पहिलें पाताल तें.

अतलस, स्त्री० न० रेशमी किं० गर्भरेशमी एकवस्त्र आहे.

अतलस्पर्श, ३लिं० जाचा गर्व लागत नाहीं असें जें उदक किं० उदकधारा, डोह, इ० तो.

अंतवंत, ३लिं० जाचा ध्वंसाभाव अवश्य होणार असा जो देह, संपत्ति, इ० तो.

अंतःशौच, न० कामक्रोधादिकांचा परित्याग आणि शम, दम, वैराग्य, भगवद्भक्ति, इ० कांचा स्वीकार झाल्यामुळें जी अंतःकरणाची निर्मलता होत्ये तें.

अतसबाजी, स्त्री० नळे, चंद्रज्योती, बाण, घडेबाजी, इ० रूप दारूजाळून जी क्रीडा करितात ती.

अतसी, स्त्री० जवस म्हणून जें धान्य तें व त्याचें झाड ती.

अंतस्थ, न० सर्कार इ० संबंधी आपलें काम जाचे हातून करून घ्यावयाचें त्याणें पोटागीनें करून यावें म्हणून आर्जवार्थ त्यास गुप्त रूपें करून जें द्रव्यादि देतात तें; २, ३लिं० अंतस्थित.

अंतस्थित, ३लिं० आंत जो विद्यमान तो.

अतौ, अ० आतां.

अताई, ३लिं० गुरूपासून शिक्षा न घेतां ऐकून शिकलेला गवई, मृदंग्या, इ० किं० त्याचें गाणें, वाजविणें, इ० तो; २, वैद्यशास्त्र न पढतां केवळ गुरुपरंपरेनें च किं० कोणाचें ऐकून पाहून वैद्यक करितो तो किं० तें वैद्यक किं० त्याणें केलेलें रसायनादिक तो.

अतार, अतारी, पु० अत्तारी.

अतौशी, अतौशे, अ० आतांशीं.

अतौसा, अ० आतांसा.

अति, अ० भाषणादि व्यवहारादिकांची इतकें अ-

सावें अशी जी लोकशास्त्रकृत कांहीं मर्यादा आहे तीतें उल्लंघून; उ० हा अतिशीलतो, त्या देशांत अतिथंडी सणून पानवेल होत नाहीं; या अर्थी समास अतिकठिन, अतिमृदु, इ० जाणावे; २, अतिक्रमून; परंतु या अर्थी समासींच; उ० मनुष्यांतें अतिक्रमून वर्ततें जें तें अतिमानुष ज्ञान, अतींद्रिय, अतिग्राम, इ०; स० अतिरागाभीकमागा; वाक्य, अति सर्वत्र वर्जयेत्.

अतिकाल, अतिकाळ, पु० पेरणी, भोजन, इ० जा कर्मास जो योग्य काल, वर्षाऋतु, मध्यान्ह, इ० तो जाऊन प्राप्त झाला जो शरदृतु, तृतीय प्रहर, इ० पुढचा काल तो.

अतिकाळ्या, ३लिं० स्नान, संध्या, भोजनादि, अतिकाळीं करण्याचा स्वभाव जाचा तो.

अतिक्रम, पु० गतिमानानें क्रमस्थित पूर्वस्थानाहून उत्तर स्थान आक्रमिल्यामुळें पूर्वस्थानाचा जो परित्याग घडतो तो; २, तत्तन्मर्यादा बहिर्भूत जें आचरण तद्द्वारा त्यात्या मर्यादांचा किं० तींतीं मर्यादावंत जीं शास्त्रगुरु इ० त्यांचा जो अनादर तो.

अतिक्रमण, न० अतिक्रम करण्याचा जो व्यापार तें.

अतिक्रमणें, अतिक्रांत करणें.

अतिक्रांत, ३लिं० जाचा अतिक्रम झाला तो किं० जाणें अतिक्रमण केलें तो.

अतिक्रांताशौच, न० जेव्हां अशौच झालें तत्समयीं असन्निधानादिवशात् कालांतरीं जें परावें परावें लागतें अशौच तें.

अतिगंड, पु० सत्तावीस योगांतील जो सहावा योग तो.

अतिचर, ३लिं० अतिचार पावला जो भौमादि ग्रह तो; २, पु० अतिचारास प्राकृत जन स्व०.

अतिचार, पु० भौमादि ग्रहांची मध्यमगतीहून अतिशयित जी भोगी गति कांहीं काल होत्ये ती.

अतिछत्रा, स्त्री० एक ओषधी आहे.

अतिथि, पु० भोजनार्थ भोजनसमयीं आपले घरीं कोणी येतो जो पांथ तो.

अतिथिपूजन, न० अतिथि आला असतां त्याची आसन, पाद्य, भोजन, इ० कें करून जी पूजा करितात तें.

अतिदिष्ट, ३लिं० अतिदेशानें ज्ञापित जो कर्तव्यादिरूप अर्थ तो.

अतिदेश, पु० एकेस्थलीं विधान केलेला किं० एरवींच प्रसिद्ध जो कांहीं एक अर्थ त्याचें स्थलांतरीं तद्वत् एथेंही करावें, जाणावें, इ० रूप जें कथन तो.

अंतिम, ३लिं० शेवटील.

अतिमर्याद, ३लिं० जाची मर्यादा सुटली तो; उ० अतिमर्याद भाषण सभ्यामध्यें शोभत नाहीं.

अतिमान, ३लिं० स्वप्रमाणातें उल्लंघून अतिरिक्त झाला जो काम, क्रोध, वायु, पित्त, इ० तो.

अतिरथ, अतिरथी, पु० असंख्यात योध्यां सहवर्त्तमान एकला युद्ध करणारा जो योद्धा तो.

अतिरथी, महारथी, पु० एकापेक्षां एक पराक्रमी असे जे अनेक पुरुष त्यांस स्र०; उ० तेथें मोठे मोठे अतिरथी महारथी पडले आहेत त्यांस कोणी पुसेना मग मला गरीबाला कोण पुसतो.

अतिरिक्त, ३लिं० विवक्षित मर्यादेतें अतिक्रमून जें बाहेर गेलें तो; २, विवक्षित धर्माक्रांत कोटीहून जें इतर तो; उ० हें मला गाऊक आहे एतदतिरिक्त गाऊक नाहीं.

अतिरेक, पु० अतिरिक्तपणा.

अतिवयस्क, ३लिं० शास्त्रादि विद्येचें साधन, विवाह, इ० कर्मविषयीं जें योग्य वय तें अतिक्रमलें जाचें तो किं० अतिवृद्ध तो.

अतिवाद, पु० वादाची रीति सोडून आडवेतिडवे भाषणानीं जो वाद तो.

अतिवादी, ३लिं० अतिवाद करण्याचा स्वभाव जाचा तो.

अतिविष, न० अतिविषा.

अतिविषा, स्त्री० ओषधी आहे.

अतिवृष्टि, स्त्री० गांव बुडावे, शेतें कुजावीं, इ० रूप अनर्थकारक जो वृष्टीचा अतिशय तो.

अतिव्याप्त, ३लिं० जा लक्षणाची जा अलक्ष्यांशीं अतिव्याप्ति होती तें तेथें.

अतिव्याप्ति, स्त्री० अलक्ष्यांवर लक्षणाची जी व्याप्ति ती.

अतिशय, पु० कोणेक व्यवहारादिकांचा सामान्य मर्यादेचें उल्लंघन व्हावा जोगी जी अतिरिक्तता तो; २, ३लिं० अतिशयित; प्राकृतजनव्यवहारीं अ०.

अतिशयित, ३लिं० अतिशय विशिष्ट तो.

अतिशयोक्ति, स्त्री० वर्णनीय वस्तुनिष्ठ जे गुणादिक त्यांचें यत्प्रमाण सत्व आहे तदपेक्षया आधिक्यें करून वर्णन करण्याचा जो प्रकार ती.

अतिशूद्र, पु० महार, मांग, चांभार, इ० जे चंडालजातीय ते प्र०.

अतिसार, पु० जेणें करून मलविसर्गीचा अतिशय होतो असा एक रोग आहे.

अंतीं, अ० कोणेक कार्य आचरिलें असतां तदनुरोधानें कांहीं मिळणें, खरचणें, करायास अवश्य प्राप्त होणें; इ० कांचें वि०; उ० व्यवहारचे अंतीं चारपैसे मिळतात, किं० बुडतात, हें चाललेंच आहे.

अतीत, ३लिं० अतिक्रांत जो मार्ग, काल, सुख, दुःख, इ० तो; २, पु० गृहस्थाश्रम्याचे घरीं भिक्षार्थ येतो जो गोसावी, वैरागी, फकीर, इ० तो.

अतीतअभ्यागत, पु० अतिथि, गोसावी, वैरागी, इ० तो.

अतींद्रिय, ३लिं० इंद्रियांची जी गोचरीकरणशक्ति तिचा पलीकडे स्थित जो परमाणु, ईश्वरस्वरूप, दूरस्थित पदार्थ, इ० तो.

अतीव, अ० अत्यंत.

अंतुरी, स्त्री० ग्रं० भार्या; उ० स्वानुभूति स्वामीची अंतुरी.

अतुल, ३लिं० जास कोणाची तुलना नाहीं तो.

अतुल्य, ३लिं० अतुल; २, विवक्षित प्रमाणादिकांशीं तुल्य न झाला तो.

अतूट, ३ लिं० जास तूट नाहीं असें जें धान्यादिक कि० मध्यें व्यवछेद नहोतां अविछिन्न चाललें जें वृत्यादिक तो.

अतृप्त, ३ लिं० किती लाभ झाला असतांही तृप्ति होऊं नये असा स्वभाव जाचा तो.

अतोनात, अतोनास्त, अ० जाचें प्रमाण. संख्या, इ० कांची पराकाष्ठा होऊन गेली अशा प्रकारें; उ० यापाशीं अतोनात द्रव्य आहे; नदीस अतोनात पाणी आलें.

अत्कारी, पु० कों० गांवचा वतनदार सोग एक अधिकारी आहे.

अत्तर, न० चंदनादि द्रव्यांचा सुगंधि अर्क आहे.

अत्तरदाणी, अत्तरदानी, स्त्री० सभादिकांत अत्तर घालून देवावयाचें एक पात्र आहे.

अत्तीं, अ० अतांच.

अत्तार, अत्तारी, पु० अत्तर इ० सुगंधिद्रव्यें विकणारा जो तो.

अंत्य, ३ लिं० अंतिम.

अंत्यकर्म, न० मृताचीजी क्रिया पुत्रादि करितात तें.

अंत्यक्रिया, स्त्री० अंत्यकर्म.

अंत्यज, पु० अतिशूद्र.

अत्यंत, अ० अतिशयें करून

अत्यंताभाव, पु० विवक्षिताधिकरणीं विवक्षित पदार्थ नाहीं अशा आकारें प्रतीत होतो जो अभाव तो.

अत्यय, पु० पदार्थाचा जो प्रध्वंस तो.

अत्यवस्थ, ३ लिं० कोणेक दुखण्यामुळें आतां मरेल असें वाटायाजोग्या अवस्थेस पावला जो कोणी तो.

अत्याग्रही, ३ लिं० अतिशयित आग्रह धरण्याचा स्वभाव जाचा तो.

अत्याचार, पु० काहीं देखील धुऊन घ्यावीं इ० रूप केवळ छांदसपणा दिसायाजोगा जो आचार तो; २, ३ लिं० अत्याचारी.

अत्याचारी, ३ लिं० अत्याचार करण्याचा स्वभाव जाचा तो.

अत्यावस्थ, अंत्यावस्थ, ३ लिं० अत्यवस्थ.

अंत्याक्षरी, स्त्री० एकानें श्लोक म्हणावा तो जा अक्षरावर संपेल त्या अक्षरावर आरंभिलेला दुसऱ्यानें म्हणावा पुनः तो जा अक्षरावर संपेल तदादि श्लोक पूर्वीचानें म्हणावा अशा प्रकारेंजे अनेक श्लोक म्हणतात ती.

अत्युक्ति, स्त्री० अतिशयोक्ति.

अंत्येष्टि, स्त्री० प्रेताचीजी प्रेतत्व निरसनार्थ क्रिया करितात ती.

अत्र, न० कोणेक भाषणादि व्यवहारामध्यें होय किं० नव्हे अशा एक रूपतेचा निश्चय न व्हावया जोगें जें मुग्धत्व राहातें तें.

अत्रत्य, ३ लिं० एथील.

अत्रप, ३ लिं० कोणेक कार्याकडे विवक्षित सामग्रीचा विनियोग होऊन तत्सामग्र्यंतरवर्ती जो एकादा गुंतल्यावांचून पदार्थ राहतो तो; उ० तुह्मापाशीं अत्रप अंगरखा असला तर द्या; २, त्या कार्यास तितकी सामग्री पुरेल न पुरेल या भ्रांतीनें अधिक घेऊन देवतात जो सामग्रीभूत

पदार्थ तोही.

अव्वव, ३लिं॰अव्वप;२.कोणेक गोष्टीचा फोड,निवाडा,इ॰ न होतां मोघमपणानें,राहा,देव,इ॰कांचें वि॰,उ॰ चार तंड्यांतून तीन निवडले एक अव्वव राहिला आहे.

अंवा, पु॰ ध्रुपद,ख्याल,इ॰कांचा दुसरा भाग तो.

अत्विरवं, अत्विष, न॰ कों॰ अतिविष.

अथ, अ॰ कोणेक ग्रंथादिकांचे आरंभ प्रतिज्ञेचें द्योतक;अथपासून इतिपर्यंत स॰ आरंभापासून समाप्तिपर्यंत.

अंथरणें, निजणें.बसणें,इत्यादयर्थ भूमी इ॰कांवर सतरंजी.गादी.रुजामा.इ॰ वस्त्रें किं॰ तद्वा, पल्लव,इ॰ पसरून घालणें;२,त्या तशा घालण्यानें तें भूम्यादिक आच्छादित करणें;उ॰ याएवज्या शेरुजाम्यानेंही एवढी जागा अंथरली जाणार नाहीं.

अंथरी, स्त्री॰ पात्या,तृणें,इ॰ विणून आस्तरणार्थ पदार्थ केला असतो ती.

अंथरूण, न॰ शयनार्थ अंथरण्याचे उपयोगी जें वस्त्रादिक तें.

अथर्गण, न॰ कों॰ स्वार्थ सिध्यर्थ रडणें,ओरडणें. दुसऱ्यास दाबणें,शिवीगाळ करणें,इ॰रूप दुसऱ्यास घाबरें करण्याचा व्यापार तें.

अथर्वण, न॰ वा॰ दुसऱ्याचा नाश व्हावा किं॰ स्वार्थसिद्ध व्हावा इत्यादयर्थ कपटानें गुप्तरूपें चाहाडी,तुफान, लावालावी,इ॰रूप जो खेळ कोणी करितो तें.

अथर्वणवेद, पु॰सं॰ चारवेदांतील चवथा जो वेद तो.

अथर्वणवेदी, ३लिं॰ अथर्वणवेदोक्त संस्कार ज्याचे कुलपरंपरेंत होत आले तो.

अथवा, अ॰ पक्षांतराचें द्योतक;उभयपक्षांचे मध्यें याचाप्र॰;उ॰उदईक भोजनास तूंये अथवा मुलास पाठऊन दे.

अथाँग, ३लिं॰ अतलस्पर्श.

अथापि, अ॰ असें असतांही;उ॰ तो कोपून शिव्या देऊं लागला अथापि मी बोललों नाहीं.

अद, न॰ अर्धाचा अपभ्रंश;याचा प्र॰ प्राकृत समासीं प्रा॰ होतो;उ॰ गजाचें अर्ध तो अदगज, अदमण.अदकोस,अदखंडी.अदघडी,अद, शेर,अदपाव,अदतोळा,इ॰.

अदकाव,अदकावाचा, ३लिं॰ रा॰ विवक्षित कार्याचे खर्चास पुरून उरायाजोगा अधिक जो साहित्यभूत पदार्थ तो.

अदकोत्तर, ३लिं॰ अधिकोत्तर.

अदत्त, ३लिं॰ कटु.

अदत्तशिरवामणि,अदत्तशिरोमणि,पु॰ पराकाष्ठेचा जो अदत्त तो.

अदपशीर, ३लिं॰ भिंत,पडदा,इ॰कानें आवृत्त जें स्थलादि तो;२,आवरण,वेष्टनादिकें करून सुरक्षितपणें आंत राहिला जो पदार्थ तो;राहाणें धातुयोगीं प्र॰;उ॰ हीं कांचेचीं भांडीं पेटींत घालून देवा म्हणजे अदपशीर राहतील.

अदमणका, ३लिं॰ अदमण वजनाचा मापाचा जो दगड,शाब,इ॰ पदार्थ तो.

अदमणी, स्त्री॰ अदमणाचे वजनाचा बांधून ठेविलेला

ठेविलेला जो दगड, इ० वजन तीं कि० मापाचें पागर इ० पात्र बांधिलें असतें तीं.

अदमास, पु० अजमास.

अदमासणें, अजमासणें.

अदमासी, वि० अजमासी.

अदमुरें, न० अर्धवट विरजलेलें जें दहीं तें.

अदय, वि० निर्दय.

अदर्शन, न० सं० दर्शनाचा जो अभाव तें.

अदलाबदल, स्त्री० एथलें तेथें, तेथलें एथें, याचें त्याला, त्याचें याला, इ० रूप जो तत्तत् दार्थाचा बदलण्याचा प्रकार तो.

अदलेदिवशीं, अ० आदलेदिवशीं.

अदलेंवर्ष, न० आदलें वर्ष.

अदळणें, आदळणें.

अदा, पु० आदा.

अदाकरणें, सर्कार, सावकार, इ० कांचें देय द्रव्यादिक तें देऊन पोंहचेसें करणें.

अदालत, عدالت स्त्री० न्यायाधीशानें न्याय करण्याची जी जागा तीं कि० तो व्यवहार तो.

अदावत, स्त्री० عداوت वास्तविक आंगीं दोष नसतां द्वेषामुळें कल्पून कोणी एक करतो जो दोषारोप तो; पालणें, घेणें, करणें इ० कांचा योगीं प्र०.

अदावती, अदावत्या, वि० दुसऱ्यावर अदावत पालण्याचा स्वभाव जाचा तो.

अदाबळ, स्त्री० दुसऱ्यास उपद्रवकारक जे अनेक प्रकारचे व्यापार तो.

अदिति, स्त्री० सं० इंद्रादि देवांची माता पुराणप्रसिद्ध आहे.

अदु:

अदु:खनवमी, स्त्री० भाद्रपद शुक्ल नवमी.

अंदू, पु० हत्तीचे पुढील दोन पाय खिळ्यापाशीं करितां सांखळी, दोरी, चर्मपाश, इ० रूप बंधन केलें असतें तो कि० मागील पायांस सांखळदंड बांधाया करितां लांकडाचा चवकट अडकिवली असते तो.

अदृश्य, वि० दिसत नाहीं तो.

अदृष्ट, न० शुभाशुभफल होण्याविषयीं प्रयोजकजें आपलें प्राक्तन कर्म तें; २, त्याचा ब्रह्मलेख कपाळीं लिहिला असतो म्हणून प्रसंगविशेषीं कपाळास हात लावणें स्त्री०; ३, वि० जो पाहिलेला नव्हे तो; अदृष्टास येणें स्त्री० उचितास येणें स्त्री० अनुचितही एखादी गोष्ट दैववशात् करावी लागणें.

अदृष्टवंत, वि० चांगलें अदृष्ट आहे जाचें असा जो तो.

अदृष्टवशात्, अ० दैववशात्.

अदेख, वि० कों० जास दुसऱ्यांचा उत्कर्ष पाहवत नाहीं तो.

अदेखाई, स्त्री० कों० अदेखपणा.

अंदेशा, पु० आंदेशा.

अद्दल, वि० अदल; २, ईषन्मात्रही न्यून नाहीं असें जें माप, वजन, इ० तो; ३, स्त्री० काहीं केल्या कर्मामध्यें तत्सजातीय कर्म यावज्जन्म पुनः करूं नये असा संस्कार राहाया जोगें होतें जें काहीं एक शासन तीं, घडणें धातुयोगीं प्र०.

अद्धागी, वि० हतभाग्य.

अद्भुत, न० सं० जें प्रायशः होत नाहीं कि० प्रवृत्तींत चाललेलीं जीं प्रमाणें तद्दीवर नव्हे असें जें

भूकंप

भूकंप,उल्कापात,सुवर्णदृष्टि,पुरुषांस हत्तीचें बळ, इ०तें.

अद्भुतरस,पु०सं० काव्यादिकांतील जे नवरस त्यांतील एकरस आहे.

अद्भुतशांति,स्त्री०सं० भावि अरिष्टसूचक कांहीं अद्भुत झालें असतां त्या अरिष्टाचे निरासार्थ जें होमादिक कर्म करितात तो.

अद्य,अ०सं० आज.

अद्यतन,वि०सं० आजचा.

अद्यप्रभृति,अ०सं० आजपासून.

अद्यावत्,अ०सं० आजपर्यंत.

अद्याप,अद्यापि,अ०अजून.

अद्यावत्,अ०अद्यावत् याचा अपभ्रंश.

अद्यावस्थ,वि०रा० अद्यावस्थ याचा अपभ्रंश.

अद्रि,पु०सं० पर्वत.

अद्वातद्वा,अ० नाळतंत सोडून मनस्वीपणानें, बोलणें,चेष्टा करणें,इ०कांचें वि०.

अद्वितीय,वि०जा सारिखा दुसरा कोणी नाहीं किंवा जास सोबती नाहीं तो.

अद्वैत,न०सं० द्वैताचा अभाव तें.

अद्वैतभाव,पु०सं० अद्वैतपणा.

अद्वैतमत,न०सं० जीवात्मा आणि परमात्मा यांचा वस्तुतः अभेद असें जें मत तें.

अद्वैतवाद,पु०सं० अद्वैतमतानुरोधी जो वाद तो.

अद्वैतवादी,वि०सं० अद्वैतमतातें अनुसरलेला जो शंकराचार्यादि तो.

अद्वैतसुख,न०सं० जीवात्मा आणि परमात्मा यांचा अभेद साक्षात्कार झाल्यानंतर जें सुख अनुभवास येतें तें.

अंध,वि०सं० आंधळा;२,अश्विनीपासून तीन तीन नक्षत्रें सोडून चवथीं चवथीं रोहिण्यादिक जीं सात नक्षत्रें तीं प्र०.

अधः,अ०सं० खालीं;अधःप्रदेश,अधोभाग,इ० समास ही जाणावे.

अंधक,वि०सं० जामध्यें जितकी तेजगी दिसावी तदपेक्षया न्यून दिसत्ये असा जो रंगरंगित पदार्थ किंवा अग्नि,दीप,चंद्र,इ० तेजोरूप पदार्थ किंवा त्यांचा प्रकाश इ० तो;अंधक दिसणें स०द्रष्टव्य पदार्थाचे बारीक अवयवादिभेद दृष्टिदोषादि कारणामुळें गोचर न होतां यथाकथंचित् पदार्थ प्रतीत होणें;२,अंध द्वितीयार्थी.

अंधकार,पु०सं० प्रकाशाचा जो अभाव तो;२,ला० विवक्षित व्यवहारोपयोगी जें शास्त्रादिज्ञान त्याचा जो अभाव तो.

अंधःकार,पु० अंधकार शब्दाचा अपभ्रंश.

अंधकूप,पु०सं० अंधकारामुळें किंवा तृणादिकांचा आच्छादनामुळें जाचें तोंड स्पष्ट दिसत नाहीं अतएव दुर्लक्ष्यपणेंचालणारा मनुष्यादिक जामध्यें पडतो असा जो कूप तो.

अधचामधचा,वि०सं० अधीलमधील.

अधण,न० अग्निसंयोगानें आंत सळसळ शब्द व्हाया जोगी जी उदकास संतप्तावस्था होत्ये तें किंवा तदवस्थापन्न जें उदक तें;२,गूळ,काकवी, इ० करायासारीं कांहीं तीं कढत होवितात जो रस तें;३,ला० राज्य,कारभार,संसारकृत्य,इ० चालविण्याचें कोणेकावर मुख्यत्वें करून अस

तें जें ओझें तें कि० तत्तत्संसारादिव्यवहारविषयीं वृत्त्यादिकांवर ठेवलेला असतो जो भरवंसा तें: जीवावरचें अधण उतरणें स्र० प्राप्त झालेलें कांहीं एक महासंकट तादृश नाश न करितां निवृत्त होणें.

अंधतामिस्र, न० सं० यमलोकीं एक नरक आहे.

अधन, वि० सं० निर्धन.

अंधपरंपरा, स्त्री० सं० एकानें केलें तें पाहून दुसऱ्यानें करावें, दुसऱ्यानें केलें तें पाहून तिसऱ्यानें, हें मी करितों कशास, यांत फल काय, हें केलें असतां होईल काय, वगैरे कि० वाईट इ० विचार न करितां कांहीं एक कर्म करीत असावें असा चालतो जो परिपाठ त्यास स्र०.

अधःपात, पु० सं० पुण्यक्षय झाल्यामुळें स्वर्गादि उत्तम लोकांपासून मृत्यूलोक कि० नरक इ० कांचे ठायीं जें पतन तो; अधःपातास जाणें स्र० अधःपातास जावयाची जी अवस्था ती पावणें.

अधम, वि० सं० उत्तम मध्यम याहून जो खालचा तो; २, दीन जनाची हिंसा, मातापितृविरोध, इ० जें लोकशास्त्रनिंदित कर्म तें कि० तत्कर्ता ही तो.

अधमर्ण, पु० सं० जाणें जाणापासून ऋण घेतलें तो त्याचा.

अधर, वि० सं० जो जापेक्षां गुणादिकें करून खालीं तो त्याहून; २, पु० ओष्ठ.

अधरपान, न० सं० अधरामृताचें जें चुंबनद्वारा पान तें.

अधरामृत, न० सं० स्त्री इ० कांचे ओष्ठसंबंधी चुंबन घ्यावयाजोगा रस त्यास स्र०.

अधरोष्ठ, पुं० सं० खालचा जो ओष्ठ तो.

अधर्म, पु० सं० जें कर्म जास शास्त्रानें निषिद्ध आहे तें त्यास; २, त्याचे अनुष्ठानें कि० जें जास अवश्य कर्तव्य ते करून शास्त्रानें सांगितलें त्याचा अननुष्ठानें जो आत्म्यास धर्मविरोध घडतो तो.

अधर्मी, वि० सं० अधर्माचरण करितो तो.

अधलंडमधलंड, वि० मूर्ख विद्वान्, खरे खोटे, गृहस्थ भिक्षुक, वैदिक पंडित, शैव वैष्णव, इ० रूप अनेक जीं कोटिहूयें त्यांत एके कोटींत ही धड पणें गणावयाजोगी जामध्यें तत्तद्गुणादिकृत योग्यता नाहीं तो; उ० याचे गाण्याचा संप्रदाय धड हिंदुस्थानीं नव्हे धड कर्नाटकी नव्हे अधलंडमधलंड आहे.

अधलामधला, वि० अधीलमधील.

अधव्याचा, वि० जो जाव्यवहारादिकांमध्यें स्वतःपुरा घसवटलेला नव्हे कि० जाची कुलपरंपराही घसवटलेली नाहीं असा जो नवाच एखादे कामांत शिरलेला कि० योग्यताविशेषास चटलेला मनुष्यादिक तो; स्र० अधव्याचा जोडला आणि पिढीचा मोडला बरोबर होत नाहीं.

अधस्तन, वि० खालचा.

अँधळा, वि० दर्शनसामर्थ्यहीन जें नेत्र कि० तद्विशिष्ट मनुष्यादिक तो; २, ला० जो शास्त्रादि विषयांत जास ज्ञान नाहीं तो तद्विषयीं.

अँधळाकारभार, पु० अंधा धुंदीनें युक्त जो राज्यादिसंबंधी कारभार तो.

अँधळीकोशिंबीर, स्त्री० मुळांचा खेळ आहे जांत डोळे मिटून एकामेकास शोधून काढितात तो.

ती.

अँधळेँनक्षत्र, न० जा नक्षत्रावर वस्तु हारवलेली केवळ जात नाहीं परंतु समीप असून शोधिली असतां ही दृष्टीपडत नाहीं त्या नक्षत्रास लोक म्ह०.

अँधळेँवरण, न० केवळ सोलीं वडाळीचें नव्हे जें वरण तें.

अधौटी, स्त्री० कोणेक सयुक्तिक बोलत असतां त्याजवर घेतो कोणी दुसरा जो अडफांटा ती किं० त्या अनेक अडफांट्यानीं स्वाभिमत अर्थ सिद्ध करण्याविषयीं धरलेला जो हट्ट आग्रह ती.

अधांवीँ, अ० अंतराळीं.

अंधाधुंद, अंधाधुंध, वि० अंधाधुंदी जींत आहे असें जे राज्य, साबकारी, संसार इ० व्यवहार तो.

अंधाधुंदी, अंधाधुंधी, स्त्री० सेवकानीं किं० पुत्रादिकानीं धनी, वडील, इ०कांचें भय बाळगूं नये तो तो संसार, राज्य, व्यवहार, इ०कांची काळजी अदाकिती, खर्च किती, इ०कांचा विचार न करितां मनस्वीपणें जाला जसें पाहिजे तसें त्याणें वर्तावें, धनी, इ० नियामकानींही त्याचें निवारण किं० तद्विषयीं विचार न करितां आपले मनास येईल तसें वर्तावें इ० रूप जी राज्यादिव्यवहारांत अव्यवस्था चालत्ये ती.

अंधार, पु० अंधकार; अंधारीं उजेडीं मागणें म्ह० कोणेक गोष्टीं विषयीं कोणेकास अन्योक्त्यादिद्वारा किं० स्पष्ट हें करूं नको; कर, इ० उपदेश करणें.

अंधारकोँडी, स्त्री० जेथें निरंतर बहुत अंधकार असतो अशी गुहा इ० जागा ती जेथें अपराधी जनास कोंडून ठेवितात.

अंधा

अंधाररवण, पु० स्त्री० अंधारकोंडी.

अंधारा, पु० अंधार.

अंधारी, स्त्री० सजल मेघाची निबिड व्याप्ति झाल्यामुळें जो अंधार पडतो ती; २, अश्वाचे नेत्राचें आच्छादन करावयाचें जें वस्त्र असतें ती; ३, पित्तक्षोभादि निमित्तानें अकस्मात् कांहीं दिसेना असें होऊन नेत्रांपुढें भासती जो अंधार ती.

अंधारीरात्र, स्त्री० अंधारानें युक्त जी कृष्णपक्षींची रात्र ती.

अधाशी, अधासी, वि० आपल्या शक्तीपेक्षां अधिक खाण्याचा स्वभाव जाचा किं० क्षुधेपेक्षां अधिक पात्रावर अन्नादि घेण्याचा सोस जाला तो.

अधिक, वि० सं० जा विवक्षित पदार्थाचे प्रमाणापेक्षां जाचें प्रमाण व्यापक आहे त्याहून तो; २, विवक्षित कार्य निर्वाह होऊन उरायाजोगें जें साधनीभूत कांहीं एक किं० साधनशक्ति खर्चून अवशिष्ट राहायाजोगें जें कार्य तो; ३, संक्रांतिरहित जो अमावास्यांत मास तो; ४, विवक्षितप्रमाणांची किं० कार्याची पर्याप्ति होऊन अवशिष्ट राहिलाजो प्रमेयसाधन इ० कांचा अंश, तो; एकानें अधिक जें शत तें एकाधिकशत, व्यधिकपंचाधिक, इ० रसें करून विवक्षितापेक्षां अधिक म्ह०; उत्कृष्ट तो रसाधिकपदार्थ, गुणाधिक, इ० समास ही जाणावे.

अधिकआगळा, वि० केवळ जितक्यास तितकाच मेजलेला असा नव्हे कांहीं अधिकही तो; उ० अल्लास नेमणूक करून दिल्ही आहे त्या प्रमाणेच

माणें-च खर्च करूं अधिक आगळा करणार नाहीं.

अधिकउणा, ३लिं० कमजास्त.

अधिकमहिना, अधिकमास, पु० संक्रांति रहित जो वैशाखादि चांद्रमास पडतो तो.

अधिकरण, न० सं० ज्याचेठायीं कांहीं एक पदार्थ राहातो किं० कांहीं क्रिया होत्ये तें त्याचें.

अधिकाई, स्त्री० अधिकपणा.

अधिकांग, ३लिं० सं० साहावी अंगुली इ० रूप अधिक अवयव जास आहे तो.

अधिकार, सुं० सं० यद्यद्गुणादि साहित्य असतांच जें कर्म होतें तत्तद्गुणादि वैशिष्ट्य अंगीं आल्यामुळें तें तें कर्म करण्याविषयीं होत्ये जी योग्यता तो; २, राज्यादि व्यवहार संबंधीं कर्मे चालावयाकरितां राजत्व, सेनापत्य, पाटिलकी, महाजनकी, महारकी, इ० रूप एक एक कर्मावर एक एक प्रभुत्व, कल्पिलें असतें तो; ३, अनेक वाक्यार्थीचाठायीं अन्वय व्हावा अशा विवक्षेनें प्रकरणामध्यें एकवार सांगितलें असतें जें वाक्य किं० पद तो; ४, शास्त्रादि ग्रंथांमध्यें कोणेक अर्थाची धरिली असते जी उद्देश विषयता तो; उ० ब्रह्मज्ञान उद्देशून वेदांत प्रवृत्त झाला तस्मात् त्यामध्यें ब्रह्मज्ञानाचाच अधिकार.

अधिकारच्युत, ३लिं० सं० प्रधानत्व, सरंजामदारी, इ० अधिकारांपासून जो भ्रष्ट झाला तो.

अधिकरणें, स्तुति, निंदा, इ० विधानार्थ कोणीएक अर्थातें केवल मनानेंच किं० नाम निर्देशानें उद्देश विषय करणें; उ० धन्वंतरी सारखे जे मोठे मोठे वैद्य त्यांतें अधिकारून वैद्यस्तुति केली असतां.

असतां जितकी केली तितकी शोभेल, पाणें मला अधिकारून शिव्या दिल्या.

अधिकारस्थ, ३लिं० सं० अधिकारावर स्थित आहे जो तो.

अधिकारी, पु० सं० जो अधिकार जास आहे-नहि-पदीं तो.

अधिकृत, ३लिं० सं० राजत्वादि अधिकारावर जो स्थापित तो; २, अधिकारिलेला तो.

अधिकोत्तर, ३लिं० सं० सामान्यापेक्षां अपूर्वत्वें करून मानावाजोगा किं० इतरास सांगावाजोगा सविशेष जो गुणादिक तो.

अधिगत, ३लिं० सं० जाणलेला; २, मांस.

अधिगम, पु० सं० शब्दादि प्रमाणापासून कांहीं एक अर्थाचें होतें जें ज्ञान तो किं० कांहीं एक अर्थाची होत्ये जी प्राप्ति तो.

अधिगम्य, ३लिं० सं० ज्ञेय किं० प्राप्य जो कांहीं एक तो.

अधिप, पु० सं० जो पृथिव्यादि विषयांचें स्वामित्व जास आहे तो त्याचा.

अधिपति, पु० सं० अधिप.

अधिमास, पु० सं० अधिकमहिना.

अधिवासन, न० सं० व्रतोद्यापनादि कर्तव्य असतां तत्तत्कर्मांग देवतांचें विधिपूर्वक पूजी सर्वतोभद्रादि आसनावर जें स्थापन करितात तें; २, ला० कूळ इ० कांचें दारीं सावकार इ० कांचेंनिग्रहपूर्वक जें उपवेशन त्यास ल्ला०.

अधिष्ठणें, अधिष्ठित करणें; उ० ग्रं० जेपक्षी जे श्वापदसंघ अधिष्ठूनि कानना वसती.

अधिष्ठाता, ३लिं० सं० जो अधिकरणातें अधिष्ठितकरून जो राहतो तो त्याचा.

अधिष्ठान, न० सं० प्रभुत्वादिरूप स्वशक्तिद्वारा किंं० शरीरद्वारा जो अधिकरणातें व्यापून जो राहतो तें त्याचें; उ० नेत्रांतर्वर्ती जो मांस गोलक हें चक्षुरिंद्रियाचें आणि तद्देवतेचें अधिष्ठान; २, जो अधिकरणभूत पदार्थावर यदर्थविषयक भ्रम होतो त्या अर्थाचें तें; उ० भ्रमविषय सर्पाचें अधिष्ठान रज्जू; तसें याजगाचें अधिष्ठान ब्रह्म जाणावें; ३, कोणी एक अधिकरणाचे ठायीं कोणेकाची स्वरूपतः किंं० शक्त्यादिद्वारा जी स्थिति तें; उ० या गावांत दोन महिनें आमचें अधिष्ठान होतें; कोणेकाचें अधिष्ठान माजणें, वाढणें, मोडणें, इ० स्थलीं संपत्ति, स्नान, संध्या, देवपूजा, इ० संबंधी खटले माजणें, इ० अर्थ.

अधिष्ठानसत्ता, स्त्री० सं० द्वितीयार्थ अधिष्ठानाचें जें अस्तित्व तो; उ० अधिष्ठानसत्तेनें जगाची अस्तित्वप्रतीति होत्ये.

अधिष्ठित, ३लिं० सं० कोणेक अधिष्ठानातें व्यापून जो स्थित तो, किंं० त्याणें व्यापिलें जें अधिष्ठान तो.

अधीं, अ० अगोदर.

अधींचा, ३लिं० अगोदरचा.

अधीत, ३लिं० अध्ययन केलें आहे जेणें तो, किंं० अध्यन केलें जाचें तो ग्रंथादिक तो.

अधीन, ३लिं० जो जाचा स्वामित्वास्वाली वर्ततो तो त्याचे.

अधींमधीं, अ० कांहींएक कार्य करण्यास मूल, मध्य, मध्य, अंत, तल, उपरिप्रदेश, इ० रूप प्रसिद्ध जे कोणेक अवयवींचा गयीं अवधिभूत अनेक अवधिक्रमानें असतात त्यामध्यें पूर्वावधीहून किंचित् पुढें, उत्तरावधीहून किंचित् मागें, अशाप्रकारें भलतेथेंच; उ० हा वृक्ष मुळाशीं तोड किंं० खांद्यापाशीं तोड अधींमधीं तोडूं नको कामाचें लांकूड वायां जाईल.

अधीर, ३लिं० कोणेक कर्म, लाभ, इ० कांविषयीं जो उतावळा तो; २, सं० न्याड.

अधील, ३लिं० अगोदरचा.

अधीलमधील, ३लिं० अधींमधीं जो स्थित तो.

अधीश, पु० सं० अधिप.

अधीश्वर, पु० सं० अधिप.

अधुपा, अधुवा, ३लिं० कों० धुतलेलें नव्हे असें जें तांदूळ इ० धान्य, किंं० नित्य धुऊन नेसायाचें वस्त्र इ० किति एक तो.

अधुरा, ३लिं० विवक्षित संस्कारादि काहीं यावयाचे जे दृढतादिरूप गुणते जांत पुर्ते आले नाहींत तो; उ० तें काम अधुरें पडलें आहे, शेवटास जाईल तेव्हां खरें; असें अधुरें सांगूं नको निखालस सांग; हा पंडित अधुरा आहे पुरा झाला नाहीं; अशी अधुरा गांठ देऊं नको बळकट दे; २, अधीर.

अधू, ३लिं० कार्यनिर्वाहक सामर्थ्य जाचें कांहींएक दोषानें न्यून झालें आहे असा जो अवयव किंं० तद्विशिष्ट अवयवी मनुष्यादिक तो; उ० काय जो डाचांगला याचीं नेत्रें अधूती कानानीं अधू.

अंधूक, ३लिं० अंधक.
अधैंमधैं, अ० अर्धांमधीं.
अंधेर, पु० अंधार
अंधेरी, स्त्री० अंधारी.
अधेला, पु० पैशाचा अर्धभाग तो; २, सर्पांत एक भेद आहे.
अधेली, स्त्री० अर्द्ध रुपयाचें नाणें आहे.
अधौंक, ३लिं० कों० जामध्यें प्रायः धोंका बसत नाहीं किं० धोंका न बसतां चिरकाळ चाललेला जो साबकारी इ० व्यापार तो.
अधोगत, ३लिं० सं० अधोगति पावला तो; २, अधोभागीं जो स्थित तो; ३ स्त्री० अधोगतीचा अपभ्रंश.
अधोगति, स्त्री० सं० उच्चप्रदेशाकडून नीचप्रदेशाकडे जी गति ती; २, अधःपात; ३, ३लिं० नीचप्रदेशाकडे चाललेला आहे, किं० जाण्याचा स्वभावजाचा तो.
अधोभूमि, स्त्री० सं० अंतरिक्ष माडीची नव्हे अशी जी केवल भूतल संबंधी जागा ती.
अधोमुख, ३लिं० सं० अधःप्रदेशाकडे आहे मुख जाचें किं० लज्जादि कारणानें अवनत झालें आहे मुख जाचें तो.
अधोली, स्त्री० पायलीचे अर्धभागाचें माप आहे.
अधोवदन, ३लिं० सं० अधोमुख.
अधोवायु, पु० सं० अपानवायु.
अध्ययन, न० सं० वेदशास्त्रादिकाचें पठन तें; २, पठलेलें जें शास्त्रादिक तें; उ० अनभ्यासामुळें मी अध्ययन विसरलों.

अध्यलंडमध्यलंड, ३लिं० स० अधलंडमधलंड.
अध्यवसाय, पु० कोणेकपदार्थाचा निश्चयरूपें बोध होऊन केवल आत्मरूपता पावाया जोगा आत्म्यावर जो ठसतो तो, तद्विषयक अंतःकरणवृत्तीस अहंकार स्म०.
अध्यवसित, ३लिं० यद्विषयी अध्यवसाय झाला तो अर्थ.
अध्यस्त, ३लिं० सं० अधिष्ठानाचें तत्तद्रूपेंकरून भान नउराया जोगा अधिष्ठानसत्तेवर मनःकल्पनेनें आरोपून सिद्ध केला जो पदार्थ तो.
अध्यक्ष, ३लिं० सं० जा व्यवहारादिकांचा धनीपणा जाकडे आहे त्याचा तो.
अध्या, पु० अध्यायाचा अपभ्रंश.
अध्यात्म, न० सं० ब्रह्मज्ञान.
अध्यात्मशास्त्र, न० सं० वेदांतशास्त्र.
अध्यापक, ३लिं० सं० अध्ययन करिवणारा गुरु तो.
अध्यापन, न० सं० अध्यापकाचें जें कर्म तें.
अध्याय, पु० सं० पुराणादि ग्रंथांचे जे अनेक खंड केले असतात ते प्र०.
अध्याव, पु० अध्यायाचा अपभ्रंश.
अध्यास, पु० कांहीं एक विषयाचें क्षणमात्र विस्मृति न पडतां जें निरंतर ध्यान तो.
अध्याहार, पु० सं० जा पदादिकांवांचून जा वाक्यादिकांची अन्वय योजना होत नाहीं म्हणून त्या त्या वाक्यादिकांत त्या त्या पदादिकांची जी योजना अन्वय लावते समयीं करितात तो; २, वाक्यादिकांचे ठायीं अध्याहार्य पदादिकाचें जें न्यूनत्व तो.

अध्याहार्य, ३लिं० सं० अध्याहार करावयास योग्य जें पदादिक तो.

अध्याहृत, ३लिं० अध्याहार केला जाचा तो.

अध्यैमध्यै, अ० अधींमधीं.

अध्वमान, न० कोस, योजन, इ० रूप जें परिमाण तें.

अध्वर, पु० सं० यज्ञ.

अध्वर्यु, पु० सं० यज्ञादिकांमध्यें एक मुख्य ऋत्विज आहे; २, राज्यादि व्यवहारांत धन्याचा जो मुख्य हस्तक त्यास ल्ह०.

अध्वा, पु० सं० पंथा.

अनंकष्ठ, न० पवसंख्येचा अंक जा ष्ठावर घातला आहे त्याहून इतर जे ष्ठ तें.

अनकूळ, ३लिं० अनुकूल शब्दाचा अपभ्रंश.

अनंत, ३लिं० सं० जास अंत नाहीं तो; २, पु० ईश्वर; ३, एक नाग पुराण प्रसिद्ध आहे; ४, चतुर्दशग्रंथियुक्त रेशमाचा जो पुजावाकरितां दोरा करितात तो; ५, एक कर्ण भूषण आहे.

अनंतचतुर्दशी, स्त्री० सं० भाद्रपद शुक्ल चतुर्दशी.

अनंतपार, ३लिं० सं० जास अंतपार नाहीं तो.

अनंतर, अ० सं० उत्तरकालीं; २, ३लिं० अव्यवहित.

अनंतवात, स्त्री० चवदा सूतांची जी वात करितात ती.

अनंतव्रत, न० सं० अनंत-चतुर्दशीस अनंतपूजनात्मक जें व्रत करितात तें.

अनंती, स्त्री० अनंत-चतुर्दशीस अनंताची स्त्री ल्हणून तत्सदृश एक लाहान दोरा करितात ती.

अनं

अनंदक, ३लिं० जा गृहादिस्थलांत वाचका, मुलें, मनुष्यें, इ० कां सहवर्त्तमान राहणारा जो मनुष्य तो चिरकाल नांदत नाहीं असें जें तें दुष्टगृहादिस्थल तो.

अननं, अनन, अ० क्तन्निवृत्त्यर्थ जो भोजनादि व्यापार त्यास ल्ह०; याचा प्रयोग, अगोदर अननं मग तननं या ल्हणींतच.

अननस, अननास, पु० न० एक फल आहे; २, स्त्री० त्याचें जें झाड तो

अनन्य, ३लिं० सं० जा एकावांचून अन्य कोणी जास नाहीं असा जो भक्तादिक तो त्या ईश्वरादिकांचा.

अनन्यगति, अनन्यगतिक, ३लिं० सं० विवक्षितगतीहून जास दुसरी गति राहिली नाहीं तो.

अनन्यभक्ति, स्त्री० स० एक ईश्वरावांचून दुसरें देहादिकही प्रिय वाटूं नये अशी जी भक्ति तो.

अनन्यभाव, पु० सं० आंत बाहेर एकच जो भाव तो.

अनन्यवेद्य, ३लिं० सं० परममित्र जो त्यासही जें कळवितां येत नाहीं केवळ आपले मनांतच गुप्त ठेवायाचें असें जें दुष्कर्मादि तो; कि० आपण आपले अनुभवानेंच केवळ जाणतां येतें, लक्षणादृष्टांत इ० कें करून ही दुसऱ्यास सांगतां येत नाहीं असें जें निरुपम ब्रह्मसुखादि तो.

अनन्वयालंकार, पु० सं० एकाच अर्थास उपमानत्व आणि उपमेयत्व कल्पून जो उपमानोपमेयभाव वर्णिला असतो तो; उ० समुद्रासारिखा एक समुद्रच इ० अनन्वयालंकाराचीं उदाहरणें जा-

णावीं

णावीं.

अनन्वित, ३लिं० सं० जाचा अन्वय यथास्थित-सुज्ञ-त नाहीं असेंजें भाषण ग्रंथ इ० तो; २, शास्त्रास, व्यावहारिक नीतीस विरुद्ध जें कर्म तो.

अनपत्य, ३लिं० सं० जास अपत्य नाहीं तो.

अनपराध, अ० सं० विनापराध; २, ३लिं० अनपराधी.

अनपराधी, ३लिं० सं० जाचे आंगीं अपराध नाहीं तो.

अनपेक्ष, ३लिं० सं० निरपेक्ष.

अनभ्यस्त, ३लिं० रा० अनभ्यस्त.

अनभ्यस्त, ३लिं० सं० जा कर्माचें अभ्यासानें परिज्ञान जास झालें नाहीं तो त्याविषयीं.

अनभ्यास, पु० सं० अभ्यासाभाव, वा० अनभ्यासे विषं शास्त्रं.

अनभ्यासी, ३लिं० सं० अनभ्यस्त; २, विद्यादिकांचा अभ्यास करण्याविषयीं आळस जाला तो.

अनमान, पु० कर्त्तव्यत्वादिरूपें करून प्राप्त झालें जें काहीं एक कर्म त्याविषयीं जो अनादरबुद्धि तो.

अनमानणें, कांहीं एक कार्याविषयीं अनमानानें युक्त होणें.

अनमानधपका, पु० अटकळपंचविशी.

अनमानिक, ३लिं० अनमान आहे जामध्यें असेंजें भाषण, गमन, इ० तो.

अनय, पु० अन्याय; २, जामध्यें नीति नाहीं असा पुरुष, देश, राज्य, इ० तो.

अनर, स्त्री० न० कों० रामफळ व त्याचें झाड तीतें.

अनरसा, पु० एक पक्कान्न आहे.

अनर्गल, अनर्गळ, ३लिं० जास आडकाठी कोणाची नाहीं अनएवजीं मनस्वी तो.

अनर्घ, अनर्घ्य, ३लिं० अमोलिक.

अनर्थ, पु० सं० जेणें करून सर्वस्व नाश होतो आणि मनुष्यादिक केवळ घाबरे होतात असेंजें चोरभय, अतिवृष्टि, अग्न्युत्पात, इ० रूप जीं महासंकटें तीं. किं० तदुपद्रवांचा जो अतिशय तो; उ० तिकडे चोरांचा अनर्थ आहे तूं जाऊं नको; २, क्रिया, गुण, इ० कांचा सामान्यरूप जा मर्यादा त्यांचा उल्लंघ व्हावयाजोगा जो त्या क्रियादिकांचा अतिशय होतो तो; उ० याणें एकें दिवसांत पांचशें श्लोक लिहिले तस्मात् याणें अनर्थ केला; यंदा सस्ताईचा अनर्थ झाला पंधरा पायली तांदूळ रुपयास मिळतात; तादृश अतिशयविशिष्ट जे क्रियादिक त्यांचें पक्षीं विशेषणही होतें; उ० अनर्थ बोलतो, याची अनर्थबुद्धि; ३, अर्थ नव्हे तो; उ० त्या श्लोकाचा अर्थ सोडून अनर्थ केला.

अनर्थक, ३लिं० सं० जामध्यें अर्थसंदर्भ नाहीं असेंजें पद, वाक्य, इ० तो; २, निष्प्रयोजन.

अनर्थापात, पु० चोरोपद्रवादिरूप अनर्थाचें कोणेकावरजें पतन तो; २, दुसऱ्यास उपद्रव कारक जीं शिव्या गाळी, रडणें, ओरडणें, मारणें, इ० कर्में त्यांचा जो अतिशय तो.

अनल, अनळ, पु० अग्नि.

अनलस, ३लिं० सं० जास आलस्य नाहीं तो.

अनवकाश, ३लिं० निरवकाश.

अनवट, पु० प्रायः रुप्याचें एक पादभूषण आहे.

अनवटी, स्त्री० हनुवटी.

अनवर्णी, ३लिं० अनवाणी.

अनवधान, न० अवधान राहित्य; २, वि० अवधान रहित.

अनवलोभन, न० षोडश संस्कारांतील एक संस्कार आहे.

अनवस्था, स्त्री० प्रश्नोत्तरादि क्रमाचे समाप्तीस अवधि कोठेंच मिळूं नये अशी जी त्या त्या व्यवहारास अवस्था प्राप्त होत्ये ती; उ० परमाणूस निरवयवत्व मानायाचें कारण कीं त्याचा अवयव पुनः त्याचा अवयव अशी कल्पना करीत सुटल्यास अनवस्था होईल; २, स्थिति पावायाचीं जीं अनेक विषयादि स्थलें असतात त्यांतून एक ही स्थलाचा गयीं स्थिति न पावल्यामुळें निराश्रितत्व रूप जी दशा अंतःकरणादिकांस होत्ये ती; उ० पुरतें वैराग्य नहोतां उगीच हटानें विषय त्याग केला असतां अंतःकरणाची अनवस्था मात्र होईल.

अनवस्थित, वि० अनवस्था पावलें जें अंतःकरणादिक तो.

अनवळखी, वि० अनोळखी.

अनवा, उ० मसुदा; २, वि० या प्रतिमेचा पूर्वी कधीं ही पाहिला नवता असें यादाचाजोगा सर्वोत्कृष्ट चांगला जो मनुष्य, पदार्थ, इ० तो; उ० आजचें गाणें अनवा झालें, आज खरोर अनवा झाली.

अनवाणी, अनवाहणी, वि० चालण्याचे प्रसंगी जोडा, वाहाण, इ० पादत्राणा वांचून स्थित जो मनुष्यादि कि० जाणें, चालणें, इ० क्रियांचें वि०.

अनशन, न० व्रतार्थ काहींच न भक्षितां अहोरात्रादि काल घालविण्याचा जो प्रकार तें.

अनशनव्रत, न० अनशन चर्जामध्यें प्रधान असें व्रत आहे.

अनशवेंपोट, अनशिळेंपोट, न० अन्नादि भक्षिल्यावांचून केवल रिक्त जें पोट तें, प्रायः प्रथमांतप्र०, कमी; उ० अनशवे पोटीं पाणी प्यालें असतां नळांत भरेल.

अनशूद, स्त्री० अनशुद्धीचा अपभ्रंश.

अनशेंपोट, अनशोपोट, अनशोयपोट, न० अनशवें पोट.

अनश्रुत, वि० सं० कधींहि पूर्वी ऐकलेली नव्हे अशी जी कांहीं एक गोष्ट इ० तो.

अनसूट, वि० आंतील कांहीं अंशाचाही उपभोग, व्यय केल्यावांचून तसेंचें तसें ठेविलेलें कि० आणिलेलें पाणी, दुभतें शेतचें धान्य, इ० तो.

अनसोळेंपोट, न० अनशवें पोट.

अनहित, न० हित नव्हे तें.

अनागत, वि० पूर्वी आलेला नव्हे असा जो भविष्यकालादिक तो.

अनागतविधाता, वि० कांहींएक संकट येऊन ठेपण्याचे पूर्वीच त्याचा प्रतीकार योजण्याचा स्वभाव जाचा असा जो चतुर पुरुष त्यास ल०.

अनागम, वि० जाचा लाभ अमुकापासून झाला म्हणून थांग नाहीं असे असतां केवल उपभोग मात्र चालतो असें जें वृत्यादिक तें.

अनाघात, अ० सामान्य मर्यादेहून अतिशयितपणें; उ० यंदां अनाघात पाऊस पडला.

अनाचार, शास्त्रानें वर्णाश्रमादि भेदें कल्पिलेले जे शौचाचाचार सांगितले आहेत तद्विरुद्ध जें आचरण तो.

अनाचारी, ३लिं० अनाचार करण्याचा स्वभाव जाचा तो.

अनाठायीं, अ० द्रव्यादिकांचा विनियोग जेथें केला असतां इहलोकीं किंं० परलोकीं कांहीं फल व्हावयाचें नाहीं असें जें अपात्रभूत अधिकरण त्याचेठायीं; उ० द्रव्याचा धर्मार्थ व्यय करावा किंं० उपभोगतरी करावा उगेंच अनाठायीं घालवूं नये.

अनाडी, ३लिं० अडाणी.

अनाथ, ३लिं० सं० जाचा सांभाळ करणारा मातापितर, धनी, इ० कोणी नाहीं असा जो तो; २, अनाथाचा सांभाळ करण्याचा स्वभाव जाचा असा जो ईश्वर, साधु, इ० तो, अनाथनाथ, अनाथबंधु, इ० समास जाणावे.

अनादर, पु० सं० आदराचा प्रतिपक्षी.

अनादरण, न० अनादर करण्याचा व्यापार.

अनादरणें, अनादर करणें.

अनादि, ३लिं० सं० हा अमुककालापासून प्रवृत्त झाला अशा ज्ञानास कारणभूत जो आरंभ कालरूप अवधि तो जास नाहीं असा जो ईश्वर, माया, इ० तो; २, जाचे आरंभकालाचा थांग नाहीं असा जो चिरंतन ग्रंथादिक तो.

अनादिनिधन, ३लिं० सं० जास आदि नाहीं व अंत ही नाहीं तो.

अनादिपरंपरा, स्त्री० सं० जीचा प्रारंभी प्रवर्तक कोण हा थांग लागत नाहीं अशी जी कांहीं आचारादिकांची परंपरा चालत असत्ये ती.

अनादिसिद्ध, ३लिं० सं० कोणी मनुष्यादिकानें केलेला नव्हे असा जो ईश्वरनिर्मित किंं० केवल स्वतःसिद्ध तो.

अनादृत, ३लिं० सं० अनादर केला जाचा तो.

अनामत, स्त्री० आपल्ये द्रव्यादिकांची दुसऱ्यापाशीं ठेवितात जी ठेव ती; २, अ० वादी प्रतिवादी इ० रूप कोणेक विषयावर सत्ता करणारे जे अनेक त्या सर्वांचा सत्तेबाहेर ति-ह्या दुताकडे, तो विषय ठेव, अस, इ० कांचें वि०; ३, कोणेक विषयाचे जे अनेक विभागी त्याणी स्वस्व विभागानुरूप वांटे न करितां मोघमांत; उ० सारी जिंदगी वांटून घेतली शेतें मात्र अनामत राहिलीं आहेत; ४, दे० अचळ; उ० भरलेली दऊन अनामत उचलून ठेव.

अनामय, न० आरोग्य; २, ३लिं० तद्विशिष्ट तो.

अनामिक, पु० सं० अंत्यज.

अनामिका, स्त्री० सं० हाताचे करंगळीचे शेजारचें जें बोट ती.

अनायक, न० नायकाचा जो अभाव तें; उ० या राज्यांत आतां अनायकझालें येथें राहाण्याची सोय नाहीं; २, ३लिं० तद्विशिष्ट जें राज्यादिक तो.

अनायासानें, अनायासें, अ० आयासा वांचून.

अनार, न० पु० दाळिंब लक्षणोन फल आहे; २, तादृश मातीचें पात्र करून त्यात दारू भरून जो नळा करितात तें तो.

अनारदाणी, ३लिं० दाळिंबाचे दाण्यासारखे विणकरी नेजावर बूट केले असतात असें जें पागोटें, दुपट्टा, इ० तो

अनावर, ३लिं० विवक्षित मर्यादेंत नियमित करून न देवण्यास जो दुःशक तो; २, तादृश नियमन जास नाहीं असा जो तो.

अनावळी, स्त्री० अवळी.

अनावार, ३लिं० अनावर.

अनावृत, ३लिं० जास आवरण नाहीं तो.

अनावृष्टि, स्त्री० जेणें करून शेतें मरावीं व पृथ्वीवर उदकही दुर्लभ व्हावें असा जो वृष्टीचा अभाव ती

अनाश्रम, अनाश्रमी, ३लिं० सं० ब्रह्मचर्यादि आश्रमांतील एकही आश्रम जास नाहीं तो.

अनाश्रय, अनाश्रयी, ३लिं० सं० निराश्रय.

अनास्थ, ३लिं० अनास्थाविशिष्ट तो.

अनास्था, स्त्री० आस्थेचा प्रतिपक्षी जो भाव ती.

अनिघा, स्त्री० निषेचा अभाव.

अनिच्छ, ३लिं० सं० निरिच्छ.

अनित्य, ३लिं० सं० शाश्वत नव्हे तो.

अनिमेष, पु० सं० इंद्रादिदेव; २, मत्स्य.

अनियम, पु० विवक्षित नियमाचा जो अभाव तो.

अनिर्वचनीय, ३लिं० जाचें निर्वचन करितां येत नाहीं असा जो ईश्वरमहिमा, पराकाष्ठेचें दुःख, सुख, गुण, दोष, इ० तो.

अनिर्वाच्य, ३लिं० सं० अनिर्वचनीय.

अनिर्वाह, पु० सं० निर्वाहाचा अभाव तो.

अनिल, पु० सं० वायु.

अनिवार, ३लिं० अतिशयित.

अनिवार्य, ३लिं० जाचें निवारण करायास अशक्य तो.

अनिष्ट, ३लिं० सं० इष्ट नव्हे तो.

अनिष्टसूचक, ३लिं० सं० अनिष्टफलातें सूचविणारा जो उत्पातादिक तो.

अनी, स्त्री० अणकुची.

अनीन, स्त्री० लगामाची सरदारी व तोंडातील लोखंडाचा पदार्थ असतो तो वर्ज करून अवशिष्ट जो चर्मरूप, दोरीरूप, अंश असतो ती.

अनु, अ० सं० हा उपसर्ग; अ० अनुलक्षून; याचा प्र० संस्कृतांत समसमादिस्थलीं होतो; उ० अनुगमन, अनुचर, इ०; २, पश्चात्; याचाही प्र० संस्कृतांतच; उ० अनुताप, इ०.

अनुकंपा, स्त्री० सं० दया.

अनुकंपित, ३लिं० सं० कोणेकानें जावर अनुकंपा केली आहे तो.

अनुकंप्य, ३लिं० जाजवर अनुकंपा करायास योग्य असा जो रोगी, दरिद्री, इ० तो.

अनुकरण, न० सं० कोणेकाचे कृतीसारखी दुसरा करितो ती कृति किं० शब्दासारखा जो शब्द तें परंतु अव्यक्तशब्दाचें अनुकरण कर्तव्य असतां तेथें वर्णाभास मानून व्यक्तरूपही करितात; २, वाच्यार्थी तात्पर्य न धरितां शब्दाचा अर्थ केवल शब्दच या तात्पर्यानें उच्चारित जो शब्द तें; ३, तें अनुकरण करण्याचा जो व्यापार तें.

अनुकरणधातु, पु० सं० अव्यक्तध्वनी इ० कांचे अनुकरणशब्दानें कर करणें, खट खट णें, इ० होतात जे धातु ते प्र०.

अनुकल्प, पु० मुख्यत्वें करून जें कर्मादि सांगिलें असतें तदसंभवीं तदपेक्षया कांहीं गौण कर्मादि तत्स्थानीं करावें अशी जी शास्त्रादिकांत कल्पना असत्ये तो.

अनुकार, पु० प्रा० अनुकरण तृतीयार्थी.

अनुकूल, अनुकूळ, ३लिं० विवक्षित कर्मादिप्र-

वृत्तीचा जाचे योगानें उत्कर्ष होतो त्यास तो; उ० पूर्वेकडे गमनास पश्चिमवायु अनुकूल होतो; मीमांसामत धर्मशास्त्रास अनुकूल आहे; २, न० विवक्षित कर्म करण्याविषयीं कोणेकास देशकालादि साधनाचा जो अनुकूलपणा असतो तें; उ० यंदा काशीस जाण्याचें आह्मास अनुकूल नाहीं सारीं माणसें घरीं दुखणाईत आहेत.

अनुकृति, स्त्री० सं० अनुकरण.

अनुक्त, वि० सं० कोणेक कार्याविषयीं निषेधिला जो तो, कि० भाषण लेखनादिकें करून जाचें प्रकटीकरण केलें नाहीं तो.

अनुक्रम, पु० सं० यापुढें तो, त्यापुढें तो, त्यापुढें तो, असा जो पूर्वापरीभावसंबंध तो.

अनुक्रमणिका, स्त्री० सं० अमुकपत्रीं अमुक प्रकरण आहे किं० अमुकप्रकरणापुढें अमुकप्रकरण आहे, हें समजाया करितां त्या त्या प्रकरणाचीं नावें अनुक्रमानें लिहिलीं असतात ती.

अनुक्रांत, वि० सं० अनुक्रमानें निवेदनादिकराया साठीं जो धरला शास्त्रादिरूप अर्थ तो.

अनुग, पु० सं० अनुचर.

अनुगतधर्म, वि० सं० इतरत्र अतिव्याप्त नसून तत्तत्पदार्थाचेठायीं अवच्छेदकावच्छेदेंकरून स्थित असतो जो जातिगुणादिरूप धर्म तो; उ० गंधवत्व हा पृथ्वीचाठायीं अनुगत धर्म आहे.

अनुगम, पु० सं० अनेक व्यक्त्यादिकांतें व्यापून स्थित जो जात्यादिरूप अर्थ त्याचें अनुगतधर्मसंबंधद्वारा बुद्धीनें जें आकलन तो.

अनुगमन, न० सं० कोणीएक जाणाराचे मागून जें गमन तें; २, भर्त्यास मंत्राग्निसंस्कार झाल्यानंतर क्षत्रियादिस्त्रिया तत्सादुकादिसहवर्तमान जें एथकूचितेचाठायीं आरोहण करितात तें; ३, सत्या जें सहगमन करितात त्यासही ही संज्ञा आहे.

अनुगामी, वि० सं० जो जाचे पाठीमागून किं० अनुलक्षानें चालणारा तो त्याचा.

अनुगुण, वि० सं० कांहीं एक कार्यार्थ जाशीं जो योजायाचा तन्निष्ठ गुणास अनुकूल आहे तगुण जाचें तो त्यास; उ० औषधपाहून तदनुगुणच पथ्य योजलें पाहिजे.

अनुगृहीत, वि० सं० जाजवर अनुग्रह केला तो.

अनुग्रह, पुं० सं० देवता, गुरु, राजा, इ० कांचा भक्त, शिष्य, सेवक, इ० कांवर होतो जो प्रसाद तो; २, सद्गुरु शिष्यास जें मंत्रदान करितो तो; ३, कोणेक अर्थावर कोणकाचें स्वशक्त्यादिद्वारा जें व्यापन तो; उ० अंतःकरणाचा अनुग्रहावांचून इंद्रियांस विषयग्रहणीसामार्थ्य येत नाहीं.

अनुग्रही, वि० सं० जास जा सद्गुरुनें मंत्रोपदेश दिला तो त्याचा.

अनुग्राहक, वि० सं० अनुग्रह करणारा तो.

अनुग्राह्य, वि० सं० अनुग्राहकानें अनुग्रह करण्यासजो योग्य तो.

अनुचर, पु० सं० सेवक.

अनुचित, वि० सं० उचित नव्हे तो.

अनुज, पु० सं० पाठचा भाऊ तो.

अनुजीवी, पुं० सं० पोष्यवर्गांतरगत जो दासी, दास, भार्या, इ० तो.

अनुतप्त, वि॰ सं॰ अनुताप पावला आहे जो तो.

अनुताप, पु॰ सं॰ क्रोधावेशादिकारणें मुळें जें कांहीं अकर्मादि हातून घडतें मग तो आवेशादि गेल्यानंतर डोळ्यांत वाईट कर्म माझे हातून घडलें असा जो तद्विषयीं अंतःकरणास खेद होतो तो.

अनुतापी, वि॰ सं॰ अनुतापशील.

अनुत्तर, न॰ सं॰ जो प्रश्नावर समर्पक उत्तर जें नव्हे तें; २, उत्तराचा अभाव; उ॰ कोणी कांहीं फार मार्गें लागला असतां संकोचादि कारणानें कदाचित् अनुत्तरच उत्तर कल्पावें लागतें.

अनुत्पन्न, वि॰ सं॰ प्रपंचादि निर्वाहोपयोगी वृत्यादिक जें तें उत्पन्न नाहीं जाला तो.

अनुदिन, अनुदिनी, अ॰ प्रत्यहीं.

अनुधार, अ॰ धार क्षणभर न राहातां एकसार रहे धारेनें पाऊस, पडणें, बसणें, लागणें, इ॰ कांचें वि॰.

अनुधावन, न॰ सं॰ प्रकृत कार्याचा सामान्य पदार्थानें उदाहरण लाभादिरूप निर्वाह संभवत असतां विशेष पदार्थ शोधनार्थ ग्रंथकारादिकांचे बुद्धीचें जें दूरगमन तें.

अनुध्यास, पु॰ सं॰ निरंतर जो ध्यास लागतो तो.

अनुनय, पु॰ सं॰ विनयपूर्वक प्रार्थना तो.

अनुनासिक, वि॰ सं॰ मुखसहित नासिकेनें जाचें उच्चारण होतें असा जो अँ ईं भमङणनइ॰ वर्ण तो.

अनुनीत, वि॰ सं॰ विनयानें जो प्रार्थिला तो.

अनुपकारी, वि॰ सं॰ अल्पायासानें हीमहान् उपकार दुसऱ्यावर होत असतां करूं नये असा स्वभाव जाचा तो, कि॰ दुसऱ्यानें केलेल्या उपकाराचा आभार जो मानित नाहीं तो; २, कों॰ जें जामध्यें तेज असावें तें त्यांत नाहींसें झाल्यामुळें विवक्षित कार्याविषयीं अनुपयोगी झाला तो.

अनुपपत्ति, स्त्री॰ सं॰ उपपत्तीचा अभाव ती.

अनुपपन्न, वि॰ सं॰ शब्दादि प्रमाणानें जाची उपपत्ति होत नाहीं असा जो कांहीं प्रमेयार्थ तो; २. अनुत्पन्न.

अनुपम, वि॰ निरुपम.

अनुपमेय, वि॰ सं॰ अनुपम.

अनुपम्य, वि॰ अनुपम.

अनुपयुक्त, अनुपयोगी, वि॰ सं॰ उपयोगी नव्हे तो.

अनुपस्थित, वि॰ सं॰ उपस्थित नव्हे तो.

अनुपस्थिति, स्त्री॰ सं॰ उपस्थित्यभाव ती.

अनुपान, न॰ सं॰ रसायनादि सिद्ध औषध जांत मिश्रित करून पोटांत घेतात तें शर्करादि द्रव्य तें.

अनुपूर्वी, स्त्री॰ आनुपूर्वीचा अपभ्रंश.

अनुप्रास, पु॰ सं॰ श्लोकादिकांत शब्दालंकार आहे.

अनुबंध, पु॰ सं॰ कुटुंबादिक जें कांहीं आपले मागें खटलें असतें तद्रूप जें आपल्यास बंधन असतें तें.

अनुभव, पु॰ सं॰ प्रत्यक्ष अनुमान, शब्द, इ॰ द्वारा हा पदार्थ मी जाणतों असा जो अंतःकरणावर ज्ञानाकार होतो तो; २, सत्यत्वासत्यत्व साधारण्यानें ज्ञात जो शब्दादिक कांहीं एक अर्थ तत्कलादि प्रत्यक्षादिकानें तद्विषयीं सत्यत्व किं॰ असत्यत्व ग्रह होतो तो; ३, वृत्यादि भोग्य वस्तूंचा जो उपभोग तो.

अनुभवणें, उ० अनुभवविषय करणें.

अनुभवरसिक, ३लिं० सं० त्या त्या कवितादिविषयां-चा अंगीं अनुभव भिनल्यामुळें त्या त्या विषयीं जास रसिकता आली असत्ये तो त्याविषयीं.

अनुभवारूढ, ३लिं० सं० अनुभवास आला जो कोणेक अर्थ तो.

अनुभवी, ३लिं० सं० जा विषयाचा जास अनुभव आला आहे त्याविषयीं तो.

अनुभवीक, ३लिं० ज्याचा अनुभव आला आहे असा जो औषधादिक तो.

अनुभूत, ३लिं० सं० अनुभवलेला जो तो.

अनुभूति, स्त्री० सं० अनुभव.

अनुभूयमान, ३लिं० सं० वर्तमानकालीं जाचा अनुभव होत आहे तो.

अनुमत, न० सं० कोणेक गोष्टीविषयीं कोणेकाचे मताचा जो अनुकूल भाव तें; २, तज्ज्ञापक जो त्या त्या कर्माविषयीं होयकार तें; ३, ३लिं० यद्विषयीं जाचे मताचा अनुकूल भाव आहे तो त्यास.

अनुमति, स्त्री० सं० अनुमत प्रथमार्थी.

अनुमाता, ३लिं० अनुमान करणारा.

अनुमान, न० सं० कांहीएक हेतूचा प्रत्यक्षानें अप्रत्यक्ष अर्थाचें जें ज्ञान होतें तें; २, व्याप्तिविशिष्ट जो विवक्षित हेतु त्याम विवक्षित पक्षवृत्तित्व आहे असें जें तत्साधनीभूत पूर्वी ज्ञान होतें तेंही; ३, तें ज्ञान होण्याचा जो मनोव्यापार तें; ४, अटकळ.

अनुमानी ३लिं० सं० अनुमानानें जाणण्याविषयीं जो बुद्धिमान तो.

अनुमापक, ३लिं० सं० जेणेंकरून अनुमान होतें तो हेतु इ० तो.

अनुमानोक्ति, स्त्री० सं० कोणेक विषयाचें अनुमान करून हें असेंच अशी जी तद्विषयीं उक्ति ती.

अनुमित, ३लिं० सं० अनुमानानें जाणला तो.

अनुमिति, स्त्री० सं० मा० अनुमान प्रथमार्थी.

अनुमेय, ३लिं० सं० अनुमानानें जाणायास योग्य तो.

अनुमोदक, ३लिं० सं० अनुमोदन करणारा जो तो.

अनुमोदणें, अनुमोदित करणें.

अनुमोदन, न० सं० उत्साहपूर्वक दुसऱ्यानें केलें किं० करायास आरंभिलें जें कर्म तद्विषयीं हें बरें केलें किं० करायास हें बरें आहे इ० रूप त्या कर्माचा स्तुतीनें कर्त्याचें कोणी करितो जें प्रोत्साहन तें; २, अनुमृतविषयीं कोणी प्र० करितात.

अनुमोदित, ३लिं० सं० अनुमोदन केलें जाचें तें कर्म किं० कर्मकर्ता.

अनुयायी, ३लिं० सं० सहवर्तमान किं० मागून चालणारा जो सेवकादिक तो.

अनुयोगी, ३लिं० सं० संयोग, स्वस्वामि भाव इ० संबंधानीं संबद्ध एक मागचा अधिकरणादि आणि पुढचा आधेयादि असे दोन दोन असतात त्यांत जो मागचा तो; उ० राजाचा पुरुष असें म्हटलें असतां राजा अनुयोगी पुरुष प्रतीयोगी होतो.

अनुरक्त, ३लिं० सं० अनुरागविशिष्ट तो.

अनुरंजक, ३लिं० सं० अनुरंजन करणारा जो तो.

अनुरंजन, न० सं० कोणेकविषयीं सुखानें चित्तवृत्ति रंगली जावी असा जो अवस्थाविशेष होतो ते.

अनुराग, पु० सं० प्रीति.

अनुरागी, ३लिं० सं० प्रीतियुक्त.

अनुराधा, स्त्री० अनूराधा.

अनुरूप, ३लिं०सं० जास, जेथें, जाशीं, इ० विवक्षित गुणादिकांनीं जसा असावा तसा; उ० ही स्त्री या पुरुषास सर्वगुणांनीं अनुरूप आहे; तुमची आज्ञा होईल तदनुरूप मी चालेन, आज्ञानुरूप, कालानुरूप, देशानुरूप, सामर्थ्यानुरूप, इ० समास जाणावे.

अनुरोध, पु०सं० कोणी एक भाषणादि कर्माचे प्रवृत्तीस इतर जो प्रभुशास्त्रकार्य इ० प्रवृत्त तत्प्रवृत्तिवेग पारतंत्र्यें स्वीकृत असतें तो, उ० जाला शास्त्रज्ञान आहे त्याला तदनुरोधानें बोलावें लागतें, नावेंत बसलें स० नावेचा अनुरोधानें जिकडे जाणें घडेल तिकडे जाणें प्राप्त.

अनुलक्ष्यून, अ० कोणेक अर्थानें अनुलक्ष्यविषय करून.

अनुलक्ष्य, न०सं० कोणेक लक्ष्यानें लक्ष्यून किं० कोणेकाचे वर्तणुकीचें जें लक्ष्य त्याशीं अनुकूलपणें कोणेक वर्तनाविषयीं धरिलें जें संधान तें.

अनुलेप, पु० शरीरास चंदनादिकांचा जो लेप करितात तो किं० तें चंदनादिद्रव्य तो.

अनुलोम, ३लिं०सं० जाचा क्रम सुटलाजाहे तो; २, नीचजातीचे स्त्रीचागर्यी उत्तम जातीचे पुरुषापासून संतति होऊन जा मनुष्यजाति होतात त्या प्र०.

अनुलोमविलोम, ३लिं०सं० कांहीं उरफाटा कांहीं सरफाटा असा आहे क्रम जाचा तो.

अनुवर्तणें, अनुवृत्तहोणें.

अनुवर्तन, न०सं० अनुवृत्ति.

अनुवर्ती, ३लिं०सं० जातें जो अनुवर्तन राहातो तो त्याचा.

अनु

अनुवाद, पु०सं० एकवार उक्तभाषणाचा सर्वांस स्पष्टतर बोध व्हावा इ० कारणार्थ दुसऱ्याचें मुखानें किं० स्वमुखानें पुनः जें उच्चारण तो; २, अर्थाचे अपूर्वबोधनाविषयीं तात्पर्य नसतां केवल सिद्धवत् कथनार्थ जें उच्चारण तें; उ० मी तेथें गेल्यापासून सुख पावलों नाहीं येथें सुख पावलों नाहीं या अर्थाचें मात्र अपूर्वबोधन तेथें गेलों होतों हा अर्थ श्रोत्यास विदितच आहे म्हणून तदंशी अनुवाद; ३, दुसऱ्याचे दुष्कर्माचें उच्चारण तो.

अनुवादक, ३लिं०सं० अनुवाद करणारा जो तो.

अनुवृत्त, ३लिं०सं० जाची जाचागर्यी अनुवृत्ति तो त्याचागर्यी.

अनुवृत्ति, स्त्री०सं० प्राधान्यें करून एकेस्थानीं उत्पन्नकिं० स्थित जो कांहीं एक अर्थ त्याचा उत्तरोत्तर कांहीं एक स्थानाचागर्यी चालतो जो अन्वयती; उ० याचे सातव्या पुरुषानें यज्ञदीक्षा घेतली होती ती दीक्षितपणाची अनुवृत्ति सातपिढ्या चालत आली, आरंभश्लोकांत राजपद असतें त्याची अनुवृत्ति पुढील सर्व श्लोकांत होत्ये; २, कार्यादिकांचेंगर्यी कारणादिकांचा स्वगुणद्वारा जो अन्वयती; उ०, अलंकाराचेगर्यी सुवर्णत्वाची अनुवृत्ति आहे तशीच जगाचेगर्यी सद्रूपेंकरून ब्रह्माची अनुवृत्ति आहे; ३, सेवा, उ० अक्षी राजाची अनुवृत्ति करून पोट भरतों.

अनुव्यवसाय, पु०सं० घटातें मी जाणतों इ० रूप ज्ञानानंतर तादृश ज्ञानवान् मी आहें असें जें ज्ञान होतें तो.

अनुशासन, न०सं० कोणेक व्यवहार यायाप्रकारें,

याया

याचा मर्यादेनें,असें,असें,करावें,इ०रूप लक्ष्य लक्षणादिपूर्वक कोणेकरीतीनें बांधण्याचा जो व्यापार तें;२,त्याप्रमाणें व्यवहाराची इतिकर्त्तव्यता समजायासाठीं बांधलेलें जें तें तें शास्त्र तें.

अनुशास्ता, पु० सं० अनुशासनकर्त्ता.

अनुशीलन, न० सं० परिशीलन.

अनुशेंपोट, न० अनशवेंपोट.

अनुषंग, पु० कोणेकास कोणेकाचा जो समागम तो,२ प्रपंचादिनिर्वाहाविषयीं कोणेकास कोणेक समर्थाचा असणें जो आश्रय तो.

अनुष्टुप्, स्त्री० सं० श्लोकादि ग्रंथांत एक छंद आहे जाचे चरणास आठ अक्षरें असतात ती;२,३लिं० त्या छंदानें बांधलेले जे श्लोकादिक ते प्र०;३,न० कोणेक पदार्थ,गोष्ट,इ०कांचा आहे आहे,नाहीं नाहीं, असा जो भाव तें;उ० या तुमचा कोंकणांत तुपाचें अनुष्टुप् दिसतें.

अनुष्ठणें, कांहीं एक कर्म तत्साधक व्यापारद्वारा संपादणें.

अनुष्ठाता, ३लिं० सं० अनुष्ठानकर्त्ता.

अनुष्ठान, न० सं० अनुष्ठण्याचा जो व्यापार तें;२ होम हवन,जप जाप्य,इ० विधियुक्त जें कर्म तें.

अनुष्ठानप्रसंग, पु० सं० हितीयार्थक लाहान मोठें जें अनुष्ठान तो;उ० या गावांत कोणाचेहीघरीं अनुष्ठानप्रसंग झाला असतां दीक्षितांस आमंत्रण येतें.

अनुष्ठानी, ३लिं० सं० यजमानापासून कोणेक अनुष्ठानाचें वरण जाणें घेतलें आहे कि० इष्टापूर्तादि कर्मानुष्ठान चांगलें जाणतो तो.

अनुष्ठित, ३लिं० अनुष्ठिला जो तो.

अनुष्णाशीत, ३लिं० सं० उष्ण नव्हे आणि शीतही नव्हे असा जो स्पर्श कि० स्पर्शविशिष्ट वायु तो.

अनुसंधान, न० अमुक केल्यानंतर अमुक करायाचें, अमुक बोलल्यानंतर अमुक बोलायाचें इ०रूप जे अनेकविषय अनुक्रमानें ओवल्यासारिखे क्रमयुक्त संबद्ध झाले असतात असा जो अंतःकरणवृत्तीचा सूचाकार आकार झाला असतो तें;२,अंतःकरणवृत्ति,बाण,इ० जीं वेधकें त्यांची त्या त्या वेध्य विषयाकडे जी अभिमुखता तें;उ० मी गोष्ट सांगतों इकडे आपलें क्षणभर अनुसंधान असावें;३,विवक्षितस्थल व्यवहार इ०कांचा ठायीं प्रवेश व्हावा इ०रूप कार्यसिद्ध्यर्थ त्या त्या द्वारा चा आनुकूल्यानें करितात जो मार्ग जेणेंकरून त्या त्या कार्याची प्रवृत्ति चालत्ये तें;उ० मुख्यस्थानीं दाद लागणा जोगें मी अनुसंधान बांधून ठेविलें आहे;४,अमुक केल्यानंतर अमुक केलें च पाहिजे,अमुक कर्तव्य असतां अमुक केलें पाहिजे,इ०रूप कार्यकारण भावादि संबंधानें संबद्ध जीं अनेक कार्यें असतात त्या सर्वांतें धरून व्यवहार मार्गानुरोधानें कि० कर्तृमतानुरोधानें अनुस्यूत जो सूत्रप्राय संबंधचालला असतो तें;उ० याणें शिवी दिली ते व्हायाचा तोंडांत मारावी हें अनुसंधानास आलें;५,कथीनें क्रमानें बांधलेलें जें राजादिचरित्र जें कथेमध्यें कथेकरी गोंसावी लावितात तें;उ० आज गोंसाव्यानें हरिश्चंद्राचें अनुसंधान लाविलें होतें.

अनुसंधानी, ३लिं० संधानी;२,राजचरितादि अनुसंधान लाऊन कथा करितो जो गोंसावी तो.

अनुसरण, न० अनुलक्षून जें वर्तन तें.

अनुसरणें, अनुलक्षून वागणें

अनुसार, ३लिं० मा० अनुरूप या अर्थी; उ० तुझी बोलाल तसा अनुसार मी वर्तेन. औषधानुसार गुण आहे. कोलानुसार तुझी करितां हेंबरें आहे इ० समासीं प्र०.

अनुसारी, ३लिं० जो जातें अनुसरून वागतो तो तदनुसारी; येथेंही समासींच प्र०.

अनुसृत, ३लिं० अनुसरलेला तो किं० जाचें अनुसरण कोणेकानें केलें तो तेणें.

अनुस्यूत, ३लिं० सं० मध्यें विच्छेद नसतां एकसारखा चाललेला जो धनि, वृत्ति, उपभोग, कारभार इ०तो.

अनुस्वार, पु० एक वर्ण आहे जो अकारादि स्वरांपुढें श,ष,स,ह,इ० व्यंजनें पुढें असतां मध्यें कदाचित् येतो जाचें व्यंजकचिन्ह बिंदु असतो.

अनुक्षणी, अ० प्रतिक्षणी.

अनुज्ञा, स्त्री० सं० आज्ञा.

अनुज्ञात, ३लिं० आज्ञप्त.

अनूढ, ३लिं० सं० अविवाहित.

अनूराधा, स्त्री० सत्तावीस नक्षत्रांतील जें सत्रावें नक्षत्र त्या.

अनृण, अनृणी, ३लिं० जास ऋण नाहीं तो.

अनृत, न० सं० असत्य; २, ३लिं० तद्विशिष्ट भाषणादि तो.

अनेक, ३लिं० सं० एकाहून अधिक दोन, चार, इ० संख्येनें जे संख्येय ते; अनेकधा, अनेकवार, अनेकसत्ताक, अनेकमातृक, अनेकविध, इ० समास जाणावे.

अने

अनेकजिव्ह, ३लिं० सं० जो आतां एक, घटकेनें एक, बोलतो असा मनुष्य तो.

अनेकवचन, न० सं० नामाचे अर्थीं अनेकत्व असतां नामापुढें जो विभक्तिरूप प्रत्यय होतो तो किं० प्रत्ययार्थभूत जें कर्मादिकारक तद्गत अनेकत्वाचा ज्ञापक जो धातुपुढें प्रत्यय होतो तें, किं० तदंतजें तें पद तें.

अनोठा, ३लिं० गवई लोकांत गानाचे सामान्यतः जे प्रसिद्ध राग असतात त्याहून इतर जे कोणेकापाशीं चमत्कारिक रागविशेष गुप्तपणें असतात त्यांचें वि०; उ० त्याणें आज दोन राग अनोठे गायले.

अनोपत, स्त्री० रा० ग्रामांतील किं० गृहांतील अनेक मनुष्यें एककालीं दुखणायांत पडलीं असावी अशी जी अवस्था होत्ये ती.

अनोळखी, ३लिं० ओळखी चा नव्हे जो मनुष्यादिक तो.

अन्न, न० सं० जीवनहेत्यर्थ भक्षाया चे उपयोगी धान्य शिजवून, तळून, भाजून, सिद्ध केलें जें भात, भाकर, पुरी, इ० तें; २, प्रसंगविशेषीं धान्यासही स्त्र०; ३, प्राणवृत्यर्थ जें जाचें भक्ष्य तें त्याचें असें आरोपानें स्त्र०; मी तुमचे अन्नाचा इ० स्थलीं तुझी दिलेल्या अन्नानें जगलेला; स्त्र० अन्नतारी अन्नमारी, कोणेकाचे अन्नांत माती घालणें स्त्र० त्याचा प्रपंचादि चालविणार जें हत्यादिक त्याचा नाश करणें; अन्ना आडयेणें स्त्र० कोणेकास प्रपंचनिर्वाहाची सोय लागत असतां आपण विघ्न करणें; कोणेकास अन्नास लावणें स्त्र० जास प्रपंचनिर्वाहाची कोठें सोय नाहीं त्यास रोजगार इ० कांवर

जडून

जडून देणें इ० अनेक संप्रदाय आहेत.

अन्नकूट, पु० बलिप्रतिपदे-चेदिवशीं देवास अर्पाया-स जो अन्नाचा पर्वत करितात तो.

अन्नछत्र, न० अन्नसत्राचा अपभ्रंश.

अन्नदाता, पु० अन्नदानकर्ता; २, ज्याचे योगानें जाची प्राणवृत्ति चालत्ये तो त्याचा.

अन्नदेवता, स्त्री० सं० मोठे प्रयोजनाचा स्वयंपाक सिद्ध शाला ह्मणजे अन्नराशी-चेठायीं पूजितात जी अन्नाभिमानिनी देवता ती; २, अन्न धान्य या-सच देवता बुद्धीनें ह्म०.

अन्नपाणी, न० अन्न, पाणी आदि करून जें निर्वाह साधन तें.

अन्नपूर्णा, स्त्री० सं० भवानी; २, जिचे हातानें अन्ना-स पुरवण येतो अशी स्त्रियेस ह्म०; ३, भिक्षा मागा-याचे झोळीस ह्म०; अन्नपूर्णा येणें ह्म० अन्नास पु-रवण येणें.

अन्नप्राशन, न० सं० मुलांस प्रथमतः अन्न देण्याचा संस्कार आहे.

अन्नमय, १लिं० सं० त्यात्याकाळीं अन्न न पोंहोंचलें असतां व्याकुळ होतात अशीं जीं इंद्रियें, प्राण, देह, इ० तो.

अन्नरस, पु० सं० प्रसंगविशेषीं अन्नाचा अंशास-च ह्म०; उ० कांहीं करून याचे पोटांत अन्नरस जाई असें कर ह्म० हा सावध होईल.

अन्नवस्त्र, न० मनुष्यास निर्वाहार्थ अवश्य लागतें जें अन्न, आणि वस्त्र तें.

अन्नविकार, अन्नविकृति, पु०स्त्री० सं० अन्ना-चा जठराग्नीनें यथास्थित परिपाक न झाल्यामुळें जी विकृति होत्ये तो ती; २, कांहीं एक कारणानें अन्न पाहातांच ओकारी यावी अशी जी विकृति होत्ये तो ती.

अन्नव्यवहार, पु० सं० एकमेकाचे हातचें अन्न ए-कमेकानें खावें असा जो परस्पर व्यवहार चाल-तो तो; उ० दाक्षिणात्यांचा आणि गुर्जरांचा प्रा० अन्नव्यवहार नाहीं.

अन्नशांति, स्त्री० सं० अनेकांस अन्नदानरूप जें धर्मकृत्य ती.

अन्नशुद्धि, स्त्री० सं० अन्न देवादिकांस समर्पाया-स योग्य व्हावें ह्मणून वरघृत घालून जो संस्कार करितात ती; २, तदर्थ जें घृत त्यास ही ह्म०.

अन्नसंतर्पण, न० अन्नशांति.

अन्नसत्र, न० सं० जो कोणी ब्राह्मणादिक क्षुधित येईल त्यास अन्न घालावें असा जो व्यवहार आ-पले संसारा-चे खटल्याबाहेर कोणी भाग्य पुरुषानें चालविला असतो तें; २, तदर्थ बांधलें असतें जें घर तें; ३, पान, सुपारी, तमाखू इ० पदार्थ जास पा-हिजेत त्याणें येऊन खावे, ओढावे, भोगावे, इ० रूप अप्रतिबंध कोणेका-चेघरीं व्यवहार चालला अस-तो त्यास ह्म०; ह्म० अन्नसत्रीं जेवणें आणि मिरपू-डमागणें.

अन्नसंपर्क, पु० सं० अन्नसंस्कार, निषेधविषयीं प्र०

अन्नसंस्कार, पु० सं० ईषन्मात्रही अन्नभक्षणरूप जो भोजनसंस्कार तो. उ० महागिरींत बसल्यापा-सून आठवे दिवशीं बंदरास लागलों तेव्हां अन्न-संस्कार झाला, याला पंधरादिवसांत अन्नसंस्का-र नाहीं कांहीं औषधतरी योजून सांगा.

अन्नाच्छादन, न० सं० अन्नवस्त्र

अन्नानगत, स्त्री० कोणीकास अन्नाविषयीं जें दुर्भिक्ष प्राप्त होतें तो.

अन्नार्थी, ३लिं० सं० कोणी आपल्यास अन्न घालीलतर बरें आहे अशा इच्छेनें जो आर्त झाला तो.

अन्नोदक, न० सं० प्राणवृत्ति निर्वाहार्थ जाजा जीवास कोणेकादेशीं किं० कोणेकाचे पदरीं देवानें जें अन्न उदक कल्पिलें असतें तें त्याचें.

अन्नोदकऋणानुबंध, पु० सं० अन्नोदकाचा आणि जीवाचा दैवकृत जो भोग्य भोक्तृभाव संबंध तो.

अन्य, ३लिं० सं० अंतःकरणानें विषयीकृत जो कोणी एक अर्थ तद्रूप किं० तदंतःपाती नव्हे असा जो अर्थ तो; २, वस्तुतः एकरूप नव्हत असे जे ते परस्पर तो; उ० वेदांत आणि न्याय कांहीं एक नव्हे हें अन्य, तें अन्य.

अन्यजन्मार्जित, ३लिं० सं० पूर्वजन्मीं केलें जें सुकृत किं० दुष्कृत तें.

अन्यतर, ३लिं० सं० विवक्षित दोहोंतील जो एक तो.

अन्यतम, ३लिं० सं० विवक्षित बहुतांतील जो एक तो.

अन्यत्र, अ० सं० अन्यस्थलीं.

अन्यथा, अ० सं० विवक्षिताहून अन्यप्रकारानें; उ० हें औषध घ्यालतरच गुण पडेल अन्यथा पडणार नाहीं; २, मिथ्या; उ० मी तुलापाशीं अन्यथा बोलणार नाहीं खरें असेल तेंच सांगेन; मी इतकी मेहनत केलेली अन्यथा गेली कांहीं उपयोग झाला नाहीं; ३, विवक्षिताहून विपरीत.

अन्यथासिद्ध, ३लिं० सं० जो पदार्थ वांचून ही जो कार्याची सिद्धि होत्ये असा जो पदार्थ तो त्या कार्याविषयीं.

अन्यदा, अ० सं० अन्यसमयीं.

अन्यदीय, ३लिं० सं० अन्याचा जो तो.

अन्यपूर्व, ३लिं० सं० विवक्षित काल्याहून पूर्वी जाजवर अन्याचा स्वत्वसंबंध होता असा जो भूमि, वृत्ति, स्त्री, इ० तो.

अन्यसाधारण, ३लिं० सं० विवक्षित लक्ष्यादिकांहून इतरवेही जाची वृत्ति आहे असा जो संज्ञा, गुण, इ० तो.

अन्याय, पु० सं० व्यवहाराचेठायीं नीतिमार्गीचा जो अतिक्रम तो; २, तादृश अतिक्रम कर्त्यास तज्जनित जो घडतो अपराध तो.

अन्यायी, ३लिं० सं० अन्याय जाचे हातून घडला तो.

अन्यायोपार्जित, ३लिं० सं० अन्यायानें मिळविलेलें जें द्रव्यादिक तो.

अन्योन्य, ३लिं० सं० याणें त्याला उद्देशून त्याणें याला उद्देशून अशी कांहीं एक क्रिया होत असतां उभयकारकताविशिष्ट जे उभयतां किं० अनेक त्यांचें किं० क्रियेचें वि०; उ० या उभयतांनीं अन्योन्याला शिव्या दिल्या.

अन्योन्याभाव, पु० सं० घट तो पट नव्हे पट तो घट नव्हे अशाप्रतीतीनें वेद्य जो अन्योन्यावर अन्योन्यरूपतेचा अभाव तो.

अन्योन्याश्रय, पु० सं० याची सिद्धि तत्सिद्धिसापेक्ष, त्याची सिद्धि एतत्सिद्धिद्वारा असा जो अन्योन्यसापेक्षभाव असतो तो.

अन्योन्याश्रित, ३लिं० सं० अन्योन्याश्रयविशिष्ट जे

जे शब्दार्थादिक ते परस्पर.

अन्वय, पु०सं० स्वरूपतः किं० स्वशक्त्यादिद्वारा कोणेक अधिकरणातें व्यापून जे कोणेक पदार्थांचें अस्तित्व तो; उ० जितक्या चंद्रकलांवर सूर्यकिरणाचा अन्वय होतो तितक्या कला प्रकाशमान दिसतात; अंतःकरणाचा अन्वयावांचून सकल इंद्रियें विषयग्रहणाविषयीं जडप्राय आहेत; २, अनेकपदें वाक्यें यांन्वे अर्थांचा परस्पर जो कर्तृकर्म भाव, क्रियाकारकभाव, हेतुहेतुमद्भाव, विशेषण विशेष्यभाव, इ०रूप क्रमानें संबंध असतो तो किं० त्या अन्वयानुसार जुळलेला जो तत्तद्वाचक पदांचा समुदाय तो; ३, कोणेक अनुमान ज्ञानाविषयीं प्रयोजक असुक असतां असुक असतें, एतद्रूप जो परस्पर हेतुसाध्यभाव तो; ४, भाषणादिव्यवहारांतील जें इंगित तो; उ० याचे बोलण्यांतील अन्वय माझे ध्यानांत येत नाहीं.

अन्वयमुखें, अ० कांहीं अर्थांचें समर्थनादि करण्याचे प्रकार दोन आहेत एक पदार्थ सत्तेस हेतुत्वादि मानून घडतो दुसरा पदार्थाभावास हेतुत्वादि मानून घडतो त्यामध्यें प्रथम प्रकारातें आश्रयून.

अन्वययोजना, स्त्री०सं० श्लोकादिनिष्ठपदांची अन्वयानुरूप जी जुळणी ती.

अन्वयव्यतिरेकी, वि० सं० अन्वय आणि व्यतिरेक या दोनही व्याप्ति जेथें वसतात असें जें अनुमानस्थल तो.

अन्वर्थ, अन्वर्थक, वि० सं० यौगिक अर्थ न सोडितां कोणेक अर्थाची अभिधानता पावला जो शब्द तो; उ० मनोभव ही मदनाची अन्वर्थ संज्ञा.

अन्वारब्ध, वि० सं० कोणेकानें अन्वारंभ केला आहे जास तो.

अन्वारंभ, पु०सं० आचार्य यजमान इ०जो मुख्यकर्मी त्यास कर्मकालीं इतर ऋत्विज, पत्नी, इ० जो हस्तादिकेंकरून स्पर्शसंबंध करितात तो.

अन्वित, वि० सं० जाचेद्वारां कोणेकाचा अन्वय झाला तो किं० कोणेकाचाद्वारां जाचा अन्वय झाला आहे तो.

अन्वेषण, न०सं० कोणेक पदार्थाचा शोध लावण्याचा जो व्यापार तें.

अन्वेषणें, धुंडाळणें.

अन्हवणी, अन्हवाणी, वि० अनवाणी.

अप, अ०सं० हा उपसर्ग जाचे मागें लागतो तेथे त्याचा विरुद्ध किं० हीन अशा अर्थांचा द्योतक होतो; प्र०स०उ० अपमान, अपकर्ष, इ०

अपकरा, पु० उदकादिप्राशनोपयोगी आकारविशेषाचें पात्र आहे.

अपकर्ष, पु० अनुक्रमानुरोधानें पुढीलस्थानीं स्थित जें कर्मादिक त्याचें कांहीं कारणामुळें मागें जें आनयन तो; २, पराक्रम, वर्धमानता, महत्त्व, इ० गुणांनीं जी योग्यतारूप पदवी जो स्थित त्याचें त्यापदाहून खालचे पदवीं जें आकर्षण किं० स्थिति तो.

अपकर्षणें, कर्मादिक अपकर्षविशिष्ट करणें.

अपका, पु० कोणेक पदार्थावर पाणी, दूध, इ०कांचा हातानें जो छिडकाव देतात तो.

अपकार, पु०सं० अपथ्य, शत्रु, इ०कांपासून रोग. धननाश, इ०रूप भोग्यत्वेंकरून जी अहितफलाची

ची प्राप्ति होत्ये तो कि० अपथ्यादिकर्तृकत्याफलाचें जें कोणेकास प्रापण तो.

अपकारक, ३लिं०सं० अपकार करणारा जो तो.

अपकारी, ३लिं०सं० अपकार करण्याचा स्वभाव जाचा तो.

अपकीर्ति, स्त्री०सं० दुष्कर्मादि संबंधानें कोणेकाची वाईटपणानें जी ख्याति ती.

अपकृष्ट, ३लिं०सं० जाचा अपकर्ष झाला तो.

अपंक्त, ३लिं० अपंक्ताचा अपभ्रंश.

अपंग, ३लिं० प्रथमार्थक अपांगाचा अपभ्रंश.

अपगत, ३लिं०सं० जो कोणी एकापासून विवक्षित संबंध सोडून वियुक्त झाला तो.

अपघात, पु०सं० अकस्मात् मरण यावयास प्रयोजक जें उदकांत बुडणें, झाडावरून पडणें, सर्पदंश, शस्त्राघात, इ०तें प्र०.

अपचय, पु०ह्रास.

अपजय, पु०पराजय.

अपटणें, शय्यादिकांवर वस्त्र, काष्ठ, इ०पदार्थ बळकट तडाखाबसे असें प्रहत करणें; २, वादप्रतिवाद, युद्ध, इ०कांचा गयीं दुसऱ्यास एखादे पकडींत धरून पराभूत करणें.

अपटा, पु०एक वृक्ष आहे.

अपटी, स्त्री० देणें, घेणें, इ०व्यवहाराचा गयीं जो कांहीं एक कारणानें धक्का बसतो तो.

अपण, ३लिं० आपण.

अपत्य, न०सं० जा आईबापाचे पोटीं जें जन्मलें कन्या किं०पुत्र तें त्यांचें.

अपथ, पु०सं०कुमार्ग; अपथानें जाणारा तो अपथगामी, अपथवर्ती इ०समास जाणावे.

अपथ्य, ३लिं०सं० जाचा सेवनानें रोगविकृति होत्ये किं० असेल ती अधिक होत्ये असा जो अन्न, तेलकट, तिखट, अंबट, इ०पदार्थ तो; २, न० त्यांचे सेवनानें पथ्यनियमाशीं जो विरोध घडतो तें; ३, ला०जा कार्यसिद्धीविषयीं जा गोष्टीचें सेवन अहित त्या गोष्टीस तत्सेवनानें होतो जो तत्तन्नीतीचा विरोध त्यास स्त्री०.

अपदेश, पु०सं० व्याज.

अपधाक, पु०सं० आपधाक.

अपपाठ, पु०सं० अशुद्ध जो पाठ तो.

अपभाषण, न०सं० दुर्भाषण.

अपभाषा, स्त्री०सं० संस्कृतादिजी मूल भाषा तीचा अपभ्रंश होऊन प्रसिद्ध जी भाषा ती.

अपभ्रंश, पु०संस्कृतादि भाषेंतील मूलभूत जो कांहीं एक शब्द तो इतरभाषा व्यवहारांत आल्यामुळें कांहीं विकृति होऊन त्याचें होतें जें स्वरूपांतर तो.

अपमान, पु०सं० मानखंडना.

अपमानणें, अपमान विशिष्ट करणें.

अपमृत्यु, पु०सं० मरण नयेतां निवर्ततो जो सर्पदंश, मोठें दुखणें, इ०कारणानीं आलेला जो मरणाचा लाग तो; उ० हा पोर विहिरींत पडला आगींत पडून भाजला परंतु याचे दोनीं अपमृत्यु टळले.

अपयश, न० यशाचा प्रतिपक्षी जो कांहीं एक धर्म तें.

अपयशी, ३लिं० सर्व कर्मीचा गयीं अपयश च यावें असा दैवयोग जाचा तो.

अपर, वि॰ सं॰ अन्य, परंतु लोकांत याचा प्र॰ विरल; २, विवक्षिताहून जो पुढचा तो; याचा प्र॰ प्रा॰ समासीं; उ॰ पूर्वापर, अपररात्र, अपरार्ध, इ॰; ३, पश्चिम.

अपरपर्याय, पु॰ सं॰ ज्या शब्दाचे अर्थाचा वाचक जो दुसरा शब्द तो त्याचा; उ॰ उदकशब्दाचा अपरपर्याय जल शब्द.

अपरपक्ष, पु॰ सं॰ कृष्णपक्ष; २, पितृपक्ष.

अपरंपार, वि॰ ज्याचा अंतपार लागत नाहीं असें जल इ॰ तो.

अपरात्र, पु॰ स्त्री॰ मध्यरात्रीचा पलीकडील जो भाग तो ती.

अपरसूर्य, वि॰ सं॰ विद्या, किं॰ तपश्चर्यांचा तेजामुळें सूर्यरूपें करून मानायास जो योग्य तो.

अपराजिता, स्त्री॰ सं॰ एक वनस्पती आहे.

अपरात्र, स्त्री॰ अपररात्राचा अपभ्रंश.

अपराध, पु॰ सं॰ अन्याय्य कर्म केल्यामुळें कर्त्यास जो दोषविशेष घडतो तो, जेणेंकरून दंडार्ह ताथेत्ये.

अपराधी, वि॰ सं॰ अपराध ज्याचेहातून घडला तो.

अपराह्ण, पु॰ न॰ पंचधा विभक्तदिवसाचा जो चवथा किं॰ द्विधा विभक्तदिवसाचा जो दुसरा भाग तो.

अपरिमित, वि॰ सं॰ ज्याची इयत्ता होत नाहीं तो; उ॰ हा किल्ला अपरिमित मोठा; २, नेमलेल्यापेक्षां अधिक तो; उ॰ जितक्या सांगितलें तितकें बोलावें उगीच अपरिमित बोलूं नये.

अपरिहार्य, वि॰ सं॰ परिहार करण्यास अशक्य दोष, रोग, इ॰ तो.

अप

अपरूप, अपरूब, वि॰ जो कधीं पूर्वी पाहणें, आइकणें, इ॰ प्रकारानीं अनुभवलेला नव्हे अतएव ज्याचे दर्शनादिकानें आश्चर्य होतें किं॰ दुर्लभतेमुळें ज्याजवर उत्कट प्रेमा असतो असा जो कांहीं एक पदार्थ.

अपरूबाई, अपरूभाई, स्त्री॰ रा॰ अपूर्वाई.

अपरोध, पु॰ कों॰ गुरुजनादिकांपासून लज्जेमुळें कांहीं एक गोष्टीविषयीं जो मनांत संकोच होतो तो.

अपरोधणें, कों॰ अपरोध पावणें.

अपरोक्ष, अ॰ सं॰ समक्ष; २, केवल प्राकृतजनअसमक्ष या अर्थी प्र॰ करितात; ३, परोक्ष नव्हे असें जें ज्ञानादि तो.

अपला, वि॰ आपला.

अपलाअपण, अ॰ आपलाआपण.

अपलाप, पु॰ भाषणादिप्रसंगीं कांहीं कपटयुक्तीनीं वास्तविक जो वक्तव्य अर्थांश किं॰ शृंगारादि रस किं॰ क्रोधाद्याकार इ॰ कांचें जें गोपन तो.

अपलाला, वि॰ आपलाला.

अपलेअपण, अपल्याअपण, अ॰ आपले आपण.

अपवर्ग, पु॰ मोक्षसाधून जो पुरुषार्थ तो.

अपवर्तक, वि॰ जेणेंकरून अपवर्तन होतें तो अंक.

अपवर्तन, न॰ भाज्य आणि भाजक किं॰ लव आणि छेद असे जे दोन दोन राशी त्यांची जा अंकानें दोघांचीही निःशेषता होत्ये त्या अंकानें भागून जें लघुकरण तें; उ॰ भाज्य ६४ भाजक ४० अप-

वर्तक

वर्तक ४ अपवर्तन करून शाले लघुभूत राशि भाजक १८ भाजक १०.

अपवाद, पु० आंगीं कांहीं दुर्गुण दुष्कर्मादि न सतां यांत अमुक दुर्गुण आहे अमुक दुष्कर्म आहे इ० रूपेंकरून ख्यातिविषयता कोणेकावर येत्ये तो; २, कोणेक विधीनें कोणक विधीचा निरवकाशत्वादि कारणामुळें जो बाध होतो तो.

अपवित्र, ३लिं० सं० जाविषयीं जो पवित्र नव्हे तो त्याविषयीं.

अपशकुन, पु० अशुभफलसूचक जो शकुन होतो तो.

अपशब्द, पु० व्याकरण शास्त्रानें साधला जात नाहीं असा जो शब्द तो; २, सभ्यानीं बोलायास योग्य नव्हे किं० जेणेंकरून दुसऱ्याचा धिक्कार होतो किं० जाचा अर्थ, घात, पात, मरण, इ० रूप अशुभ आहे असा जो शब्द तो.

अपशौंच, अपशौंच, अ० आपाप.

अपसंत, ३लिं० पसंत नव्हे तो.

अपसरण, न० विवक्षितस्थलापासून एकीकडे होण्याचा व्यापार तें.

अपसव्य, न० सव्याचा प्रतिपक्षी.

अपसाँत, अ० तिराईत, शत्रु, इ० कांचे संबंधा पांचून आपल्या आपल्यामध्यें भांडणें, समजणें, इ० धा० वि०; उ० शत्रूवर जाण्याचें सोडून आपसांतच भांडूं लागले, हे दोघे सर्कारांत एकमेकावर फिर्याद गेले होते परंतु आपसांत समजले.

अपसारण, न० अपसृत होई असें करण्याचा व्यापार.

अपसारित, ३लिं० जाचें अपसारण केलें तो.

अपसिद्धांत, पु० सिद्धांतविरुद्ध जो पक्ष तो.

अपसरवानें, अपसरवेनें, अ० दुसऱ्यानें प्रेरणा, आग्रह इ० नकरितां आपल्याच संतोषें.

अपसुज्या, ३लिं० अपस्वरयुक्त गाणारा तो.

अपसूत्र, अ० आपोआप.

अपसूर, पु० अपस्वराचा अपभ्रंश.

अपसूर्य, पु० अपरसूर्याचा अपभ्रंश.

अपसृत, ३लिं० अपसरण केलें जाणें तो.

अपस्मार, पु० तोंडांतून फेंस येऊन बेशुद्ध होऊन पडावें असा मनुष्यादिकांस रोग जडतो तो.

अपस्मारी, ३लिं० अपस्मार जास जडला आहे तो.

अपस्वर, पु० सं० षड्जादि स्वरांचे मर्यादेचा भ्रंश होऊन जो भलताच स्वर निघतो तो; २, ३लिं० अपस्वरयुक्त जो विणा, मृदंग, इ० त्यांचें वादन णें इ० तो.

अपहरण, न० अपहार तें.

अपहर्ता, ३लिं० अपहार करणारा तो.

अपहस्तकीं, अपहस्तें, अ० आपले हातें; उ० या ब्राह्मणाचें कार्य अपहस्तें परहस्तें होईल तितकें करावें.

अपहार, पु० कोणेकापासून द्रव्यादि लुंडन करून घेण्याचा व्यापार तो; २, जापासून लुंडन करून घेतलें त्यास तद्वियोगरूप दुःख होतें तो.

अपहारक, ३लिं० अपहर्ता.

अपहारी, ३लिं० अपहर्ता.

अपह्नव, पु० अपलाप.

अपक्रुति, स्त्री० अपकृत.

अपक्ष, १लिं० जास पंख नाहीं तो मनुष्यादि.

अपक्षय, पु०सं० क्षय, किं० उत्तरोत्तर क्षय होण्याची अवस्था तो; उ० चंद्रकलांची शुक्लपक्षीं वृद्धि आणि कृष्णपक्षीं अपक्षय होतो.

अपक्षिप्त, १लिं०सं० अपक्षेपण केलें जाचें तो.

अपक्षीण, १लिं०सं० अपक्षय पावला तो.

अपक्षेपण, न०सं० कांहीं एक पदार्थ उपरि देशापासून अधोदेशीं टाकण्याचा व्यापार तें.

अपाँक्त, १लिं०सं० कांहीं दोषामुळें स्वजातीयांनीं पंक्तिव्यवहार न ठेवला जो तो.

अपाँक्तपत्र, न० कोणेकास अपांक्त केल्याचें वर्त्तमान सर्वदेशींचे स्वजातीयांस कळवावें म्हणून अमुक कारणामुळें याला अपांक्त केला असें असें लिहून जें देशोदेशीं पत्र पाठवितात तें.

अपांग, १लिं० अंधळा, पांगळा, बहिरा, इ०रूप जो अंगविकल तो; २, नेत्राचे बाहेरचे शेवटाकडील जो भाग तें.

अपात्र, न०सं० विवक्षित दान करण्यास वाईट जें पात्र तें.

अपात्रीकरण, न०सं० पातकांत एक जाति आहे.

अपाद, १लिं०सं० जास पाय नाहींत असा जो वृक्ष, लता, तृणें, इ०सृष्यंतःपाती जीव तो.

अपादान, न०सं० जापासून गमनादि व्यापारानें वियोग साधावा त्वा तें जें अवधिभूत कारक तें; उ० गांवापासून निघाला, घोड्यावरून पडला, एथें गांव, घोडा, हें अपादान.

अपान, न०सं० गुद; २, पु० पंचप्राणांतील एक वायु आहे जो गुदप्रदेशीं राहातो.

अपानद्वार, न०सं० गुदद्वार.

अपानवायु, पु०सं० अपानसंज्ञक जो वायु तो.

अपाप, अ० आपल्या आपण; २, १लिं०सं० निष्पाप.

अपापला, १लिं० आपापला.

अपामार्ग, पु०सं० आघाडा.

अपाय, पु०सं० अहितफल होण्यास कारणभूत जो कांहीं एक उपाधि तो; उ० जा राजानें न्याय सोडला त्याचे राज्यास अपाय जडला असें समजावें; २, विनाश.

अपार, १लिं० जाचा पार लागत नाहीं तो.

अपुत्र, अपुत्रक, १लिं०सं० पुत्रहीन.

अपुत्री, अपुत्रीक, १लिं० अपुत्र.

अपुनर्भव, पु०सं० अपवर्ग.

अपुरता, १लिं० शेवटास गेलें नाहीं जें कांहीं काम तो, किं० विवक्षित कार्यासं पुरायाजोगा नव्हे जो साधनभूत पदार्थ तो.

अपुरा, १लिं० अपुरता.

अपूज्य, १लिं०सं० पूज्य नव्हे तो.

अपूट, अ० अचूक; २, १लिं० विवक्षित स्पर्शादि संस्कार नहोतां जसाचे तसा राहिला जो कांहीं एक पदार्थ तो; उ० तुलीं सर्वीस थोडें बहुत पोंहचविलें परंतु आलीं दोघेमात्र अपूट राहिलों, हा उंसाचा फड तुलीं येणार म्हणून अपूट राखिला आहे.

अपूप, पु०सं० एक पक्वान्न आहे.

अपूर्ण, १लिं०सं० पूर्ण झाला नाहीं तो.

अपूर्व, ३लिं०सं० पूर्वी कधीं नहोतां प्रथमच जें प्राप्त झालें, केलें, इ०तो; उ० यागाबांत माझें येणें हें अपूर्वच आहे; आज समुद्राचें अपूर्व दर्शन झालें; २, आश्चर्यकारक; उ० तुमचें भाषण मला अपूर्व वाटतें; ३, असें पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें असें बाद्यायोगा उत्कृष्ट झालेला जो कांहीं एक पदार्थ तो; उ० हा पेटीतर तूं अपूर्व केलीस; तुला बायको अपूर्व मिळाली; ४, न० सुखदुःख होण्याविषयीं प्रयोजक आत्म्याचा गाथीं पुण्यपापात्मक कर्मजन्य जो संस्कार राहिला असतो तें.

अपूर्वदर्शन, न०सं० देवता, राजा, इ०कांचें प्रथमच जें दर्शन तें; २, आश्चर्य जनक पदार्थादिकांचें जें दर्शन तें.

अपूर्वाई, अपूर्वायी, स्त्री० अपरूपपणा.

अपेट, ३लिं० पेटविलेला नव्हे असा जो बैल इ०तो; २, ला० स्त्रीसंग, संसारकृत्य, इ० शरीरजर्जर व्हायाजोगें कांहीं कर्म प्राप्त नआल्यामुळें जो शरीरानें सुदृढ त्यास ल्ग०.

अपेश, न० अपयशाचा अपभ्रंश.

अपेशी, ३लिं० अपयशीचा अपभ्रंश.

अपेष्टा, स्त्री० केवळ जिकिरीस यावयाजोगी जी दुःखावस्था प्राप्त होत्ये ती.

अपेक्षणीय, ३लिं० अपेक्षाविषय जो ती.

अपेक्षया, अ०पेक्षां, प्रा०समासीं प्र०; उ० तदपेक्षया हे थोर, मदपेक्षया तूं लाहान, इ०.

अपेक्षा, स्त्री०सं० विवक्षित कार्य निर्वाहार्थ कोणेक पदार्थाविषयीं कोणेक पदार्थावर हें मला पाहिजे असा जो भावविशेष राहातो ती.

अपे

अपेक्षित, ३लिं०सं० अपेक्षाविषय तो.

अपोआप, अ० अपापप्रथमार्थी.

अपोष्णी, स्त्री० आपोशनाचा अपभ्रंश.

अपौरुष, ३लिं०सं० मनुष्यादि जीवसंबंधी नव्हे असें जें केवल ईश्वरसंबंधी शक्त्यादि तो.

अप्सी, स्त्री० आप्सी.

अप्याधोप्या, पु० एक मुखांचा खेळ आहे.

अप्रज, ३लिं०सं० अनपत्य.

अप्रतर्क्य, ३लिं०सं० तर्कास गोचर होत नाहीं असें जें ईश्वरमाहात्म्यस्वरूपादि तो.

अप्रतिम, ३लिं०सं० जास उपमा द्यावयास सदृश पदार्थ दुसरा नाहीं असा जो सर्वोत्कृष्ट तो.

अप्रतिष्ठा, स्त्री०सं० प्रतिष्ठेची जी हानि ती.

अप्रधान, ३लिं०सं० गौण.

अप्रबुद्ध, ३लिं०सं० ज्याचे बुद्धीस प्रौढत्व आलें नाहीं तो, किं०जो मंदबुद्धि तो, किं० जो व्यवहाराविषयीं ज्याची बुद्धि परिनिष्ठित झाली नाहीं त्याविषयीं तो.

अप्रमाण, ३लिं०सं० प्रामाणिक नव्हे जें भाषण, शास्त्रार्थ, इ० तीं; २, ज्याचें प्रमाण होत नाहीं तो.

अप्रमाणिक, ३लिं० प्रामाणिक नव्हे तो.

अप्रमेय, ३लिं०सं० कोणेक प्रमाणानें इयत्ता निश्चय जाचा कर्ता येत नाहीं तो.

अप्रयोजक, ३लिं० अजागला सारिखा केवल निरुपयोगी तो.

अप्रशिरवा, स्त्री० ज्याचा आपला संकेत आहे त्यालामात्र अर्थ समजावा असें जें कोणी संकेतगर्भित गूढार्थ वाक्य बोलतो त्या वाक्यास ल्ग०.

अप्र

अप्रसिद्ध, वि॰ सं॰ त्रैलोक्यांत कोणी पाहिला नाहीं, ऐकिला नाहीं, असा जो शशविषाण, वंध्यापुत्र, इ॰ पदार्थ तो; २, जागा स्थलादिकांचेठायीं जो अर्थ प्रसिद्ध नाहीं तो तेथें तेथें.

अप्रा, वि॰ साधारण प्रमाणापेक्षां अंगवूड जें नाक तो किं॰ तद्विशिष्ट तो; २, अपुरता जो अंगरखा इ॰ तो.

अप्राप्य, वि॰ सं॰ प्राप्त करून घेण्यास अशक्य तो.

अप्सरा, स्त्री॰ देवलोकींच्या उर्वशी, मेनका, इ॰ वेश्या आहेत त्या प्र॰.

अफरातफर, स्त्री॰ दंगा इ॰कांचे गडबडीमुळें, व्यवस्थेनें ठेवलेले पदार्थांचा किं॰ मनुष्यादिकांचा इकडचें तिकडे, तिकडचें भलतीकडे, असा जो व्यस्ताव्यस्तपणा, किं॰ कांहीं गेलें कांहीं राहिलें असा जो भाव होतो ती.

अफलाग, अ॰ अलाद; २, वि॰ निर्लंद.

अफलाद, स्त्री॰ दत्तपुत्रापासून पौत्रादिरूप किं॰ कन्येपासून दौहित्रादिरूप जी संतति तीस स्त्री॰.

अफवा, स्त्री॰ अवाई.

अफाट, वि॰ जितक्यास तितकें बेताबातानें जें असावें तदपेक्षया फारच अधिक जें स्थल, संसार, खटलें, इ॰ तो.

अफिण्या, अफिम्या, वि॰ अफू खाण्याचा स्वभाव जाचा तो.

अफीण, अफीम, स्त्री॰ अफू.

अफू, स्त्री॰ पु॰ खसखसीचे बोंडाचा जो चीक तो जांतकैफ असतो.

अबई, स्त्री॰ एक फुलझाड आहे.

अबक, स्त्री॰ विटूदांडूचे खेळांत एक प्रकार आहे.

अंबट

अंबट, वि॰ चिंच, निंबू, हिरवा अंबा, याचे रसासारिखा जो साहा रसांतील रस तो व तद्विशिष्ट पदार्थ तो, किं॰ त्याचे वासासारिखा जो वास तोही; वईवरून अंबट होणें स्त्री॰ अत्यविषयासाठीं कोधाऊन मनुष्यास तोडणें.

अंबटओला, वि॰ पुरता कडकडीत वाळला नव्हे कांहींसा आर्द्र असा जो धान्य, काष्ठ, वस्त्र, इ॰ पदार्थ तो.

अंबटचिंबट, वि॰ अंबट, तेलकट, आदिकरून जें अपथ्यकारक, किं॰ विवक्षित मधुरपणा जांत नाहीं असा जो पदार्थ तो.

अंबटढाण, वि॰ अतिशयित अंबट जें तक्रादिक त्यास स्त्री॰.

अंबटपाणी, न॰ अंबट जें पाणी तें.

अंबटवेल, स्त्री॰ अंबट रसाची एक वेल आहे.

अंबटा, वि॰ अंबट्या प्रथमार्थी

अंबटाई, स्त्री॰ पदार्थनिष्ठ जो अंबटपणा तो.

अंबटाण, स्त्री॰ अंबट जो वास तो

अंबटी, स्त्री॰ पाण्यांत हरभऱ्याचें पीठ, डाळ, चिंच, व मसाला घालून शिजवून पातळ असा एक पदार्थ करीत असतात ती.

अंबट्या, वि॰ विवक्षित माधुर्य जांत नाहीं असा अतिशयित अंबट चिंच, अंबा, इ॰ तो; २, अंबट जाला फार आवडतें तो.

अंबणें, आर्द्र पदार्थ कांहीं काल ठेवल्यानें अंबट होणें; २, अतिशयित अंबट पदार्थाचा स्पर्श झाल्यामुळें दांतानीं विकृतिविशेषातें पावणें; कोणेक कार्य अंबत पडणें, टाकणें, असणें, इ॰

स्थलीं

स्थलीं आरंभलेलें कार्य तडीस नजातां मध्येंच लोंबत राहणें.

अबदागिरी, स्त्री० हिं० अबदागीर.

अबदागिऱ्या, पु० धन्याचे मस्तकावर अबदागीर धरणारा जो सेवक तो.

अबदागीर, न०स्त्री० उष्ण निवारणार्थ राजादि लोकांचे मस्तकावर धरावयाचें आकारविशेषाचें वस्त्रनिर्मित छत्र आहे तें ती.

अबद्द, वि० सं० लोकशास्त्रप्रमाणास विरुद्ध जें भाषण, आचरण, इ० तो.

अबनाळ, न० तरवारीचे मेणाचे टोंकास जें रोप्यादिकांचें टोपण बसविलें असतें तें.

अबब, अ० अतत.

अंबर, पु० एक सुगंधीपदार्थ आहे; २, खिळे उपटून काढावयाचे उपयोगी आकारविशेषाचा लोहाचा चिमटा आहे तो; ३, न० वस्त्र याअर्थी नील वर्ण आहे अंबर जाचें तो नीलांबर, पीतांबर, इ० व्याघ्रचर्मच आहे वस्त्रस्थानी जाला तो व्याघ्रचर्मांबर, गजचर्मांबर, दिगंबर, इ० समास जाणावे; ४, आकाश.

अबरचबर, न० अरबट चरबट.

अंबरस, पु० पिकल्या अंब्याचा काढितात जो रस तो.

अंबराई, स्त्री० अनेक अंब्यांचे झाडांचा जो समुदाय असतो ती.

अबलक, अबलख, वि० एक पशु, पक्षी, इ० कांचे अंगावर रंग आहे तो; २, तद्विशिष्ट अश्वादिक तो.

अबला, स्त्री० सं० स्त्री.

अंबवणी, न० हिरवा अंबा भाजून पाण्यांत कोळून जें कालवण करितात तें.

अंबवा, पु० एक रंग आहे; २, त्याणें रंगिवलेलें जें वस्त्र तो.

अबळ, स्त्री० अबाळ.

अंबळ, अ० अंमळ.

अंबळसा, अ० अंमळसा.

अंबा, पु० एक वृक्ष आहे; २, त्याचें जें फल तो; अंबा शिंपणें स० विवाहोत्तर दुसरे दिवशीं वधूवरांचे स्नानसमयीं एक समारंभ आहे तो करणें; अंब्याचा ढाळा स० कोणेकाकडे कांहीं शुभ झालें तथापि किं० अशुभ झालें तथापि त्या त्या कारभारांत सारखेपणानें वागणारा जो मनुष्य त्यास स०; ३, स्त्री० सं० आई; ४, जगन्माता.

अंबाडा, पु० एक वृक्ष आहे; २, त्याचें जें फळ तो; ३, स्त्रिया वेणी नघालितां केशांचा जो बुचडा बांधितात तो; ४, अंबाडी.

अंबाडी, स्त्री० जाचें तेल निघतें असें एक बीज आहे ती; २, त्याचें जें झाड ती; ३, त्या झाडाची दोरी करण्याचे उपयोगी जी त्वचा निघत्ये ती; केंसांची अंबाडी होणें स० केंस पिकल्यामुळें अंबाडीचे वारवा सारिखे दिसूं लागणें.

अबाद, वि० आबाद.

अबादान, वि० आबादान.

अबादानी, स्त्री० आबादानी.

अबादी, स्त्री० आबादी.

अबाधित, वि० सं० कोठेंही, कधींही कशानेंही

नाचा बाध होत नाहीं असें जें सामर्थ्य. कल्पना, बुद्धि, इ० तो; २, शास्त्रादिकानें बाधित नव्हे जें कर्मादिक तो.

अंबार, न० भिंतीमध्यें धान्यादि ठेवाया करितां जो अवकाश ठेविला असतो तें.

अंबारी, स्त्री० हत्तीचे पाठीवर बसाया करितां गृहाकार वस्त्रादिकानीं मढऊन करितात ती.

अबाँच, न० कोणेकानें आपला यत्किंचित् अपराध केला असतां तें, आरडणें. ओरडणें, इ० कें करून मोठें करून दाखविण्याचा प्रकार तें.

अबाळ, स्त्री० विवक्षित निगेचा जो अभाव ती; उ० हा घोडा खाण्यापिण्याचे अबाळीमुळें खंगला येरवीं चांगला आहे; २, जीवन निर्वाहक जे अन्न, वस्त्र, इ० पदार्थ लागतात तदभावमूलक जी विपत्ति ती; उ० सांप्रत माझी खाण्याजेवण्याची अबाळ आहे.

अंबिका, स्त्री० सं० जगदंबा.

अबीर, पु० सुगंधिकद्रव्यांचें चूर्ण आहे.

अंबील, स्त्री० प्रा० नाचण्यांचें पीठ अंबवून किं० ताकांत घालून शिजवून प्यावयाजोगा पातळपदार्थ करितात ती; २, नद्यादिकांचें फार जें गढूळ पाणी त्यास आरोपानें स्त्री०.

अंबु, न० सं० उदक.

अंबुचीचिंबोची, स्त्री० एक अंबटवेल आहे.

अंबुज, न० सं० कमल.

अंबुधि, पु० सं० समुद्र.

अंबूहत, न० सं० तोंडांतून थुंका बाहेर उडत उडत जो शब्द होतो तें.

अंबूस, अ० लिं० ईषत् जो अंबट तो.

अंबेबन, न० अंबराई.

अंबेमोहर, अंबेमोहोर, पु० साळींत एक भेद आहे; २, नाचणींत एक भेद आहे.

अंबेहळद, स्त्री० हळदींत एक भेद आहे.

अबोट, अ० लिं० कों० आंतील अंशाचा खर्च वेचन करितां तसाचे तसाच अचळबी ठेविला जो कांहीं एक पदार्थ तो.

अंबोण, न० औबोण.

अबोल, अ० लिं० अल्पभाषी.

अबोला, पु० रुसवा, द्वेष, इ० कारणामुळें कोणेकानें कोणेकाशीं, किं० परस्परानीं एकामेकाशीं बोलूं नये असा कांहीं काल धरिला जो नियम तो

अंबोशी, स्त्री० एक लाहान वनस्पति आहे; २, हिरव्या अंब्याचा फोडी वाळवून करितात ती.

अंबोळी, स्त्री० पीठ अंबवून तें तव्यावर घालून भाजून एक भक्ष्य पदार्थ करितात ती.

अब्ज, अ० लिं० १०००००००० संख्या आहे; २, कमल.

अब्धि, पु० सं० समुद्र.

अब्बा, अ० आश्चर्याचा उद्गार आहे.

अब्बाशाई, अब्बाशी, अ० लिं० एक रंग आहे; २, तद्विशिष्ट वस्त्र तो.

अबू, स्त्री० आबू.

अबूचा, अबूदार, अ० लिं० आबूदार.

अभंग, पु० ईश्वर गुण वर्णन प्रधान प्राकृत भाषेंत कवितेची जाति आहे; २, अ० लिं० सं० जास भंग नाहीं तो.

अभंड, न० तेल, तूप, इ० पदार्थ पात्रांत घालून त्या व-जन करावयाचा असतां त्या पात्राभारंभार दग-ड इ० बांधून वजनाचे पारड्यांत जें घालितात तें.

अभद्र, ३लिं० सं० सत्क, घात, बाधा, इ० अशुभार्थक किं० विचकट अर्थाचा जो शब्द किं० तत्प्रधानभा-षण किं० तद्भाषण कर्ता पुरुषादि तो; २, न० क-ल्याणाचें प्रतिपक्षी तें.

अभय, न० सं० कोणेकास आपल्यापासून किं० इ-तरांपासून संभावित जें भय त्याचा मजपासून तुला भय होणार नाहीं किं० इतरांपासून होऊं दे-णार नाहीं अशा प्रतिज्ञेनें वचनादिद्वारा करिता-तजो भाव तें; २, अभयमुद्रा; ३, ३लिं० निर्भय.

अभयडिंडिम, पु० जापासून भय होईल अशी प्र-जांस संभावना आहे तो राजादिक नगरादिकांत मजपासून भय नाहीं एतत्सूचक वाजत फिरवि-तो जें वाद्य तो.

अभयपत्र, न० सं० अभयाविषयीं प्रतिज्ञा करून राजादिक त्याचा जो लेख करून देतात तें.

अभयमुद्रा, स्त्री० सं० देवता मूर्त्यादिकांचे हस्ता-ची अभयसूचक जी मुद्रा असती ती.

अभयवचन, न० अभयाविषयीं प्रतिज्ञेचें कोणेक कोणेकास देतो जें वचन तें.

अभयहस्त, पु० सं० अभयमुद्रायुक्त जो हस्त तो.

अभर, स्त्री० द्रव्यादिक जितकें पाहिजे तितके व्य-वहारादिद्वारा मिळाल्यासुळें तद्विषयीं जी कोणे-काची पूर्तता होत्ये ती; कर, हो, धातूंचे वि०; २, ३लिं० तद्विशिष्ट तो.

अभरवण, न० स्त्री० कों० जिरविण्याचे सामर्थ्यापे-क्षां अधिक केलें जें विकृति व्हावयाजोगें अन्ना-दिकांचें भक्षण तें ती; घेणें धातुयोगीं प्र०.

अभरवँशीं, अ० कोणेकाचे भरवंशावर प्रवृत्त हो-ऊन तो भरवंसा तुटल्यामुळें जी संकटावस्था प्रा-प्त होत्ये तींत, पड, घाल, दे, इ० धातूंचें वि०.

अभरवँसा, पु० कोणेकास दिलेल्या भरवंशाचें जें अप्रतिपालन तो; उ० तुमचा भरवंशावर मी रा-हिलों आतां ऐते वेळेस भरवंशाचा अभरवंसा करूं नका.

अंभस्, न० सं० उदक; अंभोधि, अंभःपति, अंभो-निधि, अंभोज, इ० समासीं प्र०.

अभक्ष्य, ३लिं० सं० भक्षायास अयोग्य जें मांस, मद्य, पतिताचें अन्न, इ० तो.

अभागी, अभाग्य, ३लिं० कपाळकरंटा.

अभांड, न० अभंड.

अभाव, पु० सं० कोणेक पदार्थाचा जो नाहींपणा तो; उ० यंदा आमचेघरीं दुभत्याचा अभाव आहे.

अभाविक, न० त्या त्या कार्याची पूर्त्ति होऊंनये अ-शी असत्ये जी कोणेक पदार्थ, गोष्ट, इ० कांची अ-ल्पता; उ० त्याचे घरीं भोजनास गेलों होतों तेथें तुपाचें अभाविकच होतें.

अभाळ, न० आकाश; २, मेघपटल; अभाळाएवढी अभाळातळीं स्त्र० सर्व पृथिवी तलावर असा अ-र्थ; अभाळ कोसळणें स्त्र० कोणेकावर एखादा पराकाष्ठेचा अनर्थ गुदरणें, स्त्र० अभाळ फाटलें तर त्यास ठिगळ कोण देईल.

अभि, अ० सं० हा उपसर्ग आहे.

अभिघार, पु० सं० होमद्रव्यावर घृतानें जो संस्कार

करितात

करितात तो.

अभिचार, पु० सं० कोणेकाचें उद्देशून जारण मारणादि फलक होमादि कर्माचा एक प्रकार आहे.

अभिचारी, वि० सं० अभिचारकर्म करितो तो.

अभिजन, पु० सं० ज्याचे वाडवडील जा देशीं नांदत आले तो देश त्याचा.

अभिजात, वि० सं० कुलीन.

अभिजित्, पु० न० सं० उत्तराषाढांचा अंत्यपाद आणि श्रवणाचे आदीचा पंधरावा अंश मिळून मुहूर्त्तोपयोगी अठ्ठाविसावें नक्षत्र शास्त्रकृत आहे तो तें; २, वि० ला० आपण यद्विषयीं यत्न न करितां प्राप्त होईल इ० रूप पूर्वी संभावना ही नसता जें अकस्मात् कदाचित् कांहींएक उपस्थित होतें त्यास स० ; उ० आह्मीं आहे खटलें यास पुराया जोगी वर्षाचे खर्चाची बेगमी केली आहे आतां मध्येंच अभिजित् एखादा खर्च उभा राहिल्यास पुरणार नाहीं नवें घेतलें पाहिजे.

अभिजिन्मुहूर्त्त, पु० सं० दिनमानाचे पंधरा विभाग करून आठवा जो विभाग तो.

अभिधान, न० सं० जा शब्दानें जा अर्थाचा वाच्य मर्यादेनें बोध होतो तो शब्द त्याचें; २, अभिधानरूप शब्दोच्चारणानें अभिधेय अर्थाचें जें बोधन होतें तें; उ० घट हा शब्द कंबुग्रीवादिमान् जो व्यक्तिविशेष त्याचें अभिधान करितो.

अभिधायक, वि० सं० अर्थाचें अभिधान करणारा शब्द कि० वक्ता मनुष्य तो.

अभिधेय, वि० सं० अभिधानानें वाच्य जो अर्थ तो.

अभि

अभिनंदन, न० सं० कोणेकानें कांहीं कर्म केलें असतां तत्स्तुतिद्वारा, व तत्कर्मस्तुतिद्वारा, त्यास आनंदविण्याचा जो व्यापार तें.

अभिनय, पु० सं० कांहीं एक गोष्ट बोलतानां कि० गीतादिश्रवणतानां तत्तन्मिश्र रसाचा आवेश वक्त्याचे अंगीं झाल्यामुळें तदनुरूप हातवारे, भ्रूभंग, इ० रूप जा चेष्टा होतात तो, जेणें करून श्रोत्यास तत्तद्रस वैशिष्ट्यें करून अर्थाचा बोध होतो.

अभिनव, वि० सं० नूतन.

अभिनिवेश, पु० सं० कोणेक कार्यांविषयीं करीनच, करीनच, अशी जी अंतःकरणानें आसक्ति धरिली असत्ये तो.

अभिप्राय, पु० सं० विवक्षित भाषणादि कर्मानें साध्य जो कांहीं एक अर्थ त्यातें अनुलक्षून आभिमुख्य पावलेली जी अंतःकरण वृत्ति तो; भाषणाचा, श्लोकाचा, अभिप्राय इ० स्थलीं ही भाषणादि कर्त्याचा अभिप्राय असा अर्थ.

अभिप्रेत, वि० सं० अभिप्रायविषय जो अर्थ तो.

अभिभव, पु० पराभव.

अभिभवणें, पराभवणें.

अभिभूत, वि० सं० पराभूत.

अभिमत, वि० सं० स्वमतास अनुकूल जो अर्थ तो.

अभिमंत्रण, न० सं० कांहीं एक पदार्थ मंत्रजपानें संस्कृत करण्याचा जो व्यापार तें.

अभिमंत्रणें, अभिमंत्रित करणें

अभिमंत्रित, वि० सं० अभिमंत्रण केलें जाचें तो.

अभि

अभिमान, पु० सं० आत्म्याविषयीं किं० आत्मसंबंधी जे देहादि त्यांविषयीं हा मी किं० हा मदीय असा जो मह असतो जेणेंकरून त्या त्या विषयांचें जें बरें वाईट तें तें आपलेंच असें वाटतें तो; उ० या देहाचा अभिमान जसा जीवात्मा धरितो तसा विराट् देहाचा अभिमान हिरण्यगर्भ धरितो, तसाच नेत्रादि इंद्रियांचा अभिमान सूर्यादि देवतांस आहे; या अर्थी देहाविषयीं जो अभिमान तो देहाभिमान इ० समास जाणावे; २, तादृश अभिमानविषय जे पुत्रादिक त्यांविषयीं किं० अंगीकृत जी कांहीं एक गोष्ट तीविषयीं जो पक्षपात तो; या अर्थी कुलाविषयीं जो अभिमान तो कुलाभिमान, मताभिमान, देशाभिमान, जात्यभिमान, भक्ताभिमान, इ० समास; २, ईर्ष्या, उ० तो तुजपेक्षां लाहान असून शास्त्र शिकला आणि तुला कां अभिमान नाहीं; ४, गर्व; या अर्थी धनामुळें जो अभिमान तो धनाभिमान, विद्याभिमान, कुलाभिमान, इ० समास.

अभिमानी, ३ लिं० सं० यद्विषयीं प्रथमाद्वितीयार्थक अभिमान जास आहे त्याविषयीं तो; २, ईर्ष्यावान्, १, गर्विष्ठ.

अभिमुख, ३ लिं० सं० जाचें तोंड जिकडे तो तिकडचे प्रदेशादिकांस; या अर्थी पूर्वाभिमुख, पश्चिमाभिमुख, सूर्याभिमुख, मदभिमुख, प्रवाहाभिमुख, इ० समास; २, ला० अनुकूल जो काल, दैव, देवता, इ० तो; ३, जाचे इच्छीचा रोख जा कर्मादिकांकडेस झाला तो तिकडेस.

अभियुक्त, पु० सं० जाचें वचनादि प्रमाणलेंकरून इतरानीं घ्यावें असा जो महाकवि, योगी, इ० तो; अभियुक्तांची जी उक्ति ती अभियुक्तोक्ति इ० समास; २, ३ लिं० जाजवर कोणेकानें अभियोग केला आहे तो.

अभियोग, पु० सं० कोणेकातें उद्देशून यानें माझी चोरी केली किं० माझें ऋण देत नाहीं इ० रूप न्यायाधीशापाशीं वादी करितो जें कथन तो.

अभिरुचि, स्त्री० सं० आवड.

अभिरुचित, ३ लिं० सं० अभिरुचिविषय तो.

अभिलषित, ३ लिं० सं० अभिलाषविषय जें द्रव्यादि तो.

अभिलाष, पु० आपल्याहातीं सांपडलें जें दुसऱ्याचें द्रव्यादिक त्याचा त्यास प्रतारून जो अपहार तो; २, परद्रव्यादिकांचा अपहार करण्याविषयीं जी इच्छा तो; २, सं० इच्छा.

अभिलाषणें, कोणेक वस्तु अभिलषित करणें.

अभिलाषी, ३ लिं० सं० अभिलाष करितो तो.

अभिवचन, न० सं० कोणेक कार्याविषयीं कोणेकास कोणेकानें दिलेलें जें वचन तें.

अभिवंदन, न० सं० सर्वांशें करून जें वंदन तें.

अभिवादक, ३ लिं० सं० अभिवादन करणारा तो.

अभिवादन, न० सं० मी अमुक असें स्वनाम उच्चारून गुरु इ० कांस जो नमस्कार करितात तें.

अभिविधि, पु० सं० पासून, पर्यंत, इ० शब्दसाध्य जे अवधिविशेष त्यांतें पोटीं घेऊन, कोणेकविधीचे प्रवृत्तीचा जो प्रकार तो; उ० रविवारापासून शनवारपर्यंत या वाक्यांत अभिविधि विवक्षित असतां सातदिवस घडतात नाहीं तर पांच

अभिवृद्धि, स्त्री० सं० कोणेक पदार्थाचा जो वृद्धिंगतपणा तो; २, आयुष्याची जी अभिवृद्धि ती आयुष्याभिवृद्धि, ऐश्वर्याभिवृद्धि, इ० स०

अभिव्यक्त, ३लिं० सं० अभिव्यक्तिविशिष्ट.

अभिव्यक्ति, स्त्री० सं० समजणारास संदेह, अज्ञानादि, न राहातां यथास्थित सुरवेंकरून तो तो गुणादिक अनुभवारूढ व्हावयाजोगा त्याच्या गुणादिकाचे अनावृततपणे स्थितीचा जो प्रकार तो.

अभिव्यंजक, ३लिं० सं० जेणेंकरून कोणेक गुणादिकाची अभिव्यक्ति होत्ये तो.

अभिव्यापक, ३लिं० सं० अभिव्यापणारा जो तो.

अभिव्यापणें, कोणेक अर्थातें अभिव्याप्तिविशिष्ट करणें.

अभिव्याप्ति, स्त्री० सं० पदार्थातें सर्वावयवावच्छेदेंकरून धरून आसपासचाही कांहीं प्रदेश धरावा अशी जी कोणेक पदार्थावर कोणेक पदार्थाची व्याप्ति ती; उ० सर्व लोकांवर आकाशाची अभिव्याप्ति आहे.

अभिशस्त, ३लिं० सं० अभिशाप जाऊन वर आला तो.

अभिशंसन, न० सं० कोणेकातें उद्देशून याणें अमुक दुष्टकर्म केलें असें प्रकट व्हावयासाठीं लोकांपाशीं जें कथन तें.

अभिशंसी, ३लिं० सं० अभिशंसन करणारा तो.

अभिशस्त, ३लिं० जातें उद्देशून अभिशंसन केलें आहे तो.

अभिशाप, पु० सं० कोणेकाचें वाईट केल्यामुळें त्याचा आपणास बाधतो जो तळतळाट तो; २, अपवाद प्रथमार्थी.

अभि

अभिभाप, पु० अभिशापाचा अपभ्रंश.

अभिषिक्त, ३लिं० सं० जावर अभिषेक केला तो.

अभिषेक, पु० सं० देवांवर स्नानार्थ किं० राज्यपदीं बसावयाचे आरंभी राजावर किं० कांहीं कर्मांगतें करून यजमानावर संतत धारे करून किं० बिंदुशः बिंदुशः जो उदकादिकानें सेक करितात तो.

अभिषेकपात्र, न० सं० देवादिकांवर अभिषेक करायास सतत धार पडावयाजोगें सच्छिद्र पात्र केलें असतें तें.

अभिषिंचन, अभिषेचन, न० सं० अभिषेक करण्याचा जो व्यापार तें.

अभिसारिका, स्त्री० आपण होऊन पुरुषास संकेत करून संभोगार्थ संकेतस्थलीं अगोधर जी स्त्री जात्ये ती.

अभिहित, ३लिं० सं० उक्त.

अभिज्ञ, ३लिं० सं० जाविद्या, कला, इ० कांतें आंतील मर्मस्थानें जो जाणतो तो त्याविषयीं,

अभिज्ञान, न० विद्या, कला, इ० कांचें आंतील मर्मस्थानें जें ज्ञान तें; २, सं० ओळखपटावयासाठीं कोणेकाजवळ जी आपली खूण देतात किं० कोणेक पदार्थावर खूण करितात तें.

अभीप्सित, ३लिं० यद्विषयीं इच्छा झाली आहे तो.

अभीष्ट, ३लिं० सं० अभीप्सित, २, आपल्यासहित रूप जो लाभ, देवता, इ० तो.

अभीष्टचिंतन, न० सं० कोणेकाचें अभीष्ट होऊ अशी जी ईश्वराजवळ निरंतर प्रार्थना तें.

अभुक्त, ३लिं० सं० जाचा भोग कोणी घेतला नाहीं किं० जाणें भोजन केलें नाहीं किं० अन्य कांहीं व-

स्तूचा

स्तूचा उपभोग केला नाहीं तो.

अभुक्तमूल, न०सं०ज्येष्ठा नक्षत्राचा अंत्य चार घटिका आणि मूलाचा आद्य चार घटिका असा जो आठघटिकाकाळ तें.

अभूतोपमा, स्त्री०सं० वस्तुतः नाहीं जो पदार्थ तो संभावनेनें कल्पून त्याची इतर पदार्थासजी उपमा देतात ती.

अभेद, पु०सं० भिन्नत्वाचा जो अभाव तो; अभेद-बुद्धि, अभेदसंसर्ग, अभेदान्वय, इ०समास.

अभेदवाद, पु०सं० जीवात्मा आणि परमात्मा यांचा वस्तुतः अभेद आहे असें जें मत तो.

अभेदवादी, ३लिं०सं० अभेदमतातें अनुसरणारा जो तो.

अभोग, पु० आभोगाचा अपभ्रंश.

अभोज्यान्न, ३लिं० सं०जांकडील अन्नभक्षूंनये असे जे पतित, सूतकी, संन्यासी, इ० धर्मशास्त्रांत परिगणित आहेत ते प्र०.

अभ्यक्त, ३लिं०सं०जाचे शरीरीं अभ्यंग केला आहे तो.

अभ्यंग, पु०सं० स्नाण इ०कांचे उद्देशानें तैल, घृत, इ०कांचा जो शिरःप्रभृति शरीरास लेप करितात तो.

अभ्यंगस्नान, न०सं०अभ्यंगपूर्वक जें स्नान तें.

अभ्यंजन, न०सं० अभ्यंग करण्याचा जो व्यापार तें

अभ्यंतर, न०सं०विवक्षितपदीर्थाचे बहिर्भूत विभागाहून इतर जो विभाग तें; २, अंतःकरणांतील जो आशय त्यास ल०.

अभ्यर्थना, स्त्री०सं० प्रार्थना.

अभ्यस्त, ३लिं०सं० जा शास्त्रादिकांचा अभ्यास जास झाला आहे तो किं० जाणें जा शास्त्रादिविषयीं अभ्यास केला आहे तो त्या विषयीं.

अभ्यागत, पु०सं० प्रा० अतिथि या अर्थी.

अभ्यास, पु०सं० कोणेक विद्या, कला, इ० पूर्णपणें यावें म्हणून एकवार म्हटलेलें तेंच अनेकवार म्हणावें, एकवार केलें तेंच अनेकवार करावें इ०रूप जो व्यापार तो; २, तेणें करून तत्तद्विषयीं नैपुण्य यावयाजोगा कर्त्याचे अंगीं होतो जो संस्कार तो.

अभ्यासणें, विद्या, कला, इ० अभ्यस्त करणें.

अभ्यासी; ३लिं०सं० अभ्यास करण्याचा स्वभाव जाचा तो; २, कोणेक गोष्टीचा जास अभ्यास झाला आहे तो.

अभ्युत्थान, न०सं० कोणी आपल्याजवळ शिष्ट आला असतां तत्सन्मानार्थ उठण्याचा जो व्यापार तो; दे, षे, धातुयोगीं प्र०.

अभ्युदय, पु०सं० ऊर्जितावस्था.

अभ्युदित, पु०सं० सूर्योदयसमयीं निजल्यामुळें जो प्रत्यवायी तो; २, ३लिं० अभ्युदय झाला आहे जाचा तो.

अभ्युपगम, पु०सं० हेमला संमत, हें चागलें, अशारीतीनें जें कोणेक विषयाचें स्वीकरण तो.

अभ्युपेत्यवाद, पु०सं० स्वसिद्धांतमतें खंडावयाचा जो पक्ष त्यातेंच अवलंबून कांहीं कारणास्तव जें कोणी एकाचें भाषण तो.

अभ्र, न०सं० मेघपटल.

अभ्रक, पु०सं० एक उपधातु आहे.

अभ्रा, पु० लोड, तक्या, गादी, इ०कांवर शुभ्रवस्त्रावें

जें आच्छादन असतें तो.

अमका, ३लिं० अमुक.

अमकातमका, ३लिं० अमुकतमुक.

अमंगल, अमंगळ, ३लिं० मंगल नव्हे तो; २, ओंगळ.

अमच्चा, ३लिं० आमच्चा.

अमंत्रक, ३लिं० सं० मंत्ररहित जें कर्म तो.

अमदानी, स्त्री० धान्यफलादि पदार्थांचें प्रचुरपणें होण्याचे किं० मिळण्याचे जे दिवस ती; २, वस्त्र धान्यादि पदार्थांची क्रयविक्रया्र्थ देशानें या देशाहून त्यादेशीं आणणें नेणें इ० रूप जी वहिवाट ती व कदाचित्याप्रसंगीं त्या जिन्नसावर ही व्यवहार करितात; ३, राजा, गृहस्वामी, इ० कांची जी कारकीर्द ती.

अमदाबादी, ३लिं० अमदाबाद म्हणून शहर आहे तेथील वस्त्रादिक जो पदार्थ तो.

अमर, पु० सं० देव; २, ३लिं० जास मरण नाहीं तो.

अमरपदा, अमरपट्टा, पु० घेऊन येणें याचा योगीं प्र०; अ० आपण कधीं मरूं नये असें ईश्वराचें आज्ञापत्र घेऊन येणें, प्रा० निषेधविषयीं प्र०.

अमरपत्र, न० अमरपदा.

अमराई, स्त्री० अंबराई.

अमरावती, स्त्री० सं० स्वर्गी इंद्राची नगरी आहे.

अमर्याद, ३लिं० सं० लोक शास्त्रमर्यादेतें उल्लंघून वर्त्तणारा जो पुरुष, भाषण, कर्म, अतिरिक्तपर्जन्य, शीत, इ० तो.

अमर्यादा, स्त्री० सं० थोरांचे आज्ञेचा उल्लंघ करूं नये इ० रूप मर्यादांचा विपरीत आचरणानें जो भंग ती.

अमर्ष, पु० सं० क्रोध.

अमल, ३लिं० सं० निर्मल; २, पु० सत्ताधारी जे राजादिक त्यांचे नियामक शक्तीची विवक्षितावधिक देशातें आक्रमून प्रजादिकांवर जी व्याप्ति असत्ये जेणेंकरून त्या प्रजांस त्या राजादिकांचे आज्ञानुरूप वर्त्तावें लागतें तो; ३, सुभा, मामला, इ० रूप जो अधिकार तो; ४, लाच रोगादिकानीं दबायाजोगी त्याजवर औषधादिकांची जी बर्चस्विता चढत्ये तो; ५, कैफ.

अमलदार, ३लिं० सुभा, मामला, इ० रूप अमलाचा जो अधिकारी तो.

अमली, ३लिं० भांग, अफू, इ० अमल खाण्याची संवय जास आहे तो.

अमसूल, अमसोल, न० कोकमसाल.

अमळ, अंमळ, अ० ईषन्मात्र; देश, काल, क्रिया, गुण, यांचें वि०.

अंमळसा, अमळसा, अ० केवळ अमळच नव्हे परंतु प्रा० तत्सदृश अशी विवक्षा असतां अमळ या अर्थी प्र०.

अमा, स्त्री० सं० अमावास्या; २, पु० मुलांचे भाषेनें स्तनासह्य.

अमात्य, पु० सं० अष्टप्रधानांतील एक आहे; २, राजाचे सर्वप्रधान ते प्र०.

अमानत, स्त्री० अ० अनामत.

अमानुष, अमानुष्य, ३लिं० सं० मनुष्यसाध्य नव्हे असें जें कर्मादि तो.

अमावास्या, स्त्री० सं० जा तिथीचे अंतीं सूर्य आणि चंद्र

चंद्र यांचें पूर्वपश्चिम अंतर अगदी राहत नाहीं ती तिथि.

अमित, वि॰ सं॰ अपरिमित.

अमिनी, स्त्री॰ अमीनाचें कर्म किं॰ अधिकार ती.

अमिरी, स्त्री॰ अमीरपणा.

अमीन, पु॰ ا۔ वादिप्रतिवाद्यांचा न्याया-चा निर्णय करण्याविषयीं नियुक्त असतो जो पुरुष तो;२, अनेक कारकुनावर अधिकारी जो एक कारकून असतो तो.

अमीर, पु॰ امیر जास सर्कारांतून मोठेपणाचा किताब आहे, कांहीं सरंजाम आहे, असा जो श्रीमंत तो.

अमु, वि॰ लिं॰ कों॰ जास वाचा नाहीं असे जे पशुपक्ष्यादि जीव किं॰ लहान अर्भक इ॰ त्यांस ल॰.

अमुक, वि॰ लिं॰ नामविशेषेंकरून मनांत उद्देश असतांही त्या नामानें निर्देश न करितां सामान्यरूपेंकरून निर्देशाया-स विवक्षित जो अर्थ तो;उ॰ कोणी तरी करा असें सांगूं नको अमुकानें करावें असें सांग.

अमुकतमुक, वि॰ लिं॰ अमुक इ॰;उ॰ मी बाजारांत जातों अमुकतमुक काय जिन्नस आणायाचे असतील तें सांग आणीन.

अमूप, वि॰ लिं॰ अमित.

अमूल्य, वि॰ लिं॰ सं॰ जाचें मूल्य करतां येत नाहीं असें जें अद्वितीय विद्यादि वस्तु तो.

अमृत, न॰ सं॰ स्वर्गीं देवांचा भक्ष्यपदार्थ आहे जाचे भक्षणानें अजरामरता येत्ये तें, नामामृत, गीतामृत, अधरामृत, कर्णामृत, इ॰ समास;२, दुग्ध आटऊन त्यांत खडीसाखर, जायफळ, वेलदोडे, इ॰ मसाला घालून रात्रीं थंडींत ठेऊन दुसरेदिवशीं प्रातःकाळीं तें दूध घुसळून त्यावर केंस येतो तो पदार्थ भक्षणार्थ करितात त्यास ल॰;४, अपवर्ग;५, उदक.

अमृतकुंडली, स्त्री॰ एक चर्मवाद्य आहे.

अमृतफळ, न॰ जाचे भक्षणानें अजरामरता प्राप्त होत्ये असें फळ गोष्टीमध्यें प्रसिद्ध आहे.

अमृतवल्ली, स्त्री॰ सं॰ जाचे रसादि सेवनानें अजरामरता येत्ये अशी पुराणप्रसिद्ध वल्ली आहे.

अमृतवेळ, स्त्री॰ शृंगारीजन विलास योग्य जो समय त्यास ल॰;२, औषधसेवनास योग्य जो प्रातःकालादि समय त्यास वैद्य ल॰;३, शिवालिखित श्लोकांनीं ज्योतिर्मत आहे त्यांत वारपरत्वें एक शुभवेळ सांगितली आहे.

अमृतसंजीविनीविद्या, स्त्री॰ मृतसंजीविनीचा अपभ्रंश.

अमृतसिद्धियोग, पु॰ रविवारादि दिवशीं क्रमानें हस्त, श्रवण, अश्विनी, अनुराधा, पुष्य, रेवती, रोहिणी, या नक्षत्रांचा योग झाला असतां ते ते काल प्र॰.

अमेध्य, वि॰ लिं॰ सं॰ विष्ठादि अपवित्र जो पदार्थ तो.

अमोघ, वि॰ सं॰ कदापि व्यर्थ होत नाहीं असा जो पराक्रम, शक्ति, शस्त्र, वीर्य, मंत्र, इ॰ तो;अमोघ आहे पराक्रम जाचा तो अमोघपराक्रम, अमोघवीर्य, अमोघरेता, इ॰ स॰.

अमोज, वि॰ लिं॰ कों॰ अमित;२, जाची मोजदाद केली

केली नाहीं तो.

अमोल, अमोलिक, ३लिं० अमूल्य.

अम्मल, पु०हिं० अमलविशेष्यार्थी.

अम्मलदस्तूर, पु०हिं० अम्मलदाराचे मर्जीप्रमाणें नवा नवा चालतो जो दस्तूर तो.

अम्मलदार, ३लिं०हिं० अमलदार.

अम्मलदारी, स्त्री०हिं० अम्मलदाराचेंजें कर्मकिं० अधिकार ती.

अम्मळ, अ० अमळ.

अम्याग, ३लिं० जो प्रकृतीनें केवळ गरीब जाचे अंगामध्यें पराक्रमाचें कोणतेंच पाणी नाहीं दुसरा वर्तवील तसें कर्तीवें असा जो त्यास ल०.

अम्ल, ३लिं० अंबट.

अयत्नतः, अयत्नानें, अ० ताद्दश यत्न नकरितां सांपड, मीळ, इ०कांचें वि०.

अयन, न० सं० मकरादिक आणिकर्कादिक जीं दोन राशिषट्कें त्यांच्या योगयीं सूर्यादिग्रहांचे जे संचार ते प्र०; २, सूर्य एक एक षड्भामध्यें असतां जे अर्धवर्षात्मक काळ जातात ते प्र०.

अंयना, पु० अरसा.

अयब, पु०हिं० लोकांनीं हा वाईट असें म्हणावा जोगी जो पदार्थाचे अंगीं खोड असत्ये तो.

अयबदार, ३लिं०हिं० अयबानें विशिष्ट तो.

अयंविशेषः, हें संस्कृतवाक्य आहे, प्रथम अभिमत झालेली जी गोष्ट तिजवर तद्विषयींच पुनः सांगितलेंजें युक्त्यंतरादि तें पहिल्यापेक्षां अभिमत झालें असतां याचा प्र०.

अयश, न० सं० अपकीर्ति.

अयस्, न० सं० लोखंड; अयःपिंड, अयोगोलक, इ० समासीं प्र०.

अयस्कार, पु० लोहार.

अयाचित, ३लिं०सं० याचना नकरितां जें मिळेल तितक्यानेंच आपल्याउदराच्याकिं० प्रपंचनिर्वाह करावा असा नियम जाणें धरिला आहे तो; २, अ० विवक्षित वस्तूचे लाभाविषयीं आपण याचनादि उपाय नकरितां तें तें वस्तु प्राप्त होणें, मिळणें, येणें, इ०कांचें वि०.

अयाचितवृत्ति, स्त्री०सं० अयाचितप्रथमार्थकांचीजी वृत्ति ती.

अयाचितव्रत, न०सं० नमागतां कोणी देईल तेंच खावें एतन्नियमरूपजें व्रत तें.

अयाल, अयाळ, स्त्री० घोडें, रेंचर, इ०कांचे मानेवरजे लांब केश असतात ती; २, कागदोपत्रीं शूद्रादि विधवा स्त्रियेचे नावास भर्त्याचे नावाचा संबंध लावायाचा असतां मध्यें याचा प्र० होतो; उ० साळू सोळसकरीण अयाळ विठोजी सोळसकर.

अयुक्त, ३लिं०सं० अनुचित.

अयुत, ३लिं०सं० संख्या आहे १०००.

अयोग्य, ३लिं०सं० अयुक्त.

अयोनिसंभव, ३लिं०सं० शुक्रशोणितसंयोगानें उत्पन्न झालेले नव्हेत असे जे ईश्वराचे मानसपुत्र इ० ते प्र०.

अरकस, पु० करवत.

अरकसणें, करवतणें.

अरड, स्त्री० अनेक मनुष्यांनीं एकदांच मोठ्यानीं

शब्द केले असतां जो गलबा होतो ती, कदाचित् एकाचे शब्दामेंही होत्ये; २, एरंडया इ० कांचें घाण्यांत न घालितां तेल काढाव्याचें असतां जो भाजून शिजऊन कुटा करितात ती.

अरडणें, अरड प्रथमार्थ करणें.

अरडा, पु० अरड प्रथमार्थी.

अरडाओरड, स्त्री० अतिशयित अनेक प्रकारचा जो अरडा ती.

अरडाओरडा, पु० अरडाओरड.

अरडेल, न० एरंडया, करडी, इ० कांची अरड घेऊन काढिलेलें जें त्यांचें तेल तें.

अरडया, ३लिं० अरडण्याचा स्वभाव जाचा तो.

अरणि, स्त्री० सं० अग्निहोत्राचा अग्नि घर्षणानें उत्पन्न कराव्याचें अश्वत्थादिकाचें काष्ठ असतें ती.

अरण्य, न० जेथें आसपास मनुष्यवसति नाहीं असें जें स्थल तें; २, झाडी.

अरण्यरोदन, न० सं० कोणेकास उद्देशून कांहीं फलासाठीं प्रार्थनादि प्रयत्न जो केला तो फल न होतां केवल व्यर्थ गेला असतां त्यास स्म०

अरण्यवास, पु० सं० तपश्चर्यार्थ गांव सोडून अरण्यांतच जो वास करितात तो.

अरतणेंपरतणें, पोळी इ० कांस भर्जनादि संस्कार सर्वत्र सारखा व्हावा इ० कारणार्थ तो पदार्थ उलथापालथा इ० करणें.

अरता, अ० विवक्षित अवधीपासून संनिकृष्ट प्रदेशांत किं० संबंधांत; उ० तो गांव नदीच्या अरता आहे; अरे गडया अंमळसा अरता ये; मला लेंक अरता आणि पुतण्या परता असें नाहीं दोघे सारखे.

अरतापरता, अ० विवक्षित जो कांहीं एक अवधि त्याचे आसपास संनिकृष्टस्थानीं; २, कों० सरासरी निर्वाहमात्र होई असें गृहादि कार्य करण्याचें वि०.

अरलि, स्त्री० पु० सं० कोंपरापासून कनिष्ठिकेचे अग्रपर्यंत जें हस्ताचें प्रमाण ती तो.

अरपार, अ० आरपार.

अरब, पु० यवनामध्यें एक जाति आहे.

अरबचरब, न० अरबटचरबट.

अरबटचरबट, न० नीरस, असात्विक, आलापाला, कदन्न, इ० रूपजें भक्ष्य तें.

अरबस्थानी, ३लिं० अरबस्थान म्हणून अरबांचा देश आहे तत्संबंधी घोडा, द्राक्ष, गुलाबकळी, डांळिंबें, इ० पदार्थ तो.

अरेंबळणें, ओंपफार भरल्यामुळें व्याकुळ होणें.

अरबा, ३लिं० हिं० चार, परंतु यवनी सालाविषयीं प्र०.

अरबी, ३लिं० अरबसंबंधी भाषा, वेष, लिपि, इ० तो.

अरबैन, ३लिं० हिं० चाळीस, यवनी सालाविषयीं प्र०.

अरर, अ० स्वशरीरास कांहीं मोठी वेदना किं० आपले इष्टादिकांचें अकस्मात् घातपातादि श्रवण झाल्यामुळें जो खेद होतो त्याचा किं० अद्भुत रसाचा उद्गार आहे.

अरवार, अरवाळ, ३लिं० जामध्यें वातडपणा टणकपणा नाहीं असें केवळ हलकें झालेलें जें पक्कान्नादि तो.

अरशी, स्त्री० केवळ लाहान जो आरसा ती.

अरसपरस, अ० आसपास; २, कों० अवरसचवरस.

अरसा, पु० एके अंगें पारा लाऊन आंत प्रतिबिंब दिसायाजोगें भिंग जें काष्ठादिकांचे घरांत बसविलें असतें तद्विशिष्ट तो; २, पाहाणांचा साधारणासही बोध व्हावयाजोगा बालबोध जो हिशेब, जमाखर्च, इ०कांचा लेख असतो त्यास स्व०; स्व० बोडकी जर अरशांत पाहे तर सहदेव म्हणे तेथें कांहीं तरी आहे.

अरसेमहाल, पु० चोहोंकडे भिंतींस अरसे लाऊन जें क्रीडास्थान केलें असतें तो.

अराकस, पु० लांकडें करवतून उपजीविका करणारा तो.

अरारवडा, पु० चित्रादि काढायासाठीं पूर्वी त्यात्या पत्रादिकांवर केवळ रेषानींच जो तो तो आकार रेखितात तो; २, कांहीं एक पदार्थावर कांहीं एक पदार्थ कांहीं काल संयुक्त होऊन निघाला असतां तेथें तदाकार ज्ञापक चिन्ह जें उमटतें तो.

अराजक, न० राज्यामध्यें नियामक राजाचा जो कदाचित् अभाव होतो तें; २, तद्विशिष्ट जो देशादिक तें.

अराष, अरास, स्त्री०पु० गृहमंडप इ०कांस दिवे, अरसे, चित्रें, छतें, पडदे, इ०कानीं जी शोभा करितात ती.

अरि

अरि, पु० सं० शत्रु.

अरिष्ट, न० सं० ज्याचे संबंधानें मोठी संकटावस्था प्राप्त होत्ये असे जे चोर, शत्रु, सैन्य, ईति, सांत, इ०त्यांस किं० तत्कृत बाधतो जो उपद्रव त्यास स्व०; २, अकटोविकट, भयंकर, अद्भुतप्राय वाटायाजोगें असें जें कांहीं एक त्यास स्व०; अरिष्टनिरसन, अरिष्टकारक, अरिष्टसूचक, इ०स०.

अरी, स्त्री० चर्मकाचें चर्म टोंचायाचें एक शस्त्र आहे; २, खेळायाचा भोंवरा, पराणी, इ०कांस जी लोखंडाची बारीक अणी लाविली असत्ये ती.

अरुचि, स्त्री० रोगादिकांमुळें कोणतांही पदार्थ रुचूं नये अशी जी अवस्था प्राप्त होत्ये ती; २, कोणेक विषयावर प्रीतीचा जो अभाव ती; ३, ग्रंथादि प्रतिपादित जो कांहीं एक अर्थ त्याजवर कांहीं दोष संभावनादि कारणामुळें जी त्यात्या ग्रंथकारादिकांची अनभिमतता असत्ये ती; उ० या दुसऱ्या उदाहरणावरून पूर्वोदाहरणीं कांहीं ग्रंथकाराची अरुचि आहे असें दिसतें.

अरुण, पु० सं० सूर्याचा सारथि आहे; २, ३लिं० तांबडा.

अरुणिमा, पु० तांबडेपणा.

अरुणोदय, पु० सं० सूर्योदयाचे पूर्वी तीन घटिका जो अरुणाचा उदय होतो तो; २, तदुपलक्षित जो काल त्यासही स्व०.

अरुता, स्त्री०पु० कोणेकास कोणेक कर्म करण्याविषयीं न्यायतः जो अधिकार असतो ती तो.

अरुंद, अरुंध, ३लिं० विवक्षित रुंदीपेक्षां जाची रुंदी न्यून तो.

अरुं

अरुंधती, स्त्री० सं० वसिष्ठऋषीची स्त्री, जिचा तारा आकाशांत दिसतो ती.

अरुवार, अलि० अरवार.

अरे, अ० पुरुषाचे संबोधनाचें द्योतक परंतु प्रा० संबोध्यास हलकेपणा विवक्षित असतां प्र०; अरे जारे, बोलणें, ऐकणें, इ० स्थलीं कोणेकास एकवचनानें संबोधून बोलणें; ह्म० अरे तर कांरे, आणि अहो तर कांहो.

अरेतुरे, स्त्री० न० बहुवचनांतानें संबोधून बोलण्याची जी मर्यादा ती क्रोधादिकांमुळें सुटून एकवचनांतानें जें भाषण होतें तीं तें.

अरेरे, अ० अरर; २. प्रसंगीं करायाचें तें विस्मृत्यादिकारणामुळें राहिलें किं० न करायाचें तें घडलें असतां अनंतर जो पश्चात्ताप होतो त्याचा उद्गार.

अरोग, अरोगी, अलिं० जास रोग नाहीं तो.

अरोचक, न० अरुचि प्रथमार्थी.

अरोळी, स्त्री० आरोळी.

अर्क, पु० सूर्य; २, रुई ह्मणून झाड आहे; ३, औषध्यादिकांचा तत्वांश जो द्रवादिरूपें करून यंत्रादिकानें निराळा काढितात तो; ४, न० कोनाडा, द्वार, इ० प्रदेशींचे भिंतीस जो कमानेसारखा आकार केला असतो तें.

अर्कटी, अलिं० अर्कट ह्मणून शहर आहे तेथें चालेला रुपया इ० तो.

अर्कद्वेष, पु० उभादावा.

अर्कविवाह, पु० पुरुषास तृतीय विवाह कर्त्तव्य असतां तत्पूर्वी रुईशीं विवाह करावा लागतो तो.

अर्की, स्त्री० ग्रं० रुई ह्मणून झाड आहे

अर्कुलें

अर्कुलें, न० इकार, उकार, इ० कांवर दीर्घत्वबोधक किं० इतरवर्णावर रेफबोधक जें ॅ असें चिन्ह लिहितात तें.

अर्गजा, पु० सुगंधिक द्रव्यांचें चूर्ण आहे.

अर्गडी, पु० जोंधळ्यांत एक भेद आहे.

अर्गला, अर्गळा, स्त्री० बिडी; २, अडसर.

अर्गळ, स्त्री० अडसर.

अर्घ्य, न० सं० ओंजळींत किं० पात्रांत पाणी घेऊन त्यांत गंधाक्षत फुलादि घालून देवादिकांस पूजादिसमयीं जें अर्पितात तें.

अर्घ्या, पु० अर्घ्य देण्याचे उपयोगीं एक पात्र आहे

अर्चक, अलिं० सं० अर्चन करणारा तो.

अर्चणें, अर्चित करणें.

अर्चन, न० सं० देव, ब्राह्मण, इ० कांस यथाविधि अर्घ्य, पाद्य, गंध, पुष्प, इ० उपचार अर्पिण्याचा जो व्यापार तें.

अर्चा, स्त्री० देवता प्रतिमेस पूज्यत्व यावें ह्मणून प्रथमतः पूजाविशेषरूप जो संस्कार करितात ती; २, देवतेची प्रतिमा.

अर्चाशुद्धि, स्त्री० सं० देवता प्रतिमेस अस्पृश्यस्पर्शादि झालें असतां होमादि मनुष्यानानें जी शुद्धि करितात ती.

अर्चित, अलिं० सं० अर्चन केलें जाचें तो.

अर्च्य, अलिं० सं० अर्चायास योग्य तो.

अर्च्या, स्त्री० सं० पूजायास योग्य देवादिकांची जी मूर्त्ति ती.

अर्च्याशुद्धि, स्त्री० सं० अर्च्येची अभिमंत्रणसंस्कारें करून शुद्धि ती.

अर्ज

अर्ज, पु० عرض देव, राजा, इ० कांजवळ कांहीं कार्यासाठीं जी विनंती करितात तो; २, त्यांपाशीं विज्ञाप्य जो कांहीं एक अर्थ तो.

अर्जक, वि० सं० अर्जन करणारा.

अर्जणें, अर्जिन करणें.

अर्जन, न० सं० पाप, पुण्य, द्रव्यादि मिळिवण्याचा जो व्यापार तें; द्रव्यार्जन, हत्यर्जन, विद्यार्जन, इ० स०.

अर्जना, स्त्री० अर्जन.

अर्जित, वि० सं० अर्जन केलें जाचें तो.

अर्जी, स्त्री० عرضي अर्ज. २, अर्ज लिहिलेलें जें पत्र ती.

अर्जुन, पु० एक वृक्ष आहे.

अर्जुनसादडा, पु० अर्जुन.

अर्णव, पु० सं० समुद्र.

अर्थ, पु० सं० जा संज्ञारूप शब्दाचा उच्चारणानें, वाच्यमर्यादेनें जाचा बोध होतो तो त्याचा; २, ईश्वर आणि ईश्वरापासून जें यच्चयावत् उत्पन्न झालें आहे जें जीवांस बोधविषय होनें तो; ३, सोनें, रूपें, नाणें, इ० रूप जें धन तो; ४, साधनीयत्वें करून उद्दिष्ट जो कांहीं एक कार्यभाग तो; उ० धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष, हे पुरुषाचे अर्थ; तुझी उगीच या शहरांत खर्च खाऊन राहिलां यांतील अर्थ काय. या अर्थी समास होऊन विशिष्टशब्द क्रियाविशेषणें होतात. उ० मी अध्ययनार्थ राहिलों, शीतनिवारणार्थ वस्त्र घ्यावें लागतें इ०, कोणत्याही अर्थानें तुमचें कार्य व्हावें इ० स्थलीं कोणत्याही प्रकारें असा अर्थ; या अर्थी तुझी मागतां त्या अर्थी दिलें दिलें पाहिजे इ० स्थलीं जा कारणास्तव, त्या कारणास्तव, असा अर्थ.

अर्थणें, याचणें.

अर्थवाद, पुं० सं० कोणत्याही पदार्थीत गुण किं० दुर्गुण ईषन्मात्रही असतां अतिशयित जें त्यांचें वर्णन तो; २, कोणेक कार्याचर वस्तुतः संबंध नसतां कल्पनेनेंच जी कांहीं एक गोष्ट संबद्ध केली असत्ये तो; उ० चिचुंद्री माजराची मावशी ह्मणून तिला माजर खात नाहीं ह्मा उगीच अर्थवाद वस्तुतः पाहिलें असतां पाणचेत्ये ह्मणून खात नाहीं

अर्थशास्त्र, न० सं० द्रव्यादि अर्थ साधन कोण कोणत्या प्रकारें करावें अशा युक्तिजाम ध्यें सांगितल्या आहेत असें जें राजनीत्यादिक किं० जाम ध्यें केवळ वचन प्रमाण नव्हे अनुमानादि युक्ति जाम ध्यें प्रबल असें जे न्यायमीमांसादि शास्त्र त्या स स०.

अर्थसिद्ध, वि० सं० अथालसिद्ध जो कांहीं एक अर्थ तो.

अर्थीअर्थी, अ० संबंध, प्रयोजन, गरज, इ० योगीं प्र०; अ० किंमपि; निषेधविषयीं प्र०; उ० तुमचा खटला तुटला आतां त्यांचा व तुमचा अर्थीअर्थी संबंध राहिला नाहीं.

अर्थात्, अ० विवक्षित तत्तत्कार्याविषयीं प्रयत्न न करितां सहजच; उ० वस्त्र धुतलें असतां अर्थात् मळ जाईलच.

अर्थांतरीपन्यास, पु० सं० प्रकृतार्थ दृढीकरणार्थ अप्रकृत अर्थांतराचें श्लोकादिकांचा द्वारीं

जें

जें कथन केलें असतें तो; उ० तुझी मनाबर घेतलेंत तर होईल, कांकिं थोरांस काय अवघड आहे, एथें थोरांस इ० अर्थांतरोपन्यास.

अर्थी. पु० सं० याचक; २, वि० जास जें प्राप्त होणें अशी इच्छा आहे तो त्या विषयीं. प्रा० समासीं प्र०; उ० विद्यार्थी. धनार्थी. पुत्रार्थी. मोक्षार्थी. इ०.

अर्थीदान, न० ग० जा विषयीं ज्यास मोठी गरज आहे त्या विषयाचें त्यास कोणेकाचे हातून जें सद्जांत समर्पण घडतें त्यास स०.

अर्ध, न० सं० एका पदार्थाचे जे दोन समविभाग ते प्र०; ग्रामाचें जें अर्ध तो अर्धग्राम. तें ग्रामार्ध इ० स०; अर्धकोस, अर्धघटका, अर्धरुपया, इ० प्राकृतशब्दांशीं ही स० होतात.

अर्धकच्चा, वि० केवळ कच्चा नव्हे केवळ पक्का झाला नव्हे असा जो फल, अन्न, धान्य, विद्या, इ० पदार्थ तो; २, पुरें शेवटास नजातां अर्धवट राहिलेंजें कांहीं एक काम तो.

अर्धचंद्र, पु० सं० चंद्राचें जें अर्ध तो; २, गचांडीस स०.

अर्धचरतीय, अर्धजरतीय, न० धड एक नव्हे अर्धेहें, अर्धें तें, असें जें कांहीं एक तें; उ० येतों म्हणकिं० नाहीं म्हण उगीच अर्धचरतीय सारूं नको.

अर्धजेवा, वि० जाचें जेवण अर्धें झालें आणि अर्धें व्हायाचें तो.

अर्धनार, स्त्री० स्त्रीजातीय जो षंढ असतो ती.

अर्धनारीनटेश्वर, पु० अर्धांगीं जाणें पार्वती धारण केली आहे असा जो ईश्वर तो.

अर्धपड, अर्धपडा, वि० कों० अर्धवट.

अर्धपिका, वि० अर्धवट पिकलेलें जें फलादि तो.

अर्धबाट, वि० जा विद्यादिकांत जो पुरा निपुण झाला नाहीं तो त्याविषयीं.

अर्धपोटीं, अ० अर्धवट पोट भरे इतकें असणें, राहाणें, उरणें, जेवणें इ० कांचें वि०.

अर्धबुकट, वि० रा० अर्धवट.

अर्धबोबडा, वि० ठेंचणें, चेंचणें, इ० कानीं अर्धवट बारीक केलेला जो पदार्थ तो.

अर्धमेला, वि० मारण्यानें किं० ज्वरादिकानें शक्तिरहित केवल जर्जरप्राय झाला जो तो.

अर्धरथ, अर्धरथी, पु० एक्या रथ्यासहवर्तमानही युद्धकरायास जो पुरता नव्हे तो.

अर्धरात्र, पु० स्त्री० मध्यरात्र.

अर्धल, स्त्री० अर्धेल.

अर्धलंड.मर्धलंड, वि० अधलंडमधलंड.

अर्धल्या, पुं० दुसऱ्याचे भूमींत अर्धलीनें शेत इ० करितें जें कूळ तो.

अर्धवट, अ० गुणादिकृत विवक्षित जो पुरतेपणा तो जास आला नाहीं असें जें मध्यावस्थापन्न कार्यादि तो; उ० काम पुरतें करावें अर्धवट ठेऊं नये, हा पुरता वेडा नव्हे पुरता शाहणा नव्हे अर्धवट आहे; २, अर्धें वय जाचें अतिक्रांत झालें तो; उ० आली ईस घेतली तीतरणी नाहीं अर्धवट आहे.

अर्धवेडा, वि० वेडसर.

अर्धशिजा, वि० अर्धवट शिजलेला भात इ० पदार्थ तो.

अर्धशिशी, स्त्री० एक रोग आहे जेणें करून एके बाजूचें कपाळ दुखतें ती.

अर्धी, ३लिं० अर्धरूप किं० अर्धीहून कांहीं न्यूनाधिक तो; उ० अर्धे केळें दिलें म्हणून मी काम अर्धें-च देवि-लें; अर्धे ब्राह्मण आले अर्धे यावयाचे आहेत. अर्धी जीवाचा स्व० केवळ जो शरीरानें अशक्त त्यास स्व० कोणेकानें कोणेकाचे अर्धे वचनांत असणें स्व० आज्ञाप्रार्थनादिरूप वचन झेलींत असणें.

अर्धींग, न० सं० देहाचीं जीं वामदक्षिण दोन अर्धें तीं प्र:२, स्त्री, किं० परममित्र, किं० सहाय, इ० कांस आरोपानें स्व०.

अर्धींगवायु, पु० सं० एक वायुरोग आहे जेणेंकरून अर्धें अंग अचेतन होतें तो.

अर्धींगीकार, पु० सं० कोणेकानें उक्त जो कांहीं एक अर्थ त्याचा मी याजवर दोष बोलतों हा न आला तर हें म्या अंगीकारिलें अशा तात्पर्यानें होय, बरें. इ० शब्दानीं जो अंगीकार करितात तो.

अर्धीमर्धी, अर्धीसुर्धी, ३लिं० अर्धी किं० अर्धीहून कांहीं न्यूनाधिक तो.

अर्धीला, ३लिं० अर्धी अर्धी, परंतु एकजातीय जे अनेक पदार्थ त्यांचीं जीं अर्धें त्यांवर एकविधिविषयता असतां प्र०; उ० सर्वांस अर्धील्या भाकऱ्या दे.

अर्धीसन, न० सं० बसावयाचे आसनाचा जो अर्धीभाग तें

अर्धूक, न० मूर्त एक पदार्थ द्विधा केला असतां जे दोन तुकडे होतात ते प्र०.

अर्धेल, स्त्री० कृषि, सावकारी इ० व्यवहारामध्यें शेतकरी, सरकती, इ० कांचा असतो जो अर्धा अंश ती.

अर्धेली, अर्धेल्या, पु० अर्धील्या.

अर्धेअर्ध, अ० निमेनिम.

अर्धोन्मा

अर्धोन्मा, पु० प्रतिमाशीं शेंकडा अर्धे रुपया व्याज द्यावें असा जो संकेत असतो तो.

अर्धोदय, पु० सं० माघ किं० पौषमास, अमावास्या, श्रवण नक्षत्र, रविवार, आणि व्यतीपात, यांचा जो एखादे वर्षी योग पडतो तो; २, सूर्य-चंद्र यांचे अर्धे बिंबाचा झाला जो उदय तो; कांहीं एक काम अर्धोदयीं पडणें. स्व० अर्धेमुर्धे होऊन तडास न जातां तसेंच लोंबत पडणें.

अर्पण, न० सं० कोणेक संप्रदानांतें उद्देशून कोणेक पदार्थ स्वस्वत्वनिवृत्तिपूर्वक तत्स्वत्वविषय करण्याचा जो व्यापार तें.

अर्पणें, अर्पित करणें.

अर्पित, ३लिं० सं० अर्पण केलें जाचें तो.

अर्बुज, न० लोक व्यवहाराची रीत रवेस जास समजत नाहीं व वस्त्र अलंकार इ० कांची टाकटिकी नाहीं असा जो असमंजस अव्यवस्थित मनुष्य त्यास स्व०; उ० खेडेगांवचा बायका म्हणजे अर्बुजें त्यांस कांहीं कळत नाहीं.

अर्बुजजात, स्त्री० जांची भाषा, वेष, इ० आमचे संप्रदायास केवळ एक प्रकारचे कसेचसे वाटतात असे जे अरब, सिद्दी, इ० त्यांस आम्हीं म्हणतो.

अर्बुद, ३लिं० संख्या आहे १०००००००००.

अर्भक, पु० सं० मुलगा; २, ३लिं० असमंजस जो मनुष्य त्यास स्व०.

अर्भकी, स्त्री० मुलगी.

अर्मर, अर्मार, न० लढाऊ गलबतांचा जो समुदाय तें; २, कदाचित् त्या एका गलबतासही स्व०.

अर्मरी, अर्मारी, ३लिं० अर्मार संबंधी तोफ, दारू, गोळा

गोळा, खर्च, इ० तो.

अर्व, १लिं० संख्या आहे १०००००००००.

अर्वाक्, अ० सं० विवक्षित कालाचे पूर्वी.

अर्वाचीन, १लिं० सं० अलीकडला, क्षणजे प्राचीन नव्हे तो.

अर्वाच्य, १लिं० जामध्यें सभ्यता नाहीं व दुसऱ्याला मारावें, शिव्या द्याव्या, आपणही दुसऱ्यापासून शिव्या, मार, घेत असावें. अशा स्वभावाचा जो मनुष्य त्यास क्षु०.

अर्वाळी, स्त्री० अर्वाच्यपणानें जा चेष्टा ती; २, कागाळी.

अर्श, न० पु० सं० गुदस्थानीं एक रोग होत असतो तो.

अर्ह, १लिं० सं० योग्य.

अलक, पु० सं० कुरळ केश.

अलंकरण, न० सं० अलंकृत करण्याचा व्यापार तें

अलंकार, पु० सं० मनुष्यादिक स्वशरीरावर शोभार्थ धारण करितात जो रूपवर्ण, रौप्य, रत्नादि निर्मित पदार्थ तो किं० ते योगें करून येतो जो शोभाविशेष तो; २, काव्यादिकांचा गद्यीं वाक्यार्थास चमत्कारिकता आणणारे जे उपमा रूपकादिक किं० वाक्यसरणीस शोभविणारे जे अनुप्रास यमकादिक ते प्र०; ३, जेणेंकरून जास शोभायेत्ये तो त्याचा असें स०; उ० क्षमाही समर्थास अलंकार होय, चिन्हेंही भिंतीस अलंकार.

अलंकारणें, अलंकृत करणें.

अलंकारी, अलंकारीक, १लिं० आलंकारिक शब्दाचे अपभ्रंश.

अलंकृत, १लिं० अलंकार विशिष्ट केला तो.

अलक्ष

अलक्त, अलक्तक, पु० सं० अळता.

अलख, न० ब्रह्मवाचक जो अलक्ष्य शब्द त्याचा अपभ्रंश; गोसांवी भिक्षेसमयीं याचा उच्चार करितात.

अलखपालखत, अलखडपालखड, अलखतपालखत, स्त्री० आसनमांडी.

अलग, अ० राहायास आधारभूत जें कांहीं एक तत्संबंधावांचून असणें, राहाणें, इ० कांचें वि०; उ० आकाशांत पक्षी अलग राहातात असें दिसतें; आमचे यजमान गेल्यापासून आम्ही एथें उगीच अलग पडलों आहों; २, इकडे तिकडे न लागतां धोंडा, गोळी, इ० कोणेक मार्गानें जाणें, उडणें, श्लोकादि पाठ म्हणणें, इ० कांचें वि०; ३, अचळ; ४, विवक्षिताशीं संबंध न होतां पृथक्; उ० आमचा व्यवहार अलग, त्याचा व्यवहार अलग; ५, विवक्षित संस्कारादि संबंध नहीतां, असणें, राहणें, देणें इ० कांचें वि०; उ० महामारीनें सर्वांचा समाचार घेतला एवढें मात्र घर अलग राहिलें.

अलंग, स्त्री० वस्त्रें विणणें, दोऱ्या वळणें, इ० कारणास लांब चलांब दुपारची एकमजलाजें घर बांधिलें असतें तो.

अलगणें, वृक्षशाखादिकांस हस्तादिकानें धरून लोंबत राहाणें; २, पिकून पडायास झालेंजें वृक्षाचें फल तें न पडतां तसेंच राहाणें.

अलगत, अ० अलग; प्रा० चतुर्थपंचमार्थी यांचून.

अलगरजी, अलगरजू, १लिं० आपलें कामापुरतेंमात्र दुसऱ्याचें साक्षात्कारी आर्जव करणारा

त्यास

त्यास ल०

अलगुजें, न० एक वंशवाद्य आहे; २, घोडयाचे खोगिरास दोन छापांस मिळून मध्यें एक एक बंध असतात ते प्र०.

अलड, ३लिं० अल्लड.

अलफ, ३लिं० हिं० सहल; यवनी सालाविषयीं मात्र प्र०.

अलबत, अलबत्ता, अ० हिं० अगत्यपूर्वक; उ० एथें गुरांचा उपद्रव आहे तेव्हां अलबत कुपण केलें पाहिजे; २, अगदीं नाहीं झटलें तथापि निकृष्टपक्षीं; उ० अलबत शंभर रुपये तरी पदरीं असावे तर घर बांधावयास आरंभावें.

अलबत्या गलबत्या, पु० साळकोजी माळकोजी.

अलंबीं, अ० जेथें मनुष्यास हातानें धरायास किंवा पाय ठेवायास दृढ शाखादिकांचा आश्रय नाहीं असा जो वृक्षावरील उच्चप्रदेश त्याचेठायीं.

अलंबुद्धि, स्त्री० सं० कोणेकपदार्थाविषयीं पुरेअशी जी बुद्धि ती.

अलबेला, ३लिं० दृढता आणि नीटनेटकेपणा हे गुण जामध्यें तादृश नाहींत असा जो बांधणें, सांधणें, लिंपणें, इ० क्रियानीं केलेला पदार्थ तो; २, ला० होय किंवा ना, याचा निश्चय न होई असें मुळमुळीत जें भाषण, लेख, इ० तो; उ० त्याला खरखरीत ताकीद कर उगीच अलबेलें सांगून येऊं नको; ३, आंत ज्ञानदारी असून बाहेर साधेपणा दिसावा असा जो वेष किंवा तद्विशिष्ट पुरुष इ० तो.

अलभ्य, ३लिं० मिळावयास जो अशक्य तो.

अलभ्यलाभ, पु० सं० अलभ्यतेंकरून संभावित जो अर्थ त्याचा दैवयोगानें कदाचित् जो लाभ घडतो तो.

अलम, स्त्री० दुनियां; २, जनसमुदाय.

अलमगिरीपैसा, पु० पेशांत एक भेद आहे.

अलमदुनियौ, ع ل م د ن ی स्त्री० सर्वजगत्.

अलर्क, पु० सं० कुत्र्यास एक रोग होत असतो जेणें करून कुत्रें पिसाळतें.

अलल, अ० अरर.

अलवण, ३लिं० सं० लवणरहित जें अन्नादि तो.

अलवणी, ३लिं० अलवणा चा अपभ्रंश.

अलस, ३लिं० सं० आलस्ययुक्त तो.

अलक्षित, अ० सं० पूर्वी लक्ष्यांत नयेतां अकस्मात्.

अलक्ष्मी, स्त्री० सं० अवलक्ष्मी.

अलाईबलाई, स्त्री० अलायबलाय.

अलागत, अ० अलगत.

अलाड, अ० अलीकडे.

अलातचक्र, न० सं० कोलीत वाटोळें फिरिवलें असतां चक्रासारखा आकार दिसतो तें.

अलाद, अ० अलगद्दिनीयार्थी.

अलाप, अलाफ, पु० अ. न, त, इ० अक्षरें करून गवईलोक रागाचा जो आकार दाखवितात तो.

अलापचारी, अलाफचारी, स्त्री० अलापरूप जें कर्म ती.

अलापणें, अलाफणें, कोणेकराग अलापरूपें करून गाणें.

अलाबु, पु० सं० पांढरा भोंपळा.

अलाय्यबलाय, स्त्री० इडापिडा.

अलायीकारखाना, पु० अलीजाहां कारखाना.

अलाव, पु० हिं० यवनलोक डोल्यांचे दिवसांत डोल्यापुढें जी अग्निदेवतेसाठीं खळी करितात तो.

अलाहिदा, عَلَیحِدَہ अ० इथक्.

अलि, पु० सं० भ्रमर.

अलिता, पु० अलक्तकाचा अपभ्रंश.

अलिस, वि० सं० लिप्साळा नव्हे तो.

अलीक, वि० न० सं० अनृत.

अलीकडचा, अलीकडला, अलीकडील, वि० अलीकडे जो स्थित झालेला इ० तो.

अलीकडून, अ० अलीकडे एनछब्दवाच्य जें अधिकरण त्यापासून कि० त्यातें अनुलक्षून.

अलीकडे, अलीकडेस, अ० विवक्षितपदार्थातें मध्यें अवधित्वेंकरून मानिलें असतां जे देशकालादिरूप दोन दोन प्रदेश पडतात त्यामध्यें जो स्वसन्निधप्रदेश त्याचा गयीं; २, सांप्रत.

अलीजाहीं, वि० फारच मोठा जो कांहीं एक कारखाना, व्यवहार, कारभार, इ० तो.

अलें, न० एक औषधी आहे तें कि० तिचा मुळ्या तें.

अलेपाक, पु० अलें आदिकरून औषधांचा भक्षायाचा जो पाक करितात तो.

अलेल, वि० कों० अट्टल; लुच्चा, सोदा, शिंदळ, इ० कांचेंच वि०.

अलोचनजागरण, न० क्षणमात्रही डोळे मिटायास न सांपडतां सारे रात्र होतें जें जागरण तें.

अलौकिक, वि० सं० लौकिकरीतीहून निराळें असायाजोगें कांहीं एक अतिशयानें युक्त जें बुद्धि, शक्ति, कर्म, इ० तो.

अल्प, वि० सं० विवक्षित परिमाणाहून जाचें परिमाण व्याप्य आहे तो; अल्पजी बुद्धि ती अल्पबुद्धि, अल्पजाची बुद्धि तो अल्पबुद्धि, अल्पमति, अल्पविद्या, तद्विशिष्ट तो अल्पविद्य, इ० समास.

अल्पमोली, वि० सामान्यतः पाहिलें असतां जी मोलाची इयत्ता ध्यानांत येत्ये तदपेक्षया अल्प जास मोल पडतें तो; स० अल्पमोली आणि बहुदुधी.

अल्पसंतोषी, वि० थोडया लाभानेंच संतोष पावण्याचा स्वभाव जाचा तो.

अल्पस्वल्प, वि० केवळ अल्प कि० तदपेक्षया किंचित् अधिक तो.

अल्पायुषी, वि० थोडें आहे आयुष्य जाचें तो.

अल्पाहार, पु० लघुभोजन.

अल्याड, अ० अलीकडे.

अल्लड, वि० नित्यव्यवहारीं शिक्षित होऊन पुरा प्रौढपणा जाचे अंगीं आला नाहीं असा जो मनुष्य, घोडा, इ० तो.

अव, अ० सं० अप या उपसर्गासारिखाच याचा प्रयोग होतो, अवमान, अवदशा, इ० स० जाणावे.

अवई, स्त्री० अवाई.

अवकणें, रा० अविकणें.

अवकहाडचक्र, न० ज्योतिषांत जन्मनक्षत्रावरून मनुष्याचें नाव ठेवायाचें एक चक्र आहे.

अवकळ, वि० अनावर द्वितीयार्थी

अवकळा, स्त्री० उत्तरोत्तर तेजोहीन व्हावें अशी जी मनुष्य, ग्राम, देश, इ० कांस दशा येत्ये ती

अवकात, अवकाद, स्त्री० कोणेक कार्य करण्याविषयीं शारीर किं० द्रव्यादिरूप जें सामर्थ्य तीं; निषेधविषयीं प्र०

अवकाश, पु० सं० विवक्षित क्रियादिरूप आधेयानें अधिष्ठित झालेला नव्हे अतएव आधेयांतराचें अधिकरण व्हावयास उचित जो काल, देशादिरूप प्रदेशविभाग, तो.

अवकाळ, अ० सांप्रत.

अवकाळीं, अ० अकाळीं; उ० अवकाळीं पर्जन्य पडला म्हणून होतें नासलें.

अवकृपा, स्त्री० सं० कोणेकावर कोणेकाचे कृपेचा जो अभाव होतो ती.

अवस्था, स्त्री० कों० देहप्रकृति बदलून जी विकृति होत्ये ती.

अवगणणें, कोणेकास कःपदार्थ अशा बुद्धीनें मानणें.

अवगणन, न० अवगणना, स्त्री० कोणेक विषयाचा हा कःपदार्थ अशा बुद्धीनें केला जो अनादर तो तें.

अवगणित, भूकृ० सं० अवगणना केली आहे जाचीं तो.

अवगत, भूकृ० सं० ज्ञानविषय झाला जीं तो

अवगम, पु० सं० कोणेक पदार्थाचें होतें जें ज्ञान तो.

अवगाहन, न० सं० जलामध्यें बुडी मारण्याचें जें कर्म तें; २, कोणेक विषयाचे गर्भीं बुद्धि इ० कांचा जो प्रवेश तें किं० त्याचें जें ग्रहण तें.

अव

अवगुण, पु० सं० तोटेपणा, लुच्चेपणा, चोरी, वाहाडी, कुरूपता, इ० रूप जो मनुष्यादिकांचा गर्भीं वाईट गुण असतो तो; २, औषधादि योगानें प्रकृतीचे पूर्वस्थितीपेक्षां अहितरूप जो कांहीं विशेष होतो तो.

अवगुणी, भूकृ० सं० चोरी इ० अवगुणविशिष्ट जो मनुष्यादि तो.

अवघड, भूकृ० त्या त्या व्यापारानीं जाचा निर्वाह करण्यास कठिन पडतें असा जो खडतर मार्ग, ग्रंथ, वित्तप्रसंग, इ० कष्टसाध्य किं० दुर्घट तो; उ० कोंकणचा मार्ग चालण्यास अवघड आहे; हा किल्ला हातीं घेण्याची गोष्ट अवघड दिसत्ये; अवघड होणें, वाटणें, इ० स्थळीं विरहादिजन्य शोकामुळें अस्वस्थता प्राप्त होणें.

अवघडजागा, स्त्री०पु० अडसंधि, प्रथमांत प्र० प्रा० नाहीं; स० अवघडजागीं दुःख आणि जांवईवेष.

अवघडणें, कोणेक संकटांत पडून निरुपायावस्थापन्न होणें.

अवघडपंथ, पु० दशविध गोसाव्यांत एक आचरणमार्ग आहे तो.

अवघडपंथी, वि० अवघडपंथानें आचरणारा जो गोसावी तो.

अवघा, वि० सर्व.

अवचट, अ० अकस्मित.

अवचित, अ० अवचट.

अवचित्फळ, न० मकरसंक्रांतीचे दिवशीं लिंबा

यांचाएकवसा आहे.

अवचिते, न० अतित्वरेनें पिकतें असें एक भात आहे.

अवचित्र, न० अशुभसूचक जें दुःस्वप्न, भूकंप, अपशकुन, इ० तें.

अवच्छिन्न, वि० सं० अवच्छेद झाला आहे जाचा तो; दक्षिणादिगवच्छिन्न, घटावच्छिन्न, पटावच्छिन्न, इ० स०.

अवच्छेद. पु० सं० अखंडपणें एकरूपेंकरून स्थितजो कांहीं एक पदार्थ त्याची एकरूपता जावयाजोगा छेद, उपाधिसंबंध, इ० कारणानें झाला जो भेद तो: २, तज्ज्ञापक मध्येंमध्यें जें रेषादिचिन्ह असतें तो.

अवच्छेदक, न० वि० सं० कोणेकपदार्थाचा अवच्छेद जेणेंकरून घडतो असें जें विशेषण, उपाधि, इ० तें.

अवच्छेदकावच्छेदेंकरून. अ० जा जात्यादिरूप अवच्छेदकानें जितका व्यक्त्यादिरूप अर्थ आक्रमिला आहे त्यांतील अंश न वगळतां तो सर्व घेऊन.

अवजड, अवजाड, वि० विवक्षितापेक्षां आकारानें किं० वजनानें फारमोठा आटोपसार नव्हे जो कांहीं पदार्थ त्यास ह्न०.

अवजतन, स्त्री० मूल, पशु, वृक्ष, इ० कांस जीं जतन पाहिजे तिचा जो अभाव ती.

अवजार, न० गलबत, पवन-चक्की, इ० चालायाकरितां वारा धरायासाठीं जें वस्त्र पसरून लावि-

तात तें.

अवटणें, रा० ओहोटणें.

अवटळणें, अवटाळणें, डोकीवर मोठें ओझें घेतलें किं० निजतानां उशीचे खालीं डोकें पडलें इ० कारणानें शिरा इतस्ततः चलित झाल्यामुळें मान दुखूं लागणें.

अवटाण, न० रा० विवक्षित कर्मांविषयीं जें टाण नव्हे तें; उ० भरतीचें टाणावर होडींत बस अवटाण झालें ह्न० चालणार नाहीं.

अवटी, स्त्री० विवक्षित आकार कोरून केलेलें सोनार इ० कांचें साळेंत आऊत असतें जावर सुवर्णीचा पत्रा इ० मारिला असतां त्या आकाराचा ठसा उठतो ती; २, रा० ओहोट; ३. पु० बाजारचे पेठेंत एक अधिकारी आहे.

अवठाणू, न० रा० उगाणू.

अवड, स्त्री० आवड.

अवडणें, न० रोगादिकामुळें कांणताही भक्ष्य पदार्थ रुचूं नये अशी विकृति होत्यें तें; पडणें इ० कांचे योगीं प्र०.

अवडणें, आवडणें.

अवडता, वि० आवडता.

अवडनावड, स्त्री० आवडनावड.

अवडनिवड, स्त्री० आवडनिवड.

अवडणणें, अवडणणें. अवडण्यानें युक्त होणें.

अवडणें, न० अवडणें.

अवंवटा, पु० मुखांतील द्रव जो क्षणक्षणीं गिळावा लागतो तो, परन, उतर, गिळ, इ० कांचे योगीं प्र०

अवदाण, ३लिं० रा० हाड ओढाळ जें गुरूं तो.

अवदूया, पु० अवदणें.

अवंतणें, न० आमंत्रणाचा अपभ्रंश.

अवतरण, न० सं० पूर्वापरश्लोक, वाक्य, इ० कांची संगति दाखवायासाठीं टीकाकारादिक जो मध्यें कांहीं पदरचा ग्रंथ घालितात तें; २, अवरोहण; ३. अवतरण्याचा व्यापार.

अवतरणिका, स्त्री० सं० अवतरण.

अवतरणें, देव, सिद्ध, इ० कानीं कांहीं कार्यार्थ मनुष्यादिरूपें करून उत्पन्न होणें.

अवतंस, पु० सं० पुष्पें, रत्नें, इ० कांचें जें शिरोभूषण किं० कर्णभूषण करितात तो.

अवतार, पु० देव, सिद्ध, इ० कानीं धारण केलें जें मनुष्यादिरूप रूपांतर तो किं० तद्रूपें करून जो त्यांचा प्रादुर्भाव तो; कोणेक कर्माविषयीं कोणेकानें अवतार घेणें स० तें तें अतिशयित करूं लागणें; अवतार घेणें स० पूर्वस्थितींतील व्यवस्था सोडून केवळ अव्यवस्थितपणें वर्तूं लागणें; श्रीकृष्णादि अवतारांची जी कथा ती अवतारकथा, अवतार-चरित, इ० स०; कोणेकाचा अवतार होणें, संपणें, इ० स्थलीं त्याची उत्कर्षदशा जाऊन अपकर्षदशा प्राप्त होणें.

अवतारणें, मनुष्य, पशु, इ० कानीं पिसाळल्यासारिखें वेडेवडेचार करूं लागणें.

अवतारी, ३लिं० अवतार स्वरूप धारण केलें आहे जेणें तो; २, लोकविलक्षण पराक्रमादि गुण विशिष्ट विशिष्ट जो मनुष्यादि त्यास स०.

अवतीर्ण, ३लिं० सं० अवरोह किं० अवतार पावला जो तो.

अवदसाचिन्ह, न० भावि अरिष्टसूचक होतात जीं भूकंपादि दुश्चिन्हें तीं प्र०; २, भावि अनिष्ट व्हावयाजोगी कोणेकास आठवत्ये जी दुर्बुद्धि तें.

अवदसा, स्त्री० दारिद्र्यादि अनिष्टफल प्रापक दुष्ट जी दैवदशा तिला स०; २. अवलक्ष्मी; कोणेकास अवदसा आठवणें स० अहितप्रापककर्म करण्याविषयीं बुद्धि होणें.

अवदां, अ० वर्त्तमान वर्षीं.

अवदान, न० सं० एके आहुतीस पुरायाजोगें घेतलेलें जें होमद्रव्य तें; अवदान मारणें स० लबाडीनें धनी इ० कांचा पैका खाणें.

अवध, स्त्री० अवधिशब्दाचा अपभ्रंश, परंतु कोणेक व्यवहाराविषयीं कालरूप जो उत्तरावधि तद्विषयीं प्रा० प्र०; २, त्या अवधिपर्यंत जो अवकाश तो; उ० स्वयंपाक होण्यास मध्यें चार घटिका अवध आहे.

अवधंडा, पु० अतिनाश होण्यास कारणभूत जें अतिवृष्टि, भूकंप, इ० कांहीं उत्पातरूप त्यास स०.

अवधणा, पु० बाधणा.

अवधान, न० सं० ज्ञेयविषय जाणले जात अशी जी अंतःकरणाची जागरूक दशा तें; २, तादृशदशायुक्त अंतःकरणाचें कोणेक ज्ञात व्याकडेस जें अनुसंधान तें.

अवधानी, ३लिं० सं० जाचें अवधान चांगलें स० अनेक

अनेक ज्ञातव्यार्थाकडेस सारखें लागतें तो; जितक्या अर्थांकडे लागतें त्या त्या संख्यावाचक शब्दांशी समास होतो, उ० अष्टावधानी, दशावधानी, चाळीसावधानी, इ०.

अवधारण, न० **अवधारणा**, स्त्री० सं० कोणेक अर्थीचें हेंच, असेंच, आहेच, नाहींच, इ० रूप जें निश्चयीकरण तें तो.

अवधारणें, क्रि० सं० कोणेक अर्थ अवधारणयुक्त करणें किं० अवधारण पूर्वक जाणणें.

अवधि, पु० स्त्री० सं० विवक्षित जे देश, काल, कर्म, इ० रूप पदार्थ त्यांचें अस्तित्व संपून नास्तित्व जेथें लागतें असा जो त्या त्या पदार्थाचा मागला पुढला किं० आरंभ ताड्या गींचा प्रदेशविशेष तो; २, जाबर दृष्टि देऊन इतर पदार्थांवर हा लहान, मोठा, आंसपूड, लांब, दूर, जवळ, पुढला, मागला, पूर्वेस, पश्चिमेस, इ० शब्दांनीं व्यवहार होतो तो अर्थ; ३, दान, गमन, निष्कासन, त्यजन, इ० व्यापारांनीं जा अधिकरणापासून कांहीं एक अर्थाचा वियोग घडतो तो पदार्थ त्या क्रियेविषयीं; ४, अवधिदिनीयार्थी.

अवधिसाकांक्ष, वि० सं० स्वार्थसिध्यर्थ किं० स्वरूपसिध्यर्थ जास नियमेंकरून कोणेक अवधीची आकांक्षा असत्ये असे जे लहान, मोठा, इ० शब्द किं० त्यांचा अर्थ तो.

अवधिसापेक्ष, वि० सं० अवधिसाकांक्ष.

अवधूत, पु० सं० एक देहावांचून दुसरें वस्त्र, पात्र, इ० कांहीं जवळ नाहीं असा जो कोणी योगी, गोंसावी असतो तो.

अवध्य, वि० सं० वधायास जो उचित नव्हे असा जो अनपराधी इ० तो.

अवनि, स्त्री० सं० पृथिवी.

अवनिगा, **अवनिषा**, स्त्री० अवजतन.

अवबोध, पु० सं० बोध.

अवभृथ, न० सं० यज्ञाचे समाप्तीस एक कर्म आहे.

अवभृथस्नान, न० सं० यज्ञसमाप्ति झाली स० दीक्षित स्त्रिये सहवर्तमान विशिष्ट समारंभ पूर्वक जें स्नान करितीं तें.

अवमत, वि० सं० अवमान केला जाचा तो.

अवमान, पु० सं० अपमान.

अवमानणें, अपमानणें.

अवयव, पु० सं० जे हस्त, पाद, परमाणु, इ० अनेक पदार्थ संयोगादि संबंधानें परस्पर संबद्ध साले असतां विशिष्ट एक पदार्थ देह, पृथिव्यादिभूतें, इ० रूप उत्पन्न होतो ते प्र०.

अवयवशः, अ० सं० अवयवांचे जे अनेक अवयव त्यांजवर प्रत्येकीं विधिसंस्कार होई असें; उ० हा ग्रंथ मी अवयवशः अवलोकन केला.

अवयवार्थ, पु० सं० समासादिरूप विशिष्ट शब्दाचे अवांतर जे अनेक अवयव त्यांचा जो अर्थ तो.

अवयवावयवीभाव, पु० सं० अवयव आणि अवयवी यांचा जो परस्पर संबंध तो.

अवयवी, पु० सं० अनेक अवयव मिळून झाला जो

जो एक देहादि तो.

अवरजा, पु० खतावणीमध्यें एकेक कलमाचे खात्याचें सदर घातलें असतें तो.

अवरजा. ३लिं० कों० ८ अ, वरणें) विवाह कालातिक्रम होऊन विवाह न होतां राहिला तो.

अवरणें, आवरणें.

अवरसचवरस, अ, ८चवरस.पु०) लांबीचें आणि रुंदीचें प्रमाण मिळवून किं० लांबीनें रुंदी गुणून किं० जितकी लांबी तितकीच रुंदी धरून; चतुरस्रक्षेत्रादिकांचे प्रमाणाचें वि०; उ० चोळीस खण अवरसचवरस सात वीती लागतो; हे शेत अवरसचवरस दाहा बिघे आहे; चवरंग अवरसचवरस एक हात कर.

अवरा, पु० कों० कडवा हरणून धान्य आहे तो.

अवरुद्ध, ३लिं०सं० अवरोध पावला तो.

अवरोध, पु० सं० गतिमान् पदार्थाचे गतीचा कांहीं प्रतिबंधकामुळें जो कुंठितपणा होतो तो; मलावरोध, कंठावरोध, मार्गावरोध, इ०स०; २, मृताशौचास स्प०.

अवरोधणें, ८अवरोध.) अवरुद्ध करणें.

अवरोह, पु० ८ अवरोह. सं०) उच्चस्थानापासून नीच स्थानाकडे जी स्वरादिकांची गति तो.

अवरोहण, न० ८अवरोह.) उच्चस्थानापासून खालीं उतरण्याचा जो व्यापार तें.

अवर्षण, न० ८अ.वर्षण.) अनावृष्टि.

अवल, اوّل आदौ; २, ३लिं० पहिला; ३, उत्तम मध्यमादिजा अनेक कोटि त्यामध्यें जो उत्तम कोटींतला तो.

अव

अवलंब, पु० ८ अवलंब.सं) आश्रय.

अवलंबणें, ८अवलंब) आश्रयणें.

अवलंबन, न० सं० आश्रयण.

अवलंबित, ३लिं० ८अवलंब.) अवलंब केला आहे जाचा तो.

अवलसाल, न० सालाचे आरंभीचा जो कांहीं एकदिवसात्मक काल तें.

अवलक्षण, न० ८अव, लक्षण.) मनुष्यादिकांस साहावी अंगुलि, रावखंडेपणा, झोंपेत दांत चावावे, इ० रूप जे वाईट लक्षण असतें तें.

अवलक्षणी, ३लिं० ८अवलक्षण.) अवलक्षण आहे जास तो.

अवलक्ष्मी, स्त्री० ८अव, लक्ष्मी०) दारिद्र्याभिमानिनी एक देवता आहे.

अवलाद. स्त्री० पुत्रपौत्रादि जी संतति ती.

अवलिया, पु० केवळ ब्रह्मनिष्ठता पाऊन विदेही झालेला जो तो.

अवलिळा, अवलीळा, अ० ग्रं० ८अव, लीला.) सहज लीलेंकरून च; कांहीं मोठी गोष्ट सिद्ध करण्याचें वि०; उ० राममामजपशी जरि अंतरीं अवलीळा तरशी भवसागरीं.

अवलुंठन, न० लुंठन.

अवलें, न० ८वलविणें.) नीकावलवून त्याकरण्याचें जें साधन एकेकाडीचे अग्रास पर्णाकार फळी बसवून केलें असतें तें.

अवलेह, पु० चाटून खायाजोगा पातळजो औषधार्थ पदार्थ करितात तो.

अवलोकणें, ८अवलोकन.) अवलोकित करणें.

अव.

अवलोकन, न० ८अवलोकन. सं०) कोणेकविषय चक्षुरिंद्रियानें किं० विचारात्मक बुद्धीनें जाणण्याचा व्यापार.

अवलोकित, ३लिं० ८अवलोकन.) अवलोकन केलें जाचें तो.

अवश, ३लिं० सं० परस्वाधीन झाल्यामुळें स्वाधीनता जाचीं गेली असा जो मनुष्यादि तो.

अवशिष्ट, ३लिं० ८अवशेष. सं०) अवशेषरूपें करून राहिलेला जो पदार्थ तो.

अवशीं, अवशीं, अवशीस, ८अवैस)ऊ०पूर्व रात्रीं.

अवशेष, पु० ८अव. शेष.) कोणेकपदार्थाचे अंशाचा विवक्षित विनियोग होऊन विनियोग न होतां राहिला जो अंश तो.

अवश्य, अ० ८अवश्य. सं०) अगत्यरूप; २, कोणेकानें सांगितली किं० विचारली जा गोष्टीचा अंगीकाराचें द्योतक.

अवश्यक, ३लिं० आवश्यकाचा अपभ्रंश; २, अ० अवश्यप्रथमार्थी.

अवश्यंभावी, ३लिं० ८अवश्यं, भावी. सं०) अवश्य होणारच जें कांहीं एक तो.

अवश्यमेव. अ० ८अवश्य, एव. सं०) अवश्यच.

अवष्टब्ध, ३लिं० ८अवष्टंभ. सं०) अवष्टंभपावला तो.

अवष्टंभ, पु० ८अव, स्तंभ.) कोणीकडेही गति न होतां जागचेजागीं स्थिर राहावें अशी जी कोणेक पदार्थास अवस्था होत्ये तो; २, टेंका.

अवैस, स्त्री० अमावास्येचा अपभ्रंश.

अवसर, पु० ८अवसर. सं०) जें कार्य करण्यास जो काल उचित तो त्याचा; किं० जे ह्मणजें कार्य चाललें आहे तो काल त्याचा; अवसरांतें जाणतो तो अवसरज्ञ, अवसरपंडित, इ० भोजनावसर स्नानावर इ० स०; २, कोणेकाचे अंगीं संचरत असतें जें देवतांचें वारें तो.

अवसान, न० ८अवसान. सं०) कोणेक कार्याची जी समाप्तिदशा किं० मध्यें मध्यें होतो जो विराम तें किं० श्लोकादिकांचे वेगायीं मध्येंमध्यें कांहीं विराम घेण्याचीं जीं नियमित स्थलें असतात तीं प्र०; उ० या व्यवहाराचें अवसान नीट दिसत नाहीं; हें कार्य आरंभापासून अवसानपर्यंत निर्विघ्नपणें गेलें ह्मणजे बरें; एकसारखें काम केलें पाहिजे मध्यें अवसान घेतां नये; ह्मणताना अवसानावर दमघ्याया मध्यें घेऊं नये; २, विवक्षित कार्याचा निर्वाह करण्याविषयीं प्रयोजक जें शारीरबलादिबल तें किं० तें आपल्यापाशीं आहे अशा निश्चयानें विवक्षित कार्य शेवटास नेईन किं० विवक्षित संकटापासून पार पडेन इ० रूप जी मनाची दृढता असत्ये तें; २, रा० कोणेक कार्यावर प्रवृत्त झालेली मध्यें विराम घेईपर्यंत जी एकसारखी कोणेकाची शक्ति टिकली असत्ये तें; उ० तूं दमला असलास तर बैस मी एक अवसान मारतो; ३, कोणेक कार्याचे अवसरांतील मुख्य जो अंश जाचा तदुचित कर्म न घडतां उल्लंघ झाला असतां मागचें पुढचें कार्य बिघडून भलतेंच होतें तें; उ० पाऊस येरवीं पुष्कळ लागून

गून अवसानीं घालवितो त्यापेक्षां अवसानेंसंभाळून थोडा थोडा जरी लागला तरी पुरे; कोणेक कार्य अवसानांत येणें स्र० अटोक्यांत येणें.

अवसानघातकी, ३लिं० ८अवसान, घात .) जा समयीं जें काम केलेंच पाहिजे त्या समयीं तें न करितां घात करण्याचा स्वभाव जाचा तो.

अवसानी, ३लिं० ८अवसान .) प्रसंगीं हा प्रसंग जड आहे असें न वाटतां कार्य करण्याविषयीं जास ङ्कुरूप येतो तो.

अवस्तॉं, अ० अकल्पित

अवस्था, स्त्री०सं० काल देशादि भेदें करून पदार्थमात्राचे भिन्नभिन्न होतात जे स्थितिप्रकार ते प्र०.

अवस्थान, न०सं० पदार्थाचे उभा, अडवा, निरकस, ऊर्ध्व, इ०रूप जे स्थितीचे अनेक भेद ते प्र०.

अवस्थित, ३लिं०सं० कोणेक अवस्थानातें पावून राहिला तो.

अवस्थिति, स्त्री०सं० अवस्थान.

अवहित्था, स्त्री०सं० हर्ष, क्रोध, काम, इ०कांचा आवेश मनांत झाल्यामुळें जे तच्ज्ञापक रोमांचादिरूप शरीरावर आकार होऊं लागतात त्यांचें जें बलात्कारानें गोपन तो.

अवहेलन, न०सं० हेळणा.

अवहेळणा, स्त्री० अवहेलनाचा अपभ्रंश.

अँवळ, ३लिं० ८अवळणें .) अडस; २, पसरट नव्हे असें जें पात्राचें तोंड इ० तो.

अँवळकटी, अँवळकठी, स्त्री० ८अँवळा.) वाळलेले अंवळे तो.

अँवळणें, ८आ, वलन .सं०) मऊनपणें, किं० शिथिलपणें, स्थित जो पदार्थ तो दोरी, इ०कांमध्यें धरून आकुंचितपणें स्थित होई असा करणें.

अँवळसरा, पु० गंधकांत एक भेद आहे.

अँवळा, पु० ८आमलक .सं०) एक फळ आहे; कोणेक कर्मादिकाचे नावें अंवळ्याएवढें पुण्य स्र० त्या त्या कर्मादिकांचा केवळ अभाव, अंवळा देऊन बेल काढाडणें स्र० स्वल्पदानादिकानें कोणेकास आर्जऊन त्यापासून मोठें कार्य करून घेणें.

अँवळी, स्त्री० ८आमलकी .सं० अंवळ्याचें झाड तो.

अँवळीभोजन, न० ८अंवळी .भोजन .) कार्तिक मासांत एखादे दिवशीं आंवळीखालीं ईश्वरप्रीत्यर्थ ब्राह्मणादि सहजें भोजन करितात तें.

अवक्षर, न० ८अव, अक्षर .) अवाक्षर.

अवज्ञा, स्त्री० ८अवज्ञा .सं०) माननीय जे पित्रादिक किं० राजाज्ञादिक त्यांचें संमानन न केल्यामुळें जें अवमाननघडतें तो किं० तद्विषयीं त्यामध्यें काय आहे याचा मान नाहीं केला तर काय होतें असा जो बुद्धीचा भाव तो.

अवज्ञात, ३लिं०सं० ८अवज्ञा.) अवज्ञा केला जाचा तो.

अवा, पु० कच्चीं मडकीं इ० मातीचीं भांडीं भाजायाकरितां एके जागां रचिलीं असतात तो; २, भाजल्या

जल्यानंतर होत्या तितक्या भांड्यांच्या समुदायावर व्यवहार होतो; २, स्त्री० शूद्रादि जातीय प्रौढस्त्रियांस सन्मानानें म्ह०.

अवाई, स्त्री० ८आव.) कोणेक झालेली किं० होणारी परोक्ष गोष्ट तद्विषयीं साक्षाद्दर्शनरूप किं० लेखपत्रादिरूप प्रमाण उपलब्ध नसतां केवळ लोकपरंपरेनें असुक देशीं असुक झालेकिं० असुक होणार इ० रूप जी उक्ति चालली असत्ये ती; म्ह० तवाईपेक्षां अवाईकरीण.

अवाक्, अ० सं० अधः प्रदेशाकडे; अवाक् आहे मुख जाचें तो अवाङ्मुख, अवाग्वदन इ० स० प्र०.

अवाँकणें, कर्तव्यकार्याविषयीं तत्काल प्रवृत्त न होतां करावें किं० न करावें, हें मला साध्य आहे किं० असाध्य आहे, इ० रूप विचारानें तें कार्य मनांत नाडून पाहाणें; २, कोणेक कार्याविषयीं तोड, कल्पना, इ० बुद्धि एकाग्रकरून सुचविणें; ३, कोणेक कार्य करायाविषयीं निश्चित करणें; उ० आम्हीं यंदां लग्न करायास अवांकलें होतें परंतु घडलें नाहीं; ४, कोणेक पदार्थ कांहीं लक्षणावरून यामध्यें असुक गुण असावे इ० रूप बुद्धि चालवून निर्धारित करणें; या अर्थीं प्रा० निषेधविषयीं कर्मकर्तरि प्र०; उ० हा लोखरुपयांचा धनी असें मला अवांकत नाहीं.

अवाँका, पु० ८अवांकणें.) अवसानद्वितीयार्थी; २, कोणेक पदार्थ असुक असुक तऱ्हेचा असावा किं० असुक कार्य असुक प्रकारें केलें असतां असुक तऱ्हेचें होईल इ० रूप आपले मनाचीं धांवत्ये जी कल्पना तो.

अवाचेसवा, अ० अवासवा.

अवाच्य, वि० ८अ, वाच्य.) बोलायास अयोग्य जें अपशब्दादि तो; २, बोलायायास अयोग्य जो सन्मार्गानें चालणारा इ० तो.

अवाज, पु० आवाज.

अवाजदार, वि० आवाजदार.

अवाजवी, वि० कों० ८अ, वाजवी.) गैरवाजवी,

अवाजी, स्त्री० अवांतरीयार्थी.

अवाड, न० ८आवार.) सभोंवतीं कुंपण इ० घालून घराचे आसपास आवृत असतें जें स्थल तें.

अवाडाव, स्त्री० मारणें, लुटणें, शिव्या देणें, नाश करणें, इ० रूप जा लोकोपद्रवचेष्टा ती.

अवाढव्य, वि० ८अति, वाढ.) सामान्यरीतीपेक्षां किं० विवक्षित प्रमाणापेक्षां जो अति मोठा, शरीर, गृह, इ० पदार्थ तो.

अवात, न० कों० ८अति, वात.) समुद्रादिकांचा यायीं अनेक गलबतें बुडावी इ० अनर्थकारक जो वातोत्पात होतो तें; २, ला० अकस्मात् मोठा घात व्हावयाजोगें जें अरिष्ट प्राप्त होतें त्यास म्ह०.

अवांतर, वि० ८अवांतर. सं०) कोणेकविशिष्ट अर्थाचे पोटचेजे अनेक अर्थ ते प्र०; उ० विवाहाचे पोटचीं अवांतर कर्मे बहुत आहेत;

२, प्राधान्येंकरून कोणेक संज्ञेनें निर्दिष्ट जो कांहीं एक अर्थ त्याहून इतर तदनुषंगी तत्सजातीय जाचा असुकच असा विशेषसंज्ञेनें निर्देश करितां येत नाहीं असा जो कांहीं अर्थ असतो तो; उ० मला चाकरीचे दोनशें रुपये मिळतात अवांतर शंभर रुपये मिळतात

अवाप्ति, स्त्री० सं० सुखदुःखादिकांहींएक अर्थाचीजी प्राप्ति ती; सुखावाप्ति दुखावाप्ति मोक्षावाप्ति इ० स०

अवार, न० गृहादिकांचे भोंवतें कुपण भिंत इ० रूप करितात जें आवरण तें.

अवासवा, अ० (असह्यासह्या) एकाचे आगींसवाई दिढी इ० रूप मनस्वीपणें अव्यवस्थितपणें खर्च करणें, खाणें, बोलणें इ० कांचें वि०

अवाळूं, न० शरीरावर जो चर्मवृद्धि होऊन फुगाउठतो तें.

अवाक्षर, न० सं० पढतांना कि० लिहितांना कि० बोलतांना जिव्हादोषादिकारणासुळें विवक्षिताहून भलतेंच जें अक्षर निघतें तें; २, वरें कि० वाईट ईषन्मात्र एकाक्षररूप तरी जें भाषण तें; उ० याणें मला बहुत शिव्या दिल्या परंतु मी अवाक्षर बोललों नाहीं दोनहीअर्थी प्रा० निषेधविषयीं प्र०

अविकणें, (अति-पिकणें) आम्रादिफल निचरुन होई इतकें अतिशयित पिकणें.

अविकारी, ३लिं० सं० जास विवक्षित विकार होत नाहीं तो.

अविचार, पु० सं० कर्तव्याकर्तव्यादिविचाराचा जो अभाव तो.

अविचारी, ३लिं० सं० कोणेक कर्माविषयीं अविचारानें प्रवृत्त होण्याचा जाचा स्वभाव तो.

अविच्छिन्न, ३लिं० सं० मध्यें विच्छेद नपडतां कोणेक गोष्ट कांहीं काल चालण्याचें वि० उ० ही वृत्ति आम्हाकडे पांचशें वर्षें अविच्छिन्न चालली आहे; २, आंत ईषदंशही न्यून नहोतां विवक्षित प्रमाणक पदार्थ मिळणें इ० कांचें वि० उ० यंदांचे व्यवहारांत अविच्छिन्न दोनहजार रुपये मिळाले.

अविद्या, स्त्री० सं० वस्तुतः यद्रूपजो पदार्थ त्याचें ईश्वर मायादिकारणासुळें तद्रूपेंकरून जें अभान होतें ती जेणेंकरून तो पदार्थ अन्यथारूपें करून भासतो उ० हे चिदंश अविद्येमुळें आत्मस्वरूप विसरून आपण जीव असें मानून संसारांत पडले.

अविंध, ३लिं० (अ-विंधणें) छिद्र पाडल्यावांचून जें मोतीं रुद्राक्ष इ० तो; २, यवनास स०

अविधवा, स्त्री० सं० सुवासिनी.

अविधवानवमी, स्त्री० सं० भाद्रपद कृष्ण नवमी जादिवशीं सुवासिनीपणें मेलेल्या आई बायको इ० त्यांचें श्राद्ध करितात ती.

अविधि, ३लिं० सं० शास्त्रानें सांगीतला जो विधि तद्रहित जें कर्म तो.

अविनय, पु० विनयाचा प्रतिपक्षी.

अविनाशी, ३लिं० सं० नाशवंत नव्हे तो.

अविवाहित, ३लिं० सं० जाचा विवाह झाला नाहीं तो पुरुष कि० स्त्री.

अविवेक

अविवेक, पु० सं० अविचार.

अविवेकी, वि० सं० अविचारी.

अविश्वसनीय, वि० सं० जावर विश्वास ठेवायास योग्य नव्हे तो.

अविश्वास, पु० सं० विश्वासाचा अभाव.

अविश्वासी, अविश्वासू, अविश्वासूक, वि० सं० जास कोणेकाचा विश्वास वाटत नाहीं तो, २, अविश्वसनीय.

अविहित, वि० सं० जाविषयीं शास्त्ररूप विधीची आज्ञा नाहीं असें जें कोणेक कर्म तो.

अवीट. वि० (अ·विटणें) मा० विटत नाहीं असा जो वस्त्रादिकाचा रंग तो; २. जाचें नित्यशः सेवन होत असतांही कंटाळा येत नाहीं असा जो अन्नादि भोग्य पदार्थ तो; ३, कंटाळा यावयाजोगें. पापाचरण, अमंगलपदार्थसेवन, इ० जें कर्म त्यापासून जाला कंटाळा येत नाहीं तो; ४, सामान्यरीतीपेक्षां आकारानें अतिमोठा असून सुदृढ जो पात्र, काष्ठ, देह, इ० पदार्थ तो.

अवील, पु० अवेल.

अवेच, वि० (अ·वेचणें) द्रव्यादिकांचा खर्च करण्याविषयीं मोठा कंटाळा जास तो.

अवेल, पु० (वायला·वाईल·वेल) सुलीचे एके अंगें वर लहान साहान दुसरें भांडें ठेवायाचे सोईचें जें ऊर्ध्वमुख छिद्र राखिलें असतें तो.

अवेलचूल, अवीलचूल, स्त्री० (अवेल·चूल) अवेलानें विशिष्ट जी चूल ती.

अवेश्वरीं, अ० ग्रं० अवसरीं.

अवेळ, स्त्री० (अति·वेळ. अ·वेळ) अतिकाळ; २, जा कर्माचा जो उचित समय नव्हे तो त्याची

अवेळसवेळ, स्त्री० (अवेळ.सुवेळ) कोणेक कर्माविषयीं योग्य किं० अयोग्य जी वेळ ती; उ० अवेळसवेळ पाहून कामकरणें तें करावें भलतेव्हां करूं नये.

अव्यक्त, वि० (अ·व्यक्त) स्पष्ट किं० प्रकट नव्हे तो; २, ककारादि वर्णरहित शुद्ध ध्वन्यात्मक जो शब्द तो ; अव्यक्तरूप, अव्यक्तगणित, अव्यक्तमार्ग, अव्यक्तगुणन, अव्यक्तभजन, इ० स०

अव्यंग, वि० सं० व्यंग नव्हे तो.

अव्यय, वि० सं० जाचा व्यय होत नाहीं असें जें ब्रह्मस्वरूपादि तो; २, न० क्रियापदवाच्य जें कर्ता किं० कर्मरूप कारक त्याशीं सामानाधिकरण्य पावायाची योग्यता कदापि यावयाची नाहीं अशा अर्थाचें वाचक लक्षण जे क्रियाविशेषण, उद्गार, कालदेशादिरूप अधिकरणाचे वाचक, अचानक, झाडून, अरर, हाहा, एकां, आज, रवालीं, तेथें, इ० रूप जे शब्द ते प्र०.

अव्ययीभाव, पु० सं० समासांत एक भेद आहे.

अव्यवस्थ, वि० सं० अव्यवस्थित.

अव्यवस्था, स्त्री० सं० विवक्षित संसारादिव्यवहारीं त्या त्या व्यवस्थेचा जो अभाव ती,

अव्यवस्थित, वि० सं० जामध्यें विवक्षित

व्यवस्था नाहीं असा जो व्यवहार कि० पुरुषादिक तो.

अव्यवहित, ३लिं० सं० व्यवहित नव्हे तो.

अव्याप्ति, स्त्री० सं० लक्ष्यार्थाचा एकदेश लक्षणानें व्याप्त न होतां राहतो असा जो लक्षणास दोष तो.

अव्याहत, अ० सं० अविच्छिन्न.

अव्रण, ३लिं० सं० जाचे अंगावर क्षत, खांच, खवळगा इ० खोड नाहीं असाजो मनुष्यादि कि० फल पात्र इ० तो०

अव्हेर, पु० (अवहेलन सं०) अनादर.

अव्हेरणें, (अव्हेर) अव्हेरानें युक्त करणें; २, गृह, शरीर, वस्त्र, पात्र, इ० पदार्थ विवक्षित जो पास न केल्यामुळें मळाचे कट बसलेच आहेत जिकडे तिकडे उकीर वारवीर, पडझड झाली आहे, गयतें रुजलीं आहेत इ० रूप जादुर्दशा तद्युत करणें.

अंश, पु० सं० एका पदार्थाचे दोन तीन कि० शतशः लक्षशः कि० पाहिजेत तितके स्थूल कि० सूक्ष्म छेदादिकानें कि० कल्पनेनें झालेले जे अनेक खंड तें प्र०; २, लेश उ० घरांत धान्याचा अंश नाहीं, पोटांत अन्नाचा अंश गेला स० हुशार होईल, ईश्वरांश, जलांश, पित्तांश, ज्वरांश, इ० स० शीतांश. उष्णांश. इ०

अशक्त, ३लिं० सं० शरीर शक्तीनें हीन जो तो; २, जें कर्म करण्याविषयीं जी ज्ञानादि शक्ति पाहिजे तद्रहित जो तो तद्विषयीं.

अशक्य

अशक्य, ३लिं० सं० शक्य नव्हे असें जें कांहीं एक कर्म तो.

अंशतः, अ० सं० अंशेंकरून स० साकल्यें करून नव्हे असें; उ० याथांशतः.

अशन, न० सं० भक्षण; २, भोजन.

अशर, ३लिं० न० दाहा परंतु यवनी सालाविषयीं मात्र प्र०

अशरीन, ३लिं० न० वीस परंतु यवनीसाला विषयीं मात्र प्रवृत्ति.

अंशहारी, ३लिं० सं० कोणेक अर्थाचा जो कोणेक विभागी तो.

अंशावतार, पु० सं० ईश्वराचा कांहीं कारणास्तव एके अंशेंकरून जो अवतार होतो तो.

अंशावतारी, ३लिं० सं० अंशावतार रूपानें जो प्रादुर्भूत झाला तो.

अंशांश, पु० सं० अंशाचा जो अंश तो.

अशाश्वत, ३लिं० सं० शाश्वत नव्हे तो.

अशास्त्र, ३लिं० शास्त्रविरुद्ध तो.

अशिजा, ३लिं० (अ-शिजणें) शिजलेला नव्हे स० हिरवा जो भाजी धान्य इ० पदार्थ तो.

अशिष्टव्यवहार, पु० सं० लाघण्या सणणें दासीगमन करणें इ० रूप शिष्टांस अनुचित जो व्यापार तो.

अंशुक, न० सं० वस्त्र.

अशुद्धाळ, ३लिं० (अशुद्ध-आलय) जाचे भाषणांत कि० लेखांत बहुत अशुद्ध असतें असा जो मनुष्य कि० तत्संबंधी लेख भाषण इ० तो.

अशुद्ध

अशुद्ध, ३लिं० सं० शुद्ध नव्हे जो पदार्थ कर्म इ० तो; २, न० लिहिणें म्हणणें इ० कांत जें अवाक्षर निघतें तें, कि० ग्रंथादिकांचा ठायीं शब्दशास्त्रविरुद्ध जें अक्षर, पद, इ० पडतें तें; ३, ग्रं० रुधिर.

अशुद्धया, ३लिं० (अशुद्ध) जाचे लिहिण्यांत, म्हणण्यांत, फारच अशुद्धें निघतात त्याला स०.

अशुभ, न० सं० अकल्याण; २, ३लिं० शुभाचा प्रतिपक्षी जो शब्द. कर्म इ० तो; अशुभाचें ज्ञापक जें चिन्ह तें अशुभचिन्ह, अशुभ लक्षण, इ० अशुभाचें जें सूचक तें अशुभसूचक इ० स०

अशोला, ३लिं० असला.

अशेष, ३लिं० सं० अवघा.

अशोक, पु० सं० एक पुष्पवृक्ष आहे; २, एक दुसरे प्रकारचा सुशोभित वृक्ष आहे.

अशौच, न० आशौच.

अश्मंतक, पु० सं० अपटा.

अश्मरी, स्त्री० सं० मूत्रकृच्छ्र.

अश्मा, पु० सं० दगड.

अश्रद्धा, स्त्री० सं० श्रद्धेचा अभाव ती.

अश्रद्धेय, ३लिं० सं० जाजवर श्रद्धा ठेवायास योग्य नव्हे तो.

अश्रफी, स्त्री० اشرفی मोहोर म्हणून नाणें आहे.

अश्राव्य, ३लिं० सं० श्रवण करायास जें अयोग्य साधुनिंदा, बीभत्स, इ० तो.

अश्रु, पु० न० सं० रोदनादिसमयीं नेत्रांत जें उदक येतें तें, हर्षामुळें उत्पन्न झालें तें हर्षाश्रु, आनंदाश्रु, प्रेमाश्रु, शोकाश्रु, इ० स० अश्रूची धारा ती अश्रुधारा. अश्रुपात, अश्रुप्रवाह, इ० स०.

अश्रुत, ३लिं० सं० श्रुत नव्हे तो.

अश्रुपात, पु० सं० नेत्रांपासून अश्रूंचें जें पतन तो; २, अश्रु.

अश्व, पु० सं० वर बसून जावयाचे उपयोगीं एक ग्राम्यपशु आहे; अश्व बांधायासाठीं बांधली जी शाला ती अश्वशाला, अश्वपति, अश्वारोहण, अश्वारूढ, इ० स०.

अश्वगंधा, स्त्री० सं० एक वनस्पति आहे.

अश्वत्थ, पु० सं० एक वृक्ष आहे.

अश्वत्थनारायण, पु० सं० अश्वत्थास देवता बुद्धीनें स०.

अश्वत्थोद्यापन, न० सं० अश्वत्थास पार बांधून मंत्रानीं जो संस्कारविशेष करितात तें.

अश्वमेध, पु० सं० सार्वभौम राजानें करायाचा एक यज्ञ आहे.

अश्ववैद्य, पु० सं० अश्वास कांहीं रोग झाला असतां त्याविषयींचे उपाय जाणणारा जो तो.

अश्वशिक्षा, स्त्री० सं० अश्वास नानाप्रकारचा चाली शिकविण्याचा जो व्यापार ती.

अश्वासन, न० आश्वासनाचा अपभ्रंश.

अश्विनी, स्त्री० सं० अश्वजातीय स्त्री; २, सत्तावीस नक्षत्रांतील जें पहिलें नक्षत्र त्या.

अश्विनीकुमार, पु॰सं॰ स्वर्गी जुळे दोन भाऊ देवांचे वैद्य आहेत ते; २, एक रसायन आहे तो.

अश्वीन, पु॰ आश्विनाचा अपभ्रंश.

अश्शी, स्त्रिं॰ (अशीति, सं॰) ऐशीं ८०.

अषड्ताळ, स्त्रिं॰ कों॰ जाचें बोलणें, करणें, इ॰ कांत ताळतंत नाहीं असा जो मनुष्य तो, किं॰ त्याचें तें बोलणें, करणें, इ॰ तो.

अषाढ, पु॰ आषाढाचा अपभ्रंश.

अष्ट, वि॰ सं॰ ८; अष्टगुण, अष्टगुणित, अष्टसंख्या, इ॰ स॰ आठानीं अधिक जे दश. सं॰ अष्टक ते अष्टादश, अष्टाविंशति. इ॰ स॰.

अष्टक, न॰ स॰ आठ पदार्थांचा जो समुदाय तें.

अष्टकोण, स्त्रिं॰ सं॰ आठ आहेत कोण जाचे असा जो गृह, पात्र, स्थल, इ॰ पदार्थ तो.

अष्टकोनी, स्त्रिं॰ अष्टकोणाचा अपभ्रंश.

अष्टगंध, न॰ सं॰ सुगंधिक आठ द्रव्यें एकत्र करून देवादिकांस लावावयास जें गंध करितात तें.

अष्टगोल, अष्टगोली, स्त्रिं॰ (अष्ट॰ सं॰ गोल॰ प्रा॰) चार पट्टी एकत्र करून केला जो तो प्रा॰ शेल्याचेंच वि॰.

अष्टघाण, स्त्री॰ (अष्ट, सं॰ घाण, प्रा॰) अतिशयित जो दुर्गंध त्यास म्ह॰.

अष्टदल, अष्टदळ, न॰ सं॰ आठ पांकळ्यांचे रेषानीं. किं॰ रंग भरून भूम्यादिकांवर रेखितात जें कमल तें.

अष्टदिशा, स्त्री॰ सं॰ पूर्वआग्नेयी, इ॰ आठजा दिशा त्या.

अष्टपदरी, स्त्रिं॰ (अष्ट, सं॰ पदर, प्रा॰) आठ आहेत पदर जाला असा शेला, माळ, दोरी, इ॰ तो.

अष्ट

अष्टपुत्रा, स्त्री॰ सं॰ आठ आहेत पुत्र जिला ती, प्रा॰ सुवासिनीस आशीर्वाद वाक्यांत वाचा म॰.

अष्टपुत्री, स्त्री॰ (अष्ट, पुत्र,) विवाह समयीं वधूस जें वस्त्र नेसविलें तें.

अष्टपैलू, स्त्रिं॰ (अष्ट, सं॰ पैलू, प्रा॰) आठ आहेत पैलू जास तो; २, ला॰ अनेक गुणानीं युक्त असून जो व्यवहारचतुर त्यास म्ह॰.

अष्टफल, अष्टफळ, न॰ (अष्ट, फल, सं॰) अष्टफळी.

अष्टफली, अष्टफळी, स्त्री॰ अष्टफल, सं॰ एकजातीय अंबे, पेरू., इ॰ आठ आठ फळांचें एक एक वायन अशीं आठ वायनें आठां ब्राह्मणास देतात तीं म॰, तादृश विधीनें पुष्पादिकानींही वायनें दिलीं असतां त्यांस म्ह॰.

अष्टम, स्त्रिं॰ सं॰ आठवा.

अष्टमांगल्य, न॰ सं॰ सगर्भ स्त्रीचा आठव्या महिन्यांत करायाचा एक संस्कार आहे.

अष्टमांडा, पु॰ सं॰ आठवा जो अंडा तो; २, ज्वरादि निवृत्त्यर्थप्राशनार्थ उदकाचे सात अंडा जालून एक अंडा उगविलान तो.

अष्टमी, स्त्री॰ सं॰ प्रतिपदेपासून आठवी जी तिथि ती.

अष्टवर्ग, पु॰ सं॰ मुंजीचेदिवशीं मुंजलागायाचे पूर्वी आठां बटूस भोजन घालावें असें कर्म आहे तो.

अष्टवर्ग्या, पु॰ (अष्टवर्ग, सं॰) अष्टवर्गास जेवणारे जे बटू ते म॰.

अष्टवसु, पु॰ सं॰ स्वर्गी वसुसंज्ञक आठ देव प्रति मन्वंतरीं निरनिराळे होतात ते.

अष्ट

अष्टसावध, ३लिं० (अष्ट·सं० सावधान·सं० १ सावध २.) एक समयावच्छेदेंकरून अनेक विषयांकडे जाचें लक्ष्य असतें तो.

अष्टांगीं, अ० (अष्ट·अंग·सं०) कांहीं एक विषय ध्यानांत धरण्याचीजी चित्तवृत्ति तिचा एकदेशीही निषेधविषयीं प्र०; उ० मी काल इतका उपदेश केला परंतु याचें अष्टांगीं नाहीं.

अष्टाधिकार, पु० ग्रामसंबंधी ज्योतिष, धर्माधिकरण, उपाध्यपण, पाटिलकी, सारकी, इ० जे आठ अधिकार ते; २, ला० निजणें, उठणें, बसणें, जेवणें, इ० सर्वजीं करायाचीं कर्मे त्यांस प्रसंगविशेषीं प्र०; उ० एका रवणाचे रवोलींत सगळे अष्टाधिकार करूं म्हणतां ने होतील कसे; ३, राज्यादिसंबंधी प्रधानकी, सेनापत्य, इ० जे सर्व अधिकार त्यांस प्रसंगविशेषीं प्र०; उ० हा नारू एक असला म्हणजे दुसरा गडी, कारकून, मोतद्दार, इ० कोणी नको सगळे अष्टाधिकार एकदा सांभाळील.

अष्टोप्रहर, अ० अष्टोप्रहर याचा अपभ्रंश.

अष्टौप्रहर, अ० सं० रात्रंदिवस.

असकृत्, अ० सं० अनेकवार.

असंख्य, असंख्यात, ३लिं० सं० जाचे संख्येचा मोजून निश्चय केला नाहीं किं० जाची संख्या करतां येत नाहीं तो.

असंग, ३लिं० सं० संगति करायास योग्य नव्हे असाजो दाढ, लुच्चा इ० रूप मनुष्यादि तो; प्र० असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ; २, सर्वसंग परित्याग केला आहे जेणें तो.

असंगत, ३लिं० सं० पूर्वापर संगति जाची चांगली जुळत नाहीं असें जें भाषणादि तो.

असंगति, स्त्री० सं० भाषणादिकांमध्यें पूर्वापर अर्थांचें संगतीचाजो अभाव ती.

असर, ३लिं० आंत पाणी अधिक झाल्यामुळें जाचा गोळा बांधूं लागलें असतां बांधत नाहीं असें पीठ, भात, इ० तो.

असडणें, असडयानें युक्त करणें.

असंडा, पु० (असडणें) ओंचका.

असडा, असडी, ३लिं० (अ० सडणें) मुरलाने सडून सडीक केलेला नव्हे असाजो तांदूळ, इ० तो; २, ला० अलुड.

असडी, स्त्री० (अति, सडणें०) क्षतादिकांवर मक्षिका बसून हगत्या जी विष्ठा ती किं० तिचा योगानें व्याप्तांत जो कृमिरूप विकार होतो ती.

असण, असणा, पु० एक वन्यवृक्ष आहे.

असणें, (अस सं०) अस्तित्वांत आश्रयून राहणें.

असत्, ३लिं० जास अस्तित्व नाहीं तो; २, वाईट; ३, साधुजनाचा प्रतिपक्षीजो जन तो; असत्य, असत्कर्म, असदाचरण, असत्स्वभाव, असद्वासना, इ० स०

असती, स्त्री० व्यभिचारादिदोषवतीजी स्त्री ती.

असंतुष्ट, ३लिं० सं० संतुष्ट नव्हे तो.

असंतोष, पु० सं० संतोषाचा प्रतिपक्षी रंवदविशेषरूपजो भाव तो; उ० याचकानीं किती मागितलें तरी मला असंतोष नाहीं.

असंतोषी, ३लिं० सं० लाभादि बहुत झालें तथापि संतुष्ट न होण्याचा स्वभाव जाचा तो.

असत्कळ, स्त्री० सा० (असत्, काल) कोणेकाचें परें

बरें केलें असतां त्यास उलटा विषाद यावा दुर्गुणी पुरुषाची प्रतिष्ठाहानी, सद्गुणी पुरुषानीं दैन्य भोगावें, इ० रूप विषम जी काळदशा ती सत्य०; ये धातुयोगीं म०.

असत्य, ३लिं० (अ० सत्य, सं०) जामध्यें सत्यता नाहीं असें जें भाषण, पुरुष, इ० तो; असत्यभाषण, असत्यवाद, असत्यवादी, इ० स०.

असंबद्ध, ३लिं० (अ, संबद्ध, सं०) पूर्वापर संबंध जाचा यथायोग्य जुळत नाहीं, असें जें भाषण, ग्रंथ, इ० तो; २, जा अर्थांचा संबंध योग्यतेचा अभावास्तव अघटमान दिसतो तदर्थक जें वाक्यादि तो. उ० पाण्यानें घर जळालें म्हणतांस परंतु हें असंबद्ध म्हणावयाचें.

असंभव, पु० (अ, संभव, सं०) कोणेक गोष्टीचे संभावाचा अभाव तो.

असंभवदुल्लिक, ३लिं० जाचे उल्लीचा मुळीं संभवच नाहीं. असा जो कोणीएक अर्थ तो; उ० सूर्य अंधारामुळें ठंथलागून पडला ही गोष्ट असंभवदुल्लिक दिसते.

असंभवित, ३लिं० जाचा असंभव वाटतो असा जो कोणीएक अर्थ तो.

असंभावना, स्त्री० (अ, संभावना, सं०) शब्दादि प्रमाणानें ज्ञान जो कोणीएक अर्थ तद्विषयीं कोणी कारणामुळें, हा अर्थ असंभवित दिसतो अशी जी बुद्धि होत्ये ती.

असंभावित, ३लिं० सं० घडावा, व्हावा, इ० रूप संभावना यद्विषयी झाली नाहीं, असा जो कोणेक अर्थ तो.

असंभाव्य, ३लिं० सं० होईल, घडेल, इ० रूप संभावना करण्यास अयोग्य जो अर्थ तो

असंभूत, ३लिं० सं० कदापि संभवलेला नव्हे असा जो कोणीएक अर्थ तो.

असभ्य, ३लिं० सं० सभ्य नव्हे असा हलका जो मनुष्य तो.

असमंजस, ३लिं० सं० समंजस नव्हे तो.

असमजुती, असमजुत्या, ३लिं० (अ० समजूत.) दुसऱ्यानें समजूत पाडली असतां ही जाची पडत नाहीं असा जो तो.

असमजूत स्त्री० (अ० समजूत.) गैर समजूत.

असमर्थ, ३लिं० सं० विवक्षित कर्म संपादनाविषयीं उपयुक्त जें सामर्थ्य तद्रहित तो.

असमाधान, न० सं० असंतोष; २, अतिरिक्त अन्नादि भक्षित्यामुळें पचन होईतों जी अस्वस्थता होत्ये ती.

असरणी, स्त्री० रा० (अशरीरवाणी, सं०) आकाशवाणी.

असल, ३लिं० मुळचा बिंबभूत जो कोणीएक पदार्थ तो, तत्प्रतिबिंबभूत जे अनेक पदार्थ त्यांजवरही बिंबभूताचे संज्ञानीं व्यवहार होतो म्हणून तद्व्यावृत्त्यर्थ हें वि०; उ० याची नक्कल तुम्ही घ्या आणि हें असल पत्र मजपाशीं ठेवा. ही शाल जोडी असल काश्मीरची; २, जारीत्पन्न नव्हे, किं० रावबटीक, इ० कांचे पोटचा नव्हे एकून यथायोग्य आई बापा पासून झालेला जो मनुष्य इ० त्यास म्ह०: ३. स्वजातीय पदार्थ समुदायांत जो उत्तम कोटींतला त्यास म्ह०.

असला, ३लिं० (असा) अशा सारखा तो.

असहन, न० सं० दुःख किं० परोत्कर्ष इ० कांचें सहन

न नसल्यामुळें जी उद्विग्नता होते तें.

असहाय, वि॰ सं॰ जाला दुसऱ्याचें साहित्य नाहीं असा जो केवळ एक तो.

असह्य, वि॰ सं॰ सहायास अशक्य जें दुःख, तेज, इ॰ तो, असह्य आहे वेदना जाची तो, असह्य वेदन, असह्य पराक्रम इ॰ स॰

असळका, असळसा, स्त्री॰ आळेपांचा अपभंश.

असा, वि॰ (हा) या प्रकारचा; २, अ॰ या प्रकारें करून: ३, उक्त वाक्यादिकांचे परामर्शार्थ, तत्तद्वाक्यादिकांपुढें किं॰ विवक्षितार्थी सदृश या अर्थरं तत्तच्छब्दापुढें याचा योग होतो तेव्हां प्रा॰ अकाराचा लोप होतो; उ॰ गोरगरीबास अन्न यावेंसें मला वाटतें परंतु अनुकूळ नाहीं, तो जातो आहे तो रा घोपंतसा वाटतो.

असाच, अ॰ (असाच) व्यापारांतर न करून मध्यें विलंब न लावितां येणें जाणें इ॰कांचें वि॰

असातसा, वि॰ (असा॰तसा॰) सामान्यकोटींतला भलतेंच दुराचरण करणारा इ॰ तो; प्रायः निषध विषयीं प्र॰

असाधारण, वि॰ सं॰ साधारण नव्हे तो.

असाध्य, वि॰ सं॰ साध्य नव्हे जो रोग, विद्या, इ॰ तो,

असामी, स्त्री॰ आसामी.

असामीदार, वि॰ आसामीदार.

असार, वि॰ (असार॰सं॰) जामध्यें कांहीं तत्त्वांश नाहीं तो.

असावध, वि॰ (अ॰सावध॰) सावध नव्हे तो.

असावरी, स्त्री॰ एक रागिणी आहे.

असावरी, असावली, कांठ, पु॰ विणण्यानेंच जा-

वर

वर वेल उठविली असल्ये असा जो शेला इ॰ कांस कांठ असतो तो.

असास, वि॰ (असहाय॰सं॰) कोणेक कर्मादिविषयीं जास दुसरा कोणी सहाय नाहीं तो.

असाक्ष, वि॰ असाक्षिकाचा अपभंश.

असाक्षिक, वि॰ सं॰ जास कोणी एक साक्षी नाहीं असा जो कांहीं एक व्यवहार तो.

असु, पु॰ सं॰ प्राण.

असुख, न॰ सं॰ सुखाचें प्रतिपक्षी स्व॰ दुःख तें.

असुजणें, कों॰ (अ॰सुजणें॰) सुजीनें वियुक्त होणें.

असुढाळ, वि॰ (असूं॰ढाळणें) निरंतर डोळ्यांतून पाणी वाहतें जाचा असें जें घोडें तो; २, लाडक्या पुरुषादिकांस स्व॰: ३. स्त्री॰ घोड्यास एक खोड आहे ती.

असुदा, वि॰ फार दिवस फेरफटका न करितां ठेवलेलें जें घोडें अतएव घर बसलें असतां प्रा॰ मस्ती करितें तो; २, बहुकाळ मैथुन प्रसंग न होतां राहिला जो मनुष्य इ॰ तो.

असुदा, वि॰ कोणेक कर्मादिकांकडे संबद्ध होऊन गुंतलेला नव्हे असा केवळ मोकळा मनुष्य जागा, पात्र, इ॰ तो.

असुदा, वि॰ (असूद॰) (जाणें धातुयोगीं प्र॰अ॰) अन्नादिकांचा ग्रास असूद जाई अशा प्रकारें गिळिला जाणें.

असुर, पु॰ सं॰ दैत्य.

असुरी, वि॰ (असुर॰) तामस, साहस, जें कर्म, उपाय, इ॰ तो; उ॰ वायु झाला असतां डाग देणें हा

आसुरी

असुरी उपाय.

असूं, न० अश्रुशब्दाचा अपभ्रंश.

असूड, अँसूड, पु० (अँसडणें) बेल इ० कांस हांकावें किं० शेतावरील पारवरें उठवावीं इत्यादयर्थ क्रमानें बारीक होत गेलेला दोर केलाअसतो जास फिरवून आंसडा दिला असतां मोठा शब्द होतो.

असूडगांठ, स्त्री० (अँसडा, गांठ) एक पदर धरून आंसडा दिला असतां सुदायाजोगी जी जी गांठ देतात ती.

असूत, असूद, न० (उँशीत, उत्सिक्थ) जाणें धातुयोगीं प्र० अ० भक्ष्यमाणपदार्थाचा अंश गिळतांनां श्वासद्वारा शिरल्यामुळें ठसका लागून जीव घाबरा होतो अशीजी अवस्था होत्ये तें.

असूनअसून, अ० (असणें,द्वि०) एकसारखें सतत नव्हे मध्यें मध्यें विराम पावून;उ० असून असून पोटांत तिडीक येत्ये.

असूया, स्त्री० सं० मत्सरादिकारणामुळें दुसऱ्याचे गुणावर जी दोषबुद्धि होत्ये ती किं० दुसऱ्याचे गुण दोषबुद्धीनें पाहाण्याचा जो व्यापार ती.

असोग, स्त्री० (अशोक सं०) अशोक प्रथमार्थी.

असोड, पु० असूड.

असोला, ३लिं० (अ०सं० सोलणें-भा०) सोललेलानव्हे असाजो नारळ, रोंडा, इ० कित्येक तो.

असो

असोशी, स्त्री० (अति, सं० सोस-भा०) कोणेक प्राप्तव्य अर्थाविषयीं अतिशयितजो सोस ती;२, ३लिं० तद्विशिष्ट मनुष्यादि तो.

असोशीक, ३लिं० (अ०सं० सोशीक भा०) सोशीक नव्हे तो.

अस्करा, पु० कोणेकाची कोणेक गोष्टीविषयीं पडली असत्येजी आरच्या तो.

अस्का, ३लिं० अवघा.

अस्खलित, ३लिं० मध्यें स्खलन न पावतां एकसारिखी चालत्येजी गति, वाणी, इ० तो.

अस्त, पु० नं० सं० मेषादिराशींचें किं० तद्विशिष्ट ग्रहादिकांचें भूगोलाचे आड गेल्यामुळें जें अंतर्धान होतें तें;२, मंगलादिग्रह सूर्याचे संनिहित गेल्यामुळें जें त्यास अदृश्यत्व येतें तें तें;३, मरण, अन्यत्रगमन, प्रध्वंस, इ० कारणानें विवक्षितस्थलीं आदळूं नये अशीजी कोणेकाची अवस्था होत्ये तो तें; अस्तकाल, अस्तसमय, सूर्यास्त, चंद्रास्त, इ० स०

अस्तंगत, ३लिं० अस्तातें पावला तो.

अस्तनी, स्त्री० अंगरखा, चोळी, इ० कांस हाताचा आच्छादकजो अवयव असतो ती.

अस्तनीतलीआग, स्त्री० (अस्तनी, आग) आपला असून परपक्षास मिळून किं० स्वयें नजो आपल्या नाशाविषयीं उठला त्यास स०

अस्तमय, न० पु० सं० सूर्यादिकांची भूगोलाचे आड गेल्यामुळें अस्तरूपजी अवस्था होत्ये तो तें;२, अस्तमान.

अस्तमान, न० सं० भा० सूर्याची अस्त होण्याची

वेळ

वेळ तें.

अस्तमित, ३लिं० सं० अस्तंगत.

अस्तर, न० पु०. (आस्तरण सं०) रुंदार अंग ररवा, दुलई, रुजामा, इ० कांस आंतले अंगें जें दुसर्‍या प्रकारचें वस्त्र घालितात तें तो.

अस्ताचल, पु० सूर्यादिकांचें जा प्रदेशीं अस्त होतें त्या प्रदेशास पर्वतत्व कल्पून स०

अस्तायी, स्त्री० ध्रुपदाचा पेडाबंद.

अस्ताव्यस्त, ३लिं० (व्यस्त. द्वि०) अव्यवस्थितपणें पडलेला जो कांहीं पसारा, रचना, व्यवहार इ० तो.

अस्तित्व, न० आहे अशा प्रतीतिकारणभूत पदार्थनिष्ठ जो धर्मविशेष तें.

अस्ती, स्त्री० अस्थिशब्दाचा अपभ्रंश.

अस्तु, अ० असो, २, कांहीं एक गोष्टीचा विस्तार नकरितां अंगीकार करून दुसरी गोष्ट बोलायासाठीं किं० एरवींच जेव्हां उपसंहार कर्तव्य आहे तेव्हां याचा प्र०.उ० यालास मजत नव्हतें तेव्हां करूंनये तें केलें अस्तु आतां समजूं लागलें आतां असें करूं नये, मजकडे दोष नसतां तूं मला लबाड म्हणतोस अस्तु थोर आहेस.

अस्तेकरी, ३लि० (असणें) कांहीं द्रव्य जाचे पदरीं आहे तो.

अस्त्यानस्त्या, पु० (असणें.नसणें) नस्त्या.

अस्त्र, न० सं० जा बाणादि शस्त्रावर मंत्रें करून देवतेचें आवाहन केलें तें शस्त्र किं० तो मंत्र; अस्त्रविद्या अस्त्रशास्त्र अस्त्रज्ञान अस्त्रप्रयोग इ० स० अग्न्यस्त्र वारुणास्त्र नारायणास्त्र इ० सं०

अस्थि, न० सं० मनुष्यादि शरीरांतील जा सात धातु त्यांमध्यें काष्ठसदृश दृढावयवरूप एक धातु आहे तें.

अस्थिगत, ३लिं० स० अस्थींतें आश्रयून राहिला आहे तो, उ० याचा ज्वर अस्थिगत आहे.

अस्थिपंजर, पु० सं० देहांतील सर्व अस्थींचा जो सांगाडा तो.

अस्नात, ३लिं० सं० शरीरशुद्ध्यर्थ जें नित्य स्नान किं० विवाह इ० निमित्तक जें नैमित्तिक स्नान तें नाहीं केलें जेणें तो.

अस्नार्ना, ३लिं० अस्नाताचा अपभ्रंश.

अस्पर्श, ३लिं० अस्पृश्य, रजस्वलेविषयीं प्र०

अस्पृश्य, ३लिं० सं० स्पर्श करण्यास अयोग्य किं० अशक्य तो.

अस्मत्, सं० आम्हीं परंतु याचा प्रयोग लोकांत समासींच होतो उ० अस्मद्गृह, अस्मत्स्त्री. अस्मत्कुल, इ०

अस्मदीय, ३लिं० सं० आमचा.

अस्मादिक. (अस्मत्. आदि सं०) आम्हीं कांहीं एक गोष्टीविषयीं असाधारणता आपली वर्णायाची असतां प्राकृतजन याचा प्रयोग करितात उ० एथें अस्मादिक होते म्हणूनच या कामाचा उलगडा झाला.

अस्मान, न० आकाश.

अस्मानगिरी, स्त्री० मंडप इ० कांस जें कापडाचें

डाचें छत देतात ती.

अस्मानी, स्त्री० (अस्मान) ग्राम, शेत, इ० कांस विपुलता, सांत, अतिवृष्टि, अनावृष्टि, इ० जो दैवी उपद्रव बाधतो ती; २, वि० निरभ्र आकाश जसें दिसतें तसा जो रंग तो किं० तद्विशिष्ट जें वस्त्रादि तो.

अस्वरस, पु० ग्रंथादिकाचे स्वरसाचा कोणेक अर्थावर जो अभाव दिसतो तो.

अस्वल, न० एक वन्यपशू आहे; २, ला० मोठा जो सुरवंट त्यास स्व०

अस्वलीकांठ, पु० असावरी कांठ.

अस्वामिक, वि० सं० जास कोणी धनी नाहीं असें क्षेत्रादि तो.

अस्वास्थ्य, न० सं० कांहीं व्याधीमुळें स्वस्थतेचा जो अभाव तें.

अस्सल, वि० असल.

अहं, सं० मी; २, मी असा जो आत्मविषयज्ञानाचा आकार त्याचें अनुकरण, अहं अशी जी प्रतीति ती अहंप्रतीति, अहंस्फूर्ति, अहंभाव, इ० समासीं प्र०

अहंकार, पु० सं० अभिमान प्रथमार्थी; २, गर्व.

अहंकारास्पद, न० सं० मी अशा प्रयोगानें जो ग्रहणविषय आत्मा. कि० देह तें.

अहंकारी, वि० सं० अहंकार आहे जाला तो.

अहंकृति, स्त्री० सं० अहंकार.

अहंचत्वंच, स्त्री० सं० अरे तुरे.

अहंग

अहंग, पु० गाण्यांत एक राग आहे.

अहंता, स्त्री० सं० अहंपणा.

अहदं तहद, अ० (हीहद्द. तीहद्द) या हद्दीपासून त्या हद्दीपर्यंत, उ० हा गांव अहद तहद दोन कोस रुंद आहे, अवधिभूतपदार्थांचा मध्यें योग होऊन व्यस्तही प्र० होतो, उ० अहद पुणें तहद काशी सारखा पाऊस पडला, अहद दर्या तहद सूर्या.

अहंपणा, पु० (अहं सं० पणा प्रा०) अहंकार.

अहंभाव, पु० (अहंभाव सं०) अहंकार.

अहर्गण, पु० दिवसांचा समुदाय, इष्टकालींचे ग्रहादिकांचें गणित वर्तवायासाठीं विवक्षित अवधीपासून गत दिवसांचा गणितांत जो समुदाय तद्विषयीं प्रा० प्र०

अहर्निश, अ० सं० रात्रंदिवस.

अहर्निशीं, अ० अहर्निश याचा अपभ्रंश.

अहळींव, न० औषधी एक बीज आहे.

अहा, अहाहा, अ० आनंद खेद यांचा उद्गार आहे; उ० अहा वारा येतांच बरें वाटलें. याचा रोजगार निघाला अहा वाईट गोष्ट झाली.

अहाटणें, शिजलेली डाळ इ० पळी इ० कानें घाटणें.

अहि, पु० सं० सर्प.

अहित, वि० न० सं० हिताचा प्रतिपक्षी, शत्रुरूप कि० हानिरूप.

अहिरण, स्त्री० ऐरण.

अहिरा, पु० नेत्रामध्यें एक रोग होत असतो तो.

तो; २, त्या रोगाचा निरास जेणें करून होतो असा एक मणि आहे

अहिरी, स्त्री० कों० लग्न मुंजीत बहुल्याचे भोंवतीं उतरंडी रचायाकरितां रंगीत मडक्यांचा आणितात जो समुदाय ती.

अहिंसा, स्त्री० हिंसेचा जो अभाव ती.

अही, स्त्री० सूक्ष्म जी अग्निज्वालेची शिरवा ती.

अहीर, पु० (आभीर सं०) गवळी परंतु बहुधा: हिंदुस्थानीं गवळ्यांवर प्र०

अहेनवमी, स्त्री० (अहेव. नवमी) अविधवानवमी.

अहेर, पु० आपले सोयरे धायरे, इष्ट मित्र, यांचे घरीं मंगलादि झालें असतां त्यांस देतात जीं शेला पागोटें, इ० वस्त्रें तो, किं० त्याचें समर्पण तो.

अहेरा, पु० दे० अहिरा.

अहेराऊ, अहेरी, ३लिं० (अहेर) अहेर करण्याचे उपयोगीं सणजे दिसण्यांत मात्र चांगलें परंतु घडोती ल्यारय नव्हे असें जें शेला, पागोटें, इ० वस्त्र तें.

अहेव, स्त्री० अविधवेचा अपभ्रंश.

अहो, अ० मोठ्या गोरवानें संबोधन यायाचें असतां याचा प्र०; २, आश्चर्याचा उद्गार; कोणेक शब्दापुढें याचा योग झाला असतां प्रा० अकाराचा लोप होतो; उ० कायहो; कांहो.

अहोजाहो, सणणें, बोलणें, इ० कांचा योगीं प्र० अ० (अहो, जा, अहो.) कोणेकास अनेक वचनानीं संबोधून बोलणें; उ० कोणी थोर आला असतां त्यास अहोजाहो सणावें

अहोरात्र, पु० न० सं० सूर्योदयापासून पुनः सूर्योदयपर्यंत जो काल तो तें; २, अ० अहर्निश.

अह्यव, अह्यो, स्त्री० अविधवेचा अपभ्रंश.

अह्यवनवमी, अह्योनवमी, स्त्री० (अह्यव, अह्योनवमी) अविधवानवमी.

अळंकरण, न० अलंकरण.

अळंकार, पु० अलंकार.

अळंकारणें, अलंकारणें.

अळंकारी, अळंकारीक. ३लिं० अलंकारी.

अळकुडी, स्त्री० (अळूं, कुडें.) अळवाचा लहान जो कांदा ती किं० कांद्यास जी लांबट मुळी फुटत्ये ती.

अळकुवा, ३लिं० रा० सर्वदुःखादि विसरून लंपट होऊन रहावें असें प्रेम जावें जा विषयाचर असतें तो त्या विषयीं.

अळंकृत, ३लिं० अलंकृत.

अळग, अ० अलग.

अळगत, अ० अलगत.

अळंगेंविळंगें, न० रा० अळेपिळें तीं.

अळण, न० चण्यांचें पीठ पाण्यांत शिजवून मसाला घालून कोरडेशास पदार्थ करितात तें.

अळणट, ३लिं० (अळणी) किंचित जो अळणी तो.

अळणी, ३लिं० (अलवण, सं०) रुचिकारक क्षारजा पदार्थांत नाहीं तो; २, ला० जामध्यें रुच्यता

रुच्यता तेजस्विता तारदा नाहीं असा जो मनुष्य, भाषण, पठन, इ० तो.

अळता, पु० (अलक्तक, सं०) लाखेचा चूर्णांत पाणीं, लिंकणखार, इ० घालून जो लाल रंग करितात तो.

अळंबें, अळंभें, न० कों० पर्जन्यादि समयीं भूमींतून छत्राकार एक पदार्थ उत्पन्न होतो तें.

अळमटळम, न० स्त्री० मन घालून झटून काम करायाचें तें न करितां आलस्य उपेक्षा, इ० कारणांनीं जी चुकवाचुकव तें ती; उ० यांणें कामाची अळमटळम मांडली; २, होईलच असा निश्चय नव्हतां कोणेक गोष्टीची जी संदिग्धता दिसत्ये तें ती; उ० त्यांचें येण्याचें अळमटळम दिसतें.

अळमळीत, वि० मळमळीत जें भाषण तें.

अळवडी, स्त्री० (अळूं, वडी०) अळवाचे पानास पीठ लावून जी वडी खायासाठीं करितात ती.

अळवीण, स्त्री० (अळूं) एक झाड आहे.

अळशी, वि० आळशी.

अळस, पु० आळस.

अळा, पु० कांहीं पदार्थ कांहीं पदार्थांशीं संबंध केला तसाच राहावा म्हणून भोंवताला बांधितात जो बांध तो; २, ल० कोणेक व्यवहारास व्यवस्थानियमरूप जो असतो बंध त्यास ल०.

अळिता, पु० अळता.

अळी, स्त्री० (अलि, सं०) धान्य, इ० कांत बारीक तंत्वाकार जो क्षुद्रजीव उत्पन्न होतो ती; २, रंगांकांचा रेषानीं जेव्हां लेखन करायाचें तेव्हां जा जास्थानीं रेषा दियेत नाहीं त्यास्थानीं स्थानज्ञापकजी ८ अशी खूण करितात ती; २, कों० वृक्षाचे मुळीं पाणीं सांचायाकरितां जी भोंवती रचळी करितात ती; ३, आळी.

अळीकर, वि० आळीकर.

अळू, पु० एक वन्यफल आहे; २, अळवीण.

अळूं, न० जाचे कंद देंठी, पान, यांचा भाजा होतात अशी एक वनस्पति आहे: अळवाचरचें पाणीं ल० केवळ अशाश्वत, क्षणभंगुर, लक्ष्मी, देह, इ० त्यास ल०.

अळें, न० (आलबाल, सं०) वृक्ष, वल्ली, इ० कांचे मुळीं किं० चिरखल करायाकरितां मांती, इ० कांचे दिगांत घातलेलें पाणीं राहायाकरितां खणून किं० बांध घालून जें स्थल करितात तें; २, भोंपळा, पडवळ, कारलें, इ० कांचीं बीजें जास्थलीं रुजत घालतात तें स्थल किं० तीं उगवलीं जीं बीजें तें; ३, भोंगीं, मिरचा, इ० कांचें एकेक रचळीं त लाविलेलें जें रोप तें; ४, अळी द्वितीयार्थी; ५, कों० शेतांतील चिखल सारखा करायाचें एक काष्ठाचें आऊत आहे जाला दंताकार अवयव मारिले असतात तें.

अळेपिळे, पु० अंग अनेक प्रकारें वांकडें तिकडें करून देतात जे अंगपिळे तें.

अक्ष, पु० सं० सोंगट्या, इ० खेळायाचा जो फांसा तो; अक्षक्रीडा, अक्षकुशल, इ० स०; २, रथ, गाडी, इ० कांचीं दोन चाकें मिळून मध्यें एक दंड असतो तो.

अक्षत, पु० स्त्री० सं० देवता पुजादिकर्मार्थ किं०

अभिमंत्रित करावयासाठीं घेतात जे तांदूळ ते; २, लग्न, मुंजीचें समयीं जास आमंत्रण करितात त्याचे कपाळीं लाविताततें कि० हातीं देतात जे तांदूळ ते; ३, त्या आमंत्रण समारंभासही ल०; ४, प्रसंगविशेषीं साधारण तांदळास ल०; उ० आज घरांत एक अक्षत नाहीं भात कशाचा करावा; ५, कपाळीं लावलेल्या गंधामध्यें दुसरे रंगाचे गंधाची लाविताततो रेषा निघाली ती कि० तदर्थ केलें जें रक्तचंदनादिकांचें गंध ती; ६, वि० जाची इच्छा नाशादिरूप कि० छेदभेदादिरूप क्षति झाली नाहीं तो; चुलीस अक्षत लावणें, देणें, ल० घरचे सर्व मंडळीस भोजनास सांगणें.

अक्षतमरिष्ट, अ० सं० मध्यें कोठेंही तंटा, बखेडा, विघ्न, इ० न होतां अव्याहतपणें इत्यादि चालविण्याचें वि०; उ० आमची हल्लि पांचशें वर्षे अक्षत मरिष्ट चालत आली आहे.

अक्षता, स्त्री० (अक्षत, सं०) अक्षत पंचमार्थी.

अक्षतृतीया, स्त्री० अक्षय्यतृतीयेचा अपभ्रंश.

अक्षय, वि० सं० जाचा क्षय होत नाहीं तो; २, शाश्वत; उ० आमचें राहणें या गांवांत अक्षय असतें तर घरही बांधलें असतें.

अक्षयभाता, अक्षयीभाता, पु० (अक्षय, भाता) जांतून बाण, शक्ति, इ० शस्त्रें किंतीही काढिलीं तरी सरूं नयेत असाजो देवताप्रसादानें कोणा वीरास भाता मिळाला असतो तो.

अक्षयी, वि० (अक्षय, सं०) अक्षय.

अक्षय्य, वि० सं० क्षय करावयास जो अशक्य तो.

अक्षय्यतृतीया, स्त्री० सं० वैशाखशुक्ल तृतीया.

अक्षर, न० सं० एकानेक व्यंजनसहित किं० केवल जो क, क, अ, इ० स्वर तें; २, ला० वेदशास्त्रादिरूप जी विद्या तीस प्रसंगविशेषीं ल०; उ० अक्षर नाहीं, चातुर्य नाहीं, मग प्रतिष्ठा कशानें होईल; ३, वि० जाचा क्षय करून कोणीं अंश न्यून होत नाहीं तो.

अक्षरओळख, स्त्री० (अक्षर, सं० ओळख, प्रा०) अ, क, प्र, इ० लिहिलेलीं अक्षरें ओळखावयास यावींइतकेंजें ज्ञान ती.

अक्षरवटिका, स्त्री० उच्चारणानें अक्षरांची अभिव्यक्ति करण्याचाजो प्रकार ती.

अक्षरशः, अ० सं० विवक्षित अक्षरसमुदायांतून एकही व्यक्ति न वगळतां; उ० या कूटश्लोकाचा अर्थ अक्षरशः मला लागत नाहीं.

अक्षरशत्रु, पु० सं० निरक्षरजो पुरुष त्यास ल०

अक्षरारंभ, पु० सं० मुलास प्रथमतः शुभमुहूर्तानें पाटीवर घालण्याचाजो संस्कार करितात तो.

अक्षरी, वि० (अक्षर) वार, नक्षत्र, इ० कांचे ज्ञापक अंक न घालितां त्यांचीं आद्याक्षरें घालून केलेंजें पंचांग, इ० तो.

अक्षि, न० सं० डोळा.

अक्षोट, अक्षोड, न० सं० अक्रोड.

अक्षोभ, वि० (अक्षोभ्य, सं०) अगाधजें जल तो.

अक्षोभ्य, वि० सं० दुसऱ्यानें क्षुब्ध करावयास शक्य नव्हे असाजो शांतस्वभाव, अगाधजल, इ० तो.

अक्षौहिणी, स्त्री० सं० गज २१८७० रथ २१८७०

अब्द ६५६१० पदाति १०९२५० एतत्परिमित जें सैन्य तीं; २. एकावर एकवीस बद्ध्यें हिलीं असतां जी संख्या होत्ये ती.

अक्ष्वण, न० दे० लग्न, मुंज, इ० शुभकार्यांत कर्त्यासजो दिवे ओंवाळायाचा संस्कार करितात तें.

अज्ञ, वि० सं० मूर्ख.

अज्ञात, वि० सं० जाणलेला नव्हे तो.

अज्ञातयौवना, स्त्री० सं० कामोत्पत्तिद्वारा आपल्या अंगीं तारुण्य आलें असा अनुभव जिला नाहीं अशा अवस्थेंतील जी नायिका ती.

अज्ञातवास, पु० सं० आपण अमुक स्थलीं राहतों असें दुसऱ्यास न समजेसा गुप्तपणें जो वास तो.

अज्ञान, न० सं० ज्ञानशक्तीचा अभाव तें; उ० पाषाणादि जडपदार्थीं अज्ञान राहतें; २, भ्रमात्मक अयथार्थ जें ज्ञान तें; उ० मी कर्ता, मी लोकांचें चालवितों, इ० अज्ञानामुळें जीव मानितात वस्तुतः पाहिलें असतां ईश्वर कर्ता, चालविता, ३, तत्कारणीभूत अधिष्ठानाचें तत्त्वरूपेंकरून जें अभान तें; उ० सर्पविषयक भ्रमाचें रज्जुविषयक अज्ञान कारण; ४, विवक्षित ज्ञेयविषय ज्ञानाचा जो अभाव तें; उ० आत्मा जें पाहिलें नाहीं, ऐकिलें नाहीं, तद्विषयक अज्ञान आम्हांस आहेच; ५, वि० अज्ञ; ६, ज्याचा लेंकुरपणा जाऊन भेदपणा आला नाहीं तो.

अज्ञानी, वि० सं० ज्ञानी नव्हे तो.

आ, पु० आकारादि अक्षर उच्चारते समयीं किंकांहीं खातेसमयीं मुखाचा प्रसृतजो आकार होतो तो; उ० तूं आकर स्व० मी तोंडांत पाणी ओतितों; अ० हा संस्कृत उपसर्ग आहे, हा ज्या ज्या पदामागें लागला असतां तोंपर्यंत त्या पासून समंताभागीं असा अर्थ होतो; उ० आजन्मांत मी खोटें बोललों नाहीं, आमरण याचें सारखें व्रत चाललें; २, खबुतरें, मोरें, इ० पक्ष्यांस बलावण्याचा शब्द आहे.

आं, अ० कोणेकानें कांहीं सांगितलेली गोष्ट चांगली श्रुत झाली नसतां पुनः बोल असें म्हणावें तत्स्थानीं हें उच्चारितात.

आइकणें, (आकर्णन, सं०) श्रोत्रेंद्रियानें शब्दरूपविषय ग्रहण करणें; २, दुसऱ्यानें कांहीं एक गोष्ट सांगितलेली मान्य करणें.

आइकभट्टी, स्त्री० (आइकणें, भट्टी.) कांहीं एक विशेषविषयीं गुरुमुखापासून शिक्षण घेतां नी विद्या येण्याविषयीं साधनभूत होतो जो आइकण्याचा अभ्यास त्यास म्ह०

आइकींव, वि० (आइकणें) लेखपत्रादिकांहीं साधन नसतां केवळ जनमुखापासून आइकून च समजलेलें जें कांहीं एक तो; २, आइकण्यानेंच प्राप्त होत्ये जी गानादि विद्या तो.

आइता, अ० (अयत्नतः, सं०) आपण तत्सिद्ध्यर्थ यत्न न करितां सिद्धरूपानें असणें, मिळणें, होणें, इ० कार्यें वि०; उ० हा रागिना मी करिवला नाहीं मला आइता मिळाला; मी अंब्याचे झाडाखालीं गेलों तों आइता अंबा पुढें पडला.

आइती, स्त्री० कों० आइतें.

आइतें, न० (आइता) स्वयंपाक, इ०-यवहारांत सिद्ध केलेलें जें साहित्य तें; उ० स्वयंपाकाचें आइतें त्या चुलीपासून आणून या चुलीपाशीं ठेव.

आइतोजी, पु० (आइता) पूर्वी स्वदपदीचे वेळेस न येतां फलोपभोगसमयीं मात्र येतोजो त्यास ह्म०

आइतोळा, २लिं० (आइता) पाटाचे स्त्रीचें पूर्व भर्त्यापासून झालेलेंजें अपत्य तें दुसऱ्या भर्त्यास.

आई, स्त्री० (अंबा, सं०) जीचे पोटीं जो जन्मला ती त्याची; २, जगदंबा; देवतांचे नामापुढें याचा प्रयोग होतो, उ० विठाई, जाखाई, काळकाई, इ०

आईन, पु० एक वन्यवृक्ष आहे.

आईबाई, स्त्री० (आई, बाई,) परकीय असून आईसारखें आपलें बरें करणारीजी कोणी स्त्री तिला ह्म०; ह्म० देईयेईती आईबाई आणि नदेईती मसणांतजाई.

आईस, स्त्री० कों० आई.

आउक्ष, न० आयुष्याचा अपभ्रंश.

आउक्षवंत, २लिं० आयुष्मान्.

आऊ, स्त्री० (आई) अब्बाजी.

आऊट, २लिं० ओट.

आऊटकें, न० ओटकें.

आऊत, न० (आयुध, सं०) शेतसंबंधी नांगर, कुळव, पाभार, इ० बैलानीं फिरवावयाचीं जीं साधनें तीं प्र०; २, सोनार, कांसार, लोहार, साळी, कुंभार, इ० कांचीं स्वस्वव्यापार करावयाचीं शस्त्रादिरूपजीं साधनें असतात तीं प्र०; २, रा० सूप, डोपली, रोवळी, इ० जीं महारानीं केलेलीं वंशपात्रें तीं प्र०;

२, कों० पु० न० भंडाऱ्याचे माडाची पोथी कापण्याचें एक शस्त्र आहे.

आँक, पु० (अंक, सं०) अंक प्रथमार्थी.

आकंठमर्याद, अ० सं० खालचें सर्व व्यापून कंठापर्यंत येईअसें भोजन करणें जल, संकट, इ० कांत निमग्न होणें, इ० कांचे वि०; यदुत्तरतेतें होण्याचा अवधि राहत नाहीं

आँकडा, पु० (अंक, सं०) अंकडा.

आँकडी, स्त्री० (अंक, सं०) अंकडी; २, कों० कोयता, विळा, इ० अडकवायासाठीं शेत भात करणारे लोकांचे कंबरेस लाकडाचें दुबेळकें बांधिलेंअसतें तीं.

आँकणी, स्त्री० (आंकणें) विवक्षितानुरूप रेघ सरळ यावी ह्मणून गोल किं० चौरस काष्ठादिकांचें साधन केलें असतें तीं; २, विवक्षित कोष्ठकादि पडे असा अंकण्याचाजो व्यापार तो.

आँकणें, (अंकन, सं०) अंकणें.

आँकपट्टी, स्त्री० (आंक, पट्टी.) आंखपट्टी.

आकर, पु० सं० जा स्थलींजो रत्नादिपदार्थ प्राप्तुर्थेंकरून होत असतो तें स्थल त्या पदार्थांचा; उ० समुद्रहा मोत्यांचा आकर; गुणाकर, दयाकर, रत्नाकर, इ० स०

आँकरी, स्त्री० रा० (अंकुर, सं०) वृक्षाची केवळ कोंवळी जी कोंवरी ती.

आकर्ण, अ० सं० कर्णपर्यंत; उ० धनुष्य आकर्ण ओढून बाण सोडिला; कर्णप्रांत पर्यंत लांबजें नेत्र तें आकर्ण नेत्र, तद्विशिष्ट जो पुरुष तोही, तसेंच आकर्णनयन, आकर्णलोचन, इ० स०

आकर्णणें, ग्रं० ८ आकर्णन, सं०) आइकणें प्रथमार्थी.

आकर्णन, न० सं० श्रोत्रेंद्रियानें शब्दरूपविषयाचें जें ग्रहण तें.

आकर्णित, ३लिं० सं० आकर्णिला तो.

आकर्षक, ३लिं० सं० आकर्षण करणारा तो.

आकर्षण, न० सं० कोणेक वस्तु विवक्षित स्थलापासून वेग परवश करून आपलेकडे आणण्याचा जो व्यापार तें; २, तेणेंकरून त्या वस्तूचें आकर्षकाकडे होतें जें आगमन तें; ३, प्रसृतपणें स्थित पदार्थाची आकुंचितपणें जी स्थिति तें.

आकर्षणें, ८ आकर्षण, सं०) आकर्षित करणें.

आकर्षित, ३लिं० सं० आकर्षण केलें जाचें तो.

आकलन, न० सं० बुद्धिसामर्थ्य किं० शारीरादि सामर्थ्यांचे व्यापकतेनें त्याचें त्यांचे जे शास्त्रराज्यादिविषय त्यांतें व्याप्यकोटींत आणण्याचा जो व्यापार तें; २, त्यापासून होतें जें फल तें

आकलित, ३लिं० सं० आकलन केलें जाचें तो.

आकल्प, अ० सं० ब्रह्मदेवाचे दिवसाचे समाप्तिपर्यंत; उ० आकल्प आयुष्य व्हावेंत यांकुळां माझियामकळां हरिचादासां.

आकस, पु० ☞ अकस.

आकस्मिक, ३लिं० सं० अकस्मात् उत्पन्न झाला, आला, मिळाला, इ० तो.

आकळणें, ८ आकलन, सं०) दोर इ० कानें कांहींपदार्थ इतस्ततः नहोईं असा बांधून नियमित करणें.

आका, स्त्री० ८ अक्का, सं०) स्त्रियांस प्रतिष्ठानाम आहे वडील बहीण इ० कांस ल्ला०.

आकांत, पु० उपद्रवकारक जे उष्ण, शीत, ईति दुष्काल इ० तत्कर्तृक उपद्रवांचा जो अतिशय तो; २, त्याणे होतो जो दुःखातिशय तो आणि तत्संबंधी होतो जो ओरडा भारडा तो.

आकांतणें, ग्रं० आकांत द्वितीयार्थानें युक्त होणें.

आकाबाई, स्त्री० अक्काबाई.

आकाबाईचाफेरा, पु० अक्काबाईचा फेरा.

आकार, पु० सं० अभिव्यक्तपदार्थाचा आसमंतात् स्थित जा समाप्तिमर्यादा त्यांतें अनुलक्षून तत्तत्पदार्थांचें ज्ञान होण्यास कारणीभूत जो तत्तत्पदार्थनिष्ठ धर्मविशेष तो: वर्तुलता, दीर्घता, चतुरस्रता, स्थूलता, सूक्ष्मता, इ० जाचे अवांतर भेद अनेक असतात; २, अंतःकरणांत विषयीकृत अर्थांचें जें प्रतिबिंबवत् रूप उमटतें तो: ३. ज्ञान, वाक्य, इ० कांची जी आनुपूर्वी तो; उ० घटातें मी जाणतों हा घट विषयक ज्ञानाचा आकार; ४, भय, हर्ष, शोक, खेद, काम, क्रोध, इ० कांचे ज्ञापक जे शरीरावर सकंपता, हास्यवदनता, इ० भाव होतात ते प्र०; ५, कांहीं एक कार्याची सामग्री सिद्धतादिरूप ईषन्मात्र आरंभ झाल्यामुळें हें कार्य याया प्रकारें एवढें होणार अशाप्रकारें तत्तत्कार्यस्वरूपाची ज्ञापक जी छाया पडत्ये तो; ६, अनेक अंकराशी एकत्र केल्यानें किं० करण असतीलत्यांचा वियोग केल्यानें जमा खर्च इ० व्यवहाराचें निर्णीत होतें जें विशिष्ट स्वरूप तो: ७, कांहींएक परोक्षपदार्थाचें ज्ञापक जें चिन्ह कांहीं एकदिसतें तो; उ० या व्यवहारांत शंभर रुपये मिळतील

मिळतील असा आकार दिसतो; कोणेक कार्य आकारास येणें स्र० आतां हें सिद्ध होईल असें वाटायाजोगे अवस्थेस येणें, स्र० आकारे रंगने चेष्टा; मंडला सारखा आकार जाचा तो मंडलाकार, शूर्पाकार, चंद्राकार, इ० स०.

आकारण, न० सं० आव्हान.

आकारणें, क्रि० आकारण, आकार, सं० १ कोणेकास आकारण युक्त करणें; २, जमाखर्च इ० हिशेब आकार विशिष्ट करणें.

आकारशुद्ध, वि० जाचा आकार सुशोभित असेंजें भांडें, गृह, इ० तो.

आकालिक, वि० सं० अकालीन.

आकाश, पु० न० सं० पृथिवी, उदक, तेज, वायु, याचोहोंस सोडून राहिली जी अवशिष्ट पोकळी तो जास पंचमहाभूतांत प्रथम गणितात; २, भूमीपासून स्व मध्याकडील जो प्रदेश तो; आकाशांत जो जाणारा तो आकाशगामी, आकाशचारी, इ० स०; घटावच्छिन्न जो आकाश तो घटाकाश, मठाकाश, इ० स०.

आकाशदिवा, आकाशदीप, पु० ८ आकाश, सं० दिवा, प्रा० १ उच्चस्तंब पुरून त्यावर किं० उच्चवृक्ष इ० कांवर प्रा० कार्तिकमासीं भिंग, कागद, इ० कांचा करंडक करून त्यांत लाविलात जो दिवा तो; २, त्या करंडासहीं स्र०.

आकाशपथ, पु० सं० देव, पक्षी, इ० कांचा गमन करण्याचा आकाशरूप जो मार्ग तो.

आकाशपाणी, न० ८ आकाश, सं० पाणी, प्रा० १ नाडी, माडी, इ० मद्यास स्र०.

आकाश

आकाशभाषण, न० सं० नाटकामध्यें कोणेक पात्र आकाशाकडे पाहून कोणेकास हाक मारून कांहीं एक प्रश्न करितें त्याचें उत्तर त्याणें केलें आपण आइकिलें असा अभिनय करून काय असें असें स्र० तोस असा अनुवाद करितें एतद्रूपजें भाषण तें.

आकाशमार्ग, पु० सं० आकाशपंथ.

आकाशयान, न० सं० आकाशमार्गें चालणारें जें विमानादि वाहन तें.

आकाशवाणी, स्त्री० सं० कोणेकास कांहीं एक अर्थाचा ज्ञापक ईश्वरेछेनें आकाशांत मनुष्यबोलल्यासारखा जो शब्द होतो ती.

आकाशवेल, स्त्री० ८ आकाश, सं० वेल, प्रा० १ इक्षावर एकवल्ली उत्पन्न होत्ये जिला मूळ असत नाहीं ती.

आकांक्षा, स्त्री० सं० अपेक्षा; २, कांक्षा.

आकांक्षापूरण, न० सं० कोणेक अर्थाविषयीं साकांक्ष झालें जें वाक्य त्याचें त्या अर्थाचे प्रयोगानें जें पूरण तें; उ० जो एथें आहे या वाक्याचें तो; याचा प्रयोगावांचून आकांक्षा पूरण होणार नाहीं.

आकांक्षित, वि० सं० जाविषयीं आकांक्षा साली आहे तो.

आकुंचन, न० सं० प्रसृतपणे स्थित जो पदार्थ त्याची स्वल्पावकाशांत स्थिति व्हावयाजोगा त्याचे अवयवांचा जवळजवळ होतो जो सन्निवेश तें किं० तादृश संनिवेश करण्याचा जो व्यापार तें.

आकुंचित, वि० सं० आकुंचन पावलेला तो.

आकुल

आकुल, आकुळ, वि॰ ८आकुल, सं०) हर्ष, शोक, भय, क्रोध, मद, इ॰कानीं जो व्याप्त स॰केवल तत्परवश जो झाला तो; हर्षादि सन्निधानींच प्र॰ हर्षाकुल, भयाकुल, इ॰स॰.

आंकूर, पु॰ अंकुराचा अपभ्रंश.

आकृति, स्त्री॰ सं॰ आकार, परंतु प्रथमार्थी प्र॰.

आकृष्ट, वि॰ सं॰ आकर्षिला तो.

आंकोल, न॰ चिंचेचे फळाचें पोकळ टरफल तें; २, स्त्री॰कों॰ अंकोल.

आक्रंदणें, ८आक्रंदन, सं०) आक्रंदन करणें.

आक्रंदन, न॰ सं॰ शोक, भय, इ॰कारणानें रडारड भारडा ओरडा होतो तें.

आक्रम, पु॰सं॰पराक्रम.

आक्रमण, न॰सं॰ स्वस्वरूपानें किं॰स्वशक्त्यादि द्वारा विवक्षित संबंधानें कोणेक अर्थाचें जें व्यापन.

आक्रमणें, ८आक्रमण.सं०) आक्रांत करणें.

आक्रसणें, आकुंचन पावणे.

आक्रांत, वि॰सं॰ क्षुधा इ॰कानीं आक्रमण झालें जाचें तो; प्र॰स॰उ॰ चिंताक्रांत, तृषाक्रांत, इ॰.

आक्रोश, पु॰सं॰ आक्रंदन; २, निंदा.

आक्सा बोक्शी, अ॰ अक्सा बोक्शी.

आंख, पु॰ ८अंक, सं०) अंकप्रथमार्थी; २, डोळा, आणि कान, याचे मध्यें जें मर्मस्थल आहे तो; ३, ८अक्ष तृतीयार्थी; ४, सर्कीरांतून अमुकास दोनशें आंख पोंहचतात इ॰स्थलीं तितक्या आंखाचें कापड पावतें असा अर्थ.

आंखटणें, वस्त्रादिक धसास लागून फाटणें.

आंखडणें, आंखडणें, ८आंखूड,) लांब प्रसृत जो दोर, वस्त्र, इ॰तो आटोपून आंखूड करणें; २, आंखटणें; ३, पाऊस कांहीं काल उभणें; गाय, म्हैस, इ॰ आंखडणें स्व॰ त्याचा गळ्यांतील लांब दोर आटोपून खांब इ॰कांचा केवळ जवळ बांधणें.

आंखणी, स्त्री॰ आंकणी.

आंखणें, आंकणें.

आखंदुळणें, ८आंदोलन, सं०) पात्रस्थित धान्यादिकांस पाकादिसंस्कार सारखा व्हावा स्व॰ पात्रास उचलून आंचके देऊन खालचें वर वरचें खाली होई असें करणें.

आंखपट्टी, स्त्री॰ ८आंख, पट्टी,) कापड, इ॰कांची किमत किं॰कांहीं एक पदार्थाचें वजन इ॰कांचे पक्के किं॰कच्चे आंखाची यादि लिहिली असते ती.

आखर, पु॰दे॰ गोठण.

आंखा, पु॰को॰ खंभ, इ॰दोराचें जाळें करून त्याचें पोत्यासारिखे नारळ इ॰ठेवावयास पात्र करितात तो.

आखाड, पु॰आषाढाचा अपभ्रंश.

आखाडपागोळी, स्त्री॰ ८आखाड, पागोळी,) आषाढमासीं घरावर पर्जन्य पडला असतां गळतात जापावळ्या ती; उ॰ वधूनें प्रथमवर्षी श्वशुरगृहींची आखाडपागोळी पाहिली असतां सासूस वाईट.

आखाडपौंडी, स्त्री॰ आषाढपांडी.

आखाडभूती, पु॰स्त्री॰ आषाढभूती.

आरवाडसासरा, पु०कों० ८आरवाड,सासरा,)स्त्रियांस कोणी पुरुषानें दबावणीची किं०उपदेशाची गोष्ट सांगितलेली त्यांचे मनास न आली असतां त्यास त्या निंदेनें ह्म०; उ० मोठा मेला आरवाड सासरा उपदेश करायास आला आहे.

आरवाडसासू, स्त्री० ८आरवाड.सासू.) आरवाडसासऱ्यासारखी जी स्त्री तीस ह्म०.

आरवाडा, पु० अङ्गाहितीयार्थी;२, मल्लांचा जो तालिमखाना;३, ३लिं० आषाढ संबंधी जो आदित्यवार सोमवार इ०तो.

आरवाडी, स्त्री० ८आरवाड,) आषाढी.

औरवी, स्त्री०कों० आंबेडं०उतरून काढायासाठीं जोडेला करितात तो.

आरवु, पु०सं०उंदीर.

आरवुकर्णी, स्त्री०सं० एक वनस्पति आहे जिचें पान उंदराचे कानासारिखें आहे.

आरवुडणें, औरवुडणें, ८औरवुड,) आंरवडणें प्रथमार्थी.

औरवुडवण, न०कों० वहाटाची माळ लांब झाली असतां तिचा कांहीं भाग दुमडून जो बांधून ठेवितात तें.

आरवुडवत, न०रा०८आंरवुड,प्रा०,पत्र,सं०)केळ चवई यास कोंक्याचे अगोदर जे लहान सें पान येतें तें.

आरवुपुष्पी, स्त्री०सं०एक वनस्पति आहे.

आरवूड, औरवूड, ३लिं०८आकुंचन,सं०)विवक्षित लांबीहून जाची लांबी कमी तो.

औरवें, न० गोणी,कंगाळ,पडशी, इ० ओझ्यांचे जे दोन दोन भाग ते प्र०;२, तेल,तूप,इ०कानीं भरलेला जो कातडयाचा बुधला तें.

औरवोऔरव, अ०८औरव,हि०) कापडावरजो किमतीचा आंरव लिहिला असतो त्यास अधिकउणें नकरितां तें कापड विकणें,देणें,घेणें,इ० कार्चे वि०

आरव्या, स्त्री० सं० विद्यापराक्रमादिसद्गुणांकरून किं०चौर्यादिदुर्गुणांकरून कोणेकाची जी प्रसिद्धि झाली असत्ये ती;२, जो अर्थाचें वाचक जें नाम तो त्याची.

आरव्यात, न०सं०क्रियापद.

आरव्यान, न०सं० राजादि-चरित्ररूप जें कथानक तें

आरव्यायिका, स्त्री०सं० वस्तुतः ती गोष्ट वर्तली नसतां कवीने आपल्या बुद्धीनें च कल्पून केलें असतें जें काव्य तो;२, ऐतिह्याग कोणी ह्म०.

आग, स्त्री० अग्निशब्दाचा अपभ्रंश;३, ज्वर कोधइ०कानें होतो जो शरीराचा अतिसंताप तो; कोणेकाचे घरावर आग पाखडणें किं०आग देवणें ह्म० सकीरांत कोहीं अपराधांची चव्हाडी किं० गुप्तदोषाचें प्रकटन इ०करून त्याचा सर्वस्व नाश होई असें करणें; आग लावणें ह्म० कोणेकाशीं कोणेकाचा कज्जा,युद्ध,इ० होई असें करणें.

आंग, न०कों० अंग शब्दाचा अपभ्रंश; परंतु तृतीयार्थी प्रा०प्र० नाहीं; अंगशब्दावरील सारे संप्रदाय एथेंही जाणावे.

आंगकाढू, आंगकाढया, ३लिं० अंगकाढू.

औंगगडी, पु० ८ अंग,गडी,) सोंगटी इ० कांचें खेळांत गडयाचा तोटा असतां आपणच त्याचे बारचेंही खेळावें अशा संकेतानें आपल्या अंगीं कल्पितात गडी तो.

औंगचपळाई, स्त्री० अंगचपळाई.

औंगचा, ३लिं० अंगचा.

औंगचुकाऊ, औंगचुकार, औंगचुकारू. ३लिं० अंगचुकार.

औंगचें, न० ८ अंग,) देवीस्मरणून शरीरांतून जो स्फोटरूपेंकरून रोग बाहेर पडतो तें.

औंगचोर, ३लिं० अंगचोर.

औंगजड, ३लिं० ८ अंग,जड,) स्फटसुटीत नव्हे असें फोपसें जड अंगजाचें तो.

औंगजोर, पु० अंगजोर.

आगटी, स्त्री० **आगटें**, न० ८ आग,) शेकायासाठीं भूमीवर किं० कांहीं पात्रांत जो अग्नि पेटविलात तो तें; २, सोनाराची जी बागेसरी.

औंगठा, पु० अंगठा.

औंगठी, स्त्री० अंगठी.

औंगठेदाम, पु० ८ आंगठा,दाम,) विवाहांत वधूची बहीण वधूचा आंगठा दाबून धरिते तो सोडवायासाठीं वरानें तीस द्रव्यादि द्यावें लागतें असा मान आहे तो.

औंगठोळा, पु० अंगठोळा.

औंगठ्याचामान, पु० आंगठेदाम.

औंगडी, स्त्री० कों० अंगडी.

औंगडें, न० अंगडी.

औंगण, औंगणें, न० अंगणाचा अपभ्रंश.

आगत, ३लिं० सं० आला तो.

आगतस्वागत, न० सं० आपल्याकडे आलेला जो पाहुणा इ० त्याचा अभ्युत्थान, कुशलप्रश्न, इ० कानीं जो सत्कार तें.

आगती, स्त्री० कों० ८ आगत,) वरानें न मागतां आपण होऊन वरा-घरीं विवाहार्थ समारंभाने येते जी कन्या ती त्या समारंभसुद्धां.

आगंतुक, पु० सं० विवाहादिसमारंभांत आमंत्रणावांचून भोजनदक्षणा इत्याद्यर्थ येतो जो कोणी ब्राह्मण तो; २, गांव्या गावांत राहून लोकांचे घरीं भोजनसमयीं हारीं बसून भोजन मागावें अशा रीतीनें राहाणारा जो ब्राह्मणादिक तो; ३, कोणेकस्थळीं वतन नसतां उपरीपणें जो राहिला तो; ४, शाश्वत नव्हे कादाचित्क जें सुख, दुःख, लाभ, इ० त्यास सं०; उ० स्वरूपानंद मात्र शाश्वत इतर विषयसंबंधानें होतात जे आनंद ते आगंतुक होत.

आगंतुकी, स्त्री० ८ आगंतुक,) आगंतुकपणा.

औंगधटाई, स्त्री० अंगधटाई.

आगधाड, स्त्री० ८ आग, धाड,) गृहादि दहन करणारा जो अग्नि तद्रूप जी धाड ती; २, लो० लुटून खाऊन एरव्या याचा सर्वस्व नाश करण्याचा स्वभाव जाचा असा हाडमनुष्य, गुरूं इ० त्यास सं०

आंगधुणें, न० अंगधुणें.

आगप, अ० ८ आगें,हिं०) आगाव; २, ३लिं० हडबें जें धान्यादिक तो.

आगपाई, स्त्री० कों० ८ आगप,) आगपपणा.

आंगपिळा, पु० अंगपिळा.

आगचेपण, स्त्री० ८आग,पेण,) शरीरावयवावर स्फोट उत्पन्न होऊन आग व्हावी असा एक रोग आहे ती.

औंगबळ, न० अंगबळ.

आगम, पु० सं० धर्मशास्त्रादि जें शास्त्र तो; २, हत्यादिकांची प्रतिग्रहादिद्वारा आपल्यास झाली जी प्राप्ति तो; ३, कोणेक व्यवहाराचे प्रवृत्तीची जी आद्यावस्था तो; ४, आगमन क्रियेची देशविशेषावेगायीं होते जी प्राप्ति तो.

आगमन, न० सं० दूरस्थित मनुष्यादिकानें गतिद्वारा स्वसन्निकृष्ट होण्याचा जो व्यापार तें.

आगमनिर्गम, पु० ८आगम,निर्गम,) कोणेक कार्याची आद्यावस्था आणि परिणामावस्था तो किं० आद्यावस्थेपासून परिणामावस्थेपर्यंत जा सर्व दशा तो; उ० तुमचे व्यवहाराचा सर्व आगमनिर्गम मला ठाऊक आहे.

औंगमर्दाई, **औंगमर्दी**, स्त्री० अंगमर्दी.

औंगमस्ती, स्त्री० अंगमस्ती.

औंगमेहनत, स्त्री० अंगमेहनत.

औंगमेहनती, **औंगमेहनत्या**, ३लिं० आंगमेहनत करण्याचा स्वभाव जाचा तो.

औंगमोडा, पु० अंगमोडा.

आगर, पु० न० ८आकर,सं०) नारळ,सुपारी, केळ,इ० पदार्थ उत्पन्न होण्याचें किं० मीठ पिकवायाचें जें क्षेत्र तो तें; २, जो जो पदार्थ जा अधिकरणी विपुल उत्पन्न होत असतो तें अधिकरण त्याचें असें स्व०.

औंगर, न० कों० गुरें इ० कानीं नजाता मनुष्यानीं मात्र ओलंडून आवें यावें सणून कुंपण इ० कांस राखलें जें द्वार तेथें किं० गोशादिकांचा गर्दी गाताडीवर देवायासाठीं पुरितात जें दुबेळक्याचें लांकूड तें; २, रा० कुंपण करायासाठीं एरंड इ० कांचे जे खुंट पुरितात ते प्र०.

औंगररखा, पु० अंगररखा.

आगरगौंव, पु० न० ८आगर,गौंव,) पोफळ इ० कांचे आगरानीं विशिष्ट जो गांव तो.

औंगरस, पु० अंगरस.

औंगरारख्या, ३लिं० अंगरारख्या.

आगरी, पु० ८आगर,) शूद्रांत एक जाति आहे; २, ३लिं० आगरांत उत्पन्न होणारे नारळ,सुपारी,इ० पदार्थ तो.

आगरीमिरीं, न० ८आगर,मिरें,) काळे मिऱ्यांत एक जाति आहे.

आगरूं, न० ८आग,प्रा०,रुक्,सं०) अशक्ततादि कारणामुळें गुदद्वारानें जो मांस गोलक बाहेर पडतो तें.

औंगरेंटाई, स्त्री० अंगरेंटाई.

औंगरोग, पु० अंगरोग.

औंगलट, स्त्री० अंगलट.

आगला, ३लिं० विवक्षिताचे पुढचा तो.

आगलाव्या, ३लिं० ८आग,लावणें,) परस्परांमध्यें विरोध पाडून कज्जा लावण्याचा स्वभाव जाचा तो.

औंगवठा, पु० अंगवठा.

औंगवस्त्र, न० अंगवस्त्र.

आगवळ, पु० ८अग्र,सं० वळणें,प्रा०) वेणीचा अग्रांची

अर्थांची गांठ घट्ट यावी म्हणून गंगावन इ० कांचा जो दोर तेथें लाविताततो.

आँगवळण, न० अंगवळण.

आँगवळा, पु० अंगवळा.

आगशी, स्त्री० रा० ८आग, मा० शिरवा, सं०) अही.

आगस, अ० ३लिं० आगप.

आगसणें, ८आगस,)जाकाळीं जें व्हावयाचें. पिकावयाचें, यावयाचें इ० तें त्या काळाहून अगोदर च होणें, पिकणें, येणें. इ०; स्र० आगसली ती मागसली आणि मागाहून आली ती गरभार झाली.

आँगस्फटका, स्त्री० अंगस्फटका.

आँगसूट, ३लिं० आंगानें जो सटसटीत मनुष्यादि तो.

आगळ, स्त्री०पु० ८अर्गला, सं०) अडसर; २, कों० स्त्री० गोट्या, विटीदांडू, इ० खेळावयाकरितां जी भुईवर खळी लहानशी खणितात ती.

आगळडाव, पु० ८आगळ, डाव,) गोट्या, कवड्या इ० आगळेंत टाकून जो डाव खेळतात तो.

आगळा, ३लिं० अधिक चतुर्थार्थी वांचून; पैसा आहे आगळा जामध्यें तो पैशा आगळा रुपया, दिवसा आगळा टांका आगळा इ० स०.

आँगळी, स्त्री० अंगुलि शब्दाचा अपभ्रंश.

आगळीक, स्त्री० ८आगळा,) अपराध ज्यायोगें मर्यादेचा अतिक्रमक रुन जें वर्त्तन ती.

आगाऊ, अ० आगाव.

आँगागवडी, अ० रा० आंगोगडी.

आगांतुकी, स्त्री० आगंतुकीचा अपभ्रंश.

आगांतूक, पु० आगंतुकाचा अपभ्रंश.

आगापिछा, पु० ८आगा, पिछा, हिं०) आंगरखा इ० पदार्थांचा किं० कोणेक गोष्टीचा पुढला आणि मागला जो विभाग तो.

आगाबानी, स्त्री० अगाबानी.

आगामी, ३लिं० सं० भविष्यकाली वेणारा जो वर्षादिकालविभाग किं० मनुष्य, सुख, दुःख, इ० तो.

आंगारा, पु० अंगारा.

आगाव, अ० व्यवहारकर्मांचे किं० कर्तृकर्मांचे अनुरोधानें कोणेक कर्मांचा होणें, करणें, इ० कांचा जो समय तदपेक्षया पूर्वसमयीं; उ० आगाव रुपये दिले असतां सस्तें मिळेल, ऐनेवेळेस दिलें तर महाग पडेल, यंदा आगाव पाऊस पडला म्हणून पेरे आगाव झाले.

आँगावरचा, ३लिं० अंगावरचा.

आगाशी, स्त्री० अटाली.

आगिवळा, पु० ८आग,) मद्यमांसादिस्पर्शइ० कानीं अपवित्र झालेलें जें भांडादिक तें पवित्र व्हावें म्हणून त्यास अग्नीचा जो ताव देतात तो; २, अही.

आँगी, स्त्री० ८आंग,) अंगडें.

आगीदुगीत, अ० ८असणें) (या धातूचे योगीं प्र०; कोणकाचें बरें होऊ किं० वाईट होऊ असें जें दोन पक्ष त्यांतून अन्यतर पक्षांत ही; निषेधविषयीं प्र०.

आगीमण्यार, स्त्री० ८आग, मण्यार,) मण्यार म्हणून सर्प आहे त्यांत एक भेद आहे.

आँगूळ, न० अंगुलाचा अपभ्रंश.

आगैंमागैं, अ० ८ आगैं,मागैं,) विवक्षितदेशकालादिरूप अवधीचे कांहीं पुढें, किं०कांहीं मागें; उ० मागाल तेव्हांच रुपये देईल असें प्रमाण नाहीं परंतु आगैंमागैं देईल बुडविणार नाहीं; या पत्रावर तो श्लोक नाहीं कोढें आगैंमागैं असेल.

आगैरूं, न० आगरूं.

औंगोगडी, अ०कों० ८ औंग,गडी,) प्रतिव्यक्तीकरितां निराळा अन्वय होई असें,देणें,सांगणें, इ०कांचें वि०; प्रा० मनुष्यहस्ति; उ० एकजण कोणतेंकाम सांगा औंगोगडी सांगूं लागलां तर म्या काय करावें; सगळे गांवकऱ्यास शंभररुपये बक्षीस एकापाशीं दिले औंगोगंडी दिले नाहींत.

औंगोघडी, औंगोघड्या, अ०कों० औंगोगडी;२, पुनःपुनः वारंवार.

आगोट,आगोड, स्त्री० अगोट.

आगोतली, स्त्री० ८ अग्र,) केळ,चवई,यांचें पानाचा अग्रभागींचा जो तुकडा भोजनार्थ कादितात तो.

आगोती, स्त्री० आगोतली;२, दांडाळवत.

आगोदर, आगोधर, अ० अगोदर.

आगोदरचा, आगोधरचा, वि० अगोदरचा.

आगोदरील, आगोधरील, वि० अगोदरील.

औंगोस्तर, न० अंगवस्त्राचा अपभ्रंश.

औंगोळी, स्त्री० आंगळी.

आग्नेय, वि०सं० अग्नि आहे देवता जाची असा मंत्र,आहुती,इ० किं० अग्निसंबंधी तेज इ० तो;

२,स्त्री० आग्नेयी.

आग्नेयी, स्त्री०सं० पूर्व आणि दक्षिण यांचे मधली दिशा ती.

आग्या, पु० ८ आग,) एक वनस्पति आहे जाचा आंगास स्पर्श झाला असतां आग होत्ये तो;२, वि०सं० एकाचजातीचे अनेक सर्प रोगमाशी इ० पदार्थ असतात त्यामध्यें जाचे योगानें आंगाची आग होत्ये तो; उ० त्याला आग्या उपदेश झाला आहे;३,स्वभावानें जलद,तापट,जो मनुष्यादिकत्यास ह्न०.

आग्यावेताळ, पु० आग्यावेताळ.

आग्यैंमोहोळ, न० ८ आग,मोहोळ,) आज्ञामात्रेंजें मोहोळ तें.

आग्रह, पु०सं० करावें,जावें, इ०रूपेंकरून मनांत आलीजी गोष्ट ती तडीस नेण्याविषयीं करीनचकरीन इ०रूप अंतःकरणानें धरिला जो भाव तो;२,दुसऱ्यास प्रवृत्त किंवा निवृत्त करण्याविषयीं प्रार्थनेचा जो अतिशय तो.

आग्रही, वि०सं० आग्रह धरण्याचा स्वभावजाचा तो.

आघ, स्त्री०कों० आग.

आघटी, स्त्री० **आघटें**, न० आगटी.

आघवा, वि०ग्रं० अघवा.

आघाडा, पु० एकझाड आहे.

आघाडी, स्त्री० ८ अग्रे,सं०१ आगैं,हिं०२) कोणेक पदार्थाचा पुढील जो भाग किं० प्रदेश ती; उ० गलीमानें लष्करची आघाडी मारली; तो माझे आघाडीस चालत होता;२, घोड्याचें पु-

ट्चे पायांस किं० गळ्यास बांधायाची जी दोरी ती.

आघात, पु० सं० कोणेक पदार्थाचा कोणेक पदार्थीं वेगानें शब्द होई असा जो संबंध होतो तो.

आघारी, स्त्री० (आघार,सं०) शूद्रलोक श्राद्धदिवशीं पितृद्देशानें जो तुपाचा होम करितात ती.

आघिवळा, पु० आगिवळा.

आघिवळी, स्त्री० कों० (आघ,प्रा० आवली,सं० १वळ प्रा० २) अही.

आघीमण्यार, स्त्री० आगीमण्यार.

आघीमाशी, स्त्री० (आघ, माशी,) मधुमक्षिकांत एक भेद आहे.

आँघोळ, स्त्री० कों० (आंग, होळणें,) जलस्नान.

आघ्या, पु० ३लिं० कों० आग्या.

आघ्यावेताळ, पु० (आघ्या, वेताळ,) एकपिशाच आहे; २, ला० अतितापट साहसी जो मनुष्यादि त्यास स्न०

आघ्यॅमोहोळ, न० आग्येंमोहळ.

आग्रव, पु० आग्रहाचा अप०

आघ्राण, न० स० नासिकेनें गंधग्रहणाचा जो व्यापार तें.

आघ्रात, ३लिं० सं० आघ्राण केलें जाचें तो गंध किं० तद्विशिष्ट पुष्पादि तो.

आँच, स्त्री० अही; २, पाकरसायनादि कराया साठीं तत्तद्द्रव्यास करितात जो अग्निसंस्कार ती; ३, ला० कोणेक व्यवहार जसा ह्यावा तसा न झाला असतां माझें अनिष्ट होईल अशी जी मनांत चिंता असल्ये ती, जीचा योगानें त्या त्या व्यवहारीं सावधपणें जपत असतो; ४, एकवार झालेल्या भयाची निरंतर स्फूर्ति व्हावया जोगा जो अंतःकरणानें संस्कार धरिला असतो ती; ५, चिरकालसंस्कार रहाया जोगा कोणेक व्यवहाराचे दुष्टपरिणामाचा अनिष्ट फल संबंध झाला असतो तो, जेणेंकरून तादृश व्यवहारीं पुनः एकाएकीं प्रवृत्ति होत नाहीं प्रा० बस० प्र०

आँचकणें, (आंचका,) कोणेक पदार्थ आंचक्यानें युक्त करणें; २, ला० कोणेकापासून इष्टादिक त्यास येतों असें पूर्वी न कळों देतां प्रलोभनादि युक्तिप्रयुक्तीनें एकाएकीं काढून घेणें.

आँचका, पु० कोणेक पदार्थास ओढणें लोटणें हालविणें इ० कारणानीं अकस्मात वेगसंबंध झाल्यामुळें चलन विशेषोत्पत्तिरूप जो त्या पदार्थावर संस्कार होतो तो.

आचंद्रार्क, अ० हे चंद्र सूर्य आहेत तों काळपर्यंत स्न० कल्पांतपर्यंत.

आचंबा, पु० अचंबा.

आचमन, न० सं० शरीरशुद्ध्यार्थ तळहातावरउदक येऊन प्राशन करितात तें.

आचमनीय, न० सं० आचमनार्थ जें उदक तें.

आचरण, न० सं० कांहींएक कर्म आचरण्याचा व्यापार तें; २, आचार.

आचरणीय, ३लिं० सं० आचराव्यास योग्य जें कर्म

र्म तें.

आचरणें, कोणेक कर्म तत्तदनुकूल व्यापारद्वारा संपादणें याचे अकर्मकहि प्र० होतात.

आचरित, ३लिं० सं० आचरलेला जो धर्म इ० तो; २, न० आचरण.

आँचवण, न० (आचमन, सं०) प्रथमार्थक आंचवण्याचा व्यापार तें.

आँचवणें, भोजन करून उठला जो त्यास हस्त मुखप्रक्षालन विशिष्ट करणें; २, (आ, च्यवन, सं०) मुकणें.

आँचळ, पु० (अंचल, सं०) गोमहिष्यादि पशुस्त्रियांचा स्तन तो.

आँचळी, स्त्री० (अंचल, सं०) वस्त्राचे शेवटास विणल्यावांचून जीं सूत्रांचीं शेवटें राहिलीं असतात तीं.

आचार, पु० शास्त्रोक्त जे विधिनिषेध तत्परिपालनपूर्वक जें वर्तन किं० वर्तनप्रकार तो; २, मनुष्यादिकांचें व्यावहारिक कर्मांचेठायीं वर्तन किं० वर्तनप्रकार तो, विध्युक्त आचार न केल्यामुळें जो भ्रष्ट तो आचारभ्रष्ट, आचारसंपन्न, आचारहीन, इ० स० देशानुरोधेंकरून चालत आला जो आचार तो देशाचार, कुलाचार, इष्टाचार, शिष्टाचार, इ० स०

आचारभ्रष्ट, ३लिं० सं० सोवळें ओवळें इ० संबंधीजास आचार नाहीं तो.

आचारविचार, पु० सं० शास्त्रोक्त स्नानसंध्यादि आचार, आणि कर्तव्याकर्तव्य विचार तो, उ० शहरांत राहिलें असतां तादृश आचारविचार रहात नाहीं.

आचारशुद्ध, ३लिं० सं० जा कर्मास जसेंजसें आचरण पाहिजे तसें तसें झाल्यामुळें अव्यंगजें कर्म तो, केवळ सलगीचा मनुष्याबरोबरजरी देवघेव करणें झालें तरी स्नान पंचकरून करावें, कांकीं कोणताही व्यवहार आचारशुद्ध असावा; २, स्नानसंध्यादिविध्युक्त आचारानें संपन्नजो मनुष्य तो.

आचारी, पु० दुसऱ्याचे घरीं स्वयंपाक करून जो उपजीवन करितो तो, प्रा० ब्राह्मणवृत्ति.

आचार्य, पु० यजमानानें आपले अंगत्वें होमादि कर्म कराया करितां जो वरिला असतो तो; २, वेदादिविद्या सांगणारा जो गुरु तो; ३, जा शास्त्राचा किं० जा धर्माचा जो प्रवर्तक तो त्याचा; ४, विद्वान् प्रतिष्ठित जो पुरुष त्याचे नामापुढें हें प्रतिष्ठानाम लागतें, उ० राघवाचार्य, रामाचार्य, कट्टाचार्य, इ०

आँचूळ, पु० आंचळ.

आचोंद्रा, ३लिं० कों० जाचे डोळे सदां दुरवरेपासुळें जास मंद दिसतें अतएव जाची मुद्रा बावळी दिसती असा जो पुरुष इ० तो.

आच्छन्न, ३लिं० सं० वस्त्रादिकेंकरून झांकला गेला तो.

आच्छादक, ३लिं० सं० आच्छादणारा तो.

आच्छादणें, आच्छादित करणें.

आच्छादन, न० सं० कांहीं एक पदार्थावर वस्त्रादिक घालून वाहेरून नदिसे असें करण्याचा जो व्यापार तें, किं० तेणेंकरून होतोजो त्यापदार्थावर

दार्थावर अंतर्हितपणा तें; २, तत्साधनीभूत जें वस्त्रादिक तें.

आच्छादित, वि॰ सं॰ आच्छादन केलें आहे जाचें तो.

आज, अ॰ (अद्य, सं॰) वर्तमान दिवशीं, आज उद्यां करणें इ॰ स्थलीं कोणेक कर्तव्य कार्य लांबणीवर टाकणें, आजचा काळ क्षणजे सांप्रत काळ.

आजकाल, अ॰ सांप्रत काळीं, उ॰ दीन गरीब याचा समाचार घेणारा आजकाल कोण आहे बाबा, ही गोष्ट आजकालची नव्हे इ॰ स्थलीं विवक्षानुरूप फार दिवसांची मागली असा अर्थ.

आजकाळीं, अ॰ (आज, काळ,) आजचे काळीं.

आजन्म, अ॰ सं॰ जन्मापासून, याच अर्थीं आजन्मपर्यंत, आजन्मप्रभृति, आजन्मांत, इ॰ कोणी स्म॰

आजला, अ॰ (आज) विवक्षित अवधीपासून आजपर्यंत जो काल तितक्या कालानें, उ॰ मी मुंज झाल्यापासून जर शास्त्र पढतों तर आजला पंडित झालों असतों.

आजवळ, न॰ रा॰ आजोळ.

आजा, पु॰ (आर्य, सं॰) मातामह आणि पितामह ते प्र॰

आजागुरु, पु॰ (आजा, गुरु) आपले गुरूचा जो गुरु तो.

आजानुबाहु, वि॰ सं॰ उभा राहिला असतां सहज गुडघ्यास पुरावा जोगे लांब जाचे हात असा जो पुरुष इ॰ तो.

आजाबा, पु॰ आजोबा.

आजार, पु॰ ज्वरादिक जे दुरवणें तें.

आजारी, वि॰ (आजार,) दुरवणाईत.

आँजिणी, स्त्री॰ रांजणवाडी.

आजी, स्त्री॰ (आजा) आजाची जी बायको ती,

आजीबाई, स्त्री॰ (आजी, बाई,) आजी कि॰ इतरजी कोणी वृद्ध स्त्री तिला या नामानें व्यवहार करितात.

आजुनी, अ॰ आजून.

आजून, अ॰ अजून.

आजूळ, न॰ आजोळ.

आजूबाजू, स्त्री॰ (बाजू, हि॰) कांहीं एक पदार्थाचा जो आसपासचा प्रदेश ती, परंतु प्रा॰ प्रथमांत प्र॰ नाहीं, उ॰ वेल शेतांत नसला तर तेथेंच आजूबाजूस कोठें असेल पहा.

आजेगुरु, पु॰ आजागुरु.

आजेचीर, आजेवाण, न॰ (आजी, चीर, वाण,) लग्नामध्यें मुलीचे मातामहीस वराकडील यजमान मानार्थ जें लुगडें देतो तें.

आजेसासरा, पु॰ (आजा, सासरा,) सासऱ्याचा आणि सासवेचा जो बाप तो.

आजेसासू, स्त्री॰ (आजी, सासू,) आपले सासऱ्याची कि॰ सासूची जी आई ती.

आजोबा, पु॰ (आजा, बा,) आजा कि॰ तत्सदृश जो वृद्ध कोणी पुरुष त्यास या नामानें व्यवहार करितात.

आजोळ, न॰ (आजा, प्रा॰ आलय, सं॰) मातामहा-

महाचें जें घर तें.

आजोळवंश, पु० कों० माता महाचा जो वंश तो.

आज्य, न० सं० तूप.

आज्ञून, ज० अज्ञून.

आट, पु० (आटणें) अटापिटा, स्त्री० अट; २, धारगे मृदु व्हावे म्हणून कण्या उकडून त्यांत पीठ घालून सिद्ध करितात जें धारग्यांचें पीठ तीं.

आटंका, पु० आटोंका.

आटंकाळ, पु० (आटणें, काळ) धान्य पाणी यांचा जो दुष्काळ पडतो तो.

आटणी, स्त्री० अटणी.

आटणें, अटणें.

आटप, पु० कों० आटोप.

आटपणें, पसरलेला सवेग गतिमान जो पदार्थ कि० व्यवहार तो उपसंहृत करणें, उ० वारा पुटचा आला शीड लवकर आटप, यंदां त्याणें आपली सावकारी आटपली; २, कोणेक व्यवहार निर्वाह करण्याविषयीं अंगीकृत करणें उ० तूं संसार आटपशील तर मी यात्रेस जाईन; ३, कोणेक विषय स्वसत्ताक्रांत करणें, उ० बापाची संपत्ती वडील भावानें आटपली धाकट्यानें रोजगार आटपला; ४, कांहीं एक व्यवहार करून समाप्त करणें, उ० स्नान संध्या आटपून लवकर पटायास ये; ५, विवक्षित स्थलादिक गतिद्वारा स्वसंबद्ध करणें, उ० तूं पुढें गेलास तरी मी धांवत येऊन तुला आटपीन; ६, कोणेकास आपले शक्तीनें व्याप्य कोटींत आणणें, उ० मी या घोडयास आटपीत होतों परंतु हा आटपत नाहीं; ७, कोणेक पदार्थ कि० मनुष्यादि खर्च, मरण इ० कारणानें नाहींसा होणें, उ० या तळ्यांतलें पाणीं आटपलें तेव्हां पक्षी देखील गेले, तो गृहस्थ पटकीनें हालोहाल आटपला फार थाईट झालें.

आटपता, वि० विशेष प्रसृत नव्हे जितक्यास तितका नेमस्त असा जो संसारव्यवहार, शरीर, वस्त्र, इ० पदार्थ तो, कोणेक व्यवहार आटपता धरणें कि० येणें स० विशेष विस्तार विलंब न होतां थोडक्यांत लवकर होई अशारीतीनें करणें.

आटपसार, वि० आटपता.

आटपाआटप, स्त्री० (आटपणें, द्वि०) अनेक प्रकारचा पसारा आटपण्याचा जो व्यापारतो, उ० येथील बिऱ्हाडाची आटपा आटप होण्यास दोन दिवस तरी लागतील.

आटवल, पु० कों० (आटवणें) पाणी पुष्कळ ठेऊन आंत थोडयाशा कण्या कि० तांदूळ घालून पातळ सरबरीत जो भात करित असतात तो.

आटवली, स्त्री० आटवल.

आटवलें, न० आटवल.

आटा, पु० छत्री इरलें यांचा जो सांगाडा तो; २, कांबीट वेल इ० गुंडाळून करितात जो वलयाकार तो; ३, कों० कांहीं एका पदार्थाभोंवतां बंधनार्थ सूत्र, दोरी इ० कांचा घालितात

तात जो वेढा तो.

आटाआट, पु० स्त्री० (आटणें, हिं०) अटापिटा.

आटांका, पु० आटोंका.

आटाघाट, स्त्री० पु० (आटणें, घाटणें) आटाआट.

आटापाणी, न० (बंदकरणें किं० होणें) (आटा, हिं० पाणी प्रा०) तगादेदारानें द्रव्यादि उगवावें म्हणून शपथ, इ० कानें कुळाचें जेवण खाण बंद करणें.

आटापिटा, पु० (आटणें, पिटणें) आटाआट.

आटापिटी, स्त्री० आटापिटा.

आटापीट, स्त्री० आटापिटा.

आटापेट, स्त्री० आटापिटा.

आटीक, स्त्री० एक झाड आहे; २, न० तिचें फळ.

आटीबाज, ३लिं० (आट) अटदार.

आटींव, ३लिं० अटींव.

आटोंका, पु० पदार्थांची ईयत्तादिकांचें आकलन करण्याविषयीं साधनभूतजी बुद्धीची शक्ति तो; उ० हें काम माझा आटोंक्यांत एकदा आलें म्हणजे करीन; २, कांहीं एक लक्षणावरून विवक्षित पदार्थामध्यें अमुक अमुकगुण प्रा० असावे अशीजी योग्यताविषयक सं. भावना अंतःकरणांत असत्ये तो, प्रथमांत म० प्रा० निषेधविषयीं; उ० यापाशीं लाख रुपये आहेत असा आटोंका होतनाहीं

आटोकाट, ३लिं० जहांबाज; २, अ० तमाम.

आटोप, पु० उपसंहार; २, कोणेक व्यवहारादिक व्यवस्थादिकानें आटोपून धरण्याविषयीं अंगीं असत्ये जी शक्ति तो; उ० एवढा कारभार झेंपायास याचे अंगीं आटोप नाहीं; ३, अनावार जें मूल, गुरूं, स्खळ, इ० त्याचें जें तत्तदुपायानीं आवरण तो, उ० गुरें शेतांत येतात तर आपल्ये शेताचा आटोप करा, आमचे गुरांचा आटोप आम्हास परिछिन्न होत नाहीं.

आटोपणें, आटपणें.

आटोपता, ३लिं० आटपता.

आटोपशुद्ध, ३लिं० नीटनेटका नेमस्तदिसाया जोगा आटोपसार जो गृहादि पदार्थ तो.

आटोपसार, ३लिं० आटपसार.

आटोपी, ३लिं० कोणेक व्यवहार करण्याविषयीं जाचे अंगीं चांगला आटोप असतो तो.

आट्यापाट्या, स्त्री० एकपोरांचा खेळ आहे त्या.

आठ, ३लिं० (अष्ट. सं०) संख्या आहे.

आठका, ३लिं० (आठ) खंडी इ० मापाचे अवांतर जे मण इ० अवयव ते आठ असावे अशा संकेतानें जें देशविशेषीं चालतें माप तो, उ० सुरती खंडी आठकी; २, आठजणांनी वाहिला जातो असा जो दगड, तुळई, इ० तो.

आठकी, स्त्री० रा० आठ मनुष्यादिकांचा जो समुदाय ती परंतु तुळई इ० संबंधीओझें उचलायाचें असतांच विशेष प्र० आठकीचा म्ह० आठकीनें वाहिला जातो जो दगड इ० तो; २, खड्यांचे खेळामध्यें एक डाव लागत असतो ती.

आठल,

आठल, स्त्री० रा० (अष्टि, सं०) अठळी.

आठव, पु० (आठवणें) स्मरण.

आठवगाँठ, स्त्री० कोणेक गोष्टीचा विसर न पडावा म्हणून उपवस्त्रादिकास जी गांठ मारून ठेवितात ती.

आठवडा, पु० (आठ) आठ दिवसांचा किं० सात दिवसांचा जो समुदाय म्ह० महिन्याचा चतुर्थांशरूप जो काल तो.

आठवडेपाईक, पु० (आठवडा, पाईक) कोणेक कामावर पराकाष्ठा आठ दिवस टिकणारा असा जो चाकर इ० त्यास म्ह०

आठवण, स्त्री० (आठवणें) आठव.

आठवणूक, स्त्री० (आठवणें) दूरस्थित किं० मृत जो इष्ट मनुष्यादिक त्याची आपल्यास आठवण व्हावयास साधनभूत जो तत्संबंधी वस्त्रादि पदार्थ आपल्यापाशीं असतो ती; २, त्याचे योगानें होतें जें त्या इष्ट मनुष्यादिकांचें स्मरण ती.

आठवणें, कोणेक विषय आठवणेंत आणणें.

आँठळी, स्त्री० कों० (अष्टि, सं०) फणसाचा गरा बोर खजूर जांभूळ इ० कांतील जी बी ती.

आठवा, वि० (आठ) क्रमानें मोजिलें असतां आठ या संख्येचा जो विषय तो; २, पु० अठवें.

आठांगुळें, न० (आठ, मंगळ,) अष्टमांगल्य.

आँठी, स्त्री० आंठळी; २, अंठी.

आठोफळी, स्त्री० अष्टफळी.

आँड, पु० (अंड, सं०) वृषण.

आड,

आड, पु० जाला खालीं उतरायाला पायऱ्या केल्या नाहींत असा जो खणून केलेला बांधीव जलाशय तो; २, अ० विवक्षित पदार्थास विवक्षित पदार्थाचें अंतर्धान घडे अशा प्रकारें मध्यें कोणेकानें रहाणेंअसणें होणें इ० वि० उ० मेघ आड आला म्हणजे चंद्र दिसत नाहीं; ३, कोणेक पदार्थाचे अडोशानें युक्त प्रदेश जो त्याचा ठायीं; उ० डोंगराचे आड सूर्य गेला; ४, अड द्वितीया अर्थी; उ० आडं घोडा इ०; ५, स्त्री० अट तटी० चतु०; ६, रा० दोहोंडोंगराचे मध्यें पाण्याचे सोईनें युक्त लहानसा गांव वसाया जोगें जें स्थळ असतें ती.

आडई, स्त्री० कों० (आडवा) आडय.

आडउंड, अ० (आड, द्वि०) कोणेक पदार्थाचे अडोशाचे प्रदेशीं किं० आसपास.

आडकणी, स्त्री० अडकणी.

आडकथा, स्त्री० अडकथा.

आडकळणें, अडकळणें.

आडका, पु० अडका.

आडकाठी, स्त्री० अडकाठी.

आडकाम, न० अडकाम.

आडकामी, वि० अडकामी.

आँडकुली, स्त्री० अंडकुली.

आँडकूल, न० पु० अंडकुली.

आडकूस, स्त्री० (आड, कूस) अडबाजू.

आडरखप्या, पु० (आड, रखप्या) मोलमजुरी करून पोट भरणारा बारा पंधरा वर्षांचे वयाचा जो मुलगा तो.

आडरवर्ष,

आडरवर्च, पु० अडरवर्च.

आडरवाणें, न० (आड, रवाणें) जेवणाचे पदार्थांहून इतर मेवा मिठाई इ० रूपजें भक्ष्य खातात तें.

आडरवाद, स्त्री० (आड, रवाद) आडरवाणें.

आडरवळणें, आडरवुळणें, अडरवुळणें.

आडरवोल, न० कों० अडरवोल.

आँडगडी, पु० अंडगडी.

आडगल्ली, स्त्री० अडगल्ली.

आडगाँव, पु० अडगांव.

आडगूण, पु० रा० (आड, गूण) घरचे मनुष्यास दुरवणें. गुरांस गोंचीड इ० उपद्रवास कारणभूत जो पिशाच संबंध तो.

आडजात, स्त्री० (आड, जात) ब्राह्मण क्षत्रिय आदि चार जातींहून इतर जी तेली तांबोळी महार इ० जात ती; २, ३लिं० हाड जो मनुष्यत्यास म्ह०

आडणा, पु० कों० (अडणें) अडसर.

आडणी, स्त्री० अडणी.

आडदाँड, ३लिं० अडदांड.

आडदाळ, स्त्री० कों० अडदाळ.

आडदिवस, पु० (आड, दिवस) विवक्षित कर्मविषयीं संकेतित कि० नियमित असतात वर्षांतील कि० महिन्यांतील जे दिवस त्याहून इतर जो दिवस तो.

आडदीस, पु० (आड, दीस) आडदिवस.

आँडधरणी, स्त्री० (आंड, धरणें) कोणेकापासून विवक्षित स्वकार्य करून घेण्याकरितां निकृष्ट सेवा करून जें आर्जव करावें लागतें त्यास म्ह०

आडधोतर, न० अडधोतर.

आडनळ, पु० कों० रहाटाचे कोंळब्यास आश्रयार्थ जें लांकूड लाविलें असतें तो; २, क० दरवाजा खिडकी इ० काचे कपाटास प्रतिबंधार्थ जो फिरता लोखंडाचा गोल तुकडा बसविला असतो तो.

आडनाड, ३लिं० अडनीड.

आडनाव, न० अडनाव.

आडनीट, आडनीड, आडनेड, ३लिं० अडनीड.

आँडपंचा, पु० अंडपंचा.

आडपडदा, पु० (आड, पडदा) विवक्षितस्थलीं अडोसा खावयास जो वस्त्रइ० कांचापडदा बांधितात तो; २, ला० लज्जा भय इ० कारणामुळें भाषणादिव्यापारीं स्पष्ट उघडें न दिसाया जोगी पर्यायांतरें करून तो व्यापार करून राखितातजी मर्यादा तो; उ० बडिलां देखत तपकील ओढणें झालें तर एकीकडे तोंड करून ओढावें इतकातरी आडपडदा असावा.

आडपन्हळी, स्त्री० कों० (आड, पन्हळी) रहाटाचे कोंळब्यांतील पाणी सांडायास जो खालीं पन्हळ लाविला असतो ती.

आडपेंठ, स्त्री० अडपेंठ.

आडफाँटा, पु० अडफांटा.

आडबंदर, न० (आड, बंदर) जेथें फार व्यवहार होत नाहीं असें जें लहान बंदर तें; २, जेथें गलबत

लवत लागायाची सोय नाहीं असा जो समुद्राचे किं० खाडीचे कांठचा प्रदेश तें.

आडंबर, न० मोठें कार्य यापासून उत्पन्न होईल अशी संभावना व्हाया जोगा ततत्कार्य सामग्रीचा जो मोटा आव तें.

आडबंक, आडबाँक, ३लिं० अडबंक.

आडबाजू, स्त्री० अडबाजू.

आडबाप्पा, पु० अडबाप्पा.

आडबायको, स्त्री० अडबायको.

आँडमळणी, स्त्री० अंडमळणी.

आडमाप, न० अडमाप.

आडमार्ग, पु० अडमार्ग.

आडमुठ्या, ३लिं० अडमुठ्या.

आडमूठ, स्त्री० (आड+मूठ) रा० डोंगरपट खंडकळजी भूमि जेथें नागर फिरत नाहीं तेथें नाचणी, इ० धान्य, मुठीनें पेरण्याचा प्रकार आहे.

आडय, आडव, स्त्री० कों० (आडवा) पासल.

आडरान, न० अडरान.

आडवण, न० डोंगराचा पाणलोट आणि पायथ्याचा मधला आडवा जो सर्व प्रदेश तें.

आडवत, न० कों० कांकडीचा कीस तांदळाचे पिठांत घालून शिजवून एक भक्ष्य पदार्थ करितात तें.

आडवळण, न० अडवळण.

आडवळणी, ३लिं० अडवळणी.

आडवा, ३लिं० अडवा.

आडवाट, स्त्री० अडवाट.

आडवातिडवा, ३लिं० अडवातिडवा.

आडवेसुडक्याची बायको, आडवेसुडक्याची रांड, रा० स्त्रीत्व मूलक जें दुर्बलत्व तें वर्णनीय असतां स्त्रीयांस ल०; उ० तूं लहान झालास तरी पुरुष आणि मी मोठी झाल्येंतरी आडवेसुडक्याची बायको माझे ह्मणून काय दरबारांत बोलवेल.

आडवेळ, स्त्री० अडवेळ.

आडव्याजिभेचा, ३लिं० अडव्याजिभेचा.

आडसंधि, स्त्री० अडसंधि.

आडसर, पु० अडसर; २, कों० केवळ कोवळा नव्हे केवळ जून नव्हे जो नारळ तो.

आडसांठा, पु० (आड+सांठा) नित्यशः उपयोगी पडायाचे पदार्थांचा जो संग्रह त्याहून इतरत्र कांहीं पदार्थांचा जो संग्रह असतो तो.

आडसोंग, न० (आड+सोंग) दशावतारादि खेळामध्यें रामकृष्णादि मुख्य सोंगाहून इतरजीं चोबदार, भालदार, इ० सोगें तीं प्र०.

आडहतेर, आडहत्यार, न० अडहत्यार.

आडहतेरी, आडहत्यारी, ३लिं० अडहत्यारी.

आडा, पु० रा० (अडणें) गृह, किल्ला, बाग, इ० काचे भोंवताला कंळकी, निवडुंग, इ० वृक्ष लावून जो परिघ केला असतो तो.

आडाँरव, पु० अडारव.

आडाणचोट, पु० अडाणचोट.

आडाणा, पु० गायनांत एक राग आहे.

आडाणी, ३लिं० अडाणी.

आडाणीजात, स्त्री० अर्वाचीनजात.

आडात, पु० दरवाजा, पेटी, इ० कांचे फळ्यासजीं आडवीं लांकडें मारलीं असतात तीं प्र०, बसायाचे पाटाचे जे पाय ते प्र०.

आडावा, पु॰ अडावा.

आडिंबा, पु॰ अडसर.

आडी, स्त्री॰ गहाटाचेरड्यांवर जीं प्रा॰ बारा लांकडें व सविनात तीं प्र॰; २, अडचीं; ३, अडी.

आडील, २ लिं॰ (आड) आडप्रदेशीं जो स्थित तो.

आँडील, २ लिं॰ अंडील.

आँडुकली, स्त्री॰ अंडुकली.

आडून, अ॰ (आड) आडजो प्रदेश तेथून; २, कोणेकाशीं साक्षात्संबंध न करितां मध्यस्थादि द्वारा बोलणें, शिव्यादेणें, इ॰ कांहीं वि॰; आडून गोळी मारणें ल॰ कोणेक कार्याचा आपण पुढार न घेतां किं॰ आपलें आंग न दाखवितां पुढें असेल त्यास सूचनादिरूप साहित्य करून परस्परतें काम करावियें.

आडे, स्त्री॰ को॰ आडय.

आडें, न॰ अदें; २, अडथळकरकत.

आँडोर, आँडोल, पु॰ शंखिणी डंखिणी मुलास ल॰.

आडोसा, पु॰ अडोसा.

आढक, पु॰ सं॰ द्रोण ल॰ जेंधान्यादि मान त्याचा जो चतुर्थांश तो.

आढळ, पु॰ अढळद्वितीयार्थी.

आढळणें, अढळणें.

आढा, पु॰ अढा.

आढाँवविहीर, स्त्री॰ को॰ पुढणघटभूमींत बांधल्या बांधून जी विहीर केली असते ती.

आढी, स्त्री॰ कों॰ अदी द्वितीय॰ तृतीय॰ षष्ठ॰ स समचार्थी.

आढी

आढीरखोर, २ लिं॰ कों॰ कोणेकाविषयीं मनांत आढीधरण्याचा स्वभाव जाचा तो.

आदें, न॰ अदें.

आदेवेदे, पु॰ अदेवेदे.

आदय, पु॰ सं॰ धनिक; २, २ जें विद्यादि जापाशीं आहे तो तेणें तेणें करून; लोकीं प्रा॰ समासीं प्र॰; उ॰ विद्यादय, गुणादय, द्रव्यादय, इ॰.

आदयता, स्त्री॰ सं॰ तादृशयोग्यता नसतां प्रतिष्ठितपणा चाजो कोणी घालितो आवडी; उ॰ तुला मिरेपपाठविला ल॰ याचें तुम्हीं आलांतर चये ई न इतकी आदयता कशास पाहिजे.

आण, स्त्री॰ आपले कृत्याविषयीं दुसऱ्यास अभा माण्यसंदेह राहूंनये ल्हणोन किं॰ दुसऱ्यानें विवक्षिताहून अन्यथा वर्तूंनये ल्हणून अन्यथा वर्तल्यास ईश्वराचा अपराध घडेल एतदर्थ विधायकजो वाक्यप्रयोग करितात ती; अन्यथा करिशील तर मासेंगड्याची आण ल॰ मासागड्याकाप ल्याचें पातक लागेल; देवाची आण ल॰ देवाचा अपराधी होशील अशा प्रयोग रीती आहेत; वाहणें, घेणें, घालणें, इ॰ प्र॰.

आणखी, आणखी, अ॰ अणखी.

आणणें, (आनयन॰ सं॰) विवक्षित स्थलाहून कोणेक अर्थ स्वसन्निकृष्ट स्थलीं आकर्षण, वहन, इ॰ द्वारा नेई असा करणें.

आणने, स्त्री॰ कोणेकपदार्थ आणणें आणिनेणें अशीजी खटपट ती.

आणभाक, आणभाख, स्त्री॰ (आण॰ भाष॰) कोणेक कर्माविषयीं शपथपूर्वक कोणेकास देणें

जें

जें बचनती.

आणशपथ, स्त्री० (आण-शपथ-) आण इ०.

आणा, पु० रुपयाचा षोडशांश तो; २, आहणा.

आणाआण, स्त्री० (आणणें-हि०) कोणेक व्यवहारार्थ अनेकपदार्थ आणण्याचा जो व्यापार ती; आणाआणीचा संसार इ० ल० घरचें उत्पन्न जास अगदीं नाहीं अतएव बाहेरून आणाआण करून सजिवलेला.

आणि, अ० तुल्यरूपें करून क्रियाद्यर्थावर अन्वित होणारे जे अनेकपदार्थ त्यांचा जो तो तादृश परस्पर संबंध त्याचें द्योतक प्र० मध्यें होतो; उ० काल गाय आणि म्हैस विकत घेतली तूं आणि तो लबाड; २, उभयवाक्यार्थांचा जो आनंतर्य संबंध त्याचें द्योतक; उ० तो गेला आणि तू आलास

आणी, स्त्री० (आणा) आण्याचे किमतीचें एक रुप्याचें नाणें आहे.

आणीक, अ० अणीक.

आणीबाणी, स्त्री० (बाणी-हि०) कोणेक कार्याची जी सिद्धि समीपावस्था ती; उ० आमची पंचाईत आणीबाणीस आली आहे आणखी एकेबैठकेंत पार होईल; २, क्रोधाद्यावेशामुळें भाषणादिकांची मर्यादा सुटून अरेतुरे शिव्यागाळी मारामारी इ० करूं लागावें अशी जी अवस्था प्राप्त होत्येती; उ० मी फार बोलत असतां तूं आणीबाणीवर येतोस हें काय, स० ला० वर० एतद्दंतप्रा० येणें याचे योगीं प्र०

आत, स्त्री० बापाची जी बहीण ती.

आँत, अ० (अंतः सं०) कोणेकअर्थाचा अभ्यंतर

तररूप जो विभाग त्यावेठायीं; २, विवक्षितदेशकालरूप जो उत्तरावधि त्याचेआलीकडे; उ० अंबसेचा आंत येईल; कोणेक व्यवहार आंतपेणें स्व० विवक्षितानुरूप वृद्धिंगत न होतां पूर्वापेक्षां ह्रास दशापन्न होणें; ३, न० आंतडें.

आँतचा, ३लिं० आंतला.

आँतचाल, स्त्री० सूर्यनक्षत्रापासून दिननक्षत्र पर्यंत अभिजितासह वर्तमान मेजावें येईल संख्याती सातानी नष्ट करून शेष एकापासून चारपर्यंत जर आहेत तर गोमहिष्यादि पशु नेण्या आणण्यास जो मुहूर्त घडतो ती.

आँतडें, न० (अंत्र-सं०) पोटांत दोरीसारखा पोकळ जो मांसाचा अंशविशेष असतो तें.

आततायी, पु० (आततायी-सं०) आपल्यास दारमाराया सिद्ध झालेला तो; २, घर जाळणारा विष घालणारा इ० जे शास्त्रपरिगणित आहेत ते प्र०; ३, क्रोधावेश आत्मामुळें कर्तव्याकर्तव्य विचारजाचा सर्वस्फटतो तो.

आतप, पु० सं० सूर्याचें जें ऊन पडतें तो.

आतपत्र, न० सं० अबदागीर, छत्री, इ० जें आतपनिवारणार्थ डोईवर धरितात तें.

आँतबट्टा, पु० (आंत-बट्टा-) जासंख्येवर बटयाचा दरदरला असतो तत्संख्याकच बटावयाचे नाणें धरून त्यांतच बटयाचा अंश वजा देऊन अवशिष्ट दुसरी मत किती साली असाही शेष करण्याचा प्रकार आहे तो.

आँतर, ३लिं० सं० आंतला.

आँतला, ३लिं० (आंत) कोणेकअर्थाचे आंतजो

स्थित

स्थित तो.

आँतलीचाल, स्त्री॰ आंतचाल.

आँतवार, न॰ रा॰ (आंत) भित्त्यादिकांचे आवरणाने आंत असलेपणा आला आहे असें जें स्थल तें; उ॰ आलीपुरुष बाहेर निजूं परंतु बायकास आंतवार जागा पाहिजे.

आतळणें, ग्रं॰ कोणेक पदार्थास स्पर्शणें.

आतां, अ॰ (अथ·सं॰) वर्तमानक्षणापर्यंत होउन गेला जो काळ त्याहून अव्यवहित उत्तरकालीं; उ॰ येवढावेळ घरीं होते आतां बाहेर गले; २, कोणेक गोष्ट होउन गेल्यानंतर काळीं; उ॰ लेख गुंतला आतां उगीच भांडून फळ काय; ३, एक्कां; उ॰ आतां मला फावत नाहीं मग येईन; ४, ग्रंथादिकाचे आरंभप्रतिज्ञेचें द्योतक; उ॰ आतां शब्दाचे प्रकार सांगतों.

आतार, आतारी, पु॰ अत्तार.

आतांशीं, अ॰ (आतां·असा·) सांप्रतकालीं.

आतांसा, अ॰ (आतां·असा·) सांप्रतकालीं.

आतिथ्य, न॰ सं॰ आपल्याकडे आला जो कोणी अतिथि, शिष्ट, इ॰ त्याचा जो सत्कार तें.

आतिदेशिक, ३लिं॰ सं॰ अतिदेशानें प्राप्त जो कोणीएक अर्थ तो.

आतुडणें, ग्रं॰ कोणेक अर्थ आपुल्याहातीं लागणें.

आतुर, ३लिं॰ सं॰ दुखणाईत; २, कोणेक कर्मविषयीं जो अत्युत्सुक झालेला तो.

आतुरसन्यास, पु॰ सं॰ यादुण्यापासून आपण जगत नाहीं असा निश्चय झाल्यानंतर जो सन्यास

सन्यास घेतात तो.

आँतून, अ॰ (आंत) अभ्यंतर प्रदेशाहून.

आतृप्त, अ॰ आतृप्तीचा अप॰.

आतृप्ति, अ॰सं॰ पुरती तृप्ति होईपर्यंत खाणें, पिणें, वाढणें, भोगणें, इ॰ कांचें वि॰.

आते, स्त्री॰ रा॰ आत.

आतेगोरव, पु॰ (आत·गोरव·) लग्नांतनवरीचे आतेस वराकडून वस्त्रादि द्यावयाचा मानआहे.

आतेचीर, न॰ (आत·चीर·) आतेगोरव.

आतेदीर, पु॰ (आत·दीर·) नवऱ्याचा जो आतेभाउ तो बायकोचा.

आतेबहीण, स्त्री॰ (आत·बहीण·) आपल्या आतेचीजी कन्या ती.

आतेभाउ, पु॰ (आत·भाउ·) आपले आतेचा जो लेंक तो.

आतेवाण, न॰ (आत·वाण·) आतेगोरव.

आतेसासरा, पु॰ (आत·सासरा·) आपल्या सासऱ्याचा जो आतेभाउ तो किं॰ आतेसासवेचा जो नवरा तो.

आतेसासू, स्त्री॰ (आत·सासू·) आपल्या नवऱ्याची किं॰ बायकोचीजी आत्ती.

आत्मक, ३लिं॰ सं॰ जो जाचा आत्मा तो तदात्मक; उ॰ हें जगत पंचभूतात्मक आहे, अलंकार रूपवर्णात्मक इ॰ समासीं प्र॰.

आत्मघात, पु॰ सं॰ आत्महत्या तथमार्थी.

आत्मघातक, आत्मघातकी, ३लिं॰ सं॰ आत्मघात करणारा जो तो.

आत्मघाती, २ लिं० आत्मघातक.

आत्मज, पु० सं० पुत्र.

आत्मजा, स्त्री० सं० कन्या.

आत्मनिवेदन, न० आत्मा ईश्वरार्पण करावा असा एक भक्तिप्रकार आहे.

आत्मनिष्ठ, २ लिं० सं० आत्मस्वरूपीं जाचें अंतःकरणाची निष्ठा लागली आहे तो.

आत्मबुद्धि, स्त्री० सं० दुसऱ्याचे शिकवणीची नव्हे केवल आपलेपोटची जी बुद्धि ती.

आत्मबोध, पु० सं० आत्मस्वरूपविषयक जो बोध तो.

आत्मलाभ, पु० सं० आत्मबोधानें जो आत्मस्वरूपाची प्राप्ति घडते तो.

आत्मलिंग, न० सं० श्रीशिवाने कैलासीं भक्त जनाचे हातून पूजादि घडावें म्हणून आत्मस्वरूपाचा तत्तांश मूर्तिकरून शरीरीं धरिला आहे तें; २, ला० जो जाचा केवल जिवलग तो त्याचें असें ल०.

आत्मविद्या, स्त्री० सं० वेदांतविद्या.

आत्मसंतोषाने, आत्मसंतोषें, अ० (आत्मसंतोष·सं०) कोणाचा बलात्कार, भीडभाड, इ० नसतां केवल आपल्या संतोषाने; उ० हें खतमीं आत्मसंतोषें लिहून दिल्हें असे.

आत्महत्या, स्त्री० सं० विधी योजून बुद्धिपूर्वक करितांजो आपल्या प्राणाचा नाश ती; २, तज्जनित लागतें जें पातक ती.

आत्महत्यारा, २ लिं० (आत्महत्या·) आत्मघातक.

आत्महित, न० सं० ईश्वरपदप्राप्तीनें घडतें जें आत्म्याचें हित तें; २, कांहीं एक स्वार्थसिद्धीनें होतें जें आपलें हित तें.

आत्मज्ञान, न० सं० आत्मस्वरूप वस्तुतः जसें आहे तशाप्रकारें जें ज्ञान तें.

आत्मज्ञानी, २ लिं० सं० आत्मज्ञान झालें आहे जास तो.

आत्मा, पु० सं० देहमात्राचा यायीं भिन्नत्वें करून तत्तद्देहाभिमानी जाणीव म्हणून जो पदार्थ आहे तो; २, त्यासर्वांचें बिंबभूत जें परब्रह्मस्वरूप जाला परमात्मा म्हणतात तो; ३, यत्धर्मवैशिष्ट्यें करून पदार्थाचें ज्ञान, स्थिति, इ० होतें तत्धर्मविशिष्ट जें कांहीं एक तो, जो तत्तत्पदार्थाहून अतिरिक्त नसतां त्या त्या पदार्थाचा असा भेदव्यवहार पावतो तो; ध्वनि आहे आत्माजाचा तो ध्वन्यात्मक शब्द, संकल्पात्मक, पापात्मक, इ० स० जाणावे; ४, अंतःकरण; ५, देह; ६, मी एतच्छब्दवाच्य जो अर्थ तो; या अर्थी आपलें जें गृहतें, आत्मगृह, आत्मजाया, आत्मधन, इ० स०.

आत्मानात्मविचार, आत्मानात्मविवेक, पु० सं० देहादिकचेठायीं शुद्धनिर्विषय जो ज्ञानांश तो मात्रमी इतरदेहादिक तें अनात्मा होय ल० मीं नव्हें असा जो विचार तो.

आत्माराम, २ लिं० सं० आत्मलाभानेंच आनंद पावून इतर रक्षाविषयीं जो निरिच्छ तो; २, पु० जीवात्म्यास प्रसंगविशेषीं ल०; उ० तुलसी जेवून आत्माराम थंड करून घेतलात मीमांस

उपाशी मेलों

आत्मीय, ३लिं० सं० आपलेपणा जाजवर आहे असाजो सोयरा धायरा स्त्री, पुत्र, मित्र, पशु, गृह, धन, इ० तो.

आत्यंतिक, ३लिं० सं० अत्यंतजें मित्रत्व, शत्रुत्व, विरोध, नाश, रूरव, दुःख, इ० तो.

आत्यंतिकप्रलय, पु० सं० मोक्षजाला प्राप्त झाला त्याला अर्थात् सकलजगाचा जो अभाव घडतो तो,

आत्या, स्त्री० आतेला याशब्दाने व्यवहार करितात; २, पु० पुरुषाला प्रतिष्ठानाम आहे.

आथडणें, औथडणें, थडकणें.

औथडा, पु० कों० आंथडण्याने कोणेकपदार्थास बसतो जो हिमका तो.

औथर, पु० मोट्या कामटीची मोटी जी ओथरी तो.

औथरणें, (आस्तरण·सं०) अंथरणें.

औथरी, स्त्री० (आस्तरण·सं०) अंथरी.

औथरूण, न० (आस्तरण·सं०) अंथरूण.

औदण, न० लग्नांत कन्येला किं० जांवयाला अवश्यजें द्यावयाचें त्याहून इतर स्वसंपत्त्यनुसार घोडा, रथ, दासी, दास, भूमि, इ० जें देतात तें.

औदणा, औदणी, औदण्या, ३लिं० (औदण·) औदणरूपेंकरून मिळालेला जो पदार्थ तो.

आदमुरें, आदमोरें, न० (अर्ध·सं०१अद·२आद३मुरणें) अदमुरें.

आदर, पु० सं० कोणेकपदार्थ किं० गोष्टी यांविषयीं ह्याचांगला याचा संबंध आपल्यास घडावा इ० रूपजो अंतःकरणांतभाव असतो तो; २, मनुष्यादिपदार्थांचा गौरव प्रतिपालनपूर्वकजो सत्कार तो; ३, कोणेकपदार्थगोष्टींचास्वीकारद्वारा जो सन्मान तो.

आदरउपचार, पु० सं० कोणीआपल्याकडेआलाजो त्यास आदरपूर्वक आसन, अभ्युत्थान, भोजन, इ० जे उपचार करितात तो.

आदरण, न० सं० आदर करण्याचा जो व्यापार तें.

आदरणीय, ३सं० ज्याचा आदर करायास योग्य असेंजें शास्त्र, गुरु, वचन, शिष्ट, अतिथि, इ० तो.

आदरणें, (आदरण·सं०) आदर करणें.

आदरमान, पु० सं० आदर उपचारपूर्वक जो अतिथ्यादिकाचा सन्मान तो.

आदरसत्कार, पु० सं० आदरमान.

आदर्श, पु० सं० आरसा.

आदलेदिवशीं, आदलेदिशीं, अ० (आदि दिवस·) विवक्षितदिवसाहून पूर्वदिवशीं.

आदलेंवर्ष, आदलेंसाल, न० (आदि·वर्ष·किंसाल·) विवक्षितवर्षाहून पूर्वीचें किं० गतवर्षाचे मागलें अव्यवहिनजें वर्ष तें.

आदळआपट, स्त्री० (आदळणें·आपटणें·) क्रोधादिकामुळें शरीर किं० कांहीं इतरपदार्थ इतस्ततः अनेकवार आपटण्याचा जो व्यापार तो.

आदळणें, (आदलन·सं०) आपटणें; २, थडकणें; उ० एथूनकोंजउडलीतीथेटकिल्ल्याचाभा

चीस आजुन आदकली; २, कों० अतिवृष्टि, अवृष्टि, इ० कानी शेतें पिकास कांहीं कमीयेत अशीं करणें.

आदा, पु० अभिनय; २, कांहीं एक व्यापारापासून होतो जो लाभ तो; उ० आदापाहून खर्च करीत असावें; ३, पदरीं इ० आदिकांचा जो संग्रह तो; उ० हा नाहीं ह्मणतो परंतु किमानपक्ष हजार रुपयांचा तरी आदा यापाशीं आहे; ४, सर्कार, सावकार, इ० कांकडे कुळाकडून इ० आदिये जुन होती जी जमा तो.

आदाकरणें, अदा करणें.

आदान, न० कोणेका स मरण आसन्न व्हावयाजोगा जो अरिष्टयोग असतो तें; २, सं० कोणेक अर्थी चेंजें गृहण तो.

आदापावती, स्त्री० सावकार इ० कांस कांहीं रोख दिलें कांहीं दुसऱ्याचा हवाला दिला इ० द्वारा साली असती जी पावती ती.

आदाय, पु० आदा होणें योग्य अर्थी.

आदावन, स्त्री० हिं० आपली इ० आदि हानि व्हावयाजोगे दोष अपराधादि घडलेंनसतां ताबडतोब हानि होई असें उपस्थित झालें कि० कोणेकानें बलानें उपस्थित केलेंजें निमित्त ती, ग्रा० पड, घाल, इ० कांचे योगीं म०; २, मनुष्यादिकांचा जो परस्पर वैरभाव ती; ३, आघातादि कारणानें शरीरावयवांस होत असे जी दुखापत ती.

आदावती, आदावत्या, २ लिं० अदावती.

आदावळ, स्त्री० कोणेकाचे योगानें कोणेकावर पडतें जें नहक कांहीं एक खर्चाचें लचांड ती, घाल, पड

पड, इ० धा० योगीं म०.

आदि, पु० सं० जो अवयव पासून कोणेक अवयवी रूप पदार्थाचा प्रारंभ होतो तो अवयव त्याचा; २, समुदायामध्यें प्रमुख तें करून विवक्षित जी व्यक्ति तो; उ० इंद्रादि देव, रंभादि स्त्रिया, याअर्थी प्रा० स० म०; ३, विवक्षितांहून अगोदरचा; उ० ईश्वर सर्वांहून आदि होय; ४, अ० अगोदर; उ० मीं आदि उद्देन मग तूं उद्द.

आदिक, २ लिं० (आदि०) जो आहे आदि ज्यास तो तदादिक; उ० अकारादिक वर्ण, ब्राह्मणादिक जाति, आकाशादिक भूतें, इ० स० म०.

आदिकरून, अ० (आदि० करणें०) विवक्षित समुदायास कोणेक अर्थानें आदि तें करून धरून; उ० ज्ञान झाल्यानंतर देह आदिकरून सर्वपदार्थ तुच्छ वाटतात.

आदिकारण, न० सं० कोणेक कार्याचें इतर कार्यापेक्षां मुख्य जें कारण तें.

आदिठिकाण, न० मूळठिकाण.

आदितवार, पु० आदित्यवाराचा अप०.

आदित्य, पु० सं० सूर्य; २, स्वर्गीं हा द्वादश संख्याक एतन्नामक देव आहेत.

आदित्यवार, पु० सं० सातावारांतील जो पहिला वार तो.

आदित्याची छत्री, स्त्री० छत्राकार एकलहान सें झाड पावसाळीं उगवत असतें ती.

आदित्याची तुळस, स्त्री० तुळसीसारखी एक वनस्पति आहे.

आदिनारायण, पु० सं० क्षीरसमुद्रांत शेषावर

निज

निजलेलें जें भगवत्स्वरूपआहे तो.

आदिपश्चात्, अ॰सं॰विवक्षितस्थलापासून ईषत्पश्चात्मागें कि॰पुढें; उ॰ आदितवारींच आलें पाहिजे कीं आदिपश्चात् आलोंतर येईल कामास; २, क्रमाने असावाजो पदार्थ त्यांतील कांहीं विभाग मागें वा पुढें पुढचा मागें अशाप्रकाराने,होणें,लागणें, इ॰कांचें वि॰; उ॰ पोथी-वींपत्रें आदिपश्चात् लागलीं असलींतर नीटकरा.

आदिम, ३लिं॰सं॰ अगोदरचा.

आदिमग, अ॰ (आदि॰मग॰) आदिपश्चात्.

आदिमाया, स्त्री॰सं॰ ईश्वराची जी शक्ति जिचा योगाने हासर्वप्रपंच होतो ती.

आदिशक्ति, स्त्री॰सं॰आदिमाया.

आदिष्ट, ३लिं॰सं॰ आज्ञप्त.

आदीं, अ॰ (आदि॰सं॰) अगोदर.

आदींचेविदीं, आदींविदीं, अ॰(आदि॰द्वि॰) एकजातीय क्रियेचे अनेक जे इतर कर्ते त्यांचे क्रियेचे अगोदर कि॰जाजा क्रियेचें जेंजें प्रयोजन तें उपस्थित होण्याचे पूर्वी; उ॰ उघा आदींविदीं निजून कोण उठतो पाहूं; आदींविदीं घरशाकारले स्त॰ पाउस केव्हां कांपडेनां.

आँदुळणी, स्त्री॰रा॰ राजणघाडी.

आँदुळणें, (आंदोलन॰सं॰) पाळणा इ॰कांचा दोऱ्याधरून कि॰एरवींच झोके देउन आंतस्थितजें मूल इ॰त्यास हालविणें.

आदृत, ३लिं॰सं॰ ज्याचा आदर केला आहे तो.

आदेश, पु॰सं॰ आज्ञा; २, अभिदेशास आकृत जन स्त॰; ३, कोनफाटे गोसावी परस्पर नमन करि

करतेसमयीं हाशब्द उच्चारितात.

आंदोल, पु॰सं॰ आजवर वसून झोंके घेतात असा झोंपाळा,पाळणा, इ॰तो.

आंदोलन, न॰सं॰ दोरी इ॰कांचा आश्रयाने जोंवर तो राहिलाजो पदार्थ तो हालविल्यामुळें जें इतस्ततः त्याचें चलन होतें कि॰ नौका,रथ,गाडी, इ॰कांचा ठायीं स्थितजो पदार्थ त्याचें त्याआधाराचे हालण्यामुळें जें तत्सदृश चलन होतें तें.

आदो, अ॰सं॰ अगोदर.

आद्य, ३लिं॰सं॰ अगोदरील; २, आदिद्वितीयार्थी; उ॰ काशीयात्राद्यपात्रायाणें केल्या आहेत.

आद्यंत, पु॰सं॰ कोणेकगोष्टीचा उपक्रम आणि उपसंहार एतद्रूपजो आरंभींचा आणि शेवटींचा विभाग त्याचे ज्ञानावांचून मध्यस्थित विषय ध्यानांत येतनाहीं तो; २. अ॰ अथपासून इतिपर्यंत.

आधण, न॰ अधण.

आधणणें, (आधण॰) उदक आधणरूप अवस्थेतें पावणें.

आधरून, अ॰(आदरण॰सं॰) आवर्जून; उ॰ मी दाणे वाळत घातले म्हणजे आंधरून पाउस येतो.

आधवड, स्त्री॰ चरसा.

आधवणी, न॰ (आधण॰पाणी॰) आधणाचें जें पाणीतें.

आधव्याचा, ३लिं॰ अधव्याचा.

आधळा, ३लिं॰ कों॰ (अर्ध॰) आडसर द्वितीयार्थी.

आँधळा, पु॰ अंधळा.

आँधळाकारभार, पु॰ अंधळाकारभार.

आँधळी कोशिंबीर, स्त्री० अंधळी कोशिंबीर.
आँधळेंनक्षत्र, न० अंधळेंनक्षत्र.
आँधळेंवरण, न० अंधळेंवरण.
आधा, ३ लिं० ग्रं० (अर्ध-सं०) अर्धा.
आधाँटी, स्त्री० अधांटी.
आधान, न० सं० कोणेक अधिकरणीं कोणेक वस्तूचें जें स्थापन तें; २, अग्निहोत्र घेण्याचे आरंभीं एक कर्म आहे; ३, जिवावर चालणें.
आधायक, ३ लिं० सं० कोणेक अधिकरणीं कोणेक आधेयाचें आधान करणारा तो; गुणाधायक, दोषाधायक, इ० स०.
आधार, पु० सं० पदार्थ इतस्ततः न पडतां राहण्या विषयीं कारण ता पावतो जो ; भारसंभाळणारा ज्या पदार्थांतराचा संबंध तो किं० तें पदार्थांतर तो; उ० सर्व जगास पृथ्वीचा आधार आहे किं० पृथ्वी आधार; या दोहोंवाक्यांचा अर्थ एकच; २, विवक्षित व्यवहार खोटा न पडतां चालावयास कारणीभूत जें वचनादि प्रमाणाचें बल असतें तो किं० तें वचनादिरूप प्रमाण तो; उ० तुलीवचन मासें लेणतां याला आधार कशाचा लेणाल तर भोगवटदाराचा आधार; ३, निर्वाह्य जो संसारादि व्यवहार त्यास निर्वाह पावण्याविषयीं नानदुपयुक्त धन, प्रभु, विद्या, इ० कांचे संबंधाचें बळ असतें तो किं० ते धनादिपदार्थ म०; उ० जवळ पैसा नाहीं आणि कशाचे आधारावर लग्न आरंभावें.
आँधार, पु० अंधार.
आँधारकोंडी, स्त्री० अंधारकोंडी.

आँधाररवण, पु० आंधारकोंडी.
आँधाररवणी, स्त्री० आंधारकोंडी.
आधारपत्र, न० सं० पत्रावळ, ताट, इ० जें भोजन पात्र त्याचेखालीं लावितात जें लहान सें वेगळें पान तें
आधारासपंथ, पु० (आधार-पंथ-) कांहीं एक गोष्टीचें परिज्ञान करून घेण्याविषयीं कोणे काम विचारिलें असतां त्याणें स्पष्ट न सांगतां तथापि त्याचे भाषणावरून दिसतें जें त्या परिसेय अर्थाचें कांहीं लक्षण तो; लागणें, लागूं दणें, याचेयोगीं निषेधविषयीं म०; उ० मला तो ओळखीचा सा वाटला खरा पण त्यास विचारीत होतों परंतु त्याणें आधारासपंथ लागूं दिला नाहीं.
आँधारी, स्त्री० अंधारी.
आँधारीरात्र, स्त्री० अंधारीरात्र.
आधि, पु० स्त्री० सं० शरीरास कांहीं उपद्रव नसतां शोक, भय, चिंता. इ० कारणानीं केवल अंतःकरणास जी व्यथा होत्ये तो ती; २, कांहीं एक गोंडी मागें लागतें नें तें पीडा त्यास ल०; ३, पु० गहाण.
आधिक्य, न० सं० अधिकपणा.
आधिदैविक, ३ लिं० स० अधिदैव संबंधी जें सुख, दुःख, इ० तो.
आधिपत्य, न० सं० ग्राम, देश, द्रव्य, इ० विषयांचा जो धनीपणा तें; २. कोणे कार्चा कोणेक स्थलीं असत्ये जी मोठी प्रतिष्ठा तें; उ० पुरुष निर्गुण जरी असला तरी साखरबाडीस गेला म्हणजे त्याचें आधिपत्य मोडतें.

आधिभौतिक, ३लिं॰सं॰ अधिभूत संबंधी जें दुःखादिक तें.

आधीं, अ॰ अधीं.

आधुनिक, ३लिं॰सं॰ सांप्रतकालींचा जो ग्रंथ संप्रदाय इ॰ तो.

आधेय, न॰सं॰ जा अधिकरणाला आश्रयून राहिलाजो पदार्थ तो त्याचें.

आँधेर, पु॰ अंधेर.

आँधेरकोंडी, स्त्री॰ अंधारकोंडी.

आँधेरी, स्त्री॰ अंधेरी.

आधेला, पु॰ अधेला.

आधेली, स्त्री॰ अधेली.

आधेलें, न॰ अधेला हितीयार्थी.

आधोड, स्त्री॰ कों॰ भा॰ लोथ या अर्थी.

आधोली, स्त्री॰ अधोली.

आँध्य, न॰सं॰ अंधपणा.

आध्यात्मिक, ३लिं॰सं॰ अध्यात्मसंबंधी जें दुःख, सुख, ज्ञान, इ॰ तो.

आंध्र, पु॰सं॰ तैलंग.

आध्वर्यव, न॰सं॰ अध्वर्यूचें जें कर्म तें.

आनक, पु॰सं॰ एक चर्मवाद्य आहे.

आनखशिख, अ॰सं॰ पायांचे नखापासून डोकीचे केसापर्यंत; उ॰ मी असें बोलतांच क्रोधाने आनखशिख लालेलाला.

आनंतर्य, न॰सं॰ अनंतरत्व.

आनंत्य, न॰सं॰ अनंतत्व.

आनंद, पु॰सं॰ अंतःकरणाची सुखरूप जी अवस्था तो; २, कांहीं इष्ट साल्यामुळें सुखातिशय जो होतो तो; स्वानंद, आत्मानंद, विषयानंद ब्रह्मानंद, इ॰स॰; आनंद करणें स॰ आनंदवृत्तीनें कोणेक व्यापारनें काळघालविणें.

आनंदणें, (आनंदन॰) आनंदयुक्त होणें.

आनंदभैरव, पु॰सं॰ एक रसायन आहे.

आनंदभैरवी, स्त्री॰ (आनंदभैरव॰) गाण्यांतला एक राग आहे.

आनंदाश्रु, न॰पु॰सं॰ फार आनंद साल्यामुळें नेत्रांतून जीं अश्रुयेतात तें तो.

आनंदित, ३लिं॰सं॰ आनंद पावलेला तो.

आनंदी, ३लिं॰सं॰ निरंतर आनंदवृत्तीनें असण्याचा स्वभाव आहे तो.

आनन, न॰सं॰ मुख.

आनयन, न॰सं॰ आणण्याचा व्यापार तें.

आनर्थक्य, न॰सं॰ अनर्थकपणा.

आनीत, ३लिं॰सं॰ आणिलाजो तो.

आनुकूल्य, न॰सं॰ अनुकूलपणा.

आनुगुण्य, न॰सं॰ अनुगुणत्व.

आनुचित्य, न॰सं॰ अनुचितपणा.

आनुनासिक्य, न॰सं॰ अनुनासिकत्व.

आनुपम्य, न॰सं॰ अनुपमपणा.

आनुपूर्वी, न॰सं॰ शब्दादिकांचा ठायीं एकापुढें एक, एकापुढें एक, असा अक्षरादिकांचे स्थितीचा जो क्रम असतो ती.

आनुपूर्व्य, न॰सं॰ आनुपूर्वी.

आनुभविक, ३लिं॰सं॰ आयुष्यादिकांविषयीं आपल्यास अनुभव आलेला आहे तो; उ॰ हें औषध मासें आनुभविक आहे म्हणून तुलाला द्याया

घ्यायाला सांगतो.

आनुमत्य, न॰सं॰ अनुमत प्रथमार्थी.

आनुमानिक, वि॰सं॰ अनुमान संबंधीजें ज्ञान किं॰ ज्ञात अर्थ इ॰ तो.

आनुरूप्य, न॰सं॰ अनुरूपपणा.

आनुलोम्य, न॰सं॰ अनुलोमपणा.

आनुषंगिक, वि॰सं॰ अनुषंगसंबंधी; करव. दुःख, पाप, पुण्य, इ॰ तो.

आनृण्य, न॰सं॰ अनृणीपणा तें.

आनर्थक्य, न॰सं॰ अनर्थकपणा.

आप, न॰सं॰ उदक; २, आपण, परंतु समासीं प्र॰; उ॰ आपहस्तें, आपसरवें, इ॰.

आपआप, अ॰ (आप-हि॰) आपल्या आपण.

आपआपला, वि॰ (आपला-हि॰) ज्याचा त्याचा जो जो विषय तो तो त्याचा त्याचा; उ॰ सर्वांस आपआपला स्वभाव चांगला वाटतो.

आपई, स्त्री॰ दूरदेशस्थित जो मित्रादि त्यास पाठविलेला जो वस्त्र, भूषण, खाऊ, इ॰ पदार्थ तो.

आपका, पु॰ अपका.

आपगंड, वि॰ रा॰ (आपण-) माता, पितर, गुरु, इ॰ दुसऱ्यानें हितोपदेशादि सांगीतलेलें न आइकतां आपलेमनास येईल तसें वर्तणारा जो त्यास ल्ला॰.

आपंगणें, (आपला-अंग-) पोर, पशु, इ॰ ममतापूर्वक जवळ बाळगून संरक्षणें; उ॰ याचे आईबाप हा लहानअसतांच मेले तेव्हां आत्तीयाला आजपर्यंत आपंगलें.

आपगरजी, वि॰ (आप-गरज-) आपलें काम

काम झालें म्हणजे झालें मग दुसऱ्याचा कितीही तोटा होवु अशी बुद्धि जाची तो.

आपटणें, अपटणें.

आपटा, पु॰ अपटा.

आपण, (आत्मा-सं॰) हें सर्वनाम मी याचे अर्थाचें वाचक; २ सत्कारपूर्वक भाषण असतां तृतीयाचे अर्थाचें वाचक परंतु तेव्हां अनेकवचनांत; ३, पु॰ सं॰ बाजार.

आपत्, स्त्री॰ सं॰ आपदा.

आपत्काल, पु॰ सं॰ दारिद्र्यादि संकटें भोगावयास कारणीभूत जी काल दशा तो.

आपत्ति, स्त्री॰ सं॰ संसारादि व्यवहार निर्वाहास द्रव्य, अन्न, इ॰ अवश्य जो जो पदार्थ पाहिजे असतो त्याचे दुर्लभतेमुळें किं॰ रोगादि जन्य दुर्निर्वाह दुःख भोक्तव्य तें करून प्राप्त झाल्यामुळें जी कष्टावस्था ती; २, प्राप्ति; उ॰ करवाची जी आपत्ति ती करवापत्ति, दुःखापत्ति, दोषापत्ति, इष्टापत्ति, इ॰ प्रा॰ समासींच प्र॰.

आपत्तिकाल, पु॰ सं॰ आपत्काल.

आपत्पुरवणी, स्त्री॰ (आपत्-सं॰ पुरवणी-प्रा॰) बोलतांना जी गोष्ट घसरली तिची यथा कथंचित् जी संपादणी करितात ती.

आपदा, स्त्री॰ सं॰ आपत्ति प्रथमार्थी.

आपदावणें, सं॰ (आपदा-) दुखवणें, दारिद्र्य, इ॰ संबंधामुळें कुचंबत राहणें.

आपद्धर्म, पु॰ सं॰ वर्णाश्रमास उत्सर्गतः सांगितला जो धर्म तो आपत्कालीं घडतनाहीं त्म्हणून गौणपक्ष धरून जो धर्म शास्त्रानें

सांगि

सांगितला आहे तो.

आपधाक, पु० (आपला·धाक·) दुसऱ्यानें भय प्रदर्शक व्यापार केलानसतांही आपणच आपल्यामनांत हामलामारील इ० संभावना करून जो धाक बाळगितात तो.

आपंधाकणें, (आपधाक·) आपधाकानें विशिष्ट होणें.

आपन्न, २ लिं० सं० आपत्ति दशेतें जो पावला तो; २, प्राप्त; सुखापन्न, दुःखापन्न, इ० स०.

आपपर, २ लिं० (आपला·पर·) कांहीं एक पदार्थ आपले आणि कांहीं एक परकीय असेंजें उभयविधपदार्थजात तो.

आपपरभाव, पु० (आपपर·भाव·) हा आपला आणि हा दुसऱ्याचा अशी जी भेदबुद्धि मनांत असत्ये तो.

आपरोक्ष्य, न० सं० अपरोक्षपणा.

आपलपोटाच्या, आपलपोट्या, २ लिं० (आपला·पोट) आपलें मात्र पोट भरलें म्हणजे साले इतर पोष्य वर्गादिकांची काळजी जो बाळगीत नाहीं अशा स्वभावाचा जो त्यास म्ह०.

आपला, २ लिं० (आपण·) आपणाजो तत्संबंधी तो; म्ह० आपलें तें मापलें आणि दुसऱ्याचें तें दुपायले, वाक्यांत अलंकारार्थ याचा प्रयोग होतो; उ० मी आपला एथून उठलोंनो आपला त्याचे घरीं गेलों कि० देवास जावें म्हणून निघालों तो आपला बाजारांत गेलों.

आपलातुपला, २ लिं० (आपला·तुपला·) हा माझा आणि हा तुझा अशा भेदबुद्धीनें मानिलेंजें पदार्थजात तो.

आपलाला, २ लिं० आपआपला.

आपलेआपण, आपल्याआपण, अ० (आपण·हि०) दुसऱ्याने प्रेरणादिकरितां स्वयें आपण होउन.

आपसांत, अ० अपसांत.

आपस्तंब, पु० सं० आपस्तंब म्हणून ऋषि होता तत्कृत सूत्रानें जाचे कुलांत मौंज्यादि संस्कार होत आले तो.

आपा, पु० पुरुषाचें प्रतिष्ठानाम आहे.

आपातनः, अ० सं० कोणेक बाधकानें बाधजों होई तावत्कालपर्यंत दोष, समाधान, लक्षण, सिद्धांत, इ० कांचें जें टिकणें, शोभणें, असणें, इ० त्यांचें वि०; उ० हें तुलीं समाधान केलें तें आपातनः आलीं घेतलें.

आपातरमणीय, २ लिं० सं० आपातनः जें चांगलें दिसतें तो.

आपादतलमस्तक, आपादमस्तक, अ० सं० आनखशिख.

आपाप, अ० आपल्याआपण.

आपामरसाधारण, २ लिं० सं० मूर्ख, दरिद्री, चांडाल, इ० जे केवल निकृष्ट त्यांपासून ज्ञानी, श्रीमंत, ऋषी, इ० त्यापर्यंत जो सर्वांस सारखा मिळतो. अनुभवासयेतो, इ० असा जो द्रव्यगुणादि पदार्थ तो.

आपाशाई, २ लिं० चर्मीजो उद्योग एक भेद आहे.

आपुला, २ लिं० यं० आपला.

आपूस, आपोस, पु॰ गोमंतकी अंब्यांत एक जाति आहे.

आपोआप, अ॰ अपोआप.

आपोशन, न॰ सं॰ भोजनाचे प्रारंभीं आणि अंतीं तळहातावर घेउन जें पाणी प्राशितात तें.

आपोष्णी, स्त्री॰ अपोष्णी.

आप्त, पु॰ सं॰ साक्षात् किं॰ परंपरेनें ज्यांचा शरीर संबंध परस्पर आहे ते परस्पर; २, आपला असा मानलेला जो इष्ट, मित्र, इ॰ तो; ३, यथार्थ भाषणकर्ता जो ज्याचें वचन ईश्वरवचनासारिखें प्रमाण मानावें तो; याअर्थी आप्तवाक्य, आप्तवचन, आप्तोक्ति, इ॰ स॰; ४, वि॰ सं॰ प्राप्त.

आप्तविषय, आप्तविषयी, वि॰ (आप्त-विषय·) आप्त प्रथमार्थी.

आप्ति, स्त्री॰ सं॰ प्राप्ति.

आप्ती, स्त्री॰ (आपनि·सं॰) अस्मानी प्रथमा.

आप्यायन, न॰ सं॰ जाला जो हित उपचार त्याचें तत्समर्पणद्वारा जें पुष्टीकरण तें किं॰ जेणें करून पुष्टीकरण होतें तें इत्यादि तें; २, रूप्रास अन्नादिकांचेंजें भक्षण किं॰ दुग्धादिकांचें जें प्राशन त्यास रू॰; ३, ला॰ दुसऱ्याचें इत्यादि खाण्याचाजो व्यापार त्यास रू॰

आप्लुत, वि॰ सं॰ उदकादिकानें भिजलेला तो.

आफडणें, रा॰ कोणेकपदार्थास स्पर्शणें.

आफडूंनयेशी, स्त्री॰ (आफडणें·नये·असा·) शिवूंनयेशी.

आब, पु॰ यापाशीं असुक द्रव्य, विद्या, पराक्रम, इ॰ असावें अशी दुसऱ्यास संभावना व्हावया जोगा कांहीं लक्षणावरून डौलदिसत असतो तो; २, भाषणादि व्यवहारास हा व्यवहार यथायोग्य असा असावा तसा आहे असा जो कांहीं रूशोभितपणा दिसत असतो तो.

आँब, स्त्री॰ (आंबट·) हरभऱ्याचे झाडावर जो आंबट स्वेद असतो ती; २, रा॰ ज्याचें फळ आंबट असतें असेंजें अंब्याचें झाड नी.

आबई, स्त्री॰ अबई.

आँबट, वि॰ अंबट.

आँबटओला, वि॰ अंबट ओला.

आँबटचिंबट, वि॰ अंबटचिंबट.

आँबटदाण, वि॰ अंबटदाण.

आँबटवणी, न॰ अंबटवणी.

आँबटवेल, स्त्री॰ अंबटवेल.

आँबटा, वि॰ अंबटा.

आँबटाई, स्त्री॰ अंबटाई.

आँबटाण, स्त्री॰ अंबटाण; २, पदार्थनिष्ठ आंबटरस तो.

आँबटावणें, (आंबट·) फार अंबट पदार्थ खाल्ल्यामुळें मुखानें किं॰ खाणारानें व्यथित होणें.

आँबटी, स्त्री॰ अंबटी; २, एक वनस्पति आहे.

आँबट्या, वि॰ अंबट्या.

आँबडणें, कों॰ कोणेकानें स्वतंत्रेछेनें वागूंनये ल्लणून त्यास कोणेक कार्यादिकांचे वायीं बेजार होईअसें गुंतवूंनदेवणें.

आँबण, स्त्री॰ (आंबट·) एक झाड आहे ज्याचे

पानास आंबटवास येतो; २, न० आंबोण.

आँबणें, अंबणें.

आबताब, पु० आबदाब.

आँबतें, न० (आंबणें) आंबोळी, आंबील, इ० करायासाठीं आंबट व्हावें म्हणून जें पीठ भिजत घालितात तें.

आबदाब, पु० (आब-दाब) धनिकत्व, पराक्रम, इ० संबंधी आब असल्यामुळें कोणे काचा लोकामध्यें जो जडपणा असतो तो.

आँबरस, पु० अंबरस.

आँबराई, स्त्री० अंबराई.

आँबलें, न० कांकडी सारखें एक फळ आहे जें फा० कडू असतें.

आँबवण, न० आंबोण; २, आंबत घातला जो पदार्थ तोलवकर आंबावा म्हणून त्यांत घालितात जो लिंबाचा रस इ० तें.

आँबवणीं, न० अंबवणी; २, चकवा.

आँबवा, पु० अंबवा.

आँबष्टाण, आँबसाण, स्त्री० आंबटाण पथमार्थी.

आँबसुका, आँबसुरवा, ३लिं० आंबटओला.

आँबसूल, आँबसोल, न० आमसोल.

आबा, पु० पुरुषास एक प्रतिष्ठानाम आहे.

आँबा, पु० अंबा प्रथम द्वितीयार्थी.

आँबाडा, पु० अंबाडा.

आँबाडी, स्त्री० अंबाडी.

आबाट, ३लिं० हिं० आबादान.

आबादान, ३लिं० स्वचक्र, परचक्र, सांत, दुर्भिक्ष, इ० उपद्रवरहित सुरक्षरूपणें नांदता, ग्राम, देश, घर, इ० तो; २, जास चोर रोगादि कुठल उपद्रव बाधला नाहीं तो; उ० वरकड विषय, चोरानीं नेला पेटीमाजतेंपढी आबादान राहिली.

आबादानी, स्त्री० (आबादान) आबादानपणा.

आबादी, स्त्री० (आबाद) आबादानी.

आबालवृद्ध, आबाळवृद्ध, पु० सं० केवल लें करापासून वृद्धपर्यंत जो जनसमुदाय तो.

आबाँब, न० को० अबांब.

आबाशाई, ३लिं० अब्बाशाई.

आबाळ, स्त्री० अबाळ.

आँबील, स्त्री० अंबील.

आँबूस, ३लिं० अंबूस.

आँबेमोहर, पु० अंबेमोहर.

आँबेरी, स्त्री० रा० एक वृक्ष आहे ती; २, त्या वृक्षाचा जो चीक ती.

आँबेहळद, स्त्री० अंबेहळद.

आँबोण, न० (आंबणें) धान्य कोंडा, इ० शिजवून किं० भिजवून गुरांस खायास घालायासाठीं जें करितात तें; २, लग्नांत एकेपांतीन शिध्याचें सर्व साहित्य व कोंडा, पेंडी-चारवडा, भाजीचा काढा, इ० घालून वाजत गाजत जें विहिणीकडे पोंहचवितात तें.

आबोल, स्त्री० पिंपळी मोरवंदी; २, न० तिचें फूल.

आबोलें, न० अबईचें फूल.

आँबोशी, स्त्री० अंबोशी.

आँबोळी, स्त्री० अंबोळी.

आब्रू, स्त्री० आपल्या सभ्यपणाचे वर्तणुकेवरून जो आपल्या अंगीं योग्यताविशेष आलाअसतो जेणेंकरून याचेहातून हलकेंजें करूंनयेतें कर्म घडणारनाहीं अतएव हाथोरआहे असेंलोकांस वाटतअसतें ती; २, काहींएक हातून पराक्रमादि घडल्यामुळें राजादिकांपासून जी प्रतिष्ठा मिळते ती.

आब्रूचा. आब्रूदार, २लिं० (आब्रू·) आब्रू अथवा माथाविशिष्ट जो तो.

आभ, न० कों० आभाळ.

आभंड, न० अभंड.

आभरण, न० सं० अलंकार अथवा भूषण

आभा, स्त्री० कांति, प्र०स० उ० अंजनाभ, सुवर्णाभ, इ०

आभांड, न० आभंड.

आभार, पु० सं० दुसऱ्यानें केल्याउपकाराचें जें आपल्यावर ओझें असतें तो.

आभारी, २लिं० (आभार·) यत्कृतउपकाराचें ओझें प्रत्युपकारनकरितां जाजवर आहे तो त्याचा.

आभाव, पु०रा० यापाशीं अमुकद्रव्य किंवा विद्यादि गुण, इ० असेल किंवा अमुकपराक्रमादिकरील, इ० रूप कोणेकाविषयीं कोणेकाचेमनांत जी संभावना असत्ये तो; २, कोणेकगोष्टीविषयीं ही गोष्ट घडणेस अशक्य आपणकरूंलागलों असतां क्रायहोईलतेनकडे. असाजो कोणेकाचेमनांत भाव असतो तो किंवा तादृशभाव उत्पन्न व्हावयाजोगा त्या गोष्टीचाजो अघडपणा तो; उ० जास अंकनोडावास चालुकनाहींत त्यासहिशेबाचें काम लट लें त्रणजे मोठाअभाव वाटतो.

आभास, पु० सं० कोणेकअधिष्ठानाचाठायीं दृष्टिदोषादिकारणामुळें कोणेकअसत्पदार्थाचाजो भ्रम होतो तो; २, भास.

आभाळ, न० अभाळ.

आभिचारिक, २लिं० सं० अभिचारसंबंधी जेंकर्म, कर्ता, इ० तो.

आभिमुख्य, न० सं० अभिमुखपणा.

आभीर, पु० सं० गवळी.

आभेळ, न० कों० अभाळ.

आभोग, पु० सं० ध्रुपदाचातिसराभाग तो.

आभ्यंतर, २लिं० सं० अभ्यंतरींचा.

आम, २लिं० सं० पक्क शालेलें नव्हेजें धान्यादि किंवा भक्षिलेलें अन्नादिजें जठराग्नीनें पक्क न होतां स्थित तो.

आमचा, २लिं० (आम्ही·) आम्हीजे तत्संबंधी तो.

आमटी, स्त्री० आंबटी.

आमंत्रण, न० सं० कांहींएक कार्यार्थ कोणेकातें उद्देशून तुम्ही मजकडे यावें इ० रूपजो वाक्प्रयोग करितातें; २, विवाहाद्यर्थ लोकांस आमंत्रणकरावयाकरितां प्रवृत्तजो मनुष्यादि समुदाय त्यास ल० .

आमंत्रणें, प्रा० ग्रं० (आमंत्रण·सं०) आमंत्रितकरणें.

आमंत्रणया, २लिं० (आमंत्रण·) विवाहादिकांत आमंत्रित मंडळीस भोजनादिसमयीं बोलावण्याकरितां जो ब्राह्मणादिठेविलाअसतोतो.

आमंत्रित, अलिं॰सं॰ आमंत्रण केलें आहे असतो.

आमदानी, स्त्री॰ अमदानी.

आमय, पु॰सं॰ रोग.

आमरस, पु॰ आंबरस.

आमराई, स्त्री॰ (आम्रराजि॰सं॰) अंबराई.

आमलक, न॰सं॰ आंवला.

आमलकी, स्त्री॰सं॰ अंवळी; २, आंवळकठी.

आमवात, आमवायु, पु॰ (आम॰वात॰वायु॰) पोटांत आमांशाचा संचय झाल्यामुळें त्यांतवा युमिश्रित होउन एकरोग होत असतो जेणें सांधे धरावे, इ॰ अनेक उपद्रव होतात तो.

आमविकार, पु॰सं॰ आमांशजनित जी विकृति होत्ये तो.

आमशूल, पु॰न॰सं॰ पोटांत आमांशाचे संचयामुळें जो पोटसूळ जडतो तो.

आमसाण, स्त्री॰ आंबसाण.

आमसूल, आमसोल, न॰ अमसोल.

आमा, पु॰ मुलांचे भाषेनें स्तनास स्त॰.

आमान्न, न॰सं॰ जेथें पाक करून ब्राह्मणादिकांस भोजन द्यावयाचें तेथे दाल, तांदूळ, कणीक, इ॰ धान्यचे जें उदक सोडून देतात तें.

आमांश, पु॰सं॰ पोटांत अपक्व अन्नरसाचा जो अंश राहतो तो कि॰ तज्जनित होत्ये जी विकृति तो.

आमिष, न॰सं॰ भक्षणार्थ मेषादिकांचे अंगाचें काढिलेलें जें अपक्व मांस तें; २, ला॰ जो विषय स्वप्नासी विषयीं पुरुषादिकांस लोभ घून तत्तद्व्यवहारीं प्रवृत्त करितो असा जो स्त्री, धन, इ॰ विषय तें.

आमूलचूड, अ॰सं॰ मूलापासून शेवटपर्यंत.

आमेज, पु॰ गाण्यांतील राग, रंग, भाषा, इ॰ पदार्थांमध्यें सजातीय पदार्थांतरांचा अंशतः जो मिश्रीभाव झाला असतो तो; उ॰ मुंबईची भाषा शुद्ध मराठी नव्हे कांहीं अंत गुजराथी भाषेचा आमेज आहे.

आमोद, पु॰सं॰ पुष्पादिकांचा जो सुगंध तो.

आम्र, पु॰सं॰ आंबा.

आम्रपल्लव, पु॰सं॰ आम्रवृक्षाचा जो पल्लव तो.

आम्रेडित, न॰सं॰ एकच शब्दाचें दोन तीन चार वेळा जें उच्चारण तें.

आम्ल, २लिं॰सं॰ अंबट.

आम्लपित्त, न॰सं॰ पित्तज प्रधान एकरोग आहे, जेणेंकरून वारंवार ग॰ळ्याशीं आंबट येतें वमन होतें इ विकृति होत्ये तें.

आम्लवेतस, पु॰सं॰ निंबामध्यें एक जाति आहे जें अति अंबट असतें तो.

आय, पु॰सं॰ मिळकत; २, गृहादि बांधावयाकरितां योजिलेली जी चतुरस्र भूमि तीची लांबीने रुंदी गुणून आलेली नष्टकेलें असतां अवशिष्ट जें राहतें तो; ३, स्त्री॰ आई.

आयआय, अ॰ (आय॰हि॰) अकस्मात अंगास असह्य वेदना झाली असतां हा उद्गार निघतो.

आयकणें, आइकणें.

आयकभट्टी, स्त्री॰ आइकभट्टी.

आयकींब, २लिं० आइकींब.
आयत, २लिं० सं० दीर्घजेक्षेत्रादि तो.
आयतन, न० सं० राहाया चेंजें स्थान तें.
आयता, अ० २लिं० आइता.
आयती, स्त्री० कों० आइती.
आयतें, न० आइतें.
आयतोजी, पु० रा० आइतोजी.
आयतोळा, २लिं० आइतोळा.
आयत्त, २लिं० सं० जो जाचे स्वाधीन तो तदायत्त.
आयदण, न० रा० धान्य, इ० सांठवायाचे उपयोगी वंशपात्रादि जेंपात्र तें.
आयनेरणें, ऐनरणें.
आयनेरें, न० मूलकेवळ लहान असतांच आई पुनः गरोदर राली असे जे तिचा दुग्धप्राशना नें त्यामुलास जीविकृति अडत्ये तें.
आयस, २लिं० सं० लोहसंबंधीजो शस्त्रादि पदार्थ तो.
आयाओया, न० स्त्री० (आय·ओय·अनु·) पोटांत तिडीक, इ० असह्य वेदना झाली असतां आय आय, ओय ओय, इ० अशा शब्दांचा होतोजो उच्चार तें.
आयाबाया, स्त्री० (आई·बाई·) पराक्रमहीन जे पुरुषादि कर्त्यांस किं० गोरगरीब जे लोक त्यांस प्रसंगविशेषीं स्त्र०; उ० अरेतुसे सारखा वीर जेथें थकला तेथें या आयाबायांचे हातून काय व्हायाचें आहे; स्त्र० वृक्षामध्यें एक साया आणि वरकड साऱ्या आयाबाया.
आयाम, पु० सं० क्षेत्रादिकांची जी लांबी तो.

आयास, पु० सं० श्रा० परिश्रम याअर्थी.
आयु, न० सं० आयुष्य; शतवर्षे आयु जाचें तो शतायु, सहस्रायु, दीर्घायु, चिरायु, लघायु, इ० स०.
आयुध, न० सं० युद्धोपयोगी तरवार, भाला, इ० जें शस्त्र तें.
आयुर्दाय, पु० सं० प्राण्याचा आयुष्यकालाचें जें प्रमाण तो.
आयुर्दाव, पु० आयुर्दायाचा अपभ्रंश.
आयुर्वेद, पु० सं० वैद्यशास्त्राचा मूलप्रमाणभूत एक ग्रंथ आहे तो.
आयुष्मान्, २लिं० सं० बहुत आहे आयुष्य जास तो.
आयुष्य, न० सं० उत्पन्न झाल्यापासून मरेतोंपर्यंत भोग्यजो काळ त्याजवर जीवन द्वारा प्राण्याचाजो भोक्तृत्वसंबंध ईश्वरानें नियमित असतो जाचें प्रमाण त्याकालानें होतें तें; २, ला० इतरही अचेतन मूर्त्तामूर्त्त पदार्थ जे त्यांचा स्थितिद्वाराजो नाशावधिक कालावर संबंध असतो तें; उ० यापुरुषांत सर्वगुण चांगले आहेत परंतु बोलण्यास मात्र आयुष्य थोडें.
आयुष्यमर्यादा, स्त्री० सं० आयुष्याचा परमजो अवधि तो.
आयुष्याचीदोरी, स्त्री० (आयुष्य·दोरी·) प्राण्यास जीवंतपणें राहायास आधारभूत जें आयुष्य त्यासच प्रसंगविशेषीं स्त्र०
आर, स्त्री० आरी द्वितीयार्थी; २, पु० अजगर सर्प मार्थी.

आरक्त, वि॰ सं॰ तांबडा किं॰ इषत्तांबडा तो.
आरड, स्त्री॰ अरड.
आरडणें, अरडणें.
आरडा, पु॰ अरडा.
आरडाओरड, आरडाओरडा, स्त्री॰पु॰ अरडाओरड.
आरड्या, वि॰ अरड्या.
आरणें, रा॰ (आर॰) अभ्रादिपुष्कळ रवाउन शरीरजड झाल्यामुळें अजगरासारखें रुक्ष पडणें.
आरण्य, आरण्यक, वि॰ अरण्यसंबंधीजे वृक्ष, पशू, इ॰ तो.
आरत, स्त्री॰ आरती.
आरता, अ॰ अरता.
आरतापरता, अ॰ अरतापरता.
आरती, स्त्री॰ (आर्तिक्य॰सं॰) देवादिकांस दीपानीं ओंवाळावें असाजो उपचार करितात ती; २, ओवांळायाकरितां सिद्धकेलेलें दीपसहित जें पात्र ती; ३, ओवांळतेसमयीं लवणातजें कवीनीं केलेलें गीतविशेष ती; ४, आरतीचेदीपठेवायाचेपात्रांत रंगानें अष्टदल, स्वस्तिक, इ॰ काढितात ती.
आरपार, अ॰ (पार॰हि॰) वेध्य, उल्लंघ्य, इ॰ जोपदार्थ त्याचे आलीकडचे भागापासून पलीकडचे भागापर्यंत वेधणें, उल्लघणें, इ॰ कांचें वि॰; उ॰ तोफेचा गोळा तट आरपार फोडून गेला.
आरब, पु॰ अरब.

आर

आरबस्थानी, वि॰ अरबस्थानी.
आरंबळणें, अरंबळणें.
आरबी, वि॰ अरबी.
आरबैन, वि॰ अरबैन.
आरभ्य, वि॰ सं॰ आरंभ झाला आहे जाचा तो.
आरंभ, पु॰ कोहींएक कार्यजनक जी कृति तिचा केवल जो पहिला विभाग जाचे योगानें हें कार्य होणार अशी प्रतीति असत्ये ती जाउन हें कार्य होउं लागलें अशी प्रतीति होउं लागत्ये तो कि॰ त्या कार्याची जी ती आदिभूत अवस्था तो; २, कोणेकपदार्थाची कि॰ गोष्टीची जेथून प्रवृत्ति होत्ये असा जो तत्तत्पदार्थादिकांचा आदिभूत विभाग तो; उ॰ हीनदीयागाचांचा आरंभ; ३, कोणेकपदार्थाची नास्तित्व संपून अस्तित्वावस्थेचा द्वारायीं जी प्रवेशक्रिया तो; उ॰ एथून करनाटकास आरंभ झाला.
आरंभणें, (आरंभ॰सं॰) कोणेककार्य आरब्धकरणें.
आरंभशूर, वि॰सं॰ कोणेककर्माचा उत्साहानें आरंभमात्र करावा मग आळसानें शेवटास नेतां तसेंचटाकावें असास्वभाव जाचा तो.
आरभ्य, वि॰सं॰ आरंभकरायास योग्य जें कोहींएक कार्य तो.
आरभ्यमाण, वि॰सं॰ जाचा आरंभ होतआहे तो.
आरवणें, रा॰ (आरव॰सं॰) कोंबडा इ॰पक्ष्यानीं शब्द करणें; आरवना कोंबडा स्त्री॰ आरडा याजोगे वयोवस्थेंत आलेला तो.

आर

आरशी, स्त्री॰ अरशी.

आरस, स्त्री॰ रा॰ अराष.

आरसा, पु॰ अरसा.

आरसेमहाल, पु॰ अरसेमहाल.

आरळी, स्त्री॰ आरोळी.

आरारवडा, पु॰ अरारवडा.

आराधक, वि॰ सं॰ आराधनकरणारा तो.

आराधणें, (आराधन॰ सं॰) देव, गुरु, इ॰ जें श्रा राध्यतें आराधितकरणें.

आराधन, न॰ सं॰ देव, गुरु, प्रभु, इ॰ कांनीं प्रस न्नव्हावें म्हणून पूजन, स्तवन, सेवा, इ॰ रूप जो व्यापार करितात नें

आराधना, स्त्री॰ सं॰ आराधन; २, सन्यासी, समा धिस्थ, याचे पुत्रादिक तदुद्देशेंकरून श्राद्धस्था नी जें कर्मकरितात ती.

आराधित, वि॰ सं॰ आराधनकेलें जाचें तो.

आराध्य, वि॰ सं॰ जाचें आराधनकरायास यो ग्य तो; २, कुळस्वामी, कुळदेवता, तो.

आराध्यदेवता, स्त्री॰ **आराध्यदैवत**, न॰ (आ राध्यदेवता॰ दैवत॰) आराध्यदेवतेचा अर्थी.

आरापारा, अ॰ रा॰ मध्येंमध्यें बहुतठिकामें स्थल गहे अशाप्रकारें विरलपणें कांहीं एक पदार्थांचे सन्निवेशाचें वि॰; उ॰ यंदा या अंब्यावर अंबे आरापारा धरले आहेत दाटनाहींत.

आराबा, पु॰ कों॰ संसार, शेत, भात, इ॰ कांचें जें खटलें तो.

आराम, पु॰ सं॰ दुखणें किं॰ कांहीं अन्यसंताप यांचा उपशम साल्यामुळें जीअंतःकरणास स माधानावस्था होत्ये तो; २, ज्वरादिदुखण्यास जो कांहीं उपशम तो; उ॰ कालपासून ज्वरास कांहीं आराम आहे; ३, उपवन; ४, रूपरूप.

आराष, आरास, स्त्री॰ अरास.

आरी, स्त्री॰ अरी.

आरूढ, वि॰ सं॰ आरोहण केलें जेणें तो; अश्वा वर जो आरूढ तो अश्वारूढ, गजारूढ, गर्वारू ढ, अभिमानारूढ, इ॰ स॰.

आरूढणें, (आरूढ॰ सं॰) आरूढ होणें; २, अं॰ कोणेकगोष्ट प्रायः खोटी असतां लोकांत प्रसिद्ध होणें.

आरेरवडा, पु॰ आरारवडा.

आरेरवणें, रा॰ (आरेरवा॰) कांहीं एक पदार्थ आ रेरव्यांत टेवणें.

आरेरवा, पु॰ रा॰ आटोपवृत्ती.

आरोग्य, न॰ सं॰ निरोगीपणा.

आरोप, पु॰ सं॰ वस्तुतः जा जवर जो धर्म नाहीं त्या जवर त्याधर्माचें बळेंच जें स्थापन तो; उ॰ तेज स्विनादिकारणामुळें सूर्यत्वाचा आरोपकरून हा ब्राह्मण केवळ सूर्य आहे असा व्यवहार होतो; २, क्षेत्रादिअधिकरणाचा ठायीं हस्तादिकानें बीजा दिकांचा जो प्रक्षेप तो; बीजारोप, अक्षतारोप, इ॰ समास जाणावे; ३, अपवादप्रथमार्थी.

आरोपणें, (आरोप॰ सं॰) आरोपितकरणें.

आरोपित, वि॰ सं॰ कोणेकअधिकरणीं आरोप केला आहे जाचा तो.

आरोह, पु॰ सं॰ भूमि, पर्वत, काळ, स्वर, संपत्ति, रोग, इ॰ कांचा क्रमेंकरून जो चढतेपणा तो.

आरोहण, न॰सं॰ नीचप्रदेशाहून उच्चप्रदेशीं जेंगमनतें.

आरोळी, स्त्री॰ उच्चस्वरानें जीहाकती.

आर्जव, न॰सं॰ सरळपणा; २, आर्जव.

आर्जव, न॰ (आर्जव·सं॰) कोणकाचें अंतःकरण प्रसन्नकरून घेण्याकरितां सेवा, स्तुत्यादिरूप जो तदनुकूल आचरणाचा प्रकार तें.

आर्जवणें, (आर्जव·) आर्जवानें कोणकास प्रसन्नकरणें.

आर्जवी, वि॰(आर्जव·) दुसऱ्याचे आर्जवांत राहण्याचा स्वभाव जाचा तो; २, स्वकार्यापुरतें आर्जव करणारा जो तो.

आर्जवृ, वि॰ आर्जवी.

आर्त, वि॰सं॰ पीडित; २, आतुर; कामेंकरून जो आर्त तो कामार्त, क्षुधार्त, रोगार्त, द्वेषार्त, भयार्त, इ॰स॰.

आर्ति, स्त्री॰सं॰ पीडा.

आर्थ, वि॰सं॰ शब्दाहून इतर जो नव्हाच्य अर्थ तत्संबंधीजें ज्ञान, अलंकार, शक्ति, शास्त्र, इ॰ तो.

आर्थिक, वि॰सं॰ आर्थ.

आर्थिकार्थसिद्ध, वि॰सं॰ अर्थसिद्ध अर्थाचे माहात्म्यानें सिद्ध होतें जें अर्थांतर तो; २, अर्थसिद्ध.

आर्ई, वि॰सं॰ ओला.

आर्द्रक, न॰सं॰ अलें.

आर्द्रता, स्त्री॰सं॰ ओलावा.

आर्द्रा, स्त्री॰सं॰ सत्तावीस नक्षत्रांतील सातवें जें नक्षत्र तें.

आर्द्राप्रवेश, पु॰सं॰ सूर्याचा आर्द्रानक्षत्रीं जो प्रवेश तो.

आर्य, वि॰सं॰ श्रेष्ठ.

आर्या, स्त्री॰सं॰ एक छंद आहे; २, त्या छंदावर रचलेला जो श्लोक तो.

आर्यावर्त, पु॰सं॰ विंध्याचल आणि हिमाचल यांचे मध्यभागचा जो देश तो.

आर्ष, वि॰सं॰ ऋषिसंबंधी जो ग्रंथ, ज्ञान, आचार, स्वभाव, इ॰ तो; २, जाचे अंगीं लौकिकचातुर्य, कोणककर्माची ढाकढिकी करणें, समजणें, यांविषयीं चपलता, इ॰ नाहीं असा जो कोणी मनुष्य किं॰ त्याचा स्वभाव त्यास स्त्री॰.

आल, स्त्री॰ तांबडा रंग करण्याचे उपयोगीं एक झाडाची मुळी आहे.

आलंकारिक, वि॰सं॰ अलंकारप्रधान जें काव्य, भाषण, इ॰ किं॰ उपमादिअलंकारप्रतिपादक जो ग्रंथ किं॰ त्यातें जाणणारा जो पुरुषादिक तो.

आलबेला, वि॰सं॰ अलबेला.

आलय, न॰सं॰ गृह; देवालय, द्विजालय, सर्पालय, इ॰स॰.

आलस्य, न॰सं॰ आळस.

आलागेला, आलेंगेलें, पु॰न॰ (येणें·जाणें·) पाहीपाहुणा; आल्यागेल्याचें घर स्त्री॰ जेथें नित्यशः पाहीपाहुणें येत असतात असें अरण्यें घर.

आलादिवस, अ॰ (येणें·दिवस·) मधें एकदिवस ही विराम न होतां प्रतिदिवशीं होणारा गोष्टी

विषयीं कंटाळा कथनीय असतां प्र० .

आलाप, पु० सं० परस्परांनीं जें भाषण तो; २, अलाप .

आलापणें, अलापणें .

आलापाला, पु० (पाला-हिं०) यथाकथंचित् देहनिर्वाहमात्र जेणेंकरून होतो असें जें पाला, कंद, कदन्न, इ० भक्ष्य त्यास प्र० .

आलिंगणें, (आलिंगन-सं०) आलिंगित करणें .

आलिंगन, न० सं० प्रीतीनें पुत्रादिकांस किंवा येरयेरांनीं कांहींएक पदार्थास कवटाळून जें धारण तें; दे, कर, इ० धातुयोगीं प्र० .

आलिंगित, वि० सं० आलिंगन दिलें आहे जास तो .

आलीकडचा, आलीकडला, आलीकडील, वि० अलीकडचा .

आलीकडून, अ० अलीकडून .

आलीकडे, आलीकडेस, अ० अलीकडे .

आलें, न० अलें .

आलेख, न० अलख .

आलेख्य, न० सं० भित्त्यादिकांवर लिहितात जें मनुष्य, देव, पशु, वृक्ष, पर्वत, इ० कांचें स्वरूप तें .

आलेपाक, पु० अलेपाक .

आलेंपालें, न० आलापाला .

आलोकशब्द, पु० सं० राजा चालताना किंवा सभेंत बसला असतां लोकांकडे पाहावें, रामराम द्यावा, इ० अर्थक चोबदार जो शब्द बोलतात तो .

आलोकन, न० सं० अवलोकन .

आलोचन, न० नेत्राची किंवा बुद्धीनें कांहींएक पूर्वेपणें पाहाण्याचा व्यापार तें .

आलोचनजागरण, न० अलोचनजागरण .

आलोडन, न० सं० कांहींएक पदार्थ ढवळण्याचा व्यापार तें; २, ला० ग्रंथादिकांतील तत्त्वसमजावें लपणून अनेकवार अनेक प्रकारें ढवळून पाहण्याचा जो व्यापार तें .

आलोडित, वि० सं० आलोडन केलें आहे जाचे तो .

आलोड्य, वि० सं० आलोडन करायास योग्य जो ग्रंथादिक तो; २, बहुत आलोडन झाल्यामुळें कोणेकास चांगला परिचित झालेला जो शास्त्रादिविषय तो किंवा त्याविषयांत दृढ अभ्यस्त जो पुरुष तो; २, न० शास्त्रादिविषयाचे ठायीं कोणेकाचा असलेला जो दृढ आलोडन व्यापार तें; उ० ज्योतिषांत याचें आलोड्य चांगलें आहे .

आव, पु० आकार, परंतु प्रा० द्वितीय, तृतीय आणि षष्ठ्या अर्थांचून; २, अवसान द्वितीयार्थीं; ३, पदार्थाचा आकार यथायोग्य असल्यामुळें दिसतो जो नीटनेटकेपणा तो; ४, रा० आब .

आँव, स्त्री० (आम-सं०) पोटांत अन्न परिपाक यथास्थित न झाल्यामुळें राहतो जो आमांश तो .

आवई, स्त्री० अवई .

आँवकणें, अवांकणें .

आवगणें, पोर इ० कानें कुलपरंपरागत रीतीची मर्यादा सोडून मनस्वीपणें बर्तूं लागणें .

आवटणी, स्त्री० (आवटणें-) आवटण्याचा व्यापार ती .

आवटणें, नाचणी, वरी, इ० कांचें रोप उपटून रवण लेल्या

लेल्या जमीनीवर चागलें व्हावयासाठीं एकेक काडी टाकणें.

आँवटरणें, न. चर्म, वस्त्र, दोर, इ० पदार्थ वळ्या, पीळ, इ० कारणानीं आटविणें; उ० शिंप्यानें माया अधीक धरून अंगरख्याचें कापड आंवटरलें.

आवटी, स्त्री० पु० अवटी प्रथम तृतीयार्थी.

आवड, स्त्री० कोणेक विषयाविषयीं ह्रापदार्थ चांगला, हामला असावा, असाजो अंतःकरणांत भाव असतो ती.

आवडणें, (आवड०) कोणेकपदार्थ आवडीस विषय होणें.

आवडता, वि० (आवडणें०) जास जा विषयाची आवड तो विषय त्याचा.

आवडतेंशास्त्र, न० (आवडता०शास्त्र०) आपल्यास जात्र कारें कर्मादिकरण्याविषयीं आवड तदनुकूल चमत्कृष्ट कल्पनादि करून काढितात जो शास्त्रार्थ त्यास ल० .

आवडनावड, स्त्री० (आवड०न०आवड०) कांहीं पदार्थाविषयीं आवड आणि कांहीं विषयीं तद्भाव असाजो अंतःकरणांत विषमभाव असतो ती, निषेधविषयीं प्र०

आवडनिवड, स्त्री० (आवड०निवडणें०) आवड नावड या० भक्ष्यपदार्थाविषयीं प्र०

आवडा, वि० (आवडणें०) आवडता.

आँवडा, पु० कों० अंबाडा.

आवडी, स्त्री० ग्रं० आवड.

आँवढा, पु० अंबाडा; २, कों० शोक हर्षानें रडण्याचा जो हुंदका येतो तो.

आवण, न० रा० भात, वांगा, मिरची, इ० कांचें जें रोप तें.

आँवण, न० कों० भात, नाचणी, यांचें रोप.

आँवणी, स्त्री० (आंवणें०) आंवण्याचा व्यापार ती.

आँवणू, वि० कों० (आंवणें०) जांत भाताची आवणी करावी लागते असें जें शेताचें स्थल तो; २, आवणी करून झालेलें जें भात तो.

आँवणें, भाताचें आवण उपटून दुसऱ्या भूमींत लावणें.

आँवतणें, अंवतणें.

आवंतर, वि० अवांतराचा अपभ्रंश.

आवथी, स्त्री० आहुतीचा अपभ्रंश.

आवर, पु० (आवरण सं०) आटोप.

आवरक, वि० सं० आवरण करणारा.

आवरकशक्ति, स्त्री० सं० कोणेक व्यवहारादि आटोपून धरण्याविषयीं उपयुक्त जी शक्ति ती.

आवरजा, पु० अवरजा.

आवरण, न० सं० आवरण्याचा जो व्यापार तें; २, तेणेंकरून पदार्थास होतो जो आवृतपणा तें; ३, वेष्टन.

आवरणदेवता, स्त्री० सं० कोणेक कर्माची मुख्य जी देवता तिचे भोंवती राहाणाऱ्या जा अवांतरदेवता असतात त्या.

आवरणशक्ति, स्त्री० सं० आवरकशक्ति.

आवरणें, (आवरण०) आटपणें प्रथ० द्वि० तृ० षष्ठ्यार्थी; २, आच्छादणें; ३, वेष्टणें;

४, न० हरितालिकेचा पूर्वदिवशीं रात्रीं जो फलाहार करण्याचा व्यापार तें.

आवरशक्ति, स्त्री० आवरकशक्ति शब्दाचा अपभ्रंश; उ० मोठें काम करण्यास आवरशक्ति असेल तो कामाचा.

आवर्जून, अ० (आवर्जन-सं०) अगत्यपूर्वक केलें पाहिजे असा भाव धरून.

आवर्त, पु० सं० नद्यादिकांचें उदक किं० वायु यांचें वर्तुल भ्रमण होऊं लागल्यामुळें जो त्यांचा मंडल वत् आकारविशेष होतो तो; २, शरीरावरील केशांचें वळण जेथें वर्तुल असतें तेथें जो मंडलाकार असतो तो.

आवर्तन, न० सं० ईश्वरप्रीत्यर्थ स्तोत्रादिकांचा जो पाठ करितात तें.

आवर्षीत, अ० उभ्या वर्षांत.

आवलि, स्त्री० सं० कांहीं एकपदार्थांची जी पंक्ति ती; दंतावलि, रोमावलि, पत्रावलि, भ्रमरावलि इ० स०

आवशुद्ध, वि० (आव-शुद्ध) आकारशुद्ध.

आवश्यक, वि० सं० अवश्य केलें पाहिजे, झालें पाहिजे, इ० रूपजें कांहीं एक कार्य तो.

आँवँस, न० (आमिष-सं०) व्याघ्रादिक, बेल, गाय इ० पशु मारून तत्समयीं कांहीं मांस भक्षून अवशिष्ट मांस दुसरे दिवशीं खावयाकरितां जें गरजून ठेविलें तें.

आँवँसावरचा वाघ, पु० (आंवंस-वाघ) आंवंस भक्षायाकरितां आवेशानें चालले लाजो वाघ तो; २, ला० जा विषयाचा भोगा विषयीं चिरकाल उत्कंठा होती त्या विषयावर भोगार्थ चिरकालें ग्रहण झालाजो मनुष्यादि त्यास ल०.

आवसा, पु० कों० (आभास-सं०) कारण.

आवह, वि० सं० प्रापक; सुखाचा प्रापक तो सुखावह, दुःखावह, शोकावह, भयावह, हर्षावह, कल्याणावह, इ० स० प्र०.

आँवळ, वि० अंवळ.

आँवळकटी, आँवळकाठी, स्त्री० अंवळकठी.

आँवळणें, अंवळणें.

आँवळसर, वि० कांहींसाजो आंवळ तो.

आँवळसरा, पु० अंवळसरा.

आँवळा, पु० अंवळा.

आँवळी, स्त्री० अंवळी.

आँवळीभोजन, न० अंवळीभोजन.

आवा, पु० अवा प्रथ० द्वितीयार्थी; आवाउतरणें ल० जिनकीं अपत्यें झालीं त्यांतून एकही नमरतां आईबापाचे देखत श्रोद्दशे येणें; २, रा० भाताचे रोपाचे पृथक् पृथक् लाविलेले पुंजके ते प्र०; ३, स्त्री० अवा तृतीयार्थी.

आँवाँकणें, अवांकणें.

आवाँका, पु० अवांका.

आवाज, पु० ध्वनि रूपजो शब्द तो.

आवाजदार, वि० (आवाज) चांगला आहे आवाज जाचा असा जो मनुष्यादिकांचा कंठ वीणा, घंटा, इ० तो.

आवाजी, स्त्री० अवाजी.

आवाड, न० अवाड.

आवाडाव, स्त्री० अवाडाव.

आवार, पु॰ सं॰ परसूं, इ॰ स्थल आवृत करावयासाठीं भोंवतालाजो कुंपण गडगा, सैन्य समा, वेश, इ॰ करितात तो कि॰ तेणेंकरून आवृत होतें जें तें स्थल तो कि॰ त्या स्थलास होतें जें आवृतत्व तो.

आवास, पु॰ सं॰ कोणेकाचें राहावयाचें जें स्थान तो.

आवाहणें, (आवाहन॰सं॰) आवाहित करणें.

आवाहन, न॰ सं॰ मूर्ति, शस्त्र, इ॰ कांचे ठायीं मंत्रादिकें करून देवतादिकांचें जें संनिहित करणें तें.

आवाहित, वि॰ सं॰ आवाहन केलें जाचें तो.

आवाळूं, न॰ अवाळूं.

आविंज, स्त्री॰ को॰ (आवणें॰) आंवणी.

आविर्भाव, पु॰ सं॰ अव्यक्तपणें स्थित जें कांहीं एक त्याचा जो प्रकटीभाव तो; २, आकार चतुर्थ पंचमार्थीं.

आविर्भूत, वि॰ सं॰ आविर्भाव प्रथमार्थ पावला तो.

आविष्करण, न॰ सं॰ अव्यक्तपणें स्थित पदार्थाचें जें प्रकटीकरण तें.

आविष्कृत, वि॰ सं॰ आविष्करण केलें जाचें तो.

आविष्ट, वि॰ सं॰ ओजेणें स्वप्रवेशद्वारा व्यापला तो तदाविष्ट; लोभानें जो व्यापला तो लोभाविष्ट, कामाविष्ट, कृपाविष्ट, क्रोधाविष्ट, इ॰ स॰ प्र॰.

आवृत, वि॰ सं॰ आवरण केलें आहे जाचें तो; २, स्त्री॰ आवृत्तिचा अपभ्रंश.

आवृत्त, वि॰ सं॰ आवृत्ति केली आहे जाची तो.

आवृत्ति, स्त्री॰ सं॰ विवक्षित कर्माचें तत्तत्क्रियाद्वारा मूलापासून शेवटपर्यंत एकवार जें अनुष्ठान ती एक आवृत्ति; २, जा प्रदेशापासून कोणेकगती स प्रारंभ झाला त्यागतीनें मध्यस्थित क्रमगत स्थानातें संस्कृत करून पुनः त्या प्रदेशपर्यंत यावें इतकें जें गमन ती एक आवृत्ति.

आवेदन, न॰ सं॰ निवेदन.

आवेल, न॰ रा॰ ओल्या नारळाचा कीस यत्किंचित् उन करून त्याचें जें तेल काढितात तें.

आवेश, पु॰ काम, क्रोध, इ॰ कांचा अंतःकरणांत अतिशयपणें होतो जो आविर्भाव तो कि॰ त्या त्या आविर्भावामुळें त्यात्या कर्तव्य कार्यावर वेगानें सदून पडावें असें होतें जें अवस्थांतर तो.

आशंकणें, (आशंका॰सं॰) आशंकायुक्त होणें

आशंका, स्त्री॰ सं॰ कोणेकगोष्ट करण्याविषयीं अंतःकरणास वाटतो जो संकोच ती; २, एथें हा अमुक अर्थ असावा तो कांहीं कि॰ हें अमुक एथेंनसावें तें कांआहे इ॰ रूप कोणेगोष्टीविषयीं उठत्या जी कल्पना ती; ३, किंतू.

आशंकित, वि॰ सं॰ यद्विषयीं कोणेकास आशंका झाली आहे असा जो विषय तो कि॰ जास आशंका उत्पन्न झाली तो.

आशय, पु॰ सं॰ अभिप्राय; २, जा पदार्थाचें उत्पन्न होउन राहावयाचें जें स्थान तो त्याचा; या अर्थीं जलाचा जो आशय तो जलाशय, पित्ताशय, गर्भाशय, इ॰ स॰.

आशा, स्त्री० सं० इष्टपदार्थाचे लाभाविषयीं किंवा इष्टगोष्टींचे सिद्धीविषयीं जी संभावना तद्विशिष्ट जी अंतःकरणवृत्ति ती; २, आत्मसात् झाले ल्या पदार्थाविषयीं याणें आपल्याशीं वियुक्त होऊं नये असा जो भाव असतो ती: उ० आतां या फाटक्या अंगरख्याची आशा कशास धरितोस एखादा दुसरा देऊन टाक; ३, कोणेक पदार्थाविषयीं हा आपल्यास प्राप्त व्हावा असा जो भाव होतो ती: उ० बाजारांत चांगले पेरू पाहिले तेव्हां मासी आशा त्यांजवर गेली; ४, दिशा.

आशापाश, पु० सं० संसारादि दुःखांत गुंतून पडण्यास कारणभूत, या व्यवहारांत मला अमुक लाभ, सुख, इ० होईल इ० रूपजी कोरडी आशा तीस स्त्री०.

आशाबद्ध, वि० सं० आशापाशानें जो बद्ध तो.

आशाभंग, पु० सं० कोणेकानें कांहीं एका विषयीं धरलेल्या आशेचा तें न मिळाल्यामुळें होतो जो भंग तो.

आशाभूत, वि० कांहीं एक भक्ष्यादि पदार्थाविषयीं आशा धरून हलकेपणा येतो हें न गणितां याचनादि करण्याचा स्वभाव जाचा तो.

आशाळभूत, वि० आशाभूत.

आशी, स्त्री० सं० आशीर्वाद; २, वि० जो जातें भक्षणारा तो तदाशी; अमृतानें भक्षणारा तो अमृताशी, विषाशी, अन्नाशी, इ० स० प्र०.

आशीक, वि० (आशा०) जाविषयाची जास फार प्रीति तो त्याचा.

आशीपाशी, अ० आसपास.

आशीर्वचन, न० सं० आशीर्वाद.

आशीर्वाद, पु० सं० कोणेकातें उद्देशून तुला संपत्ति मिळो, आरोग्य होओ, ईश्वरप्रसाद होओ, इ० बरें होओ, इ० रूपजो वाक्यप्रयोग किंवा तशा अर्थाचें मनांतजें चिंतन तो; दे, घे, कर, इ० धातुयोगीं प्र०.

आशीर्वादपत्र, न० सं० ज्यानें वडीलजे पित्रादिकांते लाहानजे पुत्रादिकांस जें पत्र पाठविलें त्यास कागदोपत्रीं स्त्री०.

आशीर्वादार्थ, आशीर्वादार्थक, वि० सं० ईश्वराचें कांहीं स्वरूपवर्णन करून असा जो ईश्वर तो तुमचें रक्षण करो अशा अर्थाचा जो श्लोक, वाक्य, इ० तो.

आशौच, न० सं० कोणी सपिंडादि जन्मला किंवा मेला असतां किंवा त्याचें वहनादि केलें असतां धर्मशास्त्रांत सांगीतल्याप्रमाणें श्रौतादि कर्माविषयीं अनर्हता आणि अस्पृश्यत्व असा जो धर्म मनुष्यांस कांहीं काल प्राप्त होतो तें; २, ग्रहणसमयीं जो तसाच धर्म सर्वांस प्राप्त होतो तें; जन्मल्याचें जें आशौच तें जातआशौच, मृताचें मृताशौच, निर्हरणाशौच, इ० स०

आशौची, वि० सं० आशौच आहे ज्यास तो.

आश्चर्य, न० सं० जी गोष्ट नित्यशः पाहाण्यांत येतना हीं ती पाहाण्यांत आल्यामुळें मनांत जो विस्मयरूप धर्म उत्पन्न होतो तें किंवा ती गोष्ट

आश्चर्यकारक आश्चर्यजनक इ० स० .

आश्रम, पु० सं० ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, सन्यास, हे चारप्र०; २, ऋष्यादिकांचें राहाण्याचें जें पर्णशालादिरूप कि० आसपास चीजमीनसकट्याजें स्थल तो.

आश्रमी, वि० सं० ब्रह्मचर्यादिकांतील अन्यतम आश्रम आहे जास तो.

आश्रय, पु० सं० आधार; २, कोणेकाचे स्थितीस गुणाधायक कि० दोषाधायक जो कोणेकाचा सामीप्यसंबंध तो; उ० अग्नीचा आश्रयास तूप देऊंनको बितुळेल, जलाश्रय, ग्रामाश्रय, वृक्षाश्रय, इ० स०

आश्रयण, न० सं० कोणेकाचा आश्रय धरण्याचा जो व्यापार तें.

आश्रयणें, (आश्रयणं० सं०) आपल्यास त्याचा आश्रय होई अशाप्रकारें कोणेकपदार्थ कि० गोष्ट, इ० स्वसंबंधानें संबद्धकरणें.

आश्रा, पु० आश्रयाचा अपभ्रंश.

आश्रित, वि० सं० जाचा आश्रय जाला आहे तो त्याचा; राजाचा आश्रय जाला आहे तो राजाश्रित, धर्माश्रित, भिक्षाश्रित इ० स०; २, कोणेकानें जो आश्रयिला तो: ३, पु० श्रीमंत लोकांचे पदरीं उपाध्या, कारकून, इ० त्याहून नवेगळा अमुक कामयाणें करावें असुकयास द्यावें असानेंमनकरितां बाळगला असतो जो भिक्षुक ब्राह्मण तो: आश्रितकोद्यंतर्गत, आश्रितांतर्गत, इ० स० .

आश्लिष्ट, वि० सं० आलिंगित .

आश्लेष, पु० सं० आलिंगन .

आश्लेषा, स्त्री० सं० सत्तावीस नक्षत्रांतील जेंनववें . नक्षत्र त्या .

आश्वलायन, पु० सं० आश्वलायन म्हणून ऋषि होता तत्कृत सूत्रानें जाचे कुलांत मौंज्यादि संस्कार होत आले तो .

आश्वासन, न० सं० भयाविष्ट कि० शोकाविष्ट जो त्यास कांहीं चिंता नाहीं, भिऊंनको, मीसंभावीन, इ० वचनादिद्वारा जे धैर्य दान देणात तें .

आश्वासित, वि० सं० आश्वासन दिलें आहे जास तो .

आश्विन, पु० सं० चैत्रापासून सातवा जो मास तो .

आश्विना, आश्विनी, वि० (आश्विन०) आश्विनसंबंधी आदित्यवारादिवार कि० पूर्णिमादि तिथि तो .

आश्विल, न० अस्वल.

आषट्टाळ, वि० अषट्टाळ .

आषाढ, पु० सं० चैत्रापासून जो नववा मास तो.

आषाढपागोळी, स्त्री० आरवाडपागोळी .

आषाढपांटी, स्त्री० (आषाढ०पांटी०) लग्नसाल्यानंतर पहिल्या आषाढांत जांवयास सोंगटी, गंजीफा, इ० खेळ, पोषाख, मेवामिठाई, शिधा, इ० पांटींत भरून समारंभानें पोंहचविणात ती .

आषाढभूती, पु० यानावाचा कोणी पूर्वी भोंदू होता; स्त्री० त्याचेंजें तें जो कास भोंदायाचें कर्मती .

आषाढा, आषाढी, २लिं० (आषाढ·) आषाढसंबंधी वार किं० पूर्णिमादितिथि तो.

आष्ट, पु० एकवृक्षआहे.

आँस, पु० (अक्ष·सं०) अक्षद्वितीयार्थी; २, स्त्री० एकवृक्षआहे; ३, पु० एकवृक्षआहे.

आस, स्त्री० (आशा·सं०) आशा-चतुर्थार्थीचा न.

आसक्त, २लिं० सं० कोणेविषयावर बसलेंजें अंतःकरणादि इंद्रियें किं० तद्विशिष्ट जो पुरुष तो; विषयासक्त, गृहासक्त, भजनासक्त, इ० स०.

आसक्ति, स्त्री० सं० विषयावर आसक्तपणें जी स्थिति ती.

आँसट, २लिं० अस्ट.

आँसड, पु० अंसूड.

आँसडणें, असडणें.

आँसडा, पु० अंसडा.

आँसडी, स्त्री० अंसडी.

आसण, आसणा, पु० असणा.

आसंद, पु० एक औषधी आहे.

आसन, न० सं० बसण्याचा जो व्यापार तें; स्व० आसनी, शयनी, भोजनी, शिंकेचांगली; २, बसायाचे उपयोगी जो पाट, रवुरची, तक्क, कंबल, इ० ते प्र०; कुशासन, दर्भासन, कंबलासन, इ० स०; ३, मनुष्यादिकांचे बसण्याचे जे आसनमांडी इ० अनेकप्रकारते प्र०; वीरासन, पद्मासन, इ० स०; ४, योगसमर्थीचे जे किं० मैथुनसमर्थीचे स्थितीचे जे अनेकप्रकारते प्र०; कुक्कुटासन, मयूरासन, इ० स०; ५, अश्वादिकजे बसायाचें वाहनतें; याअर्थी गरुडआसन जाचें तो गरुडासन, मूषकासन, इ० स०; ६, जे मारण-वीलिहण्यांत तीनीं प्रकरणें निरनिराळीं त्याहायासाठीं भिन्नभिन्नस्थलें त्यात्या प्रकरणाचे नावानीं चिन्हितकरितात तीं प्र०; आसन जडहोणें म्हणजे कांहीं थोरपणा आल्यामुळें आदयतेसचढणें किं० कोणेकानें आसन गुंडाळणें म्हणजे विवक्षितस्थलापासून खटलें आटोपून स्थलांतरास जाणें.

आसनमांडी, स्त्री० (आसन·मांडी·) दोन्हीपायलें दुणून हेंपायुलत्या गुडघ्याशीं आणि तें पायुलत्या गुडघ्याशीं लावुन बसण्याचा प्रकार आहे.

आसन्न, २लिं० सं० समीपवर्ती जो तो.

आसन्नमरण, २लिं० सं० केवळमरायासटेंकलाजो तो.

आसपाशील, २लिं० आसपासचा.

आसपास, अ० (आसमंतात्-पार्श्व·) विवक्षितपदार्थाचे सभोंवता समीपजो प्रदेश त्याचेठायीं.

आसपासचा, आसपासला, २लिं० (आसपास·) आसपासजो स्थित इ० तो.

आँसफळ, न० (आँस·फळ·) आंशीचेंफळ.

आसभास, पु० (भास·द्वि·) होणारजी कोणेकगोष्टिचा ईषन्मात्र जो भास तो.

आसमंतात्, अ० सं० आसपास.

आसमाप्ति, अ० सं० समाप्तिपर्यंत.

आसर, पु॰रा॰ पर्जन्यकाळीं पाउस उघडून मध्यें दिवस दोन दिवस उन पडावें अशी जी काला व स्था येत्ये तो.

आसव, पु॰सं॰ मद्य; २, द्राक्षें, कोरफड, इ॰ औषधी पदार्थांचा अग्निसंयोगानें औषधार्थ जो द्रव काढितात तो.

आसाडी, स्त्री॰ अंसडी.

आसादन, न॰सं॰ विवक्षित कर्मसामग्रीभूत जे पात्रादिक पदार्थ ते भूम्यादिकांवर मांडण्यांचा जो व्यापार तें.

आसादित, वि॰सं॰ आसादन केलें जाचें तो.

आसामदार, वि॰ आसामीदार.

आसामी, स्त्री॰ फडणिशी, पोतनिशी, चिटणिशी, मजुमदारी, इ॰ जा सर्कारी दरकीचा क्या त्या प्र॰; २, त्या त्या कामगारास नेमलेंअसतें जें वेतन त्यासही ल॰; ३, मनुष्यजाती यजा अनेक व्यक्ति त्या प्र॰; याअर्थी प्रा॰ सं॰ संख्यापूर्वक व्यवहार; उ॰ शिपायांचा चारआसाम्या पाठवून द्या; कि॰ पक्षींतन्नज्जाति रूप विशेष्याचे संनिधानीविशेषणही होतें; त्या णीचारआसामी श्रावण पाठवून दिले.

आसामीदार, वि॰ (आसामी·) फडणिशी इ॰ आसामी जास आहे तो; २, अनेक मनुष्य व्यक्ति हाताखालीं घेउन कोणेक व्यवहारीं जो मुख्य असतो तो.

आसार, पु॰ आसारीवर गुंडाळलेला तसाचा तसा च काढला जो वलयाकार रचनाविशिष्ट सूत्रसमुदाय तो.

आसा

आसारी, स्त्री॰ रेशीम, सूत, इ॰ कांचे तंतू जाचे भोंवती गुंडाळतात असें एक आयुध आहे.

आसावरी, स्त्री॰ असावरी.

आसीन, वि॰सं॰ बसलेला.

आसीमांत, अ॰सं॰ विवक्षित ग्रामादिकांचा जा सर्वसीमा तेथपर्यंत.

आसुडणें, आँसुडणें, रूपानें धान्यादिक चारव डणें.

आसुढाळ, वि॰ असुदाळ.

आसुर, पु॰सं॰ असुरसंबंधी कि॰ तत्सदृश लक्षण जे तमोगुणादिविशिष्ट जो स्वभाव कर्म रूप शब्द इ॰ तो.

आसुरविवाह, पु॰सं॰ कन्याविक्रय घेउन निज सहधर्मचारिणी जो विवाह करितात तो.

आसुरी, वि॰सं॰ असुरी.

आसुरीचिकित्सा, स्त्री॰सं॰ देशतारतम्य कि॰ रोग रोगी यांचें तारतम्य, इ॰ न पाहातां केवळ आंगधटाईनें च करितात जो राक्षसी उपायती.

आसूं, न॰ असूं.

आँसूड, पु॰ असूड.

आसूडगोंद, स्त्री॰ असूडगोंद.

आँसें, न॰रा॰ किंकरें.

आस्तरण, न॰सं॰ अंथरण्याचा जो व्यापार तें; २, तेणेंकरून भूम्यादिकांस होतो जो आच्छादितपणा तें; ३, अंथरलेंजातें जें वस्त्रादिक तें.

आस्तरणें, (आस्तरण·सं॰) अंथरणें.

आस्तिक, पु॰सं॰ ईश्वर आहे परलोक, पाप, पुण्य, इ॰ आहेत असें जें वेदशास्त्रमन अनुमन

आहे

आहे जास तो.

आस्तिक्य, न॰ सं॰ आस्तिकपणा.

आस्तीर्ण, ३ लिं॰ सं॰ आस्तरण घालें आहे जाचें तो वस्त्रादिक किं॰ स्थलादिक तो.

आस्तृत, ३ लिं॰ सं॰ आस्तीर्ण.

आस्था, स्त्री॰ सं॰ कोणेकगोष्टीविषयीं हें साध्यकरावें किंवा करावें असा जो औदासिन्यप्रतिपक्षी भाव असतो ती; २, आशा.

आस्थेवाईक, ३ लिं॰ (आस्था॰) कोणेकगोष्टीविषयीं जास पोटाग्र आहे तो.

आस्पद, न॰ सं॰ स्थान; परंतु हर्ष, शोक, भय, इ॰ कांचे प्राप्तीचें जें स्थान ल॰ प्रापक जें कर्मादि तद्विषयीं समासीं प्र॰; उ॰ हें कर्म तुलीं करितांच रें परंतु परिणामीं दुःखास्पद होईल. हर्षास्पद, आनंदास्पद, शोकास्पद, रूरवास्पद, इ॰.

आस्रा, पु॰ आश्रा; २, स्त्री॰ जलदेवता; या अर्थीं नित्य अनेकवचनांत.

आस्रल, स्त्री॰ न॰ अस्रल.

आस्राद, पु॰ सं॰ स्राद.

आस्रादणें, (आस्रादन॰ सं॰) कोणेकपदार्थाचा स्रवणें किं॰ टुंगणें.

आस्रादन, न॰ सं॰ आस्रादण्याचा जो व्यापार तें.

आस्रादित, ३ लिं॰ सं॰ आस्रादिलाना तो.

आहणा, पु॰ (आह॰ सं॰) धाडेसून घरासारिखी, मीं सासूबाईंतुल्यासारिखी, इ॰ जा स्नणी त्या प्र॰; २, विवाहांतस्त्रियांनीं, शिमग्यांतपुरुषांनीं, थट्टेनें एकमेकास बोलायाचीं यमकविशिष्ट कूसवाक्यें आहेत तीं प्र॰.

आह

आहन, ३ लिं॰ सं॰ आघातविशिष्टकेलाना तो.

आहत्य, अ॰ सं॰ अगत्यपूर्वक.

आहरण, न॰ सं॰ आनयन.

आहर्ता, ३ लिं॰ सं॰ आहरणकर्ता.

आहळींव, न॰ अहळींव.

आहा, आहाहा, अ॰ अहा.

आहार, पु॰ सं॰ प्राणवृत्त्यर्थ भक्षणीय जें अन्नादितो; २, तें अन्नादि खाण्याचा जो व्यापार तो; दुग्धाहार, फलाहार, धान्याहार, इ॰ समास॰; ल॰ आहारीं व्यवहारीं भीडन साधी; ३, अजगर स्नणून सर्प आहे; ४, बहुत इंधनें जळतीं असतां जमनो जो निखाऱ्यांचा समुदाय तो; कोणेकक र्म किं॰ मनुष्यादिक कोणेकाचे आहारीं असणें स्नणजे खेंपायाजोगें असणें.

आहारणें, आरणें.

आहार्यारोप, पु॰ सं॰ कोणेकपदार्थ जो वस्तुतः यत्स्वरूपनव्हे असें समजतअसतांही बुद्ध्या जो त्याचाठायीं तत्वबुद्धिविषयतेचा आरोप तो, हें मनुष्यानें राक्षसाचें सोंगघेतलें आहे असें समजतअसतांही आहार्यारोपानें हा राक्षस रा क्षस असा व्यवहार होतो.

आहाळींव, न॰ अहळींव.

आहिन, ३ लिं॰ सं॰ आधानकेलें जाचें तो.

आही, स्त्री॰ अही.

आहुति, स्त्री॰ सं॰ देवतोद्देशेंकरून अग्नि, भूमि, मुख, उदक, इ॰ कांचाठायीं एकेकवार टाकितांनजें चरु, घृत, तिल, इ॰ द्रव्य तीं.

आहून, ३ लिं॰ सं॰ आव्हानकेलें जाचें तो; २.

स्त्री॰

२, स्त्री० आहुतीचा अपभ्रंश.

आहुत, ३ लिं० सं० आहरण केलें जाचें तो.

आहेआहेनाहींनाहीं, केवळ नांहींच असें म्हणण्यास नमावयापुरतें मात्र कोणेकपदार्थाचें अस्तित्व जेव्हां वर्णनीय आहे तेव्हां तत्पदार्थापुढें त्या क्रियापदसमुदायाचा प्र० होतो; उ० आशेचा मध्यें स्नानसंध्या म्हणजे काय आहे आहे नाहीं नाहीं.

आहेपणा, न० **आहेपणा**, पु० अस्तित्व.

आह्निक, न० सं० ब्राह्मणादिकांचें स्नानसंध्यादि नित्यकर्म तें.

आह्लाद, पु० सं० कांहीं झाल्यामुळें होतोजो आनंद तो.

आह्लादक, ३ लिं० सं० कोणेकास आह्लाद करणारा जो तो.

आह्लादणें, (आह्लादन० सं०) आह्लादित करणें.

आह्लादन, न० सं० आह्लाद करण्याचा व्यापार तें.

आह्लादित, ३ लिं० सं० आह्लादयुक्त केला तो.

आह्वान, न० सं० आमंत्रण.

आळ, स्त्री० पु० अपवाद प्रथमार्थी; २, स्त्री० कों० वडील, प्रभु, इ० कांपाशीं लाडिवाळपणें कांहीं एकगोष्टीविषयीं घेतलेला जो हट तो; ३, ग० आबो; ४, पु० अळा प्रथमार्थी.

आळण, न० अळण; २, आळवण.

आळणें, पदार्थाचे अंगांतील द्रवांश, अग्नि, वायु, किं० इतर शुष्कपदार्थ. इ० योगानें कमी झाल्या झाल्यामुळें तो पदार्थ पूर्वापेक्षां घट्ट किं० शुष्क होणें किं० तो द्रवांश न्यून होणें.

आळवण, न० (अळणें) भाजी. इ० पातळ झालेली असतां आळावयासाठीं आंत घालितात जें पीठ, इ० कोरडा पदार्थ तें.

आळवणें, दाता, प्रभु, मूल, ईश्वर, इ० कांस वेडीं वांकडीं तोंडें करणें. इ० अभिनयपूर्वक दीन, बोबडे शब्दांनीं प्रसादित करणें; २, गीत वस्तु जें राग आदिकें अभिनयादिपूर्वक जसीजसी त्यास गोडी येईतसेंतसें पुनः पुनः फेरून फेरून म्हणणें.

आळशा, ३ लिं० रा० (आळ०) जाणें भलत्याच गोष्टीविषयीं आळ घेतलेली असतांही पित्रादिकांनीं चालवावयास योग्य असें जें असमंजसमलहानमूल तो.

आळशी, ३ लिं० (आळस०) स्वभावानें जो आलस्ययुक्त तो; स्त्री० आळशाचें काम आणि तो भ्याचा गुण व धर्म.

आळस, पु० (आलस्य० सं०) उद्योग करण्याविषयीं कंटाळावयास कारणभूत जो अंगीं शैत्यादियोगानें मंदपणा येतो तो; २, हेगई.

आळसट, ३ लिं० (आळस०) आळशासच्या प्रसंगविशेषीं स्त्री०.

आळसणें, (आळस०) आळसानें युक्त होणें.

आळसावणें, आळसणें.

आळा, पु० अळा.

आळाबांधा, पु० (आळा०बंधन०) कोणेक व्यवहारास व्यवस्थादिरूप असतो जो नियम तो.

आळी, स्त्री० (आलि० सं०) घरें, दुकानें, इ० कांची

ओ

जी ओळ ती कि० दोहींकडे दोन ओळी आणि मध्यें मार्ग एवढा जो ग्रामादिकांचा विभाग ती.

आळीकर, ३लिं० (आळी-) एके आळींत राहाणारे जे मनुष्य तेपरस्पर.

आळू, पु० दे० सुलाची अड.

आळेपिळे, पु० अळेपिळे.

आक्षिप्त, ३लिं० सं० आक्षेप केला जाचा तो.

आक्षेप, पु० सं० आशंका हितीयार्थी; २, असन्निहित किं० असिद्ध जो कोणी एक पदार्थ त्याचे सन्निधानादिरूप संबंधास विवक्षित कर्म करण्याविषयीं मानिनाता जी अवश्य निमित्तना तो; उ० हा माल गिऱ्हाईक आला त्याजविकूनताका माझा आक्षेप करूंनका.

आक्षेपून, अ० (आक्षेप-) आवर्जून.

आज्ञप्त, ३लिं० सं० आज्ञापिलाता.

आज्ञप्ति, स्त्री० सं० आज्ञा.

आज्ञा, स्त्री० सं० वरिष्ठजे धनी, वडील, इ० ते स्वनियम्य जे सेवक, पुत्रादिक, त्यांस उद्देशून तूं असें हें कर, हें नको करूं, इ० रूप वाक्य प्रयोगानीं प्रवृत्तिनिवृत्तिविषयीं करिनात जो विधि ती; राजादिकानीं सेवकादिकांस कांहीं गोष्टीविषयीं आज्ञा केली असतां सेवकादिकानीं होय त्या वाचे जागीं याचा प्रयोग करितात: राजाज्ञा, ईश्वराज्ञा, शास्त्राज्ञा, इ० आज्ञेचा जो उल्लंघ तो आज्ञोल्लंघ, आज्ञोल्लंघन, ने करणारा तो आज्ञोल्लंघी, इ० स.

आज्ञांकित, ३लिं० सं० जो जाचे आज्ञेत वर्तणारा तो त्याचा.

आज्ञाधारक, आज्ञाधारी, ३लिं० आज्ञांकित.

आज्ञापणें, (आज्ञापन-सं०) कोणे कास कोणे कर्मा विषयीं आज्ञाधिशिष्ट करणें; पक्षीं त्या कर्मा सहीं कर्मना येतें: उ० प्रधानास राज्यकर्म आज्ञापून राजा आपण ईश्वराचे ध्यान करीत बसला.

आज्ञापक, ३लिं० सं० आज्ञा करणारा जो धनी इ० तो.

आज्ञापत्र, न० सं० सर्कारांतून प्रजा, सेवक, यांस एतच्छब्दपूर्वक कोणी कर्मा चे आज्ञा विषयीं जें पत्र लिहून पाठविनात तें: २, सेवकादि नियम्यांनां कोणी साधारण पत्र पाठविनात त्यास ते सेवकादि स्व०.

आज्ञापन, न० सं० आज्ञा करण्याचा व्यापार.

आज्ञापालक, ३लिं० सं० आज्ञांकित.

आज्ञापित, ३लिं० आज्ञप्त.

आज्ञाप्य, ३लिं० सं० आज्ञापायास योग्य जो कोणी तो सेवक किं० कर्म तो.

आज्ञाभंग, पु० सं० आज्ञाविरुद्ध वर्तल्याने त्या आज्ञेचा होतो जो भंग तो.

इकडचा, इकडला, ३लिं० (इकडे-) इकडेजो स्थित इ० तो.

इकडील, ३लिं० इकडचा.

इकडून, अ० इकडे एतच्छब्दवाच्याजें अधिकरण तेथून.

इकडे, इकडें, अ० (हा-कड-) विवक्षित स्थलादिकांचा आपल्या कडील जो दिग्भाग तेथें.

इकडेस, अ० इकडे.

इकुडचा, इकुडना, ३लिं० इकडचा.

इकून, अ० इकडून.

इंगरेज, पु० इंग्रज.

इंगरेजी, ३लिं० इंग्रजी.

इंगळ, पु० (अंगार-सं०) निखारा.

इंगळा, पु० कों० इंगळ; २, भुंगळ्यांत एक जाति आहे.

इंगळी, स्त्री० (इंगळ-) विंचूंत एक भेद आहे जो शरीरानें मोठा आणि वर्णानें काळा असतो तो.

इंगा, पु० चर्मकाचें चर्म घोटायाचें एक आयुध आहे; कोणे कावर इंगा फिरणें म्हणजे दर्पपरिहार व्हावयाजोगे एखादे कचाटींत सांपडणें; २, नांगरलेल्या जमिनीवरचीं ढेंकळें फुटून सारखीं करण्याकरितां जें वर मोठें लांकूड फिरवितात तो.

इंगित, न० सं० मनांत कांहीं अभिप्राय आला असतां त्याचा ज्ञापक जो शरीरावर आकार होतो ते किंवा तज्ज्ञाप्य जो तो अभिप्राय तें.

इंगितज्ञ, ३लिं० सं० आकारावरून अभिप्राय जाणणारा जो चतुर तो.

इंग्रज, इंग्रेज, पु० टोपीवाल्यांत एक जाति आहे; २, न० पोलाद म्हणून लोखंडांतें.

इंग्रजी, इंग्रेजी, ३लिं० (इंग्रज-) इंग्रजसंबंधी कागद, दारू, शस्त्र, भाषा, लिपी, वेष, इ० तो; २, स्त्री० राज्यावर इंग्रजांचें आधिपत्य चालविणारी व्यक्ति ती.

इच्छा, स्त्री० सं० कोणेक गोष्टीविषयीं हें आपण करावें, एवढी चढाओढ, इ० रूप कि० कोणेक पदार्थविषयीं भोगावें, अनुभवावें, मिळवावें, इ० रूप जो अंतःकरणांत भाव उठतो ती; इच्छापुरःसर, इच्छापूर्वक, इ० स०; २, त्रैराशिकांत प्रमाणसजातीय जो राशि ती; उ० पांच रुपयांस दोन मण तेल्हां चार रुपयांस किति एथें पांच हें प्रमाण आणि चार ही इच्छा.

इच्छातृप्त, अ० (इच्छा-तृप्ति-) इछेची तृप्ति होई इतकें जेवणें, खाणें, इत्यादि मिळविणें, इ० कांचें वि०.

इच्छाभोजन, न० सं० ब्राह्मणानें इछिलेला पक्वान्नादि पदार्थ तो सिद्ध करून तद्विशिष्ट इच्छातृप्त जें त्यास भोजन घालिणें तें.

इच्छामरण, न० सं० इच्छामरणी लोकांचें जें मरण तें.

इच्छामरणी, ३लिं० (इच्छामरण-) आपल्यासमरावें अशी जेव्हां इच्छा होईल तेव्हांच मरण यावें अशी ईश्वरप्रसादानें जास योग्यता आली असते तो.

इच्छिणें, (इच्छा-सं०) कोणेक पदार्थ कि० गोष्ट इच्छाविषय करणें.

इच्छित, ३लिं० सं० इच्छिलाजो तो.

इच्छु, ३लिं० सं० इछिणारा ब्रा० स० प०; उ० विद्येच्छु, द्रव्येच्छु, मोक्षेच्छु, इ०.

इजत, स्त्री० अब्रू.

इजतराखु, इजतघेणा, ३लिं० (इजत-राखणें-घेणें-) जाचे आश्रयास राहतो त्याचे प्रतिष्ठेचा डोळा घालविरा जो सेवक, वस्त्र, घोडें, इ० तो.

इजनीचा, २लिं० (इजन०) आवरूचा.

इजमायली, २लिं० कों० यथाकथंचित् कांहीं काल निर्वाह व्हावयाजोगें केलेलें जेंगृह, भिन्न, भूमि, इ० तो.

इजा, स्त्री० हिं० उपद्रव.

इजाफतजमा, स्त्री० महाल, प्रांत, इ० जेनेमलेले वेगळे वेगळे तनरखे असतात एकेतनरख्यांत दुसरे तनरख्यापैकीं कांहीं कारणास्तव वहिवाट चालली असतां तत्संबंधी होतेजी जमा ती.

इजाफती, २लिं० हिं० इजाफतजमेसबंधीजें तो.

इजाबिजातिजा, होणें, सांगणें, धातुयोगीं प्र० अ० कोणेकगोष्ट एकवेळ, दोनवेळ, तीनवेळ, होणें, सांगणें, इ० कांचें वि०.

इजायली, २लिं० कों० सागवानाबांचून इतरजातीचें इमारतीचे उपयोगी जें लांकूड तो; २, तेणेंकरून बांधलेलें जें घर, गलबत, इ० तो.

इजार, स्त्री० हिं० कंबरेपासून पायांचे घोट्यापर्यंत शरीर झाकावयाजोगें चोळण्यासारखें परिधानीयवस्त्र करितात ती.

इजारदार, पु० (इजारा०) कोणेकव्यवहाराचा इजारा जाणें केलाआहे तो.

इजारा, पु० हिं० व्यवहाराचा धनीजो सर्कार, इ० त्यास उक्तें द्रव्य द्यावयासकरून तोटा नफा सर्व आपलेंअशी जी तोव्यवहार पत्करून घेण्याविषयीं बोलीकरितात तो.

इजितपत्र, न० (विजितपत्र०) जितपत्र.

इजीतजाणें, (विजित०जाणें०) हारजाणें.

इटकर, न० (ईट०) इटेचाजो तुकडा तें; २, स्त्री० पु० इटेचाजो बारीकचूर ती तो.

इटकूर, न० स्त्री० इटकर

इटबंदी, २लिं० (इट०बंधन०) इटांनी बांधलेलें जें भिंताड, धक्का, इ० तो.

इटा, पु० भाल्यासारखें एकशस्त्र आहे.

इटाळें, न० (ईट०) मातीचा इटा घालावयाचा लांकडाचा सांचा असतो तें.

इटी, स्त्री० चारमाबोटें लांब क्रीडार्थ दांडूनें उडवावयाचा लांकडाचा तुकडा असतो ती.

इटीदांडू, इटूदांडू, पु० इटी आणि दांडू मिळून जें क्रीडासाधन तें.

इटेकरी, पु० (इटा०) इटा घालणाराजो शिपाई तो.

इठाळ, स्त्री० रा० (ईट०) तक्रादिकास चमत्कारी कवास लागावास म्हणून लालहोईतों तापवून वरलोणी, मोहऱ्या, इ० घालून त्यातक्रादिकांत बुडवितातजो इटेचा कि० चोपट दगडाचा तुकडा ती.

इडनिंबू, न० ईडम्हणूनजें फल तें.

इडा, स्त्री० सं० शरीरांतएकनाडी आहे.

इडापिडा, स्त्री० (पिडा०हि०) झाडून सर्वजी पिडा ती; जाणें, नाहींशी होणें, दूरहोणें, इ० योगीं प्र०; स० इडापिडाजाओ आणि बळीचें राज्यहोओ.

इतउपर, अ० (इतःउपरि०) इतःपर.

इतका, २लिं० (इयत्०सं०) हें अशाप्रकारें दर्शित जें परिमाण कि० संख्या तद्विशिष्ट तो.

इतपत, २लिं० इयत्परिमित.

इतःपर, अ॰सं॰ अतःपर.

इतबार, पु॰ विश्वास.

इतमाम, पु॰हिं॰ आपलेसंपत्त्यनुसार जें आप त्याजवळ दास,दासी,घोडीं, पालखी, इ॰ खटलें असतें तो.

इतर, वि॰सं॰ अन्य.

इतरत्र, अ॰सं॰ अन्यत्र.

इतरथा, अ॰सं॰ अन्यथा.

इतराजी, स्त्री॰हिं॰ अवकृपा.

इतलाख, वि॰हिं॰ स्वस्वामिभाव,विधिविषयता,इ॰ रूपजे संबंधतद्दानूजेत्यांहूनजो निराळेपणाने स्थित तो.

इतल्ला, पु॰ अनुमतविशेष्यार्थी.

इतस्ततः, अ॰सं॰ इकडेतिकडे किं॰ इकडूनतिकडून.

इतिकर्तव्यता, स्त्री॰सं॰ कोणेककर्मांचें मुळापासून क्रमाने शेवटपर्यंत असतेंजें अनुष्ठानजात तो.

इतिक्रिया, स्त्री॰सं॰ इतिकर्तव्यता.

इतिश्री, स्त्री॰ समासीस्त्र॰

इतिहास, पु॰सं॰ पूर्वी झालेलेंजें प्राचीन कांहींएक वृत्त त्याचीजी कथा तो;२, विवक्षित गोष्टीचें जें इत्थंभूत वृत्तत्यास स्त्र॰.

इतुका, वि॰सं॰ यं॰ इतका.

इत्थंभूत, वि॰सं॰ जाप्रकारें जितकी कोणेक गोष्ट झाली त्यांतील एकही अंशनगळतांजसेंचेतसें सकलजें कांहींवृत्त तो.

इत्यर्थ, पु॰सं॰ कोणेकगोष्टीचा सारांशभूत सिद्धांतरूपजो भर्थतो.

इत्यादि, इत्यादिक, वि॰सं॰ संनिहितउच्चारितजो कांहींएक अर्थ तोआहेआदिभूतजास तो.

इथचा, इथला, वि॰(इथे) यास्थलींचा.

इथपर्यंत, इथपावेतों, इथवर, अ॰(इथें) यास्थलपर्यंत.

इथून, अ॰(इथे) यास्थलापासून.

इथें, अ॰ एथे.

इदंकारास्पद, न॰सं॰ अहंकारास्पदाहून इतरजो ज्ञेयविषय तें.

इदमित्थ, न॰सं॰ कोणेकगोष्टीचा हाउपक्रम, हाउपसंहार,हेंप्रमेय,हाहेतु,ही इतिकर्तव्यता, इ॰ सर्वजो ज्ञेयांश तें.

इदमित्थज्ञान, न॰सं॰ इदमित्थविषयकजें ज्ञान तें.

इदानींतन, वि॰सं॰ एव्हांचाजो तो.

इंदु, पु॰सं॰ चंद्र; मुखेंदु, वदनेंदु, पूर्णेंदु, इ॰स॰.

इंदुवार, इंदुवासर, पु॰सं॰ सोमवार.

इंदुरी, वि॰(इंदूर) इंदूरसंबंधीनगर आहे तत्संबंधीजें वस्त्र, बुका, इ॰ पदार्थ तो.

इंद्र, पु॰सं॰ स्वर्गीदेवांचा राजा देव आहे;२, राजा;३, जासमुदायामध्येंजो श्रेष्ठ तो त्यामध्यें; याअर्थी विप्रेंद्र, मृगेंद्र, कपींद्र, पक्षींद्र, पुरुषेंद्र, इ॰स॰.

इंद्रकट, न॰कों॰ अढ्यापासून पांरव्यांनेरवलीं आलेजे वांसे,ते टेंकून राहाया साठीं तुळ्यांचे टोंका

टोकावर आडवें एकलांकूड बसविलें असतें तें.

इंद्रकापशी, स्त्री॰ कापशीचा एक भेद आहे.

इंद्रगेळ, न॰ पायांचे घोटयाचा जो प्रदेश तो.

इंद्रगोप, पु॰ सं॰ पर्जन्यकाळीं उत्पन्न होत्ये अशी कृमिजाति आहे.

इंद्रचाप, न॰ सं॰ मेघमंडलावर किं॰ इतरत्र उडतांजे उदकाचे तुषार त्यावर सूर्यकिरणादि योगानें दिसतो जो धनुष्याकार तें.

इंद्रजव, पु॰ (इंद्रयव॰ सं॰) कुडयाचें बीं.

इंद्रजाल, न॰ सं॰ नाहीं तें दिसावें, आहे तें दिसूं नये, इ॰ चमत्कारकारक मंत्रविद्या आहे.

इंद्रध्वज, पु॰ सं॰ संवत्सरप्रतिपदेचे दिवशीं उभारतांजी गुढी तो.

इंद्रमडें, इंद्रमढें, न॰ केवळ अशक्त रोडका जो मनुष्य त्यास ल॰

इंद्रवारुणी, स्त्री॰ सं॰ कडूकवंडळ.

इंद्राटी, स्त्री॰ इंद्रकट.

इंद्राणी, स्त्री॰ सं॰ इंद्राची बायको; ल॰ इंद्रफिरनोपण इंद्राणी फिरतनाहीं.

इंद्रिय, न॰ सं॰ श्रोत्र, चक्षु, रसना, घ्राण, त्वक्, हीं जीं ज्ञानसाधनें पांच आणि हस्त, पाद, पायू, उपस्थ, वाक्, हीं जीं पांच कर्मसाधनें तीं ग्र॰ मनासहीं कोणी ल॰; इंद्रियगोचर, इंद्रियविषय, इंद्रियजन्य, इंद्रियवैकल्य, इ॰ कर्णेंद्रिय, नेत्रेंद्रिय, ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय, इ॰ स॰; २, पुरुषाचें लिंग तें.

इंद्रियजुलाब, पु॰ (इंद्रियजुलाब॰) मूत्रदाह.

इंद्रियदमन, न॰ सं॰ इंद्रियें विषयाकडे न धांवत असें

असें योगसाधनाद्वारानें त्यांचें जें स्थिरीकरण तें.

इंधन, न॰ सं॰ अग्निपेटवायाचें साधन जें काष्ठ. गोवरी, इ॰ तें.

इधरतिधर, अ॰ (कर॰ मांड॰ लाव॰) (इधर-तिधर॰ हिं॰) कोणी सांगितलेलें काम मनांत करायाचें नसलें ल॰ जे चुकवा चुकव, बयाज, इ॰ करणें.

इनसाफ, पु॰ हिं॰ यथानीति जो न्याय तो.

इनसाफी, वि॰ (इनसाफ॰) इनसाफ करण्याविषयीं जो चतुर तो कि॰ न्याय्य जें भाषणादिक तो.

इनाम, न॰ राजादिक सेवकादिकांवर प्रसन्न झाले असतां देतांजें वस्त्रभूषण, घोडे, भूमि, इ॰ तें; २, देवब्राह्मण इ॰कांस स्वकल्याणार्थ स्वस्वत्वनिवृत्ति करून देतांजी भूमि तें; ३, अ॰ स्वामिभाग देवुंनये अशा प्रकारानें देणें, घेणें, रखाणें, सोडणें, इ॰ कांचें वि॰; उ॰ आजपर्यंत हा माड याणें इनाम राखला आलीं गाईचें दूध काढीत नाहीं बोलरें इनाम पीतात.

इनामइक्राम, न॰ इनाम इ॰ तें.

इनामत, स्त्री॰ (इनाम॰) इनामदिलेली जी भूमि ती.

इनामती, वि॰ (इनामत॰) इनामतरूपजो गांव, शेत, इ॰ तो.

इनामदार, वि॰ (इनाम॰) फलोपभोग्य जो भूम्यादिपदार्थ तो आहे इनाम जास तो.

इनामपट्टी, स्त्री॰ (इनाम-पट्टी॰) सर्कारांत कांहीं अडचण पडल्यावुंजें एरवा देवर्षी इनामदारां पासून

पासून कांहीं वसूल घेतात ती.

इनामपत्र, न० (इनाम-पत्र०) कोणास भूम्यादिक इनामादिलें असतां हें तुजकडे पुत्रपौत्रादि वंश परंपरेनें चालेल इ० रूपजें साधनार्थ पत्रक रुन देतात तें.

इनामी, वि० इनामती; २, इनाम जमीन इ० जा सआहे तो.

इभ्रत, स्त्री० हा कोणतें वेळेस काय करील न कळे अशेंमानून लोकांनीं वचकत असावें असा पराक्रमादि गुणामुळें अंगीं योग्यता विशेष आलाअ सतो ती.

इभ्रतीचा, वि० (इभ्रत०) जाचीलोकांनत्तोटी इभ्रतआहे तो.

इमला, पु० स्वतःसिद्ध जो भूमि तूनभाग तोसो डून मनुष्यकृतीनें केलेलें जें घर, बिहीर, भिंत, धक्का, इ० बांदिल्लीचें काम तो.

इमान, न० हिं० सत्य.

इमानी, वि० (इमान०) सत्यशील जो मनुष्या दिनो.

इमामदांडगा, पु० लढाऊ मिश्र.

इमारत, स्त्री० हिं० दगड, चुना, इटा, माती, लांकूड, इ० कानीं बांधून केलेलें जें गृह, बिहीर, इ० स्थावर ती.

इयतू, वि० सं० इतका; इयत्काल, इयत्परिमाण, इ० स० प्र०.

इयत्ता, स्त्री० सं० इतकेपणा.

इरजा, पु० इरजीक संबंधी कामावर यावयाचा जो माणूस किं० बैल तो.

इर

इरजीक, स्त्री० शेत इ० कामावर आपल्यास अने कमनुष्य कि० बैल यांचीगरज लागल्यास दुसऱ्या चीं आणावी आणि त्यास गरज लागेल तेव्हां आपणाचीं असा कामकरण्याचा जो प्रकार ती.

इरडु, स्त्री० गांवदरीस पडलेलें जें उष्टेंपाष्टें, विष्ठा, इ० तें गुरांनीं भक्षिण्याचा जो व्यापार ती.

इरली, स्त्री० लहानजें इरलें ती.

इरलें, न० पर्जन्यनिवारणार्थ डोकीवर घ्यायाकरितां कामटांचा सांगाडा करून पळस इ० कांचे पानांनीं शिवून रचलेलीसारिखा पदार्थ करितात तें.

इरसाल, वि० (वि०रसाल०) सजातीय इतरफलांपेक्षां गोडी इत्यादि गुणानीं उत्कृष्ट जें अंबा, फणस, इ० फल किं० त्यांचीं झाडें तो; २, अतृल.

इरारवत, स्त्री० मूत्र किंवा मूत्रोत्सर्ग ती.

इरादा, पु० हिं० आपण अमुक करावें असा जो मनांत कांहीं कर्तव्याविषयीं हेतू उद्भवा अस तो; २, कोणेकावर सत्ता चालावी, कोणेकाचें बोलणें, इ० सोसावें, कोणेक कर्म पाहिजे तसें करावें, इ० किंवा एक गोष्टींविषयीं कोणेकाचे अंगीं अधिकारपरत्वें असनेजी योग्यता.

इरे, स्त्री० ईर.

इलम, पु० हिं० उपाय; २, हुनर; ३, ऐंद्रजालिक आपल्याविद्येनें कांहीं करितातजो चमत्कार तो.

इलमी, वि० (इलम०) अनेकप्रकारचे इलम जो जाणतो तो.

इलाखा, पु० कोणेकविषयावर कोणेकाचा अ

सतो

सतो जो स्त्रीआदिसंबंध तो; २, पालखीचे दांडीस जे लहान लहान गोंडे लाविलात ते म०.

इलाची, पु० एक तऱ्हेचें उंचेंकापड आहे.

इलाची, स्त्री० (एला·सं०) एलदोडयाचा जोस मुद्राय ती; २, एला.

इलाचीदाणा, पु० (इलाची·दाणा·) इलाचीची बी आंत घालून करितात जो साखरफुटाणा तो.

इलाज, पु० हिं० उपाय.

इलायची, स्त्री० एला.

इलावृत, न० सं० नवखंडांतील एक खंड आहे.

इलिसा, २लिं० इवलासा.

इवला, २लिं० मूठभर, चिमटीभर, नरवभर, इ० अल्पप्रमाणकर्जे कांहीं एक द्रव्य तो.

इवलासा, २लिं० (इवला·असा·) इवला.

इवलिसा, २लिं० इवलासा.

इशारत, स्त्री० कोणेकगोष्टीविषयीं कोणेकास कटाक्षादिद्वारा जें सूचन ती.

इशारा, पु० इशारत.

इशी, स्त्री० (इशा·) मुलाचे भाषेनें मलोत्सर्ग किं० मल यांस ल०.

इशीम, स्त्री० आपलेंनाव, लौकिक, इ० रक्षणा विषयीं आपल्यास असतोजो अभिमान ती.

इश्श, इश्शो, अ० दुर्गंधयुक्त ओंगळ बीभत्स असा कांहीं एक पदार्थ दृष्टयादिगोचर झाला असतां तिरस्कार द्योतक हाउद्गार निघतो.

इष्क, पु० इष्क.

इष्कपेंच, पु० एकशोभिवंतलता आहे.

इष्क

इष्कबाज, २लिं० हिं० इष्कबाज.

इष्क, पु० हिं० शृंगाररसणून जोरस तो; २, कोणेकविषयाचा कोणेकास लागलाअसतो जो छंद तो; भा० शृंगारप्रधान आणि क्रीडाप्रधान जेपदार्थ तद्दर्शि.

इष्कबाज, २लिं० (इष्क·) इष्काकडेसनिरंतर लक्ष्यजाचें तो.

इष्की, २लिं० इष्कबाज.

इष्ट, २लिं० सं० आपल्ये इछेनें विषयीकृतजो कांहींएक अर्थ तो; उ० तुलीं इष्टअंकमनांतधरा तोमीं सांगतों कि० कोणेककर्म करण्या विषयीं क्षमुहूर्तत्वेंकरून धरिलेलाजो काल, लग्न, घटिका, नवमांश, इ० तो; ३, आपलेअंतःकरणास अनूकूल असा वाटतोजो कांहीं एक अर्थ तो; उ० तुलीं बोलतां हींगोष्ट आम्हास इष्टआहे; ४, आपल्यास हितावह जो ग्रह, काळ, देव, इ० तो; ५, पु० मित्र; इष्टंधर्मेणयोजयेत्; इष्टाचेंजेंदर्शन तें इष्टदर्शन, इष्टमंडळी, इ० स०; ६, सं० न० यज्ञयागादिक होमप्रधानजेंकर्म तें; ७, स्त्री० इष्टीचा अपभ्रंश.

इष्टदेवता, स्त्री० इष्टदैवत, न० सं० ज्याची भक्ति जादेवावर तो त्याचें.

इष्टपंगत, स्त्री० (इष्ट·पंगत·) श्राद्धादिकर्मांगजें ब्राह्मणभोजन तें झाल्यानंतर यजमान आपले इष्टमित्रांसहवर्तमान करितोजो भोजन समारंभ ती.

इष्टभोजन, न० इष्टपंगत.

इष्ट

इष्टमित्र, पु॰सं॰ मित्र, सोयरा, धायरा, इ॰ तो.

इष्टापत्ति, स्त्री॰ सं॰ आपल्यास अनुकूल जो कांहीं एक अर्थ त्याचीजी सिद्धि ती.

इष्टापूर्त, न॰ सं॰ यज्ञयागादिक आणि अश्वत्थ वटोद्यापनादिक असें उभयविध जें कर्म तें.

इष्टि, स्त्री॰ सं॰ एक अग्निहोत्राचें कर्म आहे.

इष्टिका, स्त्री॰ सं॰ ईट.

इसंने, २ लिं॰ हिं॰ दोन, यवनी वर्षाविषयीं प्र॰.

इसप, पु॰ एक गजकर्णासारिखा रोग आहे जो प्राहातापायांवर होत असतो.

इसपगोल, इसबगोल, पु॰ एक औषधी बीं आहे.

इसब, पु॰ इसप; २, गोविंडासारिखा एक किडा आहे.

इसम, स्त्री॰ कों॰ इशीम.

इसाड, न॰ (ईषा·सं॰) नांगराचे जो कडास बांधाया चें जें लांब लांकूड असतें तें; २, एक झाड रबालीं कांहीं बुंधा राखून तोडून त्याजवर तत्सजातीय वृक्षाचीं कलमें लावुन झाड करितात तें.

इसाप, पु॰ इसप.

इसार, पु॰ द्रव्य धावयास करून ओकोणेक व्यवहार कोणेका शीं ठरावून तोठराव फिरूं नये म्हणून जें तत्कालीं किंचित् द्रव्य देउन ठेविनात तो.

इसारा, पु॰ इसार.

इसूप, पु॰ इसप.

इस्तकबील, अ॰ हिं॰ कोणेक व्यवहाराचा विवक्षित जो आद्यवधिकाल त्याचें उपलक्षक.

इस्तकबीलतागाइत, अ॰ कोणेक व्यवहाराचा विवक्षित आद्यवधिपासून चरमावधिपर्यंत.

इस्ताद, स्त्री॰ हिं॰ स्थावरवर्जकरून जी मालमत्ता ती.

इस्ता

इस्तावा, पु॰ हिं॰ शेत प्रथम कोलानें घेउन नंतर प्रतिवर्षीं चढता सारा द्यावा लागतो तो कि॰ शेतकरण्याविषयीं ठरवून घेतलाजो तसा नियम तो.

इस्त्री, स्त्री॰ अंबट ओल्या वस्त्राचा घडया करून त्या साफ व्हाव्या म्हणून आंत अग्नि घालून बरफिरवायाचें करंडाकार धातुमय परटाचें एक आउत आहे कि॰ तीणें करून त्या घडयांस करितात जो संस्कार ती.

इहजन्मी, इहजन्मांत, अ॰ (इह·जन्म·सं॰) प्रस्तुतकालीं प्राप्त झालेलें जें मनुष्यादियोनीचा ठायीं जन्म त्यांत.

इहलोक, पु॰ सं॰ इहजन्मीं प्राप्त झालेला जो मृत्युलोकादि लोक तो.

इहिदे, २ लिं॰ हिं॰ एक; यवनी सालाविषयीं प्र॰.

इळा, पु॰ तृणादिकापायाचे उपयोगी एक शस्त्र आहे.

इळारिवळा, पु॰ घरांतील लहान मोटी चीचवस्तु तो.

इळी, स्त्री॰ भाजी, इ॰ चिरण्याचें एक शस्त्र आहे.

इळीमिळी, स्त्री॰ पोरें फार गलबा करूं लागलीं म्हणजे त्याणीमुका त्यानीं राहावें म्हणून एतच्छब्दपूर्वक वाक्य आहे तें उच्चारून शफथ घालितात ती.

इक्ष, पु॰ सं॰ उंस.

इक्षुदंड, पु॰ सं॰ उंस.

ई, अ॰ (हीही·सं॰) दुसऱ्याचीवर उपहास कर्तव्य असतां त्याचा उच्चार करितात.

ईट, स्त्री॰ (इष्टका·सं॰) भिंत, इ॰ बांधाया करितां मृत्तिकेचा चिरवल करून चतुष्कोणाद्याकार पातळ पाषाणासारिखा पदार्थ करितात ती; २, तत्सदृशतदाकार सुवर्णादि धातूचीही करितात.

ईड

ईड, न० निंबासारखें परंतु मोठें असें एक फळ आहे; २, स्त्री० त्याचें झाड.

ईडपीड, स्त्री० इडापिडा.

ईत, स्त्री० ईतीचा अपभ्रंश.

ईति, स्त्री० सं० अतिवृष्टि, अनावृष्टि; मूषक, टोळ, कीर, यांतिघांचे जे अतिशय तें; स्वचक्र, परचक्र, हीं सात प्र०.

ईद, पु० स्त्री० विवाह झाल्यावर प्रथम वर्षी संक्रांत दिवाळी, दसरा, इ० सणास वराकडून वधूकडे आणि वधूकडून वराकडे संप्रदायानुरूप तिळगूळ, गोंठ्या, इ० जे समारंभ पूर्वक पाठवितात ते प्र० किं० ते सण ते प्र०; २, मुसलमानांचा सण.

ईदृश, त्रिलिं० सं० अशा प्रकारचा.

ईनमीनसवातीन, त्रिलिं० मनुष्यादि पदार्थांस केवल अल्पसंख्याकत्व वर्णनीय असतांना०.

ईर, स्त्री० ईर्ष्येचा अपभ्रंश; २, (वीर्य० सं०) धातु, पीठ, इ० कांचा ठायीं स्वस्वकार्य निर्वाहक जो सत्व विशेष असतो ती; ३, बुद्धबांचे खेळांतराजास दुसऱ्याचे मोहऱ्याचा बसणार जो शह तो लागून-पडायाजोगी मध्यें आपले मोहरें कि० प्यादें यांची मध्येंजी स्थिति ती.

ईर्षा, स्त्री० ईर्ष्येचा अपभ्रंश.

ईर्ष्या, स्त्री० (ईर्ष्या० सं०) दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून आपण तदपेक्षया ही उत्कर्षक राहावा अशी जी भावना होत्ये ती; २, संकल्पित कि० प्रतिज्ञात जो कांहीं एक अर्थ तो तडीस नेण्याविषयीं असतो जो अभिनिवेश ती.

ईश, पु० सं० धनी.

ईशा

ईशानी, स्त्री० सं० ऐशानीचा अपभ्रंश.

ईश्वर, पु० सं० ज्याचे सत्तेनें जगाचे उत्पत्तिस्थिति प्रलयादि सर्व होतात असा एक स्वतःसिद्ध सर्वनियंता आहे तो; २, धनी.

ईश्वरसत्ता, स्त्री० सं० कांहीं बरेंवाईट होण्यास कारणभूत जो ईश्वराचा संकल्प ती.

ईश्वरसूत्र, न० सं० परस्परांचा दांपत्यादिरूप संबंध होण्यास कारणभूत जो ईश्वरसंकल्प तें.

ईश्वरी, स्त्री० सं० आदिमाया ती; २, त्रिलिं० (ईश्वर०) ईश्वरसंबंधीजें कांहीं एक तो.

ईश्वरीपुरुष, पु० (ईश्वर०पुरुष०) परमार्थनिष्ठ असून प्रपंचांत भोळा जो पुरुष त्यास ल०.

ईश्वरीतंत्र, न० (ईश्वर०तंत्र०) हा सृष्टिव्यवहार चालविण्याविषयीं ईश्वराने करून ठेविली आहे जी योजना तें.

ईश्वरीसूत्र, न० ईश्वरसूत्र.

ईश्वरीक्षोभ, पु० (ईश्वर०क्षोभ०) कोणाचा वर मोठ्याना शाचा प्रसंग बुद्धरत्यामुळें तत्कारणत्वेंकरून संभावितात जो ईश्वराचा कोप तो.

ईश्वरेच्छा, स्त्री० सं० ईश्वरसत्ता.

ईषणा, स्त्री० सं० लोक, स्त्री, पुत्र, वित्त, इ० विषयांचा ठायीं आस्था ती; लोकेषणा, दारेषणा, पुत्रेषणा, वित्तेषणा, इ० स० प्र०.

ईषत्, त्रिलिं० सं० यत्किंचित्.

ईस, न० इसाड.

ईहित, त्रिलिं० सं० इच्छित.

ईक्षण, न० सं० नयन; २, अवलोकन.

ईक्षित, त्रिलिं० सं० अवलोकित.

उँ:, अ० अँः.

उकटणें, बसलेला जो रिवळा, सांधा, इ० तो वियुक्त करणें; २, जांतें, पाटा, इ० टांकीनें विशिष्ट करणें.

उकड, स्त्री० (उकडणें) मोदक, पोळी, इ० कराया करितां चिकट झावें म्हणून कांहीं शिजिवलेलें जें तांदूळ इ० कांचें पीठ तो.

उकडअंबा, पु० (उकडणें, अंबा) पाडाचा अंबा उकडून तोंडी लावायासाठीं बहुत दिवस टिकायासाठीं पाणरवारांत घालून ठेवितात तो.

उकडणें, (उत, कथन सं०) उदकयुक्त पदार्थ पात्रांत घालून अग्निसंयोगानें मृदु होईं असा करणें; २, ऊष्मा अनुभूयमान होणें; उ० एथें दाटीमुळें उकडतें.

उकडंबा, पु० उकडअंबा.

उकडवा, २ लिं० उकिडवा.

उकहंडी, स्त्री० (उकडणें, हंडी) पावटे, भुइमूग, इ० कांचा ओल्यानेंगा एके मडक्यांत घालून तें मडकें पालथें भुईवर ठेऊन त्यावर तृणादिकांचा आळ करून भक्षणार्थ शिजवितात ती.

उकडा, २ लिं० (उकडणें) मीठ, मिरची, मसाला, इ० न घालितां केवळ उकडून मात्र काढलेला जो भाजी इ० पदार्थ तो; २, कों० उकाडा तृतीयार्थी; ३, उकडवा.

उकडातांदूळ, पु० (उकडणें, तांदूळ) भात मथम उकडून मग कांडून जे तांदूळ करितात तो.

उकर, पु० उकीर.

उकरडा, पु० उकिरडा.

उकरणें, (उत्किरण सं०) नरव, दंत, इस्त, राम्र, इ० कांचे अग्यानें भूमि इ० कांतील थोडाथोडा अंश कोरून काढणें; कि० तें काढल्यामुळें भूमि, काष्ठ, इ० रवांचेनें उक्त करणें; २, पात्रादिकांस घट्ट चिकटून बसलेला जो अन्नादि पदार्थ तो भिजल्यामुळें निघायाजोगा होणें, कि० तें पात्रादिक तद्वियुक्त व्हावयाजोगें होणें; कांहीं गोष्ट, कज्जा, इ० उकरून काढणें, ल० प्रसंगवशात् उपस्थित नसतां बुध्या निमित्त कल्पून उपस्थित करणें.

उकरी, स्त्री० कों० उकीर.

उकरीडु, पु० रा० उकिरडा.

उकरीव, २ लिं० (उकरणें) उकरून केलें जें पात्रादिक तो.

उकल, पु० (उकलणें) गुंतलेली, कि० गूढपणें स्थित जी कांहींएक गोष्ट निघाजो उलगडा तो; उ० यं० यागोष्टिचा उकल एक हरीच जाणे.

उकलणें, (उत्कीलन सं०) कांहींएक पदार्थाशीं दृढ संयुक्त जें पदार्थांतर तें त्यापासून मोकळें करणें; २, दोरी, इ० कांचा पीळ, कि० ती दोरी, निचे पदर, उलगडणें; ३, उलणें.

उकवण, उकवीण, न० किवण बरें करायाचा मंत्र आहे, कि० त्या मंत्राचा जो प्रयोग तें.

उकसी, स्त्री० एक झाड आहे.

उकसणें, रा० उसकटणें.

उकळ, पु० कों० उकळीप्रथमार्थी; २, उकळाद्वितीयार्थी.

उकळणें, (उकळी) पाणी इ० फार तापल्यामुळें उकळ्यानीं विशिष्ट होणें; २, (उत्कीलन सं०) राजकर, सावकारी, भिक्षा, इ० संबंधें लोकांकडे यावयाचें जें द्रव्यादिक तें त्यात्यापासून घेणें; म० घुसळणीपेक्षां उकळणीचे घरीं फार; ३, कांहीं औषधादि पदार्थ पाण्यांत यालून उकळी येई तों कढविणें.

उकळी, स्त्री० (उत्कलिका सं०) पाणी, तेल, दूध, इ० पगकाढ्यें तापल्यानंतर अग्नीवर राहिलें असतां वर खालीं, वर खालीं, व्हावें अशी त्यास अवस्था प्राप्त होत्ये ती; २, नद्यादिकांचें सवेग जें उदक त्यास कांहीं पुढें अडचण असल्यामुळें जो तादृश आकार दिसतो ती; ३, कोणेक गोष्ट करण्याविषयीं आवेशपूर्वक अंतःकरणवृत्तीची जी उन्मुखवना होत्ये ती.

उकळीत, न० (उकळणें) कुळांकडून पेका इ० उकळण्याचा जो व्यापार तें; २, तेणेंकरून जमा होतो जो पेका इ० तें.

उका, ३ लिं० ग० ओंका.

उकाडा, पु० (उकडणें) ऊष्मा; २, सोनार इ० अलंकार, पात्र, इ० उजळ करायासाठीं संस्कारार्थ चिंच, मीठ इ० पाण्यांत घालून कढवून सिद्ध करितात जें द्रव्य तें, किं० तेणेंकरून त्या अलंकारादिकांस जो संस्कार तो; ३, गवळी मालकी, इ० कांपाशीं दुग्धादिकांचा एकदांच दर रवंडून नित्यशः त्याणें तें तें द्रव्य एक सारखें देत जावें असा बांधून ठेवितात जो नियम तो; किं० तन्नियमानुसार प्रत्यहीं येतें जें तें द्रव्य तो.

उकाढा, पु० कों० उकाडा.

उकाळ, पु० क० उकाळा द्वितीयार्थी.

उकाळा, पु० (उकळीत) उकळीत; २, विषादि बाधा इ० झाली असतां वमन व्हावें म्हणून तांब्याचे भांड्यांत अंबट, मीठ, खुर्दा, इ० यालून कढवून पाजायासाठीं जो कळंक काढितात तो.

उकिडवा, ३ लिं० टांचा टिरीशीं घेऊन घुडंगपोटाशीं येत असें पायलें टेंकून बसला तो.

उकिरडा, पु० गृहादिकांनील कांहीं दिवस टाकलेल्या केरकचऱ्याचा जमलेला जो ढीग तो; २, एक माठामध्यें भेद आहे.

उकिरडीभाजी, स्त्री० (उकिरडा, भाजी) माठाचे भाजी मध्यें एक जात आहे.

उकीर, पु० (उकरणें) उंदीर, घूस, इ० कानीं भूमि उकरून काढिलेले मातीचा तेथे होतो जो ढीग तो; २, आई भूमीवर शेण, विष्ठा, इ० पडलें असतां त्याचे योगानें तेथें उकरून उचलली जाती जी माती तो; ३, ला० नेत्रकोणास जमतो जो नेत्रमल तो.

उकुडवा, ३ लिं० उकिडवा.

उक्त, ३ लिं० सं० उक्तिविषय झाला जो कांहीं एक अर्थ तो; तदुक्त, मदुक्त, ईश्वरोक्त, आप्तोक्त, इ० स०.

उक्का, ३ लिं० क्रयविक्रयादि व्यवहारीं समुदायांतील जे अवांतर अवयव त्यांस मत्वेकीं; मूल्यादि संबंधनकरितां विशिष्ट समुदायावर विशिष्ट मूल्यसंबंध करावा अशा प्रकारनें विशिष्ट जो क्रय, विक्रय, मोल, बोली, इ० तो; २, मनुष्यें, दिवस, इ० कांची अमुकत्वेंकरून बोली नकरितां अमुक काम करावें; आणि अमुक द्रव्य घ्यावें, अशा प्रकारानें विशिष्ट जी ती बोली, तें काम, इ० तो.

उक्ति, स्त्री० सं० भाषण; २, कांहीएक गोष्टीविषयीं कथ्यादिकांचें जें वचनरूप प्रमाण असनें तीं.

उक्साबोक्शी, अ० अक्साबोक्शी.

उखर, ३ लिं० (उषर सं०) जेथें शेत चांगलें होत नाहीं अशी जी माळवट, डोंगरवट, जमीन ती.

उखरखारखर, उखरावारखर, ३ लिं० विवक्षानुरूप नितळ नव्हे अशी जी भूमि, भिंत, फळी, इ० तो.

उखळ, न० (उलूखल सं०) दगडास खळी पाडून धान्यादि कुटावयास साधन करितात तें; कोणेकाचें उखळ पांढरें होणें, ल० दारिद्र्यविच्छेद झाल्यायोगे उमप द्रव्यादि मिळणें; बेंबीचें उखळ होणें, ल० निकाळजीपणें भोजनादि भोग मिळूं लागल्यामुळें शरीर पुष्ट होणें.

उखळण, स्त्री० रा० (उखळणें) चांगल्ये साफ केलेल्ये जमिनीवर चिरकाल सडा संमार्जनाचा अभाव, कि० काष्ठ, पाषाण, शस्त्रादिकांचें घर्षण, इ० कारणानें होतो जो उखळलेपणा ती.

उखळणी, स्त्री० (उखळणें) शेत इ० करावयाकरितां भूमीस पहिल्यानें जो कर्षणसंस्कार करितात ती; २, अनेक पदार्थ उखळण्याचा जो व्यापार ती.

उखळणें, (उत्किरण सं०) नांगर, कुदळ, इ० कानीं पिंडीभाव पावलेली जी भूमि, भिंत, इ० ती विशकलावयव करणें; २, कांहीं पदार्थांशीं घट्ट बसलेला जो कांहीं पदार्थ तो त्यापासून टळविणें.

उखळवेरीज, स्त्री० (उखळणें. वेरीज) उखाळी.

उखळी, स्त्री० (उखळ) पोहे, नांदूळ, इ० कांडावयासाठीं लांकडाचें, कि० पाषाणाचें डमरूचे आकाराचें लांबट करितात जें उलूखल ती.

उखळ्या, ३ लिं० (उखळ) मधला दंवका निघून उखळासारिखा आकार जाजवर झाला आहे असा जो मा० पैसा, रुपया, इ० तो.

उखाणा, पु० आणा; २, प्राकृत भाषेंत रचिन कूटार्थक वाक्यें आहेत तीं म०.

उखार, ३ लिं० कों० (ऊषर सं०) उंचवट्यावरची दमदार नव्हे अशी जी माता शेताची जमीन तो; २, पु० कोंब्यारेशमाचे अंगीं असल्ये जी खळ तो.

उखाळ, पु० कों० उकाळा हिंदीयार्थी.

उखाळी, स्त्री० (उखळणें) कोणेकाचे अंगीं

दुष्कर्म, दुर्व्यसन, इ० असतें जें पैशून्य तो; मा० अनेकवचनांत, काटणें धातुयोगीं प्र०.

उरवाळीपारवाळी, स्त्री० (उरवाळीसोप०) उरवाळी इ० ती.

उरवीरवारवीर, २ लिं० उरवरवारवर.

उगम, पु० (उद्गम० सं०) नद्यादिकांचा स्थलविशेषीं मूलभूत झाला असतो जो प्रादुर्भाव तो

उगरावणें, रा० उगारणें.

उगला, अ० यं० उगा.

उगवण, न० कों० देवी, गोवर, यांचा जो शरीरावर नवीन होतो उद्गम तो; २, सूर्याचा अत्यंत सांनिध्यामुळें अस्तंगत झालेले जे चंद्रादिग्रह त्यांचें सूर्य सांनिध्य सुटून होतो जो नूतन उदय तें; ३, नवरात्रांत देवापुढें रुजत घालितात जें धान्य तें.

उगवणी, स्त्री० (उगवणें०) दुसऱ्याकडे गुंतलेला जो सावकार इ० कांचा पैका इ० तो त्यांपासून उकळीत करण्याचा जो व्यापार ती.

उगवणें, (उद्गमन सं०) सूर्यादि, ग्रहनक्षत्रें, इ० उदयाचलापासून, अंकुर तृणें इ० बीजापासून, किं० भूम्यादिकांपासून प्रादुर्भूत होणें; २, कोणेकानें विवक्षित विद्या, कला, व्यवहार, यांचा ठायीं पूर्णनिष्णात होणें; उ० हा लिहिण्यामध्यें दोहोंवर्षांत सांगला उगवला; ३, रा० कोणेकानें घांदी घांट इ० चढून वर जाणें; उ० तुम्हीं खोळंबा न करितां नर येईतों ला घांट उगवून पार गेलों असतों; ४, संकलित पणें स्थित जो अर्थ तो भाषण लेखनांत हेतु कारणादि निरूपणद्वारा स्पष्ट करून दाखवणें; ५, एकत्र स्थित जो कोणेक विषय तो, दुसऱ्या लेखामध्यें, कि० भाषणामध्यें भंग्यंतरेंकरून, कि० त्याच रूपेंकरून उल्लेखून दाखविणें; उ० हें कलम तुम्ही खरें खणतां परंतु तुमचे हातचें दाखण आहे त्यांत उगवलेलें नाहीं; ६, दुसऱ्याकडे यावयाचें जें आपलें द्रव्यादिक तें वसूल करणें; द्वेष, वैर, सूड, इ० उगवणें अ० सूड घेणें; ७, परस्पर गुंतलेले जे केस, सूत, इ० ते फणी, हस्त, इ० कानें मोकळे करणें.

उगवत, स्त्री० (उगवणें०) पूर्वदिशा; २, अ० पूर्वेकडे.

उगवा, पु० कों० उगावा.

उगवीतपागवीत, अ० कों० (उगवणें, सोप०) सोईसोईनें थोडेंथोडें द्रव्यादि उगवून घेण्याचें वि०.

उगवील, स्त्री० कों० उगवणी.

उगळणें, यं० (उद्गिरण सं०) ओकणें; २, नूतन बडविलेल्या पत्र्याचा वृषणाचा शिरा पुरतेपणी न मळल्या गेल्यामुळें त्या वृषणानें पूर्वावस्थापन्न होणें.

उगा, अ० भाषण, हस्त पादादि चेष्टा, रोदन, इ० विवक्षित व्यापार न करितां, बसणें, राहणें, इ० कांचें वि०.

उगाच, अ० उगीच.

उगारणें, (उद्ग्रहण सं०) कोणेकास मारायाकरितां

करितां शस्त्र, हस्त, काठी, इ० उचलून त्याजवर रोंखून धरणें.

उगावा, पु० उगवणी.

उगाळणें, चंदन, काष्ठादिकपदार्थ, यांचा अंश निघे असें साण इ०कांवर घांसणें, किं० त्या व्यापारानें तो गंधादि अंश काढणें; २, शिष्यादिकांस विवक्षित विद्यादि यावीं म्हणून त्या त्या शिक्षेंत धरणें; ३, कांहीं एक गोष्ट दृढ व्हावी इ०कारणार्थ पुनः पुनः मुखानें बोलणें.

उगी, अ० उगा.

उगीच, अ० प्रयोजनावांचून; उ० कामाशिवाय उगीच कोणाचे घरीं जाउं नये.

उगेंच, अ० उगीच.

उग्र, वि० सं० दुसऱ्यास अवलोकनादिकेंकरून सहन करायास कठिन असे जे क्रोधाद्याकार विशिष्टरूप, शब्द, स्वभाव, कर्म, इ० तो, किं० तद्विशिष्ट पुरुषादिक तो; २, उग्रट,

उग्रट, वि० (उग्र०) जाचे सेवनानें त्रास यतो, कपाळ दुखूं लागतें, असें जें सोनचांपे, सोनटका, हिंग, लसूण, कांदा, इ०कांचा वास तो.

उग्रटाण, स्त्री० (उग्रट०घाण०) उग्रट जो वास ती.

उग्रम, पु० रोग, पर्जन्य, बंड, इ०कानें प्रवृत्त होण्याविषयीं धरिलेलें जें स्वस्व सामग्रीबल जाचा व्यय झाल्यावांचून तो रोगादि शांत होत नाहीं तो; उ० पावसाचा उग्रम मोडल्यावांचून थंडी पडत नाहीं; २, कांहीं एक कार्याचा जो उद्गम तो.

उग्रष्टाण, स्त्री० उग्रटाण.

उग्रस, वि० उग्रट.

उग्राणी, स्त्री० वसूल करण्याचा व्यापार ती.

उघड, वि० (उघडणें) स्पष्ट समजाया जोगा जो कोणी एक अर्थ तो; २, अ० प्रसिद्धपणें; फिरणें, सांगणें, बोलणें, असणें, इ०कांचें वि०, ३, स्त्री० उघाड.

उघडझाँक, स्त्री० (उघडणें, झांकणें०) नेत्र, पेटी, इ० अनेकवार उघडणें, झांकणें असा जो व्यापार ती.

उघडणें, (उद्घाटन सं०) आछादनानें अंतर्हित झालेला पदार्थ आछादन निरासानें मोकळा करणें; तें आछादन जर त्या पदार्थाचा अवयवी भूतच आहे तर त्यासही पक्षीं कर्मना येत्ये; उ० पेटी उघड म्हटलें काय आणि पेटीचें झांकण उघड म्हटलें काय फळ एकच; २, मिटलेला पदार्थ विकासित करणें; ३, पर्जन्यानें कांहीं काल मध्यें विरत होणें; दैव, कपाळ, इ० उघडणें म्ह० ऊर्जित दशा वह होणें.

उघडदोरा, पु० (उघडणें, दोरा०) जे दोरे दोहींकडे धरून ओढिले असतां बटवा इ० उघडला जातो असे जे बटवा इ०कांस दोरे लाविले असतात ते म०.

उघडमीट, स्त्री० (उघडणें. मिटणें०) उघडझांक.

उघडवाघड, अ० (उघड·सोप·) उघडदिती-याथीं.

उघडा, वि० (उघडणें·) झांकलेला नव्हे तो; २, गूढ, गुप्त, असा नव्हे जो कांहीं एक अर्थ; ३, सांभाळ करणारा माता पित्रें, राजा, इ० जास कोणी नाहीं अशीं पोरें, राज्य, इ० तो; पडणें, धातुयोगीं म०; स्त्र० नागडयापाशीं उघडा गेला आणि सारे रात्र हिंवानें मेला.

उघडानागडा, वि० (उघडा, नागडा·) आवरणवस्त्र, आणि परिधानीयवस्त्र, एतद्रहित जो तो, कि० सभादिकांचाठायीं जावयास योग्यतानुरूप पागोटें, अंगरखा, इ० वस्त्रें असावींतद्रहित तो.

उघडामाथा, पु० (उघडा, माथा·) कोणेक कर्म करण्याविषयीं आपण लोकांस लाजूं नये, कि० तें कर्म केलें असतां लोकांनींही आपणास हंसूं नये, अशी जी कोणेकाचे अंगीं योग्यता आली असल्ये तो; उ० अल्पी पिंडीचे भिक्षुक आत्म्यास मतियह घेण्याविषयीं उघडामाथा आहे.

उघडावागडा, उघडावाघडा, वि० (उघडा, सोप·) उघडानागडा; २, आंत केर कचरा पडूं नये, मूषकादिकानीं भक्षूं नये, इ० कारणार्थ करावयाचे जे आच्छादनादि उपचार तद्रहित स्थित जो अन्न, धान्य, इ० पदार्थ तो.

उघडी, स्त्री० कों० शेत इ० कांचे मोठे जे बंदिस्त केलेले बांध त्यांस आंतील पाणी बाहेर आणावयासाठीं जें द्वार सारिवलें असतें तें.

उघडीक, स्त्री० (उघडा·) गुप्तपणें स्थितजी कांहींएक गोष्ट तिची जी प्रसिद्धता ती; २, उघाड प्रथमार्थी.

उघडीमराठी, उघडीमल्हाटी, स्त्री० (उघडा, मराठा·) आंत कांहीं व्यंग्यपणा, गूढाभिप्राय, इ० नठेवितां सर्वांस अभिप्रायाचा बोध व्हायाजोगा भाषणादि व्यवहाराचा जो प्रकार ती.

उघाड, उघाडी, स्त्री० (उघडणें·) पर्जन्यकाळीं मध्यें पर्जन्य उघडल्यामुळें कांहीं काल होत्ये जी पर्जन्याभाव वैशिष्ट्यरूप कालावस्था ती.

उघारणी, स्त्री० उघाणी.

उघाणी, स्त्री० कों० उघाणी.

उंच, वि० (उच्च·सं०) अधोदेशाकडून उपरिदेशाकडे व्यापीचें जें अंगुलादिरूप प्रमाण तद्विशिष्ट जो आकार, कि० त्याआकारानें विशिष्ट जो पदार्थ तो; २, तंतुवाद्याची तार शिथिल असतां यादृश स्वर होतो तीच तार कांहीं ताणून वाजविली असतां त्या स्वराचाठायीं पूर्व स्वरापेक्षां जें वैलक्षण्य भासतें तें विवक्षितापेक्षां जा मध्यें अधिक आहे, अशा जातीचा जो कंठ वाद्यादि संबंधी ध्वनि तो, कि० तद्विशिष्ट जें तें कंठादि तो; ३, उंचा; ४, रा० खोल जो विहीर इ० तो; ५, अ० ऊर्ध्व प्रदेशाकडे; उ० चंद्रमंडलापेक्षां सूर्यमंडल उंच आहे.

उंचकटणें, लांकूड, भूमि, इ० कांचाठायीं तोडून

कून बसविलेला जो खिळा इ० तो उपडून काढणें;२,क्षत,भूमि,नखा,इ०कांवर घट्ट चिकटून बसलेला जो खपली,भाकर,इ०पदार्थ तो नखादिकानें सोडविणें;३,साररूपणी रचना विशिष्ट होऊन बसलेला जो डोकीचे केश,वस्त्राचा चुण्या,तृणसमुदाय,इ०पदार्थ तो अस्ताव्यस्त करणें.

उचकणें,दृष्टिचुकाऊन कोणेकाचा कांहीं पदार्थ चोरणें;२,कांहीं युक्तीनें मोह घालून कोणेकापासून द्रव्यादि काढून घेणें.

उचका,पु०(उचकणें)अनेकांपासून मोहवून,ठकवून,द्रव्यादि उचकण्याचा जो व्यापार तो;२,कोणेक विषयाचा अंतःकरणांत जो अतिशयित ध्यास लागतो जेणेंकरून तत्सदृश ईषन्मात्र चिन्हादि पाहिलें असतां तो विषय एथें आहे इ०भास होतो तो,किं०तो होतो जो भास तो,किं०तादृश ध्यासामुळें तद्विषयक पडतो जो स्वप्न तो.

उचकाउचक,स्त्री०(उचकणें-द्वि०)उचका प्रथमार्थी.

उचकी,स्त्री०उदरस्थ वायूस कांही विकृति होऊन अकस्मात् सशब्द जो कंठाचे ठायीं गच्चका लागतो ती.

उचक्या,पु०(उचकणें)उचकण्याचा स्वभावजाचा तो.

उचंगणें,कों०(उच्च,अंग)स्वाभाविक किं० ज्वरादिरोगानें रुग्ण,निस्तेज जो मनुष्यादि तो औषध सेवनादिकें करून कांहीं पुष्ट होणें.

उच्चटणें,(उच्चाटन सं०)नव्यावर इ०चिकटलेली भाकर इ०कलथा इ०कानें उचकटणें;२,कों०उचाटणें;३,न०भाकर इ०उचटायाचें साधन लोखंडाचें कलथ्या सारिखें केलें असतें तें.

उचंडळणें,(उच्च,आंदोलन सं०)जलादिकानें भरलेलें पात्र कांहीं धक्का लागून हालल्यामुळें आंतील तें जलादिक वर उडोन बाहेर पडे असें करणें.

उंचनीच,३लिं०(उंच,नीच)उंचसखल.

उचंबळणें,कोणेक पात्राचे ठायीं उदकादि अतिशयित भरल्यामुळें वर सांडूं लागणें,किं०तें पात्र तादृश भरलें जाणें.

उचल,स्त्री०(उचलणें)कोणेकास कोणेक कार्याचे ठायीं उत्तेजनादि द्वारा दुसरें काम न करूं देतां खरेनें प्रवृत्त करण्याचा जो व्यापार ती;२,युद्ध,कज्जा,इत्यादर्थ दुसऱ्याकडून कांहीं उपक्रम नसतां त्याजवर आपण होऊन केलें जें उत्थान ती,किं०उपशांत झालेल्या ज्वरादिकानें पुनः केलें जें उत्थान ती;३,कों०उत्तेजन;४,कोणेक व्यवहाराविषयीं थकला जो त्याचें साहाय्यद्वारा दुसरा कोणी करितो जें उत्थापन ती;५,कों०दुसरा जो भाऊबंद इ०विभागी त्याचे स्थलांतील कांहीं विभाग आपले सोईकरितां मागून घेतला असतां त्याचे मोबादला दुसरीकडे आपले स्थलांतील त्यास जो विभाग देतात ती.

उचलटप्पु, पु० (उचलणें) जा स्थलचा जो घरंदाज, वतनदार, इ० नव्हे उगीच कांहीं कामाकरितां देशांतराहून चारदिवस आलेला तो त्या स्थलचा.

उचलणें, (उच्चलन सं०) खालचे प्रदेशीं स्थित पदार्थ तो हस्तावलंबानें भार संभालून उर्ध्व प्रदेशीं होई असा करणें; २, ला० अप्रवृत्तपणें स्थित जो कांहीं एक व्यवहार तो प्रवर्तमान करायास हातीं घेणें, उ० यंदा पेशाचें अळमटळम दिसतें आहे, नवें घर बांधायाचें काम उचलूंनका; ३, वाद, युद्ध, इ० व्यवहाराविषयीं अप्रवर्तमान जो कोणी त्यास उत्तेजनादि युक्तीनीं त्या व्यवहारीं उभा करणें; उ० त्याचे मनांत भाऊबंदाशीं आजच कजिया सांगावा असें नव्हतें परंतु लोकानीं गांडींत काठ्या घालून त्यास उचलला; ४, कोणेक व्यवहार निर्वाह्यत्वेंकरून अंगीकारणें; उ० हा दाहा वर्षांचा होता तेव्हां याचा बाप मेला तेव्हांपासून यानें संसार आपण उचलला; ५, दृष्टि चुकाऊन दुसर्‍याचा कांहीं द्रव्यादि पदार्थ चोरणें; उ० यास विश्वासूनका हो कोणते वेळेस काय उचलील कळूं देणार नाहीं; ६, कोणेक पदार्थ पूर्वावस्थेपेक्षां उन्नत करणें; या अर्थी सकर्मक म० थोडा. उ० दोन दिवस पाऊस लागतांच झाडें उचललीं; ७, शरीर, उदक, भूमि, आकाश, इ० कांचा ठायीं गळूं, फोड, लाट, बुडबुडा, उकीर, खपली, मेघ, इ० उत्पन्न होऊन उठणें; ८, पित्तक्षोभादि कारणानें आपल्यास कोणी उचलले असें वाटायाजोगी विकृति होणें; उ० कालचे उपोषणामुळें क्षणोक्षणीं उचलतें, स्वस्थ पडत नाहीं; वाद, युद्ध, इ० कांविषयीं उचलून जाणें, येणें, स० आपण होऊन उपक्रम काढणें; विवाहाविषयीं उचलून जाणें, स० मुलगी इ० सर्व खटले घेऊन वराचे गावीं विवाहार्थ जाणें; उचलून देणें, स० त्याची सत्ता न चालूं देतां आपल्या संतोषास येईल तें कोणेकास देणें; उ० हा गांव आत्म्यास इनाम आहे, परंतु गांवकरी काय द्रव्य उचलून देतील तें घेतों, आमची सत्ता चालत नाहीं; उचलून बोलणें, स० ताठ्यानें चढून बोलणें.

उचलपाँगडी, उचलबाँगडी. स्त्री० (उचलणें) कोणी हात धरावे, कोणी पाय धरावे कोणी डोकें धरावें, असें अनेकांनीं बलात्कारानें कोणेकास उचलण्याचा जो प्रकार तो; २, ला० अधिकारादि स्थलावरून कोणेकाचें चोघांनीं चोहोंकडून अनेक उपद्रव लावून जें उत्थापन तो.

उचलसाँचल, स्त्री० उचलासांचल.

उचला, पु० कों० (उचलणें) यामदुर्गादिकांचे देवालयीं एक देवाजवळ दगड ठेविला असतो जो कांहीं गोष्टीविषयीं देवाला प्रश्न करून उचलला असतां कदाचित् जड येतो, कदाचित् हलका येतो त्यावरून त्या प्रश्नाचें उत्तर समजतें तो.

उच्चलाउच्चल, स्त्री० (उचलणें-द्वि०) संसार इ० खटल्याची एके स्थलापासून दुसऱ्या स्थलीं, दुसऱ्या स्थलापासून तिसऱ्या स्थलीं, अशी नेण्याची जी खटपट ती; २, हें उचल, तें उचल, याणें उचलावें, त्याणें उचलावें, असा जो व्यापार ती.

उच्चलासाँचल, स्त्री० कों० उचलाउचल प्रथमार्थी.

उच्चल्या, पु० (उचलणें) उचलटप्पु; २, दुसऱ्याची दृष्टि चुकाबून पदार्थ चोरण्याचा स्वभाव जाचा तो.

उंचवट, ३लिं० वसकटीचा प्रतिपक्षी.

उंचवटा, पु० शरीर, भूमि, इ० स्थलीं आसमंतापेक्षां उच्चत्वविशिष्ट जो भाग तो.

उंचसखल, ३लिं० (उंच-सखल) कोठेकोठे उंचवटे, कोठेकोठे बटखल, अशा विभागाचें विषम स्थल तो.

उंचा, ३लिं० (उंच) इतर सजातीयापेक्षां गुणजात्यादिकृत योग्यता जाची मोठी तो.

उचाट, पु० (उच्चाटन सं०) कोणेक स्थलादि विषयाविषयीं कंटाळा येऊन लवकर याचा संग सुटो असा अंतःकरणाम होतो जो उद्वेग तो; ये, खा, इ० धातुयोगीं म०; २, कोणेक गोष्ट करण्याविषयीं मनास लागतो जो दृढ ध्यास तो.

उचाटणें, (उच्चाटन सं०) विवक्षित विषयापासून कंटाळून मन उठणें.

उचापत, उचापत, स्त्री० होईल पैका तो एकदांच पुढें देऊं अशी बोलीकरून नित्यशः तूप, गूळ, इ० लागेल जिन्नस तो वाण्यापासून विकत घेण्याचा प्रकार ती; २, तशा प्रकारानें घेतात जो जिन्नस ती.

उचापतखाऊ, ३लिं० (उचापत, खाणें) जाचे पदरीं पैसा शिरत नाहीं अतएव उचापत घेऊनच दिनचर्या चालविती असा जो शिलेदार इ० त्यास म्ह०.

उचापत्या, ३लिं० (उचापत) जो वाणी जास उचापत देत असतो तो त्याचा.

उचित, ३लिं० सं० देश, काल, लोक, शास्त्र, रीति, इ० प्रमाणानुरोधेंकरून कोणेक अर्थ असा असावासा दिसतो तसाच जो तो; कोणेक गोष्ट कोणेकाचे उचितास येणें म्ह० विद्या, कुलादिकृत जी आपली योग्यता तदनुसार हें आपल्यासँ करायास उचित असें वाटणें.

उचितज्ञ, ३लिं० सं० देश, काला इ० अनुरोधेंकरून कर्मादिक उचित कोणतें, अनुचित कोणतें, हें जाला समजतें तो.

उंची, स्त्री० (उंच) पदार्थाचें अधो देशाकडून उपरिदेशाकडे व्याप्तीचें जें प्रमाण ती; २, रा० विहीर इ० कांची जी खोली ती; ३, उंचा.

उंचीँ, अ० रा० (उंच) कोणेक पदार्थाचे उपरिप्रदेशीं; उ० पजन्यकाळीं मीठ चुली उंचीं ठेवावें. म्ह० जे पाघळत नाहीं.

उंचून, अ० (उंच, हून) जांत घालायाचें, ओतायाचें, त्या पात्रादिकांचे केवळ अवळ न आणितां उच्च प्रदेशीं धरून वाढ, घाल, इ० कांचें

वि०.

उच्चेट, स्त्री० (उचटणें) खडा निघाल्यानंतर उचकटून काढलेलें जें सोनें, रूपें तो.

उच्च, ३लिं०सं० उंच; उच्चप्रदेश, उच्चासन. उच्चस्थान, उच्चजातीय, इ०समास; २, न० सूर्यादि सात ग्रहांस ज्योतिश्शास्त्रांत मेषादि राशींतील स्थानें सांगितलीं आहेत तीं प्र०; ३, ग्रहांचे गणितामध्यें एक पदार्थ सांगितला आहे तें.

उच्चनीचभाव, पु० सं० एकापेक्षां एक उंच, एकापेक्षां एक नीच, असें जें परस्पर वैषम्य तो.

उच्चाट, पु० उचाट.

उच्चाटण, न० उच्चाटनाचा अपभ्रंश.

उच्चाटणें, उचाटणें.

उच्चाटन, न० सं० अधिकारादि पदस्थित जो कोणीएक त्याचें तेथून मंत्रप्रयोगादि युक्तीनें करितात जें उन्मूलन तें.

उच्चाटित, ३लिं०सं० उच्चाटन केलें जाचें तो.

उच्चार, पु० सं० वागिंद्रियापासून वर्णात्मक शब्दाची होती जी अभिव्यक्ति तो, किं० तदनुकूल व्यापार, किं० त्याचा प्रकार तो.

उच्चारण, न० सं० उच्चारण्याचा व्यापार तें.

उच्चारणीय, ३लिं०सं० उच्चारायास योग्य जो शब्द तो.

उच्चारणें, (उच्चारण सं०) शब्दउच्चार विशिष्टकरणें.

उच्चारित, ३लिं०सं० उच्चारिला तो.

उच्चार्यमाण, ३लिं०सं० उच्चारण विषय होत आहे जो तो.

उच्छाद, पु० कोणेकापासून अतिशयित अनेकप्रकारचे उपद्रव होऊं लागल्यामुळें अंतःकरणासहि येतो जो पगकाढेचा त्रास तो.

उच्छाप, पु० सं० शाप देणारा त्या शापाची निवृत्ति अमुक झालें म्हणजे होईल असा जो वर देऊन ठेवितो तो.

उच्छास्त्र, ३लिं०सं० शास्त्रविरुद्ध जें भाषण, वर्तन, इ० तो.

उच्छिन्न, ३लिं०सं० उच्छेद झाला जाचा तो.

उच्छिष्ट, ३लिं०सं० कोणेकानें आंतील कांहीं अंश भक्षून अवशिष्ट राहिला जो अन्नादि पदार्थ तो, किं० भक्षितानां कोणेकाचे मुखानें स्पृष्ट झाला जो अन्नादि तो; २, ला० दुसऱ्यानें उपभोगिलेलें जे वस्त्र, पुष्प, स्त्री, इ० तो; ३, दुसऱ्यानें काढलेली कल्पना, किं० उक्ति जें भाषण, इ० तेंच पुनः कोणी एकानें काढिलें असतां त्या कल्पना, वचनादिकांस लग्न.

उच्छृंखल, ३लिं०सं० शास्त्र, राजा, वडील, इ० जे नियामक त्यास न गणितां मनस्वीपणें वर्तणारा जो तो.

उच्छेद, पु० सं० उत्तरोत्तर चालणारे जे वंश. वृत्ति, धर्म, कांहीं व्यवहार, इ० त्यांचा पुढें अनुवृत्ति न चालाया जोगा होतो जो कांहीं कारणानें खंड, किं० नांदता जो गांव, देश, वन, इ० त्यांचा जो विध्वंस तो; धर्मोच्छेद, वंशोच्छेद, वृत्युच्छेद, वनोच्छेद, इ० स०.

उच्छेदक, ३लिं०सं० उच्छेद करणारा तो.

उच्छेदणें, (उच्छेदन·सं०) उच्छिन्न करणें.

उच्छेदन, न० उच्छेद.

उच्छ्वसन, न०सं० श्वासोच्छ्वास करण्याचा व्यापार तें.

उच्छ्वास, पु०सं० नासिका, मुखद्वारें, वारंवार बाहेर येत असतो जो प्राणवायु तो, परंतु शोकखेदादि कारणानें मोठ्यानीं जेव्हां येतो तेव्हां विशेषेंकरून प्र०; २, नळानें प्रतिबद्ध करून आणितात जें पाणी त्यास मोकळेपणें वाहावयास मध्यें मध्यें ठेवितात जो अवकाश तो.

उंछवृत्ति, स्त्री०सं० क्षेत्रादिकांत पडलेले जे धान्य, कण, ते एकएक वेंचून त्यांहीं करूनच उदर निर्वाह करावा अशी तपस्वी जनास शास्त्रांत वृत्ति सांगितली आहे ती.

उजगरा, उजागरा, पु०कों० (उत्·जागर·सं०) उजागरा.

उजड, पु० उजेड.

उजडणें, उजाडणें.

उजडतां, अ० उजाडतां.

उजदार, न० पुढीलप्रदार.

उजरणें, (उज्वलन·) एकवेळ काढलेली रेषा, कि०दिलेलाडाग, कि०ठसा, इ०कानें उठविलेला आकार इ० पुनः त्या त्या संस्कारानें अभिव्यक्त करणें; २, केलेलें अध्ययनादि, कि०सांगितलेली गोष्ट इ० पुनः त्या संस्कारानें दृढकरणें; ३, केवळ मरगळीस आलेले मूल, गुरूं, झाड, इ०तें तत्तदुपायानीं टवटवी धरून हुशार दिसे असें करणें; ४, (कजूकरण·सं०) वांकडे तिकडे झालेले रिवळे इ०, कि०पोंचलेलें भांडें इ० त्या त्या संस्कारानीं नीटकरणें.

उजवट, २लिं० (उज्वल·सं०) प्रा०यं० उजळ जो मनुष्य तो; उ०यं० नवऱ्यापरीस नवरी उजवट, सोन्याचे तुला गोट साळू बाई.

उजवण, स्त्री० रा० (उजवणें·) अंकेरून पडलेली जी भूमि, शस्त्र, मनुष्य, अश्वादिपशु, इ० त्यांचें ते ते संस्कार होऊन ऊर्जा चालावयास कारण भूत जे उर्जित दशा ती.

उजवणें, (ऊर्जन·सं०) (उद्यापन·सं०) केलेलें व्रत, कि०लावलेला अश्व, थवट, इ० उद्यापन संस्कारानें विशिष्ट करणें; २, मनुष्यादिकांस एकवार झावयाचा असा संभावित असतो जो मुंजी, विवाह, शास्त्राध्ययन, इ० संस्कार तो करून त्या त्या संस्कारांविषयीं त्यांस कृतार्थ करणें; ३, अनेकांस अवश्य मानव्यतें करून संभावित जीं देवी, गोंवर, सांत, इ० संकटें त्यांतून कोणेकानें पार पडणें; ४, हा अद्यापि अमुक संकटांतून निभावायाचा आहे, कि० अमुक संस्कारानें संस्कृत झावयाचा आहे असा जो पूर्वी योग्यता विशेष असतो तो जाऊन हा या संकटांतून निभावला, कि० याचा हा संस्कार होऊन चुकला असा जो योग्यता विशेष तद्विशिष्ट कोणेकानें कोणेकास करणें, कि० त्याणेंच स्वतः होणें हा तात्पर्यार्थ.

उजवा, ३ लिं० मनुष्यादि पदार्थ पूर्वाभिमुख राहिला असतां त्याचा दक्षिणेकडे होतो जो अर्धभाग तो; २, तदवच्छिन्न जी दिशा आणि नीचाठायीं स्थित जो पदार्थ तो; देवादि उजवा घालणें, स्र० तो आपल्ये उजवीकडे पडे असें आपण गमन करणें; कोणेक कोणेकास उजवा जाणें, इ० स्थलीं त्याचे उजवेकडून जाणें.

उजळ, ३ लिं० (उज्वल सं०) निर्मळ चकचकीत जें पात्र, अलंकार, वस्त्र, इ० पदार्थ तो; २, केवळ काळा नव्हे असा जो कांहीं गौरवर्ण अगून तेजस्वी असा जो मनुष्य तो; ३, पाडास आल्यामुळें कांहीं पीतवर्ण झालें, पेरू, केळें, इ० फल तो; तोंड उजळ होणें स्र० कांहीं अपवादादिकानें आलेला जो कालिमा तो जाणें.

उजळणी, स्त्री० (उजळणें) येनें झालेलें धुळाक्षरादि विसरूं नये म्हणून आठा चोहों दिवशीं लेखनद्वारा सुळावासून जी आवृत्ति करितात ती.

उजळणें, (उज्वलन सं०) भांडें इ० घांसणें. इ० कानें उजळ करणें; २, दिवा, मशाल, वाती, इ० पेटविणें; ३, सूर्य चंद्रादि तेजसन्निहित आल्यामुळें दिशा प्रकाशविष्ट होणें; ४, मनुष्य, किं० पाडास आलेलें आम्रादिफल उजळ होणें; ५, उष्णादि विकृतीनें लालझालेला डोळा आणि अंधकारानें विशिष्ट झालेली गात्र निवळणें.

उजळतामाथा, पु० (होणें) (उजळणें·माथा) अपवादादि निरास होऊन तोंड उजळ होणें.

उजळपाजळ, ३ लिं० उजळजें वस्त्र, पात्र, इ० तो,

उजळा, पु० (उजळणें) सोने रुप्याचा दागिना उजळ होण्याकरितां सोरा, तुरटी, इ० द्रव्यांत घालून तापवितात असा जो संस्कार तो, किं० तें एकत्र सिद्ध केलेलें द्रव्य तो.

उजागरा, पु० (उन् जागर सं०) कांहीं कारणामुळें निद्रा न आली असतां घडतो जागर तो.

उजागरी, स्त्री० कोणेक व्यवहार प्रसिद्धपणें करण्याविषयीं असतें जें भय लज्जादि प्रतिबंधक त्याचा निरास झाल्यामुळें तें कर्म प्रसिद्धपणें करावयास होती जी मोकळीक ती; २, उघडीक.

उजागिरी, स्त्री० उजागरी.

उजागीर, ३ लिं० विवक्षित कर्म प्रसिद्धपणें करण्यास जास मोकळीक झाली आहे तो.

उजाड, ३ लिं० ग्रामादिकांचा ठायीं राहाणारे जे मनुष्यादिक त्यांचे वसतीनें रहित झाला जो ग्राम, गृह, देश, वन, इ० तो.

उजाडणें, उजेडणें.

उजाडतां, अ० (उजाडणें) सूर्योदय समयीं.

उजाडताकाळ, पु० (उजाडणें·काळ) अभ्युदयकाळ.

उजाडी, स्त्री० (उजाड) उजाडपणा.

उजू, वि॰ (ऋजु॰ सं॰) समसूत्रानुवर्ती जें क्षेत्र, रेषा, मार्ग, इ॰ पदार्थ तो; २, जा दिशेकडे जें जें पदार्थाचें अंग असावें त्या त्या दिशेकडे तें तें अंग करून स्थित जो पदार्थ तो; ३, ला॰ यथान्याय जो भाषणादि व्यवहार तो; ४, छक्केपंजे, ध्वन्यर्थ, वक्रोक्ति, इ॰ रहित जें भाषण, वाक्य, श्लोक, इ॰ तो; ५, अ॰ मानक्यान; ग॰ बेल, कि॰ टोणगा, उजूकरणें, स॰ पेटविणें.

उजूं, अ॰ पुनः यार्थी; शूद्रभाषावृत्ति.

उजूर, पु॰ आक्षेप द्वितीयार्थी: उ॰ महिना भरल्यावर माझा उजूर नधरितां तुम्ही गाहाण विकून ऐवज घ्यावा; २, अरुता.

उजेड, पु॰ पदार्थ दृष्टिगोचर होण्यास कारणभूत सूर्यादिसंबंधी प्रभा तो जाचे अभावास अंधकार म्हणतात कोणेकाचे हातें उजेड पडणें स॰ लोकानीं हंसावें, छी, थू, करावें, अशी कांहीं अपकीर्ति इ॰ होणें.

उजेडणें, (उजेड॰) सूर्योदय होणें: २, ला॰ कोणेकास यथेच्छ व्यवहार करण्यास अनुकूलकाल प्राप्त होणें.

उजेडतां, अ॰ उजाडतां.

उजेरणें, रा॰ मा॰ उजरणें; २, पाणी यावयाचा पाट, कि॰ मार्ग, इ॰ आंतील केरकचरा रुजलेलें तृण, इ॰ काढून स्वच्छ करणें; ३, लिहिणें, पढणें, इ॰ कांविषयी केवळ अशिक्षित जें मूल त्यास त्याणें स्वतः थोडें बहुत वाचावें, लिहावें, अशी योग्यता येई असा शिक्षित करणें.

उज्ज्वल, वि॰ (उज्वल॰ सं॰) स्वच्छ अमृत चकचकीत जो पदार्थ तो.

उज्ज्वलन, न॰ सं॰ दीपादि. कि॰ पात्रादि जळण्याचा व्यापार तें.

उज्ज्वलित, वि॰ सं॰ उजळलेला दीपादिक, कि॰ पात्रादिक तो.

उज्झित, वि॰ सं॰ त्यक्त.

उझेड, पु॰ उजेड.

उझेडणें, उजेडणें.

उझेडतां, अ॰ उजाडतां

उज्झित, वि॰ त्यक्त.

उंट, पु॰ न॰ (उष्ट्र॰ सं॰) सैन्यादि संबंधी ओझें वाहणें. इ॰ उपयोगी एक पशु आहे.

उंटकटारी, स्त्री॰ एक वनस्पति आहे.

उटंगर, न॰ (उठणें॰) शरीर, भूमि, इ॰ कांचा ठायीं मध्यें जो टेंगळा सारखा अवयव असतो तें.

उटंगळ, वि॰ (उठणें॰) मध्यें मध्यें उटंगरें आहेत जाचा ठायीं असें शरीर, शरीरावयव, भूमि, इ॰ तो; २, आधारावर यथास्थित टेंकून डुळमळेना असा बसलेला नव्हे असा जो दगड मनुष्य, इ॰ तो.

उटणें, धातुमयमूर्ति, भांडें, इ॰ रासव, माती, इ॰ कानें घांसणें; २, न॰ अभ्यंगोत्तर शरीरास लावावायाचें जें अर्गजा, इ॰ सुगंधिद्रव्य असतें तें, कि॰ तेणेंकरून शरीरास जें मर्दन तें.

उंटमान्या, वि॰ (उंट॰ मान॰) विशोभित दिसाया जोगी उंच जाची मान त्यास म्ह॰.

उटाळणें, वागिंद्रियद्वारा कोणेक शब्द स्पष्ट उच्चारला जाणें ; लिहिलेलें अक्षर स्पष्ट उमगलें जाणें, कि० गूढ जो श्लोक, अर्थ, इ० समजला जाणें.

उटाळा, पु० (उटाळणें) उटाळी; २, वागिंद्रियापासून कोणेक अक्षराचा स्पष्ट जो उच्चार तो; ३, लिहिलेलें अक्षर, कि० गूढ श्लोक, अर्थ, इ० कांचें परिज्ञान.

उटाळी, स्त्री० कों० उत्तेजन; देणें धातुयोगीं प्र०.

उटाळें, न० गाडा, गाडी, इ० कांचें चाक चढूं नये म्हणून जी दगड इ० अट लाविलेला तें

उटिंगळ, न० भूमि, भिंत, इ० कांवर असतें जें उटंगर तें.

उटिंबरा, पु० कों० उटिंगळ.

उटी, स्त्री० कपाळ, भुज, उर, पोट, इ० सर्वांगास जो चंदनादि द्रव्याचा लेप करितात ती, कि० तें तदर्थ सिद्ध केलेलें पातळ चंदनादिक ती; २, गा० मध्यें एक स्तंभ पुरून त्याचे भोंवतालें भाताचें इ० तृण वरपर्यंत रचितात अशी नीरचना ती; ३, चाक, नोफ, इ० नघरळावें म्हणून त्यास लाविलेला जो प्रतिबंध ती.

उटेरेटे, उ० रा० (उठणें-रेटणें) स्वस्थपणें बसावें, तें सोडून अनेक प्रकारची वळवळ करावी असा जो पोर इ० कांस छंद लागतो तें लागणें, धातुयोगीं प्र०.

उठणें, (उत्थान-सं०) भूम्यादि आधारावर आडवेपणें देऊन पडलेला जो मनुष्य, तृण, इ० सजीव पदार्थ त्याचें गुद, पाद, मूल, इ० आधार देंकून उभार होणें; २, निजलेल्यानें जागृत होणें, कि० मूर्छादिकानें मृत प्राय झालेला जो तेणें सावध होणें; ३, बसलेला जो मनुष्यादिक त्यानें उभें राहणें; ४, अधोदेशास्थित जो पदार्थ त्याचें उर्ध्वदेशाकडे होणें; उ० होडी हलकी होतांच चार अंगळें वर उठली; ५, ठेंगणा जो कांहीं पदार्थ त्याचें उन्नत होणें; उ० चार शिंपणीं लागोपाठ सांपडतांच पहिल्यापेक्षां चार बोटें भाजी उठली; ६, अधिष्ठित स्थलादि सोडून निघणें; उ० चार वाजले म्हणजे कचेरी उठते; आतां या विषयावरून माझें मन उठलें; ७, कोणेक व्यापारीं अप्रवृत्तपणें स्थित जो त्याचें त्या व्यापारीं प्रवृत्त होणें; उ० मी इतकें बोलतांच तो जीव घायास उठला; ८, कोणेकानें कोणेकावर त्याचें वाईट करण्यास प्रवृत्त होणें; उ० दुर्जन जाचें अन्न खातो त्याजवरच उठतो; ९, अप्रवृत्तपणेंस्थित जें चोरावें, माहामारी, इ० त्याणीं प्रवृत्युन्मुख होणें, कि० प्रकृत्यवस्थेकरून स्थित जे पित्तादिक त्याणीं क्षोभावस्थेतें पावणें; १०, कांहींएक गोष्ट नवीच प्रसिद्ध होणें; उ० बारा वर्षांचें मागलें देणें, येणें, कीणी देऊं नये, मागूंनये, असें हें आलीकडे नवेंच उठलें; ११, कागद, पत्र, इ० कांवर रंग, अक्षर, ठसा, रेषा, इ० अभिव्यक्त होणें; १२, शरीरांत आग, निडीक, इ० अनुभव विषय होणें; १३, भूमि, शरीर, उदक, इ० कांवर पोपडे, वारूळ, खरूज, फोड, कोड, बुडबुडे, लाद, इ० उत्पन्न होणें;

१४, कोणेक काम करून, कि० कोणक पदार्थ खाणें, नणें, इ० कानें निःशेष होणें; कोणेकानें आपला स्वभाव, जाति, गुण, कूळ, इ० कांवर उठणें अ० लोकिकानुरूप धरलेली मर्यादा सोडून तत्तदनुरूप वर्तूं लागणें; कपाळ, डोकें, इ० उठणें अ० कलकलणें.

उठतांबसतां, अ० (उठणें० बसणें०) प्रतिक्षणीं, प्रतिव्यापारीं; उ० उठतांबसतां जर मारूं लागलों तर मग परिणाम काय.

उठल्याबसल्या, अ० उठतांबसतां.

उठवण, स्त्री० (उठवणें०) बसलें असतां स्वतः उठवत नाहीं, दुसऱ्यानें उठवावें लागतें, असा जो गुरूं, घोडें, इ० कांस अशक्तपणा येतो तो; २, ला० लोकांचें कर्ज, वाम आणि दारिद्र्य झाल्यानें जी व्यवहारा विषयीं दुर्बलदशा येत्ये ती

उठवणकर, ३ लिं० (उठवण०) उठवणीस आलेलें गुरूं इ० तो.

उठवळ, ३ लिं० (उठवणें०) बसला असतां दुसऱ्यानें उठवावें असा जो आळशी तो.

उठाउठी, अ० (उठणें द्वि०) विलंब न करितां सत्वर येणें, जाणें, इ० कांचें वि०.

उठाठव, स्त्री० कों० उठाठेव.

उठाठेव, स्त्री० (उठणें ठेवणें०) आणणें, नेणें, देणें, घेणें, ठेवणें, विचारणें, पुसणें, इ० रूपजी अनेकप्रकारची कोणेक व्यवहार संबंधी रिकामी खटपट ती.

उठाणू, न० (उठणें०) शरीरावर गळूं इ० उठल्ये जी गांठ इ० तें.

उठाबशी, स्त्री० ऊठबशी.

उठावणी, स्त्री० युद्ध, मोठें ओझें उचलणें, इ० कर्मीं चाठायीं सावेश वेगानें पडण्यासाठीं जें उत्थान तीं; २, कोणेक व्यवहारादिकांविषयीं जो थकला त्याचे, कि० त्या व्यवहादिकांचें द्रव्यादि साहित्यपूरणद्वारा कोणी करितो जें उत्थापन तीं; ३, अधिष्ठित स्थल सोडून स्थलांतरीं जावयाकरितां जें उत्थान तीं.

उठावणें, युद्धार्थ कोणेकावर चालून जाण्याकरितां उठणें.

उठावा, पु० (उठणें०) प्रा० उठावणी; २, कांहीं उपद्रव बाधूं लागल्यामुळें अधिष्ठित स्थलापासून होतें जें उत्थान तीं; कि० आतां एथून उठून जावें असा येतो जो त्या स्थलाचा त्रासतो.

उंड, पु० कों० वातादि विकृतीनें पोटांत जो गोळा उचलतो तो; २, स्त्री० उंडीण.

उडकी, स्त्री० ग० (उडणें०) उचकी.

उडणें, (उड्डान० सं०) अश्वादिकांनीं उड्डान युक्त सवेग गमन करणें; २, उडीनें मध्यस्थित जो चर, तट, भिंत, खळा, दीग, इ० उल्लंघित करणें; ३, कोणेक पदार्थ आघात प्रत्याघातादि कारणामुळें सवेग होऊन त्याच वेगानें अधिष्ठित आधारापासून तटकन अन्यत्र जाणें, पडणें; उ० चेंडूजसा वेगानें अपटाल तसा वर उडेल; ४, तोंडावर वस्त्र धरून बोल नाहींतर दुसऱ्याचे अंगावर थुंका उडतो; ४, बैल, दोणगा, घोडा, इ० पशूनीं मैथुनार्थ गाय, म्हैस, घोडी, इ० कांवर

चढणें; ५, ला० भिंत, वस्त्र, इ० कावर ठिसेला रंग कि० भूम्यादि संबंधी आर्द्रता इ० सूर्य किरणादि संयोगानें नच्चदधिकरणी नाहींसा होणें; ६, द्रव्यादि पदार्थ खर्चून नाहींसा होणें; ७, कोणेकास प्राप्त झालेलें रोजगार, चाकरी, वृत्ति, इ० त्या पासून सुटणें. कि० त्या रोजगार इ० कांपासून तो वियुक्त होणें; ८, शास्त्र विषयादिकांवर आलेला जो दोष, युक्ति, समाधान, उपपत्ति, इ० तें कांहीं एक विरोध सन्द्रावामुळें लागूं पडेनासें होणें; ९, दुसरें जें गुरू इ० त्याणें दृष्य आटल्यामुळें भाकडपणारूप दशा पावणें; १०, कोणेकानें नाट्यानें विनय, मर्यादा. सोडून साभिमान चढाचें भाषणादिकर्म करणें; ११, कज्जा, लढाई, मजा, फजीती इ० सा निश्चयपणें होणें; तोफ, बंदूक, इ० उडणें, स्फ० त्यांनीं ला बार उडणें.

उडत-उडत, अ० (उडणें-हि०) पुरतेपणें हें अमुकच असें निर्धारण न होई असें अस्पष्टपणें ऐकणें, सांगणें, बोलणें, इ० कांचें वि०; उ० हें काम त्यास होणार अशी बातमी मी उडत उडत ऐकिली, २, मूलस्थलापासून विवक्षित स्थल पर्यंत एका वेगानें यावें असा जो आगमन प्रकार त्यानें स्फ० मध्यें मध्यें अनेकस्थलीं संबंध होत होत वर्तमानादि येण्याचें वि०; ३, मध्यें मध्यें कांहीं कांहीं स्थलें सोडून; उ० सगळी कथा सांगावी तर वेळ लागेल यास्तव उडत उडत सांगतों.

उडता, वि० (उडणें) उडत उडत आलेलें. कि० एकलेलें इ० वर्तमानादिकतो; उडत्या पांखरगचे पंख मोजणारा, कि० मोजणारा, स्फ० सूक्ष्म कांहीं एक लक्षणावरून अंतःस्थित अभिप्रायादि जाणणारा चतुर त्या सस्फ०.

उडदाबेगम, स्त्री० मोंगली संप्रदायाचीं बुद्धवळें आहेत त्यांत एक मोहरे आहे.

उडदीमुहूर्त, पु० कों० (उडीद-मुहूर्त) लग्न, कि० मुंज. एतदंगत्वें करून पूर्वी सुवासिनी मिळून उडीद दळण्याचा जो समारंभ करितात तो.

उडदावळ, स्त्री० (उडीद-आवली-सं० आवळ) प्रतिवर्षी जेथें उडदाचें शेत करितात ती जमीन.

उडपाल, न० मार्गी उतरायाकरितां जें मोठें पाल देतात त्याचे पुढले अंगी स्वयंपाकादि करण्याकरितां जें लहानसें पाल देतात तें; २, पर्जन्य निवारणार्थ कंबलाची खोळ इ० जें घेतात त्याजवर दुसरें वस्त्र लावितात तें.

उंडल, स्त्री० रा० उंडीण; २, न० तिचें जें फल तें.

उडवणी, स्त्री० (उडवणें) कोणे एकानें सांगितलेली कांहीं गोष्ट तिचें आदरपूर्वक यात्य बुद्धीनें ग्रहण न करितां थट्टेवर यातून त्या गोष्टीची, कि० त्या बोलणाराची करितात जी अवहेलना ती.

उडवणें, एकत्र रचून ठेविलेला जो तृण, केश, पानें, कागद, इ० पदार्थ अस्ताव्यस्त करणें;

२, उडे अमाकरणें.

उडवलाउडवला, ३ लिं० कों० (उडवणें द्वि०) मध्यें मध्यें कांहीं कांहीं स्थलीं आहे, कांहीं कांहीं स्थलीं नाहीं, अशा प्रकारें स्थित जो पदार्थ तो, उ० अंबे बहूत करून अभाळानें गळाले आतां कोठें उडवलेउडवले आहेत.

उंडवळ, ३ लिं० कों० उंडारणें द्वितीयार्थानें युक्त जो तो.

उडवाउडव, स्त्री० (उडवणें द्वि०) रचून ठेविलेला जो तृणादि तो इकडे तिकडे उडविण्याचा जो व्यापार ती, कि० तेणेंकरून त्या तृणादिकांचा होतो जो अस्ताव्यस्तपणा ती; २, कोणेक विषयादिकांवर आलेला जो दोषादिक तो तेथें लागून होऊंदेतां निरास करण्याचा जो व्यापार ती.

उडवी, स्त्री० लहान जें उडवें तें.

उडवें, न० शेत कापून सधान्य तृणाचा रचून ठेवितात जो राशि तें.

उंडा, उ० भाकर, पोळी, इ० करायासाठीं सिद्ध करितात जो पीठ इकांचा गोळा तो; २, उडीद आणि तांदूळ यांचे पीठाचा शिजवून भक्षणार्थ पदार्थ करितात तो.

उडाऊ, ३ लिं० (उडवणें) हातीं आलेलें द्रव्यादि वरचेवर खर्च करून उडवावे असा स्वभाव जाचा तो.

उडाणटप्पू, ३ लिं० धरलेल्या स्थलावर, कि० व्यवहारादि विषयांवर चिरकाल स्थिर नहोतां तें सोडून दुसरें धरावें असें वारंवार २

वार करण्याचा स्वभाव जाचा तो.

उडाणवीर, उ० कों० कोणत्याही अवघड कामांत भय शंका न धरितां उडी घालण्याचा स्वभाव जाचा असा जो मनुष्य इ० तो.

उंडारणें, चांगला पदार्थ उपभोगास मिळूं लागल्यामुळें साधारण पदार्थांचा अव्हेर करूं लागावें असा मन होणें; २, कों० यथेष्ट खाणें, पिणें, मिळाल्यामुळें उन्मत्त होऊन अध्ययन, संसार, इ० कांची काळजी सोडून खेळणें, उड्या मारणें, उनाडकी करणें, इ० चेष्टांनीं युक्त होणें.

उडावणी, स्त्री० उडवणी.

उडाळ, ३ लिं० रा० विवक्षित विषयांवरून उठलें जें अंतःकरण तें; उ० द्रव्य मिळविण्याची आस्था लागतांच याचें मन विषयावरून उडाळ झालें.

उडी, स्त्री० (उडणें) पायांनें भूम्यादि आधार खालीं दाबून त्या नेटानें जो वेग उत्पन्न होतो तेणेंकरून तेथून तटकर उडून दुसरेठायीं पडावें, असा जो गमन प्रकार ती; २, ला० कोणेक कर्तव्य गोष्टीविषयीं कोणेक प्रमाण मर्यादेतें लक्षून धरिला असतो जो संकल्प ती; उ० त्या घोडयाचे हजार रुपये द्यावे अशी त्याची उडी आहे; कोणेक पदार्थ, व्यवहार, यांवर उडी पडणें, ग्र० मला पाहिजे मला पाहीजे मी करितें मी करितों असें म्हणून घाईनें झडून कोणेकाची प्रवृत्ति होणें; उड्या मारणें ग्र० माझी फजीती होईल, कि० मला कोणी मारील. इ० भय न धरितां उद्दामपणें वागणें, कि० पोर

इ०

इ० कानें उनाडक्या करणें, कि० आपल्या हातानें होईल काय न होईल काय, इ० विचार न करितां अहंकारानें मी असुक करीन, नसुक करीन, इ० भकणें, कि० कोणेक बलाचे आश्रयानें काळजी न धरिता पाहिजे तसें उमेदीनें वर्तणें; उ० आजपर्यंत आम्ही तुमचे बळावर उडया मारीत होतो परंतु तुम्ही हातचें सोडलेंत; ३, रा० दुसऱ्यास बेल, कि० दोणगा नांगरास वाहायास दिला असतां तन्निमित्त जें कांहीं धान्य, कि० द्रव्य आपल्यास येतें तो.

उंडी, स्त्री० शिजलेल्या भाताचा यास परिमित जो विभाग तो; २, खीर इ० करायासाठीं तांदूळ इ० कांचा पिठाचा गोळ्या करितात त्या प्र०; २, उंडीण.

उंडीं, न० उंडिणीचें फळ.

उंडीण, स्त्री० एक झाड आहे.

उडीद, उ० एक द्विदल धान्य आहे.

उंडीबकाल, उ० रा० (उंडी·बकाल·) भोजनभाऊजो मनुष्य त्यास प्र०.

उंडेल, न० (उंडी·तेल·) उंडिणीचा फळांचेंजें तेल तें.

उडुाण, न० उडुानाचा अपभ्रंश.

उडुान, न० सं० उडी अंत्यार्थावांचून मा० प्रथमार्थी.

उडया, ३लिं० (उडणें·) पडयाचा मतिपक्षी; प्र० उडया पुरवेल पण पडया पुरवत नाहीं.

उंडेवें, न० उंडी.

उंड्येल, न० उंडेल.

उणवाई, स्त्री० कों० (उणा·) विवक्षित परिमाणापेक्षां कोणेक परिमेय पदार्थास जें न्यूनत्व तो.

उणा, ३लिं० (ऊन·सं०) विवक्षित संख्येपेक्षां, कि० परिमाणापेक्षां अल्प संख्याक, कि० अल्पपरिमाणक जो पदार्थ तो, कि० तावत्परिमित होण्याविषयीं आकांक्षित असतोजो अंश तोही; २, अपूर्ण जें काय, सामग्री, इ० तो, कि० तें पूर्ण होण्याविषयीं आकांक्षित असतोजो पदार्थ, कर्म, इ० तोही; उ० शेताचा सरंजाम जमविला खरा परंतु उणा आहे, कांकीं आंत बेल उणे आहेत म्हणून; ३, जा पेक्षां जाची योग्यता अल्प तो त्या पेक्षां; उ० वैश्य जातिपेक्षां शूद्रजाति उणी; ४, जास बोलावे त्याची, कि० वन्त्याची योग्यता जेणेंकरून हलकी होत्ये असा जो दुर्भाषण याचनादिरूप शब्द, वाक्य, इ० तो; ५, चाललेल्या व्यवहाराची दुर्दशा होण्यास, कि० आपला उपहास इ० होण्यास निमित्तभूत जें व्यंग कांहीं एक तो; परंतु या अर्थी नपुंसकी विशेष्येंकरून प्रा० व्यवहार; उ० साधु कोणाचें उणे पाहत नाहींत: आपले घरची उणी गोष्ट बाहेर सांगूं नये.

उणारव, ३लिं० (उणा·आंरव·) उंच नव्हे असा जो कापड, मोतीं, सोनें, कागद, इ० किती एक पदार्थ तो.

उणादुणा, ३लिं० (उणा·सोप·) दुर्भाषणादि-

क जें उणें इ० भाषण तो.

उणापुरा, २ लिं० (उणा-पुरा-) विवक्षित प्रमाणापेक्षां कांहीं उणा, कि० यथा कथंचित् तुल्य तो; उ० तो गांव एथून उणापुरा कोस भर आहे.

उणावणें, (उणा-) पर्जन्य, शैत्य, रोग, इ० पूर्वस्थितीपेक्षां उणा होणें.

उणीव, स्त्री० (उणा-) उणेपणा.

उत्, अ० हा संस्कृत उपसर्ग आहे; उत्कर्ष, आधिक्य, ऊर्ध्वत्व, उन्नतत्व, इ० अर्थ होतात.

उतटणें, (उत्-सं० तट्-मा०) आंतील पदार्थ अतिरिक्त झाल्यामुळें वरील आवरण फाटाया जागें ताणलें जाणें, कि० ताणून फाटणें.

उतणणें, (उत्-तृण-) तृण. झांप. इ० कानीं आच्छादित जें गृहादि तें त्या आच्छादनानें रहित करणें; २, ला० गर्वजन्य ताठ्यानें युक्त होणें.

उतणें, (उत्-सं०) दूध, कढी, तेल, तूप, इ० पदार्थ अग्निसंयोगानें पात्राबाहेर पडाया जागें वर येणें; २, शरीरांतील ज्वर ओष्ठादि प्रदेशीं स्फोटादिरूपेंकरून बाहेर पडणें; ३, विद्या, अंबा, शेर, इ० कांचा चीक इ० शरीरास लागला असतां चिडणें; ४, समुद्रफेन, कात, इ० कांचे चूर्णावर निंबाचा रस इ० घातलें असतां दूध उतल्या सारिखी अग्निसंयोगावांचूनही अवस्था झाली असतां तेथें प्रयोग करितात; ५, ला० उतणणें द्वितीयार्थी.

उतरंड, उतरड, स्त्री० मडकीं, तपेलीं, इ० पात्रें एकावरएक एकावरएक ठेऊन करितांतजी रचना

रचना ती; २, घोडयाचे कपाळावर एक अवलक्षण असतें ती; ३, एकवेल आहे.

उतरण, स्त्री० (उतरणें-) पर्वत, नदीतीर, इ० संबंधी क्रमानें उतरती जीजमीन ती; २, न० पायानीं नदी उतरून जाण्याचेण्याचें जें नदींतील स्थल तें.

उतरणें, (उत्तरण-सं०) ऊर्ध्वप्रदेशीं स्थित जो पदार्थ तो अधःप्रदेशीं आणणें; उ० डोकीवरचें ओझें खालीं उतरकिरे; २, जिना, घाट, पर्वत, इ० कांचे माथ्यावरून खालीं येणें, कि० कोणेकास आणणें; ३, नदी, ओढा, इ० उल्लंघून कोणेकास पारनेणें, कि० स्वतः जाणें; ४, एकाठायीं लिहिलेला जो कांहींएक अर्थ. तो त्या प्रतीप्रमाणें दुसरे ठिकाणीं लिहिणें; ५, कोणेक कर्तव्य कार्याविषयीं हें कार्य या आकाराचें या गुणाचें सिद्ध झालें इ० रूप जें पूर्वी त्याचें स्वरूप मनांत आलें असतेंतदनुरूपच तें कार्य सिद्ध करणें; उ० तपकिराची भट्टी कृष्णापा चांगली उतरतो; कोंकणयाची नक्कल हा हूबहू उतरतो; ६, मोठ्या प्रमाणानें चाललेला जो कांहींएक व्यवहार तो तदपेक्षया अल्प प्रमाणक करणें; उ० नवा राजा झाला त्याणें शेतास पीक नाहीं असें पाहून धारे उतरले; ७, संपत्त्यादिकें करून उच्चपदीं स्थित जो त्यास नीचपदींआणणें, कि० उच्च जो गृहादि पदार्थ तो ठेंगणा करणें, कि० गर्वानें जो वरचढ झालेला त्यास भोंसडपट्टी इ० हारा हलका करणें;

८, शरीरादिकांचेठायीं चढलेला जो तेज, पाणी, गर्व, मद्यादिमद, विष, पित्त, इ० तो शांत करणें; या अर्थी लक्षणेंकरून सर्पाचें विष उतरलें या अर्थी सर्प उतरला असा प्रयोग करितात; ९, गंजीफांतील हुकुम पान खेळाया साठीं रवाली टाकणें; १० हिशेब, माप, शकुन, भविष्य, कथन, इ० ताळ्यास येणें; ११, वस्त्र जीर्ण झाल्यामुळें जागोजाग फाटूं लागणें, १२, फळ अविकणें; १३, कोणेक पदार्थ विवक्षित संस्कारद्वारा परिणाम पावून कोणेक रूपानें भिद्रावस्थापन्न होणें; उ० एक काहीलभर रसाचा वारमण गूळ उतरला; हा रंग सुकल्यावर कसा उतरेल तो पाहावा; १४, मार्गी चाललेला मनुष्यादिक, कि० भिन्नसपानस इ० त्यानें गमनावसान करून विवक्षित स्थलीं स्थिरकरणें; उ० आपलें सर्व खटलें बाहेरचे देवळांत उतरा आणि तुम्ही सडे किल्ल्यांत या; १५, द्रव्य, माल, कुंडी, इ० विवक्षित दुकान इ० स्थलापासून स्थलांतरीं पोंहचे असें करणें; १६, सामान्यतः निघालेला जो कोणी त्याणें कोणेक प्रदेशाकडे जावयास शरव धरणें; उ० महामारी तिकडे खानदेशांत उतरली; १७, चोर इ० कांची नाक, जीभ, इ० छेदणें; १८, कांहीं एक करणानें उत्साह धैर्यादि भंग होऊन विरमणें; १९, भोक्तव्यतेंकरून प्राप्त जें कांहीं एक संकट, प्रसंग, त्यापासून पारपडणें; उ० देवीतून दोन मुलें उतरलीं एक दगावलें; २०, कोणेकस्थलीं सोपा, पडवी, छपर, इ० बांधून सिद्ध करणें; २१, मनुष्यादिकानें तारूण्याचा भार जाऊन उतार होणें, कि० रोगादिकानें रुक्ष, अशक्त होणें; कांहींएक गोष्ट मनुष्य, इ० कोणेकाचे मर्जी, खुषी, इ० कांस उतरणें, ल्प० अनुरूप होणें; कोणेकाचे मर्जी, प्रीति, इ० कांतून कांहींएक उतरणें; ल्प० अननुरूप होणें; गुरूं, घोडें, इ० पशूंचें अपत्य दोहों पायींनीं, चहूं पायांनीं इ० उतरणें, ल्प० उपजतच ते त्याचे पाय खुरापाशीं पांढरे असणें; गरभार स्त्री हातीं पायीं उतरणें, ल्प० प्रसवापासून मोकळी होणें; कोणेकावरून निंब, लोण इ० उतरणें, ल्प० दृष्टिविकारादि निरसनार्थ ओंवाळून काढणें; पोषाख, अलंकार, पूजा, इ० उतरणें, ल्प० शरीरावरून काढणें; कांहीं गोष्ट मनांत उतरणें, ल्प० मनांत घेणें; सकर्मक जे अर्थ लिहिले आहेत तथेंही कर्मास कर्तृत्व मानून अकर्मकत्वें करून व्यवहार प्रचुर आहे.

उतरता, वि० (उतरणें) क्रमेकरून उतरत आलेला जो भूविभाग, संपत्ति, काळ, इ० तो; २, दहल्याचे मागें नहल्यानें हुकुम हाणावें, नहल्याचे मागें अहुयानें हुकुम हाणावें, इ० क्रमाचा जो गंजीफांतील रंग तो.

उतरतापाया, पु० (उतरता·पाय·) चढते पायाचा प्रतिपक्षी.

उतरतीकमान, स्त्री० (उतरती·कमान·) चढत्याकमानीची प्रतिपक्षी.

उतरतीवेळ, स्त्री० उतारवेळ.

उतरपराई, स्त्री॰ उतरपगई.

उतरपेंठ, स्त्री॰ रा॰ उतारपेठ.

उतरवट, ३लिं॰ (उतरणें) सुमाराचा उतरता जो भूविभागादि तो

उतरवणी, न॰ रा॰ (उतरणें-पाणी) तांदूळ अधणांत घेरून त्यास उकळी आल्या नआली तों त्यांतील पाणी उष्णता निगसार्थ ओतावयासाठीं इ॰ कादितात तें.

उतराथी, ३लिं॰ (उतरणें) दुसऱ्यानें आपल्यावर उपकार केल्यामुळें, किं॰ कोणेकास मी तुझें काम करीन इ॰ वचन दानादि कारणामुळें जो त्याचा आपल्यावर भार असतो तो प्रत्युपकारादिद्वारा उतरला आहे जाचा तो.

उतरींव, ३लिं॰ (उतरणें) खालीं आदळून पडतां अचळ उतरून काढलेला अंबा इ॰ तो.

उतव, पु॰ रा॰ परशावर कांबळें इ॰ सुकत घालावयासाठीं लहान मंडपी साररच्या तीन, चार, काठ्या बांधल्या असतात तो.

उतवणें, (उत्तू॰ हिं॰ १ उतू॰ मरा॰ २) तापता इ॰ वस्त्र, तापलेल्या रवापरावर पसरून शास्त्रानें विवक्षित रेखांकित करणें.

उतळणें, कों॰ पाडास आलेलें आम्रादि फळ उजळणें.

उताटणें, कों॰ केळें, फणस, इ॰ फळ, किं॰ पोतें इ॰ आंतील अंश फार झाल्यामुळें बाहेरचें साल इ॰ फाटे अशा अवस्थेनें विशिष्ट होणें; २, ला॰ गर्वानें ताटणें.

उताणा, ३लिं॰ (उत्तान॰ सं॰) मुख, पोट, हे पुरो भागाकडील जें अवयव ते ऊर्ध्व प्रदेशाकडे करून स्थित जो मनुष्य, पात्र, पर्ण, इ॰ तो.

उताणापाताणा, ३लिं॰ उताणा इ॰.

उतार, पु॰ (उतरणें) पाण्याचे अल्पत्वामुळें पायांनीं उतरून जाण्याची जी नदी, ओढा इ॰ कांस येत्ये योग्यता तो; २, नदींतून पायांनीं उतरून जाण्याची वाट असते तो; ३, नद्यादिकांतून गलबत, नाव, पेटें, इ॰ कानीं आपल्यास उतरून नेलें असतां त्या नाविकादिकांस जें तन्निमित्त द्रव्यादि द्यावें लागतें तो; ४, जा ओषधादिकाचा विकृतीचें निरसन जा ओषधादिकाचा योगानें होतें तें त्याचा; ५, कोणेकास बक्षीस द्यावयाकरितां काढिलें जें अंगावरील उपउभून्क वस्त्र, भुषण, तो; ६, पर्वतादिकांचा जो क्रमेंकरून उतरतेपणा तो, किं॰ वृधिंगत झालेलें दुखणें, संपत्ति, दारिद्र्य इ॰ त्यांस जें उत्तरोत्तर ह्रासोन्मुखत्व तो, किं॰ त्याचा पूर्वावस्थेपेक्षां जो न्यूनीभाव तो; ७, चवघडा वाजून राहायाचा झाल्या अगोदर जे गतिविशेषेंकरून जो बाजा करितात तो; ८, ३लिं॰ तारुण्याचा भर जाचा गेला असा जो मनुष्यादि तो.

उतारकरी, उतारकरू, पु॰ (उतरणें) स्थलविशेषीं भोजन, वस्ती, इ॰ करायासाठीं उतरलेला जो पांथस्थ तो; २, उतार देऊन नौका, गलबत, इ॰ कानें नद्यादिकांतून उतरून जाणारा जो तो.

उतारपेंठ, स्त्री॰ (उतरणें-पेंठ) चोहींकडून उ-

दमीलोक हराजिनसी माल घेऊन विकाया करितां आणि देशावरचे खरीददार माल खरेदी करावया करितां जेथें नेहमी येत असतात अशी जी पेंठ ती.

उतारपोशाक, उतारपोषाक, पु० (उतार-पोषाक) आंगावर उपभोगून काढिलेला जो पोषाक तो; परंतु कोणेकास बक्षीस देण्याचे प्रसंगीं प्र०.

उतारबाजी, स्त्री० उतारसप्तमार्थी.

उतारवेळ, स्त्री० (उतार-वेळ) दोन प्रहर दिवस टळल्यावरचा सायंकालावधि जो समय तो.

उतारा, पु० (उतरणें) कांहीं परिमाणानें परिमित जें कांहींएक द्रव्य तें तत्तत्संस्कारानीं परिणत केलें असतां त्या परिणाम देणेचाठायीं त्याजवर सिद्धपणें राहतें जें कांहींएक परिमाण तो; उ० पंधराशेर लोणी कढिलें त्याचा बाराशेर उतारा आला; २, कोणीएक श्लोक, वाक्य, लावणी, इ० कांची अर्थ, धाटी, इ० विवक्षित धर्मानें, किं० एकानें प्रतिपादित जो कांहीं अर्थ तो उघडला जाई अशा विरुद्ध प्रतिपादनानें बगंबरा करणारें जें श्लोकांतरादिक तो; ३, कों० पिशाचोपद्रव निरसनार्थ अंगावरून ओंवाळून टाकितात जें अन्न, नारळ, कोंबडें, इ० तो.

उतारी, स्त्री० (उतरणें) बंद होतीं न गरगरूनजो गंजिफांचा खेळ खेळतात तो; २, संपत्ति, तारुण्य

तारुण्य, इ० कांची जी उतरती दशा तीस क० प्र०.

उतारू, पु० (उतरणें) उतारकरू.

उतार्‍या, पु० (उतरणें) नाव, पेटें, इ० केंकरून नदींतून लोकांस उतरून नेणारा जो तो.

उतावळा, वि० (उत्तान्यत् सं०) कर्तव्य, प्राप्तव्य, इ० रूप जो कोणी एक अर्थ तद्विषयीं काल विलंब जाला कंठवत नाहीं तो; प्र० उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग.

उतावळी, स्त्री० (उतावळा) उतावळेपणा; २, औंधळ्यांत एक जाति आहे.

उतावीळ, उतावेळ, वि० उतावळा.

उतूं, पु० (उत्तू हिं०) अंगरखा इ० शिवावयाचे कापडास जसे जसे दोरे घालावयाचे तशीतशी घडी घालून दाबून मोडी पडत असा करितात जो संस्कार तो.

उतूं, अ० येणें, कि० जाणें, धातुयोगीं प्र०, अ० दूध, कढी, इ० पदार्थ अग्नीचा अतिसंयोगानें उतास जाणें. येणें.

उतें, न० कों० जमीन न भाजितां तेथें करितात जें भाताचें रोप तें.

उत्कट, वि० सं० अतिशयित.

उत्कंठा, स्त्री० सं० कांहींएक जें प्राप्तव्य, कर्तव्य, द्रष्टव्य, इ० तद्विषयीं उत्कट जी इच्छा होत्ये जीणेंकरून तदेकतानचित्तवृत्ति होऊन इतर कांहींच रुचेनासें होतें ती.

उत्कंठित, वि० सं० उत्कंठा झाली आहे जाला तो.

उत्कर्ष, पु० सं० विजयिता, संपन्नता, इ० रूप जे उत्तम गुण त्यांचे बाहुल्यामुळें समृद्धपणें जी कोणेकाची स्थिति ती.

उत्कलिका, स्त्री० सं० कोणेकविषयीं हें आपण करावें, हें आपण घ्यावें, इ० रूप एका एकीं जी सवेग अंतःकरणवृत्ति उठत्ये ती.

उत्कृष्ट, १ लिं० सं० फार चांगला; २, अत्युत्कट; उ० मनुष्यानें उत्कृष्ट उडी मारली तर पांच हात मारील आणीक किती मारील.

उत्क्रम, पु० सं० व्युत्क्रम; २, ३ लिं० नहिशिष्ट तो.

उत्क्रमण, न० सं० अधो देशाकडून ऊर्ध्वदेशाकडे जें गमन तें प्राणोत्क्रमण इ० समास.

उत्क्रांत, ३ लिं० सं० उत्क्रमण केलें जेणें तो.

उत्क्रांतधेनू, स्त्री० उत्क्रांतिधेनूचा अपभ्रंश.

उत्क्रांतिधेनु, स्त्री० सं० मुमूर्षु मनुष्य, पापक्षय होऊन सुखानें लवकर प्राणविमुक्त व्हावा म्हणून जी ब्राह्मणास गायदान देतो ती.

उत्तप, न० कोणेक स्थलीं वृक्षादिकाचे छाया राहित्यामुळें जें सर्वदा सूर्यकिरणताप वैशिष्ट्य असतें तें; २, ३ लिं० नहिशिष्ट जें स्थलादि तो.

उत्तम, ३ लिं० सं० फार चांगला; २, विवक्षित समुदायामध्यें निकृष्ट आणि मध्यम यांहून वरचा तो.

उत्तमपुरुष, पु० सं० संस्कृतांतअस्मच्छब्दार्थरूप जो कर्ता, किं० कर्म त्या अर्थी होणारा जो क्रियापदाचाठायीं प्रत्यय तो; २, प्राकृतांत क्रियापद घटक जे कर्तरि, किं० कर्मणी प्रत्यय होतात तत्समानाधिकरण जो मी या सर्वनामाचा अर्थ तो.

उत्तमर्ण, पु० सं० जाकडेस जावें ऋण आहे तो त्याचा

उत्तमांग, नं० सं० मस्तक.

उत्तमोत्तम, ३ लिं० सं० फार च उत्तम तो.

उत्तर, न० सं० कोणेकानें आपल्यास उद्देशून जें आज्ञा, प्रश्न, इ० भाषण केलें त्याचें जें प्रतिवचन तें; २, कांहींएक अर्थाचा बोधनार्थ तोंडांतून उच्चारला जो वाक्यरूप, किं० पदरूप शब्द तो; उ० मी एक उत्तरही बोललों नाहीं आणि हा मला उगीच शिव्या देतो; ३, स्त्रियांचीं गाणीं इ० यांतील एकेक वार घोकावयाजोगे लहान लहान विभाग असतात त्यांस म० स्त्रिया इ० ग्र०; ४, ३ लिं० विवक्षित संख्या परिमाणांहून जो अधिक तो, या अर्थी प्रा० अन्य पदार्थास विशेष्यत्व असतां समासीं म०; उ० पंच आहेत उत्तर ग्र० अधिक जा मध्यें ते पंचोत्तरशत; कोशोत्तरयोजन. अंगूलोत्तरहस्त, इ० स०; ५, ३ लिं० अ० विवक्षितांहून देश कालादिरूप पुढलें स्थानचा तो. किं० पुढलेस्थानीं; या अर्थी समासीं म०; उ० उत्तर ग्र० पुढला जो श्लोक तो उत्तरश्लोक

उत्तरार्ध. इ०: ज्येष्ठोत्तर लग्नें होत नाहींत त्म० ज्येष्ठमासापुढें होत नाहींत; एतदुत्तर, तदुत्तर इ०; ६. स्त्री० पूर्वाभिमुख राहिलेंअसतां डावीकडे पडतेजी दिशा ती.

उत्तरकर्म. न० सं० उत्तरकार्य.

उत्तरकार्य. न० सं० मेलेला जो त्यास सद्गति व्हावी, यणून सूतकांत त्याचे पुत्रादिक जें तदुद्देशें कर्म करितात तें

उत्तरकुरु. पु० सं० नव खंडांतील एक खंड आहे.

उत्तरक्रिया, स्त्री० सं० उत्तरकार्य.

उत्तरखंड, न० (उत्तर-खंड-सं०) आर्यावर्तदेशास त्म०.

उत्तरण, न० सं० उर्ध्वदेशाहून अधोदेशीं आगमन तें: २, नद्यादिकांतून पार गमन तें.

उत्तरत्र, अ० सं० विवक्षित देश कालादिरूप स्थलाहून पुढचे स्थानीं.

उत्तरदेश, पु० उत्तरखंड.

उत्तरपंथ, पु० (उत्तर-पंथ-सं०) संसारापासून विरक्त होऊन परलोकसाधनार्थ तीर्थयात्रा, अरण्यवास, तपश्चर्या, इ० करावें असा जो मार्ग अवलंबितात तो; २, हिमाचलावर बदरिकाश्रमापुढें एक स्थान आहे; कोणेकानें उत्तरपंथास लागणें त्म० मरणोन्मुख होणें.

उत्तरपराई. उत्तरपन्हाई, स्त्री० (उत्तर-पराई-) अर्धवयगेल्यावरची जी वयोवस्थाती.

उत्तरपक्ष, पु० सं० प्रतिवाद्याचा जो पक्ष तो.

उत्तरराग

उत्तरराग, पु० (उत्तर-राग-) उत्तररात्रीं गावयाचे मालकंस, वसंत, इ० जे राग ते म०.

उत्तररागिणी, स्त्री० उत्तरराग: परंतु सोहनी इ० जा स्त्रीलिंग रागिणी तद्विषयीं विशेषेंकरून म०:

उत्तररात्र. स्त्री० (उत्तर-रात्रि-) मध्यरात्रोत्तर जो रात्रिभाग ती.

उत्तरवय, न० (उत्तर-वय-सं०) उत्तरपराई,

उत्तरवस्क, वि० सं० उत्तरवय जास प्राप्त झालेंआहे तो.

उत्तरसाक्षी, पु० (उत्तर-साक्षी-सं०) प्रतिवाद्याचा जो साक्षी तो.

उत्तरा. स्त्री० सं० बारावें नक्षत्र त्या; २. उत्तरदिशा.

उत्तरांग, न० सं० कोणेक कर्मांचे प्रधान अनुष्ठानाहून पुढलें जें कर्म तें.

उत्तराण, स्त्री० (उत्तर-) उत्तरेकडून येतांजो वायु तो.

उत्तराफल्गुनी, स्त्री० सं० उत्तराप्रथमार्धी.

उत्तराभाद्रपदा, स्त्री० सं० सविसावें नक्षत्र त्या.

उत्तरामात्रॉं, उत्तरामात्रीं, अ० (उत्तर-मात्र-) प्रतिक्षणी प्रति व्यवहारीं; उ० तुलाउत्तरामात्रां शिकविलें पाहिजे.

उत्तरायण, न० सं० सूर्यादि ग्रहांचें मकरादि राशि षट्कसंबंधी जें अयन तें, कि० सूर्य त्या अयनांत असतां जो काल ते.

उत्तरार्द्ध. न० (उत्तर-अर्द्ध-सं० ग्रंथादिकां-

चे

जे विवक्षित दोन भाग त्यांतील जो दुसरा भाग तो.

उत्तराषाढा, स्त्री० सं० एकविसावें नक्षत्र त्या.

उत्तरी, स्त्री० (उत्तरीय सं०) मृताची उत्तर क्रिया - करिते समयीं गळ्यांत जानव्या सारिखें एक फडकें घालितात तें; २, स्नान संध्यादि कर्मसमयीं रामनामाद्यंकित दाला सारिखें कोणी ब्राह्मण गळ्यांत घालितात तो.

उत्तरीय, न० सं० उत्तरी; २, नेसल्या वस्त्राहून इतरजें अंगावर अंगवस्त्र, शेला, इ० घेतात तें.

उत्तरोत्तर, अ० सं० क्रमेकरून पुढें पुढें; उ० उत्तरोत्तर विद्या कमी होत चालली.

उत्तान, वि० सं० उताणा; २, उथळ; ३, गूढ नव्हे असा जो श्लोकार्थ, अभिप्राय, इ० तो.

उत्तानार्थ, पु० (उत्तान अर्थ सं०) श्लोकादिकांचा केवळ उघड जो अर्थ तो; २, वि० तद्विशिष्ट जो श्लोक, वाक्य, इ० तो.

उत्तीर्ण, वि० सं० नदी, घाट, इ०, कि० कांहीं संकटादि उतरून पार पडला तो, कि० त्याणें तें उल्लंघित केलेलें नद्यादिक तो.

उत्तेजक, वि० सं० उत्तेजन करणारा तो.

उत्तेजन, न० सं० तत्तत्कार्य निर्वाहक मनुष्य, औषध, शस्त्र, इ० कांचा ठायीं पराक्रम शक्त्यादि रूप असतो जो गुप्तपणें निद्रितप्राय तेजो विशेष त्याचें प्रोत्साहनादि वाक्यानीं, पदार्थांतर मिश्रणानें, कि० कांहीं संस्कारानें होतें जें जागृतिप्राय उत्थान तें; २, तादृश उत्थान होण्याचें जें साधन तें.

उत्था

उत्था, स्त्री० सं० उत्थित, कि० उत्पन्न; उ० मायेपासून आहे उत्था जाची तो मायोत्थसंसार, अज्ञानोत्थभ्रम, अजीर्णोत्थज्वर, इ० समासींचा प्रा० म०.

उत्थान, न० सं० प्रा० उठण्याचा व्यापार तें.

उत्थापक, वि० सं० उत्थापन करणारा जो तो.

उत्थापन, न० सं० कोणेकास उठविण्याचा व्यापार तें; २, कोणेकास कोणेक अधिकारादिस्थलापासून उठविल्यामुळें त्याचा त्या स्थलादिकांशीं होतो जो विश्लेष तें; ३, अभ्युत्थान; देवकोत्थापन, देवतोत्थापन, इ० स०.

उत्थापित, वि० सं० उत्थापन केलें जाचें तो.

उत्थाप्याकांक्षा, स्त्री० सं० ग्रंथादिकांवर वस्तुतः दोष नसतां उगीच मनःकल्पनेनें दोषाची संभावना करून कदाचित् असें झालें तर काय करावें इ० रूप कोणी येतो जी आकांक्षा ती.

उत्थित, वि० सं० उत्थान झालें जाचें तो.

उत्थिति, स्त्री० सं० उत्थान; २, तेणेंकरून उत्थितपणारूप जो धर्म होतो ती.

उत्पत्ति, स्त्री० सं० अभावावस्थेंत स्थित जो पदार्थ त्याचा भावावस्थेचा ठायीं जो संभवती; २, कोणेक अधिकरणाचा ठायीं गुणरूपेंकरून स्थित जो पदार्थ त्याचा जो प्रादुर्भाव ती; जगदुत्पत्ति, पुत्रोत्पत्ति, पुण्योत्पत्ति. इ० स०.

उत्पन्न, वि० सं० उत्पत्ति पावला तो; २, न० रुप्यादि व्यवहारापासून उत्पन्न होतें जें मासयंत्रा-

रूप

रूप फल तें, शेत, भूमि, इ० उत्पन्नास येणें स्त्री० आंत चांगलें पीक होऊं लागून धान्यादिक देण्याचे योग्यतेस येणें; कोणकोत्ता उत्पन्नास येणें स्त्री० मारणें, घुसडणें, इ० कानें होता किंवा नकना असा केला जाणें.

उत्पन्नभक्षी, वि० [उत्पन्न-भक्षण-सं०] नित्याचे नित्य द्रव्यादि मिळवून दिनचर्या चालविणारा जो तो.

उत्पन्नविनाशी, वि० सं० उत्पन्न होतांच नाश पावणारा जो पदार्थ तो.

उत्पाटणें, [उत्पाटन-सं०] उत्पाटित करणें.

उत्पाटन, न० सं० आपल्या मूलादिविभागानें पृथिवी, शरीर, मन, इ० आधारानें धरून स्थित जो वृक्ष, दगड, तृण, दंत, केश, क्रोध, लोभ, वासना, इ० पदार्थ त्यांचें जें तेथून समूल बाहेर निष्कासन तें; वृक्षोत्पाटन, केशोत्पाटन, पक्षोत्पाटन, वासनोत्पाटन, इ० स०.

उत्पाटित, वि० सं० उत्पाटन केलें जाचें तो.

उत्पात, पु० सं० लोकांस कांहीं अतिरिक्त पीडादि होणार असलें म्हणजे जें तन्मूचक भूकंप, उल्कापात, इ० अद्भुत चिन्ह होतें तो; २, लहान मुलांची हें मांड, तें लवंड, भांडेफोड, याला मार, त्याला बोल, इ० रूप जी चपलपणाची चेष्टा तो; ३, चोर, बंड, राजा, इ० कांची लोकांस उपद्रवकारक जी आळावें, लुटावें, मारावें, हाणावें, नासावें, इ० रूप चेष्टा तो; कि० त्याचे उपद्रवामुळें हें नको आतां एथून जाणें होईल तर बरें इ० वाटायाजोगा येतो जो त्रास तो.

उत्पाती

उत्पाती, वि० [उत्पात-सं०] उत्पात करण्याचा स्वभाव जाचा असे जें मूल तो; २, नाना प्रकारचीं उलींढालीं करीत असावें, नवेनवेच कांहीं च उद्योग मोठे मोठे काढावे परंतु कदापि शिकामे मोल्या सारिखें वसूं नये अशा स्वभावाचा चपल, उद्योगी, हिय्येदार, जो मनुष्य तो.

उत्पादक, वि० सं० उत्पादन करणारा तो.

उत्पादणें, [उत्पादन-सं०] उत्पन्न करणें.

उत्पादन, न० सं० उत्पन्न करण्याचा व्यापार तें.

उत्पादित, वि० सं० उत्पादिला तो.

उत्प्रेक्षण, न० सं० उत्प्रेक्षण्याचा व्यापार तें.

उत्प्रेक्षणें, [उत्प्रेक्षण सं०] कोहीं एक अर्थ उत्प्रेक्षा विषय करणें.

उत्प्रेक्षा, स्त्री० सं० वस्तुन: जो पदार्थ यद्रूपनक्की त्याजवर तत्पदार्थनिष्ठ कांहीं एक धर्माचे उपलब्धीमुळें हा तोच काय असें जें तद्रूपतेचें समर्थन काव्यादिकांचा ठायीं अलंकाररूप असतें तें; उ० हा अंधकार चक्रवाकांचा विरहाग्नीचा धूमपुंजच काय अशी उत्प्रेक्षा त्याणें घेतली; २, ला० इष्टकांत झाली जी कोहीं एक गोष्ट निजवर वक्तृत्वबलानें शंका समाधानादिरूप कल्पनानीं कोणी अनेक काढितो जा कोटी त्या प्र०; उ० त्या हरदासानें एका अभंगावर किती हो उत्प्रेक्षा घेतल्या फार चांगला बस्का तो.

उत्प्रेक्षित, वि० सं० उत्प्रेक्षिला तो.

उत्फुल्ल, वि० सं० प्रफुल्लित जें नेत्र, पुष्प इ० तो.

उत्रा

उत्रामात्रीं, उत्रामात्रीं. अ० उत्तरमात्रां.

उत्संकळ, उत्संग्वळ, वि० (उच्छृंखल सं०) उच्छृंखल जो मनुष्य तो; उरंतू घोर, मासुरवाशीण, इ० जो नियम्य न्याजवर ना० प०

उत्संग, पु० सं० मांडीरूप जो शरीरावयव तो.

उत्सर्ग, पु० सं० आत्मसात झालेला पदार्थ, कि० कर्म, इ० त्यांचा आतां हें घ्यावयाचें नाहीं, करावयाचें नाहीं अशा बुद्धीनें जो त्याग तो; मलोत्सर्ग, मूत्रोत्सर्ग, वृषोत्सर्ग, कूपोत्सर्ग, अभिमानोत्सर्ग, इ० स०. स्थूल विशेषीं असतो जो कांहीं एक विशेषांश त्या वांचून केवल सामान्यरूप जो कोणेक विधि, गति, इ० तो; उ० मनुष्यानें सत्य बोलावें या उत्सर्गाचा कोणकाचा प्राण रक्षणार्थ असत्यही बोलावें या विशेष वचनानें बाध होतो; माणसास एक हातास पांच बोटें असावीं हा उत्सर्ग मग कोणाचे हातास सहा असतात तो गोष्ट वेगळी; उत्सर्गशास्त्र, उत्सर्गवाक्य, इ० स०.

उत्सर्गतः, अ० सं० सामान्यरूपेंकरून; उ० उत्सर्गतः पाहिलें असतां अहिंसारूप धर्म निर्दुष्ट आहे.

उत्सर्जन, न० सं० ग्रंथमार्थक उत्सर्ग करण्याचा व्यापार तो; २, यज्ञोपवीत धारण करणारे जे ब्राह्मण, क्षत्रियादि त्यांचें नैमित्तिक एक कर्म आहे.

उत्सर्जित, वि० सं० उत्सर्जन केलें जाचेंतो.

उत्सव, उत्साव, पु० उत्साह.

उत्सार, पु० भाज्य अंकाचे पंक्तींत कितीएक अंकांचें अंकाचें भाजन होऊन पुढें योग्यता असतां भाजन संस्कार न होतां कितीएक अवशिष्ट जे अंक त्यांची भाजनाहतीनें करून जी विद्यमानता तो.

उत्साह, पु० सं० कोणेक गोष्टीचा करण्याादि प्रसंगीं तद्विषयीं मीनिवाडून अहाहा हें मला चांगलें साधलें इ० रूप जो प्रवृत्यनुकूल अंतःकरणांत भाव उठतो तो; या अर्थी रणाविषयीं जो उत्साह तो रणोत्साह, दानोत्साह, इ० स०; २, कांहीं इष्ट झाल्यामुळें होतो जो हर्ष तो; या अर्थी पुत्र झाल्यामुळें जो उत्साह तो पुत्रोत्साह, धनोत्साह, मानोत्साह, इ० स०; ३, ईश्वरप्रीत्यर्थ रामनवमी, शिवरात्रि, इ० पुण्य दिवशीं कांहीं अनुष्ठानें, ब्राह्मणभोजन, कथाकीर्तन, इ० हा जो त्या त्या कालास सुशोभितपणा करितात तो, कि० कांहीं एक सण, लग्नादिकार्य, एतन्निमित्त इष्टमित्रांसहित समारंभानें मिष्ट भोजन करावें, इ० व्यापारानीं आनंदानें काल नेण्याचा जो प्रकार तो; या अर्थी वसंतोत्साह, नवरात्रोत्साह, इ० स०.

उत्साहभंग, पु० कांहीं एक गोष्टीविषयीं मनांत उठला जो उत्साह त्याचा कांहीं प्रतिकूल संबंध निमित्तानें होतो जो नाश तो.

उत्साहमूर्ति, स्त्री० देवाचे स्थापित मूर्तीहून इतर उत्साहादिकांत पालखींत बसून मिरवावें इत्याद्यर्थ जी दुसरी चर मूर्ति असते ती; २, छा० राज्यादि व्यवहाराचा मुख्य जो राजा इ० धनी त्याचे हातास खालचा त्या व्यवहा-

राविषयीं मुख्य जो कारभारी असतो त्यास म्ह०.

उत्साहित, भवि॰ सं॰ कोणेक गोष्टीविषयीं कोणे-कानें जास उत्साह आणिला आहे तो, कि॰ स्व-तः जो उत्साह पावला तो.

उत्सुक, भवि॰ सं॰ उत्कंठित.

उत्सृष्ट, भवि॰ सं॰ उत्सर्जन केलें जाचें तो.

उत्क्षिप्त, भवि॰ सं॰ उत्क्षेपिला जो तो.

उत्क्षेप, पु॰ सं॰ कांहीं एक पदार्थाचा ऊर्ध्व देशा कडे उडवण्यानें जो त्याग तो.

उत्क्षेपण, न॰ सं॰ उत्क्षेप करण्याचा जो व्यापा-र तें.

उत्क्षेपणें, (उत्क्षेपण सं॰) पाषाणादि पदार्थ ह-स्तादिकानें ऊर्ध्व देशाकडे उडविणें.

उथळ, भवि॰ (उत्-तल सं॰) खोलगटपणा जा-चा कमी असा जो पात्र, नदी, नळें, इ॰ पदार्थ तो.

उथळा, पु॰ कों॰ वृक्षावर पर्जन्य पडला असतां त्या-वरून जे त्यापाण्याचे थेंब खालीं पडतात ते म्ह०.

उथळी, स्त्री॰ गृहादिकांचा खांबाचे तळीं जो द-गडाचा, कि॰ लांकडाचा तुकडा त्याचें कुसूं अ-डकवायासाठीं घालितात तें.

उथळें, उथाळें, न॰ उथळी.

उदक्, अ॰ सं॰ उत्तरेकडे; उदक् आहे मुख जा-चें तो उदङ्मुख, उदगय, इ॰ समासीं म्ह०.

उदक, न॰ जाचा स्वाभाविक स्पर्श शी-तल असें पंच महाभूतांतील एक भूत आ-हे; कांहीं एक पदार्थ, कि॰ गोष्ट यांस उदक सोडणें, देणें, म्ह॰ त्याचा त्याग करणें; गंगोदक, तीर्थोदक, पर्जन्योदक, झर्‍यांचोदक, संचितोदक, इ॰ म्ह०; उत्तरक्रिया, विवाह, इ॰ कर्मउदकापाण्यानें करून टाकणें, म्ह॰ द्रव्यशक्तीचा अभावामुळें विशेषखर्चनकरितां विधीसमान्य विरोधनचे अशा प्रकारें यथाकथंचित् करून घेणें

उदकाडी, स्त्री॰ (ऊद-काडी॰) ऊद इ॰ सुगंधि चूर्णा-चा लेपकरून धूपार्थ आलायास काडी सिद्ध क-रितात ती.

उदकुंभ, पु॰ सं॰ उदकानें भरलेला जो मृत्तिकादि निर्मित कुंभ तो; दैवादिकर्मांचा ठायीं विनियो-ग असतांच म्ह०.

उदकुंभश्राद्ध, न॰ सं॰ कोणी मेला असतां त्याचा उद्देशानें वर्ष पर्यंत मनिदिवशीं कुंभदान पू-र्वक जें श्राद्ध करितात तें.

उदगयन, न॰ सं॰ उत्तरायण.

उदंड, भवि॰ (उद्दंड सं॰) पुष्कळ.

उदधि, पु॰ सं॰ समुद्र.

उदफूल, न॰ उदाचा अग्नि संयोगानें लाही सारिखा जो परिणाम करितात तें

उदबत्ती, स्त्री॰ (ऊद-वत्ती॰) उदकाडी.

उदमस्त, भवि॰ कों॰ द्रव्यादि प्राप्त झाल्यामुळें उन्मत्त झाला जो तो.

उदमी, पु॰ (उदीम॰) उदीमकरून वृत्ति करणारे जे वाणी, तांबोळी, गांधी, गंधी, इ॰ ते म्ह०.

उदमेरव, पु॰ कों॰ (उद्यम सं॰) कोणेक कर्म क-रण्याविषयीं अंतःकरणाचा ठायीं आस्थे-मुळें उद्योगाभिमुखतारूप जो भाव राहतो

तो

तो.

उदमेरवी, ३लिं॰कों॰ (उदमेरव॰) उदमेरव आहे जास तो.

उदमेरवून, अ॰कों॰ (उदमेरव॰) आवर्जून.

उदय, पु॰सं॰ भूगोलांतर्धानानें अदृश्यपणेंस्थित जे सूर्यादि ग्रह,नक्षत्रें,राशिचक्रविभाग,इ॰ त्यांचें जें त्यापासून ऊर्ध्वभागीं बाहेर आगमन तो;२,सूर्यसन्निधानानें अदृश्य झालेले जे बृहस्पति शुक्रादिक त्यांस सूर्यापासून दूर झाल्यामुळें जी दृश्यावस्था प्राप्त होती तो; ३,वृक्ष,भूमि,अंतःकरण,शरीर,इ॰ उत्पत्ति-स्थानापासून पुष्पफलादिक,तृण,अंकुरादिक, रोमांच स्वेदादिक,काम क्रोधादिक,इ॰कांचा जो उद्भव तो;पुष्पोदय,धर्मोदय,कामोदय, अभ्युदय,भाग्योदय,देवोदय,इ॰स॰;कोणेक गोष्ट उदयास येणें,क्रि॰ प्रसिद्धतेस,किं॰ अभ्युदयदशेस येणें.

उदयगिरि, पु॰सं॰ सूर्यादिकांचा जा प्रदेशीं उदय होतो त्या प्रदेशास पर्वतत्व मानून क्रि॰.

उदयाचल, पु॰सं॰ उदयगिरि.

उदयीक, अ॰ (उदय॰सं॰) उद्यां.

उदर, न॰सं॰ पोट मुख्यार्थी;२,पोटांत एकरोग होत असतो जाचे भेद वातोदर,जलोदर,मत्स्योदर, इ॰ बहून आहेत तें;अन्नादि भक्षणानें उदराचा जो निर्वाह तो;उदरनिर्वाह,उदरपूर्ति,उदरपोषण,उदरवृत्ति,इ॰स॰;कोणेकाचें उदरीं शनेश्चर येणें क्रि॰ जन्मराशीसयेणें;कोणेकाचें उदरीं येणें,क्रि॰ यथेच्छ स्वायास,भोगायास मिळावया जोगी दशा येणें भा॰निंदावृत्ति.

उदरंभरि, ३लिं॰सं॰ मान,अवमान,किं॰भक्ष्यपदार्थांचे गुणागुण,इ॰विचार न करितां आपलें पोटमात्र कसें तरी भरून घ्यावें असा स्वभाव जाचा तो.

उदरी, ३लिं॰सं॰ उदररोग झाला आहे जास तो.

उंदरी, स्त्री॰ (उंदीर॰) हाताचे केश उंदरानें खाल्या सारिखे नाहींसे होतात असा एक रोग आहे.

उदव, पु॰ (उदय॰सं॰) अंबाबाईचे भक्त देवीपुढें,किं॰ भिक्षेस निघाले त्यणजे हा मंगलशब्द उच्चारितात तो;कोणेकानें उदवलायणें,किं॰ करणें, क्रि॰ उजेड पाडणें.

उदवणें, (ऊद॰) कोणेक पदार्थ उदाचे धुरानें सुगंधित करणें.

उदान, न॰ सं॰ पंचप्राणांतील एक प्राण आहे. जाचें स्थान कंठदेश.

उदार, ३लिं॰सं॰ धर्मादायादि रूपेंकरून देणें,आपण स्वतः भोगणें,इ॰ द्वारा व्यय करण्याविषयीं जो भीत नाहीं उत्साहानें प्रवृत्त होतो अशा स्वभावाचा जो पुरुषादिक तो;२,भय,दैन्य, ग्लानि,इ॰रूप जें हलके भाव त्यांचा संबंध जा मध्यें न दिसतां धैर्यगांभीर्यादि भावांचा संबंध दिसतो असें जें भाषण,अवलोकन,चाल, रूप,इ॰ तो.

उदारकर्णा, पु॰ (उदार॰कर्ण॰सं॰) कर्ण त्यणून एक अत्युदार पुराण प्रसिद्ध होता विपरीत लक्षणेनें अतिकृपणास क्रि॰.

उदास, १लिं० सं० मनुष्यादिकांची वसती, गेन, आगर, इ० कानीं जी स्थलास रमणीयता दिसनी त्यांचा अभावामुळें विशोभित, शून्याकार, भयंकर, दिसतें जें गांव, रान, घर, इ० स्थल तो; २, कोणीएक विषयावर बसलेली जी प्रीति तिचा कांहीं कारणानें विघात झाल्यामुळें कांहींच सुचूंनये अशा दशेतें पावलेलें जें चित्त तो, किं० तद्विशिष्ट पुरुषादि तो.

उदासी, १लिं० (उदास सं०) उदास जें चित्त. किं० तद्विशिष्ट मनुष्य तो.

उदासीन, १लिं० सं० कोणेक अर्थावर जाची प्रीति ही नाहीं आणि द्वेषही नाहीं असा, किं० यद्विषयीं विधिही नाहीं, आणि निषेधही नाहीं असा मध्यवर्ती जो पुरुषादि पदार्थ तो; २, उदास जें चित्त, किं० तद्विशिष्ट पुरुषादि तो.

उदाहरण, न० सं० सामान्य धर्मानें उद्दृशून कांहीं एक केला जो विधि, किं० लक्षण तदंतर्भूत जो विशेष धर्म तदवच्छेदंकरून त्या विधीस, किं० लक्षणास विषय होणारे जे अनेक अर्थ ते प्र०.

उदाहृत, १लिं० सं० उदाहरणरूपेंकरून विधिविषय, किं० लक्षणविषय केला जो कांहीं एक अर्थ तो.

उदित, १लिं० सं० उदय पावला तो.

उंदिरकानी, स्त्री० (उंदीर-कान) आखुकर्णी.

उदी, स्त्री० (ऊद) पिराजवळ ऊद जाळून त्याचा अंगारा प्रसादरूपें घेतात ती; २, १लिं० एक रंग आहे; ३, तद्विशिष्ट वस्त्र तो.

उदीची, स्त्री० सं० उत्तरदिशा ती.

उदीम, पु० धान्य, वस्त्र, किराणा, इ० संबंधी जो क्रयविक्रय व्यवहार तो.

उंदीर, पु० (उंदुरु सं०) एक क्षुद्रजंतु आहे.

उदुंबर, पु० सं० उंबर वृक्षापासून जो वृक्ष तो.

उदेल, न० (ऊद-तेल) उदाचें जें तेल तें.

उदो, पु० उदव.

उद्गत, १लिं० सं० उद्गम पावला तो; २, अधःप्रदेशा पासून ऊर्ध्व प्रदेशा कडे उडाला, किं० गेला तो.

उद्गम, पु० सं० उगम.

उद्गार, पु० सं० ढेकर; २, कोणीकानें मनामध्यें धरून ठेविली असती जी गोष्ट ती तो बोलत नसतांही कांहीं प्रसंगानुरोधानें त्या संस्कारामुळें सहज तोंडावाटें त्या गोष्टीचा ज्ञापक कांहीं शब्द निघतो तो; ३, आश्चर्य, खेद, इ० रस अंतःकरणांत झाले असतां वाहवा, अहाहा, इ० क जे तोंडावाटें सहज शब्द निघतात ते प्र०.

उद्गारणें, क्रियावेशानें डोळे वटारून मोठ्यानें ओरडून कोणीकाचा अंगावर जाणें.

उद्घाटन, न० सं० लागलेलें जें कपाट, पेटीचें झांकण, इ० तें उघडण्याचा व्यापार तें; २, कोणीकाचा गुप्त जो दोष, मर्म, इ० तें प्रसिद्ध करण्याचा जो व्यापार तें; गुह्योद्घाटन. मर्मोद्घाटन, इ० स०.

उद्घाटित, १लिं० सं० उद्घाटन केलें जाचें तो.

उद्घोष, पु० सं० शास्त्रादिकांचा, कि० यदर्थी उत्कंठा लागली आहे तद्विषयीं निरंतर जो घोष तो; २, देशांतरींची, कि० कालांतरींची जी परोक्ष कोणेक गोष्ट तद्विषयीं अमुक अमुक स्थलीं झाले, कि० होणार इ० रूप लोकामध्यें माचुर्येकरून चालते जो भाषण व्यवहार तो.

उद्दाम, वि० सं० बाणीकपणा, लवचीपणा, इ० रहित चांगला टवटवीत ठोसर जो अंकुर भूषण, पुष्प, कलिका, इ० पदार्थ तो; २, दुसऱ्याचे दाबानें दबून विनीत व्हावयाजोगा नव्हे असा जो मनुष्यादिक कि० त्याचा स्वभाव, कि० तदनुरूप भाषण गति इ० तो; ३, पाहतांच डोळे दिपाया जोगा अत्यंत गहिरा झालेला जो रंग तो; ४, पुष्पादिकाचा अतिशयित असून उग्र जो वास तो; ५, मोठा सुस्वर आणि एकाएकीं पडायाचा नाहीं असा जो कंठध्वनि तो.

उद्दिष्ट, वि० सं० उद्देशिलेला जो तो

उद्दीपक, पु० सं० उद्दीपन करणारा जो तो.

उद्दीपन, न० सं० अग्नि, क्रोध, काम, शौर्य, इ० जे प्रकृत्यवस्थेकरून स्थित ते क्षोभ पावून स्वस्वशक्तीनें बाहेर काढीत असें तत्तदुपायानीं करण्याचा जो व्यापार तें. कि० तत्साधनीभूत जें द्रव्यादि तें; उ० या चूर्णानें क्षुधेचें उद्दीपन होतें; स्रक् चंदनादिक जे पदार्थ ते कामोद्दीपन आहेत.

उद्देश, पु० सं० कोणेक कर्माचा ठायीं प्रवृत्त होणारा जो त्याणें स्वनिष्ठ क्रिया जन्य विशेषानें संबद्ध करण्याविषयीं कोणेक अर्थाचा मनानें केला असतो जो संग्रह तो, कि० त्या अर्थाचें मनामध्यें प्रतिबिंबवत् उठलें असतें जें स्वरूप तो.

उद्देशणें, (उद्देशन सं०) कोणेक अर्थ उद्देश विषय करणें; २, वर कांहीं अपूर्व विधान करावया करितां कोणेक अर्थ नाम घेऊन उच्चारणें; उ० ही मात्रा उष्ण आहे या वाक्यांत मात्रेतें उद्देशून उष्णत्वाचें विधान प्रतीत होतें.

उद्देश्य, वि० न० सं० उद्देश विषय करावयाचा जो अर्थ तो तें.

उद्देश्यतावच्छेदक, न० सं० उद्देश्यनिष्ठ जो व्यावर्तक धर्म तें.

उद्देश्यविधेयभाव, पु० सं० उद्देश्यरूप अर्थाचा आणि विधेयरूप अर्थाचा जो परस्पर तद्रूप संबंध तो.

उद्धट, वि० (उद्धत सं०) विनय संबंधी नम्रता जाचे अंगी नाहीं तो

उद्धत, वि० सं० उद्धट.

उद्धरण, न० सं० खालीं पडलेला जो कांहीं एक पदार्थ तो वर काढण्याचा व्यापार तें; २, कोणेक अधिकरण धरून बसलेला जो पदार्थ तो नेथून निरवळणें, उपटणें, इ० द्वारा काढण्याचा जो व्यापार तें; ३, कांहीं कारणानें लुप्तप्राय होऊन राहिलें जें वृत्ति, धर्म, इ० तें पुनः चालूपणास आणण्याचा, कि० जीर्ण होऊन पतितप्राय झालेलें जें गृह, देवालय, वस्त्र, नौका, इ० तें पुनः दाग दुजीनें चांगलेपणास आणण्याचा

णण्याचा जो व्यापार तें; ४, नरकादि निकृष्ट लोकीं, कि० निकृष्ट योग्यतेचा ठायीं स्थित जो कोणी त्यास स्वर्गादि उत्कृष्ट लोकीं, कि० उत्कृष्ट योग्यतेचा ठायीं आणण्याचा जो व्यापार तें

उद्धरगत, स्त्री० उद्धारगत.

उद्धरणें, (उद्धरण० सं०) उद्धरण विशिष्ट करणें; विपरीत लक्षणेनें वडील इ० कांवरून शिव्या देणें या अर्थी वडील इ० उद्धरणें, असा प्र० करितात.

उद्धर्ता, ३लिं० सं० उद्धरण करणारा तो.

उद्धार, पु० सं० उद्धरणानें अधोदेशादि त्याग पूर्वक उर्ध्व देशाद्याकमरूप जें तत्तत्पदार्थीफल होतें तो; वडिलांवरून शिव्यादि त्या असतां जी त्यांची निंदा घडती तद्विषयीं प्र० करितात

उद्धारक, ३लिं० स० उद्धर्ता.

उद्धारगत, स्त्री० (उद्धार-गति सं०) उद्धार.

उद्धारण, न० सं० उद्धरण.

उद्धारणें, उद्धरणें.

उद्धृत, ३लिं० सं० उद्धरण केलें जाचें तो.

उद्बंधन, न० सं० पदार्थ खालीं लोंबत राही असें जें त्यास उर्ध्व प्रदेशीं कांहीं आधाराशीं बंधन तें

उद्भिज्ज, न० (उद्भिज्ज सं०) कृतुमाहात्म्यादि कारणानें एक समयावच्छेदेंकरून असंख्यात उत्पन्न होतात जे सुंगळे, गोचिड, टेंकूण, इ० अशा ज्या प्राणिजाति त्या प्र०

उद्बुद्ध, ३लिं० सं० उद्बोधपावला तो.

उद्बोध, पु० सं० उद्बोधक चिन्हावरून होतें जें कांहीं एक अर्थाचें ज्ञान तो.

उद्बोधक, ३लिं० सं० हा पदार्थ असुक, कि० असुक प्रकारचा आहे, इ० रूप ज्ञान होण्यास कारणीभूत जें चिन्हादि तो.

उन्द्रव, पु० सं० उत्पत्ति; २, आविर्भाव प्रथमार्थी.

उन्द्रवणें, (उन्द्रवन सं०) उत्पन्न होणें, कि० आविर्भूत होणें; याचा क्वचित् सकर्मक प्र० होतो.

उन्द्रावणें, उन्द्रवे असा करणें.

उन्द्रावन, न० सं० कोणेक ग्रंथादि विषयावर दोष, पूर्वपक्ष, इ० उपस्थित करण्याचा जो व्यापार तें

उन्द्रिज्ज, ३लिं० सं० भूमि भेदून अंकुरादिरूपानें उत्पन्न होणारे जे वृक्ष, तृण, इ० पदार्थ तो.

उन्द्रिद, ३लिं० सं० उन्द्रिज्ज.

उन्द्रूत, ३लिं० सं० उत्पन्न; २, आविर्भूत.

उन्द्रेद, पु० सं० वेगानें वर आणारा, कि० होणारा जो पदार्थ त्याचे नेटानें वरील कांहीं आवरक पदार्थाचा होतो जो भेद तो; उ० पर्जन्य पडला त्रणजे भूमींतील बीजें भूमीचा उन्द्रेद करून बाहेर येतात.

उद्यत, ३लिं० सं० कोणेक कर्म करण्याविषयीं जो सिद्ध झाला तो.

उद्यम, पु० सं० उद्योग.

उद्यां, अ० (उदय सं०) वर्तमान दिवसाहून अव्यहित उत्तरदिवशीं.

उद्यान, न० सं० उपवन.

उद्यापन, न॰सं॰ व्रताचा समाप्तिसमयीं कांहीं कर्मविशेष सांगितला आहे तें;२, अश्वत्थ, सरोवर, इ॰कांचा जो मंत्रानें संस्कार करितात तें.

उद्यापित, भूलिं॰सं॰ उद्यापन झालें जाचें असें जें व्रत, अश्वत्थ, इ॰ तो.

उद्युक्त, भूलिं॰सं॰ उद्यत.

उद्योग, पु॰सं॰ विवक्षित कार्य सिद्ध करण्याविषयीं करावा लागतो जो व्यापार तो;२, धंदा, रोजगार, चाकरी, इ॰कांस ल॰.

उद्योगी, भूलिं॰सं॰ जाचे अंगीं उद्योग आहे, म्हणजे आळशाचा प्रतिपक्षी तो.

उद्रिक्त, भूलिं॰सं॰ उद्रेक विशिष्ट जो तो.

उद्रेक, पु॰सं॰ कांहीं एक पदार्थाचे पूर्वस्थितिपेक्षां, किं॰ सामान्य स्थितिपेक्षां जें आधिक्य तो.

उद्वर्तन, न॰ उद्वर्तनाचा अपभ्रंश;२, उद्वासन द्वितीयार्थी.

उद्वर्तन, न॰सं॰ मनुष्य शरीर, किं॰ देवमूर्ति इ॰कांस मळ जाऊन स्वच्छता येण्यासाठीं उटणें इ॰ लावून प्रक्षालन करितात असा जो संस्कार तें.

उद्वस्त, भूलिं॰(उत्-वसति॰) उजाड जो गांव, गृह, इ॰ तो;२, रा॰(उत्-व्यस्त॰) व्यवस्थेनें रचून, जुळून ठेविला जो कांहीं पदार्थसमुदाय, किं॰ कांहीं व्यवहार त्याचे चोहोंकडे चार अवयव झाल्यामुळें अव्यवस्थित पणें जो स्थित तो.

उद्वासन

उद्वासन, न॰सं॰ कर्मार्थ स्थापित जी देवतामूर्ति तीचें विसर्जन पूर्वक जें उत्थापन तें;२, अधिकाराधिकरणावरून कोणेकाचें जें उत्थापन तें.

उद्वाह, पु॰सं॰ विवाह.

उद्विग्न, भूलिं॰सं॰ उद्वेगयुक्त तो.

उद्वृत्त, भूलिं॰सं॰ शास्त्रोक्त जी सभ्यरीति तिला सोडून चोरी, पारदार्य, इ॰ कर्मांचेठायीं असभ्यरीतीनें वर्तणारा जो तो.

उद्वेग, पु॰सं॰ भय शोकादिकानें कांहींच सुचूं नये कोठें कांहीं केल्यानें चैन पडूं नये अशीजी अंतःकरणास अस्वस्थता प्राप्त होत्ये तो.

उधड, भूलिं॰उक्ता.

उधडणें, (उ॰धड॰) उसवणें;२, शृंग, हस्त, इ॰कें करून वस्त्रादिक फाटे असें करणें;३, ला॰ धुडकावणें.

उधरणें. कों॰(उद्धरण॰सं॰) ओकणें; शूद्रभाषावृत्ति.

उधवणें, कों॰ मांडलेले जे जांतण, इ॰ पदार्थ ते उभे करणें.

उधळ, स्त्री॰ उधळपट्टी.

उधळणें, (उत्धूलन॰सं॰) धूळ, गुलाल, भस्म, माती, इ॰ जे चूर्णमाय हलके पदार्थ ते आसमंतात उर्ध्वप्रदेशीं उडत असें करणें;२, द्रव्यादिक संपेल हें भय न धरितां मनस्वीपणें खर्चणें;३, घोडा, बैल, इ॰ कानें अनावरपणें धांवत सुटणें, किं॰ सैन्यादिक जो समुदाय तो भयादि कारणानें वेगानें फुटून चोहींकडे पळूं लागणें.

उधळपट्टी

उधळपट्टी, स्त्री० (उधळणें-पट्टी-) द्रव्यादिक संपेल ही काळजी न बागवितां मनस्वीपणें खर्चकरण्याचा जो प्रकार तो.

उधळ्या, ३लिं० (उधळणें-) उधळपट्टी करण्याचा स्वभाव जाचा तो.

उधाण, उधान, न० अमावास्या पौर्णिमेचे संधीस वेगानें अतिशयित येत असतें जी भरती तें; २, तारुण्यावस्थेचा, किं० कामावस्थेचा जो भर तें.

उधानणें, क्रि० उधान द्वितीयार्थानें युक्त होणें.

उधार, पु० उदम्यास कालांतरीं पैका द्यावयास करून पतीवर पाहिजे तो जिन्नस आणावा, असा जो घेण्या देण्याचा प्रकार तो, किं० त्या प्रकारें व्यवहार केल्यामुळें उदम्याचें आपल्याकडे तटून राहतें जें द्रव्य तो; २, अ० उधार म्हणून जो प्रकार तेणेंकरून आणणें, देणें, घेणें, नेणें, इ० कांचें वि०; तिहीं दिसाचे उधारानें घाल्या कोणी पुसत नाहीं इ० स्थलीं तो तो पदार्थ केवळ तुच्छ, योग्यताहीन, असा अर्थ; (म० उधाराचें पोतें सवा हातरितें.

उनाड, ३लिं० नियामक जो गुरुरवी, पंतोजी, इ० त्यांचे नियमनांत नाहीं असें मोकळें सुटलेलें, मनस्वीपणे चेष्टा करूं लागलें, जें गुरूं, पोर, इ० तो; २, क्रि० कोणी नलाविता आपल्या आपण रुजलेलें जें कांहीं झाड इ० तो.

उनाडकी, स्त्री० (उनाड) उनाड जें पोर इ० त्याचा जा मनस्वीपणें चेष्टा ती.

उनाडचाळा

उनाडचाळा, पु० (उनाड-चाळा) उनाडकी.

उनाडणें, क्रि० उनाड क्या करीत असणें.

उनून, ३लिं० उनून.

उन्नत, ३लिं० सं० प्रायः उंच या अर्थी; २. न० धारेपासून विवक्षित भचक्र प्रदेशपर्यंत जें मध्यवर्ती अंतर तें.

उन्नति, स्त्री० सं० उंची विशेष्यार्थी.

उन्मत्त, ३लिं० सं० स्वभावें करून, किं० विद्या, धन, इ० मदानें जाचे अंगीं विनय नाहीं तो; २, मद्यादिमदानें, किं० वायु, काम, इ० कांचे विकृतीनें जो बेशुद्ध झाला तो.

उन्मत्तभैरव, पु० सं० एक रसायन आहे.

उन्मत्तवायु, पु० सं० एक वातरोग आहे, जाचे योगानें मनुष्य उन्मत्त होऊन नानाप्रकारचा चेष्ट करितो आणि मा० मारतो तो.

उन्मनी, स्त्री० सं० जागृति, स्वप्न, सुषुप्ति, आणि तुरीया, यादून पर जी पांचवी अवस्था ती.

उन्माद, पु० सं० विद्या, संपत्ति, इ० कांचायोगें मजपेक्षां सर्व तुच्छ आहेत असें वाटाया जोगा जो अंतःकरणांत धर्मविशेष राहतो जेणेंकरून माननी यांचा अनादर इ० अनेक असमंजस व्यवहार घडतात तो; २, भांग, अफू, संपत्ति, इ० कांचाठायीं तादृश उन्मादजनक जो गुणरूप शक्ति विशेष असतो तो.

उन्मादक, ३लिं० सं० उन्मादजनक जें मद्य,

भांग

भांग, लक्ष्मी, इ० तो.

उन्मान, न० सं० पदार्थाचे अंगीं गुरुत्वानुरूप जें परिमाण असतें तें; २, तत्परिज्ञान साधन जें तोळा, मासा, मण, शेर, इ० कि० ताजवा, घट, तागडी, इ० तीं प्र०; ३, तागडी इ० कानें कांहीं पदार्थ तोलण्याचा जो व्यापार तें.

उन्मीलन, न० सं० मिटलेलें जें पुष्प, नेत्र, इ० त्यांचा विकसित होण्याचा जो व्यापार तें.

उन्मीलित, वि० सं० उन्मीलन झालें जाचें तो.

उन्मुख, वि० सं० करण्याविषयीं जाचे प्रवृत्तीचा झोंक जा कर्माकडे झाला आहे तो त्या कर्माविषयीं; गमनाविषयीं जो उन्मुख तो गमनोन्मुख, मरणोन्मुख, इ० स०.

उन्मूलन, न० सं० उत्पाटन.

उन्मूलित, वि० सं० उत्पाटित.

उन्मेष, पु० सं० नेत्राचा सर्वदां उघडावें, मिटावें, असा जो वारंवार व्यापार स्वभावतः चालला असतो त्या मध्यें उघडण्याचा जो व्यापार तो; २, मिटलेलें जें नेत्र, पुष्प, इ० त्याचा जो विकास तो.

उन्हत, अ० (ठेवणें) (उन्ह · होणें) पाणी इ० ऊन्ह व्हावयासाठीं अग्नीवर, कि० उन्हांत ठेवणें.

उन्हन, वि० (ऊन्ह · हि ·) उष्ण स्पर्श विशिष्ट जो पदार्थ तो.

उन्हातान्हाचा, अ० (ऊन्ह · हि ·) ऊन्ह असतां तज्जनित जी व्यथा होत्ये ती मान्य करून कोठें जाणें, येणें, हिंडणें, इ० कांचें वि०; उ० एह्यां उन्हातान्हाचा जाऊं नको अंमळ शिळोपा पडला त्रणजे जा.

उन्हाळणें, (उन्हाळी ·) पोर, गुरें, इ० उन्हाळीचा बाधेनें युक्त होणें.

उन्हाळपावसाळ, अ० रा० (उन्हाळा · पावसाळा ·) उन्हाळ्यांत आणि पावसाळ्यांत; प्र० बारमाही; उ० या विहिरीस उन्हाळ पावसाळ पाणी एकसारखें असतें.

उन्हाळवाँगी, स्त्री० (उन्हाळा · वांगी ·) उन्हाळ्यांत होत्ये अशी एक वांग्यांत जात आहे.

उन्हाळवाँगें, न० (उन्हाळा · वांगें ·) उन्हाळ वांगीचें जें फळ तें.

उन्हाळा, पु० (ऊन्ह · काळ ·) पावसाळा आणि हिंवाळा यांहून इतर जो चतुर्मासात्मक काळ तो. कि० पावसाळ्याहून इतर जो अष्टमासात्मक काळ तो; २, उष्मा; ३, मूत्रद्वारीं आग होऊन वारंवार मुतावयास होतें अशी एक उष्णविकृति होत असत्ये तो.

उन्हाळी, स्त्री० (उन्हाळा ·) उष्णकाळीं लोकांस विकृति व्हावयाजोगी जी हवेचा अंगीं उष्णता येत्ये ती; २, एक झाड आहे; ३, कों० उन्हाळा प्रथमद्वितीयार्थी.

उन्हाळें, न० (ऊन्ह ·) स्थलविशेषीं सर्वदा जीवंत ऊन्ह पाणी असतें तद्विशिष्ट जें तें क्षेत्र तें.

उन्हून, वि० (ऊन्ह · हि ·) कढत जो अन्नादि पदार्थ तो.

उन्हेरें, न० कों० उन्हाळें.

उप, अ० हा संस्कृत उपसर्ग आहे; क्वचित् याचा उत्तर पदाशीं योग झाला असतां उत्तर-

पदवाच्य जो अर्थ तत्प्रतिनिधिभूत गौण, कि० मुख्याहून अवांतर जें अर्थांतर त्याचा वाचक विशिष्ट शब्द होतो, कि० क्वचित् तत्संनिहित जो अर्थ त्याचा वाचक होतो; उ० पत्नीहून इतर परंतु पत्नीसदृश ती उपपत्नी. उपपति, उपधान्यें, इ० मुख्य साहित्याहून अवांतर तें उपसाहित्य, अंत्याचे जो सन्निहित तो उपांत्य; क्वचित् उत्तर पदार्थाचे समीप स्थलीं असा अर्थ होतो, तेव्हां विशिष्ट शब्द अव्ययहोतें; क्वचित् अप या उपसर्गाचा योगानें जो अर्थ होतो तत्प्रतिपक्षी याचा योगानें अर्थ होतो; उ० अपकाराचा प्रतिपक्षी तो उपकार, अपचय उपचय अपनयन उपनयन इ०.

उपकरण, न० सं० कांहीएक कार्याचे साधनभूत जे पात्रादि पदार्थ ते म०; २, उपकरणें.

उपकरणें, न० (उपकरण·सं०) देवपूजा साधनभूत जीं घंटा, धुपार्ती, तबकडी, इ० पात्रें तीं म०; २, अंक जाला करून पंचांग साधनार्थ पूर्वी इष्टशकावरून अब्दप, तिथिशुद्धि, इ० फलें सिद्ध करितात तीं म०

उपकर्त्री, अलिं० सं० उपकारकर्त्री.

उपकार, पु० सं० कोणेक क्रियाद्वारा कोणेकावर हितरूप फलाचा जो संबंध तो; २, कर्त्या स्वहित निरपेक्ष असून परमार्थबुद्धीनें दुसऱ्यावर जेव्हां हितफल करितो तेव्हां विशेषें करून म०.

उपकारक, अलिं० सं० उपकर्त्या; २, उपकार होतो जेणेंकरून असें जें औषध, क्रिया, इ० तो.

उपकारी

उपकारी, अलिं० सं० दुसऱ्यावर उपकार करण्याचा स्वभाव जाचा तो; २, आभारी.

उपक्रम, पु० सं० आरंभ; २, अप्रवृत्तपणें स्थित कांहीं एक गोष्ट तिचा कोणेकाचे क्रियेनें प्रवृत्तावस्थेचा ठायीं होतो जो आगम त्याचें जें आद्यलक्षणावच्छिन्न स्वरूप तो.

उपक्रमणें, (उपक्रमण·सं०) कोणेक गोष्ट उपक्रम विशिष्ट करणें

उपक्रांत, अलिं० सं० उपक्रम केला आहे जाचा तो.

उपखर्च, पु० मुख्यखर्चाहून अवांतर जो खर्च त्यास म०.

उपगुरु, पु० (उप·गुरु) शास्त्रादि सांगणारा जो मुख्य गुरु त्याहून इतर चिंतणी सांगणारा इ० दुसरा गुरु असतो तो.

उपग्रह, पु० सं० राहु, आणि केतु, हे म०.

उपचय, पु० सं० कांहीं पदार्थाचें जें उत्तरोत्तर आधिक्य तो.

उपचार, पु० जाजा रूपानें विवक्षित कार्य सिद्ध कराचायें त्यास साहित्यभूत इतर पदार्थसंबंधद्वारा करितात जे संस्कार ते म०; २, तत्तत्कार्य साहित्यभूत जे इतर पदार्थ, वस्तु, तीं साधनें म०.

उपज, पु० (उपजणें·) रुज्यादि व्यवहारांतील जें उत्पन्न तो; २, गाणें, कि० शास्त्रादिव्यवहार याचा ठायीं आपल्ये कल्पनाबलानें नवीन चमत्कारिक कोणी घेतो जी तान, कि० शंका, समाधान, इ० अर्थांश तो.

उपजणें

उपजणें, (उपजनन·सं·) जन्मणें.

उपजत, अ·(उपजणें·) त्या त्या चातुर्यादि गुणांनीं विशिष्टच जन्मला त्र·उपजल्यानंतर कोहीं निमित्तानें तो गुण आलेला नहे अशी विवक्षा असतां त्या चतुरादिकाचें वि·होनें; उ· उपजत शाहाणा, उपजत आंधळा, इ·.

उपजनिपज, पु·(उपजणें·निपजणें·) प्रा·आगम निर्गम या अर्थी.

उपजा, पु·उबजा.

उपजीवक, ३लिं·सं·उपजीवी.

उपजीवन, न·सं· प्राणी जे त्यांची अन्नादि योगानें सप्राणपणेंजी स्थिति तें, किं· तादृश स्थिति होण्यास कारण जें तें अन्नादि तें; २, अप्राणी जो पदार्थ त्याची कोणेक आश्रयबलानें नाश, विकृति, इ· न पावतां यथास्थितपणेंजी स्थिति तें, किं· तत्साधनीभूत आश्रयादि तें.

उपजीविका, स्त्री·सं·उपजीवन.

उपजीवी, ३लिं·सं· जाचें जाचे योगानें उपजीवन होते तो तदुपजीवी; प्रा·समासीं म·; उ· कृषीनें जो उपजीवन पावतो तो कृष्युपजीवी, विद्योपजीवी, शस्त्रोपजीवी, इ·.

उपजीव्य, न·सं· जा वृत्यादि अर्थानें आश्रयून जो उपजीवन पावतो तो वृत्यादि अर्थ त्याचे.

उपजीव्यविरोध, पु·सं· जा उपजीव्यानें आश्रयून जो उपजीवन पावतो तोच अर्थ त्या उपजीव्याचा नाशाविषयीं निमित्तभूत होऊं लागला असतां येतो जो विरोध तो.

उपजीव्योपजीवकभाव, पु·सं· उपजीव्य आणि उपजीवक यांचा जो परस्पर संबंध तो.

उपट, स्त्री·(उपटणें·) उपभोक्ता, कि· ग्रहणकर्ता जो त्याचे इच्छाशक्ति यांस पुरून उरे असें जें त्या त्या पदार्थांचें बाहुल्य तो; २, तादृशबाहुल्यामुळें उपभोक्ता, कि· घेणारा जो त्यास पुरेपुरे अशी जी अवस्था होत्ये ती; भक्ष्यादिपदार्थांची उपट घेणें, त्र· येथेच्छ पाहिजे तितकें खाणें, घेणें, इ·; ३, दाबून राहिलेला जो शत्रु, रोग, दैव, दोष, इ· त्याचें पुनः जें उत्थान तो; खाणें धातुयोगीं म·; ४, कों· काठी दोहों हातानीं धरून त्विचाबळानें कोणेकावर जो प्रहार तो.

उपटणी, स्त्री·(उपटणें·) शेत, तृण, केश, इ· उपटण्याचा जो व्यापार तो.

उपटणें, (उत्पाटन·सं·) उत्पाटित करणें; २, लाघवयुक्तीनें कोणेकापासून द्रव्यादि काढून घेणें; ३, दबलेला शत्रु, रोग, दोष, इ· त्यांनीं पुनः उपट खाणें; ४, दुसऱ्याची दृष्टचुकावून कांहीं पदार्थ चोरून नेणें; ५, कोणेकावर कोणेकानें क्रोधावेशानें अकस्मात् उठणें; उ· अन्याय केला कोणी आणि मजवर कां उगीच उपटलोस; उपटून सूळ खांद्यावर घेणें त्र· नसतें एखादें लचांड गांडीमागें लावून घेणें.

उपटसरी, उपटसुरी, स्त्री·कों· उपटसुळी.

उपटसुळी, स्त्री· एक औषधी वल्ली आहे.

उपटसूळ, पु·(उपटणें·सूळ·) कांहीं एक गोष्ट रंगानें

रंगानें चालला असतां त्यास विन्यरूप मध्यें च कोणी उपस्थित होतो जो मनुष्यादिक तो.

उपटाउपट, स्त्री० (उपटणें हि०) अनेकांनासून युक्तीनें, किं० हिसकावून द्रव्यादि उपटण्याचा जो व्यापार तो.

उपट्या, ३लिं० (उपटणें) उपटाउपट करण्याचा स्वभाव जाचा तो.

उपडणें, उपटणें प्रथमार्थी.

उपडा, उपडी, ३लिं० मुख, पोट, इ० जे पुरोभागाचे अवयव ने अधःप्रदेशाकडे करून स्थित जो मनुष्य, पात्र, पान, इ० पदार्थ तो.

उपणबटी, स्त्री० फार खोलगट नव्हे उथळ अशी जी तुरटया, निरगुडीचे फोक इ० कांची केलेली आकार विशेषाची पांटी ती.

उपणा, पु० हस्तपादाद्यवयवांस वाध्यादि विकृति झाली असतां तन्निरासार्थ निरगुडी शेगवा, इ० कांचा पाला, नारळाचा कीस इ० कांचा त्या हस्तादिकांस बांधितात जो पेंड तो.

उपणी, स्त्री० (उपणें) पेरणी.

उपणें, (वपन सं०) पेरणें.

उपनिषणें, (उपनिषदति सं०) सांगितलेलें अध्ययनादिकें संस्काररूपें करून अंतःकरणांत राहणें.

उपदंश, पु० सं० एक रोग आहे जो मा० दुसरा जो उदंशी पुरुष, किं० स्त्री त्याशीं मैथुन संबंध झाला असतां होतो तो.

उपदंशी, ३लिं० सं० उपदंश आहे जास तो.

उपदिष्ट, ३लिं० सं० उपदेशीला जो मंत्रादिक तो. किं० जास उपदेश केला तो शिष्यादिक तो.

उपदिशा, स्त्री० सं० माच्यादिक जा चार, किं० आठ, किं० दाहा, त्याहून अवांतर जा दिशा त्या म०.

उपदेव, पु० सं० गंधर्व, विद्याधर, अप्सरा, इ० जा मुख्य देवाहून इतर स्वर्गी राहतात जाति त्या म०.

उपदेश, पु० सं० गुरु कोणेक मंत्राचें कथनद्वारा करितो जें दान तो; २, कोणी कोणास कांहीं एक युक्ति, किं० मनसोबा, इ० कांचें जें कथनद्वारा दान करितो तो; मंत्रोपदेश, हितोपदेश, गुरूपदेश, ब्रह्मोपदेश, इ० स०

उपदेशक, ३लिं० सं० उपदेश करणारा तो.

उपदेशणें, (उपदेशन सं०) मंत्रादि शिष्यादिकांस उपदेशरूपें करून देणें, किं० त्या दानानें त्या शिष्यादिकास तद्विशिष्ट करणें.

उपदेशी, ३लिं० सं० जाला जापासून मंत्रादिकाचा उपदेश झाला आहे तो त्याचा.

उपदेष्टा, ३लिं० सं० उपदेशक.

उपद्रव, पु० सं० कोणेकाचे संबंधानें कोणेकास होत्येजी पीडा तो; पिशाच संबंधानें कोणेकास होत्येजी पीडा तेथें विशेंकरून म०; उ० या औषधानें जेव्हां गुण पडत नाहीं तेव्हां हा अंगरोग नव्हे कांहीं उपद्रव आहे.

उपद्रवीक, ३लिं० (उपद्रव सं०) पिशाचोपद्रवसंबंधी जें दुखणें इ० तो.

उपद्रष्टा, पु० सं० यज्ञादि कर्मामध्यें न्यूनाधिक कांहीं कर्म होईल तें पाहून जेथील तथें यथास्थित करवावें म्हणून एक ऋत्विज वरिला

रिला असतो तो.

उपदुत, २वि॰ सं॰ उपद्रव पावला तो.

उपद्वीप, न॰ समद्वीपातिरिक्त उक्त जी द्वीपें तीं म॰.

उपद्व्याप, पु॰ (उप॰ उत्॰ व्याप॰ सं॰) कांहीएक कार्य सिद्धकरण्याविषयीं अत्यंत मोठा व्यापक जो उद्योग तो; उ॰ सर्कार, दरबार, पंचाइती इतकाजेव्हां उपद्व्याप केला तेव्हां त्याज करितां लक्ष रुपये उगवेले.

उपद्व्यापी, २वि॰ (उपद्व्याप॰ सं॰) उपद्व्याप करण्याचा स्वभाव जाचा तो.

उपधातु, पु॰ स्त्री॰ सं॰ तांबें, सोनें, इ॰ जा मुख्य सात धातु त्याहून इतर, जा धातु त्या म॰.

उपधान, न॰ सं॰ कोणेक अधिकरणी किंचित कर्तृक गुणादिकाचें जें अर्पण तें; उ॰ साधु समागम अंतःकरणांत बिनयाचें उपधान करितो; २, कोणेक पदार्थाशीं कोणेक पदार्थाचें उपाधिरूपें करून जें संबंधन तें.

उपधान्य, न॰ सं॰ व्रीहियवादिक परिगणित जीं अष्टादश धान्यें त्याहून इतर जीं जोंधळा, सजगुरा, लांक, इ॰ धान्यें तीं म॰.

उपधायक, २वि॰ सं॰ उपधान करणारा तो; फलोपधायक, गुणोपधायक, इ॰ स॰

उपनयन, न॰ सं॰ ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य, यांचे पुत्रास वेदाधिकारार्थ अष्टमादि वर्षीं करावयाचा एक संस्कार आहे.

उपनाम, न॰ सं॰ अडनाव.

उपनामक, २वि॰ सं॰ जें जाचें उपनाम तो तदुपनामक; वैशंपायनोपनामक, पंडितोपनामक, इ॰ समासीं म॰.

उपनाव, न॰ उपनामाचा अपभ्रंश.

उपनीत, २वि॰ सं॰ उपनयन झालें जाचें तो.

उपनेत्र, न॰ (उप॰ नेत्र॰) दृष्टीनें बारीकही पदार्थ दिसावा म्हणून दोन वर्तुल भिंगें नेत्राशुढें लावावयास करितात तें.

उपपति, पु॰ सं॰ कोणी व्यभिचारिणीनें पतीहून इतर जो जार ठेविला असतो तो.

उपपत्ति, स्त्री॰ सं॰ जें कार्य जा प्रकारें होतें, तिसतें, त्याचें त्या त्या प्रकारें होण्यास, किंवा तिसण्यास नियामक कार्यकारणभाव माहात्म्यरूपजें मूलभूत कारण असतें तीं; २, कोणेक अर्थाची समाधानयुक्तिकजी सिद्धि ती; उ॰ सुईचे वेजांतून हत्ती पार गेला म्हणतां हें घडलकसें याची उपपत्ति करून द्या; ३, मपंचादि व्यवहार निर्वाहास राजाश्रय. वृत्ति, धनिकता, इ॰ असती जी सोय ती.

उपपत्नी, स्त्री॰ (उप॰ पत्नी॰ सं॰) आपली जी विवाहाची स्त्री तिजहून इतर जी उपभोगार्थ स्त्री ठेविली असते ती स्त्री म॰.

उपपन्न, २वि॰ सं॰ उपपत्तिविशिष्ट झाला जो कांहीं एक अर्थ तो. कि॰ उपपत्ति आहे जास तो.

उपपातक, न॰ सं॰ गोवधादिक पापें जीं धर्मशास्त्रांत परिगणित आहेत तीं म॰.

उपपात्र, न॰ (उप॰ पात्र॰ सं॰) पाणी ठेवावयाचें जें तांब्या, इ॰ मोठें पात्र त्याहून इतर आंतपाणी ओतून घ्यावयाचें जें पंचपात्री, पेला, इ॰

लहान पात्र तें.

उपपादक, ३लिं॰सं॰ उपपादन करतो.

उपपादणें, (उपपादन·सं॰) उपपादित करणें.

उपपादन, न॰सं॰ शास्त्रादि व्यवहार संबंधी जो पूर्वपक्षादि विषय त्यांचें सभादिकांचा ठायीं हेतुहेतु मद्भावादि विस्तारपूर्वक सुसंगत जें उच्चारण तें.

उपपादित, ३लिं॰सं॰ उपपादन केलें जा विषयाचें तो.

उपपुराण, न॰सं॰ भागवतादिक अष्टादश पुराणें त्याहून इतर जीं कांहीं पुराणें आहेत तीं प्र॰.

उपप्राण, पु॰सं॰ पंचप्राणाहून इतर जे नागादि पांच प्राण आहेत ते प्र॰.

उपप्लव, पु॰सं॰ उपद्रव सामान्यार्थीं

उपभुक्त, ३लिं॰सं॰ कोणेकानें उपभोग केला आहे जाचा तो.

उपभोक्ता, ३लिं॰सं॰ उपभोग करणारा तो.

उपभोग, पु॰सं॰ तत्तद्विषयजन्य सुखाचा, किंं॰ दुःखाचा संस्कार आत्म्याचा ठायीं होत असावा अशा प्रकारें त्या त्या विषयाची आत्मसंबंधांत अनुभूयमानत्वेंकरून जी धृति तो.

उपभोगणें, (उपभोग·सं॰) उपभुक्त करणें.

उपभोग्य, ३लिं॰सं॰ उपभोगाया स जें योग्य तो.

उपमर्द, पु॰सं॰ अनेक अपकारांनीं कांहीं पदार्थ, मनुष्य, गोष्ट इ॰कांची करितात जी भग्नावस्था तो.

उपमा

उपमा, स्त्री॰सं॰ कोणेक पदार्थास कोणेक पदार्थांतराचें कांहीं धर्मैक्यास्तव वर्णितात जें सादृश्य ती; २, उपमान.

उपमाता, स्त्री॰सं॰ मातेहून इतर मुलास स्तनपान देऊन शुश्रूषा करावी त्यणून जी स्त्री ठेविली असते ती.

उपमान, न॰सं॰ वर्ण्य जो सुखादि पदार्थ त्यास जाची उपमा देतात असा जो चंद्रादि पदार्थ तें; २, अनुमानादि चतुर्विध प्रमाणांत एक प्रमाण आहे.

उपमानोपमेयभाव, पु॰सं॰ उपमान आणि उपमेय यांचा जो परस्पर संबंध तो.

उपमित, ३लिं॰सं॰ कोणक उपमानाची जास उपमा दिली आहे तो.

उपमिति, स्त्री॰सं॰ उपमान त्यणून जें प्रमाण तज्जन्य जें ज्ञान तीं.

उपमेय, न॰सं॰ कोणेक उपमानाची उपमा जास देण्यास विवक्षित आहे तें.

उपयुक्त, ३लिं॰सं॰ उपयोग आहे जाचा तो.

उपयोग, पु॰सं॰ कोणेक कार्याविषयीं कोणेक अर्थास तत्साधनत्वेंकरून असत्ये जी उपकारकता तो; २, त्या कार्यास स्वसिद्धीविषयीं त्या अर्थाची उपकारकत्वेंकरून असत्ये जी सापेक्षता तो.

उपयोगी, ३लिं॰ (उपयोग·सं॰) उपयोग आहे जाचा तो.

उपर, अ॰ (उपरि·सं॰) उपरांत; २, विवक्षित स्थलाहून उत्तरेकडील प्रदेशीं, परंतु प्रा॰

समुद्र

समुद्रतीरीं, किं० समुद्रांत याचा प्र०; २, स्वरूप गुणादि दाखविण्यानें कोणेकाची कोणेकावर चढत्या जी वर्चस्विता तो.

उपरकाठी, स्त्री० अणवाणी चालतानां कांहीं एक लहान काठीवर पाय पडला असतां तीचें अग्र तटकर उडोन पायांचे तळास आघात करितें तेणेंकरून विषारा सारखें मोठें दुखणें होतें तें झालें असतां त्या आघातास प्र०.

उपररवणी, स्त्री० (उपर·रवण·) उपरमाडी.

उपरटपका, उपरठपका, पु० (उपरट्टपका· उपरठ्ठपका·) आपण कोणेकाचें बरें करूं गेलें असतां यश यावें तें न येतां याणें वाईट केलें असें जें निमित्त येतें तो; २, उपरचतुर्थीही क्वचित् याचा प्र०.

उपरटप्पा, पु० कों० उपरटपका.

उपरटप्पी, उपरटप्प्याचा, वि० (उपरटप्पा) दृढता, सांगता, इ० जे भाषणादि कर्मांत गुण असावे तद्रहित वरवर जें भाषणादि तो.

उपरणा, पु० एकेरी पांघरायाचें जें आंगवस्त्र काढिलें असतें तो.

उपरति, स्त्री० सं० उपरम; २, विरक्ति.

उपरदवडा, पु० उपरटपका.

उपरम, पु० सं० कांहीं सतत चाललेला जो व्यवहारादिक त्याचा जो कुंठीभाव तो.

उपरमाडी, स्त्री० (उपर·माडी·) माडीवरची जी माडी ती.

उपराग, पु० सं० सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण

ग्रहण ही प्र०.

उपराठणें, उफराटणें.

उपराठा, वि० उफराटा.

उपराँडणें, गाडा, गलबत, इ० कलथून पाडणें.

उपराँत, उपरांतीक, अ० (उपरि·सं०) कोणेक क्रियेचा अनंतर कालीं.

उपराळा, पु० (उपर·) बैल इ० कांवर लादलेलें जें लांकडें इ० कांचें ओझें त्याचा दोहों अंगांचा तोल सारखा व्हावा म्हणून बांधलेल्या गळ्यावर मोकळीं जीं लांकडें इ० ठेवितात तो; २, गुळाची ढेप, सुपारीचें कपात, लांकडांचा गठ्ठा इ० सबंध पदार्थ तोलित असतां वजनाचे थडीपेक्षां त्या ओझ्यांत अधिक जें कांहीं वजन भरतें तो; ३, रोजगार, शेत, इ० संबंधी जें उत्पन्न द्रव्यादि तेणेंकरून त्या व्यवहाराचा खर्च भागून दुसरा जो संसारादि व्यवहार त्यास त्याज कडून होतो जो कांहीं आश्रय तो; ४, आपण बरे रीतीनें वागत असतां दुसरा शेजारी इ० तूं असेंच कां केलेंस इ० करितो जो निमित्तारोप तो; ५, कज्जा, युद्ध, इ० प्रवृत्त होण्याविषयीं प्रथमतः कोणी करितो जी कांहींएक निमित्ताची उपस्थिति तो; उ० आत्मी केल्या निश्चयास टळलों नाहीं परंतु तुमचे कडून च उपराळा झाला तेव्हां आत्माला उठणें प्राप्त; ६, विविक्षित कार्यास पुराया जोगी सामग्री घेऊन प्रसंगविशेष संभावनेनें जी कांहीं अधिक घेऊन ठेवितात तो; ७, वाद,

युद्ध

युद्ध, इ० कांत होतां होतां बरोबरी होऊन कांहीं अंशानें दुसऱ्यावर एकाचा होतो जो वरचढपणा तो.

उपरि, अ० सं० मा० वर हेंजें अव्यय त्या अर्थी.

उपरितन, वि० सं० वरचा.

उपरिभाग, पु० सं० उपरितन जो भाग तो.

उपरी, पु० (उपरि० सं०) ओजा स्थलींचा वतनदार नव्हे तो तेथें राहिला असतां.

उपरुद्ध, वि० सं० उपरोध झालाजाचा तो.

उपरोध, पु० सं० यथेच्छपणें वर्तण्यास, किं० बोलण्यास कोणेकाची भीड, भय, चोरघुपद्रव, इ० कारणामुळें संकोच व्हावयाजोगी होत्ये जी अडचण तो: उ० गांवा जवळ जर तुह्मी सैन्य उतरलें नर ग्रामस्थांस उपरोध होईल; जें काम पडेल तें मला सांगत जा हे थोर यांस कमें सांगावें असा उपरोध बाळगूं नका.

उपरोधाचा, वि० (उपरोध०) उपरोधीक

उपरोधी, उपरोधीक. वि० (उपरोध० सं०) जेणेंकरून दुसऱ्यानें आपला अपराध, अनुपकारिता, इ० स्मरून संकोच पावावा, वर्मावें, असें त्याला लागावा जोगें जें विपरीत लक्षणेचें नत्स्तुति, आत्मनिंदा, एतद्वृत्ति भाषण, लेख, इ०, किं० तादृश कांहीं व्यापार तो; उ० साळेंत पोर वेळ चुकवून उशीर करून गेला म्हणजे त्यास पंतोजी अहो यावें महाराज बसावें अरे कोणीयानां आसन घारे इ० जें सर्व करितो ते उपरोधिक.

उपलप्रक्षेप, पु० सं० कोणेकावर करतात जो अनेक दगडांचा भडिमार तो; २, ला० परमत खंडनार्थ प्रवृत्त जो कोणी ग्रंथकारादि वक्ता तो एक दोन चांगल्या युक्तीनीं त्या मताचें खंडन करून मग त्या आवेशानें अनेक बऱ्या वाईट युक्तींचा करितो जो मार तो.

उपलब्ध, वि० सं० उपलब्धि झाली जाचीतो.

उपलब्धि, स्त्री० सं० द्रव्यादि विषयाची जी प्राप्ति ती; २, कोणेक पदार्थाची जी इंद्रिय गोचरता ती; उ० शब्दाची उपलब्धि श्रोत्रेंद्रियावांचून होत नाहीं.

उपलक्षण, न० सं० लक्ष्यार्थाशीं जाचा योग नित्य नाहीं, यदाकदाचित् असतो असा होत्साता तल्लक्षणत्वें करून विवक्षित केला जो कांहीं अर्थ तो त्या लक्ष्यार्थाचें; उ० जाजवर कावळा बसला आहे तें रामाजीपंताचें घर एथें कावळा हें उपलक्षण; २, कोणेक विधीविषयीं व्यापकरूपेंकरून विवक्षित जो अर्थ त्याचा व्याप्यरूप विधिविषय केला असतो जो एकदेश तें; उ० सोंगटी रवेळूं नये एथें सोंगटी हें उपलक्षण; कांहींच खेळूं नये असा या विधीचा अर्थ; उ० तुह्मी माझे घरीं चोरी केली असतां मी तुह्मास शिक्षा करावी कीं नाहीं अहो तुह्मी म्हणजे एक उप-

लक्षण, भलत्याकोणी असा अर्थ.

उपलक्षणें, (उपलक्षण·सं·) कांहीं एक अर्थ उपलक्षणरूपेंकरून धरणें.

उपलक्षित, वि·सं· कांहीं उपलक्षणानें उपलक्ष्यता पावलेला जो कांहीं अर्थ तो.

उपलक्ष्य, वि·सं· उपलक्षणानें ज्ञाप्य जो कांहीं एक अर्थ तो.

उपलाणी, वि· (उत्·पल्याण·सं·) बसायासाठीं खोगीर, जीन, इ·जें पाठीवर ठेवितात तद्रहित जें घोडें इ· तो; उपलाणी बसणें रूप·उपलाणी जें घोडें इ· त्याजवर बसणें.

उपलिप्त, वि·सं· उपलेप केला आहे जास तो.

उपलेप, पु·सं· भूमि, शरीर, इ·कांवर गोमय चंदन इ·कांचा करितात जो लेप तो.

उपलेपन, न·सं· उपलेप करण्याचा व्यापार कि·साधन जें गोमयादि तें.

उपवन, न·सं· फुलझाडें, केळी, नारळी, पोफळी, सरू, इ· वृक्ष लावून जें रमणीय स्थल करितात तें

उपवर, वि·सं· मुलीस आठवें, नववें, वर्ष आणि मुलास बारावें, तेरावें, वर्ष असा जो विवाहाचा सामान्यकाल तो अतिक्रमून विवाह न होतां कांहीं काल राहिला जो मुलगा, कि·मुलगी तो.

उपवस्त्र, न·सं· उत्तरीय.

उपवास, पु·सं· व्रताद्यर्थ सारादिवस भोजन न करितां राहण्याचा जो प्रकार तो.

उपवासी, वि·सं· उपवास केला आहे जेणें तो, परंतु भोजन करी पर्यंत.

उपविष्ट, वि·सं· उपवेशन केलें जाणें तो.

उपवीत, न·सं· जानवें.

उपवेद, पु·सं· चार वेदाहून इतर जीं आयुर्वेद, धनुर्वेद, इ·शास्त्रें आहेत तीं प्र·

उपवेश, पु·सं· बसलेपणानें जी स्थिति तो.

उपवेशन, न·सं· बसण्याचा व्यापार तें.

उपशब्द, पु·सं· शब्दाचा जो शक्यार्थ त्या सहवर्तमान तत्सजातीय इतर अर्थांचीही जेव्हां विवक्षा असते तेव्हां त्या शब्दासहवर्तमान दुसरा जो शब्द उच्चारला जातो तो; उ· दंगाधोपा, लांकूडफाटें, वस्त्रपात्र, पोथीपुस्तक, झाडझाडोरा, दगडगिगड, औषधपाणी, इ·कांतील जे दुसरे शब्द ते प्र·.

उपशम, पु·सं· प्रवृत्त, वृद्धिंगत, जे कांहीं रोग, क्रोध, अग्नि, चोर, सात, इ·त्यांची पूर्वावस्थेपेक्षां कांहीं शांतता तो.

उपशमन, न·सं· उपशम होण्याचा व्यापार. कि·साधन जें द्रव्यादि तें.

उपशाखा, स्त्री·सं· वृक्षास कांडापासून जा मोठ्यामोठ्या शाखा फुटतात त्यांस जा लाहनलहान शाखा फुटतात त्या प्र·.

उपशांत, वि·सं· उपशम पावला तो.

उपशांति, स्त्री·सं· उपशम.

उपशास्त्र, न·सं· न्याय मिमांसादिक जीं साहा

साहाशास्त्रें त्यांहून इतरजीं वैद्यक, गानशास्त्र, इ० तीं अ०.

उपशिक्षक, पु० सं० उपगुरु.

उपश्रुति, स्त्री० सं० परोक्ष, कि० भवितव्य गोष्टीविषयीं पभ्र पाहाया करितां रात्रौ चर्मकादिकांचे गृहाजवळ हळूच आऊन त्यांचा साहाजिक निघालेला बराबाईट जो तज्ज्ञापक शब्द ऐकतात ती; २, आपण कांहीं एक गोष्टीचा विचार करीत असतां तच्छुभाशुभ ज्ञापक जो कोणेकाचे मुखें बराबाईट शब्द सहज निघतो त्यास स्त्री०; उ० मी लग्नाचा विचार करीत बसलों होतों तों मरशील रे मरशील अशी तिकडून उपश्रुति झाली तस्मात् यंदा करूंनये; ३, पुढें होणार, कि० देशांतरीं झालेलें जें वर्तमान तज्ज्ञाप जनांत निघतो जो शब्द ती.

उपश्लिष्ट, श्लिं० सं० जाचा उपश्लेष जास आहे तो तेणेंशीं.

उपश्लेष, पु० सं० कोणेक पदार्थाचा कोणेक पदार्थास सामीप्य संबंध तो.

उपसणी, स्त्री० (उपसणें) पात्रांतून जलादि उपसण्याचा व्यापार ती.

उपसणें, (उत्सर्पण सं० १ उसपणें प्रा० २) विहीर, हंडा, पेंव, कणिंग, इ० पात्रांत भरलेलें जें पाणी, धान्य, इ० घागर, तांब्या, टोपलें, हस्त, इ० कानें बाहेर काढणें, कि० तें पात्र त्या व्यापारानें त्या उदकादिकानें वियुक्त करणें; २, तरवार, सुरी, इ० मेणांतून बाहेर काढणें.

उपसर्ग, पु० सं० उपद्रव; २, प्र, परा, इ० संस्कृत भाषेंत अव्यय विशेष आहेत ते अ०.

उपसर्जन, न० सं० विशेषण

उपसर्पण, न० सं० दूरदेशाहून कोणेक मनुष्यादिकाचें जवळ जें आगमन तें.

उपसंहार, पु० सं० प्रसृतपणे स्थित जो वस्त्रादि पदार्थ त्याचा गुंडाळणें, घडी करणें, इ० क्रियानीं करितात जो संकोच तो; २, उपक्रांत जी कांहीं एक गोष्टनिची समाप्ती करावयासाठीं तस्मात्, एवंच, एकून, इ० शब्दानीं त्यांतील सर्व सारांशाचा शेवटीलविधीवर अन्वय कराया करितां करितात जो संग्रह तो.

उपसा, पु० (उपसणें.) उपसणी; २, उपसणी केल्यामुळें विहीर इ० कांतून जलादिकांचा होतो जो व्यय तो.

उपसाण, स्त्री० कों० उबसाण.

उपसाभर, स्त्री० (उपसणें भरणें.) उलगाघाल.

उपसामग्री, स्त्री० उपसाहित्य.

उपसाहित्य, न० सं० पाकादि कार्यांचीं मुख्य जें तांदूळ, कणीक, डाळ, इ० साहित्य तदितर मीठ, मिरची, हिंग, मोहऱ्या, इ० साहित्य तें.

उपस्थ, पु० न० सं० स्त्री आणि पुरुष यांचें जें मैथुनसाधन इंद्रिय तो तें; २, रथांत रथीनें बसायाचें जें उंच स्थल केलें असतें त्याचे आसपास जी सरळ बसायाजोगी

जोगी जागा असल्ये तो.

उपस्थान, न० सं० उपस्थित करण्याचा व्यापार तें; २, मंत्रादिकें करून देवतादिकांची जी स्तुति तें, किं० तें मंत्रादिक तें.

उपस्थापन, न० सं० उपस्थित करण्याचा व्यापार तें.

उपस्थित, वि० सं० कोणेक शब्दादि प्रमाणापासून ज्ञान होतो जो कोणेक अर्थ तो; २, कर्तव्यता, भोग्यता, निर्वाह्यता, इ० रूपेंकरून अस्तित्व पावला जो कांहीएक अर्थ तो; ३, वागतें जें शास्त्रादिक तो; ४, स्त्री० उपस्थितीचा अपभ्रंश.

उपस्थिति, स्त्री० सं० उपस्थितपणा.

उपहत, वि० सं० ताडित.

उपहसित, वि० सं० उपहास झाला जाचातो.

उपहार, पु० उपाहाराचा अपभ्रंश.

उपहास, पु० सं० कोणेकानें उद्देशून जनामध्यें छी छी थू थू इ० रूप त्याला लज्जा वाटाया जोगा जो व्यापार प्रवृत्त होतो तो; २, जनानीं तादृश उपहास कराया जोगी जी कोणेकास योग्यता प्राप्त होत्ये ती.

उपहासास्पद, न० सं० लोकानीं उपहास करायास पात्र भूत जो तें.

उपहास्य, वि० सं० जाचा उपहास करायास उचित आहे तो.

उपहास्यता, स्त्री० उपहास्य.

उपाहित, वि० सं० कोणेक उपाधीनें संबद्ध झाला जो तो; मायारूप उपाधीनें संबद्ध जें चैतन्य तें मायोपहित चैतन्य. घटोपहित आकाश, इ० समासही जाणावे.

उपळ, स्त्री० (उपळणें) फार पाऊस पडल्यामुळें जागोजाग झरे सुटावे. अशी भूमीस अवस्था प्राप्त होत्ये ती; २, पु० ते सुटतात जे झरे ते प्र०; ३, स्त्री० फुरसें, किं० घणसर डसला असतां सर्वांगांतून रगत पाझरतें अशीजी शरीरास अवस्था होत्ये ती.

उपळण, स्त्री० को० (उपळणें) उपळ प्रथमार्थी.

उपळणें, (उत्प्लवन सं०) भूमि, किं० शरीर उपळीनें विशिष्ट होणें; २, कांहीं उष्णादि विकृतीनें मूल भागांतून रक्तस्राव होई अशा अवस्थेतें दातांनीं पावणें; ३, वृक्ष, तृण, स्रोत. शरीरावयव, इ० कानीं मूलधार शिथिल झाल्यामुळें उपटले जाणें.

उपळवणी, न० (उपळ-पाणी) जमिनीचा उपळ संबंधी जें पाणी तें; २, अश्वशास्त्र वर्णन प्रसंगीं संपत्त्यादिकांस लाग०.

उपळी, स्त्री० (उपळणें) प्रा० उपळ चा र्थी.

उपाई, अ० (येणें) (उत्-पाय) अश्व, रेंचर, इ० कानीं पुढील दोन पाय उभारून मागचे दोन पायांवर उभें राहणें; २, ला० मनुष्यानें क्रोधावेशानें कोणेकाचा अंगावर येणें.

उपाकरण. उपाकर्म, न० सं० यज्ञोपवीत धारण करणारे जे ब्राह्मण, क्षत्रियादिक त्यांचें यज्ञोपवीत धारण करण्याचें प्रतिवार्षिक एक कर्म आहे.

उपांग, न॰सं॰ कोणेक कर्मादिकांचीं मुख्यें जीं अंगें त्याहून इतरजीं गौण अंगें तीं प्र॰.

उपांगललिता, स्त्री॰सं॰ एक देवता आहे जीचें पूजादिव्रत आश्विन शुद्ध पंचमीस करितात तीं;२, ललितापंचमीस प्र॰.

उपात्त, २लिं॰सं॰ गृहीत.

उपादान, न॰सं॰ कोणेक कार्याचें समवायिजें कारण तें;२, हस्तादिकेंकरून कोणेक अर्थाचें जें ग्रहण तें

उपाधीक, न॰ उपाधपण.

उपाध, स्त्री॰ (उपाधि·सं॰) उपद्रवकारक पाठीशीं जडतें जें रोग. कज्जा, इ॰लिगाड त्यास प्र॰.

उपाधपण, न॰ (उपाध्या·पण) पौरोहित्य;२, तत्संबंधें यजमानाकडून जी प्राप्ति तें.

उपाधपेंठ, स्त्री॰ (उपाध्या·पेंठ) लग्न, मुंज, इ॰कांत उपाध्या इ॰ यास जीं केवळ हल्लक्या किमतीचीं शेला, पागोटीं आणितात त्यास प्र॰.

उपाधि, पु॰सं॰ शुद्ध स्वस्वरूपेंकरून स्थित जो पदार्थ, याचाठायीं कांही अन्यरूपता भासायास कारणभूत पदार्थांतराचा जो संबंध तो, किं॰ तें पदार्थांतरही;उ॰ आकार विशेषरूप उपाधि झाला म्हणजे सुवर्ण अलंकारादि व्यपदेश पावतें;२, कोणेका पासून विलक्षण कार्य उत्पन्न होण्यास प्रयोजक कारणभूत जें कांहीं एक तो;उ॰ अग्नीपासून धूर उत्पन्न होतो त्यास आर्द्रेंधन संयोग उपाधि होय;३, स्त्री॰ उपाध.

उपाधीक, न॰ उपाध्यपण;२, औपाधिकाचा अपभ्रंश.

उपाध्यपण, न॰ उपाधपण.

उपाध्या, पु॰ (उपाध्याय·सं॰) जो जाचेघरचें लग्न, मुंज, व्रत, श्राद्ध, इ॰ कर्म चालविता असा जो ब्राह्मण तो त्याचा; तीर्थोपाध्या, ग्रामोपाध्या, कुलोपाध्या, इ॰स॰; कोणेकवस्तूस उपाध्या भेटणें, प्र॰ तें कोणेकानें चोरून नेणें.

उपाध्याय, पु॰सं॰ उपाध्या;२, वेदादिविद्या शिकिवणारा जो गुरु तो.

उपाय, पु॰सं॰ अनिष्टपणें स्थित जें कांहींएक त्याणें इष्टरूपें करून परिणाम पावावा म्हणून त्याजवर उपयुक्त क्रियेचा जो विनियोग तो, किं॰ तादृश परिणामाविषयीं विनियुक्त करायास योग्य जी क्रिया तो;२, साम, दान, दंड, आणि भेद, हे प्र॰.

उपायन, न॰स॰ वायम;२, कोणी कोणेक इष्ट, मित्र, किं॰ राजा इ॰कांस पाठवितानजी भेट तें.

उपार्थीं, अ॰ येणें धातुयोगीं प्र॰; अर्थ; उपाई येणें.

उपार्जन, न॰सं॰ अर्जन.

उपार्जना, स्त्री॰सं॰ द्रव्यादि मेळवायासाठीं लोकांजवळ याचना, सेवा, आर्जव, इ॰ जो निकृष्ट उपाय करावा लागतो ती.

उपार्जित, २ लिं० सं० उपार्जन केलें जाचें तो द्रव्यादि अर्थ तो; पूर्वोपार्जित, आत्मोपार्जित, इ० स०

उपाव, पु० उपायाचा अपभ्रंश; ग्रंथांत, कि० शूद्रादि भाषेंत प्र०.

उपाशीं, २ लिं० (उपास) नजेवितां रिकामे पोटानें जो स्थित तो.

उपाशींतापाशीं, २ लिं० उपाशीं इ० तो

उपास, पु० उपवासाचा अपभ्रंश.

उपासक, २ लिं० सं० उपासना करितो तो.

उपासकर, उपासकरी, २ लिं० (उपास करणें) व्रताद्यर्थ उपासाचा नियम धरला आहे जेणें तो.

उपासणें, (उपासन सं०) उपासित करणें.

उपासनापास, पु० (उपास सोप) उपास, जागरण, इ० जे कष्ट ते.

उपासना, स्त्री० सं० वस्तुतः निर्गुण, अमूर्त, जो ईश्वर त्याचे ठायीं शास्त्रानुरूप मूर्तत्वादि कल्पना करून पूजादि क्रियाद्वारा भजण्याचा जो प्रकार ती; २, कोणेक मंत्र गुरूपासून घेऊन यथाविधि जपादिद्वारा धरिला असतो जो तत्सेवा नियम ती.

उपासित, २ लिं० सं० उपासना केली जाची तो.

उपास्य, २ लिं० सं० जाची जो उपासना करितो तो देवतादि त्याचा.

उपाहार, पु० सं० भोज्य जें अन्नादि त्याहून इतर फलें, मिठाई, पोहे, इ० जे पदार्थ त्यांचें जें भक्षण तो.

उपिठणें

उपिठणें, (उत् पीठ) पापड, खापरपोळी, इ० वाकेनें शिजायाचे जे पिठाचे पदार्थ त्याणी, कि० भाकर इ० कानीं वाफ गेल्यामुळें, कि० अग्निसंयोग यथास्थित न झाल्यामुळें एका अंशीं पक्व होऊन इतरांशीं पक्व न होतां शुष्क नीरस होऊन भेगा पडाव्या अशा अवस्थेनें युक्त होणें.

उपीठ, २ लिं० (उपिठणें) उपिठलेला जो भाकर, खापरपोळी, इ० पदार्थ तो.

उपेक्षक, २ लिं० सं० उपेक्षा करितो तो.

उपेक्षणीय, २ लिं० सं० जाची उपेक्षा करणें योग्य आहे तो.

उपेक्षणें, (उपेक्षण सं०) उपेक्षित करणें.

उपेक्षा, स्त्री० सं० कर्तव्यतें करून उपस्थित झालें जें कांहींएक तद्विषयीं हें केलें नाहीं त्यणून काय होतें, कि० एवां केलें नाहीं तर काय होतें अशी करितात जी अंतःकरणवृत्ति ती.

उपेक्षित, २ लिं० सं० उपेक्षा केली जाची तो.

उपोद्घात, पु० सं० ग्रंथांत प्रतिपादनीय जो कांहींएक विषय त्याचें अमुक स्वरूप, प्रयोजन, हेतु, संबंध, इ० प्रतिपादनरूप अवतरण माथीं जो पूर्वी ग्रंथांश असतो तो

उपोषण, न० सं० उपवास.

उपोषित, २ लिं० सं० उपाशीं; २, उपोषणद्वारा

रा पाडिला जो एकदम्यादि दिवस तो.

उफट, ३ लिं० रोगादिकांमुळें आंगीलरक्त यून झाल्यानें निस्तेज पांढरें शुष्क दिसूं लागलेलें जें शरीर तो.

उफटणें, उफट होणें.

उफंडुणें, दे० उफटणें.

उफरा, उ० रा० वृक्ष, लता, इ० कांस मतिवर्षी कलें, पुनें, यांचे वेनात जे वार ने प्र०.

उफराटणें, कोणक पदार्थ, गोष्ट, इ० जी क्रमानें, कि० विवक्षित अवयवाचा रोख विवक्षित दिशेकडे अशा प्रकारें स्थित त्यानें तद्विपरीत प्रकारानें; कि० विपरीत क्रमानें स्थित करणें; २, मदाचा अतिशयानें, कि० मृत्युछाया पडल्यामुळें डोळे चढले जाणें

उफराटसुफराट, ३ लिं० उलटासुलटा.

उफराटा, ३ लिं० (उफराटणें) कोणेक पदार्थाचा दिगनुरोध, अनुक्रम, इ० रूप विवक्षित जो स्थितिप्रकार तद्विरुद्ध प्रकारानें जाची स्थिति झाली तो; उफराटी बाहुली स्त्री० केवळ डोळ्यांजवळ धरल्यावांचून बारीक पदार्थ दिसत नाहीं अशा स्वभावाचा जो कोणेकाचा नेत्रकनीनिका असनात्यास स्त्री० प्र०.

उफराटासुफराटा, ३ लिं० उफराटसुफराट.

उफरांडुणें, कोणेक मनुष्यादि पदार्थ धक्का इ० कानें खालचें आंगवर, वरचें आंगखाली, असा उफराटा होई असा करणें; उ० त्या गडयास या मसलीनें उफरांडून पाडलें

उफानगिरी, स्त्री० कों० उधळपट्टी

उफारटा, ३ लिं० उफराटा

उफाळ, ३ लिं० देणें, घेणें, इ० व्यवहारांत जितक्यास तितकें होऊन अधिक अवशिष्ट होतें जें द्रव्यादिक तो.

उफिटणें, उपिठणें

उफिणणें, कों० फणस, अननस, इ० फळ अति अधिक ल्यामुळें दुर्गंधि विशिष्ट होणें.

उबगणें, (ऊब) दाटी, भय, इ० कारणामुळें इतस्ततः हालायास नाहींसें झाल्यामुळें त्याउबेनें त्रास पावणें; २, ला० भय, लज्जा. इ० कारणानें यथेच्छ वर्तायास सांपडल्यामुळें त्या संकोचानें अंतःकरणांत मोडावला जाणें; मा० यं० प्र०; उ० मी उबगल्यें सासुच्या आतां मज माहेरा न्या हो.

उबजणें, (उबजा) उबजे तांदूळ इ० वयाजोगें भात संस्कृत करणें.

उबजा, पु० (ऊब) भातावर आधण घालून तें भात रवापरांत भाजून निववून कांडिलें असतां जो तांदूळ होतो तो.

उबट, ३ लिं० (ऊब) सूर्यकिरण. ज्वर. इ० संबंधानें स्वाभाविक जो थंडपणा तो जाऊन किंचित् उष्ण स्पर्श विशिष्ट झालेंजें उदक, शरीर, इ० पदार्थ तो, कि० तादृश त्याचा स्पर्श तो; २, उबटाणरूप जो वास तो. कि० तद्विशिष्ट जो धान्यादि पदार्थ तो

उबटणें, (ऊब·) केवल परिपक्व होण्याचे दशेस आलेलें नव्हे असा जो फणस, आंबा, इ० फळ तें काढून उबेस ठेविल्यामुळें, कि० कांहीं आभाळ येऊन झाडावरच ऊब्मा लागल्यामुळें पिकल्या सारिखें होणें; २, धान्य, पानें, इ० यद्दृ एकत्र दडपून ठेविल्यामुळें उबट होणें.

उबटाण, स्त्री० (उबट·याण·) आलीं पानें, फुलें, फळें, इ० एकत्र दडपून ठेविल्यामुळें, कि० धान्यपेंव इ० कांत ठेवल्यामुळें उबेचा योगानें वाईट येतो जो त्याला वास ती

उबणें, (ऊब·) वात संचार नाहीं अशा स्थलीं कांहीं फलपुष्पादि अचेतन पदार्थ, कि० मनुष्यादि जीव राहिल्यामुळें त्या उबेचा योगानें विकृत होणे, कि० व्यथित होणे.

उंबऱ्या, पु० कों० उंबरा प्रथमार्थी.

उंबर, पु० एक वृक्ष आहे; २, न० त्याचें फळ; उंबर फोडून केंबरें काढणें ह्म० लहानशा कामाचा धरिला जो अभिमान तो मोठ्या एखादे कामाचा विध्वंस करून तद्द्वारा नडीस नेणें; ३ पु० वायनादि द्यावयाकरितां भोंक न पाहितां करितात जो वडा तो; ह्म० भटो तुमचें पोट हो कां वांकडें तर त्यणाला उंबर राहिले त्यणजे झालें.

उंबरघाट, पु० (उंबरा·घाट·) प्रवासार्थ नियायाचे प्रसंगीं आपले द्वारचा जो उंबऱ्याचा प्रदेश त्यासच दुर्लंघनीयत्वें करून घाट असें मानून ह्म०.

उंबरठा, पु० (उंबरा·ठाव·) उंबऱ्याचे आसपासचा पासचा जो प्रदेश तो; २, उंबऱ्यासही कोणी ह्म०

उबरणें, रा० शरीरावरील क्षत; पावटा. इ० अपथ्य पदार्थ भक्षिल्यामुळें पू अधिक वाही असें होणें.

उबरा, अलिं० रा० (उबरणें·) जाचे भक्षणानें आंगावरील क्षत उबरतें असा जो पावटा. वाटाणा, भोंपळा, पोपया, इ० पदार्थ तो.

उंबरा, पु० द्वाराचे चवकटीचीं वरचें आणि खालचें अशीं दोन जी आडवीं लांकडें, कि० चिरे तीं प्र०; २, नगरादिकांतील गृहांची संख्या विवक्षित असतां गृहांसच ह्म०; उ० या शहरांत लाख उंबरा आहे.

उबलरव, अलिं० उबार प्रथमार्थावांचून.

उंबळा, पु० पिंगट वर्णाचा एक मुंगा आहे, जो प्रा० वृक्षावर असतो.

उबवरा, अलिं० (ऊब·) ऊब यथास्थित न जिरल्यामुळें चिकट चबचबीत जो भात, रिंवडी, इ० तो.

उबवलें, न० (उबावणें·) चहूंकडून वात संचार होण्यास जथें सोय नाहीं असत एव जे थें ऊब्मा फार होतो असें जें स्थल तें.

उबसाण, स्त्री० उबटाण.

उबळक, अलिं० देणें, घेणें, इ० व्यवहारींच्या ज इ० हिशेबांत गाळाव्या लागतात अशा जा वस्तु काल परत झाल्यामुळें रद पडल्या असतात जा कांहीं रकमा त्या प्र०.

उबार, अलिं० रोजस्वरूपावर पूर्वदिवशींनिघालेली

लेली शिलक दुसरे दिवशीं जमा धरितात ने थे सदरीं हा शब्द लिहितात; २, फाजिल.

उबारा, पु० (ऊब) कोणेक पदार्थ, स्थल, इ० कांचे अंगीं असतें जें ऊष्म वैशिष्ट्य तो.

उबावणें, (ऊब·होणें) उकडणे हिनीयार्थी.

उबाळूं, न० (ऊब·अबाळूं) उष्णकालीं उष्णाचा योगानें शरीरावर गळवा सारखी गांठ उठते तें.

उंबील, पु० उंबळा.

उबेणें, ग० उबणें.

उभगणें, कों० उबगणें.

उभट, वि० (उभा) उभारमथमार्थी.

उभड, पु० भूमि, शरीर, इ० कांतून क्षतादि झाल्यामुळें, अकस्मात् वेगानें उदक, रक्त, इ० कांचा मोठा निघतो जो प्रवाह तो; २, ला० रोदनाचा जो अनावारपणें गहिंवर येतो तो.

उभणें, (उभा·राहणें) पडत असतो जो पर्जन्य त्याणें विराम पावणें.

उभय, न० सं० द्वय; २, द्विशब्दार्थक उभय शब्द संस्कृत आहे त्याचा उत्तरपदाशीं समास झाला असतां असें रूप होतें; उ० दोन जे ब्राह्मण ते उभय ब्राह्मण, दोहींकडून जो भ्रष्ट तो उभयभ्रष्ट, दोन स्वामी जाचे ते उभयस्वामिक, उभयसनाक, इ०.

उभयतः, अ० सं० दोहोंकडून

उभयतःपाशारज्जु, स्त्री० सं० इकडे नदी, आणि इकडे वही, असें जें उभयतः संकट त्या स

स्थ०

उभयतां, वि० (उभय·सं०) दोघेजण.

उभयतोमुखी, स्त्री० सं० विते समयीं वत्साचें मुख मात्र बाहेर पडलें आहे अशा अवस्थेंतील जी गाय ती.

उभयत्र, अ० स० इकडे, आणि तिकडे, हें आणि तें अशीं दोन जीं स्थलें त्या दोनीं स्थलांचा ठायीं

उभयविध, वि० सं० दोहों प्रकारचा

उभयसाधारण, उभयसामान्य, वि० सं० पा० परस्पर विरुद्ध जे वादिपक्ष, प्रतिवादिपक्ष, इ० रूप दोन अर्थ त्या दोही कडे सारखा जाचा अन्वय तो; उ० कांहीं व्रतें स्मार्तांचीं कांहीं वैष्णवांचीं आहेत कांहीं उभय साधारण आहेत.

उभरंग, वि० फिका जो रंग, कि० तद्दिष्ट वस्त्रादि तो.

उभवण, न० (उभवणें) अंगावर पर्जन्य न पडावा म्हणून निवारणार्थ घेतात जें छत्री इरले, टोपी, इ० तें.

उभवणें, मार्गी जातानां वृक्षादिकांचे आश्रयास राहून पर्जन्य टाळणें; २, कों० वशिवलेलें जांतें घरट इ० भिंतीशीं उभें करून टेंकून देविणें, कि० वशिवलेले डोईचे केस उसकटणें

उभस्वना, स्त्री० कों० (उत्·भर्त्सना) दुष्कर्मादि मसिद्ध झाल्यामुळें कोणेकाची होये जी उपहास्यता ती.

उभळ, स्त्री॰ डांग्या रवोकला इ॰ रवोकल्याचा पोटांतून मोठा जो वेग येतो ती; २, पु॰ रा॰ कोणेक प्रिय मनुष्यादिकास भेटायासाठीं, किं॰ इष्टस्थळीं जावयासाठीं उत्कंठा-चिरकाल सांचल्यासुळें प्रेम रसासऊत आल्या सारिखा जो हृदयांत कांहीं विलक्षण अवस्था विशेष होतो तो; ३, उभळण्यानें पृथक् होतो जो कणांडा तो; ४, कों॰ उभड पथमार्थी.

उभळणें, कांहीं पिष्टमाय आणि कांहीं कणमाय असे जे कणीक, सांजा, कोंडा, कणी, इ॰ मिश्रित पदार्थ ते सुपाचे कांहीं विलक्षण व्यापारानें निरनिराळे करणें.

उभळेणें, (उभळ येणें) उभळ द्वितीयार्थीनें युक्त होणें.

उभा, २ लि॰ (उत्तभन सं॰) अडव्याचा प्रतिपक्षी; २, पादतलें भूम्यादिकांवर टेकून आपले शरीराचे उन्नतीचा संकोच न करितां स्थित जो मनुष्यादि तो; ३, सर्व अंगें यथायोग्य अन्वित होऊन प्रवृत्त होण्यास सज्ज झाला जो कोणेक व्यवहार तो, किं॰ पडलेला नव्हे प्रवर्तमानपणें स्थित जो तो; ४, गमन करीत असतां गमनाचा अटोप करून तसाच स्तब्ध राहिला जो मनुष्यादिक तो: उ॰ अवजार पाडून अंबळ महागिरी उभी करा तों बर मी येतों; ५, पिकलेलें परंतु न कापितां तसेंचे तसेंच भूमीवर स्थित जें भात, जोंधळा, इ॰ होत तो; ६, कोणेक कर्म करण्याविषयीं जो सिद्धतो; उ॰ कोणी व्यापारास उभा राहिला त्याजे मी किंमत सांगेन; कोणी कोणास उभें राहणें स्व॰ विवक्षित कर्मांविषयीं द्रव्यादि द्वारा सहाय होणें; उभा, दावा, द्वेष, वैर, इ॰ स्व॰ अतिशयित जो विरोध तो; उभें वर्ष, साल, संवत्सर, इ॰ स्व॰ आरंभापासून समाप्तिपर्यंत अवधें जें वर्ष तें; उभी दुपार. उभे दोन प्रहर, स्व॰ ऐन जो मध्यान्ह त्यास स्व॰.

उभाउभी, अ॰ (उभा॰ द्वि॰) कोठें कांहीं कामासाठीं गेलें असतां तेथें कांहीं बसल्यानें जो यत्किंचित् वेळ लागतो तोही न लावितां अशा त्वरेनें जाणें, येणें, करणें, बोलणें, इ॰ कांचें वि॰.

उभांग, २ लिं॰ (उभा॰ अंग) उभारपथमार्थी.

उभागत, २ लिं॰ (उभय॰ गत) उभारत.

उभातांब्या, पु॰ (उभा॰ तांब्या) एक आकार विशेषाचा तांब्या असतो तो.

उभादोरा, पु॰ धांवतादोरा.

उभार, २ लिं॰ (उभा॰ आकार) उंचवट जें पात्र, बांधलेलें पागोटें, इ॰ कांचा डोल, किं॰ तद्विशिष्ट तें पात्रादिक तो; २, पु॰ घोडयास दाणा चारितात त्यांतून कांहीं थोडासा दुसऱ्यानें चारायाकरितां काढून देतितात जो दाणा तो.

उभारणी, स्त्री॰ (उभारणें) उभारण्याचा व्यापार तो; २, आदत होंविला जो उंसाचा र-

स, दूध, इ० त्यांस जे अनेक वार कढ येतात ते म०; गुळाचें आधण इ०उभारणीस येणें, म० सिद्धसमीपावस्थेस येणें.

उभारणें, (उभा·उभार करणें·) स्तंभादिक उभा करणें; २, थपकट पणें स्थित जो धान्यराशि इ० पदार्थ तो उभा करणें; ३, कोणेक व्यवहार सामग्री संपादन द्वारा उभा करणें, कि० कोणेक व्यवहार करण्याविषयीं कोणेकास द्रव्यादि साहाय्यद्वारा उभा करणें.

उभारत, अ० (उभय·) अवांतर जे अनेक विभाग ते निरनिराळे न करितां तसेचें तसें राखिलेलें जें क्षेत्रादिक तो; २, विशेष धर्मीतें न आश्रयितां सामान्य धर्म पुरःसर कांहीं एक अर्थातें उद्देशून करितात जें भाषणादि तो; उ० या गांवचे लोक फार लबाड असें मी उभारत बोललों आणि तुलाच कां राग आला; ३, हेंच, कि० हेंच अशा प्रकारें विशेष प्रकारें करून निर्णीत न करितां सामान्यरूपें करून राखिली जी कांहीं एक गोष्ट तो.

उभासूळ, पु०(उभा·सूळ·) चढावास अवघड केवळ उभार असा जो घाट, कि० घाटी घास म०.

उभीरास, उभीरास, स्त्री० (उभा·रास·) विभाग मेज मापें, निवड, इ० न करितां तशीची तशीच ठेविलेली जी धान्यादिकांची रास ती.

उभें

उभें, न० वस्त्र सतासरी गुंडाळून ल्यावें असा एक स्त्रियांनीं वस्त्र नेसण्याचा प्रकार आहे नेस, लाव, वें, इ०धातुयोगीं म०

उभेउभ्यां, उभेउभ्यानीं, अ०उभ्याउभ्यां

उभेंदा, २लि० कों०(उभा·) उभार मथमार्थी.

उभ्याउभ्यां, उभ्याउभ्यानीं, अ०(उभा·हि०·) उभाउभी.

उमरखा, स्त्री० (उत्·मनीषा·) कोणेक भाषणादि कर्म करावयास उचित जो समय तो आला असतां तें कर्म आपण करावें असें अंतःकरण वृत्तीचें होतें जें उत्थान ती.

उमग, पु० कोणेक गोष्ट. कि० पदार्थ हा अमुक कि० अमुक ठिकाणीं आहे अशा प्रकारें होतें जें त्याचें ज्ञान तो; पड, धातुयोगीं म०.

उमंगणें, उमगणें, (उन्मज्जन·सं०·) कोणेक पदार्थ अमुक स्थलीं आहे, अशा प्रकारें जाणणें, कि० कोणेक अधिकरणीं अज्ञातपणें स्थित जो कांहीं एक अर्थ तो विवक्षित प्रकार वैशिष्ट्येंकरून जाणणें; उ० हें अक्षर अमक्याचें असें मी उमगीन; मला व्यसन आहे हें गुरूस उमगतां नये कामास.

उमज, पु० (उमजणें·) समज; २, कांहीं एक गोष्टीचा समज पडल्यानंतर त्या समजापासून जन्य अंतःकरणांत फलित होतो जो ज्ञान विशेष तो; उ० सर्व जीवांनीं पापास भ्यावें या गोष्टीचा समज पडल्यानंतर आपणही जीवच तस्मात् आपणही

पाप

पापकरतांनये कामा असा उमज पडतो.

उमजणें, (उन्मज्जन-सं०) कोणेक गोष्टीविषयीं जो उमज तद्विशिष्ट होणें.

उमट, उ० (उमटणें) गुसल्यामुळें थोंग लागन नकता जा अर्थाचा त्याची होते जी परिस्फुट ती, पड, धातुयोगीं म०; २, काहीं एकविकृतीमुळें वमन व्हावयाजोगा जो उबक येतो तो.

उमटणें, उदकादिकांत बुडून गुत. झालेला जो कांहींएक पदार्थ त्याणें त्यापासून वरयेऊन दृश्यता पावणें; २, छपवून ठेवलेलें जें दुष्कर्मादिक त्याणें प्रसिद्धतेस येणें; ३, वागिंद्रियानें वर्ण, शब्द, इ०, किं० तंतु वाद्यादिकानें स्वरादिक स्पष्ट समजाया जोगा उत्पन्न होणें; ४, लिपि, ठसा, इ० कागद इ० अधिकरणीं स्वच्छ अंकित होणें

उमठणें, उमटणें.

उमदा, वि० शौर्य, पराक्रम, रूप, तेज, इ० विवक्षित गुणांनीं सजातीयापेक्षां जो विशिष्ट, शिपाई, वक्ता, घोडा, रत्न, वस्त्र, औषध, इ० पदार्थ तो.

उमप, वि० उमापे.

उमर, स्त्री० वयोवस्था.

उमरठा, उ० उंबरठा.

उमरा, उ० उंबरा.

उमराव, उ० अमीर.

उमलणें, (उन्मीलन-सं०) पुष्पाची कळी विकसित होणें; २, सुरवल्यामुळें घट्ट झालेला जो मृत्तिका, पिंड, ध्यान्य, किं० वस्त्र, पात्र, इ० कांवरंचा मळ इ० त्याणें भिजल्यामुळें मृदुत्व पावोन विशकल होणें; वरचें खरकटें उमलेलें द्र० मग घांस, एथेंपक्षीं पात्रादिकांसही कर्तृता येते; ३, धान्यादिकानें लाही व्हावयाजोगें फुटणें; ४, सुवर्णादिकांचा अलंकार डांक न लावितां सांधायासाठीं त्या स्थलीं केवल क्षार लावून अग्निसंयोगानें द्रवविणे; ५, भिजत घातलेले पावटे, हरभरे, इ० दाणे सोलणें.

उमलें, न० (उमलणें) लाह्या करावया करितां पूर्वी भिजत घालून ठेवितात जें भात, जोंधळा इ० तें.

उमळ, स्त्री० (उमळणें) पित्तादिकानें सुटती जी मळमळ ती; २, उपळ मथमार्थी.

उमळट, न० रा० (उमळणें) भूमीस उपळ आल्यामुळें जो झरा लागतो तें.

उमळणें, (उन्मीलन-सं०) भूमीनें किं० विषारासुळें शरीरानें उपळीनें विशिष्ट होणें; २, पोटांतील कोंवळा जो गर्भ त्यास कांहीं उष्ण विकृति झाल्यामुळें तो पडणें; ३, पित्तादि विकृतीनें पोटांत मळमळणें; ४, फणस, अंबा, इ० फळ झाडावरच उबटणें.

उमळा, वि० रा० (उमळणें.) मळमळीत.

उमळावण, न० रा० (उमळणें) वमन होण्याचे पूर्वी मळमळावें, तोंडास पाणी सुटावें, अशी जी विकृति होते तें सुटणें, येणें

णें, धातुयोगीं प्र०.

उमा, स्त्री० सं० पार्वती.

उमाडा, पु० स्थलनिष्ठ जें उच्चता वैशिष्ट्य तो.

उमाड, स्त्री० कों० वायूचे योगानें उच्च लाटा उसळत असाव्या असा जो क्षुब्धपणा समुद्रादिकांस प्राप्त होतो ती.

उमाडा, पु० उभड.

उमाप, ३लिं० (उत्-माप०) परिमित जिनक्यास तितकेंच, असें नव्हे पाहिजे तितकें पुष्कळ असें जें कांहीं एक तो.

उमास, उमासा, पु० उमाळा.

उमाळा, पु० वमन पडायाचे पूर्वी पोटांतून वायूचे वेगानें अन्नादिकांवर होत्येजी उत्थिति तो; २, रोदन, विषवेग, इ० कांचा येतो जो झंदका तो.

उमाळी, स्त्री० उमाळा.

उमेद, स्त्री० कांहीं एक कार्य करण्याविषयीं अंगीं असतें जें अवसान ती.

उमेदवार, ३लिं० कांहीं धंदा, रोजगार, इ० काम आपण पतकरून वहिवाटीन अशी उमेद जाणें धरिली आहे तो त्या कामाविषयीं.

उमेदवारी, स्त्री० (उमेदवार०) उमेदवारपणा.

उमोप, ३लिं० उमाप.

उम्हळ, पु० (उम्हळणें०) उमाळा.

उम्हळणें, उमळणें.

उत्पास

उम्हास, उम्हासा, पु० कों० उमाळा.

उयला, पु० कों० पावटयाचा सोलाणा.

उर, न० सं० ऊर प्रथमार्थी.

उरकणें, कोणेक काम करून तडीस नेणें; २, द्रव्यादिक खरचल्यामुळें, किं० मनुष्यादि मेल्यामुळें नाहींसा होणें; याविषयीं कदाचित् सकर्मक ही प्रयोग होईल.

उरग, पु० सं० सर्प.

उरणें, (उर्वरित-सं०) अवशिष्ट राहणें.

उरता, स्त्री० (उरणें०) आक्षेप द्वितीयार्थी; २, कोणेकाची फजिती, पारिपत्य, इ० उरतें न करितां भीड इ० कारणामुळें त्या त्या कृतींत कांहीं राखितात जो अंश, निषेधविषयीं प्र०; उ० मी बोलत नाहीं तों, बोलूं लागलों तर कोणाची उरता देवणार नाहीं.

उरता, ३लिं० करणें धातुयोगीं प्र०, अर्थ, देयजें कृणादिक त्यांतून कांहीं देऊन कांहीं अवशिष्टपणें राखणें.

उरफाटणें, उफराटणें.

उरफाटसुरफाट, ३लिं० उफराटसुफराट.

उरफाटा, ३लिं० उफराटा.

उरफाटासुरफाटा, ३लिं० उफराटसुफराट.

उरफोड, स्त्री० (उर०फोडणें.) उरस्फोड.

उरपणें, उरबणें, घोडा, बैल, इ० कानें अतिश्रम केल्यामुळें उरीं फुटणें.

उरमाल, पु० रुमाल.

उरस्थल, न० सं० वक्षमदेश तें.

उरस्फोड, स्त्री० (उर०फोडणें०) कांहींएक

काम

काम, कि० विद्यादिक यथास्थित समजून द्यावया करितां उरांत रक्त पडावा जोगा फार श्रम करावा लागतो ती.

उराड, न० (उर०) निंदा, कि० जर्जरपणा वर्णावाचा असतां प्रसंग विशेषीं उगासच रा० .

उरूबरू, उरूबुरू, अ० समक्ष; २, स्त्री० समक्षता.

उरूस, पु० पिराचा प्रतिवर्षी मृतदिवशीं जो उत्साह करितात तो, कि० तत्संबंधी जी जत्रा तो.

उरोज, उ० सं० स्तन.

उर्जा, स्त्री० ऊर्जा.

उर्मट, उर्मठ, वि० (उन्मत्त सं०) स्वभावें करून जो उन्मत्त तो.

उर्वरित, वि० सं० अवशिष्ट.

उर्वी, स्त्री० सं० पृथ्वी.

उलकटणें, कों० कोणीएक पदार्थ शोधून काढणें इत्यादर्थ कमानें लागलीं जीं पुस्तकें इ० रचित जो काष्ठादिकांचा ढीग त्यांची उलटापालट करणें.

उलरवणें, (उत्० लारव० येणें) पोटीं लारव घालून केलेला दागीना आंतील लारव दिसावयाजोगा झिजणें.

उलगडणें, (उ० लगटणें० उद्घाटन०) गुंडाळून घडी करून ठेविलेलें जें वस्त्रादिक, कि० एकेठायीं गुंतून राहिलेलें जें सूत, दोरी, केस इ० तें मोकळें करणें; २, पंचाईत हिशेब, इ० निर्वाह्य जें कांहीं खटलें तें निर्वाहित करणें; २, कोणेक लग्न, मुंज, इ० जें मोठें कार्य तें उरकणें; ४, उलगणें पहा मार्थी.

उलगडा, पु० (उलगडणें०) वाद, पंचाईत, हिशेब, कूट, इ० कांचा उलगडण्यानें होतो जो निर्वाह तो.

उलगणें, (उ० लाग०) कांहीं पदार्थांची झालेली जी सुगीती समाप्त होणें; एथें त्या पदार्थासही पक्षी कर्तृता येते; २, लग्न, मुंज, इ० मोठें कोणेक कार्य होऊन संपणें.

उलगाघाल, स्त्री० (उलगडणें० घालणें०) उठाठेव.

उलगामालगी, स्त्री० (उलगणें०) कोणेक गोष्टीची उलगून जी समाप्ति.

उलट, पु० स्त्री० (उलटणें०) शांत झालेला जो रोग, सांत, शत्रु, दुष्काळ, पर्जन्य, देव, इ० त्याची पुनः जी उत्थिति; खाणें धातुयोगीं प्र०; २, रहाट, दोरी, सूत्र, इ० कांस फिरवून, कि० पीळ घालून सोडिलें असतां त्या संस्कारामुळें तद्विपरीत प्रकारें जें त्याचें परिभ्रमण होतें तो; ३, उपकार, अपकार, शिवी, कानें, आदर, मान, इ० जिकडून आपल्याकडे आले असतात त्यांची पुनः आपल्याकडूनच तिकडे जी गति तो ती; ४, वांति; ५, अ० जें जा प्रकारें झालें असें असतें तें त्या प्रकारें नव्हतां तद्विरुद्ध प्रकारें; उ० मी तुज पाशीं कांहीं देशील त्यणून आलों आणि तूं कांहीं न देतां उलट माझेंच कांहीं घेऊं पाहतोस; ६, कोणेकानें कोणेकास उद्देशून शिक्षा उप-

देश, थट्टा, इ० रूप केलें जें भाषण इ० त्याजवर तो दुसरा त्यास लागायाजोगें मनुष्यनर्माण करितो जें भाषण इ० त्याचें वि०; उ० यापोराला कोणी कांहीं बोललें असतां उलट जाबसाल करितो; त्याणें तिकडून दगड मारितांच मी इकडून उलट दगड मारिला.

उलटकर, २ लिं० अंमळ धका लागला असतां उलटायाजोगा बसलेला जो दगड लांकूड, इ० तो.

उलटणी, स्त्री० (उलटणें) एकदां मेजलेलें जें धान्यादिक तें पुनः पायली, अधोली, इ० मापानें मेजून दुसरीकडे टाकण्याचा जो व्यापार तो; २, क्वचित् पहिल्यानेंही.

उलटणें, भूम्यादाधारावीं जो अंगे आश्रयून राहिलेला जो भाषणादिपदार्थ तो तें अंग त्या आधारावीं विश्लिष्ट होऊन दुसरें अंग आधारा भिमुख होई अशा प्रकारें चलित करणें; २; जा स्थितीनें कोणेक कार्याचेठायीं विनियुक्त झालेला, किं० रचनेचाठायीं संबद्ध झालेला जो कांहीं पदार्थ तो तद्विपरीत स्थितीनें विशिष्ट करणें; उ० पागोट्यास दोहों कडून गोल असला त्यणजे उलटून बांधावयास येतें; २, एकवार मेजलेलें जें धान्यादिक तें पुनः मेजणें; ४, कराया चें अशा दशेतें अवलंबून पडलेलें जें कांहीं कार्य तें करून केलें गेलें अशा दशेतें पावविणें; उ० हें सारें लिहिणें पडलें आहे हें उलटायास मला दोन महिने पाहिजेत; ५, एकवार करून नडीस नेलेलें काम पुनः कांहीं कारणास्तव करून शोधवास नेणें; ६, कोणेकानें घातलेली पुरशीस, कूट, हिशेब, भरभ, इ० त्या त्या युक्तीनीं निर्वाहित करणें; ७, कोणेकानें यद्दिशाभ्रछेदें करून आभिमुख्य, किं० गति धरिली असल्या तें सोडून तद्विपरीत दिशाभ्रछेदें करून आभिमुख्य किं० गतीतें धरणें; ८, शांत झालेल्या रोगादिकानीं उलट खाणें; ९; न० कों० शेताचें खतें इ० कांचाठायीं धान्य मोजाया करितां सरासरी अटकळीचें पांटी इ० माप करून ठेवितात तें.

उलटपालट, स्त्री० उलटापालट.

उलटसुलट, २ लिं० उलटासुलटा.

उलटा, २ लिं० (उलटणें) विवक्षित स्थितीहून विपरीत स्थितीनें स्थित जो कांहीं पदार्थ तो; २, उलट षष्ठार्थी; ३, अ० उलट पंचमार्थी; ४, उतारा द्वितीयार्थी.

उलटापालट, स्त्री० (उलटणें · पालटणें) जा स्थितीनें कोणेक पदार्थ रचून ठेविला आहे तो तेथून उलटून तद्विरुद्ध स्थितीनें, किं० तद्वितर स्थलीं रचून ठेवावा असा, किं० इकडचा तिकडे, तिकडचा इकडे ठेवावा असा जो व्यापार तो.

उलटापालटा, २ लिं० (उलटणें · पालटणें) उलटासुलटा.

उलटासुलटा, २ लिं० (उलटा · सुलटा) अनुलोम विलोम, किं० इकडचा विभाग तिकडे, तिकडचा विभाग इकडे, असा हो

ई असा केला जो तो.

उलटी, स्त्री० (उलटणें) वांति; २, कोणेक पदार्थ उलटून पूर्वस्थितीवर येई इतका जो त्यास परिभ्रमणरूप संस्कार ती; रवा, मार, दे, घे, इ० धातुयोगीं प्र०.

उलटून, अ० (उलटणें) उलटपंचमार्थी.

उलंडणें, कलंडणें.

उलँडी, स्त्री० (उलंडणें) होडी पाण्यांत उलंडूं नये म्हणून तिला एके अंगास बावरवडांचे टोंकास जें पाण्यांत एक लांकूड बांधितात ती.

उलणें, भूमि, शरीर, फल, इ० गर्भाशयाचा नेटामुळें बहिर्भागीं विदीर्ण होणें.

उलथ, स्त्री० कों० उलथी.

उलथणें, (उत-तल) भाकर, गोंवरी, इ० पदार्थ जा अंगें तवा इ० आधारास धरून राहिला असतो तो त्या अंगें तेथून सोडवून विपरीत करणें; २, उलटणें चतुर्थार्थी; ३, कोणेकानें तटकर मरणें; उ० एवढा बाप्या पटकीनें होहां म्हणतां उलथला; ४, न० भाकर इ० तव्यावरून उलथायास साधन लोहादिकाचा पदार्थ विशेष असतो तें.

उलथा, २ लिं० (उलथणें) पालथ्याचा प्रतिपक्षी; २, पु० उलथणें; ३, धान्यादि कांडत्या समयीं उखळाचे तळीं जें कांडित्या वांचून धान्यादि राहतें तें कांडलें जावें म्हणून खालचेवर वरचें खालीं असें करण्याचा जो संस्कार तो.

उलथा

उलथापालथ, स्त्री० (उलथा-पालथा) उलथा असेल तो पालथा, पालथा असेल तो उलथा असें करण्याचा जो व्यापारती.

उलथापालथा, २ लिं० (उलथा-पालथा) अंशतः उलथा आणि अंशतः पालथा अशा अनेक स्थितीनें जो स्थित तो.

उलथी, स्त्री० (उलथणें) उलथण्यानें जो परिवर्तनरूप संस्कार ती; रवा, दे, घे, इ० धातुयोगीं प्र०.

उलफा, पु० ब्राह्मणादिकांस भोजनार्थ देतात जें तांदूळ, डाळ, इ० पाक साहित्य तो.

उलागीर, २ लिं० कों० संसारादि कृत्याकडे विनियुक्त जे पदार्थ तद्दितर जे अप्रयोजकपणें गृहादिकांस पडले असतात जे पदार्थ ते प्र०.

उलाढाल, स्त्री० एकाचें कर्जे काढून दुसऱ्यास द्यावें, कोणेकास जामीन राहावें, कांही जिन्नस खरेदी करून विकावें इ० रूप अनेक प्रकारचीं जीं खटलीं त्यास म्ह०.

उलिसा, २ लिं० इवलासा.

उलूक, पु० सं० घुबड म्हणून पक्षी आहे.

उलेंढालें. न० उलाढाल.

उल्का, स्त्री० सं० आकाशांतून अग्निरूप जो तारा पडतो ती; उल्कापात इ० स०; २, [illegible]मुक.

उल्बण, न० सं० शरीरांतील वात, पित्त, इ० कांचा प्रकृत्यवस्था सोडून जो क्षोभ तें; २, देश, ग्राम, सहस्रावधि माणसें इ०

कांचा

कांचा नाश व्हावयाजोगे अतिवृष्टि, अवृष्टि, वादळ, सांत, स्वचक्र, परचक्र, इ० जे अनर्थ त्यास उ०.

उल्मुक, न० सं० पेटलेलें लांकूड, गोंवरी, इ० तें,

उल्लंघ, पु० सं० अतिक्रम.

उल्लंघणें, (उल्लंघन-सं०) अतिक्रमणें.

उल्लंघन, न० सं० अतिक्रमण.

उल्लंघित, वि० सं० उल्लंघन केलें जाचें तो.

उल्लसित, वि० सं० हर्षयुक्त किं० सुशोभित तो.

उल्लास, पु० सं० कांहीं मनासारिखें झाल्यामुळें अंतःकरण प्रफुल्लित होऊन सुखोदयरूप जो भाव उठतो तो; उ० यं० अर्धाच शरदाचा उल्लास त्यांत पातला फाल्गुन मास.

उल्लासणें, (उल्लसन-सं०) उल्लास युक्त होणें.

उल्लासी, वि० सं० निरंतर उल्लासयुक्त असण्याचा स्वभाव जाचा तो.

उल्लू, वि० मद्यादिकाचे मदानें, किं० कामक्रोधादिकांचे क्षोभानें जो बेशुद्ध झाला तो; २, अविचारानें भलत्याचभरी भरावें अशा स्वभावाचा जो मनुष्य तो.

उल्लेख, पु० सं० कोणेक गोष्टीचा भाषणप्रसंगीं अंशतः ईषन्मात्र जो उच्चार, किं० लेखनप्रसंगीं तादृश लेख तो.

उल्हास, पु० उल्लासाचा अपभ्रंश.

उल्हासणें, उल्लासणें.

उल्हासी, वि० उल्लासीचा अपभ्रंश.

उंवला, पु० ग० पाचटे, हरभरे, इ० कांचा जो सोला तो.

उंवळ, उवळ, वि० (उ० वळणें०) भरपूर जितका पीळ असावा तितका जा मध्यें नाहीं असा दोरी, सुंभ, सूत, इ० तो.

उंवळणें, उवळणें, (उ० वे० वळणें०) सूत, सुंभ, दोरी, इ० कानें पीळ रहित होणें, किं० अंबा, फणस, इ० फल पाडास नयेतां कांहीं विकृतीनें पिकल्यासारिखें होणें.

उंवळा, वि० रा० (उं० वळणें०) उंवळ; २, विवक्षित मिष्टता जांत नाहीं अतएव स्वादलें असतां मळमळीत लागतें असा जो अंबा, फणस, इ० तो; ३, ला० अळणी जें भाषण, मनुष्य, मुद्रा, इ० तो.

उवाप्यास, अ० (उर्वरित-सं०) कांहीं पदार्थानें अवश्य निर्वाह्य जें कार्य त्याचा निर्वाह होऊन तो पदार्थ कांहीं उरणें; ये, धा० प्र०.

उवीळ, वि० (उ० वळणें०) उवळ.

उवेरा, वि० (ऊ०) जाचे डोयींत उवा फारपडतात असा मनुष्य. किं० त्याची डोयी तो.

उशागत, न० (उसें० गात०) पलंग इ० शय्येचा जिकडे उसें करायाचें तिकडील जो प्रदेश तें; २, ला० कोणेक क्षेत्राचा उर्ध्व प्रदेशाकडील पर्यंत जो अवधि प्रदेश तें.

उशिरां, अ० (उशीर०) फार विलंब करून अतिकाळीं.

उंशी, उशी, स्त्री० (उच्छीर्षक-सं० वस्त्रादिकाचे पिशवींत कापूस इ० भरून निजतानां मस्तकाखालीं देवायास जो साधन

भूत

भूत पदार्थ करितात ती.

उँशीत, न॰ रा॰ (उन॰शीत॰) असून.

उशीर, पु॰ अतिकाल; २, विलंब; उ॰ अरे असून भोजनास किती उशीर आहे.

उँशील, न॰ ग॰ (ऊंस॰) ऊंस लाविलेलें जें शेत तें.

उश्राप, पु॰ उच्छापाचा अपभ्रंश.

उश्वास, पु॰ उच्छ्वासाचा अपभ्रंश.

उश्शाप, पु॰ उच्छापाचा अपभ्रंश.

उषःकाल, पु॰ सं॰ पहाटेचा पांच घटकांगत्री पासून तीन घटिका रात्र राही पर्यंत जो काल तो.

उषःपान, न॰ सं॰ उषःकालीं नित्य नियमानें उष्णादि निवृत्यर्थ उदकपान करावें असें वैद्यशास्त्रांत सांगितलें आहे तें.

उष्टरखाना, पु॰ उंट बांधावयासाठीं जें स्थल केलें असतें तो. कि॰ तो सारा कारखाना तो.

उष्टवड, उष्टवळ, स्त्री॰ उष्टावळ.

उष्टा, वि॰ (उच्छिष्ट॰सं॰) उच्छिष्ट; २, भोजन, कि॰ उपहार केल्यानंतर आंचवल्या वांचून स्थित जो पुरुषादिक, कि॰ ज्याचा उष्ट्यानें लिप्त हात, तोंड, इ॰ अवयव तो; उष्टा होणें, स॰ ईष-मात्र भोजन संस्कार करणें.

उष्टापाष्टा, उष्टामाष्टा, वि॰ (उष्ट॰सोप॰) उष्टा इ॰रूप जो अशुचि अन्नादिपदार्थ, कि॰ मनुष्यादि तो.

उष्टावण, न॰ (उष्टावणें॰) अन्नप्राशन.

उष्टावणें, (उष्टा॰करणें॰) उष्टाकरणें.

उष्टावळ, स्त्री॰ (उष्टें॰आवलि॰सं॰वळ॰प्रा॰२) भोजन केलेल्या स्थलीं जो उच्छिष्ट अन्नादिकांचा पसारा पडतो तो.

उष्टाविटाळ, पु॰ उष्टा जो मनुष्य, कि॰ अन्न त्याचे स्पर्शानें होतो जो विटाळ तो.

उष्टीपत्रावळ, स्त्री॰ (उष्टी॰पत्रावळ) अनेकांनीं उपभुक्त व्यभिचारिणी जी स्त्री तीस ल॰.

उष्टीहळद, स्त्री॰ विवाह समारंभांत नवरीकडील नवऱ्याकडेस येत असतां जी तीचे अंगास लागून अवशिष्ट तैलयुक्त हळद ती.

उष्टें, न॰ (उष्टा॰) जाजवर भोजन केलेंतें पत्रावळ इ॰पात्र, कि॰ त्यावरील अवशिष्ट अन्न तें.

उष्ट्र, पु॰ सं॰ उंट.

उष्ण, वि॰ सं॰ अग्नीचा, कि॰ तत्सजातीय जो स्पर्श तो, कि॰ तद्दिष्ट अग्न्यादि द्रव्य तो; २, जीचे भक्षणादि संबंधानें शरीरादिकांस अग्निसंबंधानें जशी विकृति होत्ये तत्संजातीय विकृति होत्ये असा जो मिरीं, चित्रक, सुंठ, इ॰ पदार्थ तो; ३, न॰ उष्णौषधादि भक्षण, उपवास, इ॰ निमित्तानें शरीरांत जी शीत प्रतिपक्षी विकृति होत्ये तें; ४, उष्ण प्रधान जो वायु, रोग तो उष्ण वायु, उष्णज्वर, इ॰ स॰; सूर्याचा भूम्यादिकांवर पडतो जो तेज॰प्रसर तें.

उष्णता, स्त्री॰सं॰ शरीराचेठायीं उष्णरूप जी विकृति ती; २, उष्णपणा.

उष्णा, ३लिं॰उसणा.

उष्णोंवाण, न॰उसनेंवाण.

उष्मा, पु॰सं॰ ग्रीष्मऋतु इ॰संबंधानें होनोजो दाहा तो.

उसकटणें, रचून जुळून ठेविलेला जो कागद, केश, तृण, वस्त्र, पर्ण, इ॰कांचा समुदाय त्याचा रचालचे अवयव वर, वरचे खालीं, इकडचा तिकडे, तिकडचा इकडे, अशा प्रकारें व्यस्त करणें, किं॰ अनेक अवयव एकत्र जडून विशिष्ट केलेला जो घडयाळ. चाप, इ॰ पदार्थ तो विश्लिष्टावयव करणें.

उसकटाउसट, स्त्री॰ (उसकटणें॰हि॰) उसकटल्यानें होनोजो अस्ताव्यस्तपणा ती; किं॰ कांहीं एक पदार्थ उसकटण्याची खटपट ती.

उसण, स्त्री॰ मोठें ओझें उचललें इ॰ निमित्तानें मान, पाठ, कंबर, यांचे शिरेस आंचका बसल्यासुळें इतस्ततः हलल्यानें कळनिघायाजोगी जी विकृति होये ती

उसणवार, ३लिं॰उसनवार.

उसणवारी, स्त्री॰उसनवारी.

उसणा, ३लिं॰उसना.

उसणेंवाण, न॰उसनेवाण.

उसंत, उसंथ, स्त्री॰ एक कार्य करीत असतां त्यांतच कार्यांतर करायास थोडासा सांपडतो जो अवकाश ती.

उसंधि, स्त्री॰कों॰ कांहीं एक कार्य करीत असतां त्यामध्यें तदितर कार्य करण्याविषयीं मिळतो जो अवकाश ती.

उसनवार, ३लिं॰ (उसना) उसना अशाप्रकारें दिला, किं॰ घेतला तो.

उसनवारी, स्त्री॰ (उसनवार) उसनवारपणानें द्रव्यादि द्यावें घ्यावें अशी जी रीति; २, त्या रीतीनें होतें जें ऋण ती.

उसना, ३लिं॰ आपल्यास जा द्रव्यादि पदार्थांची गरज लागल्ये तत्सजातीय पदार्थ कोणेकास कालांतरीं द्यावयास करून व्याजबाद, इ॰ बोली बांधून त्यापासून घेनात जो तो द्रव्यादि पदार्थ तो; सावकारलोक गरज लागली असतां एकामेकास द्रव्य व्याजानें देतात घेतात तेथेंही उसना असा व्यवहार आहे; २, ला॰ त्याच्या व्यवहाराचा पोटागीनें अभिमान न धरितां उदासीनपणें वागणारा जो कोणीएक त्यास, किं॰ त्याचें तदनुरूप जें भाषण, कर्म, इ॰ त्यास लघु.

उसनेवाण, न॰ (उसना·वाण) दुसऱ्यानें आपल्यास दिलें असतां आपणही त्यास देऊन फेडिलें पाहिजे असाजो अहेर, किं॰ प्रत्युपकार, सापेक्षउपकार, अपकार, इ॰ त्यास लघु.

उसपणें, (उत्·सर्पण·सं॰) उपसणें.

उसपा, पु॰उपसा.

उसपाभर, स्त्री० उपसाभर.

उसंबणें, रडयाचा आवेश न आटपल्यामुळें हुंदके निघत अशा अवस्थेनें युक्त होणें.

उसरीं, अ० उशिरां.

उसरी, स्त्री० कालांतरीं पाहिजे तेव्हां भाजी इ० करायासाठीं चिरून वाळवून ठेवितात जी अळवाचे देंठ, गाजरें, वांगीं, इ० तीं.

उसवणें, (उ-वे-शिवणें) शिवलेलें जें वस्त्रादिक तें दोरा काढून शिवणीनें विमुक्त करणें. कि० तो दोरा काढणें; २, रा० सुजलेला अवयव सुजीनें रहित होणें, कि० ती सूज निघणें.

उसळ, स्त्री० (उसळणें) दाळ, कि० सगळे दाणे शिजवून भक्षणार्थ सिद्ध करितात ती.

उसळणें, (उच्छलन-सं०) भूम्यादाधारावर वेगानें आघात पूर्वक पडला जो जलादि पदार्थ तो भूम्यादिकांचा सत्याघातानें, कि० इतर कांहीं आघात बसल्यामुळें, कि० अग्नितापादि संयोगानें उडणें; संभव असतां उडवणें या अर्थीही स० होतो; २, उदकांत, कि० समुदायांत स्थित जो मनुष्यादि पदार्थ त्याणें उडी मारल्या सारखें तटकर उदकादिकांतून उडणें; ३, कोणेकानें भाषणादि प्रसंगीं शांति सोडून अकस्मात् क्रोधावेशानें विशिष्ट होणें; ४, झाड, शेत, मनुष्य, इ० कानें हलोहाल वाढणें; ५, भाजी, डाळ, पावटा, इ० दाणे, इ० फोडणीस टाकून शिजविणें.

उसळपा, पु० रा० आळायाचें फोडलेलें जें लोकूड तें.

उसळा

उसळा, २ लिं० (उसळणें) उसळून भक्षायोग्य सिद्ध केला जो पोहा, पावटा, इ० तो.

उसळी, स्त्री० (उसळणें) कोणेकाची तटकर उसळून जीवर उत्थिति ती; खा, मार, इ० घातयोगीं प्र०; २, कोणेक गोष्ट घटनेस आणायासाठीं घाटा घाटीचें भाषण करीत असतां कोणी एक हा प्रकार मला सर्वथा मान्य नाहीं इ० रूप स्वमतिकुल्याचा तटकर करितो जो आविष्कार ती.

उसाण, उसान, न० उधान; २, नद्यादिकांस जो अतिशयित पूर येतो तें.

उसार, पु० पात्र, गलबत, घर, इ० स्थलीं कांहीं पदार्थ समाविष्ट होऊन कांहीं पदार्थ समाविष्ट होण्यास उरला असतो जो अवकाश तो.

उसास, पु० उच्छ्वासाचा अपभ्रंश.

उसासा, पु० (उच्छ्वास-सं०) खेदादिकानें जो मोठा सुसकारा टाकितात तो.

उसाळी, स्त्री० उसळी.

उसुलवार, २ लिं० कों० वाटाळू.

उसू, २ लिं० कों० (उच्छ्वास-सं०) घट्ट अवान बसतां कांहीं फटीनें युक्त राहिलेलें जें कवाड, दादा, गुडदी, इ० तो.

उसें, न० (उच्छीर्षक-सं०) उशागत; २, निद्रार्थ शय्येवर टेंकण्याचे प्रसंगीं मस्तकासचे स्थ०; ३, निद्रासमयीं मस्तक टेंकायास घेतात जें उशी, गिरदी, इ० तें; कोणेकाचे मांडीचें उसें करणें. प्र० आपल्या सांभाळाचा

सर्व

सर्व प्रकारें त्याजवर विश्वास ठेवणें.

उसेंगत, न॰ उशागत.

उस्तरणें, घराचर जें तृणादिक आच्छादन असतें तें घराबरून काढणें, कि॰ गृहादि आस्तरण रहित करणें; २, उसरणें पहा मार्थी.

उस्तवारी, स्त्री॰ गृह, क्षेत्र, ग्राम, पशु, इ॰कांस जा जा समर्थी जो जो उपचार पाहिजे तो तो त्या त्या समर्थी करून बिघडूं नदेतां उत्तम प्रकारचे स्थितींत राखण्याचा जो प्रकार तो.

उस्सें, न॰ को॰ सुंजुक सुंजुक.

उस्साप, पु॰ उश्राप.

उस्वास, पु॰ उश्वास.

उहुं, अ॰ कोणी कांहीं विचारलें असतां नको, कि॰ नव्हे अशा उत्तराचें वाचक.

उहू, पु॰ (ऊह॰ सं॰) कांहीं एक कार्यार्थ रचितात जो विभु तो; उ॰ रात्रीं जाऊन घरवेदून त्याला धरावें असा उहू रचला आहे; २, सामान्य रीतीनें अनुलक्षून कांहीं वाक्य समुदायादि रचिलें असतें तेथें कांहीं विशेषार्थ प्रकट झाला असतां त्या विशेषानुरोधानें एकवचन स्थानीं अनेकवचन पुल्लिंग स्थानी स्त्रीलिंग अमुक इ॰ शब्दस्थानीं कृष्ण विष्णु, इ॰ विशेषनाम इ॰ची योजना करावी लागते तो; उ॰ यज्ञोपवीत धारण करावें हें सामान्य वचन एथें दोन यज्ञोपवीतें आहेत तर यज्ञोपवीतें धारण करावीं असा उहू केला पाहिजे; ३, क्रियापदाचे उपक्रमार्थ तत्संबंधी मूलभूत शब्दाचा जो प्रयोग तो; उ॰ मी आपण होऊन उहू काढणार नाहीं तुम्ही उहू काढा म्हणजे मी मध्यस्थपणें बोलेन.

उळकंवणें, रा॰ कांहीं पदार्थ अधांतरीं लोंबत राही असा वरील आधाराशीं संबद्ध करणें.

उळकंवा, पु॰ ओळकंवा.

उळग, न॰ उलिग.

उळगाऊ, उळगीऊ, वि॰ (उळग॰) अहेराऊ.

उळा, पु॰ हवाला.

उळीग, न॰ अहेर परंतु नदेतां उपाय नाहीं त्यणून दिला पाहिजे असा भाव असतां प्रा॰ वारणें, फेडणें, इ॰कांचे योगीं म॰.

ऊ, स्त्री॰ (यूका॰ सं॰) षट्पद स्वेदज एक क्षुद्र जंतु आहे जो प्रा॰ डोईचे केसांत, कि॰ मलिनवस्त्र इ॰कांत पडतो ती.

ऊँ, स्त्री॰ ऊ; २, अ॰ आं.

ऊँः, अ॰ कोणी कांहीं केलेलें बोललें इ॰ मनास न आलें असतां असें नव्हे, कि॰ हें नव्हे एतद्वाक्य प्रयोग स्थानीं वाचा उच्चार; २, कदाचित् आपले हातून असावधपणामुळें असमंजस गोष्ट होत्ये आणि पटकरध्यानावर येतो तेव्हां हा उद्गार निघतो.

ऊँट, पु॰ न॰ उंट.

ऊँटकटारी, ऊटकटारी, स्त्री॰ उंटकटारी.

ऊठपाय, अ० क्रि० (उठणें-पाय) उठल्या-बसल्या; उ० तूं उठपाय त्याचे घरीं कां जातोस.

ऊठबशी, स्त्री० (उठणें-बसणें) उठावें पुनः बसावें पुनः उठावें असा जो व्यापार ती.

ऊड, स्त्री० क्रि० खिडकी इ० कांतून उजेड पुरेसा पडावा म्हणून आंतल्या बाजूस उत्तरोत्तर पसरट आकार करितात ती.

ऊत, पु० (उतणें) अग्नीवर ठेवलेलें जें दूध, तूप, कढी, इ० पदार्थ कढूं लागला म्हणजे बाफेचा योगानें जो वर उचलला जातो तो, किं० ती दशा; २, ला० संपत्त्यादिकांची जी पराकाष्ठेची उत्कर्ष दशा तो; ३, रडण्याचा अतिशयित पणे अनावार जो गंहिवर येतो तो.

ऊद, पु० एक सुगंधि ओषधीचा चीक आहे जो धूपार्थ जाळितात तो; २, न० कांडेशोर म्हणून जनावर तें.

ऊन, न० (उष्ण-सं०) उष्ण चतुर्थांशी; २, वि० उष्ण मथमार्थी; २, सं० उणा; एकानें जो ऊन तो एकोन, पादोन, अर्धोन, इ० स०.

ऊनपाऊस, पु० (ऊन-पाऊस) ऊन पडलें असतां जो पाऊस पडतो त्यास म्ह०.

ऊनित, वि० सं० कोणेक संख्यादिकानें जो उणा केला असा जो अंक राशि इ० तो; पांचानीं जो ऊनित म्हणजे पांच जोन कमी केले तो पंचोनित, दशोनित, इ० स०.

ऊन्ह, न० ऊन.

ऊब, स्त्री० आवृत वात संचार रहित जो प्रदेश तेथें, किं० शरीरादि पदार्थांचे ठायीं स्पर्शी वेद्य असत्ये जी उष्णता ती; २, शिजत ठेविलेल्या पदार्थापासून निघत्ये जी उष्ण बाफ ती; ३, ला० पदरीं जो द्रव्य संग्रह त्याचा असतो जो आपत्त्यास आश्रय त्यास म्ह०.

ऊर, पु० (उर-सं०) पोटावरचा आणि गळ्या खालचा पुढले अंगचा जो शरीर प्रदेश तो; कोणेकाचे उराबर कोणेकानें असणें म्ह० त्याणें कांहीं मनस्वीपणानें अन्याय्य केल्यास त्यास शिक्षा करणें, याचे अधिकारीं असणें; कोणेक काम उराबर बसणें, म्ह० अवश्य निर्वाह्यत्वें करून उपस्थित असणें; २, स्त्री० (उरणें) उरताद्वितीयार्थी; ३, कोणेक पदार्थ विवक्षित कार्यास पुरून उरावा अशी जी त्या पदार्थावर अवस्था येत्ये ती; उ० इतकें आवण एवढ्या खांचरास पुरणार नाहीं असें वाटत होतें, परंतु पुरून ऊर आली.

ऊरु, पु० सं० मांडी.

ऊर्जा, स्त्री० सं० मा० उत्साहारी या अर्थी.

ऊर्जित, न० स० दारिद्र्यादि विपत्ति दशा जाऊन उत्तरोत्तर वर्धमान जी संपत्त्यादि सुदशा प्राप्त होत्ये तें; ऊर्जित होण्याचा

ज्या ओ काल तो ऊर्जितकाळ, ऊर्जितदशा. इ० स०.

ऊर्णा, स्त्री० सं० शाल, घोंगडी, इ० वस्त्रें जीचीं होतात अशी जी मेषादिकांची लोंकर. किं० तें शाल, घोंगडी, इ० वस्त्र तीं.

ऊर्ध्व, अ० सं० उपरि.

ऊर्ध्वदेहिक, न० और्ध्वदेहिक.

ऊर्ध्वदृष्टि, वि० सं० वरडोळ्या.

ऊर्ध्वरेतस्क, ऊर्ध्वरेता, वि० सं० भगवत्प्रसादानें, किं० योगादि साधनानें कदापि जाचें रेतस्खलन होऊं नये अशी सिद्धि जास झाली असते तो पुरुष.

ऊर्फ, वि० प्रसिद्ध; मास इ० पदार्थांचीं प्रसिद्धाप्रसिद्ध जीं अनेक नामें असतात त्या मध्यें एक नाम घेऊन विशेष प्रसिद्धीस्तव दुसरें नाम घ्यावयाचें असतां तत्पूर्वी याचा प्र०; उ० माहे मोहरम उर्फ चैत्र.

ऊंस, पु० (इक्षु सं०) एक वनस्पति विशेष आहे जाचे कांडाचे रसाचे गूळ, साखर, इ० अनेक गोड पदार्थ होतात तो; रूप० ऊंस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊं नये; ऊंस गोड कीं संगत गोड.

ऊह, पु० सं० तर्करूप जें ज्ञान तो; २, ऊहू.

ऊहापोह, पु० सं० यथाकथंचित् लिहिलेलें, किं० एकिलेलें जे श्लोक, वाक्य, किं० कोणेकाचें भाषण, इ० त्याचा यथास्थित सुसंगतपणा करायासाठीं इकडचें पद तिकडे तिकडचें पद इकडे, किं० कांहीं अंश गाळावा कांहीं नवें आपले पदरचें आंत घालावें अशी विचारपूर्वक जी योजना तो

ऊँहुँ, अ० ऊंहुं.

ऊळ, स्त्री० पलांडूचे झाडाचा जो समुदाय तो.

ऋग्वेद, पु० सं० चार वेदांतील जो पहिला वेद तो.

ऋग्वेदी, पु० सं० जाचे कुलपरंपरेंत ऋग्वेदानें मौंज्यादि संस्कार होत आले असे जे द्विज ते म०.

ऋजु, वि० सं० उजू पंचमार्थी वांचून.

ऋण, न० सं० व्याज इ० कांचा नियम करून सावकारापासून परत घ्यावयाचे बोलीनें घेतात जें द्रव्यादिक तें; २, व्याज इ० नियमावांचून उसनवार इ० रूपें घेतलें असतांही व्यवहार होतो; तसेंच प्रत्युपकारादिद्वारा अवश्य फेडलें पाहिजे जे उपकारादिक तेथेंही व्यवहार होतो; ३, कोणेकं अंकराशींत उणा करायाचा जो अंकराशि तो; ऋण करणें रूप० उणा करणें; ऋण काढून सण करणें, रूप० अवश्य प्राप्त झाला जो खर्चाचा प्रसंग तद्विषयीं द्रव्याची अनुकूलता नसतांही यत्न मयत्नानें द्रव्यादि मिळवून आपली हौस, किं० लौकिक संभाळणें

लणें.

ऋणकरी, पु० (ऋण-करणें) उत्तमर्ण, कि० अधमर्ण ते म० ;२, ला० जापासून आपणास कांहीं उपयोग होत नसतां उगीच पोसावें लागतें त्यास निंदावसरीं आणि आपल्यापासून कांहींच उपकार होत नसतां आपले निरंतर हित करितो त्यास स्तुत्यवसरीं म०.

ऋणमुक्त, वि० सं० ऋणापासून जो मुक्त झाला तो.

ऋणाईत, पु० ऋणकरी मा० लाक्षणिकार्थी म०.

ऋणाईतस्वरूपी, पु० (ऋणाईत-स्वरूप) जापासून आपल्यास कांहीं उपयोग पडत नाहीं आणि उगीच पोसावें लागतें असा जो कोणी त्यास निंदावसरीं म०.

ऋणानबंध, पु० ऋणानुबंधाचा अपभ्रंश.

ऋणानुबंध, पु० सं० कोणेक मनुष्य, पशु, वृक्ष, स्थळ, इ० कांपासून आपल्यास कांहीं इष्ट, कि० अनिष्ट फल प्राप्त होण्यास प्रयोजक जो पूर्वजन्मीचा त्याचा आपला कांहीं ऋणसंबंध असतो तो ;२, ला० कांहीं कारणामुळें परस्परांचा पडतो जो मित्रभाव तो.

ऋणायस्वरूपी, पु० ऋणाईतस्वरूपी.

ऋणायीत, पु० ऋणाईत.

ऋणायीतस्वरूपी, पु० ऋणाईतस्वरूपी.

ऋत, वि० सं० सत्यजें भाषणादिक तो.

ऋतु, पु० सं० दोन दोन महिनें मिळून एकेक असे जे वसंतादि संज्ञक वर्षाचे सहा विभाग ते म० ;२, स्त्रियांस तारुण्यदशा प्राप्त झाली त्यणजे मा० प्रतिमासीं जो विकृति विशेष होतो जेणेंकरून योनिद्वारा रक्तस्राव होतो तो. ती विकृति चार दिवस पर्यंत विशेषेंकरून असत्यें आणि पुढें थोडी होतां होतां सोळा दिवस पर्यंत राहून नाहींशी होत्ये ;३, पश्वादिकांनीं फळावें, वृक्षादिकांनीं पुष्पित फलित, अंकुरित, इ० व्हावें असा जो त्यांस कालानुरोधानें विकृति विशेष होतो तो

ऋतुदर्शन, न० रजोदर्शन.

ऋतुमती, स्त्री० सं० ऋतु प्राप्त झाला आहे जिला अशी जे स्त्री ती चार दिवस पर्यंत कि० सोळा दिवस पर्यंत.

ऋतुशांत, स्त्री० ऋतुशांतिशब्दाचा अपभ्रंश.

ऋतुशांति, स्त्री० सं० स्त्रियेस प्रथमतः ऋतु प्राप्त होतो तेव्हां पतीनें गर्भाधान करण्याचे अधिकारार्थ करावयाचें कर्म आहे तो.

ऋतुस्नान, वि० (ऋतुस्नाता-सं०) ऋतु प्राप्त झाल्यावर चवथे दिवशीं स्नान करून शुद्ध झालेली जी स्त्री ती.

ऋत्विज, पु० (ऋत्विज्-सं०) यज्ञादिकांत नेमलेलें हवनादि कर्म करणार्थ यजमानानें वरला असतो जो ब्राह्मण तो.

ऋषपंचमी, स्त्री० ऋषिपंचमी शब्दाचा अपभ्रंश.

ऋषि, पु० स० तपश्चर्यादि पुण्यकर्माचे ठायीं निरंतर जाची निष्ठा, जांचीं वचनें ईश्वरवचना सारिखीं लोकप्रमाण मानित आहेत असे

असे जे पुराणादिप्रसिद्ध वसिष्ठ.विश्वामित्र,नारद,इ०ते म०;२,ब्राह्मण असून जो ऋषि तो ब्रह्मर्षि,राजर्षि,देवर्षि,इ०स०;२, ज्ञानसंध्यशील असून जाचे अंगी लबाडी लचाडी तिळभाय नाहीं असा जो सात्विक ब्राह्मण त्यास म्ह०.

ऋषिपंचमी, स्त्री० सं० भाद्रपद शुक्लपंचमी जा दिवशीं सप्तर्षिपूजा प्रधान व्रत करितात बी.

ऋषिमार्ग, पु० (ऋषि-मार्ग सं०) शास्त्रांत जा बांधून सर्वथा सोडूं नये असे जे यज्ञोपवीत,उपवस्त्र,भस्मधारण,इ०तें मात्र नित्य धारण करावे इतर जें शोभार्थ,किं० शरीर सुखार्थ शेला,पागोटे,जोडा,इ० असलें असलें नाहीं नाहीं निषिद्ध अन्याय्य कर्म,लाभ होत असतांही सर्वथा करूं नये असा जो कोणेक ब्राह्मणाचा वर्तन संप्रदाय असतो त्यास म्ह०.

ऋषिमार्गी, वि० (ऋषिमार्ग.) ऋषिमार्गानें वर्तणारा जो त्यास म्ह०.

ऋक्ष, पु० सं० आस्वल;२,न० नक्षत्र.

ए, अ० सं० एकवचनानें कोणेकास संबोधन करायाचें असतां त्याचे नामाचे पूर्वी,किं० केवलाचा म० करितात;उ० ए पांडू इकडे ये.

एक, वि० सं० सर्व संख्येमध्यें आद्य जी संख्या तिचा वाचक;२.जाचे बरोबर मेजावयास दुसरा कोणी पदार्थ नाहीं तो;उ० ब्रह्म जें आहे तें एक आहे;३,विवक्षित गुणानें जाचे बरोबरीस दुसरा कोणी नाहीं असा जो त्याच्या गुणांत पुरा तो;उ० तो एक मात्रा गमनी आहे;तो एक शूर आहे;४, विवक्षित भेदक विशेषानें जे भिन्न भिन्न सर्वपदार्थ ते म०;उ० एक करावें त्रयणतो,एक करूं नये त्रयणतो,किं० जाति गुण प्रकार,मत,इकानीं परस्पर जे समान ते परस्परें;उ० ते आणि आत्मी एक,ते औषध आणि हे औषध एक;५,पर्जन्यपतन,रोदन,अनर्थ, मारामारी,घोळ,गरदी,रगड,रेल,इ० कांचा अतिशय आणि सातत्य वर्णायाचे असतां त्या त्या शब्दा बरोबर द्योतकत्वें करून याचा म० होतो;उ० तेथें पोरानें एक रडून घोळ केला मग एकच अनर्थ झाला;आज एक पावसाची धार लागली;६,केवल तिनकेंच असें नव्हे कांहीं उणें,किं० कांहीं अधिक एतदर्थ द्योतनार्थ संख्या परिमाण वाचकाशीं याचा म० होतो;उ० शंभर एक रुपये शिलक असतील;एथून कोस एक भर समुद्र आहे;७,कोणेक अर्थ विवक्षित विधीस विषय करून तद्दितर अर्थी तत्तादात्म्याभावामुळें जे द्वा तद्विधि विषयतेचा अभाव वर्णनीय आहे ते द्योतनार्थ विधिविषयार्थ वाचकापुढें याचा म० होतो;उ० तो एक वेडा झाला त्रयणून अवघे वेडे नव्हत तो एक श्रीमंत परमीतर गरीब आहे;८, कदापि अन्यथा व्हावयाचें नाहीं असें जें कोणेकाचें वाक्य,वचन,बाण,इ० तो;उ० तुम्ही थोर ते द्वा तुमचें बोलणें एक असावें;एक होणे

होणें त्र्य० परस्पर जे विरुद्ध मनाचे त्याणीं ए-कमत्यपावणें, कि० अन्योन्यतादात्म्य पावणें. कि० एकवटलें जाणें; •, क्वचित् अन्यव्यावृत्तत्वरूप जें असाधारणत्व त्याचा बोधक होतो; उ० ही गोष्ट एकमनानेंच जाणावी; आत्मैकवेद्य, दुःखैकसाध्य, इ० स०.

एकउंटी, स्त्री० (एक·उंट·) हुच मुद्दी.

एककल्ली, ३लिं० (एक·कल·) वर्तनास जो कांही एक समुदाय धरिला असतो तेणेंकरुनच वागणारा त्याणजे प्रसंग विशेषीं प्रसंगानुरूप वागण्याचें ज्ञान जास नाहीं तो; २, पाठकरणें, तर्ककरणें, हिशेबकरणें, कवन करणें, इ० जे अनेक बुद्धींचे विषय त्या मध्यें एकाच विषयावर चालणारी कोणेकाची स्वाभाविकबुद्धि तो.

एककार, न० एकाकाराचा अपभ्रंश.

एककालिक, ३लिं० (एक·काल·सं०) एक समयीं झालेले, आलेले, इ० ते परस्पर.

एककालीन, ३लिं० (एक·काल·सं०) एककालिक.

एकरंगी, ३लिं० (एक·रंग·) दुसऱ्या विजातीय रंगाची एकेरी छडी उठवली असलेलें असें जे रेशमी चोळरवण, लुगडें इ० तो.

एकरेप, अ० (एक·रेप·) एकवार.

एकगोत्री, ३लिं० (एक गोत्र·) एक आहे गोत्र जांचें ते परस्पर.

एकचएक, ३लिं० (एक·द्वि०) केवळ जो एक तो; उ० माझें एकचएकचागोटें नें तुला देऊन काय करूं.

एकचाल, स्त्री० (एक·चाल) एकचाली.

एकचाली, ३लिं० (एकचाल·) एकमार्गी.

एकचित्त, ३लिं० (एक·चित्त·) एकमनाचे जे अनेक ते परस्पर; २, एकाग्र झालें आहे चित्त जाचें तो; ३, न० एकाग्रजें चित्त तें.

एकछत्रीराज्य, न० (एक·छत्र·राज्य·) समुद्रवलयांकित पृथ्वीचें एकें राजाचे हातारवालीं जें राज्य तें.

एकजात, ३लिं० सं० एकापासून बंधुरूपें करून उत्पन्न झालेले जे पुत्रादिक ते परस्पर.

एकजात, ३लिं० विवक्षित जो जात्यादि धर्म तदितर धर्मांनें अन्वित न सून केवल त्या मात्र धर्मांनें अन्वित जो कोहीएकपदार्थ तो, उ० एकजात पक्षीपानें घेऊन ये त्रणजे हिरवें एकही नसावें; २, सजातीय पदार्थांत उत्तम प्रतीचा जो तो; उ० अरे बाप्या हें तूप बाईट दिसतें नाहीं महाराज एकजात तूप आहे.

एकजातीय, ३लिं० सं० एकजातीचे जे अनेक ते परस्पर एथें जातिशब्द प्रकारादिभेदक धर्माचा उपलक्षक.

एकटक, अ० (एक·टक·) एकसारखा टकीनें पाहणें इ० कांचें वि०

एकटणें, क्रि० पसरून पडलें जें फूल, धान्य, इ० तें एक एक वेंचणें.

एकटा, २ लिं० (एक-सं०) जाला दुसरी सोबत नाहीं तो मनुष्यादिक.

एकटाँकी, ३ लिं० (एक-टांक) एका लेखकानें एके लेखणीनें एकसारखें दिसाया जोगें लिहिलेलें जें अक्षर, पुस्तक, इ० तो.

एकठोक, अ० एकथोक.

एकडा, पु० एक संख्या बोधक लिहितांत अंक तो.

एकतऱ्हेचा, ३ लिं० (एक-तऱ्हा) एक प्रकार.

एकतान, ३ लिं० सं० एकाग्र.

एकतार, एकतारी, ३ लिं० (एक-तार) रेशमाचे एकेरी तारानीं विणलेलें पितांबर इ० वस्त्र तो.

एकताल, पु० (एक-ताल) तालांत एक भेद आहे; २, ३ लिं० एकतालो.

एकतालो, ३ लिं० (एक-ताल) एकताल आहे जास असें जें ध्रुपद इ० तो.

एकतालीस, ३ लिं० एकेचाळीस.

एकतीस, ३ लिं० (एक-तीस) संख्या आहे ३१

एकत्र, अ० सं० एके ठिकाणीं; २, बंधु इ० कानीं विभक्त न होतां एकेसंसारांत.

एकथोक, ३ लिं० (एक-थोक) थोडें थोडें अनेकवार न देतां घेतां एकदांच मोठी रकम होई असें द्रव्यादि घेणें, देणें, इ० कांचें वि०.

एकदम, अ० (एक-दम) मध्यें विसांवा न घेतां एकदमानें; २, कोणेक कर्माचे अनेक पर्याय न करितां एके पर्यायानें; उ० मला त्यानीं एकदम लाख रुपये दिले; ३, युगपत; उ० एकदम हजार गोळा उडतो असें एक यंत्र करायाचें आहे.

एकंदर, अ० (एकत्र-सं०) एके अधिकरणीं अनेक पदार्थांचें मिश्रण, संकलन, इ० द्वारा मिळून स्थिति जेह्मां विवक्षित आहे तेह्मां याचा प्र०; उ० तांदूळ आणि डाळ एकंदर केली त्र० खिचडी होत्ये; या अवघ्या रकमा एकंदर करून बेरीज किती होत्ये ती पाहा; सारीं औषधें एकंदर कुटून मग पुडया बांधा; २, पुनःपुनः अनेकवार करायाची अरुता नठेवितां एकदांच ताकीद करणें, सांगणें, इ० कांचें वि०; उ० या प्रमाणें बर्त्तीचें त्रयण त्यास एकंदर ताकीद केली आहे; तूं एथें एकंदर येऊं नको इ० स्थलीं येऊं नको असें एकंदर सांगितलें आहे, असा अध्याहार जाणावा; ३, स्त्री० न० अनेक अंकराश्यादिकांची एकत्र जी मिळवणी ती. तें; उ० दोन्ही मजकुरांची एकंदर करून काय अर्थ होतो तो पहा त्रण जे सज्जेल; तुह्मी आज पर्यंत कारभार केला तर त्याचें एकंदर करून मला समजावा; ४, (एक-अंदर) रा० कोणेकाचा कोणेकाशीं परंपरा संबंधानें जो स्पर्श तें; उ० त्या सुतक्याचें मला एकंदर झालें त्रणून स्नान करितों.

एकदा, अ० सं० एकसमयीं; २, युगपत; ३, एकवार.

एकदाँ, अ० एकदा.

एकदाँचा, अ० (एकदां) कसेंतरीं सायासानें

एकवार होणें, करणें, इ० कांचें वि०; उ० एकदां-चें लग्न झालें म्हणजे सुदलों.

एकदिल, वि० (एक·दिल०) एकचित्त प्रथमार्थी, २, पु० ऐकमत्य.

एकदिवस, अ० (एक·दिवस०) एके दिवशी.

एकदेशी, वि० सं० प्रसंगीं अभिप्रेत जे सिद्धांतमत तद्विरुद्ध मताचाही अवलंबकरून सिद्धांतावर आलेला जो कांहीं दोष त्याचें खंडन करणारा जो तो, कि० ते त्याचें मत; २, दार्ष्टांतिक, उपमेय इ० अर्थानें सर्वांशीं व्यापिनाहीं एकादे अंशीं व्यापितो असा जो दृष्टांत, उपमा, इ० तो, ३, सर्वांचे समजुतीस मिळत नाहीं असे जे वादादि प्रसंगीं कोणेकाचे भाषण त्यास, कि० तादृश भाषण करणारा जो त्यास म्ह०.

एकधान्य, न० (एक धान्य·सं०) एक जातीचें च धान्य भक्षून असावें एतन्नियमात्मक चातुर्मास्यादिकांत करायाचें एक व्रत आहे.

एकधोत्री, वि० (एक·धोत्र०) नेसावयापुरतें एकच आहे धोत्र जाजवळ तो; म्ह० एकधोत्री आणि महादेवी.

एकनाथषष्ठी, स्त्री० (एकनाथ·षष्ठी०) फाल्गुन वद्य षष्ठी, एकनाथ म्हणून साधु होता त्याचा मरण दिवस तो म्हणून तत्संप्रदायी त्या दिवशीं तत्कीर्तनादिकरितात.

एकनिश्चय, पु० सं० कोणेक गोष्टीविषयीं दृढजो निश्चय तो.

एकनिष्ठ, वि० (एक·निष्ठा·सं०) भक्ति, तप, इ० कावरदृढ निष्ठा जाची वसली आहे, असा भक्त, तापस, इ० तो, २, एकनिष्ठकारीकर.

एकनिष्ठकारीकर, वि० पुराजो मात्रागमनी त्याग म्ह०.

एकनिष्ठमात्रागमनी, वि० सर्वदा एकनिष्ठमात्रागमनीपणा करण्याचा स्वभाव जाचा तो.

एकपत्नी, वि० (एक·पत्नी·सं०) आपली विवाहित जी स्त्री तिजवांचून इतर स्त्रियेचा उपभोग जो करीत नाहीं तो.

एकपत्नीव्रत, न० (एक·पत्नी·व्रत·सं०) एकपत्नी पुरुषाचा एक पत्नीत्वरूपजो नियम तें.

एकपदरी, वि० (एक·पदर०) एक आहे पदर जाम असें जें पागोटें, लुगडें, इ० तें; २, एकेरी; एकपदरीवर येणें म्ह० एकेरीवर येणें.

एकपक्षीं, अ० (एक·पक्ष·सं०) कोणाएक पक्षातें अवलंबून बोलणें, वरें असणें, इ० कांचें वि०.

एकपाठी, वि० (एक·पाठ·सं०) एकवेळच ऐकून श्लोकादिक पाठकरणारा असा जो बुद्धिमान तो; २, एकपाठ्या.

एकपाठ्या, वि० (एक·पाठी०) ज्यागोपाठ झालेलीं जी अनेकभावंडें तीं परस्पर.

एकपिकी, वि० (एक·पीक०) वर्षांस एकच पीक जेथें येतें असा जो भूमिभाग तो.

एकपुटी, एकपुठी, वि० (एक·पुट·सं०) एकच पुट देऊन सिद्ध केलेलें जें रसायनादि तो.

एकपुती, स्त्री० (एक·पुत०) एक आहे पुत्र जिज्या

ला नी; ब० एकपुनी रडे आणि सातपुनीही रडे, या अर्थानेंच प्रा० प्र०.

एकप्रकार, एकप्रकारचा, ३ लिं० (एक-प्रकार-) कांहीं विलक्षण प्रकारानें विशिष्ट जो तो.

एकबारी, ३ लिं० (एक-बार-) एकवेळचा जा मध्यें असतो असा फळाफुलादि० इ०, किं० प्रतिवर्षीं जास फलपुष्पादिकांचा एकवारच बार येतो असा वृक्षादिक तो, किं० एक वारांचें काढलेलें गुलाबपाणी तो; २, मध्यें शिवण नाहीं सगळा तिनका रुंद विणलेला जो दुपटा इ० तो.

एकबेरजी, स्त्री० (एक-बेरीज-) कांहीं जमा किं० खर्च इ० कोणेक कार्कून इ० कांचे नावें जो लिहिला जातो असें जें लिहिणें तीं; पक्षीं ती जमा, खर्च, कार्कून, प्रकरण, इ० कांचें विशेषणही होतें.

एकबोटीगंध, न० (एक-बोट-गंध.) एकबोटानें कपाळीं आडवें उभें लाविलें जे गंध तें

एकभक्त, न० स० दिवसास मात्र एकदां जेवावें एतन्नियमात्मक जें व्रत तें.

एकभुक्त, न० (एक-भुक्त-सं०) अहोरात्रांत एकवार जें भोजन तें; २, ३ लिं० अहोरात्रांत एकवार मात्र भोजन करून राहिलेला जो तो.

एकभुक्ति, स्त्री० (एक-भुक्ति-सं०) एकभुक्त प्रथमार्थीं

एकमंगल, एकमंगळ, न० (एक-मंगल-) सोंवळें सोंवळें, ओवळें, विटाळ इ० कांचा एकच जो संकर तें.

एकमजला, एकमजली, ३ लिं० (एक-मजला-) एकच आहे मजला जास असें जें घर, इ० किं० पातळ, पागोटें, इ० तो; २, अ० (एक-मजली-) मध्यें भोजन, फराळ, इत्याद्यर्थ नउतरतां मुकाम पर्यंत चालणें, जाणें, इ० कांचें वि०.

एकमत, ३ लिं० (एक-मत-) एक मताचे जे अनेक ते परस्पर.

एकमार्गी, ३ लिं० (एक-मार्ग-) जी रीति एकवेळ आपल्या मनास आली आणि धरिली तीणेंकरून वर्तणारा त्यांत कांहीं दोष आणि दुसऱ्यांत कांहीं गुण दिसला तथापि धरले मार्ग सोडित नाहीं असा जो तो; २, एकरोखी प्रथमार्थीं.

एकमाही, ३ लिं० (एक-माहे-) एका महिन्याचा हिशेब, वसूल, रोजमुरा, बेगमी. इ० तो.

एकमुखी, ३ लिं० (एक-मुख-सं०) एकच आहे मुख जास असा जो रुद्राक्ष, किं० देवादिकांची मूर्ति, मुखवटा, इ० तो; २, ला० मुख्य जो राजा इ०, किं० त्याचा हस्तक जो प्रधान इ० तो, एक आपल्या बुद्धीनें जें बरें वाईट करील तें होत असावें दुसऱ्याचें शाहाणपण चालूंनये असा जो राज्य, संसार, इ० तो, किं० जें कार्य करायाचें तें जा कोणेकावर विश्वास ठेविला आहे, तो सांगेल तसें करितो दुसऱ्याचें ऐकत नाहीं अ-

सा

सा जो मनुष्य तो.

एकमेक, ३ लिं० (एक-द्वि०) अन्योन्य.

एकमोल, न० कों० एकमंगल.

एकमोली, ३ लिं० (एक-मोल०) एका मोलाचे जे अनेक पदार्थ ते परस्पर.

एकरकम, अ० (एक-रकम०) एकेरकमेनें.

एकरंगी, स्त्री० (एकरंग०) तिफाशी खेळांत एकडाव येत असतो ती; २, ३ लिं० दोहों अंगें सारखा एक जास रंग दिला आहे. असें जें पागोटें, सरवलाद, इ० वस्त्र तो.

एकरात्र, अ० (एक-रात्रि-सं०) एक जें अहोरात्र त्यातें व्यापून.

एकरास, ३ लिं० (एक-रास०) एका राशीचा जो धान्यादि पदार्थ म्हणजे विवक्षित गुणानीं परस्पर तुल्य तो.

एकरूप, ३ लिं० सं० यत्किंचित् वैमनस्य नसून सख्य भाव आहे जांचा ते परस्पर.

एकरोंरवी, ३ लिं० (एक-रोंरव०) जा एका विषयाकडे चित्त लागलें असतें तो मात्र विषय स्फुरत असतो इतर विषय जरी इंद्रिय संन्निकृष्ट झाले तथापि जाला समजत नाहींत अशा स्वभावाचा जो तो; २, बैल, बूट, विणकर, इ० कानीं वरचें अंग मात्र जाचें चांगलें असतें आंतलें दुसरें अंग नसें नाहीं असें जें छीट इ० वस्त्र, इ० तो.

एकलकाजा, पु० गोट्यांचे खेळांत मेजण्याचे प्रसंगीं एक याचे स्थानीं म्ह०

एकलकोट, एकलकोंड, ३ लिं० (एकला-कोंडणें०) एकाकी असावें दुसऱ्याचा सहवास-चा जास तिरस्कार येतो अशा स्वभावाचा जो मनुष्यादि तो

एकला, ३ लिं० (एकल-सं०) एकटा.

एकवचन, न० सं० एकत्व संख्या बोधक जो नामापुढें, किं० धातूपुढें जो प्रत्यय होतो तें, हा प्रकार संस्कृतांत प्र०; २, प्राकृतांत शब्दापासून एकत्व संख्या वैशिष्ट्येंकरून अर्थाची उपस्थिति व्हावी असा जो नामरूप, किं० क्रियापदरूप शब्दाचाठायीं अर्थोपस्थापन रूप प्रकार राहतो तें.

एकवचनांत, ३ लिं० सं० एकवचन विशिष्ट जो शब्द तो; एकवचनांत बोलणें इ० स्थलीं आदरार्थ जें बहुवचन तद्रहित अनादरानें बोलणें.

एकवचनी, ३ लिं० (एक-वचन-सं०) एकदां जें बोलला त्यास विरोध येई असें कदापि बोलत नाहीं व करीत नाहीं असा जो वचनाचा खरा तो.

एकवट, अ० (एक०) एकंदर प्रथमार्थी.

एकवटणें, (एकवट०) एकवट करणें.

एकवत, न० एकभक्ताचा अपभ्रंश.

एकवर्ण, पु० न० (एक-वर्ण-सं०) वर्णसंकर.

एकवर्णी, ३ लिं० (एक-वर्ण०) एक रंग जाचे अंगावर आहे, अशी गाय, बैल, पक्षी, इ० तो.

एकवशीं, अ० रा० एकोशीं.

एकवाक्यता, स्त्री० सं० श्लोकादिरूप जीं एक प्रकरणीं अनेक वाक्यें त्यांपासून विशिष्ट

शिष्ट एक अर्थ उपस्थित झाल्यावाचून जो त्यांचा अंगागी भावादिरूपें करून अन्वय तो; २, अनेक वाक्यांचा अर्थाविषयीं परस्पर जो अविरुद्ध भाव तो; ३, एकाच अर्थाविषयीं भाषणादि करणारे जे अनेक त्यांचा आपसांतले आपसांत जो मतादि विरोध असतो तत्परिहार पूर्वक जें त्याचें ऐकमत्य तो; उ० तुम्ही बोलतां एक आणि तुमचा वकील बोलतो एक तें तें मिळत नाहीं याजकरितां तुमची आणि त्याची एक वाक्यता करून मग बोला म्हणजे काय तें सांगेन.

एकवाढ, स्त्री० (एक-वाढणें.) जेवणाचा प्रसंग जिनकें अन्न पाहिजे तितकें एक वारच पात्रावर वाढून देण्याचा प्रकार तो.

एकवीस, ३ लिं० (एक-वीस-) एक संख्या आहे २१.

एकवेळ, एकवेळां, अ० (एक-वेळ-) एकदां.

एकवेळचा, ३ लिं० कों० एकवेळ.

एकशाफ, ३ लिं० सं० एके नरवीचा आहे खूरजाला असा जो घोडा, गाढव, इ० तो.

एकशेज, अ० (एक-शेज-) एके ओळीनें बसणें, मांडणें, इ० कांचें वि०.

एकशेष, पु० सं० एक शब्दाचा वाच्यत्वें करून विवक्षित अनेकजा अर्थव्यक्ति बोधनार्थ शब्दव्यक्तीहीनावसंख्याक असाव्या परंतु अनेकवचनानें एकाच व्यक्तीनें तितक्या अर्थव्यक्तींचा बोध होतो म्हणून इतर व्यक्ति

जाऊन एकेव्यक्तीची मात्र अवशेषपणें स्थिति होते तो.

एकश्चिन्न, ३ लिं० (एक-चिन्न-) एकाग्र झालें आहे चित्त जाचें तो.

एकसडी, ३ लिं० (एक-सड-) एकवार सडून केलेले जे तांदूळ इ० तो.

एकसंध, एकसंधी, ३ लिं० दुसरा जोडून लाविलां एकच दगड, पत्रा, लांकूड, इ० कांचा केला जो चौरंग, पात्र, पेटी, इ० पदार्थ तो.

एकसमयावच्छेदेंकरून, अ० सं० युगपत्.

एकसष्ट, ३ लिं० (एक-षष्टि-सं०) एक संख्या आहे. ६१.

एकसहाँ, अ० एक सारखा प्रथमार्थांचून.

एकसारखा, ३ लिं० (एक-सारखा-) विवक्षित गुणानें सदृश जे अनेक ते परस्पर; २, अ० कोणेक वर्तनास धरिला जो कोणेक प्रकार त्याच प्रकारानें; उ० या औषधास एकसारखें पथ्य केलें पाहिजे; ३, प्रवृत्त झाल्यापासून मध्यें विराम नहोतां; उ० सकाळपासून एकसारखा बोलतो आहे.

एकसाक्षिक, ३ लिं० सं० एक आहे साक्षि जाहीस अशी जी गोष्ट तो.

एकसुरा, ३ लिं० (एक-) जाचें संसारांत बायको, मुलें, इ० अनेक मनुष्यें नाहींत असा जो एकटा तो.

एकसोय, अ॰कों॰ एकसहां.

एकहती, एकहाती, २लिं॰ (एक॰हात॰) एकाच कर्त्याचे हातें जाची वहिवाट होत्ये असा जो संसार, राज्य, इ॰तो.

एका, उ॰ (एक॰) एका.

एकाएकीं, अ॰ (एक॰द्वि॰) अकस्मात्.

एकाकी, २लिं॰ (एक॰) एकटा.

एकाकार, न॰ ८ (एक॰आकार॰सं॰) अनेक जे जात्यादिरूप पदार्थ त्यांचा भिन्नभिन्नत्वें करून बोध न करायाजोगा होतो जो संकर तें; २, ३लिं॰ एकच आहे आकार जाजवर असें जें अंतःकरण, बुद्धि, इ॰तो.

एकांगवीर, पु॰ (एक॰अंग॰वीर॰) इतर सैन्यादि साहित्याची अपेक्षा न धरितां एकटाच उडून तरवार मारणारा जो तो; २, ला॰ विवादादि प्रसंगी इतरांचें पाठबळ इ॰न धरितां एकटाच तो तो व्यवहार पार करणारा जो त्यास ल॰.

एकांगी, २लिं॰ (एक॰अंग॰) स्वभावें करून शरीरानें कृश जो पुरुषादिक तो; २, एकालाच निजायास पुराया जोगा जो माचा, गादी, सतरंजी, इ॰तो.

एकाग्र, २लिं॰सं॰ सांचल्य सोडून एकाच विषयाकडे लागलें जें अंतःकरण, बुद्धी, इ॰तो.

एकाड, २लिं॰कों॰ दुसऱ्याचे मकनीस जाची मकति मिळत नाहीं असा जो स्वछंदी पुरुषादि तो.

एकांडया

एकांडया, २लिं॰ (एक॰अंड॰) एकच आहे सा दिसतो अंडकोशा जाचा असा घोडा इ॰तो; २, जाचे दिमतीस दुसरा शिपाई माणूस, इ॰नाहीं असा जो एकटा चाकरी करणारा शिपाई इ॰तो; ३, ला॰ सूरदेणारा, ताल धरणारा, इ॰सोबती जास कोणी नाहीं असा जो हरदास, गवई, इ॰त्यास ल॰.

एकांत, पु॰सं॰ जाचे संन्निधानामें आपल्यास विवक्षित गोष्ट करायास अडचण होत्ये असा जो परकीय मनुष्य इ॰ तद्रहित जें स्थल तो; २, कोणेका सहवर्तमान एकांतीं विवक्षित गोष्टीचा करितात जो विचार तो; कोणेकास कांहीं गोष्ट इ॰एकांतीं लोकांतीं सांगणें, इ॰ल॰ एकीकडे आणि मसिद्धपणें चौघांत सांगणें.

एकांत्रा, अ॰ (एक॰अंतर॰) मध्यें एकेकदिवस वर्जकरून कांहीं करणें, होणें, इ॰कांचें वि॰; २, ३लिं॰ एका दिवसा आड येणारा जो ज्वर, हिंव, इ॰तो.

एकांत्रा आड, एकांत्राड, अ॰ (एक॰अंतर॰आड॰) एकांत्रा मथमार्थी.

एकाद, २लिं॰ एकादा.

एकादशा, २लिं॰सं॰ अकरा.

एकादशरुद्र, पु॰सं॰ स्वर्गी रुद्र संज्ञक अकरादेव आहेत ते.

एकादशी, स्त्री॰सं॰ प्रतिपदेपासून अकरावी तिथिती.

एकादा, २लिं॰ (एक॰आदि॰सं॰) एकच

आणि

आणि अमुकच अशा प्रकारें विवक्षित नहे तो; उ० तुझपाशीं एकादा रुपया असला तर दे; अपथ्य करितोस पर एकादें दुखणें येईल.

एकानएक, अ० (एक·अनु·एक·) एकाचे मागें दुसरा दुसऱ्याचे मागें तिसरा अशा प्रकारें सर्व संपत असें.

एकान्न, न० (एक·अन्न·सं०) अहोरात्रांत एक वारच जें भोजन तें असें प्रा० कांहीं एक दिवस चालिलें असतां प्र०; उ० मला आज पंधरादिवस एकान्न चाललें आहे त्यामुळें उष्णा झालें; २, एकध्यान्य.

एकामी, अ० कों० (एक·काम·) युगपत्; २, मध्यें विघ्न होण्यास कारणभूत जी कांहीं खटपट ती सर्व पूर्वीच आटपून गमनार्थ निघणें कांहींएक आरंभणें, इ० कांचें वि०; उ० भोजन आटोपून एकामीच निघावें म्हणजे वाटेनें मध्यें उतरावयास नलगे.

एकामें, अ० एकामी.

एकारणें, (एक·) कंटाळ, पडशी, गोणी, गलबत, इ० एकीकडे ओझें अधिक झाल्यामुळें तिकडचें अंग अधःप्रदेशीं होणें; २, भिन्नभिन्नपणें स्थित जे अनेकपदार्थ ते एकवटकरणें

एकार्णव, न० सं० सर्व विश्व बुडून एकच समुद्र प्रलयादिकालीं होतो तें.

एकावन, एकावन्न, ३लिं० (एक·पंन्नास·) संख्या आहे, ५१

एकाह

एकाह, पु० सं० एक अहोरात्रात्मक जो काल तो.

एकाहत्तर, ३लिं० (एक·सत्तर·) एक संख्या आहे, ७१.

एकाक्ष, ३लिं० सं० एक अंध आहे नेत्र जाचा तो.

एकी, स्त्री० (एक·) युद्धकलहादि निमित्त जो परस्पर विरुद्धभाव तत्प्रतिपक्षी जो भाव ती; २, एकी बेकीचे खेळांत जी विषम संख्या ती.

एकीकडून, अ० (एक·कड·हून·) मध्यें ईषद्देशही न वगळतां शेजानें झाडून सर्वांवर कोणेक संस्कारादि होईअसें; उ० यंदां एकीकडून अंबे आले; हा रागास आला म्हणजे एकीकडून अवघ्यांस शिव्या देतो; २, एकीकडे एतच्छब्द वाच्य जें अधिकरण तेथून.

एकीकडे, एकीकडेस, अ० (एक·कड·) कोणेक प्रदेशादि पदार्थांचा आसमंतात् अनेक जाकडा त्यांतूनअन्यतम जी कडती चा ठायीं; २, लोकांची साहजिक जेथें गतिस्थिति वहिवाट इ० होते असा जो ग्रामादिसंबंधी मध्यप्रदेशादि प्रदेश त्यापासून बहिःप्रदेशीं आजूबाजूस; २, ला० भाषणादिकांचा जो प्रस्तावक्रम त्याहून बहिःप्रदेशीं; उ० मी बोललों तें एकीकडेच राहिलें, आपलेंच तेवढें पुढें आणतो.

एकीकरण, न० सं० अनेकत्वें करून जें स्थित त्यांस संकलन, संमिश्रण, विरोधपरि-

हार

हार, इ० द्वारा एकत्व विशिष्ट करण्याचा जो व्यापार तें

एकीकृत, वि० सं० एकीकरण केलें आणलें तो.

एकीबेकी, स्त्री० (एकी·बेकी·) मुठींत पैसे इ० घेऊन दुसऱ्यास सम आहेत कीं विषम आहेत असें विचारावें त्याणें सांगितलें तें खरें झालें म्हणजे मुठींतले पैसे इ० त्यास द्यावे खोटें झालें तर दुसऱ्यापासून तावत्संख्यक आपण घ्यावे असा एक खेळ आहे तो.

एकीभवन, न० सं० अनेकत्व विशिष्ट जे पदार्थ त्यांचा संकलन, संमिश्रणादि द्वारा एकत्व विशिष्ट होण्याचा जो व्यापार तें.

एकीभूत, वि० सं० एकीभवन झालें जाणें तो.

एकुणअश्शी, एकुणऐश्शीं, वि० संख्या आहे, ७९.

एकुणचाळीस, वि० संख्या आहे, ३९.

एकुणजमा, स्त्री० (एकूण·जमा·) अनेक रकमांची एकंदर केली जी वेरीज ती; २, ती वेरीज एकंदर करण्याचा जो व्यापार तो.

एकुणतीस, वि० (एकोन·सं० तीस·प्रा०) एक संख्या आहे. २९.

एकुणनव्वद, वि० (एकोन·सं० नवद·प्रा०) संख्या आहे, ८९.

एकुणपन्नास, एकुणवन्नास, वि० (एकोन·सं० पन्नास·प्रा०) एक संख्या आहे, ४९.

एकुणवीस, वि० एकोणीस.

एकुणशंभर, वि० [illegible] प्रयोग, क्वचित्.

एकुणसाठ, वि० (एकोन·सं० साठ·प्रा०) संख्या आहे, ५९.

एकुणहत्तर, एकुणयहत्तर, वि० (एकोन·सं० सप्तर·प्रा०) संख्या आहे, ६९.

एकुणात, स्त्री० (एकूण·) जमा, खर्च, इ० रूपजा अनेक रकमा त्यांची एकत्र वेरीज, इ० करून त्यांत न्यूनाधिक कायकरायाचें असेलतें करून सिद्धांत संख्येचा जो लेखक करितात ती; २, तो लेखकरायासाठीं जी ०— अशी रेषा काढितात तीसही (प्र०; ३, ला० भाषण करतां करतां प्रमाणसिद्ध होतो जो कांहींएक अर्थ त्याचा सिद्धांतरूप करितात जो वाक्य प्रयोग ती.

एकुणीस, वि० एकोणीस.

एकुनएक, अ० एकानएक.

एकुनात, स्त्री० एकुणात.

एकुलता, एकुलताएक, वि० एक नाहीं· सा झाला तर दुसरा आहे. तो नाहीं तर तिसरा आहे, असें म्हणायास नाहीं एकच एक. अतएव अमूल्यपणें मानायास योग्य जो कोणेकाचा पुत्र, गाय, घोडा, इ० तो.

एकूणात, स्त्री० एकुणात.

एकून, एकूण, अ० (एक·करून·) उपक्रमापासून उपसंहारपर्यंत विषयीभूत झालेले जे अनेक अर्थ ते सर्व मिळून कांहींएक सिद्धांतरूपें करून सिद्ध होणें इ०; उ० फार बोलून

बोलून काय एकून तुम्ही जाणार, पांचा जणांनी सांकरांच रुपये दिले एकून पंचवीस झाले.

एकूनात, स्त्री॰ एकूणात.

एकेचाळ, एकेचाळीस, एकेताळ, एकेताळीस, २लिं॰ (एक॰ चाळीस॰) संख्या आहे, ४१.

एकेरा, २लिं॰ एकेरी

एकेरी, २लिं॰ (एक॰ फेरा॰ १हेरा॰ २) वस्त्र, कागद, सूत, दोरी, इ॰ कांचें मुळचें जें अंग त्याशीं तसेंच दुसरें अंग संबद्ध न होतां एकाकी अंगानें स्थित जें तें वस्त्रादि तो; २, जेथें एकेक स्थानीं दोन दोन तीनतीन इ॰ पदार्थांचे स्थितीची संभावना आहे तेथें एक एक अशाप्रकारें संबद्ध झालेला जो कोणी पदार्थ तो, किं॰ तद्विशिष्ट पदार्थ तो; उ॰ एकेरी फुलें गुंफून जी माळ केली ती एकेरी माळ असें म॰; ३, बारीक किरकोळ जो कंठादिकांचा अवाज त्यास म॰ ४, आदरार्थ जें अनेकवचन होत असतें तद्रहित एकवचनानें जें भाषण, संबोधन, इ॰; भाषणादि व्यवहारीं एकेरीवर येणें म॰ चिरडीस येऊन अरे तुरे, मारामारी, इ॰ करूं लागणें.

एकेरीकारकून, पु॰ (एकेरी॰ कारकून॰) जाला शिपाई, प्यादा, शागिर्द, इ॰ नेमणूक धन्यानें करून दिली नाहीं असा हलके योग्यतेचा जो काकून तो.

एकेरीहोन, पु॰ होन अशून सोन्याचें नाणें आहे, त्यांत एक जात आहे

एकेहत्तर, एकेहात्तर, २लिं॰ एकाहत्तर.

एकोणीस, २लिं॰ (एकोन॰ सं॰ वीस॰ मा॰) संख्या आहे, १९.

एकोद्दिष्ट, न॰ एकोद्दिष्टाचा अपभ्रंश.

एकोत्रा, पु॰ (एक॰ उत्तर॰) शंभर रुपयांस प्रतिमासीं एक रुपया व्याज द्यावें असा जो व्याजाचा नियम तो

एकोनें, न॰ एकादि शतांत संख्येचे वर्ग क्रमानें रचिले आहेत ज्यांत असें एक लेख आहे त्यांतील प्रत्येकाचा जो वर्ग तें.

एकोदर, २लिं॰ सं॰ सोदर.

एकोद्दिष्ट, न॰ सं॰ मृताचे अकरावे दिवशीं करावयाचें एक श्राद्ध आहे.

एकोपा, एकोबा, पु॰ कांहीं एक कर्माविषयीं परस्परांचें जें ऐकमत्य तो

एकोशास, एकोशीं, अ॰ कों॰ एकीकडे द्वितीयार्थी.

एकोसा, पु॰ गाय, म्हैस, इ॰ कांचे थानास एक रोग होत असतो तो.

एक्का, एक्या, पु॰ (एक॰) गंजीफांत एक संख्येचे चिन्हानें अंकित जें पान तो

एक्याण्णव, २लिं॰ (एक॰ नव्वद॰) संख्या आहे, ९१.

एक्याऐंशीं, २लिं॰ (एक॰ ऐंशी॰) संख्या आहे, ८१.

एखाद, २लिं॰ एकादें.

एखादा, एखांदा, २लिं॰ एकादा.

एड, स्त्री॰ घोडें इ॰ कांवर बसलेला जो स्वार

त्याचा तें थोडें इ०तरेनें चालवायासाठीं नेटानें टांचलावें, मारावें, इ० सर्वशक्ति खर्चून जो प्रयत्न तो.

एडका, पु० (एडक०सं०) मेंढा ह्मणून जो या-म्यपशु तो.

एढोळ, अ० एवढावेळ.

एढोळीं, अ० (एढोळ०) या वेळीं.

एणेप्रमाणें, अ० या प्रकारें.

एतत्, ३लिं०सं० हा ह्मणून जें सर्वनाम तदर्थी लोकींम०; उ० याहून अतिरिक्त तो एतदतिरिक्त, एतदनंतर, एतदभिन्न याणें ओळखतो; एतत्कृत, याचें जें गृहतें; एतद्गृह, हा आहे अवधि ज्यास तें एतदवधि, एतदर्थक, इ०स०

एतदर्थ, अ०सं० यासाठीं.

एतपर्यंत, अ०एथपर्यंत.

एतपावतों, अ०एथपावेतों.

एतावत्, ३लिं०सं० इतका; इतका जो काळ तो एतावत्काल, एतावत्प्रमाण, इ०समासीं प्र०.

एतावता, अ०सं० इतक्यानें, कांहीं एक अर्थ सिद्ध करण्याविषयीं प्रतिपादित जो हेत्वादिप्रपंच त्याचा परामर्श विवक्षित असतां मा०म०; उ० त्याणें आदर आतिथ्य केलें, गोडबोलला, एतावता त्याचे मनांतील हेष गेला असें ह्मणूंनका.

एथचा, एथला, ३लिं० (एथें०) या स्थलीं-चा.

एथपर्यंत, ३लिं० (एथें०पर्यंत०) या स्थलापर्यंत; २, हा काल पावेतों.

एथवर, अ० (एथें०वर०) एथपर्यंत.

एथील, ३लिं० एथला.

एथून, अ० (एथें०हून०) या स्थला पासून; २, या काला पासून.

एथें, एथे, अ० देशकालादिरूप जें हें स्थल त्याचा अर्थी

एथोन, अ० एथून.

एथोर, अ० एथवर.

एधस्, ३लिं०सं० (एधस्०सं०) पाहिजे तितका पुष्कळ.

एर, ३लिं० (इतर०सं०) मुख्य मध्यम कोटींत परिगणनीय नहे असा जो निकृष्ट अप्रयोजक कांहींएक पदार्थ तो; २, इतर; मा० यं०म०.

एरजार, एरझार, स्त्री० येरझार.

एरंड, पु०सं० एक औषधिवृक्ष आहे; २, मोंगली एरंड.

एरंडमूल, एरंडमूळ, न० (एरंड मूल०सं०) एरंडाची मुळी तें.

एरंडी, स्त्री० (एरंड०) यथार्थ एरंडाची बी.

एरँडें, न०नस्यांत्र ह्मणून वस्त्र तें.

एरँडेल, न० (एरंडी०) एरंडयांचें जें तेल तें.

एरँडयासाप, पु० (एरंडी०साप०) एरंडीवर असे ठिपके असतात तशा रंगाची एक सर्पांत जाति आहे.

एरवीं, अ० (एर०) परवांचे पलिकडचे दिवशीं, कि० याहून पलीकडले दिवशीं.

एरवीं, अ० (एर०) अन्यथा, क्रि० सुरुवातीं करून विवक्षित जो प्रकार तदभावपक्षीं.

एरशोर, २ लिं० (एर-सोप०) केवळ, क्रि० त्याहूनही कांहीं वाईट, क्रि० कांहीं बरा तो.

एरही, अ० एरवीं.

एरीं, अ० एरवीं.

एरु, २ लिं० (एर०) परस्पर संभाषण, वाद, युद्ध, इ० करणें जे उभयतां त्या मध्यें कवि एकाचें वृत्त निवेदून पूर्व प्रकांत जो दुसरा त्याचे वृत्ताचे निवेदनार्थ या शब्दानें त्याचा परामर्श करितो, तिचें प्रथमांत प्र०; उ० सं० सीता त्रणे लक्ष्मणा धाव, एरु त्रणे राक्षसी माव.

एलगार, पु० कांहीं एक मोठें कार्य सिद्ध करण्याविषयीं नेटाने सर्वशक्ति खर्चून जो प्रयत्न तो.

एलची, स्त्री० (एला-सं०) एलदोडा.

एलदोडा, पु० (एला-सं०दोडा०) शीतल सुगंधि असें एक औषध विशेषाचें फल आहे.

एला, स्त्री० सं० एलदोडा; २, त्याचा दाणा; ३, त्याचें झाड.

एवंच, अ० सं० एकून.

एवढा, २ लिं० (एतावत्-सं०) हें आहे आकार परिमाण जाचें तो; २, इतका.

एवढावेळ, एवढावेळ, अ० (एवढा-वेळ०) विवक्षित कालावधिपासून वर्तमान क्षणपर्यंत

एवींच, अ० रा० दुसरा कोणी आपले छंदानें वर्तनांत असतां त्यास आपल्याकडून कांहीं अन्यथा प्रेरणा, क्रि० अवरोध, इ० न करितां, पाहूं, इ० कांचें वि०.

एवींतेवीं, अ० प्रथमतः प्रवृत्त होऊनथे तें झालें आतां जसें होईल तसें होऊ अशा स्वभावानें.

एव्हां, अ० यासमयीं.

एव्हांएव्हां, अ० रा० (एव्हां-हि०) अघतन जो मध्याह्नादि विवक्षित वर्तमान काल तत्तुल्य जो दिनांतरींचा भूत, क्रि० भविष्यकाल त्याचा ठायीं, क्रि० क्षणभर आलीकडे पलीकडे; उ० काल आपण तेथून एव्हांएव्हां निघालों नाहींवरें.

एव्हांशीं, अ० (एव्हां-अमा०) एव्हां.

एषादिक, २ लिं० (एषःआदि-सं०) हे; हे होते त्रणूनच झालें इ० असाधारणता वर्णनीय असतांच कोणी प्राकृत जन प्र० करितात.

एस, स्त्री० वेस.

एसकर, पु० (एस-कर०) वेशीचे रक्षणार्थ नियुक्त असतो जो महार तो; २, साधारण महारासही त्र०.

एव्हवीं, अ० एरवीं.

एळा, स्त्री० (एला-सं०) वेलदोडयांत एकभेद आहे, जाची बी मोठी असते त्याचें बीं पा० अनेकवचनांत प्र०.

एळिया, एळ्या, एळ्याबोळ, पु० एक औषधोपयोगी वेलांत भेद आहे तो.

ऐकणें, आईकणें.

ऐकमत्य, न० सं० परस्परांचा जो एकमतपणा, तें.

ऐकाहिक, ३लिं॰सं॰ एकदिवसानें करण्याचें किं॰ एकदिवस धरण्याचें इ॰रूपाचें कांहीं कर्म, आशौच, इ॰ तो; २, नित्य येतो आणि नित्य नियतो असा जो ज्वर तो.

ऐकींव, ३लिं॰आइकींव.

ऐक्य, न॰सं॰ एकपणा; जीवात्मा, परमात्मा, इ॰ कांचें परस्पर एकरूपें करून जें ज्ञान तें ऐक्यज्ञान, ऐक्यभाव, इ॰स॰.

ऐगूबेगू, पु॰ ऐबतेगैबते.

ऐच्छिक, ३लिं॰सं॰ इतर साधन, प्रमाण, इ॰नसतां केवळ इच्छेनेंच सिद्ध केलेला जो कांहीं एक अर्थ तो.

ऐना, ३लिं॰आईना.

ऐतिह्य, न॰स॰ लोकपरंपरेचा प्रवादानें पूर्वीपासून जी कांहींएक प्रसिद्ध असलेली; उ॰ याकडावर ब्रह्मराक्षस आहे असें ऐतिह्य ऐकतों

ऐदी, ३लिं॰अजागलप्राय, अव्यवस्थित, आर्ष, असा जो मनुष्य त्यास स्त्री॰.

ऐंद्र, पु॰सं॰सत्तावीस योगांतील सत्तरावा योग तो; २, ३लिं॰ इंद्रसंबंधी जें आयुध, अस्त्र, यज्ञ, इ॰ तो.

ऐंद्रजालिक, पु॰सं॰ इंद्रजालाचा खेळ करणारा जो गारुडी इ॰तो.

ऐंद्रियक, ३लिं॰सं॰ इंद्रियसंबंधी जें सुख दुःख, इ॰तो.

ऐन, ३लिं॰ उत्कर्ष होतां होतां उत्कर्षाची पराकाष्ठा झाली आणि अपकर्षाचा प्रारंभ झाला नाहीं अशा मुख्य अवस्थेंतील तो तो कालादि जो पदार्थ तो; उ॰ ऐनदोन पहरीं निघूं; नथे मागें पुढें निघावें; २, व्याज, तोटा, इ॰ हानि जो अधिक उणा झालेला नव्हे, किं॰ विक्रयादिद्वारा द्रव्यादि अन्यरूपता पावलेला नव्हे. इ॰रूप मूलभूत जें रूप तेणेंकरून स्थिर असा जो द्रव्य, धान्य, इ॰ पदार्थ तो; उ॰ ऐन कर्जी हजार रुपये आणि व्याज शंभर एकून अकराशें; या शेतांत ऐन पीक दोन खंडी पिकतें. खांतखर्च आऊन एक खंडी पदरीं पडतें.

ऐनजिनशी, ३लिं॰(ऐन·जिन्नस·) ऐनजिन्नस संबंधी जो धारा, वसूल, शेत, जकात, इ॰तो.

ऐनजिन्नस, पु॰(ऐन·जिन्नस·) विक्रयद्वारा द्रव्यरूप केलेला नव्हे असा स्वरूपें करूनच सर्कार इ॰कांस द्यावयास घ्यावयास विवक्षित जो धान्यादि पदार्थ तो; ऐनजिन्नसधारा, ऐनजिन्नसवसूल, इ॰ समासही आणावे.

ऐनदस्त, पु॰(ऐन·दस्त·) बाबती गांवखर्ची, इ॰कांवांचून शेत, आगर, इ॰ संबंधी मुख्य जो सर्कारी सारा तो.

ऐना, पु॰अयना.

ऐब, पु॰अयब.

ऐबतेगैबते, पु॰ साळकोजी माळकोजी तें.

ऐबूगैबू, पु॰ ऐबतेगैबते.

ऐरण, स्त्री॰ सोनार, कांसार, लोहार, इ॰कांचें लोखंडाचें ओत आहे जाजवर अलंकार, भांडीं, इ॰ ठोकून घडितात ती.

ऐरा, पु॰ अहिरा.

ऐरावत, पु॰ सं॰ स्वर्गी इंद्राचा हत्ती आहे तो.

ऐरावती, पु॰ ऐरावताचा अपभ्रंश.

ऐरिणी, स्त्री॰ सं॰ लग्नांत साडेकरितात ते समयीं वंशपात्रांत पिठाचे दीप लावून ठेवितात ते तद्विशिष्ट पात्र ती; ऐरिणीचें जें दान तें ऐरिणीदान, ऐरिणीपूजन, इ॰ स॰.

ऐल, अ॰ आलीकडे: मा॰ ममासीं म॰; ऐलतीर, ऐलकांठ. इ॰.

ऐलपैल, अ॰ (ऐल पैल·) आलीकडे पलीकडे; उ॰ नदीचे ऐलपैल वस्ती आहे; २, ३लिं॰ सुरव्याहून इतर अवांतर जो खर्च मनुष्यें, इ॰ तो; उ॰ आत्मास संसार खर्चापेक्षां ऐलपैल खर्च फार लागतो.

ऐलीकडचा, ऐलीकडला, ३लिं॰ अलीकडचा.

ऐलीकडील, ३लिं॰ अलीकडचा.

ऐलीकडून, अ॰ अलीकडून.

ऐलीकडे, ऐलीकडेस, अ॰ अलीकडे.

ऐवज, पु॰ जेणेकरून पाहिजे तो जिन्नस विकत घ्यावा इ॰ काम होतें असा जो पैसा रुपया, होन, इ॰ तो, किं॰ जाचे विकयानें तो पैसा इ॰ उत्पन्न होतो म्हणून तद्रूपच मानिला जो सोनें, रुपें, धान्य, भांडें, पशु, क्षेत्र, इ॰ पदार्थ तो; २, वस्तुमात्राचाठायीं तत्तत्कार्यसाधक जो तत्तांश असतो तो.

ऐवजदार, ३लिं॰ (ऐवज·दार·) विवक्षितकार्यसाधक जो जांत तत्तांश असावा तो जांत आहे तो; उ॰ ऐवजदार खाणें खालें म्हणजे भूक लवकर लागत नाहीं.

ऐवजशीर, ३लिं॰ ऐवजदार.

ऐवजी, अ॰ (ऐवज·) द्यावयाचा घ्यावयाचा जो कांहींएक पदार्थ त्याला ऐवज रूपें करून मानून तत्प्रतिनिधिरूपें करून. इत्यादि देणें, घेणें, इ॰ कांचें वि॰; उ॰ हे रुपये मुद्दलांत धरूं कीं व्याजा ऐवजीं धरूं; पोथीचे ऐवजीं तुजपाशीं त्याचा तांब्या आहे मग काय.

ऐशआराम, पु॰ नाच, तमाशा, गाणें, इ॰ भोग उपवनांत गमन इ॰ द्वारा जो मनोरंजन व्यापार तो.

ऐशानी, स्त्री॰ सं॰ उत्तर आणि पूर्व यांचे मधली जी दिशा ती.

ऐशी. अ॰ (असा·) आपल्या अंतःकरणानुरूप कोणेकास दंड, पारपत्य, किं॰ कोणेकाचा बलादिकांचा उत्कर्ष इ॰ पाहिलें असतां जो आनंद, किं॰ चमत्कार होतो त्याचा उद्गार आहे.

ऐशी, ३लिं॰ (अशीति·सं॰) एक संख्या आहे, ८०.

ऐश्वर्य, न॰ सं॰ प्रभुत्व; २, वैभव.

ऐसपैस, ३लिं॰ अडचण नव्हायाजागें प्रशस्त जें गृहादिस्थल इ॰ तो; २, अ॰ आसमंतात्‌द्वारां.

ऐसा, ३लिं॰ असा मा॰ यं॰ म॰.

ऐहिक, ३लिं॰ सं॰ इहलोक संबंधी जें सुखादि

दिक तो.

ऐहलौकिक, २लिं॰ सं॰ ऐहिक.

ओ, अ॰ कोणी हाक मारिली असतां तिचें मनिवचन आहे.

ओइँचणें, कों॰ वेंचणें.

ओइरण, न॰ ओयरण प्रथमार्थी.

ओइरणें, रा॰ शिजणें, भाजणें, दळणें, इत्यादयर्थ तपेलें, खापर, जांतें, इ॰कांचेठायीं धान्यादि हस्तादिकानें ओतणें; २, न॰ जांतें, किं॰ खापर, इ॰ यांत एकवार ओईरायाचें जें धान्यादि तें.

ओंऊळ, स्त्री॰ कों॰ (बकुल सं॰) बकुलवृक्ष; २, न॰ त्याचें पुष्प.

ओंऊळदोडा, पु॰ स्त्री॰ (ओंऊळ दोडा) बकुलवृक्षाचें फल तो.

ओक, स्त्री॰ (ओकणें) भक्षिलेलें ओकून पडलें जें अन्नादिक तो.

ओकटा, पु॰ ओखटा द्वितीयार्थी

ओकटें, न॰ यं॰ प्रा॰ संकट.

ओकणें, (ओक अनु॰) उदरस्थित जें अन्नादिक तें मुखद्वारा बाहेर पडे अशा व्यापारानें आपण विशिष्ट होणें; २, स्त्री॰ वाप, शिवी, वर, इत्यात्मक शब्द मुखद्वारा बाहेर काढणें; उ॰ मं॰ अणली हाहा न ओक शापातें; २, अपहारादि द्वारा कोणीकानें आत्मसात केलेलें जें द्रव्यादि ते दंडादि घात्यानें पुन॰ द्यापारीं देणें.

ओकती, स्त्री॰ (ओकणें) विहीर इ॰कांतून पाणी काढावयाचें एक यंत्र आहे.

ओकरा, १लिं॰ ओकण्याचा स्वभाव जाचा तो.

ओंका, २लिं॰ जेथें जो पदार्थ अलंकारादिक होता, किं॰ असावा तो तेथें नाहींसा झाल्यानुलें विशोभित कसाचसा एक प्रकारचा दिसतो जो देह, शरीर, शरीरावयव, इ॰ तो.

ओकाबोक, स्त्री॰ (ओकणें द्वि॰) सतत अतिशयें करून चालतो जो ओकण्याचा व्यापार तो; २, सोंगट्या खेळण्याचा एक प्रकार आहे; कोणेकानें ओकाबोक होणें, रूप॰ ओकाबोकीनें विशिष्ट होणें.

ओकारा, पु॰ (ओकार) ओकारी प्रथमार्थी; २, मुखांत घातलेला घास पुरता गिळला न जातां ओकून बाहेर जो पडला तो.

ओकारी, स्त्री॰ (ओकार) उदरस्थित अन्नादिकांची ओक् असा शब्द होऊन बरजी उत्पत्ति होत्यानी; २, ओक.

ओक्सांबोक्शी, अ॰ उक्सांबोक्शी

ओखट, स्त्री॰ ओखटी प्रथमार्थी.

ओखटपणी, न॰ (ओखटा पाणी) खरकटे झाल्न, भांडीं, इ॰ धुवून गुरें इ॰कांस पाजावयास देविताल जें पाणी तें.

ओखटपाणी, अ॰ वाईटपणी.

ओखटा, १लिं॰ जाचे दर्शनादिकानें कंटाळा येतो असें जें मलीन, घाणेरें, घृण्य, पात्र, कि॰ मनुष्य इ॰ तो; २, कों॰ माता, पिता, यांनें वियोगानें बालक येतें जी संतती ती.

ओखट, न॰ ओषधाचा अपभ्रंश.

ओरवदी, ३लिं० (ओरवट·) ओषधोपयोगीजें वृक्षमूल धातु इ० तो.

ओंगण, न० रथ, गाडा, रहाट, इ० कांस तेल, बेरी, इ० लाविताततत्प्रासतत्प्रसंगीं स्त्र०.

ओगरणें, स्त्र० ताट, पत्रावळ, इ० कांचेठायीं अन्नादिक वाढणें.

ओगराळें, न० (ओगरणें·) भाताची मूद करून वाढावयाचें पात्र आहे.

ओंगळ, ३लिं० (अमंगल·सं०·) वाईट, घाणेरा, जो पदार्थ तो; २, पूय, विष्ठा, श्लेष्मा, लाळ, कुजलेलें मांस इ० जाचे दर्शनादि संबंधानें कंटाळा येतो असा जो पदार्थ तो त्या पूयादिकानें संस्पृष्ट जो वस्त्र, शरीर, इ० किं० त्या पदार्थांचा कंटाळा जास नाहीं असा जो मनुष्यादि तो.

ओंगळवाणा, ओंगळवाणी, ३लिं० (ओंगळवाण·) ओंगळा सारखा जो तो.

ओंगळसोंगळ, ३लिं० ओंगळ इ० तो.

ओघ, पु० सं० जलादिकांचा जो प्रवाह; कोणेकगोष्ट ओघास येणें स्त्र० बोलणें, करणें, इ० विषयीं क्रम प्राप्त होणें; २, समुदाय; समोघ इ० स०.

ओघळ, पु० (ओघ·) जलादिकांचा बारीक भूम्यादिकांवरून निम्न प्रदेशाकडे चालतो प्रवाह तो; २, स्त्री० दोहीं अंगें डगरी असून मध्यें केवळ संकुचित जो निम्न प्रदेश असतो ती.

ओघळणें, (ओघळ·) ओंवलेलें मोतीं, फूल, इ० तें त्या तंतूंतून बाहेर पडणें; २, नाक, कान, सुई, इ० कांस पाडिलेलें जें छिद्र तें त्या अलंकारादिकाचा घर्षणानें मोठें सैल होऊन खालीं उतरणें

ओच्चका, पु० कों० उचकादि तीयार्थी.

ओंचणें, कों० वेंचणें.

ओंचा, पु० वस्त्राचा कांठ धरून मध्यें थोडासा मोकळा सोडून पुढें दुसऱ्या स्थलीं धरून तेथेंच घ्यावें या प्रकारें केलें असतां जे अवच्छेद पडतात ते स्त्र०; २, नेसल्येल्या वस्त्राचा जो सोगा तो.

ओज, न० सं० शरीरांतील जी प्राणशक्ति तें.

ओज, स्त्री० (ऊर्जा·सं०·) कोणेक पदार्थ न बिघडतां विवक्षित गुणविशिष्ट झाला यास अपेक्षित जे उपचार तत्समर्पण द्वारा जो संस्कार ती; २, शिक्षा, अभ्यास, इ० कानें कोणेक कर्माची लागत्ये जी बरी रीति ती; ३, रा० संवय.

ओजवणें, (ओज·) कोणेक पदार्थ कार्यक्षम होण्याविषयीं जी ओज पाहिजे तद्विशिष्ट करणें

ओंजळ, स्त्री० पु० (अंजलि·सं०·) कांहीं पदार्थ आंत राहावा जोगें ओंडून प्रसृत केलेलें जें करद्वय ती.

ओझर, पु० रा० पर्वतादि उच्च प्रदेशावरून अलग खालीं पडतो नद्यादिकांचा प्रवाह तो.

ओझरता, अ० (ओसरणें·) कां करता.

ओझें, न० पदार्थांचे अंगींचा जो भार तें; २, मनुष्य

मनुष्य, घोडें, इ० कानीं वाहाया जोगा परिमित जो काष्ट, दगड, इ० पदार्थ, कि० बंधनादिकें करून एकत्र केलेला जो धान्य, तृण, इ० पदार्थ समुदाय तें; ३, अवश्य निर्वाह्यत्वेंकरून प्राप्त जें संसारादि खटलें, कि० तन्निष्ट जी श्रमदायक निर्वाह्यता तें.

ओझली, पु० ओझें स्थलांतरीं वाहून नेण्यासाठीं करितात जो माणूस तो; २, ३ लिं० पुष्कळ ओझें घेतो असा जो तट्टू, बैल, इ० तो; ३, कोणेक कामाचें मोठें ओझें अंगावर पडलें तरी नकंटाळतां निर्वाह करितो तो.

ओंट, स्त्री० एक वृक्ष आहे; २, न० तीचें फल जाचीं सार इ० उपयोगीं सोलें होतात.

ओंटभरण, ओंटभरणी, न० (ओंटी-भरणें) गर्भाधान त्रयोदशमास संस्कार तें; २, गर्भार स्त्रीचा आठवे महिन्यांत अनेक सुवासिनी मिळून ओंटी भरावी इ० रूप जो समारंभ करितात तें.

ओंटवणी, न० (ओंट-पाणी) ओंटाचें सोलाचें सार तें.

ओंटळा, पु० को० (ओंटी) ओंटींत बहुत कांहीं पदार्थ भरल्यामुळें बाहेरून मोठी दिसूं लागली जी ओंटी तीस त्र०

ओंटा, पु० नेसलेल्या वस्त्राची जी ओंटी, तो.

ओटा, पु० वर बसणें, चूल घालणें, कि० कांहीं पदार्थ ठेवणें इत्याद्यर्थ भूम्यादिकांवर माती, विटा, इ० कानीं उंच जें स्थल करितात तो; २, ओत्याची कड इ० स्थली बसण्याकरितां टेकावें इत्याद्यर्थ हात सवाहात उंचीचा जो भिंतीसारखा आकार करितात तो.

ओटी, स्त्री० घरांत माजघराचे बाहेर बसाया उठावयासाठीं भिंतीवांचून जी जागा राखितात ती.

ओंटी, स्त्री० कांहीं पदार्थ आंत घ्यावयासाठीं नेसलेल्या, कि० पांघरलेल्या वस्त्रांचा पदर न बांधितां यथा कथंचित् पात्ररूप केला जो आकार ती; २, ओंटी भरण्याचे जे तांदूळ, सुपारी, हळकुंड, नारळ, इ० साहित्य तीः ओंटी भरणें त्र० मंगलार्थ, कि० सत्कारार्थ सुवासिनी स्त्रीची ओंटी तांदूळ, रवण, नारळ, इ० कानीं पूर्ण करणें; ३, गाय, इ० पशुस्त्रियांची जी कांस ती; गाय इ० कानीं ओंटी करणें, त्र० प्रसवसमय आसन्न आल्यामुळें त्यांची ओंटी परिपुष्ट होणें; ४, गुह्य आणि नाभि यांचा जो मध्यप्रदेशती

ओंटीभरण, न० ओंटभरण.

ओंठ, पु० (ओष्ठ-सं०) मुखद्वाराचा वरचा आणि खालचा असे जे दोन अवयव ते त्र० कांहींएक गोष्ट ओंठाबाहेर काढणें, त्र० बोलून प्रसिद्ध करणें; त्र० ओंठाबाहेर तें कोठा बाहेर.

ओठंगण, न० (ओठंगणें) ओठंगायास साधनभूत जें लोड, भित, इ० तें; २, ला० जाचे योगानें संकटादि पार पडतें, संसारादि निर्वाह होतो, असा, कि० आपण कोणेक व्यवहारीं

वहारीं थकलें असतां तो व्यवहार कांहीकाल संभाळाया जोगा जो कोणी आपल्यास आश्रयभूत असतो तें.

ओठंगणें, (अवष्टंभन-सं०) मनुष्यादिकानें कांहींएक लोड, तक्या, इ०कांवर टेंकणें.

ओंठतुट्या, ३लिं० (ओंठ-तुटणें) रावरंडा जो तो.

ओठावणें, ओंठावणें, दुसऱ्याचे हातून आपल्याविषयीं जी कांहीं गोष्ट गेली, किं० आपल्यापासून दुसऱ्याविषयीं जें कांहीं उपकारादि घडलेलें तें तो दुसरा वर्मीयाजोगें बोलून दाखविणें; उ० एक दिवस तुह्मास बोलवायास विसरलों म्हणून इतके ओंठावतां कशास.

ओंठाळी, स्त्री० (ओंठ-आळा) घोडयाचे खालचे ओंठास लगामेचा अभावीं जी दोरी बांधितात ती.

ओठिंगण, न० ओठंगण.

ओठिंगणें, ओठंगणें.

ओड, स्त्री० कों० सुरमाडास अनेक तंतु विशिष्ट येतो फलसमुदाय ती.

ओंड, ३लिं० कों० खोलया अर्थीं.

ओंडकी, स्त्री० (ओंडा) लहान जो ओंडा ती.

ओंडकूर, न० कों० (ओंडा) ओंडकी.

ओंडकें, न० ओंडकी.

ओंडण, न० खोलगट जें शेत तें.

ओंडा, पु० शाखारहित केलेला हात दोनहात लांब फोडून आळाया जोगा जो लांकडाचा तुकडा तो; क्वचित् न फोडितां आळायाजोगा असतांही म्ह०.

ओंढ, ३लिं० ओंड.

ओढ, स्त्री० पदार्थाची कोणी एकीकडे गति होण्यास कारणभूत जी वेग परवशता त्याजवर होत्ये ती; उ० उदकाची ओढ स्वभावतः निम्न प्रदेशाकडे असत्ये; २, त्या त्या विषयाकडे अंतःकरणाचा गतीचा रोख असण्यास कारणभूत जी अंतःकरणास आशा, ममता, इ० वेग परवशता होत्ये ती; ३, खर्चा वेचायास पाहिजेत जे द्रव्यादि पदार्थ त्यांचे दुर्लभते मुळें त्या त्या संसारादि व्यवहारांत होत्ये जी अडचण ती; ४, शक्तीपेक्षां कांहीं विशेष गमनादि केल्यामुळें शरीरास वसतो जो ताण ती; ५, बैल राहाट, तेल्याचा घाणा, इ० कांचे ओकडास आणि बैलाचे मागें जो बसनेकड इ० अवयव असतो त्यास जें दोरी लांकूड, इ० बांधितात ती; ६, बैल, टोणगा, इ० लाऊन ओढीत आणला जो मोठें लांकूड, किं० अनेक लांकडांचा समुदाय ती; ७, तीं लांकडें बांधायासाठीं दोरी इ० बांधलेंअसतें ती; ८, भूमिवरून कांहीं ओढीत नेलें असतां पडतो जो आरावडा ती.

ओढक, ३लिं० (ओढणें) दुसऱ्यानें कांहीं तोडओढीची गोष्ट सांगीतली असतां ऐकूनये आपण धरिलें तेंच घेऊन बसावें असा स्वभाव जाचा तो.

ओढकर, पु० (ओढ-कर) बैल, टोणगा, इ०

द्वारा लांकडें इ० ओढून आणून त्याजवरच उपजीविका करणारा तो.

ओदगस्त, ओदघस्त, २लिं० (ओद-मा० यस्त सं०) ओदतृतीयार्थानें जो युक्त तो.

ओदगस्ती, ओदघस्ती, स्त्री० (ओदगस्त-) ओदगस्तपणा.

ओदण, न०स्त्री० (ओदणें-) पूर्वस्थानींचा गुणादिकांची क्रमानें उत्तरोत्तर चालत्ये जी अनुवृत्ति ती तें; उ० यंदांचा हिशेब झाला, परंतु मागील ओदण थावर आली नाहीं; या कुळीं बायकोस प्रथम कन्या झाली अशी ओदण चालत आली; २, बायकोचे नेसलेल्या लुगड्याचा आंतल्या पदराचा जो एक कोन जो ओढिला असतां नेसण यद्दा होतें तीतें.

ओदणगांठ, स्त्री०(ओदण-गांठ-) ओदणाशेवटास जी गांठ दिली असत्ये ती.

ओदणबाकी, स्त्री० (ओदण-बाकी-) मागाहून उत्तरोत्तर अनुवृत्त होत आलेली जी बाकी ती.

ओदणें, आकर्षणें; २, दुसऱ्याची तोडओड न ऐकतां दुराग्रहानें कोणेक गोष्ट धरून बसणें; गुडगुडी, तमारखू, भांग, इ० ओदणें, अ० तत्संबंधी धूम मुखवायूनें आंत घेणें; तपकीर इ० ओदणें, अ० नासिकाद्वारानें आंत घेणें; रेघ, पट्टा, इ० ओदणें अ० ताद्दश अंकन व्यापारानें तो तो निर्मिणें; ३, जमीन लागवडीस यावया करितां चोहों कडेस बांध

बांध मध्यें सरवल पडे अशी खननादि संस्कारानें संस्कृत करणें; कोणेकाचें देणें, इ० ओदणें इ० स्थली न देतां कांहीं काल राखणें; शब्द इ० ओदणें अ० स्वच्छपणें बाहेर न पडतां कुंदित होणें.

ओदतें, न० (ओदणें-) ओदणें द्वितीयार्थीं; घेणें धातुयोगीं अ०.

ओदवणें, दुःखमद्यें भारुन्ध, कि० तत्कृत दुःखरूप फलतें अवश्य भोक्तव्यत्वादिरूपें उपस्थित होणें; २, यं० कांहीएक पदार्थाचें ग्रहण इ० करावयासाठीं हस्तादि पुढें करणें; उ० ओदवितो हात भाजिचा पाना.

ओदा, पु०(ओदणें-) ओद प्रथम द्वितीयार्थीं; २, गृहादिकांस बसलेला रवांब इ० नदळावा म्हणून त्यास आणि दुसऱ्या तुळई इ०कांस मिळून जें एक लांकूड मारितात तो; ३, उद्गमापासून दोन तीन कोसावर जाऊन नदीस मिळतो असा जो लहानसे नदीसारखा जलप्रवाहमार्ग तो; ४, निर्वाहखेंकरून अंगावर पडलेला संसारसंबंधी केर, पोतेरें, धुणीं, भांडीं, इ० जो कामाचा समुदाय तो: ओदणें धातुयोगीं अ०; उ० सारादिवस घरांतला ओदा ओदला पाहिजे; ५, भात, शेताची लावणी केल्यानंतर नवी पात फुटूं लागली म्हणजे जुनी पात जी मेलेली सुखलेली असत्ये ती ओढून काढण्याचा जो व्यापार तो.

ओदाताण, स्त्री० (ओदणें-ताणणें-) वस्त्रादि

दि पदार्थ अनेकांनीं चोहोंकडे ओढलें असतां विलक्षण ताण बसे असा जो कांहीं त्याजकर संस्कार होतो ती; २, ला० एकसमयीं अनेक कार्यें एकासच उपस्थित झालीं असतां त्याची होये जी तारांबळ ती.

ओढाळ, ३लिं० चरीं तृणादि भक्षायास असतांही लोकांचे घरांत, शेतांत, इ० जाऊन रवावें, नाश करावा, अशा स्वभावाचें ढोर जें गुरूं तो; उ० यं० मनहें ओढाळ गुरू, परधनपरकामिनीकडे धांवें

ओढाळकी, स्त्री० (ओढाळ०) ओढाळपणा.

ओढिस्त, ३लिं० ओढगस्त.

ओढील.ओढीळ, स्त्री० ओढण द्वितीयार्थीं

ओणवणें, (ओणवा०) कोणेकानें ओणवा होणें.

ओणवा, ३लिं० कंबरेपासीं देह लववून धनुष्याकार स्थितीनें जो उभा राहिला तो.

ओत, पु० ऊत; २, नद्यादिकांचा जो ओघ तो.

ओतणें, पात्रांतील जल, धान्य, इ० पदार्थ तें पात्र वांकडें करून तन्मुखद्वारा बाहेर पात्रांतरादिकांचा ठायीं पाडणें; २, उतणें; ३, धातूचा रस सांचांत ओतून प्रतिमापात्र इ० निर्मिणें

ओतारी, पु० (ओतणें०) मूर्ति, भांडीं, इ० ओतण्याचें कसब करितो तो.

ओतींव, ३लिं० (ओतणें०) ओतून केलेलें जें भांडें, मूर्ति, इ० तो.

ओतींवथालीपीठ, न० कढई इ० कांत तेल. तूप घालून जोंधळा, हरभरा, उडीद, इ० कांचें पीठ पाण्यांत कालवून पातळ करून त्यांत ओतून शिजवून जें भक्षणार्थ करितात तें.

ओथंबणें, वरील पुष्पादि काद्याया करितां वृक्षाची डाहाळी इ० वांकविणें, कि० तो वृक्ष.शाखा, इ० फलादिभारानें वांकला जाणें

ओथंबा, पु० लतेस आरोहणार्थ जो यष्टी इ० रूप आश्रय पुरित असतात तो.

ओंदण, न० कों० कोठार, दुकान, इ० कांचा फळ्या बसवावयाकरितां खंचणी घेतलेलें जें लांकूड वर, खालीं, बाजूस बसवितात तें.

ओदन, पु० सं० तांदूळ शिजवून करितात जो भात तो; शाल्योदन, दध्योदन, इ० समास: ओदनाचें ग्र० संकेतानें भोजनास ग्र०.

ओंध, स्त्री० मा० पर्जन्यकाळीं पर्जन्य तादृश न पडतां अभ्रांची मात्र निबिड व्याप्ती झाली असतां अशी जी कांहीं काल दिगवस्था होत्ये ती; मेघकृतक, घालणें धातुयोगीं ग्र०.

ओंधट, ३लिं० कों० (ओंध०) जेथें प्रकाश बहुतनाहीं असें स्थल कि० दिवस, तो.

ओप, स्त्री० धातुमय जो अलंकार, पदार्थ, इ० त्यास चकाकी यावया जोगा कवडी, ओपणी, इ० कानीं घोटून करितात जो संस्कार, ती, कि० तेणेकरून येत्ये जी चकाकी ती; २, प्रातःकाळचें कोवळें जें ऊन ती.

ओपणी, स्त्री० ओपसळई.

ओपंणें, (अर्पण सं०) आपण अंगीकारलेला जो कारभार, अधिकार, इ०, कि० कांहीं

हीं फल,पुष्प,इ०पदार्थ तो दुसरा जो कोणी पुत्र,प्रधान,इ०त्याचे स्वाधीन करणें;२,विकणें;३,(ओप०) वस्त्रानें स्वच्छ पांढरें व्हावयाकरितां पुनःभिजावें पुनः उन्हांत वाळावें अशा संस्कारानें संस्कृत होणें.

ओपतें,न०कों०(ओपणें०) ओपत घातलेलीं जीं वस्त्रें तीं प्र०.

ओपसळई,स्त्री०(ओप सळई०) सोनार इ०कांचें अलंकारादिकांस ओप देण्याचें गारेचें एक औत असतें तें.

ओपावणें,रा०ऊर्ध्वस्थित,क्रि०दूरस्थित जो पदार्थ तो घ्यावा इत्याद्यर्थ शरीराचा तोल संभाळून पायांचे अग्रावर उभें राहणें

ओपींव,३लिं०(ओपणें०) ओपऊन स्वच्छ केलेलें जें वस्त्र तो.

ओफटणें,(ओप हटणें०) रोगादि विकृति मुळें शरीर,क्रि०सुरवटवदवी जाऊन निस्तेज होणें

ओबडधोबड,३लिं०आबडधोबड.

ओंबण,न०(ओंबणें०) घराचे वाशांवर तृण, कवलें इ०राहाण्याकरितां आडवीं शिरीं कारव्या.इ०बसवितात तें.

ओंबणें,घर ओंबणानें विशिष्ट करणें.

ओंबळणें,अंगवस्त्र इ०यथाकथंचित् धुणें.

ओंबी,स्त्री०गव्हांचे झाडाचा धान्य विशिष्ट तुरा ती,क्रि०तत्संबंधी ओला दाणा ती.

ओमण,न०ओंबण.

ओमणें,ओंबणें.

ओय

ओय,अ०कांहीं वेधना दुःसह झाली असतां हा उद्गार नियतो.

ओयरण,न०कों०जांत्यांत एकवार घालावयाचें जें धान्यादि तें तितकें;२,स्त्री०गोठ्यांत दोहों गाताडयांचे मध्यें वैरण घालावयास जी जागा राखिली असते ती.

ओयरणें,वैरणें.

ओयरा,पु०(ओयरणें०) नित्यांत पाकार्थ निराळें काढून घेतात जें तांदूळ,डाळ,इ०धान्य तो;२,कों०स्वयंपाकगृह.

ओररवडणें,(ओररवडा०) शरीरादि पदार्थ ओररवडयानें खुरकरणें;२,ला०निरक्षरपणें स्थित जें पोर त्याणें सरासरी वेदशास्त्रादिरूप जें अक्षर तत्संस्कार विशिष्ट होणें;उ०हा केवळ निरक्षर नव्हे कांहीं ओररवडला आहे;३,कोठें नांगर लागला कोठें नलागला,कोठें लेरवणी लागली.कोठें नलागली, कोठें तासणी लागली नलागली,अशा प्रकारचें जें नांगरणें,लिहिणें,तासणें,इ०तेथें प्र०करितात.

ओररवडा,पु०शरीरादिकांवरून कांटा,नख. इ०बलानें ओढलें असतां वरील त्वचा दुरवून निघते जी रेषा तो.

ओररवाडणें,ओररवणें.

ओररवाडा,पु०ओररवडा.

ओरट,पु०मिरचा,तेल,इ०अग्नींत पडलेंअसतां,क्रि०भाजत,करत देवलें असतां त्या धूमाबरोबर जो दुःसह गंध नियतो तो,क्रि०

मिरचा

मिरचा इ० कांचें नाका तोंडांत आवयाजागें उधळतेंजें बारीक रज तो.

ओरड, स्त्री० अरड प्रथमार्थी.

ओरडणें, अरडणें.

ओरडा, पु० अरडा.

ओरडाआरड, ओरडाआरडा, स्त्री०पु० अरडाओरड.

ओरपणें, अंबील, कणेरा, कढी, इ० पदार्थ भुरके मारीत भराभर खाणें; २, वरील खचा कांहीं कांहीं निघे इतकें अतिशयित खाजविणें; ३, दंड, वृक्ष, शाखा, इ० कांस संबद्धजीं पर्णें, पुष्पें, इ०, कि० लिप्त झालेलें जें घृत, अन्न, मृत्तिका, इ० तें त्यापासून एकदांच निघे असें मुष्यादिकानें तो दंडादि दृढ धरून बळानें ओढणें एथें पक्षी त्या पर्णादिकांसही कर्मीता; ४, मोडशी इ० विकार दूर व्हावा म्हणून लोखंड तापवून तळव्यावरून ओढावें अशा संस्कारानें हात, कि० पाय संस्कृत करणें.

ओरबडणें, ओरखडणें प्रथमार्थी; २, वृक्षाची टहाळी, कि० त्याजवरचा पाला, पुष्पें, इ० ओरपणें

ओरबडा, पु० ओरखडा.

ओरबाडणें, ओरबडणें.

ओरबाडा, पु० ओरखडा.

ओरवा, पु० वरवा.

ओरा, पु० लाडवासारखा सारखेचा गोळा बांधिला असतो तो; २, कों० क्षेत्र खंदफार असलें म्हणजे एकदांच नांगरलें जात नाहीं म्हणून त्यामध्यें दीर्घ मंडळाकार नांगरफिरवायास जे अनेक विभाग कल्पितात ते प्र०.

ओरी, स्त्री० ओवरी.

ओर्क, न० वाद्य विशेष आहे.

ओल, स्त्री०न० भूमि, भिंत, वृक्ष, शरीरावयव, इ० कांचे अंगीं पर्जन्यादियोगानें असत्ये जी आर्द्रता ती; २, योजलेलें जें कांहीं कार्य तें होईल अशी संभावना द्दाया जोगें कांहीं दिसतें जें लक्षण तें ती; ३, स्त्री० शत्रु इ० कानें आपल्यापाशीं कांहीं एक गोष्टीविषयीं केला जो करार त्या प्रमाणें त्याचा वर्तनाचा आपल्यास विश्वास येत नाहीं म्हणून, कि० आपलें काम कांहीं त्याला अडवून करून घ्यावें, म्हणून तें काम इ० होईपर्यंत त्याचें मनुष्य, रत्न, इ० कांहीं अडकावून ठेवावें आणि कार्य झालें म्हणजे माघारीं द्यावें, कि० तादृश संकेतानें अडकावून ठेवितात जो मनुष्यादि ती; ४, एकेपन्ह्याचें मा० फाडींव पांच सात हात लांब असें जें वस्त्र, जें शेल्या सारखें पांघरतात, पलंग पोसा सारखें गादीवर घालतात इ० उपयोगीं आहे ती.

ओलट, स्त्री० कों० (ओलें-काष्ठ) जाळाऊ व ओलीं जीं तोडलेलीं लांकडें ती; २, लिं० ओलसर.

ओलटा, पु० कों० (ओलट) ओल्या लांकडाचा बारीक तुकडा तो; वृक्षादिकांवरून फलादि

फलादि पाडायास मारायाचे प्रसंगीं प्र०.

ओलंडणें, गतिद्वारा विवक्षित देश उल्लंघित करणें; २, गमन करतानां कोणेक पदार्थ देंगाचा मध्यें पडे असें करणें.

ओलंडा, पु० गळवें झालीं असतां तीं जावीं त्यणून एके फडक्यांत सात बिब्बे घालून सात गांठी देऊन तें रस्त्यांत टाकितात तो; कि० तें जाणें ओलंडलें त्यास तत्सदृश विकृति विशेष होतो तो; ओलंडा बाधणें क्रि० उपदंश रोग जास आहे, त्याणें जेथें लघुशंका केली असल्ये तेथें आपण केली इ० तदीय संबंधानें तो उपद्रव आपणास बाधणें.

ओलपटणें, कों० (ओलपटा) ओलपटा. कि० तत्सदृश अन्य कांहीं वृक्षादिकांवर फेकणें.

ओलपटा, पु० कों० ओलटा.

ओलवण, न० (ओलवणें) भात, भाकर, मृत्तिका, इ० कोरडा जो पदार्थ तो ओला करायाचें साधन ताक, पाणी, इ० तें.

ओलवणें, (ओला) कोरडा जो पीठ, गहूं, इ० पदार्थ तो जल, घृत, इ० कानें ओलसर करणें; २, स्नान समयीं नेसलेलें वस्त्र अवश्य भिजतें त्यास तें नेसलेलें वस्त्र भिजवायाचें नसतां त्या स्थानीं दुसरें वस्त्र योजणें; कदाचित् नेसलेल्या पहिल्यावस्त्रा सुध्यां स्नान केलें असतां प्र० होनो.

ओलवत, स्त्री० कों० (ओला) उन्हाळे दिवसांत गुरानीं भक्षायाजोगें जें ओलें तृण, पाला, इ० कोठें कोठें असतें तीं.

ओलसर

ओलसर, वि० मा० किंचित् ओला तो.

ओला, वि० उदकादिकानें भिजलेला, कि० जाचे अंगींचा जलांश सुरक्षला नाहीं असा जो काष्ठ, पर्ण, वृक्ष, इ० पदार्थ तो; २, कोरडा जो आदर, भाषण, ब्रह्म ज्ञान, इ० तत्प्रतिपक्षी जो आदर इ० तो.

ओलाचा, वि० (ओल) जमीनीचा अंगची जी ओल तिचा योगानेंच त्यणजे दुसरें पाणी न शिंपता केलेला जो ऊस इ० तो.

ओलाचिंब, वि० (ओला-चिंबट) कार्याचा थायीं विनियोग करायास जाचा कोरडेपणा अपेक्षित आहे तो वस्त्रादि पदार्थ ओलेपणा मुळें परिधानादि कर्माविषयीं अनर्ह असतां त्यास त्य०.

ओलांडणें, ओलंडणें.

ओलांडा, पु० ओलंडा.

ओलाणी, स्त्री० (अवलंबन-सं०) वस्त्रें इ० ठेवायाकरितां बांधितात जी दोरी ती.

ओलाणें, न० (अवलंबन-सं०) लोखंडाचा आकार विशेषाचा दिवा असतो तो टांगावयाकरितां जी दोरी बांधली असल्ये तें; २, घरांतील मनुष्यानीं स्नान करिते समयीं ओलवायाकरितां एक वस्त्र नियुक्त केलें असतें तें.

ओलावा, पु० (ओल) भूम्यादि पदार्थांचा थायीं ईषत् जो ओलेपणा असतो तो; २, ला० प्रार्थनादि श्रवणानें कोणेकाचे हृदयास यत्किंचित् होतो जो सद्भावपणा तो; ३, ओल हितीयार्थी; ४, प्रपंच, सन्मार्ग, इ० व्यवहारीं अपेक्षित जो द्रव्यां-

ज्ञा

श, भगवद्भक्ति, इ० रूप तत्वांश त्याचें जें सत्व तो.

ओलास्त्रा, पु० (ओल·आस्रा·) भूम्यादिसंबंधी ओलाचा जो आश्रय तो; उ० ही भाजी ओलास्त्रा सहेव त्रणजे वाळणार नाहीं; २, ओला वाहितीयार्थीबांचून

ओलीकूस, स्त्री० (ओला·कूस·) नूतन प्रसूत झालेली जी मनुष्यादि स्त्री तीचा तो रजस्राव आहे पर्यंत जो गर्भाशय तो; पुनः गर्भधारणाचा प्रसंग असतां म०.

ओलें, न० (ओला·) भिजलेलें जें वस्त्र तें; २, पशूनीं भक्षायाजोगें हिरवें तृण, पाला, इ० तें.

ओलेटा, ओलेडा, ओलेता, वि० (ओला·) नेसलेलें वस्त्र जाचें ओलें आहे तो.

ओलेंपालें, न० (ओला·पाला·) ओलें द्वितीयार्थीं.

ओल्हाँटणें, कों० ओलपटणें.

ओल्हाटा, पु० कों० ओलपटा.

ओंवणें, मणि, पुष्प, इ० कांचे छिद्रांत दोर, दोरा, इ० भरणें, कि० दोरा इ० कांत मणि, पुष्प, इ० भरणें; २, ला० श्लोक, वाक्य, इ० कांत पदें, अक्षरें, कि० कांहीं अर्थ इ० संबद्ध करणें.

ओवरा, पु० गृहामध्यें जें पाकगृह असतें तो.

ओवरी, स्त्री० देवालय, तीर्थ, इ० कांचे समीप यात्रेकरू, तपस्वी, इ० राहावयाकरितां दगड, विटा, चुना, इ० कानीं बांधिली असते जी धर्मशाला ती, कि० तिचे जे अवांतर विभाग ते म०.

ओंवसा

ओंवसा, पु० वसा.

ओंवळा, वि० केवळ सोंवळा नव्हे, आणि विटाळाचा नव्हे असा जो मध्यस्थित मनुष्य. वस्त्र, इ० तो.

ओंवा, पु० एक ओषधीबीज आहे तो. कि० त्याचीं झाडें तो.

ओंवाळणी, स्त्री० (ओंवाळणें·) आपल्यास कोणी दिवाळी इ० कांमध्यें ओंवाळलें असतां त्यास सन्मानार्थ जें द्रव्यादि देतात तीं; २, कथादिकांचे समाप्तीस हरिदास इ० कांवरून पैसा इ० ओंवाळून टाकितात तीं.

ओंवाळणें, (अवज्वलन·सं०) दीपादिक हातीं घेऊन मंगलार्थ देवता, नवरामूल, इ० कांचे मुखासमोर प्रदक्षिण फिरविणें; पक्षीं त्या दीपादिकांस करणता आणि त्या राजादिकांस कर्मता येत्ये.

ओंवी, स्त्री० (ओंवणें·) प्राकृत भाषेंत केचिनेचा एक छंद आहे; २, दळणें, ओंपाळ्यावर बसणें, मुलास हलविणें इ० समयीं स्त्रियानीं त्रणायाचे गीतविशेष आहेत ते म०.

ओशट, न० (अवशिष्ट·सं०) तेल, आणि तूप, यांचे अंगीं सारांशनिष्ठ स्निग्धत्व त्रणून जो धर्मविशेष असतो जाचे योगानें तें तैलादिक हस्तादिकांस लागलें असतां कांहीं विलक्षण बुळबुळीतपणा येतो तें, आणि तद्विशिष्ट जें तैलत्वावच्छिन्न आणि घृतत्वावच्छिन्न जें तेंही; उ० ज्वर आला असतां ओशट कांहीं खाऊं नये; २, वि० तेल, तूप, यांचे संपर्कानें

पर्कीनें बुळबुळीत झालाजो हस्त, वस्त्र, पात्र, इ० पदार्थ तो.

ओशात, ओशाद, स्त्री० कों० वृक्ष, दीप, बाज, मनुष्य, इ० कांची जी छाया ती, परंतु तिचा सेवनाविषयीं अनौचित्य जे ह्मां विवक्षित आहे तेह्मां म०.

ओशाळकी, स्त्री० ओशाळगत.

ओशाळगत, स्त्री० (ओशाळा०) ओशाळेपणा.

ओशाळणें, (ओशाळा०) ओशाळा होणें.

ओशाळा, ३लिं० कांहीं आपलें दुष्कर्मादि दुसऱ्यास समजूं नये तें समजल्यामुळें मुखश्री उतरे असा लज्जित झाला जो तो; २, दुसऱ्याचे उपकारादि भारानें केवळ दबेला झाला जो तो त्या उपकारादि कर्त्याचा.

ओशाळी, स्त्री० ओशाळगत.

ओशाळीक, स्त्री० ओशाळगत.

ओशेट, न० ३लिं० ओशट.

ओशेटा, पु० वृक्षादिकांची जी छाया तो; २, मनुष्यादि पदार्थांचें केवळ व्यक्त ज्ञान न ह्मावयाजोगी दूरत्वादिदोष, नेत्र मांद्य, इ० कारणामुळें दिसत्ये जी तत्तदाकार ज्ञापक छाया तो.

ओषध, न० औषधाचा अपभ्रंश.

ओषधी, स्त्री० सं० एकवार फलें आलीं ह्मणजे मरतात अशीं जीं झाडें तीं म०; २, वृक्ष, लता, तृण, इ० जे भूरुह उद्भिज्ज पदार्थ त्यांस सामान्यतः स्त्री०; ३, ३लिं० औषधोपयोगीं जे वृक्ष, लता, काष्ठ, मूल, इ० तो.

ओष्ठ, पु० सं० ओंठ.

ओष्ठभाषा, स्त्री० (ओष्ठ·भाषा०) बहिरा इ० कांशीं बोलावयाचें असतां तत्तच्छब्दोच्चार मसंगीं जसे ओंठ हलतात तसे ओंठमात्र हलवून दाखवावे त्याजवरून त्याणें समजावें असा जो भाषासंकेत त्यास स्त्री०.

ओष्ठ्य, ३लिं० सं० ओष्ठव्यापारसापेक्ष जांचा उच्चार असेजे उ, प, फ, इ० वर्ण ते म०.

ओष्णावणें, ओष्णेणें, रा० ओसणणें.

ओस, ३लिं० उजाड.

ओंस, स्त्री० कों० (ओसणें०) भात झोडल्यावर त्या तृणाचा पेंढ्या बांधते समयीं कवळी अग्रभागीं धरून झाडली ह्मणजे त्यांतून ओंबूड कुजका तृणांश जो खालीं पडतो ती; २, पु० वा० नाकाचे आंतलें जें हाड तो.

ओसगी, स्त्री० एक वृक्ष आहे.

ओसणणें, (उत्स्रंभ·सं०) निजेत बोलणें.

ओंसणें, कों० नारळ, पोफळ, शेंग, अंबाडीची काठी, इ० सोलणें.

ओसद, स्त्री० रा० सावट.

ओसंबणें, रा० रुदन आदपण्याचे अवसरीं त्या रुदनाचे वेगानें हृदय, कंठ, इ० कांस जे हिसके बसतात श्वासोच्छ्वास कांहीं विलक्षण होतो असें जें कांहीं होनें त्याणें युक्त होणें.

ओसर, स्त्री० पु० (ओसरणें०) मार्गादिकांचा ठायीं आपण एकीकडेस होऊन दुसऱ्यास देतांजो अवकाश ती; २, नद्यादिकांचें जलसूज, इ० कांचा भाराचा जो कमीपणा तो.

ओसरणें, (अपसरण·सं०·ओसरण·बाल०)

उत्तरोत्तर वर्धमानता पावत होतें जें दुखणें, सूज पर्जन्य, दुष्काळ, नदीचा पूर, इ० त्याणें मागें हटणें.

ओसरी, स्त्री० ओटी.

ओसा, पु० क्रमानें निबिडपणें रुजलेलें जें आंवण, किं० मिरचा इ० कांचें रोप इ० त्यांचा मधून मधून अंश नाहींसा झाल्यामुळें जें रिकामें स्थल राहतें तो.

ओसाड, २लिं० उजाड.

ओसाडी, स्त्री० (ओसाड) उजाडी.

ओसार, पु० ओसर.

ओसारा, पु० ओसरहितीयार्थी.

ओः हो, अ० आश्चर्याचा उद्गार आहे.

ओहोट, पु० (ओहोटणें) भरती संपल्यानंतर उत्तरोत्तर पाणी न्यून व्हावें, अशी जी समुद्राचे पाण्यास अवस्था होत्ये तो

ओहोटणें, (अव० सं० अटन० सं० हटणें मा०) समुद्राचें पाणी ओहोटानें विशिष्ट होणें.

ओहोटी, स्त्री० ओहोट.

ओहोडणें, ओढणें.

ओहोण, न० कों० (वाहणें) पर्जन्यकाळीं डोंगर इ० कांवर सांचलेलें जें पाणी नेंशेतांत यावया साठीं जी वाट करितात तें.

ओहोर, पु० कों० समुद्राचे कांठीं पाण्याचे वेगानें रेती खणून जा लांबट खड्या पडतात जांतून पाणी वाहून समुद्रांत जात असतें त्या म०; २, खाडीचा जो लहानसा फांटा तो; ३, न० दे० वहर.

ओहोरणें

ओहोरणें, होरणें.

ओहोरा, पु० कों० ओराहितीयार्थी.

ओहोळ, पु० (वाहणें) लहानसा जो ओघ तो; २, ओघळ.

ओहोळणें, ओघळणें; २, कों० उलंडणें.

ओहोळी, स्त्री० कों० ओहोळ प्रथमार्थी.

ओळ, स्त्री० (आवलि सं० वळ मा०) कांहीं पदार्थ समसूत्रानें संनिविष्ट होत गेले असतां होतो जो रचनाविशेष तो; २, अक्षरें इ० कादायासाठीं कादितात जी रेषा ती; ३, ला० वर्तनाविषयीं सभ्यपणाची जी रीति ती; कांहीं एक गोष्ट ओळीस येणें रू० बोलणें, इ० विषयीं ओघास येणें.

ओंळक, ओळक, पु० कों० डेरा इ० कांतून ताक इ० कादायासाठीं नारळाचे बेल्यास काठी लावून करितात जें पात्र. किं० काठी न लावितां जें बेलें तो; २, तत्सदृश तांबें इ० कांचाही करितात तो.

ओळकंबणें, अधांत्रीं लोंबत राहावयाजोगें वरील कांहीं आधाराशीं संबद्ध होणें.

ओळकंबा, पु० (ओळकंबणें) ओळकंबत राहायाजोगा वरील आधाराचा हस्तानीं करितात जो संबंध तो; घे, मार, धातुयोगीं म०.

ओंळकी, स्त्री० रा० लहान जो दांडा लावलेला ओळक ती.

ओळकुंबा, पु० ओळकंबा.

ओळख, स्त्री० (ओळखणें) एकवार प्रत्यक्ष झालेला जो कांहींएक अर्थ त्याचे ज्ञानाचा

कालांतरीं

कालांतरीं पुनः त्या अर्थाचें प्रत्यक्ष झालें असतां हा असुक असें ज्ञान व्हावयाजोगा अंतःकरणांत राहिला असतो जो संस्कार तो;२, मनुष्यादिकांचा परस्परें जो परिचय तो;३, ओळख पटावयासाठीं साधनभूत जी खूण ती; ओळख देणें क्रि० अनोळखी जो दुकानदार इ० त्या पासून उधारपाधार इ० घ्यावयाचें असतां त्याला विश्वास येत नाहीं त्यणून उभयतांचे ओळखीचा जो कोणी निसरा त्याचे मुखें स्वविषयीं विश्वास उत्पन्न करविणें, किं० गुणपणें अंगीं असतो जो गुण, किं० हृदयांत कर्तव्यादिविषयीं असतो जो संस्कार तो प्रसंगी दर्शविणें.

ओळखणें, (उप० लक्षण-सं०) पूर्वी जाचें प्रत्यक्ष झालें असतें त्याचें पुनः प्रत्यक्ष झालें असतां हा असुक अशा प्रकारें जाणणें

ओळखदेख, स्त्री० (ओळखणे-देखणें) ओळख, परिचय, सख्य, इ० ती.

ओळखपाळख, स्त्री० (ओळख-सोप) ओळखदेख.

ओळखी, ओळखीचा, वि० (ओळख) परस्पर ओळख जांची आहे ते परस्पर.

ओळखीदेखी, ओळखीदेखीचा, वि० (ओळखदेख) ओळखी, सखा, सोयरा, इ० तो.

ओळखीपाळखी, ओळखीपाळखीचा, वि० (ओळखपाळख) ओळखीदेखी.

ओळंगर, पु० रा० ओघळ प्रथमार्थी.

ओळण

ओळण, स्त्री० कों० दिवा अडकावयासाठीं जी दरवाजामध्यें दोरी, कडी, इ० संबद्ध करून ठेविली असते ती;२, ओलाणी.

ओळंबणें, (अवलंबन-सं०) हात, पाय, इ० चिरकाल लोंबत राहिल्यामुळें खालीं रक्त उतरून भारावणें.

ओळंबा, पु० (ओळंबणें) भिंत इ० कांचा उजूपणा, वांकडेपणा, इ० समजावा इ० त्यार्थ उंच धरून लोंबवून पाहनात जो एके दोरास बांधलेला शिसें, दगड, इ० कांचा गोळा इ० तो.

ओळंबी, स्त्री० कों० (ओळंबणें) गाय, म्हैस, इ० अशक्त झालीं असतां मानेखालीं रक्त उतरून जमतों जो गोळा ती.

ओळविणें, कों० वळवणें द्वितीयार्थी.

ओळा, पु० कों० (ओळ) ओज द्वितीयार्थी.

ओळाणें, न० ओलाणें प्रथमार्थी.

ओळी, स्त्री० रा० ओहोळी.

ओळीचा, वि० (ओळ) विद्वत्ता, कुलीनता, संपत्तिमत्ता, इ० कानीं जो जाशीं समान योग्यतेचा तो त्याचे;२, सभ्यरीतीचा जो कोणी मनुष्य तो.

ओकात, ओकाद, स्त्री० अवकाद.

ओकाळ, पु० अवकाळ.

ओचित्य, न० उचितपणा.

ओज्वल्य, न० उज्वलपणा.

ओट, वि० साडेतीन.

ओटकें, न० (ओट) साडेतीनींहींचा शंभरापर्यंत जो लेख शिकिवतात तीं.

ओन

ओत, न० आऊत.

ओत्सर्गिक, वि० सं० उत्सर्गतः प्राप्त जो कांहीं एक अर्थ तो.

ओत्सुक्य, न० सं० उत्सुकपणा.

ओदार्य, न० सं० उदारपणा.

ओदासीन्य, न० सं० उदासीनपणा.

ओदुंबर, वि० सं० उदुंबर संबंधी जें काष्ठ, पर्ण, इ० तो; २, पु० उदुंबरासच कोणी स्त्री०.

ओद्धत्य, न० सं० उद्धतपणा.

ओपचारिक, वि० सं० उपचार संबंधी तो.

ओपरोधिक, वि० सं० उपरोधिक.

ओपाधिक, वि० सं० उपाधिसंबंधानें सिद्ध जो गुणादिक तो.

ओरस, वि० सं० स्वस्त्रीचेठायीं स्ववीर्यानें उत्पन्न झालले जें अपत्य तो.

ओरसचौरस, अ० अवरसचवरस.

ओर्ध्वदेहिक, न० सं० उत्तरकार्य.

ओषध, न० सं० जाचे सेवनानें रोगनिवृत्ति होऊन पुष्ट्यादि गुण उत्पन्न होतात असा झाड, पाला, मुळी, काष्ठ, धातु, रस, रसायन, मात्रा. इ० तें; २, ला० जाचे योगानें विवक्षानुरूप कार्य सिद्ध होतें असा जो द्रव्य क्रियादिरूप कांहीं अर्थ त्यास स्त्री०; ३, संकेतानें सोमल, अफू, इ० कांस स्त्री०; कांहीं पदार्थ ओषधास नाहीं इ० स्थलीं तो पदार्थ ईषन्मात्रही नाहीं,

ओषधी, वि० ओषधी द्वितीयार्थी.

ओक्ष, न० आऊक्ष.

ओक्षवण, न० विवाहादि शुभकर्मीचेठायीं ओंवाळायास आणितात जो दिवा तें; ओक्षवण करणें, क्रि० तो दिवा ओंवाळणें.

क, हा प्रत्यय संस्कृत नाममात्रापुढें विकल्पेंकरून स्वार्थी होतो, तसाच बहुव्रीहि समासापुढें प्रायः याचा म० होतो; उ० पुत्रजो तोच पुत्रक: देवदत्त आहे नाम जाचें तो देवदत्तनामक.

कईक, ३ लिं० केक; एतादृशक पुढें ई लागून जे शब्द आहेत ते के अशा उच्चारे म्हणावयाचा बहुत लोकसंप्रदाय आहे म्हणून ते के याचा क्रमांत लिहितो; उदाहरणार्थ एकमात्र एथें लिहिला आहे: तसेच क पुढें ऊ लागून जे कऊल, कोल, इ उभयविध शब्द होतात ते को याचे क्रमांत लिहितो.

कंक, पु० एक पक्षी आहे जाचे पिसांचा पिसारा करितात तो.

कंकण, न० स्त्रियांचे हातांतील भूषण आहे; २, यज्ञादिकांत मंत्रून दोरा हातांत बांधितात तें; कोणेक गोष्टी विषयीं हातांत कंकण बांधणें म० त्या त्या गोष्टी विषयीं अभिमान बाळगणें असा अर्थ.

कंकणी, स्त्री० कंगणी.

कंकर, पु० लाहान लाहान जे खडे ते प्रत्येकीं; २, मृदंग, नगारा, इ०कांस ओदणी करितां जी वादी लाविली असतात तो.

कंकरी, स्त्री० वळींव रेशमाचे चंवगा इ०कांभोंवते दाहा पांच वढे गुंडाळून जो आकार विशेष केला असतो ती.

कंकोल, कंकोळ, पु० मिऱ्या सारखा एक औषधी पदार्थ आहे.

कंगणी, स्त्री० स्त्रियांचें हस्त भूषण आहे; २, पागोट्याचे बिनीवर एकावर एक पटया चढवून जी उंच केली असती ती; ३, भिंत, काष्ठ, इ०कांस कंगणीचे आकाराचा जो उंचवटा सारिवतात ती.

कंगणीदार, ३ लिं० कंगणी आहे जास असें जें पागोटे, भिंत, इ० तो.

कंगाल, ३ लिं० दरिद्री.

कंगाली, स्त्री० कंगालपणा.

कंगोरा, पु० कंगणी तृतीयार्थी; २, भिंत, लांकूड, इ० चतुष्कोणाद्याकार केलें असतां धारा सारिख्या शिरा पडतात तो.

कच, स्त्री० चढूंकडून संकटें आल्यामुळें आंत कोंडावयाजोगी जी अडचण प्राप्त होती ती; २, कचक प्रथमार्थी; ३, कचकच लागावयाजोगा पीठ, गूळ, इ०कांमध्यें जो रेती इ० अंश असतो ती; ४, भयादिकामुळें कांहींएक कार्यापासून मागें सरण्याचा जो प्रकार ती, स्त्रा, धा० योगींचे प्रा० प्र०.

कच्चक, स्त्री० तलवार, इ० शस्त्रांचा, किंवा लत्ताप्रहार. कठोर भाषण, इ०कांचा कचकच शब्द व्हावयाजोगी जी युद्धाची, कलहाची, उभय पक्षांस आवेश चढल्या मुळें पराकाष्ठा होती ती; प्र० झड, उड, इ०; २, खबरदार जें ओंझें, जेवण, इ० ती; ३, उसण; ४, पडदळ्यास जी चपरास असते ती.

कच्चकच्च, स्त्री० पिंगळ्याचा व दांताचा शब्दाचें अनु०.

कच्चकच्चणें, कचकच शब्द होई असें, दंतादिकानी वाजणें [illegible].

कच्चकच्चा, अ० कचकच.

कच्चकच्चाट, पु० कलहशब्द; २, कचकचशब्दांचा अतिशय तो.

कच्चकचीत, ३ लिं० पुरतान शिजल्यामुळें कठीण

ण राहिला जो भात इ०तो; २, अन्नादिकांत कचकच लागणें जें रेती इ०तो; ३, रा० ठळक दिसावया जोगा अलंकार, मोतीं इ०तो.

कच्चकडा, पु० कांसवाचे पाठीचें जें हाड तो.

कच्चकणें, युद्धादिकांत भय पावणें, कि०काष्ठ, हाड, इ० भारादिकामुळें केवल द्विधान होतां किंचित मोडलें जाणें; उ० घराची तुळथी कच्चकली; २, रा० कांहीं एक धरून त्याला हिसका बसे असें एकदांच ओढणें.

कच्च,-,कन,-कर,-दिशीं, अ० काचमडकें इ० फुटण्याचा, कि० शरीरादिकांत शस्त्रादि टोंचण्याचा, कि० दातांखालीं रेती इ० सांपडण्याचा जो शब्द त्याचें अनु० फुट, वाज, इ० कांचें वि०

कच्चकरणें, कचरणें

कच्चकल, पु० रा० अनेक पदार्थांचे तुकडयांचा समुदाय तो.

कच्चका, पु० बलानें कांहीं एकावर शस्त्रादिकांचा प्रायः कच शब्द होई असा जो प्रहार तो; २, कांहीं पदार्थास आंचका बसे असा ओढण्याचा जो व्यापार तो; कि० कोणेक मनुष्यादिकांचा कांहीं एक कार्यावर सवेग प्रवृत्तीचा जो प्रकार तो जाचे संबंधानें तत्क्रिया संबंधी पदार्थास दिकाव काढायास कठीण पडतें; उ० याचा कच्चका खवाळीं पोतर दोन महिनें टिकत नाहीं.

कच्चकावणें, ओकणें; २, शिवी गाळ, इ० कांनीं कोणेकास दटविणें; ३, दुर्वह जें काम त्याची दुर्वहता न गणितां झपाट्यानें करून टाकणें; ४, कच्चकणें द्वितीय तृतीयार्थी.

कच्चकाबून, अ० आपली सर्व शक्ति खर्चून, कि० विवक्षित वक्षित गोष्टीवर जितकी शक्ति पाहिजे त्यापेक्षां अधिक लावून, कर, जेव इ० कांचें वि०.

कच्चकून, अ० कच्चकावून: उ० मजल कंठायाची आहे कच्चकून जेव.

कच्चकोळ, पु० जाचे कांठ फुटून गेले आहेत असें जें मडकें तो; २, फुटलेल्या बांगडया इ० काचमय पदार्थांचा तसाच मृन्मयादि पात्रांचा तुकडयांचा समुदाय तो.

कच्चक्या, ३लिं० विवक्षितांची खुमखुम जिरवाया जोगा जो शक्तिमान तो.

कच्चणें, कचरणें.

कंचन, पु० एक पुष्पवृक्ष आहे.

कंचनी, स्त्री० कलावंतीण.

कच्चंबणें, कों० पाणि आदिकरून वाईट होई असें दबळणें.

कच्चमणें, कों० कच्चंबणें.

कच्चर, स्त्री० एक कंद आहे.

कच्चरणें, युद्ध, वाद, इ० व्यापारीं जो प्रवृत्त त्याणें भयादि उपस्थित झाल्यामुळें कच चतुर्थार्थी खवाणें.

कच्चरा, पु० केर, लांकूड, इ० कांचे बारीक तुकडे इ०तो; २, हळदिचे झाडा सारिखें एक झाड आहे.

कच्चरी, स्त्री० सुगंध द्रव्य आहे.

कंचा, ३लिं० कोणता.

कच्चाकच्च, अ० तोडण्याचे शब्दांचें अनु०; उ० त्यानें तलवारीनें कच्चाकच्च माणसें तोडिलीं; २, स्त्री० कच्चकच; ३, कज्जा; उ० त्याची व आमची कच्चाकच्च झाली.

कच्चाकची, स्त्री० तलवार इ० शस्त्रांचा कच्चकच शब्द

द्द ह्मावयाजोगा जो युद्ध प्रकार ती.

कच्चाच, पु० पिंगळा आदिकरून पारवरांचे शब्दांचा कलकलाट तो; २, ला० त्यांसारिखा मनुष्यादि शब्दांचा कलकलाट तो.

कच्चाचणें, पिंगळ्यानें कचकचणें.

कच्चाट, न० अनेक प्रकारचे प्रयत्नानीं साध्य, किं० निरंतर जाची काळजी बाळगावी लागती असा जो कांहीं एक व्यापार त्यास त्रासानें स्व०; २, दुःख भोगादिकें करून जाचा अवश्य निर्वाह केला पाहिजे असें जें कोणेकास उपस्थित झालें कांहीं एक त्यास स्व०.

कच्चाट्या, ३लिं० अनेक प्रकाचीं खटलीं, लचांडें, करण्याचा स्वभाव जाचा तो.

कच्चाटी, स्त्री० चहुंकडून चार संकटें आल्यामुळें अंतःकरणांत कोंडावयाजोगी जी अडचण प्राप्त होती ती; २, ३लिं० कच्चाट्या.

कच्चावणें, कचणें.

कंचुक, पु० अंगरखा, झगा, इ० तो; २, सर्पाची जी कांचन तो; ३, दाणा, इ० कांवर जें सालपट असतें तो.

कचुकी, स्त्री० चोळी, किं० कांचोळी; २, पु० सं० चोपदार.

कचेरी, स्त्री० राजकीय कारभार करण्याची जी जागा ती; २, तत्रस्थ कारभार करणार मनुष्यांचा समुदाय ती; ३, त्या स्थलीं जो राजकीय कारभाराचा चालूपणा तो.

कचोरा, पु० औषधी झाड आहे.

कचोरी, स्त्री० कचोरा; २, एक पक्कान्न आहे.

कचोळ, न० कचोळें.

कचाळें

कचोळें, न० गंधाक्षत ठेवायाचें एक पात्र आहे; २, कोचाळें.

कच्चा, ३लिं० पिकलें नव्हें असें जें, फल, पर्ण, गळूं, इ० तो; २, पुरतेपणीं, किं० अगदीच शिजला नव्हे असा जो भात, भाकरी, रसायन, तांदूळ, इ० पदार्थ तो; ३, पदार्थास दृढतादि येण्यास कारणीभूत जे संस्कारादि असतात ते पुरतेपणी, किं० अगदीच झालेनाहींत म्हणून विवक्षित दृढतादि गुण जामध्यें ताद्दश नाहीं तो; ४, मोठता पावलें नव्हें असें जें ज्ञान, बुद्धि, इ० तो; ५, पुरतेपणीं आलें नाहीं, किं० समजलें नाहीं असें जें विद्या, कलादि. किं० तद्विशिष्ट पुरुष त्या विद्यादिकांचा ठायीं तो; ६, उन्मानादि एक जातीय प्रमाणें दोहों प्रकारें प्रसिद्ध आहेत त्यांतील जें लाहान तो; ७, अवांतर पोटचे सर्व भेट जामध्यें घेतले आहेत असा हिशेब, वर्तमान, इ० तो; ८, कामामध्यें तोटा, नफा, होईल तो मूलधन्याचा, अशा बोलीनें कोणेकानें केली जी मामलत, इ० तो; ९, धुतल्यानें जावयाजोगा जो वस्त्र, इ० कांचा रंग तो.

कच्चीकमाविशी, कच्चीकमाविसी, स्त्री० तोटा व नफा धन्याचा अशा बोलीनें मामलत, इ० करण्याचा प्रकार ती

कच्चीकमावीस, स्त्री० कच्चीकमाविसी.

कच्चीबुद्दी, स्त्री० सोन्याचे रुप्याचे शाईचा वस्त्रावर बूटकादितात ती; २, ३लिं० तद्विशिष्ट पागोटें इ० तो.

कच्चेगिरी, स्त्री० व्यवहार, भाषण, इ० कामध्यें जो कच्चेपणा ती; उ० तुम्ही अगोदर कच्चेगिरी केली

स्व०

म्हणून फसला.

कच्छ, पु० नेसले वस्त्राचा पदर मागें खोवितात तो; २, कांसव; ३, देश आहे.

कच्छप, पु० कांहीं एक कार्य, किं० पदार्थ, कोणेकाचे कच्छपीं लागणें स्व० बरें वाईटाचा निर्वाह त्याणें करावयास प्राप्त होई अशा तऱ्हेनें त्याचें सें होणें; कोणेकानें कोणेकाचा कच्छपीं लागणें, स्व० विवक्षित काम करून घेण्याविषयीं कोणेक समर्थाचा आश्रय करणें, किं० त्याचे तंत्रानें चालूं लागणें.

कच्छी, वि० कच्छ देश संबंधी भाषा इ० तो.

कजलणें, कों० कदलणें.

कजली, स्त्री० कदली मथमार्थी.

कजारव, कजाग, वि० हिं० दांष्ट मनुष्य वृत्ति.

कजारवी, कजागी, स्त्री० हिं० कजारवपणा.

कंजारी, पु० स्त्री० ण, एक जाति आहे; २, जिचे केश पिंजारल्या सुळें भयंकर दिसतात तीस स्व०.

कजेल. न० **कजेली**. स्त्री० कदली मथमार्थी.

कजेलणें, कदलणें.

कज्जल, न० काजळ.

कज्जली, स्त्री० पारा व गंधक एके ठिकाणीं खलून रसायनार्थ जें द्रव्य करितात ती.

कज्जा, कज्या, पु० कांहीं एक अर्था विषयीं जी विप्रतिपत्ति, किं० त्यामुळें वादप्रतिवाद, शिवी गाळ इ० जो परस्परांचा व्यापार तो.

कज्जाचा, वि० तंट्याचा.

कज्जारखोकला, पु० लाहान मोठा कज्जा इ० तो.

कज्जाभांडण, न० कज्जारखोकला.

कज्जेरखोर, वि० कज्जा करण्याचा स्वभाव जाचातो.

कज्जेदलाल, वि० कज्जेरखोर.

कट, पु० कांहीं एक काम करण्याविषयीं अनेकांनीं केलेंजें ऐकमत्य तो; उ० तुम्हाला त्या सर्वांनीं वेगळे होण्याविषयीं कट केला आहे; २, बंदुकेस दस्ता व नळी मिळून जो बंद असतो तो; ३, वस्त्र, अंग, इ० कांवर जो मळाचा लेप बसतो तो; ४, कांहीं एक कार्य सिध्यर्थ अनेक प्रकारचे कष्ट भोगावे लागतात तो; प्र० खा, भोग, इ० कांचा योगीं; ५, दुसऱ्याचा प्रवेश आंत न व्हावयाजोगी सैन्यादि समुदायाचे स्थितीचा जो प्रकार तो; ६, सोंगट्याचे पटामजीं घरें असतात त्यांतला घरची सोंकटी मारूनये अशा संकेताचीं जीं घरें तीं प्र०; ७, सं० कटी; ८, पडद्यांत काळ्या घालितात त्याचा अग्र प्रदेशीं जे चर्माचे तुकडे लाविलेले ते प्र०; ९, पुरण शिजवून साराकरितां जें त्यांतील पाणीं काढितात तें; रा० कटास हात लावणें, स्व० कांहीं कार्या विषयीं केला जो एकमत्याचा संकेत त्यांत अंतर पडूं देणार नाहीं, स्वणून देवाचे पायरी इ० कांस हात लावून शपथ करणें.

कटई, पु० पडदा इ० कांस कट, चर्माचा लावून उपजीविका करणारी चांभारांत जाति आहे.

कटक, न० लष्कर; २, सं० कडें.

कंटक, पु० बाभळ, बोर, इ० झाडांस व कांहीं पर्णे, पुष्पें, यांस शरीरादिकांत टोचाया जोगा जो अवयव विशेष असतो तो; २, ला० यामादिकांस उपद्रव कारक जो लाहान साहान शत्रु, चाहाड, इ० त्यास स्व०; ३, निर्दय.

कटकट, स्त्री० कज्जा; २, किरकीर.

कटकटणें, वा० हळहळणें.

कटकटा, अ० यं० दुःखोद्गार आहे.

कटकट्या, ३लिं० व्यर्थ कटकट करण्याचा स्वभावजाचा तो.

कट-कन-कर-दिशीं, अ० कांकडी, लांकूड, इ० मोडण्याचें व मोडतांना मध्यें वाजण्याचे शब्दाचें अनु० वाज, इ० कांचें वि०.

कटंजन, न० कटडा.

कटणें, शरीर, वस्त्र, इ० मलादिकानें युक्त होणें; २, कांहीएक कार्याविषयीं जिवापरती मेहनत करणें; ३. तुटणें: उ० त्या युद्धांत हजारों माणसें कटलीं; ४, युद्धादिकांत तलवार इ० कानें शरीरावयव तुटणें; ५, कोणकानें कांहीं कर्मामध्यें बहुत काल पडल्यामुळें पूर्ण अभ्यस्त होणें.

कटदोरा, पु० कंबरेस बांधितात जो दोरा तो.

कटमस्त, ३लिं० बळकट असून पुष्ट तो.

कटार, स्त्री० एक शस्त्र आहे.

कटारा, पु० टेकून बसायासाठीं, किं० स्थल मर्यादार्थ लांकडाचे गरादे मारून जो आकार विशेष करितात तो.

कटारी, ३लिं० कटारीदार.

कटारीदार, ३लिं० कटारीचा आकाराचा जो वस्त्रादिकावर वेल, बूट, शिवण असतो तो; २, ज्याची विणकर कटारी सारिखी आहे असा जो गोफ, इ० तो.

कटाव, पु० आंत एकाएकी इतराचा प्रवेश न व्हावा व सुशोभित दिसावा असा जो सेनादि रचना प्रकार तो; २, यमकें भेद पदें इ० विशिष्ट, किं० अर्थ भरित दोष देण्याविषयीं एकाएकी दुसऱ्याची बुद्धि चालूं नये, असा जो भाषण, काव्य, इ० रचनेचा प्रकार तो.

कंटाळ, पु० कंटाळा.

कंटाळरोर, ३लिं० वाईट गोष्टीचा जास कंटाळा तो.

कंटाळणें, कांहीं पदार्थाविषयीं, किं० गोष्टीविषयीं कंटाळा पावणें.

कंटाळवाणी, अ० कंटाळा यावया जोगतें भाषण इ० क तो.

कंटाळा, पु० कांहींएक पदार्थाविषयीं, किं० गोष्टी विषयीं वाईटपणा वाटल्यामुळें जी अरुचि असती तो.

कटाक्ष, पु० नेत्र कोणानें कोणेक पदार्थाकडे अवलोकनजें प्रायः साभिप्राय असतें तो; २, तशा अवलोकनाचा जो प्रकार तो; उ० याणें माझेकडे कटाक्षानें पाहातांच मीं भ्यालों; ३, ला० सरळ वाच्यार्थावांचून इतर जो व्यंग्यादिरूप अर्थ तिकडेस जो भाषणाचा रोख असतो तो; ४, कोणेकावर कोणेकाची जी क्रोधदृष्टि असती तो; ५, ३लिं० निरंतर कांहीं शारीरश्रम करीत असतां दमूंनये असा जो कोणेकाचे शरीरीं पराक्रम असतो तो, तादृश पराक्रमविशिष्ट जें शरीर तो. व तद्विशिष्ट तो.

कटि, स्त्री० देहाचा जो मध्य प्रदेश तो प्रायः पुढचे भागीं नाहीं; २. कुक्षी खालचे भाग ते प्र०.

कटितट, न० कंबरेचा जो प्रदेश तें.

कटिबंध, पु० यमकें व प्रासयोंचा जो कवितेंत कटाव असतो तो; २, ३लिं० तद्विशिष्ट कविता, भाषण, इ० तो.

कटिशूल, पु० स्त्रीविषयजो काम त्यास स्र०.

कटिसूत्र, न० कटदोरा.

कटु, पु० जाला कडू, वनिस्वट स्र०तो;२,३ लिं०नद्विशिष्टतो;३, ला० अप्रियजें भाषणादि तो.

कटुकी, स्त्री० औषधी आहे.

कटुळतें, न०ग० सोनार, सराफ, इ०कांचा वाटोळा जो वाटवा तें.

कटोरा, पु० हिं० वाडगा, द्रोण, इ० तो;२, काष्ट, भोपळा, जहरीनारळ, इ०कांचें अन्न घ्यावयाकरितां केलेंजें पात्र तो.

कटारी, स्त्री० हिं० लाहान जो कटोरा ती.

कट्.-, कन, -कर, -दिर्शी, अ० कटकन.

कट्टा, पु० युद्धादि प्रसंगीं हजारों माणसें इ०सर्वजीव तोडण्याचा जो व्यापार तो;२, तरुण असून शरीरानें दृढ जो मनुष्यादि तो.

कंठ, पु० हनवटीचास्वालीं आणि स्कंधाचेवर शरीरावयव आहे तो;२, त्यांतील जो ध्वनि तो;३, पोपटस्वबुलबुल इ०कांतील नरांस तारुण्यावस्था आलीस्र० जे कंठस्थानीय केशांस रंग येतो तो;४, भांडें इ०कांस तोंडाचे स्वालीं जो आंवळ भाग असतो तो: याचे समास, कंठभूषण, कंठमणि, कंठप्रदेश, इ० जाणावे.

कंठगत, ३लिं० कंठाचेठायीं विद्यमान जो पदार्थ तो.

कठडा, पु० कटारा.

कंठणें, कांहीं एक दुःख भोगून अतिक्रांत करणें;२, कांही सुखदुःख भोगीत भोगीत कांहीं काल अतिक्रांत करणें;३, गतीनें मार्ग अतिक्रांत करणें.

कंठमर्याद, अ० कंठा पावेतों;उ० आजमीं कंठमर्याद जेवलों.

कंठमाधुर्य, न० कंठध्वनीची जी मधुरता तें

कंठरवेंकरून, अ० कांहीं एक विषयाचें कथन करण्याविषयीं तात्पुरचा शब्दस्वर्धून.

कंठरवोक्त, ३लिं० कंठरवेंकरून सांगीतलाजो विषय तो.

कंठसूत्र, न० मंगलसूत्र;२, जानवें.

कंठस्नान, न० कंठपर्यंत जें स्नान तें;२, ला० सिरःछेदास स्र०.

कंठा, पु० स्त्रियांचे कंठांतील भूषण आहे.

कंठाळ, स्त्री० सामान वाहाण्यासाठीं घोडें, इ०कांवर गोणपाटाचेंजें बारदान केलें असतें ती.

कंठाळ्या, ३लिं० कंठाळ वाहाण्याचा उपयोगीघोडा, इ० तो.

कठिन, ३लिं० ज्याचा भेद, किं० छेद व्हावयास बहूत प्रयत्न लागतो, किं० अल्पप्रयत्नानें चेपत नाहीं तो;२, ला० समजावयास, किं० करावयास, किं० व्हावयास अवघड, जो ग्रंथ, व्यवहार, इ० तो;३, ज्याचे उपयोगादि संबंधानें दुःख होतें तो रोग, पदार्थ, इ० तो;४, ज्याहृदयाचा करुणादि रसानें द्रव होत नाहीं तें हृदय, व तद्विशिष्ट पुरुष तो.

कंठी, स्त्री० पुरुषाचे गळ्यांतील सुवर्णाचें, किं० मोत्याचें भूषण आहे;२, अंगरख्यास कंठप्रदेशीं शिवून जी अनेकप्रकारची नक्षी करितात ती.

कठीण, ३लिं० कठिन.

कंठीदार, ३लिं० ज्या अंगरख्यास कंठी असती तो.

कठोर, ३लिं० कठिन; काल, व्यवहार, ग्रंथ, इ०कांवर प्रायः प्र० नाहीं.

कंठ्य, वि॰ लिं॰ कंठांत जा वर्णाची उत्पत्ति तो; अ, ह, इ॰, तो·

कड, स्त्री॰ कटिद्वितीयार्थी; २, वस्त्र, शस्त्र, सरोवर, शेत, इ॰कांचा सभोंवतालचा जो अंत प्रदेश तो: तिचे चार दोन चार इ॰ दिग्भेद करून विभाग कल्पितात; ३, विवक्षित क्षेत्राचा आसमंतात बहिःप्रदेश तो; उ॰ तुला भाकरी जितकी पाहिजे तितकी घे, बाकी कडेस ठेव; ४, ला॰ कांहीं एक आरंभिलें कार्याचा शेवट तो; मा॰ प्रथमांत प्र॰ नाहीं; ५, भूमीचे पोटींचे रेती जमून जो पाषाण होतो तो; कड्याचा विचार स्व॰ कधीं जी गोष्ट घडायाची नव्हे ती कधी होईल, असा प्रश्न असता तिचा कालास स्व॰ म्हणजे कधीं याव यायचा नव्हे हें तात्पर्य·

कंड, स्त्री॰ कंडूचा अपभ्रंश·

कडक, वि॰ लिं॰ जांतील आर्द्रांश निःशेष नाहींसा झाल्यानें धान्य भाकरी इ॰ तो; २, जामध्यें चिकणपणा कमी तो, काष्ट, धातू, इ॰ तो; ३, सहन होण्यास कठीण जें उष्ण, तिखट, थंडी, शस्त्रधारा, भाषण, ध्वनि, इ॰ तो; ४, तापट, जो स्वभाव, किं॰ तद्विशिष्ट मनुष्यादि तो; ५, अ॰ तडक·

कडकड, अ॰ नगारा, ताशा, इ॰ वाद्यांचे व कडकडीत धान्यादिक दंतादिकांनीं फुटण्याचे शब्दांचें अनु॰ वाज, फुट, इ॰चें वि॰·

कडकडणें, वृक्ष, इ॰ मोहते समयीं, किं॰ बीज पडते समयीं कडकड असें वाजणें; २, तूप, तेल, पाणी, इ॰ अतिशयित तापल्यामुळें सशब्द होणें; ३, ज्वरानें शरीर, अग्निसंयोगानें जलादिक अतितप्त होणें, ४, ला॰ कोणेकास उद्देशून सकोप मोठ्यानें भाषण करणें·

कडकडां, अ॰ कडकड·

कडकडाट, पु॰ कडकड शब्दाचा जो अतिशय तो·

कडकडावाल, पु॰ कों॰ भाजलेला जो बाल तो·

कडकडीत, वि॰ लिं॰ जा पदार्थाचा भक्षणीं, किं॰ हालविल्यानें कडकड असा शब्द होतो तो, व॰ कडक दाणा, वाळलेले पोहे, इ॰ पदार्थ तो; २, अतिउष्णउदकादिक तो; ३, चांगली वागती जी शास्त्रादि विद्या. किं॰ तद्विशिष्ट तो विद्वान; ४, भीडभाड, इ॰ न धरितां स्पष्ट जो भाषणादि व्यवहार तो व तादृश स्वभावाचा पुरुष तो; ५, लोकापेक्षां अधिक आचार, सोंवळें. इ॰ त्यास स्व॰; ६ केवळ निरशन जें उपोषण त्यास स्व॰·

कडकणा, पु॰ पुरीसारिखें पिष्टाचें. किं॰ तदाकार कागदाचें चित्रविचित्र करून नवरात्रादिकांत देवावर बांधित असतात तो·

कडकडून, अ॰ दृढपणें; आलिंगणें भेटणें इ॰कांचें वि॰; २, त्वरित्या आवेशानें, कोणेकाचा आंगावर जाणें, चावणें, इ॰कांचें वि॰·

कडकणें, भाकरी इ॰ अतिशयित भाजल्यामुळें, किं॰ वस्त्र, काष्ठादिक अतिशयित सुकल्यामुळें कडकडीत होणें; २, ला॰ कोणेकानें उद्देशून सकोप मोठ्यानें भाषण करणें; ३, न॰ कडकणा·

कडका, पु॰ ऊन, थंडी, यांचा अतिशय तो; उ॰ आज थंडीचा कडका पडला; २, अ॰ तडक :

कडकावणें, कोणेकाचा शरीरावर चाबूक इ॰ कडशब्द होईअसें बळकट मारणें; २, भय, किं॰ भीड, इ॰ संकोच न धरितां मोठ्यानें स्पष्ट बोलणें. म्हणणे. इ॰ करणें·

कडकी, स्त्री० उपदंशादि रोगामुळें; किं० सोमल इ० उग्र औषध सेवनानें शरीरांतील सर्व धातू संतप्त झाल्यावर जी उष्णता होती ती.

कडंग, ३लिं० अतिभाजणें इ० कारणामुळें कडकडवा-जाया जोगें कठीण झालें जें धान्य, भाकरी, इ० तो.

कडंगणें, धान्य अतिशयित तापल्यामुळें कंडणादि व्यापारानें केवल चूर्णप्राय झाल्यावाजोगें होणें; २, भाकरी, इ० अतिशयित भाजल्यामुळें कडंग होणें.

कडंगी, कडांगी, स्त्री० रा० कणकणी.

कडगुलें, न० रा० कांचेची बांगडी तें; २, अधेल्याचे अंगावर जारेषा असतात त्या प्र० तें.

कडचा, ३लिं० नदी इ० कडेस जो स्थित तो; २, कडील.

कडडड, अ० विजेचा आणि वृक्षादि मोडतें समयींचा जो शब्द होतो त्याचें अनु०.

कडण, स्त्री० रा० पर्वत, दरड, इ० कांची जी कडती.

कडणी, स्त्री० उरापासून लागलेल्या जाबरगडयांचा पंक्ति त्या प्र०.

कडदण, न० द्विदल जें धान्य तें.

कडदोरा, पु० कटदोरा.

कंडन, न० धान्यादि कांडण्याचा व्यापार तें.

कडप, न० कों० शेत कापतेवेळेस शेतांतच बांधन्यावांचून त्याचे कवळे ठेवित जातात ते प्र०.

कडबडीत, ३लिं० कों० जाबरत्वादिकाचा कडबड असा शब्द होतो तो पदार्थ.

कडबा, पु० जोंधळ्याचे वाळल्या ताटांचा समुदाय तो; सरव्याव्यवहारीं पेंढ्याची गणती होती.

कडबू, पु० एक पक्वान्न आहे.

कडबोळें, न० हलकें पक्वान्न आहे.

कडवई, स्त्री० एक वेल आहे; २, बहून कडू औषधें सेवित्यामुळें कडूपणाची सर्व शरीरांत व्याप्ति होती ती.

कडवट, ३लिं० किंचित्कडू जो पदार्थ तो.

कडवर, अ० शेवटपर्यंत.

कडवळ, न० मक्याचे ताटांचा समुदाय तें; २, गुरें घोडीयांस खायास घालाया करितां दाट पेरून जें जोंधळ्याचें शेत करितात तें.

कडवा, ३लिं० यज्जातीय फल कंदादि पदार्थ चांगले किं० कडूपणा खाजरेपणा या गुणाने वाईट असे उभयविध असतात त्यांमध्यें चांगला जो नव्हे तो; २, दासीचा वंश; ३, जो मनुष्य, मनुष्यवध करण्याविषयीं किं० लढाईत उडी घालण्याविषयीं निर्भय तो; ४, ज्याचे अंगीं भांग अफू इ० केफ जिरून गेले आहेत तो; ५, उपदंशादि किं० विषादि विकार एकाएकीं बाधन नाहीं असें शरीर तो; ६, पु० वाल्लांत भेद आहे.

कडवी, स्त्री० एक वेल आहे; २, अफूस स्त्री०

कडवें, न० प्राकृत कवितेंत पालुपदानें जाचा भेद होतो असा जो ग्रंथविभाग तें.

कडसणी, स्त्री० कों० चौकशी; २, बरगडयांचा जाडीन पंक्ति त्या प्र०.

कडसणें, कोणा एक गोष्ट चौकसून पाहाणें.

कडसर, ३लिं० कडवट.

कडसरणें, वा० कडेस येणें.

कडसरीस, अ० रा० येणें याचा योगी प्र० अर्थ कोणी एक कार्याचा शेवीं केवल थकून हात टेकायाचे

टशेस येणें.

कडळ, स्त्री० रा० काढणें याच्यायोगीं प्र० अर्थ० जें काम निरनिराळ्या प्रती नीपर्यायानें करायाचें तें तसें न करितां एकदांच सरासरी करून टाकणें.

कडा, पु० पर्वताचा धारेचारखाली जो नीट उभा प्रदेश तो.

कंडा, पु० घोड्याचा गळ्यांत बांधायासाठीं पोटीं तंतु आणि त्यास बाहेरून सरवलाद इ० वस्त्राचा तुकडा लावून करितात जें भूषण तो.

कडाकड, अ० दंतादिकांनीं हरभरे फोडणें, किं० जेरबंद इ० कांनें कोणेकास मारणें, इ० कांचें अनु० मार, वाज, इ० कांचें वि०.

कडाकडी, स्त्री० कडकड शब्द होई असें भांडण, मारामार, इ० कर्ती.

कडाका, कडारवा, पु० वाद्य, पठन, भजन, इ० शब्दांचा सतत चाललेला जो अतिशय तो; २, कांहीं एक कर्म, रोग, इ० कांचा सतत सातिशय जो प्रवृत्तपणा तो; ३, उष्ण, थंडी, यांचा जो अतिशय तो; ४, चाबूक, इ० कांचा जो फटकारा तो; ५, कंचका.

कडाकूट, स्त्री० कांहीं एक गोष्ट सिद्ध करण्याविषयीं अनेक प्रकारचा मोठा जो प्रयत्न करावा लागतो तो; २, अ० झाडून सर्व मनुष्यादि जीववृत्ति, उ० आज कडाकूट पंडित मिळाले होते.

कडाड, पु० कडकडाट.

कडाडणें, कडकडणें.

कडाडां, अ० कडकडां.

कंडापट्टा, पु० घोड्याचे तोंडावरचें भूषण आहे.

कंडारणा, अ० लिं० फारजी आड दोरी इ० तो.

कंडा

कंडारणें, कों० उंदीर इ० कांनीं वस्त्र, कागद, इ० तोडणें; २, जाळ्या खोदायाचें शस्त्र आहे.

कडासन, न० तपस्वी इ० कांचें व्याघ्रचर्मरूप आसन तें.

कडिबंद, पु० कटिबंध.

कडी, स्त्री० सांखळी इ० करायासाठीं लोहादि धातूंचीं अनेकप्रकारचीं वलयें केलीं असतात तीं प्र०; २, तींच वलयें एकमेकांत गुंतवून कवाड, पेटीचें झाकण इ० कांचा प्रतिबंधार्थ मारायास जी सांखळी केली असते ती; ३, पाटणी इ० कांस घालण्याचे उपयोगीजें चोरस लांकूड केलें असतें ती.

कंडी, स्त्री० बाजार अफवा, किं० निर्मूल जें कोणेकानें वर्तमान कल्पून उठविलें ती; २, उत्कलिका.

कडीपाट, पु० कडेपाट.

कडील, वि० लिं० कडे या अव्ययानें जें ततत्पदार्थ संबंधरूप अधिकरण वाच्य होतें त्या अधिकरणीं जो स्थित तो, ततत्पदार्था कडील; याचा प्रयोग केवलाचा नाहीं.

कडू, वि० लिं० निंबकुटकी यांचे रुची सारखी जी रुची. किं० तद्विशिष्ट जो पदार्थ तो; २, पित्तादिकामुळें पदार्थमात्र कडू लागाया जोग्या विकारानें युक्त जी जिह्वा इ० वो; ३, जो शब्दादि विषय जास रुचत नाहीं तो त्यास; ४, जाची जा मनुष्यावर पूर्वी प्रीति होती ती कांहीं कारणामुळें नष्ट होऊन त्यास विरुद्धपणा जो पावला तो; ५, दृष्टांत पाटाचे स्त्रीपासून, किं० दासीपासून झालीजी संतति तो; कोणेकानें कोणेकाशीं कडू होणें, स० अप्रिय भाषण केल्यामुळें प्रीतीतून उतरणें.

कंडू

कंडू, पु०स्त्री० खरूज इ०कानें त्वगिंद्रियास घर्षण करावें असें वाटावयाजोगी जी विकृति होती तो, ती; २, ज्याचा त्वगिंद्रियास स्पर्श झाला असतां कंडू सुटावयाजोगा जो सुरण, आळूं, इ०कांस दोष असतो ती; ३, युद्ध, कलह, इ०कीं विपरी उत्कंठ जी इच्छा जिणेंकरून तो पुरुषादिक प्रतिपक्षी केव्हांमिळेल अशी इच्छा करीत असतो ती; ४, तत्कारणीभूत जी मर्म्मी तो; उ० या घोडयाला कंडूकार आहे तर नगाऱ्या खालीं घाला स० कंडू जिरेल.

कंडूकारळें, कंडूकाल्हें, न० कारळें तिळासारिखें अतिशायित कंडूएक बीज आहे.

कंडून, अ० कंडूगतद्व्यय वाच्य जो तत्तत्पदार्थ संबंधरूप अधिकरण विशेष त्यापासून; उ० त्याकंडून तुम्हीं रुपये घ्या. २, तत्तत्पदार्थावच्छिन्न दिशेतें धरून, उ० यंदा पुण्याकंडून पाऊस चांगला आहे; ३, करणत्वेंकरून जे कारकतदर्थद्योतक हें अव्यय लागतें; उ० त्याणें ठोस्त्रेंकंडून मारिलें.

कंडूनिंब, पु० निंववृक्षांत एक भेद आहे.

कंडूपाणी, न० ज्वरादिरोग निवृत्त झाल्यानंतर प्रथम स्नानार्थ शिरगुंडी इ०कांचे पाले कंडूवून जे पाणी काढितात ते

कंडूवृंदावन, न० एक अतिशायित कंडूफल आहे.

कंडें, न० पुरुषाचें हातांतील, किं० पायांतील, भूषण आहे; २, बेडीस पायांत अडकवयाचीं वलयें असतात तीं स० ३, धातु, कांबीट, इ०कांचे कांहीं कांहीं कारणास्तव जें वलय केलें तें; ४, कांहीं एका भोंवतालीं सैन्याचा जो वेढा तें; ५, डफ, इ०कांचें वर्तुल जें काष्ठ तें.

कडे, अ० कोणेक पदार्थानें आक्रांत जी दिशा त्यादिशेस, तत्तत्पदार्थ नामपूर्वक च प्र०. उ० यंदा पुण्याकडे धारण कशी आहे; या झाडाकडे पाहावत नाही; २, कोणेकांचें स्वत्वसंबंधरूप जे अधिकरण त्यांत, किं० त्यातें अनुलक्षून; उ० त्याजकडे शंभर घोडी आहेत; ३, कोणेक व्यवहारादिकांचें स्वस्वसंबंधाक्रांत स्वर्चवेच इ० करण असतें त्या प्रकरणांत, किं० त्या प्रकरणांतें अनुलक्षून; उ० हे पागेकडे चाकरीस आहेत.

कडेकपाट, न० पर्वतादिकांचा कडा किं० तेथील गुहा इ० कदुर्गम, दुर्ज्ञेय, जें स्थान तें; उ० या कालांत कधीं कडेकपाटांत जाऊन बसले आहेत.

कडेपाट, पु० खालीं कडयावर तरवते घालून माती इ० करावयाकरितां जें स्थल करितात तो.

कडेलोट, पु० जास दार मारावयाचें त्याम पर्वताचा कडयावरून लोटून देण्याचा जो व्यापार तो; २, देवादि प्रीत्यर्थ कडयावरून कोणा घालून घेत असतात जो व्यापार तो; ३, ला० जो उत्कृष्ट कोटींतला त्याचा केवल निकृष्ट कोटींत पात तो; ४, केवल निकृष्ट कोटींतला जो मनुष्यादिक, किं० केवल निकृष्ट पक्षातली जी गोष्ट तो.

कडेशेवट, अ० कडेशेवटीं

कडेशेवटचा, वि० केवल शेवटले कोटीचा, उ० मी तुला कडेशेवटची गोष्ट सांगतों.

कडेशेवटीं, अ० का० केवल शेवटला जो पक्ष, कि०

कि० पर्याय त्याचा अर्थी.

कडेस, अ० कडे.

कडोविकड, स्त्री० भाषणामध्यें अनेक प्रकारचे वांकडे तिकडे पेंच पाच इ० जो प्रकार असतो तो; याचा मथळ्यांत प्रयोग प्रा० अनेक वचनांत.

कडोविकडीचा, वि० कडोविकडी जा मध्यें आहेत तो.

कडोसा, पु० संध्याकाळीं घटकाभर पर्यंत जो अंधार पडतो तो.

कडोस्त्री, कडोर्स्त्री, कडोसरी, स्त्री० कटिसंबद्ध वस्त्राचा जो कटिजवळचा भाग त्या भागांत पदार्थ ठेवायाचा असतां तद्युक्त कटीस स्व०.

कड्या, पु० रा० कढ्या.

कढ, पु० उदकादिक फार तापल्यामुळें त्यास बुडबुडे यावया जोगी जी अवस्था प्राप्त होती तो; २, ते बुडबुडे; ३, बहुतकाल मस्तकादिकांवर ओझें राहिल्यामुळें ऊब धरून केवल सोसवेना अशी मस्तकादिकांस जी अवस्था प्राप्त होती तो; ४, गोंधळ; स० जाळावांचून कढ नाहीं आणि माये यांचून रडें नाहीं.

कढई, स्त्री० तळणें इ० उपयोगी पसरट एक पात्र आहे.

कढण, न० द्विदल धान्य शिजवून त्याचें पाणी काढितात तें.

कढणें, कढ येई अशा दशेतें पावणें, २, घृतादिकांत तळलाद्यांश असतो, तो अग्नींत जळून जाऊन घृतादिकानें चांगलें होणें; ३, रा० अग्न्यादिसंयोगानें धातू इ० पातळ होणें

कढ

कढत, वि० अति तापल्यामुळें स्पर्श करण्याविषयीं दुःखाकर झालेला जो पदार्थ तो.

कढतवणी, न० कों० पोत्याचें भात इ० कांवर घालायाचें जें कढत पाणी तें.

कढी, स्त्री० ताक इ० कांस पीठ इ० घालून कढवून करितात ती; कढी पातळ होणें. स० दुखणें इ० कानें जर्जरी भाव पावणें.

कढीगवत, न० एक तृण आहे.

कढीनिंब, पु० एक वृक्ष आहे.

कढ्या, पु० कों० एक झाड आहे, व त्याचें जें फळ तो.

कण, पु० धान्याचा बारीक जो अंश तो; २, भात, इ० दाण्याचा जो व्यक्ति त्या प्र०; ३, क्वचित् तत्समुदाय ही; स० दाम दमडी पट आणि कण तिपट.

कणऊब, स्त्री० कों० धान्ये पिकतांत जो काळीं त्या काळीं जी गरमी होती ती.

कणकणणें, अल्पज्वरानें अंग मोडून येणें.

कणकणी, स्त्री० अल्प जो ज्वरांश येतो ती

कणकणें, कों० कळकणें.

कणक्या, वि० लगाडा इ० करण्याविषयीं क्रूर, जो त्रिपाई इ० तो.

कणखर, वि० बहुत दिवस टिकाव जो गाजा मध्यें सारांश अधिक असा जो पदृ, बळकट, काष्ठ, शरीर, इ० तो.

कणंग, स्त्री० कणिंग; २, न० कणगर.

कणगर, न० एक कंद आहे; २, स्त्री० पु० त्याचा वेल ती, तो.

कण

कणगा, पु०मोठीजी कणिंग, किं०तद्वाकारचे तट्या गुंडाकृन धान्य इ०कांस सांठवण करितात तो.

कणगी, स्त्री०कणिंग.

कणगूल, न० लाहानजी कणिंग तें.

कणणें, उसणीनें युक्त होणें.

कणवट, स्त्री०रा०कडोस्त्री; २, तेथें होतो जो रोग तो; प्रा०तारुण्यदशेत होतो.

कणशी, स्त्री० कों० भाताचें जें कणीस तो.

कणस, न०कणीस.

कणा, पु०पाठीचा दांडा; २, सारविल्या जाग्यावर पिठाचा अथवा रांगोळीचा रेघा, किं० चित्रादि काढितात तो; ३, तत्साधन रांगोळी इ०तो; ४, कों०पर्वनाकार लांब धान्यराशीची धार तो; ५, स्त्री०सं० पिंपळी सणून ओषधी आहे; ६, हात राहाटाचें मधलें जे लांकूड तो; ७, मोटेचे घरचे चाकांतील लांकूड तो; ८, रथादिकांचे दोहों चाकामध्यें जो आंस असतो तो; ९, रा०स्त्रिया वस्त्रेनसते समर्थी स्त्रियावस्त्राचा वेढा देतात तो; १०, भित्त्यादिकावर स्त्रिया जें लेणें काढितात तो.

कणिका, स्त्री०सं० उदकादिकाचा जो सूक्ष्मांश ती.

कणिंग, स्त्री०वेळूचा कांबी, किं०तुराट्या, इ०काचें धान्यादि ठेवाया करितां पात्र करित असतात ती, २, न०कणगर.

कणिश, न०जोंधळ्यादि धान्याचा भुटातें

कणी, स्त्री०धान्यादिकांचा बारीक जो तुकडा ती; २. शिजलेल्या धान्या मध्यें बारीक हिरवा अंश राहातो ती; ३, घृतादिकांमध्यें कण होतो ती; ४, पातळ भाजी इ०कांस पीठ लाविलात ती.

कणीक, स्त्री०गव्हांचें पीठ ती.

कणीकूट, न०भात कांडिले असतां तांदुळांचून कणी इ० बारीक धान्यांश निघतो तें.

कणीकोंडा, पु० कणीकूट.

कणीस, न०जों धळा, मका, इ०कांस जो धान्याचा गुच्छ येतो तें; २, केवड्याचें जें विशिष्ट पुष्प, किं० त्याचें आंत जो अवयव विशेष असतो तें; ३, रथादिकाचा चक्रादिकांत जो आंस इ०काचा अवयव शिरलाअसतो तितका अंश तें.

कणेकड, न०राहाट गाडग्याचे यंत्राचें मध्यवर्ती जें लांब लांकूड असतें तें.

कणेर, स्त्री०एक फुलझाड आहे; २, न०तिचें फूल तें.

कणेरा, ३ लिं०कण्याचा जो भात करितात तो; २, लुगड्या मध्यें तरुा आहे तो.

कणेरी, स्त्री०कण्या शिजवून पातळ प्यावया जोगें अन्न करितात ती.

कण्व, पु०ब्राह्मणा मध्ये जाति आहे.

कण्हेर, पु०स्त्री० कणेर प्रथमार्थी.

कण्हेरी, स्त्री०कणेरी.

कतबा, पु०हिं०मी सांगितलीजी हकीकत ती खरी आहे, यांत कांहीं खोटेपणा पडल्यास, मीं तुमचा अपराधी, इ०प्रतिज्ञायुक्त वादि प्रतिवाद्यादिक पंचाईतदार इ०कांस जो लेख करून देतात तो; २, कर्जरोखासही स०

कतरब्योंत, पु० अनेक प्रकारांनी जशीजशी कसर निघेल तशी युक्तीनें काढून थोडक्या खर्चांत कार्य करण्याचा

करण्याचा प्रकार तो.

कतवार, न० बाजार बुणगें.

कतार, स्त्री० एकामागून एक अशा क्रमानें चाललेल्या अनेक उंटांचीजी पंक्ति ती.

कतारा, पु० कतार.

कत्तल, स्त्री०न० युद्धादि प्रसंगीं पराकाष्ठेचीजी तोडातोडी होती ती; २, एक क्रमानें स्थित जे गृह, वृक्षादिक, त्यांचा मध्यें नवगळतां झाडून, तोडणें, मोडणें, इ० नाश करण्याचा जो व्यापार तें ती; ३, मोहोरमचे दाहावे रात्रीस फकीर लोक मिळून जें कर्म करितात तें ती.

कंत्राण, कंत्राण, न० दुर्लभ वस्तुची प्राप्ति, किं० दुर्गम स्थानीं पोंचणें इ० साधावयाविषयीं कोणेकानें चातुर्यानें बांधिलेंजें संधान तें.

कंथ, पु० बायकांचें गाण्यामध्यें भर्त्याची संज्ञा आहे.

कथक, ३लिं० कथा करणारा तो; २, कांहीं एक गोष्टींतें कथणारा तो.

कथंचित्, अ० यथा कथंचित्.

कथडया, ३लिं० कथा करणाराजो संत इ० तो.

कथणें, कांहींएकं वृत्तांत, गोष्ट, सांगणें.

कथन, न० कथण्याचा व्यापार तें.

कथनीय, ३लिं० कथायास योग्य जें वृत्तांत इ० तो.

कथली, स्त्री० कथलाचे तपेल्याचा आकाराचें पात्र ती; २, गाय, म्हैस, इ० कांचे अंगावर खरजे सारिखा रोग होत असतो ती; ३, ३लिं० कथलाचें जें पात्र इ० तो.

कथलीव्याधि, स्त्री० उपदंशांत एक भेद आहे:

२, ला० अतिदाह मनुष्यास स०.

कथलें, न० मोठी कथली तें.

कथलेंदुःख, न० उपदंशांत एक भेद आहे.

कथा, स्त्री० विणा तालादि घेऊन हरिदास जें ईश्वराचें कीर्तन करितात ती; २, कांहींएक वृत्तांताचीजी गोष्ट, किं० पुराणाचा अंश ती.

कंथा, स्त्री० अनेक वस्त्रांचे ताकडे तुकडे एकत्र शिवून जोडें वस्त्र करितात ती.

कथानक, न० कांहींएक वृत्तांताची गोष्ट तें.

कथाभाग, पु० पुराण इ० ग्रंथाचाठायीं वैराग्य भक्ति इ० विषयावांचून शुद्ध राजादि चरित्र रूप कथांश असतो तो.

कथाशेष, ३लिं० सं० सत्कीर्त्यादि रूप कथा मात्र जाची राहिली असा जो मृत राजादि तो.

कथित, ३लिं० कथिलेलाजो अंश.

कथील, न० धातू आहे.

कथेकरी, ३लिं० कथा करणारा जो हरिदास तो.

कथ्यमान, ३लिं० कथायास उपक्रमिला जो वृत्तांतादि तो.

कद, पु० रेशमाचें वस्त्र आहे.

कंद, पु० सुरण, अळूं, केळ, इ० झाडांचा मूलप्रदेशीं जो पिंडाकार अवयव असतो तो.

कदन, न० सं० सैन्य, इ० मारून, तुडवून जो नाश तें; २, युद्ध.

कदन्न, न० घृतादिरहित हरीक, राळा, इ० निकृष्ट धान्याचें जें अन्न तें.

कदंब, पु० सं० वृक्ष आहे; २, समुदाय तो.

कदर्था, पु० हिं० कनवा.

कंदमूल, कंदमूळ, न० अन्नाभावीं भक्षणोपयोगी जे कंद मुळ्या इ० तें.

कदर, स्त्री० भृत्यादिकांचे अपराधादि दोष साहणें न साहाणें एतद्विषयीं उपयुक्त जी धनी इ० कांची प्रकृति ती.

कंदरा, स्त्री० गुहा.

कदर्य, वि० द्रव्य खरचण्यास मृत्युप्राय जास दुःख होतें तो.

कदलणें, सोंगट्याचे डावांत जुगल्यानंतर बारा. बेती, इ० जुगडाव घेणें.

कदली, स्त्री० दुफांशीं खेळांत बारा, बेती, दुद्दी, आठ हे डाव ते प्रत्येकीं; २, सं० केळीचें जें झाड तीं.

कदाकाळीं, अ० प्रसंगानुसार एखाद्यावेळेसच येणार असा जो समय त्याचे ठायीं; उ० नित्यशः जो येणार त्या पक्षां कदाकाळीं येणाराचा आदर फार होतो.

कदाकाळींचा, वि० बहुत काळाचा जुनाट जो मनुष्यादि तो.

कदाचित्, अ० कोणेक गोष्टीचे होण्याविषयीं, किंवा न होण्याविषयीं अनेक पक्ष निश्चित आहे तत्तद्विरुद्ध होण्यास संभावनेनें मात्र कुस जो एखादा पक्ष त्या पक्षीं.

कदांचित्, अ० कदाचित् याचा अपभ्रंश.

कदान्न, न० कदन्नाचा अपभ्रंश.

कदापि, अ० कोणत्याही समयीं कोणेक क्रियेचा निषेधविषयीं प्र०.

कदाश्चित्, अ० कदाचित्.

कंदाळी, स्त्री० कों० परचक्रादिकानें ग्रामास, किंवा देशासजो उपद्रव होतो ती.

कंदी, वि० रंग आहे; २, तद्विशिष्ट पागोटें इ० वस्त्र तो.

कदीम, वि० चिरकाल चालत आलेलें जें चाकरी, वतन, धर्म, इ० तो त्याचा.

कंदील, पु० न० कांचेचें पात्र आहे, जा मध्यें दीपलावित असतात तो, तें; २, पितळीचा लांमणदिवा तो तें.

कंदूक, पु० सं० चेंडू.

कदेल, स्त्री० कदली प्रथमार्थी.

कदेलडाव, पु० कदलीरूप जो डाव तो

कदेलणें, कदलणें.

कदेलदान, न० कदेलडाव.

कदेली, स्त्री० कदली प्रथमार्थी.

कंदोरी, स्त्री० मुसलमान लोक पिरास नैवेद्य फकिरास भोजन एतद्रूप जें अन्नदान करितात ती; २, मोठे दोर, गलबत इ० उपयोगी वळाया करितां लांबच लांब जें घर बांधलें असतें ती.

कंद्या, पु० चतुष्कोण, अष्टकोण, इ० रूप जें कांचा लावून दीप पात्र करितात तो.

कद्दू, वि० कदर्य.

कधीं, अ० कोणत्यादिवशीं.

कधींकाळीं, अ० कदाकाळीं.

कधींच, अ० जा कोणेक कार्याचा दिवसास अतिक्रमून बहूत दिवस झाले त्या समयीं.

कधींचा, वि० जाचें होणें. येणें. इ० होऊन फार दिवस झाले तो.

कधींनवत.कधींनक्कत. अ० कधींकाळीं: अपरूपपणा गम्यमान असतांच प्र०.

कधींनक्कतेला. अ० कधींनक्कत.

कधींबधीं,कधींमधीं, अ० मधले मधले अनियमानें कांहीं दिवस वगळून कांहीं कांहीं दिवशीं; उ० देशावर पाऊस इकडल्या सारिखा पडत नाहीं, कधींबधीं पडतो.

कद्दीं, अ० कदापि.

कन, अ० अनुकरणापुढें याचा प्र० होतो; उ० झटकन निघून जा.

कनक, न० सं० सोनें; २, धतूर.

कनकावळा, पु० बावडी मध्यें भेद आहे.

कनवट, स्त्री० रा० कडोस्त्री; २, कटिप्रदेशीं रवरजेसारिखा रोग होतो ती.

कनवळ, स्त्री० कनवाळा.

कनवळा,कनवाळा, पु० कोणेकाची संकटावस्था पाहून जी अंत:करणास द्रवमाय अवस्था होती तो.

कनवाळू, वि० फार कनवाळा आहे जास तो.

कनात, स्त्री० डेरे,राहुटी, इ० कांचा भोंवताला जो पडदा उभा करीत असतात ती.

कनांदणें, रा० दारिद्र्य,देणेकऱ्याचा तगादा, इ० अनेक संकटा मुळें केवल व्याकूल अवस्था पावणें.

कनिष्ठ, वि० जा पेक्षां जो वयानें कमी तो त्या पेक्षां; २, जा पेक्षां जो गुणादिकृत योग्यतेनें कमी तो त्या पेक्षां; ३, उत्तम, मध्यम, कोटींत जो परिगणनीय नव्हे तो.

कनि

कनिष्ठपक्ष, पु० उत्तम, मध्यम, या पक्षांचे खालचा जो पक्ष तो; २, अ० कनिष्ठपक्ष जरी आश्रयिला तरी; उ० याचे लग्नाला कनिष्ठ पक्ष शंभर रुपये लागतील.

कनिष्ठिका, स्त्री० करंगळी.

कनीनिका, स्त्री० सं० नेत्रांचे बुबुळाचे मध्यवर्ती जो प्रदेश जेथें पदार्थ प्रतिबिंबित होऊन नेत्र विषय होतो ती.

कनोजा, पु० ब्राह्मणांत जाति आहे.

कन्यका, स्त्री० सं० कन्या.

कन्या, स्त्री० स्त्रीरूपजें अपत्य ती; २. साहावा जो राशी ती.

कन्यागत, पु० कन्याराशीचा ठायीं बृहस्पतीची जी स्थिति, कि० तदुपलक्षित काल तो.

कन्यादान, न० विवाह विधीनें वरा कारणें जें कन्येचें दान करितात तें.

कन्हणें, ज्वरादि व्यथे मुळें श्वासोछ्वास पूर्वक कण्हतेनें शब्द करणें.

कन्हेर, पु० कण्हेर.

कप, पु० सुरमाहाचे अंगास पांढरा कापसासारिखा बुरा असतो तो.

कंप, पु० तलवारीचें पान एकवार हालविलें असतां जसें हालत राहतें तद्वत वात विकृति, भय. इ० कानें शरीरास, कि० वातादि कानें वृक्षादिकांसजें चलन होते तो; २, शरीरांत कंप असून शब्द केला असतां त्या ध्वनीचा ठायीं जो गुणविशेष उपलभ्यमान होतो तत्सजातीय जो कंठादि ध्वनीचा ठायीं गुणविशेष असतो तो.

कप

कपच्चा. पु०कों० वरील साफी विघडाया जोगा कांही पदार्थाचा अंगाचा निघाला जो तुकडा तो.

कपची, स्त्री० कपच्चा.

कपट, न० पदार्थादिकांचें वास्तविक स्वरूप मनांत न येतां अन्यथारूपें करून तो पदार्थ भासावयास कारणीभूत जी लबाडी तें; २, त्या कपटानें अन्यथा तें करून भासूं लागला जो पदार्थादि त्यास स०; ३, कोणेका विषयीं अंतःकरणांत जो कृत्रिम भाव असतो तें.

कपटरूप, न० कपटानें जें गजादिकांचें रूप धारण केलें तें.

कपटरूपी, वि० कपटरूप धारण केलें आहे जाणें, किं० कपटरूपें धरण्याचा स्वभाव जाचा तो.

कपटवेष, पु० कपटरूप.

कपटवेषी. वि० कपटरूपी.

कपटसिंधु, पु० गुणाक्षरांत एक भेद आहे.

कपटफांसा, पु० द्यूत खेळणारानीं मंत्रादि विद्येनें आपल्यास मात्र इच्छित डाव पडावा असा साधिलेला फांसा असतो तो.

कपटा. पु० पानाचा, किं० कागदाचा लाहानसा जो तुकडा तो.

कपटी, वि० अनेक कपटें करणारा, किं० ज्याचे मनांत कोणेका विषयीं कपट असतें तो.

कपडलेप, पु० रसायन करण्याची कुपी इ०कांस भोवताला मातीनें भरलेल्या ओल्या कापडाचा जो लेप देतात तो.

कपडा, पु० हिं० वस्त्र.

कपडालत्ता, पु० हिं० वस्त्रपात्र इ० तो.

कपणी, स्त्री० दे० कफणी.

कंपणें, कांपणें.

कपर्दरी, स्त्री० कों० रवपरडी.

कंपमान, वि० कंपानें युक्त जो तो.

कपर, स्त्री० कपरी.

कपरधूळ, पु० मलमलींत एक भेद आहे.

कपरा, पु० टांकी इ०कानें फोडल्यामुळें जे पातळ धारायुक्त पाषाणाचे तुकडे निघत असतात ते प्र०.

कपरी, स्त्री० लाहान जो कपरा तो.

कपर्दक, पु० सं० कवडी.

कपर्दीक, पु० कवडीसम०.

कंपवायु, पु० शरीर निरंतर कांपत असावें अशी जी वात विकृति होते तो.

कपा, पु० ग० बटवा इ०कांस जे पृष्ठ असतात ते प्रत्येकी; २, वस्त्राचा जो तुकडा तो.

कपाट, न० द्वारास आच्छादन जे फळ्या इ०कांचें असतें तें.

कपात, न० खजूर इ० ठेवाया करितां खारिकेचा पानींचें जें पोतें करितात तें.

कंपायमान, वि० कंपानें जो युक्त तो.

कपार, न० खबदडी.

कपाल, न० मस्तकांचें जें हाड तें; २, मडक्याचे जे अनेक तुकडे ते प्र०.

कपाळ, न० भृकुटीचावर मस्तकावधिक जो भाग तें; २, सदसत्फल भोगण्यास करणीभूत जो पूर्वकर्मांचा परिपाक असतो तें; ३, त्याचा ले-

रव ब्रह्मदेव कपाळीं लिहित असतो म्हणून त्यास ही सं०; कपाळ फुटणें सं० उत्कर्षाचा प्रसंग दिसत असतां तद्विरुद्ध फल होण्यास दैवानें कारणीभूत होणें; अपकीर्ति, दारिद्र्य, इ० कपाळास येणें, सं० भोगावयास प्राप्त होणें

कपाळकरंटा, ३ लिं० दैवहिन जो तो.

कपाळकूट, स्त्री० मंदबुद्धीस कांहीं समजाविणें, किं० दुराग्रहीजो त्यापासून आग्रह सोडविण्याविषयीं उपदेशादिरूप परिश्रम करावे लागतात ती; २, दुसऱ्यास त्रास यावयाजोगें बहुत भाषण ती.

कपाळखटखट, स्त्री० कपाळकूट.

कपाळदुखी, स्त्री० निरंतर कपाळ दुखत असावें अशी जी रोगविकृति ती.

कपाळपट्टी, स्त्री० कुंचडें, इ० कांस कपाळ प्रदेशीं यावयाजोगी जी पट्टी लाविली असती ती: २. दरवाजाचे चवकटीचे वरचें जें लांकूड ती.

कपाळपांचशेरी, कपाळपांसरी, स्त्री० कों० कांहीं शुभाशुभ प्राप्त होण्याविषयीं, दैवरूप जें प्रमाण असतें जाचें अन्यथात्व देशांतर केल्यानें, किं० कालांतर केल्यानें होत नाहीं ती; उ० कोठेही गेलों तरी कपाळपांसरी बरोबरच.

कपाळफुटका, ३ लिं० कपाळकरंटा.

कपाळफोड, स्त्री० कपाळकूट.

कपाळफोड्या, ३ लिं० मनांतील इष्ट गोष्ट सिद्ध होईनाशी झाली असतां कपाळ फोडून घेण्याचा स्वभाव जाचा तो; २, कपाळकूट करणारा जो याचकादि त्यास सं०.

कपाळ

कपाळमाळा, अ० आपले मनांत जी गोष्टीची जी रुपानें संभावनाही आलेली नाहीं, ती गोष्ट त्या निकृष्ट रुपानें आटळली असतां जो खेद, किं० आश्चर्य होतें त्याचा उद्गार.

कपाळमोक्ष, पु० शवाचें दहन होत असतां त्याचा मस्तक फुटण्याचा जो व्यापार तो; २, क्वचित् इतरही आघातादिकांमुळें जो होतो त्यासही सं०.

कपाळसूळ, पु० कपाळदुखी.

कपि, पु० वानर; २, विवक्षित मंडळीमध्यें इतरांपेक्षां वचानें, किं० कांहीं कामकाज करून निभावल्यामुळेंजो मोठा मनुष्यादि त्यास यद्दनें सं०.

कंपित, ३ लिं० कंपयुक्त झाला जो तो.

कपित्थ, पु० सं० एक वृक्ष आहे; २, न० त्याचें जें फळ तें.

कपिल, ३ लिं० सं० पिंगटजो वर्ण, किं० तद्विशिष्ट पदार्थादि तो.

कपिला, स्त्री० एकरंगाची जी गाय ती: २. साधारण गाईस सं०; ३, एक ओषधी आहे.

कपिलाषष्ठी, स्त्री० भाद्रपदमास, कृष्णपक्ष, महानक्षत्र हस्त, योग व्यतीपात, मंगळवार दिवस, नक्षत्र रोहिणी, इतक्यांनीं युक्त जी षष्ठी ती.

कपिलाषष्ठीचायोग. पु० देशकालाद्यनुरोधानें घडेल तेव्हां घडेल अशी जी गोष्ट तिचा घटनेस, किं० जी गोष्टीचा घडण्याविषयीं अनेक दुर्लभ मनुष्यादिकांचा योग अपेक्षित असतो त्या गोष्टीचे घटनेस सं०.

कपी, स्त्री० फुटलेल्या लांकडास दुसऱ्या लांकडाचा

जो

जो तुकडा बसविताना ती;२, गलबत इ० कांवर वजनदार पदार्थ ओढण्यास इलका थावा म्हणून मोठेचा चाका सारिखा यंत्र विशेष असतो ती.

कंपू, पु० अक्का पळटणें जें सैन्य तो.

कंपेन्ना, पु० कोणेक गोष्टीचे, पदार्थाचे, विवक्षित प्रमाणांत जो न्यूनाधिक भाव तो.

कपोत, पु० सं० पक्षी आहे.

कपोल, पु० सं० गाल.

कप्पा, पु० कांहीं एक वस्त्रादिकांस लावण्याचा उपयोगी जो लाहानसा वस्त्रादिकांचा तुकडा तो; पिशवी, खोगीर, इ० कांस अनेक कप्पे जोडल्यामुळें जीं अनेक घरें पडतात तीं प्रत्येकीं.

कप्पी, स्त्री० लाहान जो कप्पा ती.

कफ, पु० शरीरांत जे वातादिक तीन दोष असतात त्यांतील एक आहे;२, कंठापासून मुखनासिकादि द्वारानें जो मलविशेष बाहेर पडतो तो.

कफज्वर, पु० कफ प्रधान जो ज्वर तो.

कफण, न० प्रेतावर जें आछादन वस्त्र घालितात तें.

कफणी, स्त्री० कोंपरा खालीं हात व कंठापासून मस्तक मोकळे राहून इतर सर्वांस आछादित होई असें वस्त्र शिवून आवरण रामदासी बैरागी इ० करितात ती.

कफक्षय, पु० कफ प्रधान जो क्षयरोग तो.

कबकबीत, वि० आंतील जलांश पुरता न मेल्यामुळें कांहीं विलक्षण स्वाद जाचा लागतो असा जो ऊंस भोंपळा इ० तो.

कंबरवत, वि० हिं० देवहीन.

कंबरवती, स्त्री० हिं० देवफिरल्यामुळें जी आपत् दशा प्राप्त होती ती.

कबज, न० आपल्यास प्रसंगीं प्रतिबंधक व्हावया जोगें दुसऱ्यापाशीं गुंतलेंजें आपलें वचन लेख इ० तें;२, पावतीचा जो लेख तें;३, कोणेका कडील कणादि उगवेनासें झालें असतां, त्यास खटला गावें म्हणून आपले हातीं सांपडलें जें त्याचें द्रव्यादिक तें; अडकवून टाकण्याचा जो प्रकार तें; ४, पोटामध्यें जो मलावष्टंभ होतो तें.

कबंध, पु० न० मस्तक तुटून गेलें असतांही कांहीं चलनवलन क्रियायुक्त जें धड असतें तें तो.

कबर, स्त्री० मुसलमानजेथें पुरला असतो त्या स्थलीचे जें थडगें ती.

कंबर, स्त्री० कमर.

कबरा, वि० पशु, पक्षी, इ० कांचे आंगावर जमीन पांढरी असून वर काळ्याकाळ्या रेषा असा जो वर्ण असतो तद्वत् वस्त्रादिकांवरही असतो तो;२, तद्विशिष्ट ते पशुपक्ष्यादि तो.

कबल, न० रा० दगड, भोंपळा, इ० फळ फुटून जे टोन तीन भाग झालें ते प्रत्येकीं.

कंबल, पु० लोंहकरीचें वस्त्र आहे.

कबाडु, न० बेल इ० कांवर आणिलें जें वेरणीचें ओझें तें.

कबाडया, वि० कबाडें वाल्या करितां बाळगलेंजें नटूं किं० चाकर इ० तो;२, तादृश सुख भोग नसतां केवल संसारादि व्यवहारांची खटपट मात्र करणारा जो पुरुष त्यास स्त्री०.

कबाबचिनी, स्त्री॰ एक औषधी आहे.

कबिला, पु॰ लग्नाची जी स्त्री तो.

कबीत, न॰ गाण्याचे चालींत एक भेद आहे.

कबीरपंथ, पु॰ कबीर म्हणून मुसलमानामध्यें राम भक्त झालाहोता त्याणें प्रवर्तविला जो ईश्वरभजनाचा मार्ग तो.

कबीरपंथी, वि॰ कबीरपंथानें वागणारा जो तो.

कबुलात, स्त्री॰ ही गोष्ट मला मान्य आहे अशी कोणेकाची वचनद्वारा, कि॰ लेखद्वारा करून घेतात जी मान्यता ती.

कबुलायत, स्त्री॰ कबुलात.

कबूतर, न॰ एक पक्षी आहे.

कबूतरबाज, वि॰ जास कबूतर खेळाचा हा व्यसन आहे तो.

कबूल, वि॰ हें कर्म मी केलें खरें, कि॰ हें कर्म मीं करीन, हें मला पुरवलें, अमा जो मान्य झाला तो: २, यद्विषयीं मान्य झाला तें कर्मादि तो.

कम, वि॰ कमी या अर्थी, परंतु मागें दुसऱ्या शब्दाचा योग असतां प्र॰; उ॰ आण्याकम रुपया शेराकममण.

कमअस्सल, वि॰ जाची आई, कि॰ बाप, कुलजात्यादिरूप उत्कर्षानें कांहीं हीन तो.

कमकुवत, वि॰ कमजोर.

कमची, स्त्री॰ घोडें इ॰ कांस मारायाचे उपयोगी जी बारीक काठी ती.

कमजात, वि॰ कमअस्सल.

कमजास्त, कमजास्ती, न॰ न्यूनाधिक भाव तें; २, वि॰ तद्विशिष्ट तो.

कमजोर, वि॰ विवक्षित बलवानापेक्षां कि॰ पूर्वावस्थेपेक्षां जो बलहीन तो.

कमटा, कमठा, पु॰ तीरसोडायाचें जें कांब, शृंग, इ॰ कांचें साधन असतें तो.

कमंडलु, पु॰ मृत्तिका, काष्ठ, कि॰ धातू, यांचे जल प्राशनाचें पात्र आहे जें प्रा॰ संन्यासी, ब्रह्मचारी, इ॰ बाळगीत असतात तो.

कमतर, स्त्री॰ करावयास जें नियमित, कि॰ मतिज्ञात इ॰ त्या मध्यें आलस्यादिकामुळें कांहीं येत्ये जी न्यूनता ती; पड, हो, धा॰ प्र॰.

कमता, वि॰ कमी

कमती, वि॰ कमी; २, स्त्री॰ कमीपणा.

कमतोल, वि॰ विवक्षित कार्यावर जो पदार्थ योजायाचा त्या पदार्थानें तें कार्य व्हावयास जितकें वजन, दृढता, शक्ति, इ॰ विवक्षित असतें तदपेक्षया तें कमी जा मध्यें तो.

कमनीय, वि॰ सुंदर.

कमर, स्त्री॰ कटि, २, ॰कांहीं एका कामावर कमर बांधणें. स॰ अगत्यपूर्वक करायास प्रवृत्त होणें.

कमरेचाजोर, पु॰ द्रव्यबल, बंधुबल, इ॰ बलरहित जें कांहीं कार्या विषयीं केवल शारीर बल तो.

कमरक, न॰ हिं॰ करमरीचें फल.

कमररखुलाई, स्त्री॰ हिं॰ अपराधी कुळाकडे खंड, गुनेगारी, इ॰ कारणा करिता आलाजो सर्कारचा शिपाई, त्यास कंबस्सोडाया करितां द्यावें लागतें जें द्रव्य ती.

कमरगा, पु॰ पर्वताचे चढावाचे मध्यें पर्वता

भोंवताला वाढलेला जो त्याचा विभाग असतो तो;२,भांडें,इ०उभार पदार्थाचे मध्यें जो आंवळ किं०वाढलेला सभोंवताला विभाग असतो तो.

कमरपट्टा,पु०सुवर्ण,किं०रौप्य यांचें स्त्रियाचे कंबरेस एक भूषण असतें तो.

कमरबंदी,स्त्री०युद्धास,किं०यामांतरासजाणें,इ० कारणाविषयीं कंबरबांधणें,इ०रूप जी सिद्धता ती.

कमरबस्ता,पु०हिं०कंबरबांधायाचें वस्त्र,किं०चर्म असतें तो;२,तेणेंकरून जें कंबरेचें बंधन तो;३, ला०कमरबंदी.

कमल,कमळ,न०जलांत उत्पन्न होत असतें असें एक पुष्प आहे;२,देवादि देवांचे करितां तदाकार जें पात्र करितात तें;३,मुख,नेत्र,हस्त,पाद, इ०कांस उपमा,आरोप,इ० अलंकारानें सौंदर्य विवक्षित असतां स०;उ० मुखकमल हस्तकमल,इ०.

कमला,कमळा,स्त्री०लक्ष्मी.

कमलाबणें,आगरजमीनींमध्यें दरबिघा असुक माड पोफळी असाव्या असा शिरस्ता असतां त्यासजें त्याचें कमी लावणें तें.

कमलाक्ष,कमळाक्ष,पु०कमलाचा कंदामध्यें जें मणि सदृश बीज असतें तो;२,स्त्री०फुलझाड आहे;३,न०तिचें पुष्प.

कमलिनी,स्त्री०कमलाचें जें झाड ती.

कमळीचा,स्त्री०कमलिनी.

कमाई,स्त्री०कांहीं व्यापानें जी मिळकत ती;२, शेत,पीठ,इ०चांगलें व्हावें म्हणून खत घालणें

मळणें,इ०रूप संस्कारकारक व्यापार करावा लागतो ती.

कमाऊ,३लिं०जोडता जो मनुष्य तो;२,कमावून सिद्धकेलीजी माती,रंग,इ०तो.

कमाण,कमान,स्त्री०कमटा;२,तदाकार भिंत,अंगाररखा,इ०कांचा अवयव करितात ती.

कमाणगार,कमानगार,पु०कमान तीर इ०करून उपजीविका करितो तो.

कमाणदार,कमानदार,३लिं०कमान आहे जास असा जो अंगाररखा,भींत इ०तो.

कमाल,न० ﻛﻤﺎﻝ हिं०गांव,देश,इ०कांची पहाणी होऊन प्रतिवर्षी चालाया जोगी जी बेरीज ठरली असती तें.

कमालरवानीहार,पु०गुडघ्या पर्यंत यावया जोगा आणि मोठाजो पुष्पांचा हार तो.

कमावणें,कांहीं व्यवहारानें द्रव्यादि मिळविणे. २,शेत,पीठ,इ०रक्त घालणें,मळणें,इ०व्यापारानें विवक्षित कार्योपयुक्त होई असें करणें.

कमावता,३लिं०जोडता.

कमाविशी,कमाविसी,कमावीस,स्त्री०सर्कार तर्फेनें गांव,देश,इ०कांचें संरक्षण करून वसूल वासूल घेण्याचें जें काम तें.

कमाविसजमा,स्त्री०कमावीसदारानें कमाल बेरजेचा बाहेर जी जमा साधली ती.

कमाविसदार,पु०कमाविशीचें काम जाणें पतकरलें तो.

कमाविसदारी, स्त्री० कमावीसदाराचें जें कर्म ती.
कमी, ३लिं० उणा
कमोद, पु० साळींतील एक भेद आहे.
कयरी, स्त्री० केरी.
कयवार, पु० केवार.
कयवारी, ३लिं० केवारी.
कया, स्त्री० शरीरकांति.
कयाहीन, ३लिं० शरीरकांति जाची केवळ बाईट तो.
कर, पु० सं० हस्त; २, राजा प्रजापासून संरक्षण निमित्त जें द्रव्यादिक घेतो तो; ३, कांहीं राजानीं आपआपले राज्यामध्यें नांवनें उतरणारावर, कि० देवतादि दर्शनास जाणारावर जें कांहीं नियमित द्रव्य बसिवलें आहे तो; ४, कोणेकानें कोणेकापासून कांहींएक नियमानें घ्यावयाचें ठरविलें असतें, त्यास स्त्री०; ५, ३लिं० जा जा ग्रामादिस्थलाचा ठायीं राहाणारा जो मनुष्य तो, तत्तत्ग्रामादि नामपूर्वक, उ० काशीकर, पुणेकर, इ०; ६, सं० ला० सूर्यादिकाचे जे किरण; ७, करणारा याचा प्रयोग प्रायः समासीं; उ० प्रकाशातें करणारा तो प्रकाशकर, सूर्य, इ०; ८, अ० अनुकरणापुढें याचा प्रयोग होतो; उ० धडकरवाजणें; ९, स्त्री० ग्रहण, अयनसंक्रांति, होळी, आणि जा दिवशीं गावांत कोणी मनुष्य मेला आहे, तदुत्तर दिवस ती, जिचाठायीं गमनादि करूंनये म्हणून सांगीतलें आहे.

करक, पु० कों० तांबडें दिंडयाचें जें झाड तो.
करकचणें, ओढीं इ० बांधून घट्ट आंवळणें.
करकची, पु० रा० करकोचा.
करकचावणें, रा० करकचणें.

काढणें, न॰ घेणें याचा योगी प्र॰; अर्थ; युद्ध, कज्जा, इ॰ कांतून आवेश सोडून युक्तियुक्तीनें परावृत्त होऊं लागणें.

काढा, पु॰ कषाय प्रथमार्थी; २, कोणेकास द्रव्यादिक्रमण देऊन व्याजाचे जागीं जें धान्य कबूल करितात तो; ३, मालवें विकत घेतलें असतां त्याजवर बोलीचा बाहेर जें कांहीं मागून घेतात तो.

काढाऊ, ३ लिं॰ काढींव; २, कोणेकानें फिनवून उपवून आणिली स्त्री इ॰ तो.

काढा ओढ, स्त्री॰ अनेकांपासून कर्ज काढण्याचा जो व्यापार ती.

काढींव, ३ लिं॰ आपल्यास पाहिजे तसा बेत सांगून विणिवलें जें वस्त्रादि तो; २, जसा पाहिजे तसा घोडीला घोडा देऊन उत्पन्न केलें जें घोडें तो; ३, ला॰ पक्कें सोदें जें पोर, रांड, इ॰ त्यास म्ह॰.

काढू, ३ लिं॰ दुसऱ्यापासून आर्जवाद्यनेक युक्तीनें द्रव्यादि काढण्याचा स्वभाव जाचा तो.

काढ्या, ३ लिं॰ काढू.

काणा, ३ लिं॰ एका डोळ्यानें जास दिसत नाहीं तो; उ॰ अंधळ्यांत काणा राजा; २, जा देशादिकांत जी वस्तु पाहिजे ती वेळेस मिळत नाहीं तो देश; ३, कोणेक देशीं दुष्कर्मादि केल्यामुळें पुनः त्या देशादिकांत जाववयास योग्यता जास राहिली नाहीं त्यासतो देशादि; उ॰ डोळा काणा असावा परंतु मुलूक काणा असूंनये; ४, एक पेड बारीक आणि एक पेड मोठा झाल्यामुळें विलक्षण प्रकारची होती जी दोरी, किं॰ तिडून वांकडी जाली जी गाडी, बाज इ॰ तो.

काण्णव, पु॰ ब्राह्मणांत जाति आहे.

काण्णूबाण्णू, न॰ फिरकोळ जो अनेक पदार्थांचा समुदाय तें; २, जेथां अमुक अमुक अंशारूपानें त्या त्या पदार्थांची विवक्षा नाहीं तेथां या शब्दानें सामान्यरूपानें निर्देश होतो.

कात, काथ, पु॰ खैर इ॰ वृक्षांचे अंगचा जो अर्क काढितात तो; जो विड्यांत खातात व चुन्याचा मसाल्यांत पडतो तो; एवढ्यानें काय कात होणार इ॰ स्थलीं एवढ्या पदार्थानें विवक्षित कार्याचा यत्किंचित् अंशही होणार नाहीं असा अर्थ.

कांत, स्त्री॰ सर्पादिकांचे अंगावरील जी त्वचा निघते ती; २, पु॰ कों॰ जोतें धक्का इ॰ कांचा जो कांठ तो; ३, काष्ठादि कांतलें असतां जो अंश निघतो तो.

कांत, पु॰ सं॰ भर्ता; २, ३ लिं॰ सुंदर; ३, पु॰ लोह धातूंत भेद आहे; ४, स्त्री॰ कांतीचा अपभ्रंश.

कातकरी, काथकरी, पु॰ गुहांत जाति आहे, जे कातकरितात.

कातगोळी, काथगोळी, स्त्री॰ कातामध्यें सुवासिक द्रव्यें घालून जी गोळी बांधितात ती.

कातडी, स्त्री॰ मनुष्यादिकांचा अंगावरील जें चर्म ती, अंगावर असतांच म॰.

कातडें, कातांडें, न॰ चर्म.

कांतणें, कातणें, काष्ठ, हस्तिदंत इ॰ चरकाम लावून शस्त्रानें विवक्षितानुरूप गोलाकार विशिष्ट करणें; २, चाकी, रहाट, इ॰ कानें सूत निर्माण

निर्माण करणें; ३, कों० ल्या० ज्वरादिकानें शरीर कृश होणें; ४, न० करंजी इ० कराव्याचें औत आहे.

कांतर, अ० कांकीं.

कातर, स्त्री० कर्नरी; २, अष्टदिशांचे मधील जीं अंतरालें तीं प्रत्येकीं; ३, कच प्रथमार्थी; ४, नद्या, मार्ग, इ० कांचा तिरकस संयोग झाल्यामुळें मध्यें त्रिकोणाकार क्षेत्र पडतें तें; ५, एकद्वातावर रेषा चिन्ह असतें जाचा योगानें द्वातीं पैसा दिकतनाहीं तें.

कातरणें, कातरीनें कागदादि कापणें.

कातरता, अ० तिरकस या अर्थी प्रा०

कातरा, पु० वस्त्रादिकांचा विवक्षित अंश राखून कातरून काढाव्याचा, किं० काढलेला जो अतिरिक्त भाग तो; २, दोन सोप्यांचे संयोगाचा जो संधि पडतो तो; ३, तादृश इतर पदार्थांचाही तादृश संधीस म्हणतील: ४. रा० थंडी इ० कानें पदादिकांस जा भेगा पडतात तो: ५. अ० कंसरता.

कातरी, स्त्री० कातर प्रथमार्थी.

कातरीनिरगुंड, स्त्री० निरगुंडीत भेद आहे.

कातऱ्याचोर, पु० कातरीनें दुसऱ्याचा रिवसा इ० कापून चोरितो तो.

कातळ, पु० न० अकृत्रिम दगडांची जी भूमि तें तो.

कातळवट, त्रिलिं० कातळजा जमीनीं मध्यें विशेष तो.

कातळा, पु० कों० केळें, काल, इ० कांचा वर्तुल पातळ जो तुकडा तो.

कांता, स्त्री० सं० सुंदर जी स्त्री ती; २, जाजवराबर जिचा विवाह झाला आहे ती त्याची.

कांतार, न० सं० अरण्य.

काँतारी, पु० काष्ठादि कांतून उपजीविका करितो तो.

कांति, स्त्री० सं० पदार्थ मात्राचे ठायीं सुशोभित दिसायाजोगा जो तेजोविशेष ती.

काँतीण, कातीण, स्त्री० कोळ्या सारिखा क्षुद्रजंतु आहे.

काँतींव, त्रिलिं० कांतून केला जो स्तंभादि तो.

काँतींवकोरींव, त्रिलिं० कोरींवकांतींव.

कात्री, स्त्री० कातर.

काथ, पु० कात.

काथकढी, स्त्री० काथ्याची जी एक काढी ती.

काथंवणें, रा० आंबा बांठा धरण्याचा दशोस घेणें

काथवट, स्त्री० काठवट.

काथा, काथ्या, पु० नारळाचे साल पदांत जे तंतु असतात, किं० सुरमाडाचे अंगास तदाकारच असतात त्यांचा समुदाय, क्वचित् त्याचे दोरीसही म्ह०; २, रा० आंब्याचे कोईस जें केंशर तो; काथा कुटणें म्ह० जापासून कांहीं फल नाहीं असा वाग्व्यापार करीत बसणें.

काथाकूट, काथेकूट, स्त्री० निष्प्रयोजक वाग्व्यापार करीत बसण्याचा जो व्यापार ती.

काथोट, स्त्री० काथवट.

काथोडी, पु० काथकरी.

कादंबरी, स्त्री० निर्मूल कथा रचून कवीनें एक काव्य

व्य केलें आहे; २, ला० कल्पित कादंबरी.

कॉंदरी, स्त्री० कों० कांद्यास जे लहान लहान कांदे फुटतात ती.

कॉंदा, पु० कंद; २, पलांडु.

कादाचित्क, वि० सं० कदाचित् होणारा जो तो.

कान, पु० कर्णश्रवणार्थी; २, काठवट, मोदकाचा वाडवा, टोपी, इ० कांस जे तदाकार अवयव राखिले असतात तो; ३, भूषणें घालावयाकरितां जींकर्णास छिद्रें पाडिलीं असतात तीं प्रत्येकीं; कान किटणें, स० कांहीं एक गोष्ट अनेकवेळा श्रवण केल्यामुळें कंटाळा येणें; कोणेकाचे कान उघडणें स० अन्यथा वर्तलास तर घात होईल, इ० प्रकारानें कोणेक गोष्ट पुरतेपणी मनांत आणून देणें: कान पाडणें स० आकार्यावर आवेशानें प्रवृत्त झाला तें कार्य; दुर्निर्वाह सें वाटल्यामुळें आवेश सोडून राहणें; कान फुटणें स० कानानें शब्द श्रवण होईनासें होणें, कि० पू इ० वहाणें; कोणेकाचे कान भरणें, कि० भारणें, स० विवक्षितानुरूप त्याची प्रवृत्ति व्हावी म्हणून युक्तीनें अनेक प्रकारचे उपदेश करणें; पोराचे कान लांबणें, कि० वाढणें, स० जसेंजसें थोर होत जातें तसेंतसें अकूल कमी होत जाणें; कान झाडणें स० दुसऱ्यानें प्रार्थिलेल्या गोष्टीविषयीं नाहीं म्हणून सांगणें; कान फुंकणें, स० कोणेकाचे कानीं मंत्रादि उपदेशिणें, कि० कान भरणें; कानीं लावणें स० कानांत कांहीं सांगणें; कानावर घालणें, स० कोणेक गोष्टीविषयीं कोणेकानें सहाय व्हावें. कि० आज्ञा द्यावी इत्याद्यर्थ तीं गोष्ट त्या राजादिकांस श्रुत करणें, कानास खडा लावणें; स० पुनः त्यानें तो अपराध न करावा म्हणून कानास खडा टोंचणें, कान उपटणें, इ० शिक्षा करणें; कानावर हात ठेवणें, कानांत बोटें घालणें, कान झाकणें, स० या गोष्टीमध्यें मीं नाहीं यास माझें संमत नाहीं असें सुचविणें; कानांत तुळशी घालणें स० प्रापंचिक लबाडीचे छंद सोडून बात्याकारीं साधुत्व धरणें; कान देणें, स० कांहीं गोष्ट श्रवण करण्याविषयीं अवधान देणें; कांही गोष्ट इकानावरून जाणें, स० सरासरी ऐकलीशी होणें; कान उपटणें, कान धरणें. पिळवटणें इ० स्थलीं कानास खडा लावणें असा अर्थ होतो; कोणेकाचा कोणेकानें कान कापणें, स० चातुर्यादि गुणांनीं त्यापेक्षां वरचढ असणें; स० घोड्याशीं घोडा धांवला तरी कानाचें अंतर; कानास येणें, कानावर येणें, स० कांहींएक गोष्ट श्रुत होणें; कानाचा हालका. स० कोणी खरी खोटी गोष्ट सांगितली असतां जास तत्काल खरीशी वाटती तो; कांहीं गोष्ट कानींमनीं नसणें, स० त्या गोष्टीची मनांत एकवेळही संभावनाही आलेली नसणें.

कानकळाशी, स्त्री० पशूंचे कर्णादि अवयवांची जी ठेवण ती.

कानकिरळी, स्त्री० कों० पशूंचे कानांत रोग होत असतो ती.

कानकुरकुटी, स्त्री० पोरें इ० कांचे कानास कीड लागत असती ती; २, कों० कानकिरळी.

कानकोंपरा, पु॰ चतुरस्र वर्तुल इ॰जे क्षेत्रादिकाचे आकार तद्बहिर्भूत जे त्या क्षेत्रादिकाचे अंश असतात ते॰

कानकोरणें, न॰ कानांतील मळ काढावयाचें शस्त्र आहे॰

कानगी, स्त्री॰ कांहीं एक गोष्ट गुप्तपणें अनेकांस समजाविण्याचा जो व्यापार ती; २, व्यंकोबा म्हणून देव आहे त्यास जें प्रतिवर्षी द्रव्य देतात ती॰

कानगोष्ट, स्त्री॰ दुसऱ्यानें श्रवण न करावें म्हणून कांहीं एक गोष्टीचें कानांत जें हळूच कथन, कि॰ ती गोष्ट॰

कानघुशी, स्त्री॰ कों॰ हातानें आपला कान धरून त्याच हाताचे कोंपरानें गोटी उडविण्याचा जो प्रकार ती॰

कानघुसणी, स्त्री॰ कों॰ कानघुशी॰

कानघोण, स्त्री॰ घोण म्हणून क्षुद्र जंतु आहे. ती प्रा॰ कानांत शिरत्ये॰

कानचिंबळी, स्त्री॰ कों॰ शिक्षार्थ कान पिंळवटण्याचा जो व्यापार ती; चे, धा॰ प्र॰॰

कानदाळ, कानदाळें, न॰ कों॰ बसणें, उघडणें याचा योगीं प्र॰ अर्थ, शेल्यादि विकूनानें, कि॰ मोठा नाद श्रवण झाल्यामुळें कर्णेंद्रिय बधिर प्राय होणें, उघडणें स॰ नी बधिरता जाणें प्र॰ अनेकवचनीं॰

कानठळें, न॰ कानदाळ॰

कानठळा, पु॰ कानठळें॰

कानडा, वि॰ करनाटकी मनुष्य, भाषा, इ॰ तो; २, पु॰ एक राग आहे; ३, कानवडा॰

कानडें

कानडें, न॰ दुर्बोध जें भाषण, वृत्त, इ॰ त्यास स॰॰

कानडोळा, पु॰ कानाडोळा दिरंगाई; २, तिसऱ्यास न समजायाजोगी कोणेकास मजून होण्याविषयीं, कि॰ निवृत्त होण्या विषयीं कोणेकानें नेत्रादिकानें केलीजी खूण ती॰

कानन, न॰ सं॰ अरण्य॰

कानपट्टी, स्त्री॰ कानावरून रुमाल इ॰ कांची जी पट्टी बांधीत असतात ती॰

कानपर्णें, देवीचें फोड मावळणें॰

कानपा, पु॰ को॰ काठवट इ॰ कांचा जो कान तो॰

कानपिसा, वि॰ कों॰ कानाचा हलका॰

कानपिळा, पु॰ विवाहामध्यें नवरीचे भावास स॰॰

कानफट, कानफड, न॰ कानाचे पुढचा गालावरील जो प्रदेश तें॰

कानफाट्या, कानफाडा, कानफाटी, पु॰ गोसांव्यामध्यें एकभेद आहे. जाचा कानामध्यें कुंडलें असतात॰

कानफुटी, स्त्री॰ औषधी वेल आहे॰

कानमंत्र, पु॰ कानगोष्ट॰

कानमंत्री, स्त्री॰ कों॰ कानमंत्र॰

कानवडणें, मनुष्यादिकानें कुशीवर निजणें, कि॰ कांहीं पात्रादि पदार्थ एक्या कुशीवर राहाणें॰

कानवडा, वि॰ कानवडून स्थित जो पदार्थ तो॰

कानवला, पु॰ एक पक्वान्न आहे: २. एक वृक्ष आहे॰

कानवसा, पु॰ दुरचा शब्द एकायतेनें कान देऊन श्रवण करण्याचा व्यापार तो; चे, धा॰ प्र॰॰

कानवळ, पु॰ कानामागें जो रोग होत असतो तो॰

कानवा

कान्नवा, पु॰ कों॰ कानोसा; २. कानांतील जो मळ तो.

कानवेणी, स्त्री॰ मुलें इ॰ कांचा कानाजवळील केशांची जी कानासमीप वेणी घालितात ती.

कानशींल, कानसळ, कानसूल. न॰ कानफड तें.

कानस, स्त्री॰ पु॰ लोहादिक घांसून तोडायाचें एक तिरव्याचें औत आहे.

कानसणें, रुपया इ॰ कानसानें घांसणें.

काना, पु॰ तोफ, बंदूक, इ॰ कांचें रंजक भरायाचें जें छिद्र तो; २, तोफेस दोहों अंगांस दोन मुठीनें धरायाजो गेवगाड्यांत अडकवायासाठीं जे दोन अवयव रासिनात ते प्रत्येकीं; ३, काण्यास स्त्र॰; ४, अक्षरास उभी जी रेषा असनी तो; ५, कों॰ पाणी इ॰ वहाया करितां मध्यें पोरवरून पन्हाळा सारिखा केलेला जो चिरा, किं॰ तदाकार चुना इ॰ कांचा करिनात तो.

कानाडी, स्त्री॰ बाणसोडायाचा वेळेस कर्णापर्यंत मनस्वी ताणून ओढिलीजी धनुष्याची दोरी ती.

कानाडोळा, पु॰ प्रयत्न करण्याचे प्रसंगीजो उदासीनपणा तो; २, कोणेकाचे अपराधादि समजलें असतांही ऐकलें न ऐकलें करण्याचा जो प्रकार तो.

कानामात्रा, स्त्री॰ अक्षरास यावयाचीं जीं कानामात्रा विंदू इ॰ चिन्हें तीं; उ॰ मी आपलेकडून चांगलें लिहिलें आहे परंतु कोठे कानामात्रा गेल्या असली तर पहा.

कानी

कानी, स्त्री॰ कों॰ दांवें, दावण, घांस जीं पेडीं असतात तीं प्रत्येकीं; २, शिंप्यास जे चार अवयव असतात ते प्रत्येकीं.

कानीन, ३लिं॰ विवाह झाल्याचेपूर्वी कन्यकापणी जें अपत्य तो.

कानू, स्त्री॰ राजा, धनदार, इ॰ कांहीं प्रजादिकांनीं असा कर द्यावा या या प्रकारें वर्तावें असा जो वर्तणुकेचा नियम ठरला असतो ती.

कानूजाबता, पु॰ सर्व कानू जाजबर लिहिल्या असतात तो कागद.

कानोसा, पु॰ कानवसा.

काप, पु॰ स्त्रियांचें कर्णभूषण आहे; २, पु॰ न॰ केळें, आंबा, इ॰ कांचे जे तुकडे ते प्रत्येकीं; स्त्र॰ कापगेले आणि भोंकें राहिलीं.

कॉंप, पु॰ शरीरास शीतज्वरादिकांमुळें जो कंपसुटतो तो.

कापकडीसुपारी, स्त्री॰ सुपारी कोंवळी काढून जिचे काप शिजवून वाळिवले असतात ती.

कापटय, न॰ कपटीपणा.

कापड, न॰ वस्त्र.

कापडकरी, ३लिं॰ कापड विकितो तो.

कापडणें, कों॰ छत, स्तंभ, इ॰ कापडानें मढिवणें.

कापडी, ३लिं॰ कापडानें केला जो डोला इ॰ तो; २, पु॰ भगवीं वस्त्रें धारण करून भागीरथीची कावड खांद्यावर घेऊन तीर्थ यात्रा करीव फिरतो तो.

कापणावळ, स्त्री॰ शेत, लांकूड, इ॰ कापण्याचें

जें

जें मोल ती.

कापणी, स्त्री॰ शेत इ॰ कापण्याचा जो व्यापार ती.

कापणें, तलवार, करवत, चाकू, इ॰ कानीं कांहीं पदार्थ द्विधा करणें. किं॰ खंडित करणें; २, ला॰ वर्षासन, गोंजारुग, इ॰ कमी करणें.

काँपणें, कंपयुक्त होणें.

कापता, अ॰ कातरता.

काँपरा, अलिं॰ सर्वदा कांपत असतो जो तो.

काँपरी, स्त्री॰ थंडी, भय, इ॰ कानें शरीरास कंप सुटावा जाँगीजी विकृति होती ती.

काँपरें, न॰ कांपरी.

कापशा, अलिं॰ कों॰ फोपशा.

कापशी, स्त्री॰ एक झाड आहे.

कापळा, कापोळा, पु॰ कों॰ उंडीचे गराचा जो काप तो.

कापुरकचरी, स्त्री॰ सुवासिक एक कंद आहे.

कापुरचिनी, स्त्री॰ एक औषधी पदार्थ आहे.

कापुरपोंवळी, कापुरपोंवळें, न॰ लारवेचें जें पोंवळें करितात तें.

कापुरभेंड, कापुरभेंडी, स्त्री॰ एक वृक्ष आहे.

कापुरमोती, न॰ पान्याचें जें मोती करितात तें

कापुरविडा, पु॰ कापुरयुक्त जो विडा तो.

कापुरवेल, स्त्री॰ नागवेलींत एक भेद आहे.

कापुसणें, भोंपळा, इ॰ फलांत कापसा सारिखी विकृति होत असती तद्विशिष्ट होणें; २, शरीरमेदोवृद्धीनें युक्त होणें.

कापूर, पु॰ एक सुंगधि द्रव्य आहे.

कापूस, पु॰ कापशीचे फलांत द्रव्यविशेष असतो जाचें सूत कादून वस्त्रादि करितात तो; २, तत्सदृश सांवरी, रुई, कुडा, इ॰ कांचे फलांत निघतो त्यास ल॰; ३, तवसें, भोंपळा, इ॰ चिरकाल राहिल्यामुळें नासून तत्सदृश आंत द्रव्य विशेष होतो तो; ४, अवाळूं, श्यामरवीळ, इ॰ कांचे पोटीं जें फुसफुशीत मांस असतें तो; कापूस सर्वांग करणें इ॰ स्थळीं शरीरानें पुष्ट होणें, महाग करणें, ल॰ रुशा होणें असा अर्थ.

काफर, अलिं॰ हिं॰ हरामी.

काफरी, पु॰ शिधी लोकांस ल॰.

काफला, पु॰ दूरदेशींचा यात्रेस मार्गी चोरादि भयास्तव शिपाई, प्यादे, इ॰ बरोबर घेऊन निघतो जो हजारों लोकांचा समुदाय तो; २, या रीतीनेंच गलबत इ॰ कांचा जो समुदाय निघतो तो.

काफी, पु॰ एक राग आहे; २, बुंद सणून दाण्या सारिखा पदार्थ आहे, तो व त्याचें पाणी करून घेतात ती.

काँब, स्त्री॰ वेळू, चिवा, इ॰ कांचा उभा चिरलेला जो तुकडा ती; २, तदाकार धातूचा जो तुकडा ती; ३, कोंपरापासून मणगट पर्यंत जें हाड ती; ४, कों॰ एकमेकास पाडावयासाठीं मानेस घालितात जी एका हाताची मिठी ती; ५, पंधरा तसूचे मानाचा जो दंड, क्षेत्रादि मोजावयासाठीं करितात ती.

काँबटी, स्त्री॰ कांबीट.

काँबरूण, न॰ पांघरूण.

कांवळा, पु॰ दोन घोंगड्या एकत्र शिवून विशिष्ट वस्त्र करितात तो.

कांवळी, स्त्री॰ गाय, बैल, यांचे गळ्यारवाली जें मांसल चर्म लोंबत असतें तो.

कांवळें, न॰ घोंगडी, कांवळा, इ॰ तें; २, सामान्यतः ऊर्णावस्त्रास ह्मण॰.

कांवळ्या, पु॰ सर्पांत एक भेद आहे; २, ३लिं॰ घोंगड्या.

काबा, पु॰ मनुष्यांत एक जाति आहे; २, कों॰ नारळ कोंवळा काढल्यामुळें जो बेचव होतो तो.

काबाड, न॰ कबाड.

काबाडकष्ट, पु॰ काबाडकाम.

काबाडकाम, न॰ जा मध्यें कोशल्याचें प्रयोजन नाहीं असें जें ओझीं वाहणें जमीन रखणें इ॰ तें.

काबाडरखोत, पु॰ कों॰ सर्कारांतून काबाडाची रखोती जाणेकरितां आहे तो.

काबाडरखोती, स्त्री॰ कों॰ काबाडाची जी रखोती ती.

काबाडी, ३लिं॰ काबाड्या; २, ला॰ जाला नाजूक कुशलतेचें काम करितां येत नाहीं त्यास ह्मण॰.

काबाड्या, ३लिं॰ कबाडी.

काबीज, ३लिं॰ हिं॰ पराक्रमानें स्वसत्ताक्रांत जो देश मनुष्यादि तो.

कांबीट, स्त्री॰ न॰ बांबू इ॰ कांची, किं॰ हाताची जी कांबती तें.

काबील, ३लिं॰ हिं॰ सर्व कामामध्यें जो प्रवीण तो; २, काबीज.

काबू, ३लिं॰ हिं॰ अनेक युक्तीनें कांहीं कार्यकरून घेण्याविषयीं जो कुशल तो.

काबूदार, ३लिं॰ कों॰ काफर.

काबूदारी, स्त्री॰ कों॰ काफरपणा.

कांब्याशेंदूर, पु॰ एक औषधी पदार्थ आहे.

कांभरूण, न॰ कांवरूण.

काम, पु॰ सं॰ मैथुनेच्छा, किं॰ तत्कारणीभूत जी शरीरांत विकृति होती तो; २, तदभिमानिनी देवता आहे; ३, इच्छा; ४, न॰ करण्याचा व्यापार तें; ५, सिद्ध करण्याविषयीं विवक्षित जी कांहींएक गोष्ट तें; ६, कांहीं कार्याविषयीं कांही पदार्थांची जी सापेक्षता तें; उ॰ सद्यः मला चाकूचें काम नाहीं; ७, पु॰ खाणें, पिणें, इ॰ सुखोपभोगरूप लौकिक जो पुरुषार्थ तो; ८, मामलत, चिटनिविशी इ॰ तीं न॰; काम काढणें. ह्म॰ मारून मुटकून दुर्दशा होई, नाहींसा होई असें करणें; कामासयेणें, पडणें, ह्म॰ कांहींएक गोष्ट कोणेकास अभिमत होणें, किं॰ उपयोगी पडणें; कामावर पडणें, ह्म॰ कामासयेणें; कामांतून जाणें, ह्म॰ उपयोगानर्ह होणें.

कामकरी, पु॰ स्त्री॰ ण, शेत इ॰ कांचें काम करण्याविषयीं ठेविलेला जो गडी तो.

कामकाज, न॰ लाहान मोठें जें काम तें.

कामकारभार, पु॰ राज्यादि संबंधी जें कामकाज तो.

कामगार, पु॰ कांहीं कारखान्यावर खपावयासाठीं ठेविलेले जे मनुष्य तो.

कामगिरी, स्त्री॰ राजादिकानें भृत्यादिकांस सांगितलेलें जें राजोपराजयादिरूप काम ती;

कामचुकार, कामचुकारू, ३लिं० कामाचा प्रसंगीं चुकविण्याचा स्वभाव जाचा तो.

कामचुकाव, ३लिं० कामचुकारू.

कामचोर, ३लिं० कामचुकाव.

कामत, पु० कांहीं शेणव्यांचा नामापुढें हें प्रतिष्ठानामलागतें.

कामधंदा, पु० कामकाज.

कामधेनु, स्त्री० इच्छिला पदार्थ देणारी अशी पुराणप्रसिद्ध गाय आहे; २, ला० मशंसादि प्रसंगीं साधारण गायीस ल०; ३, झोडीस संकेतानें ल०; ४, कांहीं आपल्यास निरंतर फलप्राप्ति होत असती असाजो यजमानादि त्यास ल०

कामना, स्त्री० कांहीं विषयप्राप्तिविषयीं किं० कर्तव्याविषयीं उत्पन्न झाली जी इच्छा ती.

कामनिक, न० कांहीं कामनाधरून करितात जें व्रतादिक तें.

कामबोध, पु० एक राग आहे.

कामरूपी, ३लिं० जशी इच्छा झाली तसा देहधारण करण्याचें सामर्थ्य जा मध्यें आहे तो राक्षसादि तो.

कामला, स्त्री० सं० एक कामीण ह्मणून रोग आहे.

कामशास्त्र, न० स्त्रीपुरुषलक्षणपूर्वक संभोगाची इतिकर्तव्यता जा मध्यें सांगितली आहे तें.

कामसू, ३लिं० निरंतर उद्योग करण्याचा स्वभाव जाचा तो.

कामाचा, ३लिं० जाचा कोणेक कर्माविषयीं उपयोग आहे असाजो पदार्थ तो; २, कोणेक काम करण्याविषयीं गुंतल्यासुळें जो रिकामा नहे तो.

कामाठी

कामाठी, पु० स्त्री० ण, मजुरीनें उपजीविका करणारी अशी तेलंग देशीय शूद्र जाति आहे.

कामातुर, ३लिं० मैथुनेच्छेनें जो विह्वळ झाला तो.

कामावणें, कों० जा पदार्थास जो संस्कार पाहिजे तो करून तो पदार्थ कार्यक्षम करणें.

कामाक्षी, स्त्री० रा० करदळी; २, एक देवी आहे.

कामिना, कामिणा, स्त्री० सं० शृंगारप्रकरणी जी नायिका ती.

कामिनी, स्त्री० कामिना.

कामी, ३लिं० मैथुनेच्छा आहे जास तो; २, कार्योपयोगी जो मनुष्यादि तो; ३, कामसू; मथमार्थीमात्र स्त्रीलिंगीरूप कामिनी असें होतें.

कामीण, स्त्री० एक रोग आहे. जो पक्क झाला असतां पांडू होतो

कामुक, ३लिं० मैथुनेच्छा आहे जास तो; २, इच्छा आहे जास तो प्रायः समासी प्र०; विद्याकामुक, धनकामुक, इ० जाणवे.

काय, न० मनुष्येतर कांहीं पदार्थ, किं० गोष्ट यांचें हें अमुक, अमुकशब्दवाच्य, असें ज्ञान नसतां या सर्व नामानें निर्देश होतो; वनद्युदित वाक्यांत प्रश्न काक्षार्थ गम्यमान असतात; उ० तुमचे हातीं हें काय आहे; हें काय मी जाणत नाहीं: तो काय देईल तें घेऊन ये; २, पु० देह; ३, अ० संभावनेचें द्योतक; उ० आजपाऊस पडेल काय.

कायकीं, अ० कांहींएक गोष्टीचे प्रश्नाचें असेल तर असेल मला ठाऊक नाहीं असे जें उत्तर तदर्थक अव्यय.

कायत

कायन, पु॰ हिंदूंत एक जाति आहे.

कायनी, वि॰ कायन संबंधी जें अक्षराचें वळण, वेष इ॰ तो.

कायदा, पु॰ या या प्रकारें वर्तावें अन्यथा न वर्तावें असाजो कांहीं नियम बांधला असतो तो.

कायफळ, न॰ एक औषध आहे.

कायसा, वि॰ जाचें नाम असुक असूनू स्मरत नाहीं त्यास सामान्यतः अ॰; उ॰ तुमाला त्यानीं कायसा निरोप सांगितला होता पण मीं विसरलों.

कायसाच, वि॰ कसाचमा.

कायस्थ, पु॰ हिंदूंत जाति आहे.

कायस्थी, वि॰ कायस्थ संबंधी जें अक्षर लिपि इ॰ तो.

काया, स्त्री॰ देह; २, कया.

कायापूर, न॰ नगराचे रूपकानें देहास अ॰

कायावाचामनेंकरून, अ॰ देहानें, शब्दानें, मनानें, कांहीं पुण्य पापादि कर्म करण्याचें वि॰

कायिक, वि॰ देहानें आचरित जें पुण्य पापादि तो.

कार, पु॰ धोंड्यांत भेद आहे; २, रा॰ पुरुषार्थ होत इ॰ कांस घालायाचें जें रबत तो; ३, वर्णमात्रापुढें स्वार्थी आचा प्र॰ होतो; उ॰ अकार ककार इ॰; ४, करितो तो, या अर्थी समासीं प्र॰ उ॰ वस्त्रांतें करितो तो वस्त्रकार, शस्त्रकार, इ॰

कारक, न॰ वाक्यांमध्यें क्रियेवर जांचा अन्वय असतो असेजे कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, आणि अधिकरण. हीं प्रत्येकीं; २, वि॰ करितो तो. प्रायः समासीं प्र॰; उ॰ शांतिकारक, पुष्टिकारक, इ॰; ३, रा॰ रबत पडल्यामुळें कुळ्यादि करण्याविषयीं वांगली झाली जी जमीन ती.

कारकीर्द, स्त्री॰ राज्य, संसार, इ॰ व्यवहारांवर कोणेक कर्त्याचें कांहीं काल जें कर्तृत्व चालन असतें ती.

कारकुनी, स्त्री॰ कारकुनाचें जें कर्म ती; २, जो आपण वेतन देऊन कारकून ठेविलेला नहे त्याचे हातून कांहीं काम करून घेतल्यामुळें जें त्यास द्रव्यादि द्यावें लागतें ती; ३, कांहीं एक व्यापारांत बारीक दृष्टीनें कसर काढण्याचा प्रकार ती; ४, वि॰ कारकुन संबंधी अक्षर, लेखरीति, इ॰ तो.

कारकुनीपेढ्या, पु॰ अन्यनिष्ठ स्वामित्व निरूपित कोणेका कडे कारकुनीचें नातें असतें तो.

कारकून, पु॰ राज्य, सावकारी, इ॰ व्यवहारलेखामध्यें जो कुशल तो.

कारकोळी, कारकोळ्या, वि॰ कारकोळ असूनू देश आहे तत्संबंधी मनुष्यादि तो.

काररवानदार, पु॰ कांहीं एक काररवान्यावरचा अधिकारी, कि॰ त्याचा हाताखालचीं रवटपट करण्याचीं माणसें तो.

काररवाननीस, पु॰ सर्कारी किल्ले कोट इ॰ काररवान्याचा जो अधिकारी तो.

काररवाना, पु॰ जाचे पोटीं अंगभूत कामें अनेक असतात असा जो गृहबंधन, गुरांढोर कृषि-

कर्म, इ० विशिष्ट जो व्यापार तो; २, तत्साधनीभूत पदार्थांचा समुदाय तो; ३, साधारण व्यापारासही ल०.

कारंजें, नं० शोभार्थ पाणी उंच उडवायाचें यंत्र करीत असतात तें.

कारट, न० कों० कर्मीतरास निंदेनें ल०.

कारटा, २लिं० पोरास निंदेनें ल०.

कारट्या, पु० कर्मीतऱ्या.

कारंडव, पु० सं० एक पक्षी आहे.

कारण, न० कार्याचे अधिकरणीं नियमें करून विद्यमान असून जें कार्योत्पादक तें; २, कांहीं एक क्रियेचें जें उद्देश्य तें; उ० कारणावांचून कोणतेंही कर्म करूं नये; ३, कांहीं एक कार्याविषयीं कांहीं एक पदार्थांची जी सापेक्षता तें; उ० आज पाऊस लागला नाहीं, यावरून उत्रीचें कारण लागलें नाहीं; ४, लग्न, मुंज, इ० मंगल कार्य तें.

कारणी, २लिं० सावकारी गलबतांवर जो मुख्यत्वेंकरून यजमानाचे स्थानीं चाकर असतो तो; २, ला० जाराज्यादि व्यवहारीं जो मुख्य कारभारी त्यास ल०.

कारणें, अ० संप्रदान कारकापुढें याचा प्र० होतो: उ० ब्राह्मणाकारणें गाय दे.

कारंदा, पु० एक वेल आहे; २, त्याचा कंद व फल तो.

कारभार, पु० राज्य, सावकारी, इ० कांचा मुख्यत्वेंकरून अंगावर भारयेऊन तन्निर्वाहार्थ करायाची जी देणें, घेणें, इ० खटपट तो.

कारभारी, पुं० स्त्री० ण, कारभार मुख्यत्वेंकरून जो करितो ना.

कारला, पु० बांगडयांमध्यें भेद आहे.

कारली, स्त्री० एक वेल आहे.

कारलें, न० कारलीचें जें फल तें; २, तदाकार भूषण किं० आयुध करितात तें.

कारव, स्त्री० एक झाड आहे, निचाजा काढ्यानिघतात त्या प्रत्येकीं.

कारवणें, कों० अरकस्णें; २, भाजी इ० पदार्थ पुरता न शिजतां उतरून निवाल्यामुळें बेचव होणें; ३, फणस, इ० कांनीलगरे, इ० काळे इ० रूप होत अशाविकारातें पावणें; ४, रा० जमीन खत घालून कामावणें.

कारवा, पु० स्त्रीचा वेष असून पागोटें, तलवार, इ० कानें कांहीं पुरुषाचा वेष धरून जें सोंग आणितात तो.

कारवान, पु० अनेकांनीं मिळून परदेशाहून घोडीं इ० पशू आणून विकावे, असा उद्योग करणारा जो तो.

कारवानी, २लिं० कारवानानीं आणिलें जें घोडें इ० तो.

कारवी, स्त्री० कारव.

कारसाई, स्त्री० सर्कारांत प्रजांपासून प्रतिवर्षी घेत असतात जें तृण, काष्ट, दोरांचे गुंडे, इ० तीं.

कारस्थान, न० कांहीं मोठें कार्य सिद्ध करण्याविषयीं गुप्त युक्तीनें बांधिलेलें जें संधान तें.

कारस्थानी, २लिं० अनेक कारस्थानें करायास

स जो आणतो पुरुष तो.

कारळातीळ, पु॰कों॰ तिळांत एक भेद आहे.

कारळें, न॰ कडूकारळें.

कारा, स्त्री॰ सं॰ चोर इ॰ अपराधी कोंडून ठेवाव्याचें जें घर ती; याचा म॰ व्यवहारांत गृह शब्दाचा पर्यायापुढें लागून होतो; उ॰ कारागार, कारागृह, इ॰; २, ला॰ जा स्थलीं दुःख जालें असतांही तेथून निघण्याविषयीं सुटका होत नाहीं असें जें संसारादि त्यास ल॰.

कारागिरी, स्त्री॰ कारागीरपणा; २, कार्यावर दृश्यमान जें कारागीरकृत कौशल्य असतें ती.

कारागीर, ३लिं॰ शिल्पकलामध्यें जो कुशल तो.

कारावणें, कारवणें.

कारिका, स्त्री॰ कांहीं शास्त्रार्थ जामध्यें बांधिला असतो असा जो श्लोक ती सा॰ बत्तीस अक्षरी श्लोक असतो; २, त्या श्लोकांचा समुदाय ती.

कारिगर. ३लिं॰कों॰ कारागीर.

कारिगिरी. स्त्री॰कों॰ कारागिरी.

कारिंट. स्त्री॰ एक वेल आहे: २. न॰ तिचें फळ तें.

कारिंदा. पु॰कों॰ कारंदा.

कारिवना, पु॰ ब्राह्मी ह्मणून वनस्पति आहे.

कारीक, ३लिं॰ कारक अंतिमार्थी.

कारू, पु॰ सं॰ शिल्पविद्योपजीवी जे सुतार, सोनार, लोहार, इ॰ तो; २, बलुतें वाले जे महार, चांभार, ते म॰.

कारुण्य

कारुण्य, न॰ करुणा.

कारेती, स्त्री॰ कारली.

कारेतें, न॰ कारलें.

कारेल्ला, पु॰ कारळा.

कारोट, पु॰ मारणें, लुटणें, खाणें, इ॰ कारणामुळें जो सत्यानास त्यास ल॰.

कार्कश्य, न॰ कर्कशपणा.

कार्तवीर्य, पु॰ एक पुराणप्रसिद्ध राजा आहे; कांहीं गेलें, किं॰ हारविलें असतां याचा नामाचा जप करितात.

कार्तिक, पु॰ चैत्रापासून आठवा मास.

कार्तिकस्नान, न॰ कार्तिकमासीं कृत्तिकानक्षत्र लागण्याचे पूर्वी पहांटे जें स्नान करितात तें.

कार्तिकस्वामी, पु॰ एक देव आहे; जाचे दर्शनानें पुरुषास सप्तजन्म ब्राह्मणत्व प्राप्त होतें.

कार्तिकस्वामीचेभिडेचा, ३लिं॰ केवल ब्राह्मणयोनींमध्यें उत्पन्न मात्र झाला परंतु विद्या, तप, इ॰ ब्राह्मणाचे गुण कांहीं जामध्यें नाहीं त्यास ल॰.

कार्तिका, ३लिं॰ कार्तिकसंबंधी जो सोमवार. आदित्यवार इ॰ तो.

कार्तिकी, ३लिं॰ कार्तिकसंबंधी जी पौर्णिमा इ॰ तो.

कार्त्स्न्य, न॰ सं॰ साकल्य.

कार्पण्य, न॰ सं॰ कृपणता.

कार्पास, पु॰ सं॰ कापूस.

कार्मुक, न॰ सं॰ धनुष्य.

कार्य, न॰ कामनपुंसकार्थी; २, करावयाचा जो

पदार्थादि

पदार्थादिक तें.

कार्यकर्ता, ३लिं० आपले हातून दुसऱ्याचें जें कार्य होईल तें करण्याचा स्वभाव जाचा तो.

कार्यकारणभाव, पु० कार्य आणि कारण यांचा परस्पर जो संबंध तो; उ० घटाचा आणि मृत्तिकेचा कार्यकारणभाव आहे.

कार्यप्रयोजन, न० विवाहादिक जें कार्य तें.

कार्यभाग, पु० सिद्ध करण्याविषयीं योजिलेलें जें कार्य तो; प्रसंगादिवशात् त्याची सिद्धि झाली असतां प्र०.

कार्यभार, पु० सं० कारभार.

कार्यवादी, कार्यवादू, ३लिं० कोणीकडून आपलें कार्य साधायासाठीं आर्जव करणें, गोडबोलणें, इ० प्रसंगानुरूप वर्तनतो तो.

कार्यसाधक, ३लिं० विवक्षित कार्याविषयीं जो साधक तो; २, कार्यवादू.

कार्यक्षम, ३लिं० विवक्षित कार्यावर संबद्ध होण्याविषयीं जाला योग्यता आहे तो.

कार्याकारण, ३लिं० आवश्यक कार्याचे निर्वाहापुरता.

कार्यार्थी, ३लिं० कार्यवादू.

कार्श्य, न० कृशता.

काल, पु० हें झालें, हें होईल, अशा व्यवहारास कारणीभूत जो पदार्थविशेष आहे तो; जाचें मान, पल, क्षण, घटी, इ० कें करून होतें; २, मृत्यु, किं० तत्कृत जो प्राणवियोग तो; ३, समय; ४, जापासून मरणादिभय संभावना असा जो सर्पादि त्रासदायक प्र०; ५, वरें; वाईट, भाव

अभाव

अभाव, इ० होण्याविषयीं जी ईश्वरेच्छा तो; ६, ३लिं० काळा; ७, न० केळ, चवदी, पसवली असतां निचा पोटीं जें दंडाकार असतें तें; ८, अ० न० वर्त्तमान दिवसाचे पूर्वदिवशीं, किं० तो पूर्व दिवस तें.

कालकल्पा, पु० विषमत्वें करून संभावित जो भविष्य कालाचा एखादा अंश तो; उ० धान्य घेऊन ठेवावें कालकल्पा उपयोगी पडेल.

कालकूट, न० सं० समुद्रापासून जें विष उत्पन्न तें.

कालक्रमण, न० काल घालविण्याचा व्यापार तें.

कालक्रमणा, स्त्री० कालक्रमण.

कालगति, स्त्री० बरें, वाईट, होण्याविषयीं कारणभूत जें कालाचें वर्त्तन तो.

कालगुजारा, पु० विषमकालीं यथा कथंचित् जो निर्वाह तो.

कालगुजारी, स्त्री० कालगुजारा.

कालगूत, न० बाहेर दुसऱ्यास न समजतां विवक्षित कार्य जाचे योगें होत असावें अशी यंत्रादिकांचे ठायीं कर्त्यानें गुप्त ठेविली असती जी कला तें; २, तद्विशिष्ट तें यंत्रादिक तें; ३, स्वविवक्षानुरूप व्यवहार चालाया जोगें दुसऱ्याचे मनांत न येईसें बांधिलें असतें जें गुप्त सूत्र तें.

कालपरत्वें, अ० कालाचे अनुरोधानें.

कालपाश, पु० मरणसमयीं जो मृत्युपाश जिवावर पडतो तो.

कालपुरुष, पु० दान घ्यावयाकरितां जो यमाचा पुतळा करितात तो.

काल

कालमाहात्म्य, न॰ कालगति॰

कालव, न॰ समुद्रकांठीं एक जीव असतो तें॰

कालवंचना. स्त्री॰ आलेल्या विषमकाळाचा कसा तरीजो निर्वाह ती॰

कालवड, स्त्री॰ गायीचें स्त्रीअपत्य॰

कालवण, न॰ भात इ॰ ओला करावया करितां जें तक्रादि तें॰

कालवणें, कांहीं पदार्थांमध्यें दुसरा पदार्थ घालून त्याचें मिश्रण सारखें व्हावें म्हणून, कि॰ कांहीं संस्कार सारखा व्हावा म्हणून तो पदार्थ इत्यादिक आंत घालून, इकडचातिकडे तिकडचाइकडे होई असें करणें; पोटांत कालवणें म॰ पित्तादिकामुळें टवळ्यासारिखी विकृति होणें; जीव, कि॰ प्राण कालवणें. म॰ घाबरा होणें; बिटाळ कालवणें, म॰ झालेला बिटाळ प्रकट न करितां स्पर्शानें चहूंकडे प्रसृत करणें॰

कालवा, पु॰ नद्यादिकांचें पाणीं इतरत्र न्यावया करितां खणून जो मार्ग करितात तो॰

कालवाकालव, स्त्री॰ योग्य, अयोग्य, असेजे अनेक जातीचे पदार्थ त्यांचें जें एकत्र मिश्रण तीं; २, कांहीं एक गोष्टीचा विचका करण्याचा जो व्यापार तो॰

कालसत्ता, स्त्री॰ कालगति॰

कालसाधन, न॰ स्नानसंध्यादिकर्मांस जे मुख्य काल सांगितले आहेत, त्या कालाचा ठायीं जपून जें तत्तत्कार्याचें अनुष्ठान, कि॰ घटीतुरीय यंत्रादि, साधनानें विवक्षित मुहूर्तादि समयाचें जें साधन नें॰

काल

कालहरण, न॰ कालक्षेप॰

कालक्षेप. पु॰ कालाचा जो अतिक्रम तो॰

काला, पु॰ भाकरी इ॰ कुसकुरून आंत तक्रादि घालून कालवून केला जो गोळा तो; २, कोहोळीं, भोंपळे. इ॰ किसून आंत तिखट, मीठ, इ॰ घालून सांडगे करावया करितां जें द्रव्य करितात तो; ३, दहींकाला॰

कालिक, ३ लिं॰ कालाचा ठायीं उत्पत्त्यादिकानें जो काल संबंधी तो॰

कालिका, स्त्री॰ देवी आहे॰

कालिंगड, कालिंगण, न॰ कलिंगड॰

कालिमा, पु॰ सं॰ स्त्री॰ काळेपणा; २, कांहीं दोषामुळें जो कुळास कलंक लागतो तो तो॰

काली, स्त्री॰ देवी॰

कालीन, ३ लिं॰ कालिक॰

कालू, पु॰ चवघड्यांत वाजावयाचा जो टिमक्या असतात तो॰

कालें, न॰ केळ, चवई, यांचें जें काल ते॰

काल्पनिक, २ कल्पनेनेंच रचलीजी कांहीं गोष्ट इ॰ तो॰

काव, स्त्री॰ तांबडे मातींत एक भेद आहे॰

कावकाव, स्त्री॰ न॰ कावळ्याचे कलकलाटाचें अनु॰; २, ला॰ कर्जदार, याचक, इ॰ कांचा त्रास यावयाजोगा या या हेंकरा तेंकरा इ॰ रूप अनेकांचा एकवार जो शब्द त्यास ल॰.

कावड, स्त्री॰ कांबडीचा दोहों शेवटांस शिंकें इ॰ बांधून जलादि खांद्यावर वहावयाकरितां जें साधन करितात तीं

काव

कावडया, ३लिं० कावड वहाणारा तो.

कावण, न० रा० रहाया करितां, किं० गुरांढोर इ० कांवर भोंवतालें डाहाळ्याचे कूड करून वर डाहाळ्यांचा मंडप घालून जें स्थल करितात तें.

कावणें, सं० काढणें.

कावती, स्त्री० रा० पोफळीचें जें रोप ती.

कावर, स्त्री० न० कों० काष्ठ एकदेशीं फोडून दुभागकेलें असतां तें पुनः न मिटावें म्हणून त्यांत वरवंटा इ० लांपट झाला असतां त्यांत बसिवतात जो लांकडाचा तुकडा ती तें.

कावराबावरा, ३लिं० अकस्मात्, क्रोधाचे, किं० भयाचे आवेशानें मुद्रा फिरोन कर्तव्याकर्तव्य विचार जाण्या भ्रष्ट झाला तो.

कावल, न० जुनें झाल्यामुळें मोडायाचे योग्यतेस आलें जें धातूचें भांडें, किं० नवें असून केवल पातळ त्यास म्ह०.

कावली, कावल्या, ३लिं० कावला सारिखें केवळ हलकें जुनें झालेलें जें भांडें तो.

कावळकाठी, स्त्री० केवल हलकें अशक्त जें लांकूड त्यास म्ह०.

कावळा, पु० एक पक्षी आहे.

कावळी, स्त्री० औषधी आहे.

कावळेगोत, न० एकाचें कांहीं ऊर्जित झालें असतां त्यांचे स्वकीय, सोयरे, धायरे, इ० अनेक मिळतात त्यास म्ह०.

कावळ्याचाडोळा, पु० रा० एक वनस्पतीचें फूल आहे; २, ला० केवल पातळ जें ताक त्यास म्ह०.

कावा, पु० कारस्थान.

कावित्र, न० कों० कावा.

कावीरडा, ३लिं० दुरवणें, इ० कारणामुळें बहुतत्रासून जो अस्वस्थचित्त झाला आहे तो.

कावेदार, ३लिं० अनेक प्रकारचे कावे जाणणारा तो.

कावेबाज, ३लिं० कावेदार.

काव्य, न० कविकृत जो गद्यरूप, किं० पद्यरूप ग्रंथ तें.

काव्हणें, कांहीं दुःख प्राप्त झाल्यामुळें घाबरें होणें.

काशा, पु० सं० दर्भांत भेद आहे.

काशिंदा, पु० एक वनस्पति आहे.

काशी, स्त्री० सकल पुण्यक्षेत्रांत श्रेष्ठ एक क्षेत्र आहे; २, कों० जा क्षेत्रांत कलिंगडी, जिभडी, इ० लावित असतात ती: व कलिंगडी जिभडींचा समुदाय ती.

काँशी, स्त्री० कुंदा सारखून गवत आहे त्याची जी मुळी ती; प्रा० अने० व० प्र०.

काशीकर, पु० स्त्री० ण, काशीची यात्रा जाणें केली तो; २, पक्का जो धूर्त त्यास म्ह०.

काशीद, पु० जासूद मुख्यार्थी.

काशीफळ, न० एक काव्या भोंपळ्या सारिखें फळ आहे.

काशीभोंपळा, पु० एक भाजीचें फळ आहे.

काशीयात्रा, स्त्री० काशीची जी यात्रा ती; सोंकटयांचे खेळांत दाहा, पंचवीस, हे डाव सतत तीनवेळा पडले असतां व्यर्थ जातात त्यास

काशीयाचा केली असें स्त्र०.

काशीशिक्का, ३लिं०काशीमध्यें उत्पन्न झालेला असाएक शिक्क्याचा रुपया आहे.

काश्मिरी, ३लिं०काश्मिर म्हणून देश आहे,तेथें उत्पन्न झालेजे शालजोडी, केशर, इ०पदार्थ तो.

काष्टा, पु० कांसोटा.

काष्टी, स्त्री० रा०लंगोटीस निंदेनें स्त्र०.

काष्ठ, न० लांकूड.

काष्ठकुट्ट, पु०सं० माड इ०कांस चोंचीनें घरपाडणारा पक्षी आहे.

काष्ठा, स्त्री०सं० दिशा; २, अष्टादश निमेषात्मक जो काल तो.

कास, स्त्री० गो महिष्यादिकांची जी ओटी ती; २, कटिप्रदेश; उ० गळा तुळशीहार कासेपीतांबर आवडे निरंतर हेंची ध्यान; ३, नेसल्या वस्त्राचा पदर, किं० कांठ, किं० नेसण आदोपतें झावें म्हणून पुढील सोगा पाठीमागें रवोंवितात ती; कोणेकाचे कासेस लागणें, कास धरणें, स्त्र० कांहीं संकटांतून पार पडण्याकरितां कोणेक समर्थाचा आश्रय करणें; उ० भगवंताची कास धरावी आणिक आस कशासरे; कास घालणें स्त्र० कांहीं उद्योग करण्याविषयीं सिद्ध होणें; ४, कों० पु० कुरण; ५, सं० रोकला.

कांस, स्त्री० कास स्त्रीलिंगार्थी.

कासंडी, स्त्री० धातुमय आकार विशेष रूप पात्र आहे.

कासरा, पु० चर्माचा जो आसोड तो.

कासव, कांसव, न० जलजंतु आहे.

कांसवीइरलें, न० कांसवाचे पाठीसारिखे आकारासारिखें जें इरलें असतें तें.

कांसळणें, कों० धावन, पर्वतारोहण इ० कांहीं परिश्रम झाल्यामुळें श्वासोच्छ्वास युक्त होणें.

कांसा, पु० कों० समुद्रांत जो उघडा खडक असतो तो.

कासांडी, स्त्री० कासंडी.

कांसार, कासार, पु० ताम्रादिकांचीं भांडी विकणारी, किं० करणारी, किं० बांगड्या विकणारी अशी जाति आहे.

कांसारभात, पु० रा० केवल फडफडीत झालाजो भात तो.

कासावीस, ३लिं० कांहीं दुःखातिरेक झाल्यामुळें जाचा प्राण व्याकुळ झाला तो.

कांसाळ, स्त्री० नोबद इ० कांबरोबर मोठी जी झांज वाजवितात ती.

कांसाळवत, न० कांसाळूं.

कांसाळूं, न० अबवामध्यें भेद आहे.

कासुंदा, पु० काशिंदा.

कांसें, न० एक धातु आहे.

कांसेफोड, पु० पायांचा तळवा इ० प्रदेशीं मोठा गांठरा जो फोड येतो तो.

कांसोटा, पु० कांस तृतीयार्थी; व्यभिचारदोष कदापि झाला नाहीं, असाजो पुरुष, किं० स्त्री त्यांस कांसोट्याचा बळकट, खबरदार, पाणी प्यावयाजोगा इ० स्त्र०.

कास्त, पु० परभूजातींत भेद आहे.

कांस्य, न० सं० कांसें; कांस्यपात्र इ० समासजाणावे.

कांस्यकार, उ० कांसार.

काहाकी, स्त्री० काकवी.

काहाडणें, काढणें.

काहाणी, स्त्री० कहाणी.

काहिली, स्त्री० ज्वरानें, किं० कांहीं उष्ण औषधसेविल्यामुळें जी आंगाची आग होती ती.

काँहीं, १लिं० ईषन्मात्र; उ० हा कांहीं जाणतो. यास कांहीं ज्ञान नाहीं; २, विवक्षित समुदायांतून विवक्षित भागरूप जो पदार्थ तो; उ० आंबेकांहीं खाल्ले, कांहीं ठेवले; ३, अमुक अशाप्रकारें निश्चित नव्हे जो अर्थ तो; उ० केवल उपाशींजाऊनको कांहीं खा; ४, सामान्यरूपें करून विवक्षित जो पदार्थमात्र तो, निषेधविषयीं प्र०; उ० मला कांहीं नको; ५, वक्त्याचे मनांत असुकतें करून निश्चित असतांही श्रोत्यास सामान्यतः सांगण्याविषयीं विवक्षित जो अर्थ तो; उ० तुम्हापाशीं कांहीं बोलायाचें आहे; ६, वाक्यालंकारार्थ याचा प्र० होतो; उ० तो कांहीं गवत खात नाहीं, अन्नच खातो; ७, वचनानें अनिर्वचनीय अर्थाला या शब्दानें निर्देश करितात; उ० ब्रह्मज्ञानीचें सुख कांहीं विलक्षण आहे.

काँहींएक, १लिं० कांहीं प्रथमार्थषष्ठ्यर्थांवांचून.

काँहींकाँहीं, १लिं० विवक्षित समुदायांतून अंशाअंशरूप; उ० कांहींकांहीं शेतें बरीं आहेत. कांहींकांहीं वाईट आहेत; २, अनिश्चयवाचक जे अनर्थादि शब्द त्यांचें पराकाष्ठाद्योतक, उ० आज पावसानें कांहींकांहीं शर्थ करून दिली दिली.

काँहींबाँहीं, १लिं० थोडाबहुत; उ० ओषध घेतांच कांहींबाँहीं दिसूं लागलें.

काँहींचेबाँहीं, काँहींचेबाँहींच, अ० मनांत संभावित जो कांहींएक अर्थाचा परिणामादि त्याशीं केवल विपरीत होई असें; उ० कालचांगला बोलत होता आज कांहींचेबाँहींच बोलूं लागला.

काहील, १लिं० स्त्री० काईल.

काहूर, न० निबिड जो अंधार तें.

काळ, पु० कालपुल्लिंगार्थी; २, तादृश इतर उपयोगनसतां भांडण, खर्च, भोजन, इ० एकादे कामास मात्र निमित्तभूत होतो असा जो पदार्थादि त्यास स्त्र०; उ० भाकड म्हैस उगीच खायासकाळ; काल शब्दाशीं समास होऊन जे शब्द झाले आहेत ते या शब्दाशीं समास होऊन होतील असें जाणावें.

काळकाई, स्त्री० कालिका.

काळःकाळ, अ० कों० अनेक वर्षात्मक मोठा जो काल तदवधि.

काळखडा, पु० बहुत दिवस वांचलेला जो दुर्जन मनुष्य त्यास स्त्र०.

काळगेला, १लिं० काळेला.

काळजिभ्या, १लिं० कों० जाचें वाईट भाषण खरें होतें त्यास स्त्र०; २, जाचे तोंडीं निरंतर शापाचें, किं० शिव्यांचे इ० अभद्र शब्द असतात त्यांस स्त्र०.

काळजी, स्त्री० कोणेकगोष्टकडील कायहोईल होईल

होईल, कि० करशी झाली असेल इ० अंतःकरणांत वागल्यामुळें, कि० कांहीं संकट प्राप्त होईल अशा संभावनेनें जी अंतःकरणास व्यथा होती ती; २, कांहीं पदार्थ, कि० गोष्ट यांचें बरें असावें वाईट असूं नये असा जो मनांत भाव असतो ती.

काळण, पु० अन्नाचें मद्य करून विकणारी एक जाति आहे.

काळतोंड्या, वि० अपयशी दुर्भग जो त्यासम०.

काळधाड, स्त्री० सर्वस्व नाश करावया जोगा अग्नि, चोर, इ० कृत संकटाचा अकस्मात् जो कोणकावर घात होतो त्यासम०.

काळधात, स्त्री० सर्व जगास बरें, वाईट, इ० सर्वत्र सारखें होण्यास कारणीभूत जी काळाची अवस्था ती.

काळनिद्रा, स्त्री० संकेतानें मृत्यूसम०.

काळपुळी, स्त्री० मनुष्याचे पायाचे कण्यावर एक फोड येऊन असतो जाचा योगानें प्रा० मरतें ती.

काळफोड, पु० काळपुळी.

काँळवें, न० ग० मोहळांत भेट आहे.

काळमाँजर, न० कांडेचोर

काळमुरवीगुंज, स्त्री० जा गुंजेचें मुरव काळें असतें ती.

काळरात्र, स्त्री० ग० गर्भासन्न शापथादि प्रसंगी सम०.

काळवट, वि० काळमर; २, काळी जी जमीन तो.

काळवटणें, उष्णादि लागल्यामुळें शरीर कांहीं कृष्णवर्ण होणें; २, शेत इ० कांचा पिकटलेपणा जाऊन काळें दिसूं लागणें.

काळवंडणें, कों० कांहीं मनांत भय बसल्यामुळें शरीरावरील तेज उतरून व्याकुळ होणें; २, काळवटणें.

काळवंडी, स्त्री० काळवंडलेपणा.

काळवीट, पु० काळेपाठीचा जो हरिण तो.

काळवें, न० ग० काळोरवाची जी प्रारंभावस्था तें.

काळवेला, काळवेळा, स्त्री० शिवालिरिवन इ० ग्रंथीं प्रसिद्ध दुष्टवेळा आहे.

काळसर, वि० ईषत् जो काळा तो.

काळसरणें, कों० शेतें पुष्ट होऊं लागल्यामुळें काळीं दिसूं लागणें; २, अशक्ताचे शरीरांत शक्ति भरूं लागल्यामुळें पिकटलेपणा जाऊन शरीर कांहीं काळें दिसूं लागणें.

काळसाँवळा, वि० केवळ काळा नव्हे केवळ गोरा नव्हे असा जो मनुष्य तो.

काळा, वि० कज्जलाचे वर्णासारिखा जो रंग तो; २, तद्विशिष्ट; ३, विव्यास संकेतानें स०; काळें तोंड करणें, स० मेल्यामुळें कि० देशांतरास गेल्यामुळें अधिष्ठित स्थल सोडणें; वकांहीं एक दोषकरून स्वसंबंधि मनुष्यांचे तोंडास लांच्छन लावणें.

काळाकिट्ट, काळाकीट, काळाकूट, वि० अतिशयित जो काळा तो.

काळाकुडा, पु० औषधी झाड आहे.

काळाकुळकुळीत, वि॰ अतिशयित काळा.

काळाबाळा, काळाबाहळा, वि॰ कांहीं काळे कांहीं पांढरे असे पट्टे जाजवर आहेत असा जो बैल, कुत्रा, इ॰ तो.

काळाभोपळा, काळाभोंपळा, पु॰ एक भाजीचें फळ आहे.

काळासोंवळा, वि॰ काळसांवळा.

काळीकाठी, स्त्री॰ औषधी आहे.

काळीरवजुरी, स्त्री॰ औषधीचें फळ आहे.

काळीगुळी, स्त्री॰ कों॰ गुळी म्हणून काळ्यारंगाचा उपयोगी एक द्रव्य आहे.

काळीज, न॰ पोटांत उराकडील प्रदेशीं एक अवयव आहे, जो जीवाचा मुख्य आधार तें.

काळीधार, स्त्री॰ समुद्रांत पहात असतां जापुढें दृष्टि पोंहचत नाहीं तो मर्यादा प्रदेश ती.

काळीप्रजा, स्त्री॰ कृषुपजीवी जे शूद्र त्यांस स॰.

काळीभिंत, स्त्री॰ उत्तरेस जेथ पर्यंत मनुष्याचें गमन होतें त्या सीमा प्रदेशास स॰.

काळीभोंफळी, स्त्री॰ काळ्या भोंपळ्याचा जो वेल ती.

काळीसाळ, स्त्री॰ साळीमध्यें भेद आहे.

काळें, न॰ कांहीं दोषामुळें जो कुलास कलंक लागतो तें; काळें करणें स॰ काळें तोंड करणें.

काळेंअक्षर, न॰ यच्चयावत् जें अक्षर मात्र त्यास स॰; उ॰ हा पंडित काळ्या अक्षराचा अर्थ करील.

काळेंजिरें, न॰ कडूकारलें.

काळेला, वि॰ यत्किंचित् जो कृष्णवर्ण मनुष्य तो.

काळोक, काळोरव, पु॰ अंधकार.

काळोरवमेट, पु॰ कों॰ अनिशायित जो काळोरव तो.

काळोरवापारव, पु॰ कों॰ कृष्णपक्ष.

काळोकी, काळोरवी, स्त्री॰ दुर्दिनादिकामुळें, किं॰ सायंकालादिकांचाठायीं जो थोडाथोडा अंधार पडतो ती; २, पित्तादिकांमुळें जो डोळ्यापुढें अंधार येतो ती; ३, कांहीं दोषामुळें कुलास जो कलंक लागतो ती.

काळोरवीरात्र, स्त्री॰ अंधारीरात्र.

काळोरवें, न॰ दे॰ काळोरव.

काळ्याडोईचेंमनुष्य, न॰ मनुष्य, परंतु इतर जीवांपेक्षां अल्पुन शक्ति वर्णायाची असतां म॰.

कांक्षा, स्त्री॰ कांहीं एक अर्थ साधारण रीतीनें जा प्रकारचा दिसतो तद्विरुद्ध प्रकारक त्या अर्थाविषयीं जी संभावना होती ती; २, सं॰ इच्छा.

कांक्षित, वि॰ सं॰ इच्छित.

किं, वि॰ सं॰ कोण, किं॰ काय, याचा प्र॰ प्रायः सं॰ बहुव्रीहि समासीं व्यवहारीं येतो; उ॰ कोण आहे कर्ता जाचा तो किंकर्तृक, काय आहे प्रयोजन जाचें तो किंप्रयोजनक इ॰.

किंक, स्त्री॰ भयादिकानें बारीक ऊंच गळ्यानें जी आरोळी ती, उ॰ आस्वला अर्धी किंक फोडावी

किंकणी, स्त्री॰ झाडाची बी आहे.

किंकणेल, न॰ किंकणीचें जें तेल तें॰

किंकर, पु॰ सेवक; २, स्त्री॰ देवबाभळ

किंकरें, न॰ सुताराचें ओत आहे; २, किरकिरें॰

किंकळणें, किंकाळणें, हत्तीनें स्वजातीय शब्द करणें; २, मनुष्यादिकानें किंक फोडणें॰

किंकळी, किंकाळी, स्त्री॰ किंकळण्याचा शब्द ती॰

किंकिणी, स्त्री॰ सं॰ क्षुद्र घंटिका॰

किंक्रांत, स्त्री॰ मकर, कर्क, संक्रांतीचे उत्तरदिक्षीं जी कर पडती ती॰

किंचकिंचणें, वानरानें दांत चावून, किं॰ पिंगळ्यानें शब्द करणें॰

किंचकिंचीत, ३लिं॰ भात इ॰ पुरता न शिजल्यामुळें दांतां खालीं शब्द झाबयाजोगा जो लागतो तो॰

किंचकींच, अ॰ दंतादिकांखालीं शब्द झाबयाजोगें रेती इ॰ लागणें इ॰ कांचें वि॰॰

किंचर, ३लिं॰ जामध्यें लाहान साहान अनेक खटपटी आहेत असें जें बहूत वेळ लागाया जोगें काम तो॰

किंचवंदणें, चिवडणें॰

किंचाट, न॰ कचाट

किंचाटी, स्त्री॰ कचाटी: ३लिं॰ कचाटया॰

किंचित्, अ॰ ईषत्

किंचिद्दान, न॰ चातुर्मास्यादि कालीं नित्यशः आठमुठी धान्याचें दान देतात तें॰

किंचीर, ३लिं॰ किंचर॰

किंजबिडीत, किंचबिडीत, ३लिं॰ वाचाया-

स अवघड पडाया जोगें बांकडें तिकडें एकांत-एक लिहिलें अक्षरादि तो; २, तद्विशिष्ट पोथी इ॰ तो; ३, वरबांकडी तिकडी नकशी इ॰ काट-ल्यामुळें, साध्यापेक्षां विशोभित दिसाया जोगें झालें जें मूर्त्यादि तो॰

किंजबीड, ३लिं॰ किंजबिडीत॰

किंजल्क, पु॰ सं॰ कमलादि पुष्पांतील जो केसर तो॰

किंजळ, पु॰ स्त्री॰ वन्यवृक्ष आहे; २, पु॰ साळींत भेद आहे॰

किटण, न॰ शरीर, वस्त्र, इ॰ कांवर, किं॰ गुडगुडीचा नळी इ॰ कांत जमून चिकटतो जो मळ तें; २, कुजलेलें जें शेण, लीद इ॰ तें; ३, लोखंडबहूत दिवस भूमींत राहिलें असतांत्याचा मृत्तिकामाय जो परिणाम होतो तें; ४, वीट, कोल, इ॰ अतिभाजल्यामुळें त्याभट्टींतून दगडा सारिखे जे काळे गोळे उत्पन्न होतात तें॰

किटणें, वस्त्र, शरीर, भांडें, इ॰ मळानें लिप्त होणें; २, ला॰ कांहीं इंद्रियांस कांहीं विषयांचा, किं॰ कर्मांचा अतिशयित संस्कार झाल्यामुळें तद्विषयीं त्या इंद्रियानें कंटाळणें; उ॰ याचें गाणें ऐकतां माझे कान किटले॰

किटळ, न॰ किटाळ॰

किटा, पु॰ रेवेर, इ॰ कांचीं जाळाऊ फोडींबजीं लांकडें तो॰

किटाळ, न॰ तृणादि राशी जळत असतां त्यांतून जें अग्निसंयुक्त तृणादि उडतें तें; २,

ला॰ कोणेकावर मोठा नाश ह्मावयाजोगा जो राजकीय अपराधादि दोष येतो तें.

किडका, ३लिं॰ कीड लागली आहे जास असा जो फल पर्णादि तो.

किडकिडीत, ३लिं॰ रोड.

किडरवाद, ३लिं॰ किडका.

किडविडीत, ३लिं॰ किंचविडीत.

किडवळणें, कों॰ फलादिक किडकें होणें; २, रा॰ किरविजणें.

किडा, पु॰ क्षुद्र जंतूंत एक जाति आहे. जाचे पोटीं अनेक भेद आहेत तो.

किडुकमुडुक, न॰ खिडूकमिडूक.

किडें, न॰ कों॰ जिवाणू.

किडेला, ३लिं॰ किडका.

किण, पु॰ सं॰ शरीर इ॰ कांवर दोरी इ॰ चिरकाल घसवटल्यामुळें जें चिह्न पडतें तो.

किणकिणी, स्त्री॰ कों॰ कणकणी; २, उदकाचे तुषाराचे जे कण ती.

कितकावा, ३लिं॰ कोणत्या संख्येचा विषय तो.

कितपत, ३लिं॰ कोणत्या प्रमाणानें परिमित गुण.

कितवा, ३लिं॰ कितकावा.

कितान, न॰ तागाचें वस्त्र आहे.

कितांब, पु॰ ـِتاب हिं॰ कोणी लोकोत्तर कर्म केलें असतां त्यास राजादि संतुष्ट होऊन प्रशंसार्थ जें नाम देतात तो; २, पुस्तक.

कितांबत, स्त्री॰ प्राकृत भाषेनें बोलायाचे चालीप्रमाणें लिहिलेली जी राजादिकांची कथा ती; २, हिं॰ यवनी संप्रदायांत कोणास पत्र लिहिलें असतां शेवटीं हा शब्द लिहितात असा यवनी संप्रदाय आहे ती.

कितिएक, कित्तेक, कित्येक, ३लिं॰ विवक्षित समुदायांतून कांहींएक; हा शब्द नित्य अनेकवचनांत.

कितीं, किती, ३लिं॰ कोणत्या संख्येनें, किं॰ कोणत्या प्रमाणानें परिमित तो.

कितीक, ३लिं॰ किती.

कितु, पु॰ सं॰ कांक्षाप्रथमार्थी.

कित्ता, पु॰ अक्षरांचें वळण लागावा करितां वळणयुक्त अक्षरांचा जो कागद, त्या अक्षरांतून लेखणी फिरवायाकरितां घेतात तो; २, ला॰ जा संप्रदायादिकांची शिक्षा घेण्याविषयीं आपल्यास विवक्षा आहे तो संप्रदायादिक; कोणेकास कांहींएक गोष्टी विषयीं कित्ता घालून देणें स॰ असुक गोष्ट अशा अशा प्रकारें करावी, इ॰ लेखद्वारा, किं॰ वचनद्वारा, किं॰ स्वाचरणद्वारा विदित करणें.

कित्तां, अ॰ याद, हिशेब, इ॰ लेखनांत जा रकम इ॰कांस विशेष संज्ञा, किं॰ विशेष संबंध लिहीत नाहीं तेथे हा शब्द लागतो

किनरवाप, पु॰ जरीबुटीवस्त्र आहे.

किनरवापी, ३लिं॰ किनरवापाचा अंगरखा इ॰ तो.

किनरा, ३लिं॰ बारीक असून उंच जो कंठस्वर तो.

किनरी. स्त्री॰ बारीक उंच जो कंठांतून ध्वनि काढितात ती: २. तंतुवाद्य आहे.

किनारा, पु॰ समुद्र, नदी, शेत, पर्वत, इ॰कांची जी कड तो.

किनारी, स्त्री॰ वस्त्रांस बारीक रेशीम इ॰कांचा कांठ घातला असतो ती.

किन्नर, पु॰ उपदेवामध्यें एक जाति आहे.

किन्नरी, स्त्री॰ एक पोंव्यासारिखें वाद्य आहे.

किन्निमित्त, अ॰ किमर्थ.

किपळा, पु॰ कपचा.

किपळी, स्त्री॰ कों॰ लांकडांची कपची.

किफायत, स्त्री॰ कांहीं एक व्यापारामध्यें होतो लाभ ती.

किफायतवार, वि॰ जामध्यें किफायत आहे तो व्यापार. कि॰ पदार्थ इ॰ तो.

किमपि, वि॰ ईषन्मात्रही.

किमया, स्त्री॰ पु॰ ताम्रादिकांचें ओषध्यादिकांनीं सुवर्णादि करावयाची जी विद्या ती तो; २, ला॰ जा पदार्थापासून, कि॰ व्यापारापासून निरंतर लाभ होत असतो त्यास ल्ह॰.

किमयागर, वि॰ किमयाची विद्या जाणतो तो.

किमर्थ, अ॰ कशासाठीं.

किमानपक्ष, अ॰ केवल शेवटील जो कनिष्ठपक्ष, कि॰ त्या पक्षातें आश्रयून.

किम्मत, स्त्री॰ कांहीं पदार्थ विकत घेतला असतां तन्निमित्त जें द्रव्य द्यावें लागतें ती; २, घेणारास द्रव्य द्यावें लागावयाजोगा तत्तत्पदार्थांचा ठायीं जो योग्यता विशेष असतो ती.

किम्मतवार, वि॰ जो पदार्थ लिहिला त्याची किम्मत जामध्यें लिहिली आहे असा जो याद इ॰ लेख तो.

किरकणें, हस्ती इ॰कांनें किंकळणें; २, याचक, पोर, इ॰कानें त्रास यावयाजोगें आरडणें.

किरकिरें, न॰ पोरांचें एक लांकडाचें खेळणें आहे, जें हातीं धरून फिरविलें असतां किरकीर शब्द होतो तें.

किरकिऱ्या, वि॰ किरकीर करण्याचा स्वभाव जाचा असा जो याचक, पोर, इ॰ तो.

किरकिसा, पु॰ कों॰ लांकडांस कीड लागल्यामुळें त्या मध्यें जो रवसरवशी सारिखा अंडा उत्पन्न होतो तो.

किरकीर, स्त्री॰ कानस इ॰कानें लोहादि घांसलें असतां जो त्रास यावयाजोगा शब्द होतो ती; २, याचक, पोर, इ॰कांचा हेंदे नेंदे इ॰रूप त्रास यावयाजोगा व्यापार ती.

किरकोळ, किरकूळ, वि॰ सामान्य प्रमाणापेक्षां, कि॰ विवक्षितापेक्षां जो रुडा शरीर, काष्ठ, इ॰ तो; २, एक ठोक नहे असा जो धान्य, द्रव्य इ॰ तो, व त्या द्रव्यादिकांचा तसा व्यवहार, खर्च इ॰ तो; ३, दूर ऐकायास जात नाहीं, उंच चढत नाहीं असा जो कंठादि ध्वनि तो.

किरकोळी, स्त्री॰ ठोक नहेत अशा अनेक जिनसांचा समुदाय ती.

किररवाद, स्त्री॰ कों॰ किरानें खाल्ला जो पेरू इ॰ ती.

किररवादणें, कों॰ किरानें फलादिकांचा अंश भक्षिणें.

किरटा, ३लिं० कों० अदन्त शिरोमणी तो; २, विशोभित दिसाया जोगें बारीक रेघांचें अक्षरादिक तो.

किरडू, न० किडें.

किरण, पु० सूर्य, चंद्र, इ० तेजस्वी पदार्थांपासून प्रसृत जो प्रकाश दिसतो तो; २, न० सूर्याचें जें ऊन तें.

किरपीण, किरमाडी, ३लिं० कदरू.

किरमाणीओंवा, किरमाणीवोवा, पु० एक ओंब्यांत भेद आहे.

किरमिजी, किरमेजी, ३लिं० किरमिजाचा जो रंग, किं० तद्विशिष्ट पितांबर इ० तो.

किरमिजीदाणा, पु० किरमिज रंगाचा जा बारीक गोळ्या बांधिल्या असतात तो.

किरमीज, ३लिं० कृमीपासून रंग करण्याचे उपयोगी एक पदार्थ उत्पन्न होतो तें.

किरवणें, काष्ठ, धातु, माती, इ० कांचे पदार्थांवर कंगोरा वेल, बूट, इ० निघे असा तो पदार्थ. कोरणें इ० कानें कोरणें.

किरवंत, पु० ब्राह्मणांत एक जाति आहे.

किरविजणें, भात इ० पदार्थ, अग्निसंयोग सारखा न झाल्यामुळें नासणें.

किरवें, न० कों० काष्ठादिकांस घांसण्याचा उपयोगी खरखरीत माशाचें चर्म आहे; २, खेंकडा; ३, किरिरें.

किराईत, न० ओषधी आहे.

किराणा, पु० लवंग, जायफळ, पत्री, सुपारी, हिंग, जिरें, इ० जे पदार्थ जांवांचून गरीब लोकांचा

कांचा प्रायः निर्वाह होतो तो.

किराळणें, काकस्वरानें ओरडणें.

किराळी, स्त्री० किंकळी.

किरिरें, न० कों० शिंक्यावर भांडें घट्ट बसावें म्हणून शिंक्यास वर फांस बांधितात तें.

किरी, स्त्री० रा० उत्तरोत्तर क्षीण झालें अशी जी कोणेकास कांहीं विकृति जडली ती.

किरीट, पु० देव, राजे, इ० कांचा जो मुकुट तो.

किरोंटा, पु० करंटा द्वितीयार्थी.

किर्र, ३लिं० अत्यंत निबिड जागध्यें बांबू इ० कांचे अनेक प्रकारचे शाब्द होतात असें जें अरण्य, वृक्षादिकांची दाटी तो.

किलकिलाट, पु० चिमण्या, मैना इ० कांचा शब्दांचा जो अतिशय तो.

किलच, स्त्री० तक्तपोशीस तक्त्याचा संधीवर बसिवतात जो फळीचा तुकडा ती; २, तरवत्याचे अभावीं जे फळ्यांचे तुकडे पाटणीस घालितात ती.

किलबिलाट, पु० किलकिलाट.

किलबील, स्त्री० पु० किलबिलाट.

किल्बिष, न० कल्मष.

किल्मिष, न० कल्मषाचा अपभ्रंश तें.

किलवणें, कों० भूम्यादिकांत बसला जो स्तंभादि तो बाहेर काढाया करितां हालिवणें.

किलवाणा, ३लिं० काकलूतवाणा; २, रा० जा मध्यें भव्यपणा दिसत नाहीं असा जो वस्त्र, अलंकार, गृह, शहर, वेष, इ० तो; ३, केवल कार्पण्य युक्त जो मनुष्यस्वभाव, आचरण इ०

तो

तो.

किलवाणी, ३लिं॰किलवाणा.

किलावा, पु॰ हत्तीचा गळ्यांत सुताचा दोरीचें पेंडें माहाताचे पाय अडकावयास घालितात तो.

किल्ला, पु॰ भोंवताला चर, तट, बुरूज इ॰ करून राहायासाठीं स्थल, शत्रु, चोर, इ॰कांस दुर्गम जें करितात तो.

किल्ली, स्त्री॰ कुलूप लावायाचें, किं॰ काढायाचें यंत्र असतें ती; २, ला॰ हिशोब, श्लोकार्थ, इ॰कांचें तत्व जाणण्याची जी युक्ति ती; किल्ली फिरविणें स॰ कलहादिकांविषयीं अप्रवृत्तानें प्रवृत्त व्हावें, किं॰ प्रवृत्तानें निवृत्त व्हावें इत्यादर्थ कांहीं भाषणादिद्वारा गुप्त युक्ति चालविणें.

किल्लेदार, पु॰ किल्ला जाचे स्वाधीन असतो तो अधिकारी.

किंवकाकळूत, स्त्री॰ अनेक प्रकारें करुणा भाकण्याचा व्यापार, किं॰ कोणाएकाचें देण्यादि मनांत आणून अपराध क्षमा करण्याचा जो प्रकार ती.

किवण, न॰ गाय, म्हैस, इ॰कांस सकीटक जें क्षत पडतें तें.

किवण्या, ३लिं॰किवण जास आहे तो.

किंवा, अ॰ अथवा.

किव्येण, न॰ रा॰ किवण; २, तें बरें होण्याचा मंत्र आहे.

किशोर, ३लिं॰ सं॰ बालक.

किसणी, स्त्री॰ लोखंडाचे पन्यास चार पायला वून फलादिकांचा बारीक कीस कराया करितां जें साधन करितात ती.

किसणें, फलादिक कीस होयासाठीं किसणीवर घांसणें.

किसबत, स्त्री॰ हिं॰ भिस्तीलोक मसकेसाठीं जें चर्म घेत असतात ती.

किळकिळी, स्त्री॰ याचकादिकांचा कांहीं प्राप्त्यर्थ, किं॰ कोणेकास ताडनादिकानें दुःख प्राप्त झालें असतां त्याचा जो अनेक प्रकारचा विलाप ती; दे, मार, इ॰म॰ प्रायः अनेकवचनांत.

किळकिळीत, ३लिं॰कों॰ कळकळीत.

किळट्टा, ३लिं॰कों॰ प्रायः एकनाहींएक, रोगजास निरंतर असतो तो पोर इ॰तो.

किळस, स्त्री॰ पु॰ अमंगल पदार्थ पाहिल्यामुळें, किं॰ कांहीं पदार्थ अतिशयित सेविल्यामुळें अंतःकरणास कंटाळा येतो ती तो; २, पु॰ कों॰ ज्वरादि दुखण्यानें दुःख पावावें अशी जी कोणास कालदशा येती तो; ३, पोर इ॰कांस त्या दशेचें सूचक जें अंगावर उठा पडतात इ॰चिह्न होतें त्यास स्म॰.

किळसदान, न॰ क्लेशदान.

किळोट्टी, ३लिं॰ ग॰ किळट्टा.

किळोस, पु॰रा॰ किळस द्वितीयतृतीयार्थी.

कीं, अ॰ कांहीं सामान्यतः प्रसिद्ध अर्थाचें अनुकरणवत् स्वरूपतः कथन कर्तव्य असतां मध्यें याचा प्र॰ होतो; उ॰ ते बोलले कीं आम्हास घडणार नाहीं; २, कांहीं अर्थाविषयीं उभयात्मक

यात्मकता भासून एकरूपतेचा जेथें निश्चय होत नाहीं, तेथें उभयकोटीचे मध्यें याचा संदेह द्योतनार्थ प्र० होतो; उ० आज जावें कीं न जावें हें कांहीं ठरत नाहीं.

कीकट, ३लिं० सं० कांळी, भिल्ल, इ० क रानट मनुष्यांची वस्ती जा मध्यें असा जो देश तो.

कीट, न० किटण; २, सं० किडा; ३, स्त्री० रा० टिणगी; ४, कृष्णत्वाचें अतिशय द्योतक वि० निंदावृत्ति; उ० चोरीचा दोष येतांच तोंड काळेकीट झालें; ५, न० नांगर इ० कानें निघालेलें जें मोठें ढेंकूळ तें.

कीड, स्त्री० तांदूळ, वस्त्र, शेत, इ० कांस जो नाशक किडा पडतो ती; संपदादिकांस कीड लागणें स० उत्तरोत्तर क्षीण होण्याचे दशेस आरंभ होणें.

कीर, पु० पक्षी आहे; किंरा सारखें बोलणें, स० बालकादिकानें स्पष्ट अक्षरोच्चार पूर्वक बोलणें; २, कोणेकानें जितकें शिकविलें तितकेंमात्र बोलणें; ३, अ० यं० निश्चयेंकरून.

कीर्त्तन, न० हरिदास वीणादि गानसाहित्य घेऊन ईश्वरगुणवर्णन उभ्यानें करितो तें; २, ईश्वरनामादि शब्दांचा जो उच्चार तें.

कीर्त्तनभक्ति, स्त्री० ईश्वर गुणाचें सर्वदा कीर्त्तन करावें अशा प्रकारची जी भक्ति ती.

कीर्त्ति, स्त्री० कोणेकाची उत्तम तें करून प्रसिद्धि ती.

कीर्त्तित, ३लिं० कीर्त्तन केलें जाचें असें जें ईश्वरभजनादि तो.

कीर्त्तिमान्, ३लिं० जाणें मोठी कीर्त्ति संपादन केली

केली तो.

कीर्द, स्त्री० राज्य, सावकारी, इ० व्यवहार संबंधी नित्यनित्य जे आय व्यय ते जा कागदावर लिहिले असतात ती; २, शेत, आगर, इ० भूमीची जी लागवड ती.

कील, पु० सं० खिळा; २, गुडगुडींतला जो मळ तो.

कीव, कींव, स्त्री० कोणेकाचें दुःख पाहून जी करुणा येती ती.

कीस, पु० फालादिकांचा किसणी इ० कांनें काढिला जो बारीक बारीक अंश त्याचा जो समुदाय तो.

कु, अ० वाईट; याचा प्र० समासीं; उ० वाईट जें कर्म तें कुकर्म, कुपात्र, इ०.

कुइटारू, ३लिं० कों० तृण, झांप इ० कांनें शिवलेलें जें गृहादिक तो.

कुईरी, स्त्री० एक वेल आहे; २, न० तिचें फळ ती; ३, फारकोंवळा जो अंबा फणस ती; ४, स्त्रियांचे डोसकींत घालायाचें भूषण आहे.

कुई, स्त्री० कोल्ह्यांची जी आरोळी ती; २, ला० अनेक मनुष्यांची कांहीं कारणास्तव एकदम जी आरोळी ती.

कुईट, न० कों० पर शिंबायाचें साधन जें तृण, झांप, इ० तें; २, ३लिं० खोबरें, धान्य, इ० सरदल्यामुळें, किं० कुजल्यामुळें त्याची, किं० अजीर्णीशाची जी घाण येती, किं० त्या पदार्थाची रुचि त्यास स०; ३, ला० कोणेकाचें दोषरूप मर्म अंतःकरणीं धरून ठेऊन प्रसंगीं काढावें

वें इ० रूप कुत्सित स्वभाव जाच्या तो, कि० तदनुसार जें त्याचें मर्म भेदक भाषण तो.

कुकडें, न० सुतारचें लहान लांबट जें गुंडाळें केलें असतें तें; २, पशूंस एक सेंग होत असतो तें.

कुकर्म, न० चोरी, चाहाडी, इ० रूप जें वाईट कर्म तें.

कुकर्मी, वि० कुकर्म करण्याचा स्वभाव जाच्या तो.

कुकल्पना, स्त्री० प्रत्यक्षतः कांहीं एक गोष्ट चांगली दिसत असतां तिचा शेवटीं नाशादिकांहीं दुष्ट परिणाम होईल अशी जी कल्पना उठती, कि० सरळ मार्ग सोडून शास्त्रादि प्रमाणास विरुद्ध जी कोणी कल्पना घेतो, करितो, ती.

कुका, पु० कों० जीचें गर्भधान होतें त्या दिवशीं तिजकडून भर्त्याची पूजा विड्या तोडणें, इ० कर्म स्त्रियांमिळून करवितात तो; २, जो थोर झाला असतांही पोरा सारिखे चाळे करितो त्यास बालकाचे आरोपानें म्ह०.

कुकारणें, दूरस्थित मनुष्यास ऐकूं जावें म्हणून उच्च स्वरानें दीर्घ आरोळी मारणें.

कुकारा, पु० कुकारण्याची जी आरोळी तो.

कुकीर्ति, स्त्री० अपकीर्ति.

कुकुडकुंभा, पु० पक्षी आहे.

कुंकुम, न० केशर; २, कुंकूं.

कुंकुमपत्र, न० विवाहादि शुभकार्याविषयीं बोलवायाचें असतां कुंकुम चिह्नांकित पत्र पाठवितात तें.

कुंकुमागर, पु० केशरा सारिखा चंदन आहे.

कुंकूं, न० हळदीचे रसांस निंबू, टांकणखार, इ० कांचा पुटानें रंगवून त्यांची जी लालपूड करितात तें.

कुंकोत्री, स्त्री० कुंकुमपत्र ती.

कुक्कुट, पु० सं० कोंबडा.

कुक्कुटासन, न० योगसाधनार्थ बसण्याचा शास्त्रोक्त एक प्रकार आहे.

कुंगार, वि० कंगाल; २, न० भिकार.

कुग्राम, पु० जो ग्रामामध्यें पाहिजे तो पदार्थ मिळत नाहीं असा जो ग्राम तो.

कुच, पु० स्त्रियेचा स्तन तो; २, न० पु० सैन्यादिकांचा स्थलांतरीं जावयाकरितां पूर्वस्थल सोडण्याचा व्यापार तो तें; ३, संकेतानें मरणास म्ह०.

कुचका, वि० कुजका.

कुचकुचणें, कोणेकाजवळ कुचकुच करणें.

कुचकूच, स्त्री० इतरास ऐकूंनजाई असें कोणेकाजवळ हळूहळू बोलण्याचा व्यापार तो.

कुंचडें, न० मुलांचे, कि० स्त्रियांचे डोसकीस घालावयाचें जें टोपडें तें.

कुचंबणी, कुचंबणी, स्त्री० रोगादिअनेक कारणांनीं कुचंबत पडण्याची जी अवस्था ती.

कुचंबणें, कांहीं एक गोष्टीचा अडचणींत सांपडून निर्गम न होतां कांहीं काल दुःख पावत राहीं असें कोणेकास करणें.

कुचर, वि० अंतःकरणाचा जो कपटी तो; २, दिल धान्यांत जो दाणा भिजत शिजत नाहीं असा असतो तो; ३, ला० कामचोर, कसबचोर तो; ४, खचरट जो मार्ग, ग्रंथ, इ० तो.

कुचराई, स्त्री० कामचोरपणा; २, कसबचोरपणा.

कुंचलणें, डुकरांचे केशांची कुंची इ० कानीं अलंकार इ० खरबडीत पदार्थ मळ निघावयासाठीं घांसणें.

कुचला, पु० काजरा.

कुचली, स्त्री० कुचल्याची बी.

कुचविंधी, स्त्री० कों० चीड यावयाजोगी जी कोणेकाची भाषणादिद्वारा काढली खोड ती.

कुंचळणें, मोरानें पिच्छ समुदायें करून युक्त होणें.

कुंचा, पु० मोरचेल; २, तदाकार मोळ शिंदीचा पात्या, कि० इतर कांहीं तंतु एकत्र जुळून बुडख्यास बांधून केर झाडणें, इ० अर्थ करितात तो.

कुचाळ, ३लिं० दुसऱ्याची कुचविंधी करण्याचा स्वभाव जाचा तो.

कुचाळखोर, ३लिं० कुचाळ.

कुचाळी, स्त्री० कुचविंधी.

कुंची, स्त्री० कुंचडण्यास वस्त्र जोडून मुलाचे मस्तकावर घालावयास जें सुशोभित वस्त्र करितात ती; २, डुकर इ० कांचे केश एकसारखे जुळून पकडे बांधून जी जुडी करितात ती

कुचेष्टा, कुचिष्टा, स्त्री० कुचविंधी; २, दुसऱ्यानें आपल्यास विचारावें, नादीं लागावें इत्यादर्थ जी कपटानें विलक्षण चेष्टा करितातती; स० कुचेष्टा बांधून प्रतिष्ठा वाढत नाहीं.

कुचोद्य

कुचोद्य, न० कुचेष्टा; २, ३लिं० कुचिष्टा करण्याचा स्वभाव जाचा तो.

कुचोद्याचेंपारघरूं, न० कुचोद्य करण्याचा स्वभाव जाचा त्यास स्व०.

कुंज, पु० सं० अरण्य लतांनीं आच्छादित क्रीडादि करायास योग्य जे प्रदेश असतात तो.

कुंजकट, ३लिं० कुंजट.

कुंजका, ३लिं० कुंजलेला जो पदार्थ तो; २, ला० जाचें अंतःकरण कपट युक्त वो; ३, त्याचें तसें भाषणादि तो.

कुंजट, ३लिं० ईषत्कुंजलेला जो पदार्थ तो. कि० त्याचा वास तो.

कुंजणें, कांहीं पदार्थ उदक संयोगादि अनेक कारणानीं परस्पर अवयवानीं अवयवांस धरून रहाण्याची जी पदार्थांचे अंगीं शक्ति असती तिणेंकरून हीन होणें; २, सोंकट्या इ० कांचे डावामध्यें जे संकेत आहेत त्यांत कांहीं अंतर पडल्यामुळें सोंकटी डाव इ० कानें अनुपयुक्त होणें.

कुंजन, ३लिं० जाचा स्वभाव वाईट तो मनुष्य.

कुंजर, पु० सं० हस्ती.

कुंजी, स्त्री० किल्ली मुख्यार्थी.

कुटका, पु० फल, काष्ठ, इ० कांचा लहानसा जो तुकडा तो.

कुटकी, स्त्री० कटुकी; २, कों० बारीक जो कुजक्या लांकडाचा तुकडा ती.

कुटकुटणें, पोटांत कुटकुट शब्द होणें.

कुटकूट, न० पोटामध्यें आमांशादि विकृतीनें

कांहीं

कांहीं शब्द होतो तें.

कुटण, न॰ कुटण्याचा जो व्यापार तें.

कुंटण, ३लिं॰ जार आणि जारिणी यांची घटना करून देणारा जो घटक तो.

कुंटणकी, स्त्री॰ कुंटणाचें जें कर्म ती; २, कुटाळकी ती.

कुटणें, धान्य, औषध, इ॰क मुसळ, पाहार, इ॰कांचा आघातानीं चुक्क करणें; २, ला॰ कोणेकास लाथ, बुक्क्या, इ॰कानें पुष्कळ मारणें; ३, कांहीं श्लोकादिविषय आंतील तत्व समजावें इत्यादर्थ अनेक युक्तीनीं विचारणा विशिष्ट करणें.

कुटला, पु॰ रा॰ भाकरीस दळायासाठीं भात कुटून त्याचा भुगा करितात तो.

कुटा, पु॰ लाह्या. मुसलादिकानें कुटून जो भुगा करितात तो; २, बारीक जो मासोळ्यांचा भुगा तो; ३, रा॰ फणसाचा आठळ्यांत मीठ, तिखट, इ॰ घालून जो भुगा करितात तो.

कुटाई, स्त्री॰ कुटण्याबद्दल जें द्रव्य देतात ती.

कुटाळ, ३लिं॰ कुचाळ.

कुटाळकी, स्त्री॰ कुटाळाचें जें कर्म ती.

कुटाळी, स्त्री॰ कुटाळकी.

कुटिल, ३लिं॰ सं॰ उजू नव्हे तो.

कुटी, स्त्री॰ सं॰ तृणादिकांचें यथाकथंचिन्निर्वाहापुरतें घर ती.

कुंटीण, स्त्री॰ स्त्री असून जी कुंटण ती.

कुटुंब, न॰ स्त्री; पुत्र, इ॰ जो पोष्यवर्ग तें; २, केवळ स्त्रीही ल॰.

कुटुंबकलह, पु॰ एक कुटुंबांतील मनुष्यांचा जो परस्पर कलह तो.

कुटुंबकाबाडी, ३लिं॰ कुटुंब निर्वाहाचा भार सर्वदा वाहतो त्यास ल॰.

कुटुंबघात, पु॰ कुटुंब पालनाचा जो योग्या वृत्त्यादिकांचा जो लोप तो.

कुटुंबघातकी, ३लिं॰ कुटुंबघात करणारा तो.

कुटुंबवत्सल, ३लिं॰ जाचे पदरीं मुलें, बाळें, इ॰ मोठें कुटुंब आहे तो.

कुटुंबशास्त्री, ३लिं॰ जाचीं कुटुंबाचीं मनुष्यें शास्त्रज्ञ आहेत तो.

कुटुंबाळा, ३लिं॰ कुटुंबवत्सल.

कुटुंबी, ३लिं॰ कुटुंब आहे जास तो; २, कों॰ चार. पांच इ॰ पित्यांचें अंतर जास पडलें आहे असा जो संपिंड सगोत्र इ॰ तो.

कुत्सेल, न॰ रा॰ कादणें याचा योगीं प्र॰; अर्थ; कोणेकास मारून तुडवून दुर्दशा करणें, निघणें, ल॰ कोणेकानें ती अवस्था पावणें.

कुठचा, कुठला, ३लिं॰ कोणत्या स्थलचा.

कुंठणें, कुंठित होणें.

कुठपर्यंत, कुठपावेंतो, कुठवर, ३लिं॰ कोणत्या देशांतें, किं॰ कालांतें, किं॰ प्रमाणांतें, किं॰ विषयांतें, अवधि करून.

कुठार, पु॰ सं॰ कुऱ्हाड.

कुंठित, ३लिं॰ गमन भाषणादि व्यवहारीं प्रवृत्त असतां कांहीं अडचण आल्यामुळें जाची पुढें तो व्यवहार चालिवण्याविषयीं शक्ति थकली तो; २, त्याची गति, भाषण, इ॰ तो.

कुठील, वि॰ कुठला.

कुठून, कुठोन, अ॰ कोणत्या देश, काल, प्रमाण, विषयां पासून.

कुंड, न॰ होमार्थ मृत्तिकादिकांचें परिधि पाडून चतुष्कोणाद्याकार युक्त खोल जें क्षेत्र करितात तें; २, नदी इ॰ स्थलीं दबदा सारिखी बांधलेली, किं॰ कातळाची स्वतःसिद्ध खोल तीर्थादि ठिकाणांचीसेवें असतात तें; ३, पु॰ सुवासिनीचे पोटीं जारापासून झालेली जी संतति तो.

कुडकी, स्त्री॰ पुरुषाचें कर्ण भूषण आहे.

कुडकुडणें, पापड, पातेरा, इ॰ चुरतेसमयीं कुडकुड शब्दानें युक्त होणें.

कुडकुडीत, वि॰ कुडकुड वाजावया जोगा जो चांगला भाजला, किं॰ शुष्क झाला अस्सा पापड, धान्य, इ॰ पदार्थ तो.

कुडकुड, अ॰ कुडकुड शब्द होवया जोगें पापड, इ॰ चुरण्याचें अनु॰.

कुंडगोलक, पु॰ कुंड तृतीयार्थी.

कुडची, कुडता, पु॰ हातांत जलादि घ्यावया करितां आकुंचित करून खोल गट केलाजो हस्त तो.

कुडण, न॰ कोठींएक स्थलाचे ठायीं कारव्या, बांधू, इ॰ कांनीं केलें जें येण्या जाण्यास प्रतिबंधक भिंत्याकार तें.

कुडणावळ, स्त्री॰ कुडण्याचें मोल.

कुडणें, कोठींएक स्थल कुडणानें युक्त करणें; मनांत कुडणें ह्र॰ मनांत संतप्त होणें.

कुडती, स्त्री॰ सरवलाट इ॰ कांचा जो कंबरपर्यंत अंग

अंगरखा करितात ती; २, अ॰ चौरस केलेला जो चिरा, लांकूड, इ॰ तो, जोतें इ॰ कांचा वायीं अरुंद भागावर आधाराशीं संबद्ध होई असें लाव, बस, इ॰ कांचें वि॰.

कुडपणें, न॰ हात दीड हात लांब आणि मणगटा इतका मोठा जो लांकडाचा तुकडा तें.

कुडबुडणें, कुरबुरणें.

कुंडल, न॰ कर्ण भूषण आहे.

कुंडलिका, पु॰ तपकीर घोटावयाचें पात्र तो.

कुंडली, स्त्री॰ यद्भाव इ॰ लिहावयाकरितां काढिलें जें चतुष्कोणादि यंत्र तो; २, ग्रंथादिकांतील अक्षरें, पंक्ति, अविच्छिन्न असतां त्याचे भोवताली रेषांची रचणूक करितात ती; ३, वि॰ कुंडल जाचा कानांत आहे तो; ४, पु॰ सं॰ सर्प.

कुडव, पु॰ केळी मणाचा षष्ठांश तो; २, सं॰ प्रस्थ मापाचा जो चतुर्थांश तो.

कुडवीभार, पु॰ कों॰ जो साळीचे भाऱ्या पासून कुडवभर साळी होतात असा जो भार तो.

कुडा, पु॰ वृक्ष आहे; २, भांतांत जाति आहे; ३, स्त्रियांचें कर्ण भूषण आहे; ४, कों॰ कपटी.

कुंडा, पु॰ तपकीर, भांग, इ॰ घोटावयाचें मृत्तिकादि पात्र आहे; २, कोंडा.

कुडाभाव, पु॰ कोठींगोष्ट सरळ असतां, किं॰ कोणीं मनुष्य निष्कपटपणें वागत असतां त्या विषयीं यांत कोठींकपट असेल इ॰ जी कोणेकाचे मनांत दुष्टकल्पना येती तो.

कुडाळदेसकर, पु॰ ब्राह्मण.

कुडी, स्त्री॰ मनुष्यादिकांचें जें कलेवर ती; २, कों॰

कांटकुडी

कांठकुटी.

कुंडी, स्त्री॰ कुंडा प्रथमार्थी; २, पाणी सांठवायाकरितां जेंदगडाचें पात्र करितात तो.

कुडुक, न॰पु॰ लहान मुलांचें कर्ण भूषण आहे.

कुडें, न॰ सुंठ, वेरखंड, इ॰कांची सुकी. किं॰ त्याचा तुकडा तें; २, कुडा झणून कर्ण भूषण आहे; ३, कुडा भाव; स॰ जाचें कुडें त्याचा पुतें.

कुडेपाक, पु॰ कुडयाचे पाल्याचा साली भाजून औषधार्थ त्याचा रस काढितात तो.

कुणकुणणें, कांहींएक अविवक्षितानें न ऐकावें झणून हळूहळू बोलणें, किं॰ कांहींएक गोष्टी विषयीं अस्पष्ट बोलणें.

कुणकूण, स्त्री॰ कुणकुणण्याचा व्यापार. किं॰ तो शब्द ती.

कुणगा, पु॰ बंध्यादिक जे द्रव्याचे अनेक विभागी त्यांतील एकानें इतरांस नकळतां चोरून देविलें जें द्रव्य तो.

कुणगेकरी, कुणगेदार, ३ लिं॰ कुणगा जा अवख आहे तो.

कुणट, न॰कों॰ पोत्यांत जो बारीक चुरा असतो त्यांतील एक व्यक्ति तें.

कुणबावा, पु॰ सर्कारधारा पतकरून घतलीजी शेत इ॰भूमि तीव त्याचा सारा.

कुणबावेदार, ३ लिं॰ कुणबाव्याचा अधिकारी तो.

कुणबी, पु॰ शूद्र जाति आहे.

कुणबीण, स्त्री॰ दासी.

कुणी, न॰रा॰ द्विदल धान्यामध्यें जो हलका दाणा असतो तें.

कुणेट

कुणेट, कुणेपट, न॰कों॰ कुणट.

कुतका, पु॰ भांग इ॰ घोटायाचा जो सोटा तो; २, पुकी सोटा इ॰कानें कोणेकास जो महार तो.

कुतडा, पु॰रा॰ भरणें यावा योगीं प्र॰ अर्थ॰ ज्वरादिकांमुळें कांहींकाम करण्याविषयीं केवल शक्ति नाहीं अशा दशेतें पावणें, निंदेनें निषेध विषयीं प्र॰.

कुतप, पु॰सं॰ सूर्योदयापासून अष्टम जो मुहूर्त तो.

कुतरओढ, कुतरवोढ, स्त्री॰ अनेक कार्यें करायास भाग पडल्यामुळें, किं॰ अनेकांचें देणें झाल्यामुळें जी तारंबळ होती ती.

कुतरतोड, स्त्री॰ कुतरओढ.

कुतर्क, पु॰ कांहींएक गोष्टीचा सरळ मार्ग सोडून शास्त्रादि प्रमाण विरुद्ध जो कोणेकाचे मनांत तद्विषयीं तर्क येतो तो.

कुतुप, पु॰ कुतपाचा अपभ्रंश.

कुतू, पु॰ मुलाचे भाषेनें कुत्र्यास स्त्र॰.

कुत्तेघशी, स्त्री॰ थोडया लाभासाठीं फार आणि निकृष्ट अशी जी चाकरी, मेहनत इ॰ ती.

कुत्रा, पु॰ चतुष्पद ग्राम्य जनावर आहे: स॰ धर्माचे दारीं कुत्रें.

कुत्रें, न॰ दारन उघडावें झणून त्यास अडकवण लावायाकरितां तेथें लांकूड पुरून त्यास जें दुसरें लांकूड लाविलात तें; २. गवतांत एक भेद आहे; ३, त्याचा तुरा, किं॰ एक वनस्पतीचें सकंटक फल आहे, जें वस्त्रादिकांस लागलें असतां चिकटून रहातें तें.

कुत्र्याचापाय, पु॰ रानतेरडयाचे फुलास स्त्र॰.

कुत्र्याचेंमूत, पु॰ लघाक; २, ला॰ फटकन् शिरी

याची

याची दुसऱ्याचे अंगावर यावें अशा स्वभावाचा जो हाड मनुष्य त्यास म्ह०.

कुत्र्याचेंहेपूट, न० ला० अनेक उपदेशादि केले असतांही ज्याचा दुष्टस्वभाव जात नाहीं अशा मनुष्यास म्ह०.

कुत्सित, वि० वाईट जो कांहीं एक पदार्थादिक तो; २, दुर्गंधियुक्त अमंगल असा जो कुजलेला पदार्थ तो; ३, कृत्रिमयुक्त जो मनुष्यादि तो.

कुत्सितकल्पना, स्त्री० कुकल्पना.

कुंथणें, कुंथणें, क्रि० १, मलविसर्गादि होण्याकरितां बलानें अपानवायु रेटून कंठानें शब्द करणें; २, ला० कांहीं एक कार्य सिद्ध्यर्थ सर्वशक्ति खर्चून प्रयत्न करीत असणें, कि० आरंभिल्या कार्याचा परिणाम विरुद्ध झाल्यानें, खेद करीत बसणें.

कुंद, पु० पुष्पाचा वेल आहे; २, गुरांचा रोग आहे; ३, वि० चांगला साफ नव्हे असा जो कंठध्वनि इ० तो, ४, पु० कानरा हितीयार्थी.

कुदकणें, कोणेकास लाथा बुक्क्या इ० कानें तुडिवणें.

कुदणें, घोडा इ० कानें उडया मारणें.

कुदलणें, पदार्थांचा भुसडा पडे असें वस्त्र, घोडा, इ० पदार्थ तत्तत्प्रकारें उपभोगिणें.

कुदवणें, कुदकणें.

कुदळ, स्त्री० जमीन खणण्याचें एक आऊत आहे; २, कुदळा.

कुदळणें, भूमि कुदळीनें खणणें.

कुदळा, पु० कों० मोठी जी कुदळ तो.

कुदळी

कुदळी, स्त्री० कुदळ.

कुदळें, न० खणण्याचें औत आहे

कुदळ्याचा, वि० कुदळ्यानें खणून केला जो खणाइ० तो

कुंदा, पु० गवतांत भेद आहे; २, भांग घोटण्याचा जो कुंडा तो; ३, बंदुकीचा जो दस्ता तो.

कुदान, न० जाचे प्रतियहीं घेण्यास फार पाप लागतें असें जें मृतगाय्यादि रूप दान तें.

कुंदापुरी, वि० कुंदापूर म्हणून बंदर आहे तेथील जो सुडा इ० तो.

कुंदी, स्त्री० परदेशचा पांघरुणाचा घडया घडवसायासाठीं चालून मोगरीनें ठोकण्याचा जो व्यापार तो; २, ला० कुदयेल.

कुंदेणें, क्रि० गुरांनीं कुंदरोगानें युक्त होणें.

कुधान्य, न० जाचा नैवेद्य, वैश्वदेव, करूं नये असें जें हरीक इ० धान्य तें.

कुन्हा, पु० कों० कुपिथ्य हितीयार्थी.

कुंप, न० कुंपण.

कुपट, स्त्री० रा० गृह. क्षेत्र. इ० कांची जी कडती.

कुंपण, कुपण, न० कुडण.

कुपथ्य, न० अपथ्य.

कुपा, पु० गारेसारिखा घोंडा आहे जाची रांगोळी होती तो; २, मोठ्या कुपीस म्ह०.

कुपात्र, न० दान देण्याविषयीं अनाचारादि दोषामुळें अयोग्य जो ब्राह्मण, कि० वाईट जें पात्र तें.

कुपित, वि० कोपला जो तो.

कुपिथ्य, न० पोटांत जो अजीर्णांश होतो, कि०

स्वच्छ

स्वच्छ मलशुद्धि न झाल्यामुळें रोगांत मलाचा सां-
दा राहतो तें; २, कोणेक गोष्टी विषयीं कोणकाचे
मनांत स्पष्टपणें बाहेर न पडतां राहतें जें कपट तें.

कुपी, स्त्री० कांच, बिलोर, यांचें औषधादि देवण्याचे उ-
पयोगी बारीक गळ्याचें पात्र आहे.

कुर्पान, स्त्री० गोसांवी इ० एक विधीचा करगोटा क-
रून जी लंगोटी नेसतात ती.

कुपुत्र, पु० माता पितरांस दुःख देणारा, कि० कुला-
स दोष लावणारा जो पुत्र तो.

कुपेथर, अलिं० रा० कुपा लणून जो दगड तो.

कुफराण, न० कोणेकानें कांहीं दोष केला नसतां त्या-
जवर कोणेकानें रचला जो दोष तें.

कुफराणी, अलिं० कुफराण करण्याचा स्वभाव
जाचा तो.

कुबट, अलिं० कांहीं कुजल्यामुळें, कि० सरदी इ० वि-
कारानें दुर्गंधियुक्त जें धान्यादि, कि० तो वास तो.

कुबड, न० वातादि विकृतीनें पाठीस येतो जो वक-
पणा तें.

कुबडा, अलिं० कुबड आहे जास तो.

कुबडी, स्त्री० रामदासी लोकांचे हातीं ओढिंगण्या-
चा उपयोगी एक दंड असतो ती.

कुबडया, अलिं० कुबडा.

कुबलणें, कुमलणें.

कुबुद्धि, स्त्री० कपटादि दोषयुक्त जी बुद्धि ती; २,
अलिं० तद्विशिष्ट तो.

कुबेर, पु० देवांचा धनाध्यक्ष आहे; २, ला० मोठा
जो द्रव्यवान् त्यास ह्०.

कुब्बल, अलिं० सामान्य रीतीपेक्षां जो मध्यें वजन
शक्ति, इ० गुण अधिक नमाण आहेत असें जें ओ-
झें, पुरुष, इ० पदार्थ तो.

कुंभ, पु० सं० कलश, २, हत्तीचें गंडस्थल.

कुंभकर्ण, पु० एक निद्रालू राक्षस होता तो; २, ला०
फार झोंप आहे जास तो.

कुंभकोणी, अलिं० कुंभकोण लणून गांव आहे ते-
थील जो तांब्या इ० पदार्थ तो.

कुंभा, पु० वृक्ष आहे; २, पक्षी आहे.

कुभांड, न० कुफराण; २, निर्मूल रचिली जी गोष्ट,
मत इ० तें.

कुभांडखोर, अलिं० कुभांडी.

कुभांडी, अलिं० कुभांड करण्याचा स्वभाव जाचा
तो.

कुंभार, पु० मडकीं, रांजण, इ० करून त्याजवर उपजी-
विका करणारी जाति आहे.

कुंभारकाम, न० विवाहादि कार्यास लागतो जो म-
डकीं इ० पात्र समुदाय तें.

कुंभारकी, स्त्री० कुंभाराचें कर्म ती.

कुंभारक्रिया, स्त्री० शूद्र मेला असतां त्याची
कुंभाराचे हातून जी उत्तरक्रिया करिवतात ती.

कुंभारीण, स्त्री० सपक्ष क्षुद्र जंतु आहे.

कुभाव, पु० कुडाभाव.

कुंभी, स्त्री० कुंभाप्रथमार्थी.

कुंभीपाक, पु० एक नरक आहे.

कुंभेरी, स्त्री० कों० गवत, पेंढा, इ० कांची गंजी ती.

कुभोजन, न० कदन्नादि भक्षण तें.

कुंभ्या, पु० रा० कुंभी.

कुमक, स्त्री० कोणेकाचा कांहीं एक व्यापार सिद्ध
होवा

द्धावा ह्मणून कोणेकानें द्रव्य, मनुष्य, इ० कें करून केलें जें सहाय्य, कि० सहाय्यार्थ आलेले जे मनुष्यादि ती०

कुमकणें, कुदकणें०

कुमका, पु० कों० बुकीनें केलाजो प्रहार तो०

कुमति, वि० स्त्री० कुबुद्धि०

कुमंत्री, पु० कोणेकास वाईट बुद्धि सांगणारा प्रधान इ० मंत्री तो०

कुमर, पु० कुमाराचा अपभ्रंश०

कुमरी, स्त्री० कुमारीचा अपभ्रंश०

कुमलणें, कुदकणें०

कुमळें, न० वा० कमाल जो रोगाचा धारा तें०

कुमाईत, वि० दांडी, अयाळ, गुडघे, पद, कान हे काळे असून जो शरीरानें रक्तवर्ण असा जो अश्व, कि० यत्किंचित् रक्तनामिश्र जो सर्वांगीं तो०

कुमार, पु० मोठ्या दशेस आला नाहीं असा जो पुत्र तो०

कुमारिका, स्त्री० जिचा विवाह झाला नाहीं अशी जी मुलगी ती०

कुमारी, स्त्री० कुमारिका०

कुमार्ग, पु० वाईट जो मार्ग तो; २, ला० शास्त्र लोक निंद्य जी रीति तो०

कुमार्गी, वि० शास्त्रादिविरुद्ध रीतीनें चालणारा तो०

कुमुद, न० चंद्रविकासी जें कमल तें; २, कमलासारिखें जलांत उत्पन्न होणारें असें एक पुष्प आहे०

कुमुदिनी, स्त्री० कुमुद पुष्पाचें जें झाड ती, कि० तें पुष्प तीं०

कुयोग, पु० कांहीं कर्मांविषयीं निंद्य जें तिथिवारादि त्यांचा जो विवक्षित कालीं संबंध तो, कि० तें तिथ्यादिक०

कुरकुटणें, दांतानीं, कि० नखानीं पदार्थ थोडाथोडा तोडणें०

कुरकुटी, स्त्री० कों० बारीक जो आंगांत ज्वर येतो ती०

कुरकुरणें, कोणेकानें कांहीं केलेली गोष्ट मनास न आल्यामुळें संकोचादि कारणानें स्पष्ट न बोलतां अस्पष्ट भाषण करणें०

कुरकुरी, स्त्री० घोड्याचे पोटांत एक रोग होत असतो ती०

कुरकुरीत, वि० भक्षणादि प्रसंगीं कुरकुर शब्द करावया जोगा जो पापड लोणचें इ० तो०

कुरकुला, पु० एक बुरडींच पात्र आहे०

कुरकुली, स्त्री० लहान जो कुरकुला ती०

कुरकू, स्त्री० रा० कुरकुली०

कुरकूर, स्त्री० कुरकुरण्याचा व्यापार ती०

कुरंग, पु० सं० हरिण०

कुरघोडी, स्त्री० मनुष्य दुसऱ्यास पाठीवर घ्यावयाकरितां गुडघ्यावर हात ठेऊन घोड्यासारिखा आकार करितो ती०

कुरचणें, रा० नखाचे चिमटीनें कांहीं पदार्थांचा अंश तोडणें०

कुरचा, पु० रा० बोचकुरा०

कुरटा, वि० मनाचा जो कपटी तो०

कुरडा, वि० रा० ईषन्मात्र संकुचित असतो जो डोळा, कि० तद्विशिष्ट मनुष्य तो०

कुरडू, स्त्री० पु० एक वनस्पति आहे; २, एक कर्णभूषण आहे.

कुरण, न० शेत नकरितां तृणार्थ जो जागा राखितात तें.

कुरणंकरी, ३लिं० रा० बहुत दिवस दुखण्यांत पडल्यामुळें जाची प्रकृति केवळ अशक्त तो.

कुरण्या, पु० कुरणावर रक्षणार्थ जो ठेविला असतो तो.

कुरतुडणें, कुरकुटणें.

कुरनिशात, स्त्री० हिं० राजा इ० कांस भूमीस हानि लावून अति नम्रतेनें जें नमन करितात ती.

कुरनीस, स्त्री० हिं० कुरनिशात.

कुरबुरणें, कुरमुरणें.

कुरमणें, कों० मोठा जाळ नहोतां अग्नीनें आंतचा आंत जळणें; २, ला० क्रोधादिकानें धुसमुसणें.

कुरमुरणें, अनिष्ट गोष्ट फिरवायास निरुपाय झाल्यामुळें मनांत चरफडत राहणें.

कुरमुरा, पु० कों० उबजे, तांदूळ, किं० पोहे भाजून पोकळ कुरकुरा बाजाया जोगे जे होतात तो; कुरमुरेरवाणें, स० कुरमुरणें.

कुरमुरी, स्त्री० कों० कुरमुरा.

कुररी, स्त्री० सं० तिटवी.

कुरवंडी, स्त्री० बधुवरे इ० कांवरून दृष्टिविकारादि शांत्यर्थ निंबलोण, अन्न, इ० ओंवाळण्याचा जो व्यापार ती, किं० दीप ओंवाळण्याचा जो प्रकार ती.

कुरवाळणें, ममतेनें बालकादिकांचा अंगावरून हस्त हस्त फिरविणें.

कुरळ, ३लिं० मोकळा सुटला असतो जाचें वेंटाळें होतें असा जो सुशोभित केश तो.

कुरळी, स्त्री० धोत्रजोडा, पंचेजोडी, इ० सबंध विणलेली जी वस्त्रें, यांस मध्यें फाडायाचे स्थली, किं० इतर वस्त्रांसही पदराचे प्रदेशीं आडवीं सुतें न भरितां जी जागा बगळतात ती.

कुरान, कुराण, न० हिं० यवनाचें धर्मशास्त्र तें.

कुरापत, स्त्री० कज्जा होण्यास बळेंच उत्पन्न केलेंजें निमित्त ती.

कुरी, स्त्री० उपद्रवकारक जे भूत, रोग, इ० त्यांचा उपद्रव नकावा म्हणून अमुक अमुक काळीं अमुक अमुक उपचार करावा इ० जो नियम बांधिला असतो ती.

कुरुंद, कुरंद, पु० पाषाणांत एक भेद आहे.

कुरुंदी, कुरंदी, ३लिं० कुरुंदाची जी साहाण, जांतें, इ० पदार्थ तो.

कुरुळ, ३लिं० कुरळ.

कुरूप, न० नकटेपणा, रावरंडेपणा इ० दोषामुळें वाईटजें मनुष्यादिकांचें रूप तें; २, ३लिं० तद्विशिष्ट जो मनुष्यादि तो

कुर्पण, न० रा० घांसलेली भांडी ठेवायाकरितां जी पांदी टांगली असती तें.

कुर्री, पु० विद्या शौर्य इ० कांचा अभिमानाचा ज्ञापक, वस्त्र, अलंकार, मिशा, इ० कांचा तशा धारणानें, वपाहणें, बोलणें, इ० क्रियानीं जो कोणी डोल दृष्टीस पाडतो तो.

कुर्रेदार, ३लिं० कुर्रेबाज.

कुर्रेबाज, ३लिं० कुर्रा आहे जास असा जो मनुष्यादि तो

कुऱ्हाड, स्त्री० लांकडें फोडायाचें एक शस्त्र आहे.

कुऱ्हाडा, पु० चापाचीं मळसूत्रें इ० उचकटायाचें आऊत आहे.

कुऱ्हाडीचादांडा, पु० शत्रुपक्ष्यांस मिळून स्वजनाचें वाईट करणारा जो मनुष्यादि त्यास ल्ल० स० कुऱ्हाडीचादांडा गोतास काळ.

कुल, न० एकापासून पुत्रपौत्रादि रूपेंकरून झाले जे अनेक त्यांचीजी ती मूलपुरुषापासून वंशपरंपरा चालती तें; २, सं० एक जातीय जीवांचा समुदाय तें.

कुलअरवत्यार, ३लिं० अरवत्यार.

कुलअरवत्यारी, स्त्री० कुल अरवत्याराचें कर्म ती.

कुलक, न० एकाच्यापासून जे अनेक श्लोक असतात त्यांचा समुदाय.

कुलकुली, स्त्री० अश्वास जी अतिशयित कामुकावस्था प्राप्त होती ती.

कुलकुल्ला, ३लिं० कुल अरवत्यार.

कुलंगडें, न० कों० कोणेकानें मोड्या चातुर्यादिकांहींएक कार्याची अनेक युक्तीनीं एकाएकीं दुसऱ्याचे मनांत नयावया जोगी केली जी रचना तें; उ० याणें देवस्कीमध्यें काय कुलंगडें केलें तें समजत नाहीं.

कुलंगा, ३लिं० कुब्यांत भेद आहे.

कुलगुरु, कुळगुरू, पु० कुलपरंपरेचा जो उपाध्याय तो.

कुलज, ३लिं० उत्तम कुलीं जो उत्पन्न तो.

कुलटा, स्त्री० व्यभिचारिणी.

कुलदीपक, ३लिं० सर्वकुलास उद्धारणार, किं० नावालौकिकास आणणार असा कुलामध्यें उत्पन्न झाला जो पुण्य पराक्रमादि गुणविशिष्ट पुरुष तो.

कुलदेवता, स्त्री० कुलपरंपरेनें जा देवाची पूजा करीत आले ती.

कुलदैवत, न० कुलदेवता.

कुलदैवत्य, न० कुलदेवता.

कुलधर्म, पु० अमुक दिवशीं अमुक करावें असा स्वकुलांत चालत आलेला जो धर्म तो.

कुलपरंपरा, कुळपरंपरा, स्त्री० बाप, आजा, पणजा, किं० पुत्र, नातू, पणतू, इ० रूप जी परंपरा ती.

कुलपी, ३लिं० मळसूत्र इ० जास कांहीं कळा केली असती तें गोड इ० भूषणादि तो.

कुलपीगोळा, पु० पोटीं जकेरा भरलेला जो गरनाळ इ० कांत घालावयाचा उपयोगी गोळा असतो, तो.

कुलपुरुष, कुळपुरुष, ३लिं० जाचे कुलांत जो उत्पन्न झाला पुरुष तो त्याचा.

कुलवधू, स्त्री० उत्तम कुलीं उत्पन्न होऊन सदनुरूप सदाचारादि गुणसंपन्न जी स्त्री ती.

कुलस्वामी, पु० कुलदेवता.

कुलक्षण, न० वाईट जें लक्षण तें: २. ३लिं० कुलक्षणी.

कुलक्षणी, ३लिं० अवलक्षणी.

कुलक्षय, कुळक्षय, पु० सर्वकुलाचा नाश तो.

कुला, पु० कंबरेचा खालीं ऊन्नत जे दोन अवयव

असतात ते म०.

कुलांगना, स्त्री० कुलवधू.

कुलांगार, कुळांगार, ३लिं० सर्व आपल्या कुलाचा नाश करणारा. किं० कुलास अपकीर्ति दायक तो.

कुलाचल, पु० सह्यादि, विंध्याद्रि, इ० सात पर्वत पुराणप्रसिद्ध आहेत ते प्रत्येकीं.

कुलाचार. पु० कुलपरंपरेनें चालत आला जो आचार तो.

कुलिस्थ, पु० सं० कुळीत.

कुलीन, कुळीण, ३लिं० उत्तम कुलाचाठायीं उत्पन्न होऊन तदनुरूप सभ्यत्वादि गुणांनीं जो युक्त तो.

कुलुकुली, स्त्री० अकस्मात् चोर, वाघ, इ० कांचें भय प्राप्त झाल्यामुळें, किं० रोगादि दुःख सोसवेनासें झाल्यामुळें, पराकाष्ठेची ओरडाओरड. बोंबाबोंब, इ० कोणी करतो, किं० अनेक मिळून करितात ती; २, कुलकुली.

कुलूप, न० घर, पेटी, इ० भलत्यानें उघडूं नये म्हणून द्वारादिकांस प्रतिबंधक यंत्र लाविताततें, किल्ली वांचून उघडत नाहीं तें.

कुलोपाध्याय, पु० कुलगुरु.

कुवत, स्त्री० मनुष्यादि पदार्थांमध्यें कार्य निर्वाहकजी शक्ति असती ती.

कुंवर, पु० कुमर.

कुंवरी, स्त्री० रा० कोंवळा जो फणस ती.

कुंवली, स्त्री० रा० कुयली.

कुंवळ, पु० कोळ.

कुंवळणें

कुंवळणें, रा० जलादि सद्रव पदार्थांत भात, चिंच, अंबा, गूळ, इ० कांचा तत्सांश यावा म्हणून त्यांत चालून कुसकरणें.

कुवा, पु० उदकार्थ जो आड खणिला असतो तो.

कुंवार, कुवार, स्त्री० कुमारी.

कुंवारकोंडें, न० रा० कोरफड.

कुंवारसुवाशीण, स्त्री० कों० कांहीं देवताचा उद्देशानें पूजादि करण्याविषयीं विवक्षित जी कुमारी ती.

कुवासना, स्त्री० दुर्वासना.

कुविद्या, स्त्री० पिशाचोपासना, जारण, मारण, इ० जा विद्या ती.

कुवें, न० रा० कादणें याचा योगीं प्र०; अर्थ०; गुरांचे वांसरांस सडी म्हणून रोग होत असतो तन्निवृत्यर्थ त्याचा तोंडावर डाग देणें; २, ला० कुटयेल.

कुवेडें, न० दृष्टिदोषादि निरसनार्थ मंत्राचांचून शुद्ध क्रिया तंत्रें सांगितलींआहेत तीं प्र०; २, ला० सरळमार्गानें जें कार्य होत नाहीं तद्विषयीं वांकड्या मार्गानें केली जी कांहीं युक्ति तीस म्ह०.

कुशा, पु० दर्भीत जाति आहे.

कुशल, न० रोग, दारिद्र्य, इ० जे उपद्रव तद्राहित्यामुळें जी सुखावस्था तें; २, ३लिं० तद्विशिष्ट शिल्पादि कला मध्यें जो प्रवीण तो.

कुशलप्रश्न, पु० कोणी चिरकालानें भेटला असतां त्यास तुलीं सुखरूप आहांकीं इ० रूप आदरार्थ जो प्रश्न करितात तो.

कुशलार्थ, कुशाल्यार्थ, पु० सुखरूपपणा, हाशब्द

दुसऱ्यास

दुसऱ्यांस पत्रीं लिहित असतांना; उ० स्वकीय कुशलार्थ लिहून पाठवावा.

कुशाग्रबुद्धि, स्त्री० फार तीक्ष्ण जी बुद्धि ती; २, ३लिं० तद्विशिष्ट.

कुशाद, ३लिं० जा मध्यें अडचण होतनाहीं असें जें प्रशस्त स्थल तो.

कुश्चल, ३लिं० जाचें वस्त्र, शरीर, आचरण, मलिन अशा स्वभावाचा जो तो; २, दुर्गंधि.

कुश्चित, ३लिं० कुत्सिताचा अपभ्रंश.

कुष्माण, स्त्री० रा० कुंजकट जो वास ती.

कुष्ठ, न० रोग आहे, जेणेंकरून अंगावरील त्वचा पांढरी होतो, किं० कुजून गळती तें; २, कोष्ठकोळंजन.

कुष्ठी, ३लिं० कुष्ठरोग जास आहे तो.

कुसकट, ३लिं० कों० कुंजकट.

कुसकरणें, कुसकुरणें, हस्तपादादि व्यापारानें भाकरी, फुलें, इ० पदार्थ चुरणें.

कुसकरा, कुसकर, पु० कुसकरल्यामुळें झालाजो भाकर इ० कांचा चुरा तो.

कुसका, ३लिं० कों० कुंजका.

कुसकूर, पु० कुसकरा.

कुसंग, पु० जेणेंकरून अपकीर्ति, दुष्टवासना, किं० अंतःकरणास त्रास येतो अशा भांगट, सोदा, इ० मनुष्याची जी संगति तो.

कुसंगति, स्त्री० कुसंग.

कुसट, ३लिं० कों० कुंजट.

कुसदाण, स्त्री० कों० कुंजट पदार्थाची जी घाण ती.

कुसणें, कुंजणें.

कुसंतान, न० कुपुत्रादिरूप जें संतान तें; सं० कुसंताना पेक्षां निसंतान बरें.

कुसधुवणा, ३लिं० शेवटीं झालें जें अपत्य तो.

कुसमडणें, कुसमाडणें, कों० हस्तादि व्यापारानें पुष्पादिक चुरणें.

कुससुसणें, कुरबुरणें.

कुसरुडणें, कुसरूड लागल्यामुळें शरीरावयव विकृतीतें पावणें.

कुसरूड, पु० सुरवेंट.

कुसवा, पु० पोटीं झालेल्या अपत्यास चांगला, बाईट, एकसाररवा, गुण उत्पन्न झाल्यास प्रयोजक जी मातेची कूस तो.

कुसळ, न० तृणादिकांवर शरीर, वस्त्र, इ० कांचा संबंध झाला असतां आंत भरावा असा बारीक अशाचा अवयव असतो तें.

कुसळण, कुसळीण, स्त्री० दुसऱ्याचे घरचें नवनीतादि पदार्थ मंत्रविद्येनें आणणारी जी स्त्री ती.

कुसुंब, पु० कुसुंबा.

कुसुंबा, कुसंबा, पु० वस्त्रांस रंग द्यावयाकरितां जो करडईचीं फुलें वाळवून ठेवितात तो; २, भांगेंत मिरें इ० घालून वाटून प्यावयाकरितां जें पाणी करितात तो.

कुसुंबी, पु० कुसुंब्याचा जो रंग तो; २, ३लिं० तद्विशिष्ट वस्त्र तो.

कुसुभ, न० पुष्प.

कुसुमित, ३लिं० पुष्पित.

कुसूं, न॰ कपाड, इ॰कांस चरकटीची उरवळी इ॰कां॰ तपसाया करितां जे अवयव केले असतात ते प्र॰;२, कुसब;३, गृह, याम, इ॰कां भोंवतीं अ॰ सलेजी भिंत तें॰

कुसूर, स्त्री॰ रा॰ एक झाड आहे॰

कुसृष्टि, स्त्री॰ कुकल्पना॰

कुस्त, अलिं॰ कांहीं अतिशयित परिश्रम केल्यामुळें केवळ थकून जानें जें शरीर तो॰

कुस्ती, स्त्री॰ मल्लादिकांचें बाहुयुद्ध॰

कुहिजक, अलिं॰ कुजट॰

कुहिजणें, कुजणें॰

कुही, स्त्री॰ कुई॰

कुहीट, अलिं॰ कुजकट जो वास तो॰

कुळई, स्त्री॰ पालेभाजी आहे॰

कुळक, स्त्री॰ रा॰ मोडशी अतिरिक्त झाल्यामुळें ओक, हग, ढावया जोगी जी विकृति होती तो॰

कुळकट, स्त्री॰ आपले कुलपरंपरचें, कि॰ आपण कांहीं एक व्यवहारीं अनेक प्रकारें अनुभवलेलें, केलेलें, जें कांहीं कर्म त्याचें आद्यंत वृत्त तो॰

कुळकरण, न॰ गांवांतील कुळांचें सर्कारी वसूल वासूल इ॰ हिशेब लिहिण्याचा अधिकार आहे॰

कुळकरणी, पु॰ कुळकरणाचा अधिकारी आहे; २, थट्टेनें कुल्याला ल्ह॰

कुळकुळीत, अलिं॰ अत्यंत काळा जो मनुष्यादितो याचा प्र॰ प्रा॰ काळे शब्दाचा पाठीमागें होतो॰

कुळदीपक, अलिं॰ कुलदिपक॰

कुळंबावा

कुळंबावा, पु॰ कों॰ कुणबावा॰

कुळंबी, पु॰ कों॰ कुणबी॰

कुळंबीण, स्त्री॰ कों॰ कुणबीण॰

कुळव, पु॰ तृणादिक शेतांतून काढायाचे उपयोगी आऊत आहे॰

कुळवंत, अलिं॰ कुलीन॰

कुळवाडी, पु॰ कुणबी॰

कुळवें, न॰ रा॰ गन तोडून प्रथमवर्षी तेथेंच नाचणीचें शेत करितात तें॰

कुळारगा, अलिं॰ रा॰ जा गांवांमध्यें अनेक कुळें वतनदार आहेत तो गांव; २, अ॰ कुळारगवार; ३, पु॰ गांवांतील वतनदार कुळांचा समुदाय तो॰

कुळारगवार, अ॰ ग्रामादिकांतील सर्व कुळांचा प्रथक् पृथक् नामनिर्देशादि होई असें याद करणें, वसूल घेणें, इ॰ कांचें वि॰

कुळी, स्त्री॰ कों॰ कुल, विवाहार्थ इतर जातींचा पदर आहे न आहे इ॰ विचारी प्र॰;२, पालेभाजी आहे;३, रा॰ गुळणी॰

कुळीक, स्त्री॰ कुळक॰

कुळीत, कुळीथ, पु॰ एक द्विदल धान्य आहे॰

कुक्षि, पु॰ कांखेचा खालचा आणि कटीचा वरचा आंतला, कि॰ बाहेरचा प्रदेश तो॰

कूट, न॰ लोणचें इ॰ कांवर घालायासाठीं मोहऱ्या, मेथ्या, इ॰ कुटून चूर्ण करितात तें; २, सरलव्युत्पत्तीनें लागूं नये असा जो कोणी रचिला श्लोक हिशेब इ॰ तें; ३, कांहीं तांदूळ इ॰ कुटते समयीं केवल चूर्ण माथ जो अंश होतो तें; ४, एकविचारें चालणारे, जे अनेक मनुष्यादिक

त्यांचा

त्यांचा जमलेला जो समुदाय, कि० कांहींएक कार्याविषयीं त्यांणीं केला जो एकोपा तें.

कूटसाक्षि, ३लिं० खोटी साक्ष देतो तो.

कूटसाक्ष्य, न० खोटी जी साक्ष तें.

कूटस्थ, ३लिं० जापासून पुत्र, कन्या, इ० अनेक अपत्यद्वारा भिन्न भिन्न अनेक संतति झाल्या त्या संततींचें परस्पर एक कुलोत्पन्नत्व पहायाचें असतां तो पुरुष, कि० स्त्री० तो.

कूड, पु० भिंतीचा अभायीं कोंबट्या, कारव्या, इ० कांचें जें प्रतिबंधक करितात तो; २, को० कुत्सित जो पुरुष तो.

कूप, पु० कुवा.

कूर्म, पु० सं० कांसव.

कूर्मासन, न० सं० योग साधनार्थ बसण्याचा एक प्रकार आहे.

कूश, स्त्री० कूस.

कूष्मांड, पु० सं० कोहाळें; २, न० कोणेकास ठकवावें, भिववावें, इत्यादर्थ निर्मूल रचिली जी गोष्ट तें.

कूस, स्त्री० कुक्षि; २, मेजून, मापून, कांहीं पदार्थाची इयत्ता केली असतां त्यांत जी कसर राहती ती; ३, गुरें इ० कांचा योनीद्वारा प्रसवल्यानंतर कुजका अंडा निघतो ती.

कूळ, न० कुल; २, जाणें जाचें द्रव्यादि घावयाचें आहे तो त्याचें तें; ३, जापाशीं जो पदार्थ आहे तो त्याविषयीं.

कृच्छ्र, न० प्रायश्चितांत एक भेद आहे; २, संकष्ट; मा० समासीं प्र०.

कृत

कृत, न० चार युगांतील जें प्रथम युग तें; २, ३लिं० केला जो तो; केलें आहे भोजन जाणें तो कृतभोजन; केला आहे विवाह जाचा तो कृतविवाह इ० समास जाणावे.

कृतकर्मा, ३लिं० जें कर्म जाचे हातून एक दोन वेळा निभावलें आहे त्या कर्मा विषयीं तो.

कृतकृतार्थ, ३लिं० कृतकृत्य.

कृतकृत्य, ३लिं० जें पुण्यकर्मादि करावयाचें तें केल्यामुळें जाचें जन्मसार्थक झालें तो; २, कांहीं दुर्घट काम आरंभिलेलें जाचें तडीस गेल्यामुळें जो समाधान पावला तो; ३, जें काम करावयास दुःशक तें कोणेकाचे हातून झालें असतां त्या कर्मास प्र०; उ० या अदलाबदलांतून तुम्हीं पैसा काढिला हें मोठें कृतकृत्य केलें.

कृतघ्न, ३लिं० अन्यानें केलेला उपकार मनांत न बागवितां जाणें उपकार केला त्याचे अनिष्ट विषयीं प्रवर्ततो तो.

कृतपरिश्रम, ३लिं० कोणेक विद्यादिकांविषयीं जाणें बहुत परिश्रम केले आहेत तो त्याविषयीं.

कृतश्रम, ३लिं० कृतपरिश्रम.

कृतसंकल्प, पु० कांहींएक कर्म करण्याविषयीं केला जो दृढ निश्चय तो; २, ३लिं० त्याकर्माविषयीं दृढ निश्चय जाचा तो पुरुषादि.

कृतज्ञ, ३लिं० दुसऱ्यानें केला जो उपकार विसरत नाहीं तो.

कृताकृत, ३लिं० केल्यास कांहीं फल आहे न केल्यास प्रत्यवाय नाहीं असें जें कर्म इ० तो;

२,

२,न० कांहीं एक गोष्टींचें अल्प स्वल्प जें सत्व तें; उ० यंदां दुपत्याचें कृताकृत दिसतें;३,३लिं०तद्विशिष्ट;उ०त्याचाघरीं आचार कृताकृत आहे.

कृतांजलि,३लिं० जाणें हातजोडले आहेत तो.

कृतांत,पु० यम;२,मृत्यु;३,करदनकाळ.

कृतार्थ,३लिं० कृतकृत्य प्रथमद्वितीयार्थी.

कृति,स्त्री० कांहींएक कार्य करण्याचा जो व्यापार ती;२,याप्रकारें करावें असा जो त्या व्यापारांतला प्रकार असतो ती;३,अंकाचा जो वर्ग ती;४,कोणेकानें व्यापारानें सिद्ध केलें जें कांहींएक ती; उ० रघुवंश ही कालिदासाची कृति.

कृतीश्वा,३लिं० कोणेकानें कृतीनें केला लक्षणजे जो स्वतःसिद्ध ईश्वरकृत नव्हे तो;उ० ही कृतीची फुलें,पण खरोखरीं फुला सारखीं दिसतात

कृतोपकार,पु० कोणेकावर कोणेकानें केला जो उपकार त्याचा मोठेपणा वर्णनीय असतां त्या उपकारासच्च स्त्र०.

कृत्तिका,स्त्री० तिसरें जें नक्षत्र ती.

कृत्य,न० कृति.

कृत्या,स्त्री० उग्र देवता आहे;२,भांडखोर,कज्जेखोर,जी स्त्री तीसस्त्र०.

कृत्रिम,न० कपट;२,३लिं० कृतीचा;कृत्रिमवेष, कृत्रिमरूप,इ०समास जाणावे.

कृत्रिमभूमि,स्त्री० गृहादिकांचा खालीं खापून चोपून जी चांगली भूमि करितात ती.

कृत्रिमवन,न० सं० उपवन.

कृत्रिमी,३लिं० सं० कपटी;२,कृतीचा.

कृत्स्न,३लिं० सं० झाडून सर्व.

कृदंतकाळ

कृदंतकाळ,३लिं० करदनकाळ.

कृपण,३लिं० सं० कदर्य;२,केवलदीनवाणें दिसाया जोगें जें वचन,रूप,इ० तो.

कृपा,स्त्री० सं० करुणा;२,कोणेकाचें बरें व्हावें असा जो कोणेकाचा त्याजवर पक्षपात असतो, किं० होतो ती; कृपासिंधु इ० समास जाणावे.

कृपाकटाक्ष,पु० सं० आपली कृपा आहे या अर्थाचें द्योतक कोणेकाचें कोणेकाकडे जें अवलोकन तो.

कृपादृष्टि,स्त्री० सं० कृपाकटाक्ष.

कृपापात्र,न० सं० जाजवर जाची बहुत कृपा आहे तो त्याचें;२,जाजवर कृपाकरणें उचित आहे असा जो दरिद्री इ० तो.

कृपालू,कृपाळू,३लिं० कृपावंत.

कृपावंत,३लिं० दुसऱ्याचें यत्किंचित् दुःख पाहिलें असतां जास कृपा येती तो;२,कृपा आली आहे जास तो.

कृमि,पु० सं० किडा.

कृमिघातालें,न० पोटामध्यें जंत विकृतीमुळें जी घात विकृति होती तें.

कृश,३लिं० सं० लांब असून विस्तार परिधि जाचा अल्प असा जो मनुष्यशरीरादि पदार्थ तो;२,कृश आहे अंग जाचें तो,कृशांग,कृशमध्य,इ० समास जाणावे.

कृषि,स्त्री० सं० शेत करण्याचा व्यापार ती.

कृषिक,३लिं० सं० कृषीनें उपजीविका करणारा जो तो.

कृषिकर्म,न० सं० शेत,मळा,इ० करण्याचा व्यापार

पार तें.

कृषीवल, ३लिं० सं० कृषिक.

कृष्ण, पु० सं० श्री विष्णूचा आठवा अवतार तो; २ ३लिं० काळा जो वर्ण. किं० तद्विशिष्ट तो.

कृष्णकावळा, पु० जाची मान पांढरी असती असा जो कावळा तो.

कृष्णगुंजरी, स्त्री० लुगडयांत भेद आहे.

कृष्णपक्ष, पु० सं० जामध्यें चंद्राचा कला उत्तरोत्तर कमी होतात असा जो पंधरवडा तो.

कृष्णमृग, पु० सं० काळवीट.

कृष्णवर्ण, न० सं० होणें, करणें, यांचा योगीं म०, अ० जाचा संबंधास कोणी त्रासला आहे तत्संबंधाची कोणेक कारणानें निवृत्ति होणें; उ० त्या दुरमानाचें जा दिवशीं कृष्णवर्ण होईल तेव्हां मी चेईन म० तो मरेल, किं० गांवांतून जाईल तेव्हां असा अर्थ.

कृष्णा, स्त्री० सं० महानदी आहे.

कृष्णागर, पु० एक चंदनांत भेद आहे.

कृष्णाची गाय, स्त्री० एक क्षुद्रजंतु आहे.

कृत, ३लिं० सं० कल्पिलेला जो तो; २ जा विद्यादिकांचा ठायीं जो निभावलेला त्याचा ठायीं तो.

कृति, स्त्री० सं० कांहीं कर्मा विषयीं कोणेकानें काढिली जी युक्ति ती, किं० कांहीं कार्य करण्याचें अंगीं कौशल असतें ती; २, कांहींएक कार्याचा ठायीं युक्तिमंतानें देखिली जी युक्ति ती.

कैंकटणें, कुत्रें, चोर, इ० कानें कोणी मारलें इ० कारणामुळें दीन स्वरें ओरडणें.

कैंकणें, कैंकटणें.

कैंकरूं, न० कोंकरूं.

केका, स्त्री० सं० मयूराचा शब्द.

कैंकावणें, कंकणें.

केगद, स्त्री० रा० केतकी; २, न० तिचा फुलाचें पान तें; ३, स्त्रियांचें शिरोभूषण आहे.

केचित्, ३लिं० कश्चित् याचें बहुवचन तो.

केचिन्मत, न० सर्वांस मान्य नहे असें जें एकदेशीय मत तें.

केजणें, न० कों० नारळ, दाणे, इ० देऊन मासळीचा कुटा इ० घेणें.

केजें, न० भाजी इ० घ्यावयासाठीं दाणे, नारळ, इ० जें देतात तें.

कैंड, न० रा० हरकांतील फोल तें.

केड, ३लिं० अतिकृपण.

कैंडणें, कों० कोणेक मनुष्यादि पदार्थास अनेक प्रकारें अनेक दोष ठेऊन केवल तुच्छ करून टाकणें.

केडवळ, केडोळ, पु० अ० केवडावेळ; उ० त्यास जाऊन केडवळ झाला आल्हून येत नाहीं.

केडोळचा, अ० फार मोठा वेळ होऊन येणें. जाणें, इ० धा० चें वि०.

केणा, पु० एक गवत आहे तो.

केणाकुंजरा, पु० एक पालेभाजी आहे तो.

केणें, न० विकला असतां पैसा उत्पन्न व्हावया जोगा जो पदार्थ तें.

केतक, न० केवडा; २, केतकीचे वृक्षगुच्छाचें एक पान तें.

केतकट, स्त्री० केतकी; २, न० केतकीचें लांकूड तें.

केतकी

केनकी, स्त्री० पुष्प वृक्ष आहे.

केतु, पु० नवग्रहांतील एक ग्रह आहे; २, सं० ध्वज.

केदारा, पु० एक गानांतील राग आहे.

केधवाँ, अ० केव्हां.

केनडी, स्त्री० चर्म, वस्त्र, अन्न, इ० कांवर सरदीचा योगानें जो पांढरा पांढरा अंश उत्पन्न होतो तो

केनसावणें, कों० कांहीं अन्नादि पदार्थ केनडीनें युक्त होणें.

केनी, स्त्री० लहान झाड आहे.

केंबरीं, न० ग० केंबरें.

केंबरें, न० सपक्ष क्षुद्र जंतु आहे; जो होल्ल्या पुदें येऊन फिरत असतो तें.

केंवळ, केंमळ, न० गृहादिकांवर आच्छादनार्थ घालतेलें जें तृण तें; २, दे० स्त्रियांस स्त्रिया या शब्दानें शिवी देत असतात.

केंबळा, पु० कों० केंवळ.

केंबळी, स्त्री० कों० केंबळा.

केर, पु० गृहादिकांच्या ठायीं मृत्तिका, तृण, पानें, इ० जो वाईट सांईट अंश जमतो तो; २, ला० समुदायांतून निवडून घेतला असतां जो अवशिष्ट अंश राहतो तो; ३, न० कों० केवल बारीक कसपटास ला०.

केरकचरा, पु० बारीक मोटा केर तो.

केरकसपट, न० केर इ० तें.

केरकोंडा, पु० पोटभरायासाठीं कोणेकाचा घरचा केर काढणें इ० रूप जो व्यापार कोणी करितो, तो

तो व्यापार.

केरडोक, न० परांस धूर इ० लागून जो केर जमतो तो.

केरपोतेरें, न० केर काढणें, पोतेरें घालणें, इ० गृह संबंधी व्यापार तें.

केरवा, पु० कारवा.

केरसुणी, स्त्री० केर झाडायासाठीं शिंदीचा पात्या, नारळाचे हीर, इ० क एकत्र बांधून जें साधन करितात तें.

केरावणें, कों० धान्यादिक पदार्थ केरानें मिश्रित होणें.

केरी, स्त्री० रा० नांगरामें उरवळलेल्या जमीनीवर आंतील, किं० पर्जन्याचे उदकानें आलेला जो केरकचरा तो; २, कों० माडाचे झापांची पांढी सारिखी करितात तो.

केल, न० भेद इ० कांस जें दुभालकें असतें, किं० त्याचे जे दोन अवयव तेम०; २, बांबू इ० काष्ठास फुटलेली जी रवांदी ती समूळ न तोडितां कांहीं कारणार्थ राखिला जो त्यास तिचा अंश तें; ३, तादृश मूळचा अवयव नसतां आंकडा इ० कारणार्थ बांधिलें जें दुसरें काष्ठ तें.

केलाडूं, न० कों० लेंकरूं.

केलि, स्त्री० सं० क्रीडा.

केव, स्त्री० करुणा.

केवटा, २ लिं० कृपण; २, पु० मृत्तिकेंत भेद आहे तो.

केवटी, पु० मोठ्या दुकानांतून थोडा बहुत जिन्नस विकत घेऊन किरकोळ जो विकतो तो; २, ला० अतिकृपणास ला०.

केवट्या, २ लिं० केवटी.

केवडा, पु॰ केतक; २, स्त्रियांचें शिरोभूषण आहे.

केवढा, वि॰ कोणत्या प्रमाणानें तुल्य.

केवढावेळ, अ॰ केवढ्या कालापर्यंत; उ॰ तूं यांचे घरीं केवढावेळ बसला होतास; २, अ॰ केदवळचा.

केवण, स्त्री॰ एक वृक्ष आहे.

केवल, केवळ, वि॰ जा मध्यें यत्किंचित् इतर अंशाचा संपर्क नाहीं असा, कि॰ जा मध्यें अन्यथात्वाची ईषन्मात्र ही संभावना नाहीं असा एकरूप जो तो; उ॰ हें भांडें केवल चांदीचें आहे; हा केवल वेडा नाहीं; २, जास दुसरा सहाय नाहीं तो; उ॰ केवल तांदूळ असल्यानें भोजन होत नाहीं; ३, वस्तुतः तद्रूप नसतां सादृश्यादि धर्मामुळें तसें करून जो आरोपित तो; उ॰ ही नगरी केवल लंकाच दिसती.

केवा, पु॰ डचुलकें; २, कोणेक पदार्थाची हा मोठा, हा, जड, इ॰ रूपें करून जी गणना तो; उ॰ मी यमाला भिणार नाहीं. मग तुझा केवा काय.

केविलवाणा. केविलवाणी. वि॰ दीनवाणा.

केवीं, अ॰ सं॰ कोण्या प्रकारें

केवी, वि॰ रा॰ परगांवचें कूळ गांवांत शेत करण्याकरितां जें आलें तो; २, कोंडवुलकें.

केहीं, अ॰ कोणत्या समयाचा ठायीं; २, केहींचा.

केहींच, अ॰ केवल थोडक्या वेळांत प्रा॰ भूतीं प्र॰; उ॰ घोडयास गवत घातलें तें त्याणें केहींच खालें.

केहींचा, अ॰ केदवळचा.

केहींसा, अ॰ केहीं; सभ्य असतां प्र॰; उ॰ तो केहींसा गेला

केश, पु॰ मनुष्य, पशु, इ॰कांचे अंगावर केवल बारीक जो अवयव विशेष असतो; जो छेदिला असतां पुनः वाढतो जाचा छेदनीं दुःख होत नाहीं तो.

केशपाश, पु॰ वुचडा, वेणी, इ॰ रूप जो केशबंध प्रकार तो.

केशर, न॰ काश्मीर देशोत्पन्न सुगंधि द्रव्य आहे.

केशरा, केशरी, वि॰ केशराचा, कि॰ केशरासारिखा जो रंग तो; कि॰ तद्विशिष्ट वस्त्रादि तो; २, स्त्री॰ केशरी गंधाचा जो शरीरास लेपतो; ३, जा मिठाई इ॰ पदार्थांत केशर पडतें त्यासही केशरी स॰; उ॰ केशरी बर्फी इ॰.

केशरीगंध, न॰ कपालादिकांस लावाया करितां केशर, कुंकूं, रवे, इ॰कांचें जें गंध करितात तें.

केशरीभात, पु॰ केशर, साखर, बदाम, इ॰ घालून जो तांदळांचा भात करितात तो.

केस, केँस, पु॰ केश; केसानें गळा कापणें, स॰ स्नेहादि दाखवून गुप्तरूपें घात करणें; तुझा केंसास धक्का लागूं देणार नाहीं, स॰ तुला ईषन्मात्र उपद्रव होऊं देणार नाहीं; पाणी केंस तोडतें, स॰ अतिशयित वेगवत् आहे असें जाणावें.

केँसकरीण, स्त्री॰ जिचा डोसकीचे केश भादरले नाहींत ती; स॰ हजार बोडक्या आणि एक केंसकरीण, यास्तव वांचून इतरत्र प्रा॰ विधवे विषयीं प्र॰.

केँसतोड, केँसतूड, न॰ गळवा सारिखी एक गांठ येत असती तें.

केसर,पु॰न॰ नागचांफा इ॰ पुष्पांत बारीकबारीक जे अवयव विशेष असतात जाचायोगें पुष्पास स्वाद असतो तो तें;२,अंब्याचे बांठ्यावरजी लोहोकर असती तो तें.

केँसर,न॰ अंबा,शाळी,तुळस,इ॰कांस जो पुष्पाचा तुरा येतो तें;२,केसर द्वितीयार्थी.

केसरी,पु॰सं॰सिंह;२,एक फुलझाड आहे.

केँसारी,स्त्री॰ दृष्टिबाधा नव्हावी म्हणून गोमहिष्यादिकांचे गळ्यांत घालावयाकरितां जी केशांची दोरी करितात ती.

केँसारीण,स्त्री॰ केशांचा दोरीचा गळ्यास फांस घालून अकस्मात् मनुष्यास मारणारी जी स्त्री ती;अशा स्त्रिया देश विशेषीं आहेत म्हणून प्रसिद्धि आहे.

केँसाळ,केँसाळू,३लिं॰ जाचे अंगावर बहूत केश आहेत असा जो मनुष्यादि तो

केळ,स्त्री॰ एक वृक्ष आहे;२,न॰ तिचें फल तें;३,लहान मुली साडी नेसून तिचा चुन्या खोवून परवतात तेथें केळा सारिखा आकार विशेष होतो,कि॰पागोटयाची बिनी तें;४,पु॰ एक वन्य वृक्ष आहे.

केळफूल,न॰ केळीचें,कि॰ चवेणीचें जें पुष्पांचे कणसा सारिखें येतें तें.

केळँबा,पु॰कों॰ चवेणीचें जें काल तो.

केळँभा,केळँबा,पु॰कों॰ केळीचा रोपतो.

केळवँड,स्त्री॰कों॰ केळीचें लोंगर ती.

केळवण,न॰स्त्री॰ विवाह,मुंज,यांचा आरंभीं एक सोहळा आहे.

केळवणें

केळवणें,भं॰ नवरा,नवरी,मुंजा,यांनीं केळवण सोहाळ्यानें युक्त होणें.

केळा,पु॰कों॰ लहान जी मृत्तिकेची यागर तो.

केळी,स्त्री॰ कलशी.

केळें,न॰ केळीचें फळ.

कें,अ॰ भं॰ कोठें;२,केव्हां;उ॰ रामसरवा मज भेटेल कें कें.

केक,३लिं॰ जांची संख्या,किं॰ नाम निर्देश न करितां सामान्य रूपानें विवक्षित जे ते म॰अ॰व॰.

केकट,केकड,३लिं॰ भयंकर,वाईट,असा जो देश,अरण्य इ॰ तो.

केँचा,३लिं॰ कोणता;२,कोठचा;उ॰ कोण मीकेंचा कोवून आलों हें गुज श्रीगुरुलागि पुसावें.

केँची,स्त्री॰ कागद इ॰ कापायाची कात्री;२,तुळया इ॰ वर चढवायाकरितां दोन वांशांस दोरी बांधून जी कात्री सारखी करितात ती;३,दारूचेबाणाचा चोविसांचा जो समुदाय ती.

केनव,न॰सं॰ कपट.

केद,स्त्री॰ राजा,शास्त्रकर्ते,इ॰कांनीं मजादिकानीं या या प्रकारें चालावें अन्यथा चालूं नये असा जो नियम घालिवला असतो ती;२,चोरादिकांस राजादिकृत जो प्रतिबंध ती;या अर्थीं ग्रथमांत प्रयोग नाहीं;३,३लिं॰ राजादिकानें कारागृहांत ठेविला जो चोर इ॰ तो;४,कदर;५,कों॰ आपली केद कोणेकानें यत्किंचित् मोडली असतां त्या बरोबर कोणी फारच करितो जी घांसाघीस ती.

केदखोर,३लिं॰ केद अंगावर करण्याचा स्वभाव जाचा

जाचा

जाचा तो.

केदवार, अ० राजादिकृत केदेतें न उल्लंघितां.

केदी, ३लिं० कों० केदखोर.

केफ, पु० भांग इ० कांचाजयीं भक्षिल्यानें उन्माद वा-वथाजोगा जो गुण असतो तो, किं० तें भांग, मद्य, इ० जें द्रव्य तो.

केफी, ३लिं० केफ रवाण्याची संके आहे जास तो; २, केफ आहे जाचा ठायीं असें जें औषधादि तो.

केमर्थ्य, न० कांहीं पदार्थानें सिद्ध व्हावयाचें जें काम तें अन्यथा सिद्ध झाल्यामुळें, किं० त्या कामाची इच्छा नाहीं असें झाल्यामुळें त्या पदार्थाची जी निरुपयोगिता तें.

केमुतिकन्याय, पु० कांहीं पदार्थादिकानें कांहीं दुःशक गोष्टीची सिद्धि होती असा अर्थ वचनानें सांगितला असतां त्या गोष्टीपेक्षां सुशक गोष्टीची सिद्धि सहजच होईल अशा अर्थाचाही त्या वचनापासून बोध होण्याविषयीं दृष्टांतलें करून गृहीत जो जाशास्त्रानें कठीण लांकूड तुटतें त्याशस्त्रानें गवत अनायासें तुटतें इ० लोकव्यवहार.

केरा, ३लिं० अश्वादि पशूंचा एकच डोळा जो घारा असतो, किं० तद्विशिष्ट तो; २, तिरळा जो मनुष्य तो, किं० त्याचा डोळा तो.

केरी, स्त्री० कुचंरी.

केलास, पु० स० श्रीमहादेवाचें स्थान एक पर्वत आहे.

केलासवासी, ३लिं० कागदोपत्रीं मेलेला जो आपला पिता इ० त्याचें नाव लिहावयाचें आलें असतां एतद्विशेषण पूर्वक लिहितात.

केली, ३लिं० कांहीं एक पानांतील अवकाशाचे अल्पत्व महत्त्व धरून धान्यादि मोजण्याविषयीं बांधिलेंजें परिमाण तो.

केवर्तक, पु० सं० कोळी झणून जाति आहे.

केवल्य, न० जीवात्मा आणि परमात्मा यांचें अभेदरूप ज्ञान झाल्यामुळें जी मुक्ति तें.

केवाड, ३लिं० दे० कुभांडी.

केवार, कैंवार, पु० कोणेकाची दया इ० कारणामुळें कोणेकानें कोणेकाचा धरिलाजो पक्षपात तो; २, कर्कोटक.

केवारी, कैंवारी, ३लिं० जाणें जाचा केंवार अंगीकारिला तो त्याचा.

कैसा, ३लिं० अ० कोणत्या प्रकारचा, किं० कोणत्या प्रकारें.

कोई, स्त्री० पालेभाजी आहे.

कोईळ, स्त्री० कों० विटी, दांडू, खेळावया करितां जी गल्ल खणितात ती; २, कोकिळेस म्ह०.

कोईळडाव, पु० विटीदांडूचा खेळांत कोयळींत विटी ठेऊन दांडूनें उडिवण्याचा जो डाव येतो तो.

कौंक, न० कों० कुबड.

कोकटहोळी, स्त्री० कों० फालगुनी पौर्णिमेचा पूर्वी जी मुलें होळी करितात ती.

कौंकण, न० सह्याद्रीचा पश्चिमेस समुद्र पर्यंत जो देश तें.

कौंकणपट्टी, स्त्री० कोंकणरूप जो सर्व देश ती.

कौंकणस्थ, पु० ब्राह्मणांत एक जाति आहे.

कौंकणी, ३लिं० कोंकण संबंधी जो पदार्थ इ० तो.

कोंकणें, केंकणें; २, कुकुट, काक, इ० पक्ष्यानीं शब्द करणें: ३. न० एक वेलीचें फल आहे.

कोंकण्या, २लिं० कोंकणांत राहणारा जो मनुष्य. तो.

कोकंब, पु० एक फल आहे.

कोकंबसाल, कोकंबसोल, स्त्री० कोकंबाचा वृक्ष ती.

कोकंबी, कोकंब, स्त्री० कोकंबाचा वृक्ष ती.

कोकंबेल, न० कोकंबाचे ब्यांचें तेल.

कोंकरूं, न० मेंढीचें पोर तें.

कोकशास्त्र, न० कामशास्त्र.

कोकलणें, इष्ट कार्य सिध्यर्थ उपाय चालेनासा झाल्यामुळे हाकामारीत बसणें; २, कों० कुदकणें.

कोंका, पु० एक पक्षी आहे; २, एक तंतुवाद्य आहे; ३, कोंवळें जें केळफूल तो.

कोकाट, पु० मनुष्यादि शब्दांचा जो गलबला तो.

कोंकाटी, स्त्री० हस्तिदंताचा सच्छिद्र जो भोंवऱ्या सारिखा फिरवायाकरितां करितात ती.

कोकाटया, २लिं० कोकाट करण्याचा स्वभाव जाचातो

कोकांवणें, कोंको शब्द करणें.

कोकिल, कोकिळ, पु० वसंत कालीं मंजुल शब्द करणारा पक्षी आहे.

कोकिला, कोकिळा, स्त्री० कोकिल.

कोकिलाव्रत, न० आषाढ अधिकमास आला असतां स्त्रियानी मासपर्यंत करायाचें व्रत तें.

कोंकी, स्त्री० पागोटें, बिरलें, इ० कांचा वरले भागीं शृंगा सारिखा वांकडा जो अंश करितात ती; २, डोळ्याचे बुबळावर कांही अवयव वाढतअसतो जेणें करून आंध्य येतें ती.

कोंकेरी

कोंकेरी, स्त्री० एक पक्षी आहे तो.

कोंग, न० वस्तुतः दुःख, दारिद्र्य, इ० नसतां कोणेकानें त्याचें घेतलें जें मीस तें; २, कों० कुबड.

कोंगळी, स्त्री० रा० केवल लहान जी कोयती ती

कोंगाळीचिंच, स्त्री० कों० जा चिंचेवर कोंगाळी येतात अशी जी चिंच ती.

कोंगाळें, न० कों० लांबट, वांकडें, अनेक चिंचोक्याचें जें फल तें.

कोंघ, न० कोंग.

कोंच, स्त्री० शस्त्रादिकाचें टोंक लागल्यामुळें शरीरास पडती जी खवली ती; २, न० रा० जांभ्या कातळावर सकंटक एक वनस्पतीचा वेल आहे.

कोचकई, कोचकाई, स्त्री० ओले आंवळे कुटून त्या मध्यें हिंग, जीरें, इ० घालून रुचिकर पदार्थ करितात ती.

कोंचकिंदर, न० लदर फदर, केरकेचरा, इ० पडल्यामुळें अडचणीनें युक्त झालेलें जें स्थल तें.

कोंचणें, कांहीं पदार्थ नरवानें कुरतडणें

कोचिंदा, पु० एक वनस्पति आहे, जाचा कंद पलांडू सारिखा आहे.

कोंजट, कोंझट, ३लिं० रा० ईषत् जो कोंजा तो.

कोजळणें, कों० नारळ इ० फल आंत, काळ्याकेनशीनें युक्त होणें.

कोजळी, स्त्री० दिव्याची वात जळून जो दग्धांश राहतो ती; २, कों० काळजी प्रथमार्थी

कोंजा, कोंझा, ३लिं० रा० विद्रोभिन दिसायाजोगा मनुष्यादिकाचा केवल खोलगट जो डोळा

तो

तो;२,तद्विशिष्ट तो.

कोजागर,पु.आश्विनी पूर्णिमेस जागर प्रधान एक व्रत आहे.

कोजागरीपूर्णिमा,स्त्री.आश्विनी पूर्णिमा.

कोट,पु.भोंवतालीं तटबंदी करून जो किल्ला बांधितात तो;२,शत्रूचा आंत प्रवेश न होतां आपला मार शत्रूवर चालावा जोगा जो सैन्याचा व्यूह करितात तो;३,संख्यावाचक कोटि शब्दाचा अपभ्रंश:

कोटकल्याण,न.कांहीं एका लाभानें पराकाष्ठेची तृप्तता तें.

कोटंबा,पु.वाघ्याचें भिक्षा मागावयाचें पात्र आहे तो;२,लांकडाचें काथवटीसारिखें पात्र आहे.

कोटंबी,स्त्री.लहान जो कोटंबा तो.

कोटि,स्त्री.शतलक्षरूप जी संख्या ती,हा शब्द स्वरूपेंकरून एकवचनांत;२,३लिं.तत्संख्येनें संख्यात तो;३,स्त्री.त्रिकोणाचा भूज आणि कर्ण या यांजून तिसरा जो अंश ती;४,वादप्रतिवाद प्रकरणीं,वादिप्रतिवाद्यादिक स्वपक्ष समर्थनार्थ शंका समाधानादि रूपजा अनेक युक्तिरचना करितात त्या.प्र.;५,विशिष्ट समुदायाचे पोटचे कांहीं अवच्छेदक गुणानें पृथक्पृथक् केलेले जे अनेक भेद ते.प्र.;उ.गुरांमध्यें दोन मोठ्या कोटि.म्हशी आणि गायी;६,लोकोत्तर पराक्रमादि गुणेंकरून उत्कृष्ट जो मनुष्यादि त्यास.स.;७,मनुष्यादिकांचें जें टोक तो.

कोटिशः

कोटिशः,अ.अनेकवार कोटिसंख्यनें मोजले जाई असें;उ.या कामाला कोटिशः रुपये पडतात;स.अनेक कोटि पाहिजेत.

कोटें,न.चिमणी इ.पक्ष्याचें घर तें.

कोटयधीश,३लिं.कोट्यवधि द्रव्य जा जवळ आहे तो.

कोठ,पु.कोट.

कोठचा,३लिं.कुठचा.

कोठडी,स्त्री.कांहीं ठेवावयाकरितां गृहामध्यें जी खोली केली असते ती.

कोठनीस,पु.कोठावळा.

कोठ,—,पर्यंत,—पावेतों,—वर,अ.कुठवर.

कोठला,३लिं.कुठला.

कोठवळा,कोठावळा,पु.प्रथमार्थक कोठीवर जो अधिकारी ठेविला असतो तो.

कोठा,पु.पोटांतील जी अन्नादि राहण्याची जागा तो;२,मोटें जें कोठार तो;३,बंदूक इ.कांची,कि.कारंजाचें पाणी इ.कांची जी कोठी तो.

कोठार,न.बहुत धान्य सांठवावयाकरितां भिंती इ.कांनीं आवृत स्थान करितात तें.

कोठावणें,कों.कोणी कार्यार्थ निघाला असतां त्यास कोठजातां असें विचारणें.

कोठिंबा,पु.कोटंबा.

कोठिंबी,स्त्री.लहान जो कोठिंबा तो.

कोठिंबें,न.कोठिंबी.

कोठी,स्त्री.तांदूळ,दाळ,इ.नित्य खर्चाचे उपयोगी पदार्थ ठेवावयाकरितां जें गृह केलें असतें तो;२,नौ खर्व कारवाना तो;३,कोठा तृतीयार्थी

४, गलबत, गाडा, इ० कांचा ठायीं जिन्नस ठेवाया करितां जें स्थल करितात ती; ५, कारंजाचें, किं० नळाचें पाणी सांठवून ठेवायाची, किं० बंदूक, तोफ, इ० कांनील बार रहायाची जी जागा, ती.

कोठील, वि० कोठचा.

कोठून, कोठोन, अ० कुठून.

कोठें, अ० कोणत्या ठिकाणीं.

कोठ्या, पु० कोठा.

कोड, पु० न० कुष्ठ पथमार्थी; २, स्त्री० कापड, सोनेरी वर्ख, वांगडया, इ० पदार्थांची जी विंगाति ती, क्रय विक्रयादि व्यवहारीं प्र०; ३, न० कौतुक.

कोंड, स्त्री० रा० डोहो; २, पु० गांवाचे मुख्य वसतीचे स्थलाहून इतरत्र कांहीं घरांचीजी वसति असती तो; १, कों० कोणेकापासून अपथ घ्यावयाची असतां भोंवताली रेषा काढून त्यास उभें राहावयाकरितां जें मंडल करितात तो; ४, गोट्यांचे खेळांत गोटी भोंवतालें जें मंडल करितात तो.

कोंडका, कोंडकें, पु० न० सरासरी मणगटा एवढा जाड जो लांकडाचा तुकडा तो तें.

कोडकौतुक, न० पुत्रादिकांचे ठायीं अतिस्नायित प्रीती मुळें त्यांचें लालन, पालन, इ० उपचार माता पित्रादि करितात तें.

कोडगा, वि० जास किती शिकविलें, रागें भरलें, मारलें, तथापि जास त्याची लाज नाहीं आणि आपलाच दुर्गुण सोडीत नाहीं तो; २, पु० लाथा बुक्या, इ० कांचा जो मार तो.

कोडगेरपाऊ, वि० कोडगा पथमार्थी.

कोंडहाव, पु० गोट्यांचे खेळांत भेद आहे.

कोंडणें, उ० कोणेकाचा मार्गाचा निरोध करून त्यास अडकून धरणें; २, ला० वादप्रतिवादादिकांत चढूंकडून दोष देऊन कोणेकास बोलण्याविषयीं निरुपाय करणें.

कोडबादीनें, अ० वस्त्रादिकांचे मतिष्यत्कीची किम्मत न ठरावितां सरसकट कोडीची किम्मत ठरावून दे. घे. इ० कांचें वि०.

कोडबुळें, कोडबोळें, न० अनेक धान्ये एकत्र दळून त्यांत तिखट इ० मसाला घालून बळयाकार तळून जें खावयाकरितां करितात तें.

कोंडमार, पु० चढूंकडून कोंडल्यामुळें जी संकटावस्था प्राप्त होती तो.

कोंडबरा, वि० रा० खोलगट जो पान इ० पदार्थ तो.

कोंडवाड, स्त्री० कों० गुरें, इ० कोंडाया करितां कुंपण इ० घालून केलीजी कोंडी ती.

कोंडा, पु० तांदूळ इ० धान्यावरील जे खरंडा तो; २, कोयंडा; ३, रा० चिवा; ४, ज्वरादि अंगांतून गेल्यानंतर जो शरीरावरील खरंडा चूर्ण प्राय होऊन निघतो त्यास स्त्र०.

कोडी, स्त्री० कोड द्वितीयार्थी.

कोंडी, स्त्री० मनुष्य, उदक, इ० कोंडून धराया साठी भिंती, बांध, इ० कानीं आवृत स्थल करितात ती.

कोडें, न० कूट द्वितीयार्थी; २, कोणेकास प्राप्त होती जी संकटावस्था तें; ३, मानीचें जें दिवेलावणें तें.

कोंडेकडू, न॰ तांदळाचे कोंडयांत मिसळट, भाऊ, इ॰ घालून जें पापडा सारिखें करितात तें.

कोंडया, पु॰ माही, ताडी, इ॰ ठेवायाचा भोंपळा तो.

कोडया, ३लिं॰ जाचे अंगास कोड आहे तो.

कोढ, पु॰ कोड.

कोंढी, स्त्री॰ कोंडी.

कोंढी, कोढया, ३लिं॰ कोड आहे जास तो.

कोंढया, पु॰ कोंडया.

कोण, १लिं॰ नाम जात्यादिकेंकरून अमुक अशा प्रकारें अविवक्षित, किं॰ अज्ञात जो मनुष्यादिक त्याचें निर्देशक हें सर्व नाम; २, पु॰ वस्त्र, भिंत, क्षेत्र, इ॰ पदार्थांचीं दोन सूपें जेथें मिळालीं तो संधि प्रदेश तो.

कोणचा, कोणता, १लिं॰ समुदायांतून कांहीं विध्यार्थ कांहीं पदार्थ पृथक्त्वेंकरून जो विवक्षित तन्निर्देशक हें सर्व नाम: उ॰ तुम्हाला या घोडयांतून कोणता पाहिजे तो घ्या.

कोणसा, १लिं॰ जो नाम जात्यादिकेंकरून अमुकच असा भांत्यादिकामुळें सांगता येत नाहीं तो मनुष्यादिक; उ॰ तुम्हाला कोणसा हाक मारतो आहे.

कोणी, १लिं॰ कोणमथमार्थी. परंतु मध्यकाकू यां विषयीं मध्यादि विषयता तन्निष्ठ किंवा याश्रित असतां याचा म॰, अन्यथा कोण याचा म॰; उ॰ तुमचे घरीं कोणी आला आहे; अन्यथा: उ॰ तुमचेघरीं आला तो कोण; २, कोणही; उ॰ हें काम कोणी करणार नाहीं.

कोणीकडें, अ॰ कोणत्या प्रदेशीं.

कोणें, न॰ रा॰ लेप्री, गांधी, यांचे कानांत एक रोग होऊन असतो तें.

कोणेएक, कोणएक, कोणेक, ३लिं॰ नाम जात्यादिकें करून अमुक अशा प्रकारें विवक्षित नहे असा जो सर्व पदार्थ तन्निर्देशक हें सर्व नाम.

कोंतवाल, पु॰ शहरांत चोरी, दिंदळकी, इ॰ नव्हावें ह्मणून संरक्षणार्थ जो अधिकारी ठेविला असतो तो; २, नित्यशः पाहिजेत जे पदार्थ तितके अशून प्रसंगीं कामास पडायासाठीं नेहमीं जे पदार्थ आणरवी ही संगृहीत असतात ते म॰; ३, स्त्री इ॰ कापडें शोभार्थ प्रसंगीं बसायाचे उपयोगीं पडावे ह्मणून चार जमाकरून जे घोडे चालिवले असतात ते म॰.

कोंतवालचावडी, स्त्री॰ शहरामध्यें कोंतवालीचा कारभार करायाकरितां जी जागा बांधिली असती ती.

कोंतवाली, स्त्री॰ कोंतवालाचा जो अधिकार ती.

कोंना, ३लिं॰ विवक्षित प्रमाणापेक्षां, किं॰ विवक्षित कार्याविषयीं जो अपुरसा तो.

कोंनाई, स्त्री॰ कोंतेपणा.

कोथळा, पु॰ धान्य इ॰ ठेवायाकरितां जें बळद किं॰ मोठी पिशवी करितात तो; २, ला॰ पोटाचे कोथळ्या भोंवतालें जें मांसादिकाचें आवरण असतें तो.

कोथळी, स्त्री॰ धान्यादि ठेवायाकरितां शेण, माती यांचें पाच, किं॰ पिशवी करीत असतात ती.

कोथिंबरी, स्त्री॰ को॰ कोथिंबीर.

कोथिंबरीभात, कोथिंबरीभात, न॰ भातांत भेद आहे.

कोथिंबीर. स्त्री॰ धण्याचें झाड नी:२. धणें.

कोथेंमेथें, न॰ कों॰ धणे, मेथ्या, हिंग, इ॰ जिनसांचा जो समुदाय तें.

कोथेर, कोथेरें, न॰ गवतांत जाति आहे.

कोंद, स्त्री॰ तीळ भाजलेले कुटून त्यांत गूळ इ॰ घालून मस्त्य पदार्थ जो करितात ती.

कोदंड, न॰ सं॰ धनुष्य;२,३लिं॰ हे॰ दांडगा.

कोंदण, न॰ भूषणादिकावर हिरा इ॰ रत्न बसवायाचे उपयोगी जो उंच सोन्याचा पत्रा असतो तें;२, हिरे इ॰ बसवायाकरितां भूषणास राखितात जें घर तें.

कोंदणें, उ॰ कांहीं पात्र छिद्र यांत कांहीं पदार्थ बळानें दाबून दाबून जितका आंत जाईल तितका भरणें;२, आंत कांहीं पदार्थ घट्ट बसल्या मुळें कांहीं एक छिद्र निरुद्ध होणें; उ॰ पडशानें माझें नाक कोंदलें.

कोंदाटणें, कोंदणें.

कोद्रव, उ॰ सं॰ धान्य आहे.

कोद्दू, उ॰ कोद्रवाचा अपभ्रंश.

कोन, उ॰ कोण द्वितीयार्थी;२, स्त्रीचा प्रसव होण्याचा प्रकार तो; उ॰ तिचा कोन भांगला म्हणून लवकर बाळंतीण होती;३, सुयेरांत सूतिका गृहांत बाळंतिणीचें जें सर्व खटलें तो; स्त्रीनें कोन होणें, निघणें, कोनी निघणें, स॰ प्रसूत होणें;४, न॰ एक कंद आहे.

कोनकोंपरा, उ॰ गृहादिसंबंधी कोन, संधि, इ॰ प्रदेश तो; उ॰ वस्तू कोठे कोनकोपऱ्यास पडली असेल ती शोधून आण.

कोनडा

कोनडा, उ॰ कोनाडा.

कोनपडा, कोनपा, उ॰ कोन प्रथमार्थी.

कोनपालट, उ॰ दुरवणेकऱ्यास उतार पडावा म्हणून जें स्थलांतर करितात, कि॰ ज्यालेली मांजर आपले पोरांस जें स्थलांतर करिती तो.

कोनपिका, कोनपीक, ३लिं॰ कों॰ झाडावर पिकला नहे, साली काढल्यानंतर पिकला असें जें फणस, रांफळ, अननास, इ॰ फळें तो.

कोनफळ, न॰ कोन म्हणून कंद आहे तें;२, स्त्री॰ त्याचा वेल.

कोनबांसा. उ॰ कों॰ गृहादिकांचे दोन पारड्यांचे संधीचे कोनावर जो मोठा बांसा घातला असतो तो.

कोना, उ॰ कों॰ गृहाचे आड्यावर, कि॰ कोनबांशावर घालावयाकरितां जी रुंदट कोलें केलीं असतात तीं प्र॰;२, कोनबांसा;३, कुणब्यास संकेतानें स्त्र॰

कोनाडा, कोनडा, उ॰ भिंतीस समयी इ॰ पदार्थ ठेवायाकरितां जी मोकळी जागा राखितात तो.

कोनाडें, न॰ कोनाडा.

कोन्या, उ॰ कोना.

कोप, पु॰ दुसऱ्यानें केला अपराधादि तो आपल्यास न सोसल्यामुळें त्यास शिक्षा करावी. त्याचें वाईट करावें, इ॰ रूप जो अंतःकरणावर वृत्तिविशेष उत्पन्न होतो तो;२, फल, काष्ठ, पाषाण, इ॰ कांस कीटकासुपद्रवानें व्रणच्छेद,

इ॰

इ॰ दोष असतो तो.

कोपट, २लिं॰ कों॰ कोपिष्ट.

कोंपट, न॰ खोपडी.

कोपणें, कोप मथमार्थानें युक्त होणें.

कोंपर, पु॰ भुज दंडाचा जो संधिप्रदेश तो.

कोंपररवळी, कोपररवळी, स्त्री॰ कोंपराचे हाडानें जो कोणेकास प्रहार ती.

कोंपरघुसणी, स्त्री॰ कोंपरानें जो गोदी अगर्दक डेघुसण्याचा व्यापार ती.

कोंपरा, पु॰ कोन मथमार्थी.

कोंपरी, स्त्री॰ तळहातापासून कोंपरपर्यंत चाळीस इ॰ बेटे घालून सुंदइ॰ दोरीची जी गुंडाळी करितात ती; २, गोदयांचे खेळांत एक डाव लागत असतो ती.

कोपायमान, २लिं॰ कोपयुक्त जो मनुष्यादि तो.

कोपिष्ठ, २लिं॰ जास लवकर बहूत कोपयेतो असा जो मनुष्यादि तो.

कोपी, २लिं॰ कोपिष्ठ.

कोंब, पु॰ बीज, कंद, इ॰ कांपासून फुटतो जो अंकुर तो.

कोंबट, कोंमट, २लिं॰ किंचित उष्ण जो स्पर्श. किं॰ तद्विशिष्ट पाणी इ॰ पदार्थ तो.

कोंबडसादीं, अ॰ पांहटेस जेव्हां कोंबडा ओरडतो त्या कालीं.

कोंबडा, कोंमडा, पु॰ एक पक्षी आहे; कोंबडयावरोबर उठणें, इ॰ स्थलीं कोंबडसादीं उठणें, इ॰ अर्थ जाणावा; स्म॰ कोंबडा नेला डोंगरा म्हणून का दिवस उगवत नाहीं.

कोंबरब्राक, न॰ एक धातु आहे.

कोंबरा, पु॰ कोंब.

कोंबरी, स्त्री॰ लहान बारीक जो कोंब ती.

कोंबी, कोंब, स्त्री॰ करम.

कोंभा, पु॰ माडाचा रोपा तो.

कोम, पु॰ कोंब; २, कागदोपत्रीं विधवा स्त्रियें नाम लिहिलें असतां तिला भर्तृ संबंधार्थ एतच्छब्दपूर्वक भर्त्याचें नाव लिहितात; उ॰ जानकी बाई कोम रामाजीपंत.

कोमट, २लिं॰ कोंबट.

कोमटी, पु॰ हिंदूमध्यें जाति आहे.

कोमडा, पु॰ कोंबडा.

कोमणें, कोंबणें, उष्णादि लागल्यासुळें पुष्प, मुख, पल्लव, इ॰ कांनीं म्लान होणें.

कोमल, कोमळ, २लिं॰ कडोराचा प्रतिपक्षी तो.

कोमावणें, कोमेजणें, कोमेणें, २लिं॰ कोमणें.

कोय, स्त्री॰ अंब्यांतील जो बांडा, किं॰ बांडयाचे पोटींजो दोन अवयवरूप अंश असतो ती.

कोयंडा, पु॰ रा॰ अंब्याचा जो बांडा तो; २, कोयंडा मथमद्वितीयार्थी.

कोंयंडा, पु॰ दारादिकडी आंत अडकावी म्हणून दारादिकांत मारायासाठीं मध्यें पोकळ ठेवून जो वांकवून दुहेरी केलेला खिळा असतो तो; २, कडी इ॰ कांत बसवायाकरितां वांकिवलेला जो खिळा असतो त्यास ह्मं॰; ३, मनुष्य, गुरें, इ॰ कांचे

कांचे कांहीं कारणार्थ हात पाय बांधून त्यानें हालचाल नकरावी म्हणून त्या मध्यें जो दांडा घालितात तो.

कोंयडी, स्त्री॰ रा॰ गाय, म्हैस, इ॰ चावून दातें तोडती म्हणून एका दांडयास दोन कान्या लावून जें बंधनसाधन करितात ती; २, शिक्षार्थ हस्तादिक यद्वा कळ लागावी म्हणून जो टिपऱ्या लावितात ती.

कोयना, पु॰ काष्ठादि तोडाण्याचें एक शस्त्र आहे.

कोयती, स्त्री॰ लहान जो कोयना तो.

कोयतें, न॰ कोयना कोयती यांस सामान्यतः म्ह॰

कोयाडें, न॰ अंबा भाजून त्याचे गरांत गूळ इ॰ घालून जें तोंडीलावणें करितात तें; २, पिकून उतरलेले अंब्याचे रसास तिखट, मीठ, इ॰ लावून तोंडीलावणें करितात तें.

कोयाळ, स्त्री॰ कोकिळा; २, कोंकाटी; ३, २ लिं॰ कोय जांत झाली असा जो अंबा तो.

कोयाळणें, कों॰ अंब्यानें कोयीनें युक्त होणें.

कोर, स्त्री॰ कांहीं पदार्थांचे कड इ॰ प्रदेशांचा केवल सूक्ष्म एकसारखा धाराकार अवयव दिसतो ती; उ॰ लांबून पर्वत पाहिला असतां सारखी कोर दिसती; द्वितीयेस चंद्राची कोर इ॰ दिसूं पडती; कोर धरणें, म्ह॰ चिमटा इ॰ कानीं कपाळावरील केश काढून सारखी कोर दिसे असें करकरणें; २, चतुर्थांशादिरूप जो भाकरीचा तुकडा ती; ३, नखाचे कोण प्रदेशीं रोग होत असतो ती; ४, बरकस; ५, रुपयाचा तृतीयांशाचें नाणें आहे.

कोर

कोरकौंडें, न॰ को॰ कोरफड.

कोरटा, पु॰ रा॰ फूलझाड आहे.

कोरटाण, स्त्री॰ रा॰ कोरेंवरूप, मडकें यांस कोरेपणाचा जो वास येतो ती.

कोरड, स्त्री॰ ज्वरादि विकृतीमुळें गळ्यास, किंवा कंठास जो कोरडेपणा येतो ती; कोणेकाची कोरडवाळणें, म्ह॰ भोजनास अतिकाल झाल्यामुळें क्षुधेनें केवल व्याकुलता येणें.

कोरडक, न॰ को॰ गृहादिकांस कोबिष्टक इ॰ रूप जें अळमट लोंबत असतें तें.

कोरडा, २ लिं॰ जामध्यें आर्द्रांश नाहीं तो, एथें आर्द्रांश लाक्षणिकही विवक्षित आहे; उ॰ बारावर्षें पदन होता परंतु कोरडा; कांहीं लाभावांचून कोरडी खटपट कोण करितो; २, चोगादिकांस सार द्रव्य काढितां असा जो डाग सारखा कालत्रयाचा पदार्थ करितात तो; ३, कोरडेशास भाजी कढी इ॰ पदार्थ तद्रहित जें भाकरी, भात, इ॰ भक्ष्य अन्न तो.

कोरडेशास, **कोरडेशाळा**, **कोरडयास**, **कोरडयाळा**, अ॰ भाकर इ॰ कोरडी, तुसनी, रवाबत नाहीं म्हणून तदुपचारार्थ; वरण, भाजी, इ॰ पदार्थांवर अन्वय होतो.

कोरणी, स्त्री॰ गणपती इ॰ कोरण्याचे उपयोगीं जें शस्त्र करितात ती; २, कोरण्याचा जो व्यापार ती; ३, ला॰ कांहीं पदार्थांतून कोणेकाचें द्रव्यादि युक्तिप्रयुक्तीनें थोडें थोडें हरण करण्याचा व्यापार ती.

कोरणें, काष्ठ, फल, धातु, पिंड, इ॰ कांतील शस्त्रादिकानें

गचकळणें, नद्यादिकांचे ठायीं मनुष्यादिकाचे नाकातोंडांत पाणी जाउन त्याणीं घाबरें होउन रवालीं जावरये अशा अवस्थेनें युक्त होणें; २, ला· कांहीं एका व्यापारामध्यें निभाव लागेनासा झाल्यामुळें हिंसके खात राहाणें·

गचकळी, स्त्री· गचकळण्याचे व्यापारानें घडली जी निमज्जनोन्मज्जनरूप आवृत्ति ती; २, ला· कांहीं

कांहीं एक आरब्ध कार्यांत भीत्यादिकारणामुळें कुंठितगति होण्याचा जो व्यापार.

गच्चका, पु० कांहीं एकास्थळीं अटकल्यामुळें, किं० चालत्या समयीं उंच सरळ जमीन लागल्यामुळें अकस्मात् जो आंचका बसतो; २, ला० तादृश गच्चका बसायाजोगें जें खळगा, इ० स्थळ तो; उ० तो तेथे गच्चका आहे बरें, तेथून गाडा संभाळून ने; ३, कांहीं एक व्यवहारामध्यें तोटा, इ० रूप धका बसतो तो; ४, ग्रंथादिकांमध्यें अटकून पडायाजोगा जो अंश असतो तो.

गच्चकी, स्त्री० गच्चका लाक्षणिक प्रथमार्थी.

गच्चंगळी, स्त्री० दे० गच्चकळी.

गच्चंदी, स्त्री० वा० कमरेचा सांधा दुखायाजोगा जो धका बसतो ती.

गच्चाडु, न० दाट वृक्षतृणादिकांचें रान.

गच्चांडी, स्त्री० प्रा० मानेस अंगुष्ठ तर्जनी यांचे मध्य भागानें जो धका देतात ती; २, तत्कालीं मानेस हालवणतात; उ० त्याणें मासी गच्चांडी धरिली तेव्हां मीं काय करूं.

गच्चाबोच्चा, पु० अतिशयित पुष्ट जो मनुष्यादि त्याची प्रा० निंदाकर्तव्य असतां प्र०; उ० मिष्टान्न खायाला मिळतें मग त्याचा गच्चाबोच्चा एक होईल तर काय सालें; एथे गच्चा शब्देंकरून गर्दन व बोच्चा शब्देंकरून गुदाचा आसमंताडाग असा अर्थ; याचा प्र० यास्थळींच होतो.

गच्चावणें, दे० गच्चकळणें मुख्यार्थानें मुख्यहोणें.

गच्च, अ० आंत पोकळी नराही असें, आंवळ, बांध, धर, इ० कांचें वि०, उ० हें ओसें गच्च बांध सणने लाहान दिसेल; २, तशा व्यापारानें सिद्ध साला जो पदार्थ त्याचें वि०, उ० ही गांड गच्च आहे; ३, निबिड दिसायाजोगें प्रा० दाटी, झाडी, इ० कांचें वि०; उ० यागांवाला गच्च झाडी आहे; उ० या मळ्याचें कुपण गच्च पडलें यामुळें गुरांचा उपाय चालत नाहीं.

गच्ची, स्त्री० गृहादिकांचा वरचीं चुन्यानें पिटून काढिलेली भूमि; उ० घरांत गच्ची केली असतां चिखल पडत नाहीं.

गच्छंती, स्त्री० पकून जाण्याचा व्यापार; उ० तो आला इतकें ऐकतांच त्याणें गच्छंती केली.

गच्छंतीचें, न० गच्छंती.

गंज, पु० वस्त्रादि मोजण्याचे उपयोगी चौबीस तसूंचे प्रमाणाचें एक मान आहे; २, ३ लिं० त्यांतल्यानें परिमित जें वस्त्रादि तें; ३, बिहीर, इ० कांचे बेंदिल्लीस गजांचें प्रमाण भरलें असतां जें चिन्ह दाखवितात तच्चिन्हावधि जें त्या बेंदिल्लीचें अंग तो; उ० आमचे बिहिरीस पांच गज आहेत; उ० रात्रीचा पावसानें बिहिरीचा एक गज बुडाला; ४, बिहीर, तळें, यांचाजो कांठ तो; ५, बंदूक, इ० कांत बार चिणाचाचे उपयोगी लोखंडाची छडी; ६, खिडकी, इ० कांस कमारी दोन चार बेंतांचे अंतरानें प्रा० उभे काष्ठादिकांचे त्रिधारी, किं० काठीचे आकाराचे मारितात, ते प्रत्येकीं.

गंज, पु० धान्यादिकांचा राशि; २, बाहेर एकच पदार्थ दिसण्यांत येतो आणि आंत लेखनादि व्यवहारोपयोगी

वहारोपयोगी अनेकपदार्थ असतात, तोपदार्थ.

गज, पु॰ सं॰ हत्ती.

गंजकर्ण, न॰ मनुष्याचे त्वचेस एक रोग होतअसतो तें; २, पु॰ सं॰ गणपतीस म्हणतात.

गजकर्णी, स्त्री॰ गजकर्ण निरसनोपयोगी एक औषधी झाड आहे.

गजगजीत, वि॰ मुलें, माणसें, इ॰ कांचीं गलबल जा गृहादिस्थळीं असत्ये तें गृहादि.

गजगति, स्त्री॰ सं॰ गजाचीजी गति ती किं॰ त्याचे गतिसारिखी जी गति ती; २, वि॰ तद्विशिष्ट.

गजगामिनी, स्त्री॰ सं॰ गजगतीनें चालणारी स्त्री.

गजगौरीव्रत, न॰ सं॰ भाद्रपदमासीं हस्तार्कीं स्त्रियांचें एक व्रत आहे.

गजघांट, स्त्री॰ हत्तीची घांट; २, ला॰ मोठ्यानें भाषण करणारी जी स्त्री तीस आरोपानें म्हणतात; ३, वि॰ जापाशी कांहीं गुप्त गोष्ट सांगीतली असतां ती गोष्ट लोकांस सांगण्याचा स्वभाव जाचा तो मनुष्य.

गजणें, रा॰ शरीरास जिरलें जाई असें घृतादिक चोळणें.

गजनी, स्त्री॰ गर्भसुती एकाबाजूनें रंगीत असें एक उंची वस्त्र आहे; २, वि॰ तत्संबंधी चोळी, परकर, इ॰.

गजपिंपळी, स्त्री॰ एक औषधी झाड आहे.

गजपुटी, गजपुठी, वि॰ गजपुटानें सिद्ध केलेलें औषधादि.

गजपूट, गजपूठ, न॰ अवरस चौरस गजभर खांच खणून त्यांत गोवऱ्या, इ॰ जळवण खालीं वर घालून त्यामध्यें रसादिक ठेवून त्यास जो अग्निसंस्कार करितात तें.

गजब, غضب पु॰ अवसान खचावयाजोगतें जें अपरिहार्य महत्संकट गुजरतें तो; २, दुसऱ्यानें दबलें जावयाजोगा जो गालिप्रदान, मारणें, इ॰ रूप घेगा.

गजबज, स्त्री॰ अनेक मनुष्यें एकत्र असल्यामुळें त्यांचे शब्दांचा गलबा असतो ती.

गजबजणें, क्रि॰ एकस्थळ गजबजीनें युक्त असणें; उ॰ त्याला मामलत होती तों त्याचें घर गजबजत होतें; २, दरवडा, इत्यादि कारणामुळें धैर्यसुटून घाबरें होणें.

गजबजीत, वि॰ गजगजीत.

गजबाव, स्त्री॰ चुना, दगड, इ॰ कांनीं बांधिलेली विहीर.

गजमोजणी, स्त्री॰ क्षेत्रमान समजण्याकरितां गजरूपजें प्रमाण त्याणें मोजण्याचा जो व्यापार ती.

गजर, पु॰ कीर्तनादिकांचा ठायीं अनेक मिळून ईश्वरनामोच्चारादि जो मोठा शब्द करितात तो, किं॰ अनेक वाद्यांचा जो मोठा शब्द तो; २, प्रहरभरला म्हणजे तासावर सगळ्या प्रहराचे जे टोले मारितात तो; उ॰ सकाळचे प्रहराचा गजर वाजला; ३, ला॰ कांहीं एक गोष्ट प्रा॰ शब्द हा

रा सर्वत्र प्रसिद्ध करण्याचा व्यापार; उ० मी सांगतों या गोष्टीचा गांवभर गजर करून का·

गजरगोटा, पु०रा० सागरगोटीचीबी·

गजरगोटी, स्त्री०रा० सागरगोटी·

गजरा, पु० अनेक पुष्पें एकत्र गुंफून हातांत घालावयासाठीं करितात तो; २, स्त्रियांचें एक कर भूषण आहे; ३, रा० पोरांस खेळावयाचे उपयोगीजी लाखेची गोटी; ४· गजरगोटा·

गजराज, पु० सं० ऐरावतसदृश मोठ्या हत्तीस म्हणतात·

गजरी, स्त्री०रा० सागरगोटी·

गजल, पु० غزل गाण्यांतील फारशी भाषेचा एक छंद आहे, जांत प्रा० शृंगाररस वर्णिला असतो तो·

गजविहीर, स्त्री० गजबाव·

गजश्रद्धा, स्त्री० कांहीं एक कार्याचे आरंभाचा डौल मोठा दिसून परिणाम अगदीच लाहान होतो अशारीतीनें जो तें कार्य होण्याचा प्रकार तो; कि० तें कार्य तो; उ० हा या प्रयोजनीं हजार रुपये खर्च करील असा डौल दिसतो खरा परंतु शेवटीं गजश्रद्धा ठरली नाहीं पुरे·

गजा, पु० अतिलाहान पंचास म्हणतात·

गजांतलक्ष्मी, स्त्री० जीमध्यें हत्ती आहेत अशीजी संपत्ति तो; २, ला० पंचामात्र नेसायास मिळायाजोगी जी संपत्ति तीस म्हणतात; ३, रा० जास गर्जकर्ण होतें त्यास तुला गजांतलक्ष्मी प्राप्त झाली असें म्हणतात·

गजानन, पु० सं० हत्तीचे मुखासारिखें आहे मुख जाचें असा एक देव आहे·

गंजिफा, पु०रा० गंजिफांचा जोड·

गंजी, स्त्री० तृणादिकांचा ढीग·

गजी, स्त्री० तासून चौरस केलेली लांकडाची कडी·

गंजीखाना, पु०फा० सर्कारी कडबा, गवत, इ० कांचा अनेक गंजी जास्थळीं ठेविल्या असतात तें स्थान; २, ला० जांचें नित्यशः प्रयोजन लागत नाहीं असेजे उपयुक्तानुपयुक्त उभयसाधारण अनेकजातीय पदार्थ ते जास्थळीं ठेविले असतात तें स्थळ·

गंजीफ, स्त्री० खेळावयाचे उपयोगी चतुष्कोण किं० वर्तुळ जे सचित्र अनेक रंगांचे कागदाचे तुकडे करितात ते प्रत्येकीं·

गजींव, ३ लिं० चुना, दगड, इ० कांनीं बांधलेली विहीर इ०

गजें, न० गजा·

गट, गट्ट, पु० एकचित्त मनुष्यांचा कांहींएक कार्यार्थ जमलेला समुदाय; २, अ० कांहीं एक पदार्थ त्वरेनें गिळल्येसमयीचें शब्दानुकरण; गटकरणें म्हणजे दुसऱ्याचें द्रव्य खाणें असा अर्थ·

गटकन, गटकर, गटदिशी, अ० गट शब्द होई असें, गिळणें, इ० कांचें वि०·

गटकळी, स्त्री० गचकळी·

गटंगळी, स्त्री० गचकळी·

गटंपटं, गट्टंपट्टं, न० दुसऱ्याजबळ आपला डौल पडावा कि० दुसरा दबला जावा इत्यादि

र्थी जें नानाप्रकारचें भाषण त्यास निंदेनें स्रणतात.

गटागट, अ० कांहीं एक पदार्थ खरेनें गिळत्ये समयींचे शब्दाचें अनु०; उ० गटागट गोळे मार, स्रणजे लौकर जेवण होईल.

गट्टा, पु० दे० गट प्रथमार्थी.

गट्टी, स्त्री० अतिशयित मित्रपणा; २, गट प्रथमार्थी.

गट्टू, २ लिं० ठेंगणा असून जो शरीरानें पुष्ट तो; प्रा० मनुष्यवृत्ति.

गठडी, स्त्री० वस्त्रांत द्रव्यादि घालून जी पुरचुंडी बांधितात ती; २, गुप्त द्रव्य; उ० त्याजवळ बापाचे वेळचीं गठडी होती स्रणून उडया मारीत होता; ३, ला० पिशाचपडल्यानें निश्चेष्ट होउन पडलेलें शरीर.

गठण, स्त्री० मृदंग वाजविण्यांत एक प्रकार आहे.

गठली, स्त्री० गठडी प्रथम द्वितीयार्थी.

गठ्ठ, २ लिं० दे० गट्ट.

गठ्ठा, पु० कापूस, कापड, इ० कांचें बेल इ० कांवर वाहून न्यावयाजोगें घट्ट बांधिलेलें आझें.

गठ्ठी, स्त्री० दे० गट्टी प्रथमार्थी.

गठ्ठीछोड, २ लिं० अत्यंत स्रपणास स्रणतात.

गठ्ठू, २ लिं० दे० गट्टू.

गंड, पु० सं० विष्कंभादि सत्तावीस योगांतील दहावा योग; २, गाल, ३, हत्तीचें कुंभस्थळ.

गड, पु० पाहाडी किल्ला.

गडकरी, पु० गडावर चाकरी करणारा.

गंडकी, स्त्री० सं० एक महानदी आहे; २, ला० २ लिंग स्रंबंधी शाळग्राम, शिळा, इ०.

गडरवा, स्त्री० वा० झाडावरील पर्णादि पाडायाचे उप

योगी आंकडी; २, ला० उंचस्त्रीस निंदेनें स्रणतात.

गडरवी, स्त्री० वा० गडरवा प्रथमार्थी; २, ला० गिऱ्हाइक इ० चातुर्यानें आपल्येकडे ओढितो असा जोवाणी इ० त्यास स्रणतात.

गडगंज, २ लिं० धनें धान्यें करून समृद्धिमत् जें गृहादि, किं० तत्स्वामी तो; २, अ० विवक्षित कार्यास पर्याप्त होईल असें, प्रा० होधा० वि०.

गडगड, अ० मेघ, गाडा, रथ, इ० कांचे गतिसमयींचे शब्दाचें अनु०.

गडगडणें, मेघादिकांनीं गडगड अशा शब्दानें युक्त होणें; २, मेघादिकांचा गडगड असा शब्द होणें; उ० आज दोनदिवस गडगडतें आहे.

गडगडाट, पु० गडगड शब्दाचा समुदाय; उ० मेघांचे गडगडाटापुढें ऐकायास येतनाहीं.

गडगनेर, न० केळवण.

गडगा, गडघा, पु० एकावर एक असे अनेक दगड रचून केलेला ढीग.

गडत, अ० अत्यंत अदृश्य होईल असें, होणें, इ० कांचें वि०; उ० बारींत फोज गडत झाली.

गडद, गडत, न० दे० अंधकाराचा अतिशय; २, २ लिं० गर्द.

गडदणें, कों० कांहींएक पदार्थ बाहेर नदिसायाजोगा भूम्यादिकांत पुरून टाकणें; उ० कोणी मालेल स्रणून भांडीं होतींतीं गडदून टाकिलीं.

गडदू, २ लिं० दे० शरीरानें जो धष्ट पुष्ट तो; कोण एकाचे उरावर गडदू रचून देवणें, स्रणजे एकादें दुर्निर्वाह संकट उपस्थित करून देवणें.

गडनिशी, गडनिविशी, स्त्री० गडसंबंधी चौकी पाहारा इ० कामाचा बंदोबस्ताविषयींचा अधिकार.

गडनीस, गडनिवीस, पु० गडनिशीचा अधिकार जो करितो तो.

गडप, अ० ठावठिकाण नलागे असें, कर, हो, इ० कांचें वि०; उ० त्या कारकुनानें त्याचे दोन हजार रुपये गडप केले.

गडबड, स्त्री० अंतःकरण व्यग्र होई असा जो भाषण, वार्ते, इ० कांचा घोळ तो; २, त्याणें झालेली अंतःकरणाची व्यग्रता; ३, त्या व्यग्रतेनें कांहीं एक व्यापाराची झालेली बिघडाबिघड; ४, इतर कार्य नसतांचा योग्य जो कांहीं एक व्यापार तो; उ० लिहिण्याचे गडबडींत होतों म्हणून काय बोलिलास तें ऐकिलें नाहीं; ५, सरळीतपणानें कोणएक व्यवहाराचा चालिलेला क्रम, किं० नदुपयोगी पदार्थांची जेथीलतेथे करून ठेविलेली रचना वा तो व्यवहार बिघडायाजोगा जो चोर, गलीम, इ० कांचा दंगा, इ० तो; ६, अव्यवस्था; उ० याचे कागदपत्राची सारी गडबडच दिसत्ये; ७, दुसऱ्यानें दबलेंजावें; किं० घाबरें व्हावें, इत्यादयर्थ जो कांहीं मनस्वी भाषणादि व्यापार तो; उ० अरे जा शिपायड्या, एवढी तुझी गडबड कशाला पाहिजे, अशी गडबडीला कोणीं भीतनाहीं.

गडबडगुंडा, पु० कांहींएक कार्य यथास्थित होउ किं० नहोउ हें नपाहातां सरासरी गडबड करून नें उर्कून घेण्याचा जो व्यापार प्रकार तो; उ० तो भट एका घरकेंन लग्नाचा गडबड गुंडा करून रून आटपून गेला.

गडबडणें, पात्रांघनेक पदार्थांनीं आधारापासून रूदून उलटेंपालटें होन गडबड असा शब्द करीत जाणें; उ० हातांतून दोन पडली तीं गडबडत त्या भिंतीशींगेली; २, व्यग्रचित्त होणें; उ० पेंडार्यांची आवई ऐकतांच गांव गडबडला; ३, गैर विल्हेस लागणें; उ० या रुमालांतली चिंदी गडबडली; ४, योजित व्यवस्था, किं० कांहींएक क्रमप्राप्त कार्य यथास्थित न होतां बिघडून भलतेंच होणें; उ० पोथी गडबडली आहे तीं लाबितों.

गडबडवणें, कांहींएक कार्य यथाकथंचित् त्वरेनें संपादणें.

गडबड्या, वि० चंचलस्वभाव होत्साता भाषणादिद्वारा गडबड करणारा जो मनुष्य तो.

गडबडां, अ० गडबड असा शब्द व्हायाजोगें अति त्वरेनें, लोळणें, इ० कांचें वि०; उ० पोटांत कळ उठतांच गडबडां लोळूं लागला तें काय सांगूं.

गडबडाट, पु० अतिशयित जी गडबड तो.

गंडमाळा, स्त्री० मानेस गरसायेतात असा एक रोग आहे, प्रा० प्र० अनेकव०.

गंडरी, स्त्री० सोलिलेल्या उंसाचा गोलदार जो लाहान तुकडा तो.

गडवा, पु० ताम्रादि धातूंचें पाणी प्यायाचे उपयोगी आकार विशेषाचें एक पात्र आहे.

गंडा, पु० चार पेशांचा किं० कोडग्यांचा समुदाय. २, गायनादि कला शिकविणारे लोक शिकणाराचे हातास आरंभीं जो बांधितात, किं० काळेय रंगाचा बकून घोड्याचे गळ्यांत बांधितात तो किं०

पिशाचाचा उपद्रव निरसनार्थ मंत्रून हातांत दोरा बांधितात तो ·

गंडिया, १ लिं० गावमध्यें पुरुषत्व नाहीं तो; २, ला० अपराक्रमी मनुष्यास निंदेनें म्हणतात; ३, स्व० गांवचा गंडिया तो सारक्या बाडचा देशपांडिया ·

गडी, स्त्री० गट्टी प्रथमार्थी; २, १ लिं० मित्रविशेषणार्थी; ३, रा० लाहान जो भुईकोट तो; ४, जुडी; ५, सोंगट्या इ० खेळावयाचे उद्देशानें मीलित जे अनेक ते प्रत्येकीं ·

गडू, पु० गडव्यासारिखें लाहान पात्र आहे ·

गडेकरी, पु० हत्तीचे पुढें भाला हातीं घेउन चालत असतो तो ·

गंडेरी, गंडोरी, स्त्री० गंडरी ·

गड्डा, पु० लोकप्रसिद्ध जा कंदाचें गांव नाहीं असा जो झाडें, लता, यांचा प्रा० वर्तुळ कंद तो : २, तदाकार जो कमळ, कोबी, इ० कांचा जमून होतो त्यासही म्हणतात; ३, ला० गळू, नारू, मूलव्याधि, यांचा मूलभूत जो जमलेला अंश तो; ४, रा० शर्करादिकांचा आपोआप जमलेला गोळा ·

गड्डालिका, स्त्री० गद्यरूप कविता; २, ला० भपंचादि संबंधी जी लांबचलांब कंटाळावया जोगी गोष्ट ·

गंढारणें, दे० कांहीं एक गोष्टी विषयीं गांडूपणा घेतल्यामुळें जी अवस्था होत्ये तीणें युक्त होणें ·

गंढाळणें, दुखणें, इ० कांमुळें शरीर कृश होणें, २, वादादिकांत थकणें ·

गढी, स्त्री० लाहान भुईकोट; २, दाहा दहा कागदांचा

दांचा समुदाय ·

गढुळणें, उ० खडुळणें; २, ला० राज्य देशादि दंगा इ० गडबडीनें युक्त करणें व होणें ·

गढूळ, १ लि० खडूळ; २, ला० कामक्रोधादि कांहीं एकविकारानें विकृत जें मन तें; ३, दंगा इ० गडबडीनें युक्त जें राज्य देशादि तें ·

गण, पु० सं० समुदाय, उ० पिशाचगणामध्यें वेताळ श्रेष्ठ; २, जन्मनक्षत्रानुरोधेंकरून देव, मनुष्य, राक्षस, असे तीन गण ज्योतिःशास्त्रप्रसिद्ध आहेत ते प्रत्येकी; ३, कोणएकाचे अंतःकरणांतील कर्तव्याकर्तव्य विषयक अभिप्राय किंवा त्याचें जें अनुमान तो; उ० ते आमचे मुलास मुलगी देतात कीं नाहीं तो गण काढून या; ४, गणपती इ० देवांची स्तुति जांत वर्णिली असत्ये अशी एक प्राकृत कविता आहे जी प्रा० नमासगीर तमाशाचे आरंभीं म्हणतअसतात तो; ५, शिव, देवी, इ० कांचे सेवकत्वें करून पुराणप्रसिद्ध जे प्रमथादिक ते प्रत्येकीं; ६, मुख्य पिशाचांचे सेवक जे समीपवृत्ति इतर पिशाच ते प्रत्येकीं; ७ देवाचे उत्साहांत कोणी चोपदार व्हावें कोणी चंवरीबादार व्हावें कोणी पालखी उचलावी अशा अशा अधिकारीं योजिलेले जे मनुष्य ते प्रत्येकीं; ८, कवितोपयोगी गुरु लघूंचा क्रमभेदेंकरून मगण, रगण, इ० आठ सांगीतले आहेत ते प्रत्येकीं; गण नमणें म्हणजे कांहीं एक कार्याचा आरंभ करणें असा अर्थ ·

गणक, १ लिं० सं० ज्योतिषी ·

गणंग, पु० जोंधळा इ० धान्याचा लाह्या केल्या असतां

सतां त्यांतलाही नहोतां राहिलेला दाणा ·

गणगोत, न० भाऊबंद सोयरे धायरे इ० समुदायतें

गणणें, एक, दोन, इत्यादि मोजणें; उ० तिथी गणा मास दुणा त्यांत एक उणा तें नक्षत्र आणा; २, हें भारी कि० पूज्य असें मानणें; प्रा० निषेध असतां प्र०; उ० तो एव्हांपासून बापाचें बोलणें गणीत नाहीं ·

गणनगर, स्त्री० नगरीचे साडांत एक भेद आहे; २, न० तीचें पुष्प ·

गणती, स्त्री० संख्या; २, हें भारी अशी बुद्धी; उ० जो देवास भीत नाहीं त्याला मनुष्याची काय गणती आहे ·

गणन, न० सं० एक, दोन, इ० संख्या करण्याचा जो व्यापार तें वत्या व्यापारानें साली जी इयत्ता तें ·

गणना, स्त्री० सं० गणती ·

गणनीय, सं० ३ लिं० विवक्षितरूपेंकरून संख्येमध्यें गणायास योग्य ·

गणपतिपूजन, न० सं० कांहीं एक कार्याचे आरंभीं गणपतीची पूजा करितात तें; २, ला० कांहीं एक कार्याचा जो आरंभ तें ·

गणपति, पु० सं० गजानन; २, ला० ज्याचे मोठें पोट त्या मनुष्यास थट्टेनें कोणी लगतात · गणपतीचेंकरणें, इ० स्त्री स्त्रीनें सगर्भ होणें ·

गणमणणें, कोणएकापासून भय पावणें; निषेध विवक्षित असतां प्र०; उ० तो पुण्याचे मोठमोठ्ये पंडितांस उत्तर करायाला गणमणायाचा नाहीं तो कांतुलाभितो ·

गणमैत्री, स्त्री० सं० देवगणादि तीनगण ज्योतिःशास्त्रांत सांगीतले आहेत त्यांची जी मैत्री ती, जी उभयतांचा गण एक आला असतां असते; उ० या मुलाची आणि त्यामुलीची गणमैत्री येते ऐसा पाहा ·

गणसुरी, गणसूर, स्त्री० एक औषधी झाड आहे ·

गणा, पु० दे० कोष्टीलोक कांडी करायाकरितां जो नांट इ० कांचा तुकडा घेतात तो; २, तंबाखू नेल लावून जी भाकर करितात तो ·

गणान्न, न० सं० अनेकस्वामिक अन्न ·

गणिका, स्त्री० सं० कळावंतीण ·

गणित, न० सं० अंकांची जी घडामोड तें वत्या घडामोडीनें सिद्ध जें फल तें ·

गणेश, पु० सं० गजानन ·

गणेशचतुर्थी, स्त्री० सं० भाद्रपदशुक्लपक्षींची जी चतुर्थी तिथि ती ·

गणेशटोपी, स्त्री० कोणएकास मला अमुकानें मारिलें अमुक मारितो हें नसमजावें ह्मणून त्याचे डोकीवर जें आच्छादन वस्त्र घालितात तें ·

गणेशपट्टी, स्त्री० गृहादि संबंधी पुढील दर्वाजाचे चौकटीवर गणपती काढायाकरितां आडवी जी फळी मारीत असतात ती ·

गणेशपूजा, स्त्री० सं० गणपतीची पूजा; २, ला० कथा इ० समारंभाचे ठायीं रवोवरें इ० कांची जी विरापत बांधीत असतात ती ·

गत, २ लिं० सं० अतिक्रांत, काल कालावयव इत्यादि कि० तत्कालीं होऊन गेली जी गोष्ट, कथा, इ० तद्रूप; उ० गतवर्ष, गतघटी, इ०; उ० गतगोष्ट,

गतकथा, इ०; २, नाहींसा झालेला, ग्रामांतरास गेलेला, मरणपावलेला; उ० गतवस्तूविषयीं प्रश्न केला, ग्रामांतरगत मनुष्य आजच आला; उ० गतभर्तृका, गतरस, गतश्री, इ०; ३, स्त्री० कांहींएक पदार्थाची पूर्वावस्था जाउन देशकालाद्यनेक निमित्तांनीं त्या पदार्थास जें अवस्थांतर प्राप्त होतें तीं, वाईट हेंमनांत असतांच प्र०; उ० चारदिवस तापयेतांच पोराची कायगत झाली पहा; ४, पिशाच योनीपासून जी पिशाचाची मुक्तता; ५, मृदंगादि वाजविण्याचा, किं० नृत्याचा जातत्तालानुसार रीती त्या प्रत्येकीं; उ० ख्यालाची गत वाजव; तूं तिताला ची गत नाच; ६, सदृश या अर्थी चांता पुढें याचा प्र०; उ० वेड्याचे गत काय करितोस; ७, कांहींएक गोष्टीविषयीं चिंतनीय जो उपाय तो; उ० एवढीं औषधें घेतलीं तरी तिडीक राहीना आतां कोंणती गत करूं.

गतक, न० रा० लांबचलांब कल्पिलेली कंटाळवाणी गोष्ट; उ० त्याला कोढे जातोस इतकें पुसतांच त्याणें जें मजपाशीं गतक लाविलें नें दोन घटका पर्यंत; २, थोड्या शब्दांत बांधिलेली गोष्ट; उ० तुसे बोलण्यावर मला एक गतक रचलें, कायतर, आकाशची कुऱ्हाड कोल्ह्याचे दांतावर; ३, दे० किंचित् दुःख झालें असतां तें विशेषकरून दारवविण्याचा जो प्रकार तें; ४, दुसऱ्यानें घाबरें व्हावें इत्यार्थी जो अत्युक्ति, इ० भाषण व्यापार करितात तें, ५, कों० दुसऱ्यास चमत्कार वाटून हसें यावयाजोगी जी भाषणाची नक्कल करितात तें; उ० त्याणें एक गतक घातलें तर एवढे जणांचा हसताना मुर्कुंडया पाडील.

गतकथा, स्त्री० सं० पूर्वी होउन गेलेली गोष्ट.

गतकाळा, गतकाळया, ३ लिं० दे० अवळ द्रव्य असून बाहेर दरिद्रीपणा दारवविण्याचा स्वभाव जाचा तो, किं० समयीं बेडघेतो तो.

गतकूळ, न० दंगा, देण्याघेण्याचा पेंच इ० कारणामुळें परागंदा झालेलें कूळ.

गतक्या, ३ लिं० दे० गतक तृतीयार्थ, चतुर्थार्थ, आणि पंचमार्थ करण्याचा स्वभाव जाचा तो; २, गतकाळा; ३, कों० नकल्या जो मनुष्य तो.

गतगोष्ट, स्त्री० गतकथा.

गतणें, कांहींएक गोष्ट, इ० होउन जाणें; २, मरणें.

गतभरणा, पु० मृदंगादि वाजविण्याचे रीतीचा जो समुदाय तो; उ० या मृदंग्यापाशीं गतभरणा फार असून वाजवायाला आळस करितो.

गतभर्तृका, स्त्री० जिचा दादला मेला अशी जी स्त्री ती.

गतरस, ३ लिं० जाचा रस गेला असें जें फलादिक तो.

गतवयस्क, ३ लिं० वृद्ध मनुष्य.

गतवर्ष, न० प्रकृत वर्षाचे मागलें सन्निहित वर्ष.

गतवीर्य, ३ लिं० गेलें आहे वीर्य जाचें तो.

गतश्री, २ लिं० लक्ष्मी गेल्यामुळें जो दरिद्री झाला तो.

गतसाल, न० गतवर्ष.

गतानुगतिक, २ लिं० एकानें आचरिलें तें पाहून त्याचा सदसद्विचार न करितां त्यामार्गानें चालतो तो व त्याचें आचरण.

गतावणें, गतणें.

गति, स्त्री० सं० विवक्षित देशावधिपर्यंत पादविक्षेपादिरूप स्वस्वव्यापारानें पोंचण्याचा जो व्यापार तो; २, गतरूप्यर्थीं सदृश या अर्थावांचून; ३, सूर्यादिग्रह अहोरात्रांत जितक्या कला राशिचक्राचा उल्लंघितात तो; ४, ला० कांहींएक कार्याचा जो निर्वाह तो; ५, जावांचून जें कार्य अडतें, किं० मनुष्यादि अडलाजातो तोतोपदार्थ, मनुष्य, व्यापार, इ० तो त्यास; तो गतीवर पडलाआहे, गतीवर घातला आहे, इ० स्थळीं फारदिवस दुखण्यानें त्यास होवुन पडला आहे असा अर्थ.

गतिहीन, २ लिं० निरुपायतेमुळें कुंठितगति.

गंतुकाम, २ लिं० गमन करायाची इच्छा जास झाली तो; २, ला० आसन्नमरण.

गत्यंतर, न० उपायांतर, उ० मला नाशकास गेल्यावांचून गत्यंतर नाहीं; गत्यंतर असतां शत्रूस शरण जाऊं नये.

गदगद, अ० हास्यशब्दाचें, किं० भाजी इ० कांचे शिजत्येसमयींचे शब्दाचें अनुकरण.

गदगदणें, उष्ण्यानें व्यथा होणें; २, भाजी इ० पदार्थानें शिजत्येसमयीं गदगदशब्द मुक्त होणें.

गदम

गदम, २ लिं० रा० पर्जन्य गेल्यानंतर आस्थळीं फारदिवस ओल राहातें तें शेत, इ०.

गदमणें, गदगदणें प्रथमार्थी.

गदमदणें, गदमणें.

गदवाली, २ लिं० दे० गदवाल लवून एक पेंठ आहे. तत्संबंधी जें वस्त्रादि.

गदळ, न० रा० पु० धान्य, तूप, तेल, इ० कांतील केर, कचरा, इ० रूप मलांश; २, २ लिं० तद्विशिष्ट जें धान्यादि तो; ३, कांहींएक पदार्थाचा राशींतून चांगला चांगला अंश निवडून घेउन अवशिष्ट राहिला जो बगळ सगळ तदंश तें; ४, रा० अनेकजातींचे पदार्थ एकत्र झाल्यामुळें दुर्दशाविशिष्ट झाला तो; ५, गृहादिकांतील केर कचरा; ६, ला० २ लिं० मलिन मनुष्यादि पदार्थास लावतात.

गदळणें, दे० हालवणें, इ० व्यापारानें जलादि पदार्थ मलिन करणें; २, दे० अस्ताव्यस्त करून दुर्दशाविशिष्ट करणें; उ० पोरानें पोथी गदळली आहे तीजागितें.

गदा, स्त्री० सं० एक आयुध आहे.

गदायुद्ध, न० सं० गदेनें जें परस्परांचें युद्ध तें.

गदेपदे, पु० दे० आजदेईन उद्यांदेईन इ० जा टकविण्याचा गोष्टीने; हा शब्द नित्यें अनेकव०.

गदेला, पु० पोटीं रूधालून मोठी गादी करितात, तो.

गद्दा, २ लिं० गादव.

गद्देमल्हार, पु० गादयाचे आरउण्यासारिखें

गाइट

वाइट कर्कश जें गाणें त्यास कोणी निंदेनें ल
णतात.

गद्य, न॰ सं॰ जीत अक्षरें, मात्रा अमुक असा
व्या असा नियम नाहीं ती कविता तें.

गद्यपद्यात्मक, वि॰ सं॰ जामध्यें गद्यें आ
णि पद्यें आहेत तो ग्रंथ इ॰.

गद्यात्मक, वि॰ सं॰ जामध्यें गद्यें च आहेत
तो ग्रंथ.

गंध, पु॰ पुष्पादिपदार्थसंबंधी वास; २, न॰ चं
दनादिकांचें काष्ठउगाळून देवादिकांस लावाया
करितां करितात तें.

गंधक, पु॰ सं॰ एक उपरस आहे.

गंधकरसायन, न॰ सं॰ गंधकाचें एक औषध
करित असतात तें.

गंधडा, वि॰ गाढव.

गंधमादन, पु॰ सं॰ पुराणप्रसिद्ध एक पर्वत आ
हे.

गंधर्व, पु॰ सं॰ एक देवजाति आहे.

गंधर्वगान, न॰ सं॰ गंधर्वांचें गायन; २, ला॰
कोणएकाचे उत्तम गायनास स्तुतीनें ल्हणना
त.

गंधर्वनगर, न॰ सं॰ आकाशामध्यें कोठेंएक उ
त्पातसूचक एकादेवाचेंसे नगरासारिखें दिसतें तें.

गंधाबेरोजा, पु॰ रूरूचें झाडाचें चीकास ल्हण
तात.

गंधार, पु॰ सप्तस्वरांतील तिसरा स्वर.

गंधाक्षता, स्त्री॰ गंध आणि अक्षता त्या; ल॰
या आणि मासेकपाळचा अक्षता पाहा.

गंधि, पु॰ गंधप्रथमार्थी.

गंधी, स्त्री॰ गंधिशब्दाचा अपभ्रंश, परंतु याची प्र
सिद्धी वाईट वासाविषयीं; उ॰ त्याचे जखमेला
गंधी सुटली यामुळें जवळ बसवत नाहीं; २, पु॰
अत्तर, इ॰ सुगंधिपदार्थविकणारा.

गधुळणें, गदुळणें.

गधूळ, वि॰ गदूळ.

गंध्या, पु॰ गंधी द्वितीयार्थी; २, दे॰ जामनुष्याचे
आंगास घाणयेतें त्यास ल्हणतात.

गप, स्त्री॰ मिथ्याजीगोष्टी; उ॰ हा बेटा उगीच ग
प सांगतो आहे, पेंढारीनाहीं आणि कांहीं नाहीं.

गपकन, गपकर, गपदिशी, अ॰ अकस्मात्,
धर, बस, इ॰ कांचें वि॰.

गप-चूप, अ॰ नबोलतां; बस, आ, इ॰ कांचें वि॰; उ॰
एवढा तो रागेंभरला तरी मीं उत्तर बोलिलों नाहीं
गप-चूप बसलों होतों.

गपागप, अ॰ असा शब्द होई असें अतित्वरेनें खा
ण्याचें वि॰; उ॰ गोडी लागतांच मग कोंडा गपा
गप खाऊं लागली.

गपापां, अ॰ गपागप.

गप्प, स्त्री॰ दे॰ गप; २, अ॰ तावदिकाणनलागतां
याओगें होई असें, कर, हो, इ॰ कांचें वि॰;
त्या रानांत गाय शिरली ती कोणीकडे गप्प
झाली.

गप्पाष्टक, न॰ अनेक जा गप्पा तें; उ॰ उगीच ग
प्पाष्टकें आयकून फळकाय घटकाभर देवाचें तरी
नांव घ्यावें.

गप्पी, वि॰ अनेक प्रकारच्या गप्पा सांगण्याचा

स्वभाव जाचा तो.

गप्पीदास, २ लिं. गप्पी.

गफलत, स्त्री. असावधपणा; उ. गफलतीमुळें पोथी विसरून आलों; २, तशी गफलतीमुळें कांहीएक पदार्थाचा थांग नलागावयाजोगी अवस्था होत्ये ती; उ. मासे लेखणीची गफलत झाली; ३, कांहींएक क्रमानें लावून ठेविलेल्या पुस्तकादि पदार्थांचा नीक्रम बिघडून झालेला अव्यवस्थितपणा; उ. पोरानें पोथीची सारी गफलत केली.

गफलतणें, उ. अव्यवस्थेमुळें इकडचा पदार्थ तिकडे तिकडचा इकडे अशी दशा करून समर्थी सांपडेनासें करणें.

गबगबणें, कों. पडसें खोकला याणें मनुष्य व्याप्त होणें.

गबगबीत, २ लिं. रस, पुरण, मांस, रक्त, इ. कांनीं पूर्ण भरल्यामुळें जो पुष्ट दिसतो तो; उ. हा आंबा रसानें भरला आहे म्हणून गबगबीत दिसतो; उ. पुरण पुष्कळ घातलें म्हणजे पोळी चांगली गबगबीत होत्ये; उ. हा शरीरानें गबगबीत दिसतो पण शक्तिनाहीं.

गबदूल, २ लिं. शरीरानें जो पुष्ट तो व त्याचें शरीर.

गबर, २ लिं. द्रव्यसंपन्न जो त्यास किंचित् थट्टेनें म्हणतात.

गबरू, २ लिं. गबर; २, शरीरानें रूढट स्वभावणा असा जो मनुष्य त्यास म्हणतात.

गबान, २ लिं. वा. गबानी जांत आहे असा जो देश

देश, ग्राम, शेत, इ. तो.

गबानी, स्त्री. वा. हरएक व्यापारामध्यें खर्च वे च वर मेहेनत सावकार फिटून जें शेष फल राहातें ती, उ. यंदा कापडाचे व्यापारांत शंभर रुपये गबानी झाली.

गबेलें, न. कों. चिखल, चुना, इ. वाहून न्याव्याकरितां एक काष्ठाचें यंत्र करित असतात तें.

गंभीर, २ लिं. ला. जाचा आशय एकाएकी ध्यानांत येतनाहीं किं. महत्संकटपडलें तथापि जो घाबरतनाहीं किं. कोणी त्याचा अपराध केला असतां ही प्रतीकाराविषयीं जो उतावीळ होतनाहीं असा मनुष्य तो; २, सं. अतिशयित खोल डोह इ. तो; स्थिर चाललेलें नद्यादिकांचें पाणी; मेघ समुद्र यांचा शब्द तो; तत्सदृश जो सिंहादिकांचा शब्द त्यासही म्हणतात.

गम, पु. क्षमा, परंतु करणें एतदर्थक खाधा. प्र.; उ. त्याणें एवढे अन्याय केले तथापि आम्ही आजपावेतों गम न खात आलों; २, न. एक मलम आहे; ३, रा. कोणएकाचे मनांतील कर्तव्याकर्तव्यविषयक जो आशय तो, उ. त्याचे बोलण्यांतला कांहीं गम समजत नाहीं.

गमक, न. सं. प्रमाणचतुष्टयातिरिक्त जें प्रमाण तें; उ. ईश्वरास भजावें एतद्विषयीं वेदशास्त्रपुराणादि अनेक गमकें आहेत; २, स्त्री. गवई लोक छातींतून जी तान घेतात ती.

गमजा, पु. दादला, धनी, बाप, इ. कांबराबर स्त्री.

भृत्य

भृत्य, पुत्र, इ० नीं स्वस्वयोग्यतानुरूप सरळ रीतीनें वर्तावें तीरीति समयीं सोडून अन्यविरुद्ध रीतीनें वर्तूंलागलीं असतां त्यारीतीस तेदादला, धनी, इ० या शब्दानें व्यवहार करितात; याचा प्र० अनेक व०, उ० नीट काम करावें ते आज भारीसे गमजेला वले आहेस; २, शृंगारसंबंधी जा चेष्टा तो; उ० ती स्त्री मोठ्या गमजानें चालली आहे.

गमणें, कोणएकस्थळीं कोणएकाचा काल सुखानें जाणें; उ० या गावांत मला गमतें; २, भासणें, ग्रं०, उ० भीष्मग्रीष्मतरणिसाअर्जुनहेमंततरणिसा गमला; ३, कांहींएक कर्त्तव्य व्यापारामध्यें आलस्य, किं० अवांतरव्यापारद्वारा कालक्षेप करणें.

गमन, स्त्री० सुखानें जो कालाचा अतिक्रम तो; २, ला० तत्साधन; उ० गायनासारिखी दुसरी गमत नाहीं; ३, न० गलबताचे फळ्यांचे सांध्यांतून जें आंत जमतें पाणी तें.

गमनड, स्त्री० गमन सांचावयाची गलबतांतील जागा.

गमनाड, स्त्री० गमनड.

गमती, वि० रा० दुसर्‍यांचा काळ सुखानें जाई असा हास्य विनोद करणारा जो मनुष्य.

गमदासडा, वि० कार्यामध्यें व्यर्थ कालक्षेप करण्याचा स्वभाव जाचा तो.

गमन, न० सं० जाण्याचा व्यापार.

गमनी, वि० शाहाणा असून जो पक्का लबाड तो.

गमावणें, उ० सांडणें, लुटणें, इत्यादनेक कारणांनीं कांहींएक पदार्थ नाहींसा करणें; उ० संभाळ छत्री नेतोस पण गमावशील; उ० बापाचे मागें सर्व सर्व दौलत पोरानें गमाविली; २, ला० मरणें; उ० तो गृहस्थ काल गमावला; ३, स्वसंबंधी जे प्रतिष्ठा, अबरू, मसलत, इ० अनेक पदार्थ ते कांहीं एक अयोग्य कर्माचा आचरणाचे अनेक कारणांनीं घालविणें; उ० त्या भडव्याबराबर भांडून तो अबरू मात्र गमाविली.

गम्यमान, वि० सं० वाक्यार्थ ज्ञानोत्तर वक्तृतात्पर्य विषयतेंकरून जो ज्ञायमान तो.

गया, स्त्री० सं० एकपुण्यक्षेत्र आहे.

गयावळ, पु० गयाक्षेत्रींचे उपाध्ये, जांस गयापुत्र म्हणतात ते; २, ला० बावळी मुद्रा असून आचारविचारहीन मलिन असा जो प्रा० ब्राह्मण त्यास म्हणतात; ३, जवळ पैका असून बाहेर दरिद्रीपणा, किं० आंगीं चतुरपणा असून बाहेर वेडेपणा दाखविण्याचा स्वभाव जाचा त्यासही म्हणतात; ४, रा० भिक्षुक वृत्तीमें उपजीवन करणारा आचारहीन असून जो दांडगा तो.

गयाव्रजन, सं० न० गये-चा ठायीं जें गमन तें.

गयाळ, वि० परागंदा झालेलें जें कूळ इ०; उ० सर्कारचे उपद्व्यामुळें त्या गांवची दाहा कुळें गयाळ झालीं; २, रा० गयाळ कुळासंबंधी जें शेतवाडी इ० दिकाण तें; ३, जास स्वतः ज्ञान नाहीं आणि सांगीतलें समजत नाहीं असा जो मनुष्य तो.

गयाळी, वि० दे० गयाळ तृतीयार्थी.

गर, पु० फलादिकांचे आंतील जो मृदुअंश तो; २, न० सं० विष; ३, न० साता करणांतील पांचवें जें करण तें; ४, दे० स्त्री० घोड्याचे मानेवर एक रोग होत

होन असतो ती; ५, खरारा न केल्यामुळें जो घो उयाचे आंगावर मळजमतो ती.

गरक, ३लिं० जलादिकांचे ठायीं निमग्न झालेला; २, ला० कांहीं एक विषयादिकांचे ठायीं जो निमग्नतो; उ० साधु ईश्वरध्यानामध्यें च गरक होउन जातात; ठेव, इ० गरक करणें म्हणजे खाउन नाहींशी करणें, गरक होंप येणें, लागणें, म्हणजे लौकर जागृत न व्हावयाजोगी अतिशयित येणें, लागणें, असा अर्थ.

गरका, पु० नृत्यादिसमयीं मंडलाकार फिरण्याचा जो व्यापार तो; २, कांहीं एक पदार्थाभोंवता मनुष्यादिकांनीं घातलेला वेढा; उ० त्या किल्याभोंवता जेव्हां हजार मनुष्यांनीं गरका घातला तेव्हां उपाय नाहींसा झाला.

गरगट, पु० न० कांहीं एक पदार्थांत जलांश विशेष घालून फार पातळ न व्हे फार घट्ट न व्हे असा जो करिनान तो, तें; उ० आज अळवाचें गरगट केलें होतें.

गरगटणें, दे० मध्यम पातळ जो गोमयादि पदार्थ त्याणें भिंत इ० पदार्थ लिप्त करणें; २, गरगटयांत घालून पुरण, इ० पदार्थ बारीक करणें; उ० तूं एवढें पुरण गरगटून दे म्हणजे मीं पोळ्या भाजीन.

गरगटा, पु० पुरण इ० पदार्थ बारीक कराया चे उपयोगी तेल्याचे घाण्या सारिखें दगडी यंत्र असतें तो.

गरगटें, न० गरगट.

गरगर, गरगरां, अ० मंडलाकार होई असें, फिरणें फिरणें, भोवणें, इ० कांचे वि०; उ० आज क्षुधेमुळें डोळे गरगरां फिरूं लागले; २, अतित्वरेनें वाढणें, इ० कांचे वि०; उ० पुरुषापेक्षां पोरी ची जात वाढूं लागली म्हणजे गरगरां वाढले.

गरगशा, पु० प्रा० दुःखमूलक जो अनेक मनुष्यां चा कोलाहल तो.

गरगोटी, स्त्री० मानगोटी; परंतु धर, बस, आंवळ, इ० धा० प्र०; उ० त्याची गरगोटी धरून को प्राण जाईल.

गरज, स्त्री० जा पदार्थांवांचून विवक्षित कार्य अडलें जातें त्या पदार्थाची त्या कार्याविषयीं सापेक्षता ती; उ० लेखणी करायास मला चाकूची गरज आहे; २, कांहीं एक प्राप्त झालेल्ये अडचणीचा यथाकथंचित् निर्वाह किं० कांहीं एक कार्य यथाकथंचित् करण्याचा जो व्यापार ती; उ० धोब्रें घ्यावयास पैसा नाहीं म्हणून पंचांवर गरज करितों; उ० नीट जपून लिहा गरज करूं नका; कर, हो, चाल, चालीव, या धा० प्र०; ३, कोणएकाची गरज करणें, चालविणें, इ० स्वयीं त्याची गरज शांत करणें असा अर्थ, स्व० गरज सरो आणि वैद्य मरो, स्व० आपल्येगरजे गाढव राजे.

गरजणें, मेघादिकांनीं मोठ्यानें शब्द करणें; उ० आज मेघ भारी गर्जन आहेत पाउस पडेलकीं काय; २, रा० गरजेस येणें; उ० मी आज दाहा रुपयांसाठीं गरजलों.

गरजवंत, ३लिं० कांहीं एक पदार्थाची जास्त गरज लागली तो; स्व० गरजवंतास अक्कल नाहीं.

गरजी, ३लिं० गरजवंत; २, कांहींएक काम यथाकथंचित् करण्याचा स्वभाव जाचा तो; उ० असेल्या गरजी मनुष्यांनीं कोठे काम चांगलें होत असतें.

गरजू, ३लिं० गरजी.

गरढई, स्त्री० दे० प्रा० अजीर्णविकृतीमुळें पोटांतील वायु उर्ध्वगत होउन घशांत जो जलांश येतो ती.

गरत, स्त्री० विवाह होउन व्यभिचारदोषामुळें जातिभ्रष्ट नसालेली स्त्री०.

गरनाळ, स्त्री० तोफेंतील एक भेद आहे, जिचा आकार काष्ठादिकांचे उरबळीसारिखा असतो.

गरबरणें, पित्तादिविकृतीमुळें वमन व्हावयाजोगें पोटांत ढवळणें.

गरम, ३लिं० उष्णपदार्थ; २, ला० क्रोधादिकानें संतप्त जालेल्यास कोणी म्हणतात.

गरमनरम, ३स्त्री० केवल थंडनव्हे केवल उष्णनव्हे जो पदार्थ तो; २, ला० केवळ तापट नव्हे केवळ थंडाही नव्हे असा जो मनुष्य तो व त्याचा जो भाषणादिव्यवहार तो; ३, कोरे व मळकोरे मिळून जो रुपयांचा समुदाय तो.

गरमर, न० माइणमूळ.

गरमा, पु० गरमी हिनार्थी.

गरमागरम, ३लिं० उनउन जो ताजा पदार्थ त्यास म्हणतात.

गरमी, स्त्री० उष्णपदार्थभक्षणादिकानें जी अवस्था होत्येती; २, सूर्य, अग्नि, इ० संबंधी जो उष्मा ती; ३, मैथुनजन्य एक रोग आहे.

गररर, अ० चक्रादिकांचे भ्रमणसमयीं चें शब्दानुकरण

गरल, सं० न० विष.

गरस, स्त्री० शरीरावर रक्तविकारादिविकृतीनें जी गाठ उठत्येती.

गरसळी, गरसोळी, स्त्री० तुशी, वज्रटिका, इ० प्रकारचीं जीं स्त्रियांचीं कंठभूषणें असतात तीं प्रत्येकीं; उ० माझी नांदुकांची गरसोळी ओंबायाची आहे.

गरळ, स्त्री० विषयुक्त जी सर्पादिकांची लाळ तृणादिकांवर पडत असत्येती.

गरळा, पु० विड्यामध्यें अनेक औषधें घालून चावून त्याचा रस जो लाहान मुलांस पाजितात तो; २, को० भात, वरी, इ० कांचे लोंबीचा डेंखाजवळचा प्रदेश तो; कापण्याचे प्रसंगीं आ० म०.

गरा, पु० फणसाचे फळांत आंठळीविशिष्ट जे खाद्य त्वेंकरून भक्षणीय अंश असतात ते प्रत्येकीं.

गरागर, अ० गरगरां.

गराडा, पु० किल्ला, इ० कांचा भोंवता मनुष्यादिकांनीं घातलेला वेढा; उ० त्या शहराभोंवता हजार स्वारांचा गराडा पडला आहे.

गराडी, स्त्री० दे० गाडा, इ० चालत असतां भूमीवर जी चाकाची रेषा पडत्येती; २, चुन्याचेंचाक फिरावा करितां मंडलाकार जी जागा बांधून करितात ती.

गराद, स्त्री० गजषष्ठार्थी.

गरादा, पु० गराद.

गरारां, अ० गरगरां.

गरिबाई, स्त्री० गरीबपणा.

गरी, स्त्री० वीतभर दोरीचीं दोन टोकें काढीचे अग्रास बांधून त्यावरलयाकार दोरींत चिमोरी इ०चा नांगडा सांपडवून पीळघालून त्यांस धरितात ती काढीसहित वलयाकार दोरी; २, रा०लाहान मासे धरावयाचा गळ; ३, वा० फणसाचे फळांतील लाहान गरा.

गरीब, २लिं० उद्यमनष्टे नो व जो द्रव्यहीन तो.

गरीबगुरीब, २लिं० गरीब, इ० तो; उ० धर्मकरणें तो गरीबगुरीबास करावा.

गरीबी, स्त्री० गरीबपणा.

गरुड, पु० एक पक्षिजाति आहे जो विष्णुवाहनत्वें करून पुराणप्रसिद्ध तो.

गरूळ, स्त्री० एक औषधी वल्ली आहे.

गरोदर, स्त्री० सगर्भजाती.

गरोळ, स्त्री० गरूळ.

गर, कन, कर, दिशी, अ० फिरणें भोंवळ येणें झोंपलागणें चिरवलांत पायजाणें इ०चें वि०.

गर्गरणें, गरगरां प्रथमद्वितीयार्थानें युक्त होणें.

गर्जणें, गरजणें प्रथमार्थानें युक्त होणें.

गर्जना, स्त्री० मेघादिकांचा शब्द; उ० वाघाची गर्जना जरी झाली तरी मेघाचे गर्जने खालीं.

गर्त्ता, स्त्री० सं० खळी.

गर्द, २लिं० अतिशयित, अंधकार, छाया, झाडी, निद्रा, इ०चें वि०; फौज, इ० गर्द होणें स्त्रणजे नाशादिकारणामुळें बावठिकाण नाहींसें व्हायाजोग्ये अवस्थेनें युक्त होणें.

गर्दन, स्त्री० گردن मानरूप जो अवयव ती; उ० मासी गर्दन कापली तरी पैसा मिळायाचा नाहीं;

प्र० सजीवसृष्टि:.

गर्दबाज, २लिं० दे० अतिशयित दाट झाडीचें वि०; उ० त्या रानाला मारेकीं गर्दबाज झाडी लागून गेली आहे.

गर्दभ, पु० सं० खर.

गर्दा, पुं० भांगेचीजीपत्नी तो.

गर्दाबाज, २लिं० गर्दबाज.

गर्दी, स्त्री० कोणएकास्थळीं मनुष्यादिकांची झालेली अतिदाटी; उ० हर्दास नामी होता स्त्रणून आज श्रोत्यांची भारी देवळांत गर्दी झाली; २, उधळण्याचे व्यापारानें कोणएकस्थळीं गुलाल, बूक, इ०ची झालेली निबिडता; ३, युद्ध, दंगा, पर्जन्य, धान्य, शिव्या, इ०चा अतिशयास स्त्रणतात.

गर्भ, पु० सं० मानेचा उदरांतील रेतरक्तोद्भव जो जीव तो; २, पदार्थाचेआंतील जो भाग तो; ३, क्षेत्रव्यवहारीं सूत्राचा जो मध्यभाग तो; उ० या चौकटीचा गर्भसाधा; ४, ला० श्लोकादिकांतील जें तात्पर्य तो.

गर्भगळीत, २लिं० ला० कांहींएक कारणानें अतिशयित भयविशिष्ट झालेला; प्रा० लाक्षणिकार्थी च याचा प्र० उ० वाघ दृष्टीस पडतांच तो गर्भगलित जाला.

गर्भगीळ, २लिं० दे० गर्भगळीत.

गर्भदासी, सं० स्त्री० दासीची कन्या असून जी दासीपणानें वागत्येली.

गर्भधारण, सं० न० गर्भाचेंजें धारण तें.

गर्भपतन, सं० न० पूर्णदिवस न होतां जो उदरांतील गर्भाचा पात होतो तें.

गर्भपात, पु॰ गर्भपतन॰

गर्भयातना, स्त्री॰ सं॰ माने-चे उदरीं असतां जीग भोंसयातना होत्येती॰

गर्भवती, स्त्री॰ सं॰ जीचेपोटांत गर्भराहिला आहे ती स्त्री॰

गर्भवास, पु॰ सं॰ माने-चा उदरीं-जी गर्भा-ची स्थिति तो॰

गर्भवेष्टन, न॰ सं॰ गर्भा-चे भोंवतें जें चर्म वेष्टिलें अ सतें तें॰

गर्भशय्या, स्त्री॰ सं॰ गर्भा-चेंजें माने-चा उदरीं गहा याचें स्थान तीं॰

गर्भश्रीमंत, वि॰ जो स्वोत्पत्तिकालीं बहुत संप त्तिमान् तो॰

गर्भा, पु॰ गुजराथी स्त्रियांचें एक गाणें आहे॰

गर्भागार, न॰ सं॰ देवालयांतील जे मुख्य देव गहा याचें स्थल तें॰

गर्भार, स्त्री॰ गर्भवती॰

गर्भारशी, स्त्री॰ गर्भार॰

गर्भारा, पु॰ गर्भागार॰

गर्भिणी, स्त्री॰ सं॰ गर्भवती॰

गर्भी, स्त्री॰ क्षेत्रादिकां-ची भोंवतालची बाजू सोडू न मधला जो अंश तीं॰

गर्व, पु॰ सं॰ अहंकार॰

गर्वस, वि॰ एक कालीं पेरिलें असतां कि॰ लावि लें असतां मागाहून पिकास येणारें धान्यादि॰

गर्वा, वि॰ गर्वस॰

गर्विन, वि॰ सं॰ गर्व जास आहे तो॰

गर्विष्ठ, वि॰ जा-चे आंगीं निरंतर गर्वा-ची स्थिति असत्ये तो॰

गर्वी, वि॰ गर्विष्ठ॰

गर्हाणें, न॰ कोणएकानें केलाजो अपराध. इ॰ त्याचेंजें पारिपत्य, अप्रतिष्ठा, इत्यादि अर्थ भन्या नवच्छ कथनें; २, देवादिकांजवळ कथनीयजो स्वाभिमानांश तें॰

गर्ह्वार, स्त्री॰ गर्भार॰

गर्हित, वि॰ सं॰ निंदित॰

गलका, पु॰ कोलाहल॰

गलगल, स्त्री॰ दे॰ गलका; २, भोंकर, इ॰ फळां-चा जो-चीक तो॰

गलगलीत, वि॰ आईअसून जो अत्यंत मृदु असा. पिकलें केळें, बरक्ये फणसा-चा गरा, भात, इ॰ पदार्थ तो॰

गलंड, न॰ दे॰ शरीरसंबंधी रक्तासविकार होउन जी आंगावर गांठउठत्ये तीस लक्षणान॰

गलन, स्त्री॰ गंजिफां-चा क्रम बिघडाया करितां हस्तव्यापारनें त्या अस्ताव्यस्त करणें; २, ला॰ पुस्तकादिकां-चा पत्रां-चा क्रम मोडाया जोगा के लाजो अस्ताव्यस्तपणा तीं; ३, वि॰ दे॰ अप्र योजकत्वेंकरून पर्णाया-चा जो पदार्थ त्यास लक्षणान; उ॰ हीं असलीं गलनपानें कोणपेतो चों गलीं असलींनर काढ॰

गलत्कुष्ठ, न॰ सं॰ एकरोगआहे जाणें शरीरावय वसडून जातात॰

गलत्कुष्ठी, वि॰ गलत्कुष्ठानें व्यथित झालेला॰

गलतान, قلتان हिं॰ वि॰ गयाळ लतीयाथीं॰

गलत्या, वि॰ गलतान॰

गलथा, पु॰ चौरंग, पाट, चिरे, इ॰ चे बाजूस क्रमानें मिसळता जो आकार करीत असतात तो॰

गलथेदार, वि॰ जास गलथा केला आहे असा जो, चौरंग, पाट, इ॰ तो॰

गलफटणें, मनुष्यादि पदार्थांनें थांग न लागतां या जोगें चुकणें क्रि॰ सांडणें; उ॰ काल पासून लेखणी कोठे गलफटली आहे ती शोधितानां दमलों; २, दे॰ कांहीं एक व्यवहारांत संकटादिकारणामुळें सुचेना अशे अवस्थेनें युक्त होणें॰

गलफटा, पु॰ दे॰ कांहीं एक व्यवहारांत कुंठित गति व्हाया जोगी जी संकटावस्था प्राप्त होत्ये ती; उ॰ याचा अर्थ होत नाहीं म्हणून मी मोटया गलफटयांत पडलों॰

गलबत, न॰ जलमार्गानें जावयास साधनभूत जें मोठें नौकारूप वाहन असतें तें॰

गलबल, स्त्री॰ गलका; २, कांहीं एक व्यवहारांची क्रि॰ त्याचे रचनेची जी प्रकारें स्थिति असावी ती तशी न सांपडाया जोगी जी त्यांत घालमेल असत्ये ती; उ॰ याचे कागदपत्र संगीतनाहींत आंत गलबल पुष्कळ दिसत्ये; फौजा रवाना होत आहेत तेव्हां राज्यांत कांहीं गलबल दिसत्ये; ३, भयादिकामुळें जो घाबरेपणा होतो ती॰

गलबलणें, गलफटणें प्रथमार्थानें युक्त होणें; २, भयादिकांमुळें घाबरें होणें; उ॰ दरवडा आला असें समजतांच माणसें गलबललीं॰

गलबला, पु॰ गलका॰

गलबलाट, पु॰ अतिशयित गलबला॰

गलबा, पु॰ गलका॰

गलित, वि॰ आधारापासून खालीं पडलेला क्रि॰ पडाया जोगा झटलेला पदार्थ; २, वृद्धत्वादिकारणामुळें शिथिलावयव क्रि॰ रोगादिकानें निःशक्त झालेलें शरीरादि; उ॰ गलित आलीकाया तेंचि लक्षिन पंढरीराया॰

गलितपत्र, न॰ सं॰ वृक्षादिकांचें गळलेलें पत्र; २, ला॰ अतिशयित वृद्धत्व, रोग, इ॰ कारणामुळें जो निःशक्त त्याचें शरीर बनतें; ३, शिथिलावयव सर्वपदार्थ सलक्षणतात॰

गलिमाई, स्त्री॰ गलिमानें केलेला दंगा॰

गलीच, غلیظ वि॰ हिं॰ जाची संगत करायास योग्य नव्हे असा जो अमंगल नीच मनुष्य त्यास लक्षणतात॰

गलीम, गनीम, غنیم पु॰ हिं॰ प्रा॰ राजाचा जो शत्रु तो॰

गलूल, گلول स्त्री॰ हिं॰ रवडे मारायाची जी कमान असत्ये ती; २, पु॰ अग्नि संबंधी ज्वालांचा जो समुदाय तो॰

गलूलरवडा, पु॰ दे॰ गलूलीनें मारितात जो रवडा तो॰

गलेफ, غلاف पु॰ हिं॰ लोड, इ॰ नमक्यानें लपून नलदाकार करण्याचें शिंबून जें आच्छादन करितात तो॰

गलेलठ्ठ, वि॰ अक्षरशत्रु असून शरीरानें जो धष्टपुष्ट तो॰

गलोल, گلول स्त्री॰ पु॰ हिं॰ गलूल॰

गल्ल, पु॰ सं॰ गाल; २, स्त्री॰ दे॰ इटी दोडू, गोट्या, खेळत्ये समयीं जी खळी करितात ती॰

गल्लशष्प, न० कल्ला.

गल्ला, पु० मण, खंडी, इ० रूप जो धान्यसमुदायतो; याचा प्र० पायली दोनपायली अशा थोड्या धान्यावर प्रा० होतनाहीं; उ० आम्ही यंदा पन्नास खंडी गल्ला खरेदी करून ठेविला आहे.

गल्ली, स्त्री० जाचे दोहों बाजूंस घरें, भिंती, कुपण, आहे असा जो लाहान रस्ता तो.

गल्लीकुची, स्त्री० आडगल्ली, इ०; उ० त्या शहरची मला गल्लीकुची आवडुक नाहीं पण मोठे मोठे रस्ते सर्वआवडुक आहेत.

गल्लीकुचीचा, ३लिं० प्रशस्त राजमार्गानें वागणारा नव्हे किं० लोकविरुद्ध नव्हे असा जो मनुष्य किं० त्याचा व्यवहार तो; उ० असेल्या गल्लीकुचीचा मनुष्यासंगतीं व्यवहार केला असतां त्यांत आपली फजीती होत्ये.

गल्हांटणें, गलफटणें प्रथमार्थानें युक्त होणें; २, रोगादिविकृतीनें शरीरप्रकृति अशक्त होणें व मनुष्यादिकानीं तादृश शरीरविशिष्ट होणें; ३, देणें, घेणें, इ० रूप जो व्यवहार त्यांत तोटा, बूड, इ० आल्यामुळें त्या व्यवहारानें क्षीणत्व पावणें व तादृश व्यवहारकर्त्यानें ही तदंगक्षीणत्वानें युक्त होणें.

गल्हांटा, पु० कडबा, पेंढा, गवत. इ० चा पेंड्या बांधिल्या बांचून अस्ताव्यस्त पडलेला जो समुदायतो; २, ला० कोणएक मनुष्यादि पदार्थाची किं० कांहींएक व्यवहाराची अव्यवस्था इ० कारणामुळें झालेली दुर्दशा.

गव, स्त्री० दोनही हात लांब करून त्यांचा परस्पर अंगुली संयुक्त केल्या असतां मध्यें जो अवकाश राहातो ती; उ० हा रबांब मापास्तव गवेंत मावत नाहीं; २, कांहींएक कार्यफलरूप व्हावयाजोगी जी देशकालाद्यानुकूल्यरूपसंधी ती; उ० कोणताही उद्योग करणें तो गव पाहून केला असतां एकाएकी फसत नाहीं.

गवई, ३लिं० गाण्याचें कसब करितो तो.

गवगव, स्त्री० चिंतासंव्यग्रता व्हायाजोगी अनेकांचे शब्दांची गलबल.

गवगवा, पु० गवगव; २, भाषणादिद्वारा सर्वांस विदित व्हायाजोगी जी कांहीं एक गोष्टीची प्रसिद्धि तो; उ० या गोष्टीचा गवगवा करूंनका मर्कारांत समजलें तर दंड पडेल.

गवत, न० तृण.

गवतकाड्या, ३लिं० तरवार, बरच्छा, इ० चांगल्या शस्त्राची निंदा कर्तव्य असतां म्हणतात; उ० हा बरच्छा शुद्ध गवतकाड्या आहे; २, अनाडी मनुष्यास ही निंदेनें म्हणतात.

गवत्या, ३लिं० केवळ अनाडी मनुष्यास म्हणतात.

गवत्यागोमाजी, पु० गवत्या.

गवशा, ३लिं० फुकट सांपडलेला पदार्थ; उ० ही घोडी मीं विकत घेतलेली नव्हे गवशी आहे.

गवसणी, स्त्री० वीणा, आदिकरून कांहीं पदार्थांस आच्छादनार्थ जी तदाकार पिशवी शिवून करितात ती; २, ला० राज्यास गवसणी घालणें, म्हणजे सर्वराज्य आपले आवरकना शक्तींत आणून देवणें.

गवसणीचीपोटी, स्त्री० बाहेरकणीक आणि पोटीं

पोटीं उकड पुरणासारिखी घालून जी पोळी करितात ती.

गंवसणें, सांपडणें.

गवसार, २लिं० दे० सरिफेबार.

गवळण, स्त्री० कोळ्यासारिखा एक क्षुद्र जंतु आहे; २, गवळ्याची स्त्री.

गवळा, १लिं० ज्याचे आंगावर पांदरे ठिपके असतात असा जो बैल, गाय, इ० तो.

गवळी, पु० दूध दहीं इ० करिकून त्याजवर उपजीविका करितो अशी एक जाति आहे.

गवळीण, स्त्री० गवळ्याची स्त्री

गवा, पु० एक वन्यपशु आहे.

गवाळें, न० सोवळें आदिकरून पदार्थ देवायाचे उपयोगी सोवळ्याचे वस्त्राची पिशवी करितात तें; गवाळें आटपणें, म्हणजे कोण एकानें मरणें किं० स्थानभ्रष्ट होणें; गवाळ्यांत घालणें, म्हणजे राज्य, राज्याधिकारी, इ० स्वसत्तेंत वागत असें करणें.

गवाक्ष, पु० न० सं० लाहान खिडकी.

गव्य, न० सं० गाईसंबंधी दुग्धादि.

गंव्हला, पु० गव्हांचे पिठाचा बटू जो गव्हांसारिखा करितात तो; २, एक रूपकात्मिक पदार्थ आहे.

गव्हाणी, स्त्री० गुरें बांधायासाठीं रचांबले पुरून त्यांजवर लांब आडवें लांकूड घालून करितात ती.

गंव्हार, २लिं० अप्रयोजक मनुष्यास म्हणतात.

गंव्हाळा, २लिं० एक सर्पांत भेद आहे; २, गहूंपेक्षा

गया

रायास योग्य जी जागा तो.

गस्त, स्त्री० हिं० किल्ला, इ० चे संरक्षणार्थ शौकिरायासाठीं नियुक्त जो मनुष्यादिकांचा समुदाय ती, व त्या समुदायाचा जो फिरण्याचा व्यापार ती; उ० सर्व शिपाई लोक गस्त करायास गेले आहेत; २, न० मंडपादिकाचा जो रक्षण तें; उ० या गस्तापेक्षां त्या गस्ताची कंदी अधीक आहे.

गहन, २लिं० सं० दुर्गम, दुर्ज्ञेय, जो पदार्थ तो; उ० या श्लोकाचा अर्थ फार गहन आहे.

गहना, पु० हिं० सुवर्णादि संबंधी जो अलंकार समुदाय तो.

गहिरा, पु० हिं० खोंगला खुलेला सुंदर जो रंग तो; प्रा० तांबडा, गुलाबी, यारंगावरचे प्रसिद्धि; २, ३लिं० त्यारंगानें रंगलेलें वस्त्र.

गहिंवर, पु० शोकादिकारणानें अंतःकरणास विकार झाल्यामुळें रडें यावयाचे पूर्वी जी कंठभरून येण्याची अवस्था होत्ये तो; उ० मेल्याला फार वर्षे झालीं तरी आईचें नांव घेतलें कीं त्याला गहिंवर येतो.

गहिंवरणें, गहिंवराने युक्त होणें.

गहिंसरा, पु० गइसरा.

गही, स्त्री० गई प्रथमार्थी; २, ला० गहीचा समीपवर्ती देश; ३, दे० सोनाराचे एक आयुध आहे.

गहीन, २लिं० दे० क्षमाशील मनुष्य.

गहूं, पु० एक धान्य आहे.

गळ, पु० प्रा० लाहान मासे धरायाचे उपयोगी एक लोहादिकांचें यंत्र करीत असतात तो; २, विहीर, इ० कांत पडलेलें पात्रादि बाहेर काढायाकरितां लोहादिकांचे अनेक आंकडे एकत्र संबद्ध करून

करि

करितात तो. २, मनुष्यास कांहीं धावण्याचे उपयोगी लोखंडाचे आंकडे मारून यंत्र केलें असतें तो; ४, देवद्वारापुढील वधाटास टांगून घ्यावयाचे उपयोगी मनुष्य शरीरास टोंचावयाजोगा लोखंडाचा जो आंकडा केला असतो तो; ५. रा० दमा म्हणून जो रोग त्यास म्हणतात; ६, स्त्री० नेत्रास आंतून सतत उदक पडावयाजोगी किं० आम्र, बकुळ, इ० वृक्षांसलीं चीकलें पुष्पें सतत गळावयाजोगी अवस्था प्राप्त होत्ये ती. गळघालणें, स्त्र० स्वकार्य करून घेण्याविषयीं कोणएकास अत्याग्रह करणें; गळींलागणें, स्त्र० घांसरूं, इ० चे गळ्यास दोरीचा फांस बसल्यासारिखें होउन त्याणें घाबरें होणें किं० आपणांस न आटपावया जोग्या उच्चस्वरानें बोलणें, स्त्र० णणें, इ० कारणानें कोणएकानें दुरवस्था पावणें.

गळका, वि० छिद्रादि कारणामुळें आंतील पदार्थ गळून जाणें असें जें पात्रादि तो; उ० या गळक्या दौतींत शाई घालूं नको.

गळगळा, अ० वा० दीनत्वातिशय विशिष्टपणें, येणें, धा० वि०; उ० तो दीन रुपयांसाठीं अगदी गळगळा आला.

गळगळीत, वि० केवळ तोंडोतोंड भरलेलें पात्रादि; २, चांगला रुच्य नव्हे असा कढी, आमटी, इ० पदार्थ; ३, रा० स्वल्प घांसल्यानें निर्मळ होईल असें गुळगुळीत असतें जें धातुमय पात्र तो; उ० मासा गडवा गळगळीत पडला म्हणून लोकर उजळतो.

गळग्रह, गलग्रह, पु० सं० ज्योतिःशास्त्रप्रसिद्ध एक दुष्ट ग्रह आहे; २, स्त्र० कांहीं एक स्वकार्य साधनार्थ दुसऱ्यासजो निरंतर उपद्रव देतो त्यास स्त्र०; ३, कोणएकास कांहीं एक व्यापारीं प्रवृत्त करण्याविषयीं त्याचे गळां पडून मनस्वी जो आग्रह करितात तो; उ० तुम्ही भोजनास येण्याविषयीं मला गळग्रह पालिनांपण मला फावणार नाहीं.

गळघांटी, स्त्री० वा० गळ्याचे पुढें जें वाटलेलें हाड दिसतें ती.

गळचिपी, स्त्री० धर. आंवळ, बस, इ० धा० योगीं गळ्यास च गळचिपी म्हणतात; उ० त्याची गळचिपी आंवळून को कदाचित् प्राण जाईल. गळचिपी बसणें म्हणजे स्वकार्य साधावयाविषयीं दुसऱ्यावर अत्याग्रह करणें; उ० तो त्याचे गळचिपी सबबसला.

गळणें, आधारबंध शिथिल झाल्यामुळें खालीं यावयाजोगें वियुक्त होणें; उ० मोठाधारा येतांच त्या ओंब्याचे ओंबे पटापट गळले; २, छिद्रादि कारणामुळें पात्रादि संबंधी पदार्थ खालीं पडे असा वियुक्त होणें; उ० चाळणींतून दाणे गळले; घागरींतलें पाणी गळतें; ३, घर गळतें, तांब्या गळतो, इ० स्थळीं उदकनिष्ठ कर्तृत्वाचा आरोप गृहादिकांवर होतो; स्त्र० अनेकांनीं आरब्ध जो व्यापार तो तडीस न नेतां थकणें इ० कारणामुळें त्यांतील किती एकांनीं मागें राहाणें; उ० पंचवीस जण काशीस जायला निघाले त्यांतले पांचजण तर गळले; ४, नसणें किं० अविवक्षितत्व, इ० कारणामुळें कोणएक पदार्थ किं० व्यापार विवक्षित प्रकरणांत असेसा न येतां राहाणें, हा पाय गळणें. स्त्र० उपोषण किं० कांहीं एक अनिष्ट

दि

दिकारणामुळें त्यांणीं स्वस्व व्यापारविषयीं असमर्थता पावणें.

गळंत, न॰ गळांतायेअर्थीं.

गळती, स्त्री॰ उष्णकाळीं देवादिकांवर सतत उदकबिंदु गळावेम्हणून,सछिद्र जलपूरित पात्र टांगितात ती,किं॰ त्या पात्रांतून सतत उदकबिंदू गळण्याचा जो व्यापार ती;२, गळघळार्थी;३, रा॰ तराजूस बुदला,पेटी, इ॰ लावायाकरितां साधनभूत जी दोरी असते ती.

गळतें, न॰ पर्जन्योदक जायासून आंत गळतें असें जें गृहादि संबंधी छिद्र तें.

गळदट, २लिं॰ दे॰ जास बोलिल्या चालिल्याची लज्जा नाहीं असा जो कोडगा मनुष्य तो.

गळफटणें, प्रा॰ गलफटणें याचे अर्थानें युक्त होणें.

गळफांस, पु॰ जीव जावयासाठीं गळ्यास जो फांस लाविलात तो,किं॰ गुरें, इ॰चे गळ्यास जीव जायाजोगा जो दोरीचा फांस बसतो तो.

गळफांसणें. गुरें, इ॰नीं गळफांस विशिष्ट होणें.

गळबट, २लिं॰ गळ्यापर्यंत भरलेलें पात्र तो.

गळबंड, २लिं॰ गळबट;उ॰ गळबंडनिरवें तांदूळघे.

गळसर, गळेसर, पु॰ स्त्रियांचे गळ्यांत बांधायाचे उपयोगी जे कांचेचे मणी असतात तो; २, ते मणी एकादोर्‍यांत ओंवून गळ्यांत बांधायासाठीं जो सर करितात तो.

गळसरणें, दे॰ पायांचे बोटांनीं रवाल्चे बाजूस भेगी भेगींनीं युक्त होणें.

गळसरी, गळेसरी, स्त्री॰ गरसोळी.

गळसूत्र, न॰ श्वासादिक गळ्यांत उतरायाचीं जीं छिद्रें त्यांस समयविशेषीं स्त्र॰;२, ग्रं॰ गळ्यांतील जें सूत्र तें;उ॰ योजितो हयगळां गळसूत्रें.

गळा, पु॰ पोपटाचे मानेवर जो कंठ फुटतो त्या अर्थावांचून जो कंठ तो;२, मडकें, भांडें, इ॰चा जो तोंउ,आणि पोट, यांचे मधील आकुंचित अवयव असतो तो; गळाकापणें. स्त्र॰ एकाद्यास कांहींएक गोष्टीविषयीं भरंवसा देवुन समयीं फसविणें किं॰ घात करणें; गळाधरणें. स्त्र॰ कांहींएक कार्याचा स्वीकार केल्यामुळें तत्कार्य कर्त्यास दुःख होई असें करणें; गळांपडणें, गळींपडणें, स्त्र॰ कांहींएक कार्य त्यांचे केलें इ॰ मनस्वी आग्रहोक्ति करणें किं॰ कांहीएक कार्यार्थ घेतलें वस्त्र तें त्या कार्याकडे नखरचना आंगावर पडणें किं॰ कांहींएक कार्याविषयीं कोणएकास भारी आग्रह करणें, असे कांहीं अर्थ होतात; गळ्याशीं पाणी लागणें, गळ्यापर्यंत येणें, स्त्र॰ कांहींएक कर्ज इ॰ संकटाचे परिहाराविषयीं केवळ पराकाष्ठा होणें; गळानापणें, गळास्कटणें स्त्रणजे आंतील कफादिविकृति जाउन गळा गानादि व्यापारीं टिपेस पोहचायाजोगा समर्थ होणें; गळाताणणें, टांगणें, स्त्र॰ गळ्याचे शक्तीपेक्षां अधिक उच्चस्वरानें स्त्रणूं लागलें असतां जी थकलेपणारूप अवस्था होत्ये तीणें युक्त होणें; गळाबसणें, स्त्र॰ स्वरादिनिघावयाजोग्या अवस्थेनें युक्त होणें; गळाफुटणें. स्त्र॰ पूर्वस्वन पालटून घोगरा होणें; गळानि-

वळणें, स्त्र० फुटलेल्या गळ्यानें पुनः स्त्रणण्याचे अभ्यासानुकें ताळ्यावर येणें, गळ्यांत घोंगडें, माळखंड, गोण, इ० पडणें, स्त्रणजे कांहीं एक व्यवहारीं आपल्यास निर्वाह करणें त्रास असें लक्षांत त्रास होणें; गळा गोंवणें, स्त्र० कांहीं एक व्यवहारीं कोणएक गुंतला जाई असें करणें; गळां बांधणें, गळीं बांधणें, स्त्र० कांहीं एक वस्तु घेण्याविषयीं दुसऱ्यांचा संतोषन सतां बळेंच त्याचे माथां मारणें; गळ्यांतउतरणें, गळ्यारवालीं उतरणें, एथे कोणएकाची देव इ० रवाउन जाणें, त्याचा गळा आणि मास्तानचा जेव्हां एकत्र होईल तेव्हां हें कार्य उलगडेल, इ० स्त्रलीं त्याचे स्वणीं स्वापदीसत्रसावें तेव्हां होईल असा अर्थ, स्त्र० कापला गळा आणि खोकला गेला; स्त्र० मास्ता गळा आणि कांदा मुळा.

गळागोठा, पु० वा० कलहादिप्रसंगीं जमलेला मनुष्यसमुदाय.

गळांठणें, गल्हांटणें.

गळांठा, पु० गल्हांटा.

गळांन, न० एकवेळ लिहिलेलें वाक्य किं० शब्द पुनःपुनः लिहावें लागल्यास त्या वाक्याचीं मूळ दोन चार अक्षरें लिहून पुढें शून्य लिहितात त्यांचें नांव; २, ३ लिं० जास गळांतानाचें चिन्ह आहे तो श्लोकादिसंबंधी चरणादि; उ० या श्लोकाचा चौथा चरण गळांन केला. देव, इ० गळांन करणें, स्त्रणजे रवाणें.

गळी, स्त्री० बारीक स्वराचा जो गळा तो.

गळींव, ३ लिं० वृक्षादिकांपासून गळलेलें जें फलादि तो.

गळीसुकड, गळीस्कखड, स्त्री० माडावरील नारळ पुरतेपणीं पिकून रवालीं गळतो ती.

गळेपडू, ३ लिं० दुसऱ्यावर कांहीं एक लटकें निमित्त योजून त्यांचें हें कर्म केलें, हें तुमेंच काम, इ० आग्रहोक्ति करण्याचा स्वभाव जाचा तो, व त्याचा जो तसा व्यवहार; उ० याचा गळेपडू धंदा आहे याची संगत कामाची नव्हे; २, स्वकार्यार्थ दुसऱ्यास त्रास यावया जोगा अत्याग्रह करण्याचा स्वभाव जाचा त्यास स्त्र०.

गळोगदी, न० दे० बगाड.

गळहांटणें, गल्हांटणें.

गळहांटा, पु० गल्हांटा.

गाई, स्त्री० गायप्रथमार्थी.

गाईर, स्त्री० रा० शेणरवळी; २, एक झाड आहे त्याचे शेंगेंतील जी बी ती; ३, स्त्रनांत जा प्रथमतः गांठी येतअसतात त्या प्रत्येकीं.

गागणें, दे० कोणएकाचे आंगावर ओरडणें; उ० तूं मोठ्यानें गागलास स्त्रणून तो तुला भिणार नाहीं.

गांगरणें, भयादिकारणानें सुचेना अशी अवस्थेनें युक्त होणें; उ० त्याणें दोन शब्दांचा अर्थ विचारतांच तो गांगरला.

गांगो, पु० रा० ग्रामदुर्गेसारिखा एक देव आहे.

गांजणूक, स्त्री० गांजण्याचा जो व्यापार ती व त्याणें स्त्रालें जें कोणएकास दुःख ती.

गांजणें, उ० कोणएकास चैनपडेनासें वारंवार दुःख देणें.

गाजणें, मेघादिकांनीं गर्जना करणें, २, स्त्रा०

कोहीं

कांहींएक गोष्ट प्रसिद्ध होणें.

गांजर, न० एक झाड आहे. जाचे मूलाची मुख्यतें करून प्रसिद्धि तें.

गाजरपाररवी, स्त्रिं० आपल्यास वस्तूची परीक्षा करायास येतनसतां परीक्षा करण्याविषयीं डौल घालितो त्यास निंदेनें म्हणतात.

गांजवा, पु० दे० गांजवर्या, इ० पदार्थ आंत भरून विकायास न्यायाचे उपयोगी सूआदिकांचें एकजाडें करित असतात तो; २, एक काष्ठौषधी आहे.

गाजा, पु० रा० मुलांचे भाषेनें मेघास म्हणतात; उ० गाजा गाजा गाजूंदे, तवशी भोंपळी लागूंदे.

गांजा, पु० भांगेचे जेबूट तो.

गाजी, स्त्रिं० कीर्ती वाखाणा याजोगा प्रतापी.

गांजेकस, स्त्रिं० गांजा ओढायाचें जास व्यसन आहे तो.

गाटी, स्त्रिं० दे० कोणएकाचें ऐकन नाहीं मनास येईल तेंच करितो असाजो हट्टी मनुष्य तो.

गांठ, स्त्री० रज्वादिकांचे पदर परस्पर गुंतवून त्यांचीं शेवटें ओढिलीं असतां जो कांहीं मध्यें विशेष होतो तो; २, वृक्षादिकांचे आंगास जीं टेंगळें वाढलीं असतात तीं प्रत्येकीं; ३, तत्सदृश रक्तादिविकारानें जी मनुष्यादिकांचे शरीरावर उठते ती; ४, कांहींएक व्यवहारानुरोधानें तन्नामव्यवहारसंपादक कारकांचा तन्नामरूपें करून जो परस्पर संबंध होतो तो; उ० कागदाशीं आणि लेखणीशीं गांठ पडेल तेव्हां अक्षर निघेल; ५, परस्परांची दृष्टादृष्ट, उत्तरप्रत्युत्तर, इ० व्हायाजोगा जो त्यांचा सामीप्यसंबंध तो; उ० लागोपाठ चारदिवस त्याचे घरीं गेलों तरी त्यांची गांठ पडली नाहीं; ६, नाभिस्थानीं प्राण आणि अपान यांचा जो संधि आहे तो; ७, थोड्या दिवसांचा जो पोटांतील निरवयव गर्भ तो; व तत्सदृश जो रोगादिजन्य पोटांत गोळा लागतो तो; ८, यद्धिकरणस्थ द्व्यावर आत्मीयता असल्ये असा जो स्वसंबंधरूप अधिकरणविशेष तो, याचा प्र० प्रथमांत नाहीं; उ० माझे गांठीस जों चार रुपये होते तों खर्च केला; ९, कोणएक गोष्ट जाप्रकारें उक्त किं० मनानें चिंतित असल्ये ती त्याचप्रकारें घडल्यामुळें दृष्टोत्पत्तीस यावयाजोगा जो खरेपणा तीचा होतो तो; उ० जोशीबाबांनीं सांगीतलें होतें त्यास गांठ पडली; उ० त्याणें शंभर रुपये घेईन म्हटलें होतें त्यास गांठ घातली; १०, कोणएक कार्यानें आपल्या खर्चानें विवक्षित प्रमाणा धीचें जें आक्रमण होतें तें; उ० पांच शें रुपयांत लग्न करूं म्हणतां खरें पण हजार रुपयांस गांठ घालील; जीवाशीं गांठ, प्राणाशीं गांठ, इ० स्थलीं जीवादि जाण्याचा प्रसंग, ल० असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ, ल० बोलल्या बोलास गांठ पडली; रा० कोहींएक काम करण्यास गांठ पडणें, ल० अनुकूल पडणें.

गांठण, स्त्री० गांथण.

गांठणें, दोरी, सूत्र, इ० गांठ देउन सांधणें; २, मणी, इ० दोर्यांत ओंवून ग्रंथ्यादिकांनीं हार इ० नाना असें करणें किं० कोहींपदार्थ सूआदिकांचे ग्रंथींत अडकवून त्याशीं संबद्ध करणें; ३, ला० शब्द, रूप

म, इ० विवक्षित प्रकरणादिस्थलीं लेखनादिकानें संबद्ध करणें; ४, जाशीं विवक्षित कार्य कर्तव्य आहे त्यास स्वगतीनें सन्निध करणें, परंतु जो गमनादिव्यापार पारतंत्र्यास्तव केवळ आपल्या गतीनें च जेव्हां पाहिजे तेव्हां भेटावयाचा नव्हे असा जो मनुष्यादिक तद्विषयीं प्र०; ५, दे० कोणएक मनुष्यास आर्जवादियुक्तीनें स्वेछानुरूप फलद्रूप करून घेणें.

गाँठलें, न० अनेकपुनळ्या, मणी, इ० एकत्र संबद्ध करून गळ्यांत घालावयाकरितां भूषण करितात तें.

गाँठसोडवण, गाँठसोडावण, न० स्त्री० विवाहामध्यें नवरानवरी यांचे पदरांची गांठ सोडण्याबद्दल नवरीचे बहिणीस मान द्यावा लागतो तें ती.

गाँठळ, ३लिं० ज्या काष्ठाचे आंगास गांठी आहेत तें काष्ठ.

गाँठळगुंठळ, ३लिं० गांठळ, इ० रूप.

गाँठा, पु० एक कंठभूषण आहे जें मा० खंडोबाचे भक्तजन धारण करितात तो.

गाँठी, स्त्री० मा० शिमग्याचे महिन्यांत मुलांस द्यावयाकरितां खारीक, खोबरें, इ० पदार्थ एकत्र संबद्ध करून किं० साकरेचा पुतळ्या, इ० एकत्र संबद्ध करून जीमाळ करितात ती.

गाँठीचादाम, गांठीचामान, पु० दे० गांठसोडावण.

गाँठीहळद, स्त्री० हळदींत एकभेद आहे, जिचा आकार ग्रंथिसदृश असतो ती.

गाँठोडी, स्त्री० गठडी, ला० अर्थाचांचून.

गाँठोडें, न० वस्त्रें, धान्य, इ० अनेकपदार्थ वस्त्रांत घालून गुंडाळून गांठ घालून करितात तें; २, मा० नागपंचमीचे दिवशीं एकपक्वान्न करितात तें; किं० गुंफजें द्रव्य तें; उ० तुझे बापाचें गांठोडें एथे पुरलें नाहीं; गांठोडें गुंडाळणें, आटोपणें, स्रणजे मरणें किं० विवक्षित स्थळापासून निघून जाणें किं० पळून जाणें.

गाँठ्या, पु० गांठा; २, मा० शूद्रस्त्रियांचें एक कर्णभूषण आहे; ३, भाजीकराया करितां अळवाचे पानास ग्रंथि देउन करितात तो.

गाँठ्याळ, ३लिं० रा० गांठळ.

गाँड, स्त्री० गुदद्वार; गांडीवर घाव घेणें, स्र० कांहीं एक कार्यासि प्रवृत्त होउन लोकांनीं हंसावयाजोगें मागें मरणें, गांडीसहान पाडणें, पोंचणें, स्र० मातापित्रादिकांचा अनुरोध, इ० रूपजी अटकतींतून मुक्त होउन स्वच्छंदपणें वर्तावयास योग्य होणें; स्र० गांडीवरचा घाव शोकतोनये आणि दारवतोनये; स्र० गांडफाटे पण कपडानफाटे, या शब्दावरील अन्यसंप्रदाय बीभत्स समजून लिहिले नाहींत.

गाडगा, गाडला, पु० मृत्तिकेचें लाहान कुंभसदृश एक पात्र आहे.

गाँडगुडघा, पु० गांडीवर जो गुडघ्यानें केला प्रहारतो.

गाँडगुंडा, पु० गांडगुडघा.

गाडगें, गाडलें, न० गाडगा. स्र० ताकास आणुनमग गाडगें लपवूनये.

गाडणें, जमीन इ० त पुरणें.

गाँडभरू, ३लिं० मा० द्रव्यवानास निंदेनें स्रणतात.

गाँडमोरा, २लिं॰ पाडमोरा.

गाडली, स्त्री॰ दे॰ गाडी अर्थमात्रीं.

गाँडवळ, पु॰ काडू.

गाँडवळणें, कांहीं एक व्यापारीं प्रवृत्त न होउन लोकांनीं हंसावया जोगें मागेंसरणें.

गाडा, पु॰ आस दोन चाकें लावून ओसें इ॰ वाहावयासाठीं वाहन करितात तो; २, राहाटाचा जो वृत्ताकार अंश तो; ३, नांगर, उफ, इ॰ कांस बल याकार जें काष्ठ असतें तो, किं॰ तत्सदृश इतर धातू आदिकांचा असलातरी त्यास म्हणतात. गाडाभर काम करावें लागतें, गाडाभर भांडीं घांसावीं लागतात, एथें भारी असा अर्थ; त्याची अवघा गाड्यांवर वाहात्ये आहे, इ॰ स्थलीं त्यास अवरूनाहीं असा अर्थ. म्ह॰ गाड्यावर नाव, नावेवर गाडा हें चाललेंच आहे; म्ह॰ गाड्याची वाट ती गाडीची वाट; म्ह॰ गाड्यावरावर नळ्या सही यावा; चालिलाल नर गाडा, नाहींतर खोडा.

गाडानाडा, पु॰ दे॰ संसार संबंधी जो खटला त्यास म्हणतात.

गाडी, स्त्री॰ आला दोन चाकें असलेलें वाहन; २, रा॰ मोट, गलबताची कपी, इ॰ कांस बांधी जें दोर ओढावयाचें चाक असतें तो; ३, उफ, नांगर, पांचा जो गाडा त्यासही म्ह॰.

गाडीवान, पु॰ गाडीहांकण्याचें कसब करितो तो.

गाँडू, २लिं॰ विवक्षित कार्याविषयीं जो असमर्थ.

गाडेकरी, पु॰ गाडा हांकितो तो.

गाढ, २लिं॰ सं॰ निबिड; अज्ञान, अरण्य, अंधकार, निद्रा, इ॰ चें वि॰

गाढमूढ, २लिं॰ अतिशयित निर्बुद्धि वि॰.

गाढव, २लिं॰ लांब कानाचा एक पशू आहे; २, एक क्षुद्र जंतु आहे.

गाढवाचारवरारा, पु॰ निंदेनें मूर्खमनुष्यास म्ह॰.

गाढवी, स्त्री॰ गाढव पशुजातीची स्त्री ती.

गाढवीण, स्त्री॰ गाढवी.

गाठा, २लिं॰ आकसबामध्यें जो पुरुस तो; २, आंबा-ध्यें बहुत जलांश नाहीं असा जो घण सबजीचा घोंटा, तक्र, इ॰ तो; ३, ग्रं॰ बळात्कार जो तो; उ॰ मारिले ऐत्य गाढे जाचे पुराणी पोंवाडे.

गाँठळ, पु॰ दे॰ गांडवळ.

गाँठया, २लिं॰ गांठिया.

गाण, स्त्री॰ मा॰ डोंगरांत जें पाण्याचें स्थान विहिरीसारिखें परंतु उथळ असतें तो.

गाणें, ध्रुपद, ख्याल, इ॰ म्हणणें; २, न॰ त्या म्हणण्याचें उपयोगीं जें ध्रुपद, इ॰ तें; ३, ला॰ लांबच लांब कंटाळा यावया जोगी जी गोष्ट ते; ४, कंटाळा यावया जोगें जें पुनः पुनः भाषण तें; उ॰ पोरगें नेरया पुढें रडावयाचें गाणें लाविलें आहे; ५, देणें, घेणें, इ॰ खटल्याचें जें प्रकरण तें; उ॰ या सावकारीचे गाण्यांतून मीं मोकळा झालों म्ह॰ येईन; ६, स्तवणें; उ॰ साधुजन जेने निरंतर हरीनें गायलान; ७, गावणें हीनीया थानें युक्त होणें; म्ह॰ केलास कंटाळे तो गाणें, आणि कानफाटे तो लेणें.

गान, न॰ पलंग, खाट, इ॰ चे चोहों बाजूंचीं जीं चार लांकडें तीं प्रत्येकीं.

गानडी, गानाडी, स्त्री॰ गंधकाणी.

गात्र, न॰ सं॰ अंग मुख्यार्थी॰

गात्रभंग, पु॰ कांहीं एक विकारामुळें झालेली गात्रांस अशक्तता तो॰

गाँथण, स्त्री॰ कूड, साट, इ॰ चा कांबी इ॰ स मध्यें मध्यें आढ्या घालून एका दोरानें जें बंधन करितात तें॰

गाँथणें, कूड, इ॰ गांथणीनें संबद्ध करणें॰

गादणें, वस्त्र, जल, इ॰ मळानें युक्त होणें॰

गादा, पु॰ मत्स्यांत एक भेद आहे; २, रा॰ जल, तृप, इ॰ अनिज्ञायित मृत्तिकादिमलानें युक्त झालें असतां घट्टवस्थापन्न होतें तो॰

गादी, स्त्री॰ निजाया करितां किं॰ बसाया करितां वस्त्रांचे पोटीं कापूस, इ॰ घालून शिवून करितात ती; २, राजादिक प्रतिष्ठित जे अधिकारी त्यांचें बसावयाचें जें आसन ती; उ॰ राजाचे गादीस इतरानें पायला लावूं नये; ३, तंबाखू इ॰ कांहीं जिन्नस अनेकांनीं विकूं नयेत असा नियम असतां एकानें विकण्या विषयीं सर्कारांतून दृढ करून घेतला जो अधिकार ती; उ॰ मुंबईत तंबाखूची गादी आहे म्हणून दुसर्‍यास विकतां नये॰

गाँध, स्त्री॰ पित्तादि विकृती मुळें, किं॰ मुंगी, इ॰ डसल्यामुळें शरीरावरील त्वचा जाड होऊन गांठीसारिखी वर उठलेली ती॰

गाँधट, न॰ प्रा॰ मोठीजी गांध तें॰

गाँधाड, न॰ गांधट॰

गाँधिलमाशी, स्त्री॰ मक्षिकेंत एक भेद आहे जी चावली असतां गांध येते॰

गांधी, पु॰ प्रा॰ औषधी जिन्नस विकितो तो॰

गाँधीण, स्त्री॰ दे॰ मक्षिकेंत एक जाति आहे॰

गाँधील, न॰ रा॰ गांधिलमाशी॰

गान, न॰ सं॰ गाणें मुख्यार्थी॰

गाफील, गाफल, غافل, २, हिं॰ दुरवण्या मुळें जो असावध होऊन पडला तो किं॰ तत्तत्कार्यविषयीं जो असावध तो॰

गाबडी, गाभडी, स्त्री॰ काष्ठ, रुपया, इ॰ पदार्थांस पडलेले भोंक बुजवाया साठीं जो त्यादिकाणीं कपाट सविता ती॰

गाबडें, गाभडें, न॰ गाबडी॰

गाबळणें, उ॰ क्रमसंबद्ध जो पुस्तकादि पदार्थ त्याचा क्रम बिघडून तो अव्यवस्थित करणें; उ॰ पोरानें पोथी-चोपड्यें सारीं गाबळिलीं; २, पुस्तक, वस्त्र, इ॰ किंवा एक पदार्थांनीं थोंगळ लागावा जोगें प्रा॰ सजातीय पदार्थ समुदायामध्यें घालमेल लेले जाणें; उ॰ तुमचा घरांतल्ये चिरगुटांत कोठे मासापंचा गाबळला तो सांपडतच नाहीं॰

गाबाळ, पु॰ न॰ पानें, कागद, इ॰ किंवा एक पदार्थांचा समुदायांतून चांगला चांगला अंश निवडून घेउन अवशिष्ट राहिला जो बगळ सगळ तदंश तो नें; २, अनेक अवयवीं चे मोडके तुटके अनुपयुक्त अवयव एकत्र जमून झाला जो समुदाय तो; २, रा॰ उंसाचे पाचोळ्यांचा जो समुदाय तो, नें॰

गाबाळग्रंथ, पु॰ अनेक ग्रंथांचीं अनेक प्रकरणें संबंधपत्रें एकत्र होउन झालेंजें पुस्तक तें॰

गाभ, पु॰ मनुष्यादि जातीय स्त्रियांचे उदरांतील गर्भ; रा॰ गाभा सजाणें, ल॰ मनुष्येनरपशु-

दि स्त्री जातीनें गर्भधारण करणें.

गाभटणें, गोमहिष्यादिकांनीं पतिनगर्भ होणें, पभुदृनिः.

गाभडणें, दे. गाभटणें.

गाभडा, २लिं. दे. गुरंभा.

गाभण, गाभणा, २लिं. गर्भविशिष्ट जो पश्वादि तो; २, ला. उघडनसांगतां मोहोगम ठेविलीजी कांहीं एक गोष्ट, इ. तो; उ. तिकडलें वर्तमान गाभणें कशास ठेविलें आहा बोलाना.

गाभसाँडणें, स. गाभटणें.

गाभा, पु. माड, इ. किंवा एकवृक्षांचे शेंड्याचा जो भाग तो; २, ताडाचेंजें कोंवळें नांडक तो; ३, केळीचे झाडाचे आंतलाजो अंश तो; ४, वृक्षादिकांचा पोटीं जोफार चकठीण अंश असतो तो.

गाभारा, पु. गर्भारा; २, दे. तदासन्न दुसरा आवृत प्रदेश ही.

गाभारी, स्त्री. स. लाहान जो गर्भारा ती.

गांभीर्य, सं. न. गंभीरपणा.

गाभुडणें, दे. गाभडणें; २, वा. गुरंमळणें.

गाभुळणें, दे. गुरंभळणें; २, आम्लफलानें उमळणें.

गाय, स्त्री. शिंगें असून जीचे गळ्याखालचीं कातडी लोंबत असतें अशी एकपशु जाति आहे त्यांतील जी स्त्री ती; २, ला. २लिं. स्वभावानें जो गरीब तो; उ. तो केवळ गाय आहे; ३, एकपक्षी आहे. गाईपाण्यावर येणें, स. अस्फुटान्न्यायाजोगे पाण्यानें डोळे भरून येणें.

गायक, २लिं. गाण्याचें कसब आपले अंगीं बाळगतो तो.

गायकी, स्त्री. गायकाचे गाण्याची तऱ्हा; उ. हिंदुस्थानी गायकी निराळी, दक्षिणी निराळी.

गायचाळा, पु. एक खेळ आहे.

गायदूम, २लिं. अनुक्रमें करून गोपुच्छासारिखा उत्तरोत्तर निमोळ असतो जो पदार्थ तो.

गायन, न. गाण्याचा व्यापार; २, तदुपयोगी जें ध्रुपद, इ. तें.

गायमुख, न. पाणी वाहाया करितां गाईचे मुखा सारिखें दगडाचें मुख करून लाविलें असतें तें.

गायरान, न. गोपचार.

गायरूं, न. अगणनीयत्वें करून वर्णन कर्तव्य असतां कोणी गाईला ल.; २, ला. मनुष्यास ही ल.; उ. तो बापडा गरीब गायरूं.

गार, स्त्री. एक पांढरा धोंडा आहे; २, पर्जन्योदक घट्ट जमून जा खडेसारपरेचे खडयांसारिख्या पडतानती; उ. आज गारांचा पर्जन्य पडला; ३, २लिं. अतिशीतस्पर्शविशिष्ट जें जलादिक तो; उ. गारपाण्यांत स्नान करूंनको पडसें होईल; आगरांतली जमीन डोंगरी जमिनीपेक्षां गार असते; ४, हिरवेपणाचा अतिशय वर्णाचा असतां याचा योग होतो; उ. जंगलारंग कसा, हिरवा गार दिसतो हें झाडकसें हिरवें गार दिसतें; ५, थंडपणाचा अतिशय द्योतक ही याचा योग होतो; उ. त्या पाण्यापेक्षां हें पाणी कसें थंडगार आहे गार होणें, स. विवक्षित पदार्थ प्राप्तीमुळें सुस्त होणें लिं. गेलगार इ. नाहींसा होउन निरुपायतेमुळें स्वस्थ राहाणें.

गारगोटा, पु॰ पांढरा वाटोळा धोंडा.

गारगोटी, स्त्री॰ गारगोटा.

गारठणें, अतिशयित शीतस्पर्शानें युक्त होणें; उ॰ एवढ्या सकाळचें आंघोळीकरितां दह्यिवरानें पाय गारठतील.

गारठा, पु॰ जलादिपदार्थांचे आंगीं स्पर्शवेद्य जो शीतत्वातिशय असतो तो; उ॰ एवढा वेळ नापतें आहे तरी अजून पाण्याचा गारठा मोडत नाहीं; २, हेमंतऋतु, पर्जन्य. इ॰ तत्संबंधी जो थंडीचा अतिशय तो; उ॰ आज भारी थंडीचा गारठा पडला आहे.

गारबी, गारभी, स्त्री॰ एक वेल आहे आणि तीचें बीसही स्त्री॰

गारवा, पु॰ गारठा.

गारिंवठा, पु॰ बा॰ गारठा.

गारुंडा, पु॰ दे॰ गारठा.

गारुडी, पु॰ सर्पादिक बाळगून त्याजवर पोट भरितो तो.

गारूड, न॰ इंद्रजाल; २, ला॰ दुसऱ्यास फसवावयाजोग्या अनेकप्रकारचा युक्तींचा जो समुदाय तें.

गारोठा, पु॰ दे॰ गारठा.

गारोंडा, पु॰ दे॰ गारठा.

गारोडी, पु॰ गारुडी.

गाऱ्हाणें, न॰ गऱ्हाणें.

गाल, पु॰ मुखाचे बाजूंचे जे दोहींकडील भाग ते मलेकीं; उ॰ अरे त्याणें डाव्या गालावर मारलें तर उजवा पुढें करावा पण बोलूं नये.

गाल

गालगुच्चा, पु॰ गालास जो बोटांनीं चिमटा घेतात तो.

गालगुंड, न॰ गालांत लाहान लाहान गांठी उत्पन्न होउन ते फुगतात असा एक रोग आहे.

गालफट, न॰ गालाचे आंतील किं॰ बाहेरला प्रदेश.

गालफुगी, स्त्री॰ गालगुंड.

गालफें, न॰ गालगुंड.

गालबोट, न॰ दृष्टिबंधानें ह्मणून गालास जो रंगाचा ठिपका लावितात तें.

गालविंधा, पु॰ गालगुच्चा.

गालिचा, पु॰ قالیچہ हिं॰ प्रतिष्ठित लोकांचें बसायाचे उपयोगी एक चित्रवर्ण उर्णावस्त्र आहे.

गालिप्रदान, न॰ शिव्या देण्याचा व्यापार.

गाली, स्त्री॰ शिवी.

गाँव, पु॰ न॰ जास्त्रलीं घरें बांधून मनुष्यांची चिरकाल वसती असते तो किं॰ तत्सीमावधि प्रदेश; २, ला॰ त्या स्थलीं राहणारा जो मनुष्यादि समुदाय तो; उ॰ पंदांदंग्यामुळें किती क गांव पडून गेले; ३, योजन; उ॰ या गांवाहून काशी दाहा गावें आहे; कांहीं एक गोष्ट गांवीं असणें, नसणें, इ॰ स्थलीं लक्ष्यांत असा अर्थ; उ॰ या शब्दाचा क्रम चुकला हें मासा गांवींच नाहीं; स्त्री॰ गांव आहे तेथे माहारवडा आहेच; स्त्री॰ गांवास गेला आणि गांवचा साला.

गाँवकर, पु॰ रा॰ गाँवचा भूदान देवस्कीचे मानपानाविषयीं एक अधिकारी आहे.

गाँवकरी, पु॰ जा गाँवांत जाचें घरदार आहे तो त्या गांवचा; उ॰ त्या गांवचे सर्व गांवकरी आम देवळाजवळ मिळाले होते.

गाव

गाँवकी, स्त्री॰ कों॰ सगळ्या गांवाबर जो कांहीं एक जड अवघड विषय प्राप्त होतो ती किं॰ तद्विषयक जो सर्व ग्रामस्थ मिळून विचार करितात ती॰

गाँवकुटार, कुठार, २लिं॰ गावांत राहून तत्संबंधी लोकांस खराबींत आणाया साठीं चाहाडी इ॰ वाईट कर्मे करितो तो॰

गाँवकुसुं, न॰ सर्व गांवा भोंवती जी भिंत घातली असते तें; २, ला॰ धोत्रजोडा, शेला, इ॰ किंवा एक वस्त्रांस जो रेशीम कलाबतू यांचा कांठ असतो तें॰

गाँवखर्च, पु॰ पंडित, गोसांवी, फकीर, इ॰ स ग्राम संबंधें द्रव्य, शिधा, सामग्री, इ॰ देतात तत्संबंधी जो खर्च तो॰

गाँवखुरी, अ॰ दे॰ गांवाचे आसपास॰

गाँवगन्ना, अ॰ माहाल, तालुका, इ॰ कांचे पोटचेजे अनेक गांव त्यांसर्वांस प्रत्येकीं विवक्षित करून; उ॰ गावगन्ना ताकीद करून सर्वलोक बलावून आणा; याजकरून कदाचित् गांवगन्ना करून, गांवगन्नाचा, इ॰ कांहीं विभक्ति ही होतात॰

गाँवगिरी, २लिं॰ रा॰ गाँवढू॰

गाँवगुंड, २लिं॰ गारुडयांस जिंकाया साठीं त्याची विद्या शिकतो तो; २, ला॰ आंगीं तादृश विद्या नसतां जो दुसर्‍यांस जिंकण्या विषयीं प्रवीण तो, किंवा नानाप्रकारचा लबाडया इ॰ रूप गांवांत खेळ करितो तो॰

गाँवगुंडकी, स्त्री॰ गाँवगुंडपणा॰

गाँवचलन, चलनी, २लिं॰ जागावांत जा रुपयादि नाण्याची चाल आहे तें रुपयादि नाणें त्या

गांवीं॰

गाँवचाडोळा, पु॰ ग्रामनेत्र॰

गाँवजोशी, पु॰ ग्रामजोशी॰

गाँवठी, २लिं॰ बंदरी, घांटी, बाजारी, इ॰ संबंधी पदार्थांची व्याख्या करणें व्यर्थ असतां प्रा॰ स्वग्राम संबंधानें किं॰ स्वग्रामासन्न ग्रामसंबंधानें उत्पन्न जो पदार्थ त्यास ल्॰; उ॰ बाजारी तुपापेक्षां गांवठी तूप नामीं॰

गाँवठू, २लिं॰ गाँवठी॰

गावडा, पु॰ रा॰ शूद्रांत दोन जाती आहेत, एक मीठ पिकविताना आणि एक कान उत्पन्न करितात॰

गाँवडुकर, २लिं॰ डुकर जातींत एक भेद आहे जें प्रा॰ गांवांतच राहातें॰

गाँवडुकरीण, स्त्री॰ गांवडुकराचे जातीची स्त्री॰

गाँवढळ, २लिं॰ मोठ्या मनुष्यांची रीत भांत जास कळत नाहीं आणि प्रा॰ गांवढ्ये गांवांत राहातो असा मनुष्य तो व त्याचा भाषणादि व्यवहार॰

गाँवढें, न॰ लाहान गाँव॰

गाँवढेकर, २लिं॰ नित्यशः जो गांवढ्यांत राहातो तो॰

गाँवढेकरीण, स्त्री॰ गांवढेकर्याची स्त्री॰

गावणें, सांपडणें; २, कांहीं एक कर्तव्य गोष्टीचा उद्योग यानें बहुतदिवस युक्त असणें; उ॰ काशीस जावें काशीसजावें असें दोन वर्षे गावत होतां॰

गाँवदरी, स्त्री॰ रा॰ गाँवाचे आसपासचा प्रदेश; उ॰ आताशीं वाघ रात्रीचा गांवदरीस येत असतो; याचा प्र॰ प्रा॰ प्रथमांत होत नाहीं॰

गावदी, २लिं॰ अस्ताव्यस्त वेश असून जो अज्ञा

गळ मनुष्य तो.

गाँवदेवता, स्त्री० ग्रामदेवता शब्दाचा अपभ्रंश.

गाँवशींव, पु० स्त्री० गाँव इ० तो; उ० मला त्याचा गाँव शींव ठाउक नाहीं; त्याची गांवशींव मीं सांगेन.

गावा, पु० गावणें हिंदी यार्थाचा व्यापार.

गावी, स्त्री० सोनाराचें एक आउत आहे.

गाँवीक, २ लिं० रा० सर्वगांवांस जें साधारण पाणी, शेत, खर्च, इ० तो, जाजवर एकाची सत्ता नसते.

गाशा, पु० दुहेरी वस्त्र आहे वरत्ये आंगास सकलादीचे तुकडे व आंतल्ये आंगास खंडकी असे मिळून शिवून बसायाचे उपयोगी करितात तो; गाशा गुंडाळणें, आटोपणें, इ० स्थलीं आपलें बिऱ्हाड आटपून पटून जाणें किं० व्यवहार आटोपणें किं० मरणें.

गासलापुरकरणें, कोणएकानें पळून जाणें; उ० सर्कारचें धरणें येतांच त्याणें गासलापूर केलें.

गाहाण, न० उत्तमर्ण अधमर्णास पैका देतेसमयीं तो उगवेल नउगवेल म्हणून विश्वासार्थ जो माल ऐवज घेतो तें.

गाहाणवट, २ लिं० सावकाराकडे गाहाण ठेविलेलें वस्त्र.

गाहाळ, २ लिं० जागमध्यें अव्यवस्थितपणा बहुत आहे असा जो मनुष्य वस्त्याचा कारभार, इ० तो; २, ३ लिं० गैरिल्हेस लागल्यामुळें सांपडेनासा झाला जो कागदपत्र, इ० तो.

गाहाळणें, उ० कागदपत्र, इ० गैरिल्हेस लागणें व लागत असें करणें.

गाळ, पु० जलादिकांचे तळीं जमलेला मळ असतो तो; २, कांहीं एक पदार्थांतून गाळून किं० निवडून चांगला चांगला अंश घेउन अवशिष्ट राहिला जो वगळ सगळ अंश तो; उ० चांगलीं बांगीं होतीं तीं खपलीं आतां गाळ राहिला आहे; उ० गाळाचे तपकिरी-चारंग फिकाहोतो; ३, स्त्री० शिवी.

गाळणा, स्त्री० दुरवणें, इ० कारणामुळें किं० एककालीं अनेकरवटीं उपस्थित झाल्यामुळें मनुष्यादिकांस जी दुरवस्था प्राप्त होत्ये ती; २, कांहीं एक व्यापाराचा, किं० पदार्थाचा यथास्थितपणा बिघडल्यामुळें त्या व्यापाराची किं० पदार्थाची किं० त्या व्यापारकर्त्याची जी दुर्दशा होत्येती; ३, रा० कांहीं एक हितोपदेशादि वाक्याचा तिरस्कार बुध्या जो अनादर ती; उ० मीं गोष्ट सांगतों हिची तुम्हीं गाळणा करूंनका; ४, न० गाळायासाठीं वस्त्रावर एकवार घेतला जो चूर्णादि पदार्थ तें.

गाळणें, जलघृतादि पातळ पदार्थ किं० कुटणें, इ० व्यापारानें बारीक केला जो पदार्थ त्यांतील अविवक्षित मलांश काढायासाठीं तो पदार्थ वस्त्रादिकांवर घालून चांगला अंश पात्रांत पडे असें करणें; उ० हें तूप गाळून पाहा त्यांत किती बेरी आहे ती समजेल; २, घाणा, इ० यंत्रांत घालून तिलादि पदार्थांचा द्रव काढणें; ३, अग्निसंयोगानें मळ घालवून सुवर्णादि धातू निर्मल करणें; ४, प्रस्तुतक्रमास आलीजी गोष्ट, पदार्थ, इ० तो वगळणें; उ० त्याणें सर्व सांगीतलें पण मध्यें एक गोष्ट गाळिली; सगळा गांव बलाविला पण चार घरें गाळलीं;

५, पक्ष्यांनीं स्वपक्ष संबंधी पिसें टाकणें, आंडीं गाळणें, हातपाय गाळणें, इ० कोठीं एक कार्यास आरंभ करून साला किं० प्रवृत्त होण्या विषयीं सिद्ध साला जो त्याणें त्याविषयीं माघार घेणें; ६, गाळण्याचें साधन जें वस्त्रादि० ·

गाळा, पु० चौकट, इ० पदार्थांचे गभीचें जें प्रमाण तो; उ० या चौकटीचा गाळा दोन गज आहे, २, रा० पाण्याचे नेटानें वाहावून जागोजाग जमून बसतो जो पात्येरा, केर, कचरा, तो; ३, दे० स्वच्छ पिंजलेला कापूस; ४, चूर्णादि पदार्थ गाळून घेतल्यानंतर अवशिष्ट राहातो जो गाळ तो; ५, रा० धान्यादिकांतील जो केर, कचरा निघतो तो ·

गाळींव, वि० गाळलेला जलचूर्णादि पदार्थ; २, ला० अत्यंत या अर्थाचें द्योतक सोदा, लुच्चा, लबाड, यांचें वि० उ० गाळींव सोदा आहे ·

गाळींववस्त, वस्तू, स्त्री० अत्यंत जो शाहाणा, लबाड, इ० ती ·

गाळ्यारा, वि० ना० गाळी देण्याचा स्वभाव जाचा तो ·

गिचाड, न० गचाड ·

गिजगिजीत, वि० जलांश विशेष राहिल्यामुळें मृदु झालेला भात, भाजी, भाकर, इ० किंवा एक पदार्थ तो ·

गिटकडी, स्त्री० गात्येसमयीं गळ्यांत जो कंप घेतात ती ·

गिंडी, स्त्री० लाहान तोंडाचें चंबूसारिखें एक पात्र आहे ·

गिधण, न० दे० एक औषधी आहे ·

गिधाड, न० एक पक्षी आहे ·

गिधाडा, पु० रा० गिधाड ·

गिमवस, स्त्री० ग० उन्हाळे दिवशीं पाणी लावून पिकविलान जें भात, नाचण्या, इ० ती ·

गिमवा, पु० रा० उन्हाळेदिवशीं पिकतो जो नाचणा तो ·

गिमाळा, पु० रा० उष्णकाळ ·

गिरा, पु० रा० राहु; २, गिरावळ ·

गिरावळ, स्त्री० रा० अत्यंत रोडकें पोर ··

गिराशी, पु० मनुष्यांत एक जाति आहे ·

गिरि, पु० सं० पर्वत मुख्यार्थी; २, गोसाव्यांत एक भेद आहे ·

गिरिकंदर, न० पर्वतादिकांचा गुहा

गिरिघोंटी, स्त्री० रा० ओंवळया भोंवळया; २, ला० गिर्दी ·

गिर्कांडा, गिर्कांडी, पु० स्त्री० चक्रासारिखें भोंवतें फिरण्याचा व्यापार; २, ला० सरळमार्ग सोडल्यामुळें जो फेरा तो; ३, भाषणादिकामध्यें जो दूरान्वयीपणा, इ० तो ·

गिर्की, स्त्री० गिटकडी; २, मंडलाकार फिरण्याचा प्रकार; ३, पित्तादिविकृतीमुळें जी घेरी येते ती ·

गिर्गिर, अ० गरगर भ्रमणार्थी ·

गिर्गिरें, न० किरकिरें सणून जें मुलांचें खेळणें तें; २, कागद, इ० चें पुष्पकरून पोकळ नळीमध्यें त्याचा दंड घालून वायूचेसमोर धरिलें असतां गरगर फिरतें तें ·

गिर्दी, स्त्री० गिर्कांडा; २, क० विवक्षित कार्य न होतां उगीच एकाचे स्थळीं खेप पडते ती ·

करितात ती.

गिऱ्हा, पु॰ पाण्यांतील एक पिशाच आहे; २, राहु; ३, ३लिं॰ ला॰ चांगलें जेवीन खान अमून मेंरोड केंपोर असनें तो.

गिऱ्हाइकी, स्त्री॰ जिन्नस घ्यावया करितां दुकानावर येण्याजाण्याची गिऱ्हाइकांची वहिवाट.

गिऱ्हाईक, ३लिं॰ दुसऱ्यापासून जिन्नस विकत घेणारा जो तो त्याप्रसंगीं; २, ला॰ गुणादिकांचा जो ग्राहक तें; उ॰ तुमे गुणास कोणी गिऱ्हाईक नाहीं; जीवाचा गिऱ्हाइक; प्राणाचा गिऱ्हाइक होणें, एथे जीव प्राण ग्रहण करणारा होणें.

गिऱ्हावळ, स्त्री॰ गिऱ्हाइकांची यादी.

गिलगिल्लान, ३लिं॰ गलगल्लान.

गिलावा, पु॰ भिंत, इ॰ इमारत बांधून नीचें वरलें आंग साफ व्हावया करितां चुना किं॰ माती, इ॰ चा जो लेप देतात तो.

गिल्ला, पु॰ हिं॰ नालिश; २, प्रपंचादि खटल्यासंबंधी जें रडगाणें तो; उ॰ याला जेव्हां तेव्हां संसाराचे गिल्ले लोकांपाशीं सांगावे अशी खोडच आहे.

गिळंकृत, न॰ दुसऱ्याचीदेव इ॰ गिळण्याचा व्यापार; करधा॰ योगीं प्र॰उ॰ सर्वद्रव्य गिळंकृत करून बंधूस नाहीं म्हणोन सांगतो.

गिळणें, कांहींएक पदार्थ तोंडांत घेउन गळ्याचे आंत उतरणें; उ॰ मला कोर्डा भात गिळत नाहीं कांलवण असलेंतर गिळेल; २, ला॰ देव इ॰ गिळंकृत करणें; ३, अन्यकृत जो अपराध किं॰ शिवी गाळ इ॰ त्यांचा प्रतीकार न करितां राहाणें; उ॰ त्याणें त्याला एवढया शिव्या दिल्या परंतु त्यांणें गिळल्या; ४, क्रोध, रडें, इ॰ प्रकट न होंउं देतां आंतल्या आंत आटोपणें; रू॰ गिळेल तितका घांस घ्यावा; रू॰ भाशानें माणीक गिळलेलें हानीं येत नाहीं.

गीत, सं॰ न॰ गायन; २, पु॰ छंदोबद्ध गाण्यांतील एक भेद आहे; ३, न॰ दक्षत्वेसमर्थीं किं॰ विवाहादि समयीं जाओव्यागातानतें; ४, ला॰ नावें गीतगाणें, एथे कोणीं बरेंकेलें त्याची त्याचेपरोक्ष स्तुतिकरणें; गीतगाणें, रू॰ कोण एकाजवळ आपली सर्व हकीकत सांगणें किं॰ रडगाणें; होतें तें गीत गाइलें, एथे कांहींएक कर्तव्यजें कार्यादि तें केलें किं॰ सांगायाचें होतें तें सांगितलें. रू॰ जात्यावर बसलें म्हणजे गीत आठवतें.

गीति, सं॰ स्त्री॰ आर्या छंदांत एक भेद आहे.

गीता, सं॰ स्त्री॰ ईश्वराचे तारप्रोक्त भगवद्गुणादि वर्णन जींत आहे असेजे पुराणाचे लाहान लाहान अंश ते प्रत्येकीं ती; उ॰ भगवद्गीता, शिवगीता, नारदगीता, इ॰.

गीध, पु॰ गिधाड.

गीम, पु॰ रा॰ गिमाळा.

गीर, पु॰ गरप्रथमार्थी.

गीर्वाण, सं॰ पु॰ देव; २, ३लिं॰ संस्कृत भाषाहनिः २, दे॰ न॰ आंगरख्याचें मानेचा जो वरच्या चा तुकडा तें.

गुरवाड, गुरवाडी, स्त्री॰ चहूंकडे विस्तापडलेली आहे जास्थलीं तें स्थल ती.

गुंग, ३लिं॰ ज्वरादिकांमुळें किं॰ केफ रचाल्यामुळें मोहयुक्त किं॰ शास्त्रादिकांतील कठिनांश पुरतेपणीं

पणी मनांत नआल्यामुळें मोह पावून पराङ्मुख किं॰ गायनादि विषयीं तदेकता नसल्यामुळें इतर व्यापारीं अनासक्त अशी जी मनोवृत्ति, चित्त, इ॰ तो; २, तद्विशिष्ट मनुष्यादि॰

गुंगणें, गुंग होउन बुडूंलागणें; २, वर्ण नउच्चारितां हुंहुंहुंहुं अशें नासिकास्वरानें हुंहुंहुंहुं असें गायन करणें; ३, भ्रमरानें गुं असा शब्द करणें; ४. तत्सदृश खेळाचा भोंवरा, इ॰ कानें शब्द करणें॰

गुंगारा, पु॰ कोणएकास फसवून पळण्याचा व्यापार; दे॰ भा॰ योगीं प्र॰ उ॰ त्याणें मला गुंगारा दिला, स्व॰ मला फसवून पळोन गेला॰

गुंगी, स्त्री॰ गुंगपणा॰

गुगूळ, पु॰ एक रूक्षासिक वीक आहे॰

गुग्गुल, सं॰ पु॰ गुगूळ॰

गुघाण, स्त्री॰ रा॰ कांहीं एक पदार्थ, व्यवहार, यांची अतिशयित सालेली दुर्दशा॰

गुच्ची, स्त्री॰ रा॰ उच्ची॰

गुच्चा, पु॰ पाटयांचे खेळांत दुसर्‍या गड्यास फसवून पळून जाण्याविषयीं जाहुलकारणें दारवधिनात त्या प्रत्येकीं तो; २, एका भोंवर्‍याचे आरीचे प्रहारानें दुसर्‍या भोंवर्‍यावर उडतें जें चिन्ह तो॰

गुच्ची, स्त्री॰ गुच्चा मथमार्थी॰

गुच्छ, सं॰ पु॰ अनेक अवयव अतिशयित निबिड संबंध असल्यामुळें भरदार दिसतें जें मरवमाल, वटमोगरा, यांचें पुष्प तो किं॰ तत्सदृश जो अनेक मौक्तिकादिक एकत्र गुंफून करितात तो॰

गुंज, स्त्री॰ लता आहे ती व तिचें जें रक्तवर्णादि जोखायाचे उपयोगी पडत असतें बीज तो, जा एकतोळा-

स

शा हाण्यच लागतात; २, रा॰ स्त्री॰ न॰ वृक्षादिकांचे आंगास जी गांठ असते ती तें॰

गुंजट, न॰ रा॰ गुंज हितीयार्थी॰

गुंजडी, स्त्री॰ सूत्र गुंडाळून त्याची वर्तुळ गोडी करितात ती॰

गुंजडें, न॰ गुंजडी॰

गुजर, २ लिं॰ गुजरात देश संबंधी वाणी लोकांत एक जाति आहे॰

गुजरणें, गुदरणें॰

गुजराण, स्त्री॰ अन्नद्रव्यादि सामग्रीनें जो संसारादिकांचा यथाकथंचित्‌ निर्वाह तो॰

गुजरात, गुजराथ, स्त्री॰ एक देश आहे॰

गुजराथी, २ लिं॰ गुजराथ देश संबंधी मनुष्य, भाषा लीपि, इ॰ तो॰

गुजरी, स्त्री॰ सायंकालचे समयीं ऐन भरानें भरतो जो बाजार ती; २, लुगड्यांत एक जाति आहे; ३, बा॰ स्त्रियांचें एक पादभूषण आहे; ४, ३ लिं॰ गुजर संबंधी जो वेष, इ॰ तो॰

गुजरीण, स्त्री॰ गुजर जातीचे स्त्रीस दाक्षिणात्य लणतात॰

गुंजवला, पु॰ दे॰ एक साड आहे; २, मेणाचे गोळ्यास भोंवत्या बीजरूप अनेक गुंजा चिकटवून मुलास क्रीडार्थ गुच्छसदृश करितात तो॰

गुंजाडा, पु॰ एक साड आहे; २, दे॰ गुंजवलाहितीयार्थी॰

गुजारत, स्त्री॰ देणें, घेणें, इ॰ व्यवहारीं प्रसंगीं साक्ष्यादिकर्मा विषयीं उपयोगी पडावा करितां कोणएकाचे समक्षतेचा त्या व्यवहारावर संबंध करून

ठेवि

देविताना ती कि० उभयतां व्यवहारकरणारे मध्यस्थ पणें कोण एकास घेउन त्याची द्वारभूतता त्या व्यवहारावर करितात ती; उ० भटजी बायांनीं जिन्नसनेला यास तुमची गुजारत लाविती; उ० आह्मांस तुमचे गुजारतीनें कापड घ्यावयाचें आहे; २, खर्डा, कीर्द, इ० लेखांत अमुकाचे गुजारतीनें या अर्थी गुजारत अमुक असें लिहित असतात.

गुंजारव, पु० भ्रमरांचा शब्द; उ० गुंजारव विसरुनि भ्रमर मुरतीनें लालेमग्न.

गुंजारा, पु० गुंजारण.

गुंजावीस, स्त्री० ईषन्मात्र न्यूनाधिकभाव; उ० या हिशेबांत कांहीं गुंजावीस दिसत नाहीं.

गुंजुन्ना, पु० क० गुंजवला.

गुटकळी, स्त्री० दे० गटंगळी.

गुटका, पु० घुटका.

गुटमळणें, दे० कांहींएक गोष्ट करावी नकरावी अशे विचारांत पडणें; २, गुपटणें.

गुटिका, सं० स्त्री० रसायनादिकांची गोळी.

गुंठळी, स्त्री० दे० रक्त, रस, इ० जमून जी गोळी होत्ये ती.

गुठा, पु० बा० नांगरलेली जमीन सारिखी करावयाचें एक यंत्र आहे.

गुठावणें, बा० नांगरलेली जमीन गुठ्यानें सारिखी करणें.

गुंठें, न० बा० गुठा. गुंठें घालणें म्हणजे नुडविण्याचे व्यापाराने वस्त्रादिक मळके अमें करणें.

गुड, सं० पु० गूळ.

गुंड, पु० आकारविशेषाचें धातुमय एक पात्र आहे.

गुडगुड, अ० गुडगुड शब्द होईसें, गुडगुडी, इ० चे शब्दाचें अनु० वाज, इ० चें वि०.

गुडगुडणें, नारळ, इ० नीं गुडगुड शब्दविशिष्ट होणें.

गुडगुडा, २ लिं० जा फळाचे पोटांतील अंशशुष्क होउन तो खवंशापासून सुटून हालविलें असतां गुडगुड शब्द व्हावा जोगा साला तें नारळ. उंउयें, इ० फळ तो.

गुडगुडी, स्त्री० तमाखु आदि करून किंवा एक पदार्थांचा धूम्र भाशन करण्याचे उपयोगी एक यंत्र आहे.

गुडगुडीत, २ लिं० रा० शरीरानें नेमस्त पुष्ट जो मनुष्यादि तो.

गुडगुडें, न० रा० नारळाचा गोटा.

गुडघा, पु० पायांचे मध्यभागाचे सांध्यांचा जो भा० उपरिभाग तो; २, ला० पाठबळ; गुडघे टेकणें ल० कांहींएक व्यापारीं थकणें; रा० गुडघ्यावर हात येणें, देणें, ल० वाईक्या मुळें गुडघ्यांवर हात टेकून उठावा जोगी दशा प्राप्त होणें.

गुडघी, स्त्री० गुडघ्यास एक रोग होत असतो ती; २, गुडघ्यारखालीं रुमारी चार बोटें पर्यंत लांबी चे बेताचा जो चोळणा असतो ती.

गुडणें, गुदणें, कोणएकानें मरणासंमुख होणें; उ० तो मराया ला गुदला आतां लग्न कशाला पाहिजे.

गुडदा, पु० शस्त्रविशेष आहे.

गुडदी, स्त्री० दौत, शिसा, इ० लाहान तोंडाचे पात्राचे तोंडीं आंतील पदार्थांचे संरक्षणार्थ बस-

वितान जो काष्ठ, इ॰चा तुकडा,

गुडधावणें, वा॰ मृत्तिकादिक तुडविणें.

गुंडा, पु॰ वाटोळा धोंडा; २, सूत, दोरी, खांब, इ॰चा गुंडाकून जो प्रा॰ वर्तुळ गोळ्यासारिखा करितात तो; २, सं॰ आटोकाट शाहाणा.

गुडारबू, स्त्री॰ नंबारबू आणि गूळ असें एकत्र कुटून गोळा करून ठेवितात ती; २, ना॰ दुर्दशा; प्रा॰ सजी वस्तुः.

गुंडाळणें, कांहीं एक पदार्थ भोंवतें सूत्रादिक वेष्टणें किं॰ तो पदार्थ वेष्टिला जाई असें सूत्रादिकानें करणें; २, प्रस्तुत जें वस्त्रादिक त्याचा एक अंश दुसरे अंशानें वेष्टिन, दुसरा तिसरे अंशानें वेष्टिन, इ॰री तीनें तें वस्त्रादिक आकुंचितावयव होई असें करणें; ३, कांहीं एक कार्यार्थ प्रस्तुत जे पदार्थ ते एकत्र आटोपून ठेवणें; उ॰ सारे कागदपत्र रुमालांत गुंडाकून ठेव; ४, ला॰ वाद, कज्जा, इ॰ कांमध्यें एकाचा सपराजित करणें; ५, कांहीं एक विषय हातावेगळीं घालणें, परंतु तो विषय केवळ दुसऱ्याचा किं॰ साधारण सत्ताक असतांचप्र॰; उ॰ यास्तान नाहीं म्हणून चार शेतें होतींतीं दायादानीं गुंडाळिलीं; जीव, प्राण, शक्ति, इ॰ गुंडाळणें, म्हणजे त्यांची जी शरीरामध्यें सर्वव्यापि असल्ये तीणें आकुंचित होउन यत्किंचिदूपें एकत्र राहाणें.

गुंडळी, गुंडाळी, स्त्री॰ सूत्रादिक गुंडाळिलें असतां जो आकार विशेष होतो ती.

गुंड, गुंडाळें, न॰ गुंडाळी.

गुडी, स्त्री॰ वर्षप्रतिपदा युत्साहदिनीं एक खांबकाठी स प्रा॰ सोवळ्याचें वस्त्र संबद्ध करून गृहादिकांपुढें उभा

उभारितात ती.

गुंडी, स्त्री॰ नवार, खांब, सूत, इ॰ गुंडाकून जी गोलाकार करितात ती; उ॰ नवारी चीं गुंडी करून ठेव, म्ह॰ पलंग बलायास बरेंपडेल; २, तृणादिकाचे शेंड्या कडील भागीं किं॰ बुंध्याकडील भागीं बंद बांधून जी पेंढी करितात ती; ३, आंगरखा, इ॰ चे बिरड्यां न अडकवाया साठीं लाहान गोळी सारिखी शिवून करीत असतात ती; ४, लाहान जो गुंड तो.

गुडीपाडवा, गुढीपाडवा, पु॰ चैत्रशुक्ल प्रतिपदा.

गुडुप, गुडुप्प, न॰ कोणएक स्थलीं झालेलें अंधकार बाहुल्य; उ॰ दिवेपालवतांच घरामध्यें गुडुप झालें; गुडुप्प निजणें म्ह॰ डोळ्यावरून पांघरूण घेउन स्वस्थ निजणें.

गुडूची, सं॰ स्त्री॰ गरूळ.

गुंडें, न॰ रा॰ गुंडी प्रथमार्थी.

गुदार, न॰ दंग्यामुळें पळून आलेला मनुष्य समुदाय.

गुदी, स्त्री॰ गुडी; २, परदेशीं मेलेल्या मनुष्याचें वर्तमान; उ॰ गोमाजीपंत मेल्याची काल च लष्करांतून गुदी आली; ३, दे॰ देवास कांहीं प्रभादिपुसायाचें असतां जात्याचे डाव्ये उजव्ये आंगास लाहान लाहान गोट्या लाविलेल्या त्या प्रत्येकी; उ॰ देवानें त्या विषयीं डावी गुदी दिल्ही की उजवी.

गुण, सं॰पु॰ सत्व, रज, तम, हे तीन, वरूप, रसादि चतुर्विंशति, चवदा विद्या चौसष्ट कला, वसत्य, शौर्य, औदार्यादि जे धर्म ते, वतन्नत्पदार्थनिष्ठ जे स्वभावसिद्ध किं॰ कृत्रिमजन्य धर्मविशेष ते, इ॰ सर्व प्रत्येकीं; २, दुरवणें, पिशाचीपद्रव, दुर्व्यसनादिक, यांची जी उतार दशा तो औषध; प्रभ, इ॰चा गुण

येणें

येणें, स० तत्तन्निष्ठ गुणांचा अनुभव येणें; गुणउ धळणें, पागळणें, स० कांहीं एक कार्य बिघडायाजोगे दुर्गुण प्रकट करणें; गुण घेणें, देणें, इ० स्थलीं विवक्षित मर्यादेपर्यंत पिशाचादि बाधा नव्हावी म्हणून देवादिकांपासून कौल घेणें, देणें; यच्चयावत्संख्यामात्रापुढें या शब्दाचा योग घातला असतां, एकगुण, द्विगुण, त्रिगुण, सहस्रगुण, इ० असें होतें.

गुणक, सं०पु० इतर अंकसंख्या जा अंकानें गुणितां न तो अंक.

गुणकल्पी, स्त्री० एक रागिणी आहे.

गुणकांक, सं०पु० गुणक संज्ञक अंक.

गुणकारक, वि० गुण करण्याविषयीं शक्त जें औषधादिक तो.

गुणगंभीर, सं०वि० उत्तम प्रकारचा गुणांनीं जो युक्त तो.

गुणगुण, स्त्री० कुणकुण; २, दुसऱ्यास स्पष्ट ऐकायास न जाई असें जें भाषण, अध्ययनादि तो; उ० अशी गुणगुण काय लावली आहे सगळ्यानें ऐण.

गुणगुणणें, अस्पष्टोच्चार करणें; उ० असें गुण गुणतोस काय स्पष्ट मोठ्यानें बोल; २, दुसऱ्यास स्वचितार्थ न समजायाजोगें मंदमंद भाषण करणें; उ० रुपये मागीतले पण गुणगुणला आहे स्वचीत कांहींच बोलिला नाहीं; ३, गेंगाणें भाषण करणें; उ० तो गेंगाणा घटकाभर गुणगुणतो आहे पण मला कांहींच समजत नाहीं.

गुण

गुणगुणा, पु० नाकांतील अवयवविशेष आहे, आघातादि कारणानें जो पासून रक्तस्रवनें, त्याकालींचा प्रा० फुटधा०प्र०.

गुणगुण्या, वि० भाषण करते समयीं जाच्या स्वरनासिकेंत जान असतो अशे स्वभावाचा जो मनुष्य तो वस्तूचें भाषणादि तो; २, गुणगुण द्वितीयार्थकरण्याचा स्वभाव जाचा तो.

गुणग्राहक, सं०वि० दुसऱ्यांचे विद्यादि गुण जाणून संतोष पावतो तो.

गुणग्राही, वि० गुणग्राहक.

गुणणें, गुणकांक आहे जितकेपट गुण्यांक होत असें करणें; उ० चौहोंनीं चार गुणिले असतां १६ होतात.

गुणन, सं०न० गुणण्याचा व्यापार.

गुणनिधि, सं०स्त्री० अनेक सद्गुण जामध्यें आहेत तो.

गुणराशि, सं०वि० गुणनिधि.

गुणवंत, गुणवान, वि० विद्यादि उत्तम गुण जामध्यें आहेत तो.

गुणसागर, वि०सं० गुणनिधि.

गुणज्ञ, सं०वि० विद्यादि गुणांचा जाणता.

गुणा, पु० दे० रथादिकांचे आंसाचीं चाकांत शिरवायाचीं जीं दोहोंबाजूंचीं टोकें तीं प्रत्येकीं; २, काटकोन्या.

गुणाक, पु० गुणाकार.

गुणाकभागोत्री, स्त्री० गुणाकार आणि भागाकार तो; उ० तुझापंतोजी कांहीं गुणाकभागोत्री शिकविनो कीं नाहीं.

गुणा

गुणाकार, पु॰ गुणकांकानें गुण्यांक गुणिले असतां जेंफल सिद्ध होतें तो; २, गुणन.

गुणाकारी, २ लिं॰ गुणकारक.

गुणाचा, २ लिं॰ भलेपणा, इ॰ चांगले गुण जामध्यें आहेत तो.

गुणाचीरवाणी, गुणाचीराशि, गुणाचीरास, स्त्री॰ अनेक प्रकारचे चांगले गुण जामध्यें आहेत तो.

गुणाढ्य, सं॰ २ लिं॰ विद्यादि गुणांनीं जो श्रेष्ठ तो; २, एक प्रसिद्ध कवि आहे.

गुणावह, २ लिं॰ जें औषधादि सेवन केलें असतां गुण देवूं लागलें तें.

गुणिजन, सं॰ २ लिं॰ गायनादि गुण जामध्यें आहेत तो; २, रा॰ हिंदुजातीचे कलावंतिणीचे पोटीं उत्पन्न जी पुरुषव्यक्ति तो.

गुणी, २ लिं॰ चांगले गुण जाचे आंगीं आहेत तो.

गुण्य, सं॰ पु॰ गुणकानें गुणाया करितां मांडिलेला अंक.

गुण्या, पु॰ दे॰ काटकोन्या.

गुण्यांक, सं॰ पु॰ गुण्य असाजो अंक तो.

गुनका, पु॰ मन्का; उ॰ शेतकरयेनानर गुनक्यानें देऊन टाका.

गुंतणें, मोकळें न ठेवायाजोगें एकाद्यापदार्थांत किं॰ व्यवहारांत सांपडलें जाणें; उ॰ सर्व लिहिण्याकडे गुंतले म्हणून पुढलें काम नसेंच राहिलें.

गुनणें, गुंतणें.

गुनवळ, पु॰ को॰ विंचरणें इ॰ व्यापारानें डोकीचे केशांतून तुटून गळालेला केश.

गुंत

गुंतवळ, स्त्री॰ गुनवळांचा समुदाय.

गुंता, पु॰ चालिलेला किं॰ चालावयाचा जो कांहीं एक व्यापार त्यास कांहीं काल तोनचालायाजोगा जो प्रतिबंध प्राप्त होतो तो किं॰ त्या प्रतिबंधानें त्या व्यापारास किं॰ तत्कर्त्यास जी प्रतिबंधावस्था प्राप्त होत्ये तो; हें कार्य घडेल यांत कांहीं गुंता नाहीं इ॰ वाक्यांचा द्वारायीं निःसंशय पक्षें घडेल.

गुता, पु॰ गुंता.

गुन्ना, पु॰ गुंता; २, दे॰ गुनका.

गुद, सं॰ न॰ अपानद्वार.

गुदगुद, अ॰ कानाचे द्वारांचा निषेध केला असतां जो शब्द होतो त्याचें अनु॰.

गुदगुदणें, गुदगुद शब्दानें युक्त होणें; २, दे॰ शरीरानें गुदगुदी युक्त होणें.

गुदगुदी, स्त्री॰ दे॰ शरीरास जी खाज उठती ती.

गुदगुल्ली, स्त्री॰ शरीरास हस्तादि स्पर्श झाला असतां हास्य यावया जोगा जो विकार होतो ती; २, ला॰ इष्टश्रवणादि निमित्तें करून आनंदसदृश जो कांहीं अंतःकरणास विकार होतो ती; उ॰ भगवद्गुण श्रवणें करून चित्तास गुदगुल्या होतात.

गुदगूद, स्त्री॰ दे॰ गुदगुदी.

गुदद्वार, सं॰ न॰ गुद.

गुदमरणें, गुदमुरणें, नाकातोंडांतील श्वास बंद झाल्यामुळें घाबरणें.

गुदरणें, आपण मोकळें व्हायें म्हणून विवक्षित त्यानीं पदार्थ कि॰ मनुष्य यांनें संबद्ध करणें; उ॰ तो आपल्या कामावर भाड्याला गुदरून आपण काशी

स

सजाचाला मोकळा झाला; २, दुष्परिहार्यमहत्संकटादि कोणएकास प्राप्त होणें; उ० समय गुदरला असतां यांतला कोणी कामास यावयाचा नाहीं; ३, जाजा कालीं जेंजें कार्य करावयाचें किंवा घडावयाचें तेंतें नकरितां किंवा नघडतां तोतो काल अतिक्रांत करणें; उ० रविवारीं पोथी शोधावी असें योजिलें होतें परंतु तो दिवस एकदींच गुदरला; उ० यंदां पर्जन्य नपडतां सगळें चातुर्मास्य किंहो गुदरलें; ४, रा० कांहीं एक पदार्थानें चिखला सारिख्या पातळ पदार्थांत पडून लिप्त होणें; ५, ला० संसारादिकांचे ठायीं गुंतलें जाणें; ६, मरणें.

गुदराण, گذران हिं० स्त्री० गुजराण.

गुदरोग, सं० पु० गुदस्थानीं एकरोग होत असतो तो.

गुधडणें, वस्त्र, पुस्तकादिकांची दुर्दशा व्हावयाजोगें अस्ताव्यस्तपणें उपभोगिणें.

गुधडा, पु० गुधडण्याचे व्यापारानें केलेली दुर्दशा; उ० पंधरादिवसांत पोरानें पोथीचा गुधडा केला.

गुनकली, स्त्री० गुणकली.

गुन्हा, گناہ हिं० पु० अपराध.

गुन्हेगार, گنہگار हिं० त्रिलिं० जाणें गुन्हा केला तो.

गुन्हेगारी, گنہگاری हिं० स्त्री० गुन्हा; २, तन्निमित्तक जें गुन्हेगारापासून द्रव्य घेतात तो.

गुप, अ० गपचूप.

गुपचीप, अ० गपचूप.

गुपचूप, अ० गुपचीप.

गुपटणें, दे० कांहींएक व्यापार योजिला असतां तो कसकसा करावा हें मनांतल्यामनांत झाल्यामुळें आपां-

कुं लागणें.

गुपटमार, पु० वा० बाहेर दृश्योत्पत्तीस येतनाहीं किंवा आणितांनये असें जें केवल अंतःकरणवेद्य दुःख तो.

गुपितघाला, पु० गुपटमार.

गुपितमारा, पु० गुपटमार.

गुप्त, त्रिलिं० बाह्येंद्रियास जो गोचर नव्हे तो; उ० परमेश्वर गुप्त आहे.

गुप्तघाला, पु० गुपितघाला.

गुप्तदान, न० कोहळा, इ० फळांचे पोटीं दुसऱ्यांचे ध्यानांत नयावया जोगें द्रव्य घालून ब्राह्मणास दान देणें तें.

गुप्तदूत, पु० परस्थल संबंधी वर्तमान आपणास कळावें म्हणून गुप्तरूपें योजिला असतो जो दूत तो.

गुप्तधन, न० मंत्रेंकरून तप, विद्या, इ० कांसल्य.

गुप्तमारा, पु० गुपितमारा.

गुप्ती, स्त्री० एक शस्त्र आहे जें प्रा० शस्त्रतेंकरून ओळखलें जात नाहीं.

गुंफ, स्त्री० दे० गुंतवळ.

गुंफणें, शोभार्थ किंवा विवक्षितपदार्थ सिद्धकरावया साठीं तंतु आदिकांच्या ठायीं मौक्तिक पुष्पादि संबद्ध करणें; उ० पंचनसमोतें गुंफलीं तेव्हां एकबाजी झाली; उ० वेणींत फुलें गुंफ म्हणजे फार चांगली दिसेल.

गुंफा, स्त्री० आंत राहावया जोगें जें पर्वतादिकांत बीळ असतें तें; २, तत्सदृश बांधून करितात जें स्थल तें.

गुबगुबीत, ३लिं॰ गबगबीत॰

गुमट, पु॰दे॰ घुमट मुख्यार्थी॰

गुमान, ؈ हिं॰पु॰ खातर, परंतु निषेधीं प्र॰; उ॰ पैकैवानास हजारों रुपये खर्च झाले तरी त्या गोष्टीचा कांहीं गुमान नाहीं; २, न॰ वहमा॰

गुमास्ता, पु॰ धन्यानें आंगीं करावयाचें जें व्यापारादि काम त्याकामावर जो त्याणें आपला मुखत्यार मनुष्य ठेविला असतो तो; उ॰ दयाराम आत्माराम्याचे गुमास्ते जागोजाग पडले आहेत॰

गुमास्तेगिरी, स्त्री॰ गुमास्त्याचें काम॰

गुरकणी, स्त्री॰ व्याघ्रादिकांनीं क्रोधावेशानें केलेला शब्द: उ॰ त्या वाटेनें जात होतों पण वाघाची गुरकणी ऐकतांच मागें फिरलों; २, ला॰ मनुष्यानें तत्सदृश केला जो शब्द तो॰

गुरकणें, व्याघ्रादिकांनीं गुरकणीनें युक्त होणें॰

गुरकावणी, स्त्री॰ दुसऱ्यानें दबलें जावें म्हणून दाखविला जो गुरकणी तो॰

गुरकावणें, कोणएकानें दबावें म्हणून गुरकावणी दाखविणें जो के गुरकावणें, स॰ कोणएकानें भ्यावें म्हणून डोळे वटारणें॰

गुरेंगुटणें, सकलावयव संकुचित असें वस्त्र पांघरून घेणें॰

गुरगुडी, स्त्री॰ गुडगुडी॰

गुरगुरणें, श्वान मार्जारादिकांनीं क्रोधावेशानें गुरगुर शब्दानें युक्त होणें; २, पोटानें गुरगुर शब्द विशिष्ट होणें॰

गुरगुराट, पु॰ गुरगुर शब्दाचा अतिशय॰

गुरगुरावणें, दुसऱ्यानें भ्यावें म्हणून डोळे वटारणें॰

गुरगुरीत, ३लिं॰ गुरगुरावलेलें जें नेत्र तो; २, फुगलेली जी पुरी, इ॰ तो; ३, रूजीनें फुगला जो शरीरावयव तो॰

गुरचरण, स्त्री॰ गोपचार॰

गुरदंड, पु॰ डोंगर, इ॰ कांबर गुरेंचरायास न्यायाकरितां जो मार्ग असतो तो॰

गुरधळ, गुरधळी, स्त्री॰ दे॰ गुधडा॰

गुरमळणें, दे॰ गुणगुणणें द्वितीयार्थानें युक्त होणें॰

गुरेंभळणें, आंबा, चींच, पेरू, इ॰ कांचा फलांनी पक्व दशासन्न दशापन्न होणें॰

गुरेंभा, ३लिं॰ गुरेंभळलेला जो आंबा, चींच, इ॰ तो॰

गुरव, पु॰ ब्राह्मणातिरिक्त जो देवाचे पूजेस ठेविला असतो तो; २, एक जाति आहे॰

गुरवकी, स्त्री॰ गुरवानें करावयाचें जें देवपूजादिक कर्म तो॰

गुरवडा, पु॰ गुरवास निंदेनें म्हणतात॰

गुरवळी, स्त्री॰ एक पक्षाभ आहे॰

गुरवी, ३लिं॰ गुरवसंबंधी पदार्थ, इ॰

गुरवीण, स्त्री॰ गुरवाची स्त्री॰

गुरारवी, ३लिं॰ गुरेंरारवायाकरितां ठेविलातजो मनुष्य तो॰

गुरारव्या, ३लिं॰ गुरारवी॰

गुराव, स्त्री॰ लढणें, इ॰ उपयोगी एक मोठें गलबत आहे॰

गुरु, सं॰पु॰ विद्यासांगणारा जो तो, कि॰ बाप, आजा, इ॰ जे आपणास पूज्य तो; २, स्फोटरूप देवीचे योगानें शरीरावर जें उद्भणूं उठतें तो; ३, बृहस्पति सद्ग्रह; ४, ३लिं॰ हिमाभ्रक वर्ण; उ॰ आ, का, मीं;

५, जो भक्षिला असतां लौकर पचत नाहीं असा गोधूम, माषादि, तो कि० विवक्षित पदार्थापेक्षां वजनानें जो जड तो; उ० त्या ओझापेक्षां हें ओझें गुरु आहे.

गुरुकिल्ली, स्त्री० गुरु, इ० कोणएकानें सांगीतल्या वांचून प्रा० श्लोकादिकांतील जें मर्म समजत नाहीं तें.

गुरुकृपा, स्त्री० सं० गुरूची जी कृपा ती; उ० गुरुकृपा संपादन केलें असतां विद्या लौकर येते.

गुरुगम्य, सं० वि० गुरूनें सांगीतल्या वांचून समजावयाचा नव्हे तो.

गुरुजन, सं० पु० आपणास पूज्य जो माता, पिता, ज्येष्ठबंधु, इ० मनुष्य समुदाय तो.

गुरुतल्पग, सं० वि० आपणास पूज्य जो माता, गुरुपत्नी, इ० स्त्रिया त्यांपाशीं गमन करणारा मनुष्य.

गुरुतल्पी, वि० गुरुतल्पग.

गुरुदक्षिणा, सं० स्त्री० विद्यासंपादनोत्तर शिष्य जी गुरूस दक्षिणा देतो ती.

गुरुपरंपरा, सं० स्त्री० गुरु, त्याचा गुरु, त्याचा गुरु, इ० जो स्वगुरु वंश ती.

गुरुपुत्र, पु० रा० जाणें संतांचा उपदेश घेतला तो; २, गुरूचा लेंक.

गुरुपूजा, सं० स्त्री० गुरूची पूजा; २, राशीस प्रतिकूल जो बृहस्पति त्याची जी पूजा करितात ती; ३, आषाढे पौर्णिमेस गुरु, सन्यासी, यांची जी पूजा करितात ती.

गुरुबंधु, पु० एका गुरूचे जे अनेक शिष्य ते परस्पर.

गुरुबल, सं० न० राशीसजें बृहस्पतीचें आनुकूल्य तें.

गुरुमंत्र, सं० पु० गुरूनें उपदिष्ट जो मंत्र तो; २, ला० कोणएकानें कोणएकास उपदेशिलीजी बरी वाईट गोष्ट तो.

गुरुमार्ग, पु० गुरूनें उपदेशिलेला मंत्रसंबंधी जपादिविधि.

गुरुमार्गी, वि० गुरुमार्ग जास आहे तो.

गुरुमुख, न० अध्ययनार्थ जो गुरुकृत उपदेश तें; उ० ही माझी विद्या ऐकीव आहे यास गुरुमुख नाहीं.

गुरुलघुविचार, पु० गौरव लाघव विचार.

गुरुवार, पु० सातांवारांतील पांचवा.

गुरुशिक्षा, सं० स्त्री० अध्ययनादिकाविषयीं जी गुरूची शिक्षा ती.

गुरुसंप्रदाय, सं० पु० गुरुमार्ग.

गुरुसंप्रदायी, वि० गुरुमार्गी.

गुरू, न० गाय, बैल, एतज्जात्या कांन जो पशु तें.

गुरूपदेश, सं० पु० गुरुकृत जो मंत्रोपदेश तो.

गुरूळ, पु० कों० शेत, बांधण, इ० चे बांधास आंतील पाणी वाहून जावयाजोगें खेंकडा, इ० नें पाडिलेलें भोंक.

गुरोळी, स्त्री० गुरवळी.

गुर्फटणें, गुर्फाटणें, मक्षिकादिकांनीं आंत प्रवेश नकरावयाजोगें शरीरादिकांभोंवतें वस्त्रादि गुंडाळणें, कि० त्या शरीरादिकानें त्यायस्त्रादिकांत गुंतलें जाणें; २, सूत्रादिक मोकळें नव्हावयाजोगें गुंतलें जाणें; ३, ला० भाषणादि व्यापारांत रुचेनासें व्हावयाजोग्या अवस्थेनें युक्त होणें.

गुर्मी, स्त्री० तारुण्य, विद्या, इ० संबंधी जो शरीराचे

गर्वी मद असतो ती; २, कोहीं औषधादि सेविलें असतां त्याचा विकारभूत जो परिणाम शरीरांत कांहीं काल राहातो ती.

गुर्विणी, सं॰ स्त्री॰ गर्भिणी स्त्री.

गुर्‍हाळ, न॰ गूळ करायाचा कारखाना.

गुलअनार, گل انار हिं॰ पु॰ एक रंग आहे; २, ३ लिं॰ तद्विशिष्ट जी शाल जोडी, इ॰ तो; ३, एक साड आहे.

गुलकंद, گلقند हिं॰ पु॰ गुलाबाचे फुलांत खडीसाकर घालून भक्षणोपयोगी पदार्थ करितात तो.

गुलकावणी, स्त्री॰ दे॰ हुलकावणी.

गुलगुलीत, ३ लिं॰ अतिमृदु स्पर्शपदार्थ.

गुलचनी, स्त्री॰ گل چینی हिं॰ दे॰ गुलदावरी.

गुलछबू, गुलशबू, گل شب بو हिं॰ पु॰ एक फुलसाड आहे.

गुलटोप, گل توپ हिं॰ पु॰ एक फुलसाड आहे.

गुलदावरी, گل داوری हिं॰ स्त्री॰ एक फुलसाड आहे.

गुलपणें, क्रि॰ भाषण, गमन, इ॰ व्यापारीं स्खलन विशिष्ट होणें; २, ला॰ गुर्फटणें तृतीयार्थानें युक्त होणें.

गुलफणें, गुलपणें.

गुलबदन, पु॰ एक रंग आहे; २, दे॰ नगत्याचा एक भेद आहे.

गुलबदनी, گل بدنی हिं॰ ३ लिं॰ गुलबदनसंबंधी औषधार्थ तो.

गुलबास, گل باس हिं॰ स्त्री॰ एक फुलसाड आहे; २, न॰ त्याचें फूल.

गुलभैरव, स्त्री॰ रिवळ्यांत एक भेद आहे.

गुलहौशी, ३ लिं॰ द्रव्य व्ययादिकांचें भय नबाळगतां हौशीनें नानाप्रकारचे विषय भोगण्याचा स्वभाव जाचा तो.

गुलाब, گلاب हिं॰ पु॰ एक फुलसाड आहे; २, त्याचें जें फूल तो; ३, त्या पुष्पांनीं रुजविलेलें जें पाणी तो; उ॰ गुलाबदाणीमध्यें गुलाब भर.

गुलाबचक्की, स्त्री॰ गुलाबाचे फुलांत शर्करा आदिकरून किंवा एक पदार्थ घालून भक्षणोपयोगी एक पाक करितात तो.

गुलाबदाणी, गुलाबदानी, स्त्री॰ گلابدان हिं॰ गुलाब तृतीयार्थ ठेवायाचें एक पात्र आहे.

गुलाबपाणी, न॰ गुलाब तृतीयार्थी.

गुलाबी, گلابی हिं॰ ३ लिं॰ गुलाब संबंधी जें अन्नादिक तो; २, गुलाबाचे फुलाचे रंगासारिखा जो रंग, वस्त्राचा वासासारिखा जो वास तो, व तद्विशिष्ट जो तो; उ॰ गुलाबीपेरू, गुलाबी जांब.

गुलाम, غلام हिं॰ पु॰ बटकीचा जो लेंक तो; २, ला॰ हरामी जो तो; ३, रंग कांचन गंजिफांतील लालाचा जो रंग तो.

गुलामगिरी, स्त्री॰ हरामीपणा; २, ला॰ गुलामासारिखें नम्रतापूर्वक सेवादिकर्म तें.

गुलामजादा, غلامزادہ हिं॰ ३ लिं॰ हरामी.

गुलाल, पु॰ पतंगीरंगानें रंगलेलें सांगोवी इत्यादि चूर्ण आहे; २, स्त्री॰ न॰ गुलबास.

गुलालगोटा, पु॰ पातळ कांचेचा गोट्या सारिखा आकार करून त्यांत गुलाल भरून शिमग्यामध्यें मारायाकरितां करितात तो.

गुलाली, पु॰ गुलालाचे रंगासारिखा तांबडा एक

रंग आहे; २, २लिं० तद्विशिष्टजें लुगडें इ० वस्त्र तो.

गुल्म, सं०पु० एक रोग आहे.

गुल्ल, २लिं० केफादिकानें उल्लू झालेला.

गुल्लाला, لالہ हिं०पु० एक फुलझाड आहे.

गुहा, स्त्री० पर्वतादिकांचे ठायीं व्याघ्रादिकांनी आंत राहाण्याजोगें जें बिल असतें तो.

गुह्य, सं०न० उपस्थ; २, शिश्न; ३, विवक्षितेतरांनीं समजूं द्यायाचें नव्हें असें जें वर्तमान द्रव्य तें.

गुळखी, स्त्री० दांतें, इ० कांचे विरुद्धयांत अडकलेला चीजा गांठ तो, किरडें आणि गांठ मिळून तो; २, रा०स्त्रियांचें एक शिरोभूषण आहे.

गुळगुळथापडी, स्त्री० कांहीं एक कार्याचा स्पष्ट निवाडा करून सांगावा तो नसांगतां मोघम राखण्याचा जो प्रकार तो, किं० परस्परांचें खटलें सरासरीस मोडलें जाई असा जो युक्तिप्रयुक्तिचालविण्याचा प्रकार तो.

गुळगुळीत, २लिं० खरखरीत नव्हे असा जो पदार्थ तो.

गुळचट, २लिं० इषत् गोड जो पदार्थ तो; २, दे० गूळ, शर्करा, इ० जे गोड पदार्थ तो.

गुळचीट, २लिं० दे० गुळचट द्वितीयार्थी.

गुळणी, स्त्री० मा० टाकायाचे उद्देशानें तोंडांत घेतलेंजें पाणी तो; २, कांहींएक विकृतीनें तोंडांतून जो रक्ताचा चूळ पडतो तो; गुळणी धरणें, स० देशकालाद्यनुकूलतेमुळें कांहीं एक गोष्टी विषयीं मौन धरणें.

गुळदगड, पु० दे० गुळामध्यें जो गुळासारिखा दगड असतो तो; २, ला० बाहेर साजा भोळा दिसून जो अंतःकरणाचा कपटी तो.

गुळधवा, गुळँधा, गुळधिवा, गुळधुवा, पु० केवळ तांबडा नव्हे आणि पांढरा ही नव्हे असा मिश्ररंग आहे; २, २लिं० तद्विशिष्ट जो मौक्तिकादि पदार्थ तो.

गुळपापडी, स्त्री० एकपक्वान्न आहे; २, रा० गुळांत तूप घालून कढवून जी मा० पोरें करितात तो; ३, ला० परोक्ष अपराध करून समक्ष गांठ पडली असतां प्रसन्न करण्याविषयीं जीं गोडगोड कपटार्थीं भाषणें, इ० तीं.

गुळमट, २लिं० गुळचट प्रथमार्थी.

गुळमटणें, रा० आंबा, चिंच, इ० फलांनीं गुळमट होणें.

गुळमुळणें, गुणगुणणें द्वितीयार्थानें युक्त होणें.

गुळमुळीत, २लिं० जाणून सूचितार्थ कळला जाऊनाहीं असें जें मळमळीत भाषणादि तें.

गुळवणी, न० गुडमिश्रित जें पाणी तें.

गुळवेल, स्त्री० गरुळ.

गुळाचागणेश, पु० अचळोची; २, थोडा बहुत आंगीं धनीपणा असून एकाधा कारभारासंबंधीं हेवाईट, हेंबरें, इ० कांहींच न बोलण्याचा स्वभाव जाचा तो.

गुळांब, न० गुळांबा.

गुळांबा, पु० गुळाचा पाक करून आंत कच्चे आंब्याचे तुकडे, व कांहीं रूक्षासिद्ध्यें, इ० घालून भक्षणोपयोगी करितात तो.

गुळी, स्त्री० काळ्या गुळीसदृशगण तात.

गुळी, न० बाल, इ० किंवा एक द्विदल धान्य मकून

घेतल्यानंतर तत्संबंधीजें गुरांस भक्षायाचे उपयोगी भूंसविशेषतें मेंथें.

गुढीसाकर, गुढीसाखर, स्त्री० गुळासारिखा रंग आसाखरेचा असतो तो.

गुढुंब, गुढुंभ, न० प्रा० रक्तविकारानें शरीरावर जीगांठ उठत्ये तें.

गुढें, न० रा० गुदार; २, वा० रंग्यासुळें परागंदा झालेलें मनुष्यादि.

गुढहार, न० गुन्हाळ.

गू, पु० विष्ठा.

गूंज, न० गुप्त नीयार्थी.

गूढ, सं० २लिं० गुप्त; २, ज्याचा बोध व्हायास कठीण असाजो श्लोकादिसंबंधी अर्थ, कि० तो श्लोकादि; उ० याचा अर्थ गूढआहे; हा श्लोक गूढ आहे; ३, न० सांगीतल्यावांचून समजत नाहीं असाजो श्लोक, हिशेब, इ० तें; उ० माझें गूढ सांगेल तो पंडित; ४, दे० कणसांस कटजो जोधळा, इ० कांचे तांटांचे पेंडयांचा समुदाय तें; गूढ, बाटणें, दिसणें, पडणें, इ० स्थलीं कांहींएक ग्राम्यसाला जो व्यवहार त्याविषयीं कमेंकरावें; कायकरावें, इ० रूपविचार मा महोणें. गूढांत पडणें, स० पूर्वीक्त विचारांत पडणें.

गूढार्थ, पु० गूढ असाजो अर्थ तो; २, तद्विशिष्टजो श्लोकादि तो.

गूत, स्त्री० दे० सूत्रादिकांस जो मध्यें तिडा पडतो ती; २, गुरें, इ० नीं खावयाजोगा अव्यवस्थितपणें पडलेलाजो प्रा० बारीकसारीकं तृणसमुदाय तो.

गूल, स्त्री० पु० बंदूक, इ० चा तोडा, इ० स अग्निलाविला असतां शेवटीं जो कळी सारिखा आकार होतो तो; २, खिळा, इ० तापवून वर्तुळ जो डाग देतात तो; ३, स्त्री० अकस्मात् कांहीं मारामार कि० चोर, इ० कांची आवाई आल्यावरून लोकांनीं आरडूं लागावें, घाबरावें, पळूं लागावें, अशीजी अवस्था ती, कि० तीणें झालेला गलबा.

गूळ, पु० उंसाचा रस अग्निसंयोगानें आटवून करितात तो. तुझेहातावर म्यां गुळखोबरें दिल्हें नव्हतें, स० याकार्यास त्वां प्रवृत्त व्हावें म्हणून तुझें आर्जव केलें नव्हतें.

गृध्र, पु० सं० गिधाड म्हणून जो पक्षी तो.

गृह, सं० न० घर.

गृहकर्म, न० गृहसंबंधी झाड, सारव, इ० जें कर्म तें.

गृहकृत्य, न० सं० गृहकर्म.

गृहधंदा, पु० गृहकर्म.

गृहपति, पु० सं० गृहाचा धनी.

गृहप्रवेश, पु० सं० नवेंघर बांधून त्यांत राहावयाकरितां जो प्रथम प्रवेश करितात तो; २, लग्नसाल्यावर नवर्याचे घरीं जो प्रथमत नवरीचा प्रवेश तो.

गृहभंग, पु० घरदार, मुलेंमाणसें, इ० चाजो सत्यानास, तो.

गृहभेद, पु० कोणएकाचे गृहसंबंधी वर्तमान समजावें म्हणून तद्विषयीं केलाजो भेद तो.

गृहस्थ, पु० सं० जो संसारयात्रेकरितां आहे तो; २, जो भिक्षुकीनें पोटभरित नाहीं तो; ३, भला मनुष्य; ४, साधारणजो मनुष्य त्यानें विवक्षित तो.

गृहस्थगिरी, स्त्री० दे० गृहस्थपणा.

गृहस्थपणा, पु० ग्रा० भलेपणा.

गृहस्थाश्रम, पु० सं० चार आश्रम आहेत त्यांतील जो दुसरा तो.

गृहस्थाश्रमी, वि० गृहस्थाश्रम जास आहे तो.

गृहस्थी, वि० गृहस्थसंबंधी जी रीति, वेष, भाषण, डौल, बाणा, इ० तो.

गृहिणी, स्त्री० सं० जाणें जिशीं लग्न केलें ती त्याची.

गेंगणा, वि० ग्रा० गेंगाणा.

गेंगरणें, गेंगारणें, दे० गांगरणें.

गेंगाणा, वि० भाषण करत्ये समयीं जाचा स्वर नाकांत जातो असा जो मनुष्य तो, व त्याचें भाषणादि तो.

गेंझट, वि० कों० फारच लोंचटपणा करण्याचा स्वभाव जाचा तो.

गेंझा, वि० गेंझट.

गेटम, न० एक वस्त्र आहे.

गेंठा, पु० गांठा.

गेंडा, पु० एक वन्यपशु आहे जाचे नाकावर शिंग असतें तो.

गेंद, पु० मरवमाल, बटमोगरा, इ० कांचे फुलांचा जो गुच्छ तो; २, तदाकार जो रेशीम, इ० कांचा करितात तो; ३, गुच्छासारिखें स्त्रियांचा पादांगुलिसंबंधी एक भूषण आहे.

गेंदजोडी, स्त्री० रेशीम, इ० कांचे अनेक गेंद एकत्र संबद्ध करून घोड्याचे शेंपटीचे वरल्ये बाजूस बांधायासाठीं जें भूषण करितात तें.

गेर, स्त्री० कों० प्रजा, देश, इ० कांस उपद्रवकारक जो परचक्रादि संबंधी दंगा तो; उ० होळकराचे गेरींत त्यांचें सर्वस्व लुटलें गेलें.

गेरू, पु० स्त्री० काव; २, दे० पाटीवर घालायाकरितां जो तांबडा माती करितात तो.

गेह, न० सं० गृह.

गेहेशूर, पु० सं० बाहेर गांडू असून घरामध्यें शूर त्याचा डौल मिरवितो तो.

गेळ, स्त्री० एक झाड आहे; २, न० त्याचें जें फळ तें; ३, द्विशफ पशूंचे पायांचे जे दोन शफ ते प्रत्येकीं तें; उ० गाईचे गेळांत कांटा मोडला आहे म्हणून लंगडते.

गेळा, पु० तूप, तेल, इ० ठेवायाचे उपयोगी लाहान तोंडाचें एक पात्र आहे; २, ग० गेळीचें जें फळ तो.

गेळी, स्त्री० दे० लाहान जो पात्ररूप गेळा तो.

गैबती, वि० गावदी जो मनुष्य तो.

गैर, अ० غیر हिं० ग्रा० हिंदुस्थानी भाषेंत कितीएक शब्दांचे मागें याचा योग होतो; क्वचित् मराठींत संस्कृत शब्दाचे मागें ही होतो; तेथे क्वचित् त्यावांचून असा अर्थ जाणावा; उ० गैरअन्याय मला मांजतो; उ० गैरअपराध दंड घेऊं नये; इ०; २, वि० वास्तविक जो नव्हे तो असा अर्थ होतो; उ० गैरमार्ग, गैरमनसोबा, गैरदस्ती, गैरसमदी, गैरसमजूत, इ०.

गैरविल्हेस, अ० सोइवार ठेविलाजो कागद, पत्र, इ० कांहींएक पदार्थ त्याचा ठिकाणा सुटून प्रसंगीं न सांपडे असें लागणें, पडणें, इ० कांचें वि०.

गैरसाळ, वि० खोटसाळ जें रुपया, इ० नाणें तो; उ० हा रुपया गैरसाळ दिसतो बाजारांत चालणार

लणारा नाहीं; २, ला० जाचा व्यवहाराची रीति संप्रदाय शुद्ध नव्हे असा जो मनुष्य तो, व त्याचा जो भाषणादि व्यवहार तो.

गैरा, २ लिं० / हिं० मुख्यतेकरून जाची विवक्षा केली तद्दितर जो पदार्थ तो.

गैरात, २ लिं० दे० गावदी.

गैरी, २ लिं० गैरा.

गोकर्ण, स्त्री० एक पुष्पवल्ली आहे; २, न० तीचें पुष्प; ३, पु० सं० गाईचा जो कर्ण तो; ४, न० तत्सदृश मुलांस दूध पाजावयाचे उपयोगीं धातुमय पात्र आहे तें; ५, एक शिवक्षेत्र आहे; गोकर्णीत येणें, स्व० संपत्तिमानाचे संपत्तीचा भर जाउन क्षीणावस्थेंत येणें.

गोकटी, स्त्री० रा० बोकांडी; होतें गोकटीस येणें लक्षणजे पोटरीस येणें.

गोकाकी, २ लिं० गोकाक ह्मणून पेंठ आहे तत्संबंधी जें पात्र, वस्त्र, इ० तो.

गोकुल, न० श्रीकृष्ण जास्थलीं वाढला तें; २, गोकुलाष्टमीचे दिवशीं नंद, यशोदा, श्रीकृष्ण, बलराम, इ० कांचेविभाचा जो समुदाय करितात तें; त्याचें घर कायहो नंदाचें गोकुळ आहे, इ० स्थलीं गुरें, वांसरें, मुलें, माणसें, इ० समुदायानें उत्तमशीतीनें नांदतें आहे; राज्यसंपत्ति, इ० गोकुळांत येणें, स्व० संकोचित होणें.

गोकुलाष्टमी, गोकुळाष्टमी, स्त्री० जातिथीस श्रीकृष्णावतार झाला ती श्रावण कृष्ण अष्टमी.

गोखमा, पु० जाचा लेंकुरपणा गेला असा जो पुरुष तो अविद्वान् कृष्यादिकरून वांचणारा जो मनुष्यसमूह.

गोखरू, न० औषधी वृक्षाचें बीज आहे.

गोखरू बांगडी, स्त्री० गोखरूचे आकारासारिख्या चिन्हांनीं युक्त जी स्त्रियांचे हातांत घालावयाचे उपयोगी बांगडी असते ती.

गोखरें, न० रा० गुरांनीं खाउन अवशिष्ट राहिलें जें वाइटसाइट तृण तें.

गोंखरा, स्त्री० रा० गडेरवा मुख्यार्थीं.

गोंगरण, गोंगराण, न० दुसरा जेरहोई असें मारणें, कुटणें, शिव्यादेणें, इ० जो व्यापार प्रकार तें; मा० घाल, धा० म०.

गोगलगाय, स्त्री० एक क्षुद्रजंतु आहे; २, २ लिं० प्रकृतीनें जो अत्यंत गरीब तो.

गोंगाट, पु० मक्षिका, वाण, इ० कांचा जो गोंगों शब्दाचा अतिशय तो; २, गलबा; ३, कांहीं एक गुप्तगोष्टीची जी प्रसिद्धि तो.

गोंगाटणें, बोभाटणें.

गोंगावणें, भ्रमरादिकांनीं गोंगों अशा शब्दानें युक्त होणें; २, ला० बाण, बंदुकीची गोळी, इ० कांनीं तत्सदृश शब्दानें युक्त होणें; ३, दुसऱ्यास मुष्ट्यादिप्रहार करून त्यास गोंगों अशा शब्दानें युक्त करणें.

गोचडी, स्त्री० एक क्षुद्रजंतु आहे जो मा० गोमहिष्यादिपशूंचे आंगावर चिकटून राहातो ती.

गोचर, पु० सं० जे पदार्थ चें प्रत्यक्ष जे इंद्रियानें होतें तो त्यास; याचे समास, दृष्टिगोचर, मनोगोचर, इ० जाणावे; २, न० जन्मराशीपासून द्वादशराशींचा ठायीं सूर्यादिग्रहांचा

जो

जो वर्तमान संचार नें.

गोचीड, स्त्री॰ रा॰ गोचडी; २, कों॰ पु॰ मोठी जी गोचडी तो.

गोज, न॰ वा॰ तोंडीं लावण्याकरितां मसालेदार अशी एकप्रकारची कारल्यांची भाजी करितात तें.

गोजरा, ३ लिं॰ गोजिरवाणा.

गोजरूं, न॰ गाईचेंजें स्त्रीरूप अपत्य त्यास प्रसंगविशेषीं ल॰

गोजारणें, कुरवाळणें.

गोजिरवाणा, ३ लिं॰ फार मोठा नव्हे फार लहान नव्हे असा जो शोभमान नाजुक मनुष्यादि पदार्थ किं॰ नदवयवादि तो.

गोजिरा, ३ लिं॰ ग्रं॰ गोजिरवाणा.

गोजी, स्त्री॰ गाईचें स्त्रीजातीय अपत्य.

गोट, गोठ, पु॰ रुचवर्णादिकांचें स्त्रियांचे हातांतील एक भूषण आहे; २, वस्त्रादिकाचे कांठ नसडावे ल्यणून किं॰ शोभार्थ त्याला वस्त्रादिकांचे कांठ सांपडवून किं॰ विवक्षित स्थलींची वस्त्रादिकांची चिरटी, इ॰ संबद्ध करितात तो; ३, सभोंवता चौकी पाहारा, इ॰ बंदोबस्त करून कांहीं काल कोणएक स्थलीं राहिला जो सेनासमुदाय तो; ४, कांहींएक पदार्थ भोंवता मनुष्यांनीं घातला जो वेढा तो.

गोटली, स्त्री॰ लाहान जो फलरूप आंबा तो.

गोटा, पु॰ आंतील पाणी आटलेला रुचवानारळ; २, वाटोळा दगड; ३, साखीचा किं॰ हिरव्या धान्याचे डाळीचा जो एक दाणा तो; याचा म॰

अधिक

धान्यिक.

गोटी, स्त्री॰ मल्ल, इ॰ कांचे बल परीक्षेचे उपयोगी वर्तुलजो मोठा दगड असतो तो; २, मुलांस खेळावयाचे उपयोगी जी लाख, इ॰ कांची लाहान वाटोळी असते ती; ३, ला॰ आटींव वाटोळें नें शरीर तो.

गोठण, स्त्री॰ मा॰ जलसन्निधानानें ग्रीष्मप्रहरचे वेळेस गुरांस बसावयाची जी साडारवाल्ची जागा असते ती; गोठण घालून बसणें ल॰ सभा इ॰ कांचा ठायीं अव्यवस्थित पणें बसणें; ल॰ गोठणीचा गायी माणूस भरटदान घेई.

गोठणें, सद्रव पातळ पदार्थांनें घट्ट होणें; २, खणून केलेल्ये भूमीनें चोय, इ॰ कानें घट्ट होणें.

गोठा, पु॰ गृहादिकांचा ठायीं गुरें बांधावयाकरितां जी भूमि करितात तो.

गोठावणें, रा॰ गोठणें इ॰ स्थलीं गुरें जमवून धरणें.

गोठी, स्त्री॰ बांसरें राहावयाकरितां सभोंवार कुडून रचलेली सारिखी जी जागा करितात ती.

गोंड, न॰ जोंधळ्याचे किं॰ बाजरीचे दाण्यावर जें टोपणा सारिखें असतें तें; २, रा॰ मिर्यांचा घड; ३, कों॰ स्त्री॰ गहूं; ४, खेंडुकली.

गोड, न॰ षड्रसांतील मधुर जो रस तें; २, ३ लिं॰ तद्विशिष्ट जो गूळ, साकर, इ॰ पदार्थ तो; ३, ला॰ किंचित् गोडपणा जाचे आंगीं आहे असा जो बाजरी, गहूं; इ॰ पदार्थ तो; ४, ला॰ हृदयास आनंद करणारा जो तन्नदिंद्रियप्रियविषय तो; शेवट गोड करणें, होणें, ल॰ कोणएक व्यवहाराची

कि॰

कि० मनुष्यादि पदार्थांची पूर्वदशा बाईट असतां परिणामावस्था उन्मरीतीनें होणें.

गोडघांस, पु० भोजनसमारंभालें असतां मिष्टपदार्थांचा शेवटीं घांस घेतात तो २, पक्कान्नादियुक्त जेंमिष्टभोजन तो; उ० आलीकडे फारदिवस गोडघांस मिळाला नाहीं.

गोंडुण, न० ग० गोडप्रथमार्थी.

गोडंबी, स्त्री० बिब्याचे पोटांतील जी बी ती.

गोडबोल्या, वि० दुसऱ्याचे मनासारिखें भाषण करण्याचा स्वभाव जाचा तो.

गोडवणें, रा० प्रा० गोडावणें या अर्थी.

गोडवी, स्त्री० ग० पोटांत क्षुधा व तोंडास रुचि असल्यामुळें जी भक्ष्यपदार्थसंबंधी इच्छा असत्ये ती.

गोंडस, वि० गजशुंडेसारिखे क्रमानें निमोळते मांसल असेजे हस्तपादाद्यवयव तो; तद्विशिष्ट जो मनुष्य तो.

गोंडा, पु० मरवमाल, बटमोगरा, इ० कांचें जें गुच्छसदृश पुष्प असतें तो; वनस्पतिसदृश जो रेशीम, इ० कांचा पालखी, इ० कांचे ठायीं शोभार्थ बांधितात तो, किं० तत्सदृश जो गाय, इ० पशूंचे पुच्छाग्र असतो तो; गोंडा घोळणें स० कोण एकापासून आपणास कांहीं मागून्हावें म्हणून आशेनें त्याचे पुढें पुढें खटपट करणें.

गोडा, वि० यज्ञानीय पदार्थ आंबट, खारट, तुरट, तिखट, इ० रसविशिष्ट आणि मधुररसविशिष्ट अशा प्रकारें उभयविध प्रसिद्ध आहेत त्यामध्यें जो मधुर तो. किं० जामध्यें आंबट पणा. तिखटपणा, इ० रस न्यून असा जो फल, कंद, इ० पदार्थ तो; रसाबांचून जे इतर स्थलीं प्र० होतात त्यांचीं उदाहरणें लिहितों; उ० गोडा करणें, स० खाजरा नव्हे तो, गोडें भात, स० गोड्या जमिनींत उत्पन्नतें; गोडें झाड, स० कांटेरें नव्हे तें; लांकडाचें गोडें आंग, स० नारवांचून जें वरलें आंग तें; गोडा साप, स० सविष नव्हे तो; गोडा शिपाई स० कपक्या नव्हे तो, इ० अनेक जाणावीं.

गोडांबी, स्त्री० गोडंबी.

गोडावणें, रा० आंबा, लिंबू, हरीक, इ० कांचे आम्लता, माजरेपणा, इ० दुर्गुण जाउन तन्नत्पदार्थांनीं गोड होणें; २, कों० खारी जमीन गोडी करणें किं० होणें; ३, रा० गोडपदार्थ भक्षिल्यामुळें इतरपदार्थ पचपचीत लागत असें तोंड. इ० कानें गोडीनें युक्त होणें.

गोंडाळ, वि० दे० गोंडस; २, न० दे० स्त्री० कों० तडागादिसंबंधी जलाबर लाहान लाहान माडें रुजतात ती तें; जिचे योगानें प्रा० जल स्वच्छ राहातें; ३, न० गवतांत एक भेद आहे.

गोडिळणें, रा० फणस, केळें, इ० फलांनीं पिकायाचे पूर्वी स्वल्प गोडीनें युक्त होणें.

गोडी, स्त्री० गोडपणा; २, पदार्थनिष्ठ रसग्रहण करण्याविषयीं जी जिव्हा, इ० कांचा ठायीं शक्ति असत्ये ती; ३, रसनादिकितीं एक इंद्रियांनीं जाणावयाजोगा जो नन्नत्पदार्थनिष्ठ गुणविशेष असतो ती; ४, अभिरुचि; उ० त्याला गाण्याची गोडी असतीतर ऐकायास बसता;

५, परस्परांचा जो सख्यभाव ती; उ० एवढे दिवस त्यांचा वांकडे पणा होता पण आतां गोडी साली.

गोंडी, स्त्री० रा० ग्रामांतरीं जावयाचा मोठा जो मार्ग असतो त्यास जा अर्वांतर जागोजाग जायाचा वाटा फुटल्या असतात त्या प्रत्येकीं.

गोडीगुलाबी, स्त्री० परस्परांचा जो सख्यभाव. कि० अविरुद्धभाव ती; उ० त्याची आमची गोडीगुलाबी आहे म्हणून एकमेकाचे घरीं येतों जातों.

गोडीळ, वि० ईषद् गोड जो पदार्थ तो.

गोडुळणें, ग० गोडिळणें.

गोडूळ, वि० रा० गोडीळ.

गोंडेजास्वन, गोंडीजास्वन, स्त्री० जिचें पुष्प गोंडयासारिखें असतें असा एक जास्वनीन भेद आहे ती; २, न० तीचें जें पुष्प तें.

गोंडेनगर, गोंडीनगर, स्त्री० जिचें फूल गोंडयासारिखें असतें असा एक नगरीचे झाडांत भेद आहे ती; २, न० तीचें पुष्प.

गोंडेमरवमाल, स्त्री० जिजवर फुलांचे गोंडे येतात असा मरवमालीचे झाडांत एक भेद आहे ती; २, न० तीचें जें पुष्प तें.

गोंडेरा, वि० जाचें पुष्प गोंडयासारिखें असतें असें जें जास्वन, मरवमाल, नगर, तेरडा, इ० कांचें झाड तो, व त्याचें जें पुष्प तो.

गोंडेरी, वि० गोंडेरा.

गोडया, पु० कों० धान्याचें मद्य काढून घेतल्यानंतर अवशिष्ट जो त्याचा चोथा राहातो तो.

गोण

गोण, स्त्री० कों० बैल, इ० कांवर धान्यादि भरून वाहून न्याण्याचे उपयोगी कंठाळी सारिखी गोणपाट, इ० कांची शिवून करितात ती; २, ला० कांहीएक व्यवहाराचें जें कोणएकाचे आंगावर पडलें ओसें कि० संकट ती; स्० गाढवाचे गोणीस खंडी चीं तूट.

गोणना, पु० गोणनाटाचें शिवून केलें जें पोतें तो कि० तत्सदृश जो नाड, इ० कांचे पात्यांचा विणून करितात तो.

गोणनाट, न० ताग म्हणून झाड आहे त्याचे साली चे तंतूंनी जें नाड वस्त्र निर्माण करितात तें जें रा० गोण, पोतें, इ० करण्याचे उपयोगी पडतें.

गोणपाट, पु० न० गोणनाट.

गोणी, स्त्री० गोण.

गोत, न० गोत्रसंबंधिजनांचा जो समुदाय तें; गोतमिळणें, स्० परस्परांचें सख्य होणें कि० कांहींएक गोष्टीचा पूर्वापर संबंध जुळणें.

गोतगंगा, स्त्री० स्वसजातीय लोकांचा समुदाय.

गोतपान, स्त्री० रा० शूद्रादिक पतिनास स्वजातीन घ्यावयाकरितां सर्वमिळून त्यास पंक्तीस घेउन जें भोजनादिकर्म करितात त्यास स्०.

गोतवळा, पु० गोत; २, गोतपान.

गोता, पु० वावडी, पतंग, इ० कांस रवाली आणायाकरितां त्यांचे दोरास जो अकस्मात् आंचका देतात तो; २, ला० कांहींएक व्यवहा-

गोंत

रांत गुंतून पडाया जोगी जी संकटावस्था प्राप्त होत्ये तो किं० त्या व्यवहारांत जो तोटा येतो तो; २, कांहीं एक सरळ चालले ला किं० चालाया जोगा जो व्यवहार त्यास किं० तत्कर्त्यास मध्यें प्रतिबंधक जें विघ्न प्राप्त होतें तो; ४, कोणएक स्थलीं व्यर्थ पडलीजी एर प्रार्थना स्त्री० णनात.

गोतांबीज, स्त्री० जाजा जातींचा परस्पर शरीरसंबंधादि संबंध होत नाहीं त्या जातीचा न सा संबंध प्राप्त्यामुळें जो जातिसंकर होतो ती; २, ला० मिश्रीभावाची अविवक्षा असतां दुर्दशा व्हाया जोगा साला जो भात, भाजी, इ० अनेक पदार्थांचा मिश्रीभाव ती.

गोतावळ, स्त्री० रा० गोतगंगेस स्त्री०

गोत्र, सं० न० वंशाचा मूळ पुरुष जो ऋषि तें; उ० माझें गोत्र कौंडिन्य; २, त्या गोत्रांत उत्पन्न झाला जो मनुष्य समुदाय तें; उ० माझें गोत्र आलीकडे भारी बादलें; गोत शब्दावरील संप्रदाय एथे आणावे.

गोत्रकुदळ, ३लिं० स्वगोत्रसंबंधी मनुष्यांस अनेकप्रकारें दुःख देणारा; २, ला० पु० स्वगोत्रसंबंधी स्त्री पाशीं जो गमन करणारा त्यास कोणी स्त्री०

गोत्रज, ३लिं० जो जाचे गोत्रांत उत्पन्न झाला तो त्याचा, परंतु, बाप, आजा, पणजा, बंधु चुलता, पुतण्या, इ० विशेष संज्ञा नसतांप्र०

गोत्रपुरुष, पु० गोत्रज जो पुरुष तो.

गोत्रबंधु, पु० परस्परें सूतकादि संबंध नसतां एकगोत्रज जे अनेक ते परस्पर.

गोत्रहत्या, स्त्री० सं० गोत्रज पुरुषाचा जो वध ती; २, ला० सोंगट्या खेळणारे जे गडी त्यांणीं नजर चुकून आपल्ये संगू गड्याची सोंगटी मारिली असतां विनोदानें स्त्री०

गोत्री, पु० गोत्रज.

गोंद, पु० झाडाचा चीक आहे तो लाखोटे इ० उकबायाचे किं० पुस्त्यर्थ भक्षायाचे उपयोगी पडतो.

गोद, स्त्री० खाडीचें पाणी आंत येई अशी बेनाची जी गलबत बांधाया करितां आगाकरित असतात ती.

गोदडी, गोधडी, स्त्री० अनेक वस्त्रांचे तुकडे एकत्र शिवून पांघरणें, इत्यादि उपयोगी गादी सारिखी करितात ती; २, ला० वा० घामोळें, गोंवर, इ० कांची शरीरावर निबिडता झाली असतां तीस स्त्री०

गोदडीआंबा, पु० दे० जाचे फळाची साल गोदडी सारिखी जाड असत्ये अशीएक आंब्यांत जाति आहे.

गोदडें, गोधडें, न० गोदडीसच प्रा० निंदेनें स्त्री० णनात.

गोंदणी, स्त्री० एक झाड आहे.

गोंदणें, गोंधणें, कपाळ, इ० शरीरावयवांवर नानाप्रकारचे वेलबूट उठाया साठीं कांटा, इ० कानें टोंचणें.

गोंददाणी, गोंददानी, स्त्री० गोंदसंमिश्रजलढेबायाचें पात्र आहे.

गोदरड, स्त्री० र० गोदा, इ० स्थलसंबंधी जो केर, कचरा, इ० कांचा रेंदा ती.

गोंदविडा, पु० आकारविशेषाचा भक्षणोपयोगी एक विडा आहे.

गोदा, स्त्री० एक महानदी आहे; २, पु० खिळा, इ० कांचे बोंडानें जो डाग देतात तो.

गोदान, न० षोडशसंस्कारांतर्गत एक संस्कार आहे; २, ब्राह्मणास देतात जें गाईचें दान तें.

गोदावरी, स्त्री० गोदा प्रथमार्थी.

गोंदी, स्त्री० गोद.

गोंध, स्त्री० रा० गुंतवळ.

गोधणा, गोधन, स्त्री० एक झाड आहे; २, न० त्याचें फल तें.

गोधन, न० सं० गोसमुदायरूप जी संपत्ति तें.

गोंधरणें, स० सूत्रादिक गुंतलें जाणें; २, पोथी, इ० कांचीं पत्रें, इ० अस्ताव्यस्त लागल्यामुळें अव्यवस्थित होणें; उ० पोथी गोंधरली आहे ती लाविती; ३, गुपटणें.

गोंधलें, न० गोंधल्यानें जें शरीरावर चिन्हउमटणें तें.

गोंधवणें, सूत्रादिक गोंधरणें क्रि० त्या सूत्रादिकांत कांहीं एक पदार्थ गुंतला जाणें.

गोंधळ, पु० जगदंबाप्रीत्यर्थ गायन, नृत्य, कथानुसंधान, वाद्य, गजर, रूपजो व्यापार करितात तो; घाल, धा० प्र०; २, ला० अनेक कृतनेंरडणें, ओरडणें, हांसणें, इ० जन्य जो कोलाहल होतो तो क्रि० कोणएक मोठ्या कार्याचा अंगत्वें हेंकर, तेंकर, हेंआण, तेंआण, इकडेंजा, तिकडेंजा, इ० रूप अनेक कार्यांची एकत्रस्थिति झाली असतां तो; ४, जाक मादि व्यवस्थेनें जो पदार्थ असावा क्रि० कार्य असावें त्याची ती व्यवस्था नाहींशी होउन जो अस्ताव्यस्तपणा होतो तो.

गोंधळणें, उ० गोंधळ चतुर्थार्थानें युक्त करणें; उ० पोरानें पोथी गोंधळली आहे ती नीट लाविती; २, वायु, जल, इ० कांनीं समोर एकमार्ग नधरितां वाटोळें फिरूं लागणें; ३, ला० कोणएक कार्यानें क्रि० कार्यकर्त्यानें एकसोईनसांपडल्यामुळें घोटाळ्यांत पडणें.

गोंधळी, पु० जगदंबेपुढें गोंधळ घालून तत्संबंधी द्व्यानें उपजीविका करणारी अशी एक जाति आहे.

गोंधळीक, २ लिं० गोधूलिक.

गोधूम, पु० गहूं.

गोधूल, न० सूर्यास्ताचें पूर्वापर घटिकार्ध मिळून एकघटिकात्मक जो काल तें.

गोधूलिक, २ लिं० गोधूल कालसंबंधी जो मुहूर्त क्रि० त्यामुहूर्तावर योजिलें क्रि० झालें तें लग्नादि तो.

गोप, पु० सुवर्णादिकांचा अलंकार आहे; २, आकारविशेषाचे विणकरीनें रेशीम, इ० कांचा दोरा करित असतात तो; ३, एक तृणांतील भेद आहे; ४, सं० गवळी लोणून जाति आहे तो.

गोपचंदन, न० द्वारकाक्षेत्रसंबंधी पांढरी मृत्तिका आहे जी गंधासारिखी शरीरासंलावित

वित असतात; २, ला० रा० देशादिकांची मारून लुटून जाळून केलेली दुर्दशा तें.

गोपचार, पु० गोमहिष्यादिपशूंस चरावयाकरितां मा० प्रतिग्रामास सर्कारांतून देय नघेतां जी जागा नियमितकरून ठेविली असते तो.

गोपन, न० सं० संरक्षण; उ० ईश्वर प्राणिमात्रांचें गोपन करितो; २, दुसऱ्यास नसमजावयाजोगें कांहींएक गोष्टीचेंजें गुप्तपणें स्थापन तें.

गोपाल, पु० सं० श्रीकृष्ण; २, गवळी.

गोपाळ, पु० गवळी; २, कोल्हांटया सारिखे खेळ करित असतात अशीएक जाति आहे.

गोपाळकाला, पु० मा० गोकुळाष्टमीचा उत्साह चालवणारी सर्वमनुष्यजन मिळून दह्यांची हांडी फोडावी; फुगडया घालाव्या, चेंडू खेळावा, इ० जानानाप्रकारचा क्रीडा करितात तो समारंभ.

गोपाळीं, अ० गोधूलिक मुहूर्तीं निश्चित किं० जात जो विवाहादि त्याचें वि०.

गोपिका, स्त्री० गोपजातीय स्त्री.

गोपी, स्त्री० गोपिका.

गोपीचंदन, न० गोपचंदन.

गोपीपी, पु० एक काळापक्षी आहे.

गोपुर, न० देवालयादिकांचा परिवृढावर दुमजला तिमजला अशी बंदिस्त बांधून जें करितात तें; २, स्त्रिया चैत्रमासीं भिंत, इ० कांवर रंगानें जें लिहिन असतात तें.

गोप्य, वि० गुप्त राखावयास योग्य जो मंत्र, मसलत, इ० तो.

गोप्रदान, न० गोदान द्वितीयार्थी; २, ला० थट्टेनें शिव्या देण्यास म्हणतात; उ० त्याणें त्यास गोप्रदानें केली.

गोफ, पु० गोपचतुर्थ्यर्थी बांधून.

गोफण, गोफीण, स्त्री० दगड मारावयाकरितां सुंभ, इ० कांची वळून करित असतात ती.

गोफणगुंडा, पु० गोफणीनें मारावयासाठीं ओघोडा घेतात तो.

गोफणगोटा, पु० गोफणगुंडा.

गोंफा, पु० पाउलाचें आणि नळगुडीचें मधला जो संधिप्रदेश तो; २, ग्रा० स्त्रियांचे केशांचा जो बुचडा तो.

गोंफाटणें, दे० बुद्धीस मोह घालून कोणएकास फशींपाडणें; २, भाषण व्यापारामध्यें दुसरा कुंठित होईअसें त्यास पेंचाटींत धरणें; ३, स्वल्पसामग्रीनें यथाकथंचित्कार्यकरून घेणें. उ० पांचशें रुपयांचें काम ग्वरें परंतु पैशाचे अडचणीमुळें सरासरी शंभर रुपयांत गोफाटून घेतलें; ४, गुटमळणें.

गोंफाटा, पु० कांहींएक व्यवहार संबंधामुळें आपली रुकटका नहोईअशी जी संकटदशा प्राप्त होत्ये तो; याचा प्र० प्रा० प्रथमेचा आदळन नाहीं, गोफाटयांत याविभक्तीचा मात्र योग होतो तेथेपड, घाल, सांपड, या धा० म०.

गोबरा, वि० दे० बेडौल दिसावया जोगा जो स्वाभाविक फुगीर तो; उ० याचें तोंड गोबरें आहे.

गोब्राह्मण, ला० प्रकृतीनें जो केवळ गरीब ब्राह्मण त्यास म्ह०

गोब्राह्मणप्रतिपालक, वि० गाई, ब्राह्मण यांचा

यांचा प्रतिपाल करणारा जो राजा, इ० तो.

गोम, स्त्री० जास बहुत पाय असतात असा क्षुद्रजंतु आहे ती; २, तदाकारजें घोड्याचे आंगावर दुर्लक्षण असतें ती; ३, कांबळा, घोंगडी, इ० कांचे शेवटास रेशीम, इ० चे तोरे भरून करितात ती; ४, अनेक गुणविशिष्ट जो मनुष्यादिपदार्थ त्याचे आंगीं एकादा जो दुर्गुण असतो ती.

गोमटा, २ लिं० ग्रं० रूप जो तो.

गोमंतकी, २ लिं० गोमंतक म्हणून देश आहे तत्संबंधी जो आंबा, पनाबद्ध, इ० पदार्थ तो.

गोमय, न० सं० गाईचें जें शेण तें.

गोमा, पु० दृष्टगोष्टीविषयीं दुसरा आग्रह करित असतां लटकें औदासीन्य किं० अनिष्टतादायकविषयांविषयीं जें कपट भाषणादि तो; उ० नाचपाहायासचलम्हणतों तोउगीच मींनाहीं मींनाहीं म्हणून गोमा करतो आहे.

गोमाजीकापशा, पु० एकप्रसिद्ध पुरुष होता. आतां एकाचास आरोपानें म्ह०; उ० हे मोठे गोमाजी कापशे इथे आले बोलायाला.

गोमाजीसोमाजी, पु० जीचीं नांवें ठाउक नाहींत, किं० विवक्षित कार्याविषयीं जे अनुपयुक्त मनुष्य त्यांस म्ह०.

गोमाशी, स्त्री० मक्षिकेंत एक भेद आहे जी गाय, इ० पशूंचे आंगावर राहाते.

गोमूत्र, न० सं० गाईचेजें मूत्र तें.

गोमूत्रिका, स्त्री० सं० सावयव अंक गुणायाचे असतां एक प्रकारचे अंक मांडून गुणायाचा एक प्रकार आहे.

गोमेटी, स्त्री० एक वल्ली आहे.

गोमेटें, न० गोमेटीचें फल.

गोमेद, पु० सं० एक मणी आहे.

गोयला, पु० अजमासें दोन हात पर्यंत लांबीचें डोईवर वाहून न्याया आणाया जोगें जें जळाऊ लांकडांचें ओसें तो.

गोरखचिंच, स्त्री० एक वृक्ष आहे व त्याचें जें फल ती.

गोरगरीब, २ लिं० गरीब, अनाथ, इ० तो.

गोरज, २ लिं० गोधूलिक.

गोरटा, २ लिं० ग्रं० ज्याचे शरीराचा वर्ण गोरा आहे तो मनुष्य.

गोरटेला, २ लिं० साधारण गोरा जो मनुष्य तो.

गोरव, न० वा० खोबीचे आकाराचें इरलें.

गोरस, पु० सं० गाय, किं० म्हैस एतत्संबंधी जें दुग्धादि तो.

गोरक्षक, पु० सं० गुराखी; २, रा० गांगो.

गोरा, २ लिं० एक रंग आहे; २, तद्विशिष्ट जो मनुष्य, वस्त्र, इ० तो.

गोरागोमटा, २ लिं० गोरा असून सुरेख जो मनुष्य तो.

गोराडू, पु० कोनफळ म्हणून जो कंद तो.

गोराभुरका, २ लिं० गोरा असून किंचित् भुरकेपणा ज्याचे आंगीं आहे तो मनुष्य.

गोरामाजा, पु० मायफळांत एक भेद आहे.

गोरामोरा, २ लिं० दे० आपल्यावर कोणी रागें भरला असतां ज्याची विलक्षण मुद्रा चर्या

नर्थाझाली तो वस्त्याचें सुख ·

गोरेला, २लिं० गोरटेला ·

गोरोचन, न० एक रुगंधि पदार्थ आहे, जो गाईचे मस्तकांत उत्पन्न होतो तें ·

गोल, पु० जाचा विस्तार परिधि वृत्ताकार असून आयत किं० वर्तुल जो आकार तो; उ० यास्तंभाचा गोल चांगला नाहीं; हा गोळा लांबट झाला म्हणून याचा गोल नासला; २, २लिं० तद्विशिष्ट जो पदार्थ तो; ३, पु० जाचा सर्वतः परिधि वृत्ताकार पडतो अशे आकाराचें जें वस्तु तो; उ० भूगोलापेक्षां चंद्रगोल लहान आहे; ४, भचक्राचे मेषादिक आणि तूलादिक जे षड्राश्यात्मक दोन समुदाय ते प्रत्येकीं; उ० वृषभराशीचा ग्रह उत्तर गोलांत आणावा; ५, पागोटें, इ० वस्त्रांस शोभार्थ जो जरीचा पदर करितात तो; ६, आंबूडजी इटी तो; ७, आगीचा जो गलूल तो; ८. जमूनचालिला किं० उभाजो सेना समुदाय त्यास म्ह० ·

गोलक, पु० मनुष्यांत एक जाति आहे; २, लोहादिकांचा जो वर्तुल गोळा तो; ३, न० दे० लहान पेटीसारिखें एक पात्र आहे, जास रुपया, इ० आंत जावया जोगें छिद्र असतें तें ·

गोलची, स्त्री० सुनारांचें एक हात्येर आहे; २, त्याणें केला जो स्तंभादिकांस आकारविशेष तो ·

गोलंदाज, पु० [illegible] हिं० तोफ मारण्या विषयीं नि

नियुक्त जो मनुष्य असतो तो ·

गोलंदाजी, स्त्री० गोलंदाजाचें जें कर्म तो ·

गोलदार, २लिं० जाचा आकार गोल आहे असा जो स्तंभादि तो; २, गोलपंचमार्थ विशिष्ट जें वस्त्र तो ·

गोलांगुल, न० सं० वानरांत एक भेद आहे ·

गोलाँट, गोलाँठ, न० वा० कोल्हांटी, इ० चा उडी मारण्याचा एक प्रकार आहे ·

गोल्या, पु० प्रा० वर्तुल दगडानें संबद्ध अशे प्रकारचें तांदुळ, इ० कांडायाचे उपयोगी मुसळ आहे तो, वस्त्राणें तंडुलादि कांडून उपजीविका करणारा जो मनुष्य तो ·

गोल्हाँट, न० गोलाँठ ·

गोंवई, २लिं० श० गोमंतकी ·

गोंवणें, मणी, पुष्पें, केश. इ० सूत्रादिकांत संबद्ध करणें; २, ला० कोण एक मनुष्यादि कोण एक स्थलीं किं० व्यापारीं गुंतला जाई असें करणें ·

गोवत्सद्वादशी, स्त्री० आश्वीनवद्य द्वादशी ·

गोवध, पु० सं० गाईचें जें हनन तो ·

गोंवर, पु० मनुष्याचे शरीरावर देवींसारिख्या मनस्वी पुळ्या येतात असा एक रोग आहे तो; २, खोरउण; ३, दे० गोंवर्यांचा जो चूर तो ·

गोंवरकोंडा, पु० गोंवर, इ० तो ·

गोंवरपाटें, न० रा० गोंवर वाहावयाचे उपयोगी जी मोठी पांटी तें ·

गोंवरी, स्त्री० गोमयाची बळून थापून करितात, किं० अरण्यादिकांचा ठायीं गोमय पडून जाग

चे

चे जागीं वाकून होत्ये ती ·

गोंवरी-ची आघ, स्त्री० बाहेर उघडिकेंत नयेतुं देतां जिनकें मनांतून कोणएकाचें वांकडें करायाचें असेल तिनकें कालेंकरून केल्याचेंतून सोडायाचा नव्हे असाजो मनुष्य त्यास आरोपानें ल्ा० ·

गोवर्धन, पु० सं० एक पर्वत आहे ; २, ला० बलिप्रतिपदेचा दिवशीं वल्लभसंप्रदायी इ० जो शेणाचा दीग करितात तो ; ३, न० गोरोचन ; गाईचा तोंडें गोवर्धन निवडणें ल्ा० पंचाईत इ० प्रकरणीं जाचा विषय त्याचेच तोंडें निवडणें ·

गोवर्धनधारी, पु० श्रीकृष्णपरमात्मा ·

गोंवळा, पु० गुरारवी ; २, मनुष्याचे शरीरावर जा स्फोटरूप देवी येतात तदुपद्रव शांतिकर्ता एक देव पुरुषाचे आंगीं खेळत असतो तो ; ३, रा० ला० ३ लिं० दुधरवुळा ·

गोंवारी, पु० गुरारवी ; २, स्त्री० एक झाड आहे व त्या झाडाची जी शेंग ती ·

गोविंद, पु० सं० श्रीकृष्ण ; २, रक्तवर्ण किं० हिरवा असा एक पाषाणाचा मणी आहे ·

गोविंदपुष्प, न० वा० कावळीचे झाडाचें जें पुष्प तें ·

गोविंदविडा, पु० गोंदविडा ·

गोविंदी, स्त्री० एक वेल आहे जीस वांघेटी ल्ाणतात ·

गोविंदें, न० गोविंदीचें जें फल तें ·

गोंवें, न० अदमुरें जें दहीं त्यास ल्ा० ; २, एक शहर आहे ; रा० कोणएकास गोवें सांपडणें, इ० स्थलीं घोवें सांपडणें ·

गोशन, न० सं० शंभर गाई, किं० शंभर गाई दान देण्याचें कर्म ·

गोंशाला, स्त्री० सं० गाई बांधायाचें जें गृह तें ·

गोशेरा, गोश्वारा, गोस्वारा, पु० कांहीं एक गोष्टींतील किं० प्रकरणांतील तात्पर्यार्थ ·

गोष्ट, गोष्ठ, स्त्री० अर्थानुसंधानपूर्वक प्रयुज्यमान जें वाक्य किं० वाक्यसमुदाय ती ; २, सामान्यतः कांहीं एक जो व्यापार त्यास ल्ा० ; उ० मजपासून अशी गोष्ट घडणार नाहीं ; ३, कोणएक स्थलीं किं० प्रकरणीं कोणएक विषयाचा किं० मनुष्याचा निघाला जो उल्लेख ती ; उ० काल्चे सभेंत कांहीं त्यांची गोष्ट निघाली होती काय ; तुंसीएथें गोष्ट बोलूंनका, ल्ा० कांहींएक बोलूंनका ; कोणएकाची गोष्ट काढणें, ल्ा० खोड काढणें ; याची गोष्ट निराळी, त्याची गोष्ट निराळी, एथें नानात्पदार्थनिष्ठ इतर भेदसंपादक प्रकार निराळा असतो ल्ाणून वर्णनीयांश पृथक् होतो ·

गोष्टि, स्त्री० गोष्ट ; २, याचे प्र० लोकांत समाजीं होतात ; उ० गोष्टिप्रिय, गोष्टिलंपट, इ० ·

गोष्टिवेल्हाळ, ३ लिं० गोष्टी सांगायाविषयीं किं० ऐकण्याविषयीं जास अतिशयित प्रीति असत्ये अशेस भाषाचा जो मनुष्य तो ·

गोष्टिश्राद्ध, न० श्राद्धसामग्रीचें प्रातिकूल्य असतां हा एक अनुकल्प सांगीतला आहे ; २, ला० अनेकविध जा निरर्थक गोष्टी तें ; उ० आतां हें गोष्टिश्राद्ध पुरे करा मासें डोचकें उडलें ·

गोष्पद, न० सं० गाईचें पाउल किं० कर्दमादिकांचा डाग्यीं तेंलागून उठलेली त्याची प्रतिमा तें.

गोष्वारा, पु० गोशेरा.

गोसहस्र, न० सं० सहस्रगाई किं० सहस्रगाईदान देण्याचें कर्म.

गोसा, पु० धनुष्याचें टोंक.

गोसामी, पु० गोसांवी.

गोसाँवडा, पु० निंदेनें गोसांव्यास ल्ा०

गोसाँवी, पु० जो शूद्रादिक शेंडा टाकून भगवीं वस्त्रें धारण करितो तो; २, कथाकरणारा हरिदास; ३, ला० घर, दार, बायको, पोरें, इ० खटला जास नाहीं त्यास ल्ा०; ४. दे० नव्याचे वरल्या बाजूस सारवलावून त्याजवर जी भाकर करितात तीस ल्ा०

गोहत्या, स्त्री० सं० गोवध; २, तज्जनित जें पातक तें.

गोहत्यारा, वि० जाणें गोहत्या केली तो.

गोहो, पु० दादला; २, दे० गोरवमा.

गोहोत, न० रा० गुरांस रवायाला घालावयाचें जें आंबवण तें; २, ला० अनेकपदार्थ एकत्र मिसळले गेल्यामुळें दुर्दशाविशिष्ट झालाजो समुदाय त्यास निवडणें, इ० प्रसंगीं ल्ा०

गोहोरा, पु० खोंड.

गोळक, पु० स्त्री० ईण, गोळकभयमार्थी.

गोळंकारी, वि० पा० घाय्वा सुपड्यानें हस्तपादाद्यवयवांची खोडाबिडा होवुन पडलेला मनुष्य.

गोळा, पु० चूर्णादिकाचा किं० लोहादि धातूचा किं० काष्ठ, इ० चा जमणें, जमविणें, इत्यादिनेक कारणांनीं झाला किं० केला जो वर्तुलाकार पदार्थ तो; २, उंडी, कर्दळी, नाड, इ० कितीएक झाडांचे फळांतील प्रा० वर्तुळजें बीज किं० गर्भांश असतो त्यास ल्ा०; उ० हींमोत्यें शुद्ध कर्दळीचे गोळे आहेत; ३, रा० नथींत घालावयाकरितां जो मौक्तिकसदृश रुपें इ० चा करितात तो; ४, अ० प्रस्तपदार्थ एकत्र होई असें कर, हो, इ० चें वि०; हें चिरगूट ओलें गोळा आहे, हींलांकडें ओलीं गोटें आहेत, इ० स्थलीं शुष्कत्वें करून विवक्षित जो पदार्थ तो ओला चिबअसाअर्थ.

गोळागोळी, स्त्री० बंदुकांचा गोळ्या; तोफांचे गोळे, ईहींकरून जो अन्योन्य प्रहार व्यापार तो; उ० यांची त्यांची गोळा गोळी होवुं लागली तेव्हां मीं पळालों.

गोळाबेरीज, स्त्री० सर्वबेरजा एकत्रमेळवून झाली जी बेरीज ती; २, ला० मोठी जी कांहीं गोष्ट किं० विषय त्यांतील कांहीं कांहीं वेंचे घेउन काढिलें जें तात्पर्य तें.

गोळावणें, स० उ० कांहीं एकपदार्थ गोळा करणें.

गोळी, स्त्री० बंदूक इ० कांत घालून मारावयाचे उपयोगी जी लोहादि गोळ्या सारिखी शिसें इ० ची करितात ती; २, तत्सदृश जी चूर्णादि पदार्थांची जमून किं० केल्यानें होत्ये ती; ३, दे० एक रोग आहे, जो झाला असतां प्रा० तत्काल मनुष्य मरतो ती; गोळीलागणें, ल्ा० भोजन करित्ये

करिते समयीं मक्षिका पोटांत गेल्यामुळें वमन होणें; गोळी चढविणें. स्न० नंबारवू, अफू, इ० भक्षणें.

गोळ्या, पु० कों० गाडला; २, गोल्या.

गो, स्त्री० गाय; उ० आलीकडे आमची गो फारच लत्ताप्रहार करूं लागली.

गोकोश, पु० गाईच्या शब्द जिथवर ऐकायास जातो तदवधिजें अध्वपरिमाण तो; याचाच व्यवहार प्रा० हिंदुस्थानांत आहे.

गौड, पु० सं० एक देश आहे; २, ब्राह्मणांत एक भेद आहे; ३, गुडसंबंधी जो पदार्थ तो.

गौडबंगाल, न० गारुडी. इ० मंत्रसामर्थ्यें करून किंवा एक पदार्थ उत्पन्न करितात किंवा एकाहींसे करितात अशाप्रकारचें खेळकरण्याची जी मंत्रविद्या तें; २, ला० कार्य नरदिसावें आणि कारण दिसण्यास येऊं नये असा जो कोणएकस्थलीं व्यापार घडतो तें; उ० आतां इथे लेखणी होती ती इतक्यांत नाहींशी झाली काय गौडबंगाल झालें ईश्वर जाणे.

गौडबंगाली, वि० गौडबंगाल जाणतो तो; २, गौडबंगाल देशसंबंधी जो पदार्थ, विद्या, इ० तो.

गौडसारंग, पु० एक राग आहे.

गौडी, स्त्री० एक रागिणी आहे.

गौंडी, पु० गृहादिसंबंधी भिंती इ० बांधण्याचें काम करित असतो अशी एक जाति आहे तो; २, इतर तत्कार्योपजीवी जे असतात त्यांसही

महा स्न०.

गौण, वि० मुख्य नव्हे तो; कोणएकस्थलीं कोणएक पदार्थ, व्यवहार, इ० चें गौण असणें, स्न० अल्पता असणें.

गौणकल्प, पु० मुख्यनव्हे असा जो कल्प तो.

गौणपक्ष, पु० जो मुख्यपक्ष नव्हे तो.

गौणमुख्यन्याय, पु० मुख्यपक्ष संभवत असतां गौणीं प्रवृत्त होऊं नये या अर्थाचा बोधक

गौणी, सं० स्त्री० शब्दाची स्वाभिधेय गुणसंबंधामुळें जी अर्थांतराचेठायीं प्रवृत्ति ती.

गौणीवृत्ति, स्त्री० गौणी.

गौतमी, स्त्री० गोदा प्रथमार्थी; २, संकेतानें गाईस स्न०

गौप्य, वि० गोप्य.

गौर, वि० गोरा जो मनुष्यादि पदार्थ तो; उ० हा पुरुष गौर आहे; २, स्त्री० एक देवी आहे.

गौरव, न० पदार्थनिष्ठ जो जडपणा तें; उ० पारद्याचें गौरव इतरपदार्थांत नाहीं; २, स्वल्पप्रयत्नसाध्यकार्यास बहुतप्रयत्न लाविला असतां जो दोष येतो तें; उ० याचा अनुकूल असतां गलबतांतून च जावें कांकीं पायवाटेनें जावें यांत फारच गौरव आहे; ३, पु० न० सन्मान; उ० आपल्याघरीं कोणी गृहस्थ आला असतां त्याचा गौरव करावा; ४, कोणएकास दुसर्‍यानें मानावें अशी जी त्याचे आंगीं गुणादि कृत योग्यता असते तें; उ० हापोर एव्हांपासून त्याचें गौरव राखीत नाही मग पुढें दिसून च आहे; कोणएक

एक गोष्ट गौरवानें सांगणें स्त्री० मोठ्या उत्साहानें सांगणें.

गौरवर्ण, पु० गोरा जो वर्ण तो; २, ३ लिं० तद्विशिष्ट जो मनुष्यादि तो.

गौरवर्णें, क्रि० एकास सन्मानयुक्त करणें; २, स्त्री० रा० आंगावरचें वस्त्र जळलें असतां जळलें हा अभद्र शब्द बोलूं नये म्हणून गौरवलें असें म्हणतात.

गौरी, स्त्री० सं० गौरवर्णविशिष्ट जी स्त्री ती; उ० केतकपत्रगौरी, कनकचंपकदामगौरी, इ०; २, गौरहिनीया यार्थी; याचे समास, गजगौरी, मंगलागौरी, ज्येष्ठागौरी, इ० होतात.

गौरीहर, पु० विवाहदिवशीं शिव आणि पार्वती या उभयतांचें पूजार्थ स्थापन करितात तो.

गौल्यना, स्त्री० श्रवणकरणारांचे चित्तास आनंद व्हाया जोगी जी भाषणादि निष्ठ मधुरिमा ती.

गौळण, स्त्री० गवळण.

गौळवाडा, पु० अनेक गौळी जास्थलीं गृहें बांधून गवळ्यांनी वस्ती केली असतात तें स्थल तो.

गौळा, ३ लिं० गवळा.

गौळी, पु० गवळी.

ग्रंथ, पु० परस्पर संगतार्थक वाक्यांचा जो रचना विशिष्ट समुदाय तो; २, बत्तीस अक्षरांचा जो लिहिलेला समुदाय तो; उ० भागवत अठरा सहस्र ग्रंथ आहे; ३, कांहीं एक देणें, घेणें, पंचाइत, इ० व्यवहारसंबंधी जी गोष्ट तो; उ० आमचा पूर्वापर ग्रंथ ऐकून मग न्याय करा याचेस. मास, ग्रंथस्थ, ग्रंथांतर, ग्रंथोक्त, इ० जाणावें. स्त्री० ग्रंथाची ग्रंथांतरटीका.

ग्रंथकर्ता, ३ लिं० भारत, भागवत, इ० ग्रंथकरणारा जो तो.

ग्रंथकार, ३ लिं० ग्रंथकर्ता.

ग्रथणें, अर्थानुसंधानपूर्वक अनेक वाक्ये एकत्र जुळणें; याचा प्र० प्रा० ग्रंथी; उ० ग्रथिलें भारत जाणें त्याला ही स्वमनिसौख्य वाटेना; २, पुष्पादिक विवक्षितानुरूप गुंफणें.

ग्रथन, न० ग्रथण्याचा जो व्यापार तें.

ग्रंथि, पु० गांठ.

ग्रथित, ३ लिं० सं० ग्रथन केलें जाचें असा जो ग्रंथ, माला, इ० तो.

ग्रंथी, ३ लिं० ग्रंथसंबंधी जो श्लोकादि तो.

ग्रंथीय, ३ लिं० ग्रंथी.

ग्रस्त, ३ लिं० जाणें जो गिळिला तो; उ० सर्पानें मंडूक ग्रस्त केला; २, स्त्री० रोग, ऋण, इ० नीं जो व्याप्त तो; याचा प्र० प्रा० समासीं; उ० रोगग्रस्त, ऋणग्रस्त, व्याधिग्रस्त, इ०

ग्रस्तास्त, न० सं० सूर्यचंद्रांस ग्रहण लागून तें नक्षत्रतारांत जें त्यांचें अस्त तें.

ग्रस्तोदय, पु० सं० ग्रहणसहित जो चंद्रसूर्यांचा उदय तो.

ग्रह, पु० सूर्यादि जे नव ते प्रत्येकीं; २, ब्रह्मराक्षसादि पिशाच; ३, स्त्री० पिशाचसदृश उपद्रव करणारा जो मनुष्य त्यास आरोपानें म०; ४, सुसर, इ० जलजंतु; ५, तत्तत्पदार्थांचें

प्रमारूपेंकरून कि॰ भ्रमरूपेंकरून जें बुद्धीचाठायीं भानतो; उ॰ मलाभाजवर असा ग्रह होताकीं हा महापंडित आहे.

ग्रहचार, पु॰ सूर्यादिग्रहांची गति.

ग्रहण, न॰ अमावास्येस कि॰ पौर्णिमेस सूर्याचे आड चंद्र आल्यामुळें कि॰ चंद्रावर भूमिछाया पडल्यामुळें जें त्या बिंबाचें आछादन होतें तें; २, कोणएक विषयाचें बुद्धीनें कि॰ कोणएकपदार्थाचें हस्तादिकानें जें स्वीकरण तें; याचे, विषयग्रहण, स्वादग्रहण, इ॰ समास होतात.

ग्रहदशा, स्त्री॰ सं॰ मनुष्यादिकांस शुभाशुभ फल सूचक जी सूर्यादि ग्रहांची दशा ती.

ग्रहदान, न॰ भान्वादि ग्रहांचें आनुकूल्य व्हावें म्हणून तत्तत्प्रीत्यर्थ जें ताम्रादि दान करितअसतात तें.

ग्रहबल, न॰ सं॰ कांहींएककर्म करण्याविषयीं विवक्षित राशीस जें ग्रहांचें आनुकूल्यरूप बल तें.

ग्रहबाधा, स्त्री॰ सं॰ सूर्यादिग्रहांपासून कि॰ पूतना, इ॰ ग्रहांपासून जी बाधा होत्ये ती.

ग्रहयोग, पु॰ सं॰ कांहींएक कार्याविषयीं विवक्षित राशीपासून जी सूर्यादिग्रहांची शुभाशुभ सूचक स्थिति तो.

ग्रहसाधन, न॰ सं॰ यंत्रादिकेंकरून अमुक ग्रह अमुकस्थलीं, अमुकग्रहांची अमुकगति, इ॰ जें साधन तें.

ग्रहसारणी, स्त्री॰ ग्रहसाधनोपयोगि जें अंकजाल

जाल असतें ती.

ग्राम, पु॰ गांव; २, गाण्यामध्यें समस्वरसंतील जे मुख्य तीन अवधि ते प्रत्येकीं; ३, अनेक कचाटें उदबून दुसऱ्यांचा पराभव करितो अमाजो मनुष्य त्यास म्हणतात; उ॰ तो कसला ग्राम त्याजबराबर भांडून तुम्हांपरिणाम लागणार नाहीं.

ग्रामकंटक, पु॰ सं॰ आपणगावांत राहून असून तत्संबंधी लोकांचा चाहाडया मर्कीगत समजावाव्या नाहींनाहीं तीं लचांडें त्यांजवर उपस्थित करावीं अशास्वभावाचा जो दुष्टमनुष्य, तो.

ग्रामकुक्कुट, पु॰ सं॰ ग्रामसंबंधी जो कुक्कुट तो.

ग्रामकुठार, पु॰ दे॰ ग्रामकंटक.

ग्रामजोशी, पु॰ ग्रामसंबंधी ज्योतिषपणाचा अधिकारी जो जोशी तो.

ग्रामणी, पु॰ ग्रामनेतायार्थी.

ग्रामण्य, न॰ ज्ञातीमध्यें कोणी विरुद्ध धर्माचरण केल्यामुळें त्यास जाती बाहेर टाकणें कि॰ कोणएकास पुनीत करून जातींत घेणें इ॰ विषयक जो खटला तें.

ग्रामदुर्गा, स्त्री॰ सं॰ ग्रामाधिकारिणी एकदेवता आहे.

ग्रामदेवता, स्त्री॰ सं॰ ग्रामदुर्गा.

ग्रामदेवत, न॰ सं॰ ग्रामसंबंधी जीं दैवतें तीं प्रत्येकीं.

ग्रामधर्म, पु॰ सं॰ जाजा ग्रामीं जे जे प्रसिद्ध

परंपरेनें धर्म चालत असतो तो.

ग्रामनेत्र, पु॰ संकेतानें महागस खणतात.

ग्रामसिंह, पु॰ सं॰ कुत्रा.

ग्रामसूकर, पु॰ सं॰ गांवडुकर.

ग्रामस्थ, २ लिं॰ गांवकरी.

ग्रामाचार, पु॰ सं॰ ग्रामधर्म.

ग्रामांतर, न॰ सं॰ अन्य जो ग्रामनें; २, स्वग्रामापासून अन्यग्रामीं जाण्याचा जो व्यापार तें.

ग्रामाधिकार, पु॰ सं॰ ग्रामसंबंधी अधिकार.

ग्रामाधिकारी, पु॰ ग्रामसंबंधी जो अधिकारी असतो तो.

ग्रामाधिपति, पु॰ ग्रामसंबंधी जो स्वामी तो.

ग्रामोपाध्या, पु॰ ग्रामसंबंधी जो उपाध्याय असतो तो.

ग्रामोपाध्याय, पु॰ ग्रामोपाध्या.

ग्राम्य, २ लिं॰ सं॰ ग्रामाचे आश्रयानें उत्पन्न होतात वत्याचेच आश्रयानें राहातात असे जे पशु, पक्षी, वृक्ष, इ॰ ते प्रत्येकीं. २, केवळ गांवढळ जो मनुष्य तो; ३, विषय भोगाचे ठायीं निरंतर जो आसक्त तो.

ग्रास, पु॰ सं॰ एकवार उचलून तोंडांत घातलें असतां गिळलें जावयाजोगें जें अन्नादि तो; २, ग्रासण्याचा जो व्यापार तो; ३, ग्रहणाचे ठायीं चंद्रमंडलानें किं॰ भूच्छायेनें जें आच्छादन होतें तो; तोंडचा ग्रास नेणें, काढणें, इ॰ स्वतीं स्वेष्टसिद्धि समीपकालवृत्ति जो तत्साधक पदार्थ त्याचा नाशकरणें, स्व॰ प्रथम ग्रासीं मक्षिकापात.

ग्रासणें, मनुष्यादि पदार्थ, शत्रु, इ॰ कांनीं ग्रस्त करणें.

ग्राह, पु॰ सं॰ मगरसणून जलतंतु आहे.

ग्राहक, २ लिं॰ सं॰ शास्त्रादि विषय ग्रहणाविषयीं बुद्धि कौशलरूप सामर्थ्य ज्याचें आहे तो; उ॰ एथे कोणी ग्राहक असल्यास न्याय शास्त्रांतील विषय काढूं; २, कोणएकाचे विद्यादि गुण ग्रहण करून सन्मान करणारा जो मनुष्य तो; ३, कोणएक पदार्थाचें जें गिऱ्हाइक तो. याचे समास, गुणग्राहक, रसग्राहक, इ॰ होतात.

ग्राहकबुद्धि, स्त्री॰ सं॰ शास्त्रादि विषय ग्रहणकरण्याविषयीं कुशल जी बुद्धि ती; २, २ लिं॰ तद्विशिष्ट जो मनुष्य तो.

ग्राहीक, न॰ गिऱ्हाईक.

ग्रीवा, स्त्री॰ सं॰ मानसणून जो शरीरावयव ती.

ग्रीष्म, पु॰ सं॰ ज्येष्ठ व आषाढ एतन्मासद्वयात्मक जो काल; किं॰ वृषभ आणि मिथुन या दोन राशींस सूर्य आहे पर्यंत जो काळ तो ही.

ग्रीष्मर्तु, पु॰ सं॰ ग्रीष्म.

ग्लान, २ लिं॰ ग्लानीनें युक्त जो मनुष्यादि तो.

ग्लानि, स्त्री॰ दुखणें, श्रम, शोक, इ॰ कारणांनीं शरीरावरील दबटवी जावयाजोगी जी अशक्तारूप अवस्था भास होत्येती.

ग्वाही, २ लिं॰ देणें, घेणें, इ॰ व्यवहारीं किं॰ मारामारी, इ॰ प्रसंगीं तिऱ्हाइतपणें तोतो विषय प्रत्यक्ष पाहाणारा जो तो; २, स्त्री॰

तत्तद्विषयनिर्णयप्रसंगी जें तद्विषयींचें त्याचें भाषण तीं; व या व्यवहाराचा इष्टामी एतद्बोधक त्याचे हातचा जो खत, इ० कांवर लेख असतो तो.

ग्वाहीदार, ३ लिं० ग्वाही प्रथमार्थी.

घ

घंघाळी, स्त्री० मक्षिकांत एक जातिभेद आहे.

घट, पु० सं० जलादि ठेवायाचे उपयोगी मृत्तिका, धातु, इ० चें एक पात्र आहे; २, ईश्वरानें उत्पन्नकेलें जें सर्वजगत् कि० तदंतःपाति सर्वपदार्थ तेप्रत्येकीं; उ० सर्वघटीं ईश्वर आहे; ३, नवरात्रांत्सवीं जलपूरित जो कुंभ स्थापितात तो; घटींबसणें स्त्री० आराध्यादि विवक्षित देवतेनें त्या स्थापित घटाश्रयानें राहाणें, कि० घटस्थापक यजमान कि० आचार्य याणीं घटोत्थापनावधि व्रतनियमानें असणें; ४, स्त्री० संख्येय धान्यादिकांस मोजणें मापणें इ० कारणानें तूट येणें; उ० खंडीभर भात मोजलें त्यास चारपायली घट आली.

घटक, ३ लिं० मध्यस्थपणा करून उभयतांचें कार्य जुगवून देतो तो; २, सं० कार्यसाधक व्यापारकर्ता जो ईश्वरादि तो.

घटका, स्त्री० साडपळांचें जें कालमान तीं; २, त्या मानाचा परिज्ञानार्थ साडपळांनीं बुडावया जोगें धातुमय सच्छिद्र पात्र करितात तीं; घटका भरणें, स्त्री० आयुष्यमर्यादा संपणें, कि० अधिकारादिकांचा अवधि भरणें; त्याची घटका घातली आहे, एथेंतो आतांमरेल घटकेनें मरेल अशा अवस्थेस आला आहे.

घटकेचेंघडयाळे, न० क्षणभंगुर जें देहादि त्यासम.

घटघट, घटघटां, अ० सशब्द उदकादि प्राशन समयींचे शब्दाचें अनु० पी, घोट, इ० आ० कि०; उ० तो घटघटां पाणी पितो.

घटणें, कमी होणें; उ० दोनमण गूळ आणिला त्यांत पांचशेर घटला; २, कांहीं एक विद्या, कला, व्यवहार, इ० चा दृढ अभ्यासाभावें तत्तद्विषयीं प्रवीण होणें कि० आजा विद्यांत जो प्रवीण झाला त्याचे तत्तद्वर्णांकरून त्यात्याविषयांनीं चळण इ० नें दृढता पावणें; उ० या अक्षराविषयीं माझा हात घटला आहे; उ० हें अक्षर घटलें आहे; ३, शिथिलावयव शरीर, नमस्कारादि अभ्यासानें दृढ होणें.

घटना, स्त्री० कांहीं एक कार्य साधायाविषयीं जें घटकाचें कर्म तीं; उ० तुझी घटना करावयास त्याचें लग्न होईल; २, घटक व्यापारानें साधलें जें फल तीं; उ० हें सर्वजगत् ईश्वराची घटना आहे.

घटमूट, ३ लिं० नाजूकपणा, सुरेखपणा, इ० गुण असोत किं० नसोत परंतु बळकटपणा जोंत आहे असें जें वस्त्र गृहादिक तो; उ० धोतर जोडा घटमूट पाहून आण.

घटवटना, स्त्री० कांहीं एक कार्य सिध्यर्थ विचारपूर्वक जी योजना तीं; उ० मुलाचे लग्नाची

घटघटना चालली आहे.

घटवाई, स्त्री० वा० वस्त्रादिकांचा जो घटमूटपणा तो.

घटसर्प, पु० गळ्यास सर्पाकार एक रोग होत असतो तो.

घटस्फोट, पु० प्रायश्चित्तादि न करणें इ० कारणानें आंगावें बसलेल्या डागांचें रक्त मरून कातडें घट्ट होतें तो; २, कों० भोपळा इ०चें जें कोंवळें लाहान फळ तो; ३, हरभर्‍यांचा जो सकसुक दाणा तो; ४, दे० स्त्री० घटाव.

घंटा, स्त्री० घंटाकार धातूचें एक वाद्य आहे, घंटावाजणें. रू० कांहीं एक पदार्थ संपल्याबद्दलें त्याचा अभाव होणें.

घटाई, स्त्री० घटवाई.

घटाघट, घटाघटा, अ० घडघट.

घटाटोप, पु० दे० देव्हारा, अंबारी, इ० कांवर घुमटाकार जें असतें तो.

घटाव, पु० अनेक द्रव्यें एकत्र मिळालीं असतां कांहीं एक गुणविशेष उत्पन्न होतो असा जो परस्परांचा आनुकूल्य भाव असतो तो; उ० आंबाडीचे भाजीचा आणि तेलाचा घटाव चांगला बनतो; २, डोलचांगला दिसायाजोगा जो सांरी इ०चा रचनाप्रकार किं० त्याणें आलाजो भरपूर दिसावयाजोगा डौल तो; ३, दे० वा० घटवेचा अर्थी प्रयोग करितात.

घटि

घटिका, स्त्री० घटका.

घटिकास्थापन, न० लग्न, मुंज, इ० शुभकार्यीं मुहूर्त साधायासाठीं जी घटिका स्थापितात तें कर्म.

घटित, न० बंधुवरांचा जन्मकाळावरून ज्योतिःशास्त्रवेद्य जो परस्परांचा आनुकूल्यभाव तें; २, कांहींएक कार्यसाधक जो दैवयोग तें; उ० कार्य होईल असें दिसतें परंतु घटित कसें आहे तें समजत नाहीं; ३, युक्त जो अवयवादिकानें तो, म० समासीं; उ० रूपशब्दघटित वाक्य बोलावें.

घटितार्थ, पु० अमुककार्य अमुकवेळेस अमुकानें अमुकप्रकारें करावें असा जो निश्चय तो; २, वा० घटितद्वितीयार्थी; उ० त्याणीं चांगल्यास मुलगी पाहावी असें योजिलें होतें परंतु तिचा घटितार्थ होत नसें झालें.

घटी, स्त्री० घटका.

घट्ट, वि० जामध्यें जलांश किं० पोकळपणा फारच कमी तो; उ० याचें शरीर घट्ट आहे; उ० पागोटें घट्ट बांध; उ० वरण घट्ट असावें.

घट्टंपट्टं, न० गट्टंपट्टं.

घट्टमूट, वि० घटमूट.

घट्टा, पु० घटाभवमार्थी; उ० त्याणीं वाहाताना खांद्यास घट्टे पडले.

घट्टाई, स्त्री० घट्टपणा.

घड, पु० जादेंतास अनेक फळें संलग्न असतात तो; २, दे० पांच-चार वाट्या एकत्र जडून कोशी किरी इ० वाटायासाठीं पात्रविशेष करितात तो;

३, कों० परस्परांचा ओसरव्यभाव तो; उ० सासबासूनांचा घडचांगला आहे.

घडकाम, न० धातुमयपात्रादि घडण्याचा जो व्यापार तें, उ० एथील कांसार घडकाम मात्र करितात जोतींव काम करित नाहीं.

घडकामी, घडकाम्या, ३ लिं० घडकाममात्र जाणतेतें असा जो कांस्यकारादि तो.

घडगंशीळ, न० रा० उतरतां अस्तन जो धोंडगळ जागा तें.

घडघड, घडघडां, अ० रथादिकांचा चालत्येसमयींचा शब्दाचें अनु०; २, अस्खलित पणें मोठ्यानें कागद इ० वाचण्याचें वि०; उ० हामुलगा घडघडां कागद वाचितो.

घडघडणें, रथादिकांनीं चालत्येसमयीं घडघडशब्द होईअसें वाजणें; २, ला० अधिकारादिनष्ट होणें; उ० त्यांची मामलत घडघडली; ३, योजिनजी मसलत इ० तीं कोसळलीं जाणें; उ० त्यांची मसलत घडघडली; ४, संकेतानें मरणास ल०; उ० तोदुखणेकरी घडघडला.

घडघडाट, पु० घडघडशब्दाचा जो अतिशय तो.

घडघोंसाळी, स्त्री० रा० एकवेल आहे.

घडघोंसाळें, न० घडघोंसाळीचें फळ.

घडण, स्त्री० घडून आलाजो पात्र, अलंकार, इ० कांसडौल ती; उ० यादागिन्याची घडण चांगली आहे; २, घडण्याचा जो व्यापार तो; उ० या सोनाराचे घडणीपेक्षां त्यासोनाराची घडण चांगली; ३, घडणावळ प्रथमार्थासही ल०; ४, न० पात्रादि घडावयासाठीं जें कांस्यकाराजवळ धातु इ० दिल्हें तें; उ० त्या सोनारापाशीं दोनमहिनें घडण दिल्हें आहे.

घडणावळ, स्त्री० पात्रादि घडणारास जें तत्संबंधी मोल्यदेतात ती; २, रा० घडण प्रथमद्वितीयार्थी.

घडणी, स्त्री० घडण प्रथमद्वितीयार्थी; २, गांवचेहिशेब कुळें इ० कलमें जाकागदावर लिहिलेलीं असतात अशाप्रकारचे कागदांचा समुदाय आहे तो, प्रा० कुळकरण्याचा घरीं असत्ये.

घडणें, ठोकणें, तासणें, इ० व्यापारानें चिरा, वाहाल, इ० कितीएक पदार्थ सिद्ध करणें; २, कांहींएक गोष्ट ईश्वरेच्छेनें होणें; उ० घडेलतसें घडो परंतु सहासना सोडूंनये; ३, कांहींएकगोष्ट कोणएकाचे हातानें केलीजाणें; उ० आमचे हातानें तुमचेंकार्य जितकें घडेलतितकें करूं; ४, हिशेब इ० कागदावर लेखपूर्वक आकारणें; ५, अस्पृश्यपदार्थास स्पर्श करणें; उ० तोभूड तुला घडला स्नानकरुन ये.

घडबड, अ० वा० भांडीं इ० परस्पर लागल्यामुळें जो शब्द त्याचें अनु० वाज इ० चें वि०.

घडबडणें, वा० घडबडशब्द होई असें भांडीं इ० नीं परस्पर लागल्यामुळें वाजणें.

घडबडयाँ, अ० वा० गडबडां लोळ इ० धा० म०.

घडमाळ, स्त्री० मध्यें खापेकडां ची जुळी बगळ्यावांचून लोटे वाधून जी राहाटाची मा-

ळ करितात ती.

घडमोड, स्त्री. कांहीं एक भांडे, दागिना, इ. कांचे घडण्या मोडण्याचा जो व्यापार ती; २. ला. देणें घेणें एतदात्मक वाणिज्यादि व्यापार, किं. राजकीय अधिकारी इ. कांचें नवें जुनें करणें इ. अनेक प्रकारचे नानाकार्यसाधक व्यापारांत कांहीं घडावें कांहीं मोडावें अशा तऱ्हेची जी खटपट ती.

घडवँची, स्त्री. तक्त्यास जोहोंकडे चार लांकडाचे पाय मारून करितात ती.

घडवण, न. रा. घडण.

घडशी, पु. स्त्री. शीण, नीच जाति आहे या. वाजंत्र वाजविण्याचें कसब करितात.

घडा, पु. मा. घागरीचे आकाराचें जें मृन्मय किं. धातुमय पात्र त्यास ल.; घडा भरणें, ल. कांहीं एक अधिकार, मनुष्य, इ. कांचें आयुष्य सरणें; पापाचा घडा भरणें, ल. पाप अतिशयित झाल्यामुळें त्याणें इहलोकींचें दुःख देण्याविषयीं अभिमुख होणें. घडा फोडणें, ल. कांहीं एक गुप्तगोष्ट प्रकट करणें.

घडाई, स्त्री. घडण्याचें मोल्य.

घडाघड, अ. रा. असा शब्द होई असें आंबे, मडकीं, घरें, इ. कोसळण्याचे वि.; २, स्त्री. भांडें, दागिना, इ. पदार्थांचा घडण्याचा जो व्यापार ती; उ. त्या तांबटाचा घरीं रोज भांड्यांची घडाघड चालली असते.

घडाड, पु. घडघडाट.

घडाडणें, घडघडणें.

घडाडाँ, अ. घडघडां.

घडामोड, स्त्री. घडमोड.

घडारणें, धा. वृक्षांनीं फलांचे घडांचे भरानें युक्त होणें; उ. गुद्स्तां यास एकेरी फलें आलीं होतीं परंतु यंदां घडारला आहे.

घडावण, स्त्री. घडाई.

घडिघडि, अ. वारंवार; उ. घडिघडि घडि चरणतुसे आठवती रामा.

घडिनघाट, पु. क्रयविक्रयादि व्यवहारीं अलंकारत्वपात्रत्वादिकें करून विवक्षित जो आइना प्रा. नवा दागिना, पात्र, इ. तो.

घडिबंद, २ लिं. घडी जाची मोडिली नाहीं असा जो धोतर जोडा इ. वस्त्र तो.

घडी, स्त्री. घटकारूप जें कालमान ती; २, एकेरी वस्त्र दुहेरी तिहेरी चौपडी केलें असतां जी होत्ये ती; ३, भंडारी लोक मद्य काढायासाठीं माडावर लाविलात जें मडकें ती; घडी बसणें ल. योजित कार्य यथास्थित पणें जुळणें.

घडीत, न. घडून केलाजो पदार्थ तें; उ. तुजकडे तयार असेल जें घडित तें सत्वर दे; २, घडण तृतीय चतुर्थार्थी.

घडींव, २ लिं. घडून केलाजो पात्रादि पदार्थ तो.

घडुलें, न. वा. केळीचें कोंबळें किं. लाहान जें लोंगर तें.

घडेबाजी, स्त्री. दारूचे नोटे, पताके, इ. एका घडयांत घालून एकदांच आग लावून

देनात अशीजी अग्निक्रीडा ती; २, ला० दे० वाद्यांचा गजर.

घडोघडी, अ० घडिघडि.

घडोंची, स्त्री० घडवंची.

घड्याळ, न० कालमान साधायाचें यंत्र आहे; २, घटिकादि कालमान ज्ञापनार्थ वाजविताना जो नाद तें.

घड्याळजी, पु० आपल्यास कालमान समजावें ह्मणून राजा इ० नीं घड्याळाचा कामावर कालमान सूचनार्थ ठेविला असतो तो.

घड्याळटिपरूं, न० संकेतानें निंदा असतां भाकर आणि मिरची यांस ह्म०.

घड्याळें, न० घड्याळ.

घण, पु० लोखंड, ताम्र, इ० कांवर उचलून मारायाचें कांस्यकार इ० कांचें एक आयुध आहे; २, ३लिं० जांत द्रवांश अल्प असा जो घृतादि पदार्थ तो; उ० या मधापेक्षां ह्मा मध घण आहे; ३, अविरलघणा किं० आडी जांत विशेष आहे असा जो पर्जन्य, तंतुसंयोग, कागद, पान, वस्त्र, इ० पदार्थ तो.

घणकोरा, ३लिं० घणाखालून नाजा निघाला असा जो रुपया, मोहोर, इ० नाणें तो.

घणघण, अ० घंटादि शब्दांचें अनु० वाज इ० चें वि०.

घणघणघंटा, स्त्री० दे० कांहीं एक पदार्थांचा जो केवल अभाव ती; उ० आज घरामध्यें तुझी घणघणघंटा वाजली आहे.

घणघणणें, घणघण शब्द होई असें घंटादि वाजणें.

घणघणाँ, अ० घणघण.

घणघणाट, पु० घणघण शब्दांचा जो अतिशय तो.

घणघणीत, ३लिं० घणघण शब्द ह्मणावया जोगा जो नाश, घंटा, इ० पदार्थ तो.

घणघाव, ३लिं० अवयवांनीं सदृढ असून प्रशस्त मोठा असा जो दागिना, वस्त्र, इ० पदार्थ तो.

घणघाउक, घणघावुक, ३लिं० रा० घणघाव.

घणदाट, स्त्री० ग्रं० मनुष्यादिकांची अतिशयित दाटी; उ० त्या यमुनातिरीं यादवांची हो घणदाट; २, वा० न० परस्परांचें परमसख्य; उ० आतांशीं त्यांचें वयाचें घणदाट आहे.

घणदाटी, स्त्री० वा० घणदाट ह्मणावयार्थी.

घणस, पु० रा० सर्पजातीय एक जनावर आहे ह्म० घणसापुढें गारूड चालत नाहीं.

घणसकाँडें, न० रा० एक वेल आहे.

घणसर, ३लिं० ईषदीषत् जो घणत्वादि पदार्थ तो.

घणसा, पु० रा० फुरशांत जाति आहे; २, पडवळांत जाति आहे.

घणाणाँ, अ० घणघणां.

घन, पु० घण; २, मेघ; ३, तुल्य तीन अंक परस्पर गुणून जें फल येतें तो; उ० चौहोंचा घन ६४; ४, ३लिं० जास लांबी रुंदी आणि उंची आहे असें जें क्षेत्रादि तो.

घनचक्र, घणचक्र, न० मोठा जो कलह, युद्ध,

ड्, तें; उ० अकस्मात् बोलतां बोलतां त्याचें आणि याचें घनचक्र उडालें ·

घनफल, घनफळ, न० भुज, कोटि, परस्पर गुणून पुनः तें उंचीनें गुणिलें असतां जें फल येतें तें; उ० भुज ४ कोटि ५, उंची ३ याचें घन फळ ६० ·

घनमूल, घनमूळ, न० घनापासून काढिलेलें जें मूळ तें; उ० चौसष्टांचें घनमूळ ४ ·

घनवर्ग, पु० घनाचा जो वर्ग तो; उ० घन २७ याचा वर्ग ७२९ ·

घनसांवळा, वि० घनासारिखा आहे सांवळा रंग ज्याचा तो ·

घनाक्षरी, स्त्री० कवितेंतला छंद आहे ·

घपकन, घपकर, घपदिशीं, अ० आकस्मिक मोठा रुवास येण्याचें वि०

घप्पाघोळ, पु० अनेक वाद्यांचा अव्यवस्थित मोठा शब्द; २, ला० अनेक पदार्थ अनेक कार्ये एकत्र मिळाल्यामुळें अव्यवस्थितपणा होऊन जो गोंधळ होतो तो; उ० या पोथीचा त्या पोरानें घप्पाघोळ करून टाकिला ·

घबाड, न० एक मुहूर्ताचा योग ज्योतिःशास्त्रांत सांगितला आहे; उ० अल्पप्रयत्नानें मोठा जो लाभ होतो त्यास ही सं०; उ० त्याला या खेपेस घबाड साधलें; २, तादृश लाभानुमित जो मुहूर्त त्यास ही सं०; उ० त्याला जेव्हां अकस्मात् एवढें द्रव्य मिळालें त्या जवरून असें दिसतें कीं जात्येसमयीं त्यास घबाड साधलें होतें ·

घबाडमाप, न० दे० शिरस्यापेक्षां मोठें जें माप किं० वजन तें; उ० हे दाढापायली गहूं आहेत परंतु त्या घबाडमापानें मोजिलें असतां आठ पायली भरतील; २, ला० सर्वांपेक्षां अधीक जेवणाराचें पोट ·

घमकन, घमकर, घमदिशीं, अ० घपकन् ·

घमघम, अ० अतिशयित रुवास रुटण्याचें वि०

घमघमणें, रुवास घमघम प्रसरे अशा अवस्थेनें पुष्पादिकांनीं युक्त होणें; उ० तेथें काय हो फुलें घमघमतात ·

घमघमाट, पु० रुवास प्रसराचा जो अतिशय तो ·

घमघमीत, वि० घमघम रुवास युक्त जो खोडणी इ० पदार्थ तो; उ० आजची भाजी घमघमीत आहे ·

घमंडु, स्त्री० कार्यासपुरुन उरलेला जो पदार्थांची समृद्धि ती; उ० आजलाडवांची घमंड झाली; २, कार्पण्यनकरितां उपभोग्य पदार्थांचा जो उपभोग ती; ३, अहंता;

घमंडगुळवणी, न० लापशी इ० सदृश जे गोड पदार्थ ते बिघडले असतां निंदेनें म्ह० ·

घमंडानंद, वि० शरीरानें रुरद असून जेवायास मात्र पुष्कळ मिळालें म्ह० इतर काळजी कोणतीही करितनाहीं असा जो मनुष्य त्यास निंदेनें म्ह०

घमंडी, स्त्री० घमंड प्रथमदिनी यार्थी; २, ग० कार्यकरणाराचा शक्तीपेक्षां जो अधीक कार्य करण्याचा प्रसंग ती; उ० आजपाहुणे पुष्कळ आहेत

हेत· यासुळें कामाची घरांत घमंडी आहे·

घमत, स्त्री०रा०गलबतांत जें गमन जमतें तीं·

घमतडी, स्त्री०ग० गमतडी·

घमशान, न० भक्ष्यभो ज्यादि पदार्थांची जी संमृद्धि तें; उ० त्याचे घरीं खाण्यापिण्या विषयीं तोटा नाहीं घमशान आहे; २, मनुष्यादिकांस शाप, गालिप्रदान, इ० व्यापारीं पराभूत करण्याचा जो प्रकार तें किं० वस्त्रादिकांची दुर्दशा व्हावयाजोगा जो उपभोगण्याचा प्रकार तें; चाल, उड व, धा०प्र०: १, वा०१ लिं० घमंडानंद·

घर, न० काष्ठादिनिर्मित पर्जन्यादिनिवारक छायेतें युक्त संसार कृत्योपयोगी जें स्थळ करितात तें; २, स्थित्यर्थ पशु, पक्षि, इ० कृतादिकांचें कोटें, बिल, इ० करितात तें; ३, किति एक वस्तूंचें जें उत्पत्तिस्थान किं० स्थितिस्थान तें, उ० पापाचें घर लोभ; उ० पित्ताचे घरीं औषध पोचल्याशिवाय पित्तशमायाचें नाहीं; उ० मायळ हें पावसाचें घर; ४, अंकलेखनार्थ किं० कोहींएक पदार्थ देवायासाठीं रेषादिचिन्हित कोष्ठक, पूड, इ० करितात तीं प्रत्येकीं; उ० वीस रेषा पाडिल्या स्म० एकूणीस घरें होतात; उ० या पिशवीस चार घरें आहेत; ५, मृदंग इ० चर्मवाद्यांचे वादी, दोरी, इ० परिच्छेदानें परिच्छिन्न जे प्रदेश ते प्रत्येकीं; उ० मृदंगाचा या घरापेक्षां हें घर उंच वाजतें; ६, तन्नत्पदार्थप्रमाणक काष्ठ, चर्म, इ० चेंजेतन्नत्पदार्थस्थापनार्थ करितात तें; उ० चरम्याचे घर मोडलें; ७, व्युत्पत्ति इ० तन्नद्विद्यांचें जें मर्मस्थान तें जाणा परिज्ञानानें सर्व तन्नद्विद्यांचें परिज्ञान होतें; उ० अमून तुमें हातीं व्युत्पत्तीचें घर लागलें नाहीं; ८, कृतीनें किं० स्वतः सिद्धपदार्थस्थित्युपयोगि असतें तें छिद्रादि तें; उ० भुंग्यानें त्या खांशास घर केलें आहे; उ० त्याचा हाडवैर्ण बरा साला परंतु हाडास जें घर पडलें आहे तें बरें होत नाहीं; ९, गृहांतराहाणारीं जीं कुटुंबाचीं मनुष्यें तें; उ० त्याचें घर फुटून तें सर्व वेगळे सरले; १०, गृहस्थाश्रमधर्म; उ० आजपर्यंत तो संसार करित होता पण आतां त्याणें घर सोडिलें; ११, सावकारी इ० व्यापारांतील जें सर्वस्व तें; उ०, आपलें घर पाहून काय करणें तें करावें; १२, कोहीं एक अर्थप्रतिपादनप्रवृत्त जो वक्ता त्याचें जें उद्देश्य तें; उ० पृथ्वी स्थिर आहे या उद्देशानें बोलत होतां तें घर सोडून भलतेंच बोलतां हें काय. १३, गात्रे सवयीं रागांतर न होण्यास कारण जीं स्वर, मूर्छना, यांची योजना तें; उ० तो सारंग गात होता पण त्याचें घर सोडून मल्हारांत गेला; १४, स्वरमंडल इ० वाद्यांचे स्वरभेदकल्पून जे अवच्छेदकेले असतात ते प्रत्येकी; १५, जीं चा भक्षणाद्युपभोगानें गोगादि उत्पन्न होतात असे जे पदार्थ त्यांस ही आरोपानें ल०; १६, वायु, पर्जन्य, इ० कांनीं धरिलीजी दिशा तें; उ० पंधरा दिवस उत्तराण वाहात होतीं आतां ते घर सोडून पश्चिम वाहूं लागली; १७, वायु, इ० रोगाधिष्ठित जो शरीरावयव तें; उ० माझें तनवायू होता त्याणें तें घर सोडून कमरेंत शिरला· घर करणें, ल० लग्न करून संसार थाटणें कांहीं तें घर करणें, घेणें, ल० शरीरावयवास छिद्र पाडणें;

घरासहाद बांधणें; ल० कोणएकास सतिबहिष्कृत करणें, घरबेणें, सणजे एरवा घास पुल्कि भयुन्की नें फसबून इत्यादि हरणें; घरदेणें, गमावणें, इ० स्थलीं फसणें इ० कारणामुळें आपला तोटा होई असें करणें; घरधुणें, ल० कोणएकाचा सर्वस्वापहार करणें कि० व्यसनादिकांचापायीं आपला च सर्वस्वापहार करणें; घरंरवायासयेणें, ल० घरांतीलमनुष्यें नाहीं अशीं झाल्यामुळें त्यांत भय वाटूं लागणें; घरबसणें, भंगणें, ल० सर्वस्वापहार कि० घरांतील पराक्रमी मनुष्य मरणें; अशा कारणामुळें कुटुंब आपत्तिदशेंत पडणें; घरबसविणें, ल० मुलींनीं नवर्याची स्त्री होउन त्याचे संसारास आधार होणें; घरमारणें, ल० इत्यादिकांविषयीं दुसर्यास नागविणें; घरींबसणें, ल० रोजगार इ० मेल्यामुळें निरुद्योग राहाणें; घरावरकुर्‍हाड घालविणें, ल० परस्परांचा कलह होई अशी कळपे दविणें, घरावरगोवरी, कि० निखारा, ठेवणें, ल० कांहींएक लचांडानें घरबुडे असें करणें; घरींयेणें ल० पतीस दिलेल्या कन्येनें विधवा होणें; घरडोईवर येणें, ल० घरांमध्यें मोठ्यांनीं आरडणें कि० कोलाहल करणें; घरनिघणें, रिघणें, ल० स्त्रीनें पतिकुळ सोडून दुसर्याचे आंगाखालीं पडणें; घरासकांटी लागणें, त्याजवरगदतरुसणें इ० स्थलीं घर उजाड पडणें असा अर्थ; खाल्याघरचे वांसे मोजणें, ल० जाणें आपलें घरकेलें त्याचें वाईट करण्याविषयीं प्रवृत्त होणें इ० संप्रदायप्रवृत्त जाणावे; ल० स्त्रियांस रिकामेघर कि० उपजतें घर; ल० कशीगसकें? घरासारखी; ल० घरासार

सारखा घरचार आणि कुत्र्यासारखा आचार; ल० आंगणावरून घरस्थीत जाणारी; ल० घरचंद्रमोडी आणि केसीवरनारडी; ल० घरासारखा पाहुणा होतो पण पाहुण्यास्तरवें घर होतनाहीं; ल० घरनादार आणि देवळींधिंड; ल० घरासांकड आणि बाईलमाकड; ल० बडाघरपोकळांसाभीकनमिळे सवामासा; दोहोंघरचापाहुणा उपाशींमरे.

घरकरी, पु० स्त्रिया आपल्यापतीस संकेतानें ल०; २, घरचा जो यजमान तो.

घरकरीण, स्त्री० संकेतानें स्वस्त्रीस ल०; २, घरची जो धनीण ती.

घरकलह, पु० एकाघरांतील मनुष्यांचा जो भाग्यग्रहणादिविषयक कलह तो.

घरकसबी, वि० तेनेंकसब करून उपजीवन करिणारसतां जो स्वतःतत्कलादिविषयीं निपुण तो.

घरका, पु० वा० कृतीनें कोणएकपदार्थास केलेंजें छिद्र तो.

घरकारणी, वि० दे० संसाराचा खटल्याचा मुख्य जो अधिकारी तो.

घरकुंडा, पु० पक्ष्यांचे कोटें.

घरकुबडा, वि० आपलें घरसोडून देशांतर ग्रामांतरादिकांचा ठायीं जाण्याविषयीं कंटाळा जास फारआहे तो.

घरकुबा, वि० घरकुबडा.

घरकूल, न० मुलें गेलें बायकांसाठीं यथाकथंचित् कांहींएकआडोसा लावून कि० मंडपाकार करिणातें.

तनें.

घरकेळ, स्त्री० दे० गांवकेळ.

घरकोंबडा, ३ लिं० घरकुबा.

घरखटला, पु० घरसंबंधि जो शेत, भात, इ० रूप खटला तो; २, घरकलह.

घरखटलें, न० घरखटला.

घरखप्या, घरकाम्या, ३ लिं० दे० घरांतलें मात्र कामकराव्याचे उपयोगीं जो मनुष्य तो.

घरखर्च, पु० घरचे मनुष्यादिकांकडे जो इत्यादि व्यय तो.

घरखानें, न० घरखर्चाचें मांडलेलें खानें.

घरगणती, स्त्री० घरांची संख्या करण्याचा जो व्यापार किं० त्याणें सालीजी इयनाती.

घरँगळणें, दे० उनरत्या आण्यावरून खरचट न खातीं येणें.

घरगुती, ३ लिं० भाड्याचा, उसना, बाजारी, इ० भिन्नजो गृहसंबंधी पदार्थ तो; उ० दोन घोडीं भाड्याचीं केलीं दोन घरगुती होतीं; उ० हें शेत घरगुती माणसांनीं चलाविलें; २, अ० ओ गमेहेनतीनें कि० कौशल्यानें; उ० त्याणें घरगुती राहाट भरला.

घरगोहो, पु० बाहेर भिनरा असून घरमध्यें जो पराक्रम दारवितो कि० तद्विषयीं चागो ही सांगतो तो.

घरघर, स्त्री० कंठांत कफ दाटल्यामुळें जो श्वासानें शब्द होतो तो; २, ओतें चालतेसमयीं जो शब्द होतो तो.

घरघरणें, कफरुद्ध कंठानें कि० चालत्येसमयीं ओतीं त्यानें घरघर शब्द होई असें वाजणें.

घरघरी, स्त्री० घरघर.

घरघालू, घरघात्या, ३ लिं० दुसर्‍याचें घर बुडविण्याचा कि० व्यसनादिकें करून आपलेंही घर बुडवून घेण्याचा स्वभाव आन्हातो.

घरघेडु, ३ लिं० दुसर्‍यास मोह घालून फसवून त्याचें घर घेण्याचा स्वभाव आन्हा तो.

घरघेणा, ३ लिं० घरघेडु; उ० हरिनुस्ति मुरली घरघेणी.

घरचा, ३ लिं० संपन्न इ० परापेक्षा न लागावया जोगे नेने गुण, कला, संपत्ति, इ० नीं जो युक्त तो; उ० तो घरचा गाणार, सुतार, विद्वान, इ० आणावे.

घरचार, पु० घरसंबंधी आचारादि रीती.

घरजाँवई, घरजाँवाई, पु० जो बाय को स्वतांसंसार करून सासर्‍याचे घरीं राहातो तो त्याचा;

घरजुगून, स्त्री० कांहीं एक अल्पपदार्थानें यथा कथंचित् घरखटल्याचा जो निर्वाह तो; उ० एक म्हैस आहे तिणें घरजुगुन मात्र होत्ये.

घरजोगावणी, स्त्री० घरजुगुन.

घरट, पु० मोठें जें पीठ दळावयाचें जातें तो आसभात दळावयाचे जातिणीचा सर्व संसरजाम लागतो; २, भात दळावयाचे जातिणीस ही स्त्र०

घरटका, पु० प्रतिगृहास जो प्रतिवर्षी राजकर पडतो तो.

घरटण, घरटणा, न० पु० प्रा० घरमोडल्यानंतर

नर त्या घराचा ओ चौथरा तें. तो; २, रा० सभों वत्या आवारारूद्दां जी मोडून नेलेल्या घराची जागा नें. तो.

घरटा, घरटा, पु० घराचा चौथरा; २, पक्ष्यांचें कोटें.

घरटी, स्त्री० कांहीं एक संमान विधि विषयीं प्रति गृहास उद्देश्यना असतां घरास च घरटी ल०; उ० घरटीस पांच पांच रुपये दिले, ना० ब्राह्मण गृहांवर च व्यवहार; २, घिरटी अर्थी ही प्रयोगकरितात; ३, कों० भात, इ० दळायाची जी जांतीण तीं.

घरटीप, स्त्री० घरगणती; २, ग्रामादिकांतील एकही घर न वगळतां क्रियाद्वारा रोगादिकांची जी व्याप्ति ती; उ० यंदा पोट दुरव्यानें घरटीप घेतली.

घरटोळ, घरडोळ, स्त्री० ग्रामादिकांतील प्रति गृहाचा जो साडा ती; उ० या गांवची घरटोळ घेतली तेव्हां चोर सांपडला.

घरडणें, घरटानें धान्य भरडणें.

घरडा, पु० रा० घरका.

घरडुकर, पु० न० गांवडुकर; २, ला० निंदाकर्त्या असतां निरुद्योग जा घरांतील स्त्रिया त्यांस ल०.

घरण, स्त्री० वा० घरांतील स्त्रियांमध्यें मुख्य जी कारभारीण स्त्री ती.

घरत, स्त्री० गरत.

घरतंटा, पु० घरकलह.

घरंदाज, २ लिं० स्वसत्तेचा घरांत अवरूनें रा-

हाणारा.

घरदार, न० घर इ० सर्व प्रपंचाचें खटलें; ल० एकपाहुणा लक्षणजे घरदार पाहुणें.

घरदेणें, न० घरटक्का.

घरधंदा, पु० घरांतील कांहीं एक काम मात्र.

घरधनी, पु० घरकरी.

घरनाशा, २ लिं० घरघात्या.

घरपट्टी, स्त्री० घरटका; २, कांहीं एक कार्यार्थ प्रतिघरावर केलेली वरगणी.

घरप्रवेश, पु० गृहप्रवेश.

घरफूट, स्त्री० घर, राज्य, इ० तील एकमतानें वागणार्‍या मनुष्यांचें परस्पर वैमनस्य.

घरफोड्या, २ लिं० घरफूट करण्याचा स्वभाव जाचा तो; २, घरें फोडून चोरी करणारा जो तो.

घरबंद, पु० घरांची वस्ती; उ० त्या शहरांत लाख घरबंद आहे.

घरबारी, २ लिं० बायको, पोरें, इ० खटलें जाचे मागें आहे तो.

घरबुड्या, २ लिं० घरघात्या.

घरबूड, स्त्री० कांहीं एक कारणानें सर्वस्वनाश.

घरबेगमी, स्त्री० घरीं संसार खर्चासाठीं जो धान्यादि संग्रह ती.

घरभरणी, स्त्री० रा० परिगवणी.

घरभाट, न० वा० घराचा सभोवती स्वस्थानाक घरा राखलची जी जागा तें.

घरभेद, पु० घरफूट.

घरभेदी, घरभेद्या, २ लिं० घरांतील पक्षाहित मनुष्य; २, घरफोड्या अर्थमाथीं.

घरिघणी, स्त्री॰ नूतन गृहांत प्रवेश ती॰

घरूँब, पु॰ वा॰ केरडोक॰

घरवट, स्त्री॰ वा॰ घरोटी॰

घरवड, स्त्री॰ वा॰ अथा द्वितीयार्थी॰

घरवण, स्त्री॰ घर, सैम, यांचेंजें सर्कार देणें ती॰

घरवंद, पु॰ रा॰ घरटणा॰

घरवाडी, स्त्री॰ कोणाएकास अनेक वाड्या असतात त्यांतील जा वाडींत धन्याचें घर असतें ती वाडी॰

घरवी, ३ लिं॰ वा॰ घरासाठीं काढलेलें किं॰ घरा सलाविलेलें तृणकाष्ठादि॰

घरशाकारणी, स्त्री॰ पर्जन्यादि निवारणार्थ घरावर तृणादिकांचे आच्छादन करण्याचा व्यापार॰

घरशिंवणी, स्त्री॰ घरशाकारणी॰

घरसंजोग, पु॰ दे॰ कांहीं एक कार्याविषयीं घरचा जो सरंजाम तो; उ॰ त्या हरदासाचा घरसंजोग आहे॰

घरसंजोगणी, स्त्री॰ घरजुगूत

घरसमजूत, स्त्री॰ कांहीं एक तंट्याची चौघांत नजातां आपल्येमध्यें घरचे घरांत जी समजूत ती॰

घरसारा, पु॰ दे॰ घरटक्का॰

घरसोकील, ३ लिं॰ दे॰ घरीं एक दोन वेळ खाव यास मिळाल्यामुळें त्या आस्थेनें घरसोडून जो बाहेर जातनाहीं तो; भा॰ पशु॰

घरस्थीत, स्त्री॰ गृहस्थिति॰

घरळणें, घुळणें॰

घरळता, ३ लिं॰ घुळता॰

घरा, पु॰ घरडा॰

घराउ, ३ लिं॰ घरगुती; २, घरचे घरींच बोलावयाची जी कांहीं एक गोष्ट इ॰ तो; उ॰ घराउ गोष्ट बाहेर बोलूंनये॰

घराणा, पु॰ दे॰ घराणें॰

घराणें, न॰ परंपरेनें चालत आलाजो वंश किं॰ त्या वंशांतील मनुष्य समुदाय नें॰

घरिगवणी, स्त्री॰ नूतन गृहांत जो प्रवेश ती॰

घरू, पु॰ दे॰ लांकूड लागल्यामुळें जो भुगा पडतो तो॰

घरोटी, स्त्री॰ घरांतील समाजिक इत्यादि; उ॰ घरोटीपैकी गुरें वांटावयाचीं आहेत॰

घरोपाध्या, पु॰ कुळोपाध्या॰

घरोबा, पु॰ वस्तुतः एका घरचे नसतां एकघरचा सारखा मित्रपणामुळें झालेला ऐक्य भाव॰

घरोसा, पु॰ गृहादिकांचे उर्ध्वभागीं धूर बहुत दिवस लागल्यामुळें जीं जळमटें लोंबूं लागतात तो॰

घर्म, पु॰ सं॰ घाम॰

घर्षण, न॰ सं॰ घांसण्याचा व्यापार; २, ला॰ विद्यादिकांचा अतिशयित अभ्यास; ३, कोणएक गोष्टीची वादादिद्वारा वाटावाट॰

घल, पुं॰ कों॰ सद्द्रव पदार्थ अमळसा दाट झाल्यामुळे भा॰ पाहिजे तसा नव्हे तो॰

घवघवीत, ३ लिं॰ पाहातांच नेत्रांस समाधान वाटावयाजोगा परिपुष्ट जो दागिना, मनुष्य, इ॰ तो॰

घशा, पु॰ कों॰ चुन्यासारिखा पांढरा एक मृत्तिकाविशेष आहे.

घष्टा, पु॰ पदार्थ घांसला जाई अशा पदार्थावरून हत्यादि फिरविण्याचा जो आवृत्ति त्या प्रत्येकी; उ॰ तांब्या काळा पडला आहे चार अधीकंउणे घष्टे मारल्यास स्वच्छ होईल.

घष्टें, न॰ वा॰ संकेतानें तुपास ल॰

घस, स्त्री॰ कांहीएक व्यवहारांत मूळचे भांडवलास आलेली न्यूनता; उ॰ दोनमण गुळास दाहाशेर घस आली; २, २ लिं॰ ग॰ खरजें घर, इ॰ तो; ३, स्त्री॰ वा॰ खापराचीमस.

घसकन, घसकर, घसदिशी, अ॰ बहुत धान्यादि एकवेळ ओतण्येसमयींचे शब्दाचे अनु॰ ओत इ॰ चेंवि॰

घसका, पु॰ दे॰ प्रा॰ मृदुपदार्थावर जो शस्त्रादिकांचा तडाका तो; २, कों॰ घष्टा.

घसक्या, २ लिं॰ जाचाकामामध्यें नाजुकपणा नाहीं तो.

घसघशा, २ लिं॰ घसघसकरण्याचा स्वभाव जाचा तो

घसघशीत, २ लिं॰ घसघशीत; २, दे॰ न्यूनतादिदोष रहित तो; उ॰ हा जोडा घसघशीत अक्काहान आहे.

घसघस, स्त्री॰ खाराखारीर.

घसटणें, उ॰ घर्षणादिद्वारा पदार्थाचा अंश निघेअसें करणें; उ॰ त्याभिंतीशीं त्याचें अंग घसटतांच वरची खचानिघाली; २, एकमेकास कळावया जोगा स्पर्श करून जाणें; उ॰ तो तोचाल्यार त्याअंगास घसटूनगेला; ३, ला॰ दे॰ लाटालाटीनें दपटणें; उ॰ याणें भाजीन निवडितां नशीच घसटली.

घसटया, २ लिं॰ लाटया मनुष्य.

घसण, स्त्री॰ कों॰ घसनथमार्थी; २, ग॰ अतिपरिचय; उ॰ त्यांचीं आमची आलीकडे बरीच घसण पडली आहे.

घसमस, स्त्री॰ धसफस.

घसरडा, २ लिं॰ मनुष्यादिकांनीं घसरावा जोगा जो उतरता बुळबुळीत जागा तो; उ॰ घसरडा जागा आहे संभाळून उतरा.

घसरडें, न॰ घसरडा जो जागा तें; २, घसरडपणा; उ॰ या जाग्यावर घसरडें झालें आहे संभाळून चाल.

घसरण, स्त्री॰ घसरडे.

घसरणें, घसरडे जाग्यावरून खरकन सरणें. २, ला॰ कांहीएक कर्मांविषयीं सावेश प्रवृत्त होणें; उ॰ तो पदण्यावर घसरला आहे; ३, बुद्धिभ्रंशादिकारणामुळें तद्विपरीत संधान सलागावया जोगें त्यात्या व्यापाराचें संधान करे अशा अवस्थेनें युक्त होणें; उ॰ बोलतां होता ब्रह्मज्ञानाचा गोष्टी, मग जो घसरला तो रांडबाजीचा गोष्टी सांगूं लागला; ४, अधिकारावरून च्युत होणें कि॰ तो निघणें; उ॰ तो या मामलतीवरून घसरला; उ॰ त्याची मामलत घसरली; ५, एखाद्याचे आंगावर तुटून पडणें; उ॰ तो त्याचे आंगावर घसरतांच त्याची बोबडी वळली; ६, शरीरक्षीण होणें; उ॰ आलीक

लीकडे त्याचें शरीर घसरलें; ७, कांहीं एक व्यवहारांत खोंच बसल्यामुळें रखलीं येणें; उ० त्या व्यापारांत पांचहजारांची खोंच येतांच तो व्यवहार घसरला आणि तत्कर्ता ही घसरला; ८, स्वभाव, प्रकृति, इ० कांनीं अन्यभाव पावणें.

घसरा, पु० घष्टा; २, दुसर्‍यानें दबावें म्हणून दबावण्याचा जो व्यापार तो; उ० त्याचेवरास घसरा देतांच चोर कबूल झाला; ३, दे० घसमथमार्थी; बस, धा० भ०; ४, महाहानिकर जें लचांड किं० त्याचा जो आपणावर संबंध होणें तो; उ० पेंडार्‍यांचा घसर्‍या बरोबर जे घसर्‍यांस मिळाले त्यांचें ओझें अमून वर आलें नाहीं.

घसवट, स्त्री० वा० तत्तद्व्यवहारीं मनुष्यादिपदार्थांची जी वहिवाट ती.

घसवटणें, उ० घसटणें प्रथमार्थी; २, ला० मनुष्यादिपदार्थांनें तत्तत्कार्योपयोगि व्हावयाजोगें तत्तदभ्यासानें युक्त होणें; उ० याकामांत तो चार दिवस घसवटेल तेव्हां उपयोगी पडेल.

घसवट, पु० ला० घसवटणें रूप व्यापाराचा मनुष्यादिकांवर जो निरंतर चालूपणा तो; उ० तो बैल घसवट्यारबाबीं पडेल तेव्हां नरम होईल.

घसा, पु० गळ्याचे आंतील प्रदेश; २, कंठध्वनि; उ० याचा घसा गोड आहे.

घसाघस, अ० प्रा० खसाखस.

घसाटा, पु० रा० घसवट.

घसारा, पु० दाहापांच औषधें उगाळून एकत्र सरबीत करितात तो.

घसासा, अ० घसाघस.

घसें

घसें, न० गाडीचें वाहन गाडयाभारिचें आवणें वेमूद व्यापारासाठीं करितात त्याम स्व०

घस्मर, वि० आडअसून जो बळकट पदार्थ तो; उ० हा पुरुष घस्मर आहे; २, दे० कोणएकाचें खाउन निसंतान करणारा तो.

घळ, पु० रा० ओघे इ० उतरायाची आंखी; २, गुरूळ; ३, स्त्री० पर्वताचे दोहों दंडामधली पाण्यानें धुपून खोलट झालेली जागा.

घळघळ, अ० नेत्रांतून पाणी वाही असें रडण्यानें वि०.

घळघळणें, रा० ज्वरादिकानें आंगाचे सांधे शिथिल झाल्यामुळें अत्यंत अशक्तता पावणें; उ० काल चे उपोषणानें मी केवळ घळघळलों; २, शरीर कृश झाल्यामुळें आंगरखा, बांगडया, करगोटा, इ० ढील होणें.

घळघळपोतें, न० आंग इ० कांचा वेनापेक्षां विशोभित ढील जो आंगरखा, जोडा, बांगडी, इ० पदार्थ, तें.

घळघळमाळा, स्त्री० अतिढीलजा बांगडया इ० त्या.

घळघळां, अ० घळघळ.

घळघळीत, वि० घळघळपोतें; २, वेनापेक्षां मोठेंछिद्र किं० तद्विशिष्टपदार्थ; ३, निष्कपटपणानें विपुलजें भाषण, मिश्रपणा, इ० तो; ४, घमंडीव्हावयाजोगा विपुलपदार्थ; ५, घसघशीत हितीयार्थी.

घळण, स्त्री० दे० न० पर्वतावर किं० नदीचेतीरीं उदकाचावेगानें घळून घळून जी उतरती जागा,

खची

रवळी, इ० होत्ये ती ·

घळणें, उदकांचानेटानें नद्यादिकांचीमाती धुपधुपून आणें; २, मोक्तिकादिक, नासिका, इ० कांचींछिद्रें मोठीं होणें ·

घळघ, स्त्री० घळण ·

घाई, स्त्री० उतावळी, ओंधळारूप अर्थावांचून; २, ल० चर्मपात्रादिकांचा गजर किं० त्यांचेवाजविण्याची गति ·

घाउक, २ लिं० वाणिज्यादि व्यापारामध्यें किरकोळ नव्हे जो जिन्नस, इत्यादिपदार्थ, तो; उ० घाउक मालघेतला तर सवंगमिळेल ·

घाँग, २ लिं० कांहींएक गोष्टीविषयीं आंगीं सामर्थ्य असून रहाणाऱ्याचा स्वभाव जाचा तो; २, स्त्री० स्मृति, निषेध असतांचम० ·

घागर, स्त्री० पाणी आणावयाचे उपयोगी आंवळ गळ्याचें पात्र आहे; पालथे घागरीवरणीं, याचा म० जेथें उपदेशउसत नाहीं तेथें उपदेश मसंगीं उपमेनें स्त्र० ·

घागरगडचा सभा, पु० संकेतानें पाणकेपणास स्त्र० ·

घागरा, पु० घोरबायकांचा नेसावयाचा परकर; २, मुलांचा खेळावयाचा खुळखुळा; ३, एकमाड आहे ·

घागरी, स्त्री० क्षुद्रघंटिका; २, घागरानतीयार्थी; ३, त्याचेंफळ ;

घागरें, न० कनेकडाचें बूड आलांकडाचे तुकडेयांस खरवणी घेवुन देविताना नें लांकूड ·

घाँगूड, पु० कमळाचा पांकळ्या गळल्यानंतर जो गड्डा जमतो तो ·

घाघर, स्त्री० घागर ·

घाँट, स्त्री० घंटा; २, ल० गुह्यगोष्टसर्वांस सांगण्याचा स्वभावजाचा त्यास आरोपानें स्त्र० ·

घाट, पु० या ग्रामदेशापासून ग्रामांतरादिस्थलीं जावयाचा मार्गामध्यें मोठाजो पर्वत असतो तो किं० त्यावर चढाउतरायाचाजो रस्ता तो; २, नद्यादिकांचातीरीं स्नानार्घ पायऱ्यांची बंदिस्त करितात तो; ३, कोंकणचे लोक सह्याद्रीचे पूर्वेचाजो देश त्यास स्त्र०; ४, डोल; उ० याभांड्याचा घाट चांगला आहे; उ० त्या मसलतीचा घाट चांगला उतरला; ५, आटाघाट; ६, स्त्री० पाण्यास पीडलावून घाटून खावयासाठीं करितात ती ·

घाटणा, पु० दाणे खापरांत घालून भाजल्येसमयीं दबळायासाठीं कातीस फडकीं गुंडाळून करितात तो; २, वा० घाटवाइनांत डाळ इ० घाटायाचा जो लांबोडा दगड असतो तो ·

घाटणें, धान्यादिकांचे सर्वअवयवांस भाजणें, शिजणें इ० संस्कार मारण्ये व्हावेलणून घाटणा, पळी, इ० कांनीं धान्यादि हालविणें; २, ल० कांहींएक कर्तव्यकार्यविचारांत आणणें; उ० पंधरादिवस तें लग्न घाटत होतें पण मिळीस गेलें नाहीं; ३, न० घाटणा प्रथमार्थी ·

घाटपाया, पु० पर्वतसंबंधी घाटाचा जो पाया तो; उ० घाटपायापासून घाटमाथा कोसभरउंच आहे ·

घाटबंदी, स्त्री० पर्वतसंबंधी घाटबांधायास जो

खर्च लागतो तो उगवायासाठीं त्यामार्गे येणारे जे लोक त्यांपासून जेंइव्य घेतात ती; २, घाटा नें कोणीं येतुं जातुं नये म्हणून जो केला बंदोबस्त तो.

घाटबुडी, स्त्री० रा० घाटपाया.

घाटमाथा, पु० सह्याद्रि इ० कांचा घाटाचा माथा.

घाटलें, न० गुळवण्यास पीठ लावून घाटून करितात तें पक्वान्न आहे.

घाटवळ, घाटवळी, २ लिं० देशावर राहणारा जो बैल, मनुष्य, इ० तो.

घाटवाईन, न० वा० डाळ इ० पदार्थ घाटावयाचे उपयोगी जें दगड, लोकूड, इ० कांचें उरवळा सारिखें करितात नें.

घाटशुद्ध, घाटसृट, २ लिं० दे० आकारशुद्ध.

घाटसरी, स्त्री० घाटमाथ्याचा जो आसमंतात्प्र देश तो; उ० घाटसरीचे किल्ले प्रायः पाडिले.

घाँटसर्प, पु० घटसर्प.

घाटा, पु० सकवच हरभर्याचा दाणा; २, दे० भाजरी, जोंधळा, हे सडून यांचा जो भात करितात तो; ३, घाट पहा अर्थी.

घाटा, पु० घाटा प्रथमार्थी.

घाटाघाट, स्त्री० ला० कांहीं एक कार्याचा चिरकाळ अनेकप्रकारचा चालला लाजो विचार तो.

घाँटी, स्त्री० घसा; २, हनवटीखालीं गळ्यास जें हाड वाटलें असतें तो; ३, घांटेसही स्त्र०

घाटी, २ लिं० सह्याद्रीवरचा जो देश तत्संबंधी जो जिन्नस, मनुष्य, इ० तो; २, आण्यायेण्याचा प्रसंगीं घाटेवरील लाद्यानशीं जी डोंगरी वाट त्या डोंगरीवरील रस्ता ती.

घाटीरबंडी, स्त्री० विसावणाची रबंडी.

घाट्या, पु० नदी इ० कांचा घाटावर स्नानार्थ येणारे लोकांस भस्म, गोपचंदन, देवुन उपजीवन करितो तो.

घाड, स्त्री० कों० शरीरास मोठें जें क्षत पडतें तो; २, पेंढ्याची एकवळ कटी.

घाडकी, स्त्री० रा० घाडण्याचें कर्म.

घाडी, पु० रा० देवसूकीचा एक अधिकारी आहे.

घाण, स्त्री० दुर्गंधि; २, ला० केर, कचरा, इ० रूप वाईट भसा मानिलेला पदार्थ; ३, दुर्दशा; ४, कांहीं एक व्यवहारसंबंधी अवशिष्ट खरटें; उ० मागली घाण काढून टाकानंतर दुसरा पेका घ्या; रा० हा यीचे घाणीचा आहे, स्त्र० आश्विनत्वारि संबंधविशिष्ट आहे.

घाणणें, दुसर्यास दुर्गंधि यावया जोग्ये दुर्गंधि प्रसारानें कोणएकपदार्थानें युक्त होणें.

घाणवणें, घाणणें.

घाणा, पु० तेलकाढावयाचें तेल्याचें यंत्र आहे; २, उंसाचा रस काढावयाचा चरक; ३, मुंज. लग्न, इ० कांचा आरंभीं कांडण्यांचा सम्मारंभ करितात तो; ४, खापर, उरवळ, तेल्याचा घाणा, कुंडी, इ० कांत कंउनार्थ एकवार घातला जितका पदार्थ तितका तो; ५, संक्रांतीचे दिवशीं ब्राह्मणास द्यावयासाठीं उरवळावर जो धान्य राशि करितात तो; ६, दोतीन उगीच लेखणी घालून देविली असतां हात सोडल्यावर त्या विशिष्टास स्त्र०

घाणावणें, घाणवणें.

घाणी, स्त्री. मा. घाणा-चतुर्थपंचमार्थी.

घाणेरडा, २ लिं. दुर्गंधियुक्त पदार्थ; २, जाला दुष्कर्मादिकांचा कंटाळा नाहीं तो; ३, ज्याचा संबंध नेकंटाळा येतो असा जो पदार्थ भाषण इ. तो; उ. घाणेरडया गोष्टी येथें बोलूं नको.

घाणेरा, २ लिं. घाणेरडा.

घाणेरी, स्त्री. दुर्गंधिविशिष्ट झाड आहे.

घाणेरीमुंगी, स्त्री. सा. मुंगींत एक जाति आहे. जिला घाण येत असते.

घात, पु. सं. प्राणिवध; २, ला. लाहान मोठा जो नाश तो; २, स्त्री. कृष्यादि व्यापारांचा किं. वृक्षादिकांस फलादि येण्याचा जो मुख्य समय तो.

घातक, घातकी, २ लिं. कोणएकाचा वध किं. मोठा नाश करण्याचा स्वभाव जाचा तो.

घातचतुर्दशी, स्त्री. सा. भाद्रपदवद्य चतुर्दशी, जो आघातानें मेला त्याचें श्राद्ध त्यातिथीस करितात.

घातपात, पु. कोणएकाचा वध किं. नाश इ. तो; मनुष्यानें कोणाएकाचा घातपात करूं नये.

घातपाती, २ लिं. घातपात करण्याचा स्वभाव जाचा तो मनुष्य.

घाव, स्त्री. सा. पर्वतावें किं. कानळ्यावें आंग जाव याजोगें जें बीळ पडतें तो.

घाबरणें, भयादिकांमुळें सुचेना अशा अवस्थेनें युक्त होणें; उ. वाघास पाहातांच तो घाबरला.

घाबरा, २ लिं. घाबरला तो.

घाम, पु. ज्वर, उष्णसंयोग, इ. कारणांनीं आंगास सुटतो जो द्रव तो; २, दे. सद्रवपदार्थयुक्त पात्र अग्नीवर देविलें असतां त्याचेवर सांकण जें देविलें त्याला खालचे बाफेचा जो द्रवांश जमतो तो; ३, काष्ठादि अल्पत्वें समर्थ त्यास जो द्रव ये तो तो.

घामट, २ लिं. शरीर, वस्त्र, पात्र, इ. कांची स्वच्छता बाळगीत नाहीं तो.

घामटा, पु. श्रमातिशयामुळें जो घाम येतो तो, श्रमातिशय वर्णनप्रसंगीं च प्र.

घामशाण, घामसाण, स्त्री. घर्मयुक्त पदार्थास जो गंधि येतो ती.

घामाघूम, २ लिं. श्रम, इ. कारणामुळें जाचे सर्वांगास घाम सुटला तो.

घामावणें, श्रमादिकामुळें शरीरास घर्म येई अशा अवस्थेनें युक्त होणें.

घामेणें, घामावणें.

घामोळी, स्त्री. घामाचा विकारानें शरीरावर जी पुळी उठते ती.

घामोळें, न. घर्मविकारानें जो आंगावर पुरळ उठतो तें; २, चर्मी जोडप्यांत जो कादून साडावा जोगा चर्माचा तुकडा घालितात तें; ३, घोडयाचे पाठीचा घाम खोगिरास लागेल किं. डोकीचा घाम पागोटयास लागेल म्हणून खोगीर पागोटें यांचा खालीं वस्त्र घालितात तें.

घाय, पु. घाव.

घायकटार, २ लिं. सा. कोउणा.

घायकुटार, २ लिं. कांधाई करण्याचा स्वभाव जाचा तो.

घायकुत्या, २ लिं० घायकूत करण्याचा स्वभाव जाचा तो.

घायकूत, स्त्री० दुसऱ्यानें घाबरलेंजावें अशारीतीचा घाईकरण्याचा जो व्यापार तो.

घायरखोर, २ लिं० कांघायखोर.

घायताबणें, क्रि० दुसरा घाबरे अशी त्यास घाई करणें.

घायपात, स्त्री० एक झाड आहे.

घायमारी, स्त्री० घायपात.

घायाळ, २ लिं० शस्त्रादिकांचेवार जाचा आंगावर झालेआहेत तो; २, ला० पराजय, दुष्कर्मप्रसिद्धि, इ०, कारणामुळें जाची मानखंडना झाली आहे तो; ३, स्त्री० घायमारी.

घायाळचतुर्दशी, स्त्री० घातचतुर्दशी.

घार, स्त्री० पक्षी आहे.

घारकूट, न० उडीद आणि तांदूळ एकत्र दळून केलेलें आडें पीठ.

घारगा, पु० एक पक्वान्न आहे.

घारडोळया, २ लिं० घारेआहेतडोळे जाचे तो.

घारमोर, न० दे० आलंचोमालंचो.

घारवीट, न० घारकूट.

घारा, २ लिं० पिंगटवर्णडोळा; २, तद्विशिष्टमनुष्यादि तो.

घारी, स्त्री० घारगा.

घारूड, न० घारींचासमुदाय; २, घार,

घारोळा, २ लिं० ज्ञा० घारा.

घालकाढ, स्त्री० पुनः पुनः घालणें काढणें असा जो व्यापार तो.

घाल

घालघसर, स्त्री० कांहींएकगोष्टीविषयीं अनादर आलस्यादि मूलक अनास्था; उ० अध्ययनाविषयीं घालघसर करिशील तर फसला जाशील.

घालण, स्त्री० द्रव्यनाशकारक पण जोगी तोवन; २, दे० मार्गांमधील चोरांनीं गांडावें अशा संभावनेचा जो मार्गाशी तो; उ० या मार्गांत दोनकोश घालण आहे संभाळून जा.

घालणें, पाण्यादिपदार्थांचा आंत क्रि० वरजसापाहिजेतसापदार्थ टाकणें; उ० शीत्यांत भांडीं घाल; पानावर भात घाल; २, छिद्रामध्यें काढी इ० पदार्थ शिरविणें; उ० त्याछिद्रांत काटघाल; ३, तत्संबंधीव्यापारजनितसंस्कार त्याजवर त्याजवर करावा स्व० तो तो पदार्थ त्यात्या व्यापारीं योजणें; उ० गहूंदळावयास घातले; मूलपदावयास घातला; ४, ऋणादिरूपेंकरून दुसऱ्याचें द्रव्य घेउन तें द्रव्य आपणदेनांबुडविणें तद्द्वारा त्यासावकार इ० कांसबुडविणें; उ० त्याणें माझे हजार रुपये घातले; उ० त्याणें मला हजार रुपयांस घातलें; ५, कोणएकावर चोरी, आळ, इ० कांचा अभियोग करणें; उ० त्याणें त्याजवर बालट घातलें; भित, कूड, बांध, इ० घालणें, स्व० नानत्यदार्थसिध्यर्थ नानापदार्थ नेथेनेथे सिद्ध करणें; वाद, समाधना, गोंधळ, इ० घालणें स्व० करणें; वरण, पुरण, इ० घालणें स्व० नानद्रव्यें करून सिद्ध होईअसें करणें; शपथ घालणें, स्व० शपथाचा कोणएकावर प्रक्षेप करणें; गूढहिशेब इ० घालणें, स्व० नेंतें त्याणें त्याणें उलगडावें स्वणून तत्तद्विषयीं प्रश्नादि करणें; हात घालणें, स्व० पदार्थ घेण्याविषयीं क्रि० कांहींएक कार्याविषयीं प्रवृत्त होणें;

उडी

डी, झेंप, इ० घालणें. स्त्र० पदार्थादि ग्रहणार्थ सदेगजाणें; भोजनास घालणें, स्त्र० कोणएकास भोजन देणें; भूल, भीड, इ० घालणें, स्त्र० दुसऱ्यास पडेअसें करणें; बाजार, अड्डा, दुकान, डौल, आव, ग्रन्थ, इ० घालणें, स्त्र० मांडणें; संप्रदाय, रीति, इ० घालणें, स्त्र० चालू करणें इ० लाक्षणिकार्थ बहुत होतात ते जाणावे.

घालफेल, स्त्री० ज्वरादिकांचे काहिली मुळें इतस्ततः चलनवलनरूप जो व्यापार तो.

घालमेल, स्त्री० इकडचें तिकडे तिकडचें इकडे असें करण्याचा व्यापार; उ० त्या पोरानें पोथी-ची घालमेल केली; २, मामलत, इ० व्यवहारांची जी अदलाबदल, कि० वियोग, ती; उ० मामलती-ची घालमेल दिसते; ३, कांहीं एक गोष्ट सिद्ध करण्या विषयीं जी अनेक प्रकारची खटपट ती; उ० तो लग्नाचा घालमेलीत आहे; उ० त्याणें भामलती साठीं पुष्कळ घालमेल केली; ४; सोईनें चालिलेल्या व्यापारामध्यें जें अंतर ती; उ० पथ्यांत घालमेल नसल्यास गुण येईल; ५, घालफेल.

घालमेलणें, उ० प्रा० कोणएक पदार्थाचा घालमेल प्रथमार्थ करणें.

घालमेल्या, २ लिं० घालमेल प्रथम तृतीयार्थ करण्याचा स्वभाव जाचा तो.

घालवणें, विवक्षितस्थल, अधिकार, इ० संबद्ध जो मनुष्यादि पदार्थ तो त्याचा पासून जाई असें करणें, प्रा० पाडव, धाड, इ० धातूंचा अर्थी प्रयोग होत नाहीं; २, कांहीं एक अंक गणीतून कांहीं एक अंकराशि वजा करणें; उ० दाहांतून घालविले पांच तेव्हां राहिले पांच; ३, कालादि अतिक्रांत करणें; उ० मीं एथें करवानें काळ घालविलें; मसलत, डाव, इ० घालवणें स्त्र० बुद्धिदोषामुळें बिघडे असें करणें.

घालवेडा, २ लिं० स्वकार्य साधनार्थ वेडेपण घेण्याचा स्वभाव जाचा तो.

घाला, पु० सर्वस्वनाशकारक या जोगा संकटाचा अनिवार्यपणें जो पात तो.

घालू, २ लिं० ऋणादि व्यवहारद्वारा दुसऱ्याचें द्रव्य घेवुन जिरविण्याचा स्वभाव जाचा तो.

घालूनपाडून, अ० जास बोलायाचें त्याचें नाम न घेतां त्याला आपणास च बोलतात असें वाटाया जोग्या बोलण्यावें वि०.

घाव, पु० वस्त्र, शस्त्र, इ० कांचा स्वपरविषयीं जो प्रहार तो; २, शस्त्रादि प्रहारानें पडलेलें क्षत.

घावटणें, तांदूळ इ० पदार्थ थोडक्या घावांनीं मऊ करणें; उ० तांदूळ भरभर से घावटून आण; २, शस्त्रादिकांचा थोडथोडया जरबमा होत अशारीतीनें अनेकवार प्रहार करणें; उ० चोरानीं त्यास घावटलें.

घावटळणें, घावटणें.

घावडाव, पु० डावघाव.

घावन, पु० पक्वान्न आहे.

घावना, पु० रा० घावन.

घास, पु० हिं० गवत.

घाँस, पु० ग्रास; २, जांत्यांत दळावया साठीं घालतें जें धान्यादि तें नदळतां राहिलें जें तो; धर, धा० भ०; उ० हें जांतें घांस धरतें; ३, ३ लिं० दे० जांत्यांत एकवार घालितात जें वैरण त्यास ही भ०,

४, गवत.

घासकटावू, ३ लिं. केवळ अप्रयोजक जो शिपाई किं. चोगली धार नाहीं असें जें तरवार, इ. मोठें शस्त्र त्यास निंदेनें स्व.

घांसटणें, घसटणें पहा मार्थी: २, दे. ला. कांहीं एक व्यवहारांत दुसऱ्यास घेऊन येई असें करणें: उ. यांणें त्यास त्या व्यवहारामध्यें पांचशें रुपयांस घांसटलें.

घांसण, स्त्री. घसण पहा मार्थी, भा. घे धा. प्र.

घांसणी, स्त्री. घर्षण व्यापार; २, पात्रादि घांसावयासाठीं चोथा, इ. घेतात ती; ३. ला. दुसऱ्यास त्रासदजी गांजणूक ती.

घांसणें, उ. कोणएक पदार्थाशीं कोणएक पदार्थ दृढसंयुक्त धरून भा. परस्परांचा किं. त्यांतील एकाचा अंश निघे असें मागें पुढें करणें; २, घांसटणें; ३, दे. ला. विद्यादिक दृढ अभ्यस्त करणें: उ. दाहावेळ घांसला पाहिजे तेव्हां श्लोक पाठ येईल; ४, दुसऱ्या बराबर बरकशीला यावणें; स्व. हांसून घ्यावें परंतु घांसून घेऊं नये.

घांसदाणा, पु. शब्दकिं. मोठा मनुष्य इ. आपल्याकडे आले असतां त्यांस जी भोजन सामग्री किं. घोडयास गवत इ. जो घालावा लागतो तो.

घांसाघांस, स्त्री. कोणएक बराबर अतिशयित बरकशी लाविण्याचा व्यापार; २, खागरखीर.

घांसाघीस, स्त्री. खागरखीर.

घाळ, ३ लिं. रा. गाहाळ; २, स्त्री. वा. घळण.

घाळणें, मोलें इ. कानीं वेजीं उतरणें; २, गहाळणें; ३, रा. सावधपणानें जें काम करावयाचें त्या सावधपण्यास अंतर पडल्यामुळें फसणें.

घिगी, स्त्री. रा. घाबरलें इ. लांकडें उंच चढतांना साडीं जी कैची करितात ती; घिग्या लावणें, स्व. कांहींएक गोष्टीविषयीं कोणीएक प्रवृत्त होई असें आर्जवादिद्वारा त्यास उत्तेजन देणें.

घिरघिसा, पु. रा. किरकिसा.

घिरॅट, पुं. रा. घरट.

घिरट्टणें, स. घरटानें धान्यादि भरडणें.

घिरटी, घिरठी, स्त्री. वर्तुलादिरूप जाणें येण्याजाण्याचा एरसारा ती; प्र. अनेक.

घिवर, पु. पकान्न आहे.

घिवरपात्र, न. घिवर करावयाचें उपयोगी जें पात्र करितअसतात ते.

घिसघिशा, ३ लिं. घिसघीस करण्याचा स्वभाव जाचा तो.

घिसघीस, स्त्री. घासाघीस.

घिसाडी, पु. स्त्री. ईण, लाकडकाम करणारी एक जाति आहे.

घुंगरावणें, धुडकावणें.

घुगरी, स्त्री. द्विदल धान्यकिं. जोंधळे बाजरी गहूं. इ. शिजवून फलाहारार्थ करितात ती; न. अनेकव.; उ. तुमासठीचा घुगऱ्या म्यां खाल्या आहेत, स्व. मीं तुजपेक्षां चतुर आहे.

घुंगरू, पु. नृत्यसमयीं पायांत बांधितात जो चाव त्याची एक घागरी.

घुंगरूट, न. एकपरदी आहे.

घुगा. पु. घरावरील तृणाची कुसकी गुंडी तो; २. प्रफुल्लित दशासन्नदशापन्न पुष्पकलिका.

घुगी, स्त्री॰ कों॰ आकस्मिक जो मोठ्या कार्याचा संपाटा येतो ती; २, पर्जन्यादि निवारणार्थ सरबला इ॰ कांची जी टोपी करितात ती॰

घुंगुर, पु॰ घुंगरू॰

घुंगुरमाळ, स्त्री॰ घुंगरू अनेक एकत्र गुंफून बैल इत्यादिकांचे गळ्यांत माळ घालितात ती॰

घुंघुर, पु॰ घांगुड:२, घुंगरू॰

घुटकन, घुटकर, घुटदिशी, अ॰ जलादि भाशन किं॰ प्राणगमन अशा समयींचे शब्दाचें अनु॰ पी, जा, इ॰ कांचें वि॰

घुटका, पु॰ जलादिकांचा घोट; २, चालणें, मैथुन, इ॰ कांविषयीं अलौकिक शक्तियाची स॰ औषधाची गोळी तोंडांत धरित असतात अशी प्रसिद्धि आहे ती॰

घुटघूट, अ॰ दुग्धादि अनेकवार सशब्द भाशन समयींचे शब्दाचें अनु॰ बालादिकांचे दुग्धादि पानाचें वि॰; उ॰ तेंमूल घुटघुट दूधपीतें॰

घुटमळणें, घुटमुळणें, मरणाची घरघर लागल्यानंतर प्राणनजाता घोंटाळ्यांत पडणें; २, कांहींएक कार्य कराचयाचें पडलें असतां तें करावें नकरावें अशाविचारांत अडचणलें जाणें॰

घुटवळणें, प्राणकंठासयेणें; उ॰ सर्वदशहोतांच प्राणघुटवळला; २, प्राण्यानें ती दशा पावणें; उ॰ एकनिडके बराबर तो घुटवळला; ३, कांहींएक पदार्थाचा उत्कंठेनें घाबरें होणें; उ॰ त्याचा प्राण आईसाठीं घुटवळला आहे॰

घुटी, स्त्री॰ तान्ह्या मुलास आयफळ इ॰ पदार्थ उगाळून घालितात ती॰

घुटें

घुटें, न॰ उडदांचें वरण, कोडणी, इ॰ देवुन करितात तें॰

घुट्ट, न॰ प्राणोत्क्रमण किं॰ घोटगिळणें एतत्काली न जो कंठशब्द तें॰

घुडघुडी, स्त्री॰ वा॰ गुरगुडी॰

घुडणें, रा॰ कर्तव्यकर्माचें पूर्वीं तनद्योधक चिन्ह दिसावयाजोगें कांहींएक कर्म करावयास सिद्ध होणें; उ॰ तो जावयास घुडला, निजावयास घुडला; प्रा॰ जेवायास, निजायास, अशींउपपदें लागून प्रयोग होतात॰

घुडा, घुडया, पु॰ वरंगल सणून भातांत एक जाति आहे॰

घुडाघूड, स्त्री॰ रा॰ घोडयावर कंठाळ देवणें इ॰रू पजी गमनार्थ सिद्ध जाती; उन्हामचीं घुडाघुड होईतों मीं जेवून येतों॰

घुणघुणा, पु॰ नाकांतील अवयव आहे॰

घुणा, पु॰ दे॰ लांकडाशीं लांकूड जोडून तीं घट्ट तेथे राहावीं असा बांधण्यांचा जो प्रकार तो॰

घुणाक्षर, न॰ किडयानें काष्ठादि कोरिलें असतां जें अक्षराकार चिन्ह उठतें तें; २, भ्रमराचे गुंजारवांत अक्षरासारिखें भासतें तें॰

घुणाक्षरन्याय, पु॰ अमुकाचें चित्र काढितों असा संकल्प नसतां कोणएका सारखें जें साहजिक चित्र उतरतें तसा उतरण्याचा जो प्रकार तो॰

घुबुड, न॰ उलूक सणून पक्षी आहे त्यास स॰

घुमघुमणें, असा शब्द होईअसें तोफ इ॰ गाजणेंजणें॰

घुमट, पु॰ देवालयादिकांस कळसाचे खालीं डे-

ज्याचे

र्थाचे आकारार्थी जी बंदिस्त करितात तो; २, न० चर्म वाद्य आहे.

घुमटा, पु० तबल्याचे बाह्याचा जो घुमघुम शब्द तो.

घुमटी, स्त्री० देवालयादिकांचा लाहान घुमट.

घुमणें, तोफ इ० कांचा शब्दानें, किं० व्यक्त शब्दानें प्रतिध्वनि युक्त होणें; २, नाद बाहेर जाववयास अवकाश नाहींसा झाल्यामुळें त्या नादानें परिपुष्टता पावणें; ३, पारव्यानें स्वजातीय शब्द करणें; ४, ला० जाचा भक्षणीं ईषद्उन्माद होयी अशा दशेनें हरिकानें पावणें; उ० हे हरीक किंचित घुमतात; ५, कांहीं एक कार्य होणार होणार असें सर्वत्र बोलत अशा अवस्थेतें त्या कार्यानें पावणें; उ० ते वाडा बांधणार हें वर्षभर घुमतें आहे; ६, यामादिकांत झालीजी गुप्त गोष्टी ती बहुत दिवस घुमपणें त्याणें बाजवळ याणें दुसऱ्याजवळ अशा रीतीनें बोलत असावें अशा अवस्थेतें त्या गोष्टीनें पावणें; उ० तिणें पोट केलें आहे हें वर्तमान दोन महिने गांवांत घुमतें आहे; ७, लवकर समाप्त व्हावें म्हणून चालू झालें जें कार्य त्याणें लांबणीस वाली पडणें; उ० तें काम चालू होऊन दोन वर्षें झालीं अद्यून घुमतेंच आहे समाप्तीस गेलें नाहीं; ८, आंगीं पिशाच संचार होऊन हूंहूं असा शब्द करणें, किं० त्या पिशाचानें तादृश अवस्था कारकतें करून होणें; उ० हा पिशाच संचाराने घुमतो आहे; उ० तें पिशाच त्याचे आंगीं घुमतें आहे; असे प्रयोग होतात.

घुमरणें, घुमणें अर्थार्थी.

घुमरा, पु० स्वल्प घुमतो जो हरीक तो.

घुमा, पु० दे० भोंवर्याचे खेळामध्यें घुमे बाजीनें खेळत असतां जावर डाव लागू होतो त्याचे भोंवर्यावर आपला भोंवरा मारून क्षत करीअसतात तो; २, ३ लिं० पोटांत ज्ञान चांगले असून प्रसंगीं ही बोलण्याचा आलस जास तो; घुम्या लणें, गाजविणें, एथें दुसरा जर्जर पराजित इ० रूप होई असें लना प्रहरादि करणें; या लांकडानें फोडल्या समयीं माझा घुमा यातला एथें त्या लांकडावर कर्तृत्वारोप होतो.

घुमाबाय, पु० दे० अतिशयित आळशी जो बाय तो; २, ला० तसा मनुष्य.

घुमेंघालणें. रा० घुमा घालणें.

घुमेबाजी, स्त्री० दे० जाणें डाव जिंकिला त्याने दुसऱ्याचे भोंवर्यावर घुमे मारावे असा जो खेळण्याचा प्रकार तो.

घुरघुरणें, मार्जार, व्याघ्र, आस्वल, इ० कांनी मा० संतत घोरण्याचे शब्दासारिखा शब्द करीत असणें.

घुरघुर, स्त्री० घुरघुरण्याचा जो शब्द त्याचा प्रकार तो.

घुरघूस, पु० फकीराचे हातांत. डोक्यांत. किं० उरामारून घ्यावयाचा खुळखुळा असतो तो.

घुरटाण, स्त्री० शरीर, वस्त्र, इ० कांस तेल, तूप, इ० चा संबंध झाल्या नंतर दुर्गंधि येतो ती.

घुरदळणें, दे० घुधडणें.

घुरदळा, पु० दे० घुधडो.

घुरदळी, स्त्री० दे० नाचणें, उडणें, इ० रूप जो प्रकाराचा चेष्टा ती; प्र० अने० व०.

घुरट्टें, न॰ दे॰ गुधडा॰

घुरमुळणें, दे॰ घुरमळणें॰

घुरम्यांव, न॰ माजराचे शब्दाचें अनु॰ कर धा॰वि॰

घुरवड, पु॰ एक झाड आहे॰

घुला, पु॰ कवडींत भेद आहे

घुलावणें, कोणएकानें स्वशब्दावें एतदर्थ सुचकारणें इ॰रूप अनेकप्रकारचा युक्ती चालविणें; २, कोणएकास कांहींएक कार्याविषयीं आज उद्यां अशारीतीनें सोंकें देणें॰

घुशी, स्त्री॰ घुसण्याचा जो व्यापार तो॰

घुसटणें, घुसडणें, घुमटणें, भा॰ उपभोग्यपदार्थांची आस्वानधरितां जनेंर होई असा उपभोगादि व्यापार त्याकरचालविणें॰

घुसडा, पु॰ घुसडण्याचा व्यापारानें पदार्थांची झालीजी दुर्दशा तो किं॰ तो व्यापार तो॰

घुसणी, को॰ गोटी घुसण्याचा जो व्यापार तो॰

घुसणें, दुर्गमस्थलादिकामध्यें बलानें किं॰ युक्तिप्रयुक्तीनें शिरणें; उ॰ त्या दारीमध्यें तो घुसला; उ॰ मुसलमानाचाजातीमध्यें फिरंगी घुसला; २, गोटयाच्यावेळामध्यें आवर कोपरीयेत्ये त्याणें आपलीगोटी आगळेकडे सारणें॰

घुसदा, पु॰ वा॰ घुसडा॰

घुसमटणें, ग॰ श्वासोच्छ्वासनिरोध झाल्यामुळें व्याकुळ होणें; उ॰ मींधुरानें घुसमटलों; २, ला॰ दुसर्याची आशंका इ॰ कारणामुळें मोकळेपणीं वागावयास सांपडतनाहीं मध्यें होउन अडचणींत जाणें

घुसळखांब, पु॰ दहीं घुसळण्यासाठीं जो खांब असतो तो॰

घुसळण, न॰ घुसळण्यासाठीं पात्रांतर घालिलेलें दधि तें; २, घुसळण्याचा जो व्यापार तें॰

घुसळणें, दहीं इ॰पदार्थ पात्रांत घालून मंथणें; २, ला॰ एखाद्यास एखादे व्यापारांत थकें असें करणें; उ॰ याश्लोकानें आठदिवस घुसळिलें तेव्हां लागला; याचअर्थी हाडें घुसळलीं असेंही स्म॰

घुसा, पु॰ क्रोधार्थी भा॰

घुस्सा, पु॰ रोंसा॰

घुळघुळणें, दे॰ पोटांत घुळघुळ असा शब्द होणें॰

घुळणें, लोटत किं॰ गडबडत पदार्थानें जाणें॰

घूँट, ३लिं॰ को॰ शरीरामध्यें जात असलेला जो रसुनट तो॰

घूड, पु॰ घडप्रथमार्थी; २, तदाकार काच इ॰ अलंकारांस मौक्तिकादिकांचा लाविलेला तो॰

घूम, पु॰ डोळ्यांचे वरचे पापणीचे भोंत ओरकविकार होत असतो तो॰

घूल, स्त्री॰ रा॰ घुल्ला॰

घूँस, स्त्री॰ उंदिरासारिखा मोठा एक प्राणी आहे॰

घृत, न॰ लोणी कढविल्यानंतर जें होतें तें॰

घृतकुल्या, स्त्री॰ तुपाची जी समृद्धि॰

घृतपक्व, ३लिं॰ तुपांत तळलेला जो पदार्थ तो॰

घृतपाचित, ३लिं॰ घृतपक्व॰

घृतबुद्धि, स्त्री॰ जी बुद्धी मनुष्यांस कांहीं एक विषय समजला तथापि तत्सम दुसर्या विषयीं चालनजाही अशी जी बुद्धि ती; २, ३लिं॰ तद्विशिष्टमनुष्य॰

घेगा, घेघा, पु॰ग॰ एलगार; २, को॰ पशुजनयाद्यर्थ गाभिप्रदान, मारणें, टोकणें, इ॰रूप जो व्यापार तो॰

घेघे, स्त्री॰ वीरयुद्धसमर्थी आवेशानें असा शब्द उच्चारितात

तात; २. घेगा प्रथमार्थी.

घेघेमार, पु० नलदीनें कांहींएक मोठें कार्य सिद्धकरण्या विषयीं चोंहोंकडून अनेकांचा पगकाढेचा जो प्रयत्न तो; उ० घेघेमार केला तेव्हां त्यानें घर विकलें; २, ग० अ० विचारनकरितां घाईनें कांहींएक कामकरण्याचें वि०.

घेंटोळी, स्त्री० पांदरीचुनर्नबाल्मणून वेल आहे ती.

घेणी, स्त्री० घ्यावयाची जी गंजिफांतील तलफती.

घेणें, कांहींएकपदार्थावरील अन्यदीयसंबंधाची आत्यंतिक किं० सावधिक निवृत्तिकरून, स्वत्वाक्रांत करणें; उ० हें पागोटें त्यापासून विकत घेतलें; उ० ही पोथी चारदिवस वाचायला घेतली आहे; २, कांहीं एकपदार्थ हस्तादिकानें स्वसन्निकृष्टकरणें; उ० हातांत लेखणी घेतली. घोंडा घेतला; ३, कांहींएक कार्यार्थ कांहींएकपदार्थ नियमयुक्त करून इतर व्यावृत्ति करणें; उ० या घराला शंभर हात जागा घेतली; ४. कांहींएक कार्यानें स्वमिथ्यर्थ काल, देश, बल, इ० आक्रांत करणें; उ० हें काम अद्यापि एक वर्ष घेईल; उ० आंगरखा अक्षून हातभर कापड घेईल तेव्हां तयार होईल; उ० हें लोकूड फुटायास बहुत वेळ घेईल; ५, अंतःकरणावर उत्पन्न होणारे जे कंटाळा, व्यसन, इ० धर्म ते मनानें दृढ धरणें; उ० एकदां जा विषयाचा कंटाळा मनानें घेतला त्या विषयीं पुनः मन वळतनाहीं; ६, अन्यदीयकार, मान, कलह, इ० स्वाभिमान विषयकरणें; उ० त्याचा कज्जा याणें घेतला; ७, दुसऱ्यापासून समजून घेण्याचा जो विषय तो त्यापासून सबुद्धारूढ करणें; उ० तुमचा पूर्वपक्ष घेतला. उ० त्याचें समाधान घेतलें; ८, कौल, निरोप, संधा, धडा, रुकार, इ० दुसऱ्यापासून मागून स्वविषय करणें; ९, भा० सकर्मक सर्वदुर्लभ धातूंवरून तत्तद्धात्वर्थांवर कांहीं स्वीयसंबंध असतां याचा योग होतो आणि पूर्वधात्वर्थाचा बोधविषय होतो; उ० तुम्ही तें धुवून घ्या; १०, दुसऱ्यापासून, हांसून, मागवून, मारून, घेणें स्व० भा० तत्तद्योग्य अपराध, प्रमाद, इ० घडल्यामुळें तत्तद्व्यापाराधिकरण आपण होणें; उ० दादीनें आजुनको तुडवून घेतलें; त्याणें त्यास मनस्वी घेतला. पथें दुर्भाषणादिद्वारा गर्वहीन किं० पराजित केला अमा अर्थ. यावेळीं मार मारून. बोलवोलून, द्वीउपपदेंद्वा लागतात; उ० त्याणें त्याला मार मारून घेतलें; शोध, मोज, माप, लढाई इ० स्थळीं घेणें स्व० करणें; बातमी, चाहुल, पायरव, इ० घेणें स्व० युक्तीनें आपल्येमनांत येई असें करणें; कदेनी, तिरपगडें, इ० घेणें स्व० नेंनेंग, ज्या विषयीं फलाशा करणें; मन घेणें; स्व० सरळमार्ग सोडून आडमार्गांत शिरणें; उ० त्याच्योगनीं मन घेतलें नेव्हां सांपडतना असे झाले; स्व० भाषणादि व्यापारीं शक्ति सोडून भाषणादि करूं लागणें; मंजल, चाली, इ० घेणें स्व० चालणें इ० व्यापारांनीं तो तो पदार्थ सन्निहित होई असें करणें; कानें घेणें, स्व० स्वारस्य व्यापाराचा उपदेशमुळें, किं० श्रवणामुळें त्यांतून निघणें; तड, अंत, ठोवट, इ० घेणें, स्व० आरंभिलें कार्य समाप्तीस नेणें; आळ, धास्ट, तुफान, इ० घेणें स्व० नेंनें दुसऱ्यावर लागू होई असें करणें; गांड, घोंग, इ० घेणें, स्व० नेंनें सिद्ध होई असें करणें; उत्थापन घेणें, स्व० सत्कारार्थ कोणएकास उठणें;

जागा घेणें स्र० पूर्वीचा वसलेल्या मनुष्यानीं जो कोणी मागाहून आला त्यास वसावयास जागा होई असें करणें; सावकाशीवर, चालीवर, खेरवर घेणें स्र० सावकाशी, खरा, इ० कांवर लक्ष्य ठेवून तत्त व्यापार करणें; पाठ घेणें, स्र० पळणारास धरावयासाठीं त्याचे पाठोपाठ धावणें; परीक्षा घेणें, स्र० जा पदार्थांतजो गूण ऐकिला असतो त्याचा प्रश्नादिकें करून अनुभव घेणें; गाय, इ० कांनीं वांसरूं घेणें. स्र० ममता पूर्वक पाजणें; जीव, माण, अबरू, इ० घेणें, स्र० दुसरा तद्विषयक होई असें करणें; उडी, चमकण, इ० घेणें, स्र० तेंतें करणें, इ० घे धातुचे अर्थ अपार जाणावे.

घेणेंकरी, ३ लिं० उत्तमर्ण; २, ला० अनुपयोगी केवळ खावयास मात्र काळ अमाजो त्यास स्र०.

घेणेंदार, ३ लिं० घेणेंकरी.

घेतांदेतां, अ० ठरावून घ्यावयाच्या व्यवहाराचा समयीं: उ० मनगाची दाहारुपये किम्मत सांगतो परंतु घेतांदेतां दोन रुपये उतरील.

घेपादेपा, स्त्री० व्यर्थ जी घेणें, देणें, इ० रूप खटपट ती; उ० व्याजावांचून व्यर्थ कोण घेपादेपी करीत बसतो.

घेमार, स्त्री० दे० घेघेमार.

घेस्रटल्या, अ० आपला केवळ निरुपाय झाल्यावांचून निषेध असतां, कर, बोल, इ० धा० स्र०; उ० तो घे स्रटल्या शिव्या देणार नाहीं.

घेर

घेर, पु० कांहीं एक पदार्थाचे भोंवतालचा जो परिधि तो; उ० या किल्ल्याचा घेर पांच कोश आहे; २, आंगरख्याचा चोळ्यावरील चा जो भाग तो.

घेरणें, कांहीएक पदार्थ सभोंवताला वेढा देऊन व्याप करणें; उ० त्या फौजेनें त्या सरदारास चोहूं कडून घेरिलें; २, पडिपू, दरिद्र, रोग, इ० कांनीं स्वस्थ वृत्तीनें व्यापणें; उ० कामानें त्यास घेरलें आहे.

घेरदार, ३ लिं० मोठा घेरा जास आहे असा जो आंगरखा इ० तो: २. घेरा आहे अशी जी चोंडी ती.

घेरा, पु० घेर प्रथमार्थी; उ० त्याचे कमरेचा घेरा मोठा आहे; २, तो घेर व्यापावयाजोगी जी मनुष्यादिकांची स्थिति तो; उ० त्या किल्ल्या भोंवती फौजेचा घेरा आहे; ३, रा० पाहाडी किल्ल्याचे आसमंतात जी उपत्यका तो; उ० विशाळ गडचे घेऱ्यांत आमचा गांव आहे.

घेरी, स्त्री० पित्तादिकारणानें जी गिरकी येत्ये ती.

घेरोसा, पु० घरोसा.

घेव, पु० वा० ऋणादि संबंधी दुसऱ्याकडील घ्यावयाचें राहिलें जें द्रव्य तो.

घेवडा, पु० वेल आहे, जाचे शेंगांची भाजी होत्ये.

घेवडी, स्त्री० घेवड्याची शेंग; २, वा० घेवडा.

घेवडें, न० वा० घेवड्याची शेंग.

घेवदेव, पु० स्त्री० सावकारी संबंधी घेणें, देणें, इ० रूप जो व्यापार तो ती; उ० त्याचा व आमचा उदीम संबंधें घेवदेव आहे.

घेवबा, ३ लिं० दुसऱ्यापासून अनेक पदार्थ निरंतर मागून घेण्याचा स्वभाव जाचा त्यास स्र०.

घेवाणदेवाण, न० अहेर, इ० रूप जें उसनें वा-

ण

णतें ·

घेवादेवा, पु० को० घेवदेव ·

घेवारी, पु० दे० घाऊक माल विकत घेऊन घरोघर विकायासाठीं फिरतो तो ·

घेलट, घेलाड, न० बावळा वेडगळ असा जो मनुष्य तें ·

घेशा, ३ लिं० आर्ष असून जो फार आळशी तो ·

घेस, ३ लिं० घेशा ·

घोकक्काम्या, ३ लिं० रा० अर्थानुसंधान, पाठयेणें, इ० संधान न धरितां केवल घोकण्याचा स्वभाव जाचा तो ·

घोकणी, स्त्री० अध्ययनादि यांतें लक्षून तदंतर्गत शब्दांचा किं० वाक्यादिकांचा अनेकवार उच्चार ती; २, ला० कांहीं एक पदार्थाचा उत्कंठेमुळें तन्नाम ग्रहण पूर्वक जो निजध्यास ती; उ० त्यामुळानें आईची घोकणी घेतली आहे ·

घोकणें, घोकणीकरणें ·

घोकींव, ३ लिं० घोकघोकून पाठ केला जो ग्रंथादि तो; उ० यांचें घोकींव पांडित्य आहे ·

घोक्या, ३ लिं० घोकक्काम्या ·

घोंगट, घोंघट, न० दे० घोंघों शब्द करणार्या मक्षिकांचा जो समुदाय तें; २, ला० झटया अर्थी प्रा ·

घोंगडबाजु, ३ लिं० मुलांस भेडावावें लक्षून घोंगडी पांघरून भयंकर स्वरूप धरितात तो ·

घोंगडी, स्त्री० कांबळ्याचें एक पट्टें ती; २, तदाकार परंतु उंच किमतीची पांढरी किं० करवादकी थोर असते ती ·

घोंगडें

घोंगडें, न० घोंगडी अर्थमार्थी; प्रसंग विशेषीं कांबळ्यासही ल० ; २, कांहीं एक जें लचांड तें; गळ्यांत या शब्दाचा योगीं प्र० ; उ० त्याचेंगळ्यांत पोरांचें घोंगडें पडलें आहे, यामुळें त्यास फाव नाहीं ·

घोंगडया, ३ लिं० निरंतर घोंगडी पांघरावयाचे योग्यतेचा हलका शूद्रादि मनुष्य तो; २, घोंगडी पांघरलेला जो मनुष्य तो ·

घोंगना, पु० घोंगडी इ० दुपट करून एकाबाजूस शिवून खोळा करितात तो; २, कांबळा, इ० कांची जी खोळ करितात तो ·

घोंगनी, स्त्री० दे० घोंगना ·

घोंगरा, घोंघरा, ३ लिं० फुटक्या मडक्याचा ध्वनी सारिखा किं० लहानीचा कंठ ध्वनी सारिखा जो कंठध्वनि तो; २, तद्विशिष्ट मनुष्य तो ·

घोंगशी, स्त्री० वा० चोपदरी शेला किं० घोंगडी यांस उभा दोरा घातला असतां घोंगत्याचा आकार होतो ती; २, फाटून दोबळा पडतो जाजम्यास तें चोहोंकडून आटपून घेऊन, शिवलें असतां जो शोलचेतो ती ·

घोंगा, पु० वा० घोंगडबाजु ·

घोंगाट, न० दे० पर्जन्याचें जें आडंबर तें ·

घोंगाण, न० दे० कांहीं एक वस्तूवर घोंघों शब्द करणार्यें मक्षिकांचा जो समुदाय तें ·

घोंगेरा, घोंघेरा, पु० भ्रमर जातीय क्षुद्रजंतु आहे ·

घोघाट, पु० समुद्र, नदी, इ० कांचा जो घोघो शब्दाचा समुदाय तो ·

घोघारी

घोघारी, २ लिं॰ घोघारदेश संबंधी जो रघोबरें इ॰ पदार्थ तो ·

घोघावणें, घोघो शब्द होई असें समुद्रादिकांनीं वाजणें ·

घोंघावणें, मक्षिकांनीं घोंघों असा शब्द करणें ·

घोंघों, अ॰ मक्षिका समुदाय, भ्रमर, इ॰ कांचे शब्दाचें अनु॰ कर इ॰ धा॰ वि॰ ·

घोघो, अ॰ समुद्रादिकांचा शब्दाचें अनु॰ कर इ॰ धा॰ वि॰ ·

घोट, पु॰ एकवार गिळावया जोगतें जें मुखगृहीत कि॰ पात्रस्थित उदकादि तो ·

घोंट, पु॰ घोट: २, न॰ पिकलेली जी रुपारी तें: ३, स्त्री॰ सकंटक झाड आहे; ४, न॰ त्याचें फल तें; ५, स्त्री॰ रा॰ एक वेल आहे जिचा कोमल अंकुरांची भाजी होत्ये ·

घोंटणी, स्त्री॰ घोंटण्याचा जो व्यापार तो ·

घोंटणें, कागद, इ॰ गुळगुळीत व्हावा म्हणून कवडा इ॰ कानीं घांसणें; २, कांहीं एक पदार्थ बारीक व्हावा म्हणून दंड इ॰ कानीं चुरडणें; ३, रंगादि रवलणें ·

घोटणें, तोंडांत एकवार पाणी घेउन गिळणें ·

घोंटवाल, पु॰ वालांत एक भेद आहे ·

घोंटवेल, स्त्री॰ भातांत एक जाति आहे ·

घोंटा, पु॰ घोंटून केलें जें भांगेचें पाणी तो; २, गोंफा ·

घोंटाळणें, अक्षरबद्धावें म्हणून कित्याचे अक्षरांतून हात फिरविणें; २, वारा, इ॰ कांनीं एकमार्ग नधरितां चालणें; ३, कर्तव्याकर्तव्य विषयीं निर्णय न साल्यामुळें अंतःकरणानें अनेकविधतापावणें कि॰ अविशिष्ट मनुष्यादिकांनीं होणें; उ॰ तें सनंग कितव्या रुपयानी देण्याविषयीं त्याचें मन घोंटाळत होतें ·

घोंटाळा, पु॰ सोईनें लागलेल्या वस्तूची जी अस्ताव्यस्त दशा तो; उ॰ यापोरानें पोथीचा घोंटाळा करून टाकिला; २, वायू, इ॰ कांनीं एकमार्ग नधरितां जो त्यांचे चालण्याचा प्रकार तो; उ॰ त्यावार्याचे घोंटाळ्यांत गलबत सांपडून बुडूं लागलें; ३, कांहीं एक कर्तव्याकर्तव्य विषयीं जी बुद्धीची अनेकविधता तो; उ॰ त्याचे घरीं भोजनास आवें नजावें कि॰ ग्रामांतरीं आवें एतद्विषयीं मीं घोंटाळ्यांत पडलों आहें ·

घोंटी, स्त्री॰ घोंट तृतीयार्थी ·

घोंटींव, २ लिं॰ घोंटून घोंटून विवक्षितानुरूप झालां जो पदार्थ तो ·

घोटें, न॰ रा॰ घोंटें मुख्यार्थी ·

घोडकुदळ, २ लिं॰ मुंजन होतां कि॰ कन्येचें लग्न न होतां विशोभित दिसावया जोगा बादला तो ·

घोडकें, न॰ वा॰ निंदेनें घोड्यासारखें ·

घोडक्या, २ लिं॰ घोड्याचे चाकरीसाठीं जो मनुष्य ठेविला असतो तो ·

घोडगांठ, स्त्री॰ परस्परांचें परस्परांस बळकट व्हावयाजोगी जी बुद्धबळांचाडावांत दोन घोड्यांची स्थिति ती ·

घोडदळ, न॰ घोड्यांची जी फौज तें ·

घोडदौड, स्त्री॰ घोड्यासारिखें धावणें ती ·

घोडमात, स्त्री॰ बुद्धबळांचा खेळांत घोड्याचा

शह देउन राजा कोंडण्यानें ओडाव होतो ती.

घोडमुंजा, पु. घोड़कुदळ जो मुलगा तो.

घोडवळ, स्त्री. बांधलेल्या घोड्यांचीं जी पंक्ति ती; २, घोडशाळा; ३, वा. उपवर जी कन्या ती.

घोडवेल, स्त्री. औषधार्थ घेतात जी घोड्याची लीद तीस संकेतानें ल.

घोडशह, पु. बुद्धिबळांचे खेळांत राजास घोड्याचा जो पडतो शह तो.

घोडशाळा, स्त्री. घोडीं बांधावयाची पागा ती.

घोडशीर, स्त्री. पायांचे टांचेचा वरचा बाजूची जी शीर ती.

घोडा, पु. अश्व; २, ला. पालखी टांगावयासाठीं आडव्या लांकडास पायमारून करितात तो; ३, मुलें दोन पायांमध्यें काठी घालून धांवतात त्यास मर्दी त्या काठीस ल.; ४, अथांतर लाहान लाहान फांद्यासमेत जी झाडाची निष्पत्र फांदी समुद्रस्नानार्थ गेलें असतां वस्त्रें ठेवायासाठीं नेतात तो; ५, पालखी ठेवायासाठीं जे दोन खांब केले असतात तो; ६, चालण्याचे प्रसंगीं प्रत्येकीं पायांस संकेतानें ल.; ७, तारुण्यदशापन्न जो मनुष्य तो पोरपणानें वागूं लागला असतां आरोपानें ल.; ८, मुलगें रांगायाचे पूर्वी गुडघे व दोन हात टेकून उभें राहिल्यानें जो आकार होतो तो; ९, मुलाचा खेळांत वाहुल्या, इ. बसायासाठीं हातांनीं हातपाय गुंतवून आकार विशेष करितात तो; घोडा मैदान जवळच आहे, एथे अनुमानादि सिद्ध गोष्टीचा अनुभव येण्याचा प्रसंग जवळ आहे; तागांव घोड्याचे पाठीवर दाहाकोश आहे; ल. चरबदा हाकोश असाअर्थ; तूं एथून घोडा हाक, ल. निघून जा: घोड्यावर घोडा घालणें, घोडीवर घोडी घेणें, ल. अमुक द्रव्य देउन मामलत इ. पनकरली जाणें त्याजवर अधिक द्रव्य देतें असा चढ करणें, घोड्या पुढें धावणें ल. एखाद्याची चाकरी करणें.

घोडी, स्त्री. अश्वजातीय स्त्री ती; २, ला. पंतोजी मुलांस टांगावयासाठीं जी उंच दोरी बांधून ठेवित असतो ती; ३, विणा इ. कांचा तार उंच बसायासाठीं काष्ठ, हस्तिदंत, इ. कांची करितात ती; ४, पाटास जे आडात दोन मारितात ते प्रत्येकीं; ५, गाड्यावर तृणादि अधिक राहावें ह्मणून लांकडी यंत्र करित असतात ती; ६, पखवाज उंच ठेवायासाठीं घडोंचीसारिखी करितात ती; ७, लग्न न होतां थोर झाली जी कन्या तीस किं. तारुण्यदशापन्न होउन जिचा पोरपणा गेला नाहीं तीस निंदेनें ल.; ८, तारबावर शोभास बसावयासाठीं त्याचे कडेस चौकट टांगिली असते ती; ९, दे. रूतार इ. तासायाचें लांकडास आधार भून जें खालीं लांकूड सोईनें करून घेतात ती.

घोडुला, पु. लाहान मुलें रांगायाचा पूर्वी जो घोडा करितात तो.

घोडें, न. अश्वजातीय स्त्री. किं. पुरुष अशी विशेष विवक्षा नसतां जी अश्वजाति तें; घोडें थकणें, ल. वाणिज्यादि व्यवहारहानि इ. निमित्तानें पुढें चालेना असा थकणें; गांडीरवाल्याचे घोडें, ल. संसारादि निर्वाहक जें मामलत, वाडी, इ. तें, ल. एकाचे हातीं घोडें आणि एकाचे हातीं लगाम ल. आपले गांडीरवाल्यें घोडें गेलें, मग

महार वसो किं॰ चाम्हार वसो स्व॰ घोडेंखाईभाडें स्व॰ विगारीचें घोडें आणि तरवडाचा फोक, मध्यें च घोडेंघालणें, स्व॰ उभयतां कोणएक परस्पर भाषणादि व्यापार करितअसतां तिसर्‍यानें स्वकार्यसिध्यर्थ आपलाच भाषणादि व्यापार आरंभणें स्व॰ मामेंघोडें आडुंयापुढें ·

घोडेरवाद, स्त्री॰ को॰ घोडयांचा जो तृणादि भक्षण व्यापार ती; उ॰ या घोडेरवादीमुळें या माळावर काडीराहिली नाहीं; २, घोडयानीं रवाबयाजोगें भूमीवरावर तृण ती; उ॰ या माळावर मोठें गवतनाहीं कोठेकोठे घोडेरवाद आहे ·

घोडेरवोन, पु॰ दे॰ भाडयांचा घोडयांचा जो नाईक तो ·

घोडेगाँठ, स्त्री॰ घोडगांठ ·

घोडेघाँटी, स्त्री॰ दे॰ रेशमी एक वस्त्र आहे ·

घोडेपावुल, न॰ लाहान वनस्पती आहे ·

घोडेपाळणा, पु॰ लांकडांचे घोडयासमेत जोपाळणा असतो तो ·

घोडेमात, स्त्री॰ घोडमात ·

घोडेराउत, पु॰ घोडयावर बसणारा जो शिपाई तो ·

घोडेवाट, स्त्री॰ घोडींजावयाजोगा जी घाट इ॰ कांतील वाट ती ·

घोडेस्वाँर, पु॰ घोडेराउत ·

घोडयाचीजीभ, स्त्री॰ रा॰ औषधी साड आहे·

घोण, स्त्री॰ बहूतपायांचा क्षुद्रजंतु आहे; २, कों॰ घर इ॰ कांचे पारव्याचा जो संधि ती; घोणघालून बसणें, स्व॰ उत्साहभंगादि कारणामुळें खिन्न होउन गुडघ्यांत मान घालून बसणें·

घोणघोंसा, पु॰ घर इ॰ कांचे घोणस्थानापन्न जो घोंसा तो ·

घोणशा, २लिं॰ बृहत्शरीरी असून जो आळशी तो ·

घोणस, पु॰ सर्पजातीय निर्विषसेंकरून प्रसिद्ध जिवाणूं आहे ·

घोणा, पु॰ रा॰ घुणघुणा ·

घोण्या, पु॰ घोणघोंसा; २, घोणघोंसावर किं॰ पाटिसावर जेनळेघालितात तो ·

घोंप, पु॰ घड मथमार्थी ·

घोबेँ, न॰ अल्पप्रयत्नानें मोठा जो लाभ होतो तें; उ॰ त्यास घोबें सांपडतांच तोचढला; २, अल्पप्रयासानें संसारादिनिर्वाह व्हावया जोगें द्रव्यादि देणारा जो यजमान, शेत, इ॰ तें; उ॰ तो यजमान याला मोठें घोबें सांपडलें आहे ·

घोर, पु॰ काळजी; २, वीणा इ॰ कांस स्वरज स्वराची तार लाविताना तो; ३, तज्जन्य जो स्वर त्या सही स्व॰; ४, भयंकर जो राक्षसादि तो; ५, गाढमूढनिद्रेचें वि॰; उ॰ त्यास घोर निद्रा लागली; ६, इष्टपदार्थाचे उत्कंठेनें जी त्याची चोकणी लागत्ये तो; उ॰ त्या पोरानें आईचा घोर घेतला आहे; ७, घरघरीसही स्व॰; ८, सत्यासत्य, धर्माधर्म, इ॰ विचार जांतराहान नाहीं असा जो युगादिरूप काल त्याचें वि॰; उ॰ हा घोरकली आला म्हणून सर्वजन अधर्मी झाला; ९, कों॰ कोणीएक कार्यसंबंधी आरडा ओरडा, इ॰ रूप जी गडबड ती ·

घोरंकार, पु॰ वा॰ कांहींएक कार्यार्थ अनेक प्रकारचे यत्नाची जी पराकाष्ठा तो; उ॰ त्याणें घोरंकार करून घर बांधिलें.

घोरड, न॰ रा॰ मंद, भोळसर, अव्यवस्थित, जो मनुष्य तें.

घोरणें, निजेमध्यें घर्घर शब्द होई असा श्वासोच्छ्वास टाकणें. स॰ गाय घोरे गोठा भरे; बैल पोरे धनी मरे.

घोरपड, स्त्री॰ सरड्याचे आकाराचा एक मोठा प्राणी आहे; २, दुर्निवार्य असें मोठें संकट प्राप्त होणें तें: उ॰ त्या मामलेदारावर घोरपड येऊन तो त्या मामलतीचा करून निघाला.

घोराँटी, स्त्री॰ घरघरी.

घोल, पु॰ दोहोंकडे डोंगर वाढून जो खोळग्यासारखा प्रदेश होतो तो.

घोलावणें, घुलावणें.

घोव, पु॰ ग॰ गोहो.

घोवकी, स्त्री॰ रा॰ गोहोपणा; स॰ घोवास नाहीं घोयकी, बाय को करित्ये शिनळकी.

घोवटी, पु॰ ग॰ बाप्या.

घोष, पु॰ सं॰ समुद्र, अध्ययन, इ॰ कांचा जो महाध्वनि तो; २, घोकणी: ३, गोळवाडा.

घोषणा, स्त्री॰ सं॰ पुनः पुनः उच्चारणादि द्वारा कांहींएक अर्थाची सर्वत्र प्रसिद्धि होई असा जो व्यापार तो.

घोंस, पु॰ मोत्यें, पुष्पें, इ॰ कांचा जो गुच्छ तो; २, शिडाचा काठीचा बुंध्याकडील जो प्रदेश तो; ३, रा॰ विवक्षित स्थलीं गलबताची जी खेप तो.

घोंस

घोंसबाळी, स्त्री॰ मोत्यांचे घोस जा बाळीस असतात अशी जी बाळी ती.

घोंसा, पु॰ वा॰ पुष्पांचा गजरा तो.

घोंसाळवेल, स्त्री॰ भातांत एक जाति आहे.

घोंसाळी, स्त्री॰ एक वेल आहे.

घोंसाळें, न॰ घोंसाळीचें फळ तें, जाची भाजी करितात.

घोळ, पु॰ वाघ्याचे हातांत धातूचें वाद्य असतें तो; २, गोंधळ्याचे गोंधळाचांतून जो गोंधळ तो; ३, खुळखुळ्याचे काठीस खुळखुळा बांधाया जो गाठीचा कोंयडयांत शिळमिळ्या अडकवून मारितात तो; ४, घोंटाळा तृतीयार्थी; ५, अनेक युक्तीनें दुसऱ्यास अडविण्याचा किं॰ कांहींएक गोष्ट सिद्ध करण्याचा जो व्यापार प्रसंग तो; उ॰ त्या शिपायास बाधानें प्रहरभर घोळांत घातलें; उ॰ या शास्त्रार्थाचा चारदिवस घोळ घातला तेव्हां तो उरला; ६, भांगरखा; भगा इ॰ कांचा जो घेर तो; ७, रा॰ धान्य घोळतेसमयीं जो मागला अंश राहातो तो; ८, स्त्री॰ पालेभाजी आहे.

घोळका, पु॰ आरडा. ओरडा. दांडगाईची संभावना, इ॰ जागध्यें आहे असाजो उभा कि॰ चालता मनुष्य समुदाय तो; उ॰ दरवाजा उघडतांच आगंतुकांचा घोळक्याचा घोळका आंत शिरला.

घोळकाठी, स्त्री॰ खुळखुळी काठी.

घोळकार, पु॰ घोळदिती यार्थी.

घोळण, न॰ एकवार घोळे असें रूपांत घेतलेलें धान्य तें; २, धान्य घोळण्याचा जो व्यापार तें.

घोळणा, पु॰ घाटणा; २, रा॰ भाताचा जावयाची जी

जी चावण तो ·

घोळणें, कांहींएक दाणा इ॰पदार्थ हलके, जड, बारीक, मोठे, इ॰निरनिराळे व्हावे एतदर्थ शूर्पादिकांत धान्यादि घेऊन हालविणें; २, आधारस्थित जे आधेय पदार्थ त्यांस विक्षिप्त संस्कार मारण्याकरितां हलणून हस्तादिकानें उलटापालट करणें; उ॰ लाडवांचा कढया पंकांत घोळून लाडू बांधावे; उ॰ पोळी तूपसारखरेंत घोळून खावी; ३, काष्ठादि पदार्थ हलक्या हातानें तासून गुळगुळीत करणें; उ॰ तासणीस दांडा घोळून घालावा ह्मणजे हातास बोचत नाहीं; ४, ला॰ कोणएकास मारणें, तुडवणें, इ॰ व्यापारानीं थकें असें करणें; उ॰ त्यामल्लास त्याणें एकप्रहर घोळलें; ५, ला॰ कांहींएक गोष्टीविषयीं कोणएकास घोळ पंचमापर्यंत पाडणें; उ॰ या श्लोकानें मला एकप्रहर घोळलें तेव्हां लागला; ६, कांहींएक गोष्ट अनेकवार मनांत आणून उलटून पालटून पाहाणें; उ॰ तूं गोष्ट बोलतोस ही चारघटका मनांत घोळीन नंतर उत्तर सांगेन; ७, शास्त्र, पुराण, इ॰ कांहींएक गोष्टीनीं सर्वदा विचार्यत्वेंकरून मनांत असणें; उ॰ त्याचे मनांत शास्त्र सर्वदा घोळतें आहे; ८, कांहींएक गोष्ट मनांत येतजात असणें; उ॰ काशीस जावें असें आमचे मनांत बहुत दिवस घोळतें आहे; ९, मनुष्यादिपदार्थानें कांहींएक व्यापारांत बहुत दिवस बहियाटलें जाणें; उ॰ मी केवळ नवशिका नव्हे कांहीं दिवस या कामांत घोळलों आहें·

घोळवणें, धा॰सा॰ शूर्पव्यापारातिरिक्त जे घोळ धातूचे सकर्मक अर्थ त्या अर्थीं

घोळसणें, कांहींएक चूर्णादि पदार्थाचा कोणएक पदार्थास सर्वविषयीं संबंध होईअसा व्यापार करणें; उ॰ पोळी तूपसारखरेंत घोळसून खावी; २, घोळणें चतुर्थार्थीं; उ॰ त्या जेवीस त्याणें साघटका घोळसलें ·

घोळसावणें, घोळसणें ·

घोळांकार, पु॰ घोळंकार ·

घोळाणा, घोळाणा, पु॰ द्व्यरूप घोळावांचून जो घोळ त्या अर्थीं ·

घोळींव, २ लिं॰ घोळण्याचा संस्कारानें सिद्धकेला जो धान्य, काढी, इ॰ पदार्थ तो ·

घोस, २ लिं॰ घबघबीत ·

घ्राण, न॰सं॰ नाक ह्मणून जें गंधग्राहक इंद्रिय तें ·

घ्राणेंद्रिय, न॰सं॰ घ्राण ·

च, अ॰ कांहीं एक अर्थाचें निश्चयद्योतक आहे, तत्तद्वाचक शब्दांपुढें याचा प्रयोग होतो; उ॰ तुलींच या, म्हणजे इतरास पाठवूंनका; उ॰ तुम्हीं याच, म्हणजे आल्या वांचून राहूं नका; जेवतांच आलों, जातांच गांठ पडली, इत्यादि स्थलीं अव्यवहित कालीं, अशा अर्थाचें द्योतक होतें; क्वचित् सदृश या अर्थाचेंही द्योतक होतें; उ॰ पढलेला ग्रंथ बहुत दिवस न पाहिला असतां पारका पारकाच दिसूं लागतो.

चक, पु॰ कांहीं एक कारणार्थ अनेकांनीं ऐकमत्यानें बांधिला जो नियम तो, किं॰ त्या नियमाविषयीं जें अनेकांचें ऐकमत्य, उ॰ सर्व गांवकऱ्यांचा चक असा आहे कीं प्रातःस्नान केल्या वांचून कोणी बाहेर पडत नाहींत; उ॰ ग्रामस्थांचा चक असल्यावर सर्कारचाही जोर चालत नाहीं; २, एकानें किं॰ अनेकांनीं, या या प्रकारें वर्तावें, अन्यथा वर्तूं नये, असा कांहीं एक दिवस चालाया जोगा बांधिला जो नियम तो; उ॰ मला कायतो एक चक बांधून द्या, त्या प्रमाणें मीं वर्तेन; उ॰ आमचे घरचे मंडळीचा प्रातःस्नान करण्याविषयीं गांगवर्षे एक सारखा चक चालिला आहे; ३, प्रजादिकांनीं अमुक अमुक रीतीनें वर्तावें, असा जो राजादिकृत नियम त्यास प्रजादिकांनीं टळूं नये अशा विषयीं जी राजादिकांचे तेजाची त्यांवर व्याप्ति; उ॰ सर्कारची ह्याही मोडितांच त्यास किल्ल्यावर टाकिलें त्यापासून चक बसला.

चकचक, अ॰ श्वानादिकांचे जलभाशन समयीचें शब्दाचें अनुकरण, वाजणें, इ॰कांचें वि॰ २, चकचक्य युक्त दिसे असें, दिसणें होणें यांचें वि॰ उ॰ त्या तेथे कांहीं चकचक दिसतें.

चकचकणें, विद्युल्लता, हिरा, पाच, रुपें, इ॰ पदार्थांनीं चाकचक्यानें नेत्रां पुढें स्फुरद्रूप होणें; उ॰ काय तो हिरा चकचकतो आहे.

चकचकाट, पु॰ डोळे दिपाया जोगा दीपादिकांचा तेजःप्रसर.

चकचकावणें, डोळ्या पुढें चक्र होई असें, कानशिलावर चपराकेनें मारणें; २, रा॰ वानरानें चकंचकं भसा शब्द करणें.

चकचकी, स्त्री॰ विद्युल्लता, हिरा, भिंग, इ॰कांवर जें चाकचक्य असतें तें; उ॰ हिऱ्याची चकचकी गारगोटीस यावयाची नाहीं.

चकचकीत, वि॰ चकचकीनें युक्त हीरकादिक पदार्थ; २, निर्मल वस्त्र, गृह इ॰ पदार्थ.

चकणा, वि॰ कं॰ तिरवा मनुष्य.

चकणी, स्त्री॰ दे॰ पैसे, कवडया, इ॰कांचे खेळांत जी चकण्याची पाळी येत्ये ती.

चकणें, कांहीं एक कारणा मुळें किं॰ वास्तविकांश मनांत न आल्या मुळें फसलें जावें, अशा संमोहानें युक्त होणें; उ॰ त्या शालेचा भडक रंग पाहातांच मीं चकलों आणि दोनशें रुपये दिल्हे; २, लपंडाव, छापो, इ॰ खेळामध्यें गडी उजवणें, इत्याद्यर्थ हातावर हात मारण्याचा व्यापार करणें; ३, दे॰ पैसे, कवडया, इ॰ खेळांत आरंभीं रचली मध्यें पैसा इ॰ टाकणें.

चकती, स्त्री॰ तांब्याचा पत्रा, केळें, कागद, इ॰कांचा

कांचा लाहान पातळ जो प्रायःचाटोळा तुकडा ती; २, साहेबलोक कोणा एकास साहित्यार्थ जी चिट्टी लिहून देत असतात ती.

चकंदळ, अथ. **चकांदळ**, न. शरीर, रुजलेलें शेत, गिलाव्याची भिंत, इ. कांचाद्वारां नाइटा, गजकर्ण, इ. कारणामुळें, किं. जमीनींत रोंपन झाल्यामुळें, किं. भिंतीचा गिलावा पडल्यासुळें प्रायः वर्तुळाकार जें चिन्ह होतें तें.

चकदळ, न. दे. फलादिकांचा जो चक्राकार कातळाचें.

चकदळी, स्त्री. दे. लाहान भाकर.

चकनाचूर, पु. दे. कांहीं एक पदार्थ फुटल्यामुळें त्याचा लाहान लाहान खंडसमुदायरूप जो परिणाम; २, ला. बहूत श्रम झाल्यामुळें शरीरीं जो थकलेपणा होतो; उ. ओझीं वाहातानां माझे आंगाचा चकनाचूर झाला.

चकपक, स्त्री. कांहीं एक कार्य करण्याविषयीं कोणाएकाचे आंगीं चापल्यरूप जो गुण असतो ती; २, ३ लिं. नीटनेटका असून जो स्वच्छ वस्त्र, स्थल, इ. पदार्थ.

चकभूल, स्त्री. कांहीं एक अद्भुतादि दर्शनानें बुद्धि चकाया जोगा जो संमोह भास होतो ती; २, ३ लिं. नशा संमोहानें युक्त झाला जो मनुष्य तो.

चकमक, स्त्री. गारेपासून अग्नि पाडावा म्हणून तिजवर आघात कराया साठीं पोलादी पदार्थ करीत असतात तीं; २, ला. युद्ध, किं. कलह; झडणें उडणें इ. कांचे योगीं प्रयोग.

चकरणें, कों. बाहाल, चिरा, इ. मोठा वजनदार पदार्थ विवक्षित आंगीं वसायाजोगा युक्तीनें फिरविणें.

चकला, पु. शहरांतील जो महला, किं. चवाटा, त्यास म्हणतात; २, रा. गर्भसुती असून उणाव एक वस्त्र आहे.

चकली, स्त्री. कों. तांबें इ. धातुमय पत्र्याची चकती.

चकल्या, पु. दे. शहरांतील चबठयावरला चौकीदार.

चकवा, पु. महाशिरी चालविणारे कोळी इ. कवले मारत्ये समयीं गाणें गात असतात तो; २, चक्रवाक पक्ष्यास कोणी म्हणतात.

चकसणें, कों. कांहीं एक पदार्थाची गोडी लागल्यामुळें त्याचे लाभाविषयीं पुनःपुनः झटणें.

चकाकणें, चकचकणें.

चकाकी, स्त्री. चकचकी.

चकाचूर, पु. चकनाचूर.

चकाटी, स्त्री. एक किं. अनेक मिळून मारितात जा रिकाम्या गप्पा ती; प्रायः पिटणें, मारणें, यांचे योगीं प्रयोग अनेकवचनांत.

चकार, अथ. **चकारा**, संकेतानें कोणी चबलास म्हणतात.

चकारचिल्हा, ३ लिं. संकेतानें कोणीं चाहाडास म्हणतात.

चकारशब्द, पु. भाषणाचा किंचिदंश तो, निषेध असतां प्रयोग; उ. त्या पंडितानें सभेंत चकारशब्द काढिला नाहीं.

चकारी, स्त्री॰ संकेतानें कोणीं चाहाडीस ल-णतात.

चकित, २लिं॰ भय, अद्भुतदर्शन, इ॰ कारणासु-लें जो चकला तो.

चकीर, न॰ दे॰ खेळायाचे चकास ल्हणतात.

चकोत्रा, पु॰ एक झाड आहे; व त्याचें फळ.

चकोर, पु॰ सं॰ एक पक्षी आहे.

चक्क, २लिं॰ लकलकीत, स्वच्छ; उ॰ त्याणें आपलें घर चक्क करून ठेविलें आहे; २, न॰ डोळे दिपा-याजोगें आकस्मिक जें तेज स्फुरण; उ॰ प्रथम चक्कझालें आणि लागलीच कडकडून वीज पड-ली, प्रायः होणें, याचे योगीं प्रयोग; ३, २लिं॰ आश्चर्यानें चकित; उ॰ लाख रुपयांचा तेथे ढी-ग पाहातांच मीं चक्क झालों.

चक्कन, चक्कर, चक्कदिशी, डो-ळे दिपायाजोगें तेजाचा स्फुरणदर्शनादिकां-चें वि.

चक्का, पु॰ सुरीनें कापायाजोगें जें पदार्थ; ला॰ यथेष्ट मिष्टान्न भोजनास संकेतानें कोणीं ल्हण-तात.

चक्की, स्त्री॰ जांत्यास कोणीं ल्हणतात.

चक्र, न॰ सं॰ रथादिकांचें चाक; २, त्या सारिखें खेळायाकरितां काष्ठादिकांचें करितात तें; ३, चाका सारिखें एक शस्त्र आहे; ४, अंगुष्ठादि-कांवर रेखांकित जें वर्तुळ चिन्ह असतें तें; ५, मंडलाकार जाचें भ्रमण आहे असा जो नक्षत्रा-धिष्ठित यंत्र विशेष कि॰ संवत्सरात्मक जो काल, संसार, इ॰ कांस ल्हणतात, प्रयोग प्रायः समासीं उ॰ वायुचक्र, भचक्र, कालचक्र, संसार-चक्र, इ॰ ६, ग्रहादिक मांडायासाठीं रेखांकि-त अनेक प्रकारचीं करीन असतात तीं प्रत्येकीं; ७, सैन्य, प्रयोग समासीं; उ॰ स्वचक्र, परचक्र; ८, नाभि, हृदय, इ॰ जीं प्राणस्थानें तीं प्रत्येकीं; ९, संकेतानें कोणीं वड्यास ल्हणतात.

चक्रगति, स्त्री॰ सं॰ आपल्ये भोंवतालें फिरत अ-सून पुढें जात असावें, अशी जी रथाचे चक्राचे गतिसारिखी गति ती, किं॰ त्या चक्राची गति; उ॰ नित्य जे उदयास्त होतात हे चक्रगतीनें आ-णि ग्रहांस राश्यंतर होतें हें स्वगतीनें.

चक्रभेंड, स्त्री॰ एक झाड आहे, जीचें फळ चक्रा-कार असतें.

चक्रवर्ती, पु॰ सं॰ सर्व पृथ्वीचा राजा

चक्रवाक, पु॰ सं॰ एक पक्षि आहे.

चक्रवाढ, स्त्री॰ मुदतीमुदतीस व्याज व मुद्दल एकत्र करून त्यास पुढें व्याज लाविनात अशी जी रीति.

चक्रव्यूह, चक्रव्यूहू, चक्रविभू, पु॰ शत्रुसेनेचा आपल्ये सैन्यांत प्रवेश न होई असा स्वसेना रचनेचा एक प्रकार शास्त्र प्रसि-द्ध आहे; २, ला॰ कांहीं एक मोठी रचली जी मसलत.

चक्रांकित, चक्रांगीत, पु॰ सं॰ च-क्राकार चिन्हानें युक्त असा एक प्रायः श्वेत पाषाण आहे, जास पूजिन असतात; २, ला॰ जा मनुष्याचे तोंडावर फोडयांचे व्रण असत-तात त्यास विनोदानें ल्हणतात.

चक्रावळ, स्त्री॰ पा॰ चकवाट॰

चक्री, स्त्री॰ अनेक समानशील एकत्र मिळून गानादि समारंभ करीत असतात ती; २, पागोट्याचे विनीवर चक्राकार एकावरएक पदर बसवून करितात ती; ३, चक्रीगुंगहोणें, भुलणें, इ॰ स्थलीं चक्रीशब्दाचा अर्थ अक्कल॰

चक्रीदार, ३ लिं॰ चक्री द्वितीयार्थ विशिष्ट जें पागोटें इ॰

चरवोट, ३लिं॰ विवक्षित गुणरूपादिकानीं जो उत्तम तो॰

चंग, पु॰ मुखानें वाजवायाचें पोलादी एक वाद्य आहे; २, घावडी वाजायासाठीं कागद कातरून लाविलात तो; ३, गंजिफांचे आठां रंगांतील प्रथम रंग; चंगबांधणें, एथे कांहीं एका कसबाविषयीं अडा वाळगणें अशा अर्थ॰

चंगचिलकत, चंगचिल्लद, चंगचिल्ली, स्त्री॰ गंजिफांचे खेळामध्यें शेवटीं दोघांचे दोन रंग राहिले असतां एकपान उतारणें पडावें लपून दोन पानें लुळून वर उडविण्याचा जो व्यापार ती॰

चंगळ, स्त्री॰ कांहींएक भक्षणीय पदार्थ, पर्जन्य, द्रव्य, इ॰ कांची समृद्धि॰

चंगळपट्टी, स्त्री॰ चंगळ॰

चंगळी, स्त्री॰ चंगळ॰

चंगा, अवि॰ प्रायः चरवोट या अर्थी; उ॰ आजची भाजी बहुत चंगा झाली होती; २, ल॰ मन असे चंगा तर काथोडींत गंगा॰

चंगाराणी, स्त्री॰ गंजिफांचे रंगांतील चंग राजा

चंगाळ, स्त्री॰ दे॰ चंगळ॰

चंगी, ३ लिं॰ दे॰ भांग. इ॰ व्यसनानें जो दुर्बल झाला तो॰

चंगीभंगी, ३लिं॰ चंगी॰

चघळ, उ॰ गो महिष्यादि पशूनीं तोंडांत घेऊन चघळून बाहेर टाकिलेला चारा; २, ल॰ ३लिं॰ जांत ताळतंत नाहीं असें कंटाळा यावयाजोगें भाषणादि, किं॰ तत्कर्ता मनुष्य॰

चघळणें, खावयाचा पदार्थ तोंडांत घालून बहूत वेळ आंतल्याआंत फिरविणें॰

चंच, उ॰ बाजार, इ॰ कांत आपणास घ्यावयाचा जो पदार्थ त्याची परीक्षा इ॰ चोकशी तो॰ २, चंचिबाग॰

चचणें, मृत होणें॰

चंचल, ३ लिं॰ चांचल्य विशिष्ट पदार्थ; २, व्यभिचार चेष्टायुक्त जी स्त्री तीस म्हणतात॰

चंचिबाज. अथ॰ **चंचिबाग**, ३ लिं॰ प्रायः जें पडेल काम त्याविषयीं दक्ष असून जो चपल तो॰

चंची, स्त्री॰ सुपारी, पान, इ॰ पदार्थ ठेवायाकरितां कमानें चढतीं अनेक घरें जीस करितात, अशी गुंडाळून बांधायाचे सोईची एक पिशवी आहे॰

चंचु, स्त्री॰ सं॰ पक्ष्याचें जें तोंड॰

चंचुपुट, न॰सं॰ चंचुरूप जें पुटतें॰

चंचुप्रवेश, पु॰सं॰ फलादिकांत प्रवेश; २, ल॰ किंचित्प्रवेश; उ॰ त्याचा बंदोबस्त चांगला या

मुळें त्याचे राज्यांत कोणाचा चंचुप्रवेश होत नाहीं.

चंचुवाग, ३लि॰ चंचिवाग.

चट, स्त्री॰ कांहींएक पदार्थाची किं॰ व्यापाराची गोडी लागल्यामुळें त्यावांचून चैन पडूं नये अशी जी अवस्था भास होत्ये ती; २, अ॰नि:शेष होई असें, आणें, खाणें, इ॰कांचें वि॰; उ॰ या घरचीं चट माणसें यात्रेस गेलीं आहेत.

चटई, स्त्री॰ आंथरी.

चटईचीवांक, स्त्री॰ चटईचा विणकरी सामिग्री विणकर जीस आहे अशी जी हातांतील वांक ती.

चटक, स्त्री॰ चट पथमार्थी; २, बोलणें, चालणें, इ॰ व्यापारांत लागलेली कांहींएक खोड; उ॰ याला बोलतांना जेवेंकिनाहीं खणायाची चटक लागली आहे.

चटकचांदणी, चटकचांदिणी, स्त्री॰ स्वरूपानें सुंदर असून जीचा भांगीं शृंगार चेष्टा आहेत अशी स्त्री.

चटकन, चटकर, चटकदिशीं, अ॰ दोरी, उडी इ॰कांचेशब्दांचें अनु॰ लागणें इ॰कांचें वि॰; २, खरेनें जाणें, येणे, इ॰कांचें वि॰.

चटका, पु॰ अग्नि, कि॰ निखट इ॰कांचे संयोगानें जिव्हा इ॰कांस जी दु:सह्यव्यथा होत्ये ती तत्काळीं; २, ला॰ कांहींएक व्यापार पुन: करण्याविषयीं भय बाटावें, कि॰ त्याचें स्मरण झालें असतां खेद व्हावा असें जें त्या व्यापारापासून एकवार अनुभविलेलें दु:ख तो; उ॰ जामिनकीविषयीं मला असा चटका बसला आहे कीं पुन: पुन: जन्मांत कोणास जामीन राहूं नये; उ॰ देवीनीं पोर गेला आणि त्याचे मनास चटका बसला, तेव्हांपासून देवी भटलें कीं थरथरत मिती.

चटकाणी, स्त्री॰ दे॰ चाबूक इ॰कांचा प्रहार.

चटकी, स्त्री॰ प्राय: दोनबोटांचे संयोगानें जो ध्वनि होतो ती; २, दे॰ चकाटी.

चटक्यांचामांडव, पु॰ कांहींएक मोठ्या कार्या विषयीं उद्योग न करितां उगीच चटक्या वाजवून तद्विषयीं बेतबातांचा गोष्टी सांगण्याचा व्यापार; प्र॰ मा॰ अनेकवचनांत.

चटचट, अ॰ उडी, इ॰कांनीं केला जो अनेकवार प्रहार त्याचे शब्दांचें अनु॰ लागणें इ॰कांचें वि॰; २, मक्षिकादिकांचे अनेकवार चावण्याचे वि॰; उ॰ या खोलींत चिलटें चटचट चावतात.

चटचटणें, दे॰ खतरखतणें; उ॰ झुणका चांगला चटचटूं लागला म्हणजे उतर.

चटचटां, अ॰ चटचट.

चटचटीत, ३लि॰ उरतेपणी न शिजल्यामुळें कच्चा राहिला जो भात, सांजा इ॰ पदार्थ.

चटणी, स्त्री॰ डाळ इ॰ पदार्थांत मीठ, निखट, इ॰ पदार्थ घालून वाटून तोंडीं लावाया साठीं करीत असतात ती; २, ला॰ कांहींएक पदार्थाचा मारून किं॰ खाऊन सत्यानास; उ॰ या शंभर मनुष्यानीं एकक्षणांत त्याचे पाचशों माणसांची चटणी करून टाकिली.

चटपट, स्त्री॰ कांहीं अनिष्ट झाल्यामुळें जी अंत:करणास दु:खाची टोंचणी लागत्ये ती; २, गाजिकांचे

गंजिफांचे पानाचीहातांतल्याहातांत गलत; २, चकपक मथमार्थी; ४, अक्षरेनें, जाणें, येणें, इ. कांचें वि, उ. तूं जातोस पण चटपट आऊन ये.

चटपट्या, २ लिं. चटपट तृतीयार्थानें युक्त.

चटाई, स्त्री. दे. चटई.

चटाचट, अ. चडचट.

चटार, ३ लिं. आंगीं मोठेपणा नसून अचाबचा भाषणकरण्याचा स्वभाव जाचा त्यास निंदेनें म्हणतात.

चटावणें, दे. चकसणें.

चटोर, ३ लिं. चटार.

चट्ट, अ. चट.

चट्टा, पु. शरीरावर फोड इ. झाल्यासुळें क्षत, क्षतादि घरें होऊन त्या ठिकाणीं जें चिन्ह राहातें तो; २, ला. सावकारी इ. व्यवहारांत; घस उन्यंदा भाताचे व्यवहारांत पांचशें रुपये चट्टा बसला.

चट्टामट्टा, पु. सर्व भोज्यादि पदार्थांची खाऊन जी निःशेषता तो.

चट्टीपट्टी, स्त्री. शरीरावरील भूषणादिकांचा छान दिसायाजोगा रचना प्रकार.

चंडु, पु. महादेवाचा एक गण आहे.

चडकण, स्त्री. बोटांसुद्दां तळहानाचा सुरवादिकांवर प्रहार.

चडकणी, चडकाणी, स्त्री. चडकण.

चडचड, स्त्री. दे. धान्य, द्रव्य, इ. पदार्थांची दुर्लभता व्हायाजोगी जी अल्पता ती.

चडचडणें, ओदणे, चिंचरणें, इ. प्रसंगीं दुःख व्हायाजोगें व्हायाजोगें केशानीं चडचड शब्दयुक्त होणें; २, धारणीनें चडचड युक्त होणें.

चडचडीत, २ लिं. दे. चटचटीत.

चडफड, स्त्री. चडफडण्याचा व्यापार; उ. याला सारा दिवस चडफड लागली आहे.

चडफडणें, क्रोधावेशानें दांत ओठ चावणें, हातपाय आपटणें, इ. व्यापार करणें.

चडफडाट, पु. चडफडण्याचा अतिशय.

चंडवात, पु. सं. मोठा प्रचंड वारा.

चडळ, न. दे. भिंत इ. कांचा उखडून पडलेला तुकडा.

चंडाळ, ३ लिं. महार, चांभार, मांग, इ.; २, ला. अत्यंत निर्दय, अतिपापी; निंदेनें म.

चंडाळचौकडी, स्त्री. अनेक दुष्ट जनाची जी जूट.

चंडिका, स्त्री. सं. एक स्त्रीरूप देवता आहे; २, ला. कोपिष्ठ स्त्रीस निंदेनें म्हणतात.

चंडी, स्त्री. सं. चंडिका.

चंडोल, पु. एक पक्षी आहे.

चढ, पु. पर्वतादिकांचा क्रमेंकरून जो उन्नत भागतो; २, संपत्ति, दुखणें, इ. कांची उत्तरोत्तर वृद्धि; ३, दुसऱ्याचा पक्ष खालीं व्हायाजोगा कांहींएक व्यापार तो; उ. खाणें त्याचे मामलतीवर चढ केला; उ. आजचे हरदासानें कालचे हरदासावर चढ केला; ३ लिं. रा. प्रमाणादि व्यवहारीं बराबरी होऊन जो वाढवा येतो तो; उ. पुण्याचे मापानें मोजलेला पदार्थ कोंकणी मापानें मोजला असतां कांहीं चढ येतो; ४, रा.

चढाई; उ० तो प्रथम चढ करून माझे आंगावर आला; चढींलागणें, एथें आपली हानीही पत्करून दुसऱ्याचा पक्ष रखालीं होई अशी व्यापारी प्रवृत्त होणें.

चढउतर, स्त्री० चढणें उतरणें इ० व्यापार; उ० विहिरींतलें पाणीं आणायास मला चढउतर करवत नाहीं

चढण, स्त्री० चढ ममार्थी; स० चढणीस घोडा उतरणीस रेडा.

चढणें, आरोहण करणें, क्रि० कांहींएक पदार्थानें आरोहित होणें; २, ला० सांप्रदायिक रीती पेक्षां, क्रि० पहिल्यापेक्षां कोणे एका पदार्थानें अधिक होणें; उ० कालचे उपासानें आज पित्त चढलें; उ० विहिरीस पाणीं चढलें; ३, चित्तवृत्ति बिघडायाजोगी केफ, वायु, इ० कांची व्याप्ति होणें; ४, अभिमानानें आपण वरिष्ठ असें मानणें; उ० एकदां कोठे लढाईत यश आलें म्हणून ते गृहस्थ आलीकडे चढले आहेत; ५, ऋण, शंका, प्रश्न, इ० कांचा परिहार न होतां त्याणीं कोणा एकाबर राहणें; उ० माझे पांचशें रुपये त्याबर चढले; उ० त्याची कोटी तुलाबर चढली; ६, आंगरखा, चोळी, इ० कानीं आंगांत शिरणें, म्हणजे शरीर त्यांत जाणें; कांहींएक पदार्थानें रंगामध्ये चढणें, किंमतीस चढणें; म्हणजे त्याची किंमत चढणें, रंग चढणें असा अर्थ; धारण चढणें; सोने रुपें चढणें; इ० स्थलीं पहिले पेक्षां महाग होणें, इ० लाक्षणिक बहून होतात.

चढता

चढता, वि० उत्तरोत्तर क्रमेंकरून जास्त चढ आहे तो; उ० चांगलें काम केलेंस तर तुला चढता रोजगार मिळेल; उ० पायरीचे दगड अगदी खालसे चढते लाव.

चढतापाया, उ० संपत्ती इ० कांची जी उत्तरोत्तर वृद्धि दशा.

चढती, स्त्री० चढतापाया.

चढतीकमान, स्त्री० संपत्ती इ० कांचे वृद्धीस कारण जी कालानुकूल्यरूप दशा.

चढतीकळा, स्त्री० चंद्राचे कलांची उत्तरोत्तर वृद्धि; २, ला० चढतीकमान.

चढतीपायरी, स्त्री० चढतापाया.

चढतीवाजू, स्त्री० गंजिफांची पहिल्या तिंमे रंगांची एका, दुग्गा, तिग्गा, अशी क्रमानें जी वाजू लाविताना ती; २, ला० चढती पायरी.

चढतीवेळ, स्त्री० सूर्योदयापासून मध्यान्ह पर्यंत जो काल तो. उ० चढत्या वेळेस रक्त काढूं नये.

चढवाचढव, स्त्री० हें चढाव तें चढीव इ० रूप व्यापार.

चढा, वि० विवक्षित सुरापेक्षां जो उंच सूर, क्रि० तद्विशिष्ट जो मृदंगादि तो.

चढाई, स्त्री० शत्रूस दबवाया साठी तयारी करून त्याचे आंगावर जाण्याचा जो व्यापार; २, रा० दुसऱ्याचा पक्ष रखालीं करण्यासाठीं कोणी केला जो चढती.

चढाईत, वि० झाडावर चढण्याचा किंवा घोडयावर बसण्याचा जास दृढ अभ्यास आहे तो.

चढाव, पु० प्रायः चढ या अर्थी.

चढेघोड्यालिखी

चढेघोडयानिशीं, चढयाघोडयानिशीं, चढयेघोडयानिशीं, नशीं, अ॰ कांहींएक कार्यार्थ जो आवेशपूर्वक निघाला त्याणें मध्यें विराम न घेतां; त्या कार्य करण्याचें वि॰, उ॰ शत्रू जो आला तो लागलाच चढेघोडयानिशीं किल्ल्यावर गेला.

चणकन, चणकर, चणकदिशीं, अ॰ चटकन पथमार्थी.

चणचण, स्त्री॰ चडचड; २, चटचट.

चणचणणें, कों॰ क्षारादि पदार्थांनीं क्षतादिकांस लागल्यामुळें व्यथा करणें, किं॰ तादृश व्यथा विशिष्ट त्या क्षतादिकानीं होणें; २, क्षुधेनें अत्यंत व्याकुल होणें; ३, धारणानें चटणें; ४, चण्ण शब्द होई असें ओरडी इ॰ कानीं लागणें.

चणचणीत, वि॰ जा पदार्थास तिखट, मीठ, फोडणी इ॰ यथायोग्य आहे तो झुणका, भाजी इ॰ पदार्थ; २, चकपक पथमार्थानें युक्त तो.

चणा, पु॰ हरभरा.

चणाचण, अ॰ चटचट.

चणाणणें, चणचणणें.

चतकोर, पु॰ भाकर, पोळी, इ॰ कांचा चतुर्थांश.

चतुर, वि॰ सांपत्तिक जे राज्य चालविणें इ॰ लहान मोठे व्यवहार त्या विषयीं, किं॰, लेखन, चित्रकाढणें, गान, इ॰ कलांमध्यें किं॰ शास्त्रादिविद्यांमध्यें, जो कुशल तो.

चतुरंग, वि॰ सं॰ हस्ति, अश्व, रथ, पदाति, हीं चार अंगें जास आहेत तो; सेना पर्याय शब्दांचें वि॰

चतुरसाबाजी

चतुरसाबाजी, पु॰ साबाजी या नांवाचा एक चतुर पुरुष होता; विपरीत लक्षणेनें मूर्खास म्हणतात,

चतुरस्र, वि॰ सं॰ चार च आहेत कोण जास असा क्षेत्रादि पदार्थ; २, ला॰ अनेक विद्या, कला, जामध्यें आहेत तो मनुष्य.

चतुराई, स्त्री॰ चतुरपणा.

चतुर्, वि॰ सं॰ अर्थ ४, पयोग समासीं; उ॰ चतुर्गुण. चतुर्गुणित. चतुर्थी. इ॰.

चतुर्थ, वि॰ चौथा; २, पु॰ संकेतानें कानास म्हणतात.

चतुर्थाश्रम, पु॰ सं॰ सन्यासरूप जो आश्रम तो.

चतुर्थी, स्त्री॰ सं॰ चौथी तिथि इ॰.

चतुर्दश, स्त्री॰ सं॰ अर्थ १४

चतुर्दशी, स्त्री॰ सं॰ चौदावी तिथि इ॰.

चतुर्भुज, वि॰ सं॰ चार आहेत भुज जास, देव, किं॰ क्षेत्र; २, ला॰ जाचा सुसक्या बांधिल्या त्यास संकेतानें म्हणतात; ३, जाचें लग्न झालें त्यास संकेतानें म्हणतात.

चतुर्मास, पु॰ स्त्री॰ आषाढ शुद्ध दशमी पासून कार्तिक शुद्ध दशमी पर्यंत किं॰ पौर्णिमे पर्यंत जो काल तो; २, साधारण चार महिन्यांचा जो समुदाय त्यासही म्हणतात.

चतुर्विध, वि॰ सं॰ चोहों प्रकारचा, किं॰ अनेक प्रकारचा; याचे समास चतुर्विध मुक्ति, चतुर्विध पुरुषार्थ, चतुर्विध अन्न, इ॰ होतात.

चतुष्क, न॰ सं॰ चोहोंचा समुदाय.

चतुष्कोण, वि॰ सं॰ चतुरस्र जें क्षेत्रादि तो.

चतुष्पद

चतुष्टय, न॰ सं॰ चतुष्क.

चतुष्टाई, स्त्री॰ चौपे मिळून जी एकाद्या व्यवहारांची चौकशी; २ कांहीएक गुप्त गोष्टीची बहुतांस कळाव्याजोगी प्रसिद्धि; उ॰ कुकर्म घडलें असतां त्याची चतुष्टाई करूं नये.

चतुष्पद, वि॰सं॰ चार पायांचा घोडा, बैल, मेंढा, इ॰ पशु.

चतुःसमुद्रवलयांकित, वि॰सं॰ चारसमुद्ररूप वलयानें जी अंकित, पृथ्वी तें वि॰.

चतुःसीमा, स्त्री॰सं॰ क्षेत्रादिकांचे चोहों बाजूंची मर्यादा.

चत्रा, वि॰ शूद्रादिक चतुरास म्हणतात.

चत्राई, स्त्री॰ चतुराई, शूद्रभाषावृत्ति.

चंदन, पु॰सं॰ एक सुगंधि वृक्ष आहे; २, न॰ त्या चंदनाचें काष्ठ उगाळून देवादिकांस लावायासाठीं करितात तें; ३, ला॰ कांहींएक पदार्थांचा खाणें लुटणें इ॰ व्यापारानें जो सत्यानास तें; उ॰ पेंढाऱ्यानें तो देश लुटून चंदन केलें.

चंदनबटवा, पु॰ एक पालेभाजी आहे.

चंदनहोत्री, वि॰ गुलहोत्री.

चंदनी, वि॰ चंदनवृक्ष संबंधी जें तेल, चोरंग, देव्हारा, इ॰.

चंदनीपोपट, चंदन्यापोपट, पु॰ ज्याचे पक्षांवर तांबडे पट्टे असतात असा एक पोपटांत भेद आहे.

चंदी, स्त्री॰ घोडा, उंट, इ॰कांस नित्यशः जो दाणा देतात ती; २, ला॰ संसार खर्चाकडेस जें नित्यशः धान्यादि लागतें ती.

चंदेरी

चंदेरी, वि॰ चंदेर ह्मणून एक शहर आहे तत्संबंधी जें वस्त्र, पात्र.

चंद्र, पु॰सं॰ नवग्रहांतील दुसरा ग्रह; २, यवनी महिन्याची तारीख; उ॰ रवाना चंद्र ३ मोहरम; ३, ला॰ गाय म्हैस इ॰कांचे कपाळावर जें पांढरें चिन्ह असतें त्यास कोणी म्हणतात; ४, स्त्रियांचे कपाळावर गोंधून जें बालचंद्राकार चिन्ह करित असतात तो.

चंद्रकला, स्त्री॰सं॰ चंद्राचा तेजांश.

चंद्रकळा, स्त्री॰ चंद्रकला; २ कांठ पदर निराळ्या रंगाचे व मधला नवा निराळ्या रंगाचा असें एक स्त्रियांचे उपयोगी वस्त्र आहे.

चंद्रकांत, पु॰सं॰ ज्यावर चंद्रकिरण पडले असतां द्रव सुटतो आमा शास्त्र प्रसिद्ध एक पाषाण आहे.

चंद्रकांती, वि॰सं॰ चंद्रकांताचें केलें जें उपनेत्रादि पदार्थ.

चंद्रकोर, स्त्री॰पु॰ स्त्रियांचें मस्तकीं धारण करायाचें बालचंद्राकार एक भूषण आहे.

चंद्रग्रहण, न॰सं॰ चंद्रास जें ग्रहण लागत असतें तें.

चंद्रजोन, स्त्री॰ गंधकप्रधान दारू. पणतीत घालून वर कागद चिकटवून करितात, जीचा प्रकाश चंद्रासारिखा पडतो; २, मोगली एरंड; ३, डोळ्यांत घालायाचें एक औषध आहे.

चंद्रनक्षत्र, न॰सं॰ चंद्राधिष्ठित नक्षत्र.

चंद्रबल, चंद्रबळ, न॰सं॰ कोणाएकाचे राशीस जें चंद्राचें आनुकूल्य तें; ओ दून चंद्रबळ भाणणें

णणें, एथे आंगीं सादृश्यमिश्र नसतां वक्रेंचनी ओढून आणणें,किं॰आपले इष्टगोष्टी विषयींही कोणीं मार्थिलें असतां उगीच गोमा करणें,

चंद्रबिंब, न॰सं॰ चंद्राचें बिंब॰

चंद्रमंडल, न॰सं॰ चंद्राचा राहाण्याचा प्रदेश;२, चंद्रबिंब॰

चंद्रमा, पु॰सं॰ चंद्रमथमार्थी॰

चंद्रविकासी, ३लिं॰सं॰ चंद्रोदय झाल्यानें विकासित होतात अशीं कमलादि पुष्पें॰

चंद्रहार, पु॰स्त्रियांचे गळ्यांत घालायाचें एकयष्टिस्थित भूषण आहे॰

चंद्रिका, स्त्री॰सं॰ चंद्राचें चांदिणें॰

चंद्री, स्त्री॰ मद्यादिकांचे मदानें, किं॰ पित्तदोषवायु इ॰ झाल्यामुळें डोळे तारकळून जी ऊर्ध्वदृष्टि होण्याची दशा;२॰ कों॰ पोरांस निश्चळ न बसायाजोगी जी अवस्था प्राप्त होत्ये ती;उ॰ हा पोर क्षणभर निश्चळ बसत नाहीं, दिवसभर मेल्याला चंद्री लागली आहे;३, ला॰ कोणी एक येणारास बहुतवेळ लागला असतां जी कोणाएकास अतिशयित उत्कंठा लागत्ये तीस अतिशयोक्तीनें म्हणतात; ४, लाग धा॰म॰ द्या किं॰ द्यें, जीचे मस्तकावर चंद्रासारिखें चिन्ह असतें ती गाय,किं॰ रेमेस

चंद्रोदय, पु॰सं॰ उदयाचलापासून किं॰सूर्य सन्निधानापासून जो चंद्राचा उदय तो॰

चंद्रोस, चद्रूस, पु॰एक उपधातु आहे॰

चप, अ॰ कांहींएक भाषणादि क्रिया न करितां; बसणें, राहणें, इ॰कांचें वि॰ क्वचित् याचा तुल्याही प्रयोग होतो, तेथे क्रियेचा अध्याहार जाणावा॰

चंपक, पु॰सं॰ एक पुष्पवृक्ष आहे:२॰ न॰ त्याचें पुष्प॰

चपकन, चपकर, चपदिशी, अ॰अतित्वरेनें; जाणें, येणें, उडणें, इ॰कांचें वि॰॰

चपचप, अ॰ मुख्यक्रियेंतील आवांतर क्रियांची त्वरा गम्यमान असतां त्या मुख्य क्रियेचें वि॰; उ॰ चपचप जेव॰

चपचपणें, वस्त्रादि पदार्थ द्रव गळ्याचा जो गा घृतादिकानें भिजणें; उ॰ आंगांतला आंगरखा घामानें चपचपला॰

चपचपां, अ॰चपचप॰

चपचपीत, ३लिं॰ चपचपला जो पदार्थ तो॰

चपटा, ३लिं॰ ज्या मध्यें उभारपणा कमी दिसतो असा जो डोल,किं॰ तद्विशिष्ट पदार्थ तो॰

चपटी, स्त्री॰दे॰ कांहींएक पदार्थ ठोकून चापून जो चपटा केला ती:उ॰ एडक्यांचे टकरेनें पेशाची चपटी झाली॰

चपडाक, स्त्री॰ कों॰ शरीरावर केला जो तळहाताचा प्रहार ती॰

चपडालारव, चपडीलारव, भिंगासारिखे पातळपातळ तुकडे जीचे असतात ती लारव॰

चपणी, ३लिं॰दे॰ बसकट नाक जा मनुष्यांचें तो; त्याचें नाक॰

चपराक, स्त्री॰ चपडाक॰

चपराकणें, कोणाएकास चपरानीं मारणें॰

चपराशी, ३लिं॰ चपरास धारण केली आहे जाणे तो॰

चपरास, स्त्री॰ शिपाई इ॰कांचे गळ्यांतील पट्टयावर मुद्रांकित जें पितळ इ॰कांचें तकट असतें तीं;२, दे॰ मेणबती इ॰कांचा आंकडा अडकवायासाठीं रबांब इ॰कांस जी चकती बसवीत असतात ती॰

चपल, ३लिं॰ कांहीं एक उद्योग करण्याविषयीं जाचे आंगीं त्वरा आहे तो; २, स्त्री॰ पायांतील वहाण ती॰

चपळ, ३लिं॰ चपल॰

चपळा, ३लिं॰ चपल जो मनुष्य अश्व इ॰॰

चपळाई, स्त्री॰ चपलपणा॰

चपाचप, अ॰ क्रचप॰

चपाट, अ॰ खाणें, लुटणें, इ॰कानीं निःशेष, किं॰ सत्यानास होई असें, करणें, होणें, इ॰कांचें वि॰; उ॰ त्याणें दाहा भाकऱ्या खाऊन चपाट केल्या; उ॰ पेंढाऱ्यानीं गांवचे गांव चपाट करून टाकिले; २, न॰ खाऊन, किं॰ लुटून, निःशेषता, किं॰ सत्यानास; उ॰ त्याणें शंभर लाडवांचें एकाक्षणांत खाऊन चपाट केलें॰

चपाटणें, दे॰ कांहीं एक कार्य अतिच वेगानें संपादणें; २, चपाट करणें॰

चपाटा, पु॰ कांहीं एक कार्य सिध्यर्थ कांहीं एक पदार्थावर उत्पन्न झाला जो वेग तो; उ॰ याचे हाताचे चपाट्यानें त्याचे डोकीचें पागोटें पडलें; उ॰ जो निघालों तो एका चपाट्यानें बीस कोश गेलों॰

चपाटी, स्त्री॰ क॰ चपराक॰

चपाती, स्त्री॰ लाटल्या वांचून केली जी भाकर किं॰ पोळी ती॰

चपापणें

चपापणें, अकस्मात् भय किं॰ लज्जा यांचें कारण दिसल्यासुळें वृत्यंतर पावणें; उ॰ कृष्ण येतांच सर्व स्त्रिया चपापल्या; उ॰ कोंतवालाचें शिंग वाजतांच चोर चपापले॰

चपापा, अ॰ चपचप॰

चंपाषष्ठी, स्त्री॰ मार्गशीर्ष शुध्द षष्ठी॰

चंपू, पु॰ गद्यपद्यात्मक काव्य॰

चपेट, अ॰ न॰ चपाट; २, ला॰ कोणाएकाची दुर्दशा करायाजोगें जें कोणाएकास देशकालाद्यानुकूल्य मान होतें ती; उ॰ तो माझे चपेटींत येईल त्या दिवशीं मारून निसंतान करीन; ३, कांहीं एक व्यवहारामध्यें झाला जो अर्थादिनाशरूप अनिशपात ती; उ॰ यंदा गुरें मेल्यासुळें मोठी चपेट बसली॰

चप्प, अ॰ चप॰

चप्पी, स्त्री॰ आंग रगडण्याचा, किं॰ पोथ इ॰कचा पडया सारिख्या बसाव्या म्हणून चापचोपी करण्याचा जो व्यापार ती॰

चप्पू, ३लिं॰ अल्पवयस्कअसून बोलणें इ॰ व्यापारांत जो सावधपणें कुशल तो॰

चबका, पु॰ वा॰ बचक॰

चबचबणें, चपचपणें

चबचबीत, ३लिं॰ चपचपीत॰

चबडाक, स्त्री॰ क॰ चपराक॰

चबदब, स्त्री॰ दे॰ पात्रादिकांत भरलेल्या पाण्याची कचमल्यासुळें झाली जी दुर्दशा ती॰

चबिना, पोहे फुटाणें चुरमुरे इ॰जे चाबून खायाचे पदार्थ तो; २. भक्ष्यपदार्थांचें चर्वण करण्याचा

ण्याचा जो व्यापार तो; प्र० संकुचित.

चंबू, पु० आंबळ गळ्याचें धातुमय एक पात्र आहे.

चमक, स्त्री० रत्नादिकांचे ठायीं जी चकाकी असत्ये ती.

चमकणें, चकाकणें.

चमकावणें, छडी, चाबूक, इ० कांनीं कोणा एकास मारणें; २, शृंगार चेष्टा प्रदर्शनार्थ नेत्र, नथ, इ० कांची चमक बाहेर दिसे असा व्यापार करणें.

चमकी, स्त्री० माराया चे उपयोगी बारीक वेत इ० कांची काठी ती; २, सुवर्णादिकांचें लवंगेचे आकारा सारिखें एक कर्ण भूषण करीत असतात ती; ३, नथीवर शोभार्थ जी हिरकणी लावीत असतात ती.

चमचम, अ० चटचट मथमार्थी; उ० छडी लागे चमचम विद्या येई घमघम.

चमचमाट, पु० उत्तम भक्ष्य भोज्यादिकांची जी समृद्धी तो, कि० ते पदार्थ यथेष्टपणें भक्षणें उपभोगणें, इ० जो व्यापार तो; २, दे० चकचकाट; उ० दिवाळींत घरोघर दिव्यांचा चमचमाट असतो.

चमचमीत, वि० चणचणीत मथमार्थी; २, चमचमाट मथमार्थी.

चमचा, पु० पळीचे आकारा सारिख्ये आकाराचें एकपात्र आहे.

चमडी, स्त्री० कातडें; उ० तो चमडी देईल पण दमडी देणार नाही.

चमत्कार, पु० सं० आश्चर्य कि० आश्चर्यकारक पदार्थ, व्यापार इ०; २, देव औषध इ० पदार्थांचा आश्चर्य

आश्चर्य वाटायाजोगा अनुभव.

चमत्कारिक, वि० चमत्कार वाटायाजोगा जो व्यापार भाषण पदार्थ इ० तो.

चमू, स्त्री० सं० सेना.

चमेली, चमेल, स्त्री० एक पुष्पवल्ली आहे; न० स्त्री० तीचें फूल; २, चमेलीचें जें तेल, अत्तर तें

चय, पु० सं० द्विगुण त्रिगुण इ० जी अनुक्रमानें वृद्धि तो.

चर, वि० हुसज्याचे व्यापारानें, कि० स्वनिष्ठ व्यापारानें जो चलनवलनादि व्यापार समर्थ तो; २, मेष, कर्क, तुला, मकर, हे राशी मत्यकीं; ३, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका, हीं नक्षत्रें प्रत्येकीं; ४, पु० सोमवारास म्हणतात; ५, न० पंधरा घटिकांपेक्षां अधिक उणें दिनार्ध होण्याचें कारण जें मध्यरेषापासून याम्योत्तरअंतर, कि० त्या पासून आलें जें फल तें; ६, रा० संकेतानें बोलावयाचें असतां गमनास चर म्हणतात.

चरक, पु० ंमाचा रस काढायाचें एक यंत्र आहे; २, धातुमय पात्रादिकांस साफ करण्याचें, कि० नकशी करण्याचें एक यंत्र आहे; ३, ला० खाण्या विषयीं निरंतर चालूजें तोंड त्यास निंदेनें म्हणतात; चरकी धरणें, म्हणजे भांडें इ० विवक्षितानुरूप साफ करायासाठीं चरकावर धरणें; ४, ला० एकाद्यास कांहीं एका कामावर इकडे तिकडे न होऊं देतां कुंथवणें.

चरकट, न० लांबचलांब कंटाळायाबयाजोगी जी नीरस गोष्ट तें.

चरकटणें, रा॰ दुपदरी तिपदरी वळायाची दोरी चांगली होण्याचें तात्पर्य न धरितां सरासरी त्वरेनें वळणें; २, ला॰ लेखनादि व्यापार यथाकथंचित् त्वरेनें शेवटास नेणें; उ॰ एकाक्षणांत त्याणें दाहा बंद चरकटले त्यणून त्यांत फार अशुद्धें पडलीं.

चरकटया, ३लिं॰ रा॰ चरकटण्याचा स्वभाव जाचा तो.

चरकणें, चरशब्दपुरःसर वस्त्रादिकांनीं फाटणें; २, ला॰ अकस्मात् कांहीं अनिष्टदर्शन श्रवणादिकामुळें कोणा एकानें अंतःकरणांत व्यथा पावणें.

चरकन. चरकर, चरदिशीं, अ॰ वस्त्रादि फाटतेसमयींचे शब्दाचें अनु॰ फाटणें, चिरणें, इ॰कांचें वि॰.

चरका, पु॰ चटका; २, चरकणें लाक्षणिकअर्थाचा जो व्यापार तो.

चरकी, ३लिं॰ चरकावर धरून साफकेलेलें भांडें इ॰ तो.

चरगण, न॰ गुरांस चरायाजोगें जें तृणादिक तें; उ॰ पाऊस पडला तरी चरगण व्हायाला एक महिना पाहिजे.

चरचर, अ॰ वस्त्र फाडतेसमयींचे, किं॰ तृणादिक कापतेसमयींचे शब्दाचें अनु॰.

चरचरणें, तप्ततेलादिकांत पाणी पडल्यामुळें त्या तेलादिकानें, किं॰ फाटतेसमयीं वस्त्रादिकानें, चरचर शब्दयुक्त होणें; २, ला॰ चरकणें द्वितीयार्थी.

चरचरां, अ॰ चरचर.

चरचरीत, ३लिं॰ गोजिऱ्हावत् खरस्पर्शी जो पदार्थ तो, किं॰ मृदु नव्हे असा ओषधादिपदार्थ तो; २, रा॰ अ॰ यत्किंचित् न्यूनतारहित पूर्णपणें; उ॰ हें कापड चरचरीत पंधराहात लांब आहे याला चरचरीत पंचवीस रुपये पडतील.

चरचीक, ३लिं॰ रा॰ चंचिभाग.

चरचोंडा, ३लिं॰ वारिनअसतां निर्लज्जपणें उद्दें उद्दें वेडेंवेडें बोलणें बोलायाचा स्वभाव जाचा तो.

चरण, स्त्री॰ चरगण; २, गुरें चरणीस पाठविलीं असतां तत्संबंधी जें सर्कारदेय द्यावें लागतें तो; ३, चरण्याचा जो व्यापार तो: उ॰ त्या गाईपेक्षां या गाईची चरण जलद आहे.

चरण, पु॰ मनुष्यादिजीवांस चालायास साधनभूत जो अवयव असतो तो; २, श्लोक, नक्षत्र इ॰कांचा जो चतुर्थांश तो; ३, अभंग इ॰कांचें जें कडवें तो.

चरणचाली, चरणचालीनें, अ॰ केवळ पायांनीं चालत; जाणें, येणें, इ॰कांचें वि॰.

चरणतीर्थ, न॰ गुरु, ब्राह्मण, यांचा चरणाचें तीर्थ.

चरणधूलि, स्त्री॰ चरणसंबंधी धूलि ती; २, गुरु पितर इ॰कांबरावर नम्रतेनें बोलायाचें असतां शिष्यादिक आपणासच आरोपानें म्हणतात; उ॰ महाराज मी आपली चरणधूलि आहे.

चरणरज, न॰ चरणधूलि.

चरणसंपुष्ट, पु॰ पायांतील जो जोडा त्यास म्हणतात.

चरणें, गुरें इ॰कानीं तृणादिक जा ठिकाणीं रुजलें आहे त्या ठिकाणीं जाऊन भक्षणें; २, ला॰ मामलत

मामलत सावकारी इ॰ व्यापारांत निरंतर पैसा मिळविणें; २, क्षत विद्या इ॰कानीं प्रवृत्त होणें.

चरफडणें, चडफडणें.

चरफडाट, पु॰ चडफडाट.

चरब, अ॰ विवक्षित प्रमाणामध्यें यत्किंचित् न्यूनतारहित पूर्णपणें; उ॰, हा घोंगडीचा चरब दाहा हात लांब आहे.

चरबट, चरबड, ३लिं॰ दे॰ विडा इ॰ भक्षणानें चरचरीत झालीजी जिव्हा तोंड इ॰ तो.

चरबी, स्त्री॰ बकरा, मेंढा, इ॰कांचे मासाचें तेल काढित असतात ती.

चरम, ३लिं॰ सं॰ शेवटला, याचे समास; चरमकोटी चरमांश इ॰.

चरवट, न॰ मृत्तिकेचें एकपात्र आहे.

चरवी, स्त्री॰ गुंडाचे आकाराचें लहानपात्र आहे; २, वा॰ मधाचें पोळें.

चरस, पु॰ दे॰ भांगेचे झाडावरील बोंडांचा जो द्रव काढित असतात तो.

चरसा, पु॰ बैल इ॰ पशूंचें चर्म.

चरा, पु॰ साफजें भांडें शस्त्र इ॰ त्यास रेंव इ॰कानीं घांसल्यामुळें जा रेषा पडतात तो.

चराई, स्त्री॰ चरण द्वितीयार्थी; २, क्रि॰ गुरारख्यास जी रास्थील देतात ती.

चराचर, न॰ सं॰ स्थावर जंगमात्मक जें जगत् तें; २, ३लिं॰ प्राचीन परंपरेनें चालत आलीजी रीति संप्रदाय इ॰ तो; उ॰ आम्हीं चवेगळे झालों असें नव्हे चराचरा संप्रदाय असाच चालला आहे.

चराचर

चराचर, अ॰ चरचर.

चरारां, अ॰ चराचर.

चरित, न॰ सं॰ आचरण; उ॰ बाळपणीं कृष्णानें काय चरित केलें तें मला सांग.

चरितार्थ, पु॰ संसादि व्यवहारांचा यथा कथंचित स्वल्पसामग्रीनें जो निर्वाह तो; २, ३लिं॰ सं॰ जाचें यत्नानुरूप फल झालें असें जें वाक्यादि तो.

चरित्र, न॰ सं॰ चरित.

चरींव, न॰ गा॰ चरगण.

चरु, पु॰ सं॰ शिजलेला भात.

चरुस्थाली, स्त्री॰ सं॰ चरु करायाची जी तपेली ती; २, संकेतानें प्रायः एकदोघांचा स्वयंपाक करण्याचा जो व्यापार त्यास म्हणतात.

चर्चन, न॰ सं॰ चंदनादिकांचें जें शरीराम लेपन तें.

चर्चा, स्त्री॰ प्रसंगानुरूप कोणाएकाची कोणाएकास्थलीं जी गोष्ट निघते ती; उ॰ आज तुमची तेथें चर्चा निघाली होती; २, देवादिकांचें चरित कथन करण्याचा जो व्यापार ती; उ॰ सर्वकाल भगवच्चर्चा करित असावें; ३, दे॰ कोणाएकाची जी त्याचे पाठीमागें निंदा ती; उ॰ हे तुमचे तोंडावर गोड बोलतात पण मागें तुमची चर्चा करित असतात.

चर्चिणें, चंदनादिपदार्थ आंगास लावणें.

चर्पट, न॰ वा॰ चरकट.

चर्पटपंजरी, स्त्री॰ मनस्वी लांबचलांब जी गोष्ट ती.

चर्पटिका

चर्पटिका, स्त्री॰ गड्डालिका; २, चर्पटपंजरी.

चर्म, न॰सं॰ कातडें.

चर्मक, सं॰उ॰स्त्री॰की, चर्माचे जोडे इ॰पदार्थ करणारी मनुष्यजाति आहे.

चर्मकार, उ॰ चर्मक.

चर्मचक्षु, न॰ व्यवहारिक पदार्थांचे मात्र दर्शनाचें उपयोगी मनुष्यादिकांचें चक्षु तें; दिव्यचक्षु किंवा ज्ञानचक्षु एतत्पति पक्षिलें करूनच याची प्रसिद्धि.

चर्मदंड, उ॰सं॰ संकेतानें शिक्षनास म्हणतात.

चर्मधन, न॰सं॰ गो महिष्यादि पशुजाति; उ॰ चर्मधन गहाण घेऊन पैसा देऊनये.

चर्मपादुका, स्त्री॰सं॰ संकेतानें पायांतील जोडा वहाण यांस म्हणतात.

चर्मी, ३लिं॰ चर्मानें निर्मित जो जोडा इ॰पदार्थ तो.

चर्या, स्त्री॰ कोणाएकाची कांहींएक सदसत्कर्म करण्याविषयीं सतत जी रीति चालत आली असत्ये ती; उ॰ रोजगार लागल्या पासून आलिकडेस त्याची चर्या पालटली; २, शरीरावरील जो साधारण लक्षण ज्ञापक तेजोविशेष असतो ती; उ॰ दुरवण्यानें त्याचे तोंडाची चर्या फिरली; उ॰ हा ब्राह्मण आहे असें म्हणता, परंतु याचर ब्राह्मणाची चर्या दिसत नाहीं.

चर्वण, न॰सं॰ कांहींएक पदार्थ तोंडांत घालून दांतानीं बारीक करण्याचा जो व्यापार तें.

चर्वणा, स्त्री॰सं॰ कांहींएक गोष्ट चांगली इ॰ ज्ञानानंतर ही चांगलीच, हीच चांगली, चांगलीच ही, इ॰ जे ज्ञानाचे आकार उठतात ती; २, ला॰रा॰ कोणाएकाचे मनांत कांहींएक अर्थ थोडक्या शब्दानीं आला असतांही तदर्थ निरर्थक अनेकशब्द प्रयोगकरण्याचा जो व्यापार प्रकार ती; निंद्यार्थीं च्या प्रायः प्रयोग.

चर्वित, ३लिं॰सं॰ चर्वण जाचें झालें आसा जो पदार्थ तो.

चर्वितचर्वण, न॰सं॰ चर्वितांचें जें पुनः चर्वण तें; २, ला॰ एकवार उक्त जें वाक्यादिक त्याचें निरर्थक जें पुनःपुनः उच्चारण तें.

चल्हा, उ॰ चरा.

चल्हांट, न॰ मोठी वळलेली दोरी; २, ला॰ लांबचलांब कंटाळा यावयाजोगी जी गोष्ट इ॰ तें.

चलणें, गमन करणें; परंतु याचा प्रयोग, त्याचे सहवर्तमान, किंवा पुढें, मागें, असे रीतीचें विवक्षित स्थलीं संधान असतांच होतो; तोही विशेषें करून विध्यर्थी, वर्तमानीं भवष्यीं क्वचित भूतीं तर दिसत नाहीं.

चलती, स्त्री॰ जी चळलीती गोष्ट त्याचे हातून पार पडावी अशीजी कांहींएक काल कोणाएकास देशकालाद्यानुकूल्यरूप दशा प्राप्त होत्ये ती.

चलन, न॰ सं॰ कांहींएक पदार्थ हालण्याचा किंवा स्वस्थानापासून पलीकडे सरण्याचा जो व्यापार तें.

चलन, चलण, स्त्री॰ न॰ जा देशादिकांत पाधान्येकरून जा रुपया इ॰ नाण्याची वहिवाट ती. तें.

चलनवलन, न॰हस्तपादाद्यवयवांचा जो हालणें, चालणें इ॰रूप व्यापार तें.

चलनी, ३लिं॰ जा रुपया इ॰ नाण्याचें जेथे चल-

न आहे तेथें तो; याचे समास सर्कारचलनी, पेंठचलनी, बाजारचलनी, गांवचलनी, इ० होतात.

चलबिचल, स्त्री० न० कांहींएक जी स्थिरपणें चालू झाली गोष्ट तिलाच कांहींकाल स्थिरता, कांहींकाल चंचलता, अशी जी उभयात्मक अवस्था प्राप्त होत्ये ती, तें; उ० त्याचे मामलतीची कालपासून कांहीं चलबिचल दिसत्ये.

चलारव, ३लिं० चंचिबाग.

चलारवी, स्त्री० चलारवपणा.

चलित, ३लिं०सं० चलन पावला जो पदार्थ तो.

चव, पु० ओल्या नारळाचा खरवडून काढिला जो कीस तो; २ मोत्यांचे वजनाच्या रती व मोत्यांची संख्या यांचें गणित आहे तें केल्यानें जें वजनरूप फल येतें तो; ३, स्त्री० रसनेंद्रिय याह्य, किं० श्रोत्रादि इतरेंद्रियग्राह्य जे पदार्थ तत्संबंधी जी गोडी ती; ४, त्या गोडीचे अनुभवाविषयीं रसनेंद्रियाचा ठायीं शक्ति असत्ये ती; चवघेणें, पाहणें, या व्यापारांत चव राहिली नाहीं, इ० स्थलींही चव शब्दार्थ गोडी असाच होतो.

चव, पु० कांहींएक उद्बोधक दर्शन स्मरणादिकें करून कांहींएक व्यापार करण्याविषयीं जी उत्कलिका उत्पन्न होत्ये तो.

चवई, स्त्री० रानांत जी केळ होत असत्ये ती; २, रा० देव देवाथासाठीं जी लहान घडोंची करितात ती.

चवक, पु० एक औषधी पदार्थ आहे.

चवकट, स्त्री० दरवाजाचे फळ्यांवाचून चार लांकडें जडून चतुरस्र करितात ती; २, रा० चतुष्कोण जें क्षेत्र ती; ३, चौसोपीघरास मध्यें जें चतुष्कोण अंगण पडत्ये ती; ४, चार भुतांचा जो समुदाय आहे ती; ५, ज्यें चार शब्दांचे संबंधानें जे शब्द सिद्ध होतात ते तद्धित, किं० समास इ० त्यांचें उच्चारण दोन मकारचें होतें; उ० चौकट, चवकट, चौरंग, चवरंग, इ०; असे शब्द दोन वेळ लिहावे लागतात याकरितां हे सर्वशब्द चौचा प्रकरणीं लिहितों पथे उदाहरणार्थ एक दारचविला.

चवकळ, ३लिं० विचक्षण कार्यास हुरूप उराया जोगा जो समृद्ध पदार्थ तो.

चवचव, स्त्री० संसारंभादि सभोजन व्यापारीं, किं० गानादि व्यापारीं अव्यवस्थादि कारणामुळें त्या संसारंभादिकांची, किं० तत्कर्त्यांची जी दुर्दशा होत्ये ती.

चवचवणें, या० चिचविणें.

चवड, स्त्री० दे० भाकर पोळी इ०कांचा रचलेला ढीग.

चवडचाल, स्त्री० घोड्याचे चालींत एक प्रकार आहे.

चवडा, पु० तळपायांचा पोटांजवळचा जो प्रदेश तो.

चवणा, पु० दे० चटक; उ० एवढ्यापोसस तंबाखूचा चवणा लागला हें ठीक नव्हे.

चवणें, शिष्टरीति सोडून अशिष्टरीति धरिल्यामुळें, किं० वेडावल्यामुळें लोक व्यवहारांत अयोग्यता पावणें.

चवताळणें, कांहींएक व्यापारीं आरंभोत्तर, किं० आरंभींच क्षोभून सावेश प्रवृत्त होणें.

चवदार, ३लिं० रुच्य जो पदार्थ तो.

चंवर, न॰ चंवरी; २, रा॰ चौंवण.

चंवरडोल, पु॰ हत्तीवरील जी अंबारी तो.

चंवरी, स्त्री॰ बनगाईचे सकेशपुच्छास सोनें रुपें इ॰ कांची दांडी बसवून राजादिकांवर वाराया करितां करीत असतात ती; अश्वकेशादिकांची करितात तीही.

चवल, पु॰ रुपयाचा जो अष्टमांश तो.

चवली, स्त्री॰ चवलाचे किमतीचें रुप्याचें एक नाणें आहे.

चवल्या, ३ लिं॰ चवल द्यावयास करून केला जो मनुष्यदार तो.

चंवळा, पु॰ चंवळींत एक जाति आहे.

चंवळी, स्त्री॰ एक द्विदल धान्य आहे.

चवा, पु॰ बाहाल इ॰ लांकडें उंच चढवायाकरितां दोन लांकडें एकत्र बांधून जी केंची करित असतात तो.

चवाटकें, न॰ दे॰ मारीशेराचे पोडशांशाचें एक माप आहे.

चवाठा, पु॰ चारमार्ग एकत्र मिळतात आमाजो जागा तो: २. ल्या॰ चौहोंकडचे लोक जेथें येऊन मनस्वी गप्पाष्टकें करित असतात अमेंजें गृहादिकास्त्रास आंगणानें म्हणतात.

चवारी, स्त्री॰ सुपारींत एक जाति आहे.

चवाळ, स्त्री॰ रा॰ एकसंध चारपंचे एकत्र विणलेल असतात ती.

चवाळें, न॰ चवाळ; २, लहान उणारव जी घोंगडी तें; ३, कों॰ चौपानी एकधोंडा उचलून त्याचा मध्यभाग पुसून एक बांशास दोरी बांधून करितात तें.

चवेण, चवणी, स्त्री॰ चवई मथमार्थी.

चव्वा, पु॰ गंजिफांचे रंगांत चौहोंचें चिन्ह जापानावर असतें तो; २, तिफांशी सोंगट्यांचे खेळांत चौथ्या घरीं सोंगटी बसे असा जो फांशावरील डाव तो.

चश्मा, पु॰ چشمہ उपनेत्र.

चसणें, चचणें.

चहूड, पु॰ चड.

चहूडणें, चडणें

चहाड, ३ लिं॰ दुसऱ्याची गुप्त गोष्ट दुसऱ्याजवळ सांगण्याचा स्वभाव जाचा तो; २, द्विदल धान्य भिजत, किं॰ शिजत घातलें असतां त्यांतील जादाण्यास मोड येत नाहीं व शिजत नाहीं तो दाणा.

चहाडखोर, ३ लिं॰ चहाड मथमार्थी.

चहाडबुचका, ३ लिं॰ चहाडखोर

चहाडी, स्त्री॰ चहाड मनुष्याचें जें कर्म तो.

चहुआ. चहोआ, दरशेंकडा दरमहा, किं॰ दरसाल चाररुपये प्रमाणें व्याज घेण्याचा एकप्रकार आहे.

चहुंकडे, अ॰ चोहोंबाजूंस, किं॰ सर्वत्र.

चळ, पु॰ त्वाष्टारपण, वायु, पिशाच, इ॰ मुळें झालेला जो बुद्धीस भंश तो; २, रा॰ स्त्री॰ पोर इ॰ रडूं लागलें असतां तें रडें न आटपावाजोगी जी त्यास अवस्था प्राप्त होत्ये ती: ३. पोर इ॰नीं कांहींएक पदार्थाविषयीं घेतलाजो छंद ती.

चळकांप, पु॰ व्याघ्र, चोर, इ॰ जनित भयानें चळचळां सुटणें कांपणें अशी जी कोणाएकास अवस्था प्राप्त होत्ये तो.

चळचळ, अ॰ अति भयानें चळचळ शब्द होई असें सुटणें इ॰कांचें वि॰

चळचळां

चळचळां, अ॰ चळचळ.

चळचळाट, पु॰ उत्तम भक्ष्य भोज्य पदार्थांचीजी समृद्धि तो.

चळचळीत, १लिं॰ चळचळाट; २, रा॰ १लिं॰ कां हींएक कार्यास पुरेपुरत व्हायाजोगा जो भक्ष्य भो ज्यादि पदार्थ तो; ३, जा मयोजनामध्यें भक्ष्य भो ज्य पदार्थांची समृद्धि झाली तें मयोजन.

चळचूक, स्त्री॰ कांहींएक नियमा मध्यें जो अल्प स्वल्प विपर्यास तो.

चळणवळण, न॰ चलनवलन; २, कांहीएक सं प्रदायानें कोणाएकाचीजी वर्तनरीति असल्ये तें; उ॰ संपत्ति आल्यापासून त्याचें चळणवळण फिर लें.

चळणें, मनुष्याचे बुद्धीस भंश होणें, किं॰ तद्विरुद्ध त्या मनुष्यानें होणें; २, कांहींएक पदार्थानें विवक्षित स्थानापासून चलित होणें; ३, रा॰ स तत धैर्यरुदन करणें.

चळवळ, स्त्री॰ दे॰ कांहींएक कार्यार्थ हात, पाय, इ॰ हालविण्याचा जो व्यापार तो.

चळवळणें, दे॰ चळवळीनें युक्त होणें.

चळवळ, स्त्री॰ चळबळ.

चळवळणें, चळबळणें.

चळाचळ, अ॰ चळचळां.

चळाळां, अ॰ चळचळां.

चळें, न॰ रा॰ मुडयांतील कांहीं दांणे काढून घेतल्या मुळें सईल झाला जो मुडा तें.

चक्षु, न॰ नेत्ररूप जें इंद्रिय तें.

चक्षुरिंद्रिय, न॰ सं॰ चक्षु.

चाक, न॰ रथादिकांचें जें चक्र तें.

चाकचक्य, न॰ सं॰ विद्युल्लता, हिरा, इ॰ पदार्थांचे आंगीं डोळे दिपायाजोगा जो तेजोविशेष असतो तें.

चाकचोप, ३लिं॰ चाकचोपीजास आहे आमाजो मनुष्य, किं॰ पदार्थ तो.

चाकचोपी, स्त्री॰ चापून चोपून आणिला जो कांहीं एक पदार्थावरनीटनेटकेपणा तो.

चाकपाक, ३लिं॰ चकपक द्वितीयार्थी.

चाकर, ३लिं॰ जो एकाद्याचें कांहींएक नित्यशः काम करायाचें पत्करून त्यापासून तत्संबंधी मो बदला घेऊन उदर निर्वाहादि करितो तो त्याचा.

चाकरचुकर, ३लिं॰ चाकर.

चाकरडा, ३लिं॰ चाकराची निंदा विवक्षित असतां त्यास चत्प्रत्यय लागतात.

चाकरनफर, ३लिं॰ चाकरचुकर.

चाकरमान्या, ३लिं॰ चाकरांसच प्रतिष्ठेनें म्हणतात.

चाकरी, स्त्री॰ चाकराचें जें कर्म तो; २, ऐहिकफल किं॰ पारलौकिकफल एतदर्थ अन्यत्वें करून विवक्षित जो त्याचें बरें व्हावें त्यास संतोष व्हावा इत्याद्यर्थ करितात जें कांहींएक कर्म तो.

चाकरीपेशा, पु॰ चाकरीचें नातें तो.

चाकवत, पु॰ एक पालेभाजी आहे.

चाकी, स्त्री॰ चाकासारिखा थाटोळा जो ताम्रादि धातु, काष्ठ, इ॰ चा तुकडा तो; २, चाकाचे आकाराचा जो काळा भोंपळा, सुरण, त्यांसही म्हणतात.

चाकु, पु॰ लेखणी इ॰ तासायाचे, किं॰ आचारिक फलकापायाचे इत्यादि उपयोगी लहान शस्त्र आहे.

चाकोळें, चारवोळें, रिकाम्या गोष्टी सांगत बसलाजो मनुष्यसमुदाय त्यास निंदनें म्हणतात.

चारवणी, स्त्री॰ चारवण्याचा जो व्यापार तो.

चारवणें, पदार्थाची गोडी समजायासाठीं थोडा तदंश चाखून पाहाणें.

चारवाचिणें, ला॰ तळहातानें तोंडावर मार क रणें.

चारवोळा, पु॰ मुंजीचे दिवशीं मातेजवळ पुत्रानें भोजन करावें इ॰रूप जो संभारंभ करितात तो.

चांग, ३ लिं॰ मं॰ चांगला.

चांगभला, पु॰ भैरवाचे प्रार्थनेचा शब्द आहे.

चांगभांग, पु॰ स्त्रियांची जी चढीपढी तो.

चांगला, ३ लिं॰ उत्तम जो पदार्थ तो.

चांगुलपण, न॰ **चांगुलपणा**, पु॰ चांगलेपणा.

चांचड, उ॰रा॰ तांबडेय मुंगळ्या सारिखा दांत्यास्त्र्यून एक माणी आहे त्यास म्हणतात; २, न॰ एक क्षुद्रजंतु आहे.

चांचणी, स्त्री॰ कांहींएक पदार्थाचे परीक्षे करितां तदेकदेशांचा जो यत्किंत् यत्किंत् अनुभव तो; उ॰ तो पंडित काय काय पढला आहे त्याची मी चांचणी पाहिली.

चांचपडणें, डोळ्यानीं दिसत नसतां. किं॰ अंधार असतां हस्तादिकानीं वस्तु शोधण्याचा. किं॰ चालण्याचा व्यापार करणें; २. दे॰ भयादिकामुळें. किं॰ मनांतील विवक्षितार्थ शीघ्र योजेनासा झाला असतां लागत लागत बोलणें.

चांचपणें

चांचपणें, चांचपडणें.

चाचर, पु॰ बा॰ कांहींएक पदार्थ उंदीर इ॰नीं खाऊन, किं॰ चावून केला जो चूर तो.

चाचरणें, चांचपडणें हिनीयार्थी.

चांचल्य, न॰ स्त्री॰ चंचलपणा.

चाचा, चाची, स्त्री॰ मनुष्यांत एक जाती आहे.

चाचावणें, अनेक कार्ये एककालीं करायाचीं प्राप्त झाल्यामुळें राग येऊन किं॰ एरव्हींच कोणाचि पर्यीं राग येऊन चरफडणें दांत ओठ चावूं लागणें इ॰ व्यापार करणें; २, रा॰ कोहळा आदिकरून फळ उभें चेवून बारिक बारिक तुकडे पडत असें हळू हळू शस्त्रानें तोडणें.

चांचूं, न॰ ईषन्माम जो भाषणोच्चार तें; इ॰ एवढें तें थें बसले होते पण त्यापुढें कोणी चांचूं केलें नाहीं.

चाटण, न॰ अनेक औषधी एकत्र उगाळून, किं॰ कुटून चाटून खायाजोगें जें औषध करितात तें.

चाटणें, औषधादि पदार्थ जिव्हा व्यापारानें ग्रहण करणें, किं॰ कांहींएक पदार्थावरून जिव्हा फिरविणें; २, ला॰ गोळागोळी इ॰कानीं वेगाबरोबर शरीराची कांहीं त्वचा नेणें, चावून घुसून नेणें इ॰ स्थलीं वीरादिकानीं कांहीं द्रव्यादि निःशेषनेणें.

चाटी, चाट्या, कापडाचें दुकान घालून उदीम करितो तो.

चाटू, पु॰ दे॰ लांकडाची जी पळी सारिखी करित असतात तो.

चाड, स्त्री॰ मं॰ आवड; २. दे॰ कांहींएक गोष्टीविषयीं जी पर्वा ती.

चांडाळ

चांडाळ, चांडाल, ३लिं॰ चंडाळ.

चांडाळचोकडी, स्त्री॰ दुष्टजनांची जी झुट ती.

चाडें, न॰ समईचें किं॰ लामणदिव्याचें जें वरचें खोल चें तेल राहाण्याजोगें परडें तें.

चाडेगांव, स्त्री॰ एक तऱ्हेची गांव आहे.

चाणाक्ष, ३लिं॰ लौकिकचातुर्य सुभाषित ज्ञाण णें चांगलें चमत्कृत्व इ॰ गुणांनीं युक्त जो मनुष्य तो.

चातक, पु॰सं॰ एक पक्षी आहे जो सर्वकाल पर्जन्या ची इच्छा करितो अशी प्रसिद्धि आहे.

चाती, स्त्री॰ जानवें इत्यादि अर्थ सूतकादाभा साठीं दु गाणी सारिखी सछिद्र चकती असते ती; २, लो॰ कापड करंजी कराया साठीं त्याला पिठाची पेटया चे सारिखी जी करितात ती.

चातुर्थिक, पु॰सं॰ चौथ्या चौथ्या दिवशी जो ज्वर ये तो तो.

चातुर्मास्य, न॰सं॰ चतुर्मास; २, शीतकाळ उष्ण काळ पर्जन्यकाळ यांचे जे चार चार महिन्यांचे समुदाय ते प्रत्येकी; ३, पु॰ एक यज्ञ आहे.

चातुर्थ, न॰सं॰ चतुर्थपणा.

चातुर्वर्ण्य, न॰सं॰ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र चार वर्णांचा जो समुदाय तें.

चातुर, ३लिं॰ सं॰ चतुर.

चांद, पु॰ चंद्र.

चांदई, स्त्री॰ दुपारची घराची आड्याप्रयंत उंचजी भिं त ती.

चांदकी, स्त्री॰ लहान जी भाकरीस संकेतानें ह्मणतात.

चांदणी, स्त्री॰ डोयेकरितां मंडपाकार वस्त्र बांधि तात ती; २, आकाशांतील तारा ती; ३, स्त्रियां चें शिरोभूषण आहे; ४, घोडयाचा पाठीवर आच्छा दन न घालितां दाणा त्यास दिला असतां विकार होत असतो अशी लोक प्रसिद्धि आहे ती; पहा धा॰ म॰

चांदणीरात्र, त्र, स्त्री॰ जा रात्रीस चांदणें अस तें अशी जी रात्र ती.

चांदणें, न॰ चंद्राचा जो प्रकाश तें.

चांदर, ३लिं॰ जा पशूचे कपाळावर चंद्राकार वर्तु ल चिन्ह असतें तो.

चादर, स्त्री॰ रुजामा गादी इ॰कांवर जें शुभ्र वस्त्र घालीत असतात ती.

चांदरात्र, त्र, स्त्री॰ प्रथम चंद्रदर्शन होतें अशी जी रात्र ती; चांदरात्रझडणें स्त्री॰ चांदरात्रीचें चां दरात्रीस गोजमरा पावणें.

चांदवड, पु॰ एक वृक्ष आहे; २, पुणेचलनी जो रुपया त्यास ह्मणतात.

चादवडी, ३लिं॰ चांदवड ह्मणून गांव आहे तत्सं बंधी जो रुपया तो.

चांदवा, पु॰ पाळणा इ॰कांवर जें छत बांधितात तो.

चांदा, पु॰ एक झाड आहे; २, ३लिं॰ चांदर.

चादाडा, पु॰ चांदा प्रथमार्थी.

चांदिणापारव, पु॰ शुक्लपक्षास ह्मणतात.

चांदिणी, स्त्री॰ चांदणी.

चांदिणीरात्र, स्त्री॰ चांदणीरात्र.

चांदिणें, न॰ चांदणें.

चांदी, स्त्री॰ निर्मल जें रुपें तो.

चांदुकली, स्त्री॰ चांदकी॰

चांदें, न॰ गो महिष्यादिकांचे कपाळावर चंद्रासारिखें जें पांढरें चिन्ह असतें तें॰

चांदोबा, पु॰ बालांचे भाषेनें चंद्रास म्हणतात॰

चानी, स्त्री॰ रा॰ खार म्हणून जो माणी आहे तो॰

चाप, पु॰ न॰ सं॰ धनुष्य॰

चाप, पु॰ मळसूत्र इ॰चे जोरानें चापावयाचे एक यंत्र आहे तो॰

चापचोपी, स्त्री॰ चाकचोपी॰

चापट, वि॰ चपटा जो पदार्थ तो; २, स्त्री॰ तळहाता नें मुखाद्यवयवावर मारणें॰

चापटणें, उ॰ कांहींएक उभार पदार्थ, चापट होईअसें करणें॰

चापटी, स्त्री॰ दे॰ केवळ पातळ झालाजो पैसा इ॰ पदार्थ तो; २, लहान जो पातळ भाकर तो; ३, चापट द्वितीयार्थी॰

चापणी, स्त्री॰ चापण्याचा जो व्यापार तो: उ॰ कापसाची चापणी केल्यावांचून गव्ये बांधायास येत नाहींत॰

चांपणें, चांचपणें॰

चापणें, कांहींएक कापूस इ॰ पदार्थ आंवळून घट्ट बसाया साठीं चाप इ॰नीं दाबणें॰

चापती, स्त्री॰ रा॰ जडपदार्थ उलथायासाठीं जें लांकूड इ॰क लाविलेलें तो॰

चापल्य, न॰ सं॰ चपलता॰

चांपसणें, चांचपणें॰

चांपा, पु॰ चंपक वृक्ष: २. लहान दारवेचे बाणाचे आकारा सारिखा, एक दारवेचा पदार्थ करितात तो॰

चापी

चापी, वि॰ चापरूप यंत्र आहे जास, अशी जी बंदूक धनकुटा इ॰ तो॰

चापु, पु॰ वा॰ चाकू॰

चांपें, न॰ चांप्याचें पुष्प; २, फणसामध्यें आठी चांचून जो गऱ्यासारिखा खाद्यांश असतो तें॰

चांपेकळी, स्त्री॰ चांप्याची जी कळी ती; ला॰ तदाकार जें सुवर्णादिकांचें भूषण करितअसतात ती॰

चांपेरवण, पु॰ प्रायः चौसोपी घरास दोनसोप्यांचे मधीस जो मोठा रवण येत असतो तो॰

चांपेमोळ, न॰ घराचे आडयाचे टोंकाकडील जें मोळ तें॰

चांफणें, चांपणें॰

चाबरणें, कों॰ भयादिकानें घाबरून भलतें भलतें बालूं लागणें॰

चाबा, पु॰ चबिना द्वितीय तृतीयार्थी॰

चाबुकस्वार, पु॰ हातीं चाबूक घेऊन घोड्यास नानाप्रकारचा चाली शिकविण्याचें कसब करितो तो॰

चाबूक, पु॰ घोडा इ॰कांस मारायासाठीं काठीचे तुकडयास दोरी लावून करितात तो॰

चांभार, पु॰ स्त्री॰ रीण॰ चर्मक॰

चामऊ, स्त्री॰ उषेंत एक भेद आहे॰

चामरवीळ, पु॰ शरीरावर फोडा सारिखा उत्पन्न होतो, परंतु त्यास वेदना नसत्ये तो॰

चामरवोड, पु॰ चामरवीळ॰

चामट, वि॰ मृदुअसून लेकर तुटत नाहीं, असा जो चर्म, पोळी, भाकर, इ॰ पदार्थ तो; २, ला॰ रा॰

दुसऱ्यास

तुमच्याम एकबेळ जाणें हस्तादिकाचे दायीं धरिलें असतां, त्यास सोडवायासाठीं मारणें, चावणें, इ० बहुत यत्न केला असतांही, एकाएकीं सुटत नाहीं, असा जो मनुष्य, गोचीड, इ० तो; ३, चेंगट मनुष्यासही म्हणतात.

चामठा, पु० रा० खेंकड्यासारिखा, परंतु नांवडा एक क्षुद्र प्राणी आहे, जो पर्जन्यकाळीं होत असतो.

चामडी, स्त्री० कातडी.

चामडें, न० कातडें.

चामफोड, पु० चामखीळ.

चामर, न० सं० चंवरी.

चामरडेल, स्त्री० न० कों० बेडकासारिखा एक प्राणी आहे.

चाम्हार, पु० स्त्री० रीण चांभार.

चाम्हारचढाई, स्त्री० कांहींएक कार्य उत्तम प्रतीतीनें सिद्ध झाल्यानंतर, त्याजवर उगेंच कोणी चातुर्य चालवूं लागला असतां, त्या चातुर्यास निंदेनें म्हणतात; २, रा० कपटानें आपणाकडेस नीचपणा घेऊन, गोडबोलून दुसऱ्यास फसविण्याचा जो व्यापार तो.

चाम्हारफट, स्त्री० रा० चाम्हारचढाई द्वितीयार्थी.

चार, ३ लिं० ४; २, पु० सं० दूत; त्यापाशीं चार पैसे आहेत, तो चारदेशा फिरला आहे, तेथें चार लोक मिळाले आहेत, इ० स्थळीं विवक्षेनें नेते अनेक.

चार, स्त्री० हिरवें लहान जें गवत तो; २, पु० एक झाड आहे; ३, अ० हिरव्यारंगाचें अतिशय द्योतक; उ० या पागोट्याचा रंग हिरवाहिरवा चार आहे; ४, पु० भीड मर्यादा सोडून जो नानाप्रकारचा चेष्टा तें, म० अनेकवचनांत; ५, स्त्री० रा० पुरानी खावयाजोगा केवण इ० वृक्षांचा पाला तो; ६, न० चार वृक्षाची जी बी तें; ७, स्त्री० फणसाचे पोटीं जे गऱ्या भोंवते बारीकबारीक अवयव असतात ते.

चारकटा, पु० या० कोवळ्या फणासाची जी भाजी तो.

चारकूट, न० कोडेंकोडें रुजलेलें जें लहान साहान तृण तें, किं० त्याचा तुकडा तें.

चाररवंड, न० फणसाचे फळाचें जें चारीसकट साल तें.

चारचक्षु, न० सं० परराज्यादिकांतील वर्तमान समजण्यास, कारणभूत जें दूतरूप नेत्र तें; २, ३ लिं० तद्विशिष्ट जे राजादि तो.

चारजामा, पु० जास लांकडाचें खोड नाहीं, असा एक रोपिगिरांत भेद आहे; २, पोडयाचे रोपिगिरावर याला बंधाचें, जास झालरी लागल्या असतात असें एक प्रतिष्ठित वस्त्र आहे.

चारण, पु० सं० देवजातींत एक भेद आहे.

चारण, पु० स्त्री० णीण, देशांत राहून वेलावर धान्यादि आणून विकणारी, अशी एक जाति आहे; २, स्त्री० जा स्थळीं बहूत चारा आहे, असें जें स्थळ तो; परंतु याचा प्रयोग पशूंचें प्रेरण करायाचें असतांच होतो, स, ला, वर, यांचे योगीं याल, पाठव, हे धातु लागतात; उ० भाकड गुरें घरीं ठेवूं नका, चारणीस पाठवा.

चारणें, तृण, औषध, इ॰पदार्थांतें पशु, मनुष्य, इ॰कां करून खावविणें.

चारा, पु॰ डोंगर इ॰चा गायीं चरायाजोगा जो तृण समुदाय रुजला असतो तो: २. पशु, पक्षी, यांचें मुख्यत्वेंकरून भक्ष्य जें तृणादिक तो.

चाराचुरा, पु॰कांहींएक पदार्थांचा बारीक सा रीक तुकडयांचा जो समुदाय तो.

चारोळी, स्त्री॰ चार वृक्षाची जी बी ती.

चार्वाक, पु॰ नास्तिकांत एक भेद आहे.

चाल, स्त्री॰ गमनानुकूल जो व्यापार ती; उ॰ मला आज दाहा कोशांची चालपडली; २, अश्वादिकांचे जे तुरकी इ॰ गतिविशेष ती; ३, देश, जाति, इ॰ची जी रीति ती; उ॰ त्या देशीं स्त्रिया कांसोटा घालीत नाहीं, अशी चाल आहे; उ॰ त्याचें बोलणें, चालणें, गाणें, इ॰ची चाल चांगली आहे; ४, श्लोक, गाणें, वाजविणें, इ॰चे ठायीं छंदो विशेष, किं॰ स्वरविशेष, किं॰ वाजविण्याचा गतिविशेष, इ॰कें करून जे नानासंप्रदाय भेद असतात ती; ५, कांहींएक कार्याची जी गुजराण ती; उ॰ मुगट मिळत नाहीं, म्हणून धाबळीवरच चाल करिते; ६, चलन; उ॰ मुंबईत सुर्ती रुपयाची चाल आहे; ७, चलती; उ॰ या दरबारांत त्याची चाल होती तों, कोणाचानेंही त्याचें वांकडें झालें नाहीं.

चालक, २लिं॰ इतरांपेक्षां शीघ्रचालणारा जो अश्व मनुष्यादि तो.

चालकाचोलका, २लिं॰ चालूबोलूं लागला जो मुलगा इ॰तो.

चालचर्या

चालचर्या, स्त्री॰ रीतभात; उ॰ रोजगार लागतांच त्याची चालचर्या फिरली.

चालढकल, स्त्री॰ आळस, द्रव्याभाव, इ॰कारणामुळें जो कांहींएक कार्याचा यथाकथंचित् निर्वाह ती; २, कांहींएक कार्य आजकरूं उद्यांकरूं अशा प्रकारें मागलदीस ढकण्याचा प्रकार ती.

चालणें, गमनानुकूल पादप्रक्षेपादि व्यापार करणें; उ॰ मी आज पंधरा कोश चाललों; २, क्षणलवादिरूपें करून, कालानें अतिक्रांत होत असणें; ३, देशादि संप्रदायाप्रमाणें वर्तणें; उ॰ वैद्य सांगेल तसें चालावें; ४, कोणएक कार्यानें निर्वाहित होणें; उ॰ त्या शेतावर आमचा संसार चालतो; ५, रुपया इ॰ नाण्यानें चलनी प्रमाणें व्यवहारोपयोगी असणें; उ॰ एथें चिंचवडी रुपया चालतो; ६, कांहींएक पदार्थांनीं कोणाएकास यथाकथंचित् कार्योपयोगित्वें करून होणें; उ॰ ओलें, कोरडें, जसें असेल तसें मला चालतें; ७, कांहींएक कार्योपयोगी जें सव्यापार साधन, त्याणें त्या कार्याविषयीं अकुंठितपणें व्यापृत असणें; उ॰ ही लेखणी चांगली चालते; ८, कितीएक व्यापारांनीं विवक्षितकालपर्यंत गतिविशिष्ट असणें, किं॰ होणें; तेतें व्यापार जांवरजांवर होत असतात, त्या त्या व्यापारीं त्या त्या पदार्थांनीं नांदणें; ९, ग्रामादि स्थावर, वृत्ति, इ॰ उपभोगद्वारा कोणाएकाचे वहिवाटींत असणें; उ॰ मजकडे ही वाडी पंनास वर्षें चालली आहे; १०, चलनी सुटें कोणाएकाचा सरल्या त्या व्यापारानें अमलिहतपणें पार पडणें; उ॰ जातें चालेल त्याणें कोणावर

तरी

तरी परोपकार कराया; पाया चालला आहे; भिंती चालल्या आहेत; घरण चाललें आहे; इ॰स्थलीं लक्षणेनें तत्तदुपयोगी व्यापार चालले आहेत; स्म॰ चालला तर गाडा, नाहींतर नाडा; चालत्या गाड्यास खीळ घालूं नये.

चालताकाळ, उ॰ कोणा एकाचा उदयास आला जो भाग्य काळ तो.

चालताबोलता, ३लिं॰ चालका बोलका.

चालतांबोलतां, अ॰वि॰ क्षित अल्पकाळांत; उ॰ इतक्यांत चालतांबोलतां कोणी एथली दीत नेली; २, चालतबोलत असतां; मारणें, जाणें, येणें, इ॰ चें वि॰; उ॰ अहो त्या माता-च्यास चालतां बोलतां मरण आलें.

चालन, न॰ ग्रहादिकांचे अस्तोदयांचें अंतर जाणून, क्षेपक कल्पितात तें, किं॰ इष्टकाळचे ग्रह उठें, किं॰ मागें न्यावयाकरितां जें गणितागत फल येतें तें.

चालीवजा, ३लिं॰ अ॰वि॰ यथाकथंचित् निर्वाह होवयाजोगा जो ग्रहादि पदार्थ तो; उ॰ त्याचें घर रखवरदार नव्हे, चालीवजा आहे.

चालू, ३लिं॰ वि॰ कांहीं एक व्यापार, किं॰ मनुष्यादि पदार्थ, जो चालता झाला तो.

चालूक, ३लिं॰ चालक.

चावट, ३लिं॰ जाचे बोलण्यांत ताळतंत नाहीं, किं॰ एकच बोलणें वारंवार निरर्थक बोलण्याचा स्वभावजाचा तो.

चावटाई, स्त्री॰ चावटपणा.

चावडी, स्त्री॰ शहर इ॰तील चवाठ्यावर, कोंन वाल इ॰ वसून, कारभार कराया साठीं, जी जागा केली असत्ये ती; २, ला॰ चोहोंकडील चार लोक येऊन, जा गृहादिस्थलीं गप्पा मारायास जमतात, असें जें गृहादि ती; किं॰ जा गृहांत गुप्त गोष्ट मकट नहोतां रहात नाहीं, असें जें गृहादि.

चावणें, चर्वण करणें; २. कोणा एकानें, कांहीं एक पदार्थाचा चर्वणाविषयीं, शक्य होणें; उ॰ मला भाकर चावत्ये; ३, सर्पादिकानीं, दंत इ॰नीं क्षत करणें, किं॰ वेदनोत्पादन करणें; उ॰ त्यास कुत्रा चावला; त्यास विंचू चावला; ४, रवाणें, ला॰ र्थी; उ॰ त्याणें त्याकामांत त्यापासून शंभर रुपये चावले; ५, पोटांत जंतु इ॰ विकृतीमुळें, कांहीं विलक्षण वेदना उत्पन्न होणें; ६, न॰ मेदीवर बाहाल, सारिरवें बसायासाठीं, किं॰ तें बाहाल किंचित् उंच करायाकरितां, मेट व बाहाल यांचे पोटीं जो लांकडाचा तुकडा घालित असतात तें.

चावरा, ३लिं॰ मनुष्यादिकांस निरंतर चावण्याचा स्वभावजाचा असा जो अश्वादि तो.

चावळणें, ज्वर, भय, निद्रा, इ॰ कारणामुळें कोणा एकानें विचूक बोलूं लागणें.

चावा, उ॰ मनुष्यादिकांस कोणा एकानें चावण्याचा जो व्यापार, किं॰ त्याणें झालें जें चिन्ह तो.

चावी, स्त्री॰ कुलूप काढायाची जी किल्ली ती.

चाष, चास, उ॰ एक पक्षी आहे.

चासणी, स्त्री॰ क॰ चांचणी.

चाहडरवोर, ३लिं॰ चहाडरवोर.

चाहडबुचका, २लिं॰ चहाडबुचका.

चाहणें, प्रिय असें मानणें; उ॰ मला तो भारी चाहतो; स्व॰ मी त्यास भारी प्रिय वाटतों.

चाहा, पु॰ कोणाएकाचा जो कोणाएकास स्थलीं प्रियपणा तो; उ॰ त्या शहरांत गाण्याचा चाहा भारी आहे; २, औषधी दोनप्रकारचीं झाडें आहेत.

चाहादानी, स्त्री॰ चाहा कढवायाचें एकपात्र आहे.

चाहूर, न॰एकशेंबीस विघे जमनीचा जो समुदाय तें.

चाहूल, चाहूळ, स्त्री॰ आंधार इ॰त मनुष्यादिकांचा भास व्हावयाजोगें जें चिन्ह आढळतें तें.

चाळ, पु॰ धोत्रजोडा इ॰सजी कुरळी असल्ये तो; २, नाचणारे मनुष्य, पायांमध्यें जो घागऱ्यांचा समुदाय बांधितात तो; ३, ला॰ त्या शब्दाचें जें सुरवातें अनु॰ करित असतात तो; ४, स्त्री॰ रुंदी थोडी, आणि लांबी बहुत च, असें जें गृह असतें तें.

चाळक, ३लिं॰ दुसऱ्याचे अंतःकरणास, क्षोभ उत्पन्न होई, असे चाळे करण्याचा स्वभाव जाचा तो.

चाळण, स्त्री॰ धान्य, पिष्ट, मोतीं, इ॰ पदार्थ चाळायाचें, एक सच्छिद्र पात्र आहे; २, न॰ चाळण्याचा जो व्यापार तें; ३, चाळायासाठीं उद्दिष्ट जें धान्यादि तें.

चाळणी, स्त्री॰ चाळण प्रथमाहिनीवाचीं.

चाळणें, धान्य, मोतीं इ॰चे विवक्षित निरनिराळे अंश करायासाठीं, चाळणीनें व्यापार करणें; २, कोलें, पानें, पुस्तकें, इ॰ पदार्थांचीं विवक्षित तत्तत्कार्यार्थ उलटा पालट करणें, किं॰ विवक्षित वस्तु सांपडावें म्हणून तत्तत्संभवस्थल शोधून पाहणें; उ॰ यंदा बैलगाड्यांचीं कोल चाळिलीं नाहीं, म्हणून फार गळतें; उ॰ सगळें घर चाळलें, तरी आंगठी सांपडत नाहीं; उंदीर इ॰नीं, वस्त्र, गृह, इ॰ चाळलें, स्व॰ अनेकभों कें पाडून दुर्दशा केली.

चाळवणें, कोणाएकानें कांहींएक कार्याविषयीं कोणाएकास आज देईन, उद्यां देईन, इ॰ अनेक व्यापारानीं ढकविणें; २, कोणाएकास चीड यावयाजोगी, किं॰ त्याणें हट धरायाजोगीं त्याची खोड काढणें; ३, कांहींएक पदार्थ स्थानापासून चळे असें करणें, किं॰ चाळी असें करणें.

चाळवाचाळव, स्त्री॰ अनेक तऱ्हानीं चाळविण्याचा जो व्यापार तो.

चाळा, पु॰ कांहींएक व्यापार करण्याविषयीं, कोणाएकास निरंतर लागलेला जो छंद तो; प्रायः दुर्व्यसनाविषयीं म॰ उ॰ देवपूजेचा कंटाळा, हातीं सोंगट्यांचा चाळा, चंदनउगाळितांकष्टी, आवडीनें भांग पोंदी; २, दुसऱ्याचे अंतःकरणास क्षोभ होई, अशाजा नानाप्रकारचा चेष्टा तो; ३, धोत्रजोडा इ॰चीजीकुरळी तो; ४, रा॰ एक पिशाच आहे.

चाळाचाळ, चाळाचाळी, स्त्री॰ अनेक तऱ्हानीं, किं॰ अनेक पदार्थ, चाळण्याचा जो व्यापार तो.

चाळिशी, स्त्री॰ एकजातीय चाळीस पदार्थांचा जो समुदाय तो; उ॰ हें लांकूड आणायास माणसांची चाळिशी लागली; २, मनुष्यास चाळीस वर्षें झालीं असतां, जी वयोवस्था प्राप्त होतअसत्ये तो, जीचेयोगानें प्रायः दृष्टीस मांद्य येतअसतें; ३, ३लिं॰ चाळीस पदार्थांनीं परिमित, किं॰ संख्यात, किं॰ चाळिसांनीं उचलून न्याया जो गा

गा जो पदार्थ इ० तो.

चालिसा, ३ लिं० चालिशी तृतीयार्थी.

चाळीस, ३ लिं० ४०

चाळीसपत्र, न० उपनेम.

चालुनपालून, अ० अदलाबदलीचे प्रकारानें, ओट्टी घेणें, जमीन चोपणें, इ० वें वि०.

चाक्षुष, ३ लिं० चक्षुरिंद्रियजन्य जें ज्ञानादि तो.

चिऊं, स्त्री० बालांचे भाषेनें, चिमणी म्हणून पक्षी आहे त्यास म्हणतात.

चिकचिकणें, घर्मादिकानें शरीरादिक चिकट होणें.

चिकचिकीत, ३ लिं० घर्मादिकांमुळें चिकट झाला जो पदार्थ तो.

चिकचीक, स्त्री० दे० पर्जन्यादि पतनामुळें जमीनीवर झालाजो सद्रवपणा तो.

चिकट, ३ लिं० चिका सारिखा, लागला असतां डकाया जोगा जो पदार्थ तो; २, ला० कद्दू लोचट, जो मनुष्य तो.

चिकटणें, चिकटपणाचे योगानें कोणाएका पदार्थास कोणाएका पदार्थानें मिळून राहणें; २, ला० द्रव्यादि लोभार्थ कोणाएकास लोचटपणानें जडणें; उ० संपत्ति आली म्हणजे सोयरीं धायरीं वळेंच येऊन चिकटतात.

चिकटा, उ० उरुपांस नेसायाचे उपयोगी सुगटया सारिखें एक सोंवळ्याचे उपयोगी, रेशमी उणा रव वस्त्र आहे; २, स्वल्पपर्जन्य पडला असतां, भूमिवर जो चिकटपणा होतो तो; ३, शरीरादिकावर जो चिकट मळ बसतो तो; ४, एक तृण आहे; ५, गो महिष्यादिकांचे स्तनांतून जो चिकट दुग्धांश येतो तो; ६, डळणे समयीं जांत्यास जो पिठाचा लेप बसतो तो.

चिकटी, स्त्री० डोकीचे केशांमध्यें जो चिकट मळांश होतो तो.

चिकण, ३ लिं० दुर्भेद्य दुश्छेद्य, जो तृण, काष्ठ, पाषाणादि पदार्थ तो; २, जाचे आंगीं चिकटपणा बहुत, असा जो उडीद, गहूं, इ० पदार्थ तो; ३, जिला लोणी बहुत असतें, अशी जी गाय, किं० म्हैस, वनिची धार, वनिचें दूध, तो; ४, ला० द्रव्य संपन्न म्हणतात; ५, बळकट जो मनुष्य त्यास म्हणतात.

चिकणमाती, स्त्री० जीचे आंगीं चिकटपणा बहुत असतो, अशी जी माती असत्येती.

चिकणवट, ३ लिं० जा जमीनीचे आंगीं, चिकटपणा बहुत असतो, अशी जी जमीन, क्षेत्र, इ० तो.

चिकणसुपारी, स्त्री० झाडावरून कोंवळी सुपारी काढून, शिजवून करितात ती.

चिकणा, उ० एक ओषधी झाड आहे.

चिकणाई, स्त्री० चिकणपणा.

चिकणी, स्त्री० एक झाड आहे.

चिकवडी, स्त्री० तांदुळांचे पिठाचा एका लहेचा वडया, तोंडी लावायासारीं करित असतात ती.

चिकसा, उ० पिठामध्यें हळद, व सुगंधि द्रव्यें, घालून आंगास लावायासारीं करित असतात तो.

चिकाटी, स्त्री० बलाची परीक्षा पाहावयाकरितां बलानें

बलानें कोणाएकाचें मणगट धरण्यासोडण्याचा जोाव्यापारतो; २, ला० भाषणादि व्यापारामध्यें लोकरन सुटावाजोगा कोणाएकाबरबर जो संबंधतो.

चिकाडा, पु० काड्याचें जें झाड तो.

चिकार, अ० निरवकाशपणें, भरण्याचें वि०; उ० हें गलबत माणसानीं चिकार भरलें आहे.

चिकाळ्या, ३लिं० जास चीक विशेष असतो, असा जो आंबा, कणस, इ० तो.

चिकित्सक, ३लिं० सं० वैद्य; २, रत्नादिकांचे परिक्षे विषयीं जो कुशल तो; ३, कोणीएक गोष्ट सत्य मनण्याविषयीं, बहुत चौकशी करण्याचा स्वभाव जाचा तो.

चिकित्सा, स्त्री० सं० औषधादिकें करून. रोगनिरसनाचा जो उपाय तो; २. रोगाची जी परीक्षा तो; ३, पदार्थनिष्ठ गुणदोष मनांत यावयासाठीं, नानाप्रकारचा कल्पनानीं जी त्याची परीक्षा तो.

चिकी, स्त्री० ग० गुळाचा रांधा होत्येवेळेस त्यावरून फेस काढून. तो मळून, करितात तो; २. गुळ, साखर, कढवून, जी चिकट करीत असतात तो; ३, पातळ जो गूळ तो; ४, उडदांचे पिठाची जी रवळ करितात तो.

चिकीर, ३लिं० किचीर.

चिकीर्षा, स्त्री० सं० कांहीएक कृत्य करावयाची जी इच्छा तो.

चिकीर्षित, ३लिं० इच्छा विषयभूत जो पदार्थ तो.

चिकोटा, पु० चिकटा पदार्थ.

चिकोटी, स्त्री० चिकाटी.

चिक्कट, ३लिं० चिकट.

चिक्कण, ३लिं० चिकण.

चिक्कू, ३लिं० कद्दू जो मनुष्य तो.

चिखल, स्त्री० पु० जमीनीवर पाणी सांडल्यामुळें, तत्काल जी फार आर्द्रता होत्ये ती तो; २, पु० मातीं नपाणी पडल्यानें तीमाती उमळून जो गारा होतो तो.

चिखलणें, कों० धान्यादि पेरायाचे भूमीनें. अकस्मात् बहुत पर्जन्य पडल्यामुळें. चिखलानें युक्त होणें; पेरायाचे असंगीचि मा० म०.

चिखलचट, ३लिं० सजातीय इतर स्थलापेक्षां, जा स्थलीं विशेष चिखल पडतो, असें जे क्षेत्र, भूमी, इ० तो.

चिखलचर्णी, न० चिखलानें युक्त जें पाणी तें.

चिखली, स्त्री० पर्जन्यकाळीं पायांस जो कुत्रा हो न असतो ती; याचा म० अनेक वचनांत.

चिंगळी, स्त्री० दे० लघु जातीय जे मत्स्य. चिंबू इ० ती; कि० लहानजें आम्रादिक फळ ती.

चिंगाटी, स्त्री० दे० पोरांचा खेळायाचा जो लहान भोंवरा ती; २, ला० लहानजें मूल; त्यास म्हणतात.

चिघळ, पु० कों० गूळ, साकर, मीठ, इ० पदार्थांस जो द्रव सुटतो तो.

चिघळणें, चिघळानें युक्त होणें.

चिंच, स्त्री० एक झाड आहे. व ती चें फळ ती; पदार्थनिष्ठ आंबटपणाचा अतिशय वर्णाया

च्या असतां हा पदार्थ आंबट चिंच आहे, असें म्हणतात.

चिंचपटी, स्त्री० रा० स्त्रियांचे गळ्यांतील एक अलंकार आहे.

चिंचपानी, ३लिं० चिंचेचे पानाचा कंदीमसाणें रुचीचा, रेचक इ० चा कांहीं आहे जास, असा जो पोसजोडा इ० तो.

चिंचपेटी, स्त्री० चिंचपटी.

चिंचवणी, न० पाण्यांत चिंच कोळून, कढवून काढलेलें इत्यादि अर्थ करित असतात तें.

चिंचळा, पु० रा० कोजळी सुरव्याथीं; २, सतेलपदार्थ पेटविले असतां, त्याचीं फुलें रचालीं गळतात तो.

चिंचुरडी, चिंचोरटी, चिंचोरडी, स्त्री० सांगीसारिखें एक झाड आहे.

चिंचुरडें, चिंचोरटें, चिंचोरडें, न० चिंचुरडीचें जें फळ तें.

चिंचोका, पु० चिंचेचा फळांतील जो बी तो.

चिंचोंडी, चिंचुंडी, स्त्री० उंदिरासारिखा एक प्राणी आहे.

चिंचोर, ३लिं० अचाबचा भाषण करणें, इ० विषयीं, आसक्त असण्याचा स्वभाव जाचा, असा जो केवळ हलका मनुष्य त्यास म्हणतात.

चिंचोळा, ३लिं० हत्तीचे शुंडे सारिखा क्रमानें निमोळता जो पदार्थ तो; उ० याचें तोंड चिंचोळें आहे.

चिटकी, स्त्री० चटकी पथमार्थी; २, एक मडकें आहे.

चिटचिट, अ० लहान आंचळांची जी गाय. किं० मेस, त्यांचें दूध काढ्ये समयीं चें शब्दानुकरण, वाजणें इ० चें वि०.

चिटणिशी, चिटनिशी, स्त्री० चिटनविशी चा अपभंश.

चिटणीस, चिटनीस, पु० स्त्री० शीण, चिटनविसाचा अपभंश.

चिटणें, चिटचिट शब्द होई असें गो महिष्यादिकांचें थेंबथेंब दूध काढणें.

चिटनविशी, स्त्री० चिठी, किं० जाबसालीपत्रें, लिहिण्याचें सरकारी काम ती; २, ला० जाबसालीपत्रें लिहिण्याचा जो व्यापार ती; उ० आम्हीं सकाळपासून चिटनविशी केली, तेव्हां चारपत्रें तयार झालीं.

चिटनवीस, उ० चिटनविशीचें काम जाकडे आहे तो.

चिटपारवरूं, न० पारवरूं इ०; उ० मी त्या वाटनें गेलों, पण मला चिटपारवरूं भेटलें नाहीं.

चिटी, चिठी, स्त्री० लिहिलेला, किं० लिहायाचे मसंगीं कोराजो कागदाचा तुकडा ती; २, ३लिं० चिठाचा जो आंररवा इ० पदार्थ तो.

चिटोरा, चिठोरा, उ० कागदाचा तुकडा तो.

चिटोरें, न० चिटी मथमार्थास निंदेनें म्हणतात.

चिठ्ठी, स्त्री० चिटी मथमार्थी.

चिडरखोर, चिटरखोर, ३लिं० रिझजण्याचा स्वभाव जाचा तो.

चिडचिडया, ३लिं० चिडखोर.

चिडचीड, स्त्री० दे० दाटी.

चिडणें, चिढणें, रिघजणें; २, शरीरास लागलेला जो विषबा इ० त्याणें उतणें.

चिडरा, चिढरा, ३लिं० चिडरखोर.

चिडुवर्णी, चिढवणी, स्त्री० कोणाएकानें चिडाया जोगा जो व्यापार ती.

चिडी, स्त्री० लहान एक पक्षी आहे.

चिडीकामिडी, कों० स्त्री० मनुष्यादि कांची जी कोणाएकास्थलीं अतिशयित दाटी ती.

चिडीमिडी, स्त्री० चिडीकामिडी.

चिणकारा, उ० दे० कांहीं एक पदार्थाचा आला जो तिरस्कार तो.

चिणचिण, अ० चिणचिण शब्द होई असें, राग्रो राळ इ० चे शब्दांचें अनुक०

चिणणें, बीळ, खिडकी, द्वार, इ० त इटा, दगड, माती, इ० घालून रचरचचून पक्केपणी बुजविणें.

चिणाचीण, स्त्री० अनेक विळें इ० चिणण्याचा जो व्यापार ती.

चिंतक, ३लिं० सं० ईश्वर, शुभाशुभ, इ० चें चिंतन करितो तो ; याचे स० अभीष्टचिंतक, शुभचिंतक, इ० जाणावे.

चिंतणी, स्त्री० गुरूपासून प्राप्त झाला जो मंत्रार्थ, त्याचे दृढीकरणार्थ दुसऱ्यापाशीं, कि० आपल्ये ठिकाणीं जो पुनःपुनः अभ्यास ती.

चिंतणें, कांहींएक अंतःकरणांत आलेल्या विषयाचा, यरा कि० बाईट, कसें करावें, काय करावें, इ० रूप विचार करणें; २, कांहींएक पदार्थ, कि० विषय यांची कल्पना, कि० योजना करणें; उ० तूं मनांत आंरव

आंरव चिंत आणि मी सांगतों; उ० मीएक कार्य मनांत चिंतलें आहे, घडेल तेव्हां खरें; ३, भविष्य शुभाशुभ गोष्टीविषयीं इच्छा करणें; उ० तो तुमचें अभीष्ट चिंतन करीत आहे.

चिंतन, न० सं० चिंतण्याचा जो व्यापार तें.

चिंतनिका, स्त्री० सं० चिंतणी.

चितय, स्त्री० अजगरा सारिखें एक जनावर आहे.

चितरणें, भिंत इ० चित्रानीं युक्त करणें.

चितळ, न० रानांतील एकपशु आहे.

चिता, स्त्री० सं० मेल जाल्याचा करितां, काष्ठादिकांची रचून करितात ती; २, उ० एक वन्य पशु आहे.

चिंता, स्त्री० सं० काळजी; २, विचारणा.

चिंताक्रांत, ३लिं० सं० चिंतेनें जो व्याकुल तो.

चिंताग्रस्त, ३लिं० सं० चिंतेनें जास ग्रासिलें तो.

चिताड, चितड, ३लिं० एकांतएक अक्षर लिहिल्यामुळें, किं० खोडाखोड झाल्यामुळें, वाचायास कठीण असें जें अक्षर, किं० तत्संक्ति, किं० तद्विशिष्ट कागद इ० तो.

चिंतातुर, ३लिं० सं० चिंतेनें जो आतुर झाला तो.

चिंतामणी, उ० एक रत्न आहे; २, गणपति.

चितारणें, चितरणें.

चितारी, ३लिं० चित्रें काढण्याचें कसब करून, त्या जवर उपजीविका करितो तो.

चिंतित, ३लिं० सं० चिंतलेला जो मनोरथादि तो.

चिंतितकार्य, न० चिंतलेलें जें कार्य तें; २, शिकेकरूनशुभाशुभ फल पाहतात, त्यांतील एक फल आहे.

चितोडा, उ० अश्वाचा एक रंग आहे; २, ३लिं० न-

दिशिष्ट

द्दिशिष्ट जो घोडा इ० तो.

चित्, न० सं० ज्ञान, कि० ज्ञानरूपी, जो ईश्वर तो.

चित्त, न० सं० अंतःकरण.

चित्तक, १लिं० कों० अल्पवयस्क असून, बारीक मोठ्या विषयाकडेस, चित्त लावण्याचा स्वभाव जाचा तो.

चित्तपावन, पु० कोंकणस्थ जो ब्राह्मण तो.

चित्तवृत्ति, स्त्री० सं० चित्त; २, चित्तामें जें वर्तन तो.

चित्र, न० सं० रेखानीं, किं० मृत्तिकादिकानीं केला जो मनुष्यादिकांचा आकार तें; २, आश्चर्य; ३, नानाप्रकारचा जो रंग तो; ४, १लिं० तद्विशिष्ट जो पदार्थ तो.

चित्रक, पु० एक औषधी झाड आहे.

चित्रकार, १लिं० सं० चितारी.

चित्रगुप्त, पु० सं० माणिमात्रांचें पापपुण्य लिहिणारा एक यमाचा सेवक आहे; २, ला० उत्कृष्ट लिहिणारा जो कारकून, त्यास स्तुतीनें म्हणतात.

चित्रविचित्र, पु० वस्त्रादिकांस दिला जो अनेकप्रकारचा रंग तो; २, १लिं० तद्विशिष्ट जें वस्त्रादिक तो; ३, ला० आश्चर्यकारक जो अनेकप्रकारचा कथा इ० तो.

चित्रा, स्त्री० सं० सत्तावीसनक्षत्रांतील चौदावें जें नक्षत्र तें.

चित्रान्न, न० डाळ, तांदूळ इ० एकत्र शिजवून करितात तें.

चित्रिणी, स्त्री० सं० लक्षणगम्य जो चौसष्ठ प्रकारचा स्त्रियांतील तिसरी स्त्री ती.

चित्रित, १लिं० सं० चित्रामींयुक्त जो पदार्थ तो.

चित्साक्षी

चित्साक्षी, पु० सं० ईश्वर.

चित्स्वरूप, १लिं० सं० ज्ञानरूप जो तो.

चिथडा, पु० क० चिंधी; २, फल, शरीर, यांजवर जे बारीक छिद्रके असतात, ते प्रत्येकीं.

चिथणें, चिडणें मुख्यार्थीं.

चिथावणें, कोणाएकास चीड येई, असा व्यापार करणें.

चिंधाचोळा, पु० कों० घरांतील फाटकीं तुटकीं वस्त्रें, इ० वस्तुमात्रांनी तो.

चिंधादेवी, चिंध्यादेवी, स्त्री० जिला वाटसरू चिंध्या वाहत असतात, अशी मार्गावर एक देवी असल्याची; २, मुलींचे खेळांत काडीस चिंधी गुंडाळून, मश्च पाहण्याचा एक प्रकार आहे ती.

चिंधी, स्त्री० वस्त्राचा, प्रायः लांबट असून, केवल अरुंद जो तुकडा ती; २, दे० ला० रुंदी थोडी असून, लांबी बहुत, असा जो भूमीचा तुकडा ती.

चिंधूट, न० निंदेनें चिंधीसच म्हणतात.

चिंधोटी, स्त्री० चिंधी.

चिनई, चिनाई, १लिं० चीन म्हणून देश आहे, तत्संबंधी जो कागद इ० पदार्थ तो.

चिनी, स्त्री० कोनफळींत एक जाति आहे; २, १लिं० चिनई.

चिनें, न० चिन्ये कोनफळीचे वेलावर जें फळासारिखें येत असतें तें; २, ला० कोनफळासच म्हणतात.

चिन्नादाणी, १लिं० दे० चण-चणीत हशार जो मुलगा तो.

चिन्मय, १लिं० सं० ज्ञानस्वरूप.

चिन्माय

चिन्मात्र, २लिं० सं० चिन्मय.

चिपट, चिपड, न० द्विदल धान्याचे डाळी मध्यें, सत्वच कोठेंकोठें डाळिंची राहत्ये तें, व त्यांतून निवडून काढिलाजो तसा समुदाय तें; २, दे० डाळींमध्यें जो केवळ त्वगंश राहिला असतो, त्यासही म्हणतात.

चिपडणें, डोळे चिपड्यानें युक्त होणें.

चिपडा, पु० उष्णतेनें डोळ्यांचे पापण्यांस मळ येतो तो; २, २लिं० तद्विशिष्ट जो डोळा तो; ३, २लिं० तद्विशिष्ट जो मनुष्यादि तो.

चिपडी, स्त्री० क्षणलघात्मकजो केवळ अल्पकाळ, त्यास म्हणतात.

चिपनळी, स्त्री० जोरानें पाण्याची धार दूरउडविण्याचें नळीचे आकाराचें एकयंत्र आहे.

चिपळी, स्त्री० चिपनळी; २, हातानें वाजवायाचे उपयोगी लांकडांचें एकवाद्य आहे; ३, रस भरित फलादिक दाबल्यानें, त्यापासूनजो रसांश उडतो ती.

चिपाट, चिपाड, न० ऊस इ० चें चुरलेलें जें तांट तें.

चिपारी, स्त्री० एक झाड आहे.

चिपोटा, पु० पिंजलेल्या कापास जो कपा मारितात तो.

चिपोळणा, पु० स्त्री० ळणी, चिपावन.

चिप्प, अ० चप; २, २लिं० कों० अतिभिजलेलें जें वस्त्रादिक तो, परंतु त्या वस्त्रादिकाचे भिजण्याची अपेक्षा असतां, जर भिजलें तरच म०.

चिंब, न० आंतला कणाएंश भरला नाहीं, अशी जी वाल इ० ची शेंग, किं० श्रीखंडादि तें; २, २लिं० चिप्प द्वितीयार्थी.

चिंबचळें, न० रा० आपले शेतचें जें वाईट साईट धान्यनें; स्म० चिंबचळें शेतचें, आणि ठोंठें पांगुळ गोटचें.

चिंबट, चिंमट, २लिं० जा काष्ठादिपदार्थांचा आर्द्रांश कमी होऊन जावर चिरल्या पडल्या तो; २, चिकण मद्यमार्थी; ३, रा० कांबीट.

चिंबडीण, स्त्री० रा० वेल आहे.

चिंबणें, काष्ठादिपदार्थांतील, आर्द्रांश कमी झाल्या मुळें, त्याणें आकुंचिताबयव होणें; २, दे० काष्ठादिकानें भार पडल्यामुळें पिंजणें.

चिंबळणें, कों० कर्णादि शरीरावयव, चिमटींत धरून, आंवळणें.

चिभूड, स्त्री० एक वेल आहे; २, न० तिचें फल तें.

चिमकुला, २लिं० गुचकुला

चिमरवडा, पु० कांबीचे, किं० वेटाचे जोरानें, मारितात जो रवडा तो; २, दे० मार्गा मध्यें आल्ये गेल्ये लोकानीं, एकएक दगड टाकिल्या मुळें. जमला जो ढीग तो; ३, ला० चणचणीत मुलगा इ० तो.

चिमरवोरा, पु० वेदना होई असा. चिमटीनें आंगाची त्वचा ओढण्याचा जो व्यापार तो.

चिमट, स्त्री० अंगुष्ठ आणि तर्जनी, यांचा संयोगानें जी होत्ये ती; २, तत्परिमित जो पदार्थ ती.

चिमटणें, शरीरावयवादिक हातानें चिमटींत धरून आंवळणें.

चिमटा, पु० पदार्थ वर धरणें, उपटणें, इत्याद्यर्थ लोखंडाचा करितात तो; २, चिमरवोरा; ३, ला०

दोन नखा इ० एकमेकांस मिळालेले असतां, चिमट्या-सारिखा जो आकार होतो तो; ४, कोणाएकास, चोहों आंगून अडलें जावें, अशी जी अवस्था मास होत्ये तो; चिमटाकरणें, धरणें, इ० स्थलीं, चिमट्याचा व्यापार.

चिमटी, स्त्री० चिमट; चिमटीनें काढणें, स० विषादि उतराया साठीं मंत्र घालणें; ला० युक्तिप्रयुक्तीनें कोणाएकास वश करणें; चिमटी चालविणें, स० कोणाएकानें मरावें म्हणून, त्याजवर मंत्रप्रयोग करणें.

चिमणचारा, पु० एक गवत आहे, त्याचें बीज, चिमण्या खात असतात.

चिमणडोळ्या, ३लिं० जाचे फार च लहान डोळे. त्यास म्हणतात.

चिमणसाळ, स्त्री० भातांत एक जाती आहे.

चिमणा, पु० एक पक्षी आहे; २, ३लिं० गुबगुला.

चिमणी, स्त्री० चिडी; २, चिनी मातीचें मुखानें वाजवावयाचें मूर्तीचे डोलाचें एक वाद्य आहे; ३, दोनवाटोळे खापऱ्यांस चर्म जडवून मुलांसाठीं जें वाद्य करितअसतात ती.

चिमुरा चिमोरा, पु० चिमरखोरा.

चिमूट चिमोट, स्त्री० चिमटी.

चिमोटा, पु० मं० चिमरखोरा.

चिमोरा, पु० मं० चिमट.

चिमोरी, स्त्री० कों० खेंकडयासारिखा एक माणी आहे.

चिरकणें, चरकणें मथमार्थी; २, आमांशाद्युपद्रवानें ईषन्भाव, मूल इ० कानें हगणें; ३, व्यादि भादिकांस भ्याल्यामुळें, हग्नीनें चिर असा शब्द करणें.

चिरकांडी, स्त्री० शरीरावयव, फल, इ० तून, दाबणें, इ० कारणामुळें जोरानें रुधिर रसाद्यंशाची धारा उडत्ये ती.

चिरकाम, न० कर्बतानें लांकूड चिरण्याचा जो व्यापार तें.

चिरकाल, चिरकाळ, अ० बहुतकाळ.

चिरकाळी, ३लिं० जांचा उत्पत्तीस बहुत काळ होऊन गेला, अशीं जीं देवालयें, ग्राम, वृक्ष, इ० तो.

चिरकीसयेणें, कांहींएक व्यापारीं अतिशयित श्रम झाल्यामुळें, थकलें जाणें.

चिररवांब, पु० मोठें लांकूड चिरून, केला जो त्याचा खांब तो.

चिरंगट, स्त्री० रा० कांहींएक पदार्थाची कोणाएकास्थलीं अतिशयित जी दादी ती.

चिरंगटणें, उ० कांहींएक पदार्थ, दोन पदार्थांचे कचींत सांपडवून, चुरला जाई असें करणें.

चिरगुटपांघरूण, न० वस्त्रमात्रावरण इ० तें.

चिरगूट, न० वस्त्र.

चिरचिर, अ० निर्जीववस्त्रादि फाडत्ये वेळेस जो शब्द होतो, त्याचें अनुक० फाडणें इ० चें वि०.

चिरचिरीत, ३लिं० चिरचिर फाडाया जोगें जें वस्त्रादि तो.

चिरचिऱ्या, ३लिं० अस्वनिमित्तभावरूप, जास चिड येत्ये, असा स्वभाव ज्याचा तो.

चिरंजीव, पु० उंब, वुंबा सारिखा जो कोणी सा

सही

सही कागदोपत्रीं हें वि॰ देतात; २, ३ लिं॰ अस्पक-ल्पपर्यंत बांधणारे, जे अश्वत्थामा इ॰ सात, ते मत्ये कीं॰

चिरंजीवी, स्त्री॰ कन्येसलग्नतात, मा॰ कागदोपत्रीं व्यवहार; २. ३ लिं॰ चिरंजीव द्वितीयार्थी॰

चिरजीवी, ३ लिं॰ सं॰ चिरंजीव द्वितीयार्थी॰

चिरटा, पु॰ केळीचे पानाचा जो तुकडा तो॰

चिरटी, चिरोटी, स्त्री॰ लहान जो चिरटा ती; २, चिर्धी॰

चिरटोळी, स्त्री॰ मूल, स्तनपान करूं लागलें नाहीं तों पर्यंत, त्यास दूध पाजाया साठीं, जो दुधांत भिजवलेला कापसाचा बोळा करितात ती॰

चिरड, स्त्री॰ उणेंउत्तर, मर्मश्रवण, इ॰ कारणामुळें, अंतःकरणास क्षोभरूप जो धर्म उत्पन्न होतो ती॰

चिरडखोर, चिरडीखोर, ३ लिं॰ चिडखोर॰

चिरडणें, उ॰ चिरंगटणें॰

चिरडी, स्त्री॰ लहान मुलींचें नेसायाचें लुगडयासारिखें वस्त्र आहे; चिरडी नेसणें, रूप॰ चिरडी सवेणें, संकेतानेंच म॰

चिरण, स्त्री॰ मा॰ भोजनोपयोगी केळीचे पानाचा चिरलेला जो अर्ध भाग ती॰

चिरणा, पु॰ रा॰ चिरटा॰

चिरणी, स्त्री॰ दे॰ लहान जो चिरटा तो; २, देवालयाचे भिंतींत अर्धभाग चिऱ्यांचा सांपडवून, बसणें इत्यादि अर्थ त्याचिऱ्यांचा सभोवता अर्धभाग काढेर राखितात ती॰

चिरणें, उ॰ काष्ठादि पदार्थ शस्त्रादिकानें दुभाग करणें॰

चिरफळी

चिरफळी, चिरफाळी, चिरफोळी, स्त्री॰ चिरून काढिला जो वस्त्र, काष्ठ, इ॰ चा लांबट तुकडा ती; २, चिर्धा द्वितीयार्थी॰

चिरबोटी, स्त्री॰ एक झाड आहे॰

चिरबोटें, न॰ चिरबोटीचें फल तें॰

चिरमी, स्त्री॰ काष्ठ, शरीर, फल, इ॰ तील रसाद्यंश कमी झाल्यामुळें, वरील लगंश आकुंचित होऊन, वळी सारिखा जो आकार होतो ती; २, ला॰ वस्त्रादिकांची जी सुरकुती ती सही रूप॰

चिरमुटणें, फलादि पदार्थानें चिरम्यानीं सुकत होणें॰

चिरस्थायी, ३ लिं॰ सं॰ कोणाएकास्थलीं बहुतदिवस राहणारा जो मनुष्यादि पदार्थ तो॰

चिरा, पु॰ घडून मा॰ चतुरस्र केला जो दगड तो; २, जास उभ्या जरीचा काडया असतात असें अरुंद पागोटें असतें तो॰

चिराईत, न॰ किराईत॰

चिराउतरणें, नव्हाणपदास आली अशी जी अनुपभुक्त वेश्यादि स्त्री, तीचा कोणाएकानें मथम संभोग करणें॰

चिराग, چراغ हिं॰ पु॰ दिवा॰

चिरागदान, چراغدان हिं॰ न॰ बहुतदिवे लावाया करितां स्तंभादि पुरून आडवीं लांकडें बांधून जी जागा काढितात तें; २, शोभार्थ ओळीनें लाविला जो पण त्यांचे दिपांचा समुदाय तें॰

चिरांबा, पु॰ चिरलेला जो लोणचाचा आंबा तो॰

चिरी, स्त्री॰ कुंकुमाची कपाळीं लाविलात जी रेषा ती; २, द्रोणाचे उपयोगी जो केळीचे पानाचा चिरवा ती॰

चिरींव

चिरीव, ३लिं॰ काष्ठादि चिरून केलाजो पदार्थ तो॰

चिरू, स्त्री॰ रा॰ वस्त्रावरील जी ऊ ती॰

चिरेरवण, चिरेरवाण, स्त्री॰ रा॰ चिरे व्हाया आगे दगड जांनून उत्पन्न होतात, अशी जी रवाण ती॰

चिरेबंदी, स्त्री॰ चिऱ्यानीं केली जी बंदिस्त ती; उ॰ या वाड्याचे चौकास चिरेबंदी आहे; २, ३लिं॰ चिऱ्यानीं बांधून केलाजो पाया, घर, इ॰ तो॰

चिरेबंदीपाया, पु॰ ला॰ कांहीं एक कार्याचा पक्के पणी केलाजो आरंभ तो, घाल, धा॰म॰

चिरोटा, चिरोंटा, चिऱ्होंटा, पु॰ एक पक्षी आहे॰

चिऱ्होंट, चिऱ्होंटी, स्त्री॰ एक वेल आहे॰

चिऱ्होंटें, चिऱ्होंट, न॰ चिऱ्होंटीचें जें फल तें॰

चिलरवत, न॰ शरीरावर गोळी, वार, इ॰ न लागूं द्या वास्तव, लोखंडाचें आंगरख्यासारिखें करून आंगांत घालितात तें॰

चिलरवी, ३लिं॰ पणकोरें मूर्तिमंत जें रुपया इ॰ नाणें तो; देणें घेणें, इ॰ मसंगी म॰

चिलघोळ, स्त्री॰ दे॰ बारीक पानाची जी पोळ ती॰

चिलट, न॰ एक क्षुद्र माणी आहे॰

चिलम, चिलीम, स्त्री॰ न॰ तंबाखू इ॰ पदार्थ आंत घालून, वर अग्नि देवून, गुडगुडीचे मेरू वर ठेवीत असतात, असें मृत्तिका इ॰चें पात्र आहे ती तें॰

चिलमी, ३लिं॰ चंगी भंगी लोकांनीं उडविलेली जी बातमी, वर्तमान, इ॰ तो; २, स्त्री॰ रा॰ चिलीम; ३, ३लिं॰ दे॰ भांग इ॰चें चिलीम निरंतर ओढि॰ तो त्याम त्म॰

चिलवाण, चिलवाणा, ३लिं॰ आकारलपुरवासुळें जो भव्य दिसत नाहीं तो॰

चिलींपिलीं, न॰ सुईं लेंकरें; २, मकरसंक्रांतीचे दिवशीं स्त्रिया एका मोठ्या मडक्यांत अनेक वारीक मडकीं घालून ब्राह्मणास दान देत असतात तीं; याचा म॰ अनेक वचनांत॰

चिवचीव, स्त्री॰ दे॰ अनेक चिमण्यांचा जो कोलाहल ती; २, ला॰ दुसऱ्यास त्रास यावयाजोगी अनेक कृतजी गडबड ती॰

चिवचिवणें, एक काली अनेक कार्यें मांस झालीं असतां, त्रास पावून क्रोधानें चरफडूं लागणें; २, पक्षी इ॰कानीं चिवचीव मथमार्थानें युक्त होणें; ३, आंबट पदार्थानें बहुत दिवस राहिल्यासुळें, सडा अब्द होणें॰

चिंवट, ३लिं॰ रा॰ चिकण जो काष्ठादि पदार्थ तो

चिवटा, पु॰ गलबताचे शिडाचे उपयोगी जाड वस्त्र आहे॰

चिवडणें, भात, पोळी, फल, इ॰ पदार्थांची दुर्दशा होई असें विदीर्ण करणें, कि॰ कालवणें॰

चिवडा, पु॰ कांहीं एक पदार्थ अनेक वार चिवडल्यासुळें झाली जी त्याची दुर्दशा तो; २, ला॰ कांहीं एक गोष्टीचा जो विध्वंस तो; ३, पोहे, चुरमुरे, हरभऱ्यांचें दाळें, इ॰ अनेक पदार्थ मिसळून, तळून करितात तो॰

चिवर, न॰ रा॰ फणसाचें चारखंड तें॰

चिवळणें, फलादिक हस्तानें चोळून मऊ करणें॰

चिया, उ० वेकूंतील एक भेद आहे.

चिवार, स्त्री० रा० चिव्यांतील एक भेद आहे

चिव्हाळ, उ० क्षारपदार्थ, जमीन, इ० स जोदव सुटतो तो.

चिन्ह, न० सं० कांहीं एक गोष्टीचें, किं० गुणादिकाचें साहचर्य, सामानाधिकरण्य इ० नियमासुळें ज्ञापक जें कांहीं एक तें; उ० दक्षिणवायु सुटला हें पर्जन्याचें चिन्ह दिसतें; उ० या स्वारींत छत्र चामरादि राजाचीं चिन्हें दिसत नाहींत. तस्मात् एथें राजा नमेल; २, कांहीं एक पदार्थ विवक्षित प्रकारें ओळखवला जावा म्हणून त्याजवर जें अंकनादि करितात तें; ३, ला० लोकसंप्रदाय विरुद्ध विलक्षण जो मनुष्यादि तें. किं० त्या मनुष्यादिकांचा तशा लोकविलक्षण जा चेष्टातें.

चिन्हित, ३लिं० सं० जाजवर चिन्ह केलें आहे तो.

चिळण, स्त्री० कातळ इ० दगडांस जी मध्यें फट पडली असत्ये ती.

चिळहाट, उ० चिहाळ.

चींचीं, अ० कांहीं एक व्यापारीं पराभूत असें मा० म० धा० म०; उ० मी त्याकडून चींचीं म्हणविलें.

चीक, उ० रुई आदिकरून झाडांचा जो चिक्कट सूस तो; २, गर्भिणी. किं० नवप्रसूत जी पशुजातीय, किं० मनुष्यजातीय स्त्री. तीचे स्तनांतील जें चिक्कट दूध तो.

चीज, स्त्री० वस्तु; २, ला० चमत्कारिक जी गायनादि विद्या ती; उ० गायना सारिखी दुसरी चीज नाहीं.

चीजवस्त, स्त्री० वस्त्रपात्रादि सर्व वस्तु माग ती.

चीट, न० छापून चिमटविलेली अशी एक वस्त्र जाति आहे.

चीड, स्त्री० चिरड.

चीण, स्त्री० गृहादिकांतील भूमीस ओलें न यावें म्हणून निचे पाटी पट्टी चिणून जो दगडांचा थर बसविताति ती.

चीत, ३लिं० कुस्तींत पराभूत होऊन, उताणा पडला तो; २, कोडयांचे खेळांत उताणी पडलीजी कोडी ती; ३, चिताड.

चीप, स्त्री० पातळ जो दगड ती; २, ३लिं० चिप्प हि० याची.

चीब, ३लिं० चिप्प हि० याची.

चीर, स्त्री० तडा गेल्यामुळें, किं० सांधा न बसल्यामुळें, बारीक रेषेसारिखी फट राहत्ये ती; २, न० सं० वस्त्र.

चील, उ० एक पालेभाजी आहे; २, रा० चिळण.

चुइटी, स्त्री० पत्रावळी करायाचे उपयोगी, बरूड चिरून, जा बारीक काडया करितात त्या मत्येकी.

चुई, स्त्री० चुईटी.

चुकचुकणें, पालीनें चुकचुक असा शब्द करणें.

चुकणें, जी गोष्ट जा मकाराने जा काळी जा देशीं अशी व्हावी, असा जो अजमास त्यास तत्कालीं अंतर पडणें; उ० या रसायनाची छति चुकली; उ० तुमी वळेस चुकलां; उ० गोळी चुकली; २, कांहीं एक मास झालेलें रबटलें. कलह, इ० त्याची निवृत्ति होणें; उ० त्या दोघांचा कलह चुकला; ३, ऊनंत सर्व धातुंवरून त्यात्या व्यापाराचे समाप्त्यर्थाचा बोधक, उदें याचा योग होतो; उ० तो घरबांधून चुकला, तो तें वस्तु देवून देऊन चुकला,

इ०.

चुकतमाकत, चुकतवांकत, अ० चुकतचुकत अशा प्रकारानें: स्त्र० बोल. इ० वि०; उ० त्याला श्लोक पाठ येत नाहीं, चुकतमाकत म्हणेल.

चुकवा चुकव, चुकवा चुकवी, स्त्री० कांहीं एक कार्य, आपल्यास करावें लागेल म्हणून, कुचरपणें त्या विषयीं अनेकवार चुकविण्याचा व्यापार ती; २, अनेकांचे देण्याची जी वारावार ती.

चुकविणें, चुके असें करणें; २, कांहीं एक कार्याविषयीं चुकवा चुकव करणें; ३, देणें, घेणें, इ० व्यापाराची वारावर करणें.

चुका, पु० एक पालेभाजी आहे.

चुकाऊ, ३ लिं० कांहीं एक कार्याविषयीं कुचरपणानें चुकविण्याचा स्वभाव जाचा तो.

चुकाचाकवत, पु० एक भाजीचें झाड आहे.

चुकामूक, स्त्री० विवक्षित व्यापृत अनेक पदार्थांची कोणाएका कालीं, कि० देशीं गांठ पडावी असा अजमास असतां, काल देशांतर मूलक जो तीचा अभाव ती.

चुकार, ३ लिं० ग्रामादिकांचा द्वारीं चुकून आलेलें जें गुरूं, इ० तो; २, चुकाऊ.

चुकारतडू, ३ लिं० चुकाऊ. निंदा असतां म०.

चुकारू, चुकारी, ३ लिं० चुकार.

चुकावणें, चुकविणें.

चुकावू, ३ लिं० चुकाऊ.

चुकी, स्त्री० जो व्यापार आमकारानें करावा त्या व्यापारास कर्तृदोषामुळें जें अंतर पडतें तो.

चुकूर, ३ लिं० परिचित मनुष्यादिकांस, अपरिचित मनुष्यादि समुदायीं, कि० स्थलीं, जी चकितावस्था प्राप्त होत्ये. तदवस्थापन्न झाला जो मनुष्यादि तो.

चुगलखोर, चुगलीखोर, ३ लिं० चहाडखोर.

चुगली, स्त्री० चहाडी.

चुंगी, स्त्री० दे० मा० मनुष्यांची जी टोळी ती.

चुचकारणें, कुद्ध होऊन अनायर झाला जो अश्वादि पशु त्यास स्थिर करावया करितां, मुखानें विलक्षण शब्द करणें, कि० तशी व्यापारानें युक्तीनें त्यास जवळ बोलावून, गोंजारणें.

चुंचावणें, चूं असा शब्द करणें, निषेध असतां म०; उ० एवढे बसले होते पण कोणीही चुंचावले नाहीं.

चुट-,-कन,-कर,-दिशी, अ० चटकन.

चुटका, पु० कवित्वादिकांतील, कि० भाषणादिकांतील चमत्कारिक जो अल्पांश तो; २, चटपट मथमार्थी; ३, दुसऱ्यास चटपट लागावा जोगा, कि० त्याणें मनांत रोंचावा जोगा, कि० गुप्तरूपें स्वाभिमतांश प्रदर्शक इ० रूप जो भाषणांश तो.

चुटकी, स्त्री० चिटकी; २, चिमूट.

चुटपुटता, चुटपुरता, ३ लिं० कांहीं एक कार्यास पुरतेपणी पुरावा जोगा न झाला जो वस्त्रादि पदार्थ तो.

चुटपुटहाणें, अन्नादि पदार्थानें चुटपुरतें होणें.

चुटपूट, स्त्री० चटपट मथमार्थी.

चुटियाचुर्मा, पु० एक पक्वान्न आहे.

चुट्टा, पु० तंबाखू इ० पानांत घालून, ओढावयासाठीं विडी करीत असतात तो.

चुडा, पु० स्त्रियांचें करभूषण आहे; २, ला० स्त्रियांचें सौभाग्य; उ० तुझे चुडे जन्मवर अक्षय्य असोत.

चुडी, स्त्री० दे० सणकाडया, किं० माडाचे झांपाचे शिंगे इ०ची लांब जुडी बांधून प्रकाशार्थ करितात ती.

चुडीपुनव, स्त्री० माघी पौर्णिमा.

चुडेदान, न० भर्त्याचा जीवनसंदेह असतां, त्यास बांधवून जें त्याचे स्त्रीस सौभाग्यदानतें, कर, भाग, दे, इ० धा० म०.

चुडेरहाट, पु० कनेकडास चौवीस रवे मारून जो रहाट करितात तो.

चुण,-कन,-कर,-दिशीं, अ० बंदूक इ०काचे सकेंग गोळीचे शब्दाचें अनुक० वाज, इ०चें वि०.

चुणचुणणें, चणचणणें मथमचतुर्थार्थी.

चुणचुणीत, २ लिं० चटपटया जो मनुष्य तो.

चुणचूण, स्त्री० क्षतादिकास क्षारादिपदार्थ लागल्यानें जी व्यथा होत्ये ती; २, ला० चटपट मथमार्थी.

चुणणें, वस्त्र चुण्यानीं युक्त करणें; २, विडयाचीं पानें एकाशीं एक सारिखीं लावणें.

चुणी, स्त्री० वस्त्राचा मधला तंतू धरून, वस्त्र मागें लोटिलें असतां, त्यास जमे अवच्छेद पडतात ती; तश्हेचा जो वस्त्रास अवच्छेद करितात ती; २, लहान जी माणकी ती.

चुणूक, स्त्री० कांहीं एक पदार्थाचे. किं० गोष्टीचे जो अवयवावरून सकल अवयवीचें स्वरूप ध्यानांत न येतें असें जें त्या अवयवाचें प्राकट्य ती.

चुतयावळ्या, चुतिया, चुत्या, चुत्यानंदन, ३ लिं० व्यवहार ज्ञानशून्य मनुष्यास ह्या शिव्या आहेत.

चुथडा, पु० खोडाखोडी मुळें झालेली जी वस्त्रकादिकांची दुर्दशा तो.

चुथणें, एक मस्थित जे अनेक पदार्थ त्यांतील एक पदार्थ सांपडावयासाठीं, तत्संभव स्थलाची दुर्दशा व्हावयाजोगें तें सर्व शोधून पाहाणें.

चुथाचूथ, स्त्री० हें चूथतें चूथ असा जो व्यापार ती; २, खोडाखोडी मुळें झालेली जी दुर्दशा ती.

चुनकळी, स्त्री० जाचा चुना होतो असा एक फुस फुशीत खडा आहे ती.

चुनखडा, पु० चुन्याचे उपयोगी एक दगड आहे.

चुनखडी, स्त्री० चुनखडया सारिखे पांढरे जे भूमींत खडे असतात ती.

चुनडी, स्त्री० स्त्रियांचे उपयोगी बारीक छिपक्यानीं युक्त असें एक वस्त्र आहे.

चुनपटी, चुनपट्टी, स्त्री० विडयाचे पानास चुना लावावयासाठीं एक पानाचे तुकडयावर थोडासा चुना घालून करितात ती.

चुनवणी, न० चुन्यानें युक्त जें पाणी तें.

चुना, पु० शिंप्या, कालवें, चुनखडा, इ० भाजून जें त्याचें भस्म करितात तो.

चुनाकरणें, कांहींएक पदार्थाचा मारून खाऊन सत्यानास करणें.

चुनाळ, पु० खावयाचा चुना ठेवावयाचें एक धातुमय पात्र आहे.

चुप्प, अ० चप.

चुंकणें, मुखाचे जोरानें फलादिकांचा रसाचें आकर्षण करणें.

चुंका, उ० मुखानें फलादिकांचा एकवेळ रस आकर्षण करण्याचा जो व्यापार तो.

चुंबक, पु० कदू; २, लोहचुंबक.

चुबका, उ० एकत्र गुंफलेल्या रोपइ०चा समुदाय तो.

चुबकणी, स्त्री० चुबचुब शब्द होई अशाकेवल हस्तव्यापारानें वस्त्र धुण्याचा एक प्रकार आहे तो.

चुबकणें, चुबकणीचा प्रकारानें वस्त्र धुणें.

चुबकतीउडी, स्त्री० तरतरीत उभ्यानें जलांत उडी टाकण्याचा प्रकार आहे.

चुंबन, न० प्रीतीनें मुखादि शरीरावयव चुंकण्याचा जो व्यापार तें.

चुंबळ, चुंभळ, स्त्री० ओझें मस्तकास खुपेल म्हणून, वस्त्राचा गुंडाळा करून, मस्तकावर ओझारवाली घालितात ती.

चुरचुरणें, कांहीएक गोष्टीविषयीं लागली जी चटपट, तीणेंयुक्त होणें; २, भाजल्यामुळें, कि० क्षनादिकास तीक्ष्ण क्षार पदार्थाचा संयोग झाल्यामुळें, त्या तीक्ष्णादि पदार्थांनीं व्यथाविशेष उत्पन्न करणें, कि० क्षनादिकांनीं तद्विशिष्ट होणें; २, फोडणी, कि० फोडणीस टाकलेल्या भाजी इ० पदार्थानें चुरचुर शब्द विशिष्ट होणें.

चुरचुरीत, वि० भाजणें, वाळणें, इ० कारणामुळें द्रवांश नि:शेष जाऊन चुरचुर असा शब्द व्हावा जोगा झाला जो पदार्थ तो.

चुरचूर, स्त्री० चटपट पथमार्थी; २, शरीरावयव भाजल्यानें

भाजल्यानें, कि० क्षनादिकांस क्षारादि संयोग झाल्यानें जी वेदना होत्ये ती.

चुरचोंडा, वि० कि० चरचोंडा.

चुरडणें, उ० हस्तादिव्यापारानें पदार्थाचा चुग होई असें करणें.

चुरणें, उ० चुरडणें; २, हस्तादि व्यापारानें पदार्थ शिथिलावयव होई असें करणें; उ० अमळसे पाय चूर, म्हणजे हलके होतील.

चुरमा, पु० एक पक्वान्न आहे.

चुरमुरणें, चुरमुरीनें युक्त होणें.

चुरमुरा, पु० भात उष्ण पाण्यांत भिजवून त्याचे नांदूड करून खापरांत भाजून करितात, कि० पोहे ओलवून भाजून करितात तो; चुरमुरे खाणें, चुरमुऱ्यांचे लाडू खाणें, स० जेवायास न मिळाल्यामुळें, उगेंच चुरमुरत राहणें.

चुरमूर, स्त्री० कांहींएक गोष्टीविषयीं लागली जी चटपट ती.

चुरस, स्त्री० कांहींएक विषयावरून ईर्षा उत्पन्न होऊन, याणें त्यास पाडांव करावें, त्याणें याला पाडांव करावें, एतद्विषयी होतो जो परस्परांचा येमनस्य भाव ती; २, ३लिं० दे० अपमानादि झाल्यामुळें खिन्न झाला तो.

चुरा, उ० ठेंचणें, मोडणें, फुटणें, इ० कारणामुळें पदार्थाचे झालेले जे खंडशः तुकडे तो; २, अतिश्रमादिकारणानें, शरीरांचें झालें जें अवयव शैथिल्य तो.

चुराडा, उ० चुरा.

चुरी, स्त्री० हरभरे इ० द्विदल धान्याचे डाळीचा

जो

जो चुरगंडी.

चुलत, २लिं० चुलत्याचे संबंधानें जो बंधु इ० तो; उ० तो त्याचा चुलत बंधु ती त्याची चुलत बहीण इ०.

चुलता, पु० बापाचा जो भाऊ तो.

चुलती, स्त्री० चुलत्याची जी स्त्री ती.

चुलदान, न० गलबतावर अग्नि पेटवावयाचें जें पात्र असतें तें.

चुला, पु० अवेलाषांचून जी मोठी चूल करितात ती.

चुलाणें, न० लहान जो चुला तें.

चुवा, पु० एक सुगंधि पदार्थ आहे.

चुळका, पु० जलादि पदार्थ हातांत राहावा म्हणून द्रोणाकार हाताचा आकार करितात तो; २, तत्परिमित जो उदकादि पदार्थ तो.

चुळबुळणें, उ० घृतादि स्निग्ध पदार्थांनें शरीरावयवादि बुचबुचीत व्हावया जोगें लिप्त होणें; २, ला० चळवळणें.

चुळबुळावणें, कांहीं एक पदार्थ चुळबुळीत करणें.

चुळबुळीत, २लिं० घृतादिपदार्थ सर्वावयवीं लागल्यामुळें, बुळबळीत झाला तो.

चूं, अ० चकारशब्द, कर, धा० म०.

चूक, स्त्री० चुकी; २, बारीक जो रिवळा ती.

चूड, स्त्री० चुडी; २, कांडारीस म्ह० चूड लावणें, फिरविणें, इ० स्थलीं मजेची दुर्दशा व्हावयाजोगा लुटणें, जाळणें, पोळणें, इ० व्यापार करणें.

चूडा, स्त्री० सं० शिरवा.

चूडाकर्म, न० सं० मुलांस यथेमतः शेंडी राखण्याचा एकविधि आहे.

चूडामणी, पु० सं० एक शिरो भुषण आहे.

चूण, स्त्री० चुणी; २, हरभरा इ० द्विदल धान्याचे सालांचा जो समुदाय ती.

चूर, पु० चुरा; २, २लिं० अ० वि० जा व्यापारांत जो निमग्न त्या व्यापाराविषयीं तो.

चूर्ण, न० औषधादिकांचा केवळ बारीक चुरा तें; २, सं० चुना.

चूर्णिका, स्त्री० सं० शब्दालंकार, अर्थालंकार, इ० जींत आहेत अशी जी काव्यादिकांतील गद्यात्मक कविता ती.

चूल, स्त्री० स्वयंपाक कराया करितां रचलीं अग्नि पेटवून, वरपात्र ठेवायाजोगी मृत्तिकादिकांची रचून करितात ती; चुलीस अक्षत लागणें, म्ह० गृहांतील मनुष्यांस परान्नादि असल्यामुळें, चुलीनें न पेटतां राहणें; म्ह० बायकांचें शहाणपण चुलीपाशीं; घरोघर मातीच्याच चुली: चुलीपाशीं हगावें आणि जन्मांतरास रडावें.

चूळ, पु० स्त्री० रा० बाहेर टाकाया साठीं एकवार तोंडांत घेतलें जें पाणी तो.

चेंकळणें, चेकळणें, कांहीं एक व्यापारीं लोकर स्थिर न व्हावयाजोगें आवेश पूर्वक प्रवृत्त होणें.

चेंगट, चेंगटी, २लिं० कांहीं एक कार्य करण्याविषयीं इतरांपेक्षां जास अधिक वेळ लागतो तो.

चेंगटाई, स्त्री० चेंगटपणा.

चेंगट्या, २लिं० चेंगट.

चेंगरणें, उ० चिरंगटणें.

चेंचकट, २लिं० अनेक जाप, सुलारव, इ० पडल्यासुळें, आवरील मोहोर छिन्नभिन्न झाली, असेंजें रुपवा इ० नाणें तो; २, वृक्षादिकावरून पडल्यानें ठेंचलें गेलेंजें फल त्यास ही स्त्र० .

चेंचका, २लिं० चेंचकट.

चेंचट, चेंचड, २लिं० चेंचकट; २, रवचरटजो अरण्यादि संबंधी मार्गादितो.

चेंचणें, उ० आघातादिकें करून छिन्नभिन्नावयव, किं० शिथिलावयव, किं० चापट होई असें करणें.

चेंचा, उ० कोथिंबीर, मिरचा, इ० पदार्थ एकत्र कुटून करितात तो.

चेटक, चेटूक, न० कोणाएकाचा घात करावयाचे, किं० कोणाएकास उकथावयाचे उपयोगी एक मंत्रविद्या आहे; २, ला० कारस्थान

चेटकी, २लिं० चेटकरूप विद्या जाणतो तो; २, ला० कारस्थानी.

चेडु, स्त्री० कों० कन्यारूपजें अपत्य ती.

चेडा, उ० एक पिशाच्च आहे.

चेंडू, उ० खेळावयाकरितां वस्त्रादि गुंडाळून वाटोळा गोळा करितात तो.

चेंडूफळी, स्त्री० चेंडूनें जो खेळखेळतात ती.

चेत, २लिं० आघात, दुखणें, इ० कारणानीं मूर्छित होऊन मृतवत् पडला तो.

चेतणें, अग्नि, काम, क्रोध, इ० नीं प्रदीप्त होणें.

चेतन, २लिं० सं० चलनवलनादि व्यापार विशिष्ट जो सजीव मनुष्यादि तो.

चेतना, स्त्री० सं० ज्ञानशक्ति; २, भोक्तृशक्ति.

चेतनाचेतन, २लिं० सजीव निर्जीव तो.

चेतवणें, चेतावणें, अग्नीनें न आटपावा जोगें प्रदीप्त होऊन पसरलें जाणें; २, ला० मुलानें लोकर न आटपावा जोगें अतिशयित रडूं लागणें.

चेंदणें, उ० ओला जो पदार्थ तो भार, आघात इ० कें करून चेंगरला जाई असें करणें; २, गाद्यादिकांत कांहीं एक पदार्थ चिणचिणून भरणें, उ० मडक्यांत साकर चेंदून भर त्मणजे सगळी माईल.

चेंदा, उ० फलादि चेंदल्या सुळें त्याचा झाला जो अवयवविशकल्परूप परिणाम तो.

चेंदामेंदा, चेंदू, चेंदूमेंदू, उ० चेंदा.

चेप, उ० कों० कोणाएका स्थलीं मनुष्यादिकांची अतिशयित जी दाटी तो; उ० त्या गलबतावर माणसांचा भारी चेप झाला आहे; २, दुखणें इ० ची जी कोणाएका स्थलीं अतिशयीत व्याप्ति तो; उ० गावांत देवींचा चेप झाला आहे; ३, रा० कुपण इ० चे उपयोगी शिऱ्यांचा पट्टा चेपून बांधितात जो भारा तो.

चेपकडें, न० रा० चेप पट्टा बांधला जावा त्मणून, कांबी बांधून करितअसतात तें.

चेपट, २लिं० चापट.

चेपण, न० कांहीं एक पदार्थ चेपला जावा त्मणून त्याजवर जो सजउ पदार्थ ठेवितात तें.

चेपणें, उ० चापणें; भीड चेपणें, त्म० सहवासादि कारणानें भावणादि व्यापार प्रतिबंधक जो लज्जारूप धर्म तो प्रतिबंधक न होई असें करणें; धीर चेपणें, त्म० कांहीं एक कार्याविषयीं धीर पुरणें; मूठ चेपणें, त्म० एरवा घास स्वकार्यार्थ

लांब देणें.

चेपाचेप, स्त्री० अनेक पदार्थांस अनेक तऱ्हानीं चेपण्याचा जो व्यापार तो; २, ला० दुष्कर्मादिकांची अनेकपुऱ्हीनें आंतले आंत जी दाबादाब ती.

चेपावलें, न० स्त्रियांचे उपयोगी एक प्रकारचा वहाणा आहेत त्या प्रत्येकीं.

चेंबट, चेंमट, ३लिं० चिंबट.

चेंबटणें, चेंमटणें, उ० शरीरावयवादि पदार्थ मनस्वी आंवळला जाई असें करणें.

चेर, चेरा, पु० एक रानटी वृक्ष आहे.

चेला, ३लिं० हिं० जो गुरूपासून जो कांहीं एक विद्या घेतो तो त्याचा.

चेव, उ० चव.

चेवणें, चवणें.

चेष्टा, स्त्री० सं० पदार्थ संबंधी चलनवलनादिरूप जो व्यापार ती; दुसऱ्यास चीड यावयाजोगा जो भाषणादि व्यापार ती.

चेष्टावणी, स्त्री० चेष्टा हिनीयार्थी; २, पिशाचास दुसऱ्याकडे उपद्रवार्थ लावण्याचा जो व्यापार ती; ३, ला० कोणएकानें कोणएकाबरोबर कज्जा इ० करावा एतदर्थ शिकविण्याचा जो व्यापार ती.

चेष्टावणें, पिशाच, मनुष्य, इ० स प्रथमार्थी वांचून जी चेष्टावणी तिणें युक्त करणें.

चेष्टित, न० सं० आचरित.

चेष्टेखोर, ३लिं० दुसऱ्याची थट्टा, मस्करी, इ० चीड यावयाजोगी चेष्टा करण्याचा स्वभाव जाचा तो.

चेष्टेबाज, ३लिं० चेष्टेखोर.

चेहरा, चेहेरा, उ० मुख, श्री, किं० त्याचा आकार तो.

चेहरामोहरा, उ० चेहरा इ० तो.

चेहरेदार, ३लिं० ज्याचा चेहरा चांगला तो.

चेहेळ, पु० चिखलहाट; २, दे० चंगळ.

चेहेळणें, चिपळणें.

चेळ, स्त्री० कों० चंगळ.

चैतन्य, न० सं० चेतनपणा.

चैत्र, पु० बारा महिन्यांतील जो पहिला महिना तो.

चैत्रपालवी, स्त्री० चैत्रमासीं वृक्षांस नवीन पल्लव फुटण्याची दशा प्राप्त होते ती.

चैत्री, ३लिं० चैत्रमास संबंधी जी पौर्णिमा इ० तिथि ती.

चैन, न० मनाची जी स्वस्थतारूप अवस्था तें.

चोरव, ३लिं० निर्मल, किं० निर्दोष, असा जो पदार्थ, व्यापार, इ० तो.

चोरवट, ३लिं० चरवोट.

चोरवटा, ३लिं० ग्रं० चरवोट.

चोरवणी, स्त्री० शिकेकाई इ० पदार्थांची बुकणी केंस चोरव्हावे म्हणून, त्यांस लावाया करितां करितात ती.

चोरवणें, चुंफणें

चोरवलणी, स्त्री० चोरवलण्याचा जो व्यापार ती.

चोरवलणें, भूमि इ० स्वच्छ व्हावें म्हणून वरील अविवक्षित तृणादि निःशेष काढणें.

चोरवा, ३लिं० चोरवट.

चोरवोट, ३लिं० चरवोट.

चोंच, स्त्री० चंचु; २, शस्त्रादिकांची अणी.

चोंचण, न० काठी, खुंटा, नारळ, इ० पदार्थ फुटून ठेंचून त्यांचे अनेक अवयव एकत्र जडून गुच्छा सारिखें होणें तें.

चोंचा, पु० बाध्यादिउपद्रव निरसनार्थ तापलेल्या कोयती इ० नीं शरीरावर जाटींचा पाडितात त्या प्रत्येकीं.

चोंचावणें, शस्त्रादिकांचा धार, अणी, इ० नीं कांहीं एक पदार्थ अनेक क्षतयुक्त करणें; २, बाणादिकानें वेगानें जाण्यें समर्थी चोंचों असा शब्द करणें.

चोंज, न० पं० कौतुक.

चोट, स्त्री० गारुडी, गांवगुंड, यांचे खेळांत परस्पराचा मंत्र परस्परांवर लागू झाल्यामुळें जी वेदना प्राप्त होत्ये ती; २, प्रियविरहामुळें जी दुःसह व्यथा प्राप्त होत्येती; ३, कांहीं एक व्यवहारांत जी घस येत्ये ती.

चोंटकें, न० गोंधळी, शाहीर, इ० चें एका तारेचें तंतुवाद्य आहे.

चोंटळणें, चोंटाळणें, देणें, घेणें, इ० व्यवहारीं स्वकार्य साधून दुसऱ्याचा तोंड, नुकसानी, इ० व्हायाजोगें त्यास फसविणें; २, गणनीयत्वें करून मानाथाचा जो पदार्थ त्यास तत्वेंकरून मानणें.

चोड, न० प्रायः नारळाचें जें साल तें.

चोंथलणें, निर्मळ कराया साठीं पात्रादि चोंथ्यानें घांसणें.

चोथवा, पु० दे० पायलीचा जो चतुर्थांश तो.

चोंथा, पु० भांडी इ० निर्मळ कराचा करितां, तृणादि णादिकांचा जो गुंडळा करून घेतात तो; २, नारळ, इ० पदार्थांचा रसांश ग्रहण करून अवशिष्ट जो त्याज्यांश राहतो तो.

चोंदणें, कोंदणें.

चोंदी, स्त्री० कोणाएकाची हानि व्हावयाजोगा त्यास फसविण्याचा व्यापार ती; मा० दे, बस, धा० प्र०.

चोप, स्त्री० माड, सुरमाड, इ० चिरून त्याचा जा लांबलांब फाळी करितात त्या प्रत्येकी; २, पु० गृहादिकांची करायाची भूमि पट्ट सारिखी बसायासाठीं, त्या सर्व भूमीवर एकवार केला जो चोपण्यानें संस्कार तो.

चोपचिनी, स्त्री० एक औषधी आहे.

चोपट, न० चोपमथमार्थी.

चोपड, न० तूप, तेल, इ० जे मोवाळीचे पदार्थ तें; २, पु० तूप, तेल, इ० पदार्थांचा करितात जो शरीरास लेपतो; ३, न० उष्टें रवावें चोपडाचे आशेस्तव.

चोपडणें, चोपडानें युक्त करणें.

चोपडी, स्त्री० एक सांचाचे अनेक कागद एकत्र शिवून लिहायासाठीं करितात ती.

चोपण चोपणी, स्त्री० दे० जमीं चोपायाचे उपयोगी लांकडाचें एक आऊत आहे.

चोपणें, न० कों० चोपण; २, चोपण्यानें जमीन ठोकून साप करणें; ३, ला० काठी इ० कानीं कोणाएकास ठोकणें; ४, शरीर छडा होणें.

चोंपणें, स० चुंकणें.

चोपथ, स्त्री० सरड्या सारिखा चोहों पायांचा एक प्राणी आहे.

चोपाचोप, स्त्री॰ ही जागा चोप. ती जागा चोप. असा जो व्यापार ती; २, ला॰ चालामार त्यालामार असा जो व्यापार ती.

चोपाळा, पु॰ आंदोल.

चोंबडा, चोंमडा, ३लिं॰ इकडली गोष्ट तिकडे सांगावी, तिकडील गोष्ट इकडे, अशी ज्याचा स्वभाव जाचा त्यास निंदेने म्हणतात; २, चर चोंडा.

चोय, स्त्री॰ चुई.

चोर, ३लिं॰ दुसऱ्याचें वस्तु त्याची दृष्टि चुकवून. किंवा बरदस्तीनें घेऊन जातो तो; २, दुसऱ्याचे पदार्थावर न्यायतः जाची सत्ता नसतां, तो पदार्थ आपलेपणानें उपभोगितो तो करून, संवरून, खर्चून वेचून, देऊन घेऊन, चोर होणें, इ॰ स्थलीं तत द्व्यापार संबंधी विवक्षित फल न होतां उलटें थोडेबहू हानीनें युक्त होणें; स॰ चोराची आई ओहळ्ळो ओहळ रडे; चोराची माय हृदयांत रडे; स॰ चोराचें पाऊल चोरच जाणें.

चोरओंटी, स्त्री॰ जींत दूध बहुत असतें आणि दिसण्यांत लहान, अशी जी गो महिष्यादिकांची ओटी ती.

चोरओंवा, पु॰ ओंव्यांत एक भेद आहे.

चोरकाम, न॰ कितीही केलें असतां दुसऱ्याचे डोळ्यांत भरत नाहीं असें जें काम तें.

चोरकोनाडा, पु॰ कोनाड्यामध्येंच एकीकडल्या बाजूस गुप्त जो कोनाडा असतो तो.

चोररवण, स्त्री॰ पेटी इ॰त जो गुप्त रवण असतो तो.

चोररिवडकी, स्त्री॰ समयीं पळून जाणें इ॰ कार्यास्तव गृहादिकांस गुप्तजी रिवडकी करित असतात ती.

चोररिवसा, पु॰ आंगररवा इ॰स गुप्त जो रिवसा असतो तो.

चोरगल्ली, स्त्री॰ चोरांस समयीं लपायास सांपडावा जोगी जी आड गल्ली ती.

चोरगस्त, स्त्री॰ लोकांचे समजण्यांत न यावया जोगी शहर इ॰चे ठायीं रात्रीं मुकी गस्त फिरत असत्ये ती.

चोरगस्तीनें, अ॰ कोणास न समजूं देतां गुप्तपणें; वाग, ये, जा, फिर, इ॰चें वि॰

चोरघडी, स्त्री॰ कोरेवस्त्राचे घडीचे पोटीं समजण्यांत न यावयाजोगी कमी घडी असत्ये ती.

चोरचिरटा, चोरचिलट, पु॰ चोर इ॰ तो; उ॰ चोरचिरटा फिरतो यास्तव रात्रीचें बाहेर जाऊं नये

चोरटा, ३लिं॰ चोरी करण्याचा स्वभाव जाचा तो; चोरटा धंदा, व्यापार, इ॰ स्थलीं जो केला असतां कांही लभ्यांश न होऊन उटली पदरास खोंच येत्ये असा जो तो.

चोरटेचाळे, पु॰ चोराचे आचरणासारिखें जें आचरण ते; याचा म॰ अनेकवचनांत.

चोरणें, कोणाएकाचे वस्तुचा अपहार करणें; २, कांहीं एक गोष्ट एकाएकीं दुसऱ्याचे समजुतींत न येऊं देतां गुप्तपणें राखणें; आंग. स्वाद, इ॰ चोरणें, स॰ तत द्व्यापारीं लागू झालेलें तो तो अवयव त्याचें आकुंचन करणें; पान्हा चोरणें, स॰ गो महिष्यादिकांनी पान्हवून स्तनांत उतरलेल्या दुधाचें वर आकर्षण करणें.

चोरधाड, स्त्री० चोरांचा जो आकस्मिक याला पडतो ती.

चोरपाळत, स्त्री० ग० आपण दृष्टीस न पडतां दुसऱ्याचे घरची बातमी, अनेक युक्तीनें काढण्याचा प्रकार ती.

चोरबातमी, स्त्री० चोरपाळतीनें समजलेली जी बातमी ती.

चोरभय, न० सं० चोरांपासून जें भय तें.

चोरलक्षण, न० सं० जा मनुष्यास पाहिलें असतां त्याचे इतर व्यापारांवरून हा चोर असें मनांत यावयाजोगें जें त्याचें कांहीं चिन्ह दिसतें तें.

चोरवण, न० चोरकृत उपद्रवाचें जें बाहुल्य तें.

चोरवाट, स्त्री० किल्ला, गृह, इ० स जो गुप्त मार्ग असतो ती.

चोरापोरीं, अ० चोर, पोर, इ० कानीं नेल्यामुळें, कांहींएक वस्तु नाहींसें होई असें जा, ने, इ० चे वि० उ० एथला गूळ सगळा चोरापोरीं गेला.

चोरावें, न० चोरवण.

चोरी, स्त्री० चोरावें जें कर्म ती; २ कांहींएक कर्म करण्याविषयीं जो साशंकपणा ती; उ० तुमचे घरीं यावयास कोणाची चोरी नाहीं; स० शेता आड चोरी आणि दादल्या आड शिनळकी चालली च आहे.

चोरीमारी, स्त्री० चोरणें, मारणें, इ० जो व्यापार ती; उ० तो चोरीमारी करून पोट भरितो.

चोरूनमारून, अ० चोरीमारीचे व्यापारानें; पोट भरणें, खाणें, इ० चें वि०; २, चोरगस्तीनें, जा, ये, फिर, कर, इ० धा० चें वि०.

चोल्हा

चोल्हा, पु० घेरावांचून जो आंगरख्याचा वरील भाग तो.

चोव, पु० रा० ओल्या खोबऱ्याचा जो कीस तो.

चोवा, पु० चुवा.

चोष्य, ३ लिं० सं० चुंबून खावयाजोगा जो आम्रादि पदार्थ तो.

चोहींकडे, चोहोंकडे, अ० चहूंकडे.

चोळ, स्त्री० मोजलेलें धान्य बेल, गाडा, इ० वर दुरून आणिलें असतां, तें धान्य चोळवटल्यामुळें मूळ मापांत जो तोटा येतो ती; २, क्षतादि चोळवटल्यामुळें जी अधीक बिकृति होत्ये ती; भर, धा० म०; ३, मनुष्य, गुरूं, इ० ची जी कोणाएकास्थलीं वदळ ती: उ० मार्गावरचे शेतास गुरांची चोळ फार लागत्ये.

चोळरवण, पु० एक चोळी व्हायाजोगा तदुपयोगी वस्त्राचा जो तुकडा तो.

चोळटणें, उ० वस्त्रादिक शिथिलावयव होई असा त्यावर हस्तादि व्यापार करणें.

चोळण, स्त्री० चोळ तृतीयार्थी.

चोळणा, पु० इजारे सारिखा परंतु माथ गुडघ्या पर्यंत नेमावयासाठीं शिवून करितात तो.

चोळणीमळणी, स्त्री० धान्यादिकाचा चोळणें मळणें, इ० रूप जो व्यापार ती; उ० दादा घाईकरूं नका, चोळणीमळणी होउं द्या, मग रुपये घ्या.

चोळणें, धान्यादि मळायासाठीं, किं० शरीरादिकास तेलादि जिरायासाठीं, किं० पात्रादि निर्मल होणें इत्यादयर्थ, त्या त्या पदार्थावरून हस्तादि फिरविणें; २, कांहींएक गोष्टी विषयीं लागली

जी

जी चटपट तीणें युक्त होणें; उन्हातांचोळून काय हो-तें मागेंच जपले असते तर कार्य होतें.

चोळलाग, पु० चोळीचा जो सांधा तो.

चोळवटणें, चोळटणें.

चोळा, पु० चोला.

चोळामोळा, पु० वस्त्रादि पदार्थांची चोळून मळून जी दुर्दशा तो.

चोळी, स्त्री० स्त्रियांचे आंगांत घालावयाचे उपयोगी बंडी सारिखी करित असतात ती.

चोळें, न० कों० चूडाकर्म.

चौक, पु० चौसोपी वाडयाचे मधलें जें चतुरस्र आंगण तो; २, लावणी इ० चेंजें कडवें तो; ३, घोडा इ० चा बराबर चारपाय उथलून खरेनें चालण्याचा एक प्रकार आहे तो; ४, लग्नादि समारंभामध्यें पाट पासोडयावर धान्याचें चतुष्कोण क्षेत्र करितात तो; ५, देवालयाचे चोहों खांबामध्यें चतुष्कोण क्षेत्र असतें तो; ६, सोंगटयांचे खेळांत चौथ्या घरीं सोंगटयांचे खेळांतजोगीचतुःसंख्याबोधकजें कांशावर चिन्ह असतें तो; ७, चवाठा; ८, साधारण चतुष्कोण जें अंगणादि क्षेत्र त्यासही स०

चौकट, स्त्री० चवकट.

चौकडा, पु० समान चार मोत्यांचा जो समुदाय तो; २, चार कुडक्यांचा जो समुदाय तो.

चौकडी, स्त्री० चतुःसंख्याक जो कागद, रुपये, इ० चा समुदाय ती; २, ला० एका जुटीचे चार मनुष्यांचा समुदाय ती; ३, लुगडें दोरवा, इ० वस्त्रावर चतुरस्र जें चिन्ह असतें ती; चौकडी गुंगहोणें, भुलणें, इ० स्थलीं चौकडी स० अक्कल.

चौकणें

चौकणें, घोडा इ० पशूनें चौक टाकीत चालणें.

चौकशी, स्त्री० खरें, खोटें, वाईट, सबंग, महाग, इ० निर्णयाविषयीं जो पुरते पणीं विचार ती.

चौकस, वि० चौकशी करण्याविषयीं जो कुशल तो.

चौकसणें, कांहींएक पदार्थाची चौकशी करून पाहाणें.

चौकसदार, वि० चौकस; २, चौकशीचे कामावर ठेविला असतो तो.

चौकसनीस, वि० चौकसदार द्वितीयार्थी.

चौकळ, चौकाळ, वि० कांहींएक कार्यास पुरून उराया जोगा झालाजो विपुल धान्यादि पदार्थ तो.

चौकळशा, पु० स्त्री० शी, शूद्रांत एक जाति भेद आहे.

चौका, पु० परदेशी लोक स्वयंपाक करायासाठीं जा० चतुरस्र झाडून सारवून, जागा तयार करितात तो.

चौकी, स्त्री० शहर, मार्ग, इ० चे नाक्यावर आल्या गेल्याची चौकशी, झाडा, झडती, इत्यादि अर्थ तदुपयोगी शिपाई लोक राहण्यासाठीं गृहासारिखी बांधितात ती; २, त्या स्थलीं अन्यत्र संरक्षणार्थ नियुक्त जो शिपाई लोकांचा समुदाय ती; ३, त्यांचा जो रक्षणादि रूप व्यापार ती; ४, देवादि ठेवाया करितां, लहान चौरंगासारिखी करितात ती; ५, चार धृपदांचा जो समुदाय ती.

चौकीदार, वि० चौकीविषयीं नियुक्त जो शिपाई इ० तो.

चौकीपाहरा

चौकीपाहरा, पु० चौकीपाहरा इ०रूपजो बंदोबस्त तो; उ० त्या किल्ल्या भोंवता चौकीपाहरा चांगला आहे.

चौकोन, चौकोनी, ३लिं० चतुष्कोण जें क्षेत्रादि तो.

चौरवणी, ३लिं० एकावरएक चार आहेत रवणजास असा जो वाडा इ० तो.

चौरवुंटी मार, पु० चौहींकडेस चार रवुंटे पुरून त्यांस कोणाएकाचे हातपाय बांधून त्यास जो मार देतात तो.

चौरवूर, अ० एकदम चारपाय उचलून, उड, धांव, इ० चें वि०; उ० घोडा चौरवूर उडत चालला आहे; चौरवूर दूध काढणें, रू० चार आंचळांचें.

चौगर्दे चौगर्दी, अ० चारबाजूंस, पाऊस भरणें, इ० चें वि०.

चौगस्त, न० विद्यमान वर्षापासून गेलें जें चौथें वर्ष तें; उ० आतां चौगस्तां श्री क्षेत्रीं गेलों होतों.

चौंगा, पु० चतुरंगुलात्मक जें प्रमाण तो.

चौगुण, ३लिं० चतुर्गुण.

चौगुणित, ३लिं० चतुर्गुणित.

चौघडा, पु० देव, राजा, इ० चे हारीं नित्य शा वाजवायासाठीं काहळ, नगारे, नौबती, वाजंत्रें, कर्णा असा वाद्यसमुदाय ठेविला असतो तो.

चौघडी, स्त्री० चारघटकांची जी वस्त्रादिकांची घडी ती.

चौघला, चौघुला, पु० स्त्री० ली, ग्रामसंबंधी यतनदार एक अधिकारी आहे.

चौघुलकी, स्त्री० चौघुल्याचा जो अधिकार, कि० कर्म ती.

चौघे, ३लिं० चार आसामी.

चौदाळ, ३लिं० चौहींकडून कांहींएक कार्याचा ठरवळा करितो, असा पंचकळ मनुष्य तो.

चौदाळणें, दे० अनेकांनीं मिळून कांहींएक कार्याचा विचका करणें.

चौत, पु० चातकोर.

चौतर्फे, चौतर्फा, ३लिं० अ०वि० चौहों स्वामीचा संबंधानें युक्त जो देश, ग्रामादि तो; २, अ० चौगर्दा.

चौतर्फी, ३लिं० अ०वि० चौतर्फा मथमार्थी.

चौतार, चौतारी, ३लिं० चार तंतु एकत्र करून विणला जो पितांबर इ० तो.

चौताल, पु० धृपदादिकांस चार जेटाळ्याचे ठोके लगतात तो; २, ३लिं० तद्विशिष्ट जें धृपदादि तो.

चौतालां, पु० चौताल.

चौतालीं, ३लिं० चौताल द्वितीयार्थी; २, चार आहेत ताल रू० मजलेजास, असें गृहादि तो.

चौतीस, ३लिं० ३४.

चौतुर्की, ३लिं० चार आहेत तुकडे जाचे असें जें धृपदादि तो.

चौतूक, ३लिं० चौतुर्की.

चौथ, स्त्री० चतुर्थी जी तिथि ती; २, कों० लोणी वर्जन करायाचें अठ्ठेचाळीस दुवांडी शिवराई पैसे भार, एक बजन आहे.

चौथरा, पु० घरगृहादि बांधायासाठीं चतुष्कोण जी बंदिस्त बांधितात तो.

चौथा, ३लिं० चारही संख्या जाणें पूर्ण होत्ये तो.

चौथाई, स्त्री० चतुर्थांश.

चौदा, २लिं० १४.

चौधरी, पु०स्त्री० णा, पाटिला चाहस्तक एक अधिकारी आहे.

चौधारी, पु० निवडुंगांत एक जाति आहे, जास चार धारा असतात तो; २, ३लिं० चार आहेत धारा जास असा जो धोत्र जोडा इ० पदार्थ तो.

चौपट, चतुर्गुणित; २, स्त्री० तिफांशी सोंगट्यांचा जो खेळ ती; ३, सोंगट्यांच्या जो पट त्यासही ल०.

चौपदरी, ३लिं० चार आहेत पदर जास असा जो पदार्थ तो; त्याणें चौपदरी घेतली, इ० स्थलीं तो भिक्षा मागूं लागला.

चौपन्न, ३लिं० ५४.

चौपाट, ३लिं० जाळींकाढाचा चारबाजू तासून काढिल्या असेंजें लांकूड तो.

चौपाटणें, काष्ठादि तासून चौपाट करणें.

चौफुला, पु० लवंग, जायफळ, जायपत्री, इ० पदार्थ पृथक् पृथक् देवाघेवाचे सोईचें धातुमय पात्र करितात तो.

चौफुली, स्त्री० उभ्यारेषेवर मधोमध तत्सम आडवी रेष दिल्ही असतां जो आकार होतो ती.

चौफेर, अ० चोंगदी.

चौबंदी, ३लिं० चार आहेत बंद जास असें जें कागदांचें पान इ० तो; २, स्त्री० घोडयाचे चोहोंपायांस नाल बांधण्याचा जो प्रकार ती.

चौबारी, ३लिं० एकामागून एक असे क्रमानें चार आवाज जापासून होतात, असा जो फटाका इ० तो; २, जास वर्षांतून चार वाक्ष येतात. असा जो शेगवा, पेरू, इ० वृक्षादिक; २, स्त्री० सोंगट्यांचे खेळांत एकारंगाचा चारसोंगट्या मेल्या असतां एक डाव होत असतो ती.

चौबुरजी, ३लिं० चार आहेत बुरूज जास असा जो किल्ला, गढी, इ० तो; २, अन्य पदार्थ विशेष्य नसतां हा च शब्द स्त्रीलिंगीं विशेष्य होतो; उ० त्या चौबुरजींत सारे, दाहा शिपाई आहेत.

चौमेर, अ० चारी मेरां तें व्यापून, उ० हें शेत चौमेर सारखें लागलें आहे.

चौमोळी, ३लिं० चार आहेत पारवीं जास असें जें गृहादिक तो.

चौरकांनी, अ० चारी रकान्यां तें व्यापून, रेष ओढणें, काढणें, इ० चें वि०.

चौरंग, जास चार पाय असतात असा काष्ठादिकांचा सम चतुरस्र स्नानाद्यर्थ जो करितात तो.

चौरडी, स्त्री० किंकऱ्यांत एक भेद आहे.

चौरस, ३लिं० लांबी, रुंदी, उंची हे धर्म असून जाचीं चारी आंगें तासून, साफ केलीं असा जो स्तंभादि पदार्थ तो; २, चतुरस्र जें क्षेत्रादि त्यासही ल० म्हणतात.

चौरस्ता, अ० शहर इ० चा अनेक रस्त्यांतून, माणसें फिरणें इ० चें वि०.

चौर्य, न० सं० चोरी मुख्यार्थी.

चौऱ्याण्णव, ३लिं० ९४.

चौऱ्यांयशी, ३लिं० ८४.

चौऱ्याहात्तर, ३लिं० ७४.

चौल, न० सं० चौलें.

चौविशी, २लिं॰ चौवीस अवयव जाचे पोटीं आहेत असा जो शेर इ॰तो; २, स्त्री॰ चौविसांचा जो समुदाय ती.

चौवीस, २लिं॰२४.

चौवेताळीस, २लिं॰४४

चौशेरी, २लिं॰ चारशेर प्रमाणाचें जें माप इ॰तो: २, स्त्री॰ चारशेर प्रमाणाचें जें वजन ती.

चौसष्ट, २लिं॰ ६४.

चौसष्टी, स्त्री॰ चौबारी तृतीयार्थी; २, एकजातीय चौसष्ट पदार्थांचा जो समुदाय ती.

चौसष्टीपिंपळी. स्त्री॰ चौसष्ट प्रहर रगडून औषधार्थ जी पिंपळी तयार करितात ती.

चौसोपी, २लिं॰ चार आहेत सोपे जास असें गृहादिक तो; २, स्त्री॰ चार सोप्यांचा जो समुदाय ती.

च्युत, ३लिं॰ सं॰ गलित. याचा प्रयोग प्रायः समासींच होतो; उ॰ पदच्युत. स्थानच्युत. बंधच्युत, इ॰.

छ, अ० दुसऱ्याचे भाषणादिकांचा तिरस्कार कर्तव्य असतां प्र०; उ० छः तो काय सांगतो कपाळ आपलें.

छकडभेद, पु० कांहीं एक व्यवहारामध्यें आपला मतलब साधायाकरितां केलेली कृत्रिम युक्ति.

छकडा, पु० लहान गाडा; प्रा० लष्करांत सामान वाहावयास असतो; २, कल्याणप्रांतीं बसायाचे गाडीस म्हणतात.

छकडी, स्त्री० छकडा द्वितीयार्थी; २, साहा, फळें, कागद, इ०चा जो समुदाय तो; उ० मीं रुपयाचे पेरू पंचवीस छकडया घेतले; उ० चिनाई कागदांची छकडी पेशाला मिळत्ये; ३, तिर्फांशी खेळामध्यें तीन फांशां मिळून सापगडे असतात त्यांचा समुदाय.

छकडीचें माप, न० आंबे, पेरू, इ०कांचे वीस डाकडा पंचकडया मोजून घ्यायाचे ठिकाणीं वीस छकडया देतांत घेतांत असा व्यवहार कचिद्देशीं, किं० ग्रामीं असतो तें.

छकणें, कोणाएकाचे नांवें मांडलें जें कापड, रकम, इ० ते खोडून दूर करणें; उ० माझे नांवें पांच सनगें मांडलीं असतील तीहीं घे आणि छकून टाक. २, बुद्धीस मोह पडून ठकलें जाणें, उ० तूं मला छकवायाला पाहातोस पण मीं छकणार नाहीं.

छकल, न० शाकल शब्दाचा अपभ्रंश.

छक्क, अ०लिं० आश्चर्ययुक्त हो, कर, या धा०वर अन्वय; उ० त्या मुलाचें म्हणणें ऐकून मीं छक्क झालों.

छक्कड

छक्कड, स्त्री० चपराक; २, देणें, घेणें, इ० व्यवहारांत जी चट्टी तीं; बस, ये, पा धा०वर अन्वय; उ० यंदा भाताचा व्यवहारांत छक्कड बसली, आली; ३, कांहीं एक व्यापारामध्यें दुसऱ्यास फसविण्याचा जो व्यापार तो; उ० वाण्यानें एक मणाचे वजनांत दोन शेरांची छक्कड दिली; ४, रा० द्रव्यादिक मागण्याविषयीं जो सावकारादिकांचा नेट तो; उ० सावकाराची छक्कड बसली तेव्हां गुरें आड करून पैका घावा लागला.

छक्का, पु० छकडी तृतीयार्थी; २, गंजिफांचे जो पानावर साहांचें चिन्ह असतें तेंपान तो; ३, रा०कांहीं एक व्यवहारामध्यें केले जें कपट तो; उ० हा साधू दिसत होता पण आतां छक्के करूं लागला.

छक्कापंजा, पु० गंजिफा खेळण्यांत एक प्रकार आहे; २, पावडाव द्वितीयार्थी; ३, गायन, भाषण, इ०मध्यें साथेपणा न दिसायाजोग्या जा कळाकुसरीचा नोकी असतात तो; उ० प्राचीन गाण्यापेक्षां आतांचा गाण्यांत छक्केपंजे फार झाले.

छचोर, ३लिं० चिचोर; उ० त्वां आपल्ये छिचोरपणानेंविद्येचें स्वरूप बुडविलें.

छचोरी, स्त्री० दे० छचोरपणा.

छट, ३लिं० जाचे भाषणादि व्यवहारांत छक्केपंजे असतात तो; २, कृपणासही म्हणतात.

छटा, स्त्री० प्रा० छाया लाक्षणिकार्थी.

छटांक, ३लिं० पक्केशेर-चा सोळावांश.

छटांकी, स्त्री० छटांकांचें वजन, कि० माप; २, यथेष्ट सुग्रास भोजनास संकेतानें म्हणतात.

छटाछट, अ० छटछट शब्द होईल असें केळीका

पणें

पणें. डोकीं कापणें, इ० चें वि०; उ० त्याणें डोंभर केळी छडाछट तोडिल्या.

छट्टा, पु० कोश, दोनकोश, इ० जीं देश, मार्ग, इ० चीं मानें त्यांचा जो अवधि तो; उ० तो गांव एथून दाहाकोशांचा छट्यावर आहे.

छडणूक, स्त्री० गांजणूक.

छडणें, गांजणें, कि० मनुष्याचे विद्यादि परीक्षार्थ नानाप्रकारचा युक्तीनें त्या मनुष्यास त्रासणें.

छडा, पु० कांहीं एक हारवलेली, कि० चुकलेली वस्तु मिळावी म्हणून तत्संभवस्थळीं धांडुळून पहाण्याचा जो व्यापार आणि त्या व्यापारानें झालें जें फळ तो; उ० सगळ्ये गावांचा छडा काढला तेव्हां माझे वस्तूचा छडा लागला.

छडाछड, स्त्री० परीक्षार्थ जो छडण्याचा व्यापार ती; उ० त्या चोराची बहूत छडाछड केली तथापि तो चोर कबूल होत नाहीं; २, अ० छडछड शब्द होई असें बारीक छड्यांनीं मारण्याचें वि०, उ० त्यास याणें दाहाछड्या छडाछड मारिल्या.

छडी, स्त्री० घोडा इ० स मारण्याचे उपयोगी जी वेत इ० ची काठी ती; २, राजकीय चिन्हांमध्यें सोनें, कि० रुपें अग्रास लाऊन काठी करितात ती.

छडीदार, ३लिं० छडी-चा आकार विणकरींत जा वस्त्रावर दारवविला असतो असा जो दोरवा, इ० वस्त्र तो.

छडीबरदार, छडीबारदार, ३लिं० राजापाशीं राजचिन्हाची छडी बाळगून जो राहातो तो सेवक.

छंण-, कण, -कन, -कर, -दिशी, अ० छंण असा शब्द होई असें वाजणें, रुपयादिक मोजणें, इ० क्रियांचें वि०.

छणछण, अ० छणछण शब्द होई असें घांगऱ्या वाजणें, रुपये मोजणें, देणें, इ० क्रियांचें वि०; उ० छणछण रुपये द्यावे तेव्हां माल प्राप्त होतो.

छणछणणें, छणछण शब्द होई असें ताशा, इ० नीं वाजणें.

छणछणा, अ० छणछण.

छणछणाट, पु० छणछण शब्दांचा अतिशय.

छणाछण, अ० छणछण.

छणाणणें, छणछणणें.

छणाणा, अ० छणाछण.

छत, अ० छः; २, न० मंडपादिकाचा आंतल्ये बरचा प्रदेशीं प्रस्तृत वस्त्र लाविलात तें. ३, तत्सदृश काष्ठाचें कि० चुना भरून करितात तें; ४, ला० गायन, पुराण, इ० कांमध्यें छत भरणें म्हणजे पराकाष्ठेचा रंग करणें; उ० अगोधर एकानें गायलें परंतु रंग भरला नव्हता मग त्या गवयानें दोन धुपदांत छत भरून दिलें.

छतावणें, मंडपादिक छतानें युक्त करणें.

छत्तिशी, स्त्री० छत्तीस मनुष्यादि पदार्थांचा जो समुदाय ती; २, ३लिं० कों० छत्तीस मनुष्यांनीं उचलायाजोगा जो काष्ठ, धोंडा, इ० पदार्थ तीं; ३, अवांतर तोळे, मण, इ० मानें जामध्यें छत्तीस आहेत असें जें शेर, खंडी, इ० मान ती.

छत्तीस, ३लिं० ३६.

छत्र, न० सं० पर्जन्य, कि० उष्ण, एतन्निवारणार्थ वस्त्रादिकांचें हातीदांडा धरून डोकीवर धरायाजोगें

याजोगें करितात तें; प्रा० राजा, देव, यांजवर धरितात; २, ला० जांचा सत्ते खालीं आपणास निकाळजीनें वागावयास सांपडतें असे जे पुत्रास माता पितर, प्रजांस राजा इ० तें.

छत्र-चामरसिंहासन, न० राजचिन्हेंसुद्धां जो राज्याधिकार तें; उ० त्या राजानें छत्रचामरसिंहासन पुत्राचा स्वाधीन केलें आणि आपण तपश्चर्येस गेला.

छत्रपती, ३लिं० राजा; २, ला० दुसऱ्यांची पेशास ह्मणतात.

छत्रबंध, पु० सं० छत्राकार कोष्टकांकित चिन्ह करून प्रतिकोष्टकांत अक्षरें लिहितात त्यांत छत्रांतःपाति अक्षरें दंडस्थानीं जातात तीं द्विवार वाचलीं ह्मणजे श्लोक होतो तो.

छत्राक, न० सं० अळंबें.

छत्री, स्त्री० राजा, देव, एतद्दितर लोक पर्जन्य उष्ण यांचा निवारणार्थ कामंदादिकांची छत्रसदृश करितात ती; २, ३लिं० सं० छत्र आहे जास तो राजा, इ०; छत्र आणि छत्री यांचा अर्थ एकच पण परमप्रौढभाषणांत सर्वत्र छत्र ह्मणतात एरवीं देव, राजा, यांवांचून सर्वत्र छत्री.

छंद, पु० श्लोकादिकांस गुरुलघुवर्णसन्निवेशमूलकजे भेद सांगीतले आहेत तो; २, कांहीं एक गोष्ट केल्यावांचून चैन पडूं नये असा जो अंतःकरणास तद्विषयक अभिलाष तो; उ० या मुलास नित्यशः पुस्तक पाहाण्याचा छंद आहे; ३, कांहीं एक वस्तूची उत्कंठा; उ० मुलानें आईचा छंद घेतला आहे; ४, तो त्याचे छंदीं लागला आहे ह्मणजे तदनुरोधानें वर्ततो असा अर्थ, स्त्रियांचे हातांतील एक दागिना आहे.

छंदरखोर, ३लिं० जा छंदास लागला त्या छंदापासून रुटाव्यास जाचें अंतःकरण समर्थ नाहीं तो.

छंदःशास्त्र, न० सं० श्लोकादिकांचे छंदांस प्रमाणभूत जें शास्त्र तें.

छदाम, पु० पूर्वीं कांहीं एक फार द्रलकें नाणें होतें असें वाटतें प्रस्तुत उपलभ्यमान नाहीं; ला० मला छदाम मिळत नाहीं; मीं तुझा छदाम लागत नाहीं असे प्रयोगमात्र होतात तेथे अर्थ कांहीं एक मिळत नाहीं, लागत नाहीं, असा जाणावा.

छंदिष्ट, ३लिं० दुसऱ्याचें न ऐकतां लोकविरुद्ध स्वमतानेंच वागण्याचा स्वभाव जाचा तो.

छंदी, ३लिं० छंदखोर; २, छंदिष्ट; ३, दुर्व्यसनी.

छंदोबद्ध, ३लिं० सं० छंदजातमध्यें आहे असें जें काव्यादिक तो.

छद्म, न० कपट; उ० शत्रूछद्मानें जिंकावा; २, भाषणादिकांत गुप्त जो दंश. किं० मर्म तें; उ० त्याला गर्भश्रीमंत ह्मणतांच संतोष पावला परंतु गर्भश्रीमंत ह्मणजे मूर्ख हें छद्म त्यास कळलें नाहीं; ३, मनुष्याचा जो गुप्तदोष जाचें लोकांत उद्घाटन केलें असतां राग येतो तें.

छद्मी, ३लिं० कपटी; २, मर्म बाहेर काढण्याचा, किं० एरवाचास मर्मी धरण्याचा स्वभाव जाचा तो; ३, त्याचा व्यापार, भाषण, इ० तो.

छन्न, ३लिं० सं० आच्छादित; उ० आज आकाश मेघच्छन्न आहे.

छपणें, अविवक्षितांस समजूंन देतां गुम राहाणें.

छपर, छप्पर, न० तुळया, कड्या, इ० मोठें सामान जांत नाहीं असें जें उष्ण, पर्जन्य, यांचे निवारणार्थ तृणादिकांचें घर करितात तें; २, पलंगावर केरन पडावा इत्यादयर्थी आच्छादन करितात तें; ३. दे० पर्जन्यादि निवारणार्थ घरादिकांवर तृणादिकांचें जें आछादन घालितात तें; ४. कांबट्यांचीं तटकी बांधून त्याजवर तृणाचें आच्छादन घालून जेथे पाहिजे तेथे उचलून न्यावयाजोगें करितात तें; उ० त्या घराचे एका बाजूचीं कोलें पडलीं आहेंत त्याजवर एक छप्पर घाल.

छपरपलंग, पु० छपरविशिष्ट पलंग.

छपरबंध, पु० दे० तृणाची छपरें बांधण्याचें जो कसब करितो तो.

छपरबंदी, स्त्री० यथाकथंचित् राहावयासाठीं छपरांचीं केलीं जीं अनेक घरें तीं; २, दे० तृणानें घरें शिवण्याचा जो व्यापार तो; उ० पाऊस जवळ आला आतां घरावर छपरबंदी केली पाहिजे

छपरी, स्त्री० खोपटी.

छपवणी, छपावणी, स्त्री० कांहीं एक गोष्ट छपविण्याचा व्यापार.

छपाछप, अ० छटाछट.

छपेली, स्त्री० दे० चोसोपी वाड्यापुढें सायबानासारखी चुनेगची करितात ती.

छप्पन्न, वि० ५६.

छप्पन्नी, छप्पन्या, वि० दुसऱ्यास ठकवून स्वकार्य साधनाविषयीं जो दक्ष तो.

छप्पा, पु० ससैन्य शत्रूचा असावधपणा लक्षून न त्याजवर एकाएकी घाला घालितात तो; २, रंगणेसाठीं वस्त्रादिकांवर रंगाचें वर्तुलाद्याकारक चिन्ह करितात तो; ३, कपाळावर वर्तुळाकार गंध लाविलेला तो; ४. छप्पावळणें म्हणजे महामारी, इ० उपद्रवानें मनुष्यादिकांचा अतिशयित क्षय होणें; उ० त्या प्रांतीं रोगानें गुरांचा छप्पा वळला.

छब, स्त्री० पदार्थावर चांगुलपणा दिसण्यास कारणभूत जी खुबी ती. कि० तत्तत्पदार्थनिष्ठ इतर भेदक जो प्रकार तो; उ० या कमळाची छब चांगली आहे; या पागोट्याची छब निराळी त्या पागोट्याची छब निराळी.

छबकडी, स्त्री० दे० छबदार स्त्री.

छबदार, वि० खुबीदार.

छबिना, पु० सैन्य, ग्राम, दुर्ग, इ० चा रक्षणार्थ जो घोडे राऊतांचा समुदाय, कि० गलबतांचा समुदाय निरंतर सज्ज ठेविला असतो तो; २, उत्सवादि प्रसंगीं देवाची स्वारी मिरवणें तो.

छबी, स्त्री० छब.

छबीदार, वि० छबदार.

छबेला, छबीला, वि० सुंदर असून जो नेत शृंगारचेष्टा आहेत असा जो मनुष्य तो.

छब्बा, पु० दे० संकेतानें रुपयास म्हणतात.

छमकावणें, व्ययप्रसंगीं मागें पुढें न पाहातां भराभर रुपया इ० नाणें खर्च करणें.

छमछम, अ० छमछम शब्द होई असें वाजणें, नाचणें, इ० क्रियांचें वि०; उ० छडी लागे छमछम.

छमछमाट .पु० नृत्यसमईं घुंगुर, मृदंग, इ० चा जो छमछम शब्दसमुदाय तो.

छमाछम, अ० छमछम.

छर्दी, स्त्री० सं० वमन.

छर्रा, पु० बंदुका, तोफा, इ० त भरून बाहेर उडवा यासाठीं उडदाइतकी गोळी असते, तो; ला० तोफ इ० त खुर्दा, नाल, खिळे, इ० भरतात त्यासही म्हणतात; त्याणें भाषणाचे छर्रे उडविले म्हणजे पराकाष्ठेचें वाक्चातुर्य दाखविलें असा अर्थ.

छल . छळ, पु० छळण्याचा व्यापार: उ० उगीच निरपराध कोणाचा छळ करूं नये; २. न० सं० काहीं एक कार्यार्थ पूर्व स्वरूप निन्हव पूर्वक स्वीकारिलेलें रूपांतर, कि० वेषांतरादिक, उ० रावणें भिक्षुच्छलानें येऊन सीता नेली; ३, कांहीं एक कार्यार्थ कल्पिलेलें खोटें निमित्त; उ० हा ज्वराचा छलानें घरीं राहिला.

छलक, छळक .अ़लिं० गांजण्याचा स्वभाव जाचा तो.

छलना, छळणा, स्त्री० गांजण्याचा व्यापार ती.

छळणूक, स्त्री० गांजणूक.

छळणें, गांजणें; २, भयकारक पदार्थ दर्शनानें वा सपावणें

छळवाद, पु० छळणा; उ० उगीच एखादे इसमाचा छळवाद करावा यांत कल्याण नाहीं; २. रा० छलकता; उ० याचे आंगीं छळवाद भारी यामुळें याजपाशीं मनुष्य टिकत नाहीं.

छळवादी

छळवादी, अ़लिं० छळवाद करण्याचा स्वभाव जाचा तो.

छाकटा, अ़लिं० मद्यप्राशन करून निरंतर झिंगतो तो.

छांछू, न० अल्पस्वल्पमंत्रविद्यादिकांचा जो टाणाटोणा तें; उ० हा भट कांहीं छांछू जाणतो; २, या व्यापारांत मीं सावध आहें माझें लक्ष्य ही आहे इतकें सेवकादि लोकांस कळावें म्हणून स्वल्प जो शब्दादि व्यापार तो; उ० यजमानाचा कामावर उगीच क्षणभर येऊन छांछू करून जातात पण नितक्यानेंच लोक सावध राहातात.

छाट, पु० कागद, चर्म, वस्त्र, काष्ठ, इ० वेतादिप्रमाणें ठेवून कापून काढायाचा किं० काढिला जो अंश तो; उ० या आंगरख्याचा छाट काढ आणि त्याचे कसे लाव; २, दे० राशींतील निवडक अंश घेऊन राहिलेला गाळ; उ० राशींतून चांगलीं चांगलीं पानें घेऊन पत्रावळी केल्या मग खालीं जो छाट राहिला त्याचे द्रोणे केले; ३. कांहीं एक संस्काराविषयीं एक समुदायस्थित पदार्थांचें तारतम्यपूर्वक जें पृथक्करण तो; उ० हीं बोंभर मोठीं सारखीं नाहींत म्हणून छाट करून घेतली लावा.

छाटछूट, पु० स्त्री० कागद, चर्म, इ० वेतादिप्रमाणें घेऊन कातर, इ० नें बाकीचा काढिलेला अंश. कि० तो अंश काढण्याचा व्यापार तो.

छाटणी, स्त्री० छाटण्याचा व्यापार.

छाटणें, कांहीं एक पदार्थाचा वेतापेक्षां अधिक राहिला जो किंचिदंश तो कातर इ० नें काढून

पून

घून काढणें; उ० आंगरख्याची बाही दोन बोटें लांब झाली ती कातरीनें छाटिली पाहिजे; २, एकाघावानें दोन तुकडे होत असें कांहीं एक तोडणें; उ० त्या शिपायानें तरवारीनें चार केळी छाटिल्या; ३, दे० समुदायवृत्ति पदार्थांचें तारतम्यपूर्वक छाटकरणें; उ० व्यापारीलोक लहान सहान फळें एकत्र सरसकट घेऊन छाटून विकतात यासुळें त्यांस दर चांगला येतो; ४, परिटानें वस्त्र भटींत न घालितां ओपविणें, इ० संस्कारानें स्वच्छ करणें; ५, धुणें. इ० संस्कारानें वस्त्र, साखर, इ० चा मळ दूर करणें, किं० होणें; ६, कांहीं एक कार्यी अमुक खर्च वेच करावा, किं० अमुक मनुष्यें ठेवावीं, इ० रूप नियमांत किंचिदंश न्यून करणें; उ० लग्नास हजार रुपये लागायाचे परंतु खर्च छाटल्यामुळें दोनशें कमी लागले; उ० या किल्यावर हजार लोकांचा बेहेडा होता त्यांतील दोनशें छाडून आठशें राखले; दम छाटणें, म्हणजे कांहीं एक काल श्वासोच्छ्वास न करितां राहाणें; उ० त्याणें पाण्यामध्यें घटकाभर दम छाटला; ७, ला० कांहीं एक गोष्टीविषयीं धैर्य धरून राहाणें; उ० आज येईल उद्यां येईल म्हणून आज पर्यंत दम छाटला आतां राहावत नाहीं; पाणी छाटणें म्हणजे तरून जावयाकरितां हातानें पाणी तोडणें, किं० तुटणें; श्वासामुळें दम छाटत नाहीं; इ० स्थलीं श्वासोच्छ्वास करण्ये समयीं दुःख होनें असा अर्थ.

छाटा, पु० उदकादिकांचा शिंतोडा; उ० तूं धोतरें धुतोस पण माझे आंगावर छाटे येऊंदेऊं नको.

छाटाछाट, स्त्री० बऊत छाटण्याचा जो व्यापार ती; २, कांहीं एक व्यवहाराचीं जीं अंगें तीं किंचित् किंचित् कमी करून विशिष्ट व्यवहार अल्पांत होई असें करण्याचा जो व्यापार ती; उ० हा ग्रंथ फार मोठा झाला आहे याची छाटछाट करून लहान करा.

छाटी, संन्याशाचें नेसायाचें किं० पांघरायाचें भगवें वस्त्र ती; २, तोंड पुसायाकरितां धुवट वस्त्राची घडी बाळगितात ती.

छाती, स्त्री० उर मुख्य लाक्षणिकार्थी; २, ला० कांहीं एक गोष्टीविषयीं धैर्य न सुटे अशी मनाची दृढता; उ० त्या बाघास पाहातांच त्याची छाती फाटली: ३, प्रा० उरशब्दावरील सर्वसंप्रदाय छातीशब्दावर जाणावे

छातीचा, ३लिं० छाती द्वितीयार्थ विशिष्ट तो.

छातीदार, ३लिं० छातीचा.

छातीपूर, ३लिं० छातीचा.

छातीफोड, स्त्री० उरफोड प्रथमार्थी; २, ३लिं० उरफोड द्वितीयार्थी.

छात्र, पु० सं० जो जापाशीं पढतो तो त्याचा.

छांदस, ३लिं० छंदिष्ट; २, वैदिक.

छांदिष्ट, ३लिं० छंदिष्ट.

छाण, छान, स्त्री० चौकशी; २, सुशोभित दिसायाजोगा वस्त्रभूषणादिकें करून, किं० स्वतःसिद्ध केला जो डौल ती; उ० आज चक्कीदार पागोटें घालून छान करून कोठें जातां; ३, कांहीं एक स्थलादिकांचा ठायीं वृक्षारोपण, चित्रलेखन इ० कें करून झालेली, किं० केली जी रम्यता ती; उ० त्याचे घराची भली छान केली आहे.

छानछुकी, स्त्री० छान दिसायाजोगा वस्त्र,पात्र, इ०चा यथायोग्य रचनेचा जो व्यापार ती;किं० त्या णें आलीं जी शरीर, इ० कांस शोभा ती.

छानछूक,३लिं० छानछुकी करण्याचा स्वभाव आचा तो

छानछोक,३लिं० छानछूक

छानछोकी,स्त्री० छानछुकी०

छानणें, उदकादि पदार्थ गाळणें इ०नीं गाळणें;२, कांहीं एक पदार्थांतील,किं० व्यापारांतील तत्व समजायासाठीं त्या पदार्थाची,किं० व्यापाराची चौकशी करणें.

छानदार, ३लिं० छान प्रथमद्वितीयार्थानें युक्त जो तो.

छानदारी, स्त्री० छानदारपणा.

छाप,पु० रुपया,कागद,इ०कांवर लिहिल्यावांचून अक्षरादि चिन्हें उमठायाचें एक यंत्र आहे;२,त्या यंत्रानें उमटलेलें अक्षरादि चिन्ह;उ० तो छाप जुना झाला ह्मणून त्याणें कागदावर चांगला छापउठत नाहीं;३,स्त्री० मृदंग,डफ,इ०कांवर जो ध्वनि उठायासाठीं तळ हाताचा प्रहार ती;४,स्त्री० पु० खोगिरास जेनाचे दोन तुकडे लाविलात ते प्रत्येकीं;५,इतरापेक्षां याचा कांहीं एक गुणाचा उत्कर्ष झाल्यामुळें हा याकामांत मान्य असें इतर सर्वांचे मनांत यावयाजोगें इतरांवर तेज पडतें ती,तो;उ० त्या पंडिताची पहिल्येसभेस सर्वपंडितांवर छाप बसली;उ० त्याणें एक ध्रुपद गातांच सर्व लोकांवर छाप बसून चित्त सारखें झाले;६,कोणा एकाचे बोलण्या करण्याची जी हातवटी तो;उ० त्याचे करण्याचा छाप दुसऱ्यास यावयाचा नाहीं.

छापखाना, पु० रुपये, अक्षरादि छापण्याचा जो कारखाना तो.

छापणी, स्त्री० अक्षरादिक छापण्याचा जो व्यापार ती;उ० एवढे ग्रंथाची छापणी व्हायास एक वर्ष पाहिजे.

छापणें, उ० कागद,वस्त्र,रुपया,इ० छापद्वितीयार्थानें युक्त करणें;उ० त्या दगडावर रोज हजार कागद छापितात;उ० हें कापड जकातदाराकडून छापून आणिलें;उ० त्या वस्त्रावर चित्रें छापिलीं आहेत.

छापा, पु० छप्पा.

छापी, ३लिं० खुणेकरितां रुपया,इ० नाण्यावर निशाण मारिलें आहे तो;२,छापद्वितीयार्थानें युक्त जो रुपया,कागद,वस्त्र,इ० तो;३,छापानें केलें जें खोगिर तो;४,स्त्री० बोलणें,करणें,इ० जी हातवटी ती;उ० त्याचे बोलण्याची छापी यास बारा जन्मांत यावयाची नाहीं;५, खरा;उ० हा ग्रंथ छापीनें लिहिला तरी पंधरादिवस लागतील.

छापील, ३लिं० छापद्वितीयार्थानें युक्त जो कागद,वस्त्र,रुपया,इ० तो;२,त्या कागदादिकावरचें जें छापानें लिहिलेलें अक्षरादि चिन्ह तो.

छापेकरी, ३लिं० खुणेकरितां वस्त्रादिकांवर रंग,इ०चा छापा घालायासाठीं ठेविलेला मनुष्य;२, छापा घालनारा.

छापो, पुं० कों० एक मुलांचा खेळ आहे.

छाया, स्त्री० व्यवधानानें प्रकाशाचा प्रतिबंध झाला

ला असतां व्यवधान समाकार जो तेजोभाव ती; उ० झाडाचा छायेखालीं बैस;२,जेणेंकरून छाया होत्ये असें जें तृणादिकांचें आच्छादन ती;उ० या मंडपावर छाया घातली पाहिजे;३,सुखानें राहावयास कारण जो मातापितर;यजमान,इ०चा आश्रय ती;उ० वीस वर्षेपर्यंत आईबापाचे छायेखालीं होतों सांप्रत दाहा वर्षें यजमानाचा छायेखालीं आहों;४,अप्रत्यक्ष जे रोग,ऋतु,काम, क्रोध,इ० तत्तदनुपाकज जीं शरीरादिनिष्ठ आरक्त नेत्रादिचिन्हें तींहीं करून अनुमित जो रोगादिकांचा ईषत्संक्रम भासती;उ० याचे पिंवळेडोळे झाले तस्मात् याजवर पंडूची छाया दिसत्ये;उ० कांहीं उन्हाळा जाणवूं लागला तस्मात् ग्रीष्म ऋतूची छाया पडली;उ० याणें डोळे लाल केले तस्मात् क्रोधाची छाया दिसत्ये;५,बुद्धि,ज्ञानेंद्रियें,यांणीं यांत असुक अर्थ आहे किं० हा असुक च पदार्थ अशा रीतीनें ज्ञान व्हावयाचें तें अज्ञान,दूरत्व,इ० दोषांमुळे इदमित्थ त्यात्या वाक्यादि पदार्थाचें अर्थज्ञान,किं० स्वरूप ज्ञान न होतां त्या अर्थाचा,किं० त्या स्वरूपाचा जो अधिष्ठानभूत पदार्थाचाठायीं भासती;उ० हा श्लोक तर मला लागला नाहीं पण यांत राजनीतीची छाया दिसत्ये;उ० या रागांत कानडयाची छाया दिसत्ये;६,बालभाषेत्यादींची जो अर्थबोधक संस्कृत पदादिरूप व्याख्या ती;उ० इसिइसि तुंबिदाईभमरेहिं इची छाया ईषद्वीक्षितानि भ्रमरैः;७,नवली;उ० या झाडास एक महिनापाणी पिल्लताच याची छाया पालटली;८,कांहीं एक रंगित पदार्थावर सूर्यादिकांचें तेज पडलें असतां त्याचारंगाची जो आसमंतात् प्रसर दिसतो ती;९,स्फटिकादिक जे चकचकित पदार्थ त्यांचाठायीं सन्निहित पदार्थाचा जो रंग भासतो ती;उ० स्फटिकावर जास्वनाची छाया पडली आहे म्हणून तांबडा दिसतो;१०,पदार्थांचा संगतीमुळें परस्परांचा कांहीं एक गुण परस्परांवर किं० एकावर भासतो ती;उ० हा लटकें बोलूं लागला ही त्या लबाडाची छाया याजवर पडली.

छायानट, छायानाट,पु० गायनांत एक राग आहे.

छायापुरुष,पु० उन्हांत,किं० चांदिण्यांत उभें राहून आपले छायेकडे सतत पाहात असतां एकाएकी सूर्य,किं० चंद्र यांजकडे पाहिलें म्हणजे जो पुरुष दिसतो तो,स्वप्नशास्त्रांत प्रसिद्ध आहे.

छावडा,अलिं० मूल बारा चवदा वर्षांचें होईतोंपर्यंत त्याला याशब्दें लाडिकपणानें व्यवहार करितात.

छावडें,न० लाडिकपणानें लहान लेंकरास म्हणतात.

छावणी,स्त्री० कांहीं दिवस राहावयाकरितां लष्करीलोक छपरें,इ० घालून त्यांत वसती करितात ती;२,गृहादिकांवर कोल,इ०ची छाया करिता ती;३,दरवाजा,खिडकी,इ०कांवर भिंत चढवावयाची असतांखालीं आश्रयार्थ जाफळ्या,इ० घालितात ती.

छावा,पु० हत्तीचें पिल्लूं.

छिः, अ० छः

छिक्का, स्त्री० सं० शिंक.

छिचोर, छिछोर, ३लिं० छचोर

छिछी, अ० छः

छिटाव, ३लिं० शिटाव.

छिटी, ३लिं० छिटाचा जो आंगरखा, चोळी, पागोटें. इ० तो.

छिडकणें, वस्त्रादिक, रंग इ० कांचे बारीक तुषारानें अंकित करणें; उ० माझें पागोटें वसंती छिडकून दे.

छिडकाव, पु० वस्त्रादिकांवर रंगादिकांचा कि० जलाचा जो विदुषा: सेक तो.

छिथू, स्त्री० सभादिकामध्यें अप्रतिष्ठा करावयाजोगा जो धिक्कार तो. उ० त्याची सभेमध्ये छीथू होऊन अप्रतिष्ठा झाली तथापि त्यास लाज नाहीं.

छिद, स्त्री० कांहीं एक पदार्थ अवासवा तोडून अनेक शकलें करितात ती.

छिद्र, सं० न० मुख्य आणि लाक्षणिक जो प्रवेश तद्योग्य जें द्वार तें; २, कांहीं एक व्यापारसाधन जीं अनेक अंगें त्यांतून एखाद्या अंगाची न्यूनता झाल्यामुळेंजी त्या त्या व्यवहाराची विकलांगता तें; उ० आमची दारू सरली हें छिद्र शत्रूस कळलें तर तो आतांच घाला घालील; २, छद्म तृतीय चतुर्थार्थीं; उ० दुष्टाचा असा स्वभाव कीं लोकांचीं छिद्रें काढीत असावें.

छिद्रान्वेषण, सं० न० दुसऱ्याचें उणें कि० दोष यांचा शोध पाडण्याचा जो व्यापार तें.

छिद्रान्वेषी, ३लिं० छिद्रान्वेषण करण्याचा स्वभाव जाणतो.

छिनाल, ३लिं० पती सोडून जाराजवळ जाते ती, तसा आपली विवाहित स्त्री सोडून दुसऱ्या स्त्रीशीं संग करितो तो पुरुष.

छिनाला, पु० ग्रामादिकांतील अनेकांचा जो शिनक कीचा व्यापार तो.

छिनाली, स्त्री० छिनालाचें कर्म, २ छिनाला.

छिनावणें, हिरून घेणें.

छिन्न, सं० ३लिं० तुटलेला; २, छेदिल्ये भरीवांचे तुकडयाचे कापल्ये शेवटाची आकृति; छिन्नपुच्छादि समास जाणावे.

छिन्नभिन्न, ३लिं० तुटल्या फुटल्यानें जो पदार्थ विकलांग तो.

छिलणें, लेखणी, काठी, इ० पदार्थांचा चाकू, इ० बारीक शस्त्रानें कीस काढणें.

छिलवा, पु० दे० पुष्पांचीं डेंरवें खुंटून त्यांचा केलेला गुच्छा.

छींट न० आंगरखा, इत्याद्युपयोगी रंगानें छापलेलें जें चित्र विचित्र वस्त्र असतें तें.

छुक, अ० मांजरास हाकल्येसमयीं याचा प्रयोग करितात. छुक म्हणणें. करणें. म्हणजे मनस्वी वर्तणूक करणाऱ्यास प्रतिषेध करणें; उ० मी सरकारवाड्यांत भीत भीत गेलों पण मला कोणीं छुक म्हटलें नाहीं; मा० निषेध असतांच प्र०

छुत्, अ० छुक.

छू, अ० कुत्र्यास एखाद्यावर पाठवायाचा असतां या शब्दाचा प्रयोग करितात: छू करणें, म्हणणें म्हणजे पोर इ० कांस कज्जा, चेष्टा, इ० करण्याविषयीं प्रवृत्त करणें

छूरिका, स्त्री० सं० सुरी.

छूरिकाबंध, पु० सं० शूद्रांस मुंजीचे स्थानीं संस्कार आहे.

छेंकणें, क्रि० प्रथमार्थी

छेका, पु० रकम इ० खोंडण्याची जी वृण तो.

छेकापन्हुति, सं० स्त्री० काव्यादिकांत अलंकार आहे; उ० अग, शब्द करित करीत माझे पांई लागला, सखीनें पुसलें, भर्ता कायगे, तेव्हां ती म्हणले ही: घुंघुर तो.

छेटा, छट्टा.

छेडा, पु० छडा

छेद, पु० बारीक छिद्र, २, तकता, जमीन, इ० चीर पडल्ये तो; ३, वृक्षादि तोडण्याचा जो व्यापार तो; ४, तुकडे किं० भाजक, परंतु कांहीं एक राशि विवक्षित भाजकाने निःशेष भागला जात नाहीं म्हणून त्याचे खालीं भाजक मांडिला असतो त्यास प्रायः म्हणतात.

छेदक, वि० सं० छेदन करितो तो.

छेदणें, न० वृक्षादिकांस शस्त्रादिकानें खंडित करणें; २, मौक्तिकादिक छिद्रयुक्त करणें.

छेदन, न० छेदण्याचा जो व्यापार तें.

छेदनकोस, पु० जो कोस रेघेस किं० कोसास छेदितो तो.

छेदनबिंदू, पु० रेघ, कोस, इ० दुसऱ्या रेघ, कोस, इ० कानीं जा स्थळीं छेदिलें तत्स्थलनिष्ठ तत्स्थलदर्शक जो बिंदू असतो तो.

छेदनरेघ, स्त्री० जी रेघ कोसास किं० रेघेस छेदिते ती

छेदरेघ, स्त्री० जी सरळ रेघ वर्तुळ परिघास एकेकडे आंतून स्पर्शून त्याच परिघास दुसऱ्येकडे छेदून पार गेली ती.

छोटा, वि० लिं० लाहान.

छोटेरवानी, वि० लिं० मोठ्ये योग्यतेचा नव्हे जो मनुष्य, घोडा, वस्त्र, इ० तो.

ज

ज, पु० सांकेतानें, भोजनास स्व०, २, संस्कृत शब्दापुढें याचा योग झाला असतां तदुत्पन्न असा अर्थ होतो, उ० पंकज, अंडज, स्वेदज, इ०

जई, अ० ग्रं० जेव्हां या अर्थी

जकात, स्त्री० कोण एक स्थळापासून स्थळांतरी व्यवहारार्थ आणितात जो जिन्नस तत्संबंधी त्या त्या स्थळीं कि० मार्गांतील आगोजागचे नाक्यांवर जो राज कर द्यावा लागतो ती; तो त्याचे जकातीस द्यावा, तो त्याचे जकातीस पुरणार नाहीं, इ० स्थळीं तो त्या पेक्षां योग्यतेनें फारच उणा.

जकातदार, पु० स्त्री० ईण, जकातीचे कामावर नियुक्त करून जो सर्कारांतून अधिकारी ठेवितात तो.

जकात्या, पु० जकातदार; २, एक पक्षी आहे, जो इतर पक्ष्यांपासून एक एक पीस जकात सोडवितो, अशी प्रसिद्धि आहे तो.

जकेरा, पु० जांचा नित्यशः उपयोग लागत नाहीं असे जे चांगले कि० मोडके तुटके पदार्थ त्यांचा समुदाय तो, कि० विशेष उपयोगी नव्हत असे जे कागदपत्र एकाद्ये स्थळीं ठेविले असतात तो.

जखडणें, गोमहिष्यादि पशु, गांठोडें, इ० पदार्थांनें

घट्ट आंवळून बांधणें.

जरवम, ज़र्ब स्त्री० शस्त्रादिकांनीं पडलें जें क्षत ती; २, ला० कांहीं एका व्यापारांत जो चट्टा येतो ती; उ० यंदां साकरेचा व्यापारांत पांचशें रुपयांची जरवम आली.

जरवमपट्टी, स्त्री० जरवम बरी व्हावी म्हणून मलम इ० कांची जी पट्टी लाविताति ती.

जरवमी, वि० जरवम मुरव्यार्थानें युक्त झाला तो; २, ला० वादादि प्रसंगीं निरुत्तरत्वादि कारणामुळें जो पाडाव झाला तो.

जरवीण, स्त्री० सुवासिनी स्त्री मरून पिशाच होती ती.

जरवूव, वि० दडूत्वामुळें अति अशक्त झाला जो तो.

जररवल, वि० जरव.

जग, न० ईश्वरानें निर्मिला जो स्थावर जंगमात्मक प्रपंच तें; रा० जगा मुलकानें सोडलेला म्ह० केवल निरुपयोगी वाईट जो मनुष्यादि पदार्थ तो; म्ह० आपण भला तर जग भला, म्ह० आपण मेला आणि जग बुडाला.

जंग, पु० लोहखंड कि० तत्संबंधी शस्त्रादि बहुत दिवस वहिवाटींत नसल्यामुळें त्यांजवर जो मळ चढतो तो; उ० धर्मविचारबधूचा लोहाला कां न जंग लागावा; २, अनभ्यासामुळें अधीत विद्यादिकांवर जी मलिनता येती तो; उ० आवृत्ति न केली म्ह० अर्थात् विद्येवर जंग चढतो; ३, कांहीं एक व्यापारांत व्यापृत जो मनुष्यादि पदार्थ त्याणें त्या व्यापारीं विवक्षित काल पर्यंत ठरण्याचा जो प्रकार तो; उ० या घोड्या जोडयास नित्यशः घुघडतों तरी चौदा महिने जंग दिल्हा.

जगजाहीर, वि० लिं० जगप्रसिद्ध जी कांहीं एक गोष्ट, पदार्थ इ० तो

जगजेठी, पु० ग्रं० ईश्वर.

जंगजोड, पु० संजोग.

जगज्जीवन, पु० सं० जगजेठी; २, न० जगाचें जें प्राणधारण, कि० तत्साधन जें अन्नोदकादि तें.

जंगट, न० कांशाचें एक वाद्य आहे.

जंगडी, स्त्री० परस्परांनीं एकमेकास कधींही अंतर देऊं नये असा जो त्यांचा मित्रपणा ती; उ० या म्हशीची आणि त्या म्हशीची जंगडी पडली आहे यामुळें जिकडे जातात तिकडे दोघी बरोबर.

जगड्ढाळ, वि० लिं० अवाढव्य.

जंगणें, लोहादिकास जंग लागल्या मुळें त्याणें मलिनत्व पावणें.

जगणें, न मरतां कि० प्रसंगोपात्त जे नाश, व्यय, अपहारादि, ते न होतां राहाणें; उ० याची आई शंभर वर्षेंपर्यंत जगली, उ० भोवतालचीं दाहा घरें जळालीं पण यांचें घर जगलें.

जगती, स्त्री० सं० पृथ्वी, २ काव्यादिकांतील एक छंद आहे.

जगतीतल, न० सं० पृथ्वीतल.

जगत्, न० सं० जग.

जगत्कारण, न० सं० जग उत्पन्न करण्याविषयीं हेतुत्वें करून शास्त्रकारांनीं मानिलीं जीं ईश्वर, माया, प्रधान, परमाणू, इ० तीं प्रत्येकीं.

जगत्त्रय, न० सं० स्वर्ग, मृत्यु, पाताळ, या तिहीं लोकांचा

कांचा जो समुदाय तें.

जगदंबा, जगदंबिका, स्त्री० ईश्वराची जी मायारूप शक्ति ती, किं० तदंशभूत जा लक्ष्मी, पार्वती, इ० त्या प्रत्येकी.

जगदात्मा, जगदीश, जगदीश्वर, पु० ईश्वर.

जगद्वंद्य, वि० सं० जगांतील मनुष्यांस जो वंद्य तो.

जगनाड, स्त्री० भांडखोर, हाड, व्यभिचारिणी अशी जी स्त्री तीस ल०

जगन्नाथी, स्त्री० एक श्वेत वस्त्र आहे; २, पाणी प्यावयाचे उपयोगी पितळीचें एक पात्र आहे.

जगप्रसिद्ध, वि० सं० जगताचेठायीं गुणादिद्वारा प्रसिद्ध झाला जो पुरुष, पदार्थ, गोष्ट, इ० तो.

जंगम, वि० आपल्ये स्वशक्तीनें चलनवलनादि व्यापाराविषयीं समर्थ जो मनुष्य, पशु, इ० तो.

जंगम, पु० (स्त्री० ईण,) हिंदूंत एक जाति आहे.

जंगमदवळें, न० रा० कोणा एकास्थळीं लग्नादि प्रयोजनामध्यें जी आचारविचारशून्यतारूप अवस्था होती तें.

जंगमपट्टा, पु० स्त्रियांचे कपाळीं लाविला असतो जो मोठा कुंकवाचा पट्टा त्यास निंदेनें ल०

जंगमशेटाई, स्त्री० कों० ओढून आणिली जी प्रतिष्ठा ती; उ० एथें तुमची जंगमशेटाई कोणी मानणार नाही.

जंगल, न० अरण्य, २, पु० दे० एक रांधा आहे जाचा हिरवा रंग होतो तो.

जंगलगर्क, वि० जंगल वाढल्यामुळें आच्छन्न झालें जें स्थळ, शेत, इ० तो.

जंगला, पु० जंगल द्वितीयार्थी. २, एक राग आहे.

जंगली

जंगली, वि० आरण्यक जो पदार्थ किं० मनुष्यादि तो; २, रा० फणस, साग, शिसव, अशा मोठ्या वृक्षांवांचून इतर वृक्षांचीं जीं घरास काढिलीं लांकडें तीं.

जंगली हरडा, जंगली हिरडा, पु० हरडयांत एक भेद आहे.

जगावणें, दे० कोणा एकास कांहीं एक पुढें होणाऱ्या गोष्टीविषयीं यत्किंचित् सूचनादिद्वारा सावध करणें.

जंगी, स्त्री० किल्ला, गृह, इ० कांचे भिंतीस किं० गलबतास आंतून बाहेर गोळी मारावी इत्यादि अर्थी जीं गवाक्षें ठेविलीं असतात तीं प्रत्येकीं.

जंगी भोंवरा, पु० पोकळ, छिद्रयुक्त मुलांचा खेळावयाचा भोंवरा.

जघन्य, न० गुप्त असावी अशी जी कांहीं एक गोष्ट तिची जी अति प्रसिद्धि तें; २, सं० अधम; ३, चरम जो तो.

जंघा, स्त्री० सं० पायांची जी पोटरी ती.

जंजाळ, पु० अंतःकरणास त्रास देणारा जो संसारादि संबंधी मुलें बाळें, गुरें वासरें, कृषिकर्म, इ० खटला तो, किं० चे त्याचे त्याचे निर्वाहाविषयीं जी अनेक प्रकारची खटपट तो; उ० ही पोरें हा माझे पाठीशीं मोठा जंजाळ आहे; उ० माझानें आतां शेतें, भातें, हे जंजाळ होतनाहींत.

जंजिरबंद, वि० अप्रामाण्य शंकानिरासक पूर्वापरसंगतवारपणा इ० जीं अनेकसाधनें तींहीं करून युक्त जो शिलकबंद, खातें, इ० तो

जंजिरा, पु० جزیرہ हिं० पाण्यांतील जो किल्ला तो.

जंजिरी, स्त्री० زنجیر सारखळी, परंतु प्रायः घड्याळांतील

तीलच प्रसिद्ध जीचा योगानें घड्याळ चालतें तो.

जंजीर, स्त्री० जंजीरी.

जट, पु० कांहीं एक कार्यकरण्याविषयीं अनेक मनुष्यांचें जें ऐकमत्य तो, व तद्युक्त समुदाय तो; उ० सर्वांचा जट असल्याखेरीज एखादें काम तडीस जात नाहीं.

जट, स्त्री० शिरवाडूं० संबंधी जे लांब लांब केश ते परस्परांशिकडून पेकूसारिखा जो आकार होतो तो.

जटणें, अनेक मनुष्यानीं कांहीं एक कार्याविषयीं ऐकमत्य पावणें; उ० सर्वग्रामस्थ जटले तेव्हां उपाय चालेनासा झाला.

जटा, स्त्री० सं० जट.

जटा, पु० जट.

जटागोर, स्त्री० एक औषधी आहे.

जटाजूट, पु० जटासमुदाय गुंडाळून मुकुटाकार जो करितात तो.

जटाधारी, वि० जाचे मस्तकीं जटाभार आहे असा जो गोसांवी तपस्वी इ० तो.

जटाभार, पु० मस्तकीं राखलेला जो जटांचा समुदाय तो, उ० जटाभार बाळगल्यानें केवळ साधुत्व येतें असें नाहीं.

जटामांसी, स्त्री० एक औषधी आहे

जटिल, वि० जटाधारी.

जटिली, वि० जटिल; २, गोसांवी इ० कांचा रसायन करण्याचा एक प्रकार आहे तो, व त्या प्रकारानें सिद्धजें रसायनादि तो.

जठर, न० उदर सुरव्यार्थी.

जठराग्नि, पु० भक्षित अन्नादिकाचा परिपाक करणारा जो जठरस्थ अग्नि तो.

जड, वि० भारविशिष्ट जो पदार्थ तो, उ० सर्वधातूंमध्यें सुवर्ण जड आहे; २, दुर्निर्वह जो कांहीं एक व्यवहारादि तो; ३, दुश्चिकित्स जो रोगादि तो, उ० या रोगापायीं दुरवणें बाबा जड दिसतें अजून असा; ४, वि० बुद्धि, जिह्वा, हस्त, इ० कांचीं विषयाकलन, अक्षरोच्चार, लेखन, इ० जीं कर्में त्यांविषयीं अकुशल, मंदजीं बुध्यादिक तो; उ० याची बुद्धि जड आहे, याचा हात जड आहे; ५, देण्याविषयीं उदार नव्हे असा जो हस्त तो; उ० जाचा हात जड असतो त्याचें आर्जव करून कोठें द्रव्य मिळत असतें; ६, जाचें वचनादिक सर्वांस मान्य करावें लागतें असा जो मनुष्य तो त्या समुदायांत, उ० या सभेंत राम शास्त्र्या एवढा जड ब्राह्मण दुसरा नाहीं; ७, मोल्यादिद्वारा अधिकयोग्यतेचा जो पदार्थ तो, उ० त्या शालेपेक्षां ही शाल किंमतीनें जड आहे; ८, शैत्यादिविकृती मुळें भारविशिष्ट सें वाटतें जें मस्तकादि तो; उ० पडशानें डोकें भारी जड झालें बाबा; ९, न० दुर्निर्वह जें कांहीं एक संकट तें; उ० अं० पडतांजड भारी, दासें आठवाबाहरी; बुद्धिचाजड, हातापायाजड, जिह्वेचाजड, इ० स्थळीं बुध्यादिक जाचीं जड आहेत; बुद्धिचाजडास कोणी केवळ जडही ह्म० जडसांगणें, जडजाणें, इ० स्थळीं रोगादिकांचीउपेक्षा, व कांहींएक कार्याविषयीं हेगय, केल्यामुळें त्या त्या रोगादिकानें परिणामीं संकटांत पाडणें, आसनजड होणें, गांडजड होणें, ह्म० कोणाएकास प्रतिष्ठेमुळें गर्व चढणें; १०, स्त्री० कोणएक संबंधी जी द्रव्याची पुंजी ती. उ० त्याची लाखरुपयांची जड आतांशीं आहे.

जड, १लिं० अचेतन जो पदार्थ तो; २, जड.

जडअवघड, न० व्यवहारामध्यें शंकाविषयजो कांहीं आकस्मिक घातपात तें; उ० चार पैसे थाळगून डेबावे जडअवघड तर आपल्यालाच कामास येतील.

जडकावणें, दे० रोग पर्जन्य इ० कानीं पूर्वावस्थेपेक्षां अधिक होणें; उ० दोन दिवस अपथ्य करितांच ताप जडकावला.

जडजवाहीर, न० हिं० सोनें, हिरे, माणीक, पाच, इत्यादियुक्त जे दागिने त्यांस ल०

जडओरवींव, न० संभाव्यमान जो कांहीं अनर्थापात तें, उ० एवढे रुपये वाटेनें एकटा कसे नेउं, जडओरवींव पडलें तर मग कसें होईल.

जडण, स्त्री० विवक्षित अवयवी सिद्ध होई असे अनेक पदार्थ यथायोग्य एकत्र संबद्ध करण्याचा जो व्यापार किं० प्रकार ती, उ० सर्वपदें मनांत आल्याविना अन्वयाची जडण होणार नाहीं; उ० या सांध्याची जडण चांगली आहे.

जडणी, स्त्री० जडण,

जडणें, उ० विवक्षित अवयवी सिद्ध होई अशी जडण करणें, उ० चार कागदजडून पुष्टिपत्र तयार केलें; २, हिरा, माणकी इ० कोंदणांत बसविणें, उ० या आंगठीस हिरा जडून दे; ३, स्वस्वामिभावसंबंधानें कोणएकानें कोणएकाशीं युक्त होणें किं० करणें; उ० हा नवाच त्यापाशीं चाकर जडला; ४, कांहीं एक अधिकारादिक किं० शरीरास रोगादिक किं० स्वभावास व्यसनादिक पूर्वीचीं नसतां दुर्निवारपणें प्राप्त होणें; उ० वृद्धापकाळपणावर दुसऱ्या स

स पाठवूं नये जडलातर सुटायास जड लागेल; उ० आलिकडेसच त्याला नळवायु जडला; तोन्यास वेडावून नये तीच खोड आपल्याला जडती.

जडप, न० रा० जडणी; २, कांहीं एक युक्तिसाध्य जो गोष्टीचा योजिल्या युक्तिमध्यें घेण्याचा जो प्रकार तें, उ० हें कूर लावावें म्हणून म्हटलों पण जडप बसत नाहीं.

जडबुद्धि, जडमति, १लिं० बुद्धिचा जो जड तो.

जडशील, १लिं० दे० अतिशयित भारविशिष्ट जो पदार्थ तो; उ० त्या दोरीपेक्षां ही दोन जडशील आहे.

जडाजड, स्त्री० अनेक पदार्थ जडण्याचा जो व्यापार ती.

जडाव, पु० एक अवयवी सिद्ध होई असे अनेक अवयव जडण्याचा जो प्रकार तो; उ० या श्लोकाचा जडाव चांगला आहे; २, अलंकारादिकांवर हीरकादिकांचें जें संयोजन तो; उ० या साध्ये पोंचीवर जरा हऱ्यांचा जडाव केला तर फारच खुलेल; ३, कांहीं एक अधिकारादिकावर कोणाएकाचा जो जडले पणा तो; उ० या नामलतीवर माझा जडाव झाला असतां मी तुला विसरणार नाहीं.

जडावणें, मंदपणें पडणारा जो पर्जन्य किं० मंदगतीनें वाढणारा जो रोगादिक किं० थोडा थोडा चालत लेला जो सावकारी इ० व्यवहार त्याणें अधिकावस्थेतें पावणें; २, अल्पप्रतिष्ठ मनुष्यानें लक्ष्मी इ० कांचे योगानें जड होणें; उ० तो गृहस्थ भिकारी होता पण डबोलें सांपडतांच जडावला; ३, ओझें, शरीर, इ० कानीं जड होणें किं० जडसें वाटणें; उ० सपाट वाटेनें कसें तरी ओझें झेंपतें पण चढणला-

गली स्त्र० जडावतें.

जडी, स्त्री० वृक्षादि कांची जी मुळी ती; २ रा० जडी रुतणें स्त्र० कांही एक अधिकारादिकांचा ठायीं कोणएकानें पुरतेपणी लागू होणें; उ० या दरबारांत माझी जडी रुतली तर तुझें कार्य करीन.

जडीबुटी, स्त्री० औषधोपयोगी मुळ्या, पाला, भस्म, इ० ती, ला० गुप्तठेविलेलें जें कांहीं थोडें बहुत नग नगोटें व रुपये इ० ती; उ० त्यापाशीं कांहीं जडीबुटी होती ती चट्ट दुकाळाचे वर्षीं मोडून खाल्ली.

जडींव, ३लिं० कांहीं एक पदार्थास मुळचा नसून नवा जडला जो अवयव तो; उ० या पागोट्याचा पदर जडींव आहे; २, एकसंधी नव्हे असा जो काष्ठ पाषाणादि संबंधी पदार्थ तो, उ० अरे ती साण जडींव आहे जपून उचल.

जडया, ३लिं० जडावाचें काम करून त्याजवर उपजीविका करितो तो: २, मुळचा संबंधन सतां कांहीं एक अधिकारादिकावर युक्तीनें जो जडला तो, उ० हा कांहीं प्राचीन या गांवचा उपाध्याय नव्हे जडया आहे.

जण, ३लिं० संख्येनें संख्यात जो प्रायः मनुष्य तो, या अर्थीं दोन, तीन, या शब्दांवांचून इतर संख्यावाचक शब्दांपुढे याचा योग होत असतो; उ० आम्हीं पांचजण एथे आहों, उ० दोघीजणी बायका स्वयंपाक करितात आणी दोघेंजणें पोरें खेळताहेत.

जणु, अ० प्रायः उत्प्रेक्षेचें द्योतक; उ० सुरवदिसतें जणु चंद्र उगवला.

जंत, पु० पोटांत काडूंसारिखे कृमि उत्पन्न होत असतात ते प्रत्येकीं.

जतन, स्त्री० पालन पोषणादिद्वारा आस्थापूर्वक उत्तमरीतीनें जें रक्षण ती; उ० या वांसराची जतन करशील तर तुला फुकट देतों; उ० जतन केल्यावांचून गाय अधिक दूध देत नाहीं; उ० या शाळेची जतन केली तर तुमचे मुलाचे देखील जन्माला पुरेल; २, ३लिं० विधि सुरक्षितपणें, उ० माझी एवढी वस्तू जतन देव बरें का, जतनेस पालणें, असणें, इ० स्त्रीं जतन होई अशी ठिकाणीं कि० सोयींत; उ० हे दागिने कोठेंतरी जतनेस लावून मी येईन.

जतनावणें, रा० कांहीं एक पदार्थ निगेनें सुरक्षित सरवणें.

जतने, अ० शूद्र० मोठया युक्तीनें संभाळून. चाल, उतर, चढ, इ० कांचें वि०; उ० बुळबुळीत झाड आहे जतने चढ नाहीं तर पडशील.

जंतरमंतर. न० पु० दाणादोणा.

जंतवाताळें. न० दे० कृमिवाताळें.

जंतविकार, पु० पोटामध्यें जो जंतांचा विकार होतो तो.

जतावणें, कांहीं एक गोष्ट एरवाद्यानें विसरूं नये स्त्र० पून त्यास स्मरावून सांगणें.

जती, पु० मुळचा अविवाहित असून संन्याशासारिखा असतो असा जो मार्वाडी गुजराथी लोकांचा गुरु तो.

जंतु, पु० सं० यावत् प्राणिमात्र.

जंत्र, न० यंत्र; २, सोनें, रुपें, इ० कांचा तारा करायाचे उपयोगी अनेक छिद्रांकित एक पोलादी पट्टी आहे; जंत्रीं ओतलेला स्त्र० अतिशयित जो सुरेख तो.

जंघीं धरणें, स्र० कोणाएकाच्या धरकीं धरणें; जंत्रांतून ओढणें इ० स्थळीं मनस्वी दांडगाई करूं लागला जो कोणी तो ती दांडगाई सोडून नरम येई अशी शिक्षा करणें; उ० या मुलाला शाळेंत घाला तसा, पंतोजीनें एकदां जंत्रांतून ओढला स्र० चांगला नरम येईल.

जत्रा, स्त्री० जा जा देवतेचा जो जो कांहीं नियमित दिवस असतो त्या त्या दिवशीं अनेक भक्तजनानीं दर्शनास यावें कथा. गोंधळ. इ० करावें असा जो समारंभ तो, कि० त्या समारंभास मिळालेला जो मनुष्यसमुदाय तो; २, देशांतरस्थ देवाचे दर्शनार्थ जें गमन तो.

जत्रेकरू, जत्रेकरी, २ लिं० जत्रे संबंधी जो मनुष्यसमुदाय तो.

जथणें, जा कार्याचे उपयोगी जे अनेक पदार्थ ते युक्तीप्रयुक्तीनीं संपादून तें कार्य सिद्ध करणें; उ० त्याणें युक्तीसामिळवामिळव करून संसार जथला होता तों इतक्यांत बायको संपली; उ० चौघांकडून चार वांस कटया मेळवून आणून एकदांचें घर जथलें; विवक्षित संख्यादि पर्याप्त द्रव्य, धान्य इ० युक्तिप्रयुक्तीनीं जमविणें; उ० मी मोठया युक्तीनें हजार रुपये जथले होते ते चोरानें नेले.

जथा, पु० कांहीं एक कार्यार्थ जमलेला जो मनुष्यसमुदाय तो; २, रा० कोणएक कुलामध्यें जे उत्पन्न होतात त्यांजवर साधारण कांहीं एक धर्म उत्पन्न होत असतो त्यास कारणभूत जो कुलनिष्ठ धर्मविशेष तो.

जथापत, स्त्री० रा० कांहीं एक कार्योद्देशानें अनेक पदार्थांचें अनेक युक्तींनीं जें संपादन तीं, कि० तत्संपादनद्वारा विवक्षित कार्याचें जें साध्यदशानयन तीं; उ० एकाचे बैल एकाचा नांगर एकाचें जोरवड मेळवून सरासरी जथापत केली; २ दे० अव्यवस्थित पणें पडलेले जे अनेक पदार्थ ते ठाकठीक सोयीनें लावून ठेवण्याचा जो व्यापार तो.

जथावळ, स्त्री० जथा द्वितीयार्थी.

जथीं, अ० जा दिवशीं; उ० जथीं तुलीं घाल तथीं मीं येईन.

जन, पु० न० जगांतील जो जीवसमुदाय तो, तें, उ० स्वजन, स्र० कुट्यांचा समुदाय तो; २, प्रायः विवक्षित ग्रामादिसंबंधी जो मनुष्यसमुदाय तो, उ० जनाचे तोंडीं लागतां पुरवत नाहीं; स्र० जनीं जनार्दन; स्र० मान सांगावा जना, आणि अपमान सांगावा मना; स्र० जनांत एक आणि मनांत एक.

जनक, पु० सं० बाप; २ जा वस्तूचा उत्पत्तिकारणसमुदायामध्यें मुख्यत्वेंकरून जो विवक्षित तो; उ० घटाचा जनक कुंभार; याचे समास. हास्यजनक. भयजनक. प्रीतिजनक, इ० होतात.

जनकथा, स्त्री० पुराणादिकांचे ठायीं मूळ नसून जी केवळ वृद्ध परंपरेनेंच मांजर ही वाघाची मावशी इ० जा प्रसिद्ध गोष्टी अनादिसिद्ध चालत आल्या आहेत ती.

जनजाहीर, २ लिं० जगजाहीर.

जनन, न० सं० उत्पत्ति.

जननी, स्त्री० सं० आई; कोणएकाची जननी बिणें इ० स्थळीं कांहीं एक दुष्कर कर्म करण्याविषयीं कोणएकानें समर्थ होणें.

जनपद. पु० सं० देश.

जनप्रवाद. पु० कागद. पत्र, इ० कांहीएक प्रमाण नसतां कर्णोपकर्णी ऐकून जा गोष्टी बोलत असतात तो.

जनप्रवाह, पु० सकल जनसाधारण जी रीति तो.

जनमर्यादा, स्त्री० अनादिसिद्ध परंपरेनें असें वर्तावें असें वर्तूं नये अशी चालत आली जी लोकरीति ती.

जनरंजन. न० जनास संतोष करावा असेंजें स्वाराबरपुराण सांगणें, कीर्तनादि करणें, इ० आचरण तें.

जनरीति, स्त्री० जनप्रवाह.

जनलज्जा, स्त्री० लोकसंप्रदायविरुद्ध आचरण करण्याविषयीं जी लोकसंबंधी लज्जा ती.

जनलोक. पु० यद्यपावत्सर्व मनुष्यमात्र तो; उ० तूंलहाडा केलीस असें सर्वजनलोक बोलतो.

जनवार्ता, स्त्री० जनप्रवाद.

जनव्यवहार, पु० जनप्रवाह.

जनशिरस्ता, पु० कांहीएक गोष्टीविषयीं प्रमाणभूत जो लोकसंप्रदाय तो, उ० जनशिरस्त्याप्रमाणें व्याज देत असतां घेतनाही झक मारतो.

जनाचार, पु० जनरीति.

जनानरवाना, पु० राजादिसमर्थलोकांचेंजें अंतःपुर तो.

जनानी, वि० स्त्री; पुरुष. एतदुभयोपयोपभोग्य जे सुगटा, पितांबर इ० पदार्थ त्यांत वेलक्षण्यें करून केलेले जे केवल स्त्रियांचे उपयोगी ते ते पदार्थ तो; उ० जनानी सुगटा पाहिजे असल्यास मजपाशीं आहे; २, स्त्रियांचे जे भाषणादिव्यवहार, गळा इ० तो बन्या गळ्यानें गावयाचे उपयोगी जो

जो ख्याल, टप्पा. इ० गाणें तो. उ० हा गाण्यें खरी पण गळा मर्दानी पडला जनानी असता तर शोभतें. ३, स्त्रियांसारिखें जाचें भाषणादिक तो मनुष्य बस्त्याचें तें भाषणादिक तो.

जनापवाद, पु० वास्तविक दोष घडला नसून हा दोषी अशी सर्वत्र प्रसिद्धि होत्ये कि० असत्ये तो उ० लीलावतीचे गणित शिकतो तो दरिद्री होतो असा जनापवाद मात्र आहे पण खोटी गोष्ट.

जनावर, न० हस्त्यश्वव्याघ्रादि पशु. व सर्पादि सरपटणारे प्रत्येकीं.

जनि, स्त्री० सं० जनन.

जनित, वि० सं० उत्पन्न; प्रयोग समासीं; उ० क्रोधजनित संताप कोठें शांति पावून जात असतो?

जनिष्यमाण, वि० सं० भविष्यत्कालीं उत्पन्न होणारा जो तो.

जन्म, न० पु० जनन, लोकामध्यें मातापितर यांचे उदरवाचकशब्दसंबंधानें प्रयोग; रूढ० जन्मदिवसापासून वक्रविबक्षेनें उपात्त जो काल तो, तें; उ० हा जन्मांत अजून खोटें बोलिला नाहीं मग पुढें न सांगवे, जन्मदेखणें, पाहणें, स्त्रीनें प्रथम रजस्वलात्व पावणें.

जन्मकरंटा, वि० जन्म झाल्यापासून जो करंटा तो,

जन्मकाल, जन्मकाळ, पु० जन्म होण्याचा जो समय तो; २, तत्कालीं विद्यमान जे वत्सर, तिथि, वार, नक्षत्रादि तेजा कागदावर लिहिले असतात तो कागद; उ० मुलीचा जन्मकाळ दारवा स० कांगल्ये नक्षत्रावर जन्मली तें समजेल.

जन्मकुंडली

जन्मकुंडली. स्त्री० जा लग्नीं जन्म होतें त्या लग्नींचें ग्रह पाहून या करितां जें द्वादश राशिचक्र लिहितात तें.

जन्मखोड, स्त्री० जन्मल्या पाण्यास त्या काळापासून जी कांहीं एक खोड प्राप्त होत्ये तीं; उ० पाय काढीत चालावें ही त्याची जन्मखोडच आहे.

जन्मगांठ, स्त्री० जन्मपर्यंत जी स्त्रीपुरुषादिकांची संगत ती.

जन्मजूग, वि० जन्मपर्यंत पुराया जोगा जो वस्त्रालंकारादि पदार्थ तो.

जन्मणें. क्रि० एकानें जन्म पावणें; २, अपत्यानें प्रसवणें

जन्मतः, अ० जन्मास आल्यापासून; इ० कोणी जन्मतः चतुर असतो. कोणी पदरचानें होतो.

जन्मदरिद्री. वि० जन्मापासून जो दरिद्री तो.

जन्मदिवस, पु० जा तिथीस जाचें जन्म झालें ती प्रतिवर्षसंबंधिनी त्याची तिथि तो; उ० रामचंद्राचा जन्मदिवस चैत्र शुद्ध नवमी.

जन्मनक्षत्र. न० जा नक्षत्रावर जाचें जन्म झालें तें दिवसनक्षत्र त्याचें.

जन्मनाम, न० जन्मनक्षत्राचा संबंधानें अवकहडाचक्रावरून जें नाम ठेवितात तें.

जन्मपत्रिका, स्त्री० जन्मकालीन ग्रहादिकांचें शुभाशुभफल जींत लिहिलें असतें अशी जी पत्रिका ती.

जन्मप्रभृति, अ० जन्मत.

जन्मभूमि, स्त्री० जा ग्रामगृहादिस्थलीं जाचें जन्म झालें तें ग्रामगृहादिस्थल त्याची.

जन्मभूमिका, स्त्री० जन्मभूमि.

जन्ममरण,

जन्ममरण, न० जन्मावें मरावें अशीजी पुनः पुनः पर्यायाधायीं एरझार तें.

जन्ममास, पु० जा मासांत जाचें जन्म झालें तो त्या-था.

जन्मयोग, पु० शुभाशुभफलसूचक जो जन्मकालीन ग्रहांचा योग तो.

जन्मराशि, पु० जाचा जन्मकालीं जा राशीस चंद्र असतो तो राशि त्याचा.

जन्मलग्न, न० जन्मकाळचें लग्न.

जन्मसवाशीण, स्त्री० जीस येैधव्य प्राप्त होत नाहीं अशी जी वेश्या, वटीक, इ० स्त्री तीस स्त्र०

जन्मसावित्री, स्त्री० जन्मपर्यंत जी सौभाग्यवती स्त्री ती, क्रि० सुवासिनी स्त्रियांस आशीर्वादार्थ. यानें हे शब्दाचा प्रयोग करितात; २, ला० बहुत दिवस नथुतल्यामुळें नाहक सोंवळ्यास योग्य नहे असें जें सोंवळ्याचें भावळीइ० वस्त्र ती.

जन्मसोंवळा, वि० एकवार सोंवळा झाला असतां स्पर्शादिदोष घडला तथापि जास मला विटाळ झाला ही शंका देखील वाटत नाहीं असा जो अमंगल मनुष्य त्यास निंदेनें स्त्र०; २, जन्मसावित्री द्वितीयार्थी; उ० हा मुगटा जन्मसोंवळा आहे.

जन्मस्थान, न० जन्मभूमि.

जन्मस्वभाव, पु० कोणि एकाचा उपजत जो अंगस्वभाव तो,

जन्माचा, वि० जन्मापासून प्राप्त झालेला जो रोग, दरिद्र, दुर्गुण, इ० दोष तो; उ० हा जन्माचा रोग कोठें असल्या हलक्या औषधांनीं जात असतो; २, तद्विशिष्ट जो मनुष्यादि तो; उ० जन्माचा रोगी, दरिद्री,

रिद्री, इ०; २, जन्मपर्यंत तन्नदूपेंकरून राहावयाजोगाजो तो; उ० दादला जो आहे हा जन्माचा सांवती; जन्माचें पांघरूण, इ०; उ० त्या बादावरून शेवटीं याचें आणि त्याचें जन्माचें वांकडें पडलें; दे० जन्माचा पादा बरंबटा घेणें, स्व० एखाद्याचा पालन पोषणादिकाविषयीं जन्मपर्यंत पत्करघेणें; जन्माचें दरिद्र, दळात, आणें इ० स्थलीं भोग्या पुष्यावधि दरिद्रादि आणें, जन्माची भाकर, जन्माचें अन्न, स्व० उपजीविकासाधन जी वृत्ति ती, तें; जन्माचें सार्थक करणें, स्व० पुण्ययशादि संपादनद्वारा कोणएकानें कृत कृत्यता पावणें.

जन्माचे कर्मी, अ० कधींचे काळीं.

जन्मांतर, न० अन्य जें जन्म तें; २, दैव; उ० माझें जन्मांतर लक्ष्मी प्राप्त व्हावी असें नव्हे.

जन्मादारभ्य, अ० जन्मतः.

जन्मांध, वि० उपजत जो आंधळा तो.

जन्य, वि० सं० उत्पद्यमान जो तो; उ० ईश्वरातिरिक्त सर्व पदार्थ जन्य आहेत.

जन्यजनकभाव. पु० जन्य आणि जनक या उभयतांचा जो परस्पर संबंध तो.

जप. पु० ईश्वरनाम, मंत्र, इ० कांचा अनेकवार मनामध्यें उच्चारणाचा जो व्यापार तो; कि० स्तोत्रादिकांची जी मनामध्यें एक आवृत्ति तो.

जपजाप्य. न० जपादिकजें पुण्यकर्म तें; उ० सकाळीं स्नान करून जपजाप्य करावें लागतें यामुळें उशीर होतो.

जपणी, स्त्री० कोणी भृत्यादिक गमेल, कि० चोरादिक डोळा चुकवून जाईल इत्याद्यर्थ त्याजवर लक्ष्य ठेवण्याचा जो व्यापार ती.

जपणें, जा वस्तूचा विवक्षित जो प्रकार कि० परिणाम त्यांत अंतर न पडावें म्हणून निरंतर लक्ष्य तिकडेच ठेवणें; उ० पथ्यास जपलें असतां औषधाचा गुण लोकर येतो; हंगामी जपलें तर जिन्नस सबंग मिळतो, रोजगार लागला असतां जपून वर्तावें नाहींतर खांद्यावर गांठोडें येतें.

जपणें, जप होई असा व्यापार करणें; २, ला० कांहीं एक गोष्ट वारंवार उच्चारणें; ३ कानांत जपणें, स्व० एखाद्याची बुद्धि, वृत्ति, फिरे अशी त्याचे कानांत कांहीं एक गोष्ट सांगणें; उ० तो काल होय म्हणाला होता पण कोणीं त्याचे कानांत जपलें म्हणून आतां नाहीं म्हणतो.

जपमाळ, स्त्री० जपाची संख्या धरायाची जी माळ ती; जपमाळ घेणें. एथे कांहीं एक गोष्टीची घोकणी करणें.

जपा, स्त्री० सं० आस्वनीचा वृक्ष.

जपाकुसुम, न० आस्वनीचें पुष्प.

जपी, वि० निरंतर जपकरित असतो तो.

जप्त. वि० सर्कारानें अटकाव्यांत ठेविला असा जो वतन, वाडी, शेत, गृह, इ० विषय तो.

जप्ती, स्त्री० प्रजादिकांचा वतन, वाडी, इ० विषय जप्त करण्याचा जो व्यापार ती.

जबडा, पु० दंतपंक्तीपासून जो मुखाचा अधःप्रदेश तो; उ० वाघाचे जबड्यांत सांपडलेला जीव सुटणें कठीण.

जबर, वि० विद्या, द्रव्य, बळ, इ० कानें जो अधिक तो; २, गंजिफांचे खेळांत खेळणारांचे डाव्या बाजूचा

चा जो खेळगडी तो.

जबरदस्त, वि० जबर.

जबरदस्ती, स्त्री० कोणएकावर निग्रह करण्याविषयीं जो जबरदस्तीचा व्यापार तो.

जबरा, वि० जबर पहा मार्थी.

जबरी, स्त्री० जबरदस्ती.

जंबा, पु० कटारीचें आकाराचें एक शस्त्र आहे.

जबानी, स्त्री० वादी, प्रतिवादी, साक्षी, इ० कांपासून वादनिर्णायकांनीं लिहून घेतला त्याचा त्याचा मजकूर तो.

जबाब, पु० جواب हिं० प्रश्नावरलें जें उत्तर तो.

जबाबी, वि० جوابی हिं० जबाब करण्याविषयींजो कुशल तो; २, तास भरला असतां तन्मात्र बोधक टोला जापासून आपोआप वाजतो अशा घड्याळाचें वि०.

जंबू, न० जांभूळ.

जंबुद्वीप, न० क्षारसमुद्रवलयांकित द्वीप.

जंबुरा, पु० زنبورہ लाहान तोफ.

जंबुर्दी, पु० زمردی एकरंग आहे; २, वि० तद्विशिष्टजी सरबलाद इ० तो

जंबूक. पु० कोल्हा.

जबेकरणें, स० तरवार इ० कांनीं कोणा एकास ठार मारणें.

जबेफराशी, स्त्री० समर्पक जें उत्कृष्ट वक्तृत्व तो; उ० जबेफराशी नाहीं तो कार्कून काय कामाचा.

जम, पु० جمع हिं० अनेकसाधनसाध्य जी कांहीं एक गोष्ट त्या साधनाचे आनुकूल्य झाल्यामुळें त्या गोष्टीचा सोईनें जो चालूपणा होतो तो; उ० घरबांधायाचें योजिलें होतें परंतु अद्यापि जम बसत नाहीं; २, कांहीं एक पदार्थांचा परस्पर संयोगादिसंबंध झाला असतां कांहीं एक चमत्कारिक विशिष्ट गुण उत्पन्न व्हाया जोगा जो त्यांचा आनुकूल्य भाव तो; उ० झुणका आणि भाकर यांचा भला जम पडतो; त्याणें आपल्ये कडून कीर्तन चांगलें केलें पण जम पडला नाहीं.

जमखाना, पु० جمخانہ हिं० मनरंजनास स्थ०

जमवाजमव, स्त्री० विवक्षितकार्योपयुक्त जे अनेक पदार्थादि ते अनेकप्रकारांनीं एकत्र जमविण्याचा जो व्यापार तो.

जमणें, समुदित होउन राहाणें; उ० सर्व ग्रामस्थ देवळाशीं जमलें आहेत; २, द्रवभूत पदार्थानें घट्ट होणें; उ० नूतन व्यालेल्या म्हशीचे दुधास अग्निसंयोग होतांच पट्कन जमतें; ३, कांहीं एक कार्याचीं अंगभूत जीं अनेक साधनें तीं तत्तद्रूपें अनुकूल झाल्यामुळें तें कार्य सोईलालागणें; उ० आठदिवस लग्नाची घाटाघाट करीत होतों पण जमलें नाहीं; ४, कांहीं एक व्यवहार, अरण्य, शरीर, इ० भरपूर निबिड दिसायाजोगें परिपुष्ट होणें; उ० पहिल्यापेक्षां आतां त्याचा संसार भारी जमला; त्या ठिकाणचा गांव मोडतांच एका वर्षानें रान जमलें; त्याणें एक महिना मंडूर खातांच शरीर जमूं लागलें; ५, विवक्षित गुण यथास्थित उत्पन्न व्हाया जोगा अनेकांचा परस्पर संयोगादिसंबंध होणें; उ० भाकरीचें आणि झुणक्याचें चांगलें जमतें; ६, विवक्षित कार्याविषयीं योजिली युक्ति लागू पडणें; उ० हा

श्लोक

श्लोक लावण्याविषयीं कोणतीही युक्ति जमत नाहीं; २, पुराण गायन भाषण इ० रंग भरित होणें; उ० श्रोते प्रेमळ असले ल० पुराण चांगलें जमतें.

जमनीस, पु० पांतांतील जी सरकारी जमा जमत्ये तिजवरील एक अधिकारी आहे.

जमा, स्त्री० جمع हिं० क्रयविक्रयादि व्यवहारीं आयविषय व्यवहार्यमाण जें द्रव्य तो. जमा करणें एथे दुसऱ्याकडून आलेलें द्रव्यादिक आयप्रकरणीं लिहिणें किं० अनेकत्रस्थित पदार्थांतें एकत्र करणें, असा अर्थ, जमा धरणें, एथें जमा करणें प्रथमार्थानें युक्त करणें; २, ला० कांहीं एक प्रकरणांत कांहीं एक पदार्थांचें जें परिगणन तो; पा० निषेध विषयीं प्र०; उ० आमचीं थोगांतहीं जमा नाहीं आणि पोरांतहीं नाहीं; आलीं काय जमेत नाखचीत इ० स्थलीं अप्रयोजकत्वेंकरून गणनीय.

जमारवर्च, पु० दुसऱ्येकडून आलेला ऐवज जमा धरून खर्च लिहिण्याचा जो व्यापार तो, २, आयव्ययांचें जें प्रकरण तो, जमारवर्च बरोबर, म्हणजे कांहीं स्वार्थ झाला आणि तदुत्तर कांहीं अस्वार्थ झाला असा योग असतां प्र०; उ० चार पोरें झालीं आणि चार गुरें मेलीं, एकूण जमा खर्च बरोबर.

जमारवर्ची, ३ लिं० जमारवर्चीचे लिहिण्याविषयीं जो कुशल तो; उ० तो कार्कून जमारवर्ची चांगला आहे; २, जमारवर्ची संबंधी जें लिहिणें, कागद, पत्र, इ० तो; उ० आलीं भिक्षुक आलास जमारवर्ची कागदांत काय समजतें.

जमात, स्त्री० جماعت हिं० एक कार्योद्देशें करून किं० एकाचे सत्तेखालीं विद्यमान जो मनुष्यसमुदाय तो.

जमातदार, पु० جماعدار हिं० जाचे सत्तेखालीं शिपाई लोकांची जमात असत्ये असा एक अधिकारी आहे.

जमातदारी, स्त्री० جماعداری हिं० जमातदारपणा.

जमादार, पु० جمعدار हिं० जमातदार.

जमादारी, स्त्री० جمعداری हिं० जमातदारी.

जमादिलआखर, पु० جمادی الآخر हिं० यवनी महिन्यांतील साहावा जो महिना तो.

जमादिलआवल, पु० جمادی الاول हिं० यवनी महिन्यांतील पांचवा जो महिना तो.

जमाबंदी, स्त्री० جمعبندی हिं० ग्राम, देश, इत्यादिसंबंधी उत्पन्नाची पाहाणी करून जें तत्संबंधी सरकार देय निश्चित केलें असतें तो; उ० या सुभ्याची जमाबंदी पांच लक्ष रुपये आहे; २, फौज. द्रव्य, इ० जमविण्याचा जो व्यापार तो, किं० ज्याणें जमला जो तत्तत्पदार्थ समुदाय तो.

जमालगोटा, पु० सागरगोट्या सारिखें शोधनोपयोगी एक औषध आहे.

जमाव, पु० جمع हिं० जमात; २. जम.

जमावणें, फौज इ० जमा होई असें करणें.

जमीदार, पु० زمیندار हिं० जमिनीवर जाचा हक्क असतो असा जो देशमुख, देशपांड्या इ० वतनदार तो.

जमीन, स्त्री० زمین हिं० नद्या, समुद्र, हे वर्ज्य करून अवशिष्ट जो पृथ्वीचा अंश तो; २, ला० वल्याचे कांठ पदर वर्जून अवशिष्ट जो मधला अंश तो.

२, जा वस्त्रादि पदार्थावर रंग, कलाबतू, इ० कांचे वेल,बूट, इ० चित्रें काढायाचे प्रसंगीं त्या वस्त्रादिपदार्थाचें मूलभूत जें अंग ती; उ० भिंतीची जमीन पांढरी असली तर तांबडये रंगाचीं चित्रें चांगलीं शोभतात; ४, शेताचे प्रसंगीं जी तदुपयुक्त भूमी ती; उ० राजापूर प्रांतीं जमीन थोडी कातळच बहुत; जमीन धरणें, स्त्र० दुरवणें इ० कारणामुळें दुसऱ्यानें उठवायाजोगें फार अशक्त होणें; कि० वादादिकामध्यें पडणेंणें; जमिनीस पायलागणें, स्त्र० दुरवण्यांतून बरें होणें; जमीन नदिसणें, स्त्र० अतिशयित गर्वावस्थेनें युक्त होणें; जमिनीस पाठ लागणें, स्त्र० पराकाष्ठेची दारिद्र्यदशा पावणें; जमीन सोडणें, स्त्र० आवटलेल्या नाचणी इ० कांनीं जमिनीस मूळ धरून उभारणें; कि० मनुष्यादिकांनीं दुरवण्यांतून उठणें, कि० दारिद्र्यदशेंतून सुटणें; जमिनीसमिळणें, स्त्र० किल्ला, वाडा, इ० कोसळून जमिनी बराबर होणें, कि० ला० संपत्तिव्यवहार, शेत, इ० सर्वस्वीं नाश पावणें; जमीनकरणें, स्त्र० गृहादिसंबंधी जी भूमि ती रवणून चोपून साफ करणें.

जमीनझाडा, पु० ग्रामादिसंबंधी भूमीची चतुःसीमाइ० पूर्वक जी इयत्ता लिहिली असत्ये तो कागद इ०

जमीनदोस्त, २ लिं० زمین دوز हिं० मल्लयुद्धांत पराजित होउन जाची पाठ भूमीस लागली तो; २, ला० केवळ जमिनीसमिळाला तो.

जमीनमोजणी, स्त्री० शेतइ० संबंधी जमीन मोजण्याचा जो व्यापार ती.

जमीन

जमीनशिरस्ता, पु० जमिनीची उत्तम मध्यम कनिष्ठ दशा पाहून, लागवड जमिनीस अमुक सर्कारदेय द्यावें, पडीत जमिनीस अमुक द्यावें, एतद्विषयीं जो शिरस्ता बांधिला असतो तो.

जमीनसांड, २ लिं० रा० जमीन सुटे इतकें उचललें गेलें जें ओझें इ० तो.

जमेन, स्त्री० جمع हिं० जमात.

जमेदार, पु० زمیندار हिं० जमीदार.

जमेदारी, स्त्री० زمیندری हिं० जमेदाराचें जें कर्म ती.

जय, पु० युद्धादिकांत दुसऱ्यास जिंकल्यामुळें जी उत्कर्षप्राप्ति होत्ये ती; २, ईश्वरास संबोधन द्यायाचें असतां तन्नामाग्रीं याचा योग होतो; उ० जयरघुवीर, जयविठोबा, इ० याचे समास, जयप्रस्थान, जयवाद्य, जयघोष, जयमुहूर्त इ० होतात. कोण एकानें कोण एकाचा जय करणें, एथे पराजय असा अर्थ होतो, जयासजाणें, स्त्र० जयावह होणें.

जयघोष, पु० कांहीं चांगलें झालें असतां तें सर्वत्र समजावें म्हणून जो वाद्यादिघोष करितात तो.

जयजयकार, पु० ईश्वरानें अवतार धारण केलें असतां किं० राजानें प्रजासंरक्षणउत्तमरीतीनें इ० केलें असतां त्यांची जी सर्वत्र वारवाणणी करितात तो; २, ला० पोरें, गुरें, इ० कांचे नानाप्रकारचे नियेनें करितात जे उपचार ते, प्रयोग अनेकवचनांत; उ० या म्हैशीला दिवसांत तीनवेळ धुतों, पाहिजे तितका दाणा घालतों, एवढे जयजयकार मांडिले आहेत, तरी पंचपात्रीवर दूध चढवीत नाहीं निंदाष्टमि.

जय

जयजयवंती, स्त्री० एक रागिणी आहे.

जयदुंदुभि, पु० जय झाला असतां जें दुंदुभिवादन करितात तो.

जयपत्र, न० पंडित, मल्ल, इ० कांनींदुसऱ्यास जिंकिलें असतां प्रतिष्ठार्थ त्यापासून मी पराजित झालों अशे मजकुराचें पत्र लिहून घेतात तें.

जयप्रस्थान, पु० राजादिकांचा स्वारी दूरदेशादिकांचेठायीं जायास निघाली असतां मंगलार्थ प्रौढींनें याचा प्रयोग करितात.

जयमुहूर्त, पु० राजादिक शत्रु पराजयार्थ जाकाळीं गमन करूंलागतात त्या समयीं ज्योतिषी जय व्हायाजोगा जो मुहूर्त देतात तो.

जयवाद्य, न० जय झाला असतां जीं वाद्यें वाजवितात तें.

जयशब्द, पु० युद्धादिकांत जाचा जय झाला असतां तत्पक्षपाती जनाचे मुखांतून जो आनंदाचा शब्द निघतो तो; २, राजादिकांस ब्राह्मणकृत जो तुझा जय असो इ० जयशब्दपूर्वक आशीर्वाद तो.

जयश्री, स्त्री० युद्धादिकांचाठायीं जाचा जय होतो त्यास जी शोभा प्राप्त होत्ये ती.

जयावह, वि० जय सूचक जे शकुनादि तो; २, जाचे योगानें आपलें बरें होतें असें जें कांहीं सदाचरणादिक तो; उ० मातापितरांचें आज्ञोल्लंघन केल्यास जयावह होणार नाहीं.

जयी, वि० युद्धादिकांत जाचा जय झाला तो.

जर, पु० ज्वराचा अपभ्रंश, २, पु० स्त्री० कलाबतू चा तंतूनी विणून केलाजो वस्त्रांश तो ती, कार्याची असिद्धता गम्यमान असून त्या कार्यास कारणत्वेंकरून विवक्षित जें असतें त्याचे मागें अशे अर्थाचें द्योतक हें अव्यय लागतें; उ० जर पर्जन्य पडता तर सुभिक्ष होतें, एथें सुभिक्ष होणें हें असिद्ध कार्य आहे, पर्जन्य पडणें हें त्यास कारण, याचे पुढें, का, कां, करितां, काय, यांचाही योग होतो; उ० जर का तो आला तर दांतुडर्याच पाडील, जरा शब्दाचा अपभ्रंश, कांहीं एक विवक्षित कार्याविषयीं पदार्थमात्रास अशक्तता नाहीं असा काकु व्यास्त्येनें अर्थ विवक्षित असतां प्रयोग; उ० पा धोत्रजोडयालारे काय वर्षभर दिकायला जर झाला आहे, भर, हो, धा० प्र० जरबांधणें एथें ज्वरानें पुनः नवाबें स्फुरून तोडगा करून त्या मनुष्याचा शरीरावयवबंधनद्वारास्थाची प्रतिबंधकरणें.

जरकरी. वि० जासज्वर येत असतो तो.

जरगृडु, न० दे० अंब्याचे बांठीस लोंकरे सारिखें जें केसर असतें तें.

जरठ, वि० सं० वयानें जो वृद्ध तो.

जरडा, पु० जरा शब्दाचा अपभ्रंश जो जर शब्द त्या अर्थी; पूर्ववत् भर, हो, धा० प्र०

जरंडी. स्त्री० रा० सुवासिनी असून जी वयोवृद्धा ती; २, उजव्याबाजूस पोटामध्यें कोलूसारिखा एक रोग होत असतो ती.

जरणी, स्त्री० एकऔषधी झाड आहे.

जरतार, स्त्री० कलाबतू.

जरतारी, वि० जरतार आहे जास असें जें पितांबर, शेला, पागोटें, इ० वस्त्र तो.

जरत्कारू, ३लिं० रोगादिकानें जो क्षशरीरें झाला तो.

जरब, स्त्री० दुसऱ्यास भय उत्पन्न व्हावें असेंजें कीर्त्यादिरूप कोणाएकाचे आंगीं तेज असतें तीं; उ० त्या राजाची अशी जरब होती कीं नांव ऐकतांच शत्रू थरथरां कांपत असत; २, तत्संबंधानें इतरांस प्राप्त होतेंजें भय किं० भयावस्था ती; उ० पंतोजीची हाक ऐकतांच पोरांस जरब बसली; चाबुक स्वारावांचून घोडा जरब ऱ्हाणार नाहीं; ३, ३लिं० विवक्षित प्रमाणापेक्षां जो भारी तो; उ० त्या मापापेक्षां हें माप जरब आहे; उ० या लुगडयास बावा आठरुपये किंमत जरब.

जरंबा, पु० रा० झाडाचा आंबा भक्षिला असतां तत्काळ जर येई असा जो आंबट इसाण आंबा तो.

जरबाब, ३लिं० जरतारी.

जरयान, न० दे० सोनें, रुपें, इ० द्रव्य तें.

जरलपेट, स्त्री० दे० जराची जी धाम येत्ये ती.

जरा, स्त्री० सं० वृद्धत्व.

जरा, अ० किंचित्; उ० जरा तूप पी म्हणजे आंचा सुपारी उतरेल; २, भमळसा; उ० जरा इकडे येऊन जा.

जराक, अ० जरा.

जराकसा, ३लिं० जरा.

जरासा, ३लिं० जरा.

जराबाजरा, ३लिं० रा० अवि० ईषन्मात्र कांहीं एक व्यवहारामध्यें चूक अंतर याचें वि० उ० मीं बोली केली आहे यांत जराबाजरा अंतर पडल्यास सर्कारचा गुनेगार.

जरी, अ० जर या अव्ययापुढें ही लाविला असतां जो अर्थ होतो त्या अर्थीं; २. सं० केवल जर्‌या अर्थी; उ० जरी व्हावा तूज देव, तरिहा सुलभ उपाव; या च अर्थीं कोणी जरीं ल्ह०

जरीमरी. स्त्री० एक देवता आहे जीचा उपद्रव झाला असतां मनुष्यादिक प्रायः तत्काळ मरतात.

जरीजरतारे, स्त्री० जुनी पानी फाटलेल्ये वस्त्रांची जी जर तीस ल्ह०

जरूर, अ० ضرور हिं० अगत्यरूप; उ० बर्कंड न आले तरी न येउत, पण तुह्मालां जरूर आलें पाहिजे; २, न० आवश्यक; उ० तुह्मास जाण्याचें जरूर च असल्यास जावें; ३, त्वरित; उ० माझें जेवण होईतों इतक्यांत जरूर जाऊन ये; ४, ३लिं० घडायास जो दुःशक तो; उ० हा या दुरवण्यातून वांचणें जरूर दिसतें.

जरूरी, स्त्री० कांहीं एक कार्य अगत्य त्वरेनें केलें पाहिजे कि० कांहीं एक पदार्थ संपादन करण्याविषयीं जी आवश्यकता असत्ये ती; उ० मला पुण्यास जाण्याची जरूरी आहे.

जरेणें, रा० जरानें युक्त होणें.

जर्जर, ३लिं० बहूत काळ वरून गेल्या मुळें कि० दुरवणें इ० कानें शिथिला वयव कि० निःशक्त झाला तो.

जर्द, ३लिं० पिवळा, कि० तांबडा जो रंग याचा अतिशय वर्णाया चा असतां तत्तच्छब्दापुढें कि० क्वचित् मागें याचा योग करितात; उ० या फुलाचा रंग पिंवळा जर्द आहे; २, तद्विशिष्ट; उ० तिळाचें

चें फूल पिंवळें जर्द दिसतें; या पागोट्याचा रंग जर्द तांबडा आहे.

जर्दी, पु० घोड्याचा एक रंग आहे; २, ३ लिं० तद्विशिष्ट जो घोडा तो; ३, पु० बारीक कातरून त्यास पाणी लावून खावयाकरितां करून ठेवितात तो तंबाखू तो.

जल, न० सं० उदक.

जलकुक्कुट, पु० पाणकोंबडा.

जलक्रीडा, स्त्री० विषयी पुरुष स्त्रियां सहवर्तमान जलामध्यें जो विलास करितात ती, किं० सरोवरादिकांचे ठायीं युद्धादि व्यपदेशें करून नौकांवर बसून जी क्रीडा करितात ती.

जलचर, ३ लिं० जलांत उत्पन्न होऊन राहाराणारें जे मत्स्यादि तो; २, द्वीपांतरचे मनुष्यांस संकेतानें म्हणतात.

जलजंतु, पु० सं० जलामध्यें उत्पन्न होतात जे जंतु ते प्रत्येकीं.

जलतरंग, पु० अनेक कांचेचा पात्रांत विवक्षित स्वर उत्पन्न व्हावया जोगें पाणी घालून त्या पात्रांवर प्रत्येकीं महार केला असतां षड्जादिस्वर नियत असें जें वाद्य करितात तो; २, जल संबंधी जो तरंग तो.

जलताडन, न० ला० केवल निरुपयोगी असें जें कांहीं कर्म तें.

जलद, ३ लिं० चपल; २, अ० त्वरेनें; उ० तुह्मीं जलद गेलांतर तो भेटेल.

जलदकलमी, ३ लिं० त्वरेनें लिहिणारा जो मनुष्य तो.

जलदी, स्त्री० त्वरा; २, अ० त्वरेनें; उ० तुह्मीं जलदी जाऊन

जाऊन यालतर बरें तों.

जलदेवता, स्त्री० जल संबंधिनी जी देवता असते ती.

जलधि, पु० सं० उदधि.

जलनाडी, स्त्री० पृथ्वीचे पोटीं जे जल वाहावयाचे मार्ग असतात ती.

जलप्रवाह, पु० गंगा प्रवाह.

जलमंदिर, न० जलाचे मध्यभागीं प्रायः क्रीडार्थ जें गृह करितात तें.

जलमय, ३ लिं० जामध्यें जल बहूत असा जो देश, फल, इ० तो; २, जलाचा जो विकार तें; उ० गार जलमय पडली यामुळें क्षणांत तीचें जल होऊन गेलें; ३, न० जलावांचून कांहीएक इतर पदार्थ दिसत नाहीं अशी जी अवस्था तें; उ० समुद्रांत भारी लांब गेलें ल० सर्व जलमय दिसतें.

जलमार्ग, जळमार्ग, पु० जलांतून गलबतें जावयाचा जो मार्ग तो.

जलयात्रा, स्त्री० सं० जलमार्गानें जें परदेश गमन तीं.

जलयान, न० होडी, नौका, इ० जें जलांतून गमन करणारें वाहन तें

जलसमाधि, जळसमाधि, पु० संन्यासी इ० कांनीं जलामध्यें घेतला जो समाधि तो.

जलाधिवासन, न० सं० मूर्ति आदिकांची प्रतिष्ठा करावयाची असतां पूर्वी एकरात्र त्यांस जलांत बुडवून ठेवण्याचा जो संस्कार तें.

जलाल, ३ लिं० ا.ل हिं० जाचें सहन होणें दुस्सह दुःसह तो; उ० हें औषध जलाल आहे; याची

ची प्रकृति जलाल आहे.

जलाशय, पु॰सं॰ वापी, कूप, इ॰जीं जलाचीं स्थानें तो.

जलेल, स्त्री॰ جلیل हिं॰ जबरदस्ती; २, ३ लिं॰ जलाल.

जलेली, स्त्री॰ جلیلی हिं॰ जबरी.

जलोदर, जळोदर, न॰सं॰ जलप्रधान जो उदर रोग तो व्हणून रोग होत असतो तें

जल्प. पु॰दुसऱ्याचे पराजयार्थ मीं असें करीन तरीन इ॰रूप जो भाषण व्यापार तो.

जल्पना. स्त्री॰ जल्प.

जँव, अ॰विवक्षित काल पर्यंत; उ॰ मीं जव स्नान करून येईतंव तूं भाजी चीर.

जव, पु॰एक धान्य आहे, जास सातु म्हणतात, तो; २, हस्तांगुष्ठ मध्याचे ठायीं जवाकार जें चिन्ह असतें तो; ३, जवा आगळा, म्ह॰विवक्षित उपमानापेक्षां विवक्षित गुणानें जो अधिक तो; उ॰ तो कुबेर तर हा जवा आगळा कुबेर.

जव, पु॰सं॰ गमन संबंधी जो वेग तो.

जवकणें, दे॰ जरवडणें.

जवखार, पु॰ औषधोपयोगी एक क्षार आहे.

जँवरा, पु॰अनेक प्रकारचे उपद्रवांस कारणभूत एक कल्पित पुरुष आहे; उ॰ म्ह॰ सांतारी मेल्याचें दुःख नाहीं पण जंवरा संचकतो; २, कांहीं एक कार्य मनांतून कर्तव्य नसतां याचा भ॰ करितात; उ॰ एवढ्या उनाचा कोण जंवरा जातो मग थंड वेळचे जाऊं.

जँववर, अ॰जंव.

जंववरी

जंववरी, अ॰ सं॰ जंववर.

जवस, पु॰एक धान्य आहे.

जवळ, पु॰स्त्री॰ **ळीण**, ब्राह्मणांत एक जाति आहे: २, न॰अभ्र; ३, अ॰विवक्षित पदार्थ, काल, इ॰कांपासून काल कृत, किं॰देशकृत, किं॰संबंधादिकृत, अंतर जास थोडें अशा कालीं, किं॰देशीं, किं॰संबंधविषयीं, असें, जों, इ॰कांचें वि॰; उ॰ या विहिरीपासून त्याचें घर जवळ आहे; स्वस्थ बसूं नका मुंजीच्या दिवस जवळ आला; नातवापेक्षां पुत्र जवळ म्हणून ममता विशेष; ४, कोणएकाच्या सत्ता संबंधांत, असें, नसें, इ॰कांचें वि॰; उ॰ त्या जवळ शास्त्र थोडा आहे; त्या जवळ विषय खायाला पैसा नाहीं; ५, कांहीं एक विषय सांगणें, बोलणें, इ॰विषयीं कोणएकातें उद्देशून; उ॰ ही गोष्ट राजा जवळ सांगितली पाहिजे; जवळ करणें. एथें स्वगतीनें विवक्षित स्थलादिक आदोपणें असा अर्थ; उ॰ पर्जन्य आला लोकर विव्हाड जवळ करा; दीनादिकांस स्वीय कोटींत मानणें; उ॰ तो गरीब आहे तुम्हीं जवळ करा तर पाहा; याच अर्थीं जवळ धरणेंही म्हणतात; तो तिचे जवळ जातो. ती त्या जवळ जाते, एथें स्त्री, पुरुषातें, किं॰पुरुष स्त्रीतें उपभोगितो असा अर्थ.

जवळचा, ३ लिं॰ काल देश संबंधादिकानें जो समीप वर्ती तो, किं॰ स्वसत्ताकांत जो येका इ॰तो.

जवळपास, अ॰आसपास.

जवळला, ३ लिं॰ जवळचा.

जवळसार, अ॰आसपास.

जवळी, ३ लिं॰ ग॰ जोळांतून चाला या जोगीं जीं

मोटमोटीं

मोटमोठीं गलबतें तो;२, स्त्री०वा०विवाहोत्तर सुलीस प्रथम लोकर साडी चोळी देतात त्या,मा०अने०व०प्र०.

जवळीक,स्त्री०रा०संबंधाचा जो जवळपणा तो;उ० जशीना त्याची जवळीक तशी आदराची कोंवळीक.

जवळील,३लिं०जवळचा.

जवळून,अ०आगन्तु प्रदेशातें आश्रयून जा,ये, इ०धा०वि०;उ० तुम्हीं आमचा गांवा जवळून गेलांतर आमचा घरीं या;इतक्या जवळून मीं निशाण मारीन;२,कोणएकापासून;उ०त्या जवळून रुपये घेतले नेव्हां कार्य झालें.

जवा,पु०स्त्रियांचे हातांतील भूषण आहे तोच त्याचे जे अवयव ते प्रत्येकीं;२,फळाशीलाक्षणिकार्थसह;उ० या फळ्यांचा जवा सोंगला बसविला आहे त्यापु एक संधशी दिसत्ये;३,स्त्री०उ०हा श्लोक शोभित होतो पण कांहीं केल्या जवा बसेना

जवाद,३लिं०अधिक.

जवादी माजर,पु०जाचे वृषणास सुवास येत असतो असें एक वन्य माजर आहे.

जवादी,जवादें,न०जवादी माजराचा जो ओंडनें.

जवान,३लिं० جوان हिं०तरुणावस्थापन्न जो तो:२.पु०पुरुष व्यक्ति मात्रा सही स०.

जवानकट्टा,३लिं०जवान असून जो बळकट तो.

जवानपट्टा,३लिं० جوانی हिं०जवान कट्टा.

जवानी,स्त्री० جوانے हिं०तारुण्यावस्था ती.

जवार,न०नागपूर,नारायणपेंठ इ०जा कापड उत्तम व्हावयाचा प्रसिद्ध पेंठा आहेत त्यांचे जवळपासचा लोहान लोहान जा पेंठा तें;उ०हा धोत्रजोडा पेंठचा आहे किं जवारी आहे.

जवारी,३लिं०जवार संबंधी जें तृप,व धोत्रजोडा इ०वस्त्र तो;२,स्त्री०जोंधळा सदृश जें धान्य ती.

जँवाली,जँव्हाली,स्त्री०जुँवाली.

जवाहिर,न० جواهر हिं०हिरा,पाच,माणीक, मोतीं,इ०जीं रत्नें तें.किं०तत्संबद्ध जे सुवर्णादिकाचे दागिने तें.

जवाहिरी,३लिं०जवाहिर खरेदी घेतो विकतो. अशो व्यापारानें जो उपजीविका करितो तो.

जवी,३लिं०अतिशयित जो वेगवान तो.

जँव्हार,न०जवार.

जँव्हारी,३लिं०जवारी प्रथमार्थी:२.जवाहिरी.

जव्हेर,न०जवाहीर.

जव्हेरी,३लिं०जवाहिरी.

जशाचातसा,जशाचेतसा,३लिं०कों०जसा चेतसा.

जशासतसा,३लिं०जाला जसें अम्हीं तसें,किं० जाला जसा अम्हीं वा तसा;उ०जशास तसें भेटे आणि मनचा संशय फिटे.

जसा,३लिं०जा मकारें,किं०जा मकारचा;उ०जसें तुमचे मरणें,तसें माझें मती जाणें,जसा तुम्हास पाहिजे तसा धोत्रजोडा घ्या;२,उभयकियांचा कार्यकारण भाव असून एक कालिकता अशो अर्थाविषयीं कारणक्रियेशीं याचा योग होतो; उ०मीं जसा गेलों तसा तो पळाला.

जसाचेतसा,३लिं०रा०न्यूनाधिक भाव,कांहींए-

कविकृतिबांची संभावना असून तें तें नहोतां रा-
हिलां जो तो; उ० तुमचें तूप जसें चेतसें आहे.

जसेंतसेंकरून, अ० पराकाष्ठेचा प्रयत्नानें; उ० ज-
सेंतसें करून एक दांचें घर बांधलें.

जस्त, न० एक धातु आहे.

जस्ती, वि० जस्त संबंधी जो पात्रादि पदार्थ तो.

जहर, न० विष; २, कांहीं एक पदार्थ मिष्टकटुलवणा अ-
तिशय वर्णाचा असतां हा शब्द पुढें लागतो;
उ० कटुकी काय कडू जहर आहे; कारल्यांची भा-
जी कडुकडु जहर लागते.

जहरीरवोबरें, न० जहरी नारळांतील जें रवोबरें तें.

जहरीनारळ, पु० नारळांत एक जाति आहे जाचें
रवोबरें कडू असतें. औषधोपयोगी आहे.

जळ, न० जल.

जळ, स्त्री० पु० नाम्यादि धातू आटत यातली असतां
कि० खरपूस तापिली असतां, अग्नि संयोगानें
जो तदंश जळून जातो नी तो; २, ला० पु० क्रोध; उ०
त्याला शिवी देतांच जो जळ आला आणि तोंडा-
वर चारिवली.

जळकट, वि० ईषत् जळलेला पदार्थ.

जळका, वि० जळकट.

जळकें, न० रा० भाताचे शेतास एक रोग होत अस-
तो तें; २, जळकट.

जळगणें, कों० भात, नागली, इ० कांचे रोपानें सू-
र्य संतापानें, कि० कांहीं भूमिनिष्ठदोषा मुळें ईष
दीषत् जळलें जाणें; उ० चार दिवस तापी पड-
तांच आंवण जळगलें.

जळचर, वि० जलचर.

जळजळ, स्त्री० पित्तादि विकृतीनें, कि० तीक्ष्ण प-
दार्थ संयोगानें घशांत, कि० हस्तादि अवयवांस
जी आग सुटत्येती.

जळजळणें, जळजळीनें युक्त होणें; २, ला० ज्वर,
क्रोध, इ० कांनीं कोणएकानें, संतप्त होणें.

जळजळाट, पु० अतिशयित जी जळजळ सुटत्ये
तो; उ० मिर्ची चावतांच उपचनाहींसा तोंडाला
जळजळाट सुटला; २, ला० क्रूर जे राजा, पति, मा-
तापितर इ० तत्संबंधी जो मजादिकांस अतिशयि-
त अनेक प्रकार त्या उपद्रव तो; उ० मामलेदारा-
चा जळजळाट भारी हो त्यणून तीं कुळें परा गं-
दा झालीं; ३, रा० शत्रु इ० कांनीं थरकांप होत
असावें अशी जी कोणएकाची चलती तो; उ०
पूर्वी त्यांबरोबर वाद सांगावा तर त्यांचा जळज-
ळाट होता या मुळें उपाय नव्हता.

जळजळीत, वि० अतिशयित उष्ण जें अन्नोद-
कादिक तो.

जळण, न० अग्नि पेटवाया चे उपयोगी जें काष्ठ, शे-
णी, इ० तें; उ० चुलींत जळण घाल त्यणजे पाणी
तापेल.

जळणूक, स्त्री० मात्र: गांजणूक या अर्थी.

जळणें, अग्नि इ० संयोगानें पदार्थ दग्ध होणें; २,
अग्नि इ० कानें प्रज्वलित दशापन्न असणें; उ०
रात्रीस चारी प्रहर दिवा जळत होता; ३, थंडी,
उष्ण, इ० कांचे योगानें वृक्षलतादिक करपले
जाणें; ४, ला० क्रोधादिकानें अतिशयित संत-
प्त होणें; ५, शरीरा मध्यें काम. उन्मत्तता इ० कानें
अतिशयितपणें स्थित असणें; उ० त्याचे अंगा-

त किती मद जळतो आहे कीं जाला डोळ्यांनीं भूय दिसत नाहीं; ६, जळजळणें; ७, गंजिफांचे खेळांत संप्रदायविरुद्ध डाव झाला असतां हुकुम, इ० पान खर्ची होणें; ८, तिरस्कारपूर्वक भाषण कर्तव्य असतां अलंकारद्योतक या धातुचा प्रयोग करितात; उ० काय जळलें दिवसभर अभद्र बोलतां; स्व० जळत घर, भाड्यानें कोण पेतो; स्व० कोरड्या बरोबर ओलेंही जळतें; जळता पाय जाळणारा स्वणजे अतिशयित जो दृढी त्यास स्व०.

जळत, वि० जळजळीत.

जळप, जळप, पु० क्रोधाचा आवेश; २, रा० जा व्यवहाराचा दृढ अभ्यास झाला त्या व्यवहाराचा स्वप्न पडतो तो.

जळमट, न० कोळिष्टकाचे केरकचरा अडकलेले जागोजाग लोंबत असतात जे सुतेरे, कि० तदाकार बहुत दिवशी झालेलें जें पिष्ट धान्यादि त्यांत कृमिजन्य दोर होतात तें, कि० मुखनासिका यांतून तत्सदृश जे कफादिसंबंधी दोर निघतात तें.

जळाऊ, वि० जाळावयाचे उपयोगी जो काष्ठादि पदार्थ तो.

जळीत, न० रा० आपलेकडे अपरधन असतां निष्कारण जें सर्कार इ० कांस द्रव्यादि द्यावें लागतें तें; उ० त्याचा पैका मीं खालला नसतां पन्नास रुपये उगीच जळीत द्यावे लागले.

जळू, स्त्री० एक जलजंतु आहे, जो उठाणू इ० संबंधी रक्त ओढून घेण्याचे उपयोगी पडतो ती; २, रा० आघातादिकारणानें शरीरांतील रक्त नासून एकत्र जमतें ती.

जळो, अ० त्रासोद्गारार्थी, या अव्ययाचा प्रयोग करितात; उ० जळो असुंदे परतें.

जाई, स्त्री० एक पुष्पवल्ली आहे.

जाऊ, स्त्री० भर्त्याचें बंधूची जी स्त्री ती.

जारवाई जुरवाई, जारवाई जोरवाई, स्त्री० ईश्वरातिरिक्त जा क्षुद्र देवता ती; उ० ईश्वरास भजत नाहींत आणि जारवाई जोरवाईस भजतात असे लोक मूर्ख आहेत.

जाँग, स्त्री० रा० गुडघ्याचे वरल्ये बाजूचा आंतला जो भाग ती.

जाग, पु० कों० शूद्रादिक आकस्मिक अपघातादिकांमुळें, कोणी मेला असतां त्याचें मरण, कारण, कि० त्याणें गुप्त ठेविलेली वस्तवानी इ० कांचा शोध लागणा स्वणून तत्संबंधी पुत्रादिकांचे आंगीं त्यास खेळवावें या करितां मृताचे दाहाव्य दिवशीं त्याचे सर्व कुटुंबीजन मिळून चारदेवझाडें मेळवून वाद्यादि पूर्वक जो समारंभ करितात तो; २, स्त्री० रा० जागृतपणें जी मनुष्यादिकांची स्थिति ती णेंकरून गृहादिस्थलाचेठायीं चोर व्याघ्रादिकांनीं विघ्नकारक या जोगें जें अशून्यत्व असतें ती; उ० घरांत मांजरगची जाग असली स्वणजे उंदिरांचा उपद्रव होत नाहीं.

जाँगड, अ० खपेल तें खपवून खपेतें परत करूं अशा बोलीनें वस्त्रादि विकत येण्याचें वि०; उ० हीं लुगडीं खर्ची तकरून आणिलीं आहा कीं जाँगड आणिलीं आहा; २, स्त्री० जांगड दिलें कि० घेतलें, इ० लिहावयाची जी वही ती.

जागणें, निद्रेस योग्य जो काल त्या कालीं निद्रा न ये तां

तां राहाणें;२,ला०स्व स्व व्यवहारीं सावध असणें; सत्य,इमान,वचन,इ०स्खलीं जागणें,स०त्या सत्यादिकांस अंतर न पडे असें वर्तणें;उ०त्याणें वचन दिल्हें होतें पण त्यास तो जागला; स०सारी रात्र जागली आणि शेंगा वांगीं रांधलीं,स०जागेल त्याची वांड आणि निजेल त्याचा दोंणगा.

जागना,३लिं०जें सामर्थ्य जाचे आंगीं असावें तें प्रत्यक्षपणें जांन राहातें अशी जी देवता,मंत्र,विद्या,इ० तो;उ०या गांवचा देव असा जागता आहे कीं तत्काल धांवण्यास पोंचतो;मंत्र जागता असला तर तत्काल विष उतरेल.

जागतीजोत,स्त्री०जागता.

जागमाग,स्त्री०वा०जागरूप्यर्थी.

जागर,पु०जागणें मुख्यार्थीचा जो व्यापार तो,किं० जागृतपणें जी स्थिति तो;उ०पोरांचे गडबडी मुळें रात्रीस चारी प्रहर जागर घडला;२,कांहीं एक देवतेचा उद्देशीं करून विवक्षित काल पर्यंत जागण्याचा जो समारंभ करितात तो;उ०नवरात्रांमध्यें देवाजवळ कथा करून मध्यरात्र पर्यंत प्रतिदिनीं जागर करितों.

जागरण,न०प्रायः जागरार्थी.

जागरा,३लिं०भारी जागण्याचा स्वभाव जाचा तो.

जागरूक,३लिं०जागरणशीलजो तो;२,प्रमेयसिद्धि विषयीं अभावसंभावना शून्यत्वें करून स्थित जें प्रमाण तो;३,जागती जी विद्या,मंत्र,इ० तो.

जागल्या,पु०दे०चोरादिउपद्रव न व्हावा म्हणून पाहरा कराया साठीं जो गांवचा महार,इ०जागत देवितात तो.

जागसूद,३लिं०अंमळ कांहीं खडबडलें असतां चपकन जागा होतो असा जो गाढनिद्राशून्य मनुष्यादि तो.

जागा,३लिं०जागणें मुख्य लाक्षणिक अर्थानें युक्त जो तो;२,पु०स्त्री०कांहींएक पदार्थ राहावयास,किं० मावावयास आधारभूत जें भूतलादि,किं०अवकाश तो,तीं;उ०या जाग्यावर घर बांधलें असतां चांगलें दिसेल;या जागेंत विहीर खणली असतां पाणी लागेल;एवढे दाणे राहावयास मडक्यांत जागा नाहीं;३,ला०कांहींएक अधिकारादिकजें ठिकाण तो तीं;उ०मस्तुत फडनिविसाची जागा रिकामी आहे;मुलगी देणें तीं चांगली जागा पाहून द्यावी;४,कांहींएक द्रव्यादि नियमानें उत्पन्न होण्यास जें साधन तीं,तीं;उ०ती आसामी चालत होती तों आमची पांचशें रुपयांची जागा असे;५,कांहींएक कार्य करण्याविषयीं मनोदयानुरूप लाभलेंजें निमित्त, किं०अवकाश तो,तीं;उ०मी कोंडे आतां मरतांच इतकें घुमतांच त्याला शिव्या द्यायाला जागा झाली;उ०धनी उठून आतांच चाकराम खेळायास जागा झाली.

जागचेजागीं,अ०अधिष्ठित स्थलन सुटतां;उ०मागें महामारीनें जागचेजागीं माणसें मेलीं;२,मनचेमनांत,उ०कोणा त्याला न बोलतां तो जागचेजागीं रुसला तर रुसो.

जागां,जागीं,जागें,अ०माता,पिता,इ०कांचे ठिकाणीं; उ०त्यांनां आम्हीं वडिलांचे जागीं मानितों,स्नेहाचे जागीं लबाडी करूं नये.

जागीं,अ०आपल्यामतें आपल्ये ठिकाणीं;उ०आम्हीं आपल्ये जागीं विद्वान् असें म्हणवितों पण लोक म्हण

तील तेव्हां खरें; उ० ते आपल्ये आंगीं श्रीमंत लक्षणवितात.

जांगुलिक, पु० सं० विषविकार उतरायास जाणतो असा जो वैद्य तो.

जागृत, वि० जागा अर्थमार्थी.

जागृतस्थान, न० जागतीजोत असा जो देव तें.

जागृति, स्त्री० जागृतपणा.

जाग्रदवस्था, स्त्री० सं० जागृतिरूपजी अवस्था ती.

जांघ, स्त्री० जांग.

जांघडु, न० जांग.

जाच, पु० प्रायः गांजणूक या अर्थी.

जाचक, वि० जाच करावयास कारणभूत जो कांहींएक व्यवहार इ० तो; उ० हिशोबाचें खटलें अर्धवट टेवूं नका मागें पुढें जाचक होईल.

जाचणी, स्त्री० जाच.

जाचणूक, स्त्री० गांजणूक.

जाचंद, वि० आचोंद्रा.

जाचोंद्रा, वि० आचोंद्रा.

जाजम, न० छीट, किं० खारवा, यांस अस्तर लावून बसायाचे उपयोगी वस्त्र करितात तें.

जाजमीछीट, न० जाजमाचे उपयोगीजें छीट असतें तें.

जाजावणें, क्रि० कोपावेशानें एखाद्याचे आंगावर येणें; २, ग० गुरूं, मनुष्य, इ० कानें आकस्मिक घातापद्रवानें मरण पावणें, किं० दुखावणें.

जाज्वल्य, वि० भरवर आहे तेज, किं० सामर्थ्य जाचें असा जो अग्नि, देव, औषध, मंत्र, इ० तो; उ० ही मात्रा अशी जाज्वल्य आहे कि तत्काल वायु उतरी-

ल

ल; २, ला० कोपादिकांमुळें अदृष्य जो मनुष्य तो.

जाज्वल्यमान, वि० जाज्वल्य मुख्यार्थी.

जाट, पु० हिंदूंत एक जाति आहे.

जाड, वि० विवक्षितापेक्षां स्थूल जो शरीर, स्तंभादिक तो; २, स्थूलावयवजें वस्त्रादिक, किं० तदवयव तो; ३, फार पातळ नव्हे असा जो सद्रव पदार्थ तो; ४, जड मथमार्थी.

जाडगेला, वि० साधारण रीतीचा शरीरापेक्षां अमळसा शरीरगनें जो स्थूल तो व त्याचें शरीर तें मनुष्य वृत्ति.

जाडसर, वि० विवक्षितापेक्षां ईषत् जो जाड तो.

जाडसुती, वि० जाड आहे सूत जाचें असें जें वस्त्र तो.

जाडा, वि० प्रायः जाड मथम द्वितीयार्थी.

जाडी, स्त्री० जाडेपणा.

जाड्य, न० सं० जडत्व; २, लोकांत विशेष प्रसिद्ध अन्नपचन न झाल्यामुळें पोटांत जो वायूचा अवष्टंभ होतो तें; ३, धान्यादिकाचे आंगीं लोकरपचन न व्हायाजोगा जो कांहीं धर्म असतो तें; उ० उडिदाचे आंगीं जाड्य बहुत आहे; ४, अज्ञान; उ० तुला श्लोक लागत नाहीं हें कवीचें जाड्य नव्हे.

जाण, वि० विवक्षित विद्यादिकांविषयीं जो पूर्ण ज्ञाता तो; उ० कितीही जाण मनुष्य झालेत तथापि ईश्वर गुणाचा पार लागत नाहीं; २, दुसऱ्याचें संकटादि जाणून तें यथाशक्ति दूर करण्याचोंशील जाचें तो; उ० आपलें संकट दुसऱ्यानें बोलल्यावांचून देणारा असा जाण मनुष्य विरला; स० मुक्याचा जाण कोण आहे; ३, दुसऱ्याचे उपकार जा

णून

णून प्रत्युपकार करण्याचें शील जाचें तो; उ० जाण मनुष्यावर संकटीं उपकार केले असतां तो विसरत नाहीं; ४, ही म्हैस जाण आहे. इ० स्थलीं तिला जसजसें खाणें घालावें तसतसें तिचे कासेस अधिक दूध येत असावें; असा अर्थ; ५, स्त्री० अन्यकृत उपकारांचा जो आपल्यावर आभार ती; उ० आह्मीं श्रम केले पण त्यांची त्याणें जाण जाणली, जाण धा० प्र०.

जाणणें, पदार्थलिंक रूप, कि० तन्निष्ठ गुणदोषादि वैशिष्ट्यलिंकरूप पदार्थानें बुद्धि विषय करणें; उ० वर्णभेद मनुष्य मात्र जाणतो पशु जाणत नाहीं; उ० हा तुम्हास भला सावरतो पण मीं पक्का याला जाणतों; २, आपल्या संपत्त्यनुरूप गोर, गरीब, यांचा परामर्श करणें; उ० मला संपत्ति आली तर मीं तुला जाणेन; ३, मनुष्यादिकांनीं दुसऱ्याचे उपकार स्मरून प्रत्युपकार करणें; उ० भल्या माणसावर उपकार केला असतां तो जाणतो; गोमहिष्यादिकांनीं जाणणें, स० भक्ष्य लाभानुरूप दुग्ध विशिष्ट होणें; उ० या गाईला खाणेंघातलें असतां ती जाणत्ये.

जाणना, ३ लिं० विद्या, कला, इ० कांचें तत्व जाणतो तो; उ० शास्त्र विद्येचा आतां कोणी जाणता राहिला नाहीं २, पिशाचा उपद्रव शमनोपाय जाणतो तो; ३, स्वविषयीं कोणीं दुसऱ्यानें कांहीं श्रम केला असतां तदनुरूप आभार मानणारा तो; उ० मी नित्यशः विचारपूर्वक लिहिण्याचा श्रम करितों याचा जाणता कोणी नाहीं

जाणसळणें, दे० कांहींएक व्यवहारादिकांत नवीन पडलाजो मनुष्यादि त्याचें नवीनत्व जाऊन त्याला व्यवहारांत घटणें.

जाणीव

जाणीव, स्त्री० जाणण्याची जी शक्ति ती; उ० या देहीं आणीव रूपें करून आत्मस्वरूप राहानें.

जाणू, अ० जणू.

जाणूनबुजून, अ० जाणून सँवरून.

जाणें, कोणएकानें पूर्वाधिष्ठित देश सोडणें; उ० तो या गांवांतून पळून गेला; २, पूर्वाधिष्ठित देश सोडून विवक्षित देश संयोग करणें; उ० तो उद्यां पुण्यास जाणार आहे; ३, छिद्रादिकांत प्रवेश करणें; उ० या दोनीचे भोंकांत लेखणी जात नाहीं; ४, कांहीं एकपदार्थानें, कि० गुणानें पूर्वाधिष्ठित देशावरून नाहींसें होणें, कि० अपहृत होणें; उ० या कोनाड्यांतली वस्तु कधीं जात नाहीं पण आज गेली; त्याचा सर्व पैका दरवडयांत गेला; आवृत्ति नाहीं स० पदणें गेलें, ५, कालादि अतिक्रांत होणें; उ० हां हां म्हणतां वर्ष गेलें; आयुष्य गेलें; ६, अधिकांतून न्यूनानें कमी होणें, उ० हांतून पांच गेले तेव्हां राहिले पांच; ७, कांहीं एकपदार्थानें विवक्षित काल पर्यंत टिकणें; उ० याला एक धोत्र जोडा साहा महिनें पर्यंत देखील जात नाहीं; या खेपची तपकील नीन महिने गेली; ८, कोणएक विवक्षित नियमांत चूक पडणें; उ० रोज औषध घ्यायाचें त्यांत एक दिवस मजकडून जातांच रोगानें बळ केलें; उ० त्यापासून चार अक्षरें लिहून घ्यायचीं होतीं तेवढें गेलें; ९, न्यूनाधिक भावादि दोषामुळें कांहींएक पदार्थ कि० गोष्ट अयथायोग्य होणें; उ० ही पुनली चांगली आहे पण कमरेंत गेली, लांबट कान झाले यामुळें तोंडाचा डौल गेला; कसला विद्वान होता पण अभिमानानें गेला; १०, मन, इच्छा, कान, इ० कांनीं तत्तद्विषयाभिलषि-

त

न होणें; उ० त्याचे डोळे त्या पार्थीवर गेले आहेत; उ० सांगली बायको करून ये तिजवर लोकांची इच्छा जाऊन ये; ११, इतांत सर्व धातूंवरून याचा प्रयोग होतो, त्या धात्वर्थाचा कांहीं एक नियमानें अनेकवार प्रवृत्तिविषय असतां, किं० त्या धात्वर्थ व्यापारास कांहीं एक अनुक्रम विवक्षित असतां; उ० तूं नित्य दोनवेळ औषध घेत जा; उ० जसजसा तुझीं व्यापार वाढवीत जाल तसतसा मी पैका देत जाईन; १२, ऊनांत सर्व धातूंवरून याचा प्रयोग होतो, पूर्व धात्वर्थाचे फलोपहितत्वाचा निश्चय द्योतक; उ० पर्जन्य नाहींसा होतांच तळ्यांतलें पाणी आटून गेलें; उ० शरीर वाळून गेलें; जिव्हा इ० अवयव जाणें; स० स्व स्व व्यापारा विषयीं असमर्थ होणें; जिवानशीं जाणें, प्राणानशीं जाणें, स० मेल्यामुळें आपल्या सर्व विषयास अंतरणें; कांडीं जाणें, स० फांसाचा दोरी मरणें; वचन जाणें, इ० स्थलीं कोणएकानें आपणास वचनीं धरायाजोगें आपण सांपडलें जाणें; पोट जाणें स० मनुष्यादिकांस ढाल होणें: शरीर जाणें. एथें कृश होणें. असा अर्थ; सकर्मक स्थलांत धातूंवरून तत्तत्धात्वर्थ माझ्या फलानें अन्वित होणें, या अर्थी, प्रा० याचा म० होतो; उ० तुला शिक्षा केली जाईल; तुझें सर्वस्व लुटलें जाईल, इ०.

जाणोपरी, अ० जाणपणाची दशा प्राप्त झाल्यानंतरचे कालाचा दर्शी, अस, नस, इ० कांचें वि०; उ० माझे जाणोपरी त्याचे घरीं लक्ष्मी पाणी भरीत होती

जात, ३ लिं० सं० उत्पन्न झाला; याचे समास, जलजात, जातपक्ष, इ० जाणावे.

जात, स्त्री० या पदार्थाहून तो पदार्थ भिन्न असे अर्थास कारणीभूत जो समान गुण अनेक पदार्थनिष्ठ, मनुष्यत्व, वृक्षत्व, आम्रत्व, इ० मनुष्यांमध्यें वर्ण भेद संपादक जें ब्राह्मणत्व, क्षत्रियत्व, वैश्यत्व, शूद्रत्व, अतिशूद्रत्वादिक, ती; २, भाषणादिकांची जी रीति ती; उ० याचे गाण्याची जात निराळी, त्याचे निराळी; ३, कांहींएक पदार्थाचा जो मूल स्वभाव ती; उ० हा आंबा नासला सणून रसपातळ झाला असें नव्हे याची जातच अशी; ४, कांहींएक पदार्थ अगदी नाहीं असा अर्थ अर्थात् सिद्धकर्तव्य असतां यत्किंचिदंशार्थी याचा प्रयोग होतो; उ० याचे आंगीं शाहाणपणाची जात नाहीं; ५, इतरवर्णादि गुणाचा ईषन्मात्रही संबंध जात नाहीं असा जो केवल एकवर्णी पदार्थ; उ० हा घोडा जात पांढरा आहे, हें फूल जात पिंवळें आहे; जातीचा ब्राह्मण, इ० स्थलीं ब्राह्मण जात्युत्पन्न, इ० अर्थ जाणावे; जातीचा भला, खरा, इ० स्थलीं त्याचा मूलस्वभाव भला, खरा, इ० अर्थ होतात; रा० जातीवर खर्च करणें, इ० स्थलीं केवल आपल्येच सनेचे द्रव्याचा खर्च करणें, इ० अर्थ जाणावे; उ० वडिलांचा पेका नवेच तो याणें आपल्ये जातीवर लग्न केलें; स० जातीसाठीं माती खावी लागले; स० जाती तशी युती आणि खाण तशी माती.

जाँत, न० रा० बेल शिकवायाकरितां जो खुंटारा करितात तें.

जातक, न० सं० जन्मल्या प्राण्याचा जन्मकालीन ग्रहांचे स्थितीवरून जें शुभाशुभ फलाचें परिज्ञान तें, किं० तद्ज्ञापक जें शास्त्र तें; २, घटितांतर्गत जे आठ प्रकार सांगितले आहेत त्या मध्यें योनि सणून जो प्रकार आहे तें.

जातकर्म, न० सं० मूल उत्पन्न झालें असतां तत्काल कर्तव्य

तव्य त्याचा एक संस्कार आहे तें.

जातकुळी, स्त्री० जात आणि कुल परंपरा मिळून ती; उ० मुलगी सुरूप नव्हे पण जातकुळी चांगली म्हणून करितों.

जातगंगा, स्त्री० पतितादिकांस प्रायश्चितादि देऊन जातींत घेणें, किं० बाहेर घालणें. इत्यादि अर्थ मिळाला जो जाति समुदाय ती.

जातगोत, न० स्त्री० स्व ज्ञातिव स्व गोत्रोत्पन्न मनुष्य समुदाय तें, ती; उ० त्याला प्रायश्चित दिल्हें तथें सर्व जातगोत मिळालें होतें.

जातजमात, स्त्री० दे० स्व जातिसंबंधी जो मनुष्य समुदाय ती.

जातपात, स्त्री० जातगोत इ०; २, रा० जाति बहिष्कृत जो मनुष्य तो, जातींत यावया सार्ठीं स्व जाति समुदायास भोजन देण्याचा समारंभ करितो ती.

जातभाऊ, पु० स्वजातीय मनुष्य; उ० या गांवांत त्याचा कोणी जात भाऊ असता तर उपयोगी पडता.

जातलग, वि० स्वजातीय इतरांपेक्षां सर्व गुणांनीं जो उत्तम पशु, वृक्ष, इ० तो; उ० त्या गाईपेक्षां ही गाय जातलग आहे; त्यापेक्षां हा पेरू जातलग आहे.

जाँतली, स्त्री० रा० लोहान जातें.

जाति, स्त्री० सं० जात.

जातिनशी, अ० स्वतः

जातिवंत, वि० कुलीन; २, जातलग.

जातिस्वभाव, पु० प्रकृतिस्वभाव.

जाती, स्त्री० सं० जाई.

जातीचा, वि० जातिवंत.

जाँतीण, स्त्री० साळी, इ० भरडायाचें जें मोठें जांतें भ्रमतें ती; २, ला० तदाकार जें दारवेचें यंत्र करीत असतात ती.

जातीनें, अ० जातीनशीं; उ० तो जातीनें बलावूं आला त्यापेक्षां भोजनास गेलें पाहिजे: धनी जातीनें चतुर असला तरच आपलें घर सांभाळतो.

जातीय, वि० जातीनें जो युक्त तो; याचा प्रयोग प्रायः समासीं; उ० साधूंस स्वजातीय वधि जातीयसर्व समान आहेत

जाँतुली, स्त्री० कों० जांतली.

जाँतें, न० धान्यादि दळून पीठ करण्याचें उपयोगी दगडी आहे.

जात्यंध, वि० जन्मांध.

जात्या, अ० मूलप्रकृतीनें; उ० तो जात्या बुद्धिमान त्याला शास्त्र येण्यास काय करीण; २, स्वतः उ० एवढा श्रीमंत असून जात्या बलादू फिरतो आहे.

जाथ्रू, वि० विवक्षित कालपर्यंत, किं० विवक्षित संख्या इ० काचा जो नियम तेणेंकरून कोठें एक व्यापारी अभिसंबद्ध जो पदार्थ तो; उ० याची चाकरी जाथ्रू आहे.

जादा, वि० زیادہ हिं० अ० वि० जवाद.

जादू, स्त्री० جادو हिं० शाबरी मंत्र, इ० जी जारणमारणाची विद्या ती; २, जारणमारणार्थ त्या विद्येचा जो प्रयोग ती.

जादूगार, वि० जादू दिनीयार्थ करितो तो; २, दे० जादूजाणता तो.

जादूगिरी, स्त्री० जादू.

जादूगीर, वि० जादूगार.

जादूटोणा, पु॰दे॰ जादूची, कि॰ भुताटकीची जी विद्या तो.

जानजमान, ३लिं॰दे॰ तरणाताठा मनुष्य.

जानदार, ३लिं॰ को॰ दुरवणेकरून्यास संकेतानें स॰.

जानपलान, स्त्री॰ ओळखदेख.

जानवसघर, जानवसेघर, न॰ जानवशाचें घर.

जानवशा, पु॰ वधूसह वधूपक्षीय जनाची, कि॰ वरासह तत्पक्षीय जनाची जी विवाहार्थ प्रायः ग्रामांतरीं कोणएकाचे घरीं स्थिति तो.

जानवें, न॰ ब्राह्मणाचें गळ्यांत उपनयनचिन्हसूत्र असतें तें; जानवें उकें करणें, मोकळेंकरणें, स॰ कोणी स्वगोत्र संबंधी मेला असतां त्याचें यथाकथंचित क्रियाकर्म करून आपण शुद्ध होणें.

जानु, न॰सं॰ गुडघा मुख्यार्थी.

जानू, न॰ जानव्याचा अपभ्रंश.

जाप, पु॰ रा॰ प्रश्न, आज्ञा, उत्तर, इ॰रूप उक्त जो शब्द तो; २, देवसकीमध्यें देवा, याचें अमुक कर असा जो शब्द बोलत असतात तो.

जाँपणें, क॰ भाषण व्यापार करणें; २, ग॰ केल्या अपराधाविषयीं मान्य होणें.

जाफा, ३लिं॰ हिं॰ अ॰वि॰ जादा.

जाँब, पु॰ एक फलवृक्ष आहे तो व त्याचें फल तो; २, पाणी प्यावयाचे उपयोगी आकार विशेषाचें एक पात्र आहे.

जाब, पु॰ जबाब.

जाबसाल, पु॰ प्रश्नोत्तरात्मक उक्त जो शब्द, वाक्य, तो.

जाबसाली, ३लिं॰ जबाबी प्रथमार्थी; २, कांहीं एक सि-

द्ध व्यवहारास प्रमाणीभूत, कि॰ साध्य व्यवहारास उपयुक्त जे कागदपत्र तो.

जाँभळा, जाँभळा, पु॰ पिकलेल्या जांबळाचे रंगासारिखा जो रंग तो; २, ३लिं॰ तद्विशिष्ट जें वस्त्रादि तो.

जाँवा, पु॰ दगडांत एक जाति आहे जाचा वर्ण तांबूस असतो तो; २, एक वृक्ष आहे.

जाँबूळ, जाँभूळ, स्त्री॰ एक वृक्ष आहे; २, न॰ त्याचें फळ तें.

जाँबेथर, ३लिं॰ ग॰ जांबा प्रथमार्थी.

जाँबोरी, ३लिं॰ को॰ जांबा प्रथमार्थी.

जाँभई, स्त्री॰ निद्रा, आलस्य, इ॰विकृती मुळें तोंड पसरून दीर्घ श्वास जातो ती; २, ला॰ साहा महिन्यांचा जांभई, इ॰ स्थलीं कर्त्याचे दीर्घ सूत्रीपणामुळें कोण एकाचें काम लांबणीस पडण्याचा प्रकार असा अर्थ.

जाँभळी, स्त्री॰ जांभई.

जामगी, स्त्री॰ बंदूक, तोफ, इ॰ कांतून आवाज निघावा म्हणून त्याचे काण्यांतील दारू पेटवायाकरितां सूत. इ॰ कांचा जो तोडा करितात ती.

जामदानी, स्त्री॰ प्रायः आंगरख्याचे उपयोगी एक वस्त्र आहे.

जामदार, पु॰ जामदारखान्याबरील अधिकारी.

जामदारखाना, पु॰ जवाहीर, कापड, इ॰ पदार्थ देवाघेवायाचें स्थल.

जामा, पु॰ आंगरख्याचा एक भेद आहे.

जामात, पु॰ कन्येचा पति.

जामिनकदवा, पु॰ याविषयीं मी जामीन, असा उल्लेखपत्रीं लिहून उत्तमर्णास पत्र देतात तो.

जामिनकी, स्त्री॰ जामिनाचें कर्म.

जामिनगत, स्त्री॰ जामिनकी; २, ला॰ आपल्यास निर्वाहकेलाच पाहिजे अन्यथा आपली सुटका नाहीं असें जें प्रतिज्ञादि असतें तीं; उ॰ येतों सटलें त्यापेक्षां भोजनास गेलेंच पाहिजे एव्हढीं जामिनगत सुटणार नाहीं.

जामिनसांखळी, स्त्री॰ एक गांवचीं जीं अनेक कुळें तीं परस्पर एकमेकास जामीन गुंतवून घेण्याचा जो प्रकार तो; २, ला॰ एकाच प्रकरणाचा अर्थ करूं लागलें असतां होत नाहीं असें जें अनेक प्रकरणांचें जें अन्योन्यसापेक्षितत्व असतें तीं; उ॰ यांतला एकच खर्डा पाहून हिशेब मनांत येणार नाहीं, कांकीं, ही सर्व खडयांची जामिनसांखळी आहे.

जामीन, पु॰ उत्तमर्णास अधमर्णाचा विश्वास नसतो म्हणून मध्यें विश्वासार्थ जो दुसरा मनुष्य राहातो तो; २, हा जामीन क्रयविक्रयादि सर्व व्यवहारीं जाणावा; ला॰ कांहीं एक व्यवहाराचा परिणाम विवक्षितानुरूप घडेल, किंवा नघडेल अशा संशय असतां त्यांतून एकपक्षाविषयीं जो विश्वास देतो तो; उ॰ एवढे विचारांत कां पडले आहां, तुम्हीं हें औषध घ्या गुण न आला तर मी जामीन; ३, गृह, मंडप, इ॰ संबंधी आधारभूत जो स्तंभादि तो अशक्त झाला असतां बळकटीसाठीं तो न काढितां तत्समीप जो दुसरा स्तंभादि देतात तो; ४, आंचका द्यावयाचे उपयोगी बावडीस एक दोरा असतो तो; ५, सोंगट्यांचे डावांत पट्ट्ये रंगाची सोंगटी अडकून पडाया जोगी कच्चे रंगाची सोंगटी शत्रूनें माराया जोगी असत्ये तो; ह्या॰ जामीन राहा आणि गांठचे वाहा.

जायजणा, ३लिं॰ लग्नादि कार्यार्थ चार दिवस शोभे करितां दुसऱ्या कडून जो कांहीं दागिना, वस्त्र, मागून आणितात तो; २, ला॰ कन्यारूप संततीस म्हणतात; ३, वेदांतीजन देहादि विषयांस म्हणतात; उ॰ जायजणे वपु निश्चय मानुनि तूं भज त्या रघुवीर पदाब्जा.

जायपत्री, स्त्री॰ जायफाळावर तीन वेष्टने असतात त्यांतील मधलें जें वेष्टन तीं.

जायफळ, न॰ औषधाद्युपयोगी एक सुवासिक फल आहे.

जायबंदी, ३लिं॰ अ॰वि॰ मोडणें, फुटणें, इ॰ कारणामुळें नाश व्हायाचे अवस्थेस पावला असा जो पदार्थ तो; उ॰ पाण्यावर जातानां पडला म्हणून त्या घोड्याचा पाय जायबंदी झाला.

जाया, स्त्री॰ सं॰ भार्या.

जायाँ, ३लिं॰ अ॰वि॰ जायबंदी.

जायाँचा, ३लिं॰ ग॰ जायजणा.

जायाँस, अ॰ जायजणे पणानें, दे, घे, धा॰ प्र॰.

जार, ३लिं॰ परस्त्रीशीं संग करितो तो.

जार, पु॰ समुद्र तीरीं वारे सारिख्या जो मांस गोलक पडला असतो त्यास म्ह॰; तुझे तोंडाचा जार बाळला नाहीं, म्ह॰ तूं आजून आम्हास बुद्धि शिकवाया जोगा मोठा झालास नाहीं असा अर्थ.

जारकर्म, न॰ सं॰ मैथुन रूप जो व्यभिचार तें.

जारकर्मी, ३लिं॰ जारकर्म करणारा जो पुरुष, किंवा स्त्री॰ तो.

जारज, ३लिं॰ सं॰ जारापासून झालेला; २, जरायुजास च कोणी असे मंजस पणें म्हणतात.

जारण, न० शत्रु, इ० कांस वेड लागावें, कि० रोगादिक व्हावें, स० केलेला मंत्रप्रयोग तें

जारणमारण, न० शत्रु, इ० कांस वेड लागावें, कि० मरण प्राप्त व्हावें एतदर्थ जो मंत्रप्रयोग तें·

जारस, २ लिं० शेतांत लाविलेलें भात पिकलें असतां त्याचा पुरते पणीं सर्व दाणा न वाळूं देतां जें कापितात तें, कि० तत्संबंधी जो तंडुलादि तो·

जारिणी, स्त्री० व्यभिचारिणी·

जारी, स्त्री० दे० चलती·

जाल, न० सं० मत्स्यादि धराव्याकरितां जें जाळें करितात तें; याचे समास, मायाजाल, शब्दजाल, भवजाल, मोहजाल इ० होतात·

जालीम, ३ लिं० सहन होण्यास कठीण असा जो प्रखर उग्र औषधादि पदार्थ तो; उ० मोठमोठ्या जालीम मात्रा दिल्या ते ह्मां वायु उतरला·

जाँवई, पु० जामात; स० जांवयाचे पंक्तीचें जेवण आणि लेंका बरोबर अध्ययन, मिळाव्याला देव पाहिजे·

जाँवईआग्रह, पु० भोजनादिकाविषयीं कोणाएकास करितात जो अतिशयित आग्रह त्यास स०·

जाँवईण, स्त्री० जांवयाची भगिनी·

जाँवईशोध, पु० भ्रांतीमुळें. कि० अज्ञते मुळें शुद्ध अक्षरें खोडून अशुद्ध करण्याचा जो प्रकार तो·

जावपें, न० गाथ, कि० हेस, यांचें वांसरूं; रा० जावपे पेजानें वांसरूं पोसाचास देणें, स० त्या वांसरास जें प्रथम जावपें होईल तें त्या वेनाचें दूध पोसणारानें द्यावें अशा बोलीनें असा अर्थ·

जावपेकरीण, ३ लिं० जिचा पिणीचा वत्स जीवंत असतो ती, गाथ, हेस·

जावपेशुद्ध

जावपेशुद्ध, ३ लिं० रा० जिचें जावपें चांगलें होतें अशी जी गाथ, हेस, ती·

जावळ, न० छेदन संस्कार झाल्याचे पूर्वी लाहान मुलाचे डोकीचे जे केस वाढलले तें·

जावळा, ३ लिं० एक काली एकागर्भापासून उत्पन्न जीं दोन मुलें तीं प्रत्येकीं; २, स्त्री० अनेक जावा त्या, या अर्थी याचा म० अने० व०·

जावळीभावळी, ३ लिं० अनेक बंधु एकत्रपणांत असल्या मुळें एकाचेंच स्वामित्व संसारावर पुरतेपणीं नाहीं असा जो संसार, कि० तत्संबंधी व्यवहार; उ० जावळी भावळी संसार असला म्हणजे भपंच करितां कामास नये·

जावत्, अ० यावत्काल; उ० माझा हातपाय जावत् चालतो आहे तों चार अक्षरें केलींस तर होतील·

जावायेवा, पु० कोणाएकास्थलीं जाण्यायेण्याची जी वहिवाट तो; उ० आमचा पुण्याकडे जावायेवा होता तों पाहिजे तो देसचा जिन्नस आणीत होतों·

जासुदगिरी, स्त्री० जासुदाचें कर्म·

जासुदजोडी, स्त्री० जासुदांची जोडी·

जासुदी, स्त्री० दे० जासुदगिरी; २, जासुदास द्यावयाचें जें मोल्य ती; ३, ३ लिं० जासुद संबंधी जो चर्मीजोडा, चाल, इ० तो·

जासूद, २ लिं० جاسوس हिं० काशीद·

जास्त, ३ लिं० अ० वि० हिं० जबाद·

जास्ती, ३ लिं० अ० वि० हिं० जबाद·

जास्वंद, जास्वन, स्त्री० एक पुष्पवृक्ष आहे; २, न० त्याचें पुष्प·

जाहांबाज, ३ लिं० हिं० जाजा विद्या, कि० कला, इ० त्या मध्यें

ध्येजो निपुण तो; उ० हा जाहांबाज लिहिणारा, गाणारा, इ०.

जाहागिरदार, ३लिं० جاگیردار हिं० जाहागिरी आहे जास तो.

जाहागिरी, जाहागीर, स्त्री० جاگیر हिं० मर्दार, इ० कांस फौज देवणें, इ० खर्चाबद्दल जो मुलुक देतात ती; २, देवादिकांचा इतमामा बद्दल ग्राम वगैरे देतात ती.

जाहाज, न० جہاز हिं० प्रायः मोठें जें गलबत त्यास स०.

जाहाजम, न० जाजम.

जाहाँमर्द, ३लिं० جوانمرد हिं० कोणत्येही कामास हटत नाहीं आणि पुढें उडी घालितो तो; जवान मर्दाचा अपभ्रंश.

जाहाँमर्दी, स्त्री० جوانمردی हिं० जाहामर्दपणा.

जाहिरनामा, पु० ظاہرنامہ हिं० कांहीं एक गोष्ट सर्वांस कळावी त्यासून ती पत्रांत लिहून चावडी, इ० कांवर तें पत्र लाविलात ती.

जाहिरात, स्त्री० ظاہرات हिं० जाहिरनामा.

जाहीर, अ० ظاہر हिं० विदित; २, ३लिं० दुसऱ्यानें समजाविल्यामुळें विदित झाला जो व्यवहारादि तो.

जाळ, पु० अग्नीची जी ज्वाला तो; २, ला० ज्वर; ३, रा० अग्निस्पर्शजातीय जी शरीरास व्यथा होते तो: उ० निखट वाटल्यापासून माझे हातांस जाळ सुटला आहे; ४, स्त्री० लतागृह.

जाळगा, ३लिं० रा० लाहान असून जो फार हदरखोर तो.

जाळणूक, स्त्री० जळणूक.

जाळणें, जळे असें करणें; २, ला० गाँजणें; उ० तो आपल्ये पत्ये बोथकोस दिवसभर जाळितो: प्राणी जाळणें स० कोणएकाची दैव दशा अनुकूल झाल्यामुळें त्याणें मनास येतील तशा अभिमानाचा गोष्टी आचरणें.

जाळपोळ, स्त्री० जाळणें, पोळणें, इ० रूप जो व्यापार तो; उ० शेताची अद्यापि जाळपोळ करायची आहे, पाऊस तर आंगावर आला; उ० पेंडाऱ्यांनीं या मुलकाची जाळपोळ करून पैका नेला.

जाळभाज, स्त्री० रा० जाळपोळ.

जाळवात, पु० हातापायांचे तळव्यांस आग जळावी, भेगी पडाव्या, असा एक रोग आहे.

जाळाऊ, ३लिं० जळाऊ.

जाळी, स्त्री० मासे धराव्याचे जाळ्यासारिखी पुष्यादिकांची, किं० काष्ठ, कागद, इ० कांची मखर, इ० कांस लावायासाठीं करितात ती; २, लतागृह; उ० त्या मोगऱ्याचे जाळींत वाघ बसला आहे, जाऊंनका; ३, भोंवरा फिरवायाची जी दोरी असते ती.

जाळीदार, ३लिं० जास जाळ्या लाविल्या आहेत असें जें मखर, देव्हारा, इ० तो.

जाळींव, ३लिं० जाळाऊ; २, रा० जाळून तयार केला जो शेत जमीन तो.

जाळें, न० मत्स्यादि धराव्यासाठीं, किं० गोंवव्या, इ० ठेवायासाठीं सुतळ, सूत, दोरी, इ० कांचें विरल विरल घरें पडाया जोगें गुंफून करितात तें; २, ला० माशा धरणारा एक क्षुद्रजंतु आहे. त्याचे गुदद्वारांतून तंतु निघतात त्यांचें जें तद्वत् असतें तें; ३, केवल विरलावयव जें वस्त्र त्यास आरोपानें स०.

जिकडचा, ३लिं० जा प्रदेशींचा, किं० जा संबंधाचा जो

जो तो; उ० ही पोथी जिकडची घेतली असशील तिकडे ठेव; उ० जिकडचा पाहुणा तिकडे.

जिकडणें, अ० जा प्रदेशादिकांकडून; उ० ही जमीन जिकडणें पाहिजे तिकडणें मोजा शंभर काठ्या भरचे.

जिकडला, वि० जिकडचा.

जिकडील, वि० जिकडला.

जिकडून, अ० जिकडणें.

जिकडूनतिकडून, अ० चोहींकडून.

जिकडे, अ० जा प्रदेशादिकाकडे.

जिकडेतिकडे, अ० चोहींकडे; उ० चंद्रा जिकडेतिकडे पर्जन्य सारखा पडतो आहे.

जिंकणाभामी, स्त्री० दे० कोंड्या इ०कांचे खेळांत जिंकलें असतां कोंड्या, इ० द्यावयाचे संकेतानें जो खेळण्याचा प्रकार तो.

जिंकणूक, स्त्री० दे० जिंकणाभामी.

जिंकणें, वाद, क्रिडा, युद्ध, इ०कांचा आरंभ, वादी, शत्रु, इ०कांस पराजित करणें; उ० या लढाईमध्यें भरतपूरवाल्यास जिंकिलें; २, विवादास्पद, कि० पणास्पद, जें द्रव्य तें, न्यायतः आलसात करणें; उ० त्याणे पंचाइती मध्यें दोन गांव जिंकिले; ३, स्वनिष्ठ गुणातिशयानें इतर पदार्थ लघु करणें; उ० तुझे मुखानें चंद्रशोभा जिंकिली; ४, काम, क्रोध, निद्रा, इ० आपणास उपद्रव न होत असे स्वाधीन करून ठेवणें; उ० त्याणें काम जिंकिला; ५, कांहींएक संकटावस्थेंतून पारपडणें; उ० एवढें हें लग्न यथास्थितपणें तडीस गेलें म्हणजें जिंकिलें; ऊव जिंकणें, स्त्री० कोणएकाचे गुण, बल, इ०कांचे अपरिचयामुळें त्याचें भयवादत असतें तें तसरिचयादिकांनीं जाऊन निर्भयता पावणें; उ० नवागजा झाला ने ह्यां मजा जवळजायाला बचकत असत पण आतां ऊव जिंकली.

जिंकीर, स्त्री० हें कार्य माझानें होत नाही असें वारंवार सांगितलें असतांही पुनःपुनः कसेंही करून माझें कार्य करा करा, इ० ग्लानि दाखवून बोलण्याचा जो प्रकार तो; २, कोणएक कार्यार्थ अनेक उपाय केले ते निष्फळ झाल्यामुळें, कि० द्रव्याद्यभावामुळें जी निरुपायावस्थारूप खेददशा प्राप्त होत्ये ती; उ० डोळे यावे म्हणून त्याणें हजारों उपाय केले, तथापि गुण येईना यामुळें तो फार जिंकीरीस आला; उ० धान्य महाग झालें यामुळें लोक फार जिंकीरीस आले.

जिंकू, वि० दे० कांहींएक व्यवहारीं शक्ति कुंठित झाल्यामुळें निरुपाय होऊन साता जो थकला तो; उ० एवढे दिवस मीं संसार केला पण आतां जिंकू झालों.

जिंगमिषु, वि० सं० जावयाचे सिद्धतेस जो लागला तो; उ० यजमानाचा निरोप घेऊन आलों जिंगमिषु झालों, आतां दुसरी गोष्ट सुचत नाहीं; उ० याचे प्राण आतां जिंगमिषु दिसतात, औषध देऊन बरा येईलसें दिसत नाहीं.

जिंगीषा, स्त्री० सं० जिंकायाची इच्छा; उ० युद्धामध्यें जिंगीषा मृत्युभयास हटयांत शिरूं देत नाहीं.

जिंगीषु, वि० सं० जिंकायाची इच्छा जास आहे तो; उ० सर्व पृथ्वीचें राज्य जिंकून स्वर्गा विषयीं जिंगीषु झाला.

जिंणें, प्राण धारण करणें; २, न० प्राण धारण.

जिंत, वि० सं० केवळ. कि० तत्त्व भेदा विषयीं जी संज्ञा य कारणें तद्रहित; उ० ही पोर जींत अवदसा आहे.

जित, वि॰ सं॰ जिंकलेला जो शत्रु, द्रव्य, इ॰ तो; उ॰ युद्धानें. किं॰पणानें जित केलें जें द्रव्य तें आपलें: २. याचे समास, जितक्रोध, जितकाम, जितनिद्र, इ॰ होतात, तथे जिंकले आहेत क्रोधादि जेते जाणें असा असा अर्थ; आतां क्रोधजित, कामजित, इ॰ होतात, तेथे क्रोध, काम, यांणीं जिंकलेला असा अर्थ होतो.

जितका, वि॰ जें आहे प्रमाण, किं॰ संख्या जेते जाची तो; उ॰ जितका गूळ पाहिजे तितका आहे; उ॰ जितके रुपये पाहिजेत तितके मीं देतों.

जितकोळसा, पु॰ अग्नि सहित जो कोळसा तो.

जितक्यासतितका, वि॰ विवक्षित कार्या पुरता; उ॰ आजचे लाडू जितक्यासतितके झाले नपूरही आली नाहीं आणि उरलेही नाहीं; उ॰ जितक्यासतितकें बोलणें बोलावें, अधिक बोलूं नये.

जिंतणें, जिंकणें.

जितपत्र, न॰ जयपत्र.

जिता; वि॰ जामध्यें जीवात्मा आहे तो; २, ला॰ जा पाण्याचे झरे निरंतर वाहाते असतात असें जें पाणी तें; ३, प्रज्वलित ठेवया जोगा जो अग्नि, तो; ४, केवळ भस्मदशापन्न नव्हे अशी जी ताम्र, पारद, इ॰ धातु तो; ५, लोकामध्यें जाचा प्रचार आहे असें जें शास्त्र, व्यवहार, इ॰ तो; ६, जागरूक जें प्रमाणादि तो; ७, पुरतेपणीं न वाळूं देतां कापलें जें भात, गवत, इ॰ तो; स्त्री॰ जित्या गोटी आणि मेल्या माती.

जिताजागता, वि॰ दे॰ धडधडीत जीवंत; उ॰ तो जिताजागता असतां आपल्ये घरास कशी आग लावूं देईल.

जिताजीव, पु॰ सजीव जो मनुष्य, पशु, पक्षी, इ॰ तो; उ॰ जिताजीव मारणें हें घोर कर्म भलत्यास होत नाहीं.

जिताड, स्त्री॰ मेलेल्या शेतांतील जें कोठेकोठे जीवंत शेत असतें तें.

जितारा, पु॰ उन्हाळ्याचे दिवसांत ओलाचे आश्रयानें जें तृण रुजतें तो.

जित्राब, न॰ पेरलेलें जें धान्य, किं॰ लाविलें असें जें वांगें, मिर्ची, केळी, कलिंगडी, चिभडी, पानवेल, इ॰ नें; २, गोमहिष्यादि जे पशु तें.

जिथचा, वि॰ जा स्थळचा.

जिथला, वि॰ जिथचा.

जिथवर, अ॰ यत्कालावधि, किं॰ यदेशावधि; उ॰ जिथवर वाट पाहावयाची तिथवर पाहिली; उ॰ एकादमानें तूं जिथवर धांवत जाशील तिथवर मीं जाईन.

जिथून, अ॰ कालरूप, किं॰ देशारूप, विवक्षित अवधिपासून; उ॰ मीं जिथून आलों तिथूनच तूं आलास.

जिथेतिथे, अ॰ सर्वत्र; उ॰ हा जिथेतिथे हात धुऊन माझे पाठीस लागला आहे.

जिनगर, पु॰ स्त्री॰ रीण, रंगारी, लगाम, मरोसर इ॰ पदार्थ निर्माण करणारी एक जाति आहे.

जिनगरी, वि॰ जिनगरानें निर्मित जो चित्रादि पदार्थ तो, किं॰ जिनगरसंबंधी जो तो.

जिनगानी, स्त्री॰ प्राण धारणकरून जी स्थिति ती; २, त्यास साधभूत जें द्रव्यादि ती; उ॰ त्याची हजार रुपयांची जिनगानी होती ती चोरानें नेली.

जिनगी. स्त्री०हिं० जिनगानी हिंतायार्थी.

जिनशी, अलिं० جنس हिं०जिनस भरून आलेलें. कि० जिन्नस वाहायाचेच उपयोगी जें तारूं, तरांडें, इ०तो.

जिन्नस, पु० جنس हिं० क्रयविक्रयायुद्देशेंकरून यावद्वस्तुमात्राम म्हणतात; २, स्त्री० कांहीं एक वस्तु; उ० त्याणें तुह्मापाशीं जिन्नस देविली आहे ती द्या.

जिन्नसखाना, पु० جنس خانہ हिं०दे० श्रीमंतलोकांचे घरीं तूप, तेल, खारीकें, खोबरें, इ० जिन्नस ठेवायाची जी जागा असते तो.

जिन्नसपानस, पु०हिं० अनेकप्रकारचा जो जिन्नस तो.

जिन्नसवार, अलिं० جنس وار हिं० चमत्कारिक तऱ्हेचें जें वस्त्र, पात्र, इ०तो; उ० एकादें जिन्नसवार चीट आढळल्यास आंगरख्यासाठीं घेऊनया; २, नानाप्रकारचा जो कांहीं एक तो; उ० एकाच जातीचीं फुलें आणूं नको जिन्नसवार घेऊन ये; ३, विवक्षित अनेकप्रकारचा जिनसाचे नामनिर्देशानें युक्त जी याद, लेखवेन, इ०तो; उ० जिन्नसवार याद लिहून दे म्हणजे तो आणीन

जिभली, स्त्री० जिह्वस भाथः निंदेनें स्त्री०; २, सर्पजातीय जे सर्व त्यांची जी जीभली.

जिभळी, जिभोळी, स्त्री०दे० ओष्ठप्रांतभागली. प्रा०चाट, धा०प्र०अने०व०.

जिभूड, स्त्री०न०चिभूड.

जिम्मा, पु०स्त्री० جمہ हिं० अन्य संबंधी जी कांहीं एक गोष्ट, किं० पदार्थ यांचा विवक्षितावून विजातीय परिणाम झाला असतां त्याचा निर्वाह मीं करीन अशी संकेतानें घेतला जो तन्निर्वाहकतेचा पत्कर तो ती; उ० उगवून देण्याविषयीं तुह्मी जिम्मा घेत असलां तर याला रुपये देईन; पुस्तक लिहिण्याचा जिम्मा तुह्मी घेतलात म्हणून मीं स्वस्थ आहे; हे दागीने एवढे तुमचा जिम्मेस असूं द्या

जिम्माफारक, अलिं०हिं०दे० कांहीं एक व्यवहारीं घेतला जो जिम्मा त्यापासून जो मुक्त झाला तो.

जिम्मेदार. अलिं०हिं० जिम्मा घेणारा जो मनुष्य तो.

जिरगा, पु० साळींत एक भेद आहे.

जिरणी, जिरणीस, जिरणीवर, जिरणीखाली, पु० धातूचा योगीं प्रयोग याचा अर्थ; कांहीं एक दुखण्याची जी उतारदशा ती; उ० याचा ताप जिरणी पडल्यावर येईन; २, पदार्थ मेविला असतां त्या पासून कांहीं एक गुण, किं० दोष झाला तो नहोतां त्या पदार्थानें पचावें अशी जी त्या पदार्थाची अभ्यासदृढतामूलक दशा ती; उ० मला नंबारचू जिरणीस पडला म्हणून गिळला तथापि ओकारी येत नाहीं.

जिरणें. भक्षिलें अन्नौषधादि पचणें; २, भूम्यादिकांत तैलादि सद्रव पदार्थानें मिळून नाहींसें होणें; उ० इतकें तूप डोकीला जिरव म्हणजे कपाळाचा ठणका राहील; ३, कांहीं एक आयतनादि सामान्यतः भरलें असतां त्या मध्यें अन्यही कांहीं पदार्थ यथा कथंचित् समाविष्ट होणें; उ० या भरल्या कंठाळेंत एवढें गांठोडें घालतां हें जिरेल कसें; ४, पोटांत वाढूं लागलेला गर्भ आंतल्ये आंत नाहींसा होणें; उ० तिचें साहा महिन्यांचें पोट जिरलें; साहा महिन्यांचा गर्भ जिरला; ५, दुसऱ्याचें अपहारिलेलें द्रव्यादि, किं० कांहीं एक केलेली लबाडी ती जाचे नाशी होणें; उ० अन्याय्यानें दुसऱ्याचें द्रव्य येतलें असतां जिरत नाहीं; उन्मिषत जे स्तन, उदाणू, इ० त्याणीं जागचेजागीं बसणें; ६, मोडशी, ज्वर, इ० रोगांनीं बाह्यात्कारीं विशेष विकृति न करितां

ता शरीरांत विकृति होई अशा अवस्थेतें पावणें;उ० तुझे आंगीं मोडशी जिरली आहे ह्मणून,आंगावर गळवें उठतात;८,गर्व,राग,रडें,हास्य,शोक,काम, ह्रग,मूत,इ०शरीरांत सवेग उद्भूत झाले असतां कांहीं प्रतिबंधामुळें बाहेर न पडतां परिणामांतर पावून आंतल्ये आंत राहाणें;उ० मी बळकट ह्मणून गर्वाचा गोष्टी सांगत असे,पण तो सर्वाई बळकट भेटतांच त्याचा गर्व जिरला;९,जा ओषधादिकाचा, रेच,वमन,कैफ,इ०कांहीं गुण असतो तो नहोतां तें ओषधादि पचणें;उ० त्याला जेंजें ढाळक द्यावें तेवढेंही जिरतें ढाळकांहीं होतनाहीं;१०,कांहींएक कार्याबरकारण सामग्री खपणें;उ० या घराचा एका पाखाला हजार गुंडया जिरल्या;कंडू,भोंवळ, इ०जिरणें ह्म०कोणी गर्व परिहारक भेटल्या मुळें त्यांची शांति होणें असा अर्थ.

जिरमाणी,जिरणी मथसार्था वांचून सर्व अर्थी.

जिरवेल,स्त्री०भातांत एक जाति आहे.

जिराइती,वि०जिराईत संबंधी जीजमीन,वसूल, पाहाणी,इ०तो.

जिराईत,वि०पूर्जन्यानें पिकतेंजें शालिधान्यादिकतें

जिरीं,न०जिरें.

जिरूं,न०दे०जिऱ्याचा जो एक दाणा तें

जिरूंमिरूं,न०जिरीं मिरीं,इ०जो किराणा जिन्नस तें.

जिरें,न०मसाला इ०कांस घालाथाचे उपयोगी सुवासिक बीज आहे.

जिरेपाक,पु०जिरें,इ०अनेक पदार्थ एकत्र करून औषधार्थ जो वैद्य पाक करितात तो.

जिरेसाळ

जिरेसाळ,स्त्री०जिरवेल.

जिरेळ,जिरेळी,स्त्री०केळींमध्यें एक जाति आहे.

जिरेळें,न०जिरेल्ये केळीचें जें केळें तें;प्रा०केळें शब्दाशीं योग असतांच प्रयोग दिसतो.

जिलकाद,पु०हिं०यवनी महिन्यांतील अकरावा महिना तो.

जिलबी,जिलिबी,जिलोबी,स्त्री०हिं०एक पक्वान्न आहे.

जिलीब,स्त्री०हिं०राजादिक चालत असतां अनेक शिपाई,स्वार,इ०कांचा समुदाय बरोबर चालत असतो ती.

जिल्हई,स्त्री०हिं०अलंकार,पात्र,इ०कांवर ओप दिल्या मुळें,किं०यांसल्यामुळें जी तेजगी येते ती.

जिल्हा,पु०हिं०राजकीय व्यवहाराचे व्यवस्थे साठीं कांहींएक अवधि कल्पून जो देश विभाग करितात त्याचे पोटीं अनेक तालुके प्रांत असतात तो.

जिल्हे,स्त्री०हिं०दे०जिल्हई.

जिल्हेज,पु० ذی الحجہ हिं०यवनी महिन्यांतील जो बारावा महिना तो.

जिवट,वि०शरीरानें जरी किरकोळ दिसला तथापि विवक्षित कार्य निर्वाहा विषयीं शरीर शक्ति जाचे आंगीं आहे तो.

जिवडा,पु०रा०क्षुद्र जंतूस ह्म०;२,ला०प्रिय पुत्रादिकांस लालन प्रसंगीं ह्म०.

जिवंत,वि०मेला नहे तो;२,जिंत.

जिवंतभेट,स्त्री०मरणोन्मुख झालेल्या मनुष्याची. तें जिवंत असतां जी भेट ती.

जिवंतसमाध,स्त्री०कों०व्याधि ग्रस्त मनुष्य आपण मरावें ह्मणून आपणास जिवंत पणींच पुरु-

न घेतात तीं.

जिवती, स्त्री० एक देवता आहे तिची मतिमा करून मुलांचे गळ्यांत बांधितात ती.

जिवलग, वि० जीवास आश्रयभूत असा जो प्रिय पति ईश्वर तो.

जिवस, वि० रा० जिवट.

जिवा, वि० रा० जिता.

जिवाचाकलिदा, पु० जिवापेक्षांही जो प्रिय तो.

जिवाणू, न० किरडूं.

जिवापरना, वि० शारीर शक्तीनें दुर्निर्वह जें कार्य, दुरवणें, इ० तो; उ० आजची मजल जिवापरती झाली यामुळें त्याला ज्वर आला; उ० याला जिवापरतें दुरवणें आलें आहे निभावेल तेव्हां खरा.

जिवाभावानें, अ० अंतःकरणापासून प्रीतीनें; उ० मुलाला जो जिवाभावानें घेतो त्यापाशीं फार जातें.

जिवावरचालाग, पु० जीव जाण्याचे प्रसंगाची संभावना जांत आहे असें जें कार्य तो; उ० पर्जन्यकाळीं समुद्रांतून जाणें हा जिवावरचा लाग आहे.

जिव्हाळा, पु० कांहीं एक पदार्थ, कि० गोष्ट जाचे आश्रयबलानें उत्पन्न होत्ये वर्तत्ये असें जें कांहीं त्या पदार्थाचें कि० त्या गोष्टीचें जीवस्थानापन्न तत्व असतें तो; उ० या विहिरीचा जिव्हाळा लाहान या मुळें पाणी थोडें, आमचे संपत्तीचा जिव्हाळा बंद झाला असतां पुढें कठीण पडेल; या मुलाचा जिव्हाळा पाहून अध्ययन सांगावें; २, विणा इ० कांचे तारांस जो झारा लावितात तो; ३, अंतःकरण ओढाया जोगी जी ममता तो: उ० जिव्हाळ्याचा मनुष्य असल्या वांचून दुरवणेकऱ्याची चाकरी भलत्याला होत नाहीं; दे० जिव्हाळीं लागणें

लागणें स्व० जे दुसऱ्याचें शब्दादिक अंतःकरणास व्यथा होई असें होणें.

जिव्हाळी, स्त्री० नरवाचे खालचा जो सचेतन भाग ती; २. सूर, सनई, यांस तोंडांत धरून वाजवाया साठीं, जें ताडपातीचें पोंपरें करून घालितात तें.

जिव्हा, सं० स्त्री० जीभ मुख्यार्थी.

जिव्हाग्र, न० जिव्हेचें जें अग्र तें; उ० जें तो पदला आहे तें त्याचें जिव्हाग्रीं आहे; ती काठी त्याचे जिव्हाग्रीं लागली स्व० जे मर्म स्थलीं, असा अर्थ.

जी, अ० विनयपूर्वक हाक देणें. कि० हाय स्व० णे. इत्यर्थक; उ० अरे खंडू, जी; २, प्रायः ब्राह्मणातिरिक्त जातीचे मनुष्यांस प्रतिष्ठितपणें हाक मारायाची असतां हा शब्द पुढें लागतो; उ० खंडोजी, रघुनाथजी, शेठजी, इ० जी स्व० णें स्व० अभिमान सोडून दुसऱ्याचे अंकितपणें वागणें, जीजी करणें, स्व० जी स्व० णें.

जीत, वि० रा० जिता; २, स्त्री० दे० जय; उ० प्रसंग आला असतां युद्ध करावें हार जीत ईश्वराधिन.

जीन, न० पु० زين हिं० रवो गिरांत एक भेद आहे.

जीनजिन्नब, न० को० शेत, भात, माळवें, इ० जें जिन्नब तें; उ० अरे नदू सोडून को कोणाचें जीनजिन्नब खाल्लें तर मसाला पडेल.

जीभ, स्त्री० रस ग्राहक जें मुखांतील इंद्रिय तें; २, नंदीबैलाचे पाठीवर जिव्हेचे आकारा सारिखें चर्म वादतें ती; रा० जीभ पाघळणें, स्व० जी कांहीं अनुच्चारणीय गोष्ट ती तोंडांतून बाहेर पडणें; जिभेस हाड नसणें स्व० अनृत अपशब्दादि बोलण्या विषयीं भय नसणें.

जीर, पु० को० कोंबळें जें केळें तो.

जीर्ण, वि॰ बहुत काल गेल्यामुळें, कि॰ दुरवणें, इ॰ कारणामुळें जो जर्जर झाला तो; २, जिरलेंगेलें जें भक्षित अन्नादि तो; ३, जीर्णज्वरासही कोणी म्हणतात.

जीर्णज्वर, पु॰ बहुत दिवसांचा हाडीं चसलेला जो बारीक ज्वर असतो तो.

जीर्णोद्धार, पु॰ जीर्ण झालेला जो देव, देवालय इ॰ पदार्थ तो जुना काढून नवा करण्याचा जो व्यापार तो.

जीव, पु॰ सं॰ प्राण: २. अंत:करण विशिष्ट जें चैतन्य तो; ३, सामान्य प्राणीमात्र तो; ४, फल क्षतादिकांचे ठायीं पडतात जे कृमि तो; ५, वस्तुमात्राचे ठायीं तत्तत्कार्यनिर्वाहक जी शक्ति असते तो; ६, कांहीं एक पदार्थ, व्यवहार, इ॰कांचे ठायीं गणनीयत्वादि विषयीं प्रयोजक जो तत्वांश तो: उ॰ कापडाचे व्यापारांत आतां जीव राहिला नाहीं; ह्या बाबतभी सांगतो स्वरीपण यांत कांहीं जीव दिसत नाहीं; जीव धरणें, स॰ अशक्त मनुष्यादिकानें, कि॰ वृक्षादिकानें आंगीं बळकटी धरूं लागणें, जीव अडकणें, टांगणें, स॰ प्रियपदार्थाकडेस अंत:करण वृत्ति गुंतली जाणें; उ॰ मीं गळे आहें स्वरीपण माझा जीव पोराकडे टांगला आहे; जीव मारणें, जाळणें, स॰ कांहीं एक प्रियपदार्थ विषयिणी इच्छा जिंकणें; जीव देणें, स॰ विषादि भक्षण द्वारा आत्महत्या करणें, कि॰ कांहीं एक कार्यावर आपल्ये जिवाची आशा न धरितां पराकाष्ठेनें खपणें; जीव राखून काम करणें, इ॰ स्थलीं आपल्ये जिवास श्रम न देतां काम करणें; जिवावर येणें, स॰ कांहीं एक गोष्ट करावयाद्वारें मृत्युप्राय कठिण वाटणें, कि॰ प्राणसंकट प्राप्त होणें; उ॰ याला एवढे रुपये द्यायला मोठें

जिवावर आलें आहे; जिवांतजीव नसणें, येणें, एथें जीव शब्दाचा अर्थ धैर्य असा होतो; जिवासजीव देणें, स॰ समर्थी एकमेकासाठीं जीवही द्यावया जोगें अतिशयित मित्रतेनें वागणें; एकजीवदेणें आणि एकजीवजाणें, स॰ कोण एकानें आसन्न मरणावस्थापावणें; उ॰ त्याची आतां काय दशा सांगावी, एकजीव येतो आणि एकजीवजातो; एकजीव म्हणतो करावें, एकजीव म्हणतो नकरावें, इ॰ वाक्यांचा ठायीं जीव शब्दाचा अर्थ अंत:करण वृत्ति असा होतो; जिवें मारणें, स॰ कोणएकास ठार मारणें, जिवाचा घोटघेणें. इ॰ स्थलीं, जिवाचा घोट हा असंभव म्हणून जीव शब्दार्थ देहादिक जाणावा; रडून ओरडून जीव दाकणें, ओकणें, इ॰ स्थलीं अतिशयित रडणें, ओरडणें, असा अर्थ; तो त्यासाठीं जीव टाकतो, देतो, स॰ त्या पदार्थाचा त्यास वियोग सहन होत नाहीं असा अर्थ जाणावा.

जीवघेणा, जीवघेण्या, वि॰ कों॰ दुसऱ्यास मनस्ताप यावया जोगा उपद्रव देणारा जो मनुष्यादि, कि॰ भारी कठीण जे काम इ॰ तो.

जीवजंतु, पु॰ सं॰ कीड मुंगी इ॰ जे क्षुद्र प्राणी तो.

जीवजिवडा, पु॰ रा॰ सर्प, फुरसें, कीड, मुंगी, इ॰ जो प्राणी तो.

जीवत्पितृक, वि॰ सं॰ जिवंत आहेत आई, बाप जाचे तो, कि॰ बाप मात्र जाचा जिवंत आहे तो.

जीवदशा, स्त्री॰ सं॰ आत्मज्ञानावांचून जन्म मरणाच्या फेऱ्यांत असावें अशी जी अवस्था ती.

जीवदान, न॰ सं॰ मरण्याचा प्रसंग आला असता दुसऱ्याचे जिवाचें जें संरक्षण तें; उ॰ या रोगास कांहीं

ओषध देऊन तुला मला एवढें जीवदान द्यालतर पाहा.

जीवन, न० सं० उदक; २, जो वांचून जो वांचत नाहीं तें अन्नादिक त्यांचें; ३, प्राण धारण; ४, ला० जो वांचून जो पदार्थ राहात नाहीं, किं० नाश पावतो तें त्यांचें; उ० दिव्यांचें जीवन तेल, अग्नीचें जीवन काष्ठ, संतांचें जीवन हरिभजन.

जीवनकळा, स्त्री० देहाचा ठायीं विषयादि जाणावे अशीजी ईश्वरानें युक्ति दाखविली असते ती; उ० बुद्धिमान्मनुष्यास देहही करवेल पण जीवनकळा ईश्वराचे हातीं.

जीवनपाणी, न० दे० कार्य निर्वाहक जी शारीरशक्ति ते; उ० या घोडयाचें जीवनपाणी पाहून ओझें घालणें तें घाला.

जीवनमाफक, अ० सामर्थ्यानुरूप, काम सांगणें, दंडकरणें, औषध देणें, इ० कांचें वि०.

जीवनोपाय, पु० कांहीएक संकटादिकापासून वांचण्याचा जो उपाय तो.

जीवन्मुक्त, ३ लिं० सं० जो मनुष्य विषयापासून विरक्त होऊन जाचा देहाभिमान सुटून सर्व पदार्थ ईश्वररूप मानितो तो.

जीवन्मृत, ३ लिं० सं० जिवंत असून जो मेल्या सारिखा तो, म्हणजे जाची कीर्ति बुडाली. किं० दोषाचरणामुळें लोकांत निंद्य झाला जो पतितादि तो.

जीवात्मा, पु० सं० जीवरूप जो आत्मा तो.

जीविका, स्त्री० सं० उपजीविका; २, प्रायः धनशक्ति; उ० त्याणें आपल्ये जीविकेप्रमाणें धर्म केला.

जीवित, न० सं० जिणें द्वितीयार्थी.

जीवितेश

जीवितेश, ३ लिं० सं० जिवलग; २ यमास स०

जीवित्व, न० जीवित.

जीवींचा, ३ लिं० अंतरंगींचा जीव सरवा, प्रिय, इ० तो.

जुई, स्त्री० एक पुष्पवल्ली आहे.

जुकड, न० दे० जोखड.

जुगणें, विवक्षितकार्य सिध्यनुकूल परस्पर संतन होणें; उ० एक बैल पडला तापट, दुसरा पडला मट्ट, यामुळें नांगराचे कामास दोघांचें जुगत नाहीं; २, ला० कांहीं एकदुसऱ्याशीं कर्तव्य जो व्यवहार तो विवक्षितानुरूप घटनेस येणें; उ० आम्ही कापड घेणार होतों परंतु कापडकऱ्याचें, आमचें, जुगत नाहीं; ३, अनेक सोंगट्या एका घरीं बसणें; ४, परस्परांचा विरोध जाऊन ऐकमत्य होणें; उ० त्या भावळांचें एवढे दिवस वांकडें होतें पण आतां जुगलें; ५, संभोगार्थ स्त्री पुरुषांनीं एकवटणें.

जुगडाव, पु० सोंगट्यांचें जूग चालायाचे उपयोगी, किं० जुगायाचे उपयोगी जो फांशावर डाव असतो तो

जुगदान, न० जुगडाव.

जुंगाड, न० मोठी जी जाळी, झुडपी, तें; २, जाचा विस्तार मोठा असा जो प्रचंड वृक्षतें; ३, विवक्षित प्रमाणापेक्षां फार मोठें शरीर जाचें असा जो मनुष्य, सर्प, हस्ती, मत्स्य, इ० तें.

जुगार, न० द्रव्यादिक मांडून अमुक फांसा पडला असतां तें द्रव्य घ्यावें, किं० तद्विपरीत पडला असतां द्यावें, अशा तऱ्हेचा संकेतानें एक खेळ खेळत असतात तें.

जुगारी, जुगाऱ्या, ३ लिं० जुगार खेळण्याचें व्यसन आहे

आहे जास तो.

जुगूत, स्त्री० रा० कांहीं एक व्यवहार थोडया खर्चांत झाला, किं० त्याचा दुष्ट परिणाम होऊं नये म्हणून चित्तानुसंधान पूर्वक तो व्यापार करण्याचा जो प्रकार ती; २, युक्तीनें प्रपंचादिकाचा जो यथाकथंचित् निर्वाह ती; उ० शंभर रुपयांत कर्शा तरी संसार खर्चाची जुगूत करितों.

जुगूल, जुगल, स्त्री० एक व्यापाराविषयीं अनेकांचा जो परस्पर अविरुद्ध भावपूर्वक यथायुक्तपणा कीं जेणेंकरून त्या व्यापारावर कांहीं एक विशिष्ट गुण उत्पन्न होतो ती; उ० या मृदंग्याची आणि गवय्याची जुगूल चांगली होत्ये; २, कांहीं एक गायनादि व्यापार करणारास इतरकृत जो साहित्यानुकूल व्यापार ती; उ० याला पुढें तसें गातां येत नाहीं पण मागून सूर देण्याविषयीं जुगूल चांगली करितो; ३, अनेकांचें जें कांहीं एक कार्याविषयीं ऐकमत्य ती; उ० या गांवकऱ्यांचें एकवीं कसें असो पण प्रयोजन करण्याविषयीं सर्वांची जुगूल खरी.

जुंज, न० दे० झुंज.

जुंजणें, दे० झुजणें.

जुजबी, वि० ع ج ب हिं० सरासरी निर्वाहा पुरतें जें गृहादिक बांधिलेलें तें; २, दे० यथाकथंचित् निर्वाहापुरता जो व्यवहार, किं० आटोपतें जें संसार इ० खटलें तो.

जुट्टा, पु० दे० एकावर एक अशा क्रमानें रचित जो दाहा कोलांचा समुदाय तो; उ० एवढेशी पडवी शाकाराला पांचशें जुट्टे कोलें लागलीं.

जुडगा, पु० अनेक चोथा. तांदें. शेंगा. इ० पदार्थ एकत्र

जुळून बांधून केला तो.

जुडगें, न० जुडगा.

जुडणें, प्रसंगागत कांहीं एक कार्यास प्रवृत्त होणें; २. कांहीं एक उद्दिष्ट कार्याविषयीं मनःपूर्वक प्रवृत्त होणें; उ० जेवायला सर्व जुडतात परंतु कामास कोणी जुडत नाहीं; ३, रा० कांहीं एका कार्यार्थ अनेकांनीं एकवटणें; उ० तो एकटा होता तों पर्यंत मी त्याजबरोबर भांडलों मग ते दोघे चौघे जुडून येतांच पळालों.

जुडा, पु० दे० जुडगा.

जुडी, स्त्री० प्रायः लाहान जो जुडगा ती.

जुतें, न० वाहाणाचा जोडा जो डतें, किं० एक वाहाण तें.

जुदा, वि० ع ج د हिं० निराळा.

जुनरीकागद, पु० जुनर म्हणून एक गांव आहे तथें एका जातीचा कागद उत्पन्न होत असतो तो.

जुना, वि० बहुत दिवसांचा; उ० आतां जुनी माणसें बहुत करून राहिलीं नाहीं; २, कांहीं एक व्यापार समाप्त होऊन जास बहुत वेळ झाला तो; उ० अरे तुझे पंक्तीचे जेवणारे जेवून उठून जुने झाले तरी तुझें जेवण होतच आहे.

जुनाट, वि० अतिशयित जो जुना तो: उ० तो जुनाट गोष्टी सांगतो; २, बाल्यत्व मूलक कोमलपणा जाऊन आंगचा गेला तो; उ० या झाडांतलें जुनाटसें झाड पाहून तोडा; ३, चिरंतन जो तो, परंतु एथें चिरंतनत्वासुद्धां जें जीर्णत्वें विवक्षित नाहीं; उ० आतांचे मनुष्यांपेक्षां जुनाट मनुष्य प्रमाणिक असत, जुनाट देवळांचीं कामें पक्कीं.

जुना पाना, वि० केवल जुना, किं० मध्यम जुना इ० पदार्थ तो; उ० त्या गरीबाला द्या, एकादें जुनेपानें

धोतर असलें तर; उ० आलां सणून काय पुसतां येऊन जुनेपानें देखील न आलों.

जुनावणें, कालानें कांहीं एक पदार्थाचा कोमलपणा जाऊन त्याणें कठिनत्वादि दशा पावणें; २, ला० अभ्यासामुळें विद्यादि परिपक्व होणें; ३, विरल प्रचार जी गोष्ट तिणें सर्वत्र प्रचार होई अशी दृढता पावणें.

जुनेर, न० जुनें जें स्त्रियांचें नेसायाचें वस्त्र तें.

जुनेरें, न० जुनें जें वस्त्र तें.

जुंपण, न० ग० मोठी दुपेडी तिपेडी जी दोरी तें.

जुंपणी, जुंफणी, स्त्री० गाडा, इकांस बैल इ० विवक्षितानुरूप संबद्ध करण्याचा जो व्यापार ती; २, दे० गाडा, इ० कांस बैल इ० जुंपायाची जी दोरी असते ती.

जुंपणें, जुफणें, नांगर, गाडा, इ० कांस बैल, घोडा, इ० संबद्ध करणें; २, ला० एकाद्यास एकाद्या कार्यावर नसुटाया जोगा गुंतविणें; उ० नोमला या कामावर जुंपून आपण निघून गेला; ३, युद्ध, वाद, इ० प्रवृत्त होणें; उ० त्यांची बोलतां बोलतां अकस्मात लढाई जुंफली.

जुंवडा, पु० दे० वेणी, वेणी, इ० एकवटून त्यांचा बांधिला जो बुचडा तो.

जुंवाड, न० प्रायः जुंगाड याअर्थी.

जुमला, पु० جملہ हिं० मा० समुदाय याअर्थी.

जुमान, पु० हिं० दे० कोणएका पासून हा थोर, हा दुर्निवेह इ० बुध्या जो बचक तो; पावणें या अर्थी. स्वा. धातूचाही प्रयोग होतो; उ० तुझी डोळेवटारलेत सणून तो का जुमान रवातो आहे.

जुमानणें, हें दुर्निवेह हें अनुल्लंघनीय इ० बुध्या मानणें उ० जो सर्कारला जुमानीत नाहीं तो का स्वोताला जुमानतो आहे.

जुमास, पु० हिं० जुमान.

जुयटें, न० खाडींतील जें बेट तें.

जुरत, स्त्री० हिं० दुसऱ्यास मारणें, शिव्यादेणें, इ० विषयीं जी कोणएकाची शक्ति ती; मा० निषेधविषयीं प्र०; उ० त्याची काय जुरत झाली आहे वाघाचे आंगावर जायाला.

जुरीवावरा, वलिं० दे० कुर्रा आहे ज्यास असा जो शिपाई तो.

जुलमाचारामराम, पु० आपल्या मनांतून हौस नसून जें कांहीं करावें लागतें त्यास स्व०.

जुलाब, पु० جلاب हिं० दाल होऊन पोट स्वच्छ व्हावें सणून जें औषध घेतात तो; व तें औषध घेतल्या मुळें होतो जो दाल तो.

जुलूम, पु० ظلم हिं० जबरी; २, ला० कांहीं एक गोष्टीचा साधारणरीतीपेक्षां जो अतिशय तो; उ० यंदा पावसानें मोठा जुलूम मांडला आहे; उ० पोरानें रडण्याचा मोठा जुलूम केला.

जुंवळ, न० रा० एकागर्भापासून उत्पन्न झालेले जे दोन प्राणी ते दोन मिळून एक तें.

जुंवळा, वलिं० रा० जुळा.

जुंवळी, स्त्री० रा० स्वापेक्षेकडे इ० सजातीय समजे पदार्थ त्यांचें जें युग्म ती.

जुवा, पु० हिं० जुगार.

जुंवाली, स्त्री० कों० राहाट इ० कांस बैल इ० जुंपायाचे उपयोगी जी दोरी करितात ती.

जुवें, न० रा० नदी, खाडी, इ० कांतील जें बेट तें.

जुवेबाज, वलिं० हिं० जुगारी.

जुळणी, स्त्री० जुळण्याचा जो व्यापार ती; २, परस्परांची आनुकूल्यें करून जी संबंध योग्यता ती; उ० आमचा जुळणीस कोणी मिळत नाहीं, या पदाची आणि अभंगाची जुळणी चांगली होत्ये.

जुळणें, उ० अनेकपदार्थ, किं० कांहीं एक व्यवहार विवक्षित संबंधानें यथायुक्त संबद्ध करणें; उ० ही कळाशी सारखी जुळत नाहीं अरा तासलें पाहिजे; कागद पसरले आहेत ते नीट जुळून ठेव; तुझी गोष्ट बोलतांपण ह्याचा पूर्वपर संबंध जुळत नाहीं.

जुळा, वि० जावळा प्रथमीं; २, एकाठिकाणी चिकटून उत्पन्न झालीं जीं दोन फळें, पुष्पें, इ० तीं; उ० जुळा आंबा. जुळें केळें. इ०.

जुळी, स्त्री० जुंवळी; २, अनेक पर्णादिक एकत्र जुळून केलाजो राशी ती.

जुळें, न० जुंवळ; २, मैथुनासक्त जें सर्पादि मिथुन तें.

जूं, न० नांगर, इ० कांस बैल, इ० जुंपाया साठीं त्याचे मानेवर ठेवायाचे उपयोगी जें काष्ठ करितात तें; २, दे० जुवें.

जूग, न० सोंगट्यांचे खेळांत एका घरीं बसल्या जा अनेक सोंगट्या तें; २, ला० समानशील दोन तीन मनुष्यादि एकवटून झाला जो समुदाय त्यासही ल०; उ० त्या पोरांचें जूग फोडल्या वांचून कथेंतली गडबड मोडणार नाहीं.

जूट, उ० स्त्री० न० अनेक मनुष्यादिकांचें जें ऐकमत्य तो, ती, तें; २, एक मताचे अनेक मनुष्यादिकांचा जो समुदाय तो, ती, तें.

जून, वि० जाचा कोंवळेपणा गेला असा जो पदार्थ तो.

जूळ, न० जुंवळ; २, स्त्री० दे० एकाचें स्थलीं न्यायासाठीं दोन गाई, इ० कांचें जें एकादांव्यां संयोजन ती.

जृंभा, स्त्री० सं० जांभई.

जे, अ० सामान्यतः प्रतिज्ञात जो अर्थ त्याचा विशेषें करून स्वरूप प्रदर्शनाचें द्योतक; उ० साहेबाचे खिजमतीस अर्ज करितों असा जे.

जेजाल, स्त्री० हिं० मोठ्ये बंदुकी सारिखी असत्ये परंतु जिला लांकडाचे दोन पाय असतात ती.

जेजालबरदार, पु० हिं० जेजाला मारायाचा जो अधिकारी असतो तो.

जेउणें, रा० धातु आंवळणें; उ० हें गांठोडें जेवून बांध.

जेठा, पु० वस्त्र रंगवायासाठीं कुसुंब्याचा रंग करितात तो; २, गुडघे उभे करून बसलें असतां ते गुडघे वकमर या भोंवतें वस्त्र गुंडाळून बांधितात तो बंधन प्रकार.

जेठी, वि० हिं० कुस्ती, कसरत, इ० व्यापारांत जो कुशल तो.

जेथ, अ० यं० जिथें.

जेथे, अ० जिथे; २, जिथे शब्दापासून जिथचा इ० शब्द होतात ते या शब्दापुढेंही जाणावे.

जेथवां, अ० यं० जेव्हां.

जेन, न० मेंढा, बकरें, इ० कांचे लोंकरीस रवळ लावून लावून जें वस्त्रवत् करितात तें.

जेपाळ, पु० एक औषधी झाड आहे, जाची बी जुलाबाचे उपयोगी पडत्ये; २, स० जेपाळाची मात्रा आणि वे कुंठींची यात्रा.

जेमतेम, जेमत्येम, अ० कसेंही करून पराकाष्ठेनें; उ० तो मोठ्या पांहांटेस निघाला तरी जेमतेम तीन कोश गेला असणजे भारी

जेर, ३लिं० زیر हिं० रोग, दारीद्र्य, इ०कांमुळें जो हीन सामर्थ्य; उ० पडशानें त्याला भारी जेर केलें: तो दारिद्र्यानें जेरझाला; २, युद्धादि प्रसंगीं अधिक बलापेक्षां न्यून बल तो; उ० त्या राजाच्या फौजेंत तो जेर आहे.

जेरजबर, ३लिं० زیر زبر हिं० हाव्ये आंगाचा जबर उजव्ये आंगचा जेर अशा संकेतानें जो गंजिफांचा डाव खेळतात तो.

जेरदस्त, ३लिं० زیر دست हिं० जबरदस्ताचा प्रतिपक्षी जो न्यूनबल तो.

जेरदस्ती, ३लिं० زیر دستی हिं० जेरदस्तपणा; २, गंजिफांचे खेळांत जेरदस्ताचे संबंधी जी तलफ द्० तो.

जेरबंद, पु०हिं० घोडयाचे सरोसरांत ओंवून पुढल्या दोहों पायांचे मधून तंगासजो बंधबांधितात, जो प्रायः चर्मी असतो तो: चोरादिकांस मार द्यायासाठींही तो घेतन असतात; स्र० जें न निघे संबंधी तें निघे जेरबंदीं.

जेवढा, ३लिं० जितका; उ० या गांवांत जेवढा भेटतो तेवढा दरिद्री.

जेवण, न० देशादिपरत्वें मुख्यत्वें करून भक्षणीय जें अन्न तें, वतें भक्षावयाचा जो व्यापार तें; उ० माझें जेवण झालें म्हणजे मी यतों; उ० माझें जेवण परतें शेतावरच घेऊन ये.

जेवणखाण, न० भोजन, तांबूल, भक्षण, इ० जो व्यापार तें; उ० आमचें जेवणखाण आटपे तों अजून चारघटका लागतील.

जेवणवत, न० ग० जेवायाचे उपयोगी जें केळ. इ०कांचें पान तें; उ० केळाची डांग मोठी असली तर चांगलीं पांचजेवणवतें होतात.

जेवणवार, पु० भोजनाविषयीं जो वारीं निषेध सांगितला तला नाहीं असा जो वार तो.

जेवणवेळ, स्त्री० भोजनाचा जो समय ती.

जेवणावळ, स्त्री० कांहीं एक निमित्तिकामुळें स्वजनादि लोक समुदाय मिळवून जो भोजन समारंभ करितात ती.

जेवणी, स्त्री० मुखरूप जें द्वार ती. प्रायः मनुष्यवृत्ति; २, धान्य मळणारे जे प्रायः मजूरकर गडी त्यांस जेवणाबद्दल जें धान्य द्यावें लागतें ती; उ० मागल्ये मळणीची जेवणी राहिली आहे ती ही आज द्या परती.

जेवणें, मुख्यत्वें करून भक्षणीय जें अन्न तें भक्षिणें; २, रा० कांहीं एक स्वकर्मापासून उत्पन्न जें सुखादि फल तें भोगणें; उ० पूर्वी दुष्कर्में केलीं त्यांचें हें फळ आतां जेवतों; २, स्त्र० गंधावें तसें जेवावें आणि करावें तसें पावावें.

जेवतागण, पु०दे० केवळ जेवायाचेच कामाचा जो मनुष्य तो; उ० तो काडीमात्र कामाचे उपयोगी नव्हे, आपला जेवतागण आहे.

जेवा, पु० उदरपर्याप्त जें अन्न तो. कि० तत्प्रमाण जें धान्य तो; उ० आजचा जेवा तर बाहेर पडला, उद्यांची बात बात उद्यां; उ० सर्कारचा शिपाई आला तो जेवा घेऊन गेला.

जेवीं, अ० यं० जा प्रकारें.

जेव्हां, अ० जा समयीं; उ० तुम्हीं जेव्हां याल तेव्हां मी रुपये देईन: २ जा कारणास्तव: उ० आम्हाला जेव्हां ते मारणार तेव्हां आम्हांस जातां नये.

जेव्हांतेव्हां, अ० वारंवार; उ० तूं जेव्हां तेव्हा शिव्या देतोस हें ठीक नव्हे.

जे, स्त्री० कांहीं एक पदार्थ ठेवायाचेकरितां इटानीं भ-
रल्या वांचून वीतदीडवीत रुंदीची आणि भिंती-
च्या प्रमाणानें लांबीची जी जागा राखितात ती.

जैन, पु० हिंदूंत एक जाति आहे.

जैसा, वि० पं० जसा.

जो, अ० कांहीं एक विवक्षित कार्य एका प्रयत्नानें विव-
क्षितावस्थेस पावे अशी अर्थाची विवक्षा असतां
प्र०; उ० जो टोला मारला ते लागलेच दोन तुकडे के-
ले.

जों, अ० जंव.

जोकड, जोरवड, न० सं० प्रथमार्थी.

जोरव, न० वजन करण्याचे उपयोगी जें तोळा, मासा,
शेर, इ०तें; २, रा० कांहीं एक पदार्थाचें येतलें जें मेज
तें; उ० तूं आपल्ये पायांचें जोरव दे म्हणजे त्या प्रमा-
णें जुतें करून आणील.

जोरवणें, तराजूचे एका पारडयांत जोरवें घालून दुस-
ऱ्या पारडयांत जिन्नस घालून वजन करणें; २, ला०
कांहीं एक मनुष्यादि पदार्थांतील तत्तांश तर्क इ०कां-
नें जाणणें.

जोरवम, स्त्री० दे० न० कों० जोरवीम.

जोरवी, वि० रा० वजनी; २, सणकाडी.

जोरवीम, न० याचा परिणाम कसा होईल अशी चिंता
वाग्व्यायास कारणीभूत स्वसत्ताकांत द्रव्याचा ठायीं
किं० क्रियमाण व्यापाराचाठायीं भय प्रदत्वरूप जो
धर्म असतो तें; उ० वाटेनें चोराचें भय आहे तेव्हां हें
जोरवीम कोणी संभाळावें; २, तद्धर्मविशिष्ट जें
द्रव्यादि त्यासही म्ह०; उ० हे हजाररुपये त्या म्ह-
णतां पण वाटेनें आली दुसऱ्याचें जोरवीम नेतना-
हीं; ३, कांहीं एक व्यवहारामध्यें जो तोटा येतो तो, कि०
समूलनाश पावतो तें; ४, चोरादि भयशंका असतां
कि० दुसऱ्याचा मोज माप केल्या शिवाय पदार्थ घे-
तला असतां जी चिंता उत्पन्न होते तें.

जोरवींव, न० जोरवीम; २, वि० लिं० वजनानें तोलिला जो
घृतादि पदार्थ तो; उ० हें तूप जोरवींव शेरभर आहे की
मापी आहे.

जोग, पु० कुटुंबादि परित्याग पूर्वक जें वैराग्य तो.

जोगडा, पु० गोंसावडा हरिदासा वांचून.

जोगता, वि० लिं० कांहीं एक क्रिये विषयीं कर्तृत्व कमल, इ०रू-
पें करून जो योग्य तो; त्या त्या धातूंचे आया आवया
प्रत्ययांतावरून याचा प्रयोग होतो केवलाचा होत ना-
हीं; उ० तो पुरुष द्याया जोगता आहे; उ० तो गांव पा-
हाया जोगता आहे; २, विवक्षित पदार्थास अनुरून
तो; एथे नत्तत्पदार्थाशीं समास होतो; उ० पायां जो-
गता जोडा असला तर घेईन; उ० आंगरखा आंगा-
जोगता नाहीं.

जोगम्मा, स्त्री० गोंसाव्या सारिखे जिचे डोकीचे केश
सुटलेले आणि सर्वांगास राख माती लागली अ-
सते अशी पारशीस म्ह०.

जोगलणें, रा० अशक्त मनुष्यादिकांस चालत्ये समयीं
हस्तादि देऊन संभाळणें.

जोगली, स्त्री० लाहान जो परळ ती.

जोगवा, पु० देवीचे उपासक जन प्रा० एतत् शब्दोच्चार
पूर्वक जी भिक्षा मागतात तो.

जोगा, वि० लिं० जोगता.

जोगावणें, जतनावणें; २, यथाकथंचित् निर्वाह युक्त
होणें; उ० दोन हजार रुपये असले म्हणजे आमचा
कसा

कसातरी संसार जोगावतो; २, कांहीं एक कार्य करीत असतां मध्यें वृथा कालक्षेप करणें; ४, उदर पूर्ति पावणें; उ० रानांत गवत झाल्यापासून गाई जोगवून येऊं लागल्या.

जोगी, स्त्री० एक रागिणी आहे; २, पु० सर्पांत एक भेद आहे; ३, गोसावी, बैरागी, इ० तो.

जोगी आम्मावरी, स्त्री० जोगी प्रथमार्थी.

जोगेटा, पु० जोगी द्वितीयार्थी

जोजार, पु० कुटुंबादिरूप जो मोठा संसार रवटला तो.

जोजारी, वि० जोजाराचा जो धनी तो.

जोजो, अ० स्त्रिया, पाळणा इ० कांत मुलास निजविण्यें समर्थी हें अव्यय उच्चारितात; उ० जोजो जोजो रे कुळभुषणा दशरथा नंदना बाळा जोजो रे; स्त्री० लाहान मुलांची जी निद्रा तीस स्त्री०.

जोट, जोठ, पु० जाड सुती शेल्या सारिखें एक वस्त्र आहे.

जोटी, जोठी, वि० जोटाचे कापडाचा केला जो आंगरखा, पंचा, इ० तो.

जोटींव, जोठींव, वि० जोटी.

जोड, पु० जा अलंकारास दोन अवयव असतात ते दोन मिळून तो; उ० पाटल्या जोड, कांकणे जोड, इ०; २, सजातीय समान जे दोन प्रा० अचेतन पदार्थ त्यांचा प्रा० विनियोग असतां, ते दोन तो; उ० समथांचा जोड, रुरशांचा जोड, इ०; ३, दोन साचांचें धोतर, व आंगवस्त्र मिळून तो; ४, जा खेळास जीं मुख्य साधनें त्यांचा जो समुदाय तो; उ० सोंगट्यांचा जोड, बुद्धबळांचा जोड; ५, स्नान संध्येस जीं भांडीं लागतात तीं सर्व मिळून तो; ६, वाजंत्र्यांचा जो सनई वाला, सूरवाला, डोलकेवाला, इ० समुदाय तो; असाचतासोकऱ्यांचा जोड होतो; ७, वस्त्रादिक कर्मी झालें असतां त्यास जोडितात जें सजातीय वस्त्रादि तो; ८, गायनामध्यें अलाफचारीचा जो डाव घेतात तो; ९, स्त्री० जाणें संपादिलें जें द्रव्यादि ती त्याची; उ० बापाची जोड लेकानें च्यावी; १०, लाभलें करून मानिलें जें कांहीं एक व्यापासून फल तीं; मा० निषेधविवक्षित असतां प्र०; उ० उगेच भांडतां यांत काय जोड आहे; ११, आरोपानें विद्येस स्त्री०; उ० विद्ये सारिखी दुसरी जोड नाहीं; मी आपल्ये पायांची जोड केली आहे; स्त्री० आपली कृपा संपादिली असा अर्थ; जन्मास येऊन ईश्वर चरणाची जोड करावी, एथे जोड म्हणजे सेवा ती करून कृपा संपादावी असा अर्थ.

जोडका, वि० धनादिरूप जी जोड ती नें संपादन करणारा जो तो; उ० त्याचा जोडका भाऊ होता तो वेडा ळला.

जोडकापूत, पु० जोडका जो पुत्र तो, निंदावृत्ति; २, ला० प्रजांचीं कुष्टें पिष्टें सर्कारांत समजाविती असा जो केवल पाजी मनुष्य तो.

जोडगहूं, पु० खपल्या जो गहू त्यास स्त्री०.

जोडगिरी, वि० काष्ठ, किं० पाषाण यांचा जोडून केला जो स्तंभ, आंस, तुळई, इ० पदार्थ तो; उ० या गाड्याचा आंस जोडगिरी आहे, ओझें थोडेंच भर; २, कांहीं एक कार्याचा एका पदार्थानें यथाकथंचिन्निर्वाह असतां पुष्ट्यार्थ तत्सजातीय तत्सम दुसरा योजितात ते दोन मिळून तो; उ० घरास जोडगिरी खांब दिले असतां खांगली बळकटी येते; उ० या किल्ल्याची जोडगिरी तटबंदी आहे गोळ्यास ऐकणार नाहीं; ३,

स्त्री०

स्त्री०दे० गवई, हरिदास, यांचे पाठी मागचें जें स्वर, साहित्य; उ० हा पोऱ्या त्या हरिदासाचे मागें उभा राहून जोडगिरी चांगली करितो.

जोडगोळी, स्त्री० एका बंदुकेंत एककाळीं घातल्या जा दोन गोळ्या ती.

जोडणी, स्त्री० अनेक पदार्थ विवक्षितानुरूप एकत्र जोडण्याचा व्यापार ती.

जोडणें, जुळणें; उ० सखलातीस आंतून पासोडी आडली तेव्हां थंडी राहिली; २, विशिष्ट अवयवी सिद्ध होई असा कांहीं एक पदार्थास तत्सजातीय पदार्थावयव जडणें; उ० या फळीस हातभर फळीचा तुकडा जोडला असतां मोठा तक्ता होईल; ३, द्रव्य, विद्या, इ० संपादणें; उ० तरुणपणीं द्रव्य जोडिलें असतां म्हातारपणी उपयोगी पडतें; उ० आम्ही द्रव्य जोडिलें नाहीं, पण विद्या जोडिली; ४, परस्परांचा कांहीं एक व्यवहार बने असें करणें; उ० लग्न कोणाचें मोडूं नये, जोडावें यांत पुण्य आहे; ५, अधिकारादिकांवर कोणएकास जडविणें; उ० या मुलास कोठेंचा कारीवर जोडून द्या; ६, हात जोडणें स० नमस्कार करणें; स० आधवेचा जोडलेला आणि पिठीचा मोडलेला बरोबर होत नाहीं.

जोडता, वि० लिं० जोडका.

जोडतापूत, पु० जोडकापूत.

जोडताराम, पु० दे० जोडकापूत मुख्यार्थी.

जोडपी, वि० लिं० दे० सोबती; उ० तुला कोण पाहिजे तो जोडपी पाहा आणि खेळायास बस.

जोडपें, न० नवरा आणि नवरी उभयतां मिळून तें.

जोडफळ, न० यं० जुवें जें फळ तें; उ० जेसा जोडफळाचा सांधा तेसा सुखदुःखाचा बांधा.

जोडवें, न० बोटांत घालाया करितां वलयाकार जें सुवर्णादिकांचें करितात तें.

जोडा, पु० पायांत घालाया साठीं चर्माचा करितात तो; ३० माझ्या एकजोडा फाटला आणि एक कुठ्यानें नेला; २, समान पांच जानव्यांचा जो समुदाय तो; ३, एक ताण्या वाण्याचीं जीं दोन धोत्रें तो; ४, जोडपें; फजीतीस जोडा नसणें, एथे फजीतीस पारावार नसणें असा अर्थ.

जोडाक्षर, न० अनेक व्यंजनें एकत्र जोडून झालें जें अक्षर तें; उ० क्त, त्र, ब्र, इ०.

जोडी, स्त्री० मा० एक कार्या विषयीं उपयुक्त जे सारिखे दोन पदार्थ ते उभय मिळून ती; उ० ही मोत्यांची जोडी रंगदार आहे; ही बैलांची जोडी चालूक आहे; २, शिष्यवर्ग सहवर्तमान जो कथा करणारा गोसांवी तो.

जोडीचा, वि० लिं० कांहीं एक धर्मानें तुल्य जे दोन पदार्थ ते परस्पर.

जोडीवँ, वि० लिं० एक संधाचा प्रतिपक्षी.

जोडें, न० जोडपें; २, दोन नारळ मिळून तें.

जोत, न० नांगरास वाहाया चे उपयोगी जे मा० दोन बैल, किं० दोणगे तें, व तद्विशिष्ट नांगर तें; २, स्त्री० दीपज्वाला ती; ३, रत्नाचें जें तेज ती: स० पुढील जोत तसें मागील जोत.

जोतें, न० गृहादिकांचा जो चौथरा तें.

जोत्या, वि० लिं० नांगर हाकणारा जो मनुष्य तो; २, ला० अक्षरशत्रु.

जोँधळा, पु० एक धान्य आहे.

जोधा, ३लिं० धष्टपुष्ट जो मनुष्यादि तो.

जोप, न० दे० जावपें.

जोपाशील, स्त्री० मृलबाळ, गुरुवांसरूं, वस्त्रप्रावर्ण, इ० पदार्थांचें शुश्रूषापूर्वक जें उत्तम रीतीनें संरक्षण तीं.

जोपासणें, जोपाशिलींत राखणें.

जोपासना, स्त्री० रा० जोपाशील.

जोंवडा, पु० रा० तृणादिकांची यथाकथंचित् बांधलेली जी गुंडी तो; २, तदाकार सर्कारचे हाहींचें चिन्ह शेत इ० कांवर बांधून टाकीत असतात तो; उ० या आंब्याम हाहींचा जोंबडा बांधिला आहे आंबे पाडूं नका.

जोबन, पु० तरुण स्त्रीचे जे स्तन ते मत्यकीं.

जोंबाळणें, जोंमाळणें, कांहींएक पदार्थ खर्च न करितां, किं० नाश न होऊं देतां उत्तम रीतीचा रक्षणानें राखणें; उ० एवढे दिवस दागिना जोंबाळून ठेविला होता, म्हणून प्रसंगीं उपयोगी तरी पडला; २, कांहीं एक मनुष्यादि पदार्थ प्रीतीकरून पोषणादि योगानें रक्षिणें; उ० ममतेनें पोरास पेरीं जोंमाळून ठेविला नर विद्या कशी येईल.

जोम, पु० न० मा० शरीरांतील जें बल तो, तें; २, रा० कांहीं एक कार्याविषयीं अनेकांचा जो एकोपा तन्निमित्त जें बल तो.

जोमदार, ३लिं० जोम आहे जाचे आंगीं तो.

जोर, पु० न० शरीर संबंधी जें बल तो, तें; २, पदार्थामध्यें तत्तत्कार्य कारकतारूप शक्ति असत्ये तो; ३. जेठी इ० शरीर दृढ झालें म्हणून जो मासांग नमस्कार सहसा व्यापार करितात तो; ४, समुद्रास जी भरती येत्ये तिला कोळी, किं० दर्याबर्दी लोक म्ह०; ५, कांहीं एक पदार्थाचे

पदार्थांचे भाराचा जो नेट तो तें; उ० सगळे भोई सारखे असले तर बरें नाहींतर उंच असतो त्याचे खांद्यावर भारी जोर येतो; जोरास येणें, जोर लावणें, जोर करणें, इ० स्थलीं कोणएकानें रुजुपणें कराव्याचा जो व्यापार तो न केल्यामुळें बळात्कारानें तो तो करायास योग्य होणें; उ० आज पावेतों रुपये देतोंदेतों म्हणत होता पण आतां जोरास आला त्यापेक्षां उपास घातले पाहिजेत.

जोराचा, ३लिं० बळाचा: उ० हा माडा भला जोराचा होता आहे.

जोरकस, ३लिं० जोर काढण्याचे कसरतीमुळें बळकट जें शरीर तेंच तत्शरीरी जो मनुष्य तो.

जोरगत, स्त्री० रा० समुद्राचें जें उधान तीं.

जोरतलप, जोरतलब, स्त्री० दुसऱ्यास आपल्ये स्वाधीन करून घेण्याविषयीं, किं० कोणापासून द्रव्यादि घेण्याविषयीं जो बलात्कार तीं; उ० माझे मनाम आलें तर येईन तुमचे जोरतलबेस भिणार नाहीं.

जोरतलपी, जोरतलबी, ३लिं० जोरतलबेनें केला जो कांहींएक व्यवहार इ० तो; उ० या मुलकांत जोरतलपी अम्मल असल्या कारणें वसूल होत नाहीं.

जोरदार, ३लिं० बळकट जो मनुष्यादि पदार्थ तो.

जोरावणें, पर्जन्य, वृक्ष, दुखणें, शत्रु, इ० कांनीं पूर्वदशेचे जोरापेक्षां उत्तरोत्तर अधिक जोरानें युक्त होणें; उ० झरझर चाललें पाऊस जोरावल्यावर मजल आटोपणार नाहीं; पाणी मिळूं लागतांच झाड जोरावलें.

जोरावर, जोरावार, वि० जबरदस्त जो मनुष्यादि तो.

जोरावरी, जोरावारी, स्त्री० जोरावाराचें जें कर्म तीं.

जोरी, स्त्री० जोधळा.

जोव, स्त्री०रा०बीज.

जोवणी, स्त्री०रा० जोकडाचे दोहों शेवटांस जा दोन रवुंट्या असतात त्या प्रत्येकीं.

जोवणें, विद्युल्लतेनें स्फुरण विशिष्ट होणें.

जोवाल, स्त्री०रा० अनेक शेतकरी मिळून शेताची जमीन जाळायासाठीं वृक्षांचे डाहाळे तोडण्याचा जो व्यापार करितात तीं.

जोशी, पु० ज्योतिःशास्त्र जाणता जो तो; २, ज्योतिषपणाची वृत्ति आहे असा तो; ३, सहदेवी मताचे मुहूर्त जाणतात अशी एक शूद्रांत जाति आहे; ४, कुकुड कुंभा जो पक्षी त्यास ह्म०.

जोहार, पु० शूद्रादिक जसा राम राम करितात तसा यांनीं माहार, चांभार, हे लोक हा शब्द उच्चारितात; २. ह्मं० राजा इ०कांस दासदासी, इ०कांचा जो रामराम तो.

जोहरी, जोहारी, जोहोरी, पु० स्त्री० **ईण,** भारशा, फण्या, चरकी भांडीं, इ०जिन्नसविकाया साठीं दारोदार फिरत असतात तो; प्रा० जर, जुनी वस्त्रें, घेऊन माल देतो.

जोळ, न०कों० अभ्र; २, रा० प्रथमतः अभ्र आल्यामुळें कांहींवेळ निर्वात होऊन अकस्मात जो मोठा वायु सुटतो तें.

ज्या, स्त्री०सं० धनुष्याची जी दोरी ती; २, भूमि; ३, वृत्त जें क्षेत्र त्यामध्यें दोन अंगें सांपडत अशी ओढिली जी रेषा ती.

ज्याफल

ज्याफल, न० रेषारूप जी पूर्वोक्त ज्या तीपासून लब्ध जें अंकरूप फल तें.

ज्यामिती, स्त्री० भूपरिमाण.

ज्येष्ठ, पु०सं० हिंदू लोकांचा बारा महिन्यांतील जो तिसरा तो; २, भावंडांमध्यें जो वडील तो; ३, श्रेष्ठ.

ज्येष्ठवद्य, स्त्री० ज्येष्ठ मास संबंधी कालासच संमंग विशेषीं ह्म०.

ज्येष्ठा, स्त्री० सत्तावीस नक्षत्रांतील अठरावें जें नक्षत्र त्या, प्र० अने०व०.

ज्येष्ठागोर, ज्येष्ठागोरी, स्त्री० भाद्रपद मासीं ज्येष्ठा नक्षत्रावर जी देवी पूजित असतात ती.

ज्येष्ठासन, न० कनिष्ठकन्येचा विवाहा समयीं ज्येष्ठ कन्येचे भर्त्यास जो मान द्यावा लागतो तें.

ज्येष्ठी, स्त्री० ज्येष्ठमास संबंधी जी पौर्णिमा इ० तिथि.

ज्येष्ठमध, ज्येष्ठीमध, स्त्री०पु० एक औषधी मूळ आहे.

ज्योत, ज्योति, स्त्री० जोत प्रथमार्था वांचून.

ज्योतिर्लिंग, न० काशीविश्वेश्वर आदिकरून जीं शिवाचीं द्वादश लिंगें प्रसिद्ध आहेत तीं प्रत्येकीं.

ज्योतिःशास्त्र, न० ज्योतिष जाणावयाचें जें शास्त्र तें.

ज्योतिष, न० सूर्यादि ग्रहांची गति, इ० ज्ञानाची जी विद्या तें; २, जोशीपणाची जी वृत्ति तें.

ज्योतिषी, वि० ज्योतिःशास्त्र जाणणारा जोशी तो.

ज्योतिष्टोम, पु० एक यज्ञाचें नाव आहे.

ज्वर, पु० ताप ह्मणून जो रोग तो.

ज्वरित

ज्वरित, वि॰ ज्वरानें जोपीडित तो.

ज्वलन, पु॰ अग्नि.

ज्वाला, स्त्री॰ अग्निसंबंधी जो जाळ ती.

ज्वालामुखी, स्त्री॰ एक देवी आहे; जिचे मुखांतून ज्वाला नियत असत्ये.

झ

झकणें, क्रि॰ देणें, घेणें, इ॰ व्यापारीं कोणएकाची बुध्यादि चकणें; उ॰ लाल भडक रंग पाहातांच त्याची नजर झकली आणि पटकन शंभर रुपये बोलिला.

झकत, झकूत, अ॰ कांहींएक कारणानें निरुपायावस्था पावल्यामुळें, सर्व क्रियांचें वि॰; उ॰ नाक धरिलें स॰ झकत तोंड उघडीलं.

झकमारणें, ना॰ कोणाएकानें लोकसंप्रदाय विरुद्ध निंद्यकर्माचरण करणें; उ॰ तो मातापितरांचें वचन ऐकत नाहीं, झकमारतो

झकूड, वि॰ दे॰ दुसऱ्यानें सांगितलें ऐकत नसतोअसा जो स्वच्छंदी फकूड मनुष्य तो.

झकू, पु॰ इडीदांडूचे खेळांत डाव लागू होतो तो; २, ना॰ संकेतानें मैथुनास स॰

झकझकणें, झगझगणें, चकचकणें.

झगझगी, स्त्री॰ चकचकी.

झगझगीत, वि॰ चकचकीत.

झगटणें, ना॰ कोणाएका पदार्थानें कोणाएका पदार्थाशीं घसवटलें जावयाजोगें लागून जाणें.

झगडणें, कोणाएकानें कोणाएकाशीं कलह करणें.

झगडा

झगडा, पु॰ कलह.

झगमगीत, वि॰ झगझगीत.

झगरें, न॰ भाकर, इ॰ पदार्थ भाजून सिद्ध करायासाठीं किं॰ शेकणें इत्याद्यर्थ अनेक गोंबऱ्या इ॰ रचून अग्नि संयोग विशिष्ट जें करितात तें.

झगा, पु॰ पायांपर्यंत लांब असा जो आंगरख्या सारिखा करितात तो.

झगागी, स्त्री॰ झगझगी.

झंझावात, पु॰ पर्जन्य सहित जो मोठा वायु सुटतो तो; २, ला॰ मोठा जो वारा तो.

झट, न॰ उपद्रवकारक जें कोहींएक लचांड तें.

झटकणें, झाडणें मथम द्वितीयार्थी; २, कोणाएकाची दृष्टि चुकवून खेरीज जाणें; ३, धूर्तादि संबंधी वायूनें अग्नि प्रज्वलित करणें; कि॰ धान्यादि संबंधी पोल इ॰ अविवक्षितांश निंद्य असें करणें.

झट,-,कन,-कर,-दिशी, अ॰ चकचकन.

झटका, पु॰ वेगवत्पदार्थाचा वायुद्वारा, किं॰ साक्षात् होतो जो कोहींएक पदार्थावर संघ तो; २, क्रोधादि संबंधी जो वेग तो.

झटकारा, पु॰ झटका.

झटझट, झटझटां, अ॰ चपकन.

झटणें, कांहींएक कार्याविषयीं अंतःकरण पूर्वक प्रयत्न करणें; २, कोणाएकानें कोणाएकाचे आंगावरीं बळेंच येऊन भिडणें.

झटपट, स्त्री॰ मरणोत्पत्यवस्थापन्न जो कलह तो; २, अ॰ चपकन.

झटापटी, स्त्री॰ झटपट प्रथमार्थी.

झड, स्त्री॰ पु॰ अहोरात्र एकसारिखी निबिडपणें

झी

जी पर्जन्याची स्थिति ती तो; २, पागोळ्यांसंबंधी उदकाचा, कि० पर्जन्योदकाचा वायुवेगानें जो गृहादिकांत तुषार समुदाय उडतो तो; ३, तन्निवारणार्थ जी तृणादि संबद्ध छपरा सारिखी करितात तो; ४, एकावस्तूवरजी एककाली अनेकांची प्रवृत्ति ती; उ० एक चविहीर पडली या मुळें सर्व लोकांची झड पडते; ५, कांहीं एक पदार्थ घ्यायासाठीं पक्ष्यादिक जी उडी घालितात ती; ६, याचे आंगास झड लागली. हातपायांस झडला गली, एथे शरीरावयव सडून जावयाजोगी अवस्था प्राप्त झाली असा अर्थ.

झड,-,कन,-कर,-दिन,-दिशीं, अ० झटकन.

झडझडीत, अ० झडझड शब्द होई असें, वस्त्रादि झाडण्याचें वि०.

झडणें, वृक्षादिकांचीं पर्णादिक, कि० शरीराचे अवयवादि गळून जाणें; उ० त्यावृक्षाचीं पानें झडतांच बाईट दिसूं लागला; २, अवयवी विच्छिन्न दिसावयाजोगे तत्संबंधी अवयव वगैरे निघून जाणें; उ० या पोथीचीं अक्षरें झडलीं; याचित्राचा रंग झडला; ३, चौघडा इ० कानें वाजणें; ४, अवधीचे अवधीस भृत्यादिकांचें वेतन इ० निःशेष पोहोंचणें; ५, बदूक इ० कांचा आवाज होणें; ६, दोंद इ० कर्मा होणें; उ० आठ दिवस झडांची बंद होतांच बायांचें दोंद झडलें.

झडती, स्त्री० संभावित वस्तूचा. कि० सांडलेल्या वस्तू इ० कांचा परिज्ञानार्थ तत्संभवस्थल सर्वांशीं शोधण्याचा जो व्यापार ती; उ० जकातदार मार्गी झडती घेतल्या शिवाय जाऊं देत नाहीं; उ० सुरी सांपडावी म्हणोन सगळ्या घराची झडती घेतली: २. अनेकपदार्थांची इयत्ता समजावयाकरितां एक, दोन, इ० रीतीनें संख्या करण्याचा करण्याचा जो व्यापार ती; ३, ग्राम, देश, इ० कांतील विवक्षित सर्व पदार्थांचा, कि० तत्संबंधी सर्व वहिवाटीचा परिज्ञानार्थ तेते सर्व विषय जा कागदांत लिहिले आहेत असा जो प्रायः सर्कारी कागद ती; जा वरझडती हीं अक्षरेंही लिहिलीं असतात; ४, कांहीं एकपदार्थांची विक्रयादि द्वारा झाली जी निःशेषता ती.

झडप, स्त्री० कांहीं एक पदार्थावर पक्षी जी उडी घालितात ती, कि० प्रिय मनुष्यादि पदार्थ प्राप्त्यर्थ बालादिक उडी घालितात ती; २, दर्वाजे, खिडक्या, इ० कांस जा फळ्या लाविल्या असतात त्या प्रत्येकीं; ३, न० रा० कवाडाची जी फळी तें.

झडपणें, धान्यादिकांतील पलांजी इ० अविवक्षितांश निघून जावा म्हणून, कि० अग्नि प्रज्वलित व्हावा एतदर्थ तेते पदार्थ सूर्पादिसंबंधी वायूनें संबद्ध करणें; २, पिशाचानें केणाएकास घाबरें व्हावयाजोगा उपद्रव करणें; ३, दे० पर्जन्यानें कांहीं काल उभणें.

झडपा, पु० अनेक कारवी, कि० कांबी इ० एकत्र संबद्ध करून जें दार करितात तो.

झडी, स्त्री० झड प्रथमार्थी; २, शरीरावयवादि झडून जावयाजोगा जो मनुष्यादिकांस रोग प्राप्त होत असतो तो; उ० माझे रुपये चोरले त्यास झडी लागूंदे देवा.

झण,-,कन,-कर,-दिशीं, अ० झटकर; २, झण शब्द होई असें गोफण गुंडा गोळी, इ० कांचे सवेग गति शब्दाचें अनु० वाज, इ० कांचें वि०.

झणझण, अ० झटकन; २, असा शब्द होई असें; टाळ, कांसाळ, इ० कांचे शब्दाचें अनु० वाज, इ० कांचें

कांचें वि०.

झणझणणें, आघात, तीक्ष्ण पदार्थ, स्पर्श, इ०कारणा मुळें शरीरावयवांनीं विलक्षण वेदनायुक्त होणें; २, झण झण शब्द होई असें झांज इ०कांनीं वाजणें.

झणझणा, अ० झणझण.

झणझणी, स्त्री० झणझणण्यानें जी वेदना भास होते ती.

झणझणीत, वि० चणचणीत जो शाक, भाजी, इ० भक्ष्य पदार्थ तो.

झणाणणें, झणझणणें.

झणाणाँ, अ० चपचप; २, तास इ० वाद्यशब्दाचें अनु०वाज इ०कांचें वि०; उ० घटका गेली पळें गेलीं तासवाजे झणाणां, आयुष्याचा नाश होतो राम कारे म्हणानां.

झप,-कन,-कर,-दिशीं, अ० चपकन.

झपझप, अ० चपचप.

झंपा, पु० गायनांतील तालांत एक भेद आहे.

झपाझप, अ० चपाचप.

झपाटणें, कांहीं एक कार्य त्वरेनें संपादणें; २, कांहीं एक पदार्थ त्वरेनें खाऊन निःशेष करणें.

झपाटा, पु० कोणाएकास आकस्मिक जी पिशाचादि बाधा होत्ये तो; २, कांहीं एक कार्य प्रयोजक जी कोणाएकाची सावेश प्रवृत्ति तो; उ० पाण्याचे झपाट्यानें पूल फुटला; तो एका झपाट्यानें दाहा कोश गेला.

झपापाँ, अ० झपाझप.

झपेट, स्त्री० झपाटा पहा मार्थी.

झबलें, न० लहान मुलांचे आंगांत घालावयाचे उपयोगी आंगडया सारिखें करीत असतात तें.

झमझम, अ० नूपुर, घुंगुर, इ०कांचे शब्दाचें अनु०वाज, इ०कांचें वि०.

झमझमाट, पु० झमझम शब्दांचा समुदाय.

झमाझमी, स्त्री० तलवार, गोळी, इ०कांनीं कांहीं काल जी परस्परांची लढाई ती.

झर,-,कन,-कर,-दिशीं, अ० झटकन.

झरझर, अ० झटकर.

झरझरां, अ० झटकर.

झरझरी, स्त्री० एक गुडगुडींत भेद आहे जीची नळी लांब असून वलयाकार गुंडाळली असत्ये ती.

झरझरीत, वि० जाचे तंतु, इ० अतिविरल असतात असें जें निर्जीव वस्त्रादि तो.

झरणें, पाझरणें; २, रा० घर्षणादि कारणा मुळें कांहीं एक पदार्थानें कमी होणें; उ० पुष्कळ गंध उगाळूं नको खोड झरेल.

झरवणीँ, न० झऱ्याचें पाणी.

झरस, स्त्री० कडवी, आणि गोडी, अशी दोन प्रकारची वनस्पति आहे; जीचे पाल्याची भाजी करितात.

झरा, पु० भूमींतून जो पाण्याचा उद्गम तो: २ ला० सनत जी द्रव्य प्राप्ति तो.

झराझर, अ० झरझरां.

झरारां, अ० झरझरां.

झरोका, पु० हिं० वायु, प्रकाश, इत्यार्थ गृहादिकांस जी लोहान खिडकी ठेविलेली तो.

झँवतरोड, वि० अशक्त जो मनुष्यादि त्यास स्त्री०.

झळ, स्त्री० उन्हाळे दिवशीं शरीरास अपकारकारक जी वाऱ्याबरोबर उष्णता येत्ये ती; २, दे० अग्नीची अहीती.

झळई, स्त्री० झळ.

झळकणें, चमकणें.

झळझळणें, धातुमय पात्रादिकांनीं वारंवार तेज स्फुरणानें युक्त होणें.

झळझळीत, वि॰ निर्मळ पदार्थ.

झळम, वि॰ अतिदेर्घ्यामुळें भारादिकांचा योगानें अधःप्रदेशावनत झाल्याजोगी, कि॰ त्याच कारणानीं चढावास कठीण जो वृक्ष, कि॰ शारवा, इ॰ तो.

झळमणें, झळम जी वृक्षशारवा, इ॰ तिणें वाघ्यादि कारणानें हालणें.

झळवणी, न॰ घामोळें इत्याद्युपद्रव निरसनार्थ स्नान कराव्यासाठीं उन्हाचे झळीनें जें पाणीं तापवितात तें.

झळाळणें, झळझळणें.

झळाळी, स्त्री॰ चकाकी.

झां, अ॰ कर, स्मरण, धा॰ प्र॰ अर्थ; कोणाएकानें पळून जाणें.

झाँकण, न॰ कांहींएक पदार्थावर आच्छादक जो पदार्थ घालितात तें.

झाँकणी, स्त्री॰ कांहींएक पदार्थ आच्छादून ठेवाया करितां आच्छादक जें पात्रादि करितात ती.

झाँकणें, कांहींएक पदार्थ झांकणानें आच्छादित करणें; २, ला॰ कांहींएक गोष्ट गुप्त ठेवणें.

झाँकर, न॰ को॰ अतिनिबिड अनेक रवांचा फुटल्यामुळें विस्तृत दिसतें जें मिरची इ॰ कांचें झाड तें; कि॰ अळ्याचे वेल चढाया साठीं तत्सदृश जी वृक्षाची रवांदी आणून पुरितात तें.

झाँकलेंमाणीक, न॰ बाहेर तादृश डोळ इ॰ दिसण्यांत येत नसून जाचें आंगीं गुण चांगले असतात, असा असाजो मनुष्य तें.

झाँकापाँक, स्त्री॰ गृहांतील हें झांकतें झांक असा व्यापार ती.

झाँगड, स्त्री॰ किती एक वाद्यांचा सतत वाजत्ये वेळचा शब्द.

झाँज, स्त्री॰ कांस्यमय एक वाद्य आहे; को॰ झांजझडणें, द्र॰ स्थलीं परस्परांची चकमक उडणें असा अर्थ; झाजझाडणें एथे दुर्भाषणादिकें करून कोणाएकाची खरडपट्टी काढणें, असा अर्थ.

झाँजडझाँजड, न॰ दे॰ आंगावरील लंब दिसायाजोगी जी पांढांट तें; उ॰ झांजडझांजड झालें कीं लागलेंच औषध घ्या.

झाजरणें, झाझरणें, उ॰ पदार्थाचा अंश निघाया जोगें घसवटणें; २, रा॰ कांहींएक व्यापारांत कोणीएक कसे असें करणें; झाजर माडयाचे गोरखाणें, एथे कोणीएक पडून झाजर तो त्यास थट्टेनें स्म॰.

झाँझाँ, अ॰ कर, स्मरण, धा॰ प्र॰; अर्थ, घोडा इ॰ कांस हाकलेसमयीं हें अव्यय उच्चारितात; उ॰ झांझां स्मरतां माण कंठाशी आले.

झाड, न॰ शारवा, पल्लव, इत्याद्यवयव विशिष्ट असून स्वातंत्र्यें करून वाढणारा जो स्थावर जीव तें; २, ला॰ जा मनुष्यशरीरांत जें पिशाच खेळत असतें त्या पिशाचाचें तें मनुष्यशरीर; ३, बिलोरी, कि॰ उदकाडयाला वाया साठीं, कि॰ दारू इ॰ कांचें शोभार्थ झाडा सारिखें करितात तें.

झाडखंडा, वि॰ गुरू पाशीं अभ्यास न करितां इतरांचें वाजविणें ऐकून केवळ आपल्या अकलेनें जो परवाज वाजवूं लागतो तो मनुष्य व त्याचें तें वाजविणें.

झाडझपट, स्त्री॰ वस्त्रादिकांवरील केर, कचरा, निघावा स्मणून सशब्द झाडण्याचा जो व्यापार ती; २, लुटणें

टणें, लुबाडणें, इ०रूप जो व्यापार ती; उ० त्या गावांत पेंढारी याणीं जाऊन झाड झपट केली.

झाडझाडोरा, पु० लाहान मोठ्या झाडांचा समुदाय.

झाडझुडपी, स्त्री० झाडझाडोरा.

झाडझुडूप, न० झाडझाडोरा.

झाडझूड, न० झाड इ०; २, स्त्री० झाडणें, लोटणें, इ० जी खटपट ती; उ० माझी झाडझूड होई तों तूं पाणी घेऊन ये.

झाडणी, स्त्री० केरसुणी; २, ला० पाणउतारा झाडावया जोगी कोणाएकाची काढिली जी खरडपट्टी ती; ३, पिशाच, विषार, नेत्रांतील पुष्पादि, निरसनार्थ मंत्री लोक जो टाहाळ टाकण्याचा व्यापार करितात ती.

झाडणें, केरसुणी इ० साधनानीं विवक्षित स्थलादि संबंधी केरकचरा इ० अविवक्षितांश काढणें, किं० तशा व्यापारानें तें तें स्थलादि निर्मळ करणें; २, ओलें वस्त्र, शेंडी, इ० संबंधी सुर्कुत्या, जलांश, निःशेष जावा सपून तें तें सशब्द जोरानें हालविणें; ३, ला० गालिप्रदानादिकें करून कोणाएकाची खरडपट्टी काढणें; ४, याचनार्थ आला जो कोणी एक त्यास निखालस साफ निषेधाचें भाषण करणें; ५, सर्कार, सावकार, इ० संबंधी बाकी, साकी, इ० कांचा फडशा करणें; बंदूक, इ० कांनीं झाडणें, एथे आवाज काढणाराचे शरीरास आंचका बसे असें करणें असा अर्थ.

झाडपट्टी, स्त्री० दे० सर्कार संबंधी देयाची निःशेषता झाल्याची जी शेवटची पट्टी करितात ती.

झाडपदरी, वि० जा वस्त्राचे पदरावर रेशीम इ० कांचीं तऱ्हेतऱ्हेचीं झाडें काढिलीं असतात तें वस्त्र तो.

झाडपाला, पु० औषधोपयोगी जो झाडांचा पाला, मूळ, इ० तो.

झाडबाकी, स्त्री० पदार्थ शिलक न राहावया जोगी देणे, घेणें, इ० व्यापारानें जी निःशेषता ती.

झाडलोट, स्त्री० गृहादि संबंधी केर, इ० झाडण्या लोटण्याचा व्यापार.

झाडसारव, स्त्री० झाडण्या सारविण्याचा व्यापार.

झाडसारवण, न० झाडसारव.

झाडा, पु० प्रायः झडतीचे अर्थी; २, मळमुंडीस म्ह०.

झाडाझटका, पु० दे० नाका इ० कांवर झाडा घेण्याचा जो व्यापार तो; २, शौचास जाणें, मुखमार्जन करणें, इ० जो व्यापार तो.

झाडाझडती, स्त्री० झाडाझटका प्रथमार्थी.

झाडी, स्त्री० लाहान मोठ्या झाडांचा निबिड समुदाय ती.

झाडू, पु० केरसुणी. वह लाल खोर यांस म्ह०.

झाडून, अ० सर्व्हाथावत्.

झाडेकरी, पु० नाका इ० कांवर आल्या गेल्याचा झाडा घ्यावयासाठीं नियुक्त जो मनुष्य असतो तो.

झोडोरा, पु० को० झाडी.

झाडया, पु० हलालखोर.

झांप, पु० माहाचे आंगास पर्ण स्थानापन्न जो अवयव असतो तो जास अनेक पात्या असतात; २, दे० बाभूळ, इ० कांचे कांट्यांचें दाबून बांधिलेलें जें ओझें तो; ३, झांकर हितीयार्थी; ४, स्त्री० रा० पिशाचाद्युपद्रवानें, किं० पत्नादि कारणामुळें मिटून राहावया जोगी जी डोळ्यांस अवस्था प्राप्त होत्ये ती, प्रा० प० ड, धां० भ०.

झाप, स्त्री० मनुष्य पोंहत्ये समर्थी, किं० सर्पादि ग-

मन करत्ये समर्थी अग्निमदेश आक्रमित करावया साठीं अग्निमांग ऊर्ध्व उचलण्याचा व्यापार करितात तीं;२, झडप पथमार्थी.

झाँपड, स्त्री० झांप चतुर्थार्थी.

झाँपण, स्त्री० झांपड;२, न० झांकण.

झाँपणें, क्रि० झांकणें.

झाँपा, पु० झडप.

झाँबड, ३लिं० जाची रचना बेडौल असून मोठा जो पदार्थ त्यास ल०.

झाँबडणें, मार्गादिकांचेठायीं चोरादिकांनीं वस्त्रपात्रादि हिरून घेणें

झार, ३लिं० तारेस झारा लाविला असतां जसा तीपासून ध्वनि होतो तत्सदृश जो कंठ. पखवाज इ० कांचा ध्वनि तो.

झारणें, ग० पिष्ट, तांदूळ, इ० कांतील बारीक मोठा अंश शूर्प व्यापारानें निगला करणें.

झारा, पु० पळीचे दोन्ही टोंकांचें अनेक छिद्रांचें एक पात्र आहे;२, विणा इ० कांचे तारे खालीं कंबलादिकांची जी दशी घालितात तो;३, त्या झाऱ्याचे योगानें त्या तारांपासून सांगला जो ध्वनि उत्पन्न होतो व तत्सदृश जो कंठ इ० कांतून आवाज निघतो तो.

झारी, स्त्री० जलप्राशनाद्युपयोगी तोटीनें युक्त असें एक पात्र करीत असतात ती.

झारेकरी, पु० स्त्री० रीण, रस्ता इ० कांतील पडलेला केर, कचरा, उकिर्डा, इ० कांतून सुवर्णादि धातू निवडून काढून त्याजवर उपजीविका करितो अशी एक जाति आहे.

झार्था, पु० हिंदूंत एक जाति आहे.

झाल

झाल, स्त्री० डाळी पथमार्थी; कोणएकानें कोणएकावर झाल जाणें ल० त्यातें उद्देशून अमर्यादभाषकरणें.

झालर, स्त्री० मंडप, छत, इ० कांस शोभार्थ लोंबाया जो गेंजें त्याचे बाजूस वस्त्रादि संबद्ध करितात ती.

झावळ, ३लिं० कों० बोलणें, करणें, इ० कांचें पूर्वापर अनुसंधान जास राहात नाहीं असा जो मनुष्य तो व त्याचें करणें, इ०.

झावळी, स्त्री० माडाचा झांप व पोफळीची सांवली या उभयतांस ल०.

झाळणें, पात्रादिकांस डांक लावू अग्नि संयोगानें पदृ बसविणें.

झिंकणें, ग० करून खालीं पडणारा जो पदार्थ तो अधोदेशीं संबद्ध न होऊं देतां हस्तानें वरचेवर घेणें.

झिंगट, ३लिं० मद्यप्राशनानें करून, निरंतर शुद्धिबुद्धि हीन न होऊन पडत असतो असा जो मनुष्य तो.

झिंगणें, मद्य प्राशनानें शुद्धिबुद्धि हीन होणें.

झिंगी, स्त्री० दारू प्याल्यानें जो केफ येतो ती;२, ग० ला० धनादि संबंधी जो मद ती;३, अव्यवस्थितपणें मुखादिकावर लोंबणाऱ्या जा जटा ती; झिंगी खाणें इ० स्थलीं झिंगी शब्दाचा अर्थ मद्य असा होतो.

झिंगीखोर, ३लिं० झिंगट.

झिंग्या, ३लिं० झिंगट.

झिजणें, घर्षणादि कारणानें कांहीं एक पदार्थाचा अंश गेल्यामुळें त्याणें कमी होणें;२, ल० शरीर, किं० तद्वयव यांणीं कृशत्व पावणें.

झिंजी, स्त्री० झिंगी तृतीयार्थी.

झिंझोटी, स्त्री० एक रागिणी आहे;२, टे० झिंजी.

झिडकारणें, झिडकावणें, कोणी कांहीं बोलायासा

ठीं

ठीं आला असतां उग्रभाषणादिकें करून त्याचा तिरस्कार करणें.

झिंपरा, ३ लिं० झिंपर्या.

झिंपरी, स्त्री० झिंजी.

झिंपऱ्या, ३ लिं० ज्याचे डोईचे केश लांब असून विदीर्ण झाले असतात असा जो मनुष्य त्यास निंदेनें म्ह०.

झिमझिम, अ० शांतपणें कांहीं काल एकसारिखा पडणारा जो पर्जन्य त्याचे शब्दाचें अनु०.

झिंमड, झिंबड, स्त्री० लोकांनीं वाहवा म्हणण्याजोगा जो गानादिरसाचा उत्कर्ष ती; २, विवक्षित भक्ष्य भोज्यादि पदार्थ, पर्जन्य, इ० कांची पुरपुराट झाला जो गर्दी जी अतिशयित समृद्धि ती.

झिमडी, स्त्री० झिंमड.

झिंमर, स्त्री० रा० झिंमड.

झिरंग, पु० कडीलिंब.

झिरझिरीत, ३ लिं० झरझरीत.

झिरा, पु० झरा.

झिरुमिरु, ३ लिं० वि० सरासरी जीव धरून मात्र राहिलेला असा जो केवळ निर्बल मनुष्यादिक तो.

झिरें, न० झांकर द्वितीयार्थी.

झिलगा, पु० रा० पुरुषरूप जें अपत्य तो.

झिल्ली, स्त्री० सं० रात्रीस शब्द करणारा राळ म्हणून जो क्षुद्र प्राणी तो.

झिरमळी, झिलमिळी, स्त्री० दे० नाकांतील नथ इ० कांस शोभार्थ रवाली लोंबाया जोगें जें मौक्तिकादि लाविलात तो, किं० बिलोरी झाडास जे लोंबते मणी लाविलात तो; २, ला० गृहादिकामध्यें तृणादिसंबंधी लोंबूं लागतात जीं केरडोकें इ० त्या.

झीज. स्त्री० पात्र, दागिना, इ० झिजल्यामुळें जो त्याचा अंश जातो तो.

झींट, न० कों० केवळ म्लानता झाला जो वृक्ष तें; २, स्त्री० रा० अशक्तता इ० कारणामुळें जो शरीरावयव तोल जातो तो.

झीण, स्त्री० पदार्थ बहुतकरून झिजून अवशिष्ट राहिला जो तदंश तो.

झील, पु० रा० झिलगा; २, स्त्री० गिटकडी; ३, रत्नादिकांवरील जी तेजगी तो.

झुकणें, कोणाएकानें दृष्टि चुकवून पळून जाणें; २, इमारत इ० कांनीं एका बाजूस तोलणें; ३, दे० रोगादिकांनीं शरीर रुग्ण होणें; झुकत झुकत चालणें इ० स्थलीं तुलतडुलत असा अर्थ.

झुकाटणें, झुकणें प्रयोजकार्थी.

झुकाटी, स्त्री० झुकाटण्याचा व्यापार.

झुकांडी, स्त्री० झुकाटी.

झुकापुरी, स्त्री० झुकाटी.

झुगारणें, हल्लादिकांत कांहींएक पदार्थ घेऊन जोरानें दूर उडविणें.

झुगारा, पु० झुकाटी.

झुंजणें, झुंजणें, युद्ध करणें.

झुंज, झुज, न० युद्ध.

झुंजार, झुंझार, ३ लिं० युद्धाविषयीं शूर.

झुटकणें, झुकाटणें.

झुंड, स्त्री० मनुष्यादिकांचा समुदाय.

झुडतर, ३ लिं० वृद्धत्वामुळें केवळ जर्जरीत झालेल्या मनुष्यादिकांस निंदेनें म्ह०.

झुडपी, स्त्री० कों० असंगी मनुष्यादिकांस लपून रा-

हावयाजोगें अनेकशास्त्रादिकांनीं गच्च भरलेलें लाहान झाड.

झुडूप, न० दे० झुडपी.

झुणका, पु० अळण.

झुणा, झुण्णा, पु० लाहान मुलींचा एक खेळ आहे.

झुबकबाळी, झुबकेबाळी, स्त्री० स्त्रियांचें एक कर्णभूषण आहे.

झुबका, पु० पुष्पें, मोत्तिकें, इ० कांचा गुच्छ, किं० गोपुच्छ, शिरवा, इ० कांचा जमलेला दिसतो जो तदाकार केशादि समुदाय तो.

झुंबर, पु० अनेक दीप लावावयाचें एक बिलोरी झाड आहे; २, लाहान लाहान अनेक गलाचें एकत्र ठेवून टांगून ठेवावयाचे सोईचा अनेक लोहादिकांचा तारा इ० संबद्ध करून करितात तो.

झुरकणी, स्त्री० तंडुलादिकांतील बहुतच बारीक जी कणी ती.

झुरका, पु० तपकील, नेवाग्रु, इ० एक वेळ ओढण्याचा जो व्यापार तो.

झुरणी, स्त्री० प्रियवियोगादिकारणासुळें उत्तरोत्तर जी कोणाएकास क्षीणतारूप अवस्था प्राप्त होत्ये ती.

झुरणें, कोणाएकानें झुरणीनें युक्त होणें; २, शेत इ० कांतील पाण्यानें बांधाचे सूक्ष्म छिद्रद्वारा थोडथोडें निघून जाणें; ३, ला० डोळा चुकवून पळून जाणें.

झुरळ, झुरळें, न० एक क्षुद्र जंतु आहे.

झुलणें, डुलणें नर्थमात्रानें युक्त होणें.

झुलवणें, कांहीं एक कार्यार्थी विषयीं केवळ नाहीं असें न सणतां आज, उद्यां, अशारीतीनें कोणाएकास बहुत दिवस नादीं लावणें; २, रा० तशा व्यापारानें कार्य न करितां कांहीं काल अतिक्रमणें.

झुलवाझुलव, स्त्री० झुलवण्याचा व्यापार.

झुला, पु० चौपाळा.

झुलूप, न० लाहान मुलांचे, किं० गृहादिकांचे कानाजवळ शोभार्थ जे केश राखिले असतात ते.

झुळकणें, वाऱ्यानें मध्यें मध्यें खळून थोडथोडें वाहणें.

झुळझूळ, अ० झुळझुळ शब्द होई असें स्वल्प प्रवाह युक्त जलाचे, किं० वायूचे शब्दाचें अनु० वाह इ० कांचें वि०.

झुळूक, स्त्री० मध्यें राहून राहून जो सुखस्पर्शी मंदमंद वायु येतो ती; २, ला० मनुष्यादि पदार्थ पुरेपणीं दिसण्यांत न येतां जो तत्तद्रूपाचा भास होतो ती; झुळूक वाहाणें स० हजारों रुपयांचा व्यापार करणारे जे व्यापारी लोक त्यांस बहुत पैसा मिळावयास कारणभूत जें दैव त्याणें अनुकूल होणें.

झूर, स्त्री० शेत इ० कांतील पाणी झुरून जावयाजोगें जें बांध इ० कांस सूक्ष्म छिद्र असतें ती, व त्यांतून झुरलेलें पाणी; २, न० शालि इ० धान्य दळून, सडून, तयार करितें समयीं जो अतिसूक्ष्म धान्यांश समुदाय निघतो तें.

झूल, स्त्री० अश्वादिकांचे पाठीवर आच्छादनार्थ जें वस्त्र करितात ती.

झेंगट, न० प्रायः कचाट्या अर्थी; २, कर्नाटक देशांचे भिकारी तासा सारिखें एक वाद्य वाजवीत असतात ते.

झेंगटया, ३लिं० नाना प्रकारचीं झेंगटें करण्याचा स्वभाव जाचा तो.

झेंझटणें, झेंझडणें, पडसें, खोकला, इ० कांनीं घेरल्यामुळें

त्यामुळें कोणाएकानें म्लान होणें.

झेंडा, पु० राजद्वार, देवद्वार, चावडी, दुर्ग, राजाची स्वारी, इ० कांचा तारीं जो मोठा ध्वज उभारला असतो तो; झेंडा लावणें, एखे कांहीं एक स्थलीं कोणाएकानें कीर्ति संपादणें असा अर्थ.

झेंडू, पु० एक फुलझाड आहे तो, व त्याचें पुष्प तो; २, सर्पादिकांचा दंश झाल्यामुळें घरीं येऊन ओकून पडाया जोगा पोटांत वर उचलतो जो रक्ताचा गोळा तो; ३, रा० गुरांचे घशांत एक रोग होत असतो तो

झेंप, स्त्री० निद्रा, अवाक्तता, इ० कारणामुळें शरीरगत्या जो तोल जातो तो; २, झडप मथमार्थी; ३, पोहत्ये समयीं पाणी तोडीत तोडीत पुढें जावयाकरितां लांब हात टाकण्याचा जो व्यापार प्रकार तो; ४, पाळणा, चोपाळा, इ० हालविले असतां त्यांची जी गमनागमनरूप खेप ती.

झेंपणें, कांहीं एक कार्य आपल्या स्वशक्तीनें निर्वाहित करणें; उ० एवढें ओझें मी झेंपीन ; कर्मांस कर्तृत्व विवक्षा असतां. हें ओझें मला झेंपेल असा ही प्र० होतो.

झेंपसा, पु० कों० चोपाळा, इ० कांस झेंपावयास साधन भूत हातीं धरायाजोगी जी दोरी बांधितात तो.

झेंबणें, झेंमणें, वृक्ष, लता, पुष्पें, इ० कानीं कोमेजणें; २, कोणाएकानें निद्रा मान झाल्यामुळें डुकल्या देऊं लागणें.

झेलणी, स्त्री० झाडावरील आंबे इ० फळें उतरायाची जी आंकडी ती.

झेलणें, झिंकणें; २, कोणाएकानें सुटलेलें बचन श्लोकादि तत्काल पाठ यावयाजोगें धरणें; धोका झेलणें, गोळी झेलणें, इ० स्थलीं स्वकार्य साधनार्थ कोणाएकाचें आज्ञापालनादि द्वारा पराकाष्ठेचें सेवन करणें असा अर्थ.

झेला, पु० पुष्पादिक गुंफून गुच्छ सदृश जो करितात तो; २, दे० आंबे इ० फळें उतरायाकरितां जाळ्यासारखा मोठा, पोत्याचे डोलाचा करितात तो.

झोंक, पु० वायः कल्पनार्थी; २, गायन, वस्त्रपरिधान, चालणें, इ० संबंधी जो डौल तो; ३, वायु आदिकांचा जो झटका तो.

झोंकचिठी, झोंकचिट्ठी, स्त्री० कोणाएकानें कोणाएकास, कोणाएकावर कार्यन करायाजोगी दिल्ली जी चिठी ती, २, ला० कोणाएकाचें कार्य करितां अगें कबूल करून त्या विषयीं व्यर्थ दिल्ला जो त्रास हेलपटा त्या सही स० .

झोंकणें, झोकानें युक्त होणें; उ० ही भिंत उन्हेरकडे झोकली; २, भांग, मद्य, दुग्ध इ० पदार्थांचें प्राशणें; ३, झुगारणें; ४, नाश: झेंपणें या अर्थी.

झोंकदार, वि० हिं० रचना विशेषांनें विशेष डौलदार दिसाया जोगा धारण केला जो वस्त्र भूषणादि पदार्थ तो.

झोंका, पु० झेंप चतुर्थार्थी; २, दे० वाणी लोक जिन्नस देत्ये घेत्ये समयीं उणा अधिक द्यावा घ्यावा एतदर्थ तागडीस जो आंचका मारितात तो; ३, कांहीं एक व्यापारांत तोटा आल्यामुळें जी अवस्था प्राप्त होत्ये तो; उ० पांचशें रुपयांचे कापडांत दोनशें रुपये झोंका बसतांच कमर बसली; ४, ला० कांहीं एक विवक्षित कार्य न घडल्यामुळें बसला जो हेलपाटा इ० तो.

झोकांडी, स्त्री० उपोषणादि कारणामुळें मनुष्यादिकां

चा शरीराचा इतस्ततः जातो जो तोल ती.

झोंट, झोंड, ३लिं० देणें, घेणें, इ० व्यवहारीं न्यायतः द्यावयाचें जें द्रव्यादि त्या विषयीं लबाडया करण्याचा, किं० खळखळ करण्याचा स्वभाव जाचा तो; उ० माझे बांटणीस च कां झोंट कुळांचीं रवतें.

झोंटधरणी, स्त्री० झोंटा बरोबर व्यवहार केला असतां त्यांतून मोकळें व्हावें म्हणून जी मेहनत करावी लागत्ये ती; २, ला० अन्याधीन जें कांहीं एक स्वकार्यतदर्थ त्याचें आर्जव करणें, इ० रूप जी दुःखद खटपट ती.

झोड, स्त्री० मोठया पर्जन्याचें जें कांहीं काल सातत्य ती: २, तृणापासून भात इ० गळून पडावें म्हणून नेतें झोडण्याचा जो व्यापार ती; मा० मार, काढ, धा० प्र०; ३, काठी इ० कांनीं जो ताडन व्यापार ती; ४, ला० कांहीं एक व्यवहाराचा जो सातिशय चालूपणा ती; उ० आज त्याणें दिवसभर पुराणाची झोड लाविली आहे.

झोडकाम, न० कांहीं एक काष्ठ तासून तुसून विवक्षित नुरूप करायाचे पूर्वी त्याचे बाजूंचे अविवक्षितांश फोडून तोडून काढण्याचा व्यापार तें.

झोडकामी, झोडकाम्या, ३लिं० तादृश कसबी नव्हे असा जो झोडकाम करणारा सुतार इ० तो.

झोडगें, न० गा० कोडगी जी स्त्री तीस म्ह०.

झोडणी, स्त्री० तृणादि संबद्ध जें धान्य तें पृथक् करायासाठीं, किं० शिक्षार्थ यष्टी इ० साधनांनीं जो ताडन व्यापार ती.

झोडणें, झोडणीनें युक्त करणें; २, ला० भक्ष्य भोज्यादि पदार्थांतें तन्नव्यापारानीं अतिशयित उपभोगिणें.

झोडपणें, झोडणें प्रथमार्थानें युक्त करणें.

झोत, पु० अग्नि संबंधी जी मोठी ज्वाला तो; २, प्रायः करून

रूत रवालीं पडणारा जो पाण्याचा धोधा तो.

झोंप, स्त्री० निद्रा.

झोंपडी, स्त्री० प्रायः लाहान साहान जें घर त्यास म्ह०.

झोंपडें, न० झोंपडी.

झोंपा, पु० झोंका मथमार्थी; २, कों० नांगरलेल्या जमीनींत धान्य पेरून ती भूमि सारखी करायासाठीं अनेक टाहाळे एकत्र संबद्ध करून त्यास एक लांब दोरी बांधून फिरवाया जोगा करिनान तो.

झोंपाळा, पु० झोंपाळा.

झोंपाळू, ३लिं० बहुत आहे झोंप जास तो.

झोंबट, न० परस्परांचा जुंपलेला जो कलह तें, व तद्विशिष्ट जो वादि प्रतिवादि समुदाय तें; २, झट; ३, आरब्ध मैथुन जें मिथुन तें.

झोंबणें, क्षारादि पदार्थानें क्षतादिकांस लागून वेदना करणें; २, सर्पादिकांनीं डसणें; ३, बलात्कारानें स्त्रियादिकांस धरणें; ४, दे० वृक्षादिकांस फलें पुष्पें येणें; उ० या मोगऱ्यास पाणी लावा म्हणजे हजारों फुलें झोंबतील; ५, ला० कोणाएकाचे भाषणादिकानें सलायाजोगें अंतःकरणास लागणें.

झोंबाडा, पु० कों० कांहीं एक पदार्थ घ्यावयासाठीं आकस्मिक उडी घालून झोंबण्याचा जो प्रकार तो.

झोंबी, स्त्री० मल्ल इ० कांची जी लढाई ती.

झोल, पु० वस्त्र, चर्म, इ० साफ ताणलेल्या पदार्थास रवालीं लोंबाया जोगें जें कांहीं शैथिल्य प्राप्त होतें तो, किं० आंगरखा इ० कांचा घेर; २, परिधान केलेल्या वस्त्राचा इतर पदार्थास लागाया जोगा लंबमान जो अंश तो.

झोला, पु० देणें, घेणें, इ० व्यवहारीं आज उद्यां असें

करण्याचा

करण्याचा जो प्रकार तो; दे, धा० म०.

झोलार, झोलर, २ लिं० कों० झोलानें युक्त झालेला असा जो लत, बाज, इ० पदार्थ तो.

झोळणा, पु० पान, सुपारी, इ० पदार्थ ठेवाया साठीं प्रायः समचतुष्कोण वस्त्र घेऊन त्याचे कोपरे पोटीं मोडून मधलीं अंतरें शिवून शेवटील टोंकांस दाल लाविला असतां जो होतो तो.

झोळी, स्त्री० भिक्षार्थ जी झोळणा सारिखी करितात ती; झोळीकोंपर गांवचा सुभा करणें, इ० स्थलीं कोणा एकानें झोळी घेऊन भीक मागूं लागणें.

टक, स्त्री० कपाड्यास सतत कांहीं एकवेळ ठणका लागतो ती; उ० माझे कपाड्यास टक लागली आहे; २, सतत एकाग्रदृष्टीनें पाहाण्याचा प्रकार; ३, भाषणादिकांचा अनुस्यूतपणा; उ० त्याणें भाषणाची टक लाविली आहे.

टंक, अ० पूर्वलिमेजलेल्ये माप, इ० कानें बराबर असें. उतर, हो, इ० कांचें वि०; उ० पुण्याचे मापानें दाणे आणिले ते आळंदीचे मापानें टंक उतरले; २, अलिं० परस्परें तुल्य जीं मापें, वजनें, इ०; उ० हें माप आणि तें माप दोन्हीं टंक आहेत; ३, सं० पाषाणादि फोडायाचें उपयोगी एक पोलादि आऊत आहे.

टकटक, स्त्री० कंटाळा यावयाजोगी भाषणादिकांची गडबड; २, एकलक्ष्य लावून जें पाहणें त्याचें वि०; उ० तो मूल दिव्याकडे टकटक पाहतो.

टकटकां, अ० टकटक द्वितीयार्थी.

टकटकीत, अलिं० कोमेला नव्हे जो पुष्प. मुख इ० पदार्थ.

टंकण, पु० सं० एक क्षार आहे.

टकमक, स्त्री० एक वेल आहे; २, टकटक द्वितीयार्थी.

टकमकां, अ० टकटकां.

टकमकी, स्त्री० एकवेल आहे.

टकमकीत, अलिं० टकटकीत.

टकमकें, न० टकमकीचें फळ.

टकलें, मनुष्यादिकांचें डोचकें.

टकल्या, अलिं० टक्कल आहे जास तो.

टकळा, पु० रा० कांहीं एक प्रिय वस्तूचा विरहानें जी तिची घोकणी लागत्ये तो.

टकळी, स्त्री० टक तृतीयार्थी.

टका, पु० सोळा पैशांचा समुदाय; २, क्वचित् चार पैशांचा समुदाय.

टकाकां, अ० टकटकां.

टकारी, पु० स्त्री० ण, जातें. इ० कांस टांकी लावण्याचें कसब करणारी एक जाति आहे.

टंकोटंक, अ० अलिं० टंक, संस्कृत अर्थावांचून.

टकोर, अलिं० साधारण रीतीपेक्षां मोठें फलादिक; २, पु० टक तृतीयार्थी, उ० पावसानें आज टकोर लाविला आहे.

टकोरा, अलिं० टकोर प्रथमार्थी.

टकर, टक्कर, स्त्री० मेषादिकांचा युद्धामध्यें परस्परें मस्तकावर मस्तक आदळण्याचा जो व्यापार ती; २, युद्धादि प्रसंगीं दुसऱ्याचा पराजय अथ० बराबरी होईपर्यंत जो प्रतिपक्ष्याची स्थिति ती.

टक्कल, न० जरा इ० कारणामुळें निःकेश झाला जो मस्तकावरील प्रदेश तें; ह्म० उरीं केसमाथां टक्कल.

टंगळमंगळ, स्त्री० न० कांहीं एक कार्य करण्याविषयीं अनास्थेमुळें कोण एकानें आरंभिलीजी चुकवा चुकव ती; उ० पावसानें अलीकडे, टंगळमंगळ आरंभिलें आहे.

टच, न० कों० कांहीं एक कार्याचा मुख्य यातीचा समय तें; २, कांहीं एक कार्यार्थ संकेतित काळावधि; उ० तुझी श्रावण मासीं यावें असें तुझा सटच सांगीतलें होतें तें तुझाकडून चुकलें मग आम्ही काय करावें.

टचकन, टचकर, टचकदिशीं, अ० टच असा शब्द होई असें, टचक्याचें वाजणें. टोंचणें इ० कांचे शब्दाचें अनु० वाजणें इ० कांचें वि०

टचका, पु० लांकडाचे गोट्यांचा घूड लावून मुलांचे उपयोगी एक खेळणें करितात तो; २. टच शब्द होई असा प्रहार.

टटोरी, स्त्री० कों० धान्याचे कणशीची जे गर्भावस्था ती; उ० टटोरीस शेतें आलीं होती परंतु पाऊस जातांच त्यांचा टटोऱ्या आंवळल्या; २. मान गोटी.

टणक, वि० दुर्भेद्य दुश्छेद्यादि गुणविशिष्ट लोपाषाणादि तो; २, ला० रोगादुपद्रव रहित मनुष्यादि; ३, बहुत श्रम झाल्यामुळें जी ग्लानि येत्ये तो, उ० तो आज बीस कोस चालला म्हणून त्यास टणक आला आहे.

टणकणें, बहुत श्रम झाल्यामुळें ग्लान होणें.

टणकन, टणकर, टणकदिशीं, अ० उडी, धनुष्याची दोरी, इ० कांचे शब्दाचें अनु० उड, वाज, इ० कांचें वि०

टणका, वि० शरीरानें दृढ. २. याचितार्थ प्रत्याख्याता जो त्यास जें तिरस्काराचें वाक्य बोलतात तो, उ० मी एक दिवस नाक नाहीं म्हटलें म्हणून न. न कां देईनास असा टणका मारून गेली.

टणकाई, स्त्री० टणकपणा.

टणटण, टणटणा, अ० उडी, इ० कांचे शब्दांचें अनु० उडणें, इ० कांचें वि० उ० तो टणटणा उडतो.

टणटणीत. वि० शरीरानें सुदृढ मनुष्यादि.

टणत्कार, पु० स० धनुष्याचे दोरीचा शब्द.

टणाटण, अ० टणटण.

टणाणा, अ० टणटणा.

टप, पु० खेळायाची मोटी गोटी.

टपकणें, अ० क्रि० वृक्षादिकांनीं आपल्यावर पडला जो पर्जन्यादिक त्याची टप शब्द होई अशी थेंब थेंब वृष्टि करणें.

टपकन, टपकर, टपदिशीं, अ० चपकन.

टपका, पु० उंच ठिकाणावरून टप शब्द होई असा जो उदकादिकांचा बिंदु पडतो तो.

टपटप, टपटपां, अ० उदकादि बिंदूंच पतन शब्दांचें अनु०; २, चपचप. उ० टपटप फुलें वेंचणें.

टपणें, क्षुद्रसाध्य गोष्ट साध्य दशेस येईपर्यंत तिकडे लक्ष्य देऊन राहणें.

टपाटप. अ० टपटप.

टपापां, अ० टपटपां.

टपोर, वि० टकोर प्रथमार्थी

टपोरा, वि० टपोर.

टप्पा, पु० हिंदुस्थानी गाण्यांत रचनाविशेष विशिष्ट एक पदार्थ आहे; २, तीर गोळी इ० कांची गति समाप्ति जेथें होत्ये तेथपर्यंत जो प्रदेश तो; ३. घोंट इ० कांतील जीं विरामस्थानें तीं प्रत्येकीं; ४. ला० भाषणादि व्यापारांत तर्कवेद्य जें हाकुठवर बोलेल काय करील इ० पर्यवसान तो, कांहीं एक गोष्ट टप्यांत येणें म्हणजे आकलनशक्तींत येणें असा अर्थ.

टबोणा, पु० टपोरा.

टमकी, स्त्री० लहान एक चर्मवाद्य आहे.

टमटम, अ० टमकी इ०कांचे शब्दांचें अनु० वाजणें इ०कांचें वि०

टमटमीत, ३लिं० पुष्ट असून शक्तिमान; २, ला० द्रव्यसंपन्नास म्हणतात; ३, अ० आंत अवकाश न राही असें फुगणें इ०काचें वि० उ० आतांशीं म्हशींचीं पोटें टमटमीत भरतात.

टर, स्त्री० उपहास्यता; उ० त्या प्रयोजनामध्यें त्याची टर झाली.

टरकणें, टर अशा शब्द होई असें वस्त्रादिक फाटणें.

टरकन, टरकर , टरदिशीं, अ० वस्त्रादि फाडतेवेळेस जो शब्द होतो त्याचें अनु० फाटणें इ०काचें वि०

टरका, पु० ग० अपानवायुध्वनि.

टरकांकडी, स्त्री० कांकडींत एक जाति आहे.

टरकावणें, टर शब्द होई असें वस्त्रादि फाडणें.

टरफल, न० बीज,धान्य,इ०कांवरचा लगंवा.

टंवका. पु० शस्त्रादिव्यापारानें निघाला शरीरादिकाचा तुकडा.

टंवकारणें. कामक्रोधाद्यावेशानें कोण एकाकडे पाहायासाठीं मनुष्यानें डोळे,व पक्षीनीं डोळे वकान ताठून धरणें.

टवटवी, ३लिं० टवटवीतपणा.

टवटवीत, ३लिं० टवटवीत.

टवरा, पु० कों० फल वरफी इ०कांचा शस्त्रादिकानें केलेला मोठा तुकडा.

टवळी, स्त्री० नारळाचे बुडाकडील जी निघाली लहान करटी ती; २, स्त्रियांस या शब्दानें शिवी देत असतात.

टवळें, न० पळी समई इ०कांचा दांड्यावांचून अवयव.

टवाळ, ३लिं० लेखन,अध्ययन,इ०कांवर चित्त न सून उनाडक्या करण्याचा स्वभाव जाचा तो; २, चटोर

टवाळकी, स्त्री० टवाळपणा

टवाळखोर, ३लिं० टवाळ्या करण्याचा स्वभाव जाचा तो.

टवाळी, स्त्री० टवाळकी.

टहाळ. पु० न० वृक्षावरील सपल्लव लहान लहान फांद्यांचा समुदाय; तोडण्याचे प्रसंगीं कि० तोडला असतां प्रयोग

टहाळा, पु० वृक्षाची सपल्लव लहान खांदी; २, हरभरा इ० द्विदलधान्याचें झाड.

टहाळी, स्त्री० वृक्षाची लहान खांदी.

टळटळ, अ० केवल मध्यान्ह समयीं जें अतिशयित तेज स्फुरण होतें त्याचें वि०

टळटळणें. मध्यान्हानें टळटळयुक्त होणें.

टळटळीत, ३लिं० केवळ जो मध्यान्ह समय त्याचें वि० २, स्वच्छ दिसायाजोगा मोठा फोड,गंध,इ०.

टळणें, पीडाकारक जे व्याघ्र ज्वरादिक नष्टकार्य जो पीडाप्रसंग तो होऊन दूर होणें, कि० चुकणें; २, कालानें अतिक्रांत होणें; उ० दोन प्रहर टळले म्हणजे जाऊं; ३, प्रतिज्ञातार्थविषयीं अंतर पाडणें; उ० तो वचनास टळला; म्ह० तेल

जळे आणि पीडा टळे.

टळोटळो, अ०रा० टळटळ.

टांक, पु० वजनी दोऱ्याचा बहात्तरावा अंश;२,ठसा मारून केलेली देवाची प्रतिमा;३, लेखणीचें अग्र;स्त्री० टांका आगळें लिहावें आणि घांसाउणें नेवावें;४, सं० रुपया;५, अ० कोरडा, सुखा, जो पदार्थ त्याचा कोरडेपणा किं० सुखेपणा यांचा अतिशयाचें द्योतक;उ० ती विहीर कोरडी टांक आहे.

टाक, स्त्री० अल्पमूल्य,किं० अल्पगुण जो पदार्थ त्यागें बहुमूल्य, किं० बहुगुण जो पदार्थ त्याचे बराबरीचा डौल मारणें, प्रा० टाक, धा० प्र०,उ० हा आठ रुपयांचा घोतरजोडा आहे परंतु बारा रुपयांचे जोड्याची टाक टाकितो.

टांकण, स्त्री०घोड्याची एक चाल आहे;२, ३लिंग तद्विशिष्ट घोडा.

टांकणखार, पु०टंकण.

टांकणी, स्त्री० परवाजाचा वाजत्ये पुड्याचा कांठा जवळचा प्रदेश.

टाकणें, त्याग करणें;उ०घरांतील केर टाकिला;२, कारभारादिक दुसऱ्यावर सोंपणें;उ० सर्व कारभार दिवाणावर टाकून आपण स्वस्थ राहिला आहे;३, आंथरूण इ०पसरणें;उ० कथेची वेळ झाली बैठकाटाका ;४, स्वीकृत जी कांहीं एक गोष्ट,व्यापार,पदार्थ, इ० त्यांचें वर्जन करणें;उ० आम्हीं वांगीं टाकिलीं, उ० त्यागें सोदेगिरी टाकिली;५, कोलणें लाक्षणिकार्थी;उ० तो त्याजवर टाकितो आणि तो त्याजवर टाकितो; कोण एकावर शब्द टाकणें म्हणजे स्वकार्यसाधनार्थ त्याची शब्दद्वारा प्रार्थना करणें; आंग टाकणें, एथें हात पाय पसरून जमीनीवर पडणें. किं० कृश होणें; हात टाकणें, तोंड टाकणें, इ० स्थलीं दुसऱ्याचें धर्षण होई असें हातानें मारणें; तोंडानें शिवी इ० देणें; रडून जीव टाकणें; एथें जीव जावया जोगें अतिशयित रडणें; तो तिसाठीं जीव टाकितो;इ० स्थलीं त्या पदार्थाचा विरहानें, कि० अलाभामुळें घाबरा होतो असा अर्थ; भार टाकणें म्हणजे दुसऱ्यावर भार पडें असें करणें; पेज टाकणें,इ० स्थलीं करणें असा अर्थ; ऊनंत सकर्मक धातु रूपें वरून तत्तद्धात्वर्थ संबंध रहित होणें या अर्थी प्रयोग होतो;उ० तें काम करून टाकलें; टाकून बोलणें, म्हणजे गालिप्रदानादि दुर्भाषणें करणें; त्याचें घरी टाकला पाहुणा येतो, एथें अन्यत्र न जातां नेथेंच येतो असा अर्थ; त्यास टाकला डाव पडतो एथें मागीतला डाव पडतो असा अर्थ; म्ह० खाऊन माजावें पण टाकून माजूं नये.

टाकणें,न०कोरडा आदर करणें;प्रा० टाकणें धा०प्र०. उ० मी भोजनास जात नाहीं हें त्याला ठाऊक आहे परंतु तो उगेंच टाकणें टाकायाला आला आहे.

टांकणें, टांकीनें जांतें, इ० दोंचा युक्त करणें.

टाकभाडें, न० मनुष्यादिकांस विवक्षित स्थलीं पोंचवावें परत आणूं नये अशी बोली करून भाडें कबूल करितात तें.

टाकमटिकला, टाकमटिळा, टाकमटीका, पु० चट्टीपट्टी.

टांकसाळ, स्त्री० रुपये,इ०पाडायाचा ठिकाणा.

टांकळणें. जागरादि कारणामुळें डोळे ताठणें.

टांकळा, टाकळा. पु० एक लहान झाड आहे.

टांकळी. टाकळी. स्त्री० एक पेंठ आहे; २. ३लिं० त्यापेठेंत केलेला धोतरजोडा इ०.

टांकळें, न० भाताचा एक जाति आहे.

टांका. पु० वस्त्रपर्णादिक एकाशीं एक जडावीं म्हणून दोरा. चोय. यांचा बंध देऊन: टांकेदीलकरणें. म्हणजे त्याचा शरीराचे सांथे शिथिल होन अशी त्यास मेहनत देणें; २, ला० वादादिप्रसंगीं एकानें एकास घाबरें करणें.

टाकाऊ. ३लिं० अनुपयोगी झालेला पदार्थ.

टांकी. स्त्री० पाणी इ० भरण्यासाठीं दगडाची किं० चुनादगड यांची करितात तीं; २, दगड फोडण्याचें एक पोलादी आकुन आहे; ३, त्या टांकीचा व्यापारानें जोतें इ० कांस घडितात ज्या टांचा तीं. उ० या जात्याची टांकी उडाली; कोण एकाची टांकी लागू होणें किं० लागणें इ० स्थळीं, स्वकार्यसाधनार्थ कोण एक स्थळीं आरंभिलेला यत्न लागू पडणें; ल० टांकीचे घाव सोसल्या वांचून देवकला पावत नाहीं.

टांकें, न० पाणी इ० बहुत दिवस पुरण्याजोगें भरून ठेवण्यासाठीं मोठें टांकीसारिखें बांधून करितात तें.

टांकेकरी, पु० स्त्री० ण, जोतें इ० कांस टांकी देण्याचें कसब करितो अशी एक जाति आहे.

टांग, स्त्री० कुल्ल्यापासून पावलापर्यंत पायांचा प्रदेश.

टांगणें, प्रा० ग्याली लोंबाया जोगा कोण एक पदार्थ ऊर्ध्व ऊर्ध्व बंधनयुक्त करणें; २. गानादि समयीं गळा टांगणें, एथें गळ्याचा स्वर विवक्षितावधिपर्यंत मोठ्या श्रमानें पोचणें, त्या वस्तूकडे त्याचा जीव टांगला आहे, इ० स्थळीं तिकडे त्याचें अंतःकरण ओढले गेलें आहे.

टांगें, न० टकलें.

टांच, स्त्री० पायांची खोंट; २. पु० स्त्री० सर्कारांतून कोण एकाचें घर इ० विकायाचें असतां विकण्याचें कारण लिहून त्याघर इ० कांवर मारायासाठीं कागद तयार करितात तो ती.

टांचण, न० जो कागदावर कलमें, किं० रकमा इ० स्मरणार्थ यथा कथंचित टांचल्या असतात तो कागद; २, रकम इ० टांचण्याचा जो व्यापार.

टांचणी, स्त्री० सुईसारिखीच परंतु तिला नेहें नसतें.

टांचणें. कलमें इ० स्मरणार्थ यथा कथंचित कागद इ० कांवर लिहिणें; २, सूत, चोय, इ० कांचे टांक्यानीं वस्त्रादिक युक्त करणें.

टांचळणें, घोड्यानें जलद चालावें म्हणून टांचेचा प्रहारानें त्यास युक्त करणें.

टांचा, पु० टांका मुख्यार्थी.

टांदया, पु० कों० लहान टोणगा.

टांणाटोणा, पु० अल्पस्वल्प काम्य मंत्र तंत्रादि; २, ला० अनेक ग्रंथांतील फार उपयोगी असें निवडून काढिलेले वेंचे प्र० प्रा० अनेकवचनांत.

टांप, स्त्री० घोड्याचें पुढलें पाऊल मारण्याचा प्रसंगीं प्र०; २, आई इ० प्रियवस्तु विरहानें पुत्रादि खंति करितात ती; ३, न० लहान भाजी इ० कांचें

कांचें झाड, कि० तशा झाडाचा खुंटलेला अग्रभाग; ४, पु० लेखामध्यें खुणेकरितां रेषादिरूप चिन्ह करितात तो.

टापटीप, अ० विवक्षित अज़मासा बराबर होई असें, अन्नादि पुरणें, वजन इ० भरणें, इ० कांचें वि०; २, ठाकठिकी.

टापटेप, पु० को० जमीनीवर जे उंचवटे वाढले असतात ते; प्र० अनेकवचनीं.

टापरण, न० उपकारांचें ओझें.

टापरणें, टाफरणें, मोगर इ० कांचे प्रहारानें, मेख इ० घट्ट बसविणें; २, ला० कोण एकयथेष्टपणें नवर्ते असें त्यास एकादे कामावर गुंतविणें, उ० त्या पोरास लिहिणें यावें म्हणून, शाळेंत टापरिला आहे; ३, घोडयानें पुढले पायानीं जमीन उकरणें; ४, न० मेख इ० ठोकायाचें उपयोगी जो मोगर इ० तें.

टापरा, पु० स्वविषयीं चुकला जो मिश्रादिक त्यास ती चुकी काढून लाजविण्याचा जो व्यापार तो; प्रा० मार, धा० प्र०.

टापन्नी, स्त्री० डोकीस रुमाल बांधण्याचा एक प्रकार आहे; २, बुचडीसही कोणी म्हणतात.

टापसणें, दे० रोगानें सुजणें.

टापसा, पु० दे० सूज.

टापासटीप, अ० टापटीप प्रथमार्थी.

टांपूं, न० टांप तृतीयार्थी; २, टांपू.

टांपू, पु० सभोवतें पाणी आहे असा जो लहान देश तो.

टामटूम, स्त्री० थोडक्या साधनानीं पदार्थ डौलदार दिसण्यांत यावा, असा जो करण्याचा प्रकार ती; कि० तशा प्रकारानें आला जो त्याचा पदार्थ सि डौल ती; २, मृदंगादिकांचे शब्दाचें अनु०.

टारगा, ३लिं० चटोर; २, खुज़ट्यास म्हणतात.

टालमटोला, पु० आज देऊं उद्यां देऊं, इ० अनेक रीतीनें कार्य न करण्याचा, कि० लांबणीस टाकण्याचा जो व्यापार तो.

टाली, स्त्री० संकेतानें कोणी अपेक्षीस म्हणतात.

टांस, ३लिं० कठोर जो लांकूड, जमीन, पाषाण, इ० पदार्थ तो.

टाहो, पु० सतत रडण्याचा, कि० एक शब्द वारंवार उच्चारण्याचा जो व्यापार तो; प्रा० घे, धा० प्र०.

टाळ, पु० गायनामध्यें जे कालपरिच्छेद असतात तो, जाचा अभिव्यंजक नळ हात इ० कांचा ध्वनि असतो; २, गायनोपयोगी कांशाचें एक वाद्य आहे; ३रा० टहाळ; धान्यादिकांचा टाळ वाजणें, म्हणजे अत्यंताभाव होणें असा अर्थ; ह्या घोडा टाळ वाजवीत चालतो, इ० स्थलीं पायाशीं पाय आपटीत चालतो असा अर्थ.

टाळकुट्या, ३लिं० टाळ वाजवितो तो, प्र० निंदा असतां.

टाळकें, न० टकलें.

टाळघोळ, पु० टाळ इ० वाद्यांचा मोठा जो मिश्र शब्द तो.

टाळणें, टळे असें करणें; २, काहीं एक अडचणीमुळें, स्वसत्ताक्रांत पदार्थ विक्रयादिकें करू

न स्वसत्ते बाहेर करणें ; उ० हा लातडघोडा टाकून टाक.

टाळधरी, टाळधऱ्या, ३लिं० हरिदास इ० कांचा मागें उभाराहून टाळ धरितो तो.

टाळबद्ध, ३लिं० यथायोग्य जास टाळ आहे, असें जें ध्रुपद, ख्याल, इ० तो; २, अ० टाळ नसोडिता. गायनक्रियेचें वि० ; उ० हा टाळबद्ध गातो.

टाळसूर, पु० टाळ आणि सूर ; उ० हा टाळसूरांत गातो.

टाळा, पु० अवश्य कर्तव्य जे कार्य तें नकरितां, किं० प्राप्त होणारें जें दुर्निर्वाह संकटादिक, त्याचा संबंध न होऊं देतां रहाण्याचा जो व्यापार तो ; उ० उद्यां येईन असें म्हणून टाळा देऊन गेला. २, रा० सुरवांतील वरचा भाग.

टाळाटाळ, स्त्री० अनेक तऱ्हांनीं हें टाळ तें टाळ असा जो व्यापार ती.

टाळी, स्त्री० दोनतळ हातांचे आघातानें जो शब्द होतो ती ; २, रा० टहाळी ; ह्म० एकाहातानें टाळी वाजत नाहीं ; जाचीरवावी पोळी त्याची वाजवावी टाळी.

टाळू, मस्तकावरील जो मर्मभाग ती ; २, मुलांचे त्या मर्मभागावर थोंडीसारिखी राखितात ती.

टाळें, न० मुखांतील वरचा भाग ; २, उघडण्याचा प्रसंगीं खालचा भागास ही म्हणतात ; ३, कूलूप.

टिकणें, तत्तत्कार्यीं विवक्षित काल देश पर्यंत नाशादि न पावतां रहाणें ; उ० हा धोतर जोडा दीडवर्ष टिकला ; उ० त्या गाडयाचा आंस बारा कोश पर्यंत टिकला ; उ० तो पंडित त्या पंडिताबराबर चार घटका टिकला.

टिकमिरवणा, ३लिं० रा० आंत विशेष तत्वांश नसतां बाहेरमात्र चांगला दिसतो असाजो पदार्थ तो.

टिकला, पु० कपाळ इ० कांवर गंध इ० कांचा बिंदु लाविताततो.

टिकली, स्त्री० स्त्रिया, कपाळ इ० कांवर शृंगारार्थ कांच, रंग, इ० कांची प्रा० वर्तुळ लाविताततीं ; २, लहान जो टिकला ती.

टिकलीमिकली, स्त्री० टिकली, चट्टीपट्टी, इ० कांनी केली जी छान ती.

टिकशी, स्त्री० वृक्षाचा अग्रभाग ; २, रा० पर्णादिकांचा अग्रभाग.

टिका, पु० टिकला : तो टिक्याचा मात्रधणी एथें तो उगाचमाना पुरता, परंतु त्याचे स्वाधीन कांहीं नाहीं असा अर्थ ; तिचा कपाळीं सौभाग्याचा टिकामात्र लागला, इ० स्थली तत्तत्संबंधमात्र झाला परंतु उपभोगादि झालें नाहीं असा अर्थ.

टिकाऊ, ३लिं० बहूत दिवस टिकायाजोगा ; प्रा० निर्जीव पदार्थ.

टिकाव, टिकावा, पु० कांहीं एककार्यी विवक्षित कालपर्यंत टिकण्याचा जो व्यापार तो ; उ० माझा त्याचे घरीं टिकाव निघत नाहीं.

टिकोजी, टिकोबा, ३लिं० मानपानाचे टिक्याचा मुख्य अधिकारी ; प्र० निंदा असतां

टिकोर, १ लिं० टकोर प्रथमार्थी; २, चांगला जो घोडा तें

टिकोरें, न० प्रा० मनगटाहतका जाड आणि एकहातापासून तीन हातपर्यंत लांब जो लांकडाचा तुकडा तें; २, टिकोर द्वितीयार्थी.

टिंगणें, पाय अधू झाल्यामुळें वांकडें तिकडें चालणें.

टिंच, स्त्री० अंगुष्ठ आणि तर्जनी यांचा प्रसारणानें जें मान होतें तें; २. मडकें इ० कांवर बोटांचा पेरानीं जो प्रहार करितात तो.

टिचकन, टिचकर, टिचदिगी. टचकन.

टिचकी, स्त्री० चटकी प्रथमार्थी; २, टिंच द्वितीयार्थी.

टिंचणें, गोटी, कवडी. इ० लक्ष्यावर नेमून मारणें.

टिटवी, स्त्री० एक पक्षी आहे.

टिणगिण्यामारणें, संसार, विद्या, इ० कांवर लक्ष्य न ठेवितां रिकामपणी उनाडचाळे करीत फिरणें.

टिपगिरी, स्त्री० भिंत इ० कांचा संधीस चुना इ० भरून साफ करण्याचा जो व्यापार तो.

टिपण, न० टांचण; २, कांहीं एक कार्यार्थ संकेतित जो काल देश तें; उ० तुम्ही सांगाल त्या टिपणास येईन; ३, व्याघ्रादिकांनीं सवेग मारिली जी उडी तें; ४, जाजा कालीं जेंजें कार्य व्हावयाचें त्याचा त्याचा जो नियमित काल तें.

टिपणें, नेमलेल्या स्थळीं तीर, गोळी इ० लागे असें करणें; २, टांचणें प्रथमार्थी; ३, जमीन इ० कांवर पडलेलें धान्य इ० एक एक अशा प्रकारानें वेंचून जमा करणें; ४, तेल इ० सद्रव पदार्थ जमीन इ० कांवर सांडले असतां वस्त्रादिकानें पुसून काढणें; ५, भिंत इ० चुना इ० कानें सारवून काढणें; ६, पण पुरस्सर धावून वृक्षादिकांस स्पर्श करणें.

टिपरी, स्त्री० एक माप आहे; २, हरिदास इ० कांचा हातीं वाजवावयाचे लांकडाचे तुकडे असतात तीं; ३, अपराधी मनुष्याचे शासनार्थ त्यांचे हस्ताद्यवयव आंवळावयासाठीं काष्ठद्वय संयोगानें यंत्र करितात तीं; ४, ला० बांगडी इ० पदार्थ शरीरावयवयांस घट्ट बसले असतां त्यांस आरोपानें म्हणतात; ५. श्रमामुळें कळ लागल्या तीं.

टिपरूं, न० टिपरी प्रथमार्थावांचून.

टिपळण, स्त्री० विहीर इ० कांमध्यें पाणी टिपून टिपून भरावयाजोगी जी पाण्याची अल्पता होत्ये ती.

टिपूर, अ० स्वच्छ असें चांदणें पडण्याचें वि०

टिपूस, पु० उदकादिकांचा केवल स्वल्पांश, निषेध असतांच प्रयोग; उ० त्या विहीरींत पाण्याचा टिपूस नाहीं.

टिप्पण, न० टिपण; २, जा स्थलीं ग्रंथ कठीण असतो त्यास खूण करून प्रतीक धरून त्याचे बाहेर लापनारीतीची पंक्ति लिहिली असत्ये तें.

टिप्पणी, स्त्री० टिप्पण द्वितीयार्थी.

टिंब, न० अनुस्वारादिबोधक लेखणीनें बिंदुचें चिन्ह करितात तें.

टिबा, पु०रा० उदकादिकाचा बिंदु.

टिबी, स्त्री० रा० लहान मडकें.

टिमकी, स्त्री० टमकी; स० नगाऱ्याची घाई तेथें टिमकीचें काई.

टिरटीर, स्त्री० दरिद्र्यास यत्किंचित द्रव्य इ०मिळालें असतां चढून चार दिवस श्रीमतीचे डोल करिता ती.

टिल्या, ३लिं० खुजट असून जो अशक्त तो; प्रा० पश्चवर्च प्र०.

टिवल्याबावल्या. स्त्री० उनाडपणानें किं० तादृशयोग्यता नसतां जे सोंदगिरीचे डोल त्या. प्र० अनेकवचनांत.

टिळक, पु०टिकला.

टिळा, पु० टिकला.

टीक, स्त्री० टिका सणोन स्त्रियांचे गळ्यांतील एक भूषण आहे त्याचा अवयव ती; २, नथ इ० भूषणावर शोभार्थ मोत्यांची चौकडी किं० हिरा इ० लाविलेला ती.

टीका, स्त्री० टिप्पणद्वितीयार्थी; २, ला० दुसऱ्याची त्याचे असमक्ष जी निंदा करितात ती; ३, कांहीं एक गोष्टीचा ईषदंश ह्रस्तगत झाला असतां त्याजवर जें कुतर्कानें मनस्वी शब्दपांडित्य ती.

टीकाकार, ३लिं० ग्रंथव्याख्यान करितो तो.

टींच, स्त्री० टिंच.

टीप

टीप, स्त्री० सर्कार इ० गांव, शहर, इ०कांतील सर्व घरांची मोजणी करितात ती; २, वस्त्रास दोरा घालण्याचा एक प्रकार आहे; ३, खालचा स्वरजस्वराचे दुपटीचें, किं० तदधिक जें स्वरमान; उ० त्याचा आवाज टिपेस पोंचत नाहीं; ४, द्रव्यादिमाध्य जे कार्य त्याविषयीं अनेकांवर जी वर्गणी, कि० निचीयादि करितात ती; ५, गंजिफांचे डावांत तलफ इ० डाव दुसऱ्याकडून आला असतां एकापानानें घ्यावा तो दोनपानानीं घेतात असा जो खेळण्याचा प्रकार ती; ६, न० नेत्रांतील जलबिंदु.

टीपकर, ३लिं० घरें, मनुष्यें, इ०कांची टीप करण्यासाठीं योजिलेला कारकुन इ०.

टीपदोरा, पु० टीप द्वितीयार्थानें पातला जो दोरा तो.

टीर, स्त्री०कुला.

टुकटुक, अ० अशक्ततेमुळें, कि० दुर्मिळवस्तूचा लोभानें निजकडे एकाग्रदृष्टीनें पहाण्याचें, कि० मंदज्योति दिव्याचे जळण्याचें वि०: उ०त्याचानें बोलवत नाहीं.माणसाकडे मात्र टुकटुक पहातो.

टुकटुकाबल्यो, टुकटुकमाकड, न० मुलांचे खेळांत कांहीं एक पदार्थ आपण खात असतां दुसरे मुलास बोट वांकडें करून वेंकावल्या दाखविण्याचा जो व्यापार तें.

टुकटुकीत, ३लिं० टकटकीत.

टुकणें, कांहीं एक पदार्थाची आशा धरून बसणें

टुकळा, पु० कांहीं एक नित्यशः नियमित काळीं

भक्षणार्थ

भक्षणार्थ मिळतो जो खाद्यादि पदार्थ त्याचा अभावामुळें वहन पडूं नये अशी जी संवय असत्ये तो.

टुंग, टुंगर, टुंगळ, न० रा० टेंगूळ.

टुचकन, टुचकर, टुचदिशीं, अ०सूय इ०कांचे टोंचण्यानें जो शब्द होतो त्याचें अनु०.

टुंणकन, टुंणकर, टुंणटुण, अ०टणकन.

टुपणें,उ०सूयइ० वस्त्रादिकांस वेधून आंत जाई असें करणें.

टुंबर, न० रा० टेंगूळ.

टुमटाम, स्त्री० टामटुम.

टुमटुमीत, वि० टमटमीत.

टुमणी, स्त्री० दुसऱ्यापासून कांहीं एक कार्य करून घेण्यासाठीं त्यास त्याकार्याविषयीं वारंवार कंटाळा यावयाजोगा स्मरण करण्याचा जो व्यापार तो.

टुरटूर, स्त्री० टिरटीर;२, किरकीर.

टुल्लू, वि० खुजा मनुष्य विनोदानें प्र०.

टूक, स्त्री० कोण एक पदार्थ कि० व्यापार इ०कांस तत्क्षणीं तोतो उपचार केला असतांच त्याणीं उत्तमरीतीनें असावें अशी जी त्या पदार्थाची, कि० त्या व्यापाराचे आंगीं उपचार सापेक्षता असत्ये ती;उ० शेताची जा वेळची त्या वेळेस टूक संभाळली असतां तें चांगलें होतें;२, कांहीं एक व्यापार,कि० पदार्थ सिद्ध करण्याविषयीं जो अंगस्वभावसिद्ध गुण विशेष असतो ती.

टूम, स्त्री० कांहीं एक पदार्थास उपचारानें जी शोभा येत्ये ती;२, पदार्थामधील खुबी.

टूमदार, वि० टूमजात आहे असा पदार्थ.

टेंक, स्त्री० भक्ष्यपदार्थइ०कांची विपुलता असतां फार खाणें इ०कांविषयीं खाणार इ०कांस कुंठितावस्था प्राप्त होत्ये ती;उ० दहा लाडू खाईन असें म्हणत होता,परंतु पांच खातांच टेंक झाली;२, कांहीं एक गोष्टीचा दृढाभ्यासामुळें तीच जडपणें प्राप्त झाली असतांही अवसान न सोडितां ती गोष्ट पार न्यावयाजोगें जें करणाराचे आंगी सामर्थ्य येतें ती; उ० प्रसंगीं दोनदोंही ब्राह्मण आले असतां भोजन घालण्याविषयीं तो टेंक सोडावयाचा नाहीं;प्रा०खर्चणें इ० प्रसंगींच प्र०:३० रा० न० लहान डोंगरी;४, दे० जमीनीवर जें उटिंगळ असतें तें.

टेंकडी, टेंकडें, न० लहान डोंगरी.

टेंकण, कांहीं एक पदार्थ टेंकून रहाण्याविषयीं आधारभूत जो पदार्थ लावितात तें;उ० हींभिंत तोलली आहे तिला कांहींतरी टेंकण लावा.

टेंकणें, उ० आधाराशीं आधेयाचा संबंध होई असें करणें;२, ला० लाभसंभावनाविषय जी कांहीं एककार्य साधकसामग्री तिची मार्गप्रतीक्षा करीत बसणें;उ० आमचें धान्य घेणें पुराणाचें बिदाईवर टेंकलें आहे;३, आपण करावयाचें जें कार्य तें नकरितां तोमाझा असुक करील असा त्याचा भरंवसा मानून आपण उगीच रहाणें;उ० त्या कार्याविषयीं तो त्यावर टेंकतो हा त्यावर टेंकतो असें झालें आहे;मराया, बाळंत होण्यास,टेंकणें इ०स्थलीं तन्नदासन्न-

दशेस पावणें.

टेंकवा, पु० टेंकण.

टेंका, पु० टेंकण.

टेंकाड, न० टेंकडें.

टेंकावा, पु० टेंकवा.

टेंकीचा, वि० टेंकहितीयार्थानें विशिष्ट.

टेंगूळ, न० आघातादिकांमुळें शरीरावरजी गांठउठत्ये तें; २, ला० वृक्षावर तदाकार गांठ असत्ये तें.

टेंटावणें, लहान मुलानें टेंटेंशब्द करून रडणें.

टेंटू, पु० एक औषधोपयोगी झाड आहे.

टेणपणें, टेणप्यानें कोण एकास मारणें.

टेणपा, पु० मारणें इ० कांचा उपयोगी जी जाड काठी तो.

टेणा, टेण्या, पु० पुष्ट झाला जो ढेंकूण. कि० ऊ; २, दे० दिव्यांतील मोठी वात.

टेप, पु० जमीनीवरील मोठा जो उंचवटा तो; २. शब्द व्हावयाजोगा जो परस्पर मस्तक इ० कांचा आघात होतो ती; ३, न० रा० कुदळी इ० कानें जमीनीचें कांढलेलें टेकूळ; ४. कांहीं एक कार्याविषयीं केला जो कालनियम तें; उ० सा महिन्याचें टेप करून त्यास बंदांत टाकिलें.

टेपटाप, पु० टापटेप.

टेपर, पु० न० ही गोष्ट तुह्मापासून गेली, घसरली, इ० रूप जें कोण एकावर ठेविलें निमित्त; २, टापरण.

टेपरण, न० टेपर.

टेपरणें, टापरणें.

टेपरा, पु० जमीनीवरचा जो उंचवटा तो; २, टेपर टेपलणें.

टेपलणें, उ० पदार्थाशीं पदार्थ आदळे असें करणें.

टेपशी, स्त्री० रा० टापशी; २, टक्कर सुरव्यार्थी.

टेंबुरणी, टेंभुरणी, स्त्री० एक झाड आहे; २, रुपयाचे शिक्क्यांत भेद आहे.

टेंभरें, न० टेंभुरणीचें फळ.

टेंभा, पु० उजेडासाठीं काठीस वस्त्रगुंडाकून जो कांकडा करितात तो; २, रा० जमीनीवरील उंच वटा; ३, आतांशेत्याचा टेंभा पाजळला आहे, एथें त्याची चलती झाली आहे असा अर्थ.

टेर, स्त्री० टेंक प्रथमार्थी.

टेव, पु० रा० सोदेगिरीचे जे ढंगतें, प्र० अनेकवचनीं.

टेवण, न० दे० टिपण द्वितीयार्थी.

टेहेळटिकोरी, स्त्री० उनाडकी; २, रा० द्रव्य इ० मिळवायासाठीं अनेकांचें आर्जव करण्याचा जो व्यापार ती; उ० तो टेहेळटिकोरी करून पोट भरितो.

टेहेळणी, स्त्री० टेहेळण्याचा जो व्यापार ती.

टेहेळणें, वीर्यादिकारणास्तव विवक्षित कोण एक पदार्थ गुप्तरूपें न्याहाळून ठेवणें.

टेहेळी, स्त्री० टेहेळणी.

टेहेळ्या, वि० टेहेळी करितो तो.

टोंक, न० काष्ठादिकांचा जो निमोळता अग्र भाग तें; २, शस्त्राची अणी; ३, काष्ट, वस्त्र, ग्राम, इ० कांचा जो शेवटचा प्रदेश तें; ४, स्त्री० पक्ष्याची चोंच.

टोंकर, पु० कातडयाचें पात्र आहे, जाचा आका-

र पांटी सारिखा असतो; २, मोठा जो बांबू त्यास ही कोणी म्हणतात.

टोंकरा, पु० मोठी पांटी चामड्यानें मढवून तयार करितात, जो नद्यादिउतरायचाउपयोगीं पडतो तो.

टोंका, पु० मोठे द्रोण्यास विनोदानें म्हणतात.

टोंकावणें, तोंड पुढें करून कांहीं एक वस्तु पहाणें.

टोंकावळी, स्त्री० टुकटुकमाकड.

टोंग, ३लिं० अनर्गळपणें बागतो जो मनुष्य तो.

टोंगाई, स्त्री० टोंगपणा.

टोंच, स्त्री० पक्षी इ० कांची चोंच; २. न० कांटा बोचल्यामुळें जें क्षत होतें तें.

टोंचणी, स्त्री० जाचणी; २, ला० टुमणी.

टोंचणें, उ० सूय इ० शस्त्रानीं कोण एक पदार्थ सच्छिद्र करणें; २, ला० गांजणें, स्र० सोनारानें कान टोंचल्याचें दुःख वाटत नाहीं.

टोंचळणें, यत्किंचित् क्षत होई असें शस्त्रादिकानीं टोंचणें.

टोंचा, पु० इषत् टोंचल्यानें झालें जें क्षत तो.

टोंची, स्त्री० टोंचा.

टोंटकें, दे० न० ओंडासुरव्यार्थी, २, टेणपा.

टोंणकणें, टोणक्यानें मारणें.

टोंणका, पु०, **टोंणकें**, न० टेणपा.

टोंणगा, पु० खुळगा.

टोंणपणें, टेणपणें.

टोंणपनाथ. टोंणपशुद्ध, ३लिं० केवळ मूर्ख.

टोणपा

टोंणपा, पु० टेणपा, स्र० शहाण्यास शब्द आणि मूर्खास टोणपा.

टोंणपेश्वर, ३लिं० टोणपनाथ.

टोंणा, टोंण्या, पु० टेण्या प्रथमार्थी; २, रा०प्र तिपक्ष्यास कदली न पडावी म्हणून हा शब्द उच्चारून सोण्यानें आरडतात.

टोंणाटोणा, पु० टोणाटोणा.

टोप, पु० स्वयंपाकाचा उपयोगी धातुमय पात्र आहे; २, पुरुषास स्त्रीचें सोंग द्यावयासाठीं बहुतकेश गुंफून मस्तकावर घालायाचे उपयोगी करितात तो; ३, दशावतार इ० कांचें सोंग घ्यावयासाठीं काष्ठ, धातु इ० कांचा बेगड, रंग इ० लावून मस्तकावर घालावयाचे उपयोगी करितात तो.

टोपडें, टोपरें, न० लहान मुलांचें जें कुंचडें

टोपण, न० वाटोळें छिद्र पाडायाचे उपयोगी एक सुताराचें हातेर आहे; २, टोपड्याचे आकाराचें धातू इ० काचें शिवणें इ० कांसाठीं बोट इ० कांत घालायाचे उपयोगी करितात तें; ३, नगारा, नौबत इ० कांचे उपयोगी जें पात्र करितात तें; ४. करंडयाचें झांकण.

टोपणें, काष्ठ इ० पदार्थांस टोपणाचा व्यापारानें सच्छिद्र करणें; २. दे० ओले लांकडाची साल काढावयाची असतां त्यास दगड मोगर इ० कानीं ठोकणें; ३, ला० टेपर मारणें.

टोपला, पु० **ली**, स्त्री०, **लें**. न० धान्यादि ठेवायाचा उपयोगी एक वेळूचें पात्र आहे.

टोपसल, टोपसाल, न० आंगाची खवा.

काढी

काठी इ०कानें मारण्याचा प्रसंगीं प्र०; उ० अग आई मीबसल्यें काय माझे घरधनी इतक्यांत आले तर माझें टोपसल काढितील; २, ला० विवाहादि प्रयोजनांत विवक्षितखर्चापेक्षां अतिअधीक खर्च झाला असतां म्हणतात; उ० या प्रयोजनांत माझें टोपसाल निघालें.

टोपा, पु० खोरा.

टोपी, स्त्री० मस्तकाछादनार्थ शिवून करितात ती; २, पर्जन्यनिवारणार्थ सरखलाद इ०कांची करितात ती; ३, टोपणद्वितीयार्थी; ४, त्यानें त्याला हजाररुपयाची टोपी घातली, म्हणजे त्यानें त्यास हजार रुपयांस बुडविलें असा अर्थ.

टोलणें, दे० कांहीं एक कार्याविषयीं त्यानें याजवर यानें त्याजवर अशा नव्हेनें कोलाकोल करणें.

टोला, पु० काठी इ०कानीं जो कडा एकावर प्रहार तो; २, ला० मर्मस्पृक् जें गुप्त भाषण तो; ३, इटकराचा तुकडा तो.

टोलावणें, टोलणें; २, नकरायाचें, किं० लांबणीस टाकावयाचें जें कांहीं एक कार्य त्याविषयीं त्या कार्य करून घेणाराला आज उद्यां अशा रीतीनें ठकविणें; ३, लाक्षणिक जो टोला तो मारणें.

टोली, स्त्री० पैशाचा आठवा अंश.

टोलेजंग, वि० बहुत मोठा असून खंबीर जो वाडा इ०पदार्थ तो.

टोंब, न० रा० टोंची.

टोंवणी

टोंवणी, स्त्री० रा० पाव इ० दाणे जमीनीस टोंचा पाडून लावण्याचा जो व्यापार ती.

टोंवणें, टोंचणें; २, रा० टोवणीचे व्यापारानें पावटे इ० धान्य लावणें.

टोळ, पु० सपक्ष क्षुद्र जंतु आहे.

टोळधाड, स्त्री० शेत इ०कांचे नाशास कारण ईतिरूप जो टोळांचा समुदाय ती.

टोळी, स्त्री० एकार्थ प्रवृत्त जो मनुष्यादि जीवसमुदाय ती; २, टोळधाड.

टोंक, पु० दे० टंवका.

टोर, दे० चटोर.

ट्यांहां, अ० फार लहान मुलाचे रडण्याचे शब्दाचें अनु० रड, कर, इ०कांचें वि०

ठक, ३ लिं० दुसऱ्यास ठकवून आपलें कार्य साधितो तो ·

ठकठक, अ० हातवडा, इ० कांचे शब्दाचे अनु०; २, स्त्री० दुसऱ्यास तिरस्कार यावयाजोगें भाषणादि ·

ठकठकणें, हातवडा इ० कानीं ठकठक शब्दयुक्त वाजणें ·

ठकठकें, न० खटखटें

ठकणें, कांहीं एक व्यापारांत अन्यानें केलेंजें कपट नें आपणावर लागू झाल्यामुळें, कि० स्वयमेव भ्रमानें कांहींएक व्यापारी प्रवृत्त जो त्याणें आपल्यें चातुर्यास दोष येई अशा दशेनें युक्त होणें; २, असा वध मनुष्यादिकांस चोर, सर्प, इ० कानीं नागविणें, मारणें ·

ठकबाजी, स्त्री० ठकणाऱ्याचा कि० ठकविण्याचा जो व्यापार तो ·

ठकविद्या, स्त्री० ठकाची जी दुसऱ्यास ठकविण्याची विद्या ती ·

ठकारू, ३ लिं० ठक; २, जा व्यापारादिकांत तत्कर्ता ठकला जातो असा जो व्यापारादि तो; उ० ठकारू व्यापार, ठकारू धंदा ·

ठट्ठा, स्त्री० दुसऱ्यास चीड यावयाजोग्या जा चेष्टा ती ·

ठट्ठेखोर, ३ लिं० दुसऱ्याची ठट्ठा करण्याचा स्वभाव जाचा

ठट्ठेबाज, ३ लिं० ठट्ठेखोर ·

ठणकणें, वायु इ० विकृतीमुळें कपाळ इ० शरीरावयव, कि० क्षत इ० कानीं अनेकवार आघात जन्य जी व्यथा तत्सदृश व्यथेनें युक्त होणें ·

ठणका, पु० ठणकण्याचा अतिशय ·

ठणठण, ठणठणा, अ० बोंबलणें, कि० ताम्रादि धातुमय पात्रावर काठी इ० कांचा प्रहारानें जो शब्द होतो त्याचें अनु० वाज इ० कांचे वि० ·

ठणठणाट, पु० ठणठण शब्दाचा जो समुदाय तो; २, ला० उदकादिकांची जी अत्यंत अल्पता तो, उ० पाऊस पडला नाहीं म्हणून त्या देशांत धान्याचा ठणठणाट झाला आहे ·

ठणठणीत, ३ लिं० काठी इ० कांचा प्रहार जा पात्रादि पदार्थांवर केला असतां ठणठण असा शब्द होतो तो पदार्थ; २, रसांश कि० जलांश आटल्यामुळें जो कोरडा झाला तो; उ० ही विहीर कोरडी ठणठणीत झाली आहे ·

ठणाठण, अ० ठणठण ·

ठणाण, पु० ठणठणाट ·

ठणाणणें, ठणठण शब्द होई असें वाजणें ·

ठणाणा, अ० ठणठणा ·

ठपका, पु० टपका; २, कोहींएक व्यापारांत चूक पडल्यामुळें जो त्या कर्त्यावर दुसऱ्याचा दोष येतो ·

ठपठप, अ० टपटप प्रथमार्थी ·

ठमकठाणची, स्त्री० ए० जा स्त्रीचा बांधा चांगला ती ·

ठमकणें, नाचण्या सारिखें नखऱ्याने चालणें ·

ठरणें, विवादग्रस्त गोष्ट सिद्धांतांत येणें; उ० हें स्थल अमुकाचें च असें अद्यापि ठरलें नाहीं; २, टिकणें; उ० अग्नीवर पारा ठरत नाहीं ·

ठराव, पु० विवादग्रस्त गोष्टीचा जो सिद्धांत तो; २, निकाल.

ठिकाव ·

ठरावणी, स्त्री० कांहींएक गोष्ट ठरविण्याचा व्यापार; २, ठिकाव ·

ठरावणें, विवादग्रस्त गोष्ट ठरण्यांत येई असें करणें ·

ठरावबंद, पु० ठरावलेली कलमें जावर लिहिलेली असतात तो कागद ·

ठयला, पु० जांतिणीचे खालचे पेटीचे छिद्रांत बसवावयाचा काष्टाचा केला असतो तो ·

ठसक, स्त्री० पायांतील जोडवीं इ० काचा ठस असा शब्द; २, अ० तसा शब्द उत्पन्न होई असें; चाल, जा, इ० कांचें वि० ·

ठसकन, ठसकर, ठसदिन्नी, अ० कठिण पदार्थावर आघातानें जो शब्द होतो त्याचें अनु० वाज० इ० कांचें वि०

ठसका, पु० ठस शब्द होई असा जो कपाळ इ० कांवर आघात होतो तो; २, मोहरी, मिरची, इ० कांचा अंश ब्रह्मांडांत गेल्यामुळें जो चटका बसतो तो; ३, असूत ·

ठसठशीत, वि० लि० खस्मर जो दागिना इ० तो; २, निखट, मीठ, फोडणी, इ० कांचा योगानें रुच्य झाला जो भाजी, इ० पदार्थ तो; ३, भाजी इ० पदार्थांस गोडी यावयाजोगें घातलें जें निखट, फोडणी, इ० पदार्थ तो; ४, केळें, चिंच, केसनूड, इ० कांतील गर्भाचा पूर्ण होवुन पुष्ट झाला जो तो पदार्थ तो ·

ठसठस, स्त्री० गच्च इ० कांस ठसठसण्याची व्यथा भास होत्येपणी; २, अ० अनेक ठोकर इ० कांचे शब्दांचें अनु० लाग, वाज, इ० कांचें वि०

ठसठसणें, गच्च इ० कांत पू होवुं लागतेसमयीं त्याचें ठणकण्यासारिखें व्यथेनें युक्त होणें ·

ठासठोंबरा वाटाण्याची अक्षत, भीड भाड न धरितां निरवालसपणें कांहीएक गोष्ट सांगावयाची असतां या वाक्याचा प्रयोग करितात ·

ठसणें, रुपया इ० नाण्यावर शिका इ० कानीं उमटणें; २, ला० सांगीतली, किं० ऐकिली, किं० पाहिली, जी गोष्ट तीच दृढ मनांत राहाणें ·

ठसदार, वि० लि० ठस भसा शब्द व्हावयाजोगें जें पायांतील जोडवें त्याचें वि०

ठसा, पु० अक्षरादि चिन्हें न लिहितां रुपया इ० कांवर उमटावीं म्हणून धातु, काष्ठ, इ० कांचें यंत्र करितात तो; २, ला० विद्वत्ता, सद्गुण, दुर्गुण, इ० कांविषयीं कोणाएकाची आरव्या पडल्ये तो; ३, ठोका द्वितीयार्थी ·

ठसाठस, ठसठस द्वितीयार्थी

ठळक, वि० लि० धातुमय दृढ जो दागिना इ० पदार्थ तो; २, टळटळीत द्वितीयार्थी; ३, ला० द्रव्य किं० विद्याधनी संपन्न; उ० त्याचे घरीं ठळकठळक वैदिक मिळाले होते ·

ठाउक, वि० लि० जाणलेला पदार्थ ·

ठाकठिकी, स्त्री० कांहींएक पदार्थ, किं० व्यापार, यांस शोभा यावयाजोगें जेथलें तेथें जसें असावें तसें करण्याचा जो प्रकार तो ·

ठाकठिक्या, वि० लि० ठाकठिकी करण्याचा स्वभाव जाच्या तो ·

ठाकठीक, वि० लि० ठाकठिकी जाची च्यांगली झाली तो पदार्थादिक ·

ठाकठोक, स्त्री० हातवहा इ० कांचे अनेकवार वाजण्याचे

ण्यांचे शब्दांचें अनु० ; स्व० ठाकठोक बोहणी रोख ·

ठाकणें, उभें राहाणें ; ठाकणें यांचे मागें प्रा० उभा या शब्दाचा योग असतो ; उ० क्षणक्षणि विलोकि उत्कंठमना उभा ठाकुनी ; २, दे० अलंकार भूषण इ० कानीं उत्तम वेषयुक्त होणें ·

ठाकसठिकस, ३ लिं० ठाकठीक ·

ठांका, पु० खणका ·

ठांकी, स्त्री० रा० ठीचा प्रथमार्थी

ठाकुरकी, स्त्री० अल्प साधनानीं संसार इ० खरल्याचा निर्वाह करण्याचा प्रकारानीं रक्षित जी महत्ता दिरूप पूर्वस्थिती ती ·

ठाकुरजी, पु० ईश्वरास म्हणतात ·

ठाकुरद्वार, न० प्रा० विष्णुचा देवालयास म्हणतात ·

ठाकूनठोकून, अ० ला० प्रसंगानुरूप अनेक प्रकारचा युक्तीनें ; राख, कर, चालव, इ० कांचें वि० ; उ० ठाकूनठोकून नानाफडनिसानें राज्य चालविलें ·

ठाकूर, पु० स्त्री० करीण, हिंदूंत एक जाती आहे, प्रा० जीची वसती रानांत असल्ये ; २, ईश्वर ·

ठांठुरणें, थंडीचा योगानें शरीरावयव इ० कानीं आकुंचन पावणें ·

ठांठें, न० बंदूक, तोफ, इ० कांचे प्रत्येक शब्दांचें अनु०

ठाण, न० अश्वादिकांचें बंधन स्थान ; २, तीर मारल्येसमयीं बसण्याचा एक प्रकार आहे ·

ठाणबंद, ठाणबंदी, ३ लि० ठाण्यावरच सर्वदा बांधून ठेविला असतो जो अश्वादि पशु तो ·

ठाणमाण, न० शरीराचा बांधा ·

ठाणघई

ठाणघई, ठाणघी, स्त्री० लांकडाची समई परंतु जिला लोरवंडाचें दिवेलावणें मारिलें असतें ती ·

ठाणें, न० ठाणप्रथमार्थी ; २, किल्ला, गढी, आदिकरून जें सरकार इ० कांचें संस्थान ते ; ३, त्या संस्थानाचा रक्षणार्थ अधिकारिसहकृत जो मनुष्यादि समुदाय असतो तें ; ४, ला० पाहुणे इ० कांची जी कोण एकाचे घरीं कांहीं एक दिवस स्थिति तें ; उ० त्यांचे घरीं आठआठ दिवस पाहुणें ठाणें देतात ·

ठाणेदार, पु० किल्ला इ० रूप ठाण्यावरचा अधिकारी ·

ठाम, ३ लिं० कायम ; २, टंकोटंक ; उ० त्या वजनानें तूप आणिलें तें या वजनानें ठाम भरलें ·

ठामणें, न० तूप, तेल, इ० पदार्थ ठेवायाचें पात्र ; स्व० घी गेलें परंतु ठामणें तर गेलें नाहीं ·

ठाय, पु० प्रा० स्थानार्थी ; २, जेवणाचे उपयोगी पत्रावळ, पान, इ० पदार्थ ; ३, स्त्री० ध्रुपद इ० सावकाश म्हणण्याचा एक प्रकार आहे, व तसाच पखवाज इ० सावकाश वाजविण्याचा प्रकार ती ; ४ · स० गुरांचें पेजें किं० जावपें ·

ठायचूक, ३ लिं० विसरल्यामुळें जी वस्तूचें ठिकाण समजेनासें झालें ते वस्तु ; २, रा० भ्रांति इ० कारणामुळें वस्तु विसरलागेला जो मनुष्य तो ·

ठायदुगन, ठायदुगुन, स्त्री० ध्रुपद इ० सावकाश म्हणण्याचा, तसाच मृदंगादि वाजविण्याचा, जो काल नितक्या कालामध्यें तें ध्रुपद इ० दोनवेळ म्हणावें वाजवावें, असा जो प्रकार ती ·

ठायां, ठायीं, अ० सप्तम्यर्थ बोधक ·

ठार, अ० मनुष्यादिकाचा जीव जाई असें, मार, कर ·

हो

हो, इ० कांचें वि०उ०त्याणें त्यास ठार मारिलें; २, ला० खाणें, पिणें, फुटणें, बुडणें, इ० कानीं निःशेष होईं असें; कि० किमपि फलरूप न होईं असें करणें, निर्जविणें, इ० कांचें; व्यवहारादिविषयीं हो, बुड, इ० कांचें वि०, उ० त्याणें नितकेही लाडू ठार केले; उ० त्याचें चेणें लोकांकडे होतें तें ठार बुडालें, त्यामुळें तो ठार बुडाला ·

देंप, न० मोठें जें देंकूळ तें; २, विवक्षित जमीनीचा जो समुदाय तें; उ० यां गांवचें शंभरविघे देंप आहे; ३, स्त्री० उंसाचा रस कढवून रवळींत ओतल्यानें जी जमते ती; ४, ला० समुदित गवत, कागद, इ० भिजून खापहोत्ये ती ·

देंपशी, स्त्री० देंपसा, पु० गोवरीचा सरवे - चा जो तुकडा ती तो ·

देंपळ, न० देंकूळ ·

देंपळी. स्त्री० देंपशी ·

देबरें, न० पिठांत तिखट, मीठ, इ० घालून तव्यावर थाबून टाकितात, नंतर त्याला थोडीं छिद्रें पाडून तूप तेल घालून खावयासाठीं करितात तें ·

देमणी, स्त्री० डुमणी ·

देर, स्त्री० मोठें पोट जाचें ती, व तें पोट ती; २, ला० साधारण रीतीपेक्षां मोठें जें नारळ, फणस, इ० फळ ती; ३, पु० नेत्रांस जो मळ येतो तो ·

देऱ्या, ३ लिं० मोठें जाचें पोट तो ·

देंसण, न० कों० पायाचा आणि कमरेचा जो सांधा तें ·

देंसा, पु० दे० वृक्षाची डिरी ·

देसें, न० देंसण ·

दोंकण, न० जांबा दगड फोडावयाचे उपयोगी कुदळी सारिखें अउत आहे ·

दोकळा

दोकळा, पु० संकेतानें पैशास म्हणतात ·

दोंकून, डुंकून, अ० डोकावून ही, पहा धा० वि० निषेध असतां प्र० उ० मी त्याकडे दोंकून पाहिले नाहीं ·

दोंग, न० दोंगण; २, डंभ; ३, कांहीं एक कारणार्थ दुखणें इ० रूप घेतलें जें मिष तें; उ० तो तापाचें दोंग करून घरीं बसला आहे ·

दोंगण, न० दोंग ·

दोंगणमोडें, न० रा० संगीत एक भेद आहे; २, इरल्यांत एक भेद आहे ·

दोंगधत्तुरा, पु० दोंग इ० तो; उ० त्याणें त्या शहरांत दोंगधत्तुरा माजविला आहे ·

दोंगी, दोग्या, ३ लिं० दोंग फेलावण्याचा स्वभाव जाचा तो ·

दोण, न० जाळावयाचे उपयोगी जें मोठें लाकूड तें; २, ला० बृहत् शरीर जाचें असा जो मनुष्यादि तें ·

दोणकूर, न० दोण प्रथमार्थी ·

दोणसकड, न० रा० बृहत्शरीरी अस्तन जो मंद तें ·

दोण्या, ३ लिं० जाचें फार मोठे शरीर तो, निंद्य असतां प्र० ·

दोपर, पु० न० गुडघा ·

दोंपररवुंटी, अ० थकणें इ० कारणामुळें दोंपर देंकून; चालणें, इ० चें वि० ·

दोंपररवुंटीस, दोंपररवुंटीला, अ० दोंपर देंकून उभें राहण्याचे दशेस, ये धा० प्र०

दोंपरी, स्त्री० गुडघी सपूत रोग आहे ती :

दोंपा ·

ढोंपा, पु० गुडघा.

ढोबळ, ढोबळा, २ लिं० आबड धोबड जो मोठा पदार्थ तो.

ढोर, न० गो महिषजातीय जो पशु तें.

ढोरगुंज, स्त्री० गुंजेंत एक भेद आहे ती, वतिचें झाड ती.

ढोरगुरूं, न० गुरूंढोर

ढोल, स्त्री० वृक्ष, पर्वत, इ० स पक्षी, पशु, इ० राहावयाजोगें जें भोंक असतें ती; २, पु० मोठें एक चर्मवाद्य आहें; ३, ला० मोठें जें पोट तो.

ढोलक, ढोलकी, स्त्री० ख्याल गाणारांचें एक चर्मवाद्य आहे.

ढोलकें, न० दुमकें; त्याचें ढोलकें वाजलें आहे; ह्म० त्या गोष्टीची सर्वजनांत प्रसिद्धि झाली आहे, त्यानें ढोलकें फोडलें, एथें कांहीं एक गुप्त गोष्टीची प्रसिद्धि केली, कि० कांहीं एक मसलत कीं सळली.

ढोलक्या, २ लिं० ढोलक वाजविण्याचें कसब करितो तो.

ढोलजी, २ लिं० ढोलरूप चर्मवाद्य वाजविण्याचें कसब करितो तो.

ढोला, पु० अकस्मात्‌जी कांहींएक मोठी हानि तो, बस, धा० प्र०; उ० त्या व्यवसायांत त्यास हजारों रुपयांचा ढोला बसला; पाउसानें ढोला दिला; एथें पाउस बेताल न पडल्यामुळें हानि झाली; ढोल देणें, ह्म० कोणएकाचे द्रव्यावर ताव मारणें.

ढोलार

ढोलार, न० ढोल प्रथमार्थानें युक्त जो वृक्ष तें; २, ढेर प्रथमार्थी.

ढोल्या, २ लिं० ढोल तृतीयार्थानें युक्त तो.

ढोंसकणें, दुसकणें

ढोंसण, स्त्री० सनजो मोठा बारा स्कट तो ती.

ढोंसणी, स्त्री० दुसणी.

ढोंसणें, दुसणें; २, कंठामध्यें घटघट शब्द व्हावयाजोगें उदकादि पिणें.

ढोंसला, पु० बांगडींत एक भेद आहे.

ढोंसा, पु० ढोंसा.

ढोदव, स्त्री० ढबढव.

तकट, न॰ अलंकारादिक करायासाठीं धातूचा जो ठोकून पातळ पत्रा केला तो; २, रा॰ नागव्यामुळीचा करगोट्यांत घालावयाचें अश्वत्थपर्णाकार एक भूषण आहे तें.

तकटून, अ॰ आंत किमपि पोकळी नराही असें, जेवणें, बांधणें, याचें प्रायः वि॰

तकटें, न॰ तकट; २, दार, खिडकी, कुपणाची वाट, इ॰कांचा प्रतिबंधार्थ झांप, इ॰कांचें बांधून जेंसाधन करितात तें.

तकतकणें, रंग, शाई, इ॰कांनीं गोंद, लोभ, इ॰कांचा योगानें तेजोविशिष्ट दिसणें; २, मनुष्यादिकांचें शरीर, मिंड, इ॰फलें, यानीं कांतियुक्त दिसणें.

तकतकी, स्त्री॰ तकतकीत पदार्थाचे अंगी जीकांति दिसत्ये ती.

तकतकीत, वि॰ तकतक ती जो पदार्थ तो.

तकराळ, स्त्री॰ हिं॰ भाषणावरून स्वरें, रवोटें, याचा निर्णय कर्त्तव्य असतां जो त्या भाषणांतील विपर्यास ती; उ॰ याचे भाषणांत तकराळ दिसत्ये; २, वास्तविक दोषकेला नसतां जो कोणेकावर दोषारोप ती.

तकलादी, वि॰ हिं॰ दिसण्यांत रुचिर दिसावें परंतु आंत नादरुश दृढपणा जाचे अंगी नाहीं असें जेंगृह, पेटी, इमारत, इ॰तो.

तकलुबी, तकलोबी, वि॰ تعلّی हिं॰ तकलादी.

तकवा, पु॰ تقوی हिं॰ तन्नव्यवहारीं टिकावधरून राहावयास उपयुक्त शक्ति, शारीरबल, इ॰तो.

तकवेनकौल, पु॰ تقوّت قول हिं॰ सर्कारांतून जमीन इ॰कांचा कौल घ्यावयाचा असतां तो पावयास अवकाश नसल्यास कोलादारबल जें पत्र करून देतात तो.

तकवेनचिठी, स्त्री॰ تقوّت حتی तकवेनकौल.

तकस, पु॰ रा॰ कांहीं एक अवयवीं पदार्थाचा जो धक्का किं॰ आंचका बसला असतां त्याचा संस्कार-चलनरूप, किं॰ वेधनारूप जो अवयवांतरीं पोंहों चतो तो, पोंहोंच, पाव, इ॰योगीं प्र॰.

तकसीर, स्त्री॰ تقصیر हिं॰ अपराध.

तकाकणें, तकतकणें.

तकाकी, स्त्री॰ तकतकी.

तकूब, अ॰ تکذیب हिं॰ चालत्या कार्याचा मध्येंकांहींकाल विराम होई असें, होणें, करणें, ठेवणें, इ॰वि॰ न॰को॰ कुळास कांहीं एक दिवस शिपायानें तगादा नकरावा स्तणून चिठी कि॰ रुपण देतात तें.

तकूबचिठी, स्त्री॰ तगादा तकूब होण्यासाठीं जी चिठी ती; २, ला॰ कांहींएकदिवस रोगादिकाचा उपशममात्र जाल्यानें होतो असें जें औषध ती; ३, तेणेंकरून आला जो कांहींएकदिवस गुण ती.

तक्कट, अ॰ त्वरित होइ असें, आणें, येणें, चालणें, इ॰वि॰.

तक्कू, स्त्री॰ को॰ आंब्याचीं फोडें उखडींत घालून त्यांत तिखट, मीठ, इ॰घालून कटून चटणी करितात ती.

तक्त, न॰ राजाचें आसन, जावर इतरास बसण्याचा अधिकार नाहीं तें; तक्तावर बसणें, स॰

अभिषेकादिकें करून राज्याधिकार पावणें.

तक्कपोशी, स्त्री॰ तक्क्यानीं पादून करितात जी माडी ती; २, ३ लिं॰ तद्विशिष्ट गृहादिक तो.

तक्करांवा, पु॰ विवाहांत वधूवरें, वऱ्हाडी, इ॰ समारंभानें मिरवत असतां पुढें चालावयाकरितां अनेकांनीं एकत्र जडून त्याजवर वेश्येनें नृत्य करावें म्हणून चवरंगासारिखा एकपदार्थ करितात तो.

तक्का, पु॰ ﻛﻮﻛﺎ हिं॰ लांकूड करवतानें चिरून लांब जी फळी करितात तो; २, गुलाब, इ॰ वृक्षांची सारिखी लाविली जी पंक्ति तो.

तक्की, स्त्री॰ पुस्तकादिकांचा सांचा सारखा व्हावा म्हणून प्रथम एक कागद विवक्षित प्रमाणानुरूप कापून तयार केला तो; २, त्या कापलेल्या कागदांचा सारखा जुळून केलाजो समुदाय तो.

तक्कीपत्र, न॰ तक्की प्रथमार्थी.

तक्या, पु॰ ﺗﮑﯿﮧ हिं॰ एकापिजारलेंत कापूस, इ॰ भरून टेकावयाकरितां जो पदार्थ करितात तो; २, फकीराची राहावयाची जी जागा तो; ३, ओढिंगून बसावयासाठीं ओटी, इ॰ कांवर, चुना, माती, यांचा उंचवटा करितात तो.

तक्र, न॰ सं॰ दह्यांत कांहीं पाणी घालून घुसळून लोणी काढिलें असतां जें अवशिष्ट राहातें तें.

तक्रकौंडिन्यन्याय, पु॰ कांहीं पदार्थांनें सामान्यरूपेंकरून आणि विशेषरूपेंकरून उद्देशून सजातीय दोन विधि असतां त्यापदार्थावर सामान्यतें प्राप्त जो विधि त्याचा विशेषविधीनें बाध होतो अशा अर्थाविषयीं सर्वांस तक्रवाहा आणि कौंडिन्यास दहींवाहा यावाक्यांतील दह्यांचा विधानानें तक्राचा बाधाचा घेतात ओ दृष्टांत तो.

तक्रमंडूर, पु॰ ताकाचे अनुपानानें घ्यावयाचा जो मंडूर तो.

तरवली, स्त्री॰ कथली.

तरवलीव्याध, स्त्री॰ कथलीव्याध.

तंरवा, पु॰ कांहीं पदार्थांवर जो कोणा एकाचा स्वामित्वादि संबंध असतो तो; २, अनेकसंबंधाक्रांत जे कांहीं एकपदार्थ त्यांचेजे संबंधि भेदानें भिन्नभिन्न विभाग ते, प्र॰; उ॰ येथून दुसऱ्या गांवांचा तंरवा लागला.

तरवील, न॰ कथील.

तंग, पु॰ घोड्याचें खोगीर आंवळावयासाठीं चर्मादिकांचा पट्टा करितात तो; २, ३ लिं॰ आंगाशीं गच्च बसावयाजोगा जो आंगरखा, चोळी, इ॰ तो.

तग, पु॰ कों॰ टिकाव पुसिंगार्थक; २, बजनकगवयाचा मोठा कांटा तो.

तंगचाई, स्त्री॰ द्रव्यादिकांचा अल्पतेमुळें खर्चावेंचाची जी ओढ ती; २, हात आंखडून खर्चवेंच करण्याचा जो प्रकार ती; स॰ खाण्यापिण्याची तंगचाई आणि नमोनारायणाची दरसर.

तंगची, स्त्री॰ कों॰ तंगचाई.

तगट, न॰ तकट.

तगटणें, आंवळ होईअसें घट्ट बांधणें.

तंगड, न॰ कों॰ तंगडी.

तंगडी, स्त्री॰ मांडीपासून पाउलपर्यंत जो पायत्या सनिंदाचवसरी स्त्री॰

तंगणें, शरीरशक्तीनें किं॰ द्रव्यशक्तीनें मनुष्यादिकांनें ही न होणें.

तगणें, टिकणें.

तगदमपट्टी, स्त्री. अनमानधपका.

तगदमा, पु. अनमानधपका; २, अ. दे. अनामतपणें; उ. त्याचेंउपाध्येपण तगदमा राहिलें.

तंगदार, २लिं. तंगडितीयार्थी.

तगमग, स्त्री. करणें, याचा योगीं प्र. काहिलीनें व्याकुळ होणें.

तगमगणें, तगमग करणें.

तगर, स्त्री. एकफुलझाड आहे ती; २, न. तीचें फूल तें.

तगवणा, २लिं. कों. एखादेदिवशीं प्रतिज्ञार्थ नेसावयाचा जो पीतांबर, इ. वस्त्र, तो.

तगवणें, न. बहुतदिवस तगायासाठीं वस्त्रबाळगून ठेवितात तें.

तगाई, स्त्री. हिं. मुलकाचे राखणुकेसाठीं पर्जन्याचे पूर्वी कुळांस पेसा देतात ती.

तगादगार, पुं. हिं. तत्काळीं तगादा करायासाठीं जो योजिला तो.

तगादा, पु. हिं. अधमर्णादिकांपासून द्रव्य घेण्यासाठीं किं. कोणापासून विवक्षित काम करण्यासाठीं पुनःपुनः मागें द्रव्य टाकून दे किं. काम कर, इ. घुपट्टयाचा जो व्यापार तो.

तगारी, स्त्री. मृत्तिकेचें एक चिनईपात्र आहे.

तगाव, पु. टिकाव.

तगिरी, स्त्री. तहगिरी.

तगीर, २लिं. तहगीर.

तग्रवग्र, २लिं. सं. कोपायाचे योगानें डोळे फिरवावे दांत ओठ चावावे अशा दशेनें जो पायला तो.

तज, न. दालचिनी.

तजकरनीस, २लिं. हिं. राजादिधन्यानें सांगीतल्या कामांत चोरून मिळविलाजो पैसा तो वाहेरकाढून राजादिकांस समजाविनो तो

तजकरा, पु. تذکرہ हिं. मामलत इ. कामाध्यें मामलतदार इ. कानीं खाला जो पैका तो प्रसिद्ध करून तजकरनिसानें त्याजवर घातला जो तत्संयुक्त अपराध तो; व त्याणें लागू केला जो पैका तो.

तजवीज, स्त्री. उपस्थित होणार जें कार्य तत्पूर्वी तदुपयुक्त सामग्रीची जी सिद्धता ती; उ. डेरे कनाती यांची तजवीज येथे व्हावयाची नाहीं; २, कांहीं एक कार्य अमुक रीतीनें करावें अशी जी अंतःकरणांत केली योजना ती; ३, मी एकांती बसून तजवीज करून देईन; ४, कोणी एका कार्याविषयीं विशेष बलादि नसतांना किं. कांहीं नाशन होऊं देतां काम करण्याची जी कुशलता ती; उ. हलक्या मनुष्यापासून काम तजविजीनें घ्यावें.

तजाउजू, तजाबुजु, अ. वा. تصاوُر हिं. नियमित संकेतापेक्षां अधिक उणें होईअसें, निषेधविवक्षित असतांच प्र.; उ. तुम्हीं सांगाल त्यांत तजाबुजू होऊं देणार नाहीं.

तजावजा, अ. कांहीं कार्याचा ईषदंशीं किं. सर्वांशीं कांहीं कारणानें जो नाश तद्दशापन्न होईअसें; २, मिलितजो समुदाय त्याचे अवयव बहुकडे चार केल्यामुळें तो फुटे असें होणें, करणें, इ. कांचें वि.; ३, कों. चोरादिभयानें घाबरे

बरेपणा होईअसें, होणें, पाहाणें, दिसणें, इ० कांचें वि०; उ० पेंढारी दाहाकोशांवर आलेअसें ऐकतांच लोक तजावजा साले० स्व० घाबरे साले०

तजेला, पु० तेजगी०

तट, पु० किल्ला, गांव, इ० कांचा सभोवतीं जी भिंत असती तो; २, जातीमध्यें कलहादिकारणामुळें एकपंक्ति भोजनादिविषयीं जो विरुद्धभाव पडतो तो; ३, तेजे दोनपक्ष-ने, म०; ४, नद्यादिकांचें तीर तो; ५, क्रि० रखोळंवा, निषेधविवक्षित असतांच म०; उ० तूं नआलासतर मासा तट नाहीं; ६, पर्वत, स्तन, इ० कांचा जो वरपासून खालपर्यंत उतरता भाग तो०

तटकन, तटकर, तटदिशी, अ० खडा, ठिणगी, इ० उडणें किं० दोरी, डोकें, इ० सपाट्यानें तोडणें, इ० कांचें वि००

तटकारणें, रा० एरवा पास सांगीतलें जें कांहीं तें त्याणें ऐकल्यान ऐकल्यासारखीं न-त्याचें स्मरण पूर्वक करावें ऐसून सांगीतलें आहे हो विसरशील हो, इ० वाक्यानी हटकरणें०

तटकी, स्त्री० द्वारप्रतिबंधार्थ कांटया, शिरें, इ० बांधून करितात जें कपाट ती०

तटकें, न० तटकी०

तटणें, रखोळंवणें०

तटतटणें, पिशवी, पोट, इ० जो पोकळपदार्थ त्यांत कांहीं भरल्यामुळें आंतील पोकळी नाहींशी होउन ताठला जाणें; २, अग्नींत टाकिलें मीठ, इ० तटतट वाजणें०

तट

तटतटां, अ० तटतट शब्द होईअसें, टांके तुटणें, लाह्या फुटणें, इ० कांचें वि०

तटतटीत, वि० तटतटलाजो आंगरखा, पोट, इ० तो०

तटबंदी, स्त्री० किल्ला, इ० कांभोंवतालें तटरूपजें आवरण असतें ती०

तटस्थ, वि० कांहीं कारणामुळें प्रवृत्त-चलन वलन व्यापारवृत्तीचा निरोधकरून रखोळून जो स्थित तो; २, परस्परविवदमान जे अनेकपक्ष त्यामध्यें एकाहीपक्षावर ज्याचा पक्षपात नाहीं तो०

तंटा, पु० कज्जा; २, ज्याची निर्गति नकरितां आपण मोकळा होतनाहीं असा जो देणें, घेणें, इ० व्यवहार पास असतो त्यास स्त्री० उ० त्याचे पाठीमागें हजार तंटे आहेत तेव्हां त्यास कसें फावेल०

तटाक, न० तळें; २, नद्यादिकांचें तीर; उ० नर्मदे चातटाकीं०

तटाटणें, तटतटीत होणें०

तटाटी, अ० तटतटां०

तटाणी, स्त्री० आकारानें लाहानजी अश्वजाती य स्त्री ती०

तटु, पु० न० आकृतीनें लाहान जो घोडा तो तें०

तंटेखोर, वि० कज्जेखोर०

तंटेबाज, वि० कज्जेखोर०

तटोरी, स्त्री० टटोरी०

तट्ट, अ० पोट, शरीर, इ० अतिशयित तटतटित होईअसें, फुगणें, इ० कांचें वि०

तट्ट

तट्टकन, तट्टकर, तट्टदिशी, अ॰ तटकन.

तट्टी, स्त्री॰ तारी.

तट्टू, पु॰न॰ हिं॰ तट्टू; २, ल॰ भादव्यांतेभट्टू आश्विनांत तट्टू; पुष्ट होतात.

तट्या, पु॰ वेळूची आंथरी करितात तो.

तड, पु॰ तट. द्वितीय, तृतीया; २, स्त्री॰ नद्यादिकांचें तीर ती; ३, समासीचा अवधि; माझा ग्रंथ तडीस गेला; तडीचा पोहणार, ल॰ कोणी एक हातीं धरिल्या व्यवहाराची तड घेण्याची जो सशक्ति नाहीं त्यास ल॰.

तडक, अ॰ प्रवृत्त कार्यास आरंभ जो वेग त्याचा मंदत्वास कि॰ विरामास कारणें जी. कमें करावें, कायकरावें, इ॰ कांहीं प्रतिबंधकें तेणेंकरून विरामन पावतां कांहीं कार्य करणें. जाणें, येणें इ॰ कांचें वि॰; उ॰ हें काम तडक चाललें आहे, अकबरीमाफीक सर्वत्र तडक चालत्ये; २, यत्किंचित् न्यूनतारहित जे भूमिप्रमाण कि॰ मार्गप्रमाण तें; उ॰ तोफाच येथून तडक कोसभर आहे. ३, ग॰ स्त्री॰ गमनकर्त्याचें गमनाविषयीं आंगीं घेतलाजो वेग तो; उ॰ तेथून जी तडक मारिली तो येथें उभा राहिला; ह्या मार्गे तडक पुण्यास जातो, इ॰ स्थलीं भ्रांति पडावा जोग्या मार्गांतराचा योग नाहीं.

तडकणें, उष्ण थंडी यांचे अतिशयानें, काष्ठ, भूमि, इ॰ चिरांनें युक्त होणें व आंगररवा, इ॰ नाणल्यामुळें चिरला जाणें, ल॰ अकस्मात कांहीं हानि कि॰ भय प्राप्त झाल्यामुळें अंतःकरण व्यथाविशेषानें युक्त होणें.

तडकफडक, २ स्त्रि॰ कों॰ निरर्थक संभाषणाचा जो भाषणादि व्यवहार तो; २, तद्विशिष्ट मनुष्य.

तडका, पु॰ कों॰ कांहीं एक कर्म करण्याविषयीं मुलाची स्वभावसिद्ध जी चपळता तो; २, तडकया अव्ययार्थी.

तडकाफडकी, अ॰ ज्वरादिरोगामुळें बहुतदिवस विपत्ति न भोगितां मरणें इ॰ कांचें वि॰

तडकाफडकी, स्त्री॰ उडणें, झडणें, इ॰ कांचा योगीं प्र॰ अर्थ एकमेक उडणें, झडणें, इ॰.

तडकावणें, कडकावणें.

तडंगणें, कज्जा करणें.

तडणें, उष्णादिकामुळें पदार्थ भेगांनें युक्त होणें; २, ग॰ मडकें बहुत तापल्यामुळें त्याणें खपल्या सोडणें.

तडतड, अ॰ फोडणी इ॰ कांचा शब्दाचें अनु॰ तें तडतड बोलतो, तोडितो: इ॰ स्थलीं शब्दकल्पित जाणावा.

तडतडां, अ॰ तडतड.

तडतडणें, फोडणी, इ॰ तडतड शब्द युक्त होणें. २, ल॰ थंडी इ॰ कानें शरीरास कि॰ केसांस ओढावल्यामुळें व्यथित होणें.

तडतडविणें, कों॰ तडतड शब्द होई असें. कांहीं इ॰ कांनीं मारणें.

तडतडाट, पु॰ तडतड शब्दाचा अतिशय तो.

तडतडी, स्त्री॰ एक झाड आहे.

तडतडीत, २ त्रि॰ मृदु नव्हे जें पर्णादिक तो.

तडफड, स्त्री॰ चरफड.

तडफडणें, चरफडणें; २, ज्वर, सूर्यातप, क्षुधा, यांचा

यांचा अतिशय झाल्यामुळें हस्तपादविक्षेपादिव्यापार चुक्त होणें ·

तडफडाट, पु॰ चरफडाट ·

तडबा, २ लिं॰ कों॰ जाफलपर्णादिकांस जूनपणा आला असतां गोडी कमी होत्ये असा जो जून पदार्थ तो; उ॰ हें वांगें जून तडबा आहे ·

तडस, पु॰ रा॰ कांचळ्या चीरखोळ उलगडूनये म्हणून नीस जो बारीक खिळा टोंचितात तो; पोटांत तडस भरले किं॰ पोटास तडस लागले, येथे पोट अतिशयित भरल्यामुळें किं॰ नळफुगल्यामुळें तडस टोचिल्या सारिखी व्यथा होऊं लागली असा अर्थ ·

तडसळी, स्त्री॰ वा॰ वडे काढावयाकरितां जी बारीक टोंकीची काठी घेत असतात ती ·

तडा, पु॰ मडकें, काष्ठ, इ॰ कांस चीर पडत्ये तो; २, रा॰ बहुत तापल्यामुळें मडकें इ॰ कांची रवपली निघत्ये तो ·

तडाका, तडाखा, पु॰ कडाका; २, तडतड शब्द होई असा जो चाबूक इ॰ कांचा प्रहार तो ·

तडाग, न॰ तळें ·

तडाडां, अ॰ तडातड ·

तडातड, अ॰ तडतड ·

तडातोड, स्त्री॰ ताडातोड ·

तडित्, स्त्री॰ सं॰ विद्युल्लता ·

तडिद्वान्, पु॰ सं॰ मेघ ·

तडीतापडी, पु॰ भिक्षामागून पोटभरणारा जोगी सारखा, वैरागी, इ॰ तो ·

तंडुल, पु॰ सं॰ तांदूळ ·

तंडेल, २ लिं॰ रा॰ तांडेलखोर ·

तण, न॰ तृण, परंतु साबीचे गवताचा च प्रसिद्धि ·

तणतणणें, तनतणणें, क्रोधाद्यावेशानें गळ्याच्या शिरा ताणत असें मोठ्यानें बोलणें; २, कों॰ पिशवी, पोट, इ॰ आंत मनस्वी पदार्थ भरल्यामुळें त्यांनीं ताणलें जाणें ·

तणतणीत, अ॰ कों॰ अतिशयित भरल्यामुळें पोट, पिशवी, इ॰ ताठे असें भरणें इ॰ कांचें वि॰; उ॰ पोट तणतणीत भरलें ·

तणवर, पु॰ कों॰ जमीन भाजावयासाठीं त्या जमिनीवर कचळा किं॰ शेण पसरितात नंतर त्यावर तृणाचें आच्छादन करितात तो ·

तणवरणें, कों॰ तणवराचें दाट चुक करणें; उ॰ हा राघ तणवरला; पिशवी, पोट, इ॰ कांत, काहीं पदार्थ बहुत भरल्यामुळें ताठणें ·

तणवी, २ लिं॰ रा॰ तृणाचें आच्छादित जें गृहादि तो ·

तणस, स्त्री॰ को॰ मोठ्ये तणांतील बारीक जें गवत ती ·

तणसरणें, कों॰ यथेष्ट भक्षणादिक मिळाल्यामुळें शरीर पुष्ट होऊं लागणें ·

तणसरी, स्त्री॰ गवताचे काडीस प्रसंग विशेषीं ल॰

तणावा, पु॰ दोरी, इ॰ ताणल्यामुळें ताठपणा येतो तो व ती ताणण्याचा जो व्यापार तो; २, डेरा, राहुटी, इ॰ यथास्थित नीट उभीं राहावीं म्हणून जा दोरी बांधितात त्या प्र॰; ३, ल॰

प्रपंचादि निर्वाहोपयोगी जो आश्रयभूत असतो तो; उ० आजपर्यंत यागृहस्थाचे आश्रयानें प्रपंच चालत होता आजतो तणावा तुटला.

तंत, २ स्त्रिं० संख्या, गुण, प्रमाण, इ० कानें परस्पर तुल्यतो.

तंतरणें, कोणेकानें कोणेकापासून ठकवून इच्छा काढणें क्रि० कांहीं कानगोष्ट सांगून क्रि० इच्छादिकाचा लोभ दाखवून विवक्षितानुसार कोणेकाची वृत्ति होईअसें करणें, येथेजो थकला क्रि० जा-वीवृत्तिपालटली त्यास कर्मना; २, पुरुषानें स्त्री उपभोगिणें.

तंतु, पु० कापूस, रेशीम, लोहोंकर इ० कांस, पीळ घातला असतां जें सूत्र निघतें तो; २, तदाकार लांबट लवचीक बारीक कांहीं वेलांस अवयव असतात क्रि० झाण्याचें आंतडें क्रि० लोहादिकाची तार, तदाकार जें चर्म, इ० तो; ३, ला० वंशामध्यें वंशधारक एकच जो पुरुष राहिला त्यास म्ह०.

तंतुवाद्य, न० वीणा, सारंगी, इ० तारेनें युक्त जें वाद्य तें.

तंतू, पु० नर्मदादि नद्याशयाच्चेठायीं एकजीव जातिआहे तो, जास तंतुरूप अवयव मोठेमोठे असतात.

तंतोतंत, २ स्त्रिं० तंत.

तनू, २ स्त्रिं० तो असेंजें प्राकृतसंस्कृतमतें याचा अपभ्रंश, याचा प्रयोग समासादिस्थलीं व्यवहारांत चेतो; उ० तत्समधीं, तनूज, तनूभव, इ० आणावीं.

तत्काल, अ० विलंब न करितां त्याच समयीं आ, ये, इ० कांचें वि०.

तन्नामाल, पु० रा० नगदामाल.

तत्पर, २ स्त्रिं० जाव्यवहारादि विषयांकडे जाचें सर्वभावेंलक्ष्य आहे तो त्याविषयीं; २, तत् शब्दानें परामृष्टजो अर्थ तो आहे मुख्यत्वेंकरून विषय जाचा असेंजें शास्त्रादि तो; उ० जो अर्थतुम्ही बोलतां तत्पर च हें वचन आहे.

तत्पुरुष, पु० समासांत एक भेद आहे, जामध्यें उत्तरपदाचे अर्थास प्राधान्य असतें तो.

तंत्र, न० अनेक व्यापार एकामीच करण्याचा जो प्रकार तें; उ० दोन प्रयोजनें तंत्रानेंच केली; उ० प्रपंच आणि ईश्वरभजन तंत्रानें होतनाहीं; २, कांहीं एक व्यापार करण्याचे जे अनेकमार्ग असतात जांचा भेद व्यवहारभेदानें क्रि० प्रकारभेदानें होतो तें; उ० आमचें तंत्र निराळें तुमचें तंत्र निराळें; ३, अनेककार्योपयोगी जो शब्दोच्चारणादिरूप एकच व्यापार प्रकार तें; उ० पानेंसडलीकां घोडा अडलाकां विद्यार्थिसरलाकां या प्रश्नांवर तंत्रानें उत्तर एकचकीं फेरनाहींसणून; ४, अनुलक्ष्य; उ० राजाचे तंत्रानें प्रधानानें चालावें; ५, कांहीं एक अनुष्ठानामध्यें मंत्रांवांचून जी हस्तक्रियातें; ६, मंत्रशास्त्रांतील एकअंश आहे तें; ७, युगादिपासून जाग्रंथांत ग्रह साधन केलें आहे असाजो गणितग्रंथ तें.

तथापि, अ० तसेंअसतांही; उ० मी इनकें बोलतों तथापि त्यास लाज नाहीं.

तंत्री, स्त्री० लोह, इ० कांची जी तार ती.

तत्व, न० कांहीं एक पदार्थांतील जो मुख्यांश तें; उ० दुधामध्यें लोणी हें तत्व आहे; २, भाषणादिकांतील जो सारांश तें; ३, वास्तविक स्वरूप तें; ४, पृथिव्यादि पंचभूतें, पंचविषय, दाहा इंद्रियें, मन, अहंकार, महत्तत्व, माया, ईश्वर, हीं पंचवीस प्रत्येकीं; ५, कार्यरूप पदार्थांचे ठायीं त्या कार्यदशेचा नाश झाला असतां ही राहावयाचा असा मूलप्रकृति भूतअंश असतो आणि तच्छब्दवाच्य अर्थावर विशेषणत्वें करून भासतो जो धर्म तें, तत्वांमिळणें, स्व० ब्रह्मस्वरूपाशीं अभेदपावणें क्रि० कांहीं रसायनाचायीं अंतःकरणवृत्ति निमग्न होउन देहभान जायी अशा अवस्थेतें पावणें.

तत्वतः, अ० वस्तुतः.

तत्वज्ञान, न० वस्तुतः यत्स्वरूप जो पदार्थ त्याचें तद्रूपें करून जें ज्ञान तें; २, आत्मस्वरूपाचें जें ज्ञान तें.

तत्वज्ञानी, वि० तत्वज्ञान आहे ज्यास तो.

तत्क्षणीं, अ० तत्काल.

तथा, स्त्री० कांहीं कार्य पूर्णत्वास न्यास क्रि० कोणेकाचा पाणउतारा करण्यास जो यत्किंचित् न्यूनपणा तो, निषेधविवक्षित असतांच म०; २, सं० अ० त्याप्रकारें; उ० तथाभूत इ०.

तथापि, अ० तत्रापि.

तथास्तु, हें वाक्य आहे; अर्थ तसेंअसो.

तथ्य, वि० वास्तविक.

तदंत, अ० विवक्षित कोणएक अवयवीचा ईषद्दशाही नसाही असें; बुडणें, जाणें, मरणें, जेवणें, इ० कांचें वि०.

तदनंतर, अ० उक्तगोष्टीचा अधिकरण भून जो काल त्याहून उत्तरकालीं.

तदनुगुण, अ० विवक्षितार्थाचनुलक्ष्यें करून, उ० तें बोलतात तदनुगुण च हे बोलतात; २, वि० विवक्षितगुणादिकें करून तुल्य तो.

तदनुरूप, अ० वि० तदनुगुण.

तदनुसार, अ० वि० तदनुगुण.

तदीय, वि० तत्संबंधी.

तद्देशी, वि० विवक्षित त्या देशाचाचायीं उत्पन्न झालातो; २, हिंदुस्थानी ओ पूर्व्या परदेशी इ० तो.

तद्रूप, वि० तोच केवळ तो.

तद्वत्, अ० त्यासारखा.

तधीं, अ० त्यादिवशीं.

तन, स्त्री० न० تن हिं० शरीर; २, गगन; ३, दूक अर्थमात्रीं.

तनरखा, पु० تنزاه हिं० तंरखा.

तननननणें, तणतणणें.

तननं, अ० आलाफांतील अक्षराचें अनु०; २, न० आनंदाचा नानाविधचेष्टा तें; उ० स्व० आधीं अनंमग तननं.

तनमणी, पु० تن منی हिं० स्त्रियांचें एक कंठभूषण आहे.

तनमन, न० लाग धा० न० अर्थ एखाद्या विषयाकडे अंतःकरण वृत्ति सर्वात्मना गुंतली जाणें.

तनय, पु० सं० पुत्र.

तनया, स्त्री० सं० कन्या.

तनवी, स्त्री० दे० राहुटी इ० कानी दोरी.

तनारवोरी, स्त्री॰ विश्वासानें कोणी इत्यादि स्वाधीन केलें असतां कि॰ कांहीं काम सांगीतलें असतां विश्वासघात करून कोणी आंत चोरी करितो ती.

तनाना, पु॰ न॰ तननं.

तनाव, स्त्री॰ दे॰ हिं॰ तनयी.

तनावा, पुं॰ हिं॰ तणावा.

तनु, स्त्री॰ सं॰ शरीर; २, वि॰ कृश.

तनुज, पु॰ सं॰ पुत्र.

तनुजा, स्त्री॰ सं॰ कन्या.

तनू, स्त्री॰ शरीर; २, टूक प्रथमार्थी.

तप, न॰ शरीरशुध्यर्थ कि॰ देवताप्रसादसिध्यर्थ जें उपोषणाचाचरण तें; २, हादशवर्षात्मक जें कालप्रमाण तें; उ॰ असुकानें दोनतपें राज्य केलें, तपांवसणें, स॰ मामलत इ॰ अधिकारावरून च्युत होउन, घरीं रिकामा बसणें, याचे समास तपःसामर्थ्य, तपोबळ, इ॰

तपकिरी, पु॰ तपकिरा चे रंगासारिखा जो वेंग्रा सरंग असतो तो; २, वि॰ तद्विशिष्ट वस्तु तो.

तपकिर्या, तपकिल्या, वि॰ तपकीर ओढावयाचें जास व्यसन आहे तो; २, तपकीर विकितो तो.

तपकिली, वि॰ तपकिरी.

तपकीर, तपकील, स्त्री॰ न॰ नाकांत ओढावयासाठीं तंबाखूचें वस्त्रगाळीव चूर्ण करितात तें.

तपणें, सूर्यानें सर्वांस प्रकाशव्हावया जोगें तेजस्वि रूपें वर्तणें; २, सं॰ तपकरणें

तपली, स्त्री॰ कों॰ तपेली.

तपलें, न॰ कों॰ तपेलें.

तपशिला, पु॰ एक वस्त्र आहे तो.

तपशील, पु॰ تفصیل हिं॰ समुदायरूप अवयवीचा विशिष्ट कार्यावर विनियोग असतां पोटचा अवयवांचा कार्यावयवांवर विनियोग जसे जसे साले असतात त्याचें तसें तसें जें कथन कि॰ लेखतो; २, सामान्यें करून प्रतिज्ञात जो अर्थ त्याचें हेतुकारण, इ॰ विस्तारें करून जें समर्थन तो; उ॰ एका शब्दानें नाहीं म्हणून सांगा उगाच तपशील लाउंनका; ३, दुसर्‍यानें सांगीतल्याप्रमाणें करावयाचें मनांत नसल्यास लबाडीनें कल्पिलें जें मिमित्त तो.

तपशीलवार, वि॰ तपशील सांगीतला आहे ज्यामध्यें अशीयाद, इ॰ तो.

तपश्चर्या, स्त्री॰ तपाचें आचरण ती.

तपसील, पु॰ تفصیل हिं॰ तपशील.

तपस्या, स्त्री॰ तपश्चर्या.

तपस्वी, पु॰ तपश्चर्या करितो तो.

तपास, स्त्री॰ पु॰ تفحص हिं॰ तपासणी.

तपासणी, स्त्री॰ कांहीं एका गोष्टीचा खरेखोटेपणा पाहावयाकरितां प्रमाणांतरादिकानें ताडून पाहाण्याचा व्यापार ती.

तपासणें, कांहीं एक गोष्ट तपासणीनें युक्त करणें.

तपासनिशी, स्त्री॰ हिं॰ तपासनिसाचा अधिकार कि॰ कर्म ती.

तपासनीस, पु॰ हिं॰ प्रांतांत चोरी इ॰ अपराधांचा चौकशी करितां सर्कारांतून जो अधिकारी नेमिला असतो तो.

तपी, पु० ग्रं० तपस्वी.

तंदीठ, न० तांदुळाचे पिठाचें एक पक्वान्न करितात तें.

तपेली, स्त्री० निरवें दीड निटवें तांदूळ शिजावया जोगें ताम्रादिधातूचें एक पात्र करितात ती.

तपेलें, न० मोठीजी तपेली तें; २, कोणेकाचें तपेलें बुडणें. स्व० कोठीतोटा होणें भा० निषेधविवक्षित असतांचे प्र०

तपोनिधि, पु० बहुत तपश्चर्या जाणें केली आहे तो परंतु वैरागी, गोसावी यांस पत्र लिहावयाचें असतां त्यांस विशेषण देतात.

तप्त, वि० अग्नि, सूर्य, ज्वर, काम, क्रोध, इ० कांमुळें कोणीएक तापला तो.

तप्तमुद्रा, स्त्री० वैष्णव, मुद्रा तापवून तिचा डाग जो शरीरावर घेतात ती.

तप्पा, कों० पु० एक ग्राम मुख्य त्यांकरून असतो त्याचे नावारवाली तत्समीपस्थित दाहावीस गांवांची वहिवाट होत्ये ते सर्व गांव मिळून जो प्रदेश तो.

तफावत, स्त्री० تفاوت हिं० विवक्षित प्रमाणानें विवक्षितगुणविशिष्टाशीं तुल्यतानयावयास कारणभूत जे न्यूनाधिकभावरूप वैषम्य असतें ती; २, विवक्षित उभयपदार्थांचे मध्यें तें काल देशादिरूप अंतर असतें ती: कों० तजकरा.

तबक, न० रौप्यादिकाचें एक उथळ पात्र आहे, नामध्यें प्रायः देवपूजेचें कि० विड्याचें साहित्य देवीन असतात तें; २, ना० पर्वतादिकांचा परिघांत तदाकार दिसत्ये जी भूमि तीस स्व०; ३, सभामंडप, इ० सायबानाचा प्रदेश वर्जकरून मध्यभागाचा जो प्रदेश कि० त्यावरचलचें जें स्थल तें.

तबकडी, स्त्री० तबकासारिखें आणि त्याहून एक पात्र आहे ती; २, नीन वसन असतात तो पालखीचा अवयव ती.

तबर, वि० मद्यादिकानें जो उन्मत्त तो.

तबलक, स्त्री० हिं० कागदाचे समुदायाचे रक्षणार्थ कि० प्रकरणें निराळीं निराळीं राहावीं म्हणून सूत्रादिकांचा बंध जोडतांना लावितात ती.

तबलजी, पु० हिं० तबला वाजविण्याचें कसब करितो तो.

तबला, पु० हिं० पखवाजांत एक भेद आहे त्याची पडगी निराळी दोन असतात तो.

तंबाखू, पु० स्त्री० تمباکو हिं० एक औषधी भाहे.

तबियत, स्त्री० طبیعت हिं० मनुष्यादिकांची जी प्रकृति ती.

तंबी, स्त्री० हिं० पोरांचविणें याचा योगी प्र० अर्थ, कोणेकानें भिउन विवक्षितानुरूप वर्तावें म्हणून, दटावणें, शिव्या देणें, इ० कानें कोणाए काम साधन करणें: कों० त्याला तंबीमार दि

ला यास्थलीं अतिशयित मारदिला असा अर्थ.

तबीब, पु. طبیب हिं. शस्त्रवैद्य स्त्री.

तंबुरा, पु. تنبورہ हिं. एक तंतुवाद्य आहे.

तंबुरी, स्त्री. تنبوری हिं. लहान तंबुरा ती.

तंबू, पु. एकास्तंभाचें जें वस्त्राचें गृह तो; तंबूतानूनजिणे, स्त्री. संसारादिकांची काळजी सोडून निजणें

तंबूर, पु. हिं. एकचर्मवाद्य आहे.

तबेले, पु. को. एकवाद्य आहे; या गोष्टीचें तबेले वाजले आहेत स्त्री. ही गोष्ट अतिप्रसिद्ध झाली आहे; मा. दुष्कर्मविषयींचें प्र. २, दे. कुऱ्हाड.

तबेलदार, पु. हिं. कुऱ्हाडीनें लांकडे फोडून त्यावर उपजीविका करितो तो.

तबेला, पु. طویلہ हिं. घोडा, रथ, ठेवावयाचें जें गृह तो.

तब्बल, वि. हिं. विवक्षित परिमाणानें मोजलें असतां किंचित् अधिक भरेल परंतु न्यून होणार नाहीं असें जें मार्ग, ओसें, धान्य, इ. प्रमेयतो; उ. हा मार्ग तब्बल कोसभर आहे.

तम, पु. न. अंधकार; २, तमोगुण; ३, पु. क्रोधाद्यावेशानें कर्तव्याकर्तव्य विचार राहात नाहीं अशीजी अवस्था होत्ये तो; ४, द्रव्य, मद्य, इ. संबंधानें जो उन्माद येतो तो; ५, संस्कृत गुणवाचक शब्दापुढें अतिशयार्थी हा प्रत्यय होतो आणि विशिष्ट शब्द विशेषण होतो; उ. अतिशयेंकरून जो दुष्ट तो, दुष्टतम, पवित्रतम, इ.

तमंचा, पु. पिस्तूल.

तम

तमणें, गर्वानें बोलणें करणें.

तमतमणें, तमणे.

तमा, स्त्री. हें मोडें पूज्य इ. जी गणना ती, मा. निषेध असतां प्र.

तमाखू, पु. स्त्री. تمباکو हिं. तंबाखू.

तमाखोरी, स्त्री. हिं. तंबाखोरी.

तमाम, अ. تمام हिं. प्राधान्याप्राधान्यादि विचार न करितां झाडून सर्वांची किं. सर्वांवरून कामागें एक अशाप्रकारें एकसारिख्या वेगानें प्रवृत्ति होई असें; उ. लोक तमाम घरें बांधूं लागले; तो सर्वांचीं डोकीं तमाम मारीत सुटला.

तमाल, पु. एकवृक्ष आहे तो.

तमालपत्र, न. मसाल्यांत घालणें, इत्यादि उपयोगी एकसुगंधिपत्र आहे तें; २, तंबाखूस कोणी म्हणतात.

तमाशगीर, पु. تماشاگر हिं. तमाशा करून उपजीवन करितो तो शाहीर इ.; २, तमाशा, युद्ध, इ. कांचा चमत्कार पाहावयासाठीं आपल्या आपण जो जातो तो.

तमाशा, पु. अनेकप्रकारचीं सोंगें आणावीं वा हुलीं नाचवावीं, नाड्यावर चढावें, इ. अनेक प्रकारचे जे खेळ ते प्र.; २, अंतःकरणास चमत्कार वाटावयाजोगी जी गोष्ट तिला स्त्री.; ३, शास्त्र, लोक, यांचीं मर्यादा सोडून मनस्वीपणाची जी चेष्टा तीस स्त्री.

तमासगीर, पु. تماشگر हिं. तमासगीर.

तमासा, पु. हिं. तमाशा.

तमिस्रा, सं. अंधारीरात्र.

तमी, स्त्री० सं० रात्रि.

तमोगुण, पु० ईश्वरप्रकृतीचे तीन गुण आहेत त्यांतील जो तृतीय जेणेकरून मूढत्व, क्रोध, इ० येतअसतो तो.

तमोगुणी, २ लिं० तमोगुणआहे जामध्यें तो; २, ला० रागीट स्वभाव जाचा तो.

तयार, २ लिं० طیّار हिं० जा कार्याचा कर्तव्यांश उरला नाहीं म्हणून तत्साध्यकार्यीं उपयोगी पडावयास योग्य साले असें जें कार्य तो; २, कोणी एक कार्याचर विनियुक्त करण्याविषयीं जा उपचारादिकांची पदार्थांस अपेक्षा असत्ये तेसर्व उपचारादिक जाचे झालेआहेत तो मनुष्यादि पदार्थ; ३, जी गोष्ट करण्याविषयीं जाची अंतःकरणवृत्ति अनुकूल आहे तो त्याविषयीं.

तयारी, स्त्री० तयार होण्याचा व्यापार ती; २, तेणें करून साली जी सिद्धता ती; ३, राहुटी सरंजाम वेटें कावे देवुन उंचहार करितात ती.

तर, स्त्री० मार्गाचे शेवटीं होडी, इ० कांनी उतरून जावयाजोगी जी रवाडी असत्ये ती; २, उतार करून यांस रवाडी, इ० कांतून पलीकडे न्यावयाकरितां लाहानसें गलबत, सर्कार, इ० कानें ठेविलें असतें ती; ३, अ० जरयाअव्ययानें परामृष्ट जी उद्देश्य तेंकरून कारणसत्ता तीचें विधेयतेंकरून परामर्शक; उ० जरपाऊस पडला तर सुभिक्ष होईल; ४, काकर्थ द्योतनार्थ याचा प्रयोग होतो; उ० हो आतांमी जातों तर स्त्री० सर्वथा जानाहीं असा अर्थ; ५, तरी तृतीयार्थी; ६, उपक्रांत अर्थाशी कांहीं एका अर्थाची विरुद्धता वर्णनीय असतां तद्द्योतनार्थ उद्देश्यभूत जो विरुद्धअर्थ त्याचे ठायीं याचा प्रयोग होतो; उ० तुह्मीं तर लाख रुपये मागतां आणि मीतर केवळ गरीब पडलों; मध्यें तर आणून का, त्यानें का, इ० स्थलीं, दिलें तर देईन, आलों तर येईन, इ० संदेह घटित बोलण्याचा असाअर्थ.

तरकट, न० दुसर्‍यावर कांहीं दोषाचा आरोप करावा किं० भिरवावें, घाबरें करावें, इत्यादर्थ, कोणी एकानें कल्पिलेली जी खोटी गोष्ट तें.

तरकटी, तरकटया, २ लिं० तरकट करण्याचा स्वभाव जाचा तो.

तरकणें, कांहीं एका लक्षणावरून तर्क करणें; उ० त्याचे डोळे लालपाहातांच याणें दारू प्याली आहे असें मी तर्क केलों.

तरकश, स्त्री० ترکش हिं० तीर ठेवावयाचा भाता आहे ती.

तरकारी, स्त्री० हिं० भाजी.

तरकूट, न० ग० तांदूळ. पोहे, इ० कांचा शेवटीं भाताचे नरड्याचा जो चर-चरीत अंश असतो तो.

तरंग, पु० समुद्र, नदी, इ० कांचें उदक वायूनें उचललें जातें तो; २, ला० बुद्धीस जाणण्याच्या कल्पना उठतात किं० मद्यादिकांचे मदाचे जे नवे नवे वेग उठतात ते प्र०; ३, जलावर तेलादिक पडलें असतां पसरून एका प्रकारचें जें दिसतें तो; ४, रा० ग्रामदेवतेचा देवालयांत त्यात्या देवतेचा चिन्हानें चिन्हित रंगविलेले खांब उभे देविले असतात ते प्र०.

तरंगण, स्त्री० रा० बहुत जागा व्यापे असें हातपा

यपसरून अव्यवस्थितपणें बसण्याचा जो प्रकार तो ·

तरंगणें, उदकादिकांत न बुडतां किं॰ तद्वास न जातां काष्ठादिकानें वरती राहणें; २, ला॰ कोणे कानें भाषणादि व्यवहार जा आधारावेबलें आरंभिला असतो तो आधार फटल्यामुळें मधल्या मध्यें गचके खाऊं लागणें; ३, बुद्धीनें जाणावयाचा जो विषय त्यास बुद्धीचा सामर्थ्यापेक्षां अवघडपणा असल्यामुळें बुद्धीनें केवळ मोह विशेषावस्था पावणें; ४, आरंभिलें काम सोडीसना लागतां कुचंबत पडणें किं॰ जाणें काम आरंभिलें त्याणें तल्लिमिन संकटांत पडणें ·

तरच, अ॰ कार्यकारणाचा साक्षात्कार झाल्यानंतर परम्परेचा कार्यकारणभाव जो मनांत येतो त्याचें वाचक; उ॰ अरे तुंडीनाम पीडाकरणार असा दुष्ट आहेस ना, तरच, तुला ईश्वरानें असे भिकारी केविलें आहे ·

तरजुमा, पु॰ ﻣﺮﺟﻤﻪ हिं॰ एका भाषेचा अर्थाचे भाषांतर करून जें व्याख्यान; २, साधारण रीतीनें सरासरी लिहिलेला जो अर्थ त्यांतील सारांश सारांश घेऊन जमेस धरावयाजोगा जो दुसरा लेख करितात तो ·

तरजुमान, पु॰ हिं॰ राजादिकानें भाषांतराचे तरजुमे करावयाकरितां जो कोणी विद्वान ठेविलेला असतो तो ·

तरट, तरॅट, न॰ गोणपाट ·

तरटी, तरॅटी, स्त्रिं॰ तरटाचा जो गोणी, पिशवी, इ॰ पदार्थ तो ·

तरटें, न॰ रा॰ टक्कल ·

तरडा, तराडा, पु॰ ओलाविलेगड्ड्यांचा जो कोंडा तो; २. अतिशयित जून जें मिरची. तोंडलें. इ॰ फल. त्यास ल॰ कदाचित जून शब्द पूर्वकही याचा प्रयोग होतो ·

तरढक, न॰ लांब चलोबजी कोणी कोहींएक गोष्ट लावितो तें ·

तरण, न॰ करण, स्त्र॰ नवरा रडतो तरणास, आणि बन्हाडी रडतो नवरणास ·

तरणा, स्त्रिं॰ तरुणाचा अपभ्रंश; २, पुनर्वसु महानक्षत्राम जो नीलोकस्त्र॰

तरणा ताठा, स्त्रिं॰ तरुण असून शरीरानें बळवट तो ·

तरणूक, स्त्री॰ कोहींएक संकटावस्थेपासून तरून जें पारगमन तो ·

तरणें, उदकादिकांवर काष्ठादिकानें न बुडतां राहणें; २, ला॰ भपंचादि संकटापासून पार पडणें; ३, व्यवहारादिकांचे दार्या द्रव्यादिक न बुडतां राहणें ·

तरणोपाय, पु॰ भपंचादि संकटापासून तरून जाण्याचा जो उपाय तो ·

तरतरणें, कोहींएक कार्य करावयाविषयीं अतिशयित उत्सुक होणें; २, वडे, घारगे, फोड, इ॰ फुगून टवटवीत होणें; ३, जलसमृद्ध झाल्यामुळें जमीन, इ॰ भिजून, फुगून, येणें किं॰ वृक्षादि टवटवीत होणें ·

तरतरा, पु॰ पेलू पाडलेला असा जो हिरा तो ·

तरतरॉं, अ॰ वडा, इ॰ अतिचरेनें फुगण्याचें कि॰

तरतरीत, वि॰ केवल जो नीटपणानें उभा त्यानें वि॰ ·

तरता, वि॰ उदकादिकांवर तरूं लागला जो गलबत इ॰ तो; उ॰ गलबत खालीं लागलें आहे कीं तरतें आहे; २. जाविषयीं बुडण्याची संभावना नाहीं अशा व्यवहारास लावलेला जो पैसा इ॰ तो ·

तरतूद, स्त्री॰ तर्तूद ·

तरतेंकूळ, न॰ जास पैसा दिला असतां बुडण्याचा अशी संभावना नाहीं तें कूळ ·

तरफ, स्त्री॰ طرف हिं॰ पाषाण, काष्ठ, इ॰ जड पदार्थ ढकलून नेटाया करितां खालीं पाहार कि॰ सोटा, इ॰ त्या खालीं घालितात ती; २. कांहीं पदार्थ कि॰ भाषणादि व्यवहार; यांस, हा इकडचा, तो इकडचा, अशा व्यवहाराविषयीं प्रयोजक त्या त्या पदार्थावर मनुष्यादिकांचा जो संबंध विशेष असतो तो; प्रायः प्रथमांत प्रयोग नाहीं; ३, विवक्षित ग्रामास महालाचा संबंध लागायाचा असतां कसब्याचें नांव एतच्छब्दपूर्वक लिहितात; उ॰ मौजे ओण, तरफ राजापुर ·

तरफड, स्त्री॰ चरफड

तरफडणें, चरफडणें ·

तरफडाट, पु॰ चरफडाट ·

तरबूज, न॰ خربوزہ हिं॰ दरबूज ·

तरबेज, तरबेन, तरबेद, वि॰ कांहीं एक व्यवहाराचे अभ्यासामें व्यावहारामध्यें जो निपुण झाला तो ·

तरल, वि॰ चंचल ·

तरवड, पु॰ एक झाड आहे ·

तर

तरवणी, कों॰ न॰ तरण ·

तरवा, पु॰ कों॰ रोपकरावयासाठीं भाजिनातली जमीन तो कि॰ त्यांत केलें जें साठीचें रोप तो ·

तरवार, स्त्री॰ युद्धाचे उपयोगीं एक शस्त्र आहे ती, तरवार मारणें, करणें, गाजविणें, ल॰ शूरपणाची प्रशंसा व्हावयाजोगा युद्धांत पराक्रम करणें; ला॰ वादिपराजयादिपराक्रम करणें, तरवारीच्या धारेवर चालणें ल॰ बांधून दिलेल्या गतींत स्वच्छंदपणामुळें यत्किंचित् अंतर पडल्यास मोठीच शिक्षा व्हावी अशा धाकांत वागणें, वर्तणें, इ॰ कांचें वि॰ ·

तरवारबहादर, तरवारबहादूर, पु॰ हिं॰ रणामध्यें जाणें तरवार केली आहे असा शूर जो तो ·

तरस, तरँस, पु॰ न॰ एक व्याघ्रासारिखा पशु आहे ·

तरसणें, रा॰ अग्नि, सूर्य, ज्वर, यांचा योगानें भूमि, शरीर, इ॰ अति संतप्त होणें ·

तरळ, स्त्री॰ अजीर्णविकृतीनें अतिशयित, द्रव, ओक व्हावी, अशी जी विकृति होत्ये ती; २, अ॰ शाईउडणें, इ॰ कारणामुळें, मृदंगानें, विस्वर होईअसें वाजण्याचें वि॰ ·

तराजू, स्त्री॰ ترازو हिं॰ तागडी ·

तराठणें, कों॰ दुग्ध आंत बहुत झाल्यामुळें स्तनामें तानणें ·

तराठा, पु॰ कों॰ दपटशाहा ·

तरांडा, पु॰ कों॰ सरळ असून फार लांब जें वृक्षाचें सपल्लव कांड तो ·

तरांडे, न॰ गलबत ·

तराणा, पु॰ गायनांत एक बीज आहे ·

तरा

तरारणें, तरतरणें; २, स० कोणेकानें संपत्तियोगानें वरचेवर वाढणें क्रि० संपत्तीनें पुर्जित दशाप्राप्त होणें.

तरारां, अ० तरतरां.

तराळ, पु० गावांत पेंडयेइतके तो पोहोंचवावा इ० कामकरण्याविषयीं अनिश्चित क्रि० कोणी, गांवचाचाकर असतो तो.

तराळकी, स्त्री० तराळाचा अधिकार तो.

तरळमेंदी, स्त्री० तरळ.

तरी, तरी, अ० तथापि; २, ग्रंथीं, नर, या अव्ययाचे अर्थीं याचा प्रयोग होतो; उ० जरिंद्राचा तूजदेव, तरिंद्रासकलभउपाव; ३, मुख्यत्वेंकरून जीगोष्ट व्हावी तिची सर्वथा अप्राप्तिलक्षणून तिची उपेक्षा करून गौणअर्थावर मान्यताविषयत्व विवक्षित असतां तद्योतनार्थ प्रयोग होतो; उ० शंभरनाहीं तरनाहीं पण पांचतरी द्या; ४, न० ग० तरकूट.

तरीच, अ० तरच.

तरु, पु० सं० वृक्ष.

तरुण, वि० स्त्री० णी, बाल्यावस्थाजाउन मध्यम वयोवस्था जासप्राप्त झालेला तो प्राणी.

तरोटा, पु० टांकळा

तर्क, पु० लक्षणदर्शनावरून कांहीएका अर्थाचेंजें ज्ञान होतें तो; उ० पंडापर्जन्यचांगला लागला त्या अवरून स्वस्थता होईल असा तर्क दिसतो; २, तें ज्ञान होण्यास जें बुद्धीचें सौष्ठव तो; उ० याशास्त्रांत मासा तर्क चालत नाहीं; ३, अनेकगोष्टी विषयीं अनेकप्रकारचे जे अंतःकरणाचे आकार होतात त्या मध्यें निश्चयरूपता असत नाहीं तें मन; उ० विचार करूं लागलें म्हणजे अनेकप्रकारचे तर्क उत्पन्न होतात; ४, प्रत्यक्ष अनुमानादिप्रमाणांनीं पदार्थनिर्णय समजाया ची विद्या आहे तो; ५, बुद्धीचे तर्कानेंकाहीं गोष्टींतील हेय जो अंश तो; उ० हे याममयीं येथें कांआले यांतलातर्क समजतनाहीं.

तर्कबाज, वि० हिं० अनेकप्रकारचे तर्क जाचे बुद्धीत आहेत तो.

तर्कविद्या, स्त्री० कोणएकगोष्टीविषयीं तर्क करण्याची जी विद्या ती; २, न्यायशास्त्रास्तव.

तर्कशास्त्र, न० तर्कविषयावर बांधलेलें जें शास्त्र तें; २, षड्दर्शनयायांपैकीं, नव्हे, कोणएकाचे बुद्धीचे साधी स्वभावसिद्ध असतें असें जें चातुर्य त्यास्तव; उ० रत्नपरीक्षा केवल शास्त्रावरूनच होतनाहीं यास तर्कशास्त्र पाहिजे; ३, न्यायशास्त्रास्तव.

तर्जनी, स्त्री० हाताचे आंगठ्याजवळचें जें बोट तें.

तर्तूद, स्त्री० हिं० कांहींएका कार्याचे सामग्रीची सिद्धता करण्याचा व्यापार ती.

तर्पण, न० सं० क्षुधितादिकांस अन्नदानादिकेंकरून तृप्त करण्याचा जो व्यापार तें; २, स्नानादिसमयीं देवतोद्देशानें उदक देण्याचें एककर्म आहे तें.

तर्पिणें, क्षुधितादिकांस अन्नादिदानानें तृप्त करणें.

तर्या, पु० तरीनें उतारु मनुष्यादिकांस पारनेतो तो.

तऱ्हा, स्त्री० ढ हिं० पदार्थकिं० व्यापार या वाचायीं इतरभेदकजो प्रकार असतो ती; कोणएकानें तऱ्हातऱ्हाकरणें स० नानाप्रकारचा मनस्वीपणा चा चेष्टा करणें, तऱ्हेसभरणें स० एकादे गोष्टीचें किं० पदार्थाचे नादास लागणें

तऱ्हाटणें, तऱ्हाडणें, तराटणें.

तह्नाण, न० कों० पडूंनये अशास्थलीं सडवपदार्थ पडून जीचिरवल होत्ये तें ·

तह्नावणें, कों० तरंगणें नयमार्थी ·

तह्नीं, अ० तरीं. चतुर्थार्थी वांचून सर्वार्थी ·

तह्नेचा, ३लिं० लोकविलक्षणरीतीचा कि० अपूर्वरीतीचा जो मनुष्यादिपदार्थ तो

तह्नेदार, ३लिं० हिं० अपूर्वतह्नेचा मनुष्यादिपदार्थ तो ·

तह्नेवाईक, ३लिं० तह्नेदार ·

तल, सं० न० पात्रादिकांचीं अधिकरणें त्यांचा आधेय यानें मुख्यत्वेंकरून आश्रयून राहावयास आधारभूतजो अधःप्रदेश असतो तें; २, आधेयाचा आधारावर टेकायाचाजो अधःप्रदेश तें; ३, वृक्ष, गृह, इ० कांचें खालचें स्थ० त्याचा आश्रयानें पुक्त जेंस्थल तें, पादतल, हस्ततल, भूतल, इ० मास आणावें ·

तलरव, ३लिं० हिं० जाचे आंगीं कांहींएक काम करण्याविषयीं आवेश, जलदी, इ० आहे अशास्वभावांचा जो मनुष्य, अश्व, इ० तो; २, अतितीक्ष्णजो तमारखू, मिरची, अग्नि, बुद्धि, मरची, इ० तो ·

तलरवली, स्त्री० ज्वरादिकानें अंगाची पावरें व्हावयाजोगी जी आग होत्ये ती; २, तलरवीहितीयार्थी ·

तलरवाई, स्त्री० तमारखू, अग्नि, इ० कांचा तलरवपणा तो ·

तलरवी, स्त्री० तलरवली; २, कों० कोणएकाचे आंगीं त्वरित काम करण्याचा जो स्वभाव मिरव आवेश असतो तो ·

तलपणें, कांहीपदार्थ हस्तगत व्हावा म्हणून संधान साधा साधावयासाठीं त्यापदार्थाचे भोवताले भोवताले फिरणें ·

तलफ, स्त्री० हिं० गंजिफांचे रंगांत आपले हातचें बादीर, इ० पान हुकूम व्हावें म्हणून हुसर्‍याचे हातांतील राजा, इ० हुकूमपान खालीं पाडावयाकरितां जें पान खालीं टाकितात तो; २, तलबयमार्थी ·

तलब, स्त्री० हिं० जा तपकीर, तंबाखू, इ० पदार्थांची संवे लागली असत्ये त्यांचा सेवनाविषयीं तत्काळीं होत्येजी अत्युत्कट इच्छा तो; २, तमाखू, तपकीर, यांचेंजें व्यसन तो; ३, शिपाई, इ० कांचा जो रोजमुरा तो; ४, सर्कार, साहुकार, यांचापैका जा मामलेदार इ० काकडे यावयाचा असतो त्याजवरजी तद्विषयक चिठी करितात ती ·

तलफी, तलबी, ३लिं० तपकीर, तंबाखू, इ० कांची तलफ जास होत्ये तो ·

तलम, ३लिं० हिं० बारीक, मृदु, जेंसूत्र कि० तेणेंकरून विणलेलें जें वस्त्र ना कि० नाजूक जी शरीरप्रकृति तो ·

तलमसुती, ३लिं० तलम जो धोतर जोडा, इ० तो ·

तलवार, स्त्री० हिं० तरवार ·

तलातल, न० सप्तपातालांतील चवथें जें पाताल तें ·

तलाव, पु० हिं० तळें ·

तलावा, पु० आसपासचे वर्तमान समजावें कि० पाय मोकळे व्हावे इत्यादर्थी, विशेषकार्याचा उद्देशनथरितां आसमंतात फिरण्याचा जो व्यापार तो ·

तलाश, पु० تلاش हिं० कांहींपदार्थ मिळवावा कि० काहीएकपदार्थाचा शोध लागावा म्हणून जो प्रयत्न

प्रयत्न तो, वनशाप यन्त्रानें लागला जो शोध तो ·

तल्प, न० सं० मंचकादिरूपजी शय्या किं० स्त्री० तें ·

तल्लीन, वि० कांहीं विषयादिरसाचे ठायीं जाचीं अंतःकरणवृत्ति निमग्न झाली तो ·

तव, अ० सं० हें संस्कृत विभक्त्यंत आहे, तुझा याअर्थी; उ० तव चरणीं ठेउनि माथा ·

तँव, अ० जंव याचे अनुयोगीं; उ० मी जंव येईं तंव तूं बैस; क्वचित् जंव याचा अध्याहार असतांही याचा प्रयोग होतो; उ० तंव ते थेंपातला नारद; २, नर याचें साहाव्याअर्थीं; उ० तूं तंव गजा उदार; ३, स्त्री० पिंजादिकानें येतेजी घेरी तो ·

तवकल, स्त्री० न० कांहीं एका कार्याचे ठायीं प्रवृत्त्या चीं त्या कार्याविषयीं बहुत करून होईल कदाचित न होईल तर न होवो अशीजी द्विविधबुद्धि तें; २, जो व्यापार साधला असतां मोठाचला भ्रंशावा आणि फसला असतां समूळनाश व्हावा अशा व्यापारीं द्यानें प्रवृत्त होण्याचा जो प्रकार तो ·

तवकीर, न० एक औषधीपदार्थ आहे ·

तवंग, पु० तरंगवृत्तीयाअर्थी; २, नेत्रांत जो भुरीचा पापदरा येतो तो ·

तवनवणें, नावणें ·

तँवर, अ० तोवरी ·

तवरी, वि० अल्पनिमित्तावरून सर्वस्वत्याग करावयाजोगा अतिशयित क्रोध येण्याचा स्वभाव जाचा तो ·

तवली, स्त्री० धातूचें कि० मृत्तिकेचें एक आकारविशेषाचें पात्र आहे ·

तवशी, स्त्री० तवशाचा वेल तो ·

तवसळ, स्त्री० भातांत एक जाति आहे ·

तवसें, न० एक फल आहे; २, त्याचा कीस ताकुळा नेपिठांत घालून एकपक्वान्न करितात तें ·

तवसोळी, स्त्री० वा० तवसें हितीयार्थी ·

तवा, पु० भाकरी, पोळी, इ० भाजावयाचें लोहादिकाचें पात्र आहे; २, कोंड, पदर, वर्ज करून शेला, शालजोडी, इ० कांचा मधला जो अवयव तो; ३, एक सारिखा सपाट जो कानळ कि० जांवर वृक्षखोंचखळगे, इ० नांहींत अशीजी सपाट भूमि त्यांस स्त्री०

तवांका, पु० ताकत ·

तवानणें, क्रि० तवाना होणें ·

तवाना, वि० [illegible] हिं० अशक्तपणा आदुन पुष्टि माला जो मनुष्य, पशु, इ० तो, हे अधिकारविशेषण असें किंवा एकरू० ·

तवी, स्त्री० तवली ·

तशांत, अ० तसें असतां ·

तशेला, वि० तसला ·

तष्ट, वि० कांहीं एक भाजकानें जिनके भाग जातील तिनके घालवून अवशिष्ट जें शेष तन्मात्र उरविलें जो अंक

तसनस, तसनाश, तसनास, स्त्री० पु० कांहीं एका पदार्थाचा हावणें, मोडणें, इ० कानें जो नाश तो ती ·

तसर, न० क्षेत्रादिसंबंधी जें सकारिदेणें तें फेडणें नसल्यानें असा मूळचा उगव असतां प्रजांस यासकरीत पडतें म्हणून त्या धार्यांचे धान्यादिकाचा हलका उरविला असतो जो दर तें ·

तसराँव, न० एक हलकें किमतीचें रेशमी वस्त्र नेसावयाचें उपयोगी आहे.

तसरी, स्त्री० कों० वाग्या, मिरचा, इ० कांस पाणी लावावयाकरितां दोहोंपंक्तीचामध्यें एकएक सांबट रवंथी रवणलेली असतें ती.

तसरीफ, तसरीब, स्त्री० تشریف हिं० गाणें, तमाशा, इ० कानें संतुष्ट होउन राजादिक त्यागवयी, इ० लोकांस जें वस्त्र देतात तें.

तसरीफल्याख, ३लिं० تشریف لایق हिं० अहेरगुजें वस्त्र तो.

तसलमात, स्त्री० تسلیت हिं० प्रा० दिलासा याअर्थी.

तसला, ३लिं० त्याप्रकारचा, परंतु हें क्रियाविशेषण होतनाहीं.

तसा, ३लिं० त्याप्रकारचा; २, त्याप्रकारेंकरून; ३, कांहीं एक क्रियेचा अव्यवहित उत्तरकालीं परंतु त्याक्रिया भूतकालिक असून परस्परांचा कार्यकारणभाव नसावा; उ० व्याघ्र आला तसा मी भ्यालों; ४, कांहीं एक क्रियेनानंतर दुसरा कांहींएक व्यापार न करितां कांहींएक व्यापार करण्याचें विशेषण; उ० जेवलों तसा निघालों; उ० हा उठतो तसा भोंडू लागतो; ५, तोमार्ग तीदिशाधरून जाणें, येणें, इ० कांचें वि०; उ० आम्ही असेजातों, तुम्ही तसेजा; ६, वाक्यालंकारार्थक; उ० जो तसा मारील.

तसूँ, न० गजाचा जो विसावा अंश तें

तसू, पु० तसूं.

तस्कर, न० चोर.

तस्करणी, स्त्री० तस्करविद्या.

तस्करनीस, पु० तस्करनीस.

तस्करविद्या, स्त्री० चोरीकरण्याचें कसब तें.

तस्करा, पु० तस्कर.

तस्करी, स्त्री० तस्कराचें कर्म.

तस्त, न० طشت हिं० गायधुणें, तोंडधुणें, यांचें पाणी सांडावयाचें पात्र आहे.

तस्दी, स्त्री० تصدیع हिं० कांहींएक कार्य कोणाजवळून करून घ्यावयाचें असतां त्यास निकड लागावी म्हणून तगादा करितात तें; २, कांहीं उद्योग करावा लागल्यामुळें शरीरास होतो जो परिश्रम तो, दे, पोंच, इ० धा० प्र०

तस्वी, स्त्री० تسویہ हिं० एकादेयींत अनेक मोंती ओवून करितात जो माल तो.

तस्वीर, स्त्री० कोणाएकाचें स्वरूपाप्रमाणें काढिलेलें चित्र तें त्याची.

तह, पु० उभयशब्दांचा परस्पर विरोध मिटून तुम्ही याप्रकारें वर्ताव आम्ही याप्रकारें वर्तावें असा होतो जो नियम तें संकेत तो; २, अनुमानविशेष्यार्थी; ३, गादी इ० जीर्ण झाली असतां किं० फाटली असतां तिजवर दुसरें वस्त्र लाविलें तें तो.

तहकीक, ३लिं० تحقیق हिं० जाचा प्रामाण्याविषयीं संदेह नाहीं असें कांहींएक गोष्टीचें वर्तमान तो.

तहकूप, अ० तकूब.

तहगिरी, स्त्री० हिं० मामलत, इ० अधिकारावरून कोणाएकाची जी च्युति तें.

तहगीर, ३लिं० हिं० तहगिरी आणी आणी तो.

तहद, अ० हिं० विवक्षितदेशरूप जी सीमा तीपर्यंत; उ० पथून तहद पुणें, याठिकाणचा पाऊस

तहनामा, पु॰हिं॰ उभयतां शत्रूंचा तहाचा ठराव चा लेख करून परस्पर घेतात तो.

तहनाल, न॰ تہ نعل हिं॰ तरवार, इ॰कांचे मेणाचे अश्वास रोप्यादिकांचें टोपण बसविलें असतें तें.

तहवील, तहवेल, पु॰ تحویل हिं॰ खासगी, पिलखाना, उष्ट्रखाना, इ॰कांचे खर्चाचें हें सदर आहे.

तहशील, तहसील, स्त्री॰न॰ تحصیل हिं॰ सर्कारचें, प्रजांकडे, यावयाचें जें द्रव्य त्याचा वसूल करण्याचा जो व्यापार तो; २, तो वसूल कोणापासून कसाकसा घ्यावयाचा एतद्विषयीं कुळकरणी, इ॰कांपाशीं लेख असतो तें; ३, प्रजांपासून वसूल होऊन जमा झालें जें द्रव्य तें.

तहशीलदार, तहसीलदार, पु॰ تحصیلدار हिं॰ तहशिलीचे कामावर पाठविला जो शिपाई इ॰ तो.

तळ, पु॰ तल; १, सैन्यादिक जास्त्यीं उतरलें आहे तें स्थल; २, कोणेक स्थलाचे ठायीं कांहीं काल सैन्यादिकांची जी स्थिति तो; उ॰ आजपर्यंत लश्कर चा तळ एथें होता आतां तळ कोठें पडेल तो नकळे; ४, पदार्थाचे स्थितीचें स्थल परंतु त्या स्थलापासून पदार्थ निघावयाचा विषयाची विवक्षा असतां प्रायः प्रयोग; उ॰ आंबे सगळेच नेऊंनका कांहीं तळावर देया; ५, सभोवताली पर्वतादिकांची सीमा करून मध्यें मनुष्यादिकांची वसति, शेत, इ॰कांचे उपयोगी जें स्थल असतें तो; उ॰ या तळाची प्रदक्षिणा चार कोसाची आहे, कोणेकानें तळावर बसणें, राहाणें, इ॰ स्थलीं पदरचीं संपत्त्यादिक अनेक प्रकारें नाहींशीं झाल्यामुळें फि॰ व्हावयाचा लाभतो इतरा तरानें नेल्यामुळें हीनदशा पावणें, तळ घालून बसणें स्व॰ कोणेकेस्थलीं चिरकाल राहाण्याचा आविर्भाव करून बसणें, वपरकीय ठेवीचें द्रव्य धन्यास न देतां स्वस्थपणें बसणें, तळमारणें, स्व॰ पलायनेंनें दुसर्‍याचें द्रव्य घालून बसणें.

तळकट, न॰ को॰ आंथरीचा तुकडा तें; २, सावळीचा उभारिलेला अर्धा भाग तें.

तळकटी, स्त्री॰ को॰ तळकट.

तळकर, न॰रा॰ तळकट प्रथमार्थी.

तळका, पु॰ आंथरीचा तुकडा तो.

तळकोंकण, न॰ सह्याद्रीचे पश्चिमेकडील समुद्राधिक जो देश तें

तळखंड, न॰ फणसाचे चारखंडांस आंतून चारी सारिखा अंश असतो वरकांटे असतात त्यांचा मध्यें जो भाग असतो तें; २, को॰ आंत्याचे तळीचा जो तुकडा तें.

तळखडा, पु॰ उथळ्याचा दगड तो.

तळखंबा, पु॰रा॰ शूद्रजातीय पुरुष मरून पिशाच होतो जाची पूजा त्याचे घरीं करावी लागत्ये तो.

तळघर, न॰ खालचा मजल्याचे खालीं भूमींत मनुष्यादिरा हावया जोगें जें स्थल करितात तें; २, वा॰ माडीचे घराचा जो खालचा मजला तें.

तळघाट, पु॰ घाटबुडी तो.

तळचेपणी, स्त्री॰ जा पात्राचा तळ काहींएका पदार्थाचे भारानें चेपून सारखा बसवायाचा असतो त्या कामगा, इ॰ पात्रांत धान्यादिक सर्वतळ व्यापे इतकें घालून चेपण्याचा जो व्यापार तो; २, जें पात्रादि जा पदार्थानें भरावयाचें त्या पात्राचा तळमात्र व्यापे इतकें

जें

जें न्यापदार्थानें पूरण तीं; उ० घागर भरण्यानें याका हिलीचीं तळचेपणी मात्र होईल.

तळझाडा, पु० जाठिकाणीं जो पदार्थ असतो तेथून काढून त्यास्थलीं जीत्याचीनिःशेषता तो.

तळण, न० तळण्याचा व्यापार किं० तळावयासाठीं घे तलाजो पदार्थ तें; २, पदार्थ तळावयासाठीं तेलादिकानें भरून अग्नीवर ठेविलें जे पात्र तें.

तळणाटोप, पु० कों० तळावयाचें उपयोगी एकपात्र आहे तो.

तळणी, स्त्री० कों० तळण्याचें एकपात्र आहे.

तळणें, तेल, तूप, यांत अग्निसंयोगानें पदार्थ पक्व करणें; उन्हानें तळणें, स० अग्निसंतप्त होणें.

तळतळ, स्त्री० क्रोधादिकानें अंतःकरणास जो संताप होतो तीं; २, पु० स्त्री० कोणेकास अतिभास झावया जोगा नानाप्रकारें कोणेकानें दिलाजो उपद्रव तो; व तज्जनित झालाजो संताप तो.

तळतळणें, कोणेकानें आपला अपकार केला असतां संतप्त होऊन हातपाय आपटणें, त्यास शापदेणें, इ० करणें; २, बालकादिकानें कांहीं अकस्मात् दुःख झाल्यामुळें मोठ्यानें ओरडणें; ३, धनि, पति, इ० कांचा जाचानें किं० रोगादिकामुळें जीविताचा कंटाळा यावया जोग्या व्यथेतें पावणें.

तळतळाट, पु० कोणाएकास दुःख झाल्यामुळें त्या णें दिलाजो शाप तो; २, कोणेकानें दुःखदिल्यामुळें अंतःकरणांत होतोजो संताप तो.

तळप, न० तळण; २, पु० स्त्रियांचें कर्णभूषण आहे.

तळपट, न० तुच्छरूप, शापदेणें असतां वाप०; उ० लग्न तिथि आदित्यादि सत्यानाम्ने त्यानें समूळ तळपट हो; २, देश, ग्राम, इ० कांची केवळ भयाभंगास जावयाजोगी आळणें, लुटणें, इ० कारणामुळें झालीजी दुर्दशा तें; उ० पेंढारानें या देशाचें तळपट केलें; ३, ना० भक्ष्यपदार्थांचा रवा पुनर्जीनिःशेषता तो.

तळपणें, तलपणें, अ० भूषणादिक झळकणें.

तळपाय, पु० पायांचा जो तळवा तो.

तळपी, २ लिं० रा० स्त्री० ईण, घडे, पुर्या, इ० तळावया करितां बसलाजो तो.

तळमळ, स्त्री० उष्ण, ज्वर, इ० कांचा संतापामुळें केवळ चैन पडूं नये अशीजी अवस्था होत्येती किं० तीमुळें जीतडफड ती.

तळमळणें, तळमळीनें युक्त होणें.

तळवट, न० समानजो भूमिप्रदेश तें

तळवटीं, अ० अ० कांहींपदार्थांचे अधःप्रदेशीं; उ० कुंकुमा तळवटीं टिकलागे.

तळवा, पु० हात आणि पाय यांचाजो तळ तो, स० तळव्यास लोणी आणि नेत्रास थंडी.

तळवाट, स्त्री० वा० भुयारांतून क्वचित्स्थलीं जावयाची जी वाट असत्ये ती.

तळवें, न० कों० भाताचे भारे, रचून ठेवायासाठीं जेरचलीं पेंढयाचें आस्तरण करितात तें

तळवेणें, रा० अनवाणी बहुत चालल्यामुळें पायांची आग सर्वांगांत व्यापे अशा विकृतीतें पावणें.

तळशोधणी, स्त्री० सैन्यादिकांचा तळ उठल्यानंतर त्या तळावर कांहींपडलें झडलें असेलतें पुरतेपणीं पाहावयाचा जो व्यापार ती.

तळसांडु, अ० जमीनसांड.

तळसाण, स्त्री० रा० तळणाचा जो वास सुटतो ती.

तळहात, पु० हाताचा जो तळवा तो, कोणाएकास तळहाताचे फोडासारिखें बाळगणें रू० मोठ्या मिनेतें बाळगणें, त्याचे तळहातास केस आले नाहींत, इ० स्थली तो उद्योग करून पोटापुरतें मिळविण्यास असमर्थ नाहीं.

तळाठदार, पु० तळाठीचा जो अधिकारी तो.

तळाठी, पु० कितीएक ग्रामाचा जो समुदाय त्याचे वसूलबाकीचा अधिकारी तो.

तळाव, पु० तलाव.

तळी, स्त्री० जांतें, घरट, यांचेजे दोन दोन अवयव असतात ते प्रत्येकीं; २, खंडोबाचे भक्त एका पात्रांत पान, सुपारी, भंडार, खोबरें, इ० भरून त्यांचें नाम घेऊन उचलितात ती, भर, धा० प्र०; ३, कों० विहिरीचा इमारत उतरती म्हणून तळींजी लांकडाची चौकट बसविितात ती; ४, नवेनवरीचे माहेरीं शारदीनवरात्रांत साडी, चोळी, भंडार, इ० नवर्याकडील पाठविितात ती; ५, कों० देवाचे नावानें नैमित्तिक कांहीं द्रव्य मागावयासाठीं गुरव, इ० एकापात्रांत आंगारा पुष्पें घालून जें पात्र भाणितो ती; ६, भांग भाजून धुवून शर्करादि युक्त निचीं भुकणी करितात ती; ७, रा० लाहान जेंतळें तीं, कोणकाची तळी उचलणें रू० अनेक युक्तीनी त्यास अधिकारच्युत करणें.

तळींव, वि० तळून केलाजो पदार्थ तो.

तळें, न० चतुष्कोनाद्याकार असून प्रा० चहूंकडून उतरायास वाट असती असाजो जलाशय तें; २, रू० तळें राखील तो पाणी चाखील.

तक्षक, पु० सर्पांत एक जाति आहे तो.

तक्षण, न० सं० तासण्याचा जो व्यापार तें.

तक्षा, पु० सं० सुतार.

तक्षीम, स्त्री० تقسيم हिं० इव्य, वतन, इ० कांचे भनेकजे विभाग ते प्र०.

तक्षीमदार, वि० تقسيم دار हिं० तक्षिमेचा जो विभागी तो.

ता, स्त्री० त्व; उ० घटता, विद्यमानता, इ०.

ताइतावें, न० अनेक ताईत एकादोर्यांत ओंवून केलेंजें भूषण तें.

ताइती, स्त्री० लाहान जो ताईत ती.

ताई, स्त्री० स्त्रियांचें प्रतिष्ठितपणाचें एक नाव आहे.

ताईत, पु० सुवर्णरौप्यादिकाचें कि० कांचेचें अर्धचंद्राकार कि० मृदंगाद्याकार भूषण आहे, जें दोर्यांत ओंवून धारण करितातते कि० जांत अंगारा इ० घालीत असतात तो; तो त्याचे जिवाचा कि० गळ्यांतला ताईत आहे रू० तो त्यास अतिशय प्रीतीचा आहे असा अर्थ.

ताउज, स्त्री० ग० ताईत जो मृदंगाकार असतो ती.

ताक, न० दह्यांत कांहीं पाणी घालून घुसळून लोणी काढिलें असतां जें शेष उरतें तें; ताकासजा पुन भांडेंलपविणें रू० आशापूर्वक याचना यथीं प्रवृत्त होऊन त्या प्रसंगीं त्या आशेचा निरूपकरून उदासीनता दाखविणें, ताकापुरतें रामायण, रू० स्वकार्यलाघवापुरता च जो आर्जवादिव्यापार त्यास रू०, ताकासतूरलागूंन देणें रू० कोणी कांहीं संकेतानुसार विचारिलें असतां त्यांतील

कांहीं ठाउक नाहीं, इ० दृष्टोत्पत्तीस यावयाजोगें भाषणादि करणें. स्व० जी-चा घरीं ताक तीचेंवरतें गेलें नाक, ताकाचेंपाणीं, स्व० ताकवणी किं० ताका सन्निप्रसंगी स्व० ·

ताकट, स्त्री० न० लोणी, किं० तूप, यांत जो ताकाचा अंश मिश्रित असतो तें, २ लिं० नपुंसकजें तूप किं० लोणी तें नी ·

ताकडा तुकडा, पु० दोरी, वस्त्र, कागद, इ० कांचाजो लाहान मोठा तुकडा तो ·

ताकत, स्त्री० طاقت हिं० विवक्षित कार्यनिर्वाहास पर्याप्तजें शरीर, धन, बुद्धि, एतत्संबंधी सामर्थ्य तो ·

ताकतई, ताकतय, ताकतेच, स्त्री० ताकांत मीठ हिंग, इ० घालून फोडणी देउन जेकालवण करितात तो ·

ताकपाणी, न० ताक, दहीं, इ० तें ·

ताकपिठया, पु० स्वविद्येमध्यें अपरिपूर्ण जो हरिदास, पुराणीक, इ० ता ·

ताकमेढ, स्त्री० घुसळखांब तो

ताकवणी, न० केवळपातळजें ताक त्याम्स्व०

ताका, पु० फाडल्याबाचून सबंधजें बनात किं० महमुदी, आगाबानी, इ० वस्त्र, तो; २, शेताबर रोगपडत असतो जेणेंकडून धान्य काळेंपडतें तो ·

ताकीत, ताकीद, स्त्री० تاکید हिं० यामाणें करावें नकेल्यास शासन होईल इ० रूप, राजा, सावकार, यांचे भृत्य, प्रजाकुळें, इ० कांस सांगतात तो ·

ताकीतदार, ताकीददार, पु० تاکیددار हिं० कोणाएकास ताकीद करण्याकरितां राजा, इ० कानीं योजिला जिलाजो शिपाई, इ० तो ·

ताकोला, २ लिं० ग० पुरतातोचनके इषदंशानें न्यूनआहे असेंअसताही तदूषत्वेंकरून जो विवक्षित तो; उ० हा आतांलेंकरूंनके ताकोला बाप्याशाला, मीं ताकोला बरा शालों स्त्रणजे येईन ·

ताकडा, तारवडा, तांकडा, तांरवडा, २ लिं० याकादिक कर्माविषयीं जाचेअंगीं त्वरा आहे तो ·

ताग, पु० आंबाडीसारिखें एक झाडआहे त्याचा बारवाची रुनळी, गोणपाट, इ० करितात तो; २, त्याचा बारव तो ·

ताँगडणें, मनुष्य, पशु, यांस घट्ट बांधून टाकणें; २, ला० कोणाएकास कांहींकामाबर गुंतवून परतंत्र करून देवणें; ३, फाटलेलेंबस्त्र, टोपली, इ० किं० मोडलेला काष्ठादिकांचा पदार्थ सांधासांधकरून नीट करणें; ४, रा० ला० कोणी आरंभलेलें काम त्याचेहातें सिद्धीसनजाईमें झालें असतां दुसर्यानें यथाकथंचित् साधून घेणें ·

तागडी, स्त्री० एकादांडीस दोनदोहींकडे परडीं बांधून वजनकरण्यास साधन करितात ती ·

तागलवाट, स्त्री० वा० जापदार्थांचा आपणास कंटाळा आला त्यापदार्थांचें विक्रयादिकेकरून जे दूरीकरणें ती ·

तागा, पु० ताका प्रथमार्थी ·

तांगा, पु० दे० गाडयाचारवटारा तो ·

तागाईत, अ० हि० विवक्षितकालपर्यंत ·

तागादणें, कों० कांहींएका व्यापागंत बहुत दुःखें प्राप्त झाल्यामुळें आसपावणें ·

तागादा, पु० तगादा ·

ताज, स्त्री० हिं० विवा, इ० कांचीं लांब काठी जी उथळ पा
ण्यांतून गलबत चालवाया करितां टेंकितात कि० जि
णेंकरून उच्चस्थानीं चीं फुलें, फळें, इ० पाडितात ती;
उ० गंजीफांतील एक रंग आहे ·

ताजक, न० تاجيک हिं० वर्षफल, मासफल, ग्रह
ज्ञापक ज्योतिषशास्त्राचा एक अंश आहे तें ·

ताजकरी, पु० गलबत ताजटेकून चालविणें तो ·

ताजवा, पु० रूपवर्णादि तोलावयाचें उपयोगी जोकं
टा तो ·

ताजा, वि० ३ تازه हिं० जाचीं उत्पत्ति कि० विव
क्षिताधिकरणीं स्थिति मूलाधिकरणापासून वि
योग होउन विशेष काल गेला नाहीं असा जो पदार्थ
तो; २, अशक्तता, म्लानता, जामध्ये नाहीं तो मनुष्य,
पशु, वृक्ष, इ० तो; ३, ताबूद ·

ताजाकलम, न० تازه قلم हिं० कोणे काम लिहिले
लेंपत्र पूर्ण केल्यानंतर काहीं मजकूर राहिला अस
तां हा शब्द लिहून राखीं तो मजकूर लिहीत असतां
तनें ·

ताजातवाना, वि० ३ تازه توانا हिं० ताजा पुष्ट असा
जो मनुष्य, पशु, वृक्ष, इ० तो ·

ताजारोजगार, पु० हिं० जामध्यें अनेकप्रकारें द्रव्य
लाभ होतो अशा रोजगार स्त्र० ·

ताजीम, स्त्री० تعظيم हिं० अभ्युत्थान ·

ताजीमतवाजू, स्त्री० تعظيم تواضع हिं० ताजीम स
मराम इ० सत्कार ती ·

ताजीरोटी, स्त्री० हिं० चागले यजमानादिकांचा आ
श्रय यामुळें खाणेंपिणें चांगलें मिळावें चारपैसे मि
ळावे अशी जी सोय तिला स्त्र० ·

ताजें

ताजेंकूळ, न० ताजवळ चारपैसे आहेत कि० ताची
पन, इ० आहे त्यास स्त्र० ·

**ताजाघोडयाचीगोमाशी, ताजेघोडयाचीगोमा
शी**, स्त्री० जोंपर्यंत कोणेकापाशीं संपत्ति इ० आहे तों
पर्यंत त्याचें अनेकप्रकाराचें आर्जव करणारा जो
मनुष्य त्यास स्त्र० ·

ताट, न० भोजन करणें इत्यादि उपयोगी शेण्यादिकाचें उ
थळ एक पात्र आहे; २, दे० पुतळी स्त्र० णाणें आ
हे त्यास फोसानसतां व्यवहार; ह्या त्याचें ताटारवाल
चें माजर आहे स्त्र० त्याचा भोशाळा आहे, स्त्र० ता
टांत सांडलें काय वाटींत सांडलें काय, एकाताटीं जेव
णें आणि घासमोजणें, सोन्याचें ताट त्यास कुडाचा
आधार ·

तोट, न० भोंधळा, सजगुरु, गुरु, इ० काचेंजें कांड तें;
२, ताटहितीयार्थी ·

ताटकळणें, ताठकळणें, हालचालनकरितां एक
सारखें शरीर धरिल्यामुळें ताठलें जाणें; २, कोणाए
काची प्रतीक्षा करीत तटस्थ बसणें ·

ताटकळी, ताठकळी, स्त्री० ताटकळल्यामुळे नेभा
दिकांस जो ताठा येतो ती; ताटकळया देत बसणें स्त्र०
कोणेकामाची तिष्ठत बसणें ·

ताटली, स्त्री० लाहान जें भोजनाचे उपयोगी ताट ती ·

ताटवा, पु० तक्काहितीयार्थी ·

ताटस्थ, न० तटस्थपणा ·

ताटी, स्त्री० अनेक कांवटी एकत्र बांधून भिंती चे ठि
काणीं किं० कवाडाचे ठिकाणीं लावावयाकरितां करि
तात ती; २, मृत मनुष्य न्यावयासाठी शिंप्याचा काठ्या
इ० बांधून सिद्ध करितात ती · ३, खांबीं काठ्या या

नून

लून पळस, कर्मळ, इ० पानाचें लांबट ओझें बांधितात तो, कोणेकानें ताडीकापणें स्न० हळूच पकडून जाणें.

तांदूक, न० ओंधळा, इ० कांचें लाहानसें जें तांटे ने; २, कांदूक.

ताटया, पु० कों० अल्पवयस्क जो टोणगा तो.

ताठ, १ लिं० जांत लघुचीकपणा कमि तो, दोरी, कागद, काष्ठ, इ०; २, १ लिं० तच्चल; उ० येथून तें ताठ कोस भर आहे; ३, शरीरानें बळकट जो मनुष्यादि तो; ४, ज्याचे अंगीं विनय नाहीं तो, हातपाय इ० ताठ धरणें स्न० ताणून ताठ होत असे धरणें.

ताठणें, दोरी, शरीरावयव, इ० ताठा प्रथम हिनीयार्थी ने युक्त होणें.

ताठम, १ लिं० कों० ताठर.

ताठर, १ लिं० ताठा आहे जास अमा दोरी, पर्ण, इ० तो; २, ताठजें ओझें तो; ३, शरीर बळानें युक्त जो मनुष्यादि तो.

ताठा, पु० लघुचीकपणाचा प्रतिपक्षी जो धर्मविशेष, दोरी, शरीरावयव, काठी, इ० कांचा ठायीं असतो तो; २, ला० गर्वामुळें जो उद्धतपणा तो; ३, थंडीचा जो अतिशय तो, स्न० नाकीं नाहीं कांटा आणि कोरडाच ताठा.

ताड, पु० एक मोठा वृक्ष आहे, ग० ताडमाड समजणें स्न० कोणेकानें अतिशयित समजणें.

ताडक, न० ताडाची सावळी तें.

ताडकन, ताडकर, ताडदिशीं, अ० असा शब्द होई असें, चाबूक, चपराक, लात, इ० मारणें इ० कांचे वि०

ताडगोळा, पु० ताडाचे फळामध्यें जो मगजाचा गोळा असतो तो.

ताडणें, काठी, टिपरूं, चाबूक, इ० कानें कोणाएक काम प्रवृत्त करणें, जास प्रहार होतो तें कर्म; २, परिमाण विशेष, कोणेकाचें भाषण इ० अप्रामाण्य संदेहाचें निरासार्थ प्रमाणांतराशीं लावून कि० युक्तिवचनानें खरें, खोटें, पाहाणें; उ० पुण्याचें मापाशीं हें माप ताडिलें, हा गुणाकार दुसऱ्या गणतीनें करून ताडून पाहा; ३, कांहीं एक गोष्ट अनुमानानें जाणणें; उ० तो बोलतानां युक्तमजूंलागतांच मीं ताडलें कीं हा लबाड आहे.

ताडन, न० चाबूक इ० कानें ताडण्याचा व्यापार तें.

ताडपत्र, न० ताडाचें जें पान तें.

ताडपत्री, १ लिं० एक वस्त्रान जाति आहे, ज्या जातीचा जो शेला, पासोडी, इ० तो.

ताडफल, न० ताडाचें जें फल तें.

ताडबाजी, स्त्री० कों० कांहीं एका लक्षणावरून कांहीं गोष्टीचें जें अनुमान तें.

ताडमाड, पु० एक वृक्ष आहे.

तांडव, सं० न० अभिनयपूर्वक जें नृत्य तें; २, कांहीं एक अर्थबीजरूपें धरून त्या अवर बुद्धिबलानें अनेक कल्पना घेऊन त्या अर्थाचा करितान जो विस्तार तें; उ० या श्लोकावर ज्ञानेश्वरानें बहुत तांडव केलें आहे.

तांडा, पु० एका पाठीमागें एक अशा क्रमानें स्थित कि० चालतेले जे अनेक एकजातीय, बैल, मनुष्य, मुंग्या, इ० तो.

ताडातोडी, अ० सा० तडकाफडकी.

ताडातोड, ताडातोडी, स्त्री० बालक, आई, देवनी,

मिसमिस, इ० कांचा परस्पर जो वियोग तो.

ताडातोडा, पु० ताणाटोणा.

ताडाफांटा, पु० रा० कांहीं एकपदार्था वा अनेकप्रकारें व्यय करून जो निःशेषता तो.

ताडित, वि० काढी, टिपरूं, इ० कानें ताडिला जो मनुष्य, नगारा, इ० तो.

ताडी, स्त्री० मद्योपयोगी जो ताडाचे पोईपासून द्रव निघतो ती.

तांडेल, पु० गलबताचरील कि० लष्करांतील खलाशांवर जो नायक असतो तो; २, बैलावर माल नेत असतात त्या बैलाचे तांडयाचा जो प्रमाण इ० धनी तो.

ताडया, पु० मद्यार्थ तांडाचा डवका दिलेला तो.

ताण, पु० दोर, वस्त्र, इ० कांस ताठून ओढ बसल्यामुळें त्यांचा ठायीं जो संस्कार विशेष उत्पन्न होतो तो; २, ग० पु० न० ला० मध्यें विसावा न घेतां कांहीं काम केल्यामुळें कि० देहनिर्वाहक जो श्वासोच्छ्वास, भोजन, निद्रा, इ० क्रिया त्यांचा निरोध झाल्यामुळें श्रमविशेषजनक जो शरीराचे ठायीं संस्कारविशेष उत्पन्न होतो तो; ३, व्यवहारोपयोगी क्रियांचा निरोधामुळें व्यवहारास कि० व्यवहारकर्त्यास जी संकटावस्थेची प्राप्ति होती तो; उदा० गेला मुराआला नाहीं म्हणून आम्हास ताण बसला; ४, न० कांहीं कार्यारंभाचा कालरूप जो संधि तें; उ० भरताचे ताणावर महाशिरा हाकार.

ताणणें, तोतोपदार्थादि त्यात्या ताणानें यथायोग्य युक्त करणें.

ताणा, पु० विणणें इत्यादयर्थ ताणून ठेविलेलें जें सूत्र, दोरी

दोरी, इ० तो; २, वस्त्रादिकांचे जे आडवे तंतु ते प्र०; ३, घोंसाळें, द्राक्ष, इ० कांचा जो वेल तो; ४, रा० पडवळ, भोंपळी, इ० वेलांस वृक्षादि आश्रय धरायाचे उपयोगी जे शाखाप्रतिपर्वी तंतुफुटतात ते प्र०; ५, कों० दुधाळपणा, भलेपणा, इ० सद्गुणाविषयीं कारणभूत जी गाय, म्हैस, इ० पशूंची मातृपरंपरा ती.

ताणाताण, स्त्री० अनेककामें कि० हुलांवेंदेवें, इ० उपस्थित झाल्यामुळें जी ओढ होत्ये ती.

तांत, स्त्री० वृक्षाचे त्वचेचा कि० लोहादि धातूंचा कि० मेषादिकांचा आंतड्याचा जो तंतु ती.

तात, पु० सं० पिता.

तातकथय्या, पु० नृत्यशब्दाचें अनुकरण तो; २, ला० नृत्यगीतायुत्साहास स्व०.

तातड, स्त्री० कांहीं एका कार्याचा नेट लागल्यामुळें लवकर लवकर नें कार्य करावें असें वादायाजोगी जी अवस्था प्राप्त होत्ये कि० तीमुळें अंगीं येतो सत्वरपणा ती.

तातडणें, तातडानें युक्त होणें

तातपुरचा, अ० त्याचा उद्देशानें; उ० मीयाचकामासाठीं तातपुरचा तुम्हाकडेगेलोंहोतों; उ० अगत्य मेव, मीजेवनकोरणतो नेंहा तातपुरचें करतो.

तातवणें, एकदांच अनेककार्यें उपस्थित झाल्यामुळें कि० कांहींएक दुःखसोसवेनासें झाल्यामुळें केवल भासणें; २, आपण कांहीं कारणामुळें व्यग्र असतां कोणी कांहीं विचारिल्यास त्याजवर क्रोधानें ओरडणें.

तांतू, पु० तंतु शब्दाचा अपभ्रंश.

तातोबा, पु० रा० पित्रादिवडिलास सन्मानानें ल०

तात्काल, तात्काळ, अ० तत्कालाचा अपभ्रंश.

तात्कालिक, १ लिं० सं० उपकांतजो कांहीं एक काल त्याचाठायीं साला, केला, स्थित, इ० तो.

तात्पर्य, न० सं० अभिप्राय; २, भाषण, लेख, इ० कांतील जो केवल सारभूत अंश तें.

तात्पर्यार्थ, पु० सं० तात्पर्यविषयजो अर्थ तो.

तात्या, पु० पुरुषाचें प्रतिष्ठा नाम आहे.

तांत्रिक, १ लिं० उपासनामार्ग प्रतिपादक जीं तंत्रें आहेत तदुक्त जो पूजाविधि, मंत्र, इ० तो किं० त्या तंत्रांतें जाणणारा किं० त्यामार्गें वर्तणारा तो; २, जीं अंगें सोडितांयेतनाहींत तितकीं मात्र घेउन संक्षेपानें करितात जें कांहीं एक कर्म तो; उ० सांप्रत पेशाची अडचण आहे रचर्चे तांत्रिक करा.

तात्विक, १ लिं० सं० प्रामाणिक; २, न० भाषणादि कांतील जो तत्त्वांश तें.

तांथ, स्त्री० तांत.

ताथवडु, १ लिं० कों० नाजा प्रथमार्थी.

ताथा, १ लिं० कों० ताथवडु.

तांथू, पु० तांतू.

तांदळा, पु० अवयवरहित अमून मिंदूरानें लिंप जो पाषाणाचा देव तो; २, १ लिं० बेडौल बेडा बांकडा जो भांडें इ० पदार्थ तो.

तादात्म्य, न० सं० उभयपदार्थांची जी परस्पर एकरूपता तें; उ० अग्नीचें आणि अग्नीचा ठिणगीचें तादात्म्यासारिखें परमात्मा आणि जीवात्मा यांचें तादात्म्य आहे.

तांदुळचा, तांदुळजा, पु० एकपालेभाजी आहे.

तांदूळ, पु० साळी, राळे, हरीक, इ० दाण्याचे आंत जो अंश

अंश असतो तो; साळीचे तांदूळ भाजून उपहारार्थ जो भाता सारिखा करितात ते; २, साळीचा तांदुळा सारिखे सोन्याचे मणी स्त्रियांचे करभूषणार्थ करितात ते प्र०.

तांदूळगोटा, पु० तांदूळ इ० दाणा तो.

तादृश, १ लिं० सं० त्या सारिखा किं० त्याप्रकारचा तो; २, विद्यादि गुणेंकरून विशेष कोटींत गणावया जोगा नव्हे असा मनुष्यादि पदार्थ किं० तन्निष्ठ तो गुण.

तादृप्य, न० सं० तद्रूपता तें

ताधरावणें. कों० कोंहीं एका कार्याविषयीं कोणे कास लगकर, लवकरकर, इ० वचनाची घाबरें करणें.

तान, स्त्री० गगाचा जो आलाफ तो; २, तृषा; ३, मुलांस एक उष्णता जन्यरोग होऊन भसतो जेणेंकडून शोष लागतो तो; ४, एक औषधिवल्ली आहे; ५, ताण; ६, ताव्हा. तान धरणें स्त्र० तानरोग दूर व्हावया करितां उपाय आहे तो करणें; वा० तान घालणें स्त्र० उष्णतानिवृत्त्यर्थ पोरांस उपाय आहे तो करणें.

तानकर्म, न० अलाप चारीचें कर्म.

तानभागणें, कों० गोमहिष्यादिकांनीं प्रसूत सान्या वर लोकरी गाभणें होणें.

तानणें, ताणणें.

तानबाजी, स्त्री० हिं० अलाफचारी.

तानमान, न० करावयाची जी क्रिया आणि त्या क्रियेनें तन्नटपें परस्पर संबद्ध होणारी जी कारकें त्यांवरील योग्यता समर्पक जो सामर्थ्यादि गुण त्यांचे इयत्तेचा जो प्रकार तें.

तानमोड, स्त्री० तृषार्त्त पाणी पीत असतां मध्यें कांहीं विघ्नानें विच्छेद साला असतां जो तृषेचा भंग होतो

होतो ती ·

तानलाडू, पु॰ मार्गाचे ठायीं क्षुधा, तृषा, निवारणार्थ नेंफराळाचें करून घेतात त्यास प्रसंगवशात् सं॰

तानवड, न॰ स्त्रियांचें कर्णभूषण आहे तें; २, रा॰ एक पुष्प आहे; ३, स्त्री॰ त्याचें साडती ·

तानातान, स्त्री॰ ताणाताण ·

तान्हा, वि॰ स्तनपान करणारें असें जें केवल लहान बालक तो वनवप्रसूत जी त्याची आई ती, याअर्थी प्रायः मनुष्य स्त्रीवर व्यवहार नाहीं ·

तान्हावणें, रा॰ तृषेनें युक्त होणें ·

तान्हुला, वि॰ तान्हा प्रथमार्थी ·

तान्हेणें, तान्हावणें ·

ताप, पु॰ ज्वर; २, सूर्य, अग्नि, इ॰ कांचा ठायीं जी तप्तता असत्ये तो; ३, उन्हाचा कि॰ काम, क्रोध, इ॰ कांना संबंधानें शरीरादिपदार्थी जी संतप्तता होत्ये तो; ४, आधिरूप कि॰ व्याधिरूपें दुःख तदनुभवानें जो आत्म्याचे ठायीं संस्कार होतो ती, ५, स्त्री॰ पर्जन्यकाळीं मेघपटलें एकीकडे होउन जें उष्ण पडतें ती ·

तापकरी, वि॰ ज्वरोपद्रवयुक्त जो तो ·

तापट, तापडु, वि॰ कोणाकानें कोहीं ईषन्मात्र ही अपराध केला असतां जो तत्काल कोपत्ये तो अशास्वभावाचा जो मनुष्यादि तो; २, मंदनके असा जो घोडा, बैल, इ॰ तो ·

तापणें, अग्नि, सूर्य, ज्वर, क्रोध, इ॰ कांचे संबंधानें शरीर, पाषाण, इ॰ तापयुक्त होणें; २, मनुष्य, पित्त, क्षुधा, वायु, इ॰ कानीं मंदना सोडून प्रचुरपणें प्रवृत्त होणें, गळा तापणें स्त्री॰ कांहीं काल गाणादि होत असतां पंचकाष्ठाचा उच्चस्वरनिघे अशा देशांत त्या गळ्यानें पावणें ·

तापता, ताफता, पु॰ रेशमी एक वस्त्र आहे ·

तापत्रय, न॰ जन्मल्या प्राण्यास आधिभौतिक, आधिदैविक, आणि आध्यात्मिक, असें जें दुःखत्रय भोगावें लागतें जाचेपायीं आधिव्याधिरूप सर्व दुःखें येतात तें; २, विशेषेंकरून दारिद्र्य दुःख स्त्री॰ ·

तापन, न॰ सं॰ तापविण्याचा व्यापार तें ·

तापस, पु॰ सं॰ तपस्वी ·

तापसी, पु॰ तापसाचा अपभ्रंश ·

तापाटीचा जागा, स्त्री॰ निरंतर सूर्यसंबंधि उन जीवर असतें अशी जी जागा ती ·

ताफा, पु॰ हिं॰ वाघे, साजिंदे, आणि कळावंतीण मिळून जो समुदाय तो; २, सूर, सनयी, संबळ, इ॰ वाजे जासहित वाजंत्र्यांचा जो समुदाय तो; ३, पाण्यान्न काष्ठ न्यावयाची असतां ती एकत्र बांधून करितात जो रचनाविशेष तो; ४, नद्यादिकांतून मनुष्यादिपदार्थ पलीकडे न्यावयाचा असतां बांधे मंचाचार घागरी चहूंकडे बांधून जें साधन करितात तो; ५, त्रिमण्यांचा समुदाय तो; देश॰ ताफा बसणें स्त्री॰ कर्ता पुरुषमेल्यामुळे संसार इ॰ रगडले मोडकळीस येणें ·

तांब, स्त्री॰ लोखंडाचे अंगीं जो मल उत्पन्न होतो ती; २, सूर्योदयीं कि॰ अस्तमानीं आकाशांत जी आरक्तता उत्पन्न होत्ये ती; ३, कणकेंत जो गव्हांचे साल्याचा अंश येतो ती; ४, गव्हांचे शेतावर एकरोग पडत असतो ती; ५, रा॰ युगचे अंगावर केवल बारीक जी तांबडी गोचिडी पडत्ये ती; ६, बहुत दि

वस आदलि न झाल्यामुळें विद्या, कला, यांस जें मालिन्य येतें तो.

तांबट, पु० स्त्री ईण. तांबें इ० कांचीं भांडीं घडणारा एक जाति आहे.

तांबडतोब, अ० हिं० कोडें आणें कि० पाडविणें इ० क्रियांचें निमिन्त उपस्थित होतांच वेगानें अव्यव हितोत्तरक्षणीं; २, क्षणिन जाण्याचे उद्देशानें निघालास जो त्याणें तेंस्थल येईतों मध्यें विसावा न घेतां कि० इकडेतिकडे न जातां एकावेगानें: उ० मी पेंढारयाचे भयानें निघालों तो तांबडतोब पुण्यास गेलों मध्यें कोठेंही उतरलों नाहीं मध्यें नदीवर उतरून स्नान मात्र केलें

तांबडमाती, स्त्री० तांबडी जी माती ती.

तांबडा, वि० रक्ताचे रंगासारिखा जो रंग तो व तद्विशिष्ट जें वस्त्रादिक तो.

तांबडाभोपळा, वि० अतिशयित जो तांबडा त्यास म्ह०.

तांबणें, धा० लोखंड तांबीनें युक्त होणें.

तांबनेल, वि० स० तांबलेल्या जो लोखंडाचा पदार्थ तो.

तांबरणें, कों० क्रोधानें आरक्त होणें.

तांबली, स्त्री० एकल्याहान पाणी प्यावयाचें पात्र आहे ती.

तांबसाळ, स्त्री० भाताचे जातींत एकभेद आहे.

तांबळ, न० स० जेथें तृणादिकही होत नाही अशें जें भूतल तें.

तांबा, वि० स० तांबूस.

तांबारा, पु० गव्हाचे शेतावर एकरोग पडत असतो तो.

तांबीन, अ० تابين हिं० कोणे कांचे संबंधामुळें अकिंतपणपर्यंत असणें इ० कांचें वि०

तांबूद, पु० تابوت हिं० डोला.

तांबूल, पु० सं० विडा.

तांबूल, न० स० तांबली.

तांबूस, वि० यत्किंचित् जो तांबडा तो.

तांबूळ, पु० न० विडा आपलेमुखानें चावून स्त्री. मूल, इ० कांस देणान तो.

तांबें, न० एक धातु आहे.

तांबेजणें, धा० तांबणें.

तांबेट, स्त्री० एक गवतांत जाति आहे. जीची काडी तांबडी असते ती.

तांबेदार, वि० دار हिं० जो जाचे तांबीन आहे तो त्याचा.

तांबेदारी, स्त्री० داری हिं० तांबेदारपणा ती.

तांबोटी, स्त्री० अखंड भांडें करावयाकरितां जो तांब्याचा रुंदट तुकडा करितात ती.

तांबोळी, पु० स्त्री ईण तांबूलाचें पानें, इ० साहित्य विकितो अशी जाति आहे तो.

तांब्या, पु० भोजनादि समयीं पाणी प्यावयाचें एक धातुमय पात्र आहे तो.

तांभन, न० स० तांबण.

तामण, तामन, न० कों० तांबण.

तामनदस्त, पु० तांबनदस्त.

तामस, वि० सं० तमोगुणविशिष्ट कि० तमोगुण संबंधी तो ह्म० निद्रा, आलस्य, प्रमाद, साहसिकता, इ० हीं जाचे ठायीं बहुत आहेत असा जो

मनुष्यादितमेंच जाचा सेवनानें निद्रालस्यादि प्रा
महोनात तो भक्ष्यादि पदार्थ.

नाममगुणी, ३लिं० तेलनिखट इ० नाममप पदार्थां
वरजाची अतिप्रीति आणि क्रोध, निद्रा आलस्य
युक्त जो मनुष्यादि तो.

नाममी, ३लिं० नाममस्यभाषाचा जो मनुष्यादि तो.

ताम्र, न० तांबें; २, तांबडा तो; ३, ताम्रभस्मासही
म्र०.

ताम्रपट, पु० राजानें ब्राह्मणादिकांस भूम्यादि दान
केलें असतां त्याचा लेख जो तांब्याचे पत्र्यावर करू
न देतात तद्विशिष्ट तो.

ताम्रपटी, पु०ग० ताम्रपट तो.

ताम्रभस्म, न० औषधार्थ कांहीं वनस्पत्यादिकां
तीं जें तांब्याचें भस्म करितात तें.

ताम्रण, ताम्रन, न० एक धातुमय पात्र आहे जें
संध्यादिकांचें पाणी सांडावयाचे उपयोगी पडतें तें.

तार, स्त्री० ~ ~ हिं० धातु, रेशीम, ओनडें, इ०
यांचा जो तंतु तो; २, ना० कणीक, काकवी, इ० जें
चिकट पदार्थ याचा जो तंत्याकार अवयव होतो तो;
३, भाग, मद्य, इ० भक्षिलें असतां किं० संपत्ति इ०
योगानें जो उन्माद येतो तो.

तारक, ३लिं० तारणारा.

तारकशी, तारकस, ३लिं० धातूचे तारेचें विणून
केलें जें पागादिक तो.

तारका, स्त्री० आकाशांतराचीं गोलाकार, तेजस्वी
जे पदार्थ अनेक दिसतात ते प्रत्येकीं तो; २, नेत्रां
तील जो तेजोंशनी; ३, डाहुजी पोरगी नीम म्र०.

तारकाबारका, कों० खाचरा बाचरा.

तार

तारकेवारी, स्त्री० दुसऱ्यास दाबदूब करून आप
ल्या वरचढपणा मिरविण्याचा जो प्रकार तो.

तारंगण, न० तारांगण.

तारण, न० तारण्याचा जो व्यापार किं० साधन तें;
२, कोणापासून उद्धार करितां कांहीं द्रव्य घ्याव
याचें असतां किं० मामलत इत्यादि धंद्याचे हमी
सकोणासगुंतवावयाचें असतां प्रसंगवशात त्या
व्यापारीं नेटावयेईल म्र० विश्वासार्थ जो व्यवहार
कर्ता त्याजवळ कांहीं द्रव्य ठेविलें तें; ३, पु० अठ
रावा जो संवत्सर तो.

तारणें, तरंअसें करणें

तारतरवाना, तारद्रवाना, पु० हिं० शेतरवाना.

तारतम्य, न० जाति रूप किं० क्रियारूपादि पदार्थ
परस्पर एकजातीय असतांही त्यामध्ये गुणकृ
त किं० प्रकारकृत जो भेद तें; उ० पोपट बोलतो
आणि मनुष्य बोलतो परंतु त्यांत तारतम्य आ
हे; २, पदार्थांतील तारतम्य जाणून तदनुरूप
उपचारादि करण्याविषयीं बुद्धीचे ठायीं जें कौ
शल असतें तें; उ० कोणास किती मारावयाचीं
हें तारतम्य याचेअंगीं आहे; ३, तारतीम.

तारतीम, न० कोणी आपल्याकडे पाहुणा इ० आला
असतां त्याचें यथायोग्य जें आदर आतिथ्य तें.

तारदानी, स्त्री० हिं० वीणा इ० कांचे दांडीस आं
तून तारा ओढून घ्यावयाकरितां सछिद्र हस्ति
दंताची पट्टी मारली असते ती.

तारफेणी, स्त्री० सपीठाचा तारा काढून त्यांचें ए
कपक्कान्न करितात ती.

तारंबळ, स्त्री० अनेक कार्यें एकसमयीं उपस्थित
झाल्या

झाल्यामुळें कि० आपल्यास सेवेना अमें कांहीं देणें, घेणें, ओसेंबाहाणें, इ० प्राप्त झाल्यामुळें कसेंकरूं, कायकरूं, अशीजी अंतःकरणाची व्यग्रता होय ती; २, रवाण्यापिण्याविषयीं जी आबाळ ती ·

तारवटणें, भांग, अफू, इ० कांचे मदानें गुंग होणें ·

तारवटी, ७ लिं० लांबचे वेंदगपासून तारवावर आलेला जो नारळ, रूपारी, इ० जिन्नस तो ·

तारा, स्त्री० पु० तारका; २, पु० गवयी कदाचित् आकाशापासून तेजःकल्लोल रवानीं येतो सादिसतो तो; ३, बाण, नळा, इ० कांत गंधकाची गोळी, इ० घातलें असतां नक्षत्राकार जो अग्निगोलक उडतो तो; ४, कारकून, गवयी, शिपायी, इ० कांची स्वस्व गुणामध्यें निपुणता वर्णनीय असतां त्यांस स्त्री० तारतुटणें स्त्री० कोणी एका गवयाचें गाणें कि० वक्त्याचें भाषण इ० नामध्यें कांहीं च चमत्कार सभासदादिकांस वाटूनये अशाप्रकारचें होणें हा विपरीत लक्षणें ने गवयी इ० कांची निंदाकर्तव्य असतां प्र०; ५, कों० खाडीचें पाणी ओहोटल्यानंतर जो पायमार्ग होतो तो; ६, स्त्री० जन्मनक्षत्रापासून इष्टकालीं चें दिननक्षत्र नवानी भागून जें शेष राहातें ती ·

तारांगण, न० गगन; २, गणितानुरूप ग्रहनक्षत्र पाहावयाकरितां जें तदनुरूप गृह बांधितात तें; ३, कांहीं एक सैन्यादि समुदायाचे अवयव भयादिकानें चहुंकडे चार झाल्यामुळें त्या समुदायाचा विस्कळीतपणा होतो तें

तारातीर, स्त्री० कों० तारंबळ प्रथमार्थी; २, तारांगण तृतीयार्थी ·

तारापात, पु० द्वितीयार्थक जो तारा त्याचें जें पतन तो ·

तारांबळ, न० विवक्षितकालीं षष्ठ्यर्थभूत जी तारा तीचें जें कोणेकास आनुकूल्य तें ·

तारांबळ, स्त्री० तारंबळ ·

तारामंडल, न० नक्षत्रमंडल ·

तारीख, स्त्री० تاريخ हिं० यवनी. इंग्रेजी, महिन्याचे पोटचे दिवस ने प्रत्येकी ·

तारीफ, स्त्री० تعريف हिं० कांहीं एका पदार्थाचें कि० व्यापाराचें उत्कृष्टपणाचें जें वर्णन ·

तारीफदार, ७ लिं० تعريف دار हिं० ज्याचें तारीफ करणें योग्य आहे तो मनुष्यादि पदार्थ ·

तारुण्य, न० तरुणपणा तें ·

तारूं, न० गलबत तें; स्त्री० रा० भटास तारूं आणि गाबत्यास गोरूं ·

तारूंतरांडें, न० महान मोठें गलबत तें ·

तारें, न० रा० बृहत्वादिकामुळें बुडीस जो चळ होतो तें, स्त्री० आधींच तारें आणि त्यांत शिरलें वारें; २, गलबतांस ज्याचेभय असा जो जवळी इ० वाईट वारा त्यास स्त्री०

तारेंवारें, न० रा० गलबतें चालण्याविषयीं प्रतिकूल कि० अनुकूल जो वारा तें ·

तारोतार, अ० तंतोतंत; २, कों० मध्यें एकही दिवस अंतर न पडतां कांहीं काल सतत. कांहीं व्यापार चालण्याचें वि०; उ० तारोतार त्याणें दोन महिने रेवा घातल्या ·

तारोळा, पु० दे० प्रवृत्त कार्यास कांहीं प्राप्त होतें जें प्रतिबंधक विघ्न तो ·

तार्किक, पु० सं० न्यायशास्त्रज्ञ तो; २, ७ लिं० ज्याचें

चे दुर्बीन तर्कबहुन तो; २, न० तार्किक्याचा अपभंश.

तार्किक्य, न० तर्कद्वितीयपंचमार्थी.

ताल, पु० टाळ प्रथमद्वितीयार्थी; २, सं० ताड; ३, गृहाचा ओ मजला तो; ४, हरताळ.

तालबद्ध, वि० जाचा ताल ढासळत नाहीं असें ख्याल, पद, गाणें,

तालमी, वि० कुस्तीचा अभ्यास आहे जास तो मनुष्य कि० त्याचें शरीर तो.

तालव्य, वि० सं० तालुस्थानी उत्पन्न होतो जो इ० चवर्ग, य, श, हे वर्ण ते प्र०

तालसुरीं, अ० ताल आणि सूर यांस ढासळूं न देतां गाण्याचें वि०

तालामाला, पु० तालमान.

तालीक, स्त्री० تعليق हिं० कागदपत्राची जीनकूल करितात ती.

तालीम, स्त्री० تعليم हिं० गुरूपासून गीत, नृत्य, वाद्य, शस्त्र, मल्लयुद्ध, इ० जी शिक्षा घेतात ती; २, घोडयास, पोपटास, चालत्या गाडी, बोलतां यावें, म्हणून जी शिक्षा करितात ती.

तालीमखाना, पु० تعليم خانه हिं० मल्लयुद्ध, दांडपट्टा, इ० शिकावयाकरितां जी शाला बांधितात तो; २, एक औषधी आहे ती; ३, निंबेवी तो.

तालीसपत्र, न० एक औषधिपदार्थ आहे तें.

तालु, न० मुखांतवरचा भागीं एक अवयव आहे जेथें जिव्हा संयुक्त होऊन तालव्यवर्ण उत्पन्न होतात तें; २, स्त्री० टाळू.

तालुका, पु० تعلقات हिं० एककिल्ला कि० मोठाया म मुख्यत्वेंकरून राजकीय व्यवहारार्थ त्या खालीं आसपासचा ग्रामसमुदाय धरून जो देशविभाग कल्पिला असतो तो; २, इलाखा.

तालेबंत, वि० लक्ष्मीवंत.

तालेवार, वि० तालेबंत.

तालेवारी, स्त्री० तालेवारपणा ती.

ताव, पु० रूपवर्णादि धातूस अग्निवर्ण होई तों तापविण्याचा जो संस्कार करितात तो; २, तसें तापविल्यानंतर रूपवर्णादि निघालें असतां जो वर्ण त्याव रहिसतो तो; ३, कागदाचें सगळें पान; ४, सगळें जें भिंग तो; ५, स्त्री० कों० तापपंचमार्थी; कोणा एकास ताव देणें, रू० दपटशा देणें, इच्यावर ताव देणें, रू० कारकुनी इ० कसबानें हरण करणें, लाडू इ० कांवर ताव देणें रू० बहुत रचणें, मिशांवर ताव देणें रू० वरें काय चिंता आहे पाहून घेईन इ० बोलून मिशांवरून हात फिरविणें.

तावण, स्त्री० कों० भुरदंडती; २, अतिशयित धावण्याचा जो प्रसंग ती, पड. धा० प्र०.

तावणें, रूपवर्णादि धातु मडकें, वीट, इ० अग्नि संयोगें करून लाल होई इतकें तापविणें; २, दुग्ध, पाणी, इ० तापविणें; ३, कों० कोणी एकास दपटशा हा देऊन दाबणें.

तावत्, वि० सं० तत्प्रमाणक तो; उ० यावत्संख्यक ब्राह्मणतावत्संख्यक गौ आणिले अमेमसाली व्यवहारांत प्रयोग होतात; २, अ० तों कालपर्यंत यावत्सन्निधानीं प्र.

तावत्काल, अ० विवक्षित कालपर्यंत.

तावत्कालपर्यंत, अ० तावत्काल.

तावता, अ० एतावना या अव्ययाचे अर्थी कदाचित् या शब्दाचा प्रयोग करितात.

तावत्पर्यंत, अ० विवक्षित काल, देश, ग्रंथादिकमाचा प्रदेश यापर्यंत.

तावदान, न० हार, खिडकी, इ० कांस वायु इ० कांचा प्रतिबंध करावा आणि प्रकाशाचा प्रतिबंध होऊं नये म्हणून जें भिंग किं० भिंगानें युक्त कवाड करितात तें.

तावनदस्त, पु० गंजिफा वांटतेवेळेस चुकपडली असतां त्या वांटणारापासून गुन्हेगारी घातली घेतात तो.

तावन्मात्र, अ० जितक्यासतितकें; उ० दुपतें सांगायाजोगें नाहीं तावन्मात्र आहे.

ताशा, पु० हिं० एक चर्मवाद्य आहे तो.

ताशील, स्त्री० ग० तहशील.

ताशीव, वि० तासून केलाजो नीट काष्ठ, पाषाण, इ० पदार्थ तो.

ताशेकरी, पु० ताशा वाजविण्याचें कसब करितो तो.

तास, पु० अडीच घटिकाचें जें कालप्रमाण तो; २, एक कोशाचें वाद्य आहे जें घटिका किं० तास भरलाम्हणजे प्रायः वाजवीत असतात तो; उ० घटिकागेलीपळेंगेलीं तासवाजे म्हणणा आयुष्याचा नाश होतो गमकारे म्हणानां; ३, चाप या शब्दाचा अपभ्रंश; ४, कों० काष्ठादिकावर तासण्याचें निदर्शकपणारूप होतो जो संस्कार तो; ५, न० नागरानें मीजमिनीस रेषापडत्येतें; ६, नदी, ओढा, यांचा दोहोंकांठांचा आंतील जो प्रदेश तें, कि० पाभामध्यें भिन्नभिन्न जे प्रवाहाचे मार्ग होतात ते

ते म०; ७, रा० कर्षणानें जो भूमीस संस्कार करितात तो; ८, उ० गजापुर प्रांतीं सातासें घालावीं तेव्हां उसपेराया.

तासकाम, न० काष्ठादि तासण्याचें जें काम किं० त्याणें होतो जो काष्ठादिकावर संस्कार तें.

तासकामी, तासकाम्या, वि० तासकाम करणारा तो.

तासनी, पु० हिं० ताशेकरी; २, घटिकादि भरलें असतां तासवाजविण्याकरितां ठेविला असतो तो.

तासणी, स्त्री० सुतारांचें एक आयुध आहे तें; २, तेणेंकरून काष्ठादिक किं० वस्त्यर्थानें केंश तासण्याचा व्यापार तो; ३, ला० कोणेकाचा पाणउतारा होई असाजो कठोरभाषणादि व्यापार तो.

तासणें, तासणीनें काष्ठादिकांचा अंश काढून तें यथाकारपाहिजे तदाकार करणें; २, काढिलेल्याअंशासही कर्मनामक्षीं येत्यें. ला० हजामत करणें या अर्थी निंदाप्रसंगीं प्र०; ३, हिशेब, याद, इ० तरेनें यथाकथंचित् लिहिणें; ४, रा० भाज्यांक भाजकानें भागून अवशिष्टराहील तो राखणें.

तासोपंत, पु० संकेतानें बोडकीसंख्या.

ताहां, अ० हिं० लेखामध्यें उपकांत जो महाल, परगणा इ० तेथें अधिकृत जो पाटील, मामलतदार इ० त्यांवर अन्वय. सर्कारी कागदोपत्रीं प्र०.

ताहादर, वि० ر ہ हिं० प्रा० ताजा अर्थमहितीयार्थी.

ताहान, स्त्री० तृषा.

ताहोहयात, ताहांहयात, अ० हिं० तो जीवंत आहेपर्यंत.

ताळे, पु॰ ताल प्रथमार्थी; २, भाषणादि व्यवहारीं लोकशास्त्रानुरूप जो एक परबंध असतो तो, निषेधविवक्षित असतांच प्रयोग; ३, गृहाचा जो मजला तो.

ताळतंत, पु॰ ताळ द्वितीयार्थी.

ताळा, पु॰ कांहीं एक गोष्टीचे प्रामाणिकत्वविषयीं जो संशय तन्निरासार्थ प्रमाणांतरानीं किंवा युक्त्यंतरानें नाडून जो परस्परांचा अविरुद्धभाव पाहातात तो; २, शाब्दादिप्रमाणानें ज्ञानजो अर्थ त्याचा प्रत्यक्षादि प्रमाणांतरानें तदनुरूप जो अनुभव तो.

ताळातोळा, पु॰ प्रथमार्थक ताळा इ॰ तो.

ताळू, स्त्री॰ कों॰ टाळू.

ताळेबंद, पु॰ शिलकबंद, रचनावणी, इ॰ कांचरून जो एकंदर घडणीनें महिन्याचा किंवा वर्षाचा साडाखिहितान तो.

तिकटें, न॰ कों॰ पडस, वेल, इ॰ कांचे देंठास तीनपानें असतात तीं तीनमिळून एकदेंठ नें; २, रा॰ तीनपानाचेंजें ठिकोळें तें; २, प्रेनदाहार्थ अग्न्याधयाकरितां किंवा विहिरींतला मनुष्यादिपदार्थ बाहेरकादावयाकरितां किंवा कांहीं कार्याकरितां तीन कांबटी अथवा लाकडें बांधून त्रिकोण करितात तें

तिकडचा, तिकडला, वि॰ तिकडे एतच्छब्दवाच्य जें अधिकरण तत्संबंधी तो.

तिकडील, वि॰ तिकडचा.

तिकडून, अ॰ तिकडे एतच्छब्दवाच्य जें अधिकरण तेथून

तिक

तिकडे, अ॰ दिगर्थवाचक जो तो, कडे तेथें; उ॰ जिकडे पाउस पडतो तिकडे पीक होतें, त्यांचा आमचा कज्जा साला आतां तूं तिकडे पाणी ही पिवुं नको.

तिकतिकणें, तेलादिसंयुक्त कुंकुमादिकचल्लिवितून कतकतकणें.

तिकतिकी, स्त्री॰ तिकतिकीत पदार्थाचेठायीं जेंतेजदिसतें तो.

तिकतिकीत, वि॰ तिकतिक तोजो पदार्थ तो.

तिकाकी, स्त्री॰ तिकतिकी.

तिकून, अ॰ तिकडून हा शब्द शूद्राचे भाषणांत येतो

तिकोनी, वि॰ तीनआहेत कोनजास तो क्षेत्र, काष्ठ, वस्त्र, इ॰.

तिक्कल, स्त्री॰ गंजिफांचीं तीनपानें अनुक्रमानें लागलेलीं आलींजीं एकाकडे तीं.

तिक्का, पु॰ रा॰ तीनचिन्हें आहेत जास असें जें गंजिफेचें पान तो.

तिक्त, पु॰ सं॰ मिरचीसारिखा किंवा कटुकीसारिखा जो स्वाद तो; २, वि॰ तद्विशिष्ट जो पदार्थ तो.

तिक्तय, तिक्तव, स्त्री॰ ताकतय.

तिखट, न॰ मिरचीचे स्वादासारिखा जो स्वाद तें; २, मिरचा वाटून किंवा कुटून केलेंजें द्रव्य तें; ३, वि॰ तिखटस्वादविशिष्ट जो मिरची, आलें, इ॰ तो; ४, रा॰ मिष्टना रसापून रसविशेष जामधुर फलादिपदार्थामध्यें आहे तो; उ॰ कलमीआंब्यापेक्षां हापांबा तिखट लागतो; ५, रा॰ दाहकता शक्ति जामध्यें अधिक असा अग्नि, उष्ण, इ॰ तो; ६, छेदकता शक्ति जामध्यें विशेष तो शस्त्र, शस्त्रधारा, कांटा, इ॰ तो, स्व॰ उ॰ कानामागून

आलें

आलें शिंगट तें म्हालें अतितिरखट; ७, ग्राह्यनेविषयीं शीघ्रजी बुद्धि तो; ८, तद्विशिष्ट मनुष्य तो; ९, उग्रस्वभावाचा जो मनुष्यादिक आणि त्याचा स्वभाव तो; १०, दुसऱ्यास दुःसह लागाया जोगें जें भाषण तें; ११, सूक्ष्मशब्द ग्रहण करण्याविषयीं समर्थ जें श्रोत्रेंद्रिय त्यास ल०; १२, तसें च स्वस्वविषयग्रहणीं कि० स्वस्वकर्माचेठायीं जाचे सामर्थ्यास यत्किंचित् वैकल्य नाहीं तें नेत्रादि इंद्रियें त्यांसही कदाचित् ल०; १३, तिरखट मीठ लावून कांहीं एकजिन्नस सांगणें, ल० स्वकल्पनेनें कांहीं आंतनची कल्पना करून रसविशिष्ट होईल तशी सांगणें, रूप० पुढें तिरखट आणि मागें पोंचट.

तिरखटाई, स्त्री० तिरखटपणा तो.

तिरखटावणें, कों० जिव्हादिकांस तिरखट लागल्यामुळें व्यथित होणें.

तिरखणी, ३ लिं० १ तीन आहेत रवण जास तें गृह; २, स्त्री० गृहाचे तीन रवणाचा समुदाय तो.

तिरखमिठाभात, पु० रा० रवनरवनाभात.

तिरखावणें, तिरखटावणें.

तिरखुळा, तिरखळा, पु० तीन मुलींचे पाठीवर झालाजो मुलगा तो.

तिरखुळी, तिरखळी, स्त्री० तीन मुलांचे पाठीवर झालीजी मुलगी ती.

तिरखुळें, तिरखळें, न० तिरखुळा कि० तिरखुळीयांचें सामान्य नाव.

तिरवें, न० शस्त्रादिकरण्याचे उपयोगी एक धातु आहे तें; लाक्ष० याचे अंगीं तीनमण तिरवें जळ तें आहे एथे अभिमानाचा नाश असा अर्थ.

तिरा

तिरगस्त, न० गतवर्षाचा पूर्वीचें जें वर्ष तें; ति० गस्त बाकी, तिरगस्तवहिवाट, इ० समास जाणावे; २, ३ लिं० तिथेंगतिफा रवेळत असतां तिथींचें ही कांहीं हुकूम उतरले अशा योग्यतेस आलाजो डाव तो.

तिरगस्तां, अ० गतवर्षाहून पूर्वीचे वर्षीं.

तिघई, स्त्री० तीन गस्तें आहेत जास असें जें गृहादि तो.

तिघड, ३ लिं० कों० सनत तीन लोटे बांधून मध्यें एकरवापेकडांची जुडी वगळावी अशारीतीनें लोटे बांधलेली राहाटाची माळ ती; २, अ० माळ तिघड होई असें लोटे बांधणें इ० कांचें वि०; ३, पु० रा० तीन फळांचा जो घड तो.

तिघडी, स्त्री० वस्त्र, कागद, इ० कांचे एकावर एक तीन पदर येईल अशी जी घडी ती; २, ३ लिं० तद्विशिष्ट जें वस्त्रादिक तो.

तिघें, पु० स्त्री० तिघी, न० तिघें, तीन व्यक्तिरूप जे मनुष्यादि जीव ते त्या तीं.

तिघेजणा, पु० तिघीजणी, स्त्री० तिघेंजणें, न० तिघें तिघी तिघें.

तिजा, ३ लिं० ग्रं० तिसरा.

तिजाई, स्त्री० तिसरा अंश ती.

तिजाईन, ३ लिं० तीन वेळा व्याली गाय, म्हैस, इ० पशू तो.

तिजांत्रा, ३ लिं० दोन दिवस मध्यें टाकून येतो जो ज्वर तो.

तिजारें, न० तृतीयदिवशीं जें हीव येत असतें तें.

तिजोर, पु० एकापगावर तीन मोहरी इ० कांचा

जो

जो जोर असतो तो; २, ला० काहीं एका कार्याविषयीं जें तिहारी साधन तो.

निजोरी, ३ लिं० निजोरा चे पगांत स्थित जो मोहरा इ० तो.

तिटकन, न० दे० तिटकारा.

तिटकरणें, तिटकारणें, कोणे का मनुष्यास किं० त्याचे गोष्टीस तिरस्कारणें.

तिटकारा, पु० सर्वथा ही गोष्ट नसावी असा जो मनांत द्वेषभाव उत्पन्न होतो तो.

तिटकारी, ३ लिं० तिटकारा आहे जास तो.

तिटवी, स्त्री० एक पक्षी आहे ती.

तिटाळी, स्त्री० को० अति उच्च वृक्षाचा जो केवळ उच्च प्रदेशीं चा भाग ती.

तिठणें, कों० दोर, सून, इ० आदीनें युक्त करणें; २, वळ, गबूं, इ० चौफुलीचा डागानें युक्त करणें; ३, अशक्तता, इ० कारणामुळें पाय फांकणें.

तिठा, पु० रा० दोरी, इ० कांस आदी पडत्ये तो; २, मार्गास दोन वाटा जेथें फुटल्या आहेत तो प्रदेश.

तिडक, स्त्री० शरीरास लागती जी ऐकसारिखी कळ ती.

तिडकणें, वायु, पडसें, इ० विकृति शरीरांत झाल्यामुळें सर्वांग किं० शरीरावयव व्यर्थनें युक्त होणें; २, रा० कांहीं एक व्यापारचा किं० अधिकरणीस्थिति चा तिटकारा आला असतां ही स्फुटका न होतां दुःख भोगीत तसेंच रहाणें

तिडका, ३ लिं० जो कोवळसा अग्नींत टाकिला असतां त्याचा ठिणग्या उडतांत त्यास ल्० ; २, रा० अने

अनेक प्रकारें दुसऱ्यास तिडण्याचा स्वभाव जाचा तो मनुष्य; ३, तीडआलीजास असा जो पलंग, बाज, इ० पदार्थ तो.

तिडकी, स्त्री० तिडीक.

तिडणूक, स्त्री० रा० कोणेकानें कोणएकास तिडण्याचा जो प्रकार ती.

तिडणें, पलंग, बाज, शरीरावयव, इ० कांचा सांध्याचीकळाशी विस्कळित होऊन वांकडेंतिकडें होणें; २, रा० अधिकारपरत्वें कोणेएकास विवक्षित दोषारोप करण्याविषयीं वांकड्यातिकड्या भाषणानें कोंडून धरणें.

तिडतिडणें, तिडतिडीनें युक्त होणें; २, कोवळसा, कोलीत, याणें जळते समयीं ठिणग्या उडतांमें तिडतीड शब्द करणें.

तिडतिडा, ३ लिं० तिडका प्रथमार्थी; २, तिडलेला जो पलंग इ० तो.

तिडतीड, स्त्री० क्रोधावेशानें अंतःकरणाची व्यग्रतारूप दशा होत्ये ती.

तिडा, पु० सूत्रादिकास जी आढी पडत्ये तो; २; परस्परस्नेहादि भावांत अंतर पडावयास निमित्तभूत जो अंतःकरणांत कांहीं कारणानें विषमभाव उत्पन्न होतो त्यास ल्० ; ३, रा० कांहीं एक गोष्ट अशास्त्रीतीनें ह्मावी असें दिसत असतां तीतशी होत नाहीं नेहमीं त्या अर्थापत्तीनें मनांत येतें जें प्रतिबंधकत्वास ल्० ; ४० देवानें प्रसाद द्यावा तो देतां नाहीं तस्मात् काहीं तिडा आहे; ४, ईषद्रुक्षें काष्ठादिक तो.

तिडी, स्त्री० रा० तिडा.

तिडीक, स्त्री० पोटसूळ. कपाळदुःखी, प्रसूतिवायु इ० कांमुळें उदरादिकांचेठायीं जो व्यथाविशेष होतो तो; २, कोहीं कार्यकरण्याविषयीं चीजी कळक कळ तो; उ० यास लग्नाची तिडीकच नाहीं लग्नून हा जोगावितो, कोणीएक काम तिडीक देवुनकरणें ल० तडीस जाईल तेव्हां सोडीन अशा निश्चयानें सदून करणें, कोणीएक काम एकेतिडकेनें करणें, ल० मध्येंथकलें असतांही विश्रामन घेतां तसेंच नेटानें करणें, तिडीक देणें, ल० प्रसूतिवायु, आमांश, एतत्संबंधि तिडीक येवुन वायूचें निःसरण व्हावयाजोगा नेट करणें, तिडकादेतबसणें, ल० कोहींएका संकटाचेठायीं स्फुरकान होतां दुःखभोगीत राहाणें, ल० एक तिडीकदे भाणि घरची धनीण हो.

तिडोळी, स्त्री० तीनछिद्रांचीजी नरडी ती, कदाचिद्विशेषणही होतें.

तितका, ३ लिं० विवक्षितत्यापरिमाणानें किं० संख्येनें जोपरिमित तो.

तितपत, ३ लिं० जितपतयाचें अनुयोगी; उ० तुला त्याजितपत उणेंपाहिजे तितपत आहे.

तितपर्यंत, अ० तिथपर्यंत.

तितपावेतों; अ० तिथपावेतों.

तिताल, पु० अनुक्रमानें तीनठोके वाजून मध्यें एकाठोक्याचें अवसान राहातें असा जो मापण्याचा ताल तो; २, ३ लिं० तद्विशिष्ट ध्रुपद, ख्याल, इ० तो; ३, मनस्वी उच्छृंखल पोर त्यास ल० .

तिताली, ३ लिं० तिताल द्वितीयार्थी.

तितिक्षा, स्त्री० सं० क्षमा.

तितुका, ३ लिं० यं० तितका.

तितुर, पु० कों० भांडें, वस्त्र, इ० कांस जें बारीक छिद्र पडतें तो; २, टोळासारिखा एक क्षुद्र जंतु आहे तो.

तिथचा, ३ लिं० विवक्षितजें तेंस्थल तत्संबंधी तो.

तिथपर्यंत, अ० विवक्षितजें तेंस्थल किं० काल त्यापर्यंत.

तिथपावेतों, अ० तिथपर्यंत.

तिथपासून, अ० तिथून.

तिथला, ३ लिं० तिथचा.

तिथवर, अ० तिथपर्यंत.

तिथवरी, यं० अ० तिथपर्यंत.

तिथवेगीं, अ० कों० तिथपर्यंत.

तिथि, स्त्री० दर्शतापासून दुसऱ्यादर्शतापर्यंत जें सूर्यचंद्रांचें द्वादशगत्यात्मक अंतर पडतें त्यामध्यें यागबारा अंश अंतरपडायास जितके काल विभाग लागतात ते म०।

तिथिपालन, न० अमुकतिथीस अमुक करूंनये असा जो धर्मशास्त्रांत सर्वतिथि विषयीं नियम सांगितला आहे तें; २, तिथिप्रभुकजें उपोषणादिक सांगीतलें त्याचें जी तिथि आहे तोंपर्यंत तो नियम राखावा सगळा दिवस राखूंनये असा जो प्रकार तें.

तिथिमतीम, अ० ग० धर्मकर्मविषयीं विशेषेंकरून संग्रहीत जानिथि त्यांचा शास्त्रीं; उ० यादेवाल यांनित्य पुराण होतनाहीं तिथिमतीम होतें

तिथिवासर, पु० द्वादशीचा जो आद्यचरण त्यास कोणी ल० .

तिथिवृद्धि, स्त्री॰ दिनवृद्धि ती ·

तिथिक्षय, पु॰ दिनक्षय तो ·

तिथून, तिथोन, अ॰ विवक्षित जो तो काल किं॰ स्थल त्यापासून ·

तिथे, तिथें, अ॰ त्यास्थली ·

तिदाणें, न॰ रा॰ स्त्रियांचे कंठांतील एक भूषण आहे तें ·

तिधारी, ३लिं॰ तीन आहेत धारा जास असा जो निषडंग तो; २, तीन आहेत धार्या जास असा जो धोनर जोडा इ॰ तो ·

तिनसांज, तिनिसांज, स्त्री॰ सूर्यास्त होण्याचा समय ती ·

तिनसांजा, तिनिसांजा, तिन्हिसांजा, स्त्री॰ तिनिसांज शब्दाचें हें अनेकवचन, एकवचनीं सर्वदेशीं प्रयोग नाहीं म्हणून हें लिहिलें ·

तिनसांजाँ, तिनिसांजाँ, तिन्हिसांजाँ, अ॰ तिनसांजा चा द्यायीं ·

तिपट, ३लिं॰ रा॰ तिप्पट ·

तिपदरी, ३लिं॰ तीन आहेत पदर जास असें घडी केलेलें वस्त्र, किं॰ घडी, किं॰ तीन पेडानी केलेली दोरी, वेणी, इ॰ किं॰ तिहिरी दोरी, दोर, माळ, इ॰ तो ·

तिपानी, ३लिं॰ तीन पानें जास आलीं अशा अवस्थेचें जें साड, अंकुर, तो ·

तिपायी, स्त्री॰ तिवई ·

तिपिकी, ३लिं॰ वर्षांत तीन पिकें जेथे होतात ती भूमि ·

तिपेडी, तिपेदी, ३लिं॰ तीन पेडानी केलेली जी दोरी, वेणी, इ॰ तो ·

तिपेरी, ३लिं॰ तीन आहेत पेरी जास असें जें बोट, इ॰ तो ·

तिप्पट, ३लिं॰ कोणेकपदार्थाची मूलभूत जी संख्या किं॰ परिमाण, त्यापेक्षां दुप्पट आणखी संख्या किं॰ परिमाण जांत अन्तिम आलें असा आलाजो पदार्थ तो; २, मध्यें दोन दुणी घालून तीनपदर एकाशीं एकत्र येत असें केलें जें वस्त्र, दोरी, इ॰ तो; ३, स्त्री॰ तिप्पटपणा ती ·

तिफांटा, पु॰ नदी, वृक्ष, मार्ग, यांस जा स्थळीं ती न फांटे फुटले आहेत तो प्रदेश ·

तिफांशी, ३लिं॰ तीन फांशानीं जो सोंगट्यांचा डाव खेळतात तो; २, तीन आहेत फांसे जास तो ·

तिबक, स्त्री॰ दांडूनें विटी उडवून खालीं न पडूं देतां तीन वेळां विटीस दोला लागला असतां जो डाव होतो ती ·

तिंबणें, कणीक भिजवून विशेष चिकट, मृदु, होई अशी मळणें ·

तिमजला, ३लिं॰ तीन आहेत मजले जास असें घर किं॰ शेला इ॰ वस्त्र तो ·

तिमणें, न॰ को॰ कोणी प्रस्तुत माणसी असतां तिचा माहेरचीं दाहावे दिवशीं एके पाभांत तांदूळ, गूळ, तूप, इ॰ जें आणितात तें ·

तिमिंगिल, पु॰ एक मत्स्यांत जाति आहे जो इतर मत्स्यांस गिळीत असतो तो ·

तिमिर, सं॰ न॰ अंधकार तें ·

तिरू, अ॰ शेजी, मेटी, हाकण्याचा शब्द आहे:

तिरकट, ३लिं॰ तिरवा किं॰ ज्याचे डोळे एक उंच एक नीच असे आहेत तो किं॰ त्याचा डोळा तो ·

तिरकत, पु० कों० तिरकती जें तारूं तो ·

तिरकती, ३लिं० तीनकाड्या जास असतात अस्सें जें मोठें गलबत तो ·

तिरकमठा, पु० तीर, आणि कमठा मिळून जें आयुध तो ·

तिरकमशेट, पु० तिरव्या मनुष्यास स्व०

तिरकस, ३लिं० चतुर्भुजादि क्षेत्रांतील जो कर्णतद्विस्थित तो; २. अ० त्या सूत्राप्रमाणें होई असें, कापणें, गमन करणें, पाहाणें, इ० कांचें वि०

तिरका, ३लिं० तिरवा; २, तिरकस ·

तिरकाटी, ३लिं० तिरकती ·

तिरकूट, न० मोहर्या, मेथ्या, हळद, इ० कुटून लोणचें इ० काचा उपयोगी जें चूर्ण करितात ते; २, एकेमताचे किं० एकेउद्योगाचे जे तीन मनुष्यादि पदार्थ तें; ३, कों० आपल्याकडील मुलगी कोणेकाचे घरीं द्यावी त्याकडील तिसर्याकडे देववावी आणि त्या तिसर्याकडची आपल्या घरीं करवी असा जो सोयरिकीचा प्रकार तें ·

तिरकोन, ३लिं० वा० तीन आहेत कोन जास तो ·

तिरगीमिरगीवर, अ० येणें, धा० म्र०, भाषणादि व्यवहार करीत असतां अरेतुरेवर किं० मारामारीवर येणें ·

तिरगूळ, पु० जे प्रायः नागवेलीचा पानावर उपजीविका करीत असतात अशी ब्राह्मणांत एक जाति आहे तो ·

तिरडा, पु० रा० तेरडा तो ·

तिरडी, तिरदी, स्त्री० तारीद्वितीयार्थी ·

तिरडें, न० शीग येई तोंपर्यंत भरलेली जी गोंयर्यी

यर्यी पांटी तें ·

तिरणें, पोहणें ·

तिरतिरा, तिरतिर्या, ३लिं० रा० एकेकार्यावर किं० एकेस्थलीं स्थिर राहात नाहीं अशा स्वभावाचा जो मनुष्य तो ·

तिरंदाज, ३लिं० तीरमारण्यांत जो कुशल तो ·

तिरंदाजी, स्त्री० तिरंदाजाचें कर्म ती ·

तिरपगडा, तिरपगडें, पु०न० दुपांशीरवेळांत एकापांशावर एक आणि दुसर्यावर तीन पगडे असा जोडाव पडतो तो तें ·

तिरपणें, ग्रीवादि किती एक शरीरावयव वांकडा पडून कांहीं आघातादि झाल्यामुळें आंतील शीर दुखवून कळेनें युक्त होणें ·

तिरपा, ३लिं० तिरकस ·

तिरपावणें, तिरपणें ·

तिरपीट, स्त्री० कों० जेथा स्त्री लिंगार्थी, ग० कोणेकानें तिरपिट होणें स्व० कोणेकाचा भयामुळें सर्व आस्था सोडून पळून जाणें ·

तिरपेल, न० एक औषधी तेल आहे ·

तिरफल, स्त्री० कों० एक वृक्ष आहे; २, न० त्याचें फल तें ·

तिरमणें, न० वा० सामर्थ्य; उ० बरें काय चिंता आहे तुझीं तिरमणें मीपाहीन इ० प्रौढीनें दाबटा कायाचा असतांच म० अने० व० ·

तिरमल्ली, तिरमल्या, पु० करनाटकी शूद्रांत एक जाति आहे ·

तिरमिरणें, वा० तिरमिरीनें युक्त होणें ·

तिरमिरी, स्त्री० मर्मस्थानी आघात किं० अग्नि,

तिरव

तिरवट, यांच्या संयोग कि० पित्तादि क्षोभ झाल्या मुळें तेंदुःख ब्रह्मांडीं जाउन जीमूर्च्छा येत्येती; रा० तीक्ष्ण, उष्ण, पदार्थ मर्मस्थानी संयुक्त झाल्यामुळें मस्तक सणसणाया जोगी जी ब्रह्मांडांतवेदना शिरत्ये ती ·

तिरवा, ३ लिं० जास समोरचा पदार्थ दिसत नाहीं असा जो डोळा कि० तद्विशिष्ट मनुष्यादि तो कि० त्याचें जें वक्र अवलोकन तें ·

तिरशिंगराव, पु० दुसऱ्यांशीं मिळून राहूं नये आणि थोडया कारणानें चिरडीस येउन मोडण्याचा साहसी प्रवर्त्तावें अशा स्वभावाचा मनुष्य स्त्री० ·

तिरशिंगी, तिरसंगी, स्त्री० एक पुष्पवृक्ष आहे, जास नित्य तीन वेळ पुष्पें येत असतात ती

तिरसट, ३ लिं० तिरशिंगराव ·

तिरस्कार, पु० तिटकारा; २, कोणी एक मनुष्य, वचन, इ० कांचा तुच्छबुद्धीनें जो अनादर तो ·

तिरस्कारणें, कोणेकास तुच्छबुद्धीनें अनादर विषय करणें ·

तिरस्कारी, ३ लिं० कांहीं एक गोष्टी विषयीं एकवार तिरस्कार आला असतां पुनः कदापि त्या गोष्टी विषयीं त्याचा लेपणा मनांत येत नाहीं कि० यत्किंचित् कारणानें जास तिरस्कार येतो अशा स्वभावाचा जो मनुष्य तो कि० त्याचा स्वभाव ·

तिरस्कृत, ३ लिं० तिरस्कारिला जो तो ·

तिरस्थळी, ३ लिं० प्रयाग, काशी, गया, या तीन क्षेत्रांची जी यात्रा ती; २, ला० कांहीं एका कार्या करितां इकडून तिकडे तिकडून इकडे तेथून तिसरे कडे अशे हेलपटे घेण्याचा जो व्यापार त्यास स्त्री०; ३, एक्या • एक्या सोईनें असावयाचे जे पदार्थ त्यांची अनेक स्थलीं गैरसोईनें जी स्थिति ·

तिरळा, ३ लिं० तिरवा ·

तिराईत, ३ लिं० तीरमारण्यांत कुशल तो; २, रा० पु० तिऱ्हाईत ·

तिरी, स्त्री० तिरूक प्रथमार्थी ·

तिरीप, स्त्री० सूर्यसंबंधी उन्हाचा जो संबंध तो ·

तिरुका, पु० पावआणा, स्त्री० सरूरवुरूसापिका आणि नकटा तिरुका ·

तिरूक, पु० तिसरे घरीं सोंकटी बसावयाजोगा जो फांशांचा डाव पडतो तो, त्रिकयाचा अपभ्रंश परंतु गुणनादि प्रसंगीं याचा प्रयोग क्वचित् येतो; उ० एके तिरकें तीन, तिरकीं तीन ·

तिरोधान, न० अंतर्धान ·

तिरोहित, ३ लिं० अंतर्हित ·

तिर्यक्, ३ लिं० तिरकस; २, मनुष्य, देव, इ० वर्जून अवशिष्ट जे पशु पक्षी, इ० प्राणी तो, याअर्थी तिर्यक् योनि, तिर्यक् जाति, इ० समास होतात ·

तिऱ्हाईत, पु० परस्परांनी करावयाचे जे वादप्रतिवाद, क्रयविक्रय, इ० व्यवहार त्या व्यवहारांचा जास संबंध नाहीं असा जो तिसरा कोणी तो ·

तिल, पु० सं० तीळ; २, कांहीं एक पदार्थास केवल अल्पप्रमाणत्वें वर्णावयाचें असतां हें प्रमाण घेतात; उ० तिलतुल्य, तिलप्राय, इ०

तिलक, पु० टिळा; २, जाजाति, वंश, इ० कांचा ठायीं जो श्रेष्ठ पुरुष त्यास त्याचा जात्यादि कांचा ठायीं आरोपानें स्त्री०; उ० रघुकुलतिलक ·

तिल्लाणा, पु० तराणा.

तिवई, स्त्री० वर्तुलाकार फळी, ताम्बादिकाचा पत्रा, वलय इत्यादिकांस तीनपाय लावून नैवेद्याचें ताट, अभिषेकपात्र, इ० देवावयासाठीं जो आधार करितात ती.

तिवट, न० पागोटें परंतु व्यवहार संकुचित याद, चोपडी, इ० कांत मात्र येतो.

तिवटा, पु० कों० मार्गास जेथें दोन फांटे फुटले आहेत तो प्रदेश.

तिवडा, पु० कों० धान्याचीं मळणी कादावयासाठीं खळ्यांत जो स्तंभ पुरिला असतो तो.

तिवण, स्त्री० त्रिदल ती.

तिवणाना, २ लिं० ग० तिघडी केलेलें वस्त्र, कागद, इ० तो.

तिवर, पु० तिवीर.

तिवस, पु० एकवृक्ष आहे.

तिवाठा, पु० तिवटा.

तिवाशा, पु० टेंकावया करितां एकप्रकारचा नक्शा करितात तो.

तिवीर, पु० कों० खाडीचे कडेस उत्पन्न होणारा भाताएक वृक्ष आहे.

तिवेळा, तिवेळा, तिवेळी, अ० प्रातःकाल, मध्यान्हकाल, आणि सायंकाल, या तिन्हीं वेळांचा ठायीं.

तिवा, पु० ज्याजवर तीन चिन्हें आहेत असें नेंगजिफेचें पान तो.

तिव्हा, पु० धान्यादि उपणावयाकरितां करितात जी तिवई तो.

तिशी

तिशी, स्त्री० एकजातीय तीसपदार्थांचा समुदाय ती.

तिशीं, अ० त्रिंशद्वृत्तिकाजें दिनमान त्याचेठायीं किं० त्रिंशद्वर्षात्मक जो समुदाय त्याचेठायीं.

तिष्ठणें, क्रि० कोणीकानें क्वचित्स्थळीं कोणाची प्रतीक्षा करीत स्तब्धराहणें.

तिसकूट, स्त्री० वा० उभयतांचे भाषणांत जीतिडी असत्य ती.

तिसकुडु, २ लिं० रा० कोणाचा अंतःकरणाशीं जाचें अंतःकरण मिळत नाहीं अशास्वभावाचा जो तो वस्त्याचास्वभाव

तिसड, स्त्री० तांदूळ अतिस्वच्छ व्हावे स्तव तिसर्यानें सडण्याचा जो व्यापार ती; २, २ लिं० तिसडी.

तिसडा, २ लिं० तिसडी.

तिसडी, २ लिं० तीनवेळ सडून केवळ सडीक केलाजो तांदूळ तो.

तिसमारखान, पु० कोणी एक शूरमनुष्य पृथ्वींप्रसिद्ध होता आतां विपरीत लक्षणेनें अंगीशौर्यनसतां शूराचा आव घालितो त्यास स्तव.

तिसरा, २ लिं० तृतीय तो.

तिसाला, तिसाली, २ लिं० अव्यवहित तीनजीं वर्षें तत्संबंधी हिशेब बाकी इ० तो.

तिसोवा, २ लिं० क्रमानें मोजिलें असतां तीसया संख्येचा जो विषय तो.

तिसुती, २ लिं० तीनसुतें एकत्र गुंफून केलाजो दोरा तो; २, स्त्री० यज्ञोपवीतार्थ त्रिगुणित केलें जें सूत्र ती; ३, ला० तिरकूट तृतीयार्थी.

तिस्मा

तिस्सा, न० नवव्यासंख्येचें आरबीनाव परंतु सा-व्यांचेसंख्येविषयीं याची प्रसिद्धि.

तिस्सेन, न० नवद्व्यासंख्येची आरबी संज्ञा परंतु साव्याविषयींच प्रसिद्धि.

तिहीरी, तिहेरा, वि० तिपदरी, तिप्पट.

तिहोत्रा, पु० शेंकडा तीनरुपये प्रतिमासीं द्यावे असाजो व्याजाचा संकेत तो.

तिळई, स्त्री० तिळांतल एकभेद आहे तो.

तिळकूट, न० मोहर्या, मेथ्या, इ० किं० केवळ का-ळ्या तीळकुटून भाजी इ० उपयोगी चूर्ण करितात तें.

तिळकोंद, स्त्री० कोंद.

तिळगूळ, पु० मकरसंक्रांतीचे दिवशीं ब्राह्मणास द्यावे लाडावे इत्यादि अर्थ गुळाचें कि० साकरेचें जे तीळमिश्रित करितात तो.

तिळतिळी, स्त्री० तिकतिकी.

तिळतिळीत, वि० तेलादिकांनें लिप्त किं० स्नि-ग्ध जेनें युक्त झाल्यामुळें तेजो विशेष युक्त दिसतो जो शरीरादिपदार्थ तो.

तिळपुष्प, न० कों० संकेतानें नेमांत जें फूल प-डतें त्यास ल०

तिलप्राय, तिळप्राय, वि० केवलजें अल्पप्र-माण तेणेंपरिमित तो; उ० सोमल तिलप्राय खाल्लाअसतां विकार होतो, हाताला तिळप्राय ऐकत नाहीं

तिळबडी, स्त्री० रा० तिळांची लोंडी लावायाकरि-तां करितात जी वडी

तिळाजुणी, न० स्त्री, पुरुष, सेव्यसेवक इ० कां-चा परस्पर एकमेकांवर जो प्रीतिभाव तें, जेणें करून एकमेकानें केलेलें एकमेकास अत्यंत रु-चतें, ये, अस, धा० भ०, कोणेकास कोणी येक तिळाजुणी येणें ल० त्याचा आणि त्याचा प्री तिभाव होई असें आनुकूल्य होणें.

तिळी, स्त्री० कों० पांदर्या तिळांतल एकभेद आहे तो.

तिळीं, भ० असणें, याचा योगीं नयोग, कोणेकास-नुष्यानें कोणेकास धारजिणें असणें.

तिळेल, तिळ्येल, न० तिळाचें जें तेलतें.

तीरव, न० कों० तिरवट, वि० तद्विशिष्ट. हा शब्द शूद्रादिकांचा बोलण्यांत येतो.

तीज, स्त्री० तृतीया.

तीट, स्त्री० बालकादिकांस पिशाचादिकांचा उपद्रव नका-व्या ल्पून मशीचादिका जो कपाळीं लाविलात तो.

तीड, स्त्री० तिडी.

तीथ, स्त्री० तिथियाचा अपभ्रंश.

तीन, वि० तीन तेरा गोष्टी सांगणें ल० स्करीत पणाचा मार्ग टाकून दांडगाईचें भाषण करूं ला-गणें.

तीननुकडी, वि० कों० केवळ बारीक असून अ-शक्त जीवोरी, सून, नजर, इ० तो.

तीर, न० تیر हिं० समुद्र, नदी, इ० कांचा को ठ कि० त्याकांठाकडील सर्व आसपासचा प्रदे-श तें; २, पु० धनुष्यानें मारावयाचा जो बाण तो; ३, स्तंभादिक असा बसविला नसेंच त्याणें तेथें राहावें ल० अवष्टंभार्थ जेंनिरकमलांकडे उलाविलात तो; ४, तुळई, इ० उचलावयाची

असतां त्याम काष्ठाचा जो नेदावा देतात तो ·

तीरकमठा, पु॰ तिरकमठा ·

तीरकमाण, तीरकमान, स्त्री॰ तीरकमठा ·

तीर्थ, न॰ गाउदकानें स्नानादिकर्म केलें असतां विशेष पुण्य लागतें, पापक्षय होतो, अशीं जीं भागीरथी, गोदावरी, नर्भास, इ॰ शास्त्रप्रसिद्ध जलें आहेत तीं म॰; २, शालग्रामादि देवांचें जें स्नानोदक कि॰ ब्राह्मण, सन्यासी, गुरु, इत्यादिकांचें पादोदक, इ॰ जें पुण्यकारक उदक तें; ३, तीर्थकरणें स्न॰ गंगादितीर्थास जाउन स्नानादि यात्रा विधि करणें ·

तीर्थगंडी, तीर्थगिंडी, स्त्री॰ देवादिकांचें तीर्थ देववयाची जी गिंडी असते ती ·

तीर्थपात्री, स्त्री॰ देवादिकांचें तीर्थ देववयाचें जें लाहानपात्र असतें तें ·

तीर्थप्रसाद, पु॰ साधु, गुरु, इ॰ कोणी देवदर्शनार्थ कि॰ कथादिश्रवणार्थ आला असतां त्याम तीर्थ, आंगारा, देवावरील निर्माल्य, इ॰ रुप जो प्रसाद देतात तो ·

तीर्थयात्रा, स्त्री॰ स्वदेश सोडून तीर्थोद्देशानें जी यात्रा ती ·

तीर्थराज, पु॰ समुद्र, आणि प्रयाग हे म॰ तो ·

तीर्थरूप, पु॰ पिता तो; २, पत्नी उभयतां माता पितरांस स्न॰

तीर्थवटी, कों॰ स्त्री॰ तीर्थपात्री ·

तीर्थविधि, पु॰ तीर्थी गेलें असतां क्षौर, श्राद्ध, इ॰ कर्म करावें लागतें तो ·

तीर्थश्राद्ध, न॰ तीर्थास गेलें असतां जें श्राद्ध करितात तें ·

तीर्थस्वरूप, वि॰ आपल्याम नात्यानें बडील असा जो पितृव्य, मावशी, बडील बंधु, इ॰ जास पत्रादिलेखनी लिहितात कि॰ स्नुषा तात ·

तीर्थाटन, न॰ अनेक तीर्थयात्रा करीत फिरण्याचा जो व्यापार तें ·

तीर्थोटी, स्त्री॰ कों॰ तीर्थपात्री ·

तीर्थोपवास, पु॰ तीर्थास गेलें असतां तद्दुद्देशानें यात्रेकरू जो उपवास करितात तो ·

तीर्थोपाध्या, तीर्थोपाध्याय, पु॰ तीर्थविधि करितां जो तीर्थी उपाध्याय करितात तो ·

तीव्र, वि॰ प्रखर तो ·

तीस, वि॰ ३० ·

तीळ, पु॰ तेल, मसाला, इ॰ उपयोगी धान्य आहे जाचे चार पांच भेद आहेत; २, तदाकार काळा मनुष्याचे अंगावर डाग असतो, कोणे कांचे अंगाचे तीळ पाडून होणें स्न॰ कोणे कानें केले तीशोष मनास न आल्यामुळें क्रोधानें संतप्त होणें, तीळ खाउन व्रत मोडणें स्न॰ अल्प विषयाचे लोभानें करावयाची नव्हे जी गोष्ट ती विषयीं प्रवृत्त होणें, याला तिळभर समजत नाहीं, इ॰ स्थलीं तिलप्राय असा अर्थ · स्न॰ शेजीची केली आस आणि तिळ तुटे मास ·

तीक्ष्ण, वि॰ सं॰ तिखट, प्रथम द्वितीयार्थांचें न ·

तुई, स्त्री॰ अरीचा दाला सारिखा अरुंद पदार्थ आहे जो चोळी, पिस्वाद इ॰ कांस शोभार्थ लाविनात तो ·

तुक

तुकडमोडया, ३ लिं० संसाराची काळजी वकाम धंदा करीत नाहीं केवल भोजन करावयाचे मात्र उपयोगी असा जो मनुष्य त्यास ल्ह० ·

तुकडा, पु० पदार्थमात्राचें जें शकल तो; २, पोळी वडा, पुरी, इ० जें पक्वान्न तो. कोणी एक गोष्टी विषयीं तुकडा तोडून देणें, ल्ह० त्याभागीभान धरितां स्पष्ट उत्तर करणें ·

तुकडी, स्त्री० सैन्य फुटोन जा अनेक टोळ्या होतात त्या प्र० ·

तुकणें, अ्रं० ओरखणें; उ० तयाचे तुकीं कोणद्द जा तुकावा ·

तुकतुकी, स्त्री० वृक्ष, मनुष्यादि शरीरीं शक्ति असल्यामुळें जी तेजगी दिसत्ये ती ·

तुकतुकीत, ३ लिं० तुकतुकीनें युक्त देहादि तो ·

तुकावणें, स० कों बडा, सरडा, मनुष्य, इ० कानीं मान वर उचलून मागें पुढें होई अशी डोलविणें ·

तुकीं, अ० अ्रं० तुल्यता परीक्षार्थ तुळण्या विषयी ·

तुक्कल, स्त्री० कनकावळ्या सारिखी एक वाडी आहे ती

तुक्का, पु० जास टोक नाहीं असा जो तीर तो; २, ल्ला० कार्य साधेल तर होउ न साधेल तर न होउ अशा बुद्धीनें कोणे काबर टाकावाचा जो शब्द त्या प्र कि० दुसर्‍याचे मर्मास लागावा जोगा जो कोणे कानें उक्त शब्द त्यास ल्ह०, टाक, मार, धा० प्र० ल्ह० लागला तर तीर नाहीं तर तुक्का ·

तुच्छ, ३ लिं० जा मध्यें मान्यता यावयाजोगा जो तत्संज्ञा लक्षून धर्मविशेष असतो तो नाहीं असा जो पदार्थ तो, येथें मानणाराचे योग्यतेवरून कि० सजातीय इतरपदार्थाचे उत्कृष्टतेवरून त्या तत्संज्ञांचा नियम होतो ·

तुटओल, न० कों० पर्जन्यास बहुत दिवस लाग्यामुळें राहिलेंजें जमिनीस थोडें ओल तें ·

तुटक, ३ लिं० मधील वाक्यादि गेल्यामुळें पूर्वापर संबंध जाचा जुळत नाहीं कि० जाचा अन्वय ओढून ताणून अध्याहारादिकानें करावा लागतो असा जो ग्रंथ, भाषण, इ० तो, मध्येंमध्येंखंडित जाला असा जो मार्ग, रेषा, इ० तो; २. दुसर्‍याचेंमन जेणेंकरून तुटतें असें जें स्खलद्रूपित भाषण कि० नादेश भाषण करण्याचा कोणाएकाचा स्वभाव कि० तो मनुष्य तो; ३, पृथ्वी एकत्र असून कांहीं कारणामुळें भिन्नभिन्न जाला जा भनेकांचा व्यवहार तो; ४. दे० मानेचें स्तनपान तुटतें जाणें सोडिलें असें जें बालक तो ·

तुटका, ३ लिं० तुटून छिन्न जालेला जो पदार्थ तो, प्रायः नगार, दोरा, बाधी, शरीरावयव इ० कांचा ठायीं प्रसिद्धि; २, तुटक प्रथम हिंयार्थी ·

तुटणें, शस्त्रादिकानें कि० नाणणें इ० कारणानें पदार्थ छिन्न होणें; परंतु चिरणें. कापणें, फाटणें, इ० विशेष धातूंचा विषयीं यासामान्य धातूंचा प्रयोग विशेष विवक्षा असतां होत नाहीं, २, यत्परिमाणत्वेंकरून अनुभूत जो पदार्थ त्याणें तदल्पपरिमाणत्वेंकरून अनुभवास यावयाजोगी न्यून ता पावणें; उ० त्यामापानें मोजून आणिलेलें यामापानें दोनशेर तुटलें, ओल्याचारा नाहीं साहोतांच गाईचें दूध तुटलें; ३, परस्पराचा जो कोहींएक संबंध असतो तो नाहीं साहोणें, त्यासंबंधाचा अभावामुळें नेसंबंधी निराळे निराळे

राळे होणें; मैत्री, देष, इ० कांसही संबंधत्व आहे स्र० मैत्री तुटली, इ० प्रयोग होनो; ४, कों० माळ, मैदान, इ० चालण्यानें आक्रमित होणें; ५, सरळ भाषणाची रीति सोडून कोणे काचे अंगावर कोधावेशानें तुटक भाषण करणें, याअर्थी तुटून पडणें असाही प्रयोग होनो, कांहीं एक कामावर तुटून पडणें स्र० झटून प्रवृत्त होणें, मन तुटणें स्र० जाजवर प्रीति आहे तेथें कांहीं विरुद्ध भाल्यामुळें मनानें अन्यथा भाव पावणें, जीव तुटणें स्र० उत्कंठेनें किं० शोकानें व्याकुळ होणें, कों० मेस, गाय, इ० दुधाला तुटणें स्रणजे दूध तुटणें, मनुष्यादिकानें खाण्याला तुटणें स्र० क्षुधापर्यंत खाणें न मिळे अशा अवस्थेत पावणें, स्र० फुटलें मोतीं तुटलें मन सांधूं नशके विधाता ·

तुटपांजुस, पु० पावसाचे पतनाचा भरंजाउन कधीं पडतो कधीं नाहीं अशा दशापावलाजो पाउस तो ·

तुटपाणी, न० कों० उंस, यांगी, इ० जिन्नबास य थाकथंचित त्यांचा जीवजगे इतकेंच जें पाणी देनान तें ·

तुटपुंजा, वि० तुटपुंजीचा व्यवहार करितो तो मनुष्य ·

तुटपुंजीचा, वि० थोडक्या भांडवलानें करितान जो साबकारी, उद्योग, इ० व्यवहार तो; २, तो करणारा मनुष्य ·

तुटमितीनें, अ० अधमर्णानें उत्तमर्णास जादिवशीं कांहीं द्रव्य परत आणून दिलेनें मूलद्रव्यांत उणें करून बाकी राहील तितक्या तितक्याचें त्या त्यादिवसापासून अशाप्रकारानें व्याज करणें, इ० कायें वि० ·

तुटमाळ, वि० कों० तुटक हिनीयार्थी ·

तुटारी, स्त्री० वा० वृद्धपणानें कि० अशक्तपणानें प्राप्त झालीजी अशक्तता ती ·

तुडतुडणें, भाजायाकरितां खापर इ० कांत घातलाजो चणा इ० दाणा त्यांनें तुडतुड शब्द विशिष्ट होणें ·

तुडतुडा, पु० एकवन्यवृक्ष आहे तो; २, एक क्षुद्र जंतु आहे ·

तुडवणें, तुडविणें, कांहीं एकपदार्थ पाराघानें करून चुरे, मळे, कि० तदंशपायांस चिकटे असावरपाय देउन करणें; उ० यानें शाल जोडी तुडविली, उष्टी तुडविली, कोणा एकास लाना बुक्यानीं तुडविला स्र० मारला ·

तुडस, वि० गो० तुटसाळ ·

तुडुंब, तुडुंब, न० घोडयावरचीजीनगारा ने, अ० परिपूर्ण होई असें, भरणें, फुगणें, होणें, इ० कांचें वि० उ० ही विहीर तुडुंब भरली आहे ·

तुणणावळ, स्त्री० तुणण्याचें जें मोल्य ती ·

तुणणें, फाटलेले वस्त्रांत सूत भरून तें पूर्ववत् धडकरणें ·

तुणतुणें, तुणतुनें, न० गोंधळी, शाहीर, इ० कांचें एकातारीचें एकवाद्य आहे तें ·

तुणतुण्या, पु० गोंधळी, इ० कांचे मागें तुणतुणें वाजविता तो; २, स्त्री० बोलल्या गोष्टीचा पाठीमागून अनुवाद करण्याचा स्वभाव जाचा त्यास स्र०

तुणतुणा, अ० तुणतुण्याचे नादीने शब्दाचें अनुकरण.

तुणवाई, स्त्री० तुणणावळ ती.

तुणाई, स्त्री० तुणवाई.

तुणीव, १लिं० तुणलेलें जें वस्त्र तो.

तुतारी, स्त्री० पितळेचें मुखानें वाजवावयाचें एक वाद्य आहे ती.

तुनी, स्त्री० एक फलवृक्ष आहे ती.

तुनें, न० तुनीचें जें फल तें.

तुंद, १लिं० यथेष्ट पोटभर भक्षावयास मिळाल्यामुळें इतर पदार्थांची अपेक्षा जास्त राहिली नाहीं तो, प्रायः पशुवृत्ति; २, भोग, आफू, इ० आमला मध्यें जो गुंग तो; ३, ना० इच्छादि मदानें जो मगर्व तो.

तुंदिल, १लिं० दोंदील तो.

तुपकडया, पु० रा० एक लाहानसें झाड आहे तो.

तुपकदणी, रा० स्त्री० लोणी कढवावयाचें मृन्मय पात्र असतें ती.

तुफान, न० طوفان हिं० समुद्रक्षोभावा, वृक्ष मोडावे, इ० व्हावया जोगी जी वायूची क्षुब्धता होत्ये तें; २, कोणा एकावर घेतलेलें जें कुफराण तें; ३, २लिं० क्षुब्ध जो समुद्र, नदी, वायु, इ० तो; उ० आज नदी तुफान झाली आहे, तारुण्यादिमदें करून शोभायुक्त आणि पुष्ट असा जो घोडा, हत्ती, बैल, स्त्री, पुरुष, तो; उ० हा घोडा काय तुफान आहे: ४, न० अश्व, बैल, इ० मर्दानें जा वेश करितो तें.

तुफानरवोर, १लिं० दुसऱ्यावर कुफराण घेण्याचा स्व

स्वभाव जाचा तो.

तुफानी, १लिं० तुफानरवोर तो.

तुंब, न० वेलराहाटास चक्राकृति जें काष्ठ असतें जा मदांने असतात तें; २, रा० तुंबारा तो.

तुंबक, न० स्त्री० वा० बंदूक.

तुंबजोड, तुंबजोडी, पु० स्त्री० दोहों तुंबांचा जो जोड तो.

तुंबडी, स्त्री० शरीरांतील रक्त, किं० वायु, कादावयाचें एक नळी सारिखें यंत्र आहे ती; २, गोसावी बैरागी, इ० कांचें एक भोंपळयाचें किं० काष्ठाचें पात्र असतें ती. कोणे काची तुंबडी भरणें स० पाहिजे तितकें द्रव्य मिळणें असा अर्थ.

तुंबणें, सतत चालत्या जो उदक, वायु, इ० पदार्थ किंवा निरंतर होणारा जो व्यापार, त्याचा अग्रिम गति, इ० कांचा प्रतिरोध झाल्यामुळें त्याणीं नि रुद्ध होउन जमून राहाणें; उ० नदी ला पूर आल्यामुळें गांवांत तुंबलीं.

तुंबरगहाट, पु० कों० कनेकडास भोंवतें तुंबवस वून त्यास रंबेमारून जो राहाट करितात तो.

तुंबरसडु, स्त्री० ग० गांधिलमाशींत एक भेद आहे ती.

तुंबळ, १लिं० फार मोठा जो कज्जा, युद्ध, यांचें वि०.

तुंबा, पु० पांढरा भोंपळा किं० काष्ठ यांचें जें मोठें पात्र करितात तो; २, तुंबारा; ३, एक झाड आहे तो.

तुंबाडा, पु० रा० तुंबून राहिलेल्या जलादिकांचा प्रतिबंध नाहींसा झाल्यामुळें एकदोन संवेग

मोठा प्रवाह चालतो तो; २, तुंबारा तो.

तुंबारा, पु॰ पाणी, इ॰ तुंबून राहावें, स्र॰ मोरी, इ॰ कांचे छिद्रांत, बोळा, वृक्ष, इ॰ घालितात तो; २, त्याणें गतिनिरोध झाल्यामुळें उदकादिकांस तुंबून राहावयाची अवस्था प्राप्त होते तो.

तुमान, स्त्री॰ ◌ॅ॰ हिं॰ इजार.

तुमुल, वि॰ सं॰ तुंबळ.

तुरकाढी, स्त्री॰ रा॰ तुऱ्हाटी.

तुरग, तुरंग, पु॰ सं॰ अश्व.

तुरंगम, पु॰ सं॰ तुरग.

तुरट, वि॰ तुरटी, हरीतकी, रूपारी, इ॰ कांचा जो रस तो; २, तद्विशिष्ट जो पदार्थ तो.

तुरटाई, स्त्री॰ तुरटपणा तो.

तुरटी, स्त्री॰ एक क्षार विशेष आहे तो; २, कों॰ वाळलेली कोंचळी आंब्याची जी करवुंदी तो.

तुरपणें, वस्त्राचा शेवट आंत दुमडून घेऊन शिवणें.

तुरंबणें, क्रि॰ काहीं एका वस्तूची आसमरजलाय ली त्यास ती वस्तू न देतां खोळंबवून धरणें.

तुरा, पु॰ पागोटें, टोपी, इ॰ कांस लावावयाकरितां मोतीं, फुलें, बेगड, इ॰ कांचें जें भूषण करितात तो; २, राजगिरा, मका, कुंस, इ॰ कांस जो पुच्छविशेष येतो तो; ३, नाचण्याचे कवितेमध्यें नायकानें नायिकेचे आलंबन असावें अशा प्रकारें शृंगारवर्णन करावा असा एक शाहिरांत संप्रदाय आहे तो; कोणे कानें तुरा लावणें स्र॰ आपलीच आपल्याकडून प्रशंसा व्हावयाजोगें मोठें यश मिळविणें कि॰ वाद, युद्ध, इ॰ कांत जय मिळविणें; कोणे कानें तुरा लावून फिरणें, स्र॰ कांहीं आपल्यावर अपराधादि दोषांचा निरास झाल्यामुळें कि॰ त्या दोषाची गणना न करितां प्रसिद्धपणें डोलानें वागणें.

तुराठी, स्त्री॰ तुरीची काठी ती.

तुरीय, वि॰ सं॰ चतुर्थ तो.

तुरीययंत्र, न॰ रचनाचातुर्थांशरूप काष्ठादिकांचें यंत्र दिवस किती आला इ॰ जाणण्याचें उपयोगी आहे तें.

तुरीयावस्था, स्त्री॰ सं॰ जाग्रत्स्वप्नसुषुप्तिगत द्विलक्षण जी चौथी अवस्था ती.

तुरुंग, पु॰ कारागृह तो.

तुरुतुरु, अ॰ पाउल विशेष लांब पडूं नये परंतु अतिवेगें उचलत असावें अशा प्रकारें चालण्याचें वि॰; २, रा॰ फार त्वरित परंतु मोठ्यानें न करे अशा प्रकारें बोलण्याचें वि॰, या अर्थी प्रायः निदर्शनि.

तुरुतुरूकन, तुरतुरूकर, तुरुतुरुकदिशीं, अ॰ तुरुतुरु.

तुरूत, अ॰ एकदां कि॰ तत्क्षणीच, स्र॰ तुरूत दान आणि महापुण्य.

तुरेवाला, वि॰ तुर्काचे संप्रदायाचा जो शाहीर तो.

तुर्कीचाल, स्त्री॰ तुरुतुरु जी अश्वाची चाल ती.

तुर्रे, न॰ रा॰ भाताचा एक भेद आहे तो.

तुऱ्हाटी, स्त्री॰ तुरी चिजी काठी ती.

तुलना, तुळणा, स्त्री॰ परस्परपदार्थांची तुल्यता, अतुल्यता, समजावा करितां तोलणें, इ॰ जो

जो व्यापार ती; उ० कोणाएका मार्मिकांस हे दोन्ही श्लोक दाखवा म्हणजे तो यांची तुलना करील;२, कोणे काशीं कोणे कास जें कांहीं एक गुणसाम्य असतें जेणेंकरून तेपरस्पर सदृशअसें म्हणतां येतें तो; उ० कोल्हास बाघाची तुलना कदापि यावयाची नाहीं.

तुलसी, स्त्री० तुळस.

तुलसीपत्र, तुळशीपत्र, न० तुलसीचें जें पान तें;२, ला० दक्षिणा देत्येसमयीं दिनयानें पात्राचे योग्यतानुरूप हीदक्षिणा नव्हे असें मानून त्या दक्षिणेस म्ह०.

तुलसीविवाह, तुळशीविवाह, पु० कार्तिकशुद्ध द्वादशीस विष्णुमूर्ति आणि तुलसी यांचा जो विवाह करितात तो.

तुलसीवृंदावन, न० तुलसीचें जें वृंदावन, अंगणादिकांचे ठायीं असतें तें.

तुला, तुळा, स्त्री० सं० तागडी ती;२, मेषादिक राशींतील सप्तम जी राशि ती;३, पापक्षयादिकारणार्थ विधिपूर्वक आपल्या शरीराचे भारंभार रूपवर्ण, गौष्य, शर्करा, लवण, इ० ब्राह्मणादिकांस विभागून देतात असें कर्म आहे ती;४, शतपलात्मक जें उन्मान ती.

तुलादान, न० तुला तृतीयार्थी.

तुलित, वि० सं० तागडी, इ० कानें तुलना जाची सा ली तो.

तुल्य, वि० सं० ज्याशीं जो समानधर्मा तो त्याशीं;२, काहीं एका परिमाणाशीं कि० संख्येशीं जो न्यूनाधिकभावरहित तो; उ० तेथून प्रस्थ

तुल्य

तुल्य धान्य घेतलें.

तुशारखडक, पु० ज्या रवडकाचा दगड केवळ फुसफुशीत तो.

तुशी, पु० शालजोडी, रेंस, धुसा, यांचे रंगांतर एक भेद आहे तो;२, वि० तद्विशिष्ट जें वस्त्र तो.

तुष, पु० सं० धान्यावरील जें टरफल तो.

तुषार, पु० सं० वातादिकानें केवळ बारीक उदकाचे जे कण उडतात तो;२, दहिंवर.

तुष्ट, वि० सं० संतोषंकरून जो युक्त तो.

तुष्टणें, तुष्टहोणें.

तुष्टि, स्त्री० सं० तुष्टता.

तुष्यतुदुर्जनन्याय, पु० सं० आग्रहधरावयाजोगी न्याय्य जरी गोष्ट आहे तथापि प्रसंग विशेषीं तिचीउपेक्षाकरावी अशाअर्थाविषयीं दृष्टांत घेंकरून गृहीत जी दुर्जनाशीं वादप्रसंग आला असतां उपेक्षाकरावी अशी शिष्टलोकांची रीति तो; उ० तुम्ही यावर केवळ तुष्यतुदुर्जन न्याये करून उत्तर करूंनका वास्तवीक असेल तेंच सांगा.

तुसडा, वि० तुटसाळ.

तुसार, पु० तुषाराचा अपभ्रंश.

तुसारपट्टी, स्त्री० दसरा साल्यानंतर जीकुळांवर प्रथमपट्टीचालू होत्ये ती.

तुळई, स्त्री० गृहादिकांचे खण निराळे निराळे व्हावे म्हणून दोहों खंभांवर चौरस केलेलें लांकूड आडवें घातलें असतें ती;२, तृळद्वितीया थीं.

तुळणें, परस्परांचा विवक्षितगुण हृत न्यूनाधिक

भाव

भाव समजावा म्हणून त्यांस तुलना विशिष्ट करणें.

तुळतुळीत, वि. घोटणी, तेलाचा लेप, इ० कारणानें जो विशिष्ट दिसतें जें काष्ठ, पाषाण, शरीर, इ० तो.

तुळवट, न० चोरस केलेलें फार मोठी तुळई ह्मणजे जोगें जें लांकूड.

तुळवा, पु० ब्राह्मणांत एक जाति आहे तो.

तुळवी, वि. तुळव्यांचा वेष, आचार, भाषा, इ० तो.

तुळस, स्त्री० एक वृक्ष आहे जास हिंदू देवतारूपमानितात ती; २, त्याचें जें पत्र तीं.

तुळांबा, पु० वा० केळीचा जो खांब तो; २, ला० तत्सदृश जे मनुष्याचे हातपाय त्यास हातांचा तुळांबा पायांचा तुळांबा असें ह्मणतात.

तुळाधार, अ० कोणत्याही प्रमाणानें तपासणी केली असतां तिळतुल्य अंतर नयेई असें बोलणें, पंचाइत करणें, इ० कांचें वि०.

तूं, वि. वक्ता जास संबोधन देउन तत्कर्तृक तत्कर्म कादिक्रिया घटित वाक्य बोलतो तो. ह्मणजे हूंतर भोंडी घांस तूं. तुझें तें मासें आणि मासें तें हें हें, तूंमीं करणें ह्म० गुरु, धनी, इ० कोनी तूंही अशी गोष्ट करून को इ० शिष्यादिकांस सांगीतलें असतां त्याणें उद्धतपणें मलाना को ह्मणतां आणि तुझी कांकरितां इ० उत्तर करणें.

तूक, न० लावण्यांतील चमकांत जें वाक्य तें.

तूट, स्त्री० विवक्षित प्रमाणाशीं प्रमेयाची जी कोठीं न्यूनता येत्ये ती; उ० खंडीस दोन मण तूट आली; २, संतत चाललेल्या व्यापारांत मध्यें जो खंड पडतो तो ती: उ० यंदा चार महिने सारखा पाउस पडला एक दिवस ही तूट पडली नाहीं; ३, परस्पर स्नेही, दोघती, माता पितरें इ० कांचा जो वियोग ती; उ० गाईची आणि वत्साची तूट पाडूं नये; ४, परस्पर मान्य रूप कि० एक व्यवहारतारूप जो संबंध त्याचा कोठीं कारणानें जो विच्छेद ती; उ० आजपर्यंत त्याचा आमचा व्यवहार एकहोता आज तूट पडली, भाय पड, ये, इ० धा० न० ल० गादग्याचे गोणीस खंडीची तूट.

तूण, तूणीर, पु० सं० तीरठेवावयाचा भाता.

तूत, स्त्री० एक वृक्ष आहे; २, न० तीचें फल

तूप, न० सोणी कढविलें असतां त्याचा जो परिणाम होतो तें; २, ला० तत्सदृश नारळाचा रस, मांस, इ० कांपासून जो पदार्थ निघतो त्यास ह्म०

तूपखिचडी, स्त्री० तुपानें युक्त जी खिचडी ती. कढवडया, इ० कांचे खेळामध्यें दुसर्याची कवडी इ० मारली असतां आणखी एकवार आपणा खेळावें असा संकेत असतो त्याप्रमाणें खेळण्याचा प्रकार ती.

तूर, स्त्री० एक धान्य आहे ती व तीचें झाड ती; २, शिवण्यांत भेद आहे जास टोकें दोन असतात, हातावर तुरी देणें कि० देउन पळणें, ह्म० दुसर्यास ठकवून पळून जाणें, ह्म० तुरीची काडी तुरीवर झाडावी.

तूर्त, अ० فورت हिं० तुरुत.

तूल, पु० सं० कापूस.

तूष्णीं, अ० जेथें मुखानें कांहीं शब्द आणि हस्तादिकानीं कांहीं क्रिया असा प्रसंग आहे तेथें मुखानें शब्द न करितां जेथें चलन वलनादि क्रिया सहित वर्तणें

सणें राहाणें इ० क्रियांचा प्रसंग नेथें चलनवलनादि नकरितां; २, न० कचित्स्थलीं कांहीं पदार्थांचा आहे आहे नाहीं नाहीं असा जो भाव असतो त्यास स्त्री०

तूस, न०पु० साळीवरील जे मोडे टरफल निघतें तें तो.

तूळ, स्त्री० बारा राशींतील सातवा जो राशि तो; २, पु०न० क्षेत्रव्यवहारीं जी लांबी तो; ३, एकीकडे पारडें असतें आणि वजनाचे विभाग दांडीवर केलेले असतात अशें जें जोखावयाचें साधन असतें तो; ४, संकेतानें रुपयास स्त्री०.

तृण, न० गवत, केवल तुच्छ लेखून वर्णन कर्तव्य असतां त्यास तृणवत् तृणप्राय. इ० स्त्री०, दीनी तृणधरणें, स्त्री० शूरत्वादिकांचा अभिमान सोडून दैन्यधारण करणें.

तृणधान्य, न०सं० वरी, देवभात, गजशिरा, इ० जें धान्य तें.

तृतीय, ३ लिं० क्रमानें मोजिलें असतां तीन या संख्येचा जो विषय तो.

तृतीया, स्त्री० तिसरी तिथि ती.

तृस, ३ लिं० तृप्तिपावला तो.

तृप्ति, स्त्री० कोणे एका विषया विषयीं हे पुरे अशी होती जी भावना ती.

तृषा, स्त्री० शरीरांतर्वर्ति धातूंस जी उदकादि सद्द्रव पदार्थांची आकांक्षना होत्ये जेणेंकरून भाग्यवानाठायीं उदकादि प्राशनेच्छा उत्पन्न होत्ये ती; २, ला० प्रियदर्शनादि विषयकजी उत्कंठा तिला स्त्री० तृषार्त, तृषाक्रांत, इ० समास.

तृषि

तृषित, ३ लिं० तृषाजास लागली आहे तो.

तृष्णा, स्त्री० कोणे एका विषयाचे प्राप्तीची जी इच्छा ती.

तेरव, पु० तेष.

तेरवी, ३ लिं० तेरा.

तेगा, पु० [illegible] हिं० तरवारीचा एक भेद आहे तो.

तेगार, पु०रा० शेत, भात, घर, गुरें, माणसें, इ० जें खरटलें तो; २, बैलाचा मृड, इ० सरंजाम तो.

तेज, न० अंधकाराचा आणि शीत्याचा निरास जेणें करून होतो असा जो सूर्य, अग्नि, रत्न, इ० कांचादायीं द्रव्यविशेष असतो तें; २, सर्वपदार्थांमध्यें तत्तत्कार्यनिर्वाहक्षम शक्तिविशेष तत्तच्छरूपें करून असतो तें; ३, विद्या, शौर्य, तप, इ० गुण आंगीं असल्यामुळें मनुष्यादिकांचे अंगीं जो उत्कर्षविशेष राहातो जेणेंकरून दुसरा दबतो, भितो, इ० होतें तें; ४, रेत; ५, पदार्थमात्राचे भांगावीजी कांति ती, कोणे का वर कोणे काचें तेज पडणें, स्त्री० एकाचे उत्कर्षग्रासीं दुसरा तुच्छदिसे अशें होणें, तेजोभंग, तेजोवृद्धि, इ० समास जाणावे.

तेजगी, स्त्री० पदार्थांचे अंगीं जी कांति दिसत्ये ती.

तेजःपुंज, ३ लिं० बहुत कांति जाचे अंगीं आहे असा सूर्य, रत्न, पुरुष, इ० तो.

तेजबळ, न० एक औषधी आहे तें.

तेजस्वी, ३ लिं० सं० बहुत तेज आहे जांत असा जो पदार्थ तो.

तेजाळ, ३ लिं० यं० तेजस्वी.

तेजी, पु० हिं० अश्व, स्त्री० हिमायती चागादव ने जीस त्वरा मारितो.

तेढ

तेंटू, पु॰ एक औषधी झाड आहे.
तेंड, न॰ एक औषध आहे.
तेंडफळ, स्त्री॰ वा॰ एक झाड आहे.
तेंडली, स्त्री॰ वा॰ तोंडली.
तेंडलें, न॰ वा॰ तोंडलें.
तेडा, ३ लिं॰ हिं॰ वांकडा जो पदार्थ मार्ग, इ॰ तो.
तेडाबांका, ३ लिं॰ हिं॰ वांकडा तिकडा.
तेनपर्यंत, तेथपर्यंत, अ॰ तिथपर्यंत.
तेनपावेतों, तेथपावेतों, अ॰ तिथपावेतों.
तेनीस, ३ लिं॰ २३.
तेथचा, तेथला, ३ लिं॰ तिथचा.
तेथपासून, अ॰ तिथपासून.
तेथवर, अ॰ तिथवर.
तेथवेरीं, अ॰ तिथवेरी.
तेथील, ३ लिं॰ तेथला.
तेथून, अ॰ तिथून.
तेथें, अ॰ तिथे.
तेधवां, अ॰ तेव्हां.
तेरडा, पु॰ एक फुलझाड आहे, ल॰ तेरड्याचा रंग तीनदिवस.
तेरवडी, स्त्री॰ अळवडी.
तेरवो, अ॰ वर्तमान दिवसापासून गेलेला किं॰ येणारा जो त्रयोदश दिवस त्याचेठायीं.
तेरा, ३ लिं॰ १३.
तेराबारा, पु॰ वा॰ उभयतांचे व्यवहारामध्यें जीव उथड असलेले ते प्र॰ अने॰ व॰.
तेरावा, ३ लिं॰ क्रमानें मोजिलें असतां तेरावा संख्येचा जो विषय तो; २, पु॰ मृताचे तेरावे दिवशीं जी क्रिया करितात तो.
तेरावें, न॰ रा॰ तेरावा द्वितीयार्थी.
तेरी, स्त्री॰ कों॰ तेरें.
तेरीख, स्त्री॰ तारीख.
तेरीज, स्त्री॰ हिं॰ अनेक बेरजांची विशिष्ट एक बेरीज करावयाकरितां क्रमानें मांडलेल्या जा बेरजा त्या प्र॰; २, न॰ जाजवर अनेक बेरजा मांडल्या आहेत तें पत्रक तें.
तेरीमेरी, स्त्री॰ हिं॰ वादादि भाषणांत जी अरे तुरे होत्ये ती.
तेरें, न॰ नलाविनां आपल्या आपण जें अकूं रुसतें तें.
तेल, न॰ तीळ, खोबरें, चंदन, इ॰ कांपासून जो द्रव पेराया जोगा निघतो तें, कोणेकाचें तेल काढणें, ल॰ कुटण काढणें; रा॰ कोणी एक स्त्रीनें तेल घेणें ल॰ गरनपणा सोडून भारीण होणें; ल॰ तेलजळे पीडा टळे.
तेलकट, ३ लिं॰ तेलानें युक्त किं॰ लिसजो पदार्थ तो; २, त्या पदार्थाचा जो वास तो.
तेलकटणें, वस्त्र, पात्र, शरीर, इ॰ तेलाचे मळानें लिसहोणें.
तेलकटाण, स्त्री॰ कों॰ तेलकटजो वास ती.
तेलकटी, स्त्री॰ तेलाचा संबंधानें केश, वस्त्र, इ॰ कांवर जो चिकट मळ होतो ती.
तेलंग, पु॰ तेलंगण देशांतील जो मनुष्य तो, परंतु ब्राह्मणावर विशेष प्रसिद्धि.
तेलंगण, न॰ एक देश आहे.
तेलंगभट, पु॰ तेलंग.

तेलंगा, पु॰ तेलंग ·

तेलंगाशिसवा, २ लिं॰ रा॰ अत्यंत काळें जाचें लांकूड असतें असाजो शिसवा तो ·

तेलंगी, २ लिं॰ तेलंगांची भाषा, वेष, इ॰ तो ·

तेलघडी, स्त्री॰ क्षणादिकावर तेलांत भिजवून जी कापुसाची किं॰ फडक्याची घडी घालितात ती ·

तेलघाणा, पु॰ वा॰ शूद्रादिकांचे विवाहांत गणपति पूजेपासून सावधान पर्यंत ब्राह्मणानें करावयाचें जें अनुष्ठान तो ·

तेलची, स्त्री॰ तेलांत किं॰ तुपांत तळलेली जी पुरणाची पोळी ती ·

तेलट, २ लिं॰ जा पदार्थाचे अंगी स्वतःसिद्ध तेल आहे तो, तीळ, खोबरें, इ॰ पदार्थ ·

तेलतवा, पु॰ तळावयाचे उपयोगी पितळी सारिखें पात्र करितात तो ·

तेलफळ, न॰ लग्नाचे पूर्वी नवर्याकडून नवरीकडे तेल, साडी, इ॰ समारंभपूर्वक पाठवितात तें ·

तेलबाण, स्त्री॰ समई इ॰ कांचा दाट्यीं दीपलावण्याकरितां तेल, वात, यांची जी सिद्धता करितात ती ·

तेलस, २ लिं॰ सजातीय पदार्थापेक्षां विशेष तेल जाचे अंगीं तो ·

तेलसर, २ लिं॰ तेलस ·

तेलसाडी, स्त्री॰ तेलफळ ·

तेली, पु॰ स्त्री॰ ईण तिलादिकांचें तेल काढून उपजीविका करणारी एक जाति आहे तो ·

तेल्या, २ लिं॰ जा जातीचे रंग, इ॰ पदार्थ दोहों प्रकारचे आहेत त्यामध्यें जाचे अंगीं तिकटिकी विशेष दिसत्ये तो ·

तेव, पु॰ रा॰ गूळ, साकर, इ॰ कांस उष्णसंयोगानें जो द्रव रूप होतो तो ·

तेवट, २ लिं॰ रा॰ जाचे अंगीं बहुत तेव आहे असाजो गूळ, बरफी, इ॰ पदार्थ तो ·

तेवडा, २ लिं॰ तितका ·

तेवडासा, २ लिं॰ तेवढा ·

तेवणें, दिव्यानें प्रदीप्तपणें असणें; २, रा॰ गुड, साकर, इ॰ कांनीं तेवानें पुरुष होणें ·

तेवीं, अ॰ ग्रं॰ त्याप्रकारें ·

तेवीस, २ लिं॰ २३ ·

तेव्हां, अ॰ त्यासमयीं ·

तेव्हांपासून, अ॰ त्याकालरूप अवधीपासून ·

तेहेतीस, २ लिं॰ ३३ ·

तें, अ॰ तेव्हां ·

तैरव, पु॰ तैष ·

तैरवी, २ लिं॰ तैषी ·

तैजस, २ लिं॰ सं॰ तेजःसंबंधी तो ·

तैतिल, न॰ वधादिकरणांतील चवथें जें करण तें ·

तैनात, स्त्री॰ हिं॰ रोजमुरा ती ·

तैनातजाबता, पु॰ हिं॰ अनेक तैनाती लोकांचा तैनातीचा ठराव्याचीं अनेक कलमें जांत लिहिलीं आहेत तो कागद ·

तैनाती, २ लिं॰ तैनातीचीं नेमणूक करून देविलाजो चाकर तो ·

तैल, न॰ तेल ·

तैलंग, पु॰ तेलंग ·

तैलंगण, न॰ तेलंगण ·

तैलंगणदेश, पु॰ तेलंगण ·

तेलंगभट, पु॰ तेलंगभट॰

तेलंगा, पु॰ तेलंगा॰

तेलंगी, २लिं॰ तेलंगी॰

तेलपक्क, २लिं॰ तेलांमध्यें तळून केलाजो वडा, इ॰ तो॰

तेलपाचिन, २लिं॰ तेलपक्क॰

तेलबुद्धि, स्त्री॰ कांहीं एक विषयाचा यत्किंचित् अंश गृहीत झाला असतां तत्काल त्या सर्व विषयांतें व्यापणारी अशी जी बुद्धि ती; २, २लिं॰ तद्विशिष्टपुरुषादिक तो॰

तेलाभ्यंग, पु॰ स्नानाकरितां जो तेलाचा सर्वांगास लेप करितात तो॰

तेष, पु॰ सं॰ क्रोधाचा जो आवेश तो॰

तेषी, २लिं॰ सं॰ अत्यंत तेष येण्याचा स्वभाव जाचा तो मनुष्यादि॰

तेक्ष्ण्य, न॰ सं॰ तीक्ष्णत्व॰

तो, पु॰ स्त्री॰ ती, न॰ तें, हें सर्वनाम जो, याचा अनुयोगी जो अर्थ त्याचें कि॰ केवल समिकृष्ट नव्हे असा जो पदार्थ त्याचें कि॰ प्रकरणादिकें करून बुध्या रूढ जो अर्थ त्याचें परामर्शक; उ॰ जो आम्रीं पुण्यांत घोडा पाहिला होता तोच हा, हा धोतर जो डाणको तो दे, तेथें शास्त्री आहे तो तुम्हांस सांगेल॰

तों, अ॰ नंब॰

तोकडा, २लिं॰ आखूड॰

तोख, पु॰ श्वान, व्याघ्र, इ॰ कांचा गळ्यांत लोहादिकांची पट्टी घालितात तो॰

तोंगल, न॰ बुगडी, काप, कुडूक, इ॰ कांस मोत्यांनीं युक्त लोंबता जो पुष्पाकार अवयव लाविला असतो तें॰

तोंग

तोंगलवाळी, स्त्री॰ भोंकरवाळी॰

तोटका, तोटगा, पु॰ तोडगा॰

तोटकेकरी, पु॰ देवीच्या स्तवून शरीरावर जो तोटका करिजो तो॰

तोटरा, तोटरा, पु॰ वसणें याचा योगी प्र॰ वकूळ, दाढें, इ॰ रूक्षपदार्थ खाल्यामुळें तोंगळ्याच्यानीं नउतरे अशा अवस्थेतें मनुष्यानें पावणें॰

तोटा, पु॰ लेणाएका व्यापाराचेद्वारां मूलभूत द्रव्याची कांहीं होत्ये जी हानि कि॰ त्या व्यापारीं जितका लाभ व्हावा अशी संभावना असत्ये तदपेक्षया त्या लाभाची जी न्यूनता तद्रूपतेनें युक्त व्यवहार कर्त्यास फल येतें तो; २, विवक्षित प्रमाण पुरें न व्हावया जोगी जी त्या त्या पदार्थाची न्यूनता असत्ये तो; ३, कागदाची वळी करून त्यांत दारू घालून बंदुकेनें कि॰ एरंडीच उडवावया करितां जो पदार्थ करितात तो॰

तोटी, स्त्री॰ कारंजें, झारी, मोरी, इ॰ कांस उदकादिकांची बारीक धार पडावी स्व॰ बासीकरिता द्राची नळी लाविली असत्ये ती॰

तोड, स्त्री॰ काष्ठादिकद्विभाग करावया करितां मध्यें कुऱ्हाड, इ॰ कानें जो छेद करितात ती; उ॰ याला कडास बीनभर तोड येत नाहीं त्याला कांहीं तूट णार नाहीं; २, एक आंग चोरसकेलें आहें जाचें, असा जो पाषाण ती; ३, कांहीं कारणामुळें विवक्षितानुरूप होईना असें झालें जें कार्यतें विवक्षितानुरूप व्हावयाजोगी काढिली जी युक्ति ती; ४॰ आपल्यामुळें गांवास उपद्रव होऊं लागला स्तवून आपणच गांवांतून निघून जावें ही तोड काढिली; ४, देणें, घेणें, इ॰ रूपजें उभयतांचें खटलें, त्याचा उभयतांचे भा-

घणा

षणांत कांहीं अधीक उणे करून सरासरी एक रूप तेंस आणून जोउलगडा करितात तो; उ० तो पंचवीस लक्षणी तो, तुम्ही वीस लक्षणां, सरासरी बेचीसांवर तोंड पाडा; सादृश्यें करून एकपदार्थाशीं उपमानत्वें करून किं० उपमेयत्वें करून मानिला जो पदार्थ दुसरा तो त्याची; उ० हा बैल त्या बैलाची तोंड आहे, हे दोन श्लोक एका तोंडीचे आहेत.

तोंड, न० जेणें करून भक्षायास येतें आणि बोलतां येतें असा एक शरीराचा अवयव आहे तें; २, हनुवटीपासून ललाटांत जो भाग तें; ३, ला० पार्श्वांत पदार्थ जावया करितां जें भोंक ठेविलें असतें तें; ४, फोड, गळू, इ० कांस छिद्रपडावया जोगा जो अवयव असतो तें किं० पडलेलें छिद्र तें; ५, ग्राम, नगर, क्षेत्र, इ० कांचा आंत जावयास जेथून प्रवेश होतो तो भाग तें; ६, गमन करणारें जें, नदी, वायु, सैन्य, इ० त्यांचा जो अग्रिम विभाग तें; ७, कांहीं एक पदार्थाचें दर्शन किं० ग्रहण किं० कार्यावर विनियोग इ० कांचा आरंभ जावि भागा करून होतो तो विभाग तें; उ० या ओसाचे तोंडीं मात्र चांगल्या चांगल्या पेंदया घातल्या आहेत, भाकरीस जिकडून खटलें तिकडून तोंड आहे; ८, पदार्थमात्राचा विवक्षित जो अग्रिमभाग तें; ९, कांहीं एक व्यापार करण्याविषयीं न्यायतः जी योग्यता तें, जे ह्मांकांहीं कारणामुळें ती योग्यता उडाली अशा अर्थाचा विषय आहे तें ह्मां प्रयोग; उ० तो सर्वांचा देणेदार आहे त्याला यागाचें तोंड यावयास तोंड नाहीं; उत्तरोत्तर वृद्धिंगत ह्मावयाचें जें युद्ध, वाद, इ० व्यवहार, त्यांची केवल जी आरंभदशा तें, लाग० धा० प्र०; तोंड चालणें, सुटणें, ख० भाषणरूप किं० भक्षणरूप व्यापारीं प्रवृत्त होणें; तोंड आटोपणें, संभाळणें, आवरणें, इ० स्वतीं अमर्याद भाषण किं० अपथ्य भक्षण, इ० कांपासून निवृत्त करणें; तोंड उतरणें ख० मुखश्री उतरणे; तोंड घेणें ख० तोंडांतून लाळ गळावयाजोगें पाडणें ० औषध घेणें; देणें ख० वैद्यानें कोणेकास तें औषध देणें; येणें ख० त्या औषधानें लाळ गळावया जोगी तोंडाची अवस्था होणें; कोणेकावर तोंड टाकणें ख० क्रोधाद्यावेशानें शिवी, गाळी, इ० दुर्भाषण करणें किं० अभ्यादिकानें डसावयास धांवणें; कोणेकाचें तोंड बांधणें; तोंड धरणें ख० आपल्या कार्याविषयीं प्रतिकूल बोलणारा जो त्यास द्रव्यदानादिकें करून बोलेनासा करणें; ख० मारत्याचा हात धरवेल परंतु बोलत्याचें तोंड धरवत नाहीं; तोंड पसरणें ख० कोणेकापुढें याचनारूप दैन्य दाखविणें; तोंड पाघळणें ख० न बोलावयाची जी गोष्ट ती कोणेकापाशीं बोलणें; तोंड वासणें ख० कांहीं एक कार्य सेंपेनासें झाल्यामुळें अवसान सोडून देऊन अवस्था पावणें; तोंड फुटणें ख० अभिमानगलित ह्मावयाजोगी शिक्षा किं० अपमान होणें; तोंड वाजणें ख० शिष्यादिकांस शिक्षा लागावी किं० सेवकादिकांनीं कानकरावें इत्यादि अर्थ अनेक प्रकारचे शब्द तोंडानें होत असणें; तोंड पाहाणें किं० तोंड पाहात बसणें ख० आपलें संपत्त्यादि दुसऱ्यानें हरण केलें असतां त्यापासून माघारें घेण्याचें सामर्थ्य नाहीं असें असल्यामुळें आतां काय करावें कसें करावें अशा चिंतेंत पडणें; तोंड पाहा ख० आपल्या सामर्थ्यापेक्षां मोठया कार्याविषयीं कोणी आधिक्य

तिला असतां त्याचा उत्साहभंगार्थ याचाऱ्याचा प्रयोग करितात; आपल्या अंगीं शक्ति किति आहे याचा विचार कर असा अर्थ; तोंडकाढें करणें रू० विवक्षितस्थलापासून कवितूस्थलीं जाणें त्रासानें भाषण कर्तव्य असतां प्रयोग; तोंडउजड होणें रू० तोंडास आलेली काळोखी जाणें; तोंडभर कि० तोंडभरून बोलणें रू० दुसऱ्याचें आणि आपलें समाधान व्हावयाजोगें अघळपघळ बोलणें; रा० तोंडमाजणें रू० मननेमुळें तोंडांतून अमर्याद भाषण येऊं लागणें कि० उत्तमपदार्थ खावयाची संवे सालयामुळें साधारण पदार्थांवर अरुचि होणें; तोंडकरणें रू० थोरशीं बरोबरीनें वाद प्रतिवाद करूं लागणें; तोंडचुकावणें रू० जाचें कार्य करावयाचें नेनकरितां त्यास अदृश्य होऊन राहाणें; लाहानातोंडीं मोठा घांस घेणें रू० आपल्यास नशो भावा अशेंगें आपल्यापेक्षां वरिष्ठास वरचढपणें बोलणें कि० मोठ्याची बरोबरी कि० त्यापेक्षां आपली वरिष्ठतादिसावाजोगा कांहीं व्यापार करणें; तोंडींलागणें. तोंडासलागणें, तोंडींबसणें, तोंडासबसणें, रू० कांहींएक भक्ष्यादिपदार्थ कि० कांहींशब्द, बहुत अभ्यास झाल्यामुळें सवेंस्वतःीं पडणें; कोणाचातोंडास लागणें रू० तोंडास तोंडदेणें; तोंडास तोंडदेणें रू० आपल्या कि० दुसऱ्याचा वरिष्ठपनमुळें जाशीं वादप्रतिवाद करणें अयोग्य त्याशी तो करणें; तोंडासपानें पुसणें रू० जाफलाचे अनेक विभागी आहेत तेंफल आपण एकल्यानेंच आटोपून त्यांस दगादेणें; तोंडांत बोटघालणें रू० कांहींएक आश्चर्यचाहून थक्क होणें; तोंडांत मारी, शेण, शरव, इ० पडणें रू० वृत्ति, संसार, रोजगार, इ० कांचा सर्वस्वीं नाश होणें; तोंडावर सांगणें, बोलणें, पुरवून देणें, इ० स्पष्टीं जाचीगोष्ट त्याचासमक्ष बोलणें, इ० अर्थ होतो; तोंडचेंपाणीपळणें रू० भयकारक कांहीं अरिष्ट उपस्थित झाल्यामुळें चिंतेनें कांहींच सुचूंनये अशी दशा प्राप्त होणें; तोंडापुढें कोणीएक शब्द असणें रू० केवळ आडवूंनरनये परंतु आतां आडवेल आतांआडवेल अशाप्रकारचा स्मृतींत असणें; तोंडासकाळोखीयेणें रू० आपण कि० आत्मसंबंधिजो त्याणें कांहींएक दुष्कर्म केल्यामुळें लज्जापावून लोकांस तोंडदाखवूंनये अशाअवस्थेनें युक्त होणें, इ० बहुत जाणावे, रू० तोंडधरून बुक्क्यांचामार, तोंडींनीळ गांडीसबुधली ·

तोंडओळख, स्त्री० परस्परें विशेषपरिचय नसतां तोंडपाहिलें असतां हा अमुक इतकें समजावयाजोगी जी ओळख असते ती ·

तोंडक, ३ लिं० तुरसाळ ·

तोंडगा, पु० पिशाच, रोग, यांचें निरसन व्हावें इ० कारणार्थ जें कुबेडें करितात तो; २, देवीचा आल्पून इ० स्यादिकास जो व्रण करितात तो; ३, ज्योतिषी इ० कांहीं सांगीतलेंजें भविष्य शुभाशुभ तद्विषयक जो अनुभव तो ·

तोंडघडण, स्त्री० तोंडाचा जो आकार तो; उ० यामुलाची बापासारिखी तोंडघडण आहे ·

तोंडघशीं, अ० पडणें, देणें, इ० कांचा योगांत० मिना, इ० कापासून, तोंडघांसे, फुटे, असें पडणें; २, रा० आ आश्रयाचा बळानें कांहींएक व्यवहारीं भरून साला तो आश्रय नाहींसा झाल्यामुळें फशीं पडणें. रू० डघशीदेणें रू० दुसरा तोंडघशीं पडे असें करणें.

तोंडचा, तोंडाचा, १ लिं॰ तोंडासमोर आहे गति जाची असा जो वारा, पुंच, भरती, इ॰ तो; २, लेखनविद्या, शूरपणा, कुशलपणा, इ॰ गुण अंगीं नसतां तद्गुण विशिष्टसारिखे शब्दमात्र जास बोलावयास येतात त्यास तोंडचा कारकून, तोंडचाशिपाई, इ॰ स्त्री॰; २, जामध्ये लेखरूप साधन नाहीं असा जो कारभार, हिशेब, व्यवहार, त्यास तोंडचा कारभार इ॰ स्त्री॰.

तोंडचा, तोंडाचाफटकळ, १ लिं॰ अंतःकरणांत क्रोधादिक नसतांही सहजरीतीनें जाचा तोंडांतून शिवी इ॰ दुर्भाषण निघत असावें अशास्वभावाचा जो तो.

तोंडचाघांस, पु॰ जापासून आपल्यास लाभ होत आहे असें दृष्टादिकिं॰ केवळ पदरीं पडावयास आलेला जो लाभ त्यास स्त्री॰ काढ, ने, इ॰ धा॰ प्र॰

तोंडचुकावू, १ लिं॰ कांहींएका कामाविषयीं तोंडचुकविण्याचा स्वभाव जाचा तो.

तोंडजबानी, स्त्री॰ लेखावांचून केवळ जें तोंडचें वर्तमान तें, प्र॰ कागदोपत्रीं.

तोंडजबानीनें, अ॰ लेखन देतां केवळ तोंडानें कांहींएक वर्तमान सांगणें, इ॰ कांचेंवि॰.

तोडजोड, स्त्री॰ कांहींएक व्यवहार, विवक्षितानुरूप चालावयाजोग्या बारीकमोडया जाचुकि तीं.

तोडणावळ, स्त्री॰ वृक्षादि तोडण्याचें जें मोल तें.

तोडणी, स्त्री॰ ग॰ अनेक वृक्षादिक तोडण्याचा जो व्यापार तो.

तोडणें, तुटे असें करणें, देंकूण, ऋणकरी, इ॰ तोडिताम, इ॰ स्थलीं यद्यपि तुटणें याचा प्रयोग नाहीं तथापि तुटल्यासारिखी व्यथा अमें वाटतें. म्हणून याचा प्रयोग होतो.

तोंडदेखणा, १ लिं॰ आपल्या अंतःकरणांत तसाभाव नसतां दुसऱ्यांचें मन राखावें म्हणून त्याचा मनास अनुसरून करितात जें भाषण, आवसाल, न्याय, गोष्ट, इ॰ तो.

तोंडपाठ, १ लिं॰ पुस्तकाचे आश्रयावांचून केवळ तोंडानें म्हणावयाजोगा पाठ जो ग्रंथ इ॰ तो.

तोंडपालट, स्त्री॰ पु॰ नित्यशः एकच पदार्थ भक्षिल्यामुळें त्यावर अरुचि होते म्हणून पदार्थांतर भक्षणाचा जो तोंडास संस्कार करितात तो तो.

तोंडफटयाळ, १ लिं॰ जाचा हातून कांहींएक कार्य व्हावयाचें नाहीं असें असतां मोठया मोठया गोष्टी सांगण्याचा स्वभाव जाचा तो.

तोंडफटयाळी, स्त्री॰ कों॰ तोंडफटयाळाचें बाताजाणण्याचें जें कर्म तें.

तोडमोड, स्त्री॰ लिहिणें, बोलणें, इ॰ कांची जीरीति तीं.

तोडर, पु॰ एकपादभूषण आहे.

तोंडलाग, पु॰ गोमहिष्यादिपशूंस एक रोग होतअसतो, जेणेंकरून त्याळ गळते तो.

तोंडली, स्त्री॰ एक वेल आहे ती.

तोंडलें, न॰ तोंडलीचें फळ जाची भाजी करितअसतात.

तोंडलीभात, तोंडलेभात, पु॰ तांदुळांत मसाला, तूप, तोंडलीं घालून जो भात करितात तो.

तोंडवळख, स्त्री॰ तोंडओळख.

तोंडवळण, न॰ तोंडघडण.

तोंडवळा, पु॰ तोंडवळण.

तोंडदिंदळ, २ लिं० आंगें व्यभिचार करीत नसतां व्यभिचारा चा गोष्टीमात्र बोलण्याचा स्वभाव जाचा तो.

तोंडसरना, २ लिं० कों० केवळ अस्वलिन पाडयेतना हीं सरासरी आडवून आडवून सूणनां येतो असा श्लोकग्रंथ इ० तो.

तोंडसुरव, न० घेणें, इ० कित्येकांचा योगी प्र० जीगोष्ट करण्यास आपण अशक्त तीविषयीं यथेष्टपणें तोंडानें बोलून तितक्यानेंच सुरवमानणें.

तोंडहिशेबी, २ लिं० लेखा बांधून हआरेंरकमाचा हिशेब तोंडानें सांगतो असा जो बुद्धिमान त्याम सू०

तोंडा, पु० अनेक काष्ठें, पुष्पें, फलें, इ० तोडण्याचा जो व्यापार तो; २, हातांतील किं० पायांतील सुवर्णाचें किं० रुप्याचें एक भूषण आहे तो; ३, रुपये, मोहोरा, इ० नाणें प्रायः सहस्र परिमित आंत घालून बांधिलेली जी पिशवी तो; ४, जामगी; ५, मोठें जाडें लांकूड तोडून केलीं जीं अनेक खंडें तीं प्र०; ६, सुतळी, इ० बारीक दोरीचा हात दोन हात जो तुकडा तो.

तोंडातोंड, स्त्री० हें तोड तें तोड असा अनेक तोडण्याचा कि० परस्परें एकमेकास तोडण्याचा जो व्यापार ती:

तोंडाळ, २ लिं० कुसर्चा वर तोंड टाकण्याचा स्वभाव जाचा तो मनुष्य, सू० हाताळ पुरुष तो पण तोंडाळ पुरुषतना हीं.

तोंडी, स्त्री० गाण्यांत एक राग आहे ती.

तोंडी, स्त्री० विणण्याचा डेरा आणि दांडी चा चा मध्यें जो संधिप्रदेश तीच तो सांधा बसावयासाठीं मध्यें जो लांकडाचा तुकडा देतात ती; २, मृदंग, ढोलकें, इ० किंवा एक वाद्याचें जें मुख ती.

तोंडीचीपाटली, स्त्री० स्त्रीचे हस्तांतील एक भूषण आहे ती.

तोंडींलावणें, न० तोंडीं लावावयाकरितां केलेंजें भाजी चटणी, इ० तें.

तोंडीवृ, २ लिं० तोडलेलें जें काष्ठ इ० तो.

तोंडोतोंड, अ० कांठोकांठ.

तोंडोळा, पु० तोंडचळा.

तोंडोळी, स्त्री० तोंडली.

तोंडोळें, न० तोंडलें.

तोतया, पु० तोषदार्थ नसतां तत्सें करून जी त्याची रचना तो.

तोंतरा, २ लिं० बोलतानां अडखळून एक एक अक्षर दोनतीनवेळा जाचे भाषणांत येतें तो मनुष्य.

तोता, पु० تُوتہ हिं० पोपट.

तोतो, स्त्री० मुलांचा भाषेनें अभ्यंग स्नानास सू०

तोंपर्यंत, तोंपावेतों, अ० तंवपर्यंत.

तोफ, स्त्री० تُوپ हिं० आंत दारूभरून मारकाढावयाचें एक यंत्र आहे ती.

तोफखाना, पु० تُوپخانہ हिं० अनेक तोफांचा जो समुदाय कि० दारू, गोळे, इ० त्यांचें जें खटलें कि० तें सर्व देवण्याचें जें स्थल तो.

तोफां, २ लिं० हिं० नामीं.

तोबण, स्त्री० तोबन.

तोबन, स्त्री० अपराध नकरितां कोणी कावर अपराध केल्याचा आरोप येतो ती.

तोबरा, पु० تُوبڑہ हिं० अश्वास दाणाचारा वयाकरितां कानाडें, पडम, इ० कांची जी पिशवी शिवितात तो;

तो; २, ला॰ अतिरिक्त कांहीं आंत भरल्यामुळें किं॰ कोथाद्दिकानें फुगविलेंजें तोंड त्यास लु॰ ·

तोबा, पु॰ वरच्यासपीठघालून दोरी सारिखा कोणेका॰ स मारावयाकरितां केलाजोपदार्थ तो ·

तोबातोबा, अ॰हिं॰ कांहींएकाकर्मापासून पश्चात्ता॰ प झालाअसतां किं॰ कांहींएकासंकटास भ्यालाअसतां हाउद्गार निघतो ·

तोबेमार, पु॰ तोब्यानें जोमार तो ·

तोमर, पु॰न॰सं॰ एकआयुधआहे ·

तोय, न॰सं॰ उदक; २, स्त्री॰ तुई ·

तोर, स्त्री॰ मा॰ तूर: २. न॰ अंब्याची केरी तें ·

तोरंजन, न॰ नारिंगासारिखें निंबाचे जातीचें एक फळ आहे तें ·

तोरड, पु॰ चरण भूषण आहे तो ·

तोरडी, स्त्री॰ स्त्रियांचें पादभूषण आहे ती ·

तोरण, न॰ उत्साहदिवशीं गृहमंडप, इ॰कांत द्वारा दिप्रदेशीं, आम्रपल्लव, पुष्पें, इ॰एकादोरींत गुं॰ फून शोभार्थ बांधितात तें; २, होळीवर किं॰ देवा॰ वर, नारळ, खोबर्‍याच्या वाट्या इ॰कांची माळ बां॰ धितात तें; ३, एकफल आहे तें; ४, स्त्री॰ त्याचें झाड तो ·

तोरणें, न॰ राहाटाचे कनेकडाचे पुढलेटोंक जावर ठेविलेंअसतें, जाग्यालून वेलफिरतो तें लांकूड॰

तोरप, न॰वा॰ जागा भाजून भातपिकवायाकरि॰ तांकरितांत जें शेन तें ·

तोरमळी, स्त्री॰ परिपक्वता जामध्यें आलीनाहीं असाजो कोंवळा हिरवा ती ·

तोरा, पुं॰ संपत्ति, सौंदर्य, इ॰कांचे अभिमानाचाजो आंगी आंगीं आविर्भाव दिसतो तो ·

तोरें, न॰वा॰ जलाचा स्नानानें किं॰ पानानें शरीरावर कंडूउत्पन्न व्हावी असाजो जलाचाठायीं दोषऔ॰ षधियोगानें उत्पन्न झाला असतो तें; त्यणेंकरून शरीरावर खाजीजी कंडू तें ·

तोरेदार, वि॰ तोरा आहे ज्याचेठायीं तो ·

तोल, पु॰न॰ तागडी, इ॰कानें तोलण्याचा जो व्यापार तो; २, त्याव्यापारानें समजतें जें पदार्थाचें मान तो; ३, तोलायाचें साधन जें मासा, तोळा, इ॰तो तें; ४, पु॰ कल; ५, साकर, इ॰ जिन्नस मण इ॰ प्रमाणानें घेतलाअसतां वरोवर मण देऊन शेकरीती प्रमाणें कांहींवर देतअसतात तें मान तो; तोलदेणें स॰ प्र॰ संगानुरूप कोणेकाचा अपराधाची क्षमा व सामर्थ्या पेक्षां अधिक खर्च इ॰ करून तोप्रसंग रक्षणेभित दिसे असें वर्तणें; कोणएकाचा तोलास तोलदेणें स॰ द्रव्यव्यय, शौर्य, वर्कृत्व, इ॰कानीं वरोवरी करणें; उ॰ आम्चा तोलास तोलदेई असासोयरा पाहा ·

तोलणें, ओरखणें; २, कलणेंवक्षेपणें; ३, पदार्थनिष्ठ विद्या, शौर्य, सामर्थ्य, इ॰कृतजो जडपणा त्याची इयत्ता समजायासाठीं तोपदार्थ प्रत्यक्ष अनु मानादि साधनानी ताडून पाहाणें ·

तोलाचा, वि॰ जो जाणीं विवक्षित गुणानें तोला सतोलण्यायोगा तो त्याचा ·

तोंवर, अ॰ तोंपर्यंत; २, पु॰वा॰ जामध्यें अंवटप॰ णा आलानाहीं अशाकोंवळ्या जा आंब्याचा कैरी ती तो ·

तोंवरी, अ॰ तोंवर; २, स्त्री॰ कों॰ जीचीं पानें विकसि॰ त झालींनाहींत अशी कोंवळी जी वृक्षाची डिक॰

शी ती

शी ती ·

तोशीस, स्त्री ०हिं० राजा, चोर, सावकार, इ० कांचा जो उपद्रव ती ·

तोष, पु० सं० तुष्टि ·

तोषणें, तुष्टणें ·

तोसदान, न० हिं० दारू, गोळी, इ० बाराचें सामान ठेवावयाचें चर्ममय पात्र कमरेस बांधावयाजोगें असतें तें; कोणेकाचें तोसदान वाढणें स्व० देवपु आवाढणें ·

तोहमत, स्त्री० हिं० तोवन ·

तोळबंदी, स्त्री० स्त्रियांचे हस्तांतील एकभूषण आहे ती ·

तोळा, पु० बारामासे वजनाचें जें प्रमाण तो, क्वचित् किंचित् न्यूनही असतो ·

तोंकार, तोंवार, न० औषधविशेष आहे ·

तौल्य, न० सं० तुल्यता तें ·

तौस, ग० स्त्री० नवशी ·

तौसें, न० नवसें

त्यक्त, २ लिं० सं० टाकला जातो ·

त्यजिणें, त्यं० टाकणें ·

त्याग, पु० स्वीकृतपदार्थाचें जें विसर्जन किं० स्वीकरण प्रसंगीं जो अस्वीकार तो ·

त्यागणें, त्यक्त करणें ·

त्याज्य, २ लिं० त्यागावयास योग्य जो दुर्गुणादिपदार्थ तो ·

त्रय, न० तिहींचा जो समुदाय तें ·

त्रयी, स्त्री० सं० त्रय, परंतु विशेषेंकरून बाप, आजा, पणजा, आई, आजी, पणजी, इ० पितराचे त्रयाला

र लोकांत प्रसिद्ध ·

त्रयोदश, ३ लिं० सं० तेरा ·

त्रयोदशी, २ लिं० तेरावी तिथि ·

त्रसरेणु, पु० तीन द्व्यणुकें मिळून सिद्ध होतो जो अवयवी तो ·

त्राण, न० सं० संकट, भय, यांपासून जें कोणेकाचें रक्षण तें; २, विवक्षित कार्याचा निर्वाह व्हावया जोगे शारीरादिशक्तीचें जें अवसान तें; ३, आंगें उचलणें इ० कार्यांविषयीं सर्व बल खर्चून केलाजो नेट तें ·

त्राता, २ लिं० सं० भय, संकट, यांपासून रक्षिता ·

त्रास, पु० कंटाळा; २, सूर्य, अग्नि, उग्र औषध, ज्वर, क्रोध, दुर्जन, इ० कांचा संबंधानें जो संताप होतो तो किं० त्या सूर्यादिकांचे आंगीं संतापकारकतारूप शक्तिविशेष असतो तो; ३, सं० भय ·

त्रासक, २ लिं० दुसऱ्यास त्रास देण्याचा स्वभाव जाचा असा दुर्जनादिक तो ·

त्रासणें, उ० कोणेकास त्रास प्रथमहिनीषार्थानें युक्त करणें ·

त्राहित्राहि, त्राहिभगवान्, अ० हेंवाक्य, ईश्वरा यासंकटापासून मला सोडाव अशाअर्थी; कांहीं एक संकट सोसेनासें झालें असतां हा उद्गार निघतो; मलार्थें त्राहित्राहि झालें इ० स्थलीं पुरेपुरे नकोन को अशी अवस्था झाली ·

त्रि, २ लिं० सं० तीन यांचा प्रयोग समासप्रसंगीं; उ० त्रिलोकींत्रिभुवन, इ० ·

त्रिक, न० सं० त्रय; २, पाठीचा कण्याचे खालचा जो संधि तें ·

त्रिकटु, न० सं० सुंठ, मिरें, आणि पिंपळी तें ·

त्रिकाल, त्रिकाळ. अ॰ प्रातःकाल, मध्यान्हकाळ, आणि सायंकाल यातिहींकालाचे ठायीं कि॰ भूत, भविष्य, वर्तमान, यातिहींकालाचे ठायीं, समासादिस्थलीं अधिकरण शक्ति सोडून कालत्रय इतकाअर्थ; २, कों॰पु॰ भोजनादिकर्माविषयीं सालाजो मध्यान्हचुकून अतिकाल त्यास स्त्र॰ ·

त्रिकालदर्शी, २लिं॰सं॰ योगादिबलानें भूत, भविष्य, वर्तमान, कालसंबंधि वृत्तांतें जाणतो तो ·

त्रिकालज्ञ, २लिं॰सं॰ त्रिकालदर्शी·

त्रिकूट, न॰ एककार्य करणारे कि॰ एकमतांचे जेतीन मनुष्यादिक ते ·

त्रिकोण, २लिं॰ तिकोनी·

त्रिगुण, २लिं॰ सत्व, रज, तम, यांचेंजें त्रय परंतु समासादिस्थलीं प्र॰ उ॰ त्रिगुणसंबंधी हेंजग, स॰ त्रिगुणातीत ·

त्रिगुणात्मक, २लिं॰ त्रिगुणरूप जीमाया प्रपंच इ॰ तो ·

त्रिनय, न॰सं॰ त्रय·

त्रिदंडी, पु॰ संन्यासांत एकभेद आहे तो ·

त्रिदिन, न॰ त्रिरात्र·

त्रिदोष, पु॰ वात, पित्त, कफ, यातिहींचा जो एकदांच क्षोभ होतो तो ·

त्रिपाद, पु॰ एकागशींत जानक्षत्राचे तीनपाद आलेआहेत त्यानक्षत्राचा मरणादिसमयीं जो योग तो ·

त्रिपुटी, स्त्री॰ ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान, कि॰ कर्ताकर्मक्रिया इ॰रूप जें त्रिक तें ·

त्रिपुंड्र, पु॰ रामानुजसंप्रदायी कपाळावर कुंकुम रचडी यांचा जा उभ्या तीनरेषा कादितात तो ·

त्रिपुंड्रधारी, २लिं॰ कपाळीं त्रिपुंड्र लावणारा तो ·

त्रिपुर, पु॰ कार्तिकेपौर्णिमेचे दिवशीं देवापुढें कापुर इ॰कांचा जो मोठा दीप दीपमाळेवर कि॰ एरवीं लावितात तो; २, शिवरात्रीचे दिवशीं स्त्रिया शिवापुढें जागती पाजळतात त्यास स्त्र॰ ·

त्रिपुरीपुनव, त्रिपुरीपौर्णिमा, स्त्री॰ कार्तिकीपौर्णिमा ती ·

त्रिपुरुष, पु॰ बाप, आजा, आणि पणजा, ते; २, त्रिपुरुषांतला इ॰स्थलीं त्रिपुरुष संबंधी संततीं तला ·

त्रिपुरोत्सव, पु॰ त्रिपुरीपौर्णिमेस देवापुढें अनेक दीपलावून जो उत्साह करितात तो ·

त्रिफला, त्रिफळा, पु॰ हिरडा, बेहेडा, आणि आवळकठी, हींतीन मिळून ·

त्रिभुवन, न॰ स्वर्ग, मृत्यु, आणि पाताळ, हे तीन मिळून तें ·

त्रिरात्र, न॰ तीन अहोरात्रांचा जो समुदाय तें; २, अ॰ तीनअहोरात्रापर्यंत ·

त्रिरात्रांतला, २लिं॰ जो मेला असतां आपल्यास त्रिरात्र आशौच धरावें लागतें असाजो आपला सगोत्र तो ·

त्रिवर्ग, पु॰ तिघेजण ते; २, धर्म, अर्थ, आणि काम, हे तीन मिळून तो ·

त्रिवळी, स्त्री॰ पोटावर तीनघडी पडतात त्या प्र॰

त्रिविध, २लिं॰ तिहींप्रकारचा तो ·

त्रिवेणी, स्त्री॰ गंगा, यमुना, आणि सरस्वती, यातिघींचा संगम होवुन जो वेणीसारिखा आकार झाला

ला आहे ती; २, रुधिरनदीची त्रिपेढी वेणी ती समु०

त्रिवेणीचा, २ त्रिं० रुधिर, सैन्य, नाम या तिहींचा तीन तारा एकत्र बकून करितात ती आंगठी, धाटा, इ० तो०

त्रिशूळ, पु०न० एक आयुध आहे तो०

त्रिस्थळी, स्त्री० तिरस्थळी०

त्रीपन्न, २ त्रिं० त्रेपन्न०

त्रीपन्नटिकलीचा, त्रीपन्नमंगळीचा, २ त्रिं० त्रेपन्नटिकलीचा०

त्रीसष्ट, २ त्रिं० ६३

त्रुटि, सं० स्त्री० अष्टादशनिमेषात्मक जो काल ती०

त्रुटित, २ त्रिं० तुटलेलें जें सूत्र, ग्रंथ, मैत्री, मन, इ० तो०

त्रेचाळीस, त्रेताळीस, २ त्रिं० ४३

त्रेतीस, २ त्रिं० ३३

त्रेतायुग, न० चारयुगांतील जें दुसरें युग नें०

त्रेधा, स्त्री० भयामुळें जो अंडभास होतो किं० शक्तीपेक्षां मोठें काम पडल्यामुळें किं० एकदांच अनेक कार्यें करण्याचा प्रसंग पडल्यामुळें जी अपेक्षा होत्ये ती०

त्रेपन्न, २ त्रिं० ५३

त्रेपन्नटिकलीचा, त्रेपन्नमंगळीचा, त्रेपन्नी, २ त्रिं० शिवी आहे, माहामाआगमनीजो त्यास समु०

त्रेसष्ट, २ त्रिं० ६३

त्रेहात्तर, २ त्रिं ७३

त्रैकालिक, २ त्रि० त्रिकालसंबंधीजें ज्ञानादिक तो०

त्रैगु

त्रैगुण्य, न० सं० मायेचा तीन गुणापासून साला जो प्रपंचादिक तें०

त्रैराशिक, न० प्रमाण, इच्छा, आणि फल, एतद्रूप तीन अंकराशि मांडून गणित करण्याचा एकप्रकार आहे तें०

त्रैलोक्य, न० त्रिभुवन तें०

त्रैलोक्यचिंतामणि, पु० एकरसायन आहे०

त्रैवर्गिक, २ त्रिं० धर्म, अर्थ, आणि काम, एतत्संबंधि जें कांहीं एक तो०

त्रैविध्य, न० त्रिविधत्व०

त्रोटन, न० सं० सूत्रादि तोडण्याचा जो व्यापार तें०

त्र्याण्णव, २ त्रिं० ९३

त्र्यायूँशीं, त्र्यायशी, २ त्रिं० ८३

त्र्याहात्तर, २ त्रिं० ७३

त्र्याहिकज्वर, पु० मध्यें दोन दिवस आड करून येतो जो ज्वर तो०

त्वगिंद्रिय, न० जा इंद्रियानें शीतोष्णस्पर्शाचें ज्ञान होतें तें०

त्वग्रोग, पु० त्वचेवर जो स्फोटादिरोग होतो तो०

त्वचा, स्त्री० शरीरावरील जें चर्म ती; २, वृक्षादिकांची साल०

त्वरा, स्त्री० जलदी०

त्वरित, अ० तरेनें०

त्वष्ट, न० पु० कांहीं एक कार्य करण्याविषयीं प्रेरक जो उपद्रव तें तो०

त्वष्टा, पु० सं० विश्वकर्मा०

थकणें, कांहींएक कार्यजन्य किंवा रोगादिजन्य कष्टपडल्यामुळें कुंठितशक्ति होणें; व्यवहार, साधकारी, इ० थकणें स्व० पुढें चालेनाशी होणें; बाकी पेका, इ० थकणें स्व० उगवेनासें होणें; कूळ थकणें स्व० ऋणादि फेडण्याविषयीं असमर्थ होणें.

थक्क, वि० कांहींएक अद्भुत पाहिलें असतां तदुपपत्ति शोधण्याविषयीं कुंठित बुद्धि होउन केवल आश्चर्यानें युक्त तो.

थट्टा, स्त्री० कोणेकाची विनोदार्थ जी चेष्टा ती; मानायाचें जें वचनादिकें तें गणणेंतननआणितां त्याचीजी उडवणी ती; उ० सासूचे बोलण्याची सून थट्टा करूं लागली.

थट्टी, स्त्री० राजे किं० राजपुरुष यांचे पुरांचा जो समुदाय ती.

थट्टीरवाना, पुं० थट्टीसंबंधी जो व्यवहार तो.

थट्टेखोर, वि० दुसर्‍याची थट्टा करण्याचा स्वभाव जाचा तो.

थट्टेबाज, वि० हिं० थट्टेखोर.

थट्टेबाजी, स्त्री० थट्टेबाजपणा.

थंड, वि० उष्णविकृतीनें विकृत जालेलें नव्हे जें उदक त्याचा जो स्पर्श किं० तज्जातीय इतरांचा ही जो स्पर्श तो किं० तादृशस्पर्शविशिष्ट जें उदक वायु, इ० तो; २, उष्णतेचा प्रतिपक्षी जाचा परिणाम आहे असें जें औषधादि तो; ३, क्रोध, काम, शोक, इ० कृतजो आवेश किं० त्वरा जास नाहीं तो मनुष्यादि, यंदा चहुंकडे थंड आहे इ० स्थलीं दंगा धोपा इ० कृतसंताप नाहीं असा अर्थ; तेथे अद्यापि थंड आहे इ० स्थलीं विवक्षित कार्याचे सिद्धतेस बहुत अवकाश आहे असा अर्थ; डोके थंड होणें, चित्त थंड होणें, इ० स्थलीं विवक्षितानुरूप इष्टसिद्धि आल्यामुळें समाधान होणें असा अर्थ; दंगा मारामारी इ० थंड होणें स्व० शांत होणें.

थंडगार, वि० अतिशयित थंड तो.

थड, स्त्री० नदी, नदें, इ० कांठें जें तीर ती, काम थडीस लागणें स्व० शेवटास जाणें.

थडक, स्त्री० धक्का.

थडकणें, सवेग चालल्या पदार्थानें मध्यें कोठें प्रतिबंधक आल्यामुळें वेग कुंठित होउन पडणें; उ० फौज नदीशीं थडकून सात दिवस पडली होती.

थडका, पुं० थडक.

थडगें, न० मेलें मनुष्यादि जास्थलीं जाळलें किं० पुरलें असतें त्यास्थलीं चौथऱ्यासारिखें बांधितात तें.

थडथडाट, अ० शब्द होई असें मोठ्यानें अनेकवार लाता मारण्याचें वि०

थडथडीत, वि० फडफडीत.

थंडा, वि० जाचे प्रकृतीस त्वरा नाहीं किं० एकाएकीं क्रोधकामादिकांचा आवेश येत नाहीं असा स्वभाव जाचा तो; २, मैथुनशक्ति जास कमी तो पुरुष; ३, थंडजो औषधादि पदार्थ तो.

थंडाई, स्त्री० थंडपणा.

थडाड, पुं० थडाथडी.

थडाडाँ, अ० थड थडा.

थडाथड, अ० थडथडां.

थडाथडी, स्त्री० लग्नाप्रहरांचा जो अतिशय तो.

थंडावणें, बाह्य थंडीनें व्यथित होणें; २, ला० कोणएक कार्यकरण्याविषयीं आले आवेशपूर्वक मनावर

नावर घेतलें असतें त्यानें तो आवेश सोडणें; ३, २ लिं० सवेग प्रहृत जें दंगा, महामारी किं० कांहीं एक कार्य त्यानें कांहीं मंदना पावणें; किं० केवल शांत होणें; ४, वस्त्र, कागद, पापड, इ० पदार्थ थंडीचे योगानें भिसभिशीत होणें.

थंडावा, पु० उष्णता न भासे असा शीतल वायु इक्षु-छाया, जल, इ० कृत जो थंडपणा असतो तो किं० शरीरांतील उष्णतेचा शामक जो औषधादि कृत थंडपणा तो.

थंडी, स्त्री० जल, वायु, इ० कांचे अंगी दुःसह जो शीतस्पर्श असतो जाचा हेमंतादिकाल माहात्म्यानें अतिशय होत असतो ती; २, थंड औषधादिकांचे योगानें शरीरांत जो उष्णतेचा प्रतिपक्षी गुणविशेष उत्पन्न होतो ती व औषधाचाठायीं तदुत्पादक गुणविशेष असतो ती.

थडें, न० थडगें.

थंडोसा, पु० दे० थंडावा.

थंतरमंतर, न० दाणादोणा मंत्रविद्या इ० तें.

थना, पु० कों० स्त्रीचा स्तनास स्पर्श.

थपकटा, ३ लिं० रा० आधेयाचें जें अंग विस्तृत असतें तिकडून आधारास आश्रयून स्थित जो आधेय पदार्थ तो; उ० जागा संकुचित आहे थपकटा वस्त्रको उकुडवा बैस; २, बसकट डोलाचा जो पदार्थ तो.

थपकण, स्त्री० रा० कुले मांडया आधारास सर्व लागत असें बसण्याचा जो प्रकार ती.

थपथप, अ० कांहीं एक आर्द्र पदार्थापासून बिंदुशः जलादि गळण्याचें विशेषण.

थपथपणें, अ० थपथप.

थपथपणें, थपथप आंतून उदकादि बिंदु गळत असें वस्त्र शरीर, इ० होणें किं० वस्त्रादिकांपासून उदकादि थपथप गळणें.

थपथबणें, थपथपणें.

थपथपीत, ३ लिं० जांतून थपथप पाणी, इ० गळत आहे असें जें शरीर वस्त्रादि तो.

थपाथप, अ० थपथप.

थंपाथपा, अ० थपथप.

थपी, अ० दे० थपकटा होई असें; २, चौरस केलेला चिरा, लांकुड इ० बसवणें. इ० कांचें वि०; उ० जोत्याची पहिली रांगथपी लावावी आणि दुसरी कुडती लावावी.

थबकणें, कांहीं एक कार्य करीत असतां मध्यें अकस्मात् भयादि वाटल्यामुळें चकित होउन किंचित् स्तब्धता पावणें.

थबथब, अ० थपथप.

थबथबणें, थपथपणें.

थबथबीत, अ० थपथपीत.

थर, पु० भित, बांध, जोतें, इ० कर्तव्य असतां पर्याया पर्यायानीं रगड, विटा, इ० कांचे केले जे सन्निवेश ते प्रत्येकीं किं० लिंपायाचें असतां पर्यायापर्यायानीं केले जे लेपने प्र०

थरकणें, अकस्मात् भय जाल्यामुळें कंप रोमांच होत अशा दशेंत पावणें.

थरकण, थरकन्, अ० शरीरें रोमांच एतद्युत होई असें कापणें, भिणें, इ० धा० वि०

थरकर, थरदिली, अ० थरकन्.

थरकांप, पु० भयानें रोमांचसहित जो कंपातिशय तो; २, ३लिं० तद्विशिष्ट जो मनुष्यादि तो.

थरणी, स्त्री० कों० घळलेला जो शेताचा बांध तट ही करणार्थ चिखल, धोंडे, इ० कांचा जो थर देतात ती.

थरत्, अ० कंप व्हावयाजोगें कांपणें, भीं, यांचें वि०

थरथर, अ० वारंवार शरीरीं कंप किं० रोमांच येत असें कांपणें, भिणें, यांचें वि०

थरथरणें, भय-थंडी, इ०कांनें थरथर कांपणें; २, शौर्याच्या आवेशामुळें अथवा प्रेमभरामुळें रोमांचयुक्त होणें.

थरथरां, **थरथरा**, अ० थरथर.

थरथराट, पु० थरकांप.

थरथरी, स्त्री० रोमांचसहित जो कंप ती.

थरारणें, थरथरणें.

थरारां, अ० थरथरां.

थरारी, स्त्री० थरथरी.

थरूं, न० कोयता, खवगळ, इ०कांची जी मृद तें.

थलथलणें, भूमि, शरीर, इ०कांनीं थलथलीत होणें.

थलथलीत, ३लिं० फार पिकल्यामुळें किं० अतिशयित भिजल्यामुळें जामध्यें काहीं काठिन्य राहिलें नाहीं अशा फळ, गर्भ, पीठ, चिखल, इ० पदार्थ तो; २, पुष्ट असून केवल शिथिलजें शरीर तो.

थवा, पु० एकत्र स्थित जो एकजातीय जीवांचा समुदाय तो.

थळ, न० उंस जाजाग्यांत लाविला असतो ती जागा; २, पिशाच्या चिराहायाची जी जागा ती.

थळींचा, ३लिं० चांगल्या खाणीचा बैल, गाय, म्हैस, इ० पशूंचें वि०

थाक, पु० दे० थांग.

थांग, पु० प्रा० थवयाचा अर्थी.

थांगदोरा, **थांगपत्ता**. पु० थाव याअर्थी+प्रा०

थांगा, पु० ठिकाणा.

थांगादोरा, पु० थांगदोरा.

थांगापत्ता, पु० थांगादोरा.

थांगारणें, अस्ताव्यस्त पडलेला पदार्थ पाहिजे तेव्हां सांपडायाजोगा त्याच्या सोईस लावून ठेवणें; आपण संभाळायाचे जे पुत्र, पशु, वस्त्र, पात्र, वेत, इ० पदार्थ ते दुसरे संभाळणाराचे स्वाधीन करून ठेवणें; उ० ही मुलगी कोठेतरी थांगारली म्ह० मी काशीस जाईन; २, विघडलेला पदार्थ पुनः यथाकथंचित् नीट करणें.

थाट, पु० आंत उणेंपणा किं० अव्यवस्थितपणा न दिसायाजोगा सेन्यादिकांचा यथायोग्य रचनेचा जो प्रकार तो; उ० गरीब असून त्यानें लग्नांत श्रीमंतीचा थाट उतरला; वेश्या सायंकाळीं थाट करून बसतात. म्ह० वस्त्र भूषणांची यथास्थित रचना करून बसतात.

थाटणें, थाट दिसायाजोग्या प्रकारानें संसार, कारभार, इ० व्यवहार चालविणें. किं० सेन्यादिक थाट दिसायाजोग्या रचनेनें विशिष्ट करणें; उ० त्यानें थोडयाच वर्षांत संसार चांगला थाटला; उ० थोडीच फौज थाटून उभी राहिली म्ह० ढोल मोठा दिसतो.

थाटमाट, पु० थाट दिसायाजोगीं वस्त्र, भूषण, किं० सेन्य, सभा, इ० कांची जी मांडणी तो.

थाटमांड, पु० थाटमाट.

थाटा, पु० कारवीची जून जाड काठी तो.

थाटी, स्त्री० रा० जाडजी गंध, इ० भरायाची लबकडी ती.

थाडथाड, अ० शब्द होई असें चपराक, लाथा, काठया, इ० कानीं मारण्याचें वि०

थातूरमातूर, न० बिघडलेल्या पदार्थापासून किं० मनुष्यापासून विवक्षित गोष्टीचा कांहीं काल यथाकथंचिन्निर्वाह होई असा कल्पिला जो कांहीं उपायतें; उ० जुन्या घरांत थातूरमातूर करून यंदांचें वर्ष कादायास येईल; सावकार कोपला होता परतु थातूरमातूर करून दोन दिवस राहविला आहे.

थार्थूंमार्थूं, थार्तूंमार्तूं, न० थातूरमातूर.

थार्थोंमार्थों, न० थातूंमातूं.

थान, न० स्तन; २, गजनी, किनखाप, इ० जें अखंड वस्त्र तें.

थानवा, ३ लिं० नाव्हें जें मुलगें तो.

थाप, स्त्री० शब्द व्हायाकरितां समग्र तलहाताचा मृदंगादिकांवर जो प्रहार तो; २. समुद्रादिकांचें लाटांचा नौकादिकांवर जो प्रहार तो; २, दुसऱ्यानें आपल्यास मानावें वर चढ होऊ नये असा जो आपला त्याजवर वरिष्ठता विशेष असतो ती.

थापट, स्त्री० तलहाताचा जो प्रहार तो; थापट उगारली या स्थलीं थापट व्हावयाकरितां तत्साधनीभूत हात उगारिला.

थापटणें, पीठ, माती, द्रोण, इ० कांचे गोळे विवक्षितता तानुरूप विस्तृत व्हावयाकरितां कि० शरीर कि० शरीरावयव करण्यार्थ तलहातानें हलूहलू बडविणें; भाकर, गोवरी, थापटली, इ० स्थलीं भाविसंज्ञाश्रयण जाणावें; २, ला० कोणेकानें आपल्यास द्रव्य यावें कि० आपलें अनेक प्रकारचें काम करावें, इ० कोविषयीं युक्तीनें त्यास उत्साहयुक्त करणें; पाठ थापटणें ह्र० शाबासकी देणें कि० कोणएक कार्याविषयीं कोणेकास उत्साहयुक्त करणें; ३, न० एक कुंभारांचें मडकी थोपटायाचें आऊत आहे.

थापटी, स्त्री० थापट; २, लाहानजी गोवरी ती; ३, पंतोजीचे पोरांचे हातावर मारायाचें कालथ्यासारिखें काष्ठ असतें ती; ४, गिलावा, इ० ओकायाची जी ओकणी ती; ५, पदार्थांस कांहीं उपभोग करूनये ह्र० राजाज्ञानें त्या पदार्थांवर प्रतिबंध चिन्ह करित असतात ती.

थापड, स्त्री० थापट.

थापडणें, थापटणें.

थापडवाईक, ३ लिं० बदलून गोष्ट मागायाजोगें जागध्यें पाणी नाहीं असाजो साधारण मनुष्यादि तो; उ० हा एक राजा जिंकला ह्र० वरकड सैन्यले थापडवाईकच आहेत आपोआप शरण येतील.

थापणें, चुना, चिरवल, द्रोण, इ० कांचा गोळा आघाताबरोबर कांहीं पातळ होऊन चिकटून राही असा भित्त्यादिकांवर मारणें कि० भाकर, गोवरी, इ० थापटून घडणें.

थापलणें, गलबताची नाळ वल्ह्यानें विवक्षित दिशेस फिरविणें.

थापा, पु० कों० टेंकळें फोडायाचें लाकडाचें आऊत असतें तो; २, रा० डोण, चिखल इ०कांचा गोळा भिंत्यादिकांवर थापिला असतां जो थापटी-सारिखा होतोतो; मनुष्यादिकांचा थापा वळणें ह्म० सर्व एक समयावच्छेदें करून दुरवण्यानें पडणें किं० मरणें; उ० तोंडचा रोगाच्या सांतीसुळें गुरांचा एकीकडून थापा वळला.

थापी, स्त्री० गंवडयाचें करणी ह्म० आउत असतें ती.

थापूर्णें, कों० थापणें.

थांबणें, संकल्पित किं० आरब्ध व्यापारापासून कांहींकाल विरत होणें, किं० तो व्यापार कांहीकाल विरत होणें.

थार, पु० कोणएकास स्थिर होऊन राहाण्यास जो आश्रय तो; उ० तो राजा पळूं लागला तेव्हां कोणींएक त्यास थार देईना; रवळाल्यामुळें नदी पाय ठेवायास थार देत नाहीं; २, कांहींएक व्यवहार करायास सोयीचा जो आधार तो; उ० आतां रोजगार करायास कोठें थार राहिला नाहीं यांअर्थीं प्रा० निषेधविषयीं ह्म० बोलण्यांत करण्यांत थार नाहीं ह्म० ताळतंत नाहीं असा अर्थ होतो.

थारळें, न० आंत अग्निघालून दुधादि तापवायें ह्म० जी रवळी केली असतीतें.

थारा, पु० थार.

थारावणी, स्त्री० थारावण्याचा जो प्रकार ती.

थारावणें, स्थिरता पावणें; उ० याचा पाय घटकाभर एकेजागीं थारावत नाहीं;

थारेपालट, पु० दुरवणाइतास गुण पडावा ह्म० जें स्थलांतर करितात तो.

थाली, स्त्री० स्थाली.

थालीपीठ, न० तपेल्यास तेल किं० तूप लावून त्यास भाजणीचें पीठ भिजवून लिंपितात आणि भिजवून जे भक्ष्य करितात तें.

थावर, पु० स्वयंपाकोपयोगी जी मोठी लोखंडाची पळी तो.

थावरणें, दुरवण्यानें किं० दारिद्र्यादिकांनें जो केवल घसरलेला त्यानें पूर्वावस्थेस पावणें; उ० त्याचे दिवाळें निघेल असा डोल आला होता पण मात्क्यान सावकारी थावरली; २, निराश्रित जो मनुष्यादिक त्यानें कोणेकाचे आश्रयास लागणें; उ० तुम्हास चाकरी मिळून तुम्ही येथें थावरलां ह्म० माझी सोय मी पाहीन; कदाचित्सकर्मकही प्र० होतील.

थाळ, स्त्री० स्वयंपाकादिकरायाकरितां चुलीचे अभावीं गोवच्या रचून अग्नि करितात ती; २, रा० ला० ज्वर, गोवर, इ०कानें पोटांत जी अनिवार्यित उष्णता होती ती; ३, स्नानाचें पाणी तापवायाचें जें स्थल ती.

थाळरें, न० रा० थारळें.

थाळा, पु० पीठ मळायाचे उपयोगी धातूमय पात्र असतें तो; ह्म० प्रसूत जाली बाळा आणि वाजवा म्हणती थाळा, थाळा वाजणें, ह्म० द्रव्यादिक निःशेष संपून कांहींनाहीं असें होणें.

थाळाचारी, स्त्री० कों० निसंतान.

थाळी, स्त्री० दे० थारळें; २, लाहानजो थाळा ती;

थाळी पिटणें स्र० कांहींएक गोष्ट सर्वांस विदित होई असें शब्दादिद्वारा करणें ·

थिकडे, न० ठिकडें ·

थिगळ, न० ठिगळ ·

थिगळणें, ठिगळणें ·

थिगळी, स्त्री० रा० ठिगळ ·

थिंगळी, स्त्री० ठिणगी ·

थिजणें, तूप, इ० पातळ पदार्थ थंडीचे योगानें घट्ट होणें; २, नेत्रांनीं मरणासन्नसमय प्राप्तजाल्यामुळें अचेतन होऊन स्तब्धता पावणें; ३, मनुष्यादिकांनें कांहींएक रसाच्यागायीं तल्लीन होऊन स्तब्धता पावणें ·

थिटा, अलिं० कों० विवक्षित कार्यास अपुरा व्हावयाजोगा आंखूड किं० अरुंद वस्त्रादि पदार्थ तो ·

थिनगी, स्त्री० कों० ठिणगी ·

थिपणें, रा० मडकें, इ० पात्रापासून पाणी सुरून बिंदुशः गळणें; पक्षी त्या पत्रासही कर्तृत्व मानितात ·

थिपथीप, अ० पाणी गळणें, थिपणें, इ० काचें वि०

थिबकणें, थिपणें ·

थिबथिब, अ० थिपथीप ·

थिबणें, थिपणें ·

थिरविटी, स्त्री० कों० विरविटी ·

थिलथिलीत, अलिं० कों० थलथलीत ·

थुंकणें, मुखांतील द्रवादिक बाहेर टाकणें; त्यासमयीं प्रा० थू असा शब्द होत असतो; तोंडावर थुंकणें स्र० कोणेकास ती थू करणें एथें थुंकाव जेव्हां बाहेर टाकावाचा आहे तेव्हां प्रसिद्धीस्तव कर्माची अविवक्षीत आहे स्र० अकर्मक धातू होतो; उ० तिथें बसून का तो आंगावर थुंकेल; उ० मनांत द्वेषयाचें नसलेतर अन्न तोंडांत घातलें तथापि तो थुंकील ·

थुंकरणें, थुंकणें सकर्मकार्थी ·

थुंका, पु० थुंकून टाकायाजोगा कि० थुंकून टाकलेला जो मुखांतील लाळ कि० कफ तो; कोणएकाचा थुंका झेलणें स्र० अतिशयित आर्जवांत राहणें ·

थुंकी, स्त्री० थुंका ·

थुय्यो, स्त्री० थोय ·

थुरथुरवणें, क्रोधादिकांमुळें केश, कान, नाक, इ० उभें करणें ·

थू, अ० थुंकण्याचे शब्दाचें अनुकरणोद्भव. विद्या. इ० कांवर थू असें अतिशयित निंद्य कर्तव्य असतां स्र० उ० विद्येनें विनय यावा तो उलटा तुला ताटा आला तस्मात् थू तुझे विद्येवर

थेट, अलिं० रेखा विशेषादिबोधक शब्दार्थांचे अंश रोन एक मुख्य दुसरा सामीप्य सादृश्यादि संबंधमूलक लाक्षणिक जेव्हां त्याला क्षणिकांशानें रहित केवल मुख्यांशमात्र अर्थ लेंकरून विवक्षित असतो तेव्हां लाक्षणिकांश व्यावर्तक तत्तत्शब्दांस हा शब्द विशेषण लागतें; उ० थेट कालपासरवडी साकर चांगली मिळती; हा थेट मऱ्हाटी भाषा बोलतो स्र० इतर भाषा संकीर्णांश रहित शुद्ध जी मऱ्हाटी भाषा ती बोलतो असा अर्थ जाणावा हा शुद्ध थेट ब्राह्मण दिसतो, इ० स्थलीं थेट ब्राह्मणसा दिसतो असा अर्थ होतो थेट ब्राह्मण स्र० सोंग इ० कृत्रिमानें ब्राह्मण जालेला नव्हे असाजो थू

ळचाच ब्राह्मण परंतु थेट ब्राह्मण,इ० प्रयोग अशा-
प कर्तव्य असतांच होतात.

थटेचा, ३लिं० थेट काशी, इ० स्थानें पीतांबरादि पदा-
र्थाविषयीं जी प्रसिद्ध आहेत त्याला थेटस्थानीचा
पीतांबरादि पदार्थ तो.

थेंब, पु० जलादिकांचा जो बिंदु तो; स० थेंबाथेंबीतळें भरे

थेंबका, पु० थेंब.

थेंबडा, पु० थेंब.

थेंबका, पु० थेंब.

थेर, पु० न० आपला नायलोकिक बुडेल हे भय
सोडून चोरी, व्यभिचार, दुर्भोपणा, इ० वाईट व्या-
पार अनिवार्यकरून लागण्याचा जो प्रकार तो तें,
उ० आलीकडे त्या बायकोनें थेर मांडिला आहे.

थेरडा, ३लिं० म्हातारडा.

थेरीण, स्त्री० को० गधा.

थेक, अ० मुरें हाकण्याचा शब्द आहे.

थेथेय्या, पु० चित्त विनोदार्थ वेड्यादि नृत्यरूपजी
क्रीडा तिला म्ह०; उ० असा नित्य थेथेय्या करूं
लागल्यानंतर सगळी दौलत संपेल; २, ला० कांहीं
वेदना सोसवेनाशी झाल्यामुळें गडबडा लोळ-
णें. ओरडणें, इ० जो व्यापार त्यास म्ह०; उ० हा
विंचू झोंबला तर थेथेय्या करायास लावील.

थेला, पु० ठेला

थेली, स्त्री० थैली.

थोक, ३लिं० ठोक; २, पु० दे० एक प्रमाण आहे त्या
प्रमाणानें रेशमाचे तंतू काठीस गुंडाळले म्ह० ए
ककल्ली होती त्या चार कल्ल्या मिळून एक तो.

थोकताळा, पु० ठोकताळा.

थोट, ३लिं० खोटें बोलणें कुभांडरचणें, इ० गुणवि
शिष्ट जो तो.

थोंट, थोंठ, ३लिं० थोट

थोंटण, न० हात पाय यांचे पंजे किं० वृक्षशाखादि
कांचीं अग्रेंही छेदनादिकांनें नाहींशीं जालीं अ-
सतांत तद्रहित जो मागील बोडका हस्तादिभाग
तें

थोंटा, ३लिं० हस्तादिकांचीं थोंटणें जाचीं जालीं आहे-
त असा जो मनुष्य, वृक्ष, इ० किं० तो हात पाय तो.

थोंटाई, थोंठाई, स्त्री० थोटपणा

थोंटापिंपळ, पु० जास बायको, पोर घरदार नाहीं
त्यास म्ह०

थोंटूक, थोठूक, न० थोटण.

थोडका, ३लिं० अल्प.

थोडकावणें, विपुलपणें चाललेला व्यापार किं०
विपुलपणें स्थित जो पदार्थ त्यानें थोडके होणें;
उ० पाऊस थोडकावला म्ह० विहिरीचें पाणी थो
डकावेल.

थोडा, ३लिं० थोडका.

थोडाबहुत, ३लिं० अल्पस्वल्प.

थोतांड, थोथांड, न० कांहीं मूळ प्रमाण नसतां ल
बाडीचें कल्पनेनें समूळ दिसाचाजोगी रचलीजी
गोष्ट तें.

थोतांडी, ३लिं० थोतांड रचण्याचा स्वभाव जाचा तो

थोंथली, स्त्री० नेरोद्दृष्टीमुळें शरीराचे सचेस जो
शिथिलपणा येतो ती

थोंथील, ३लिं० थोंथली आली आहे जास तें. शरी
र तो.

थोपटणें, मनुष्यादिकांस स्फुरण व्हावें किं० उत्साह व्हावा इत्यादयर्थ थापटणें.

थोपणें, थांबणें.

थोबाड, न० गालफड.

थोबाडणें, क्रि० थोबाडावर मारणें; २, ला० पराजित करणें; उ० लाख फौज पांचहजार फौजेनें थोबाडली.

थोबाडी, स्त्री० थोबाड. थोबाडींत मारणें, इ० विपर्यांच याचा प्र० दिसतो.

थोय, स्त्री० इटीदांडू इ० खेळामध्यें जे नियम आहेत त्या नियमांत खेळणार चुकला आणि तो चुकी परपक्ष्याने धरल्यानंतर याचा डाव बुडतो असा नियम आहे त्यास तो चुकला त्याने चुकी परावयाचे पूर्वी थोय ही अक्षरें उच्चारिलीं असतां सदरहु डाव बुडत नाहीं; घालणें. पडणें, धा० यो० प्र०

थोर, वि० आकार, वय, किं० विद्या, मूल्य, अधिकार, इ० संमाननीयजो गुण तेणेकरून जो अधिक किं० जाचेअंगी हलकेपणा नाहीं असाजो प्रौढ दिलदार तो; उ० जाडा तांदूळ, सूत, किं० लाबरस्ता, इ० कांचाठायीं आकारानें अधिकपणा असतांही थोर शब्दाचा प्र० प्रा० होत नाहीं; थोराघरचा थोरले घरचा स्व० संकेतानें महाराज स्व०

थोरला, वि० धाकटा नव्हे तो.

थोरकी, स्त्री० थोरपणा.

थोरवट, वि० हलकेपणा लुच्चेपणा जामध्यें नाहीं असाजो सभ्य मनुष्य तो.

थोरवी, स्त्री० थोरपणा.

थोराई, स्त्री० थोरपणा.

थोरी, स्त्री० थोराई.

द, वि० सं० संस्कृत शब्दमात्रापुढें याचा योग होतो आणि विशिष्टाचा अर्थ त्या त्या अर्थांतें देणारा असा होतो; उ० स्फुरणतें देणारा तो स्फुरद दुःखातें देणारा तो दुःखद इ० जाणावें.

दरवल, वि० ر ل हिं० ठाऊक.

दरवलगिरी, स्त्री० हिं० कोणएक गोष्टीचाजो कोणएकास ठाऊकपणा तो; २, कोणएक गोष्टीवरचो कब्जा करिताजे लक्ष्यानुसंधान तो.

दंग, वि० हिं० इष्ट विषय लाभजन्यजो संतोष किं० चमत्कारादि दर्शक चेष्टाजे विस्मय त्याचाठायीं जाचा भंग करणारी निमग्न झाली आहे तो.

दगड, पु० शस्त्राघातांवांचून सामान्य प्रयत्नानीं फुटत नाहीं जळानें विरघळत नाहीं, अशी पृथ्वीचे शरीरांत अवयवभूत पदार्थ जाति आहे तो; २, ला० मूर्ख किं० करुणादिरसानें जाचें चित्त द्रवत नाहीं त्यास स्व०

दगडधोंड्या, वि० आपआपले कसबाविषयीं आडाणी जो न्हावी, सुतार, इ० तो

दगडतळी, स्त्री० कढी, ताक, इ० पदार्थ देण्यासाठीं दगडाचें पात्र करितात तो.

दगडफूल, न० एक औषधी पदार्थ आहे.

दगडळ, वि० धोंडगळ.

दगडी, स्त्री० दगडतळी; २, वि० दगडाचीजो भिंत इ० तो.

दगडया, २लिं० दगडयांशा;२,जंवरा मसणा ·

दगदग, स्त्री० अनेकांचें देणें किं० अनेक कार्ये एकाकालीं करण्याचा प्रसंग, इ० कारणामुळें कंटाळा यावयाजोगा जो परिश्रम होतो ती ·

दगदावा, पु० कोणएक पदार्थावर कोणएकाचाजो स्वत्वादि संबंध तो:प्रा० नि०प्र०

दंगदावा, पु० दगदावा ·

दंगल, न० पु० हिं० यवनलोक अनेक गर्दाई, परवाजी, इ० एकत्रमिळवून जो गायनादि समारंभ करितात तें तो;२, ला० धांगडधिंग्यास ह्म०

दगलबाज, २लिं०हिं० दगादेण्याचा स्वभाव जाचा तो ·

दगलबाजी. स्त्री० हिं० दगलबाजपणा ती ·

दंगा, पु० देशादिकांतील सर्व मनुष्यादिकांची धांवाधांव पळापळ व्हावयाजोगा जो गलीम, पेंढारी, इ० कृत उपद्रव तो ·

दगा. पु० यद्विषयीं आपण जा भरवंशानें राहातो त्या भरवंशाचा घात होऊन आपली फसगत व्हावयाजोगें जें कोणएकाचें प्रतिकूलवर्तन किं० तेणेंकरून होणारी हानी तो; बस, दे, कर. इ०प्र०

दंगाधोपा, पु० दंगा,इ०

दगाफटका, पु० दगा,इ०

दगावणें, अकस्मात् कांहींएक बाला पडल्यामुळें मरण,छिन्नभिन्नत्व, इ० नाश पावणें ·

दगेखोर, २लिं० हिं० दगलबाज··

दगेबाज, २लिं० हिं० दगेखोर ·

दगेबाजी, स्त्री० हिं० दगलबाजी·

दग्ध, २लिं० सं० जळला तो ·

दग्धहस्ती, २लिं० जाचे हातावाली राहिलेल्या भृत्य शिष्यादिकांचें कल्याण होऊं नये असे दैवयोगाचाजो मनुष्य तो;२, जाचे हातून अन्न,द्रव्य, इ०कांस पुरवटा येत नाहीं असाजो मनुष्य तो;३, जाचे संबंधानें कोणएकाचें बरें होत नाहीं असाजो देश, ग्राम, राज्य, इ० तो ·

दचकणें, दचक्यानें युक्त होणें ·

दचका. पु० भयानें शरीरादिकांस आंचका बसतो तो ·

दटावणें, दुसरा दबे असें मारण्याबांचून शब्दव्यापारादिकानें करणें ·

दट्टा, पु० वेत, शिंसा, सुधलें, दगडतळी, इ०कांचून पदार्थ बाहेर न पडावा ह्म० त्यांचे छिद्रास बूच मारितात तो;२, दुसऱ्याचा पाणउतारा व्हावयाजोगा गालिप्रदानादि उग्र भाषणाचा जो मार तो ·

दंड, पु० गमनादिसमयीं हातीं धरावयाजोगा वेळू,इ० कांचे काठीचा जो तुकडा तो;२, कोंपरापासून हाताचा वरचा भाग तो;३, शासन;४,अपराध्यापासून शासनार्थ द्रव्य घेतात तो;५, धोतर, लुगडें, इ० जुन्ये वस्त्राचे दोन तुकडे एकत्र करावयासाठीं आकारविशेषाची जी शिवण घालितात तो;६, रताळीं, ऊंस, इ० लावायाकरितां मृत्तिकेचा लांबट उंच वटा कि० रचली करितात तो;७, मोट,इ०कांचें पाणी दोंहोंबाजूस जावयाकरितां उंचवटा करून जो मार्ग करितात तो;८, निमोळता बरूमानें उतरता जो लांबट पर्वतावयव तो;९, ला० दे० दी-

डगा जो मनुष्य तो; दंड काढणें, एथें जोर काढणें असा अर्थ, त्याजबराबर वर्षभर दंड काढिले एथें व्यर्थ श्रम केले असा अर्थ.

दंडक, पु० संप्रदाय.

दडकण, न० कों० चेपण.

दंडकणें, कों० कांहींएक पदार्थ दडपून बसे असें करणें; २, कोणएक पदार्थाचा पोटीं कोणएक पदार्थ घट्ट चेपून बसविणें.

दडकुळी, स्त्री० रा० एकानें लपावें, एकानें शोधून काढावें, असाजो पोरें खेळ खेळतात ती; दडकुळी मारणें ह्र० दडी मारणें.

दडण, स्त्री० पर्वतादिकांचे आश्रयानें मनुष्यादि दडायाजोगी जी गुहादिरूप जागा असती ती.

दडणें, कोणएकाचे दृष्टीस न पडावें ह्र० अंतर्धानादिकानें गुप्तरूपें राहाणें.

दंडणें, अपराधी, इ०कांस ताडन, द्रव्यापहार, इ० द्वारा शिक्षित करणें; २, प्रायश्चित, तीर्थयात्रा, इ० कानीं शरीर, अंतःकरण, इ० दमनविशिष्ट करणें.

दडदड, अ० असाशब्द होई असें पादप्रक्षेपध्वनीचें अनु० धांव, चाल, पांचें वि०; उ० तो दडदड धांवत गेला.

दडदडणें, अ० दडदड.

दडदडाट, पु० दडदड शब्दाचा अतिशय तो.

दडदडीत, १लिं० रक्त विकारानें जाड, कठिन, आलीजी लचा, गळू, इ० ती; २, दे० शीत निवारण व्हावयाजोगें जें जाड घट्ट वस्त्र, इ० तो.

दंडन, न० सं० दंडण्याचा जो व्यापार तेंवतज्जनित जो देहादिकास संस्कारविशेष होतो तें

दडपण, न० दडकण; ला० माझेउरावर दडपण मोठें आहे, इ० स्थलीं कांहींएक दुर्निर्वाह कार्याचें ओझें आहे, ऋनेंस सासू हें दडपण, इ० स्थलीं उ० खरबलपणें घर्तू लागली असतां शिक्षक आहे असा अर्थ.

दडपणें, कांहींएक पदार्थाचे भाजरवाली पदार्थाचेपून बसे असें करणें; २, ला० कोणेकास बादादिकानें आपली वर्चस्विता होऊन त्याची निकृष्टता होई अशी दशेतें पावविणें; ३, कांहींएक पदार्थ गोष्ट प्रसिद्ध न होऊंदेतां गुप्तपणें राखणें.

दडपा, पु० दडपण; २, मार्गस्थ मार्गी निजायाचे समयीं सर्व आपली चीजवस्त एकत्र आणोपून जी रचनाविशेष करितात तो; ३, ज्वरादिकांचा आंगांतून घर्म निघावा ह्र० जड वस्त्राचें जें पांघरूण घेतात तो.

दंडपारुष्य, न० सं० काठी, इ० कानें कोणएकास मारिल्यामुळें होतोजो अपराध तें.

दंडफुगडी, स्त्री० परस्पर एकमेकाचे दंड धरूनउड्या जी फुगडी घालितात ती.

दंडवत, न० दंडासारिखें साष्टांगनमन ते.

दडस, १लिं० दडदडीत हिंतीयार्थी.

दंडस्नान, न० नद्यादिकांचाठायीं आंग न चोळतां केवळ देहमात्र भिजायाजोगें करितात जें स्नान तें.

दड्डा, पु० नाक, कान, इ० कांचे छिद्रांत प्रतिबंधक वसनें जें मलादि तो; २, यापासून अमुक कार्य घडेल

घडेल, न घडेल इ० रुपजो कोणएका विषयीं अंतःकरणांत भरवसा असतो तो; ३, दे० पेदाऱ्याचा जो समुदाय तो.

दंडासन, न० बोंगडी, इ० कांचें कोणेकानें लांबट प्रसंगी निजायासही पुरायाजोगें घातलेंजें आसन त्यास ह्म०

दंडाळा, ३लिं० दंड घातला आहे जास तें वस्त्र.

दंडिया, पु० बाराहातांवर आणि पंधराहातांचे आंत इतक्ये लांबीचें जे लुगडें तो.

दंडी, पु० दंड आहे जास तो संन्यासी; २, स्त्री० दंडी गाणाऱ्या विणा ती; ३, छंदोविशेषानें बांधलेली एक कविता आहे.

दंडी, स्त्री० कोणेकाचे दृष्टीस न पडावें ह्म० गुप्तपणें जी स्थिति ती; मार, इ० धा० प्र०

दंडीगाण, पु० घर भोंपळा आणि रवाली दांडी अशोरीतीचा विणा बाळगून भीक मागणारी गोंसाव्यासारिखी एक जाति आहे.

दंडेरा, ३लिं० दंडाळा.

दंडेल, ३लिं० न्यायत; द्यावे. घ्यावें. असें जें प्राप्त झालें तें न करितां सुरळीतपणासोडून कज्जा सांगावा, इ० रूप स्वभाव जाचा तो.

दंडेली, स्त्री० दंडेलपणा.

दंड्य, ३लिं० दंडायास योग्य, जो अपराधी इ० तो.

दण, कन, कर, दिशी, इण, शब्द होई असें बुकी मारणें, वाजणें, इ० वि०

दणका, पु० दण शब्द व्हायाजोगा मुष्टि, मुसळ, इ० प्रहार तो; २, अनेक वाद्यादि ध्वनीचा जो कडाका तो; ३, ला० संप्रदायापेक्षां अधिक द्रव्यादि लावून सर्वत्र प्रसिद्धि व्हायायाजोगा जो विवाहादि प्रयोजनाचा समारंभ करितात तो; ४, टाका.

दणकावणें, दणक्यानें विवाहादि प्रयोजन करणें; २, दणदण शब्द होई असें मुष्ट्यादिकानीं मारणें; ३, उग्र मोठ्या भाषणानें दुसऱ्यास दबविणें.

दणकें, न० कों० दणका.

दिपणें, पदार्थांचें चाकचक्य किं० तेज असह्य झाल्यामुळें दृष्टिवर ठरेनासी होणें, एथें इंद्रीसही कर्तृत्व मानितात; उ० सूर्याकडे पाहावत नाहीं डोळे दिपतात; जातेजाचे योगानें दिसत असतें नेत्रतेज अकस्मात नाहींसें झाल्यामुळें क्षणमात्र केवळ आंधळेपावणें; २, ला० अपरिचितानें कांहीं अपूर्व अद्भुतप्राय पाहिल्यामुळें चकित होणें.

दिपमाळ, स्त्री० देवालयापुढें कार्तिकादिकांत दिवे लावायाकरितां पाषाणादिकांचा स्तंभ केलेला असतो तीं; २, ला० फार उंच जी स्त्री तिला निंदेनें म्ह०; ३, देवालयाचे द्वारप्रदेशीं काष्ठास दिवेलावणी बसवून मालाकार दीपलावितात तीं.

दिपवत, स्त्री० कों० देवालयादिकांत जी सांजवात करितात तीं.

दिपवा, पु० कों० सारादिवस मेघांचे दाटीनें अंधारी असतां त्यामध्यें कदाचित घटकादोनघटका जो सूर्याचा प्रकाश पडतो तो.

दिपवात, स्त्री० तेलवात.

दिपवाळी, स्त्री० नरकचतुर्दशीपासून चारदिवस जामध्यें हिंदुलोक दीपोत्साह पूर्वक सण करितात तीं; २, मार्गशीर्षशुद्ध प्रतिपदा आदिवशीं बैल शृंगारितात आणि सण करितात तीं; इला थोरली, गुरांची, देवांची, ह्मणिशेषणें देतात.

दिपाचाकवडा, पु० वा० केवळशरीरानें अशक्त

सालाजो मनुष्य कि॰ गृहकृत्यादि व्यवहारांत जो केवळ नावाचामात्र धनी तो.

दिपावणें, कों॰ दिपणें.

दिपुष्ट, न॰ दीपानें उच्छिष्ट केलेलें जें तेल तें.

दिपोष्ट, न॰ दिपुष्ट.

दिमारव, पु॰ तोरा; स्त्री॰ दिमारवलवडी आणि कानांत करवडी.

दिमारवदार, ३लिं॰ तोरेदार.

दिम्मत, स्त्री॰ دست वस्तुतः अन्यदीयजो पदार्थ त्याला स्वीयसंबंधानें वर्तविण्याजोगा स्वाम्यादि द्वारा तत्तत्पदार्थविषयक कृत्यजो आपल्याकडे अधिकार तो; उ॰ हा डागिना तुमचे दिमतीस असूंद्या; तुमचे दिमतीचे स्वारांची हजारी घ्यायाची आहे.

दिम्मतवार, अ॰ अनेकपदार्थांवर अनेकांचा जा दिम्मती त्या व्यवस्थापूर्वक समजत असें लिहिणें इ॰ क्रियाविशेषण.

दिम्मतदार, ३लिं॰ हिं॰ जाचे दिमतीस जो पदार्थ आहे तो त्याचा.

दिरिंग, पु॰ उशीर.

दिल, पु॰ न॰ دل अंतःकरण.

दिलखुशी, स्त्री॰ دل خوشی अंतःकरणाची जी खुशी ती.

दिलगिरी, स्त्री॰ دلگیری दिलगीरपणा.

दिलगीर, ३लिं॰ دلگیر अंतःकरणांतील उत्साह भग्न झाल्यासुमें जो खेदयुक्त तो.

दिलदार, ३लिं॰ دلدار कांहीं संकट प्रसंग पडला असतांही जाचें धैर्य किं॰ उत्साह भग्न होत नाहीं किंबहुना वाढतें तो.

दिलदारी, स्त्री॰ دلداری दिलदारपणा.

दिलदिलासा, पु॰ دل آسا भरवंसा.

दिलपाक, ३लिं॰ دل پاک अंतःकरणाचा जो कुजका नव्हे तो.

दिलासा, पुं॰ دل آسا दिलदिलासा.

दिल्ली, स्त्री॰ دلی एक मोठें शहर आहे; पराकाष्ठेचा जोढक, सोदा, त्याला दिल्लीचा, दिल्लीकर, दिल्लीवाला, इ॰ ल॰.

दिवई, स्त्री॰ कों॰ आषाढ अमावास्या त्यादिवशीं दिवे पूजितात ती; २, ३लिं॰ लाहान नारळ येत असतात अशी माडांत जात आहे.

दिवटा, पुं॰ कों॰ कांदुकास वरच्या कि॰ क्रापूस लपेटून प्रकाशार्थ कांकडा करितात तो; २, कुलादिकांस दोष लावायाजोगा अयोग्य जो मनुष्य त्यास निंदावसरीं ल॰, ल॰ चंद्रमदिवटे विरमथाळे.

दिवटी, स्त्री॰ बहुतवरचें गुंडाकून मोठी दंडाकार प्रकाशार्थ जीवात करितात ती देवादिकांपुढें उजळायाची असतां तिला शैव्यादिकांची मूठ असते ती; २, त्या केवळ मुठीसही दिवटी ल॰; ३, नारळाचे करवंटीचा जो हिलाल करितात ती.

दिवटीजोहार, पु॰ हिं॰ रा॰ सायंकालीं दिवे लागले ल्यानंतर राजादि धन्यास सेवकजन यथायोग्य गमरामा इ॰ करितात तो.

दिवट्या, पु॰ दिवटी धरायाकरितां जो भृत्य ठेविला असतो तो.

दिवठण, स्त्री॰ न॰ गृहादिकांचा ठायीं नित्य दिवा लावायाचें जें स्थान ती तें.

दिवड, न० निर्विष जलचर सर्प आहे.

दिवळी, स्त्री० रोमणदिवा, दगडई, इ० कजो लाहान दीपाधार ती; २, उभीउंचलली असतां भरून ये ती अशा प्रकारची तेलादि काढावयाची पळी अस ती ती; ३, पणथी.

दिवस, पुं० सूर्योदयापासून सूर्यास्तपर्यंत किं० दुसरे सूर्योदयापर्यंत जो काल तो; २, ला० मृताचीजी औ र्ध्वदेहिक क्रिया तो; उ० बापमेला त्याचे दिवस के लेपाहिजेत; ३, सूर्य; उ० दिवस थारेवर गेला ते व्हांमीं निघालों; दिवस घेउन येणें जाणें इ० स्थलीं दिवसाउजेडीं असा अर्थ, दिवसाबरोबर ल० सूर्यो दयाबरोबर किं० दिवसाउजेडीं.

दिवसगत, स्त्री० कांहीं एककार्य होण्याविषयीं किति एक दिवसरूपजो विलंब ती; उ० जाण्याला दिवस गत लावालतर ने भेटणार नाहींत.

दिवसबळ, न० विवक्षित कार्याविषयीं उपयुक्तजें सूर्यप्रकाशाचें विद्यमानत्व तें; उ० चित्र काढणें हें दिवसबळाचें काम रात्रीं चांगलें होणार नाहीं.

दिवसभऱ्या, वि० कामामध्यें जोगावून यथाकथं चित् दिवसभरण्याचा स्वभावजाचा असाजो भृ त्यादि तो.

दिवसमजूरी, स्त्री० महिना,वर्ष, इ० बोलीनकरितां दिवसाचीच बोलीकरून चाकरी करितात ती; उ० मीं एकाकडे चाकर राहात नाहीं दिवसमजूरीनें पोटभरितों.

दिवसाउजेडीं, अ० सूर्यास्त व्हावयाचे पूर्वी.

दिवसाढवळ्या, अ० स० ढवढवीत दिवस असतां.

दिवसादरवडा, पु० कोणी भिडेचे गृहस्थानें आप ल्या देवन आपला कांहीं विषय घेतला असतां भि डेमुळें नकोसपणानें येतनाहीं इ० रूपेंकरून जो अ पहार होतो त्याम ल०

दिवसादिवाळी, स्त्री० दिवाळीचें सणासारिखी नित्य खाणें पिणें इ० जी उधळपट्टी ती; उ० अशी दिव सादिवाळी केल्यास पुढें भीकमागावी लागेल.

दिवसानदिवस, अ० आजचेपेक्षां उद्यांउद्यांपेक्षां परवां अशाक्रमानें आधिक्य किं० न्यूनता हे विष य असतां म०, उ० याणें दिवसानदिवस शहाणा व्हावें तो वेडा होत चालला.

दिवसाभऱ्याचा, अ० सगळा दिवसपर्यंत; उ० मीं दि वसभऱ्याचा श्रमलेला आणि उपोषित आहे; २, समग्र दिवस कंठून किं० कंठला जाई असें एकवार क्रियमाण जी भोजनादि क्रिया तिचें विशेषण; उ० दिवसास कांहीं न मिळून दिवसाभऱ्याचा संध्या काळीं जेवतों.

दिवसावडा, पु० वा० दिवसभर कामकेल्याचें जें मोल तो; उ० माझे तुजकडे चार दिवसावडे येणें आहे त.

दिवसासकट, अ० दिवसाउजेडीं.

दिवसें, न० कों० निवगरी.

दिवसेंदिवस, दिवसानदिवस.

दिवा, पु० पणती इ० कांचा द्वारीं तेलानें किं० घृतानें भिजलेली जी प्रज्वलित वात तो; २, द्वारादिकांत टांगून देवावयाजोगें लोहाचें आकारविशेषाचें दीपाधारपात्र असतें तो; ३, विवाहादिकांत पिष्ट मयादि दीपाधारपात्र करितात तो; ४, वैशाखशु क्ल अश्विन्यादि पंचनक्षत्रयुक्त जे दिवस तीं; ५,

ला०

ला॰ आरोपित दिवटा; दिवालावणें स्न॰ मोठी अपकीर्ति संपादणें क्रि॰ निषेधविषयीं कांहीं मोठा गजब करणें, देशादिकांचा उजाडपणा वर्णाया-चा असतां तेथें दिवा लागत नाहीं असें वर्णिताना, दिव्याबातीनें शोधणें स्न॰ दिव्यानें न दिसे अशा अडचणीचे आगेम बातीनें पाहून गृहादिक सर्व शोधणें; ६, सं॰अ॰ सूर्योदयापासून अस्तपर्यंत जो काल तदंतःपातिकाली; उ॰ तुम्ही गमनासमुहूर्त्त दिवा धरला किं॰ गत्रौ, दिवालग्न इ॰ समासही जाणावे, कालोपलक्षणार्थ दिवेलागणें असा प्रयोग असतां प्रसिद्धीस्तव समय जाणावा.

दिवाकीर्ति, सं॰पु॰ नाव्हावी.

दिवाण, न॰ دیوان प्रजापालन दुष्टनिग्रह इ॰ राजकीय व्यवहाराचें अधिकरण तें; २, पु॰ राजा इ॰ जो मुख्य अधिकारी त्याचा जो मुख्य कारभारी तो, स्न॰ दिवाणानें मारलें आणि पायमानें भिजविलें तरि कोणास सांगावें.

दिवाणखाना, पु॰ دیوانخانہ मोठ्या वाड्यांत माडीवर इतर जाग्यापेक्षां चांगली सभा करणें इत्यादयर्थ जी जागा केली असते तो.

दिवाणगिरि, स्त्री॰ دیوانگیری दिवाणाचा जो अधिकार तो.

दिवाणजी, पु॰ دیوانجی दिवाण द्वितीयार्थक तो

दिवाणदर्बार, न॰ पु॰ हिं॰ दिवाणदर्बार इ॰ जीं व्यवहार निवडायाचीं स्थानें तें तो, कोणेएकगोष्ठीचें दिवाणदर्बार करणें स्न॰ फिर्यादचा हाडी, इ॰ हा दिवाणदर्बार इ॰ कांत प्रसिद्ध करणें.

दिवाणदेणें, न॰ भूम्यादिसंबंधी राजकर जो द्यावा लाग लागतो तें.

दिवाणझांप, दिवाणीझांप, पु॰ कों॰ दिवाणांत द्यावयाजोगा जो लाहान झांप तो.

दिवातें, न॰ कों॰ शिदोरी.

दिवांध, वि॰ सं॰ जो प्राण्यास रात्रीं मात्र दिसतें असे जे दिवाभीतादिक तो.

दिवाभीत, पु॰ सं॰ घुबड.

दिवाळखोर, वि॰ आपला आयव्ययादि विचारनपाहातां मनस्वी उधळपट्टी करण्याचा स्वभाव जाचा तो.

दिवाळखोरी, स्त्री॰ दिवाळखोरपणा.

दिवाळी, स्त्री॰ दिपवाळी; २, ला॰ भक्षभोज्यादियथेष्टोपभोग पूर्वक कालनेण्याचा प्रकार तो; उ॰ त्याचें घरीं रोज दिवाळी आहे.

दिवाळें, दिवाळें, न॰ सावकाराचा व्यवहार बुडाल्यामुळें तद्दीय उत्तमर्णांनी मिळून यथाविभागें जें द्रव्य असेल तें घ्यावें, अशी जी त्या सावकाराची फजीती तें, काढणें, निघणें, वाजणें, याधातूंवर अन्वय; २, ला॰ भोक्त्यांची तृप्ति न होतां अन्नसंपत्ति इ॰रूपजी फजीती तें.

दिवेपंचक, न॰ वैशाखमासीं अश्विन्यादि पांच नक्षत्रें तें.

दिवेलागण, स्त्री॰ सायंकालरूप दिवे लागायाचा जो समय तो.

दिवेलावण, स्त्री॰ दिवेलागण.

दिवेलावणी, स्त्री॰ दिवेलागण; २, उजाड ग्रामदेशादिकांत गृहादि बांधून केलीजी वसाहत तो, दिवेलावणीचा काल स्न॰ ग्रामादिकांत दिवेलावणी

ह्मावी म्हणून गजकर नदेतां शेतें करून खावीं असा वसाहात करणारांस कांहीं वर्षे सर्कार कौल देतें तो.

दिवेलावणें, न॰ ताम्रादिकांचें वाटीसारिखें दिवालावायास पात्र करितात तें.

दिवेसळई, स्त्री॰ दिवालावायाकरितां इंगळावर धरितांच पेटायाजोगी शेवटास गंधक लावलेली तागाची काडी असती ती.

दिव्य, १लिं॰ स्वर्गसंबंधि जो पदार्थादि; २, ला॰ लोकोत्तर उत्कृष्ट जो पदार्थादिक तो; ३, साक्ष्यादिप्रमाणानीं विवादाचा निर्णय नजाला असतां जर मा॰ साक्षावाद खोटा असेल तर ईश्वर मा॰ साक्षा नाश करील इ॰ प्रतिज्ञा पूर्वक शपथ किं॰ तप्त लोहादिक वादी किं॰ प्रतिवादी घेतात तें; दिव्यांतून उतरणें ल॰ मोठ्या संकटांतून पार पडणें.

दिव्यदेह, पु॰ जरा, घर्म, दुर्गंधि, इ॰ दोषरहित अतएव स्वर्गीं वास करायास योग्य असा जो देह तो; ला॰ निरोगी, बलाढ्य, सुंदर, जो देह त्यास ल॰.

दिव्यदेही, २लिं॰ दिव्यदेह आहे जाचा तो.

दिशा, स्त्री॰ विवक्षित प्रदेशास गोल केंद्रना किं॰ वृत्तकेंद्रना रूप अवधिता कल्पून त्यापासून परिधीकडे सूत्र, दृष्टि, इ॰ कांचे ऋजुगमनास ऋजु जे असंख्य ऋजुमार्ग जांचा अंत कोठे होत नाहीं ते प्रत्येकी, त्यामध्यें प्राच्यादिक आठ आणि ऊर्ध्व अधर अशा दहा अतिप्रसिद्ध आहेत; २, ला॰ कांहींएक कार्याची ईषत् जी रीति जिणेंकरून त्याकार्याची सर्वरीति बुद्धिमानाचे मनांत येती ती; उ॰ यालिहिण्याची एकवार दिशा दाखवून द्या ल॰ मीं हि शेष आकारून देईन, दिशेस जाणें ल॰ मलविसर्गार्थ जाणें दिशाभारणें ल॰ आपण जें कपट करितों तें कोणीकडून ही दुस-याचे नदिसे इ॰ मंत्रसामर्थ्यानें करणें; दिशाकोणें कि॰ फुलणें ल॰ सूर्य कि॰ चंद्र उदयास न आल्यामुळें उज्वलित होणें.

दिशाप्रकाश, पु॰ सं॰ सूर्य, चंद्र, उदयास न आल्यामुळें जी दिशांस उज्वलता येती तो.

दिशाभूल, स्त्री॰ अपरिचित स्थलीं गेलें असतां पूर्वकोणती पश्चिम कोणती हें समजत नाहीं असा जो मोह होतो ती.

दिशीं, अ॰ फट, खट, इ॰ अनुकरणाचे शब्द यांचा प्रयोग करितात.

दिशींच, अ॰ कों॰ आजकरीन श्रमकें आल्याबर करीन अशा बुद्धीनें उशीर नलावितां; उ॰ यंदा पावसाचें अळम टळम दिसतें बेगमी विषयीं दिशींच जपावें.

दिसगत, स्त्री॰ दिवसगत.

दिसणें, कांहींएक विषय दृष्टिगोचर होणें; २, अनुमानादिकानें बुद्धिविषय होणें; उ॰ यंदाचे पावसावरून पुढें सस्ताई होईल असें दिसतें.

दिसाघडी, अ॰ वा॰ दिवसाउजेडीं.

दीड, ३लिं॰ अर्धसहित जो एक तो.

दीडचतुर, ३लिं॰ जास्त्या मूर्खामधून जो शाहाणपणाचा अभिमान मिरवितो त्याला ल॰.

दीडदमडीचा, ३लिं॰ अतिशयित दलकें किमतीचा.

दीडशाहाणा, ३लिं॰ दीडचतुर.

दीन, १ लिं० दारिद्र्यादि संकटामुळें दुसऱ्यानें आपल्यावर कृपा करावी असें इच्छावाजोगे अवस्थेस पावला तो; २, यवनांचा महमदानें स्थापिलेला जो धर्म तो; ३, युद्धारंभीं मंगलार्थ यांचा उच्चार यवन करितात, कदाचित् द्विवार त्रिवार ही करितात; दीनदुनयां खानरेंतनाहीं ल० मदादिकामुळें धर्म आणि लौकिक गणनेंत नाहीं असा अर्थ.

दीनदयाळ, १ लिं० दीनावर दया करण्याचा स्वभावजाचा असाजो ईश्वर इत्यादिक.

दीननाथ, १ लिं० दीनांचें संरक्षण करण्याचा स्वभावजाचा तो.

दीनबंधु, पु० दीनदयाळ.

दीनवदन, १ लिं० दैन्यामुळें मुखश्री जाऊन उतरली आहे तो.

दीनवाणा, १ लिं० दीनासारिखा तो.

दीप, पु० दिवा प्रथमार्थी.

दीपक, पु० दीप; २, एक राग आहे.

दीपकल्याण, पु० गानांत एक राग आहे.

दीपचंदी, स्त्री० होरीसारिखी गाण्यांत एक चीज आहे.

दीपदर्शन, न० सायंकालीं नमस्कारपूर्वक दिव्यांचें दर्शन घेतात तें; २, तदुपलक्षित जो काल तें.

दीपन, न० अग्नीचा दीप्त होण्याचा जो व्यापार तें; २, जठराग्नि, काम, इ० कांचें उत्तेजक जें औषधादि तें.

दीपावली, स्त्री० दिपवाळी.

दीपिका, स्त्री० समई, टाणवी, दिवटी, इ० ती.

दीपोत्सव, पु० देवालयादिकांचा ठायीं कार्तिकादिकांत अनेक दीप लाविलेले असा जो उत्साह तो.

दीप्त, १ लिं० प्रज्वलित.

दीप्ति, स्त्री० सूर्य, अग्नि, हीरकादिरत्न, इ० कांची जी कांति ती.

दीर, पुं० नवऱ्याचा भाऊ.

दीर्घ, १ लिं० क्षण, पल, घटिकादि किं० यव, अंगुल, हस्त, क्रोशादि, किं० लघुमात्रादि, हीं प्रमाणें विवक्षितापेक्षां जास्त अधिक लागतात असा जो कालरूप किं० देशरूप किं० शब्दरूप पदार्थ तो; देशाविषयीं रुंदीचे यवादिक विवक्षित नाहींत; उ० दीर्घ स्वरेंकरून रडूं लागली; २, ह्रिमात्राकजो आ, ई, इत्यादि स्वररूप वर्ण तो; ३, ला० तन्नद्विषयाची परिपुष्टता जामध्यें अधिक आहे असा जो विचारादिक तो.

दीर्घचतुरस्र, १ लिं० रुंदीपेक्षां लांबी अधिक जाची असें जें चतुष्कोण क्षेत्र तो.

दीर्घदर्शी, १ लिं० कार्याचे सर्वपरिणाम लक्ष्यांत आणून तदनुसार वर्तण्याचा स्वभाव जाचा तो.

दीर्घदृष्टि, १ लिं० दीर्घदर्शी.

दीर्घद्वेष, पु० चिरस्थायी जो कोणेकाशीं कोणेकाचा द्वेष तो.

दीर्घद्वेषी, १ लिं० एकवार द्वेष पडला असतां यावज्जन्म विसरूंनये असा स्वभाव जाचा तो.

दीर्घप्रयत्न, पु० मोठाजो प्रयत्न तो.

दीर्घशंका, स्त्री० मलविसर्जन.

दीर्घसंधानी, १ लिं० कांहीएक कार्याविषयीं अनेक जीं द्वारें असतात तेथें सर्वत्र संधान राखण्याचा स्वभा

स्वभाव जाचा तो.

दीर्घसूत्री, २लिं० कांहीं एक कार्याविषयीं उशीर लावण्याचा स्वभाव जाचा तो.

दीर्घायु, २लिं० सं० चिरकाल आहे आयुष्य जास तो.

दीस, पु० दिवस.

दीक्षा, स्त्री० सं० कांहीं एक आरंभ जें व्रतादिक तत्समाप्ति पर्यंत तद्विषयक जे नियम सांगीतले असतात त्यांचा जो स्वीकार ती; २, ला० कांहीं एक आचरणाची जी रीति ती; उ० आलीकडे यानें दीक्षा बरी धरली आहे.

दीक्षित, पु० सं० यज्ञ केला आहे जाणें तो; २, तदीयसंततिपुरुषांस ही ल०; ३, जा कर्माविषयीं जाणें कंबर बांधली आहे तो त्या कर्माविषयीं.

दु, अ० दोन या शब्दाचा समास जाला असतां तत्स्थानीं हा शब्द प्रायः असतो; उ० दुपार, दुहेरी, इ०

दुई, स्त्री० कोणे एकाशीं कोणे एकाचा पडला जो विरोध ती; उ० त्यांची आमची दुई पडल्यापासून आम्हीं त्यांचे घरीं जात नाहीं.

दुकटा, २लिं० एकच आहे सोबती जास तो; एकटा शब्दाचे सन्निधानानेंच याचा प्रयोग येतो; उ० हीं वाट एकट्या दुकट्यानें जावयाजोगी नव्हे, तूं एकटा नजासनर दुकटा कोण देवुं एथें दुसरा असा अर्थ होतो.

दुकटें, न०रा० नृणासजें दोहों फांट्यांचें केसर येतें तें.

दुकसवी, ३लिं० दोहोंकामावर पडावयाजोगा जो मनुष्य, पदार्थ, तो.

दुकळ, पु० धान्य न पिकल्यामुळें अतिशयित महर्गता होत्ये अशी जी क्वचिद्देशीं कालदशा येत्ये तो; २, ला० तत्तत्पदार्थांची अतिशयित दुर्लभता

व्हावया जोगें जें स्वल्पत्व तो; उ० या कोंकणांत ही कडास दुकळ नाहीं ल० दुकळांत तेरावा महिना

दुकळणें, कों० दुकळावणें.

दुकळावणें, रा० दुकळामध्यें अभोदकादिविषयीं जसें मनुष्य आसक्त होतें तसें कांहीं एक भक्ष्यादि पदार्थाविषयीं होणें; उ० असले वाईट आंबे खावयास मीं केवळ दुकळावलों नाहीं.

दुकांटी, २लिं० दोन आहेत कांटे जास असें कुसूप इ० तो.

दुकाटी, २लिं० दोन आहेत काड्या जास असें गवत इ० तो

दुकांड, स्त्री० कों० दोन हात लांबीचें जें बारीक जाळा यांचें लाकूड तो.

दुकान, न० विकाकरायाकरितां तेतेपदार्थ मांडून बसायासाठीं केलें असतें जें घर किं० लोहार, कांसार, सोनार, इ० कांचें तत्तत्पदार्थ घडण्यासाठीं जें घर केलें असतें तें; २, विकायासाठीं मांडिलेला जो तत्तत्पदार्थसमुदाय तें; ३, लोहारादिकांची शस्त्रादिरूप जी उपकरणसामग्री तें; उ० मीं दुकान आटोपून येतों; उ० तुम्ही गोफ करविणार असलांतर मीं दुकान घेउन येतों; ४, ला० कांहीं एक व्यवहारार्थ अनेकपदार्थांचा पडलेला जो पसारा त्यास ल०; उ० तुम्ही पोथ्यांचें दुकान मांडून ठेविना शास्त्रार्थ कांहीं ठरत नाहीं; तिणें दुकान घातलें ल० प्रसिद्धपणें द्रव्य घेउन व्यभिचार करूं लागली असा अर्थ.

दुकानदार, पु० दुकानाचा जो अधिकारी, वाणी, इ० तो.

दुकानदारी, स्त्री॰ दुकानदाराचें जें कर्म तीं.

दुकामी, २ लिं॰ दुकसबी.

दुकाळ, पु॰ दुकळ.

दुकूल, न॰ सं॰ रेशमी वस्त्र किं॰ रुमालाचें जें उंचेंवस्त्रानें.

दुक्कल, स्त्री॰ गंजिफांचे खेळांत बंदेउन उतराया जोगा जो हुकूम तीं.

दुक्का, पु॰ दोनचिन्हें आजवर असलेल्या असेंजें गंजिफांतील पान तो.

दुःख, न॰ जीवमात्रास कांहीं एक निमित्तामुळें दुःसह्यरूप अनुभवयेतो तें; २, दुःसह्यरूप अनुभव जाला असें जें रोगादिनें; ३, उपदंश; दुःखा हून डागदेणें स्त्र॰ यदंशीं अपराध जाला असेल तें मर्म धरून तदंशीं च शिक्षा करणें; दुःखावर डागदेणें स्त्र॰ दैववशात् दुःखपावलेल्या मनुष्यास आणखी दुःख होई असें छळणें इ॰ करणें.

दुःखकारक, २ लिं॰ सं॰ दुसऱ्यास दुःख जापासून होनें तो.

दुखणाईत, २ लिं॰ जाला दुखणें प्राप्त जालें आहे तो.

दुखणारू, २ लिं॰ कों॰ दुखणाईत.

दुखणें, शरीर किं॰ शरीरावयव रोगादिजन्य व्यथेनें युक्त होणें; एथे जीवास कर्तृत्व मानीत नाहींत स्त्रणून मीं दुखतो तूं दुखतोस इ॰ प्रयोग होतनाहींत; २, न॰ मनुष्यादि सर्वदा व्याकूळ असाया जोगी जी ज्वर अतिसार इ॰ मोठी विकृती तें. स्त्र॰ देणें आणि दुखणें हें कोणास आवडत नाहीं.

दुखणेकरी, २ लिं॰ दुखणाईत.

दुखणेंबाहणें, न॰ दुखणें इ॰

दुःख

दुःखदायक, २ लिं॰ सं॰ दुसऱ्यास दुःख देण्याचा स्वभाव जाचा तो.

दुःखप्रद, २ लिं॰ सं॰ दुःखदायक.

दुखरूं, न॰ रा॰ कांटा, ठोकर, इ॰ लागलें असतां तत्काल बरें न जाल्यामुळें बहुत दिवस राहात्ये जी विकृति तें.

दुखवटा, पु॰ कोणएकास स्वकीय मनुष्य मृतिजन्य दुःखावस्था प्राप्त होत्ये तो; २, मृतमनुष्याचे पुत्रादिकांचे आप्तजन वस्त्रादि दानपूर्वक आशौचांतीं दुःख परिमार्जन करितात तो; ३, तें वस्त्रादिक तो.

दुखवणें, ईषदाघातादिकारणामुळें शरीरावयव दुःखयुक्त करणें; २, ला॰ दुर्भाषणादि अपकार द्वारा मनुष्यादिकांस व्यथित करणें; ३, फल, भूमि, वृक्ष, इ॰ कांवरील त्वगाद्यंश यत्किंचित् छिन्नभिन्न होई असें नख, शस्त्र, इ॰ कानें करणें.

दुखांदा, पु॰ रा॰ वृक्षाचे मोठे दोन खांदे जेथे फुटले आहेत तो आंतला प्रदेश.

दुखारणें, कों॰ खेदयुक्त होणें.

दुःखित, २ लिं॰ जाचे अंतःकरणांत दुःख जालें आहे तो.

दुःखी, २ लिं॰ सं॰ दुःखित.

दुखोटा, पुं॰ दुखवटा.

दुगन, स्त्री॰ ध्रुपदादिकाचे गायीचे नियमें काळांत खरेनें तेंच ध्रुपद गाण्याचा जो प्रकार तीं व ध्रुपद गायीनें स्त्रणत असतां त्याचे तालाची दुप्पट व्हावी असा जो त्वरित ताल धरण्याचा प्रकार तीं.

दुगाणी, स्त्री॰ दुलाची; २, एक नाणें आहे.

दुगून, स्त्री॰ दुगन.

दुग्ध

दुग्ध, न॰ सं॰ स्तनामध्यें जो श्वेतद्रव उत्पन्न होतअ सतो तें; २, रुई, वड, इ॰ कांचा जो श्वेतवर्ण चीक त्यास ल॰

दुग्धा, स्त्री॰ कांहीं एक कर्तव्यगोष्टीचे एकप्रकारक त्याचा निश्चय नजाल्यामुळें जी द्विधावस्था ती; सांग,ठेव, इ॰ कांचें वि॰; उ॰ जातां कीं नाहीं तें निश्चित सांगा दुग्धा ठेवूंनका; त्यांची जाण्याची अद्यापि दुग्धा दिसत्ये.

दुघई, ३लिं॰ दोन आहेत गस्तें जास असें जें घर, बंगला, इ॰ तो.

दुघड, स्त्री॰ कों॰ राहाटाचे माळेस दोन दोन लोटे बांधून मध्यें एक लोट्याची आगा वगळावी असा लोटे बांधण्याचा प्रकार आहे ती; २, पु॰ रा॰ आंबे, फणस, इ॰ कांचा दोहोंफळांचा जो घड तो.

दुघडओनाम्या, पु॰ कितीही अभ्यास केला असतां जास अक्षर येत नाहीं असा जो निर्बुद्धि तो.

दुघडी, ३लिं॰ दुहेरी केलेलें जें वस्त्र, कागद, इ॰ तो; २, स्त्री॰ दुहेरी केल्यामुळें होत्ये जी घडी ती.

दुजा, ३लिं॰ क्रमानें एकायासून मोजिलें असतां दोन या संख्येचा विषय होतो तो; २, आपण किं॰ आपला अशा बुद्धीचा जो विषय नव्हे तो; उ॰ मला तुम्ही दुजा मानूं नका.

दुजाईत, ३लिं॰ कों॰ दोनदां व्यालेली जी गाय म्हैस इ॰ तो.

दुजाभाव, पु॰ हें माझें हें दुसऱ्याचें अशीजी भेदबुद्धि तो.

दुजोडी, स्त्री॰ दोहोंकडील दोहों तुळयांचीं टोकें एकारखांबावर येत असें मधोमध खांब देउन दोहों सोप्यांचा एक सोपा केला असतो ती.

दुजोर, पु॰ बुद्धबळांचे डावामध्यें एका पगावर दोघांचें बळ असतें तो.

दुजोरा, पु॰ दुजोर.

दुटपी, दुटप्पी, ३लिं॰ दोहोंकडे आहे कल जाचा असेंजें भाषणादि किं॰ तद्विशिष्ट मनुष्यादि तो; उ॰ दुटप्पी बोलत असलें ल॰ जो पक्ष खरा होईल तिकडे मिळावयास सांपडतें

दुटाँकी, ३लिं॰ दोन चांके देउन शेण लावितात तो.

दुटें, न॰ धोटें.

दुट्टा, पु॰ दुंडा.

दुठरूं, न॰ कों॰ गळूं इ॰ पुरतें पिकल्या वांचून फुटल्यामुळें पुनः वृद्धिंगत होतें तें.

दुडकारीं, अ॰ रा॰ दुट्टारीं.

दुडकी, ३लिं॰ अश्वादिकांचे चालीचा एकभेद आहे; २, मृदंगाचा धूम वाजविण्याचा एक प्रकार आहे.

दुडता, ३लिं॰ दुघडी केलेलें वस्त्रादिक तो.

दुडती, ३लिं॰ दुडता.

दुडदुड, दुडदुडां, अ॰ जवळ जवळ आणि अतित्वरित पावुल पडे असें; चालण्याचें वि॰; उ॰ विठोबा मला मूळधाडा, धांवत येइन दुडदुडां.

दुंडा, पु॰ पुस्तकाचीं मध्यें दुणून नकापितां संलग्न दोनपत्रें राखिलीं असतात तो.

दुडाळ, न॰ दोन दाळिंब्या जामध्यें असतात असेंजें तूर, हरभरा, इ॰ धान्य तें.

दुडुदुडु, अ॰ दुडदुडां.

दुडू, पु॰ पैशाचे चतुर्थांशाचें एक नाणें आहे; २, त्याचा

त्यापाशीं दुडूकार आहेत इ० स्थलीं पैका असा अर्थ होतो.

दुड्या, पु० कों० मातीचाजो मोठा घडा तो; २, ला० आरोपानें मोठ्या पोटास ल०

दुढ्ढाचार्य, पु० लोक तादृश मानीत नसतां किं० मानाया जोगा आंगीं विद्यादिगुण नसतां जो विद्वत्तेचा डौल घालितो त्यास निंदात्मसंगी ल०

दुढ्ढारीं, अ० दुढ्ढीनें आणावयाजोगे पदार्थीं.

दुढ्ढी, स्त्री० दुकांशी खेळांत एकडाव पडत असतो; २, ला० पैसे, रुपये, इ० कांचे द्यूत ल०; उ० त्यानें दुढ्ढी दुढ्ढी दक्षिणा दिली.

दुणकाम, न० एकवार केलेंजें काम तें यथास्थित नजाल्यामुळें पुनः तें मोडून मुळापासून करावयासजें काम होतें तें.

दुणणें, वस्त्र, कागद, दोरी, इ० विवक्षितांशीं मोड पाडून पूर्वीचेपेक्षां दुपडी किं० दुपदरी विवक्षितांश पर्यंत होईअसें करणें; २, दोहोनीं गुणणें; उ० मास दुणा तिथीगणा एकाउणें नक्षत्रजाणा; ३, रा० एकेखळींत लावलेलीं जीं मिरची, वांग्यीं, इ० कांचीं दोन दोन रोपें असतात तीं वाढूं लागलीं ल० अडचण नव्हावी ह्मणून मध्यें माती घालून दोहोंकडे दोन करणें; ४, कों० एकवार नांगरलेली भूमि पुनः नांगरणें.

दुणता, वि० दुहेरी.

दुणा, वि० द्विगुणित; ल० आळशास दुणें काम आणि कृपणास दुणा खर्च.

दुणारणें, ज्वरादिरोग किं० पर्जन्य, पारा, इ० पूर्वीपेक्षां दुप्पट होणें.

दुणा

दुणावणें, दुणारणें.

दुणी, स्त्री० द्विगुणजी वृत्ति ती; उ० वादीनें धान्यादि लें होतें त्याची दुणी जाली.

दुणें, अ० दोहोंनी गुणलें असतां, संख्याव्यवहारीं प्र०; उ० चारदुणें आठ

दुनर्फा, अ० दोन जेराजे इ० अधिकारी त्यांकडे; देशअंमल इ० विषयीं प्र०; २, दोनजाकडा किं० त्यांस व्यापून किं० धरून इ०; उ० नदी दुनर्फा भरून चालली आहे.

दुनर्फी, वि० द्वि० उभयसन्नाकजो देश किं० अम्मल तो.

दुनाडा, पुं० सावकार, राजा, इ० कांचा अत्यंत उग्र जो दून तो.

दुनार, वि० रेशमाचे दोन तंतु एकत्र वळून त्यांनें विणलेलें जें वस्त्र तो

दुनारी, वि० दुनार.

दुनोंडें, न० दोहोंकडे दोन तोंडें असलेला असा सर्प विशेष आहे.

दुथडी, अ० दोहों तीरांतें व्यापून; उ० यानदीचा दुथडी पुंस लाविला आहे.

दुदांडी, वि० दोन दांड्यांचें चिन्ह जाजवर असतें असा पैसा आहे.

दुदावणें, कों० गाय, ससी, मार्जार, इ० कांस चहूंकडून पिटाळून पळविणें,

दुंदुभि, पु० मोठें चर्मवाद्य आहे; २, साठा संवत्सरांतील उपन्नावा संवत्सर.

दुधखुळा, वि० रा० आई, बाप, इ० कांनीं लाडुकपणा केल्यामुळें जो मोठा जालाहीतरी लेंकुरपणा

करि

करितो तो.

दुधगा, पु० रा० कोंवळें दूध प्याल्यामुळें गाय, ळेस, यांचे वासरांस रोग होत असतो तो.

दुधपाक, पु० दूध आटवून खीर करितात तो.

दुधपेढा, पु० पेढा.

दुधभोंपळा, पु० एक भाजीचें फळ आहे.

दुधभोंपळी, स्त्री० दुधभोंपळ्याची वेल ती.

दुधमोगरा, पु० शाकूंत एक भेद आहे.

दुधरी, स्त्री० कों० एक भाजीचा वेल आहे.

दुधवणी, स्त्री० दुधाणी अर्थ मार्थी; २, दुधानें मिश्रित जेंपाणी तें.

दुधाणी, स्त्री० नित्य दूध तापवाया करितां जें मृत्पात्र ठेविलें असतें ती; २, एक झाड आहे.

दुधाधारी, वि० केवल दुग्ध प्राशन मात्र करून प्राणसंरक्षण करितो तो;

दुधार, दुधारी, वि० दोन आहेत धारा जास असा चाकू, तरवार, इ० तो.

दुधाळ, वि० बहुत आहे दूध जीस अशी गोमहिष्यादि ती.

दुधालू, वि० दुधाळ,

दुधालूं, न० कों० पांढरें अळुं.

दुधीण, स्त्री० कों० दुधीभोंपळी.

दुधू, पु० न० स्त्रियांचा स्तन तो तें.

दुध्या, पु० दुधभोंपळा.

दुपक्क, वि० रा० अंशतः दोनदिवस तिथ्यादि पावल्यामुळें तेंतें कर्म आज करावें कि० उद्यां करावें अशा निर्णयास अर्ह जाली कि० जी विषयीं शास्त्रमतेंच दोनपक्ष आहेत अशीजी तिथ्यादि तो.

दुपट

दुपट, वि० द्विगुणित; २, स्त्री० दुपटपणा; उ० सावकारीत पैशाची दुपट जाली.

दुपटा, पु० दुपेटा.

दुपटें, न० दोनतीन अंगवस्त्रें एकेठिकाणीं शिवून पांघरायास वस्त्र करितात तें.

दुपता, वि० नित्य दूध देणार जी गाय, ळेस, इ० तो.

दुपतीधेनु, स्त्री० ला० नित्य थोडा बहुत जापासून लाभ होत असतो असा जो यजमानादि त्यास ल०

दुपतें, न० घरचे गोमहिष्यादिकांपासून नित्य उत्पन्न होतें जें दूध, दहीं तें; २, ला० सर्वदा जाकडे पाहिलें पाहिजे असें जें काम, कि० फोड, अवघाणूं, इ० त्यास ल०

दुपदरी, वि० दोनशेवटांस जरीचे कि० रेशमाचे पदर घातले असतात असें जें पागोटें लुगडें इ० तो; २, द्विगुणित जें वस्त्र, दोरी, इ० तो.

दुपरतणी, स्त्री० रा० एकवार शमलेल्या दुखण्याची अपथ्यादिकांमुळें पुनः उलट होत्ये ती.

दुपरतणें, रा० दुखण्यानें दुपरतणी पावणें.

दुपारखी, वि० दोन आहेत पारखी जास असें जें घर, सोपा, इ० तो,

दुपाठी, वि० दोनदां श्रवण करून ग्रंथादिक जास पाठ येतो तो.

दुपानी, वि० दोनचपानें जास आलीं आहेत अशा अवस्थेतला जो अंकुर तो; २, स्त्री० गंजिफांचे खेळांत शेवटीं जीं दोनपानें खोटीं राहिलीं ती.

दुपार, स्त्री० दिवसाचा जो मध्य भाग रूप काल ती.

दुपारां, दुपारीं, अ० दुपार समयीं.

दुपा

दुपारी, स्त्री० एकफुलझाड आहे.

दुपारींतिपारीं, अ० केवळ बाहेरपडायास अयोग्य जो मध्यान्हसमय त्याचा द्योतक शब्द किं० त्याचे योगें विनू आलीकडे पलीकडे; उ० लाहानमुलास दुपारींतिपारीं बाहेरनेऊंनये.

दुपिकी, २ लिं० वर्षांत दोन पिकें जा जमिनींत होतात तो.

दुपुडीपोळी, स्त्री० घडीचीपोळी.

दुपेटा, पु० दर्बार, सभा, इ० स्थलीं जावयाचें असतां अंगावर घ्यावयाचें वस्त्र आहे.

दुपेडी, २ लिं० दोनपेडानीं वळलेली जी दोरी तो.

दुपोडीपोळी, स्त्री० दे० घडीचीपोळी.

दुप्पट, २ लिं० दुपट.

दुफळी, स्त्री० खेळणें, मागमारकरणें, इत्यादिकारणार्थ समुदाय फुटून जा दोनफळ्या होतात ती.

दुफांटा, पु० वृक्ष, नदी, मार्ग, यांस जेथें दोन फांटे फुटले तो प्रदेश.

दुफाड, स्त्री० कों० एकपदार्थाचे दोनविभाग होत असें चिरणें, फोडणें, इ० जो व्यापार तो; लांकूड भोंपळा, इ० जे मोठेपदार्थ तेथेंच प्र०; २, २ लिं० दुफाड झाली आहे जाची तें काष्ठादि तो.

दुफांशी, २ लिं० दोनफांसेटाकून खेळावयाचा सोंकट्यांचा डाव आहे.

दुफोड, स्त्री० कों० दुफाड.

दुबक, स्त्री० विटी दांडूचा खेळांत विटीवर दुसर्‍यानें टोलामारितांना तो प्रकार तो.

दुबकणें, अश्वादिकानें फारधाबूंनये म्हणून त्यास कलाव्यानें पुक्कारणें; २, बुकलणें.

दुब

दुबकन, दुबकर, दुबदिशीं, अ० असाशब्द होईअसें जलादिकांत फलादि पडण्याचें किं० वाजण्याचें वि०

दुबका, पु० कों० बुकी.

दुबंदी, स्त्री० दोनबंद पडायाजोगा जो कागद तो; २, घोड्याचे पुढचे दोहोंपायांस मात्र जी नालबंदी करितात ती.

दुबदुबणें, फुगलेलें पोट इ० दुबदुब वाजणें.

दुबदुबीत, २ लिं० वाजविलें असतां दुबदुब शब्द व्हावया जोगा मृदुफलादि पदार्थ तो; २, वा० खचित हेंच असें समजलेलें नव्हें जें वर्तमानादिक तो.

दुबळा, २ लिं० विद्या, संपत्ति, इ० बलेंकरून जो हीन तो.

दुबार, अ० हिं० द्विवार, जेव्हां क्रियेचें एकवार होणें इष्ट आहे दुसर्‍यानें होण्यास अतिरिक्तस्वरूप दोष आहे तेव्हां प्र०

दुबारां, अ० दुबार.

दुबारी, २ लिं० वर्षांतून द्विवार फलें, पुष्पें, इ० कांचे बार जास येतात असा जो वृक्षादि तो; २, दोन बार व्हावयाची दारू जांत भरली असते असा जो फटाकडा तो; ३, दोनपट्टी एकत्र जडून केला जो दुपेटा परंतु बहुमूल्य असतांच प्र० एकबारीचा योगानें.

दुबाळकें, न० दे० दुबेळकें.

दुबेरजी, २ लिं० कांहीं एक कारणानें रकमाचे दुबार जमारखर्च करावे लागतात त पक्षीं हिशेबांत त्या जमारखर्चीचा दुबारपणा घालवून एकबेरजीचा

रीतीनें

रीतीनेंच तो पक्का हिशेब आकारितात असा जो लिहिण्याचा प्रकार तो व तद्विशिष्ट कागद इ० तो.

दुबेळकें, न० वृक्षाचा दोन खांद्या जेथें फुटल्या तेथील जो मधला प्रदेश तें.

दुबोटा, पु० साकरेंत एक भेद आहे.

दुबोटीगंध, न० कपाळास दोहों बोटांनी लाविलेंजें गंध तें.

दुभणें, सेंस, गाय, इ० कानीं दोहिलें असतां दुग्ध स्राव करणें; २, ला० इतानें पूयस्राव करणें; स्ल० बाप पाहुणा आला स्तनूर्नरेडा दुभत नाहीं.

दुभता, २लिं० दुपता.

दुभतें, न० दुपतें.

दुभाग, २लिं० मध्यें कांहीं अवछेद पडून जा पदार्थाचे दोन भाग जाले तो.

दुभाँगणें, दुभांग करणें.

दुभाव, पु० दुजाभाव.

दुभाषी, दुभाष्या, पु० उभयतां व्यवहार करणार्थीस एकमेकाची भाषा नसमजत असतां त्याचें माध्यस्थ करणारा जो दोन भाषांचा अभिज्ञ तो.

दुभीराजा, पु० गोट्यांचे खेळामध्यें दोन या संख्येचा संकेतशब्द आहे.

दुमची, स्त्री० घोडयाचे जे मागले दोन पाय त्यांस लगाम प्रहार प्रसंगीं स्ल०; २, खोगिराची मागची लेंडी: दुमची उचलणें स्ल० कोणे काम अनेक कचाटें घालून उचलबांगडी करणें; दुमची पुरवणें स्ल० पाठपुरवणें.

दुमजला, २लिं० दोन आहेत मजले जास असें घर किं० वस्त्र तो.

दुमटणें, दुणणें प्रथमार्थी.

दुमड, स्त्री० दूण प्रथमार्थी.

दुमडणें, कों० दुमटणें.

दुमण, न० कों० भात झोडतेसमयीं कवळे बांधावयास दोरी घेतात तें.

दुमता, २लिं० दुणता.

दुमदुम, अ० दुमदुम.

दुमाअकाना को, न० स्त्री० कोहें अक्षर शिकतेसमयींचा शब्द आहे; २, संकेतानें खांद्यानें वाहावयाचे दुमोटीस स्ल०; ३, २लिं० दुमोट जानें खांद्यावर घेतली आहे त्याला स्ल०.

दुमारा, पु० सैन्यादिकांवर एकदांच दोहोंकडून तोफा इ० कानीं जो मारतो; २, ला० भाषणादिकांत उभयतःपाशरज्जूंत सांपडण्याचा जो प्रकार तो.

दुमाला, पु० पदार्थाचा पृष्ठभाग; २, ला० पाठबजानें जें संरक्षण तो; उ० मासे दुमाल्यावर कोणी असे लनरमी किल्ला घेईन.

दुमाली, २लिं० दुनकी.

दुमाळी, २लिं० दुहेरी पांकळ्यांचें जें फूल किं० त्याचा वृक्ष तो.

दुमोट, स्त्री० खांद्यावर घेण्याचा सोयीचें दोन मोटा एकत्र बांधून बोसें करितात ती.

दुमोटली, स्त्री० दुमोट.

दुमोटलें, न० दुमोट.

दुमोळी, २लिं० दुपारची.

दुर्, अ० हा उपसर्ग धातूंआगीं लागला असतां विशिष्ट चा अर्थ करावयास किं० घडावयास परम कठिण जें कर्म किं० कर्ता इ० होतो; आणि यारेफाचा कचित्

सकार क्वचित् षकार क्वचित् विसर्ग होतो; उ० कष्टास कठिन तें दुष्कर, घडावयास कठिन तें दुर्घट इ०, नामामागें लागला असतां प्रायः वाईट, दुष्ट, असा अर्थ, धातु कि० नामगीर्वाण असावें; उ० वाईट जो मनुष्य तो दुर्मनुष्य इ० भाषेमध्यें एतद्दिशि एतच्छब्द प्रचारसिद्ध आहेत तेणेंच एथें लिहिले; इतरांचा अर्थ यापरिभाषेवरून जाणावा.

दुरंगी, स्त्री० मिसांशी खेळांत एकडाव होतो ती; २, वि० दोहोंअंगांस दोहोंप्रकारचा रंग आहे जास असेंजें वस्त्र तो.

दुरडी, स्त्री० तांदूळ धुणें इ० उपयोगी एक वंशपात्र आहे.

दुरढी, स्त्री० कों० दुढी.

दुरंत, वि० जाचा अंत लागण्यास परम कठीण तो.

दुरत्यय, वि० जाचा नाश करून पार पडणें परम कठीण. तो.

दुरदुरी, स्त्री० रा० करंगळीपेक्षां बारीक कि० करंगळी एवढी मोठी उदक, मूत्र, इ० कांची जी धार ती.

दुरधा, वि० रा० पुरतें पिकलेलें नव्हेजें फल तो.

दुरभीराजा, पु० कों० दुर्भीराजा.

दुरव, स्त्री० एक तृणजाति आहे.

दुरवबोध, वि० सं० दुर्बोध.

दुरशी, स्त्री० रजस्वला.

दुरस्तां, अ० मार्गाचे दोहोंकडांस आपून पंक्तीनें; उ० दुरस्तां साडेसातविसां आहेत.

दुरा, वि० रा० दुहिरी.

दुराई, स्त्री० दुराई.

दुराग्रह, पुं० कांहींएक गोष्टीविषयीं लोकविरोधकि० शास्त्रविरोध इ० संकटें आलीं असतांही सोडावयाचें नाहीं असा दृढधरलेला जो आग्रह तो.

दुराग्रही, वि० दुराग्रह धरण्याचा स्वभाव जाचा तो.

दुराचरण, न० सं० दुष्टजें आचरण तें.

दुराचार, पुं० सं० दुराचरण.

दुराचारी, वि० सं० दुराचार करण्याचा स्वभाव जाचा तो.

दुरात्मा, वि० सं० दुष्ट आहे अंतःकरण जाचें तो.

दुरांदूरचा, वि० रा० दूरदेशाहून कधीं न कधीं आलेला तो.

दुरापस्त, वि० होईलअशी संभावना ही शंभरांपैकीं एकाचीही जाची दिसत नाहीं असेंजें दुर्घटकर्म तो; उ० वाळूचें तेल काढणें हीगोष्ट दुरापस्त आहे.

दुरापास्त, वि० दुरापस्त.

दुरालभा, स्त्री० सं० एक औषधी आहे.

दुरावणें, संनिहितस्थितजे मित्रादिक त्यांहीं एकमेकांशीं दूरपडणें; उ० तुम्ही दुरावल्यावर माझें स्मरण कशानें होणार आहे.

दुराशा, स्त्री० जाआशेची सिद्धि होणें दुरापस्त ती; उ० आम्हास अन्नवस्त्रावयास मिळेना आणि पालखींत बसण्याची दुराशा धरावी हें बरें नव्हे.

दुरित, न० सं० पाप.

दुरुक्षशह, पुं० बुद्धबळांमध्यें एक समयापछेदें करून राजा आणि प्रधान या उभयतांवर जो घोडयाचा शह पडतो तो.

दुरुक्ति, स्त्री० सं० दुसऱ्यास वाईट वाटावा जोगें जें शिवीगाळ इ० भाषण ती.

दुरुत्तर, न० सं० दुरुक्ति.

दुरुत्थर, २लिं० सं० जाचा उत्थार करायास कठिन असेंजें पूर्वपक्षादिक तो; उ० यासिद्धांतावर दोष दिला ह्मसर्वांस दुरुत्थर आहे.

दुरुस्त, २लिं० درست यथायुक्त.

दुरू, स्त्री० रा० दुरव.

दुरूक, पु० दोनपगें चालून तिसरे पगीं सोंगटी बसाया जोगा ओडाव तो.

दुरूकशह, पुं० दुरोंरवशह.

दुरूग, न० चैनमासीं गोरी बसायास काष्ठाची किंमानीची किल्याचि आकृति करिलात तें.

दुरूह, २लिं० हें याया प्रकारचें आहे असें तर्कायास जें कठिण तो; उ० ईश्वरानें सृष्टि कशी केली हें सर्वांस दुरूह आहे.

दुरोंरवशह, पु० घोडा इ० मोहोर्याचा वजीर इ० मोहोर्यावर उडी पडाया जोगा जो राजास शह येतो तो.

दुरोंरवी, २लिं० दुटप्पी; २, रंगाचे वेलबूट इ० दोहों अंगीं आजवर उठले आहेत असेंजें जापीलवस्त्र तो.

दुर्ग, पु० किल्ला.

दुर्गति, स्त्री० सं० नरकादि दुष्टफलाची जी प्राप्ति ती.

दुर्गंध, पु० सं० घ्राणेंद्रियास वाईट लागाया जोगा जो वास तो.

दुर्गंधि, सं० पु० स्त्री० दुर्गंध.

दुर्गम, २लिं० सं० जावयास कठिण जो देशादिक तो.

दुर्गा, स्त्री० अंबिका.

दुर्घट, २लिं० सं० घडायास कठिन जी गोष्ट इ० तो.

दुर्जन, पु० सं० दुष्ट जो मनुष्यादि तो.

दुर्जय, २लिं० जिंकायास कठिन तो.

दुर्दर्श, २लिं० सं० पाहायास जो कठिन तो.

दुर्दशा, स्त्री० सं० कांहींएक पदार्थादिकाची केवळ वाईट जी अवस्था ती; उ० भिजल्यामुळें शालजोडीची दुर्दशा जाली; यापंडिताची यानें दुर्दशा केली; त्यानें त्या पूर्वपक्षाची दुर्दशा करून टाकली.

दुर्दिन, न० सं० अकालीं मेघाछादित जो दिवस तें.

दुर्दैव, न० सं० दुष्टफलदायक इष्टफल प्रतिबंधक जें दैवतें; उ० कीं माझें दुर्दैव प्रभु-चा मार्गांत आडवें पडलें; २, तद्विशिष्ट.

दुर्धर, २लिं० सं० धरायास जो कठिन सर्पादिक तो.

दुर्निवार, २लिं० सं० निवारायास कठिन जो मृत्युइ०

दुर्बल, दुर्बळ, २लिं० दुबळा.

दुर्बीण, स्त्री० नळींत भिंगें भरून यंत्र केलें असतें, जाणें दूरचा पदार्थ स्पष्ट दिसतो ती.

दुर्बुद्धि, स्त्री० सं० वाईट आहे परिणाम जाचा तें कर्म करण्याविषयीं जी बुद्धि होत्ये ती; २, २लिं० दुष्ट आहे बुद्धि जाची तो.

दुर्बोध, २लिं० सं० समजायास कठिन जो ग्रंथादि तो.

दुर्भग, २लिं० सं० वाईट देव जाचें तो.

दुर्भर, २लिं० सं० भरून पूर्ण करायास जें कठिन तो; उ० हें दुर्भर उदरभराया साठीं करून येतें कर्म करावें लागतें.

दुर्भाग्य, न० २लिं० सं० दुर्दैव.

दुर्भाषण, न० सं० दुरुत्तर.

दुर्भिक्ष, न० सं० दुकाळ.

दुर्भेद्य, २लिं० सं० जाचा भेद करणें कठिण असा तो

हीरकादि तो.

दुर्मति, २ लिं॰ सं॰ दुर्बुद्धि; २, पु॰ एक संवत्सर आहे.

दुर्मनस्क, २ लिं॰ सं॰ खिन्न झालें आहे मन ज्याचें तो.

दुर्मरण, न॰ सं॰ बाधानें खाऊन, सर्पडसून, पाण्यांत बुडून, जळून, इ॰ निमित्त होउन जें मरण तें.

दुर्मिळ, २ लिं॰ दुर्लभ.

दुर्मुख, पु॰ सं॰ एक संवत्सर आहे.

दुर्मुखणें, कोणएक कार्याविषयीं अनुत्साहाची जी मुखश्री ती तें पावणें; उ॰ रडायास सटलें म्हणजे हांसत येतात आणि उद्योगाचें नाव घेतलें म॰ लागलेच दुर्मुखतात.

दुर्लंघ्य, २ लिं॰ सं॰ ज्याचें उल्लंघन होणें परम कठिन तो; पर्वत. शपथादि.

दुर्लभ, २ लिं॰ सं॰ ज्याचा लाभ होणें परम कठिन तो; उ॰ आलीकडे आपलें दर्शन दुर्लभ झालें.

दुर्लक्ष, २ लिं॰ विषयांतराकडे चित्तवृत्ति लागल्यामुळें इंद्रियसन्निकृष्ट विषयाकडे ज्याचें चित्तानुसंधान राहिलें नाहीं किं॰ विषयांतराकडे चित्तवृत्ति राहातनाहीं असा स्वभाव ज्याचा तो; उ॰ तुम्ही गोष्टसांगीतलीपण मींदुर्लक्ष होतों म्हणून ऐकिली नाहीं; २, न॰ इंद्रियसन्निकृष्ट विषयाकडे अनुसंधानरहित जें चित्तें; उ॰ क्षणभर मात्रें दुर्लक्ष होतांच पुढची पोथी चोरानें नेली; ३, लक्षायास कठिन जो कांहींएक अर्थ तो; उ॰ ईश्वराचें निर्गुणस्वरूप दुर्लक्ष आहे.

दुर्लक्षण, न॰ सं॰ दुष्टफलाचें सूचक जें लक्षण म॰ ज्ञापक; उ॰ हाकुत्रा रात्रीं रडतो हें घरामध्यें दुर्लक्षण आहे; २, दुर्गुण, हा घोडा लात मारतो एवढें घरामध्यें दुर्लक्षण आहे.

दुर्लक्षणी, २ लिं॰ दुर्लक्षणविशिष्ट मनुष्य पश्वादि तो.

दुर्लक्ष्य, न॰ लिं॰ सं॰ दुर्लक्ष.

दुर्वह, २ लिं॰ सं॰ वाहायास कठिन तो.

दुर्वार, २ लिं॰ सं॰ दुर्निवार.

दुर्वासना, स्त्री॰ सं॰ दुसऱ्याचा घातपात करावा इ॰ जी दुष्टवासना ती; २, जा कर्मापासून आपलें बाईट होतें तें कर्म करण्याविषयीं जी इछा होत्ये ती.

दुर्विदग्ध, २ लिं॰ सं॰ यत्किंचित शास्त्रादिकापासून अन्यथा च ज्ञान जास झालें आहे आणि त्यामुळें दुसऱ्यानें कांहीं सोईची गोष्टसांगीतली असतां जाची कदापि समजून पडतनाहीं म्हणून इतर सर्व चतुरांस जो मूर्ख मानीन असतो तो.

दुर्वृत्त, २ लिं॰ सं॰ चोरी, मद्यपान, इ॰ दुष्ट आहे आचार ज्याचा तो,

दुर्व्यसन, न॰ सं॰ मद्यपान, रांडबाजी, इ॰ रूप दुष्ट जें व्यसन तें.

दुर्व्यसनी, २ लिं॰ दुर्व्यसन लागलें आहे ज्यास तो.

दुर्‌हाई, स्त्री॰ आपल्यामतें जें कर्म करूनये तें कोणी करूंलागला असतां त्यास जी राजाची शपथ घालितात ती.

दुलई, स्त्री॰ हिं॰ आंत थोडा कापूस घालून संजाव इ॰ लावून शोभिवंत पांघरायास रजईसारिखें वस्त्र करितात ती.

दुलाचा, स्त्री॰ दे॰ अश्वादि पशूचे मागील जे दोन पाय त्या लाता मारणें इ॰ प्रसंगीं च॰; उ॰ घोडयाचे मागें उभा राहूंनको दुलाचा झाडील.

दुलाब, स्त्री॰ कों॰ फडताळ.

दुलावा, दुलाव्या, ३लिं॰ इकडचीगोष्ट तिकडे तिकडची गोष्ट इकडे सांगून कज्जा लावण्याचा स्वभाव जाचा तो.

दुलुड, स्त्री॰ स्त्रियांचें कंठभूषण आहे.

दुवल, पु॰ रुपयाचा षोडशांश.

दुवळ, ३लिं॰ कों॰ दुपेडी जीदोरी इ॰ तो.

दुवा, पु॰ (ब) आपल्यावर कोणी उपकार केल्यामुळें ईश्वरा याचें वरेंकर असेंजें त्याचें अभीष्टचिंतन तो; देणें कि॰ ईश्वराजवळ मागणें यांचा योगी प्र॰; २, रा॰ तोडा इ॰ कांचा जो एक अवयव तो.

दुवारें, न॰ रा॰ एकवार कांडलेल्या साळी पाखडून स्वच्छ तांदूळ होण्याविषयीं जो पुनः कंडनसंस्कार करावा लागतो तें.

दुवाळ, स्त्री॰ रा॰ एकत्र विणलेले जे दोन पंचे असतात ती.

दुवाळणें, वा॰ एकदां बोललीगोष्ट पुनः बोलतानां किंचित् फेर पाडून बोलणें.

दुवेत, न॰ कों॰ गर्भिणीस पूर्णमास नहोतां जें गर्भपतन तें.

दुवेतणें, पूर्णमास न होतां मनुष्यस्त्रीनें असवणें.

दुवेळा, न॰ रा॰ भोजनविषयीं दुपारीं आणि रात्रौ इतरकार्यप्रसंगीं दुपारचे पूर्वापर भागकाळीं; उ॰ मला दुवेळां जेवण घाला स्त्रीं॰ चाकरी करीन; त्याचीगाय दुवेळां दूध देते.

दुवेळीं, अ॰ रा॰ दुवेळां.

दुःशक, ३लिं॰ सं॰ शक्य होण्यास परम कठिन तो.

दुःशकुन, पु॰ अपशकुन.

दुश

दुशमन, पु॰ دشمن वैरी.

दुशमनगिरी, स्त्री॰ دشمنگیری दुशमनपणा.

दुशाला, पुं॰ دوشاله शालजोडी.

दुश्चित्त, ३लिं॰ सं॰ दुर्मनस्क.

दुश्चिन्ह, न॰ सं॰ अशुभफलाचें सूचक जें चिन्ह तें.

दुष्कर्म, न॰ सं॰ पापलागाचाजोगें जें कर्म तें.

दुष्कर्मी, ३लिं॰ सं॰ दुष्कर्म केलें आहे जाणें तो.

दुष्कीर्ति, स्त्री॰ सं॰ कुकीर्ति.

दुष्कृत, न॰ सं॰ पाप.

दुष्कृति, स्त्री॰ सं॰ दुष्कृत.

दुष्ट, ३लिं॰ सं॰ दुसऱ्याचा घातपात करावा तें नहोईनर मत्सरतरी करावा असा स्वभाव जाचा तो; २, दावेदारी; उ॰ मी आलों असतों पण मा माझा दुष्ट नेमे आहे; ३, कांहींएक दोषानें युक्त झाला जो पदार्थादि तो; उ॰ शहरचा वायू वाईट पदार्थाचे संपर्कामुळें दुष्ट होतो.

दुष्टमानस, न॰ सं॰ दुष्टजें अंतःकरण तें; २, तद्विशिष्ट.

दुष्टाई, स्त्री॰ दावेदारीपणा.

दुष्टायकी, स्त्री॰ कों॰ दुशमनगिरी.

दुष्टावा, पु॰ दुष्टाई.

दुसग, स्त्री॰ वा॰ राज्यादिव्यवहारांचे ठायीं अनेक जे मनुष्य त्यांचा परस्परें जो मत्सर तो; उ॰ घरांत बायकांचे दुसगीमुळें संसार नासला.

दुःसंग, पु॰ सं॰ दुष्टमनुष्यादिकांचा जो संग तो.

दुसगाई, स्त्री॰ रा॰ दुसग.

दुसड, स्त्री॰ एकदां सडलेले तांदुळांस अतिस्वच्छ व्हावे म्हणून पुनः सडण्याचा जो संस्कार ती.

दुसडा, १लिं॰ दोनवेळ सडून निर्मळ केलाजो तांदूळ इ॰ तो.

दुसडी, १लिं॰ दोनच आहेत आंचळ जिला तो गोमहिष्यादि; २, दुसडकरून स्वच्छ केलेला जो तांदूळ इ॰ तो.

दुसमान, पु॰ دشمن दुशमन.

दुसरा, १लिं॰ दुजा.

दुसवास, पु॰ रा॰ दुसगाई.

दुःसह, १लिं॰ सं॰ सोसायास जें कठिन तो.

दुसांजां, अ॰ दुवेळां, भोजनप्रसंगीं प्र॰

दुःसाध्य, १लिं॰ सं॰ साधायास जो कठिन तो; उ॰ थोरवय झाल्यावर विद्या दुःसाध्य होत्ये; २, औषधादिद्वारा दूरकरण्याविषयीं दुःशक जो रोग किं॰ बराकरण्याविषयीं रोगी तो; उ॰ हा वायू अद्यापि असाध्य झाला नाहीं दुःसाध्य आहे.

दुसारणी, स्त्री॰ को॰ एकवार नांगरलेले भूमीस दुसर्यानें नांगरण्याचा संस्कार तो.

दुसारणें, कों॰ पाहांटे कोवडयानें दुसर्यानें ओरडणें.

दुसाला, १लिं॰ हिं॰ वर्षद्वयसंबंधी वहिवाट हिशेब इ॰ राजकीयादि व्यवहारविषयीं प्र॰; उ॰ यागांवची वहिवाट दुसाला आह्मीं केली.

दुसाली, १लिं॰ दुसाला.

दुसोटा, पु॰ दे॰ एकपीक काढून घेउन पुनः त्याचस्थलीं हरभरा इ॰ दुसरें शेत पेरितात तो.

दुस्तर, १लिं॰ सं॰ जापासून पार होणें दुःशक तो; उ॰ समुद्रापेक्षां हा संसार मला दुस्तर वाटतो.

दुस्ता, पु॰ वस्त्राचीं सूतें आलीकडे पलीकडे झाल्यामुळें मध्येंमध्यें जो चाळणीसारिखा विरलपणा होतो तो.

दुहसबी, १लिं॰ हिं॰ दोनकान, दोनडोळे, इ॰ सर्व मुखावयव दिसावा जोगें भित्त्यादिकाकडे पृष्ठदेग वाटावा जोगें भित्त्यादिकांवर लिहिलेलें जें चित्र तो.

दुहोशी, १लिं॰ हिं॰ दोहोंकांठांस सारिखा जिला हांशेलावि ले आहेत अशी शाल तो.

दुहिता, स्त्री॰ सं॰ कन्या.

दुहिरी, १लिं॰ दे॰ वस्त्र, दोरी, इ॰ कांचा दोन एकेरी व्यक्ति एकत्र जुळल्यामुळें पूर्वीचें मान आंत दोनदां भासूं लागलें असा एकेरीपणा जाउन विशिष्टता पावला जो दोरी, वस्त्र, साहित्य, खर्च, श्रम, इ॰ पदार्थ तो.

दुही, स्त्री॰ दुई.

दुहेरा, १लिं॰ दुहिरी.

दुहेरी, १लिं॰ दुहिरी.

दुहोतरा, पु॰ प्रतिमासीं शंभररुपयांस दोनरुपये त्या जाधावें भसाजो व्याजाचा संकेत तो, वस्त्रानें मिळें जें द्रव्य तो.

दूड, स्त्री॰ स्त्रियांचें कंठभूषण आहे; २, दोन घागरी कावडीवांचून पाणी वाहायाचे प्रसंगीं प्र॰; उ॰ एके घागरीनें पाणी केवढावेळ आणावें दुसरी घागर देणजे दूडचे दूड आणितों; ३, पुं॰ रा॰ भाताचे शेतांत तृणविशेष रुसत असतो तो.

दूण, स्त्री॰ वस्त्र, कागद, दोरी, इ॰ दुपल्यानें जी मध्यें मोडपडत्ये ती; २, कों॰ एकवार नांगरलेले भूमीस दुसर्यानें नांगरण्याचा जो संस्कार करितात ती.

दून, पु॰ सं॰ कोणे कास जाउन निरोप सांगणें किं॰ बलावून आणणें किं॰ पत्रपोंचविणें इत्यादि अर्थ जो भृत्य देविला असतो तो.

दूती, स्त्री॰सं॰ नायक आणि नायिका या उभयतांचेंमा ध्यस्थकरणारीजी सखी असत्ये ती.

दूध, न॰ दुग्ध; २, ग॰ दुधू; ३, ला॰ नारळ इ॰कांचा दुधा सारिखा दिसनो जो रस त्यास म्ह॰; हेंकूळ दुधानें धुपलेलें आहे म्ह॰ केवल निर्दोष आहे; तुझा ओंठ पिळला असतां दूधनिघेल कि॰ ओंठावरचें दूधबा ळलेंनाहीं कि॰ अद्यापि तुझे ओंठावर दूधदिसतें म्ह॰ तूं अद्यापि प्रौढ झालानाहींस असेंतात्पर्य; दुधांन साकरपडणें म्ह॰ पूर्वीचा स्नेहादिक अधिक वाढाया जोगें कांहीं निमित्त होणें; म्ह॰ दुधानें भाजला तो ताक फुंकून पिनो; मेलेम्हशीस दूध बहु.

दूम, ३लिं॰ ,,, केवळ उत्कृष्टनव्हे केवलनिकृष्ट नव्हे असें मध्यमप्रतीचें जें शेत इ॰ तो.

दूर, अ॰ अबळनव्हे असें; दूरकरणें म्ह॰ चाकर इ॰कां मतत्तदधिकारावरून काढणें कि॰ लिहिलेलें नामा दिक खोडणें. कि॰ दुसर्याबर आलेलें संकष्टादि टाळणें; दूरधरणें कि॰ पाहाणें म्ह॰ ममत्वसोडून परकीयत्वेंकरून मानणें; तुसे हातून त्याचें पारिप त्य होणें दूर आहे इ॰स्थलीं दुःशक आहे असेंता त्पर्य त्याची दृष्टि दूर आहे इ॰स्थलीं पूर्णविचारसं पन्नआहे असें तात्पर्य.

दूरदर्शी, ३लिं॰ सं॰ दीर्घदर्शी.

दूरदृष्टि, ३लिं॰ सं॰ दूरदर्शी.

दूरवर, अ॰ दीर्घदर्शीपणानें; पाहाणें, विचारकरणें इ॰कांचें वि॰

दूरस्थ, ३लिं॰ सं॰ दूरदेशींजो स्थित तो.

दूरी, अ॰ग्रं॰ दूर.

दूरीकरण, न॰सं॰ सेवकादिक कि॰ संकष्टादिक दूर करण्याचा व्यापार तें.

दूल, पु॰कों॰ डूल.

दूषक, ३लिं॰ सं॰ कांहीं पदार्थादिकांतें दूषित करि तो तो: स्नेहदूषक इ॰समास जाणावे.

दूषण, न॰सं॰ दोषप्रथमार्थी.

दूषणें, दोषविशिष्टकरणें; उ॰ त्याचा पूर्वपक्ष म्यां दूषिला: यापोरानें अकर्म केल्यामुळें आमचें घर दूषलें; सकर्मकता असतां इकार घटित प्रयोग आणि अकर्मकता असतां अकार घटित प्रयोग होतील असें वाटतें एतत्सदृश प्रौढजे धातू त्यां ची अशीच व्यवस्था दिसत्ये.

दूषित, ३लिं॰ सं॰ दूषण लागलेला जो तो.

दृघाड, ३लिं॰रा॰ अवाढव्य.

दृढ, ३लिं॰सं॰ ज्याचें छेदन, भेदन, चलन, अन्यथा करण, इ॰ करण्याविषयीं बहुत प्रयत्न लागतो असा जो पदार्थादिक तो; उ॰ हा दृढपाषाण आहे याशस्त्रानें फुटणार नाहीं, तोफेचे गोळ्यानें हि भोंक नपडे अशी दृढभिंत घालावी, रूटेना अशी दृढगांठदे, दृढनिश्चय असला म्ह॰ ईश्वर कृपा क रतो, एकदां ऐकलेला गोष्ट पुनः ऐकली म्ह॰ दृढ होत्ये.

दृढमुष्टि, ३लिं॰ सं॰ कडू.

दृढावणें, प्रथम अदृढपणें स्थित जी गोष्ट नीणें दृढ होणें; उ॰ जशी जशी भक्ति दृढावत्ये तशी तशी ईश्वर कृपा होत्ये.

दृष्ट, ३लिं॰ सं॰ अवलोकिला तो; एथे अवलोकन अनुमानादि ज्ञानाचें उपलक्षणजाणावें, अतएव ही गोष्ट प्रत्यक्षदृष्टनव्हे परंतु शास्त्रदृष्ट आहे इ॰

बोलतात; २, दृष्टि.

दृष्टभेट, स्त्री० मरणोन्मुख मनुष्याचे असन्निहित जे पुत्रादिक नातेवइन शेवटीस त्यांची भेट परस्पर होत्ये ती; उ० माझ्या नाडी आटोपत चालल्या त्यास पुत्राची दृष्टभेट करवा; २, कुशलप्रश्न संभाषणादि रहित कोणेकाची जे केवल दर्शनमात्र ती; उ० त्यांची आमची काल दृष्टभेटमात्र जाली आजून बोलायास फावलें नाहीं.

दृष्टमणी, पु० गोसाव्याचे हातांत किं० कंठांत बांधायाचे काचेचे मणी असतात.

दृष्टलणें, दृष्टावणें.

दृष्टांत, पु० सं० वाक्यार्थरूप किं० कथारूप उक्ति जो अर्थ त्यास सादृश्यज्ञानमूलक प्रामाण्यबुद्धीनें ग्रहण करितां तो अर्थ दृढ व्हावा म्हणून तत्सदृशार्थक वाक्यांतराचा किं० कथांतराचा जो उपन्यास करितात तो; २, कोणेकास कदाचित् भूतभविष्यादि गोष्टीचा सूचक जो स्वप्नपडतो तो.

दृष्टांती, २ लिं० कोणेएक अर्थाबर दृष्टांत द्यावयास उपयोगी जो श्लोकादिक तो.

दृष्टादृष्ट, सं० स्त्री० परस्परांचे नेत्रांचें जे परस्परांस दर्शन तो.

दृष्टावणें, दृष्टिदोष बाधल्यामुळे विकृतीनें पाहणें.

दृष्टावा, पु० निर्दैवजो दृष्टांत होतो तो.

दृष्टाव्या, २ लिं० रा० ज्याची दृष्ट बाधत असत्ये तो.

दृष्टि, स्त्री० सं० नेत्रगोलस्थित पाहाण्यास साधनजे इंद्रिय आणि त्याची वृत्ति ती; २, ला० कोणेएकपदार्थादिकाकडे जें लक्ष्यानुसंधान तो; उ० निरंतर शास्त्राकडे दृष्टि ठेवावी तेव्हां शास्त्रयेतें; त्यास पा गोटें द्यावयाचें खरें परंतु माझी दृष्टि चुकली; २, सदसद्विवेचनाविषयीं कारणभूत अंतःकरणवृत्तिरूप जो स्वभाव तो; उ० आलीकडे यांची दृष्टि फिरली; पुत्राकडे पुत्रदृष्टीनें पाहिलें असतां मन नाराजतो नाहींतर सर्वएकच आहे; पुत्रदृष्टीनें स० हा पुत्र अशा बुद्धीनें एतत्सदृश अनेकसमासजाणावे; ४, रा० पाषाणादि मूर्तीस रौप्यादिकाची नेत्रें लावितात ती; दृष्टीसपडणें स० चक्षुर्विषयकिं० बुद्धिविषय होणें; उ० अमावास्येस चंद्र दृष्टीसपडत नाहीं; शकुनावरून जें दृष्टीसपडेल तें सांगा; एथें स, वांचूनही प्रयोग असतो; दृष्टिपडणें किं० होणें स० पाहिलेपदार्थासविकार होईअशी दृष्टि बाधणें; दृष्टिकाढणें उतरणें इ० स्थलीं दृष्टिविकारमंत्रादिकानें उतरणें; दृष्टिचुकावून गेला इ० स्थलीं दृष्टिशब्दाचा अर्थ डोळा होतो; दृष्टिमरणें स० कांहींएकपदार्थ पुष्कळ पाहिल्यामुळें तोपदार्थ अपूर्व, अद्भुत, नवादाया जोगी दृष्टि संस्कृत होणें; उ० याची दृष्टिमेली आहे म्हणून घोडा हत्तीस भीत नाहीं; दृष्टिचोरणें स० डोळा चुकविणें.

दृष्टिगुण, पु० कांहींएकपाहिलें असतां त्याचें थरें किं० वाईट व्हावें असा दृष्टिमध्यें कोणेकाचे शक्तिविशेष असतो तो.

दृष्टिचोर, पु० दुसऱ्याचा डोळा चुकवून चोरण्याचा किं० पळण्याचा स्वभाव जाचा तो.

दृष्टिदेखत, दृष्टिदेखतां, अ० कोणेकाचे समक्ष.

दृष्टिपात, पु० सं० विषयाचा दायीं दृष्टिनें जें पतन तो

दृष्टिफोड, स्त्री० डोळेफोड.

दृष्टिबंध, पु॰ मंत्रसामर्थ्यानें अन्यथा वस्तु करून पदार्थ दिसावे असाजो दृष्टीस मोह करितात तो.

दृष्टिबंधन, न॰ दृष्टिबंध.

दृष्टिभेट, स्त्री॰ दृष्टभेट.

दृष्टोत्पत्तीस, अ॰ अनुभवदर्शक ये. धा॰ प्र॰; उ॰ मीं सांगतों हें तुह्मांस एक्दां खोटें वाटतें परंतु पुढें तुमचें दृष्टोत्पत्तीस येईल.

दृष्ट्या, अ॰ प्रत्यक्ष आपल्या दृष्टीनें, पाहा धा॰ प्र॰, मी दृष्ट्यापाहीन तेव्हां मला खरें वाटेल; २, समासीं पूर्वपदार्थ जो असेल तदाकारबुद्धीनें; उ॰ दोषदृष्ट्यापाहिलें असतां दोष वाटतो गुणदृष्ट्यापाहिलें असतां गुण दिसतो.

देउळवाडा, पु॰ ग्रामाबाहेर देवळाचे आसमंतात् भागीं देवसेवकादिकांनीं वसविलेलें जें स्थल तो.

देउळ, न॰ देवालय.

देकार, पु॰ लग्नाद्युत्साहीं अनेक ब्राह्मणास जी दक्षिणा वांटितात तो.

देखणा, १ लिं॰ नाकाडोळ्यानें करेख सुंदर जो मनुष्य, घोडा, इ॰ तो; २, ला॰ दार्ढ्यादितादृश आंत गुणनसतां पाहाण्यांत मान करेख जो त्यास ल्॰.

देखणाऊ, १ लिं॰ देखणा.

देखणें, अवलोकणें.

देखत, अ॰ डोळ्यानीं प्रत्यक्ष पाहात असतां; उ॰ यांचे रुपये मासे देखत घेतले आणि आतां नाहीं म्हणतो; २, ला॰ जीवंत असतां; उ॰ माझे देखत तुह्मी वेगळे निघूंनका मीं मेल्यावर पाहिजे तें करा.

देखतचिठ्ठी, अ॰ चिठ्ठी पाहातांच तत्क्षणीं; उ॰ तुह्मीं ही देखतचिठ्ठी लिहून येणें.

देखतभुली, स्त्री॰ रा॰ पूर्वी हें कपट आहे असा निश्चय असतो, फसल्यानंतरही कपटानें मीं फसलों असें वाटतें परंतु फसतेवेळेस मात्र हें कपट आहे असें न वाटतां जेणेंकरून मोह पडतो असें जें वादीचारवेळ इ॰ कपट त्यास ल्॰.

देखतां, अ॰ देखत.

देखभट्टी, स्त्री॰ रा॰ चित्रलेखनादि कर्माची गुरूपासून शिक्षा न घेतां पाहूनच यथाकथंचित् तें शिकण्याचा जो प्रकार ती; उ॰ मीं कांहीं चित्रें कराया स कोणापाशीं शिकलोंनाहीं करितों ही शुद्ध देखभट्टी आहे.

देखरेख, स्त्री॰ कोणे का व्यवहारावर निरंतर चौकशी ठेवण्याचा जो व्यापार ती.

देखवा, पु॰ दे॰ लोकांस समजाया पुरतें मात्र आपुलें कि॰ आपुले विद्यादिकांचें ईषन्मात्र एकवार केलेंजें प्रकाशन तो; उ॰ पावसानें देखवामात्र दाखविला नेवढ्यानें काय होणार; तुह्मीं गाण्याचा देखवा मात्र दाखविला परंतु जेव्हां आह्मांस ऐकवाल तेव्हां खरें.

देखील, अ॰ यत्संबंधि होणें इ॰ चरमावधिस्थ आहे त्यापुढें हें अव्यय लागतें तदितरांचें होणें इ॰ कांची कैमुतिकन्यायेंकरून जी सिद्धि लिचें द्योतक; उ॰ राजा देखील त्याचे पायां पडतो एथे प्रधानादिक पडतात हें अर्थात् सिद्ध होतें.

देखीलबाबती, अ॰ बाबतीसहवर्तमान; उ॰ याशेतासदेखीलबाबती पांचसण भानपडतें.

देखीव, २ लिं॰ देखल्यामुळें जें विदितजालें वर्तमान, कस

कसब, इ० तो.

देखूंसकणें, मत्सरबुद्धीनें पाहिलें जाणें; उ० पतीनें एका बायकोवर विशेषप्रीति केलीतर दुसरे बायकोस देखूंसकत नाहीं.

देखोदेख, अ० कों० कोणएकाचे दृष्टिदेखत.

देखोदेखी, अ० कोणएककर्म केलें असतां होतेंकाय व करावें कोणी इ० विचार नकरितां दुसर्यानें केलें म्हणून आपणही करावें अशा समजुतीनें. क्र इ० धा० वि०.

देघे, स्त्री० देणें घेणें, एतद्रूपजी खटपट ती.

देज, न० कों० भूइादिक आपलीकन्या देत्येसमयीं वरापासून जेंइ०इादिक घेतात तें.

देंट, पु० व० पान, फूल, फळ, यांचा आधार जो वृक्षावयव असतो तो; २, माड, राजगिरा, इ० कांचेंजें कांड तो; ३, तंबारसूमध्यें जो कांडांश आला असतो तो.

देंटपुळी, स्त्री० वा० काळपुळी.

देंटी, देंठी, स्त्री० अळूं, कमळ, इ० कांचे पर्णांचा कंदापासून निघालाजो देंट ती.

देंटीं, अ० कोणएक व्यापारीं मूलभूत तेंकरून विवक्षित जो इ०इादिकांचा आधार त्याचेबलेंकरून; उ० हे नित्यउत्साहकरितात हें अवघें पैशाचे देटीं.

देंठ, पु० न० दे० देंट, देंठीलावणें स्त्री० डेंरीलावणें.

देणगी, स्त्री० देनगी.

देणावळ, स्त्री० देणगी, स्त्री० जशीदेणावळ तशी धुणावळ यास्त्रीलिंगच म०

देणी, १लिं० द्यावयाचा गंजिफांतील तलकेविषयींच म०.

देणें, सप्तमीकांत कि० स्वसन्निहित जो पदार्थ तो, अन्यसप्तमीकांत कि० अन्यसन्निहित करणें क्वचित् स्वसंबंधाचा निरास विवक्षितआहे क्वचित् नाहीं; उ० ब्राह्मणाला गाय दिली; परटाकडे धोतें धुवायला दिलीं; तोचाकूइकडे दे; व्यापारसमाप्त्युत्तर कर्मावर कर्त्याचा स्वतःसंबंध नाहीं असाविषय असतां उभयांत सकर्मक धातू घडून स्वार्थी याचा प्रयोग होतो; उ० हीजमीन खणून देइ० दोनपैसे देतों, एथें खणून देइ० खण असा अर्थ होतो, तूंआपल्याला घर बांध एथें बांधून दे असें स्वस्वसंबंधासुद्धां होतनाहीं, हेंमला समजावून दे इ० ज्ञानार्थक, धातुस्थलीं विषयावर अन्यविषयी करणमात्रेंकरून च कर्तृसंबंधाचा अपगम मानिला आहे अतएव गुरू शिष्यास विद्या देतो इ० प्रयोग होतात, टाक, सोड, इ० वर्जनार्थक जे धातू त्यांचे उभयांतापुढें याचा प्रयोग होतो, तत्तत्संबंधापासून आपण केवळ मोकळें होणें हा अर्थ विवक्षित असतां; यापोरानें मी गोष्ट सोडून दिली इ० कधींहि पुनः काढणार नाहीं अशा बुद्धीनें सोडिली, पुंएतत्प्रत्ययांत धातूंपुढें याचा योग आला असतां तत्तत्क्रियेविषयीं प्रतिबंध नकरणें असा अर्थ; राजीं ढेंकूण निजूं देतनाहींत, घरीं आपणिआहे मला आजुंधा; २, ना० अभय, धैर्य, शिवी, आशीर्वाद, रंग, काना, मात्रा, इ० कीं कर्मे तीं, विवक्षित संबंधाचीं अधिकरणीं यथायोग्य स्वतः किं० संस्कारफलादिद्वारा स्वनिष्ठ क्रियेनें उपस्थित अशींकरणें; ३, न० अवश्यदिलेंपाहिजे दुसर्यानें करणें; स्त्री० देणें आणि घेणें हें कोणासही नसावें

मला देमाय धरणीठाव असें जालें स्त्र० पृथ्वीचे पोटांत जावें असें याद्याजोगी निरुपायदशा प्राप्त जाली असा अर्थ.

देताघेता, २ लिं० घेतादेता.

देतींघेतीं, अ० घेतांदेतां.

देनगी, स्त्री० कोणे काचा गुण पाहून संतोष आल्यामुळें त्यास जें इ० दिल्यादिक देतात ती.

देय, २ लिं० सं० द्यावयासजें योग्य कि० दिलेंच पाहिजे तो.

देव, पु० ईश्वर; २, स्वर्गी राहणारे जे इंद्रादिक ते प्रत्येकि; ३, ज्यांचें पूजन वंदन केलें असतां ईश्वरप्रसाद होतो असे जे पाषाण मूर्त्यादि तो; देवदर्शन इ० समासही जाणावे.

देवक, न० विवाह कि० मुंजी एतद्रंगलें करून स्थापनीय जें कुलदेवतादिक तें.

देवकप्रतिष्ठा, स्त्री० देवकाचें जें स्थापन ती.

देवकला, देवकळा, स्त्री० पाषाणादिकांचा ठायीं भक्तांचें वरेंकरावें आपण पूजा पावावी इ० रूपजो योग्यताविशेष ती; स्त्र० टांक्यांचे घाव सोसावे तेव्हां देवकळा पावावी.

देवकापशी, स्त्री० कापसाचे झाडांत एक भेद आहे.

देवकापूस, पु० देवकापशीचा जो कापूस तो.

देवकार्य, न० कुलधर्मानुसार जी कुलदेवतेची पूजा इ० अनुष्ठान तें.

देवकोत्थापन, न० सं० स्थापित देवकाचें जें उत्थापन तें.

देवखोली, स्त्री० वा० देवघर.

देवगण, पु० सं० जन्मनक्षत्रावरून पाहावयाचा प्राण्यां

चे वैघटितोपयोगी एक गुण आहे.

देवगत, स्त्री० देवतासंभाव, अकस्मात् कांहीं एक कार्य होतें आणि त्याचें कारण तरमनांत येतनाहीं तेथें अर्थापत्तीनें कारणलेंकरून या देवगतीला कल्पितात तेथें च म०.

देवघर, न० घरांमध्यें देवठेवावयाकरितां च जी खोली केली असते तें.

देवघाई, स्त्री० कों० देवापुढें ढोल वाजविण्याची गती आहे.

देवघोंट, पु० वा० देवालयास जावयाची जी बांधलेली वाट असते तो.

देवघेव, स्त्री० पु० घेवदेव.

देवचार, पु० ग्रामदुर्गादि देवांचा पिशाचरूप दूत असतो तो.

देवजीधसाडा, पु० माकडांचे खेळांत जो पुरुषरूपमर्कट असतो त्यास स्त्र०

देवडोंगर, पु० काळाभोंपळा.

देवडी, स्त्री० मोठ्या वाड्याचे पुढचे द्वारावाहेर दोहों कडे उंच ओटे करून बसावयाजोग्या जागा केल्या असतात ती.

देवत, न० देवता.

देवतवार, पु० रा० आपल्या कुलदेवतेस दमनारोपण, पवित्रारोपण, इ० करण्याचा वार्षिक दिवस तो.

देवता, स्त्री० देव; २, इंद्रियादि यज्ञयागतत्पदार्थांचे अभिमानी ईश्वरांश आहेत ते म०; उ० चक्षुरिंद्रियाची देवता सूर्य.

देवतार्चन, न० सं० देवाची जी पूजा तें; २, ला० उपकरणीं साहाणसोड इ० जी पूजासामग्री तें.

देवदत्त, पु॰ सं॰ उदाहरणार्थ कोणेएक मनुष्याचें नामघ्यावयाचें असतां हें नाम घेतात; उ॰ देवदत्ताचे मारणारास मारिलें ह्मणून देवदत्त जीवंत होतनाहीं.

देवदर्बार, न॰ देवाचेंजें दरबारतें.

देवदर्शन, न॰ देवाचेंजें दर्शनतें.

देवदार, पु॰ देवदारु.

देवदारी, वि॰ देवदारसंबंधी.

देवदारु, पु॰ एकवृक्षआहे.

देवदेव, पु॰ देवाचेंपूजन, प्रदक्षिणा, नामस्मरण, इ॰जेंअनुष्ठान तो.

देवदेवक, न॰ देवक.

देवद्वार, न॰सं॰ स्नानसंध्या इ॰पुण्यकर्मोचित जें देवसन्निहितस्थलतें; उ॰ देवद्वारीं यज्ञ, मस्करी, करूंनये.

देवधर्म, पु॰ देवदेव; २, कांहीं इष्टसिद्धिविषयीं किंवा अनिष्टनिरासार्थ ग्रामदुर्गा, कुलदेवता, इ॰कांस नवसकरणें, कौलप्रसाद लावणें, इ॰जो उपाय प्रकार तो; देवाधर्मानें सोडलेला ल॰ केवळ निरुपयोगी जो मनुष्यादिपदार्थ तो; देवीधर्मीविचारणें इ॰स्थलीं कौलप्रसाद लावून देवास विचारणें असा अर्थ होतो.

देवनदी, स्त्री॰ भागीरथी.

देवनळ, पु॰ एकबरूसारिखें झाड आहे.

देवपण, न॰ देवधर्म हितीयार्थी; २, देवकला.

देवपाट, पु॰ देवालाबसवायासाठीं किंवा देवपूजेस बसावयासाठीं पाटकेला असतो तो.

देवपुजा, स्त्री॰ देवपूजा, देवपूजाघाटणें ल॰यत्किंचित् प्रतिष्ठादिजाल्यामुळें डौलवाटणें ल॰गांड भरेआणि देवपुजावाटे.

देवपुरी, स्त्री॰ जाघरीं कोणीयावें कोणीनयावें असा प्रतिबंध नसतो असेंजें घर त्यास ल॰.

देवपूजा, स्त्री॰ देवतार्चन.

देवप्रतिष्ठा, स्त्री॰ देवालयांत नव्या देवाचें जें स्थापन तो.

देवब्राह्मण, पु॰ तीर्थादिकांचाठायीं गेलें असतां देवासनैवेद्य ब्राह्मणास भोजन एतद्रूपजो समारंभ करितात तो.

देवभक्ति, स्त्री॰ कों॰ पिशाचाद्युपद्रवनिवारणार्थ अंगारालावणें आपले अंगीं पिशाचसंचारकरून घेणें इ॰जेंकर्म तो, देवभक्तिमाजविणें इ॰स्थलीं उगीच ढोंगवाढविणें असा अर्थ.

देवभक्त्या, पुं॰ कों॰ अंगारालावणें इ॰देवभक्ति करीत असतो तो.

देवभात, न॰ मनुष्यानें नपेरितां आपोआप तळें इ॰कांचाठायीं होतअसतें असें भात आहे.

देवभूमि, स्त्री॰ सं॰ यज्ञयागादिकर्माविषयीं उचितजी आर्यावर्तादि पुण्यभूमि ती.

देवभोळा, पु॰ निरंतर देवाचा नामस्मरणादिसेवा करावी असेंलक्ष्य जाचें आणि देवसाधूंचें असंभावितचरित जरी कोणीं सांगीतलें तथापि कुतर्कानें त्याजवर जाचा अविश्वास होतनाहीं असा जो सात्विकमनुष्य तो.

देवमणि, पु॰ घोडयाचागळ्याचाखालीं सुलक्षणरूपचिन्ह असतें तो.

देवमाणूस, पु॰ निष्कपटभोळाजो मनुष्य त्यास

स्तुतीनें ल० .

देवमातृक, २लिं० सं० पर्जन्यवर्षणानेंच जेथे पीक होतें तो देश .

देवयोनि, २लिं० सं० स्वर्गी इंद्रादिदेवांचे आश्रयें करून राहाणारे विद्याधर, गंधर्व, इ० क जाति आहेत ती .

देवर, पु० सं० दीर .

देवरुवा, पु० ब्राह्मणामध्यें एक भेद आहे .

देवरुवी, स्त्री० देवालयादिस्थलीं देवमूर्त्यादि ठेवण्याकरितां मोठा सुशोभित जो कोनाडा राखिला असतो ती .

देवरुशी, देवरुषी, पुं० देवभन्त्या .

देवलंड, पु० देवप्रीत्यर्थ जें कर्मकरावयाचें तें नाहीं करीत तो .

देवलोक, पु० सं० स्वर्ग .

देवसभा, स्त्री० सं० देवांची इंद्रादिमंदिरीं जी सभा ती .

देवसेवक, पु० सं० देवस्थानीं देवाची पूजादिरूप सेवेकरितां जे नियुक्त ब्राह्मणादि असतात ते प्रत्येकीं कि० महास्थानीं आपुलें घर सोडून देवसेवार्थ कोणी राहिना असतो तो .

देवसेवा, स्त्री० सं० प्रदक्षिणा अभिषेक इ० रूप जी देवाची सेवा ती .

देवस्की, स्त्री० देवभक्ति; २, प्रतिग्रामीं ग्रामदैवतसंबंधी वार्षिकोत्साहादिरूप जो व्यवहार ती .

देवस्थान, न० सं० देवाचें जें संस्थान तें

देवस्थापना, स्त्री० सं० देवप्रतिष्ठा .

देवळ, न० देउळ .

देव

देवळी, स्त्री० दे० कोनाडा; २, पु० वा० भाविणीचे पोटीं जन्मलेला जो पुरुष तो .

देवांगना, स्त्री० सं० अप्सरा; २, ला० भाविणीस ल० .

देवाघेवा, पु० देवघेव .

देवाणघेवाण, न० उसणेंवाण .

देवारणें, रा० न० अर्धकोश; २, प्रसिद्ध स्थलापासून मार्गावर अर्धअर्धकोशावर दगड रचून खुणेसाठीं ठेविले असतात तें .

देवालय, न० सं० देवाचें च स्वतंत्र जें घर तें .

देवाज्ञा, स्त्री० सं० संकेतानें मृत्यू स ल० .

देविक, २लिं० देविका चा अपभ्रंश .

देवी, स्त्री० जगदंबा; २, जन्मांत सर्वमनुष्यांस एक वार होतो जो विस्फोटकरोग ते प्र० प्रा० अने० व० .

देव्हारघर, न० देवघर .

देव्हारा, पु० नित्यपूजायाचे देवठेवायाकरितां काष्ठादिकांचा अंबारी इ० आकाराचा केला असतो तो, देव्हारेंमाजविणें ल० देवरुपीपणाचें ढोंग माजविणें .

देव्हारें, न० कोणेकाचें कोणेकाचे हातें हेंकायतेंमासें सर्वस्व अशाबुद्धीनें निरंतर आदरउपचार चालतात तें .

देश, पु० कोहीं एकपदार्थ राहाणें उत्पन्न होणें इ० विषयीं अधिकरणत्वेंकरून अभिमत जें भूतलादि तो; उ० वृक्षाचे मूलदेशीं सेचनकेलें ल० अग्रदेशींही टवटवी दिसत्ये, भाषासंप्रदाय इ० कांचे योगानें भिन्नभिन्न मानिलेले जे भूतलविभाग ते प्र०; आमचे देशचे आचारमर्यादा चांचे देश

चे

चेआचारास फार अंतरआहे;२, पूर्वेसंबालेघाट द-क्षिणेस कर्नाटकपश्चिमेस सह्याद्रि उत्तरेसगंगा यां-चा मधलाओप्रदेश तो, देशींआणें इ॰स्थलीं स्व-देशीं असाअर्थजाणावा, देशभेद देशांतर इ॰ समासहीआणावे स्ल॰ जसादेशनसावेश.

देशकुळकरण, न॰ देशकुळकरण्याचा जो अधि-कार तें.

देशकुळकरणी, पु॰ माहालचे पोटचे जेगांव त्यां-चाहिशेवकिनेव त्यात्यारवेतकुलकरण्यां पा-सून घेउन एकंदर सजून सरकारांत देतअसतो असाएकमाहालचा वतनदार आहे.

देशठक, २लिं॰ सगळ्यादेशास ठकवायाजोगा जो ठ-क तो.

देशत्याग, पुं॰ पुनः त्यादेशासयेउंनये अशासंकेवा-नें केलाजो स्वदेशाचा त्याग तो.

देशपांड्या, पु॰दे॰ देशकुळकरणी.

देशभाषा, स्त्री॰ जाजादेशांत जाजाभाषेनें व्यवहा-र होतो तीतो तत्तदेशींची.

देशमुख, पु॰ माहालचा मुख्यजो वतनदार अधि-कारी असतो तो.

देशमुखी, स्त्री॰ देशमुखाचें जेंकर्म किं॰ अधिकार ती.

देशस्थ, पु॰ ब्राह्मणांत एक भेदआहे;२,२लिं॰ जा-जादेशीं जोजोराहाणारा तो तत्तदेशनामपूर्वक; उ॰ शीनदेशस्थ ब्राह्मण्यास उष्णदेशमानत नाहीं.

देशस्थी, २लिं॰ देशस्थसंबंधी जीभाषा,रीति,इ॰तो.

देशाचार, पु॰ शास्त्रप्रमाण नसतांही एकादेदेशा-मध्यें शिष्टपरंपरेनें चालत आलेला असतो जो

आचा

देशाटन, न॰सं॰ अनेकदेशांचाठायींओसंचारतें;उ॰ देशाटन केल्याविनून अनेकदेशींचारीति समज तनाहींत.

देशांतर, न॰सं॰ लंकेपासून मेरूपर्यंत दक्षिणोत्तर जीरेषा मानिली आहे तीपासून विवक्षितदेशास जेंअंतर तें;२, विवक्षितदेशाहून अन्यजो देश तें.

देशावर, पु॰ ब्राह्मण देशांतरास किं॰ ग्रामांतरास आउन प्रतिगृहीं एकएकवार जी भिक्षा मागतो तो किं॰ तीभिक्षामागण्याचा जो व्यापार तो;उ॰ यंदांपंचवीस रुपये देशावर मिळाला; आह्मीं दे-शावरकरून पोटभरतों.

देशीय, २लिं॰ सं॰ विवक्षितदेशसंबंधी प्रा॰ समा-सी प्र॰;उ॰ तद्देशीय, एतद्देशीय, पूर्वदेशीय,इ॰.

देशोधडीस, अ॰ देशधडीस.

देस, पु॰ देश;२, कांहींएकपदार्थास तुच्छत्वबोधन कर्तव्यअसतां शिवी सारिखा याचाप्रयोग क रितात.

देसक, पु॰ वा॰ देशाचा वतनदार जो अधिकारी तो.

देसकत, स्त्री॰ वा॰ देसकाचाजो अधिकार ती.

देसकी, स्त्री॰ वा॰ देसकत.

देसधड, स्त्री॰ वा॰ देशत्यागकरून जावयाजोगी आलीजी विपत्ति ती.

देसधडीस, अ॰ जा,लाग, इ॰धा॰प्र॰;उ॰राजोपद्र वादिसंकटासुकें विपत्तिपाहून देशत्याग करून दूरदेशास जाणें.

देसधूळ, स्त्री॰ वा॰ अनेकप्रकारें अनेकवस्तूंचा नाश

जाल्या

आल्यामुळें जीपरम विपत्तिरूप दशा ती.

देसाई, पु॰ देशमुख.

देसकरी, ३ लिं॰ देशांतर राहाणारा जो मनुष्य, गाय, घोडा, इ॰ तो.

देह, पु॰ सं॰ काया; देहावर असणें, येणें, रूप॰ शुद्धीवर असणें, भा॰ निषेधार्थी प्र॰; देहीं असून विदेही रूप॰ लोकांस संसारी असा दिसून अभ्यंतरीं जो केवल अनासक्त तो; देह पडणें क्रि॰ जाणें रूप॰ जी वकलेशीं वियुक्त होणें; देह टाकणें, देवणें, सोडणें, रूप॰ मरणें.

देहत्याग, पु॰ सं॰ मृत्युस्वीकारानें देहाचा जो त्याग तो.

देहदंड, पु॰ सं॰ देहशोषणार्थ जें तीर्थ, यात्रा, प्रायश्चित्तादि क्रि॰ तेणेंकरून होतें जें देहास दंडन तो.

देहधर्म, पु॰ सं॰ मल, मूत्र, घर्म, इ॰ बाहेर निघत असावे इ॰ रूप जो देहाचा असाधारण धर्म तो; देहधर्माचें करणें रूप॰ मलविसर्जन करणें.

देहधारी, ३ लिं॰ देह धारण केलें आहे जाणें तो.

देहपात, पु॰ सं॰ मेल्यामुळें जें देहाचें पतन तो.

देहभान, न॰ सं॰ हामीं या देहांत आहें इ॰ कर्तृत्वाकर्तृत्वादि विवेकाविषयीं उपयुक्त जें चित्तानुसंधान तें; उ॰ याला क्रोध आला रूप॰ देहभान जातें.

देहली, स्त्री॰ सं॰ जेथें दीप ठेविला असतां बाहेर आंत सारखा प्रकाश पडतो असा जो मध्यवर्ती द्वारप्रदेश तो.

देहलीदीप, पु॰ देहली प्रदेशीं ठेविलेला जो दीप तो.

देह

देहलीदीपन्याय, पु॰ सं॰ मध्यस्थित पदार्थाचा उभयत्र अन्वय होण्याविषयीं गृहीत जो देहलीस्थदीपाचे उभयत्र प्रकाशकत्वाचा दृष्टांत तो.

देहविसर्जन, न॰ सं॰ देहत्याग.

देहस्वभाव, पु॰ सं॰ जन्मल्यापासून मरणपर्यंत जो कांहीं बरा, वाईट, स्वभाव असतो तो.

देहात्मवाद, पु॰ सं॰ देहाच आत्मा असें जें मत तो.

देहात्मवादी, ३ लिं॰ सं॰ देहात्मवादें करून चालणारे जे नास्तिकादि तो.

देहाभिमान, पु॰ सं॰ हा मला देह आहे यामुळें मी देही आहें इ॰ कारक जी बुद्धि तो.

देहाभिमानी, ३ लिं॰ सं॰ देहाभिमान जास आहे तो.

देही, ३ लिं॰ देहधारी.

देहुडा, ३ लिं॰ ग्रं॰ एक्या पायांवर भार घेउन उभें राहून दुसरे पायांचें पाउल उचलून त्या पायांवर टेंकिलें असतां चक्र होतो जो पाय तो; उ॰ देहूडा चरणू वाजवीनो वेणूगोपीकारमणू स्वामी मासा.

दैत्य, पु॰ सं॰ देवांची प्रतिपक्षी पुराणप्रसिद्ध एक जाति आहे तो.

दैनंदिनप्रलय, पु॰ सं॰ ब्रह्मदेवाचे प्रतिदिवशीं यासृष्टीचा जो प्रलय होतो तो.

दैनवाणा, ३ लिं॰ दीनवाणा.

दैना, स्त्री॰ दुर्दशा.

दैन्य, न॰ सं॰ दारिद्र्यादिकामुळें जें दीनत्व तें.

दैव, न॰ सं॰ प्राण्यास सुखदुःखादि होण्याविषयीं

दैव

नियामक प्राचीन कर्मानुसार जो ईश्वर संकल्पतें; २, स्वजातिमनुष्यांचा जो समुदाय तें; दैवउघड णें, उपटणें, स्त्र० स्थानें रूक्षप्रद होणें; दैवफिर णें स्त्र० अनुकूलाचें प्रतिकूल कि० प्रतिकूलाचें अनुकूल होणें; दैवउभेंराहाणें स्त्र० रूक्षदुःखादि होण्याचा आकार पूर्वी कांहींनदिसतां तें रूक्षदुःखादि अकस्मात् होण्याविषयीं दैवप्रयोजक होणें; दैवखुलणें स्त्र० अकस्मात् दैवउघडणें; दैवानेंउपटखाणें स्त्र० अतिशयितरूक्षादि होण्याविषयीं दैवानें उभेंराहाणें; दैवानें धांवघेणें स्त्र० जाउद्योगाचेंफलदुःखप्रद तो उद्योगकरण्याविषयीं बुद्धिप्रद होणें, याचअर्थी दैवानें ओढघेणें, दैवओढवणें असें स्त्र०; दैवकाढणें स्त्र० दैवगतीनें रूक्षदशेनें पावणें; दैवासचढणें स्त्र० दैवकाढणें; दैवासयेणें स्त्र० दुष्कीर्त्यादि अनुभवायास कि० अनिष्टजें कौर्यादिकर्मतेंकरायास अवश्यपणें प्राप्तहोणें कि० दैवासचढणें; दैवाचा स्त्र० चांगलें दैवजाचें तो विपरीतलक्षणेनें दुर्भगास स्त्र० दैवाचाभोंपळा स्त्र० दुर्भगास स्त्र०; स्त्र० सर्वांपुढें धांवेल पण दैवापुढें धांववत नाहीं.

दैवगति, स्त्री० सं० रूक्षदुःखदेण्याविषयीं दैवाचें जें आभिमुख्यतें.

दैवन, न० सं० दैवना.

दैवदशा, स्त्री० दैवानें प्राप्तजाली जी दारिद्र्यादिदशा ती.

दैवरेषा, स्त्री० सं० कपाळींजो अस्पलेख असतो ती.

दैववशात्, अ० सं० दैवगतीमुळें.

दैववान्, २लिं० सं० चांगलें दैवजाचें तो.

दैव

दैवहीन, २लिं० सं० निर्दैव.

दैवज्ञ, पु० सं० जोशी.

दैविक, २लिं० सं० देवापासून आलाजो उपद्रवादिक तो.

दैहिक, २लिं० सं० कायिक.

दोकडा, पु० दुगाणी द्वितीयार्थी.

दोघे, २लिं० दोनजे जीव ते.

दोड, २लिं० दे० झाड.

दोडका, पु० भाजीचेउपयोगी एकफल आहे; २, साबीमध्यें एकजाति आहे.

दोडकी, स्त्री० दोडक्याचीजी वेलनी.

दोडा, पु० दे० रुईचें किं० मांदारांचें फल तो; २, बोर, पेरू, इ० कांचें कोवळें जें फल तो; ३, रा० कापशीचें फल तो.

दोद्दाचार्य, पु० दुद्दाचार्य.

दौंद, न० व्यायामाभावादिकामुळें मोठें वाढलेलें जें पोट तें; स्त्र० मासूचे दोंदावर जांवईउदार.

दौंदील, २लिं० जाचें मोठें दोंद आहे तो.

दौंद्या, २लिं० दोंदील.

दोन, २लिं० एकआणि एक मिळविले असतां जी संख्या होत्ये ते; दोनहातांचे चारहात होणें स्त्र० चहाड होणें.

दोभ, पु० वा० महिष्यादिकांचा जो स्तन तो.

दोमदोम, अ० पिशाचेनावें भिक्षामागतेवेळेस हा शब्द उच्चारितात; दोमदोमकरित जाणें, फिरणें, इ० स्थलीं भीकमागत देशोदेश फिरणें असाअर्थ जाणावा.

दोर, पु० रूंभइ० कांचीरूमारपाशांचे ओंगळ्या एवढी

दोरी

मोठी केलीजी दोरी तो; २, कों० केळ, केवण, भेंडी, आंबाडी, इ० कांची जी लव्हा जिला पीळ घालून दोरी करितांयेत्ये तो; ३, ला० गज्याम ध्यें कि० दही, गूळ, इ० नासल्यामुळें त्याम ध्यें जीतार असत्ये तो; दगडाचे दोर काढणारा ल० युक्तिमान् असून फारउद्योगी असा अर्थ आणावा.

दोरक, पु० सं० शिवण्याचा कि० बांधण्याचा उपयोगी जो दोरा, दोरी, तो.

दोरखंड, न० दोरम्हणमार्थी.

दोरडें, न० कों० दोरखंड.

दोरवा, पु० वस्त्राम ध्यें भेद आहे; २, कों० दगड इ० कांस जो दोरा असतो तो.

दोरा, पु० अनेकसूतें एकत्र वळून शिवणें इत्याद्यर्थ मोडें सूत्र करितात तो; २, ला० तांदूळ, दगड, मोतीं इ० कांस जें सूत्राकार फुटायाचें चिन्ह दिसतअसतें तो; ३, विहिरी इ० कांचे आंत त्यांस उपजीवकजें इतरजलाशय संबंधरूप सूत्र असतें तो; उ० याविहिरीस तळयाचे दोरे आहेत; ४, परस्परांचा कांहींएक परंपरेनें योनिसंबंधादिक जो संबंध असतो तो; उ० हे आर आमचे जातीचे असलेतर यांचा आमचा कांहींतरी दोरा असेल; त्यादर्जाचें आमचा कांहीं दोरा होना ल्हणून जातांच पायशिरकला; ५, वृषणाचा मध्यापरून शिश्नाग्रपर्यंत जें सूत्राकार दिसतें तो; ६, नारूचा जो तंतु तो; ७, शरीरास कीड लागत असत्ये तीणें त्वचेंतून संचार केला असतां सूत्राकार जो मार्ग दिसतो तो; ८, स्त्रियांचें करभूषण आहे; ल० सूईपाठीमागें दोरा.

दोरा

दोरावणें, कों० काष्ठ, पाषाण, मोतीं, इ० पूर्वोक्त दोऱ्यानें युक्त होणें; २, पीठ इ० कांत जो दोररूप विकार होत असतो तद्विशिष्ट पिष्टादिकानें होणें.

दोराळ, २ लिं० जाम ध्यें दोर बहूत आहेत असा गरा, दही, इ० तो.

दोरी, स्त्री० अनेक पेड एकत्र वळून केलेलें जें बंधनादि साधन परंतु तें बारीक असतांच प्रयोग मोठें जालें असतां दोरखंड इ० नावें आहेत.

दोरीसूत, अ० केवळ ऊर्जूसूत्राम माणें; जा, अस, इ० कांचा योगी म्र०; उ० हा मार्ग एथून दोरीसूत पुण्यास जातो.

दोला, स्त्री० सं० शेंपाळा, इ० जें शेंके घ्यायाचें साधन तो.

दोलायंत्र, न० सं० तैलादि काढण्याचा उपयोगी वैद्यकप्रसिद्ध यंत्र आहे.

दोलायमान, २ लिं० सं० शेंके बसल्याप्रमाणें इतस्ततः हालतो आहे जो पदार्थ तो; उ० शिरःकंपामुळें कर्णभूषणें दोलायमान होतात; २, ला० कोणे एक कृत्याविषयीं अध्यवसाय न पावतां विचारणेंत पडलेलें जें चित्त त्यास ल०

दोष, पु० सं० हा पदार्थवाईट अशा व्यवहारास प्रयोजक न्यूनता, आधिक्य, अपराध, अशुचित्व, अप्रामाण्य, पाप, दुर्गुण, इत्याद्यन्यतमरूप जो धर्मविशेष तो; तो क्वचित्पदार्थाचे अंगचा च असतो क्वचित्तया संबद्ध होतो; दोषदेणें, काढणें, आणणें, लावणें, देवणें, इ० स्थलीं पूर्वोक्तास्थितजो अप्रामाण्यादिरूप धर्मतो दोषत्वें करून प्रसिद्ध करणें; २, विकृतिपावलेले जे कफवात

पित्त

पित्त ने ग्र० तो.

दोषदृष्टि, स्त्री० सं० पदार्थांचा दोषच पाहाण्याविषयीं लटणारी जी बुद्धि ती; २, २ लिं० तद्विशिष्ट जो मनुष्यादि तो.

दोषानुवाद, पु० सं० दुसऱ्यांचे पापादिरूप दोषांचें जें उच्चारण तो.

दोषारोप, पु० सं० एखाद्यावर दोष लागू करण्याचा जो व्यापार तो.

दोषी, २ लिं० सं० दोष आहे ज्यास तो; प्रायः पाप, अपराध, एतद्रूप दोष असलांच प्रसिद्धि.

दोस्त, पु० دوست मित्र.

दोस्तदार, २ लिं० دوستدار दोस्त.

दोस्तदारी, स्त्री० دوستداری दोस्ती.

दोस्ताई, स्त्री० دوستائی दोस्ती.

दोस्ती, स्त्री० دوستی दोस्तपणा.

दोहणें, गाथी इ० कांपासून दुग्ध काढणें किं० त्यांस दुग्ध काढल्यानें तद्विमुक्त करणें; उ० गाथी दोहून चराया सोडल्या, दुग्धकर्मक प्रयोग ग्रंथांत प्रसिद्ध.

दोहन, न० सं० दोहण्याचा जो व्यापार तें.

दोहरा, दोहोरा, पु० हिंदुस्थानी भाषेंत छंदोविशेषबद्ध कविता जाति आहे तो.

दोत, स्त्री० लिहावयासाठीं शाई घेण्याचें जें पात्र असतें तो.

दौत्य, न० सं० दूतत्व.

दौर्जन्य, न० सं० दुर्जनत्व.

दौर्बल्य, न० सं० दुर्बलता.

दौर्लभ्य, न० सं० दुर्लभता.

दौर्विदग्ध्य, न० सं० दुर्विदग्धता.

दौः

दौःशक्य, न० सं० दुःशकत्व.

दौलत, स्त्री० دولت संपत्ति; दौलतीचा रखवाल्या० जाचा दैवानें सर्वांस दौलत भोगावयास सांपडत्येअसा जो पुरुष त्यास ल्या०

दौलतजादा, स्त्री० دولت زیادہ राजदर्बारीं भालदारानें बोलावयाचा जयशब्द आहे, राजाची संपत्ति वाढती असो असा त्याचा अर्थ; दौलतजादा होणें ल्या० दर्बारि इ० कांत प्रतिष्ठा वाढणें.

दौलतदार, २ लिं० دولت دار संपत्तिमान्.

दौलतवान्, २ लिं० دولت بان दौलतदार.

दौलताबादी, २ دولت آبادی दौलताबाद ह्मणून शहर आहे तदुत्पन्न जे कागद इ० तो.

दौष्ट्य, न० सं० दुष्टपणा.

दौहित्र, पु० आपले लेकीचा पुत्र.

दौहित्रप्रतिपदा, स्त्री० आश्विन शुद्ध प्रतिपदा.

द्यूत, न० सं० जुगार.

द्यूतकार, २ लिं० सं० जुगारी.

द्योतक, २ लिं० सं० द्योतविणारा.

द्योतन, न० सं० कांहीं एक अर्थाचें वाच्यमर्यादेनें न बोलतां ल्या० शब्दांचे अंगीं वाचकता शक्ति नसतां होतेंजें प्रकाशन तें; उ० आतांच आला एथें उभय क्रियांचे अन्वयव्यतिरेकपणाचें द्योतनच हें अव्यय करितें; २, शब्दावांचून इतरलक्षणादिकें करून जें कांहीं एक अर्थाचें प्रकाशन तें; उ० हीं नाडी आज पित्ताधिक्याचें द्योतन करित्ये.

द्योतविणें, कांहीं एक अर्थ द्योतन विषय करणें.

द्योतित, २ लिं० सं० द्योतविलेला.

द्योत्य, २ लिं० सं० द्योतवायास जो योग्य तो.

द्य

द्रव, पुं॰सं॰ पदार्थमात्राचाठायीं स्थित जो जलांश तो, किंवा रूक्षवर्णादि घट्टपदार्थांचा अग्निसंयोगादिपाधीनें जलसदृश होतो जो परिणाम तो; २, ला॰ दयादिकामुळें अंतःकरणास शैथिल्यरूप विकृति होत्ये तो.

द्रवणें, घृतादि घट्टपदार्थानें द्रवरूप होणें; २, ला॰ अंतःकरणानें दयाद्राविर्भावामुळें मार्दवपावणें.

द्रविड, पु॰ ब्राह्मणांत भेद आहे; २, एकदेश आहे.

द्रविडी, २ लिं॰ द्रविडसंबंधी भाषा वेषादि तो.

द्रव्य, न॰ पृथिवी, जल, तेज, वायु, आकाश, काल, दिशा, आत्मा, मन, हीं नउ मत्ये कीं; २, पैका; ३, जाअर्थावर लिंगाचा आणि संख्येचा अन्वय आहे तो अर्थ.

द्रव्यवान्, २ लिं॰ बहूत पैका जापाशीं आहे तो.

द्रव्यहीन, २ लिं॰सं॰ निर्धन.

द्रष्टा, पु॰सं॰ पाहाणारा किं॰ जाणणारा; उ॰ अधर्म द्रष्ट्यासही पातक लागतें मग करणारास लागे लयांत काय संशय; इंद्रियें सर्व अचेतन आहेत तद्दृष्टा जीव.

द्रावण, न॰सं॰ घट्टपदार्थांचे द्रवण्याचा जो व्यापार तें: २. गकूं इ॰कांचा द्रव करणारें जें औषध तें.

द्राविड, पु॰ द्रविड.

द्राष्ट, २ लिं॰ दाष्ट.

द्राक्ष, न॰ एक फल आहे; २, स्त्री॰ त्याचीजी वेलती.

द्राक्षापाक, पु॰ द्राक्षांचीजी परिपक्वदशा तो; २, द्राक्षांचा कांहीं संधा करीत असतात तो; ३, श्लोकादि श्रवण होतां होतांच रसविशिष्ट अर्थ मनांत यावयाजोगा जो काव्यादि भाषणांत गुण असतो वनद्विशिष्ट काव्यादि भाषणासही स्॰

द्राक्षासव, पु॰ द्राक्षापाक द्वितीयार्थी.

द्रोण, पु॰ कढी इ॰ पातळ पदार्थ राहावया जोगें पर्णांचें चोयाटोंचून एकपात्र करितात तो.

द्रोणवत, न॰रा॰ द्रोणाचे उपयोगी जें पान तें.

द्रोणी, स्त्री॰सं॰ डोण.

द्रोह, पु॰सं॰ वैर किं॰ वैरपूर्वक जो अपकार तो; २, कोणेकाचें अनिष्ट केल्यामुळें त्याचा लागतो जो अभिशाप तो.

द्रोही, २ लिं॰सं॰ द्रोह केला आहे जानें तो किं॰ कोणेकाचें कांहीं अनिष्ट केल्यामुळें अभिशापास पात्रभूत तो.

द्वंद्व, न॰सं॰ युग्म; २, परस्परांची लागलेली जीस्पर्धा तें; ३, पु॰ आणि, एतद्व्यर्थद्वारा अन्वित जे दोन पदार्थ त्यांचा जो समास तो; उ॰ शेला आणि पागोटें तें शेला पागोटें एथे द्वंद्वरूप समास जाणावा.

द्वंद्वयुद्ध, न॰सं॰ दोघांचें चें युद्ध तें.

द्वय, न॰सं॰ जा समुदायाचे अवांतर अवयव दोन आहेत तें; दोन आणि द्वय यांचा अर्थ एकच परंतु द्वयशब्दीं समुदायास विशेष्यता आहे म्हणून एकवचन होतें, पुस्तकद्वय इ॰ समास ही जाणावे.

द्वाड, २ लिं॰ शिव्यादेणें, त्रासणें, मारणें, इ॰ लोकोपद्रवकारक बहुत दुर्गुण जामध्यें आहेत तो मनुष्य, पशु, इ॰ तो.

द्वादश, २ लिं॰सं॰ १२; २, बारावा.

द्वादशी, स्त्री॰ बारावी तिथि.

द्वापर, द्वापार, न॰ तिसरें युग.

द्वामुष्य, अ॰ सं॰ दुग्धा.

द्वार, न॰ दार; २, कांहीं एक पदार्थांचा आश्रयीं विवक्षित पदार्थाचा प्रवेश व्हावयास छिद्रादिरूप जो मार्ग तें; ३, ला॰ कांहीं एक व्यवहारादिकांचा आश्रयीं प्रवेशादि सिद्धीस साधनभूत जें कांहीं एक उपकारक, घटक, मध्यस्थ, इ॰ तें; उ॰ गुणाकार भागाकार ज्ञान गणितविद्येचें द्वार आहे; तुम्हीं उपाध्येबाबांचे द्वारानें भेटा ल॰ तुमचें कार्य होईल; ४, कांहीं बोलणें, करणें, इ॰ कांविषयीं औचित्यरूप जो अवकाश तें; उ॰ माझी सर्व विपत्ति यानें दूर केली आतां रडगाण्यास मला द्वार राहिलें नाहीं; ५, कर्त्यादिकांचा क्रियादिकांवर साक्षात्संबंध न होई असें मध्यवर्ति संबंधविश्रामास्पद जें कांहीं असतें तें; उ॰ जीवन विषयांचें ग्रहण करितो इंद्रियें हीं उगीच द्वारें आहेत एथें जीव इंद्रियांनीं विषयांतें घेतो असा व्यवहित संबंध जाणावा.

द्वारक, ३लिं॰ यद्द्वारा झालेला जो संबंधादिक तो नद्वारक; उ॰ सासऱ्याचा आणि आपला संबंध स्त्रीद्वारक.

द्वारका, स्त्री॰ एक पुण्यक्षेत्र आहे.

द्वारदेवता, स्त्री॰ सं॰ देवालयादि द्वारीं जय विजय, कीर्तिमुख, इत्यादिक जो अधिकृत देवता असतात त्या प्र॰; २, ला॰ राजादि प्रभूपाशीं अधिकृत जे द्वारपाल मुत्सद्दी इ॰ त्यांस ल॰.

द्वारपाल, पु॰ सं॰ राजादि द्वारांचा ठायीं संरक्षक जो देविला असतो तो.

द्वारपूजा, स्त्री॰ सं॰ देवालयादिकांत द्वाराधिकृत जी देवता असतात त्यांची जी पूजा ती; २, ला॰ राजादिकांपासून कार्य करून घ्यावयाचें असतां परिवार जनांस जें कांहीं द्यावें लागतें ती.

द्वारभूत, ३लिं॰ सं॰ द्वार तें करून मानलेला जो घटकादिक तो.

द्वारा, अ॰ सं॰ कांहीं एक कार्यसिद्धि विषयीं द्वारभूत जें कांहीं एक तद्योगानें, याचा समासीं प्रयोग; उ॰ राजे परराष्ट्रांतील वृत्त दूत द्वारा आणतात.

द्वाही, स्त्री॰ दुहाई

द्वाहीदुहाई, स्त्री॰ परस्परांनीं परस्परांस घातलीजी राजाची शपथ ती.

द्विगुण, ३लिं॰ सं॰ दोन एकगुण एकत्र केले असतां जितकें व्हावें तितकें तो.

द्विगुणित, ३लिं॰ सं॰ द्विगुण केलेला तो.

द्विज, पु॰ सं॰ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, ; २, अंडज जे पक्षि सर्पादिक तो; ३, दांत.

द्विजराज, पु॰ सं॰ चंद्र.

द्विजन्मा, पु॰ सं॰ ब्राह्मण.

द्विजिह्व, ३लिं॰ दोन आहेत जिव्हा जास तो सर्पजाति; २, ला॰ जाचें वचनास धरना हीं अशा मनुष्यास ल॰

द्वितीय, ३लिं॰ सं॰ दुजा.

द्वितीया, स्त्री॰ दुसरी तिथि किं॰ विभक्ति.

द्वित्न, ३लिं॰ ककारादिजीं व्यंजनें त्यांस दुसरें तेंच ककारादि व्यंजन संयुक्त जालें असतां होतें जें जोड अक्षर तो; उ॰ याच शब्दामध्यें हा तकार द्वित्न आहे.

द्वित्व, न॰ सं॰ एकाच पदादिकाचा अर्थविशेष द्योतनार्थ जो द्विवार प्रयोग होतो तें; उ॰ घरोघर,

लांबच लांब, करकर करतो, मार मारून घेतो इ०

द्विदल, न० सं० जाम ध्यें दोन दालिंब्या असतात अ-सेंजें हरभरा, वाटाणा, इ० धान्य तें.

द्विधा, अ० सं० दोहों प्रकारानीं; २., ३ लिं० दोहों प्रकारच्या; ३. दुभाग.

द्विपक्क, ३ लिं० सं० दोनदां पाक जाला आहे जाचा तो, उकडीचा मोदक, पोहे, इ०

द्विपद, ३ लिं० सं० दोन आहेत पाय जास तो मनुष्यादि०

द्विरागमन, न० सं० विवाहोत्तर पतिगृहीं दुसर्यानें वधूचें जें आगमन तें.

द्विरावृत्ति, स्त्री० सं० कोणे एक व्यापारांचें दिवार जें अनुष्ठान तीं.

द्विरुक्ति, स्त्री० सं० एकवार कथित अर्थाचें त्याच शब्दानीं किं० भंग्यंतरें करून जें कथन तीं.

द्विर्बद्ध, ३ लिं० सं० दिवारजें बांधिलें तो.

द्विविध, ३ लिं० सं० दोहों प्रकारचा.

द्विस्वभाव, ३ लिं० सं० मिथुन, कन्या, धनुः, मीन, हे-राशी प्र०

द्वीप, न० सं० पाण्याचा मध्यवर्ति स्वातंत्र्यें करून देशा दिवसा याजोगें विपुल जें स्थल तें.

द्वेधा, अ० सं० द्विधा.

द्वेष, पु० सं० एकमेकाचे अंतःकरणांत एकमेकाचा अपकार

अपकार करावा असा एकमेकाचे मनांत किं० एकाचे नसतां एकाचेच मनांत जो भाव असतो तो; २, अन्योन्याचे संयोगादि संबंधानें कांहीं दुर्गुण उत्पन्न व्हावा किं० अन्यतराचा नाश व्हावा असा जो परस्पर प्रतिकूल भाव असतो तो; उ० कणकीचा आणि कांकडीचा मोठा द्वेष आहे.

द्वेषी, ३ लिं० सं० द्वेष आहे जास तो.

द्वेष्टा, ३ लिं० सं० द्वेष करण्याचा स्वभाव जाचा तो.

द्वेष्य, ३ लिं० सं० जा विषयीं आपल्यास प्रीति किं० उदासीनता नवाटतां द्वेष वाटतो तो; उ० प्राणिमात्रास कांहीं विषय प्रिय वाटतात कांहीं मध्यस्थ वाटतात कांहीं द्वेष्य वाटतात.

द्वैत, न० सं० भेदबुद्धि.

द्वैतवाद, पु० सं० जीव आणि परमात्मा हे वस्तुतः भिन्न असें जें मत तो.

द्वैतवादी, ३ लिं० सं० द्वैतवादाचा अभिमानी जो माध्वादिक तो.

द्वैविध्य, न० सं० द्विविधपणा.

द्व्यामुष्यायण, पु० सं० व्रतबंधोत्तर परगोत्रीं जो दत्तक दिला तो; २, अ० द्वामुष्य.

द्व्याहिक, ३ लिं० सं० मध्यें दोन दिवस आड करून येत असतो जो ज्वर तो.

धक, पु० कों० धग.

धकटी, स्त्री० कों० आगटी.

धकटें, न० कों० आगटें.

धकधक, न० भयानें ऊर उडूं लागतो तदनुकरण; उ० सर्पाचें नाव घेतांच माझे उरांत धकधक होतें, माझा जीव धकधक करतो, ह्म० धकधक होई अशी भयावस्था पावतो.

धकधकणें, उरांत धकधक होणें, किं० ऊरतडिशिष्ट होणें.

धका, पु० ढका; २ कांहींएक पदार्थाचा कांहीं पदार्थावर बळकट जो आघात, जेणेंकरून तो पदार्थ हलका निर्बळ असतां हालतो, किंचलित होतो आणि दृढ असल्यास प्रत्याघात करितो तो; ३, पाणी, वायु, इ० कांचा नेट संभाळणें इत्याद्यर्थ पाषाणादिकांनीं भिंतीसारिखा बांधिला असतो तो, ४, ला० कांहीं एक व्यवहारांत जो अनिष्टपात तो; उ० यंदां पाऊस नपडल्यामुळें पिकास धका बसला.

धकाधक, स्त्री० दगदग.

धकाबुकी, स्त्री० कोणेएकास धके आणि बुक्क्या यांचा जो मार तो.

के, स्त्री० कों० शरीरावयवानें मारिला जो धका तो.

कीबुकी, स्त्री० कों० धकाबुकी.

क्क, न० भय जाल्यामुळें हृदयांत जो एकदांच आंचका बसतो तें, हो, धा० योगीं म०; २, ३ लिं० रा० कोणतेंही संकट प्राप्त जालें असतां जो डगत नाहीं आणि नीचपणा स्वीकारीत नाहीं तो.

धक्का, पु० धका प्रथमार्थांपासून; २, एक यंत्र आहे, जास स्पर्श केला असतां धक्का बसतो.

धक्की, स्त्री० कों० धकी.

धग, पु० कों० अग्नीची आसमंतात् प्रसृत जी उष्णता असती तो; २, शैत्यनिवारणार्थ पेटविला जो अग्नि तो, उ० मी धग घेणार आहें धग पेटीव.

धगटी, स्त्री० आगटी.

धगटें, न० आगटें.

धगड, पु० उपपति; २, नवर्यास प्रसंगीं निंदेनें ह्म०; ३, जो जाचे निर्दलनपराजयादिकांविषयीं समर्थ तो त्याचा, उ० मंडूर हा पंडुरोगाचा धगड आहे.

धगधग, न० धकधक; २, स्त्री० शरीरास मिरची, इ० लागल्यामुळें जी आग उठती ती.

धगधगणें, धकधकणें; २, चूल, शेगडी, इ० बहुत धगानें युक्त होणें; ३, शरीरानें धगधगीत होणें.

धगधगीत, ३ लिं० ज्वरादिकामुळें अतिशयित तापलेलें जें शरीर तो.

धगाटा, पु० रा० मोठा जो धग तो.

धगावणें, रा० कांहींएक पदार्थ अग्नीचा धग लागल्यामुळें होरपळणें.

धज, स्त्री० दे० धजा; २, बोलणें, इ० कांची जीरीत ती.

धजणें, कांहीं काम करण्याविषयीं पुढें होणें; उ० अगो

अगोदर मोठ्या गोष्टी सांगत होते, पण वाघ येतांच पुढें पाऊल टाकायास कोणी धजेना.

धजा, स्त्री० ध्वज.

धजाव, पु० कों० धजाहितीयार्थी.

धजावणें, धजणें.

धट, पु० रवजराचीं कपातें इ० वजन करायाची जी दांडी टांगली असती तो; धटास लावणें ह्र० आपले हातून जालेला जो अपराधादिक तो उडवायाविषयीं आग्रहास प्रवर्तल्यामुळें प्रसिद्ध करून पदरीं घेणें.

धटिंगण, ३लिं० वा० धटिंगण.

धटिंगण, ३लिं० शरीरानें बळकट मोठा असून जास दुसर्‍याची भीड मर्यादा नाहीं तो.

धटी, स्त्री० रेशमी स्त्रियांनीं नेसायाचें वस्त्र आहे.

धट्ट, ३लिं० भय आणि विनय जाचे अंगीं नाहीं तो.

धट्टाई, स्त्री० धट्टपणा.

धट्टाकट्टा, धट्टारवट्टा, ३लिं० जाचें शरीर निरोग असून बळकट तो.

धट्टी, स्त्री० धटी.

धड, न० मान तुटोन अवशिष्ट राहिलें जें शरीर तें; २, ३लिं० फुटकें नव्हे जें पात्र, किं० फाटकें नव्हे जें वस्त्र, पत्र, इ० तो; ह्र० एक धड न आणि भाराभर चिंध्या; ३, अ० पुरतेपणीं यथास्थित जसें असावें तसें; उ० हा मशीं धड सांगत नाहीं, तुम्हीं विचारून घ्या, हा धड लिहीत नाहीं आणि धड पढतही नाहीं, या अर्थी प्रायः निषेधार्थी

धार्थी प्र०, धडांतला भाकड़ांत, ह्र० प्रधानकोटींत नव्हे आणि त्याज्यकोटींतही नव्हे असा अर्थ, धडे गांडीनें, ह्र० अप्रतिष्ठा, किं० मूलद्रव्याचा व्यय नहोतां, ४, स्त्री० वा० जोतें इ० कांचा जो कांठतो; दे० पदार्थांचा डावें, उजवें, इ० शब्दविषय दिग्भेदैक रूप जो प्रदेश तो.

धडक, स्त्री० धडक; २, अ० भय, शंका, दैव, इ० कानीं मध्यें मध्यें प्रवृत्तीचा संकोच, किं० विराम नपडतां, जा, ये, मर, इ० वि०, उ० तो चोर धडक घरांत शिरला, महामारीनें धडक माणसें मरतात, हा मार्ग धडक काशीस जातो, ह्र० मध्यें डावी उजवी वाट विचारायाचें प्रयोजन लागत नाहीं असा भाव.

धडकणें, अग्नि प्रज्वलित होऊन वृद्धिंगत होणें, काम, क्रोध, यांविषयींही प्र० होतो; धूल, रोगडी, इ० धडकणें, ह्र० तप्त अग्नीनें धडकणें; २, हृदयानें धडकीनें युक्त होणें, किं० हृदयांत धडकी भरणें; उ० वाघाचा शब्द ऐकतांच माझें उरांत धडकलें.

धड,-,कन,-कर,-दिशीं, अ० अकस्मात् पडण्याचें वि०; उ० माडीवरून धडकन पोर रस्तीं पडलें.

धडकफडक, ३लिं० जाचे भाषणामध्यें, किं० उद्योगामध्यें कपट, किं० युक्ति नाहीं तो, किं० तें भाषणादि तो.

धडका, अ० धडकाहितीयार्थी.

धडकाधडकी, स्त्री० परस्परांनीं एकमेकाची भीड मर्यादा सोडून आवेशानें जी वाद ती.

धडकावणें, भय संदेहादि न धरितां उत्तर, प्रत्युत्तर, श्लोकादि, सभादिकांचा ठायीं उच्चारणें.

धडकी. स्त्री० भयादिकानें हृदयांत धक्का बसल्यासारिखी जी विकृति होती ती.

धडगत. स्त्री० चांगला परिणाम होईल असें दिसायाजोगी जी दशा ती; उ० हा पोर एक्कांपासून भांडूं लागला याची कांहीं धडगत दिसत नाहीं.

धडगती, स्त्री० धडगत.

धडडड, अ० तोफ, इ० कांचा शब्दाचें अनुकरण.

धडधड, अ० माडी, इ० कांवरून धांवत चालले असतां जो शब्द होती त्याचें अनु०; २, न० भयादिकानें हृदय उडूं लागलें ह्म० शब्द होतोसा वाटतोतें.

धडधडणें, ऊर धडकीनें युक्त होणें, कि० इक्षादिक पतन पावनेवेळेस तादृश वाजणें.

धडधडी, स्त्री० धडकी.

धडधडीत, वि० अन्यथात्व, कि० गोणता, यांची संभावनाही न भासे असें; उ० हा धडधडीत चोर तुम्ही चाकरीस कशास ठेविता; धडधडीत मी रुपये दिले असतां नाहीं म्हणतो; धडधडीत रुपये देऊन असा माल कशाला घ्यावा.

धडधाकड, वि० फाटकें तुटकें नव्हे जें वस्त्रादि, कि० पट्टाकट्टा जो मनुष्यादि तो.

धडधोप, वि० धडधाकड वस्त्रादि तो.

धडपड, धडफड, स्त्री० कांहीं एक उद्योग करनेवेळेस क्रोधामुळें, कि० आडाणीपणामुळें, इकडचें तिकडे, तिकडचें इकडे, असा जो आदळ आपट इ० रूप व्यापार होतो तो.

धडपडणें, आपले शरीराचे धक्के भित्त्यादिकांस बसत, आणि त्यांचे धक्के आपल्यास बसत, असें क्रोधादिकामुळें फिरणें, लोळणें, इ० करणें.

धडफडणें, धडपडणें.

धडबड, स्त्री० धडपड.

धडबडणें, धडपडणें.

धडल्याव, वि० वा० धडेल.

धडवती, स्त्री० नित्य नेसणें, इत्याद्युद्देशानें घेतलेलीं जीं पोत्रें, लुगडीं, इ० वस्त्रें तीं, कि० विवक्षितकालावधि, नित्योपभोग्य वस्त्रांची जी पर्याप्ति ती; उ० शंभर रुपयांची धडवती घेतली; दोन पोत्रजोडे असले म्हणजे माझी वर्षाची धडवती होती; २, मकरसंक्रांतीस स्त्रिया सुवासिनीस वर्षपर्यंत पुरायाजोगीं वस्त्रें देत असतात ती.

धडसा, वि० बलवैकल्यादिविकाररहित; उ० याचा एक हात धडसा आहे आणि एक रुळका आहे.

धडा, पुं० एका दिवसांत पाठ होत इतकीं अक्षरें, कि० अंक पंतोजी मुलांस लिहून देत असतो तो; २, ला० कोणेक व्यवहाराविषयीं आपण आधरून दारवविल्यामुळें, कि० याप्रकारें करावें असें सांगितल्यामुळें दुसऱ्यास लागती जी रीति तिला ह्म०; उ० यजमान धडा घालून देतो त्याप्रकारें गुमास्ते वर्ततात; ३, दाहा शेर रूप जें वजन तो; ४, आभंड; ५, मण, दोनमण, एकदांच वजन करायाचें असतां दगड, इ० कानीं मोठे बांधितात जें वजन तो; ६, मनाचा

नाचा निश्चय; उ० तूं गेलास तर तुझें काम होईल असा माझें मनाचा धडा आहे; २, कांहीं एक वस्तु एकवार संपादिलें असतां तद्विषयीं पुनः विवक्षितकालावधि जी निश्चिंतता होती तो; उ० एक पितांबर घेऊन ठेविला म्हणजे बारा वर्षांचा धडा होती;

धडाका, पु० तडाका, प्रहाररूप अर्थावांचून; २, तोफ इ० कांचे ध्वनीमध्यें धक्का बसायाजोगा शक्तिविशेष असतो तो.

धडारवडा, ३लिं० धडाकडा.

धडाड, पु० तोफा, किं० दृक्षादिपात, इ० संबंधि शब्दांचा जो अतिशय तो.

धडाडणें, तोफ, बंदूक, इ० कानीं किं० पतन पावणारे दृक्षादिकानीं मोठ्यानीं वाजणें; २, भूमि तापल्यामुळें भेगलणें; ३, अग्नीनें धडकणें; ४, ऊर धडधडणें.

धडाधड, अ० एकाचे पाठीमागून लागलेंच दुसरें, त्या मागून तिसरें, चवथें, अशा प्रकारानें, मारणें, तोडणें, देणें, इ० सातिशय क्रियांचें वि०; उ० त्याचे तोंडावर धडाधड शेंभर चपराका चढविल्या.

धडाधडी, स्त्री० तोफा, सोटे, इ० कांचा अतिशयित ध्वनिपूर्वक जो युद्धादि व्यापार तो.

धंडाळी, स्त्री० दे० धांडाळी.

धडी, स्त्री० वस्त्रादिकाचा मधले भागापेक्षां कांहीं जाडा किं० रेशिमादिकांचा विजातीय दिसायाजोगा घातलेला जो कांठ तो; २, धडा चतुर्थांश; ३, मण इ० प्रमाणाचा दगड इ० करून ठेविला असतो तो.

धडी

धडीपगडी, स्त्री० सभादिकांत जावयाचें असतां जी पुरुषास शोला, पागोटें, इ० वस्त्रें लागतात तीं.

धडूती, स्त्री० धडवती.

धडेल, ३लिं० विशोभित दिसायाजोगें भारी मोटें जाचें शरीर तो.

धडोती, स्त्री० धडवती.

धण, स्त्री० कों० एकाचा तोटा, नाश, किं० प्रयत्न विफल होऊन दुसऱ्यास अनायासें यथेष्ट धनादिकाचा लाभ होऊन होत्ये जी त्याची भरती तो; उ० तो रागानें पान टाकून उठला म्हणून मांजराची धण जाली; जाणें पैसा मिळविला तो मेला म्हणून भावाची धण जाली.

धणकट, ३लिं० जाडें मोट सुती जें वस्त्र तो.

धणधोप, ३लिं० धणकट.

धणा, पु० कोथिंबिरीचें बीं.

धणी, पु० धनी.

धणीवरी, अ० यं० धनवर.

धतुरा, धत्तुरा, पु० दारविणें यांचा योगी प्र०; दुसऱ्याचें द्रव्यादि घेऊन दिवाळें काढणें, किं० पकून जाणें, इ० प्रकारें कोणेकास ठकविणें.

धत्तूर, पु० सं० एक वनस्पति आहे.

धंदा, पु० सुभा, मामला, इत्याधधिकारप्रयुक्त जी उद्योग किं० साधारण उद्योग तो.

धंदारोजगार, पु० लहान मोठा मामला इ० रोजगार तो.

धंदेवाईक, ३लिं० सुभा मामला इ० आहे जास तो.

धन, न० सं० रुपया. होन, किं० सोनें, रुपें, इ० रूप

जो

जो अर्थ तें; २, जें विकलें असतां धनादि येतें असें धान्यादिक कि० जाचे योगानें प्रसंगीं धन मिळतें असें विद्याकलादि त्यास आरोपानें ल०; ३, नवमराशिवाचक धनुःशब्दाचा अपभ्रंश तैं; ४, गणितप्रकरणीं प्रकृतराशीस संयुक्त करायास योग्य जें भागादि फल येतें तें; ५, स्त्री० धण; धन लागणें ल० दारिद्र्य विच्छेदादि मोठा कांहींएक उत्कर्ष होणें, विपरीतलक्षणेनें कांहींएक व्हायाचें नाहीं अशा अर्थीं. वक्तृतात्पर्य असतांच प्र० होतो, उ० पंचवीस वर्षें जालीं आतां पुढें विद्या करून धन लाभाल हें समजत आहे, धन पुरणें ल० कांहींएक पदार्थ धनवर उपभोगिल्यामुळें आशा पूर्ण होणें.

धनकट, ३लिं० धणकट.

धनकुंबी, स्त्री० रा० रवडे माराया चें धनुष्य तीं.

धनकुली, स्त्री० वा० धनकुंबी.

धनको, ३लिं० उत्तमर्ण.

धनकोनाम, ३लिं० उत्तमर्ण.

धनकोरिणको, न० लेखपूर्वक परस्परांचा कर्ज देणें, घेणें, एतद्रूप चाललेला जो व्यवहार तें; मी तुझें धनकोरिणको लागत नाहीं इ० स्थलीं मी तुझा अधमर्ण नव्हें.

धनगर, पुं० शूद्रामध्यें एक जाति आहे.

धनगरी, ३लिं० धनगरसंबंधि म्हेस, कांबळा, इ० तो.

धनतेरस, स्त्री० आश्विन शु० १३.

धनत्तर, ३लिं० दे० प्रशस्तपणें मोठा जो वाडा, पर्वत, वृक्ष, इ० तो.

धनदौलत, स्त्री० पैका, आडका, हत्ती, घोडे, इ० नें सर्वस्व तीं.

धनवही, ३लिं० धनवड ह्मणून गांव आहे तत्संबंधीक स्त्रादि तो.

धनवंत, ३लिं० बहुत आहे धन जापाशीं तो.

धनवर, अ० दे० यथेच्छ तृप्ति होई तोंपर्यंत, खाणें, पिणें, इ० कांचें वि०; उ० त्या सभाग्याचे घरीं म्या धनवर लाडू खाल्ले.

धनवान्, ३लिं० सं० धनवंत.

धनाढ्य, ३लिं० सं० धनवान्.

धनिक, ३लिं० सं० धनवान्.

धनिष्ठा, स्त्री० सं० तेविसावें नक्षत्र.

धनिष्ठापंचक, न० सं० धनिष्ठेपासून जीं रेवत्यंत पांच नक्षत्रें तें.

धनी, पुं० सं० जो पदार्थ जाचे स्वतंत असतो त्या पदार्थाचा तो कि० जो मनुष्य जाचा चाकर त्याचा तो; २, जा गोष्टीचें घरें वाईट जालें असतां निर्वाह करण्याचा भार जाजवर असतो कि० जो गोष्ट करण्याविषयीं जो अधिकारी त्या गोष्टीचा तो; उ० उगवणीस धनी तुह्मीं राहाल तर म्हाला रुपये देतों, तुह्मीं बोलायाचेमात्र धनी हातानें कांहीं ह्मणायाचें नाहीं, ब्राह्मण यज्ञोपवीताचा धनी इ० स्थलींही यज्ञोपवीत धारण करण्याविषयीं ब्राह्मण अधिकारी असाच अर्थ.

धनु, न० सं० तीर माराया चें साधन जें शृंगादिकांचें करितात तें; २ मेषापासून नवम जो राशि त्यास ह्म०.

धनुकली, स्त्री० कों० धनकुंची.

धनुःफल, न॰सं॰ इत्त परिधीचे विवक्षित खंडाची अंशात्मक जी संख्या गणितानें येते तें.

धनुर्धर, १लिं॰सं॰ धनुष्य धारण केलें आहे जाणें तो; २, ला॰ जा विद्यादिविषयामध्यें जो पुरता त्यामध्यें.

धनुर्मास, पु॰सं॰ धनराशीस सूर्य असतां सकाळीं धनुर्लग्न आहे तोंपर्यंत देवनैवेद्यादिपूर्वक भोजन करितात तो.

धनुर्वात, पु॰सं॰ एक वातरूप रोग आहे, जेणेंकरून शरीर धनुष्याकार वक्र होतें तो.

धनुर्विद्या, स्त्री॰सं॰ धनुष्य धरावें कसें, बाण मारावा कसा, इ॰ समजण्याची जी विद्या ती.

धनुष्य, न॰ धनु; २, तदाकार शरदादिकालीं जें मेघावर सूर्यकिरणांनीं चिह्न पडतें किं॰ मुरवांत पाणीं घेऊन सूर्यकिरणांत फूत्कार केला असतां तत्सदृशाकार दिसतो तें.

धन्य, १लिं॰सं॰ पुण्यवान्; २, कृतकृत्यता पावला जो तो. प्रायः विधीवरच अन्वय दिसतो; ३, १ स्त्री॰ कोणेकाची पराक्रमादिकावरून अनेकांनीं वारवाणायाजोगी जी योग्यता भासती ती.

धन्वंतरि, पु॰सं॰ समुद्रमथनापासून चवदा रत्नें निघालीं त्यांतील एक वैद्य आहे; २, ला॰दे॰ वैद्यांचा औषधें बाळगायाचा बटवा असतो त्यास ह्न॰.

धपका, पु॰ तळहाताचा किं॰ तरवार, सोटा, इ॰ कांचा जो कांहीं एकावर प्रहार तो; २, भयानें उरांत धडकी भरती तो.

धपकावणें, तरवार इ॰ कांचा धपक्यानें तोडणें; उ॰ वाटेस चोरानीं धपकावलें आणि पैका नेला.

धपला, पु॰ धलपा.

धपली, स्त्री॰ धलपी.

धपाटा, पु॰ बलानें तळहाताचा जो प्रहार तो.

धपाटें, न॰दे॰ भाजणीची भाकर तें.

धपाधप, अ॰ अंबे, फणस, इ॰ पतनार्थें वि॰; उ॰ या अंब्याचे, वार्यानें अंबे धपाधप पडूं लागले.

धबका, पु॰ धपका.

धबकावणें, धपकावणें.

धबदूल, १लिं॰ वा॰ गबदूल.

धबधबा, पु॰ मोठा जो पाण्याचा झोत.

धबधबाँ, अ॰ पाण्याचा धोधा, नारळ, इ॰ कांचे पडण्यार्थें वि॰.

धबधबी, स्त्री॰ धोधा.

धबधबीत, १लिं॰ रा॰ पुष्ट शरीराचे गौरत्वातिशयार्थें द्योतक वि॰.

धबाधब, अ॰ धपाधप.

धबाधबी, स्त्री॰ अनेकांस अनेकांनीं तलहात, बुक्क्या, इ॰ मारण्याचा व्यापार ती.

धबुल, स्त्री॰ धपाटा; २, १लिं॰ धष्टपुष्ट.

धब्बें, न॰ रा॰ अत्यंत परिपक्व जालेला मोठा जो अंबा त्यास ह्न॰.

धमक, स्त्री॰ अमुक काम मी करीन असा जो स्वसामर्थ्याचा मनांत निश्चय असतो ती; उ॰ मी एका दमानें ही घाटी चढून जाईन अशी धमक बाळगली होती पण मधींच थकलों; २, उसण; ३, पोट इ॰ कांत जी बारीक कळ निघती ती; ४, १लिं॰ पीतत्वाचें अतिशयद्योतक वि॰; माझे

अंगांत आतां धमक राहिली नाहीं इ० प्रयोगीं केवल सामर्थ्य नाहीं असा अर्थ.

धमकट, ३लिं० शरीरानें बळकट जो मनुष्यादि तो.

धमकणें, वायुविकृतीनें शरीरांतील शीरव्यथा होई अशी उडणें; २. रा० कोणेकास धमक्यानीं मारणें.

धमका, पु० धपाटा; २, दे० ज्वरादिकांची अतिशयित जी धमकी ती.

धमकावणी, स्त्री० दबकावणी.

धमकावणें, दटावणें.

धमकी, स्त्री० विशेषणार्थीवांचून जी धमक ती; २, ज्वरादिकाचा अंगांत संचार जाल्यामुळें सर्व अंग मोडलें असें बाटायाजोगी जी विकृति होती ती.

धमधम, अ० नगारा, इ० चर्मवाद्याचे वाजण्याचें वि०.

धमधमणें, फुगलेलें पोट, किं० नगारा, इ० कानें धमधम्म वाजणें.

धमधमा, पु० दे० कारंजें, इ० कांचा जो होदतो.

धमाटा, पु० धपाटा; २, वा० गुसरवी लोक आपले हातावर गोवरी, किं० लशाची लेंडी यांचे चिखलानें डाग घेत असतात तो.

धमार, पु० गायनांत एक ताल आहे.

धमासा, पु० एक औषधी आहे.

धर, पु० भाषण, किं० मलमूत्रविसर्ग, याचा प्रसंग आला असतांही तें तें कांहीं एक काल आटपून धरण्याविषयीं तत्तद्विद्रियाचेठायीं जी शक्ति विशेष असते ती; २, भाषणादिव्यवहारीं एकवार केला जो नियम, किं० धरला जो संप्रदाय, त्यास अन्यथा होऊं न देण्याविषयीं जी स्थिरता ती; उ० याचे भाषणास धर नाहीं आतां एक बोलेल मग एक बोलेल; त्या राज्यामध्यें अमुक अपराधास अमुक पारिपत्य करावें हा कांहीं धर राहिला नाहीं; ३, धारणाशक्ति; धर सुटणें स्व० धैर्य सुटणें, उ० मोठे मोठे सर्दार पळूं लागले तेव्हां माझा धर सुटला; ४, ३लिं० धारणकर्ता. याचा प्रयोग संस्कृतसमासीं; उ० विद्येचा धारणकर्ता तो विद्याधर, महीचा धारणकर्ता तो महीधर इ०.

धरण, न० पाणी फुगून पाट. इ० कांत चढावाकरितां नद्यादिकांस जो बांध घालितात तें; २, चोवीस गुंजाप्रमाण जें वजन तें; ३, वा० नऊ आणे; ४, गर्भिणीचा गर्भपात नव्हावा म्हणून तिचे गळ्यांत औषधिविशेषाची मुळी बांधीत असतात तें, बांधणें या धातूचे योगींच प्रायः प्र०.

धरणकरी, पु० अधमर्णाचा किं० देण्याचे हारीं द्रव्य उगवावें म्हणून किं० दृष्टसाधनार्थ उपोषण करीत बसतो तो.

धरणखोंब, पु० भूमीपासून आड्यापर्यंत जे खांबदिले असतात तो.

धरणगोंवी, ३लिं० धरणगांवसंबंधी दोरवा इ० वस्त्र तो.

धरणमूळ, न० कों० वृक्षाचें मूल जें धरणींत अधिक असतें तें.

धरणी, स्त्री० पृथ्वी; २, धरती; ३, अपराध्यादिकांस

कांस बलात्कारें धरून आणाया करितां मनुष्य समुदायादिकांच्या जो प्रयोग ती; एतादृश शब्दांचा तात्पर्यार्थ मनुष्य समुदाय ही अर्थ होतो; धरणी-वी मुलगी, धरणीनें लग्न, इ० स्थलीं लग्न करण्याविषयीं बलात्कारानें धरून आणलेली मुलगी किंवा तिनें लग्न.

धरणीकंप, पु० भूकंप.

धरणें, सृष्टि इ० धातुसाधितकर्मानें कांहीं एक पदार्थ गर्व सूचनेंसही असा करणें; उ० मीं हातीं काठी धरून उभा राहतों; पायें बसण्यानें उडतील म्हणून पायांखालीं धरलीं आहेत; २, ला० कांहीं एक पदार्थ किंवा गोष्ट लक्ष्य विषय करणें; उ० तूं मनांत जो अंक धरशील तो मीं सांगतों; ३, ऐकलेला श्लोकादिक अंतःकरणानें घेणें किंवा घेतलेला नविसरतां राखणें; या अर्थीं अकर्मकही प्रयोग होतो; उ० यानें एकवार श्लोक म्हणतांच त्यानें धरला; मला पाठ होतें पण धरत नाहीं; ४, कांहीं एक उपयोगादि नियमानें करूं लागणें; उ० यानें सांप्रत स्नान धरलें आहे; यानें शिक्षा व्हावयाचें धरलें आहे; कांहीं एक समुदायादिकांमध्यें कोणेकास धरणें म्हणजे गणणें; ५, कोणेकास कांहीं एक उपयोगाचा यायीं गुंतला जाई असा व्यापृत करणें; उ० हा बैल राहाटाखालीं धरा म्हणजे चांगला होईल; ६, कोणत्या तरी संयुक्त जालेला पदार्थ वियुक्त न होतां सहन करणें; उ० या भिंतीस गच्ची लावा धरत नाहीं, एथें भिंतीस कर्तृत्व मानिलें असतां सकर्मक प्रयोग ही होईल असें दिसतें; ७, वातादि रोगामुळें शरीरावयव तत्तत्क्रियाव्यापारविषयीं हालेना चालेना सा होणें; उ० माझे उजवे हात पाय धरले

रलात; ८, वृक्षानें फलयुक्त होणें; उ० समुद्रतीरचे माड बहुत धरलात; ९, कोणेकास भाषणादिकांमध्यें पूर्वापर विरोधादि संकटांत पाडून कुंठित करणें; उ० त्यालामी दोहों शब्दांत धरीन; १०, कांहीं एक गुणादिक गणनीय बुध्यमानणें; उ० हा शिव्या देतो हें तुम्हीं धरूं नका; ११, मनुष्य, पश्वादिकांनीं कोणेएक सांतीचे उपद्रवानीं व्यापलें जाणें; कोणेकपदार्थ, किंवा गोष्ट, धरणें स० त्या त्या पदार्थादिकांचे निग्रहपूर्वक उच्छेदन पडणें; स्थल धरणें इ० स्थलीं अधिष्ठित करणें असा अर्थ आणावा; समास, लांबी, रुंदी, इ० धरणें स० समासादिक जितकें तितकें सही असें लेखन तक्षणादि क्रियेनें करणें; उ० याफडीची चारबोटें रुंदी धर; पंगत, शेज, इ० धरणें स० पंक्तीनें उपवेशनादि करणें; खरा, उशीर, इ० धरणें स० तत्तत्पूर्वक तेतें कार्य करणें; जमा धरणें स० जमेचे प्रकरणीं लिहून देणें; जोर, नागर, मोट, इ० धरणें स० तत्साध्य जे कर्षणादि व्यापार त्यांचा यायीं व्यापृत करणें; जीव, बल, जोम, इ० धरणें स० दुर्बलावस्थेतें सोडून सबल अवस्था पावणें; वांकडें, उजू, तिरपें, आटपतें, इ० धरणें स० तेतें कार्य तत्तत्प्रकारानें विशिष्ट होई असें करणें; मुहूर्त, दिवस, इ० धरणें स० तत्तत्कार्याविषयीं नियमित करणें; आग्रह, पक्ष, क्रोध, लाज, भय, इ० धणें स० स्विकारणें; चोरी इ० धरणें स० यायीं पाडणें असा अर्थ; सूर धरणें स० विणा इ० दिकांचा सुरास आपलेकंठाचा सूर भिडविणें किंवा दुसरा यातो त्याचा मागून स्वर पूर्ण करणें; ताल धरणें स० गीताचा तालानुरूप डोकें देणें; मार्ग, घाट,

दार

दार, इ॰ धरणें स॰ जाण्यापेण्यास प्रतिबंध होई असें अधिष्ठित करून राहणें; प्रकृतविषयांतें सोडून विषयांतराकडे लागणें कि॰ अधिष्ठित स्थल सोडून चालतें होणें; हे दोन अर्थ दार शब्दाकडे लागत नाहींत; उ॰ त्या कज्यांत तुह्मीं बोलूंनका आपला मार्ग धरा; उ॰ घरींरोगवयास निमित्तांच सर्वांनीं वाटा धरल्या; भूक, तान, धरणें स॰ अन्नादिमाहात्म्यामुळें कांहीं कालपर्यंत न लागे अशी होणें; ओढ धरणें स॰ ओलन उडावी म्हणून ओलेपणीं चभुईनांगरून देणें; याद, नावनिशी, धरणें स॰ लिहिणें; पोट धरणें स॰ हगवणीचा उपद्रव शांत होणें; रेघ धरणें स॰ भालप्रदेशींचे केश सुरेख दिसन असे चिमटयानें उपटून टाकणें; चिमटा धरणें याचाही अर्थ हाच जाणावा; धरून बसणें स॰ आग्रहपूर्वक पक्षादिविषय स्वीकारून राहणें; उ॰ तो पंचवीस रुपये धरून बसला आहे अधिक उणें कांहींच बोलत नाहीं; कांहीं एक पदार्थ दुसऱ्यानें दिलेला हस्तादिकावर घेणें; उ॰ तुला शाली पाहिजे तर धरमी देतों, याचा प्रयोग विशिष्ट स्त्री द्वितीय पुरुषीं मात्र होतो; १२, न॰ धरणी तृतीयार्थी; १३, न॰ अधमर्णापासून आपुलें द्रव्य उगवावें म्हणून उत्तमर्णत्याचे घरीं अन्नोदकाचा प्रतिबंध करून उपोषण करितो तें कि॰ कोणी इष्टसाधनार्थ देवद्वारीं निग्रहपूर्वक उपोषण करितो कि॰ एकदिवस उपवास करावा एकदिवस जेवावें असें चातुर्मास्यादिकांत व्रतकरितअसतां तत्तत्संबंधी जो उपवास तें.

धरणेंपारणें, न॰ एकदिवसजेवावें एकदिवसउपवास करावा असें एक व्रत आहे; २, ला॰ दारिद्र्यादिकांमुळें कधीं अन्नमिळावें कधीं न मिळावें असा प्रकार चालला असतो त्याला म्ह॰.

धरती, स्त्री॰ कार्यमात्राचा साधीं इतरभेदक जो प्रकारविशेष असतो ती; २, अनेक कर्त्यांचे अंगीं अनेकप्रकारचा कार्यकरण्याचा जातिशक्तिविशेष त्याप्र॰; ३, धरित्री शब्दाचा अपभ्रंश केवल प्राकृतजन म्ह॰.

धरबंद, धरबंध, पु॰ अमुक रीतीनें अमुक गोष्टीची अन्यथा होऊं नये असा प्रमाणपूर्वक जो एक नियम असतो तो; उ॰ कसें लिहावें तो मला एक धरबंध करून द्या सनरावेळा सनरा प्रकार सांगूं नका; २, धरप्रयमार्थी.

धरबाँध, स्त्री॰ कोणे कास राजभृत्यादिकानीं धरणें बांधणें, इ॰ जो व्यापार ती; २, दे॰ पिशाचादिकांस कुरीवर बसविण्याचा जो प्रकार ती.

धरमधक्का, पु॰ कार्यनहोतां व्यर्थ जे कांहीं येरझारा इ॰ परिश्रम प्राप्त होतात तो.

धरसोड, स्त्री॰ वा॰ कांहीं एक भाषणाविषयीं हें प्रमाण असें निश्चयपूर्वक मानण्याची जी योग्यता ती; उ॰ तूं बोलतोस परंतु तुझा मागील आचरणावरून तुझ्या बोलण्यांत धरसोड दिसत नाहीं; निषेधार्थी प्र॰; २, कोणएकगोष्ट कदाचित् धरावी कदाचित् सोडावी असा जो व्यापार ती.

धरा, स्त्री॰ सं॰ पृथ्वी.

धराधर, स्त्री॰ एकसमयावच्छेदेंकरून अनेकांस बलात्कारानें कांहीं एक कामकरविणें इत्यादि अर्थी राजभृत्यादिकांनीं धरण्याचा जो व्यापार ती.

धरित्री, स्त्री० सं० पृथ्वी.

धरूनसोडून, अ० कोणेक अर्थाचा पुरतेपणीं त्याग किं० स्वीकार याचा निश्चय श्रोत्यांस नसमजे असें बोलणें इ० कोंवें वि०; उ० यंदां लग्न करतों किं० न करतों हा एकही निश्चय सांगून का; धरून सोडून बोलत जा स्ल० प्रसंगानुरूप करतां येईल.

धर्म, पु० सं० शास्त्रानें जाणें जाणें जेंजें कर्म करावें म्हणून सांगितलें आहे त्या त्या मनुष्यास तें तें कर्म तो किं० तदनुष्ठानें करून जें पुण्य उत्पन्न होतें तो; उ० पितरांचे आर्जेंत चालावें हा पुत्राचा धर्म होय; स्त्रियांस पतिसेवेनें जो धर्म होतो तो इतर क्रियेनें होणार नाहीं; २, शिष्टपरंपरेनें तत्तद्देशीं किं० तत्तत्कुलाद्यनुरोधानें चालत आलेला जो संप्रदाय तो; ३, पदार्थावर विशेषणत्वेंकरून भासमान गुण, जाति, अखंडोपाधि एतद्रूपकांहीं असतो जो त्व, ता, या संस्कृत प्रत्ययांचा किं० पण, पणा, या प्राकृत प्रत्ययांचा तो अर्थ होतो; ४, प्राणिमात्रास त्यापासून प्रतिदान किं० प्रत्युपकार न इच्छितां अन्न, उदक, द्रव्य, वस्त्र, इ० कांवें यथायोग्य जें दान तो; धर्मजागो स्ल० कोणेक गोष्टी विषयीं जो बहू न कंटाळला तो उद्गारानें हें वाक्य बोलतो; त्या गोष्टीचा आतां संबंध सर्वथा न को असें होण्याविषयीं पुण्य उभें राहो असें तात्पर्य; धर्मार्थ, स्ल० मौल्य, प्रत्युपकार, इ० न इच्छितां देणें, सेवादि करणें, इ० कोंवें वि०; धर्मास, स्ल० -यायतः कोणेक गोष्टी विषयीं कांहीं एक आग्रह जानें धरावा तो दुसऱ्याचा दुराग्रह पाहून कंटाळला स्लणजे हा उद्गार बोलतो; उ० मासेरुपये तूं देतोंस को पण तूं एथून धर्मास जा; उ० मी

मी काम करतों तूं धर्मास नीज; धर्मास येणें स्ल० उचित नसणें; उ० मी तुला सांगावयाचें तें सांगीतलें आतां तुसे धर्मास येईल तें कर; स्ल० धर्मा आड कुतरें; धर्मावर सोमवार; धर्मा वेगायी आणि दांत कोंगे नाहीं; धर्म करतां कर्म पाठीस लागतें; आजमरा आणि उद्यां धर्म करा; धर्माचा कोटा, स्ल० मोठे शहरामध्यें रूवर्णादि बजन करावयाकरितां खराताजवा करून ठेविला असतो त्या कोटयानें जो बजन करून घेईल त्यानें कांहीं द्रव्य द्यावें आणि त्या द्रव्याचा धर्मार्थ व्यय करावा असा संकेत केला असतो तो.

धर्मकार्य, न० धर्मार्थ वाट बांधणें किं० वाटेवर विहीर बांधणें इ० जें कार्य तें

धर्मकृत्य, न० धर्मकार्य.

धर्मखुंटीस, अ० बांधणें या चा योगी प्र० महिष्यादि पशूंस तृण न घालतां ठाणावर बांधून ठेवणें.

धर्मनाव, स्त्री० धर्मार्थ येणारानीं जाणारानीं उतरावें म्हणून नावाडयास वेतन देऊन नदीवर जी नाव ठेविली असती ती.

धर्मनौका, स्त्री० धर्मनाव.

धर्मन्याय, पु० विप्रतिपन्न गोष्टीचा पक्षपात आश्रयिल्यावांचून वास्तविक रीतीनें जो निर्णय तो; उ० तुम्हीं उपभयतांचें वृत्त श्रवण करून धर्मन्याय असेल तो सांगा.

धर्मपत्नी, स्त्री० अग्निहोत्रादि धर्मकर्मविषयीं योग्य म्हणजे विवाहाची जी ब्राह्मणादिकांची स्त्री ती.

धर्मपरायण, अ० धर्मार्थ; २, पक्षपातादि न धरितां धर्मावर लक्ष्य ठेवून करणें, सांगणें, बोलणें, इ० धा० वि०; उ० धर्मपरायण बोलणारे पंच असल्यास धर्म

न्याय होईल.

धर्मपुत्र, पु॰ जाचीउत्तरक्रिया करायास पुत्र नाहीं ह्मणोन तज्जातीय जो कोणीएक त्याचीउत्तरक्रिया करायापुरतेंच पुत्रत्व मानून उत्तरक्रिया करितो तो.

धर्मपुरी, स्त्री॰ तपस्वी, विद्वान्, बहुत ब्राह्मण जा क्षेत्रामध्यें वास करितात त्याक्षेत्रास ह्म॰; २, जा गृहीं आल्यागेल्यापाहुण्याविषयीं यजमानाचा किमपि प्रतिबंध नसतो त्यागृहास ह्म॰.

धर्मपोई, स्त्री॰ दुष्कालांत कि॰ मार्गादिकांचाठायीं अन्न, उदक, घेउन वसून आल्यागेल्याक्षुधार्त्तास धर्मार्थ अन्नउदकांचें दान करितात ती.

धर्मबुद्धि, स्त्री॰ आपल्याहातून धर्मघडावा अधर्म घडूनये अशीजी आस्था ती; उ॰ याचेठायला तुलीगरीबमानून घरींजेवायला घालिलां हीध र्मबुद्धि कामाचीनव्हे.

धर्मराज, पु॰ यम; २, पांचपांडवांमध्यें जो वडील बंधु होता तो; ३, ला॰ आपेमनांत दुसऱ्याविषयीं कांहींकपट नाहीं असाजो सात्विक पुरुष त्यास ह्म॰.

धर्मराज्य, न॰ जा राज्यामध्यें प्रजांस राजापासून कि॰ चोरादिकांपासून किमपि उपसर्ग होतनाहीं त्याराज्यास ह्म॰.

धर्मवाट, स्त्री॰ शत्रू शरण आला असतां त्याला मार्गी उपद्रव आलीं करणार नाहीं अशी बोली करून किल्ला इ॰ स्थल सोडून आवघास जीमो कळीक देतात ती.

धर्मवासना, स्त्री॰ धर्मबुद्धि.

धर्मशाला, धर्मशाळा, स्त्री॰ मार्गादिकांचाठायीं पांथादिकांस उतरायासाठीं धर्मार्थ जें घर बांधून ठेविलें असतें ती.

धर्मशास्त्र, न॰ वर्णाश्रमधर्मांचें प्रतिपादक जें मन्वा दिप्रणीत शास्त्रें.

धर्मशास्त्री, पु॰ धर्मशास्त्र जाणणारा जो तो.

धर्मशिला, धर्मशिळा, स्त्री॰ सती चिनेवर चढ ते समयीं जाशिलेवर पायठेवितो ती.

धर्मसंतति, स्त्री॰ कन्यारूपजी संतति तिला ह्म॰

धर्मसंतान, न॰ धर्मसंतति.

धर्मात्मा, २ लिं॰ निरंतर दानधर्म करित असावें अ शी अंतःकरणवृत्ति जाची तो.

धर्मादाय, पु॰ धर्मार्थ जें दान तो; २, सर्कारांतून प्र तिवर्षी ब्राह्मणादिकांस धर्मार्थ दिलेलें असतें तो; धर्मादाय टाकणें सोडणें इ॰ स्थलीं धर्मार्थ असा अर्थ होतो.

धर्मादायपट्टी, स्त्री॰ कोणीशिष्टादि आला असतां अनेकांनीं मिळून त्यास धर्मादाय करून द्यावा ह्म॰ ठरून जीपट्टी करून देतात ती.

धर्मादाव, पु॰ धर्मादाय.

धर्माधर्मी, अ॰ कांहींएक व्यवहारास अनेकांनीं धर्मार्थ हातबोट लाविल्यामुळें तो व्यवहार चाल णें, सिद्धीस जाणें इ॰ कांचें वि॰; उ॰ लेखकढेवून लिहिलें तर पुस्तक होईल नाहींतर धर्माधर्मी ग्रंथ तडीस जाणार नाहीं.

धर्माधर्मीचा, २ लिं॰ अनेकांनीं हातबोट लावल्या मुळें जोसंपादित पदार्थ कि॰ चालतेला व्यवहा र इ॰ तो.

धर्माधिकरण, न० सं० यामादिकांचा ठायीं धर्मा धर्माचा विचारकरण्याचा अधिकार आहे ;२, राजकीयसंबंधानें यथाशास्त्र अष्टादशव्यवहार मनासआणणें एतद्रूपजो एकव्यवहार असतो तें कि० त्याव्यवहाराचें स्थल तें.

धर्माधिकार, पु० धर्माधिकरण ;२, न्यायाधीश.

धर्माधिकरी, पुं० धर्माधिकरणाचा जो अधिकारी तो.

धर्मासन, न० राजानें कि० न्यायाधीशानें न्याय मनास आणायासाठीं बसण्याचें जें आसन तें.

धर्मी, १लिं० घटत्वादिरूपधर्माचा अश्रयभूतजो घटादिक तो.

धर्मोडा, पु० स्त्रिया ब्राह्मणाचे घरीं धर्मार्थ चैत्रादिमासीं नियमानें नित्य एकघागरपाणी देत असतात असें व्रत आहे तो.

धर्षण, न० कोणेकास स्वशक्तिपातविषय करण्याचा जो व्यापार तें ;२, बलात्कारानें स्त्रीउपभोगण्याचा व्यापार तें.

धर्षिणें, ग्रं० बलात्कारानें स्त्रीला उपभोगिणें.

धलपा, पु० ढलपा.

धलपी, स्त्री० ढलपी.

धवड, पुं० धावड.

धवधवीत, १लिं० गोरत्वाचें अतिशययोतकवि०

धवल, १लिं० सं० पांढरा.

धवा, १लिं० स्वच्छजो पांढरा तो.

धवाफूल, १लिं० वा० धवा.

धवेटी, १लिं० स्वच्छ पांढरीं वस्त्रें जो अंगावर ये

त

त असतो तो.

धशा, १लिं० वृथापुष्ट.

धंशा, पुं० धोशा.

धश्चौट, १लिं० मान अपमान नपाहातां मिळेल तेथें खावें मनस्वी नाचत उडत असावें अशास्वभावाचा जो त्यास ह्म०.

धष्ट, १लिं० धट्टाकट्टा.

धष्टपुष्ट, १लिं० धट्टाकट्टा.

धस, पु० तूर, अंबाडी, इ० लाहानलाहान झाडें कि० खांद्यांचीं अग्रें तोडिलीं असतां शरीर वस्त्रादिकांस लागायाजोगे साहातात जे खुंट कि० तदाकार लागायाजोगें बाहेर पडलेलें खिळ्याचें अग्र इ० तो, उ०, याकुंपणाचा धस लागून योतर फाटलें ;२, कों० दरड; धसावर घालणें ह्म० कोणएकगोष्ट युक्तियुक्तीनें केलीअसतां होवयाची तें सोडून साहसादिउपाय योजणें धसावरधसघालणें ह्मणजे दुसऱ्यास छळण्याविषयीं अपकारावरअपकार अपकारावरअपकार असें करणें.

धसकट, न० लाहानसाजो धस तें; द्वितीयार्थी वांचून.

धसकटया, १लिं० धसक्या.

धसणें. धस इत्यादिकांसअडकलेलें वस्त्रादिक फाटलें जाईअसें आडाणीपणानें ओढून फाडणें ;२, काढीचेअग्रानें भोंकणें ;३, पदार्थाचा नाशहोईल हें भय मनांत नधरितां बलानें त्या पदार्थास भोंकपाडणें.

धसकनंदन, १लिं० धसकटया.

धसका

धसका. पुं० भयानें हृदयांत धक्का बसतो तो ; २. धबका.

धसकावणें. वांकडातिकडा छेदादिगेलाअसतां पदार्थ नासेल हेंभयनधरितां तोडणें. फाडणें, ओढणें. इ० करणें.

धसक्या, ३लिं० कोणएककामकरण्याची बारीकयुक्ति जाचे अंगीं नाहीं तो.

धसणें, दारींत बळानें घुसणें ; २, पुरलेला खांभादिक धक्का इ० कांचे नेटानें पलीकडे सारणें.

धसफस, कलहाचें पूर्वरूप परस्परांचें जें यत्किंचित् तुटकें भाषण तो.

धसमुसळ्या, १. धसक्या.

धसरड. स्त्री० कों० दरड.

धसाधस, अ० धसकावणें एतद्रूप अनेक कर्मक जातोडणें, फाडणें, इ० क्रिया त्यांचें वि०.

धस्स, न० धक्का पथमार्थी.

धा, अ० सं० संख्यावाचकावरून तितक्या प्रकारानें अशाअर्थी याचाप्रयोग होतो ; उ, द्विधा. त्रिधा, पंचधा, दशधा, इ० जाणावीं.

धाक, पुं० विवक्षित गोष्टीचा परिणाम प्रतिकूल होईल अशा संभावनेनें कोणेकपासून आपल्यास दंडादि प्राप्तहोईल असेंमनांत वागल्यामुळें जें भयहोतें तो.

धाकटा. ३लिं० विवक्षितांहून जो लाहान तो.

धाकला, ३लिं० धाकटा.

धाकुटपण, धाकुटपणा. न०पुं० लाहानपणा

धाकुटा. सं० ३लि० धाकटा.

धांगड, न० रा० छपरीवर घसवायासाठीं केलेल्या दिकांचे पानाची पचावळ करिलान तें ; २, स्त्री० दे० आडाणीअसून दांडगी जी स्त्री तीस ह्म०.

धांगडधिंगा, पुं० नाच लावतां नाहीं अशा नाचण्याचा जो गोंधळ तो ; २, दे० ३लिं० धसकट्या.

धागा, पुं० दोरा पथमार्थी.

धागादोरा, पुं० परस्परांचा व्यवहित जो योनिसंबंधादि संबंध तो.

धाट, न० वा० रानटजो गांव तें.

धाटणी, स्त्री० बोलणें गाणें इ० कांची जी धरती उ० याची पुराण सांगण्याची धाटणी दुसऱ्यास साधत नाहीं.

धाटामोटा, ३लिं० रोगादिरुन रुशल्य जाऊन जो शरीरानें परिपुष्ट आला तो ; २, केवलनाम क नव्हे असें जें अन्न कि० वस्तु तो.

धाटी, स्त्री० धाटणी.

धाड, स्त्री० सर्वस्व नाशकारक जे अग्नि, चोर, शत्रु भ. समुदाय इ० त्यांचा अकस्मात जो कोणेकावर तत्तत्प्रकारेंकरून पात तो. उ०, अग्नीची धाड त्याचेघरावर पडून सर्वस्व जळलें ; उ० चोरानीं त्याचे घरावर धाड घातली ; २. ला० याचक, पाहुणे, इ० कांचे पतनासही ह्म०.

धाडकन्, धाडकर, धाडदिशीं. अ० उंचावरून सशब्द नारळ. मोपळा, इत्यादि मोठा पदार्थ पडण्याचें कि० वृक्षादिक मोडून पडण्याचें कि० तसें वाजण्याचें वि०.

धाडणें. मनुष्य. कागद, निरोप, कि० कांहीं एक पदार्थ. विवक्षितस्थानीं कि० विवक्षित मनुष्यापाशीं आज्ञादि द्वारा जाई असा प्रयत्न करणें.

णें.

धाडस, न० धारिष्ट.

धांडळणें, धुंडाळणें.

धांडाळ, ३लिं० मोठा जाडअसून उंच जो कडबा तो; २, ला० नीरक्कअसून भारी उंच जो मनुष्य तो.

धाडी, पुं०राजेलोक चाललेअसतां त्यांपुढें गायन करित चालतो तो.

धाणें, तृप्तहोणें; २. याचा प्रयोग प्रायः भूतींच होतो.

धात, स्त्री०रेत धातफुटणें म्हणजे रोगविकृती मुळें मूत्रविसर्गादि प्रसंगी आपोआप पडाया जोगी पातळ होणें.

धौंन, स्त्री० कों० धांदोटी.

धौंतळी, स्त्री० कों० धौंत.

धाता, पु० सं० साठसंवत्सरांतील दाहावासंवत्सर तो.

धातु, पु० स्त्री०धात,२; शरीरामध्यें रक्त, मज्जा, वसा, मांस, अस्थि, मेद, आणि रेत, हे सात प्र०; ३, सोनें, रुपें, तांबें, शिसें, इ०प्र०; ४, पारा, गंधक, मनशीळ, अभ्रक, गेरू इ०प्र०; ५, पु० जांपुढें कांहींएक प्रत्यय लाविलाअसतां क्रियेचा बोधहोतो. अशी कर, अस, हो, जेव, बोल, इ० शब्दस्वरूपें तीं प्र०.

धातुरूप, न० धातूपासून जालेलीं जीं कर्तो, करील, इ० क्रियापदें तीं प्र०.

धातुक्षय, पुं० नित्य शरीरांतील धातूंचा क्षयहो तो असा रोग आहे.

धात्री, स्त्री० सं० आँवळी; २. आंवळकटी; ३, दाई.

धाद, स्त्री० धांदोटी.

धादरणें, दे० भयभीत जाल्यामुळें घाबरणें.

धौंदल, स्त्री० चित्तविक्षेपादिकामुळें कांहींएककार्याची जी अव्यवस्था होतीती; उ०. तुमचा गडबडीमुळें माझा लिहिण्याची धांदलजाली; २. क्रमानें सन्निविष्टपदार्थांचा इकडील तिकडे, तिकडील इकडे, असाजो सन्निवेश भंगतो; ३, कांहीं गडबडीमुळें जी चित्ताची व्यग्रता ती; उ०, तुम्हीं एथें गलबाकरून माझी धांदल करून टाकलीत.

धांदल्या, ३लिं० धांदल करण्याचा स्वभाव जाचा तो.

धादांत, पु० शास्त्रमनास अनुकूल असो किंवा न सो असा आपले अनुभवावरूनच जो कोणेएक गोष्टीविषयीं सिद्धांत बांधतअसतो तो; उ०. आम्हास तुमचें वेदांतनकळे परंतु भूतमात्रींदया करावी हें आम्हास धादांतावरून वाटतें भ०दे० धडपडीत.

धादांती. ३लिं० शास्त्रविरोधाचें भय नबाळगतां स्वमतानेंच वागणारा तो.

धादावणें, कांहींएक पदार्थाचे प्राप्त्यर्थ अतिशयित उत्कंठित होणें.

धादूस, ३लिं० यथेच्छ पदार्थ उपभोगिल्यामुळें जो थकलातो.

धौंदोटी, स्त्री० लाबट जी वस्त्राची विधी.

धौंधुळणें, दांडुळणें.

धौंधू, न० कों० ठाणें

धान्य, न० भात, जोंधळा, गहूं, हरभरा इ० तें.

धान्यदेश, पु० जा देशांत बहूत धान्य पिकतें तो देश.

धान्यभिक्षा, स्त्री० धान्य पिकलें म्हणजे त्या त्या समयीं कोणी भिक्षुक गांवोगांव फिरून त्या त्या धान्याची भिक्षा मागतात ती धान्यसंग्रह, धान्यविक्रय, इ० समास जाणावे.

नवतारणें, फारजुनें झालें जें गृहादिक त्याम थोडें बहुत नवें सामान यालून नवें दिसे असें करणें.

नवती, स्त्री० तारुण्य दशा ती; २, वसंत ऋतूमध्यें नागवेलीस नवीं पानें फुटण्याची जी अवस्था ती; उ० नवतीचीं पानें खावयास चांगलीं.

नवथर, अ० विवक्षित संन्निहित भूतकाळीं: उ० मीं एथें नवथर आलों; २, वि० कांहीं एक संन्निहित भूतकोलोसन्न जी गोष्ट, पदार्थ, इ० तो.

नवधान्य, न० जास उत्पन्न होऊन बहुत दिवस झाले नाहींत असें जें धान्य तें; २, रा० त्याचे भक्षणाचा जो प्रथम संस्कार तें; ३, एक भातांत जाति आहे.

नवनवती, स्त्री० तारुण्याची जी आरंभ दशा ती; उ० नवनवती आली रसा.

नवमी, स्त्री० पंधरा तिथींतील नवम जी तिथि ती.

नवरकळा, स्त्री० नवऱ्याचे शरीरावर लग्नामध्यें अभ्यंगइ० कांनीं जो तेजो विशेष येतो ती.

नवरंगी, वि० नऊ आहेत रंग जामध्यें तो पदार्थ.

नवरत्नराजमृगांक, पु० एक रसायन आहे.

नवरत्नें, न० हिरा, पाचू, माणीक, मोतीं, पोंवळीं, इ० नव संख्यांक जीं रत्नें तीं; उ० नवरत्नाची अंगठी.

नवरदेव, पु० लग्नामध्यें स्तुतीनें वरास च म्हणतात.

नवरा, पु० विवाह योग्यता आल्यापासून विवाह होई पर्यंत तो; २, जा स्त्रीचा जो पति तो तिचा: तो आली कडे नवरा झाला आहे स्व० फारच चढला आहे; स० नवरा मरो कीं नवरी मरो दक्षिणेस्तीं करण.

नवरात्र, न० नऊ अहोरात्रांचा जो समुदाय तें, परंतु रूढि चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत तसेंच आश्विनांत होतें तें; २. त्या दिवसांत देवाचा उत्साह करितात तें.

नवरी, स्त्री० विवाह योग्यता आल्यापासून विवाह होई तोपर्यंत जी स्त्री ती; २, जी नवऱ्याची जी बायको ती त्याची परंतु प्रायः नाव्हाण येई तोंपर्यंत व्यवहार.

नवल, न० आश्चर्य; २, सांगायाजोगी, कि० ऐकायाजोगी जी कांहीं नवी गोष्ट तें.

नवलअद्भुत, न० नवल द्वितीयार्थी.

नवलविशेष, न० नवलअद्भुत.

नवलरव, ३लिं० ग्रं० नवलक्ष: उ० आकाशामध्यें नवलख तारे आहेत.

नवलपरी, स्त्री० आश्चर्य प्रकार ती; २, रवणाल्यांत एक प्रकार आहे.

नवलाई, स्त्री० नवल.

नवलाख्या, ३लिं० जाजवल नऊलक्ष रुपये, कि० असंख्यात द्रव्य जाजपाशीं आहे तो.

नवली, स्त्री० उत्तम भक्षणादिक मिळाल्या मुळें, कि० विशेष सुख झाल्या मुळें जी शरीराबर तेजगी येते ती; उ० पाऊस लागतांच शेतांची नवली पालटली.

नवशिका, नवशिरवा, ३लिं० जाजा विद्येविषयीं. कि० जाजा व्यापाराविषयीं नूतन नव प्रवृत्त, कि० शिकणारा तो; २, वा० प्रथम गरोदर झाली जी स्त्री; कि० जें प्रथमतः लागास आलें फणस, इ० झाड.

नवशीक, नवशीरव, ३लिं० नवशिका प्रथमार्थी. २, न० नवम संबंधी जी समागधना इ० तें.

नवस, पु० कांहीं एक कार्य सिद्ध व्हावें म्हणून देवादिकांची प्रार्थना करून त्यास कांहीं एक पदार्थाचा अर्पणा विषयीं, कि० सेवनादि विषयीं प्रतिज्ञा करितात तो; कि० अर्पणविषयत्वें करून उद्दिष्ट जो पदार्थ तो; नवस फळास येणें स० कांहीं एक मनोरथ सिद्धीस जाणें: नवस पुरणें एथें आपलेशा चूचा परस्पर देवादि योगें करून, कि० सामान्य स्व प्रयत्नानें त्याचें अनिष्ट झालें असतां संतोष युक्त होणें.

नवसणें, नवसा विषयीं याचादिक कि० पदार्थ प्रतिज्ञात करणें.

नवसर, ३लिं० नऊ आहेत सर जास असा जो हार. इ० तो.

नवससायास, पु० कांहीं एक कार्यासाठीं जो नवसादिक प्रयत्न तो.

नवसागर, पु० एक क्षार आहे.

नवसाचा, ३लिं० नवसानें प्राप्त झाला तो.

नवसारणें, दे० कांहीं एक सांगितलेली गोष्ट नविसरावी म्हणून पुनः पुनः सांगणें; उ० तुमची गोष्ट तो विसरला असेल तरी नवसारून द्या.

नवसुती, स्त्री० आनवें करायासाठीं एकत्र नऊसुतें करून वळून केला जो दोरा तो.

नवा, ३लिं० जाचे उत्पन्नास बहुत दिवस झाले नाहीं तो; २, जा कार्याविषयीं जो योग्य तो त्या कार्यांत निपुण नाहीं तोंपर्यंत तद्विषयीं तो, आणि त्यास तें कार्यही; उ० याकामांत तो नवा आहे आणि

हें कांमही त्यास नवें आहें; २, जो पदार्थ उपभोगादिकें करून शिथिलावयवक, कि० संमर्दित नव्हे तो; उ० ही शाल जोडी नवी आहे; जाणें जो पदार्थ अभुक्तपूर्व, कि० अदृष्टपूर्व, कि० अश्रुतपूर्व तो त्यास; उ० ही स्त्री अद्यून नवी आहे कोणी भोगिली नाहीं; आज नवें झाड पाहिले; आज याणें नवाच श्लोक रचला; ४, अल्पकाल झाला आहे जास असा जो कारभारी इ० व त्याचा कारभार इ० तो; स० नवें नवें जेवीसवे, नवें नवें निरवटल्या भवतें भवे. नवी विटी नवाडाव, नवा नाचावेळ रचांद्या, नवां दिवशीं नवें पाणी, नवे नवतार बसले गवतार, जुने डोळे आणि नवे तमाशे; नवांदिवशीं नवी विद्या.

नवाट, ३ लिं० नवट.

नवाटकें, न० नवटकें.

नवाठ, ३ लिं० नवट; २, स्त्री० घर इ० कांसाठीं जो काष्ठसमुदाय तोडितात ती.

नवानघशाचा, ३ लिं० जा पोरा करितां बहुत नवसकेले तो; २, ला० जो बहुत यत्नानें मिळाला जो पदार्थ त्यास स्व०.

नवान्नपूर्णिमा, स्त्री० आश्विनी पौर्णिमा, त्या दिवशीं प्रायः नवें अन्न खावयास आरंभ करितात, ती.

नवार, स्त्री० तीन चार बोटें रुंदीचें आणि लांब बहुत असें वस्त्र आहे जाणे पलंग विणितात ती.

नवारणें, रा० पलंग इ० नवारीनें विणणे.

नवाळ, स्त्री० रा० नवीनवाळ.

नवाळी, स्त्री० नेवाळी.

नविनवती, स्त्री० नवनवती.

नवीन

नवीन, ३ लिं० नवा.

नवीनमत, न० नवीन जे पंडित त्यांचें जें मत तें.

नवीनवाळ, स्त्री० प्रतिवर्षी उत्पन्न जे पदार्थ त्यांचे प्रथमतः भक्षणाचा जो व्यापार ती, कि० अपरूपपणें भक्षणीय जे पदार्थ ती; उ० हे पेरू पाठवाचा जोगे नव्हे न परंतु नवी नवाळ सणून पाठवावे.

नवें, न० प्रतिवर्षी उत्पन्न जे धान्यादि पदार्थ त्याचा प्रथम भक्षण संस्कार तें; २, नवान्न पौर्णिमेचा दिवशीं भात इ० कांचीं कणसें आंब्याचे पानांत बांधून, काठी चिरून त्यांत घालून दरवजा इ० कांवर बांधितात तें.

नवेंजुनें, न० राज्यादिकामध्यें कारभारी इ० कांचा अदलाबदलीचा प्रकार तें; २, नवें जुनें परस्पर बदलण्याचा प्रकार तें.

नवेताण्याचा, ३ लिं० जावरचास उत्पन्न होऊन बहुत दिवस झाले नाहीं तो; २, तसें त्याचें सूत तें.

नवोढा, स्त्री० जिला पुरुषप्राप्ति झाली नाहीं अशी जी तरुण स्त्री ती उपभोगाविषयीं.

नव्याचीपुनव, स्त्री० आश्विनी व मार्गशीर्ष पौर्णिमा ती.

नव्यांणव, ३ लिं० ९९.

नव्यांशीं, ३ लिं० ८९.

नव्वद, ३ लिं० ९०.

नव्वा, ३ लिं० नवम.

नव्हे, अ० होय याचा प्रतिपक्षी.

नश्वर, ३ लिं० सं० जाचा अवश्य नाश व्हावयाचा तो; उ० जेवढा दृश्य पदार्थ तेवढा नश्वर.

नष्ट, ३ लिं० सं० दुसऱ्याचा नाश, कि० वाईट करण्याचा स्वभाव जाचा तो; २, जो नाश पावला, कि० हारवला

इ०

द०कारणानीं नाहींसा झाला तो.

नष्टचर्य, न०दुर्दैव.

नष्टोळा, ३लिं०वा०दुष्टस्वभावाचा जो मनुष्य तो.

नस, पु०पोटांतील एक अवयव आहे, जो वायूचा योगानें फुगतो.

नसकोणा, ३लिं०वा०जाचे आंगीं गुण नसून ढेंगणा आणि अशक्त तो.

नसणें, नअसणें.

नसरड, स्त्री०रा०अशक्त असून हट्टी कोडगेंजें पोर ती.

नसराणी, ३लिं०दुसऱ्याम अनेक युक्तीनें फसवून आपला अर्थ साधणारा, किं०दुसऱ्याम न फसणारा असा जो मनुष्यादि त्यास निंदेनें स्म०.

नसरूड, ३लिं०शरीरांत पराक्रम नसून जाला बोलल्या चाल्याची लाज नाहीं अशा तऱ्हेचे गुणाचा जो मनुष्य त्यास निंदेनें स्म०.

नसीब, न०हिं०मनुष्यादिकांचें जें दैव तें.

नसीबवंत, ३लिं०दैववंत.

नसीबवान, ३लिं०दैववान्.

नस्त, न०समुद्रांत गलबत चालण्याविषयीं जी खडकामुळें, किं०खाडीचे संगमामुळें कठीण जी जागा तें.

नस्ता, ३लिं०सेवकाभावासच संबंधकर्तव्य असतां या शब्दाचा प्र०; उ० अरेनस्त्या गुडगुडी भरून आण, रावबसले आहेत; २, कांहीं संबंध नसतां निष्कारण पाठीशीं लागला जो उपद्रव. किं०उपद्रवकारक पदार्थ, व्यापार, द०त्याचें वि०.

नस्य, न०सं० नाकामध्यें जें औषध घालितात. किं०ओ-

ओदितात तें.

नहर, पु०शहर, द०कांत बाहेरचें पाणीं आंत आणाया-साठीं, किं०आंतलें पाणीं बाहेर न्यावयासाठीं भूमींतून दांडा बांधून काढितात तो.

नही, स्त्री०नई.

नळ, पु०नहर; २, नस मथमार्थी; ३, जमीनींतून पाणीं बांधून आणाया साठीं माती, तांबें, द०कांचा फुंकणीचे आकारा सारिखा करितात तो.

नळकंडें, नळकांडें, न०एकबाजू बंद एकाबाजूस भोक अशी जी वेळू, काष्ठ, द०कांचें, किं०धातुमय, लेखणी द०देवाया करितां पोकळ नळी करितात तें.

नळकूट, न०वा०नळकांडें.

नळगुडी, स्त्री०गुडघ्या खालचें पाऊलपर्यंत जें हाड तीं.

नळगूद, न०एक रोग आहे जो झाला असतां बेंबीपासून उरापर्यंत सूज येती तें.

नळनळीत, ३लिं०डिलडिलीत.

नळपटनारायण, ३लिं०दे०नगन नारायण.

नळवायु, पु०पोटांतील नळांत विकृतीनें उत्पन्न होतो जो वायु तो.

नळसंग्रहणी, स्त्री०पोटांतील नळसंबंधी एक रोग आहे.

नळा, पु०गृहादिकांवर आच्छादनार्थ जीं कवलें करितात त्यांत आकारविशेषाची जाति आहे; २, दारूचीं फुलें उंच उडावीं सणून, मृत्तिका द०कांचें पात्र दारू भरून करितात तो; ३, दे०नळगुडी; ४, तेल वगैरे देवाया साठीं वेळूचें पात्र करितात तो; ५, रा०नळकांडें; ६, नळ तृतीयार्थी.

नळी, स्त्री० दोन तोंडें मोकळीं असून मध्यें पोकळ असा जो वेळू, धातू, इ०कांचा तुकडा तो; २, बंदूक; ३, नळ गुडी; ४, कृश मनुष्यादिकांचीं हातापायांचीं हाडें तीं.

नक्षत्र, न०सं० निरभ्र आकाशांत चंद्रा बरोबर जो तारका तें; २, सूर्यचंद्राधिष्ठित चक्राचा सत्तावीस अंशांतील जो एक अंश तें; ३, सूचकाचे सत्तावीस अंश ते प्रत्येकीं; याचे हातावर, पायांवर, तोंडावर, इ०स्थलीं नक्षत्र पडलें आहे, स० क्रमेकरून हा चोर, हा निरंतर चालणारा, हा बहुत बोलणारा. इ०अर्थ जाणावे.

नक्षत्रनाथ, पु० चंद्र.

नक्षत्रमाळ, नक्षत्रमाळा, स्त्री० विवाहा मध्यें मनारंभार्थ वधूवरें मिरवत असतां कागद इ०कांचीं फुलें करून त्याचा माळा करून काठीस बांधून पुढें चालविताततीं; २, रा० देवाचा पुढें शोभार्थ मांडून टेविताततीं पात्रें तीं.

नक्षत्रसूचि, स्त्रिं० सं० गणितादि ज्ञान नाहीं आणि आपणास ओंगी क्षण विती कदाचित् नक्षत्र मात्र समजतें असा जो मूर्ख तो.

नाइटा, पु०एक त्वग्रोग आहे; स० भवानी तुळजापुरी आणि नाइट पृथ्वी भर.

नाईक, पुलिं० आपले हातारवालीं दाहापांच मनुष्यें घेऊन सर्कार इ०कांचें काम करितो तो; २, भाडयाचा डोल्या, घोडी, मजूर, इ०कांचा अड्डयाचा जो धनी तो; ३, ब्राह्मण जातीय असून जो सरकारीचें काम करितो त्यास मोठेपणाचा द्योतक त्याचा नावापुढें हा शब्द लागतो; उ० बाळोबा नाईक, चिंतक नाईक, कोंडे कोटे नामा वांचून ही प्र० होतो.

नाक, न० मुखावरील एक अवयव आहे. व तन्निष्ठ जे गंधग्राहक इंद्रिय तें; २, ला० घाण्यास जा प्रदेशीं मोडचेतो तो प्रदेश; ३, सुई, दाभण, इ०कांचें आन सून इ० ओवाया साठीं जें छिद्र करितात तें; ४, माद्यागस मोठेपणा द्यावयाचा असतां त्याचा नावापुढें हा शब्द लाविताततः उ० भागनाक, रामनाक, इ०; ५, देशादिक जे अवयवी त्यांतील जो मुख्य अवयव तें; उ० पुणें हें देशाचें नाक आहे; ६, मनुष्यादि समुदायान जो गुणादिकें करून उत्कृष्ट त्यास ही स० . नाकावर निंबूं यासणें. नाकावर पाय देणें. नाकास चुना लावणें, इ०स्थलीं स्वकार्य निबंधक जो पुरुष त्याजवर जबरी पोंचवून अथवा त्याला न गणितां, किं० त्याला न कळूंदेतां स्वकार्य साधणें; त्याचे नाकावर टिच्चा किं० रडें आहे इ० स्थलीं स्वल्प निमित्तानें त्यास राग वर रडें, येतें; नाकावर माशी बसूं न देणें स० दुसऱ्याचे उणेंउत्तर, किं० दुसऱ्यानें लाविलेला दोष त्याचें महन करणें; उंचे नाकानें बोलणें, वागणें, फिरणें, इ० आपण केलेला जो दोष त्याची लाज मनांत न आणितां वागणें, बोलणें, इ० करणें; नाकीं वेसन घालणें, दोंचणें, स० एखादे व्यापारी तिरस्कार इ०कांनें अनावृत्त जो मनुष्य त्यास त्या व्यापाराविषयीं बलात्कारानें मवून होई असें करणें; नाकीं नऊ येणें, स० कांहीं एक कार्य सिद्धीस नेतां थकणें, किं० कुंशा पावणें; नाकानें दुराही काढणें, स० कांहीं एक स्वकार्य सिध्यर्थ देवादिकांस शरण जाणें; मुठींत नाक धरून जाणें, एथें जेथें आपला मान भंग झाला आहे, किं० नष्टिपयीं संभावना आहे त्या स्थलीं आपण होऊन अभि

भिमान सोडून जाणें; नाक धरून बसणें, स्व० सर्वदा स्नानसंध्यादिकांत निमग्न असणें; नाक घांसणें स्व० स्वकार्य साधनार्थ दुसऱ्याचे पाय धरणें; नाक नसणें, स्व० नासिकायवर्नी जी गंध याद्रक देवता ती नसणें, कि० जा स्थलीं आपण अपराध केला आहे त्या स्थलीं जाण्या विषयीं लज्जा पावणें; नाकरवाली पडणें, स्व० स्वाभिमान सिद्धीस न गेल्या मुळें लज्जा पावणें; आपलें नाक काप्न दुसऱ्यास अपशकुन करणें, स्व० दुसऱ्याचें वाईट करण्यासाठीं प्रथम आपलें वाईट करणें; नाकानें कांदे सोलणें, स्व० आपण वाईट कर्म करून तें कर्म आपण न केलें असें दाखवून आदीं अमुक कर्म करीत नाहीं अशी प्रतिष्ठा भोगणें; नाक तुटणें, घालणें, बुजणें, इ० स्थलीं नाक स्व० नथ घालाया चें छिद्र; नाक गमावणें स्व० प्रतिष्ठा गमावणें; नाक पिंजारणें, नाकपुड्या पिंजारणें, नाक फुगविणें, नाक फुरफुरविणें, इ० स्थलीं क्रोधानें नाकाचीं द्वारें फुगिवणें, नाक बंद होणें, स्व० नाकपुड्याचीं छिद्रें बंद होणें; नाक वाहाणें, कि० गळणें, स्व० नाकांतून पाणी श्लेष्मा इ० बाहेर येणें; नाक ओरवाडणें, स्व० नाकांतील भूषण इ० जबरीनें काढून घेणें; नाक झाडणें, स्व० कोणेएक गोष्टी विषयीं तिरस्कार करणें; नाकांत काड्या घालणें, मुक्या पुढें नाक खाजिवणें एथें बहुत चीड येई असा व्यापार करणें; नाक तोडून कडोस्तीस खोवणें, स्व० वारंवार धिक्कारिला असतां कोडगेपणानें मागावें बोलावें, असा स्वभाव धरणें; नाकावर पदर घेणें, स्व० जाचा पक्षपात धरावा त्याचें कांहीं एक वाईट झाल्यामुळें लज्जित होणें; नाक काप्न पाटीं घालणें, स्व० एखाद्याची मोठी अप्रतिष्ठा करून तर तर किंचित् सन्मान करणें; स्व० नाकीं नाहीं कांटा आणि कोरडाच ताठा; स्व० नाकापेक्षां मोती जड.

नाकचावाल, ३ लिं० मोठ्याचे परम प्रीतीचा जो दुर्जन तो त्याचा.

नाकटा, ३ लिं० नग्न.

नाकतोडा, पु० क्षुद्रजंतु आहे.

नाकपुडी, स्त्री० नाकाचे जे दोन भाग ते न० ती.

नाकबूल, ३ लिं० कांहीं एक गोष्टी विषयीं जो अमान्य तो.

नाकशिंकणी, स्त्री० एक औषधी आहे जिचा वास घेतला असतां बहुत शिंका येतात ती.

नाकसबी, ३ लिं० नाकसबा मध्यें जो आडाणी तो त्या कसबा विषयीं.

नाकसर, न० गारुड्याचें नलीचें वाद्य आहे.

नाका, पु० जाण्या येण्याचे रहदारीचे अनेक मार्ग एकत्र मिळाले असतात असा जो जागा तो.

नाकाड, न० मोठें जें नाक तें; २, निंदेनें नाकास स्व०; ३, अंब्याचे फळास मागले बाजूस उंच नाकासारिखें असतें तें; ४, डोंगरास जो नाकासारिखा आकार असतो तें; उ० या नाकाडाचे पलीकडे आपला गांव आहे.

नाकार, पु० कांहीं एक गोष्टीचा जो अस्वीकार, कि० निषेध तो; उ० तुझी माझे गोष्टीचा नाकार करूं नका.

नाकारणें, कोणेक पदार्थास कि० आपणास मरवाडु देवणें; २, कांहीं एक व्यापार निषेधणें.

नाकारा, ३ लिं० तनज्जानीयत्वे करून अभिमतजें त्यांत जो निकृष्ट तो.

नाकीद, ३ लिं० जा जमीनीवं लागवड नाहीं अशी जी तो

तो.

नाकीस्त, वि॰ सुरेख सरळ लांब नाक जाचें तो;

नाकूस, वि॰ जाड्यापरा विषयीं जो अप्रयोजक तो.

नाकें, न॰ जा डिकाणीं जकात घेतात तें; २, रा॰ नाका.

नाकेदार, वि॰ नाक्यावर ठेविला जो अधिकारी. कि॰ रक्षक तो.

नाकेबंदी, स्त्री॰ हिं॰ प्रतिबंध्याचा ठायीं विवक्षित मनुष्यातिरिक्त मनुष्यादिकांस जाण्यायेण्याविषयीं जो प्रतिबंध तो; उ॰ मीं आज जाणार होतों परंतु नाकेबंदी झाली आहे.

नाकेश्वर, न॰ नागकेशर.

नाकोडा, पु॰ वा॰ नाकरूप जो अवयव त्यास निंदेनें स॰.

नारवा, पु॰ कोळ्यामध्यें श्रेष्ठ जो महाशिरीचा तांडलपणा करितो, कि॰ जाचा यरचीं गलबतें एकदोन आहेत तो.

नारवृश्च, वि॰ हिं॰ खवश नष्ट तो.

नाग, पु॰ सं॰ सर्पविशेष तो; २, बच्चनाग; ३, गज; ४, शिसें; ५, दाहावें करण.

नागकन्या, स्त्री॰ पुराणादिप्रसिद्ध नागाचीजी मनुष्याकृतिकन्या ती; २, ला॰ परमसुंदर स्त्रीस उपमनें स॰.

नागकुंडल, न॰ नागाचा वेंटाळ्याचे आकृतीचें जें कुंडल तें.

नागकूळ, न॰ मा॰ नागपंचमीचे दिवशीं जो सर्प निघत असतो तें; २, नागाचें जें कुळ तें; उ॰ नागपंचमीचे दिवशीं शेण, गंध, इ॰ कांचीं नागकुळें काढून पुजावीं.

नागकेशर, न॰ एक औषधी पदार्थ आहे.

नागचंद्रकोर

नागचंद्रकोर, स्त्री॰ स्त्रियांचे डोकींतील एक भूषण आहे.

नागचंपक, नागचांपा, पु॰ एक पुष्पवृक्ष आहे.

नागटा, नागडा, वि॰ नग्न; २, ला॰ म्यान उडविलें जातलवारीचें तिलाच सुईचे नेढ्यांत दोरा नाहीं अशा कितेक पदार्थांस स्त्र॰.

नागदवण, स्त्री॰ एक वृक्ष आहे.

नागदिवाळी, स्त्री॰ मार्गशीर्ष शुद्ध पंचमी ती; त्यादिवशीं पिठाचे नागकरून देवाचें पूजन करितात.

नागपंचमी, स्त्री॰ श्रावण शुद्ध पंचमी त्यादिवशीं नागाची पूजा करितात.

नागपाश, पु॰ एक पुराण प्रसिद्ध नागाकार बंधनसाधन आहे.

नागफणा, स्त्री॰ सर्पाची जी फडा ती.

नागफणी, वि॰ नागाचा फणासारिखें जा खिळ्यास चिन्ह असतें तो

नागफणीचांपा, पु॰ एक पुष्पवृक्ष आहे.

नागमोड, स्त्री॰ नागाचा मोडीसारखा बांगडी इ॰ कांचाजो वक्राकार ती; ही मुलगी नागमोडीचा पिंतावर नसली आहे; स॰ नागवी आहे.

नागमोडी, वि॰ नागमोड जास आहे, कि॰ जावर आहे असा जो बांगडी, वस्त्र, इ॰ पदार्थ तो.

नांगर, पु॰ भूमि उखळाण्याचें काष्ठाचें फाळानें संबद्ध आऊत आहे; २, गलबत इ॰ पाण्यावर स्थिर राहावें म्हणून लोखंड इ॰ कांचा करून गलबतांखालीं टाकाण्यासाठीं लांब दोरी बांधून गलबतावर ठेवितात तो; स॰ जेथें जावें तथें नांगरास पाळ.

नागर, पु॰ ब्राह्मणांत जाति आहे; २, न॰ सुंठ.

नांग

नांगरकी, स्त्री० नांगरानें जमीन उरवळण्याचा जो व्यापार ती.

नांगरट,नांगरठ, ३लिं० नांगरलेला जो जागा तो.

नांगरडा, पु०वा० नांगर जुंपतेसमयीं नांगरास जी मध्यें दोरी बांधितात तो.

नांगर्णी, स्त्री० नांगरकी; २, गलबत नांगरण्याचा जो व्यापार ती.

नांगरणें, नांगरानें जमीन उरवळे असा व्यापार करणें; २, गलबताचा नांगर पाण्यांत टाकून गलबत स्थिर करणें.

नागरमोथा, पु० एक औषधी सुवासिक मूळ आहे तो.

नांगरवट, ३लिं० नांगरट.

नांगरवाडा, पु० खुसकीचा आश्रयानें गलबतें नांगराचा जो जागा तो; २, गलबत नांगरण्याचा व्यापार तो.

नागऱ्या, ३लिं० नांगरचे उपयोगी जो बैल, गडी, इ० तो; २, जाजकडे पाटीलकीचा अधिकार तो.

नांगरेंकोनफळ, न० कोनफाळांत एक जाति आहे.

नागलकुडा, पु०रा० कुडा समून एक वृक्ष त्यांतील एक भेद आहे.

नागला, पु०रा० एक पुष्पवृक्ष आहे.

नागली, स्त्री० एक धान्य आहे.

नागवण, स्त्री० चोरोपद्रव, सर्कारसंबंधी खंड, दंड, किं० व्यापारांत तोटा इ० प्रयुक्त जी द्रव्यादिकांची हानी ती.

नागवणूक, स्त्री० नागवण.

नागवणें, चोर, राजा, इ० कांनीं लुटणें इत्यादि उपद्रवानें कोणेकास द्रव्यादि हीन करणें.

नागवा, ३लिं० नग्न.

नागवापाऊस, पु० ऊन पडलें असतां जो पाऊस पडतो तो.

नागवें, न० ला० तत्सदार्थ इ० कांचें जें दुष्पदर्शी अंगवैकल्य तें; उ० आमचा कोणी सर्कारांत बोलणारा नाहीं हें नागवें पाहून त्यानीं आम्हावर फिर्याद केली; नागवेंकोल्हें इ० भेदणें, इ० स्थलीं कार्यार्थ बाहेर पडलें असतां तें कार्य होऊन विशेष फल झालें असतां तदनुमित जे सुशकुन त्यांस नागवें कोल्हें इ० स०.

नागवेल, स्त्री० विड्याचे उपयोगी जिचीं पानें पडतात अशी एक वेल आहे ती.

नागा, पु० खाडा द्वितीयतृतीयार्थी

नाँगा, नाँगाडा, पु० विंचवाचा मागें ऊर्ध्व कंटकासारिखा अवयव असतो तो, जाचा प्रहारानें बहुत वेदना लागतात; २, खेंकड्याचा आंकड्यासारिखा जो अवयव असतो तो आणें दुसऱ्यास धरितो; कार्यामध्यें नांगडा मारणें, स० कार्य नाश होई असा भाषणादि व्यापार करणें.

नाँगाळी, स्त्री० एक वेल आहे.

नाँगी, स्त्री० गोमहिष्यादिकांचा रुपरास बोटासारिखा अवयव असतो ती; २, नांगडा; ३ शेरसमून वृक्ष आहे त्याचा जो डिंक त्या प्र०; त्याचे घरीं गुरांची नांगी राहिली नाहीं. स० गुरें राहिलीं नाहींत कोणेकाची नांगी लागणें रुतणें, इ० स्थलीं कोणेकानीं दर्बार इ० विवक्षितस्थलीं पुरतेपणीं प्रविष्ट होणें.

नाँगें, न० नेर, इ०कांचें जें दुबाळकें तें.

नागोबू, न० स्त्रियांचा नगांतील एक भूषण आहे.

नागोस, पु०ग० जा मध्यें दरवाजाचीं वरचीं कुसें अडकिवलेलीं असतात असा जो उंबरा, किं० उंबऱ्या जवळची फळी असते तो

नागोसा, पु० राहाटाचा सुचकंड्याचें टोक अडकाथासाठीं लांकडाचा करून मारितात तो; २, नागोस.

नाघाणी, अ० दे० नाहक.

नाच, पु० बेडयादिकांचा हावभाव गानासहित तालावर जो पादविक्षेपरूप व्यापार तो; लग्नादिकार्यामध्यें नाच नाचणें स० तत्तत्कार्यसिध्युपयोगी अनेक प्रकारचीं खटपटकरणें.

नाचकंड, नाचकण, न० नरवज्रिन.

नाचण, ३लिं० दे० पुरुषानें मोहित व्हावें म्हणून छानीनें हावभाव दाखविण्याचा स्वभाव जीचा तो. या० स्त्री० विशेषण होतें.

नाचणकांड, न० नाचणीचें गवत तें.

नाचणघुगरी, स्त्री० दे० नाचण.

नाचणा, पु०ग० नाचणी.

नाचणी, स्त्री० नागली.

नाचणें, वेड्यादिकांनीं हावभाव गानादिसहित तालावर पादविक्षेप करणें; कोणेकाचे पुढें पुढें नाचणें, इ० स्थली त्याला जो जो पदार्थ जो जो वेळेस पाहिजे त्या त्या वेळस तत्तत्कर्मे देणें; स० लग्नामध्यें स्वरक्षण्यापेक्षां नाचणें फार; स० नाचतां येईना म्हणून अंगण वांकडें; मोर नाचतें म्हणून लांडोर ही नाचतें.

नाचरा, ३लिं० आपलें विशेष कांहीं चालत नसतां पुढचे पुढें बोलणें, किं० अनेक प्रकारचीं खटपट करणें, अज्ञात लोकांनें डोलभिरविलेली तो; स० अधींच बाई नाचरी तिचा पाठीवर बांधली घागरी.

नाचरी, स्त्री० रा० नाचण.

नाचा, नाचाऱ्या, पु० स्त्रीचा वेष घेऊन नाचणारा जो पोऱ्या तो.

नाजकाई, स्त्री० नाजूकपणा.

नाजागीर, ३लिं० हिं० जीर्णत्वादि दोषामुळें जो पदार्थ अनुपयुक्त होतो तो.

नाजुकखर्च, पु० केवल स्वसंवेद्य जो व्यभिचार इ० काकडेस खर्च तो.

नाजुकमसलत, स्त्री० शहाणपणें च केलीपाहिजे अशी जी मसलत ती.

नाजुक, ३लिं० जास उष्ण, शीत, धक्काधक, इ० सोसत नाहीं, किं० तीं झालीं असतां लवकर विकार पावणारा असा जो मनुष्य पुष्पादि पदार्थ व मृदु असून पातळ जो पोळी इ० पदार्थ त्यास स०.

नाट, न० पांचा कवड्याचा जो समुदाय तें; २, कवड्या खेळाया साठीं रंग इ० कांचा रेपानीं कोष्टकांकित काढितात तें; ३ देण्याघेण्याचा व्यवहारांत जो कुळाकडला पैसा उगवेनासा झाला तें कूळ तें; ४, कांहीं एक दोषाधारेपानें कुलास लागला जो बट्टा तें; ५, जो कार्यास उद्दिष्ट जो काल अवधि, किं० क्रियेचा अवधि त्या अवधीस कार्य न झाल्यामुळें प्रतिबंधकत्वेंकरून कल्पित जे अपशकुनादिक तें; उ० आज कार्य व्हावयाचें परंतु आज काय नाट लागलें तें समजेना; ६, ३लिं० जा कार्याविषयीं उद्दिष्ट जो काल त्या कालीं तें कार्य न झालें असतां प्रतिबंधकत्वेंकरून कल्पित

जो तो काळ तो; उ० आजचा दिवस नाट लागला; ७, अ० थांग लागे असें, कर, जा, इ० कांचें वि०; ८ समुद्राचे आंत दूर प्रदेशीं; उ० गलबतांचीं नाळ नाट लाव; मी नाट जाणार नाहीं, नाट येणार नाहीं, स० विवक्षित कार्याविषयीं असमर्थ होणार नाहीं

नाटक, न० सं० काव्यांतील एक जाति आहे: २. दशावतारादिकांचीं सोंगें घेऊन खेळ करितात तें.

नाटकशाळा, स्त्री० पोरीस विकत घेऊन नाचणें गाणें शिकवून उपभोगार्थ ठेवितात ती.

नाटकसाळ, स्त्री० नाटकशाळा.

नाटकी, १ लिं० नाटकाचा तमाशा करितो तो; २, ला० जाचे कृतीचा अनुगम सांपडत नाहीं तो; उ० हा कारभारी मोठा नाटकी आहे; ३, नाटकसंबंधी जो श्लोकादि तो.

नाटाळ. १ लिं० नाट नृतीयार्थी: २ अतिशयित जोडू ड तो.

नाट्य, न० नृत्य.

नाठवणें, यं० न आठवणें.

नाड, स्त्री० शरीरांतील रक्त वाहातें जा शिरानीं सम० ती; २, न० वा० कळकाचें नळकांडें; नाडीपाहाणें, नाडी दारवविणें, स्र० जा नाडीवरून रोगपरीक्षा करणें आहे ती नाडी पाहाणें दारवविणें; कोणेकाची नाड सांपडणें, स्र० युक्ति प्रयुक्तीनें कोणेकाचा स्वभाव हस्तगत होणें; कोणेकाचा नाडी आटपणें, स्र० त्याणें मरणोन्मुख होणें; ला० त्या कार्याविषयीं त्याचा नाडी आटपणें, स्र० त्या कार्याविषयीं त्याणें थकणें.

नाडणूक, स्त्री० बुडणूक.

नाड

नाडणें, नागवणें; २, ला० ऊर्जित होण्यासाठीं जा पदार्थाचा योग झाला त्याणें दैवयोगानें, किं० स्वकृतीनें त्या ऊर्जितांत माती पडे असें करणें; उ० आपण त्या पोरीस नाडून मरून गेला.

नाडबंद, २ लिं० स्त्रीचा उपभोग करावयाजोगें वय असून स्त्री संग घडला नाहीं जाय तो.

नाडा, पु० बहुरूपी तमाशा करावयाकरितां उंच स्तंभ रोविताततो; २, फार जाडी जी दोरी तो; ३, तान्हुनाचे दिवसांत फकीर इ० कांस धारण करण्यासाठीं सूत रंगवून करितात तो; ४, चोळणा इ० कांस अरुंद जें नवारे सारिखें वस्त्र लाविताततो; ५, रवाळीं डोकें टेंकून वरपाय करून राहाण्याचा जो प्रकार तो.

नाडापुडी, स्त्री० सूत रंगवून करितात जो नाडा आणि अबीर, गुलाल, इ० द्रव्याची जी पुडी ती; उ० सटवाईला नाडापुडी वाहिली.

नाडी, स्त्री० सं० नाड; २, नाडा चतुर्थार्थी; ३, घटिकात्मक जो काल ती.

नाडीपरीक्षा, स्त्री० नाड पाहून वातपित्तादाधिक्यादिकाची जी परीक्षा ती.

नाडेबहुरुपी, नाडेबहोरुपी, नाडेभोरपी, ३ लिं० नाडा उंच पुरुन त्याजवर चढून खेळ करितात तो.

नाडेभोरीप, नाडेभोरुप, न० नाडे भोरपी नाडा पुरुन जो खेळ करितात तें.

नाणक, न० सं० मोहोर, पुनळी, पांची, रुपया, पैसा, इ० रुपजें द्रव्य तें.

नाणा, पु० एक वृक्ष आहे.

नाणें

नाणें, न० नाणक.

नाणेवट्टी, ३ लिं० नाण्याचा व्यापार करितो जो सराफ तो.

नात, स्त्री० लेकाची, किं० लेकीची जी कन्या ती; २, ला० ततस्थानिक जी त्याची कन्या ती.

नातजावई, पु० नातीचा जो नवरा तो.

नातलग, ३ लिं० जांचा परस्परें विवाहादिकें करून शरीर संबंध झाला आहे ते परस्पर.

नातरूं, **नातवंड**, न० पुत्राचें, किं० कन्येचें जें अपत्य तें.

नातवानी, स्त्री० प्रायः द्रव्याभाव मूलक जी गरीबी ती; २, गंजिफाचे डावांत एक तलफ देण्याचा प्रकार आहे.

नातसून, स्त्री० नातवाची जी बायको ती.

नातुंड, न० नातवंड.

नातू, पु० पुत्राचा जो पुत्र, किं० कन्येचा जो पुत्र तो; २, ला० ततस्थानिक जो पुतण्या इ० कांचा, पुत्र तो.

नातें, न० योन संबंध, किं० तन्मूलक कार्य मयूनि पथोजकीभूत जो संबंध तें; उ० त्याचें व आमचें जांवई सासऱ्याचें नातें आहे.

नातेवाईक, ३ लिं० नातलग.

नातोंड, न० नातवंड.

नाथ, पु० स्वामी, मा० ममार्सी, काशिनाथ विश्वनाथ इ०; २, बा० नथ द्वितीयार्थी.

नाथपंथी, ३ लिं० गोसाव्यांत भेद आहे.

नांद, स्त्री० दे० मोठा जो रांजण ती; २, स्नानार्थ सगडीचे आकाराची मृत्तिकेची देवितान तिलाही स०.

नाद, पु० ध्वनि विशेष तो; २, कांहीं एक गोष्टी विषयीं, किं० व्यसना विषयीं जो छंद तो; उ० तो बोलण्याचे नादांत आहे हाथोर यहस्थ असून यागांईचा नादीला गला हें चांगलें नव्हे; त्याणें देतों असा नाद लाविला आहे, स० आशा लावून देविली आहे. नाद जाणें स० कांहीं एक गुप्त गोष्टीचा आव मिळूं झाल्या मुळें नाहीं असा होणें; नाद दवडणें, नाद घालिवणें एथें तो नाद जाई असें करणें.

नादखोर, ३ लिं० एकदां जो नादांत लागला त्याच नादानें चालण्याचा स्वभाव जाचा तो.

नांदणूक, स्त्री० कोणेकस्थलीं घरदार, कुटुंब सुद्धां जी बहुत वर्षे स्थिति ती; उ० त्या गावांत आमची दाहा वर्षे नांदणूक झाली; २, कोणेकाचा राज्यांत, किं० हातारवालीं विवक्षित काल पर्यंत जो टिकाव ती.

नांदणें, एखादे यामादिकामध्यें संसार करून बहुत दिवस राहाणें; उ० आम्हीं त्या गांवांत सात पिढ्या नांदलों; २, जा व्यापारासाठीं जो पदार्थ मिळविला तो पदार्थ त्या व्यापारानें अविमुक्त असणें; उ० त्या गांवांत दुमजला घर नांदत नाहीं; त्यायें व आमचें नांदत नाहीं, स० कांहीं एक व्यापार विषयीं पडत नाहीं.

नादब्रह्म, न० गानास स०.

नादर, ३ लिं० स्वरूपानें, किं० गुणानें जो उत्कृष्ट तो; २, स्त्री० गंजीफांतील निकृष्ट दोवटीला जें पान ती.

नादरशाईरुपाया, पु० रुपायाचे शिक्क्यांत एक भेद आहे.

नाँदरूरव, स्त्री० एक झाड आहे.

नांदवट, स्त्री० वा० नांदणूक.

नादान, ३लिं० नाकारा.

नांदावणें, कांहीएक चांगलें कार्य विघडे असें आपलें अज्ञान प्रकट करणें; उ० तो तेथें जाऊन नांदावला असेल म्हणून त्याणें काम केलें नाहीं.

नादावणें, व्यसनादि कित्येक गोष्टींचा नांदी लागणें; २, दे० धातुमय पात्रादिकांवर कांहीं आघातादि झाल्यामुळें नादयुक्त होणें, कि० मृदंगादिक वाद्य कांहीं दोषामुळें विस्वर वाजणें.

नादाळ, ३लिं० नादखोर.

नादिष्ट, ३लिं० नादखोर.

नांदी, स्त्री० सं० नाटकाचा प्रारंभीं मंगलाचरण श्लोक असतात ती.

नादी, ३लिं० नादखोर.

नांदेड, स्त्री० रा० नगर; २, न० तिचें पुष्प तें.

नांदेटा, पु० वा० पुष्पवृक्ष आहे; २, रा० एक सर्पभेद आहे.

नानकपंथी, ३लिं० हिंदूमध्यें भिकारी आहेत जे टिपऱ्यावर टिपरी मारून भीक मागतात त्याचा मा० वेष फकीरगं सारिखा असतो तो.

नाना, ३लिं० अनेक: प्रकार, विध, तऱ्हा, देश, इ० कांचें वि०; उ० नानादेश, नाना प्रकार, नानातऱ्हा, इ०; २, पुरुषाचें महत्त्व द्योतक नाम आहे मुख्य नामाचापुढें लागतें, कदाचित् तुम्हाआम्हायोग होतो; उ० चिंतोपंत नाना, नाना आले.

नानू, स्त्री० न० कांहींएक कार्याविषयीं नाहीं, नव्हे, इ० संदेहरूप भाषण करण्याचा जो प्रकार तो तें.

नानेटा, पु० रा० नांदेटा द्वितीयार्थी.

नानेटी, नानेठी, स्त्री० नानेटा.

नापत, स्त्री० देण्याघेण्याचे व्यवहारांत मुदतीस पैसा देण्यास न मिळाल्यामुळें व्याज बरोबर व्यवहार करण्याविषयीं जी अयोग्यता येते ती; २, ३लिं० दे० तद्विशिष्ट जो पुरुष तो.

नापसंत, ३लिं० पसंत नव्हे तो.

नापाक, ३लिं० नाकारा सजीव वृत्ति.

नापिकलें, न० कों० पर्जन्य न्यूनता इ० कारणामुळें जो कोणेकवर्षी धान्योत्पत्ति अल्प होते; उ० गुदस्ता नापिकलें झालें त्यामुळें बहुत लोक खराबीस आले.

नापित, पु० सं० वरुथानें, कात्रीनें, जो डोकी इ० कांचे केश काढितो ती एक जाति आहे.

नापीक, न० नापिकलें.

नाफरमानी, ३लिं० एक रंग आहे; तद्विशिष्ट तो.

नाबद, स्त्री० दे० गंडोरी.

नाबदसारवर, स्त्री० पिठी सारवरेंन एक भेद आहे.

नाबर, ३लिं० अशक्त, निषेध अमतांच म०; उ० तो पर बांधायाला नाबर नाहीं.

नाबूद, अ० पाहूं गेलें असतां दिसेना असें जाणें. बुडणें, होणें, मरणें, इ० कांचें वि०; उ० ओत, नाबूद बुडालें गेलें झालें मेलें; उ० गडी गेला तो कोणीकडे नाबूद झाला.

नाभ, स्त्री० लांकडांस कूड. फळ्या, इ० भराव्यासाठीं खंचणी घेतात ती.

नाभा, पु० कस्तुरी मृगाचा अंडकोश तो.

नाभि, पु० स्त्री० जीवमात्राचें नाळ जा ठिकाणीं असतें तो पोटावरील छिद्राकार तो तो.

नाभिकमल, न० नाभीसच स्र०.

नाम, न० स० तत्तद्व्यक्तिवाचक जो आनुपूर्वी विशेषतें; २, पु० गंध इ० कांचाजो उभा टिळा कपाळीं लाविताततो; ३, ला० घोडा, कुत्रा, इ० कांचा कपाळावर उभा पांढरा पट्टा असतो तो.

नामकरण, न० उत्पन्न झालेलें जें लेंकरूं त्यास नांव ठेवण्याचा संस्कार आहे तें.

नामजाद, वि० नामांकित.

नामधारी, वि० जाचें उत्तमत्वें करून नाम प्रसिद्ध तो, उ० आम्हाजवळ दाहा नामधारी सर्दार आहेत; २, स्वतः कांहींएक कारभार इ० करीत नसतां जाचे नांवावर कारभार इ० होतात तो; ३, एकानामाचे जे दोन ते परस्पर; ४, जा मध्यें तें नें विद्यादिक नसतां तत्तद्विद्या प्रयुक्त नाम मात्र जाचें चालतें तो.

नामना, स्त्री० कीर्ति.

नामनिर्देश, पु० नामाचा जो उच्चार तो.

नामर्द, वि० نامرد हिं० अपगकर्मी मनुष्य तो.

नामर्दी, स्त्री० نامردی हिं० नामर्दपणा.

नामांकित, वि० जाचे चांगलेपणाची लोकांत ख्याति आहे तो.

नामाभिधान, न० नाम मथमार्थी.

नामी, वि० उत्कृष्ट चांगला तो.

नामोद्या, पु० نامور हिं० कीर्ति.

नाम्या, वि० दे० जाचे कपाळावर पांढरा पट्टा असतो असा जो घोडा. कुत्रा. इ० तो.

नायक, वि० जा जा समुदायामध्यें जो जो श्रेष्ठ. कि० मुख्य तो; २, स्वामी; ३, नाटकामध्यें जाचें मुख्यत्वें करून वर्णन केलें असतें तो; ४, शृंगार मध्यें जाचे आश्रयानें शृंगार वर्णितात तो.

नायकवडी, वि० फौजेंत, कि० किल्ल्यावर दाहा, बीस, मनुष्यावर जो अधिकारी असतो तो.

नायकी, स्त्री० यवनी सालामध्यें दाहा, शंभर, हजार, इ० संख्येनें फिरतो जो शब्द ती; २, नायकपणा.

नायकीकानडा, पु० कानडा रूपून गाण्यांत राग आहे त्याचा भेद तो.

नायकीण, स्त्री० कळावंतीण; २ आपले हातारवाली दाहापांच बायका घेऊन कारखाना इ० कांवर जाणारी जी बायको ती.

नायरी, स्त्री० कोणीं कांहीं सांगितलें असतां नाहीं एत्मतिपादक जो मुसलमध्यें स्वभावसिद्ध शब्द असतो ती.

नार, स्त्री० सं० स्त्री; २, पु० वृक्षादिक बहुत जून झाल्यानंतर पोटीं जो कठिनांश होतो तो.

नारंगी, स्त्री० एक झाड आहे.

नारंजी, वि० रंग आहे; २, तद्विशिष्ट शाल जोडी. सफलाद, इ० तो.

नारद, पु० ब्रह्म्याचा पुत्र ऋषी आहे; २, ला० कज्जा लावून देवून मऊज पाहाण्याचा स्वभाव जाचा त्यास म०.

नारंद, पु० कों० काष्ठादिक कांताथाची सांगड असती तो.

नारळ, स्त्री० दे० माड; २, पु० नारळीचें फळ तो; त्याचे हातीं नारळ देणें म० त्या कामावरून त्यास काढणें.

नारळपाक, पु० साखरेचा पाकांत खोबऱ्याचा कीस घालून बरफी सारख्या वड्या करितात तो.

नारळाचीआई, स्त्री० करवंदी; हातीं नारळाची आई थणें, स०भिकारी होणें.

नारळी, स्त्री० नारळ लागून जो वृक्ष तो.

नारळीपदर, पु० वस्त्राचे पदरांस जरघालण्याचा प्रकार आहे जाजवर नारळीचा आकार दिसतो तो.

नारळीपदरी, २ लिं० नारळीपदर आहे जास तो वस्त्र जात्याक्रांत; २, जेथें वस्त्र सन्मानार्थ वास्तवीक द्यावयाचें त्याअर्थी नारळ ठिला असतां त्या नारळास नारळीपदरी पोषाख स०.

नारा, पु० रा० नायरी.

नारायण, पु० देव आहे: २, सन्यासास नमस्कार केला असतां आशिर्वादार्थ हा शब्द उच्चारितात.

नारिंग, स्त्री० नारंगी; २, न० तिचें जें फळ तें.

नारिंगी, स्त्री० नारंगी.

नारिंगीतवशी, स्त्री० ग० कोंकडीचे वेलांत एक भेद आहे.

नारिंगेंतवसें, न० नारिंगी तवशीचें जें फळ तें.

नारी, स्त्री० स्त्री.

नारीकेल, पु० नारळी; २, न० नारळ.

नारींव, २ लिं० नार द्वितीयार्थ आहे जा मध्यें तो: लांकडाचें वि०.

नारु, पु० सुताचे दोऱ्या सारख्या एक रोग आहे.

नारोपंत, २ लिं० संकेतानें नारुस स०.

नाल, पु० घोड्याचे पायांस अर्धचंद्राकार लोखंडाचा बसवितात तो; २, न० सं० कमलाचा देंठ; ३, जरायुज प्राणी जन्मला असतां त्याचे नाभींत जो तंतु असतो तें.

नालकी, स्त्री० पालखी सारिखें वहन साधन आहे.

नाल

नालछेद, पु० जन्मलेल्या प्राण्याचा नाभिनालाचा जो छेद तो.

नालडबा, पु० चहूंनालांचा जो जोड तो.

नालबंद, २ लिं० घोडे इ० कांचा पायांस नाल बसवितो तो.

नालबंदी, स्त्री० घोडे इ० कांचा पायांस नालबसविण्याचा व्यापार ती; २, ला० तंग, तोबरा, नाल, इ० नवा करून स्वारीस निघण्याविषयीं जी सिद्धता ती; ३, जागिर्दपेशा माणसांचे रोज सुट्यांतून दरमहिन्यास कांहीं बाकी राखून ठेवितात आणि ती एकंदर अश्वेरसालीं देतात ती.

नाला, पु० शहर इ० कांतील वाईट पाणी बाहेर काढावयासाठीं जो नळ बांधितात तो.

नालिश्त, **नालिस्त**, स्त्री० जापासून जाचें पारिपत्य द्यावयाजोगें त्या पापीं कथनार्थ उद्दिष्ट जें तदीय दुष्कर्मादि ती.

नाव, स्त्री० नद्यादि उतरून पार होण्यासाठीं तरंठेवितात ती; २, सुताडा इ० जाड वस्त्रें एकत्र शिवून बेटक करितात ती; ३, नाम मथमार्थी; लढाई, सभा इकांत नाव मिळविणें, स०कीर्ति मिळविणें; कोणेकाचें करणें पदार्थ इ० कांस नाव ठेवणें, स० खोडठेवणें, नाव बुडविणें, नावावर पाणी घालणें इ० स्थलीं दुष्कर्मा चरणानें स्वकुलादिकांस बट्टा लावणें, कोणेकानें कोणेकाचा नावानें, कि० नावावर विकणें. स० प्रसिद्ध नाव जाचें असा जो मनुष्यादिक त्याचे नावानें आपण प्रसिद्ध होणें, कि० स्वपणें; पैसा, विद्या, इ० कांचें नाव नाहीं इ० स्थलीं त्या त्या पदार्थाचा अंशतः भाव असा अर्थ; त्याचें त्याला नाव नको

स०

स० तो पदार्थ त्याला अगदी नको, त्यानें नाव घेणें मला ठाऊक नाहीं; स० तत्संबंधी मला कांहीं ठाऊक नाहीं; कोणेकाचें नाव निशाण ठाऊक असणें स० कुलशील परंपरा ठाऊक असणें, स० नाव सोनूबाई आणि हातीं कथलाचा वाळा.

नावकरी, २ लिं० नावधारी मध्यमवृत्तीचा अर्थी.

नावड, स्त्री० अप्रीति.

नावडता, २ लिं० जावर अप्रीति असा जो पदार्थ तो.

नावडा, २ लिं० नावडता.

नावनट, अ० थांग नाहीं असें हो. कर. इ० कांचें वि०: उ० त्याची गाथ सुरारव्यानें नावनट केली.

नावनिशी, स्त्री० अनेक नावें जा कागदावर लिहिलीं आहेत तो कागद, किं० तीं नावें तीं; उ० माझी नावनिशी काढ.

नावनिशीवार, अ० प्रतिनामोद्देशें करून देणें, घेणें, मागणें, इ० कांचें वि०.

नावरस, स्त्री० जन्मकालींनक्षत्रांवरून नावेवेविज्ञात ती; २. तद्विषयीं जो निर्णय ती; ३, जन्म नक्षत्रां वरून वधूवरांचें राशिघटित पाहावयात ती; नावर रस येणें, स० वधूवरांचा घटित विचार केला असतां अनुकूलता येणें.

नावरूप, न० कीर्ति; उ० त्याणें त्या लढाईमध्यें मोठें नावरूप मिळविलें; २, कांहीं एक वस्तूचा यथायोग्य स्थानीं विनीयोग झाल्यामुळें जें सार्थक्य तें; उ० विद्यानास पुस्तक दिलें असतां त्याचें नावरूप होतें; नावारूपास येणें, स० नामांकित जे योग्यतेचे मध्यें गणनीयता पावणें.

नावलौकिक, पु० गुणादिकें करून नावाची जी प्रसिद्धि तो.

नावलौकिकी, स्त्री० वा० कीर्ति.

नावलौकिकता, २ लिं० वा० नावलौकिकी जाची प्रसिद्धि तो.

नावाभा, २ लिं० पांडित्यादि तादृश गुण नसतां नाम मात्र पंडित इ० असतें जाचें तो; उ० तो नावाभा गवई आहे.

नावांजणी, स्त्री० कोणेकाची, किं० त्याचा गुणाची जी प्रशंसा ती.

नावांजणूक, स्त्री० नावांजणी.

नावांजणें, नावांजणीनें अभिसंबद्ध करणें.

नावाडी, २ लिं० नौका तारून नेतो तो.

नावाड्या, २ लिं० नावाडी.

नावालौकिकाचा, २ लिं० नावलौकिक जाचा आहे तो.

नाविक, २ लिं० सं० नावाडी.

नाश, पु० सं० कांहीं एक विघटनी सुटें कोणेक पदार्थ, किं० व्यापार इ० कांचें मूलस्वरूप विघडावा जोगी केली, किं० झाली जी दुर्दशा तो; उ० त्या पोरानें पोथीवर शाई पाडून नाश करून टाकला; २, कांहीं एक व्यवहारांमध्यें जी द्रव्यादिकांची हानि, किं० द्रव्यादि हानिमूलक जी तत्संबंधीची हानि तो; ३, ध्वंस; उ० प्रलयीं सर्व जागाचा नाश होतो.

नाशक, २ लिं० नाश करितो तो, किं० नाश करण्याचा स्वभाव जाचा तो; याचे समास पिन नाशक, वायु नाशक, इ०.

नाशकत, २ लिं० वा० अशक्त.

नाशा, २ लिं० नाश करण्याचा स्वभाव जाचा त्याम निंदेनें स०.

नाशिक, न० एक क्षेत्र आहे; त्याचा नाशिक परगणा ओसाड असणें स० कोणेकाचें नाक बसकें, किं० अपरें असणें.

नास, उ० नाश.

नासका, २ लिं० नासलेला जो पदार्थ तो.

नासकेंकेणें, न० लोकर नाश पावावयाजोगें जें कचें. आंब इ० तें.

नासणें, उ० नाश पथमार्थ विशिष्ट करणें, किं० होणें स० नासलीं मिरें सणून जोंधळ्याबराबर विकत नाहींत.

नासधूस, स्त्री० उ० अनेक प्रकारानें जो नाश ती तो.

नासरा, २ लिं० नाश.

नासरी, स्त्री० डमडीचा अर्धभाग ती.

नासाड, स्त्री० नास धूस.

नासाडा, उ० नासाड.

नासाडी, स्त्री० नासाड.

नासावणें, पूर्ण गर्भ न होतां प्रसूत होणें.

नासिक, न० नाक सुरख्यार्थी.

नासिका, स्त्री० सं० नाक अवयव आहे.

नासिकाचूर्ण, न० संकेतानें तपकिरीस स०.

नासूर, उ० नाक, नेत्र, पांस रोग होतो तो.

नास्ति, अ० नाहीं.

नास्तिक, २ लिं० परलोक सणून पदार्थ आहे असें मानित नाहीं तो.

नास्तिपक्ष, उ० दारिद्र्य मूलक जो द्रव्यादिकांचा अभाव तो; २, दे० नारा.

नाहक, नाहाक, अ० विचार न करितां, किं० प्रयोजन नावांचून; उ० नाहाक मारिलें.

नाहाण, न० अभ्यंग पूर्वक जें स्नान तें; २, स्त्रीस जें प्रथम रजोदर्शन तें.

नाहाणघर, न० स्नान कराथासाठीं जें स्थल करून ठेवितात तें.

नाहाणवली, स्त्री० नाहाणूली.

नाहाणी, स्त्री० गृहादिकांतील पाणी इ० बाहेर जावयासाठीं दगड, काष्ट, इ० कांची, किं० चुना, दगड, इ० कांची शालुंरेचा आकाराची बांधून करितात ती.

नाहाणुली, स्त्री० प्रथमतः रजोदर्शन जीस झालें आहे ती.

नाहाणें, प्रायः अभ्यंग पूर्वक स्नान करणें; ही स्त्री नाहुं लागली स० विटाळशी होऊं लागली.

नाहातीधुती, २ लिं० जिला नाहाण येऊन पोट दशा पावली ती.

नाहावगंड, उ० निंदेनें नापितास स०.

नाहावी, २ लिं० नापित.

नाहीं, अ० अभाव बोधक.

नाहींत, अ० बहुवचनांताचा अभाव बोधक.

नाहू, २ लिं० नाहावी; स० पक्ष्यांत काऊ आणि माणसांत नाहू, याचा प्र० सणींतच आढळतो.

नाळ, न० नाल द्वितीय तृतीयार्थी; २, स्त्री० गलबताचा अग्रभाग ती; ३, तोफ; ४, घोडे इ० कांचा पायीचे संबंधानें क्षत पडतें तें.

नाळकें, न० धातुमय पात्रादिकांस मोठें छिद्र पडतें तें.

नाळगूद, न० नलगूद.

नाळीक, २ लिं० जुनी, फुटकी, तुटकी, जीं भांडी तो-

नि, उ० बाधा संस्कृत पदाशीं योग झाला असतां प्रा० अतिशयें करून असा अर्थ होतो; उ० निमग्न, निमज्जन इ० प्राकृत शब्दामागें लागला असतां रहित इ० अर्थ होतो: उ० निकोप, निकामी इ०:२. आणि; उ० तोनी तो बाजारांत गेले.

निकट, अ० जवळ अव्ययार्थी.

निकटणें, दे० कोणेक गृह, अधिकार, पद, इ० कांपासून निघून त्याणें तत्संबंध रहित होणें जाचा लोकांस त्रास आला तद्विषयींचें प्र०.

निकटवास, ३ लिं० कोणेकाचे जवळ जी स्थिति तो.

निकटवासी, ३ लिं० जवळ राहातो तो.

निकड, स्त्री० कांहीं एक कार्य त्वरेनें न केलें असतां उपद्रव होईल म्हणून तद्विषयीं त्वरेनें प्रवृत्त व्हावें अशी जी अडचण प्राप्त होती ती; उ० सावकारानें पैक्याविषयीं निकड लाविली आहे.

निकंड, ३ लिं० रा० मध्यें खांद्या फुटल्यावांचून उंच जो जाडा आंबा, फणस इ० तो.

निकता, अ० विवक्षित, समीप, भूतकाळीं; उ० तो निकता आला आहे. त्यास निकतें गतवर्षीं वेड लागलें.

निकर, पु० कांहीं एक कार्य करण्याविषयीं सोईचा मार्ग सोडून कोधाद्यावेश पूर्वक जी प्रवृत्ति तो.

निकल्हा, निकल्ही, ३ लिं० कल्हे नाहीं जास असें भांडें इ० तो.

निकम्मी, ३ लिं० कों० कोधावेशानें अवलंबिली जी कांहीं एक गोष्ट ती एकाएकी सोडीत नाहीं अशा स्वभाव जाचा तो मनुष्य, किं० त्याचा स्वभाव इ० तो.

निका, २ लिं० नकी मद्यमार्थी; २, खराब पंचमार्थी; ३, यवन लोकांत जो गांधर्व विवाह करितात तो.

निकाढा, पु० एकवार काढा केलेले औषधांचा जो दुसऱ्यानें काढा करितात तो; उ० सकाळीं काढा घ्यावा आणि संध्याकाळीं निकाढा घ्यावा.

निकामी, ३ लिं० विवक्षित कार्याचा उपयोगी नव्हे तो; २, वा० विवक्षित व्यापार रहित तो.

निकाल, पु० उलगडा; २, मोरी इ० कांचें पाणी बाहेर जाण्याची जी उतरती जागा तो.

निकाळजी, ३ लिं० काळजी नाहीं जास तो.

निकुटणें, कों० धान्यादि कुटणें.

निकुरणें, भांड्यास चिकटलेला पदार्थ नख इ० कांनें खरवडून काढणें.

निकृष्ट, ३ लिं० विवक्षित उत्तम गुणादिकें करून ज्याचें परिगणन उत्तमांत किं० मध्यमांत होत नाहीं असा जो निर्गुणादि पदार्थ तो.

निकृष्टपक्ष, पु० कनिष्ठपक्ष.

निकोचा, पु० लोखंडाचे खिळ्यांत एक तऱ्हा आहे.

निकोप, ३ लिं० स्त्रीलिंगार्थक जी कोपती नाहीं जास तो काष्ठादि पदार्थ तो; २, रागादि दोषरहित जो मनुष्यादि, किं० त्याचें शरीर, गळा, इ० तो.

निखवडणें, खवडणें; २, पांचचार अवयव एकत्र जडून तयार झाला जो पदार्थ त्याचे अवयव मोकळे करणें; उ० कोंकणामध्यें आगोठीचे दिवसांत गाडी निखवडून ठेवितात.

निखरड, ३ लिं० रा० जाजमीनीवर शेत चांगलें होत नाहीं अशी जी जमीन तो.

निरवळ, २ लिं० जा पदार्थांत दुसऱ्या पदार्थाची भेळ नाहीं तो पदार्थ; उ० हें निरवळ निळायें तेल आहे; २, केवळ; उ० थाला निरवळ वेड लागलें.

निरवळणें, उ० घट्ट जडून राहिलेला पदार्थ हालविणें, द्र० कारणानीं मोकळा करणें; २, ला० कांहीं एकाअधिकारावर, किं० एखाद्या स्थळीं दृढ राहिला जो मनुष्यादिक तो तेथून काढणें.

निरवाडा, निरवाडुया, २ लिं० जास मोठेपणी दाढी भिजी येत नाहीं तो.

निरवाद, पु० सप्त स्वरांतील सातवा स्वर तो.

निरवार, २ लिं० पराकाष्ठेचा, ओहोट ओहोटी यांचें वि०; उ० आज निरवार ओहोट होता म्हणून खाडीस पाय उतार झाला.

निरवारणें, दे० निरवरणें, आकाश निरभ्र होणें.

निरवाररंगी, २ लिं० निरवाऱ्याचा रंगा सारिखा आहे रंग जास तो; उ० हें लुगडें निरवाररंगी आहे.

निरवारा, पु० निर्धूम अंगार; २, ला० दे० क्षुधा न गणितां न खातां राहाण्याचा जो प्रकार तो; उ० आज तिसरा प्रहर पर्यंत निरवारा दिला नंतर जेवलों; घरावर निरवारा देणें स० त्याची दुष्कर्मे बाहेर काढून उभस्वना करणें; स० आपल्या पोळीवर निरवारे कोण न ओढी.

निरवालस, २ लिं० विवक्षित तत्तत्संबंधरहित; उ० आमची जागा निरवालस आहे; २, निश्चित; उ० मीं आज निरवालस बसतों; ३, निरवद्य; ४, पृथक्; ५, भीड भाड न धरितां, किं० लाभलोभ न धरितां खरें बोलणें, खरा कारभार इ० करण्याचा स्वभाव जाचा तो, खऱ्याचें जें भाषणादिक तो.

निरिव

निरविल, २ लिं० सं० सर्व.

निरवेड, २ लिं० रा० जा मध्यें खेड लाक्षणिक, किं० सुरव्य नाहीं असा जो पदार्थ तो.

निरवोड, २ लिं० जा मध्यें, किं० जास खोड नाहीं तो: उ० हें भात निरवोड पटणीचें आहे यांचें बोलणें निरवोड आहे.

निरवोडी, २ लिं० निरवोड.

निरगता, २ लिं० निकता.

निरगम, पु० देव.

निरगर्गटा, २ लिं० कोडगा.

निरगर्व, २ लिं० गर्व जास नाहीं तो.

निरगर्वी, २ लिं० निरगर्व.

निरगळ, २ लिं० रा० पर्जन्याचें उदक जांत गळत नाहीं असें जें गृहादिक तो; २, न० जिच्या प्रसादानें घर निरगळ होत असतें अशी एक देवता आहे तें; उ० आज घर शिवणी झाली आहे निरगळास नैवद्य घाला.

निरगळता, २ लिं० निरगळ पथमार्थी.

निरगा, स्त्री० पदार्थ सुरक्षित राहावा, किं० वृद्धिंगत व्हावा म्हणून त्या त्या कालीं लक्ष्य पूर्वक त्यास जो जो पदार्थ पाहिजे तो द्यावा, द्र० रीतीनें जपण्याचा जो प्रकार तो; उ० या रोपाची निगा केली असतां बहुत पिकेल.

निगाळ, पु० रा० तपकिरीचा तंबाखू दोनवेळ घोंटून गाळून राहातो जो रोपांश तो.

निगुता, २ लिं० सं० निकता.

निगूड, स्त्री० एक औषधी झाड आहे.

निगोड, २ लिं० जिनकें जा पदार्थांत गोड पडावें निमकें

तकें जांत नाहीं तो; उ० आज पोल्या निगोड झाल्या आहेत.

निग्रह, पु० लोकशास्त्रसिद्ध जी मर्यादा तद्रहित जे मनुष्यादिक त्यांस त्या मर्यादेंत आणण्या साठीं जो दंडादि शिक्षाप्रकार तो; उ० राजानें दुष्टांचा निग्रह आणि साधूंचें रक्षण करावें; २, तत्तद्विषयांपासून इंद्रियांदिकांचें जें आकर्षण तो; उ० साधूनें इंद्रियनिग्रह करावा; ३, कांहींएक कार्य केल्या वांचून राहाण्याचें नाहीं असा जो निश्चय पूर्वक आग्रह तो; उ० निग्रह केल्यानें थकलेल्या कुळांपासून पैसा उगवणार नाहीं सोईसोईनें घ्या स० उगवेल; समास इंद्रियनिग्रह इ० जाणावे.

निग्रहानुग्रहसमर्थ, वि० एकाद्यावर निग्रहाविषयीं, कि० अनुग्रहाविषयीं जो समर्थ तो; उ० राजा निग्रहानुग्रहसमर्थ आहे.

निग्रही, वि० निग्रह तृतीयार्थ आहे जास तो.

निघणें, जा जा संबंधानें जाजा पदार्थी संबद्ध जो पदार्थादि त्याणें त्याणें तत्तत्संबंध सुदां त्या जोगें त्या त्या पदार्थांपासून वियुक्त होणें; उ० तोयरांतून निघाला, त्याची चाकरी निघाली; २, कांहींएक पदार्थांत तन्नद्रुपकरून अदृश्य जो पदार्थ तो त्या त्या रूपानें प्रकट होणें; उ० दाहा रुपयांत एक रुपया तांब्याचा निघाला, याद गडांतून हिरा निघाला; ३, तत्तत्प्रापणांत कुशल होणें, कि० तत्तद्गुणें करून प्रसिद्ध होणें; उ० चोपे बंधू होते त्यांत एक कारकून निघाला, एक गाणार निघाला; आज दिवाळें निघणार, सोडत निघणार इ० स्थलीं तो तो व्यापार होणार; पाठ निघणें यथें ग्रंथापासून आपले संरक्षणा

विषयीं पराक्रमी जो त्याचा आश्रय करणें; या लेखणीनें अक्षर निघतें, या कागदावर अक्षर निघतें, स० उत्पन्न होतें; याणें निघतें घेतलें स० काढतें घेतलें; तुमची गोष्ट निघाली होती इ० प्रयोग वक्त्याच्या हृदयांत सर्वदा ती गोष्ट असती अशा अभिप्रायानें जाणावे; चालता जो पदार्थ त्याविषयीं निघणें हा प्रयोग होतो. तेथें अतित्वरेनें चालूं लागतो; उ० हा घोडा हळू चालत होता चाबूक उगारतांच निघाला तो दाहाकोश पांच घटकेंत गेला; पूर्वपक्षादि निघणें स० कांहींएक व्यवहार कर्ते जे त्यांचें त्या व्यवहारासंगीं पूर्वपक्ष इ० कांनीं तादृश व्यवहार विषय होणें.

निघा, स्त्री० निगा.

निघावा, पु० ग्रामांतरादिका प्रत जावयासाठीं निघण्याचा, कि० तद्विषयींचे सामग्री सिद्धतेचा जो व्यापार तो.

निचकणें, लग्नादि प्रहारानें मनुष्यादिकांचा अवयव तत्काल वांकें असें करणें.

निचरणें, गळूं इ० कांतील, कि० पोवांतील मलांश, कि० पदार्थांतील जलांश पातळ होऊन झरून बाहेर पडणें: उ० गळवांतील पाणी निचरूं दे. लोण्यांतील पाणी निचरूं दे. गळूनें चरसें. लोणी निचरनें, इ० स्थलीं लक्षणेनें तत्तदंतर्वर्ति जल, कि० जलांश निचरतो.

निचरा, पु० निचरण्याचा जो व्यापार तो; उ० गळवांचा चांगला निचरा झाला म्हणजे बरें होईल.

निचळ, वि० विवक्षित चलनवलनादि व्यापार न करितां

तां, बस, राहा, इ०कांचें वि०; उ० कांहीं बोलूं नको उगाच निश्चळ बैस.

निश्चाड, ३लिं० कोहींएक गुण, किं० गुण विशिष्ट पदार्थ इ०कांची जास चाहाड नाहीं तो; उ० निश्चाहाड मनुष्याजवळ गुण दाखवून फळ काय.

निश्चाडा, ३लिं० दे० निर्लज्ज.

निश्चिंत, ३लिं० निश्चिंत

निश्चूळ, पु० फणस.

निश्चेत, ३लिं० निश्चेतन.

निश्चेतन, ३लिं० निद्रा, मूर्च्छा, इ०कें करून जाचें देहभान गेलें आहे तो.

निश्चेष्ट, ३लिं० निश्चेतन.

निश्चेष्टित, ३लिं० निश्चेतन.

निज, ३लिं० सं० स्वकीय.

निजगुज, न० आपला जो परम इष्ट त्या पाशीं च सांगावयाजोगो जो अंतःकरणांतील भाव तें.

निजणें, निद्रेनें युक्त होणें; २, ला० अंथरूण इ०कांवर आडवें पडणें; ३, स्त्रीपुरुषांनीं परस्परांचा संग करणें; ४, आघातादि कारणामुळें अकस्मात् कोणेकानें मरणें; उ० तो रात्रीस जेवून निजला तो निजला; ५, ऋण, सावकारी, इ०कांनीं बुडणें; उ० त्यास हजार रुपये कर्जी दिले होते ते ठार निजले म्हणून त्याची सावकारी ठार निजली; निजून काम साधणें स० पडून अमा अर्थ.

निजसुगा, ३लिं० जाचे डोळ्यांतील झोंप पुरती गेली नाहीं तो.

निजाळू, ३लिं० बहुत निद्रा घेण्याचा स्वभाव जाचा तो.

निजो

निजोरवमी, ३लिं० जा वाणिज्यादि व्यवहारामध्यें एकाएकीं हानि होईल ही संभावना नाहीं तो; उ० गाहाणावर रुपये द्यावे हा निजोरवमी व्यवहार.

निजोर, ३लिं० अशक्त; २, जाला कोणाचा जोर नाहीं तो; उ० तो प्याटा निजोर पडला म्हणून मेला.

निजोरी, ३लिं० निजोर.

निझर, पु० उदकादिक सरून जो स्वल्प प्रवाह तो.

निझरणें, सद्रव पदार्थ झरणें.

निझरवणी, न० निझऱ्याचा जो जलांश तें.

निझाडा, पु० कांहीं एक पदार्थ सरून जी निःशेषता तो; २, दे० स्पष्ट नाहीं म्हणण्याचा जो प्रकार तो; प्रा० दे; धातूचा योगी म०; उ० मी मागितलें परंतु त्याणें निझाडा दिला.

निझाडून, अ० कोणाची भीड, किं० लाभलोभ न धरितां बोलणें, सांगणें, इ०कांचें वि०.

निटस, ३लिं० जसा असावा तसा नीट नेटका जो पदार्थ तो.

निटाई, स्त्री० नीटपणा.

निटावणी, स्त्री० निटावणें प्रथम अर्थाचा जो व्यापार तो.

निटावणें, पूर्वी यथाकथंचित सिद्ध जो पदार्थ तो जसा पाहिजे तसा नीट करणें; २, अक्षर, मनुष्य, इ०अभ्यासामुळें विवक्षितानुरूप चांगलीं होणें; ३, कांहीं एक कार्याविषयीं दुसऱ्याची अपेक्षा न धरितां पुढें सरणें; उ० शंभर शिपायांतून एक पुढें निटावला.

निटाळा, पु० वा० अतिशयित उन्हाळा होतो जा मध्यें असा जो ग्रीष्मकाल तो.

निठ

निठवें, न० केली अदशेर.

निडौंकी, २लिं० जास डांक लागला नाहीं असा जो सोनें इ० कांचा दागिना तो.

निडोळ, २लिं० जा डोळींत डोळ नाहीं ती डाव.

निठळ, निठाळ, न० कपाळास च प्रसंग विशेषीं स०; निठळचा घामाचापेसा इ० स्वतीं स्वकष्टार्जित-न्याय-तः मिळिवला जो पैसा इ० तो.

नित, अ० प्रतिदिवशीं.

नितळ, २लिं० घोंदून घांसून साफ गुळगुळीत केला जो पदार्थ तो; २, जामध्यें मलांश नाहीं असें जें तेल जल इ० तो.

नितांतणें, नितांदणें, कांहीं एक कर्मा विषयीं, किं० पदार्था विषयीं अत्युत्सुक होणें; स० नितांतल्या याचकाला बुरांडला दादल्या.

निताव, २लिं० ताव जास दिला नाहीं असें जें सुवर्णादिक तो.

नित्य, २लिं० अविनाशी; उ० परमाणू नित्य आहे; २, अ० प्रतिदिवशीं; उ० हा माझे घरीं नित्य यतो; ३, सर्वदा; उ० हा शब्द नित्य पुल्लिंग आहे.

नित्यउठून, अ० नित्य द्वितीयार्थी; नित्यारवालीं पडणें, एथें संबईरवालीं पडणें.

नित्यकर्म, न० नित्य करावयाचें जें स्नान संध्यादिक कर्म तें.

नित्यनवा, २लिं० नित्यशः करावयाचीं जीं कर्में तीं प्रथम दिवशीं सांगितलीं असतां जाचे ध्यानांत राहात नाहीं म्हणून प्रतिदिवशीं पुनःपुनः जास सांगावें लागतें असा जो मनुष्य तो.

नित्यनियम, नित्यनेम, पु० शास्त्रांमध्यें अमुक कर्म नित्य करावें असें सांगितलें नाहीं परंतु तें नित्य केलें असतां पुण्य विशेष सांगितलें अशीं जीं गीता पाठादिक नित्य करितात तीं; २, कांहीं एक गोष्ट नित्य करण्याविषयीं येतलाजो नियम तो; उ० याचाशिष्या देण्याविषयीं नित्यनियम आहे

नित्यपाठ, पु० नित्यनियम; नित्यपाठांत पडणें स० नित्यारवालीं पडणें.

नित्यपाठांतला, २लिं० नित्यारवालीं पडलेला जो व्यापार मनुष्यादि तो.

नित्यशः, अ० नित्य द्वितीय तृतीया र्थी.

नित्यांत, अ० प्रतिदिवशीं.

नित्यानें, अ० प्रतिदिवशीं.

नित्यावळ, स्त्री० एखाद्यास धर्मार्थ भोजनास नित्य ये असें एकदांच आमंत्रण देऊन भोजन देण्याचा प्रकार ती.

नित्यें, अ० नित्य प्रथमा द्वितीयार्थी.

निथणणें, रा० श्रमल्यामुळें बेंबी पासून जोर करून दांत खात बोलणें.

निथम, स्त्री० रा० पोटांत आमांश झाला असतां शौचाचे समयीं इंद्रिय तोंपलें जाई अशी जी अवस्था ती.

निथळ, पु० रा० पात्रादिकांत निथळून पडला जो जलाद्यंश तो.

निथळणें, उ० जलादिकानें भिजलेला जो पदार्थ त्याचा सर्वांगांस व्यापून राहिला जो जलाद्यंश तो एकत्र होऊन थेंबथेंब गळून निःशेष होई असें करणें.

निथळा, पु० निथळ.

निंदक, ३लिं॰निंदाकरण्याचा स्वभाव जाचा तो;उ॰निंदकाचें घर असावें शेजारीं.

निंदरखोर, ३लिं॰निंदक.

निंदण, न॰पेरलेल्या शेतांत उनाड उगवलें जें तृणादिक तें;उ॰या शेतांतील निंदण काढ.

निंदणी, स्त्री॰शेतांतील निंदण काढण्याचा जो व्यापार तो.

निंदणें, शेत,इ॰कांची निंदणी करणें.

निंदणें, कोणेएक पदार्थास दोषविशिष्टयें करून वर्णिणें.

निंदर्शनास, अ॰अनुभवास प्रा॰य,धा॰वि॰;उ॰तुम्हीं बोलत होतां तें निंदर्शनास आलें.

निंदर्शनी, अ॰परिणामी;समज,कळ,धा॰वि॰;उ॰तुम्हीं करितां ती गोष्ट इचें फळ निंदर्शनी समजेल.

निंदा, स्त्री॰कोणाचें दोषयुक्तलें करून जें वर्णन तो;उ॰तो गृहस्थ चांगला असून त्याची कां निंदा करितां.

निंदारखोर, ३लिं॰निंदक.

निंदाँती, ३लिं॰ज्यास दांते नाहींत असा जो तुंबजोड, फणी,इ॰तो.

निदान, न॰रोगादिकाचें जें बीजभूत कारण तें;२,निरुपायरूप जी अवस्था तें;उ॰सोईरे धाईरे संपत्तीचे लोक निदानीचा एक पांडुरंग;३,कांहींएक संख्या परिमाण इ॰कांचा उत्कृष्ट निकृष्टतेचा जो परमावधि तें;उ॰या धोतर जोडयास दाहा रुपये पडतील हें निदान सांगितलें आहे पाहिजे तर घ्या, स॰आहून पराकाष्ठा राहिली नाहीं असें तात्पर्य असतांच म॰;४,अ॰निकृष्ट पक्ष अवलंबून लक्षून;उ॰ या कार्यास निदान दाहा रुपये पाहिजेत.

निदानचा, ३लिं॰पराकाष्ठेचा संकटदशेंत उपयोगी पडतो तो.

निदावा, पु॰स्वामित्वादि संबंध राहित्य तो;उ॰त्याचा निदावा करूनही जमीन त्याणें घेतली.

निदावापत्र, निदाव्हेपत्र, न॰निदावा लिहिला आहे जा पत्रांत तें.

निंदित, ३लिं॰शास्त्रादिकामध्यें जाची निंदा केली आहे तो.

निदुधी, ३लिं॰जास स्वल्प दुग्ध आहे अशी जी गाय, म्हैस, इ॰तो.

निदेश, पु॰सं॰आज्ञा.

निंद्य, ३लिं॰निंदा कराया योग्य असें जें वस्तु,पुरुष,गोष्ट,इ॰तो.

निद्रा, स्त्री॰झोप.

निद्रालू, ३लिं॰झोपाळू.

निद्रित, ३लिं॰निद्रावस्थापन्न जो तो.

निधडा, ३लिं॰कोणेक कार्या विषयीं मागें नसरता निःशंकपणें प्रवृत्त व्हावया जोगें जा मध्यें सामर्थ्य आहे तो त्या विषयीं.

निधडा, पु॰आपल्या अंतःकरणांतील,किं॰परिच्छादिकें करून अन्याचे अंतःकरणांतील कितेक धर्माविषयीं जी खात्री तो;सांग,टे,इ॰कांचा योगीं म॰;२,धैर्यवान;उ॰निधडा वीर पडला रणीं.

निधन, न॰सं॰मरण.

निधा, पु॰दे॰भोंवरा फिरते समयीं एकाच ठिकाणीं चलन न पावतां फिरण्याची जी स्थिति तो.

निधाई, निधाया, स्त्री॰ पाड. लाग. इ॰ कांचा योगीं प्र॰ अर्थ, कांहीं एक व्यापारानें मोठी कीर्ति, बहुत द्रव्य, इ॰ मिळिवणें परंतु कोणेकापासून तत्तद्व्यापारानीं तें तें घडाव्याचें नसतां; किं॰ घडलें नसतां निंदेनें प्र॰ उ॰ पागोटें बांधाव्याचे विषेनें मोठी निधाई पाडाल बारावर्षे रोजरागार करून पन्नास रुपये घेउन आले मोठी निधाई लाविली.

निधान, न॰ जा ठेवण्याचा स्वामी मसिद्ध नाहीं असेंजें जमीन इ॰ स्थलीं ठेवणें सांपडतें तें; विशेषें निधान, गुणाचें निधान, इ॰ स्थलीं त्या त्या विशेषें पात्र असा अर्थ; ला॰ विवक्षित गुणवान् जो त्याचा स्तव कर्तव्य असतां केवल निधान शब्दानेंच व्यवहार करितात; उ॰ आमचा बेळ केवल निधान आहे, गुण, विद्या, इ॰ शब्द मागें लागले असतां समास होतात; गुणनिधान विद्यानिधान, इ॰; स॰ धान्य तेथें पुत्री, निधान तेथें विंद्री.

निधारती, स्त्री॰ वा॰ निधाई; हा शब्द नित्य बहुवचनांत; २, २ लिं॰ निधारती पाडल्या जाणें तो; उ॰ तूं निधारती झालास.

निधाव, पु॰ निधाई.

निधि, पु॰ निधान ग्रथमार्थी; २, खर्व, पद्म, महापद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील, हे नऊ प्र॰; उ॰ त्यास नऊ निधि आणि अष्ट सिद्धि अनुकूल आहेत.

निनावा, पु॰ निधडा ग्रथमार्थी: २. २ लिं॰ जास नाव नाहीं तो.

निपचेत, २ लिं॰ मूर्च्छा इ॰ कारणा मुळें झाला जो निश्चेष्ट तो, पड, हो, धा॰ वि॰.

निपज

निपज, पु॰ उपज सुरव्यार्थी.

निपजणें, उपजणें; २, तत्तद्रूपें करून दृष्टोत्पत्तीसयेणें; उ॰ बरासा दिसत होता परंतु तो सादा निपजला.

निपजत, २ लिं॰ वा॰ निपचेत.

निपट, २ लिं॰ मा॰ केवल या अर्थी; उ॰ निपट मागवा, निपट दरिद्री.

निपटणें, मा॰ मध्यम, सद्रव, पातळ, पदार्थ जमीन इ॰ कांवरून नि:शेष होई असा हस्तादिकानें काढणें; उ॰ हें शेण निपटून भर.

निपटारा, २ लिं॰ कोणत्या कार्यी विषयीं जो अभ्योजक तो.

निपटीशिपटी, स्त्री॰ पोरांस भरिवते वेळेस निपटूनशिपटून घेतलाजो अभ्यांद्रा तो.

निपटूनशिपटून, अ॰ सद्रव, मध्यम, पातळपदार्थ नि:शेष होई असें रवा, काढ, पुस, इ॰ धा॰ वि॰; उ॰ त्या मांजरानें मडक्यांतील दूध निपटूनशिपटून खालें.

निपणआजा, पु॰ आजाचा आजा तो.

निपणआजी, स्त्री॰ आजाची आजी ती.

निपणआजोळ, न॰ निपणआजाचें घर तें.

निपणआजळ, न॰ वा॰ निपणआजोळ.

निपणातू, पु॰ नातवाचा नातू तो.

निपणनातवंड, न॰ नातवाचें नातवंड तें.

निपनाळा, २ लिं॰ कोणेकापासून द्रव्यादि लाभझाल्या सुळें लाचा झालाजो ओशाळा तो.

निपरजत, २ लिं॰ वा॰ निपचेत.

निपाडसा, २ लिं॰ ए॰ ताल्हा त्याचे पलीकडे पाड-

सा

सा त्याचे पलीकडला जो तो.

निपाणी, २ लिं० दमदार जमी नींमध्यें पाणी घातल्या वांचून द्यावयाजोगा जो ऊस इ० लाविंतात तो; २, जा दुग्धादि पदार्थांत पाणी घातलें नाहीं तो; ३, स्वस्त जा देशांत जल तो.

निपाण्याचा, २ लिं० निपाणी.

निःपात, पु० मारणें, खाणें, इ० कांनीं निःशेष द्यावयाजोगा जो पदार्थांचा नाश तो.

निपालवाचा, २ लिं० रा० शेवटले बाराचा जो भोंपळा, वांगें, इ० तो; उ० वांग्यास पाणी न मिळतां निपालवाचीं वांगीं लागूं लागलीं.

निपुटी, २ लिं० जा औषधादिकांस पूठ नाहीं असें जें औषधादिक तो.

निपुण, २ लिं० जो जा कसबांत पूर्ण तो त्या विषयीं.

निपुत्रिक, २ लिं० जास पुत्र नाहीं तो.

निपूटशिपूट, न० निपटीशिपटी; उ० निपूटशिपूट घेईतो आपले आओळा जोई.

निपूर, स्त्री० नपूर.

निपोटी, २ लिं० चाकर इ० कांस मतिमासाचा ठायीं जें देय त्यांतच त्यांचें पोट अशा रीतीनें ठराविली जी चाकरी, बोली, इ० तो; २, रा० चाकर इ० कांस मतिमासीं देय जें नक्त त्या रोखीज पोटास देण्याचे ठरावानें ठरविली जी चाकरी, बोली इ० तो.

निप्राण, २ लिं० अत्यंत अशक्त तो.

निफांद्री, २ लिं० जिला फांसा नाहीं अशी जी उतली इ० तो.

निफाळी, २ लिं० जास फाळ नाहीं असा जो नांगर तो.

निंब, पु० कडु निंब, कडिनिंब, इ० ते प्र०.

निंबर, २ लिं० जून जो पदार्थ तो; २, काष्ठ, पाषाण, इ० जो कठीण पदार्थ त्यासही प्र०; ३, न० सूर्यकिरण संबंधी जो ताप तें.

निंबलोण, न० कोणाचा दृष्टिविकार निघावा म्हणून कडु निंबाची पानें, लवण, इ० पदार्थ मुखावरून उतरून टाकण्याचा जो प्रकार तें, व ते सर्व पदार्थ मिळून तें, उतर, कर, इ० धा० वि०.

निंबळ, २ लिं० बलहीन जो पदार्थ तो.

निंबा, २ लिं० रा० लग्न द्यावयाची योग्यता आली असतां जाचें लग्न न झालें तो.

निंबाकी, स्त्री० सावकार इ० कांचा देण्या घेण्याचा उलगडा करून जी निःशेषता ती.

निंबारा, पु० झाड आहे त्याचें फल.

निंबिड, २ लिं० गर्द मथम्मार्थी; निद्रा, आरण्य, छाया, अंधकार, मेघ, इ० कांचें वि०.

निंबी, स्त्री० रा० एक झाड आहे जाजवर निंबे येतात ती.

निंबीं, न० कांहीं एक पदार्थांचें बीजही नराही असा जो अभाव तें.

निंबू, न० कागदी निंबू, सारवर निंबू, इ० तीं प्र०.

निंबूण, स्त्री० निंबी.

निंबूर, पु० बाजरीचीं कणसें आसन्न पक्व दशेस आलीं जीं तो.

निंबोटी, स्त्री० निंबाचे अर्धा मध्यें सारवर, सुंठ, सेंधव, इ० पदार्थ घालून औष करितात ती; २, दे० अर्धे निंबू ती.

निंबोणी, स्त्री० दे० निंबूण.

निंबोळी, स्त्री० कडु निंबाचें जें फल ती; २, पु० ए

क रंग आहे; २, २लिं० ताडिलेला; स० निंबाला आल्या निंबोळ्या आणि कारल्याला आल्या गळवोंटया.

निभगणें, स्वापरपोळ्या, दोणे, इ० भाजावयाचें मृत्तिकेचें पात्र तें तडयानीं युक्त होणें

निभणें, कोणेक पदार्थाचा जा व्यापारापासून, किं० संकटापासून नाश होण्याची संभावना आहे त्यापासून त्राणें पारपडणें; उ० हें लांकूड तासतें बळेस मोडेल असें वाटलें परंतु निभलें; २, कांहीं एक व्यापाराचा अभ्यास झाल्यामुळें तो व्यापार सिद्धीस नेण्या विषयीं योग्य होणें; उ० तो लिहिण्याचा कामांत निभला; ३, कांहीं एक आरब्ध व्यापार यथास्थित पणें सिद्धीस जाणें, किं० तलवारी पुरुष त्याला व्यापारापासून पार पडणें; उ० हें काम त्याचे हातून निभलें तो या कामांत निभला.

निभाती, २लिं० जांत भाताचे दाणे नाहींत असे जे तांदूळ, करडइ० तो.

निभाव, पु० निभले पणा; उ० या कामांत माझा निभाव होईल.

निभावणी, स्त्री० निभाव.

निभावणूक, स्त्री० निभाव.

निभावणें, उ० निभे असें करणें.

निभ्रांत, २लिं० ज्या विषयांत जास भ्रांति नाहीं तो त्या विषयांत; उ० या विषयीं मी निभ्रांत आहें; २, अ० भ्रांति नधरितां, जा, कर, इ० धा० वि०; उ० तूं निभ्रांत जा.

निमक, उ० نمک हिं० मीठ.

निमकहराम, २लिं० نمکحرام हिं० कृत घ्र.

निमकें

निमकें, न० कोणेए संख्या दोहोंनीं भागिली असतां अमुक फळ येतें अशा तऱ्हेची मुळांस शिका विण्याची आहे तें; उ० बारा निमे साहा, बेळ, घोडें, यांवर निमे ओझें घाला व काळोगें जें तें मा० त्याची लकात देते समयीं म०.

निमरवाई, स्त्री० अर्थेल: घ्र० सकुंचित.

निमग्न, २लिं० जलादिकांत बुडला तो व व्यवहारांत सुचेना असा कांहींएक व्यवहारांत पडला तो त्या व्यवहारांत; उ० तो गाण्यांत निमग्न आहे.

निमचा, उ० लाहान जी तलवार तो.

निमज्जन, न० सं० पाणी इ० कांत बुडण्याचा जो व्यापार तें

निमणें, घं० शांत होणें; संकेतानें मरण्यास घ्र०.

निमताना, पु० शेत, इ० कांची पाहाणी करनेवेळेस यांत अमुक उत्पन्न होईल असा अदमास कळावा म्हणून त्यांतील कांहीं अंशाचा अनुभव पाहून उत्पन्नाचा अदमास पाहाण्याचा जो प्रकार तो.

निमदस्ती, २लिं० रा० शेत इ० कांचा धान्यास निमें धान्य देण्याचा जो ठराव तो व त्या ठरावानें केलें जें शेत इ० तो.

निमपट, स्त्री० रा० अर्धानें गुणाचें असतां गुण्यांकाचा जो अर्धभाग घेतात तो.

निमा, २लिं० अर्धा; २, अंगरख्याचा एक भेद आहे.

निमाई, स्त्री० निमरवाई.

निमाज, स्त्री० نماز हिं० नमाज.

निमित्त, न० कांहीं एक व्यापार करण्याविषयीं जें उद्देश्य तें; उ० पोट भराया चा निमित्तानें चाकरी करा-

वी

बी लागती; २, कांहीं एक व्यापाराचें जें कारण तें; उ० तो चोरीचे निमित्तानें फांशीं गेला; ३, नकरितां कांहींएक गोष्टीचा आळ तें; उ० त्याणें चोरी केली नसतां चोरीचें निमित्त आलें; ४, कांहींएक व्यापाराचें वास्तवीक कारण नसतां कल्पित जें कारण तें; उ० पोटदुखीचें निमित्त करून घरीं राहिला; उद्देश्य निमित्त, कि० सिद्धनिमित्त यांचा पाठीमागें चोरी इ० निमित्त विशेष लाविलें असतां विशिष्टाचा समास होतो तें अव्यय त्याचा अन्वय क्रियेवर होतो; उ० चोरी निमित्त हजार रुपये खर्च आला; निमित्तास टेंकणें, स० कोणेक व्यापार बिघडाचा सणून स्वल्प कारण शोधणें; निमित्त देणें, स० एखादे पदार्थास, कि० व्यापारास, वास्तवीक खोड, नसतां खोडीचा आरोप करणें; निमित्त टाळणें, स० कांहींएक व्यापारानें आपल्या वरील शब्द चुकिवणें.

निमित्तकारण, न० घटादिकांचा उलटीस कुंभार, इ० जें उपयुक्त साधन तें.

निमित्तधारी, ३ लिं० टिळ्याचा धनी.

निमित्तभूत, ३ लिं० निमित्त धारी.

निमिताचा, ३ लिं० जास स्पर्शादिक व्यापार केला असतां मोडला, तुटला, इ० निमित्तें दुसऱ्यावर यावयाजोगा जो पदार्थ तो; उ० ह्याचाकू निमित्ताचा आहे हात लावतांच मोडेल संभाळ; २, टिक्याचा धनी तो.

निमिष, निमेष, पु० नेत्राचे पापण्याचा जो स्वभाव सिद्ध उघडणें, मिटणें असा व्यापार त्यांतील जो मिटण्याचा व्यापार तो; २, तदुपलक्षित जो काल तोही.

निमिषार्ध, निमेषार्ध, न० निमिष द्वितीयार्थाचें जें अर्ध तें.

निमिषोन्मेष, पु० डोळ्याचा पापण्या उघडण्याचा मिटण्याचा, जो स्वभावसिद्ध व्यापार तो; उ० प्रीतीनें पाहूं लागला तों निमिषोन्मेष विसरला.

निमूर, २ लिं० निपचेत.

निमें, २ लिं० अर्धा.

निमेनिम, निमोनिम, २ लिं० अर्धा.

निमेषोन्मेष, पु० निमिषोन्मेष.

निमोळता, २ लिं० प्रा० कमानें जो उतरता तो.

नियत, ३ लिं० जाची संख्या, कि० व्यापार, इ० विषयक नियमाचा कधींही भंग होत नाहीं असा जो तो; उ० आमचा घरीं नियत वीस पायें होतात रेवरीज आला गेला.

नियंता, ३ लिं० कोणेक मनुष्यादि पदार्थ अमुक नियमानें राही असें करणारा तो.

नियम, पु० कोणेक गोष्टीविषयीं काल, देश, ईश्वर, आधुनिक, इ० कांनीं बांधला जो बंद तो; उ० कसंतामध्यें कोकिलानीं शब्द करावा असा नियम आहे; आम्हीं एकवेळ जेवण्याचा नियम केला आहे.

नियमन, न० कोणेक पदार्थास नियमानें ठेवण्याचा जो व्यापार तें; उ० मनाचें नियमन केलें असतां ईश्वर प्राप्ति लवकर होती.

नियमनिष्ठ, ३ लिं० स्नानसंध्यादि कराचाचें जें नियमानें कर्म तें अवश्य निष्ठेनें करावें असा जाचा स्वभाव तो.

नित्यनिष्ठा, स्त्री० स्नानसंध्यादि रूप जें नित्यनिष्ठेचें कर्म तीं.

नित्यशील, २लिं० नित्यनिष्ठ; २, कांहींएक केलाजो नित्यम त्यासकधींही टळत नाहीं तो.

नित्याचा, २लिं० सदाचरणाविषयीं जाचा नित्यम आहे असा जो त्याची निंदा कर्तव्य असतां मोठा गेला नित्याचा असा प्र० करितात.

नित्यमित, २लिं० जा पदार्थाचा कांहींएक नित्यम करून ठेविला तो; २, नित्यमानें अभिसंबद्ध तो; ३, नियत.

नित्यमी, २लिं० नित्यमशील

नियामक, २लिं० नित्यम करणारा जो तो; २, नित्यम प्रदर्शक तो; उ० एकादशी करावी या विषयीं शास्त्र नियामक आहे.

नियुक्त, २लिं० कांहींएक कार्याविषयीं योजिला तो.

नियुत, २लिं० १०००००.

नियोग, पु० कोणेकास कोणेकस्थलीं, किं० व्यापारीं नियुक्त करण्याचा जो व्यापार तो; २, कांहींएक कर्म करण्याविषयीं जी आज्ञा तो.

निरंकुश, २लिं० लोकशास्त्रसिद्ध मर्यादा न गणतां केवल स्वभावानेंच वागण्याचा स्वभाव जाचा तो.

निररव, पु० बाजार संबंधी जो जिनसाचा भाव तो; बाजार निररव अप्रतिष्ठा इ० करणें, स्म० सर्वांस विदित होई अशी अप्रतिष्ठा करणें.

निररवणें, एकाग्र दृष्टीनें चित्रादिक पाहाणें.

निरख्या, २लिं० निररवाचा कामावर जो शोकशी करितां ठेवितात तो.

निरं

निरंजन, न० पु० देवापुढें दीप लावायासाठीं धातुमय पात्र करितात तें तो; २, जन्म, मरण, दुःख, इ० कांस कारणीभूत जें मारश्च तद्रहित जो ईश्वरादि तो.

निरण, न० नाभीचा खालचा आणि गुह्यावरचा जो भाग तें; २, गाय, म्हैस, इ० कांची जी योनि तें; गाय इ० कांनीं निरण करूं लागणें, स्म० लवकर प्रसूत होण्या साठीं तें अंग शिथिल करूं लागणें.

निरपणें, निपटणें; २, ला० केलेलें कर्म निस्तरणें; स्म० भलते ठायीं डगावें आणि निरपत बसावें.

निरपराध, २लिं० अपराधरहित: अ० अपराध नसतां मारणें, हाणणें, इ० कांचें वि०.

निरपराधी, २लिं० निरपराध.

निरभिमान, २लिं० अभिमान रहित.

निरभिमानी, २लिं० निरभिमान.

निरभ्र, २लिं० अभ्ररहित जें आकाश, दिवस, इ० तो; २, न० अभ्र राहित्य तें.

निरय, पु० सं० नरक.

निरर्थक, २लिं० जास अर्थ नाहीं असा जो शब्द प्रयोग आदिकरून तो; २, उपयोग जाचा नाहीं तो; ३, अ० उपयोगा वांचून, मार, बोल इ० धा० वि०.

निरवणी, स्त्री० निरवण्याचा जो व्यापार ती.

निरवणूक, स्त्री० निरवणी.

निरवणें, ग्रामांतरास जाणारा, सन्यास येणारा, आसन्नमरण जास वाटलें असे जे त्याणीं मागें राहाणारे जे पुत्रादिक त्यांस अमुक रीतीनें अमुक करा, किं० देणें, घेणें, इ० व्यवस्था सांगणें; २, आपण

कर्तव्य

कर्तव्य जें कार्य त्याविषयीं आपले स्थानीं दुसरा कल्पून त्याजवर तें कार्य सोंपणें.

निरवयव, २लिं० अवयव रहित जो ईश्वर परमाण्वादि तो.

निरवानिरव, स्त्री० अनेक पदार्थांची अनेकांजवळ जो निरवण्याचा व्यापार ती.

निरशन, न० उपवास मुख्यार्थी; २, धान्योपहार कल्पिल्या वांचून जें व्रतादिक तें तद्विशेषणत्वें करून ही प्र० करितात; उ० आज त्याला निरशन एकादशी आहे.

निरशी, २लिं० पाणीं घातल्या वांचून. तापविल्या वांचून, जें दुग्ध त्याचेंच प्रा० वि०; २, स्त्री० वा० कांहीं एक व्यापाराच्या, किं० पदार्थांचा जो कंटाळा ती; उ० एकच भाजी नित्य होऊं लागली म्हणून तिची निरशी आली.

निरस, २लिं० स्वसजातिय जे अनेक पदार्थ त्यांत जाची योग्यता कमी तो; उ० हें सोनें निरस आहे.

निरसणें, उ० प्राप्त झालें जें विप्रादिक, किं० दोषादिक तें दूर होई असें करणें.

निरसन, न० निरसण्याचा जो व्यापार तें.

निरसें, २लिं० निरशी प्रथमार्थी.

निरहंकार, २लिं० जास अहंकार नाहीं तो.

निरहंकारी, २लिं० निरहंकार.

निरक्षर, २लिं० अक्षरज्ञानु तो.

निरा, पु० रा० पांढरें एक गवत आहे; २, मद्यभेद आहे; ३, स्त्री० एका नदीचें नाव आहे; ४, निरसें.

निराकरण, न० निरसन; २, जी गोष्ट आपल्याकडे आली तिचा जो परिहार तें.

निराकार, २लिं० जास आकार नाहीं असा जो ईश्वरादि पदार्थ तो.

निराट, २लिं० वा० वृक्षादिकांची छाया इ० जेथें नाहीं तो जागा इ० तो.

निराधार, २लिं० मुख्य लाक्षणिक आधार रहित जो तो.

निराशा, २लिं० जा पदार्थावर इच्छा असतां तो, पदार्थ मिळत नाहीं असा निश्चय झाल्या मुळें आशाभंग जाचा झाला तो; २, आतां हा पदार्थ नको अशी बुद्धी जास झाली तो.

निराशा, स्त्री० आशाभंग ती.

निराश्रय, २लिं० निराधार.

निराश्रित, २लिं० आश्रित नव्हे तो.

निरास, पु० सं० निरसन.

निराहार, पु० निरशन.

निराळा, २लिं० विवक्षितांहून इतर तो.

निरिच्छ, २लिं० कोणेक गोष्टी विषयीं इच्छा नाहीं जास तो.

निरी, स्त्री० वस्त्रादिकांची मोठी चुणी काढितांना ती.

निरीक्षण, न० बारीक दृष्टीनें जें अवलोकन तें.

निरीक्षणें, निरखणें.

निरुक्ति, स्त्री० सं० कोणेक पदार्थाचें स्वरूप समजाया साठीं लक्षण बांधितात ती; २, लक्षणादिकें करून जें स्वरूपकथन ती.

निरुतें, अ० यं० निश्चयें.

निरुत्तर, २लिं० उत्तर करण्या विषयीं कुंठित झाला.

झाला तो ;२, न० उत्तराभावतें ;उ० तुमचे बोलण्यावर निरुत्तर हें च उत्तर.

निरुंद, २लिं० अरुंद.

निरुद्ध, २लिं० जाचा निरोध झाला तो.

निरुद्योग, २लिं० उद्योग करूं नये असा जाचा स्वभाव तो;२, इच्छित उद्योगाची सोय नाहीं जाची तो.

निरुद्योगी, २लिं० निरुद्योग.

निरुपकारी, २लिं० कृतघ्न;२, कोणाचे उपयोगी पडूं नये असा स्वभाव जाचा तो.

निरुपद्रव, २लिं० विवक्षितोपद्रव रहित जो तो.

निरुपम, २लिं० अनुपम.

निरुपयोगी, २लिं० अनुपयोगी.

निरुपाय, पु० कोणेक कार्या विषयीं कोणेकाचा उपाय चालेनासा झाला अशीजी दशा तो ;उ० माझा निरुपाय झाला म्हणून असें कर्म केलें;२, कांहीं एक कार्या विषयीं जाचा उपाय चालेनासा झाला तो ;३, जावर उपाय चालत नाहीं. असा जो रोगादिक तो

निरू, पु० रेच जांत घातली नाहीं असा जो चुना त्यास लावणें, इ० प्रसंग विशेषीं स० ;२, सामान्यतः निर्मळ जो स्वच्छ निर्मळ पदार्थ तो.

निरूपक, २लिं० निरूपण करणारा जो तो.

निरूपण, न० कांहीं एक गोष्टीचे लक्षण स्वरूप प्रामाण्यादिकें करून जें कथन तें.

निरूपिणें, लक्षण स्वरूपादिकें करून कांहीं एक गोष्ट कथणें.

निरूपित, २लिं० निरूपण केलें जाचें तो.

निरोग

निरोग, २लिं० रोग रहित जो तो.

निरोगी, २लिं० रोग रहित जो तो.

निरोध, पु० कांहीं एक कार्या विषयीं जो प्रतिबंध तो.

निरोप, पु० असुकास असुक जाऊन सांग अशी जी गोष्ट सांगितली तो ;२, कोणेकास गमना विषयीं जी आज्ञा तो ;उ० मीं निरोपमागत होतों परंतु निरोप होईना ;चाकर इ० कांस निरोप देणें स० चाकरी इ० कांवरून दूर करणें ;चार गृहस्थांचा निरोप घ्यावयाचा आहे एथें त्यांपासून पाठवणी घ्यावयाची आहे.

निरोप्या, २लिं० जाबरोबर निरोप सांगून पाठविला तो ;२, दुसऱ्यानें जो निरोप सांगितला आपेक्षां अधिक बोलण्याचा प्रसंग पडला असतां जास बोलण्याचें भान नाहीं, किं० अधिक बोलण्याविषयीं यजमानाची आज्ञा नाहीं तो.

निर्ऋति, स्त्री० दक्षिण आणि पश्चिम यादोन दिशा मधली जी दिशा ती ;२, पु० त्यादिशेचा अधिकारी देव आहे तो.

निर्गत, स्त्री० कोणेक कार्याची निभावणी, किं० उलगडा ती ;उ० माझाहातून या कामाची निर्गत लागेल सें वाटत नाहीं ;२, कांहीं एक पदार्थापासून जो निघाला तो.

निर्गम, पु० निर्गत पथमार्ग.

निर्गोठ, स्त्री० गाठींत एकभेद आहे.

निर्गुंड, स्त्री० एक वनस्पति आहे.

निर्गुंडी, स्त्री० निर्गुंड.

निर्गुण, २लिं० सत्वरजस्तमादि गुणरहित जो

ईश्वर

ईश्वर तो;२,जा मध्यें चांगलागुण नाहीं असा जो मनुष्यादि तो.

निर्गुणी,३लिं०निर्गुणद्वितीयार्थी.

निर्घोर,३लिं०निघोर.

निर्जन,३लिं०जेथें लोक नाहींत असाजो देश,किं० काल तो.

निर्जल,३लिं०जल जादेशामध्यें पारच्य कमी तो देशादिक तो;२,पाणीही प्यावयाचें नाहीं अ-सेंजें उपोषणादिक तो.

निर्जली,निर्जळी,स्त्री०जेष्ठवद्य एकादशी तो.

निर्जित,३लिं०सर्वोंकरून जिंकिल्ला जो तो.

निर्जितेंद्रिय,३लिं०सर्व प्रकारानीं जिंकिलीं आ-हेत इंद्रियें जाणें तो.

निर्जीव,३लिं०जा मध्यें जीव नाहीं तो पाषाणादि-क तो;२,ला०अशक्त.

निर्झर,पु०झरा.

निर्ठवणें,जा मडक्यांत तूप,तेल,इ०ठेवायाचें त्याम-डक्यांत प्रथमतः पाणी भरून टेवून तेल इ०जि-रेनासें करणें;२,ला०व्यभिचारादि कर्मांविषयीं निर्लज्ज होणें.

निर्णय,पु०संदिग्ध स्थल,किं०भ्रम स्थल,यांचा वि-चार करून जो ठराव तो.

निर्णयपत्र,न०निर्णय जांत लिहिला आहे असें जें पत्र तें.

निर्णायक,३लिं०निर्णय करण्याचे उपयोगी जो साधन भूत पदार्थादि तो;२,निर्णय करणारा जो मनुष्यादि तो

निर्णीत,३लिं०निर्णय जाचा ठरला तो.

निर्तु

निर्तुटकं,न०कज्जा इ०कांहीं एक व्यवहाराचा नि:-शेष तुटण्याचा जो प्रकार तें.

निर्दंदान,निर्दंधात,३लिं०खाण्या पिण्याची जास दंदात नाहीं तो.

निर्दय,३लिं०दयारहित जो तो.

निर्दलन,निर्दळण,न०कोणेक पदार्थाचा नि:-शेष जो नाश तें.

निर्दाळण,न०निर्दलन.

निर्दाळणें,कोणेकांचें निर्दलन होई असें क-रणें.

निर्दुष्ट,३लिं०दोष विशिष्ट नव्हे तो.

निर्देश,पु०अमुक लक्षण दारिवडण्याचा व्या-पार तो.

निर्दैव,३लिं०दैव हीन जो तो.

निर्दोष,३लिं०दोष रहित जो तो.

निर्धन,३लिं०धन रहित जो तो.

निर्धांत,३लिं०द्रव्यहीन देश,मनुष्य इ०तो;२, साचे आंगांत धातू नाहीं तो,वस्त्राचें अंग.

निर्धार,पु०ही गोष्ट अशीच असेंजें नि:संदेह-पणाचें ज्ञान तो.

निर्धारण,न०कांहीं एक गोष्टी विषयीं जो संदेहा-भाव तें.

निर्धारणें,कांहीं एक गोष्ट नि:संदिग्धपणें जा-णणें.

निर्धूत,३लिं०द्रव्य हीन जो तो;२,न०द्रव्यादि राहित्य;उ०पेंढाऱ्यानीं त्या देशांत जाऊन अग-दी निधूत केलें.

निर्धूतपाप,३लिं०जाणें आपले पापाचें क्षा-

लन

लन केलें आहे असा साधु इ० तो.

निर्नायक, २लिं० ज्या देशादिकांस नायक नाहीं तो देशादिक तो.

निर्नायकी, स्त्री० निर्नायकपणा; उ० त्या देशांत निर्नायकी झाली या मुळें स्वराज्य झालें.

निर्निमित्त, अ० निमित्ताशिवून, बोल, जा, इ० धा० वि०.

निर्निराळा, २लिं० निराळा निराळा.

निर्बंध, पु० कोणत्याही गोष्टी विषयीं आग्रह पुरस्सर जो निश्चय तो; २, कांहीं एक गोष्ट अमुक रीतीनें राहावी म्हणून केलीजी मर्यादा तो.

निर्बल, निर्बळ, २लिं० बल रहित जो तो.

निर्बली, २लिं० जास बल नसेल त्यासच मारावें असा जो बुद्धबळें खेळण्याचा प्रकार तो डाव.

निर्बाणी, २लिं० कांहीं एक कार्या विषयीं कोणाची अपेक्षा न धरितां स्वतंत्र्यें करून नें कार्य करण्या विषयीं समर्थ तो.

निर्बाध, २लिं० बाध रहित.

निर्बीज, २लिं० जाचें बीजही उरलें नाहीं असा निःशेषपणा पावला तो; २, न० अशा प्रकारानें जो नाश तें; ३, २लिं० जा फलांत बीज नाहीं तें फलादिक तो; ४, जा गोष्टीस मूळ अधीर नाहीं ती गोष्ट इ० तो; क्रमानें सर्व अर्थाचीं उदाहरणें; उ० देंकूण निर्बीज झालें; त्याचें निर्बीज झालें; केदाणा निर्बीज आहे; त्याणें ही गोष्ट निर्बीज सांगितली.

निर्बुद्ध, २लिं० जाची शास्त्रादिकांत बुद्धि चालत नाहीं तो.

निर्बुद्धि, २लिं० निर्बुद्ध.

निर्भय, २लिं० भय रहित जो तो; २, न० भयराहित्य.

निर्भर, पु० कांहीं एक कर्मा विषयीं अतिशय निष्ठा, कि० आग्रह तो.

निर्भर्त्सना, स्त्री० कोणेकाचा पाणउतारा करावा एतदर्थ केला जो मा० त्याचे सुरवाबर, कि० मारें गालिप्रदानाचा, कि० निंदावाक्य इ० बोलण्याचा व्यापार ती.

निर्भीड, २लिं० जास कोणेकाची भीड नाहीं तो.

निर्भेळ, २लिं० जा पदार्थांत दुसऱ्या विजातीय पदार्थांची भेळ नाहीं तो.

निर्मम, २लिं० जास ममता नाहीं तो.

निर्मर्याद, २लिं० जास मर्यादा नाहीं तो.

निर्मल, निर्मळ, २लिं० वस्त्रादिकांचा मृत्तिकादिक, आकाशाचा अभ्र, बुद्धीचा दोषांचें कपट इ० जे त्या त्या पदार्थाचे मल तत्तद्रहित जो तो तो पदार्थ तो.

निर्मळी पंचपात्री, स्त्री० पंचपात्रींत एक भेद आहे.

निर्माण, २लिं० उत्पत्ति विशिष्ट, दा, कर, इ० धा० वि०.

निर्मानुष, २लिं० मनुष्य रहित जो देशादिक तो.

निर्माल्य, पु० न० वा० देवादिकावर वाहिलेजो पुष्पादिपदार्थ तो; २, तो पदार्थ पादस्पर्शादिनेक कारणानीं देवास वाहाण्याचा उपयोगी पडत नाहीं तो; ३, ला० जा मनुष्यादि पदार्थांत तेज राहिलें नाहीं, कि० मुळचेंच नाहीं तो.

निर्मिणें, मनुष्यादि पदार्थ उत्पन्न होईं असें करणें; २, उत्पन्न झालेल्या पदार्थाचा देवीं अमुक कालीं अमुक होईल अशा रीतीनें ईश्वरानें लिहिणें; उ० ईश्वरानें जसें जसें निर्मिलें असेल तसें तसें घडेल.

निर्मित, वि० निर्माण केला जो तो; २, न० देवलिखित तें; उ० जसें निर्मित असेल तसें घडेल.

निर्मुक्त, वि० कोणेकास संकटादिकापासून मुक्त झाला तो; उ० कर्जापासून निमुक्त झालों.

निर्मूल, वि० मुळा सुद्धां नाशपावला जो वृक्षादिक; उ० कोकाट्यानीं वृक्ष निर्मूल झाले; २, जास मूल नाहीं असा वृक्षावयवादिक तो: उ० निर्मूल झाड घेऊं नये; ३, न० समूल नाश पावल्यामुळें जो वृक्षादिकांचा अभाव तें; उ० यारानांत वृक्षांचें निर्मूल झालें; ४, वि० ला० जा वचनादिकास मूल आधार नाहीं, असें वचन वर्तमानादि तो; शत्रु इ० कांचें निर्मूल करणें इ० स्थलीं समूल नाश करणें.

निर्मोह, वि० सं० मोह रहित जो तो.

निर्याण, न० सं० स्थल सोडून निघण्याचा जो व्यापार तें.

निर्लज्ज, वि० सं० कोणेक गोष्टी विषयीं जास लाज नाहीं तो.

निर्लेप, वि० सं० जो पदार्थ शिजविल्यानें, भाजल्यानें खरकटा होत नाहीं तो पदार्थ.

निर्लोभ, वि० सं० लोभ जास नाहीं तो.

निर्लोभी, वि० निर्लोभ.

निर्लोभ, वि० लोभ रहित जो तो.

निर्वंश, पु० सं० वंशक्षय.

निर्वंशीकलम, न० रा० वंशक्षय झालेल्या पिढींतील जें पिशाच तें.

निर्वाण, न० सं० निदान दुसरी या अर्थी; २, सं० मुक्ति.

निर्वाणयुद्ध, न० सं० पराकाष्ठेचें जें युद्ध तें.

निर्वात, वि० सं० जा ठिकाणीं वायु स्वल्प, असें जें स्थलादिक तो; २, न० वायु राहित्य; उ० आज निर्वात आहे.

निर्वासन, न० सं० घालवून देण्याचा जो व्यापार तें; २, वि० वासना रहित तो.

निर्वाह, पु० सं० कोणतेही कामामध्यें अडकून देतां चालविण्याचा, किं० तडीस नेण्याचा जो प्रकार तो; उ० मी आजपर्यंत संसाराचा निर्वाह केला; २, एखादें भाषण, किं० लेख प्रमाणादिकें करून खरें करून देण्याचा जो प्रकार तो; उ० मीं बोललों, मीं लिहिलें याचा निर्वाह मला करणें प्राप्त आहे; ३, क्षुधा, थंडी, पाऊस, इ० कांचा निर्वाह इ० स्थलीं आपल्यास उपद्रव न होईं असा व्यापार तो.

निर्वाहक, वि० सं० कांहीं एक गोष्टीचा निर्वाह करितो तो.

निर्वाळा, पु० निवडा प्रथमार्थी.

निर्विकार, वि० सं० विकार जास नाहीं तो.

निर्विघ्न, अ० सं० विघ्न न होतां तडीस आणें. करणें, होणें, इ० धा० वि०; उ० हें कार्य निर्विघ्न तडीस गेलें; २, न० विघ्न राहित्य; उ० ईश्वर स्मरणानें निर्विघ्न होतें.

निर्विवाद, २ लिं० सं० विवादाचा विषय नहे असें जें स्थलादिक तो.

निर्विष, २ लिं० सं० विषरहित जो सर्पादिक तो; २, जाणें अहंकारादिक सोडिला तो.

निर्वीर, २ लिं० सं० वीररहित; उ० आज निर्विर भूतल झालें.

निर्वीर्य, २ लिं० सं० जाचे अंगीं वीर्य नाहीं तो; २, जाचे अंगांत स्वल्प धातु आहे तो; उ० हें औषध निर्वीर्य झालें; हा पुरुष निर्वीर्य आहे.

निर्वेद, पु० सं० विरक्त.

निर्वेध, २ लिं० सं० वेधरहित जें स्थल. पुरुषादि तो.

निर्वैर, न० सं० वैर राहित्य; २, ३ लिं० कोणाबरोबर जाचें वैर नाहीं तो.

निर्व्यसन, ३ लिं० सं० व्यसन रहित जो तो.

निर्व्यसनी, ३ लिं० निर्व्यसन.

निर्व्याकुळ, ३ लिं० मा० निर्वेधार्थी.

निर्व्यापार, ३ लिं० सं० व्यापार रहित जो मनुष्यादि तो.

निलरवी, ३ लिं० जादागिन्यांत लाघव नाहीं तो.

निलय, न० सं० मा० स्थानार्थी.

निलारव, ३ लिं० निलरवी.

निलारवी, ३ लिं० निलरवी.

निलाजरा, ३ लिं० लज्जा रहित जो मनुष्यादिक तो.

निलीम, न० रितें गलबत लांब त्यावयाचें असतां बारदाना साठीं त्यांत जें वाळू, धोंडे, इ० भरिलात तें

निवणी, स्त्री० तांदळादिकाचा पिठाचा वांटीसारिखा आकार करून शिजविलात तें पक्वान्न आहे.

निवटणें, कोणत्या एका विशेषांत. कि० व्यवहारांत. गणनीय होणें; उ० हा सोदेगीरींत निवटला; २, सं० मरणें.

निवटा, उ० मत्स्यांत एक भेद आहे.

निवड, स्त्री० कोणेक समुदायांतून विवक्षित पदार्थास निराळें करण्याचा जो व्यापार तो; २, सजातीय समुदायांतून निवडून काढिला, कि० निवडून काढाया जोगता जो पदार्थ तो; ३, समुदायांतील चांगला चांगला अंश काढून घेऊन राहिला जो गाळ तो; हा शब्द त्या त्या पदार्थांचें वि० होतो.

निवडक, ३ लिं० निवड द्वितीयार्थी.

निवडुंग, निवडुंग, पु० न० सकंटक ओषधी झाड आहे.

निवडणें, समुदायांतून विवक्षितांश पृथक् करणें; २, निवटणें, ग्रंथी या अर्थी वांचून.

निवडुंगट, न० निवडुंग

निवण, न० रा० डोळ्याची गरमी उतराया साठीं डोळ्यावर दुधाने भिजवून कापसाची घडी इ० ओषधें घालितात तें.

निवणें, अग्नि, सूर्य, यांचा ऊष्मानें संतप्त जो पदार्थ त्याणें थंड होणें; २, महामारी, दंगा, कोपादिक शांत होणें; ३, कोपादिक जाऊन आपण शांत होणें; उ० त्यास बहुत कोप आला होता तो निवाला त्या मुळें जास कोप आला होता

ता तोही निवाला; डोळे निवणें कान निवणें, इ० स्थलीं चिंता जोगी गोष्ट झाल्यामुळें समाधान होणें; स० शिजे तों राहावतें परंतु निवे तों राहावत नाहीं; ४, न० मडकें इ० कांचा सुडारवाली, गवत इ० कांचें वलयाकार करून घालितात तें.

निवर्तन, न० सं० दोनशें हात लांब रुंद जें क्षेत्र तें; २, कोहींएक स्थलादिकापासून मागें फिरण्याचा जो व्यापार तें.

निवलकांडें, न० वा० निवडंग.

निवली, स्त्री० वा० चिकाडा.

निवळ, ३लिं० गढूळ नव्हें जें उदकादिक तो; २, स्त्री० तक्रादिकांतील जडांशा तळीं बसून वर निर्मळ उदक राहातें तो; ३, अ० निःसंशयपणें; उ० या पदार्थाचे निवळ दाहा रुपये येतील.

निवळणें, उदकादिकानीं निवळ होणें; २, त्यात्या पदार्थांतील विवक्षित जो गुणविशेष त्यास प्रतिबंधक जो त्या पदार्थांतीलच दोषविशेष तो जाऊन तो तो गुण प्रकट होई असें होणें; उ० डोळे निवळले, रस निवळली, पाणी निवळलें, सुपारी निवळली, अंबे निवळले, इ० हरिक निवळणें, स० शेणस्वल्पांत घालून त्यांचा मधली उन्मादकता शक्ति काढून टाकणें, अशा कितीएक स्थलीं धातूस सकर्मकता येती.

निवळी, स्त्री० निवळ तृतीयार्थी; २, एक झाड आहे: ३, त्या झाडाची जी बी ती; ४, एक वेल आहे; ५, कों० वेल इ० कांचा शिंगास दोरी बांधीव असतात ती.

निवाडपत्र, न० पंचाईती इ० कांचा निर्णय करून निवाडा जा पत्रांत लिहिला आहे असें जें पत्र तें.

निवाडा, पु० निर्णय मा० पंचाईत प्रकरणीं प०; दोन जिवाचा निवाडा होणें, स० गरोदर स्त्री प्रसूत होऊन अपत्य आणि ती या उभतांचा पृथक् भाव होणें.

निवात, ३लिं० निर्वात.

निवांत, ३लिं० विवक्षितोपद्रव शून्य जें स्थलादिक तें; उ० निवांत स्थळीं बसून ईश्वराचें ध्यान करावें. २, अ० चलनवलन भाषणादि न करितां राहाणें बसणें, इ० धा० वि०; उ० तूं घटकाभर निवांत बैस.

निवारण, न० कोहींएक व्यापाराचा ठायीं प्रवृत्त जो त्यास त्या व्यापारापासून मागें फिरविण्याचा जो व्यापार तें; उ० तो बाघाचे आंगावर चालून जात होता परंतु त्याचें निवारण केलें; २, तगादेदारास तगादा न करण्याविषयीं त्याचे धन्याचें पत्र आणून देतात तें.

निवारणपत्र, न० निवारण द्वितीयार्थी.

निवारणें, उ० निवारण व्यापारानें निवृत्त होई असें करणें.

निवारशी, ३लिं० कोणाचा वारसा जेथें नाहीं तें स्थलादिक तो.

निवारसा, पु० स्वामित्वादि संबंध विशेष राहित्य

निवारा, पु० भिंत इ० प्रतिबंधानें जो वाऱ्याचा प्रतिरोध तो; निवाऱ्यास बसणें, स० वात रहित स्थळीं बसणें.

निवारित, ३लिं० निवारण केलें जाचें तो.

निवारिश्रा, २ लिं० निवारश्री.

निवास, पु० राहावयाचें ठिकाण तो व राहाण्याचा व्यापार तो; उ० आमचे मनांत काशींत निवास करावा असें आहे.

निवासी, २ लिं० निवासाचा ठायीं राहाणारा तो; प्रा० याचा समासीं प्र०; उ० मथुरा निवासी, द्वारकानिवासी.

निविष्ट, २ लिं० सं० प्रविष्ट; २, कांहीं एका स्थानावर, किं० अधिकारावर जो अधिष्ठित तो; २, कांहीं एका व्यापाराचा परिचय मुळें जो निपुण तो; उ० तो शास्त्रांत निविष्ट आहे.

निवृत्त, २ लिं० सं० कांहीं एक व्यापार, स्थल, इ० कांपासून माघारा परतला जो तो.

निवृत्ति, स्त्री० सं० कांहीं एक व्यापारादिकापासून माघारें घेण्याचा जो व्यापार ती; २, दोषादिकाचा जो निरास ती; उ० औषध सेवनानें रोगनिवृत्ति होती.

निवृत्तिमार्ग, पु० सं० इहलोक, परलोक, एतत्संबंधी विषयांचा अभिलाष न धरितां भूतमात्रीं दया ठेवून जो ईश्वराराधन प्रकार तो; उ० लोकदृष्टीनें प्रवृत्तिमार्गांत असून निवृत्तिमार्गांत असावें.

निवेदणें, लाहानानें थोरापाशीं, किं० बरोबरी जाचीं त्यापाशीं कथणें कथन प्रसंग असतांचप्र०; २, देवादिकास पुष्पादि अर्पिणें.

निवेदन, न० सं० कथन; २, देवादिकास पुष्पादि अर्पिणेंयाचा जो व्यापार तें.

निवेश, पु० सं० कांहीं एक जागयांत स्थल करून जें स्थापन तो; उ० या पंक्तिमध्यें एक अक्षराचा निवेश होत नाहीं; २, शास्त्रादिकाचा ठायीं प्रवेश तो; उ० याचा व्याकरणांत चांगला निवेश आहे.

निवेशन, न० सं० निवेश करण्याचा जो व्यापार तें.

निःशंक, २ लिं० सं० कांहीं एक गोष्ट आचरण्याविषयीं जास शंका नाहीं तो.

निःशक्त, २ लिं० सं० जाचे आंगीं शक्ति नाहीं तो.

निशा, स्त्री० रात्री; २, एखादे गोष्टीविषयीं जो निसंदिग्धपणा तो; उ० या गोष्टी विषयीं मला संदेह होता, परंतु आज माझी निशा झाली; ३, कोणा एका बदल मीं द्रव्य देईन इ० कबूल करण्याचा जो व्यापार ती; उ० मीं पांचशें रुपयांची निशा सावकारी देतों; ४, कैफ; उ० मीं आज निशा खाल्ली परंतु निशा आली नाहीं; ५, वाद, युद्ध, भोजन. इ० कांविषयीं अभिमानादि मूलक जी उत्कंठा असती तिला तो तो विषय स्वशक्तिपेक्षां अतिरिक्त झाल्यासुळें पुरेपुरे नकोनको अशी अवस्था होती ती.

निशाकर, पु० सं० चंद्र.

निशाचर, २ लिं० सं० राक्षस, पिशाच, चोर, इ० तो.

निशाचरी, स्त्री० चोराचें कर्म ती.

निशाचरी विद्या, स्त्री० सं० चोरीचें कर्म ती.

निशाण, न० झेंडा; २, बाणादिकानें वेध्य जें लक्ष्य तें; ३, प्रा० रुपया इ० नाण्यावर पोतदार इ० कांचें चिन्ह असतें तें.

निशाणदार, २ लिं० सैन्यादिकाचा ठायीं ध्वज धरितो तो.

निशाणा, पु० दे० शास्त्र मारजवाचयाचा दगड आहे.

निशाणी, स्त्री० एखाद्या पदार्थावर खुणेसाठीं जें चिन्ह करितात ती; २, कांहीं एक कर्मोत्तर दुष्टफळ भोगण्याचा प्रसंग तो; उ० वाघाचे घरांत गेलें असतां मरण्याची निशाणी.

निशाबाज, वि० केकी.

निशाण, स्त्री० माळा, झाड, इ० कांवर चढण्याकरितां दोन लांब लांकडांस पावकेमारून करितात ती.

निशीथ, पु० मध्यरात्री.

निशेंडया, वि० शेंडी जास नाहीं असाजो यवनादिक तो.

निःशेष, वि० सं० अवशिष्ट सुद्धां नाहीं; उ० तो पदार्थ निःशेष सरला.

निशोत्तर, न० एक औषधी पदार्थ आहे.

निश्चक, वि० निरभ्र.

निश्चंद्र, वि० सं० जा भस्मांनील चकाकी गेली असेंजें पारद, अभ्रक, इ० कांचें भस्म तो.

निश्चय, पु० सं० कांहीं एक गोष्टी विषयीं जो ठराव तो; उ० सर्कार अधिक पैसा मागतें परंतु द्यावयाचा नाहीं असा निश्चय झाला; २, हें असेंच असा जो एकरूप बुद्धीचा आकार तो; उ० दुरून रुपें आहे असा भास झाला हातीं घेतल्या नंतर शिंपी असा निश्चय ठरला; ३, कांहीं एक गोष्टी विषयीं तन्मद्रूपें करून जी अवश्यंभाविता तो; उ० सूर्यास्तोनंतर रात्रि होईल या गोष्टीचा निश्चय आहे; ४, ला० विश्वास; उ० ग्राहाण्या सुतुण्याचें वाक्यावर निश्चय ठेवून चालावें.

निश्चयपूर्वक, अ० निश्चयें करून.

निश्च-

निश्चयात्मा, वि० एकवार जाचे बुद्धीचा कोणेका विषयीं निश्चय झाला तो कधींही फिरायाचा नाहीं असाजो पुरुष तो; २ निश्चय आहे जांत अशी जी गोष्ट इ० तो.

निश्चयात्मक, वि० निश्चय आहे जांत तो; २ अ० निश्चयपूर्वक.

निश्चल, वि० चलन रहित जो तो.

निश्चळ, वि० निचळ.

निश्चित, वि० निश्चयानें अभिसंबद्ध तो.

निश्चिंत, वि० निश्चिंत.

निषाद, पु० सं० कोळी म्हणून हिंदूंत एक जाति आहे.

निषिद्ध, वि० सं० शास्त्र आणि लोक यांनीं जा जा कर्मा विषयीं जो जो वर्जिला तो पदार्थ व तसें कर्म ही.

निषेध, पु० सं० जें कर्म करूं नये, किं० पदार्थ घेऊं नये इ० रूप शास्त्र आधुनिक इ० कांनीं केलें जें वर्जन तो.

निषेधणें, निषेधानें युक्त करणें.

निष्क, पु० सं० चाळीस मासे प्रमाण जें वजन तो; २, चार रुपयाचा किमतीचें एक मान आहे ज्योतिषं प्रसिद्ध.

निष्कंटक, वि० सं० जा मार्गादिका मध्यें कांटा नाहीं तो मार्ग, राज्यादिक; उ० कौरव मारून देइल निष्कंटक सर्व राज्य आतेला; २, न० कंटक राहित्य; उ० तो शत्रु मेला या मुळें तेथें निष्कंटक झालें.

निष्कपट, वि० सं० कपट रहित जो मनुष्य व्यवहारादिक तो.

निष्क

निष्कलंक, २लिं॰ सं॰ कलंकरहित जो तो.

निष्कांचन, २लिं॰ सं॰ कांचन म्हणजे द्रव्य तद्रहित जो मनुष्य, देश, इ॰ तो.

निष्काम, २लिं॰ सं॰ फलेच्छा न धरितां जें अनुष्ठानादिक तो.

निष्कारण, अ॰ कारणावांचून, छळ, बोल, मर, इ॰ धा॰वि॰.

निष्कासन, न॰ कांहीं एकांतून कांहीं एकाचा बाहेर काढण्याचा जो व्यापार तें.

निष्काळजी, २लिं॰ निकाळजी.

निष्कृति, स्त्री॰ केल्या पापकर्माचा परिहारार्थ. प्रायश्चित दुःख भोगणें इ॰रूप जो व्यापार ती.

निष्कृत्रिम, कपट रहित जो तो.

निष्क्रय, पु॰ ब्राह्मणादिकास मुख्यत्वें करून जो पदार्थ दानाचा तदभावीं त्याचें द्रव्यरूप मोल देतात तो.

निष्ठा, स्त्री॰ कांहीं एका कार्याचा ठायीं, किं॰ पदार्थाचा ठायीं जो अतिशयित प्रेमा ती; २, ब्राह्मादिकांचा ठायीं हें सत्य अशी जी बुद्धि ती.

निष्ठुर, २लिं॰ कठोर, मन, हृदय, भाषण, पुरुष, इ॰ कांविषयीं प्र॰.

निष्णा, पु॰ निष्णाणा.

निष्णात, २लिं॰ विद्यादिकांचा ठायीं निपुण तो.

निष्पर्ण, २लिं॰ पर्णरहित जो वृक्षादि तो.

निष्पत्र, २लिं॰ निष्पर्ण.

निष्पन्न, २लिं॰ उत्पन्न.

निष्पाप, २लिं॰ पापरहित जो मनुष्यादि तो.

निष्प्रयोजन, अ॰ प्रयोजनावांचून; उ॰ निष्प्रयोजन एखाद्यास मारूं नये.

निष्प्राण, २लिं॰ सं॰ निष्प्राण; २, मृत जो तो.

निष्प्रांजल, २लिं॰ सं॰ जो भाषणांत, किं॰ ग्रथादिकांत संदेह अथवा वक्रता कपट इ॰ नाहीं असें जें मोकळें भाषण, ग्रंथ, इ॰ तो.

निष्फल, निष्फळ, २लिं॰ सं॰ फलोत्पत्ति रहित जो व्यापार आणि वृक्षादिक तो.

निःसंग, २लिं॰ अंतःकरणापासून सर्वसंग परित्याग जाणे केला तो; उ॰ संन्याशानें निःसंग असावें; २, ला॰ जाणें लोकरीति सोडली तो; उ॰ तो निःसंग होऊन जुगार खेळूं लागला.

निसंग, २लिं॰ निःसंग द्वितीयार्थी.

निसटणें, अडचणींत सांपडलेला जो पदार्थ त्याणें नेटा मुळें जिकडे अडचण कमी तिकडे मार्ग करून सवेग बाहेर पडणें; उ॰ आंबा आंवळतांच ओतून कोय निसटली; २, भार साहाकता शक्ति जा मध्यें आहे असा जो पदार्थ, प्रदेश, तो प्रदेश सुटल्या मुळें त्या त्या पदार्थानें नेटा मुळें सरणें; उ॰ त्या तुळईस टेंका देतोस तो मधोमध दे नाहीं तर निसटेल; त्या जमीनीवरून चुकीनें चाल, नाहींतर पाय निसटेल; ३, ला॰ कांहीं एका स्थलापासून हळा चुकवून. किं॰ बलात्कार इत्यादि युक्तीनीं पळणें; उ॰ एथें बसला होता इतक्यांत तो निसटून कोणीकडे गेला, तो चोर चवघांनीं धरला होता परंतु निसटला; ४, कांहीं एका कार्यांत प्रथम आपण असून मग अंग काढणें; उ॰ तो त्या मसलतींतून निसटला.

निसण, स्त्री० निशीण.

निसणा, पु० निष्णा.

निसणें, पदार्थावरची त्वचा काढून पदार्थ निरुत्वच करणें; उ० मीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत हजार नारळ निसले; २, तांदूळ, भाजी, इ० पदार्थ निवडणें.

निसन, वि० रा० बोलल्या चालल्याची जास लाज नसून जास भीड मर्यादा नाहीं तो; स० निसतचा जारी आणि पडला रोजारी.

निसंतान, न० कुळक्षय; स० कुसंताना पेक्षां निसंतान बरें.

निःसत्व, वि० असिद्ध तेजाबांचून जें तेज तद्रहित जो मनुष्यादि तो.

निःसंदिग्ध, वि० संदेहानें युक्त नव्हे जो तो.

निःसंदेह, वि० संदेहरहित जो तो.

निसपटणें, प्रा० निसटणें या अर्थी.

निसबत, स्त्री० نسبت हिं० दिमत; उ० आमचा घोडा त्याचे निसबतीस आहे; सर्कार निसबत निसबत सर्कार इ० स्थलीं सर्कारचे निसबतीचा असा अर्थ.

निसबतदार, वि० نسبتدار हिं० दिमतदार.

निसबतवार, वि० जो जाचे निसबतीस राहातो तो त्याचा.

निसरगांठ, स्त्री० आसुडगांठ; निसरगांठ देऊन ठेवणें, स० कांहींएक व्यापारांत आपण गुंतून पलाथास वाटठेवणें.

निसरड, स्त्री० भूम्यादिकावर पाय सरला जाई असा जो शेवाळी, इ० कांनीं झाला बुळबुळीतपणा ती; उ० तूं त्या वाटेनें जाऊंनको तेथे निसरड झाली आहे.

निसरडा, वि० निसरड जावर झाली आहे असा जो वृक्ष, भूमि, इ० तो; २, पु० निसरड.

निसरडें, न० निसरड.

निसरण, स्त्री० निसरड.

निःसरण, न० सं० कांहींएक पदार्थांतून कांहींएक पदार्थांचा जो सरण्याचा व्यापार तें.

निसरणें, बुळबुळीत, किं० सुळसुळीत असा जो जमीन इ० कांचा प्रदेश त्यावर पाय इ० पदार्थ ठेविला असतां तेथें न ठरतां पलीकडे सरणें.

निसरसांड, स्त्री० अवश्य पालनीय, किं० अवश्य श्रोतव्य, किं० अवश्य कर्तव्य अशा तऱ्हेचे जे पदार्थ त्यांवर अप्रीति, गर्व, इ० कांसुळें उपेक्षात्मक बुद्धि ठेवण्याचा जो प्रकार ती; उ० तूं मोठा संपत्तिमान झालास त्यासून काय आईची निसरसांड करावी; हें वर्तमान चित्त देऊन ऐका. याची केवल निसरसांड करूंनका; तो पटण्याविषयीं निसरसांड करूं लागला.

निसवणी, स्त्री० धान्य निसवण्याचा जो व्यापार ती.

निसवणें, धान्यादिकानीं आपलें कणीस बाहेर टाकणें; २, ला० चोरी, छिनाळी, इ० दुष्कर्मांविषयीं निर्लज्ज होणें; स० उसवल्याला दोरा घालतां येतो परंतु निसवल्याचें काय होणार.

निसवीत, स्त्री० निसवणी.

निसळ, अ० निरखळ.

निसांडा, पु० संग्रहीत पदार्थांचा जो झाडा तो.

निःसार, वि० सं० निःसत्व.

निःसारण, न० सं० बाहेर टाकण्याचा जो व्यापार तें.

निःसारित, वि० सं० निःसारण केलें जाचें तो.

निःसाक्षिक, वि० सं० जास साक्षी नाहीं असा जो व्यवहार इ० तो.

निःसीम, वि० सं० सीमेचा पलीकडेस पोंहोंचला असा जो विद्यादि गुण तो; उ० याची विद्या निःसीम आहे; याची सोदेगिरी निःसीम आहे, २, तन्नदुण विशिष्ट जो तो; उ० तो निःसीम विद्वान आहे; तो निःसीम चोर आहे.

निसूक, निसूग, वि० रा० अ० जा प्रेरणेने गोळी इ० प्रवृत्त झाली त्या प्रेरणेचा बलाचा व्याघात कांहींएक न होतां, लाग, मार, इ० धा० वि० उ० निसूक गोळी लागली; २, वा० दे० कोडगा; स० निसक्या माणसाला लाज नाहीं कालचें बोललें आज नाहीं.

निसूर, वि० कांहींएक काळजींतून सूक्त झाला तो; २, लोकशास्त्राची मर्यादा सोडून निर्लज्ज झाला तो.

निःसृत, वि० सं० कांहींएका पदार्थांतून बाहेर निघाला तो.

निसोत्तर, न० निश्चोत्तर.

निस्तरणें, निस्तारणें, कांहींएक आरब्ध जें कार्य त्याचा परिणाम वाईट होऊं लागला असतां श्रम करून तें तडीस नेणें, कि० चांगलें होईं असें करणें; २, कांहींएक केलीं जीं दुष्कर्में तत्संबंधानें होणारीं जें वाईट फल तें भोगून त्याची निष्कृति करणें; उ० हें तूं व्यभिचाररूपं कर्म करितोस परंतु निस्तराचास तूं नरकांत जाशील.

निस्ता, वि० साहित्यभूत इतर पदार्थरहित. कि० विवक्षित इतर पदार्थरहित जो तो; परंतु असा जो पदार्थ तो तत्कार्यी असमर्थ असतो; उ० निस्ता भात कसा जेवूं.

निस्तुक, वि० कांहींएक गुणानें विशिष्ट जो पदार्थ त्याचें तदतिरिक्त गुणरहितत्वें करून, कि० कांहींएक पदार्थाचें. कि० कांहींएक व्यवहाराचें अभावत्वें करून, कि० दुष्ट गुणातिशयत्वें करून कथन कर्तव्य असतां त्या त्या पदार्थाचें, कि० त्या त्या व्यापाराचें वि०; उ० तो निस्तुक वैदिक आहे; त्याजवळ निस्तुक पैसा नाहीं: तो निस्तुक सौदा आहे.

निस्तुष, वि० सं० जाचरला कोंडा निःशेष गेला असें जें धान्यादिक तो.

निस्तेज, वि० तेजोहीन.

निस्तोष, अ० निःशेष होईं असें, संप, हो, जा, इ० धा० वि०.

निस्पृह, वि० सं० निरिच्छ; २, इतर संबंधानाकांत असा; उ० आमचें बिऱ्हाड निस्पृह आहे.

निस्वन, पु० सं० मेघादिकाचा नादरूप जो शब्द तो; उ० मेघाचा निस्वन होऊं लागला स० मोरें नृत्य करूं लागलीं.

निळा, पु० एक रंग आहे; २, तद्विशिष्ट वस्त्रादि तो

तो; २, पांदऱ्या घोड्यासही स०.

निःक्षत्र, न०सं० क्षत्रिय राहिल्य.

निःक्षत्रिय, वि०सं० क्षत्रिय रहित तो: उ० परशुरामानें निक्षत्रिय पृथ्वी केली.

निक्षूण, अ० सांगणें, बोलणें, इ० कांपासून तद्विपरितार्थ संभावना झालेला जोग्या स्थलीं तो पुनः न होई असें खरपूस सांगणें, बोलणें, इ० धा०वि०.

निक्षेप, पु०सं० कांहीं एक अधिकरणाहून करून जो त्याग तो; २, जमीनींत ठेवलेलें द्रव्य, कि० दुसऱ्याचे पाशीं ठेवलेलें जें द्रव्य तो.

नीच, वि० आकृति, कि० गुण, कि० जाति, कि० किंमत, इ० कानीं जो विवक्षिता पेक्षां कमी तो; उ० या झाडापेक्षां तें झाड नीच आहे; ह्रेम गर्मापेक्षां अनंदभैरव नीच आहे; या शालजोडीपेक्षां ती शालजोडी नीच आहे; २, अधम जो मनुष्य तो; उ० नीचाची संगत करूं नये; हा विणा नीच आहे, परवाज नीच आहे. इ० स्थलीं त्याचा सूर नीच आहे असा अर्थ.

नीच, वि० नीच; २, आजा यहाचें जें जें उच्च स्थान सांगितलें आहे त्या स्थानापासून जें सातवें स्थान तें; ३, त्या स्थानावरचा जो ग्रह तो; नीचाश्रय नीचसेवा. इ० समास जाणावे.

नीचा, वि० नीच.

नीज, स्त्री० निद्रा.

नीट, वि० वक्र प्रतियोगी; उ० रानांत जाऊन नीट लांकूड आण; २, यथायोग्य; उ० याचें बोलणें नीट आहे; ही खुरशी नीट आहे; नीट जाणें, स० वांकडा तिकडा न होतां, कि० कोठें न गुंतता जाणें; त्याणें आपल्या शिष्यास भला नीट केला; म० त्यास ठोकून आंतील वक्रता काढिली असा अर्थ.

नीटनेटका, वि० जितक्यास तितका यथायोग्य सुशोभित दिसायाजोगा तो.

नीत, स्त्री० अमुकानें अमुक तऱ्हेनें चालावें अशी शास्त्रांत लिहिली आहे, कि० लोकसिद्ध जी रीति ती.

नीति, स्त्री० नीत.

नीतिशास्त्र, न० नीतिप्रतिपादक जें शास्त्र तें.

नीम, पु०रा० पिशाचादिकास निघमानें द्यावयाचें देयजें तो; उ० यंदा त्या पिशाचाचा नीम द्यावयाचा राहिला म्हणून तुम्हास उपद्रव होतो; सांडणें, देणें त्याचा योगी म०.

नीध, स्त्री० निधि; २, बाहेर विशेष डोळा न दिसतां अनेक सद्गुण जामध्यें आहेत त्याचा स्तव कर्तव्य असतां ती; उ० ही गाय आम्हास मोठी नीध सांपडली.

नीर, न० उदक; २, पंचाईत इ० कांतील जो इत्यर्थ तें.

नीरक्त, वि० सं० रक्त रहित जें शरीरादिक तो.

नीरस, वि० सं० रसरहित जो तो.

नीराजन, न० सं० आर्ति ओवाळण्याचा व्यापार तें; २, निरंजन मथमार्थी.

नीरोग, वि० सं० निरोग.

नील, पु० सं० वर्ण आहे; २, तद्विशिष्ट तो; ३, एक माणिकांत भेद आहे.

नीलकंठ, पु० सं० महादेव.

नीलकमल, न० सं० नीलवर्ण जें कमल तें.

नीलिमा, पु॰ सं॰ स्त्री॰ निळेपणा.

नीली, स्त्री॰ सं॰ एक वर्षे विशेष आहे.

नीव, पु॰ वृक्ष आहे; २, न॰ त्याचें फळ तें; ३, न॰ कों॰ पु॰ रा॰ घर इ॰ कांचें पायें.

नीस, १ लिं॰ निस्तुष.

नीळ, १ लिं॰ नील; २, स्त्री॰ दे॰ नीलवर्ण जांपासून उत्पन्न होतो असें एक झाड आहे; ३, पु॰ वानरांत एक जाति आहे; निळीचा रंग नासला असतां खोटी बातमी उठवावी, म॰ रंग चांगला होतो अशी प्रसिद्धि त्याजवरून एखादे बातमीचा खोटेपणा वर्णाचाचा असतां नीळ रांपली आहे, रांपविली आहे, नासली आहे, ग॰ नीळ रांप झाला आहे, असे प्रयोग करितात, एथें त्या खोटे बातमीस च नीळ म्ह॰.

नुकसान, न॰ نقصان हिं॰ व्यवहार इ॰ कांमध्यें तोटा येतो, कि॰ जिन्नस इ॰ काचा नाश होनों तें.

नुकसानी, स्त्री॰ نقصانی हिं॰ नुकसान.

नुक्ता, अ॰ निगता; २, रसभरित चमत्कारिक असें जें थोडके भाषणाचा, कि॰ गायनाचा अंश तो.

नुनू, स्त्री॰ मुलांचे भाषणांत निद्रेचें नाव.

नुमजणें, सं॰ नउमजणें.

नुरणें, सं॰ नउरणें.

नुरी, स्त्री॰ एकपक्षी आहे.

नुस्ता, १ लिं॰ निस्ता.

नुस्था, १ लिं॰ नुस्ता.

नूतन, १ लिं॰ नवीन.

नूर, पु॰ शरीरावरील जो तेजो विशेष तो.

नृत्य

नृत्य, न॰ सं॰ नाचण्याचा व्यापार तें.

नृप, पु॰ सं॰ राजा.

नृपति, पु॰ सं॰ राजा.

नृपाळ, पु॰ सं॰ राजा

नृपासन, न॰ सं॰ राजाचें आसन.

नृसिंह, पु॰ सं॰ नरसिंह.

नेऊर, न॰ घोड्याचे पाऊलास वरजी गांठ असती जावर लांब लांब केश असतात तें.

नेक, स्त्री॰ जा जा व्यवहारांत, कि॰ जाशीं जाशीं जाजा संप्रदायानें चालायाचें त्यांत चुकूं पेंजा न करितां त्या त्या संप्रदायानें चालण्याचा जो प्रकार तो; उ॰ अत्यहेतू स्तव कोणी आपली नेक सोडीत नाहीं.

नेचा, पु॰ जा सुरगुडीस लांब वेंटाळ्याची नळी असती तो.

नेट, पु॰ न॰ लोटणें, ओझें उचलणें, इत्यार्थ सर्व शरीरांतील जें बल तें एकत्र झालें तो; उ॰ मनुष्यानें किती नेट केला तरी काय पर्वत लोटेल; २, कांहीं एक वस्तूचा कांहीं एक पदार्थावर जो भार तो; उ॰ या तुळईवर नेट पडला म्हणून वांकली; ३, ला॰ कांहीं एक कार्य करण्या विषयीं जो नगादा तो; उ॰ माझे पाठीशीं रुपया विषयीं सावकाराचा फार नेट लागला आहे; ४, कांहीं एक कार्य करण्या विषयीं जो बुद्धीचा दृढनिश्चय तो; उ॰ नेट दिल्या वांचून पंचाईत शेवटास जाणार नाहीं.

नेटका, १ लिं॰ जितक्यास तितका चांगला दिसाया जोगा यथायोग्य तो.

नेटणें, नेटानें कांहीं एक पदार्थ पलीकडे ठकलणें; २, कांहीं एक कार्य, कि॰ मनुष्यादि समुदाय अ-

वधी

वधी जवळ येऊन ठेपणें, उ० लग्न उद्यांवर येऊन-नेटलें तथापि कशास अद्यापि ठिकाण नाहीं; शत्रु किल्याशी नेटला मग उपाय काय.

नेटवा, पु० धिरा.

नेडें, नेटें, न० सुई, दाभण, कुदळी, कुऱ्हाड, इ० कांस दोरा, दांडा, अडकवायासाठीं छिद्र करितात-तें.

नेण, वि० रा० जास ज्ञान आले नाहीं तें अर्भक.

नेणणें, नजाणणें.

नेणता, वि० नेण.

नेणीव, स्त्री० यं० ज्ञानाचा अभाव ती.

नेणें, जाण्यास विवक्षित जो देश त्या देशाप्रति कांहींएक वस्तु घेऊन जाणें, स० जाचें त्याणें नेलें-पायां पडणें वांयां गेलें; २, यं० नजाणणें.

नेत, स्त्री० नेक.

नेत्र, पु० न० सं० डोळा.

नेत्रकटाक्ष, पु० सं० वक्रदृष्टीनें पाहाण्याचा जो प्रकार तो.

नेत्रकमल, न० कमला सारखें जें नेत्र तें.

नेत्रकोराऱ्या, न० कों० कांहीं एक चमत्कारीक वस्तु नेत्रानेत्रपाहून संतोष मानण्याचा जो प्रकार तें.

नेत्रपल्लवी, स्त्री० नेत्राचे संकेताची एक भाषा आहे.

नेत्रसंकेत, पु० सं० नेत्रानें खूणकरितात तो.

नेपटी, स्त्री० रा० बेचूची जी फटाकफळी ती.

नेपती, स्त्री० झाड आहे.

नेपतें, न० नेपतीचे फळ.

नेपथ्य, न० सं० भूषण; २, नाटकादिचें ठायीं पडदा धरितात. त्याचे आंतील प्रदेश तें.

नेफा, पु० दे० चोळणा इ० काचा जो नाडी घालाव्या चा प्रदेश तो.

नेभळा, वि० जाचें शरीर पुष्ट असून पोकळ तो-व त्याचें शरीर व त्याणें धरिलें अलंकार वस्त्र भूषणादिक, कि० त्याचा तसा कारभार इ० तो.

नेम, पु० नियम; २, न० खांबादि पुरावा करितां जो-खळगा करितात तें, स० बांकडे मेढीस बांकडें च नेम करावें लागतें; ३, बाणादिक मारण्याचें जें लक्ष्य तें.

नेमका, अ० लक्ष्यानुसंधान नचुकायाजोगा तर-ळपणें, ये, जा, इ० धा० वि०.

नेमणूक, स्त्री० सर्कार, इ० चाकर इ० लोकांस वेतनाचा नियम करून देतात ती, उ० आम्हा-ला चारशें रुपये नेमणूक झाली आहे; २, रा० एकाचाकडे एखाद्याची जी नियमानें योजना ती उ० त्या मामलतीवर त्या गृहस्थाची नेमणूक-झाली.

नेमणें, कांहींएक कार्य, कि० तत्तत्कार्य कर्ता पुरु-षादिक अमुकच कालीं अमुकच देशीं अमुक च तऱ्हेनें निश्चय पूर्वक योजणें; २, रा० खळग्या मध्यें खांबादिक पुरणें, उ० सकाळ पासून शंभर केळी नेमिल्या; ३, बाणादिकें करून लक्ष्य वेधणें.

नेमनिष्ठा, स्त्री० नियमनिष्ठा.

नेमवणें, नेमणें द्वितीयार्थी.

नेमस्त, वि० न्यूनाधिक भावरहित, उ० हा मनु-ष्य उंच नव्हे, ठेंगणा नव्हे, नेमस्त आहे; तो पंडित

डित नेमस्तच आहे, इ० स्थळीं त्या मध्यें विशेष पांडित्य नाहीं; तोवर नेमस्त केला आहे, तीवधू नेमस्त केली आहे; एथें वस्तें करून वधूतें करून नियमयुक्त केला असा अर्थ; याचा प्र० विवाहीं कुंकुमपत्रें बोलावण्याकरितां लिहितात त्यांतच उ० उद्यां सुलीचें लग्न आहे. असुकाचापुत्र वर नेमस्त केला आहे आपण लग्नास यावें.

नेव, स्त्री० मस्त्यांत एक जाति आहे.

नेवरा, २लिं० अश्वादिकाचा पांढरा जो खूर तो; २, तद्विशिष्ट घोडा तो.

नेवाळ, स्त्री० एक पुष्प वल्ली आहे.

नेवाळी, स्त्री० नेवाळ.

नेवाळें, न० नेवाळीचें पुष्प तें.

नेष्ट, २लिं० अनिष्ट, प्रा० आदित्यादि ग्रह वृत्ति.

नेसण, न० गुह्यावयव गोपनार्थ जें कटिसंबंधु वस्त्र करितात तें; २, नेसण्याचा जो व्यापार तें; उ० इचें नेसण होईल तेव्हां पाणीं देईल.

नेसणें, गुह्यावयव गोपनार्थ वस्त्र कटिसंबंधु करणें; २, न० नेसायाचें जें वस्त्र तें; मुसळनेसणें स० निर्लज्ज होऊन दुर्भाषण, दुष्कर्म, इ० करूं लागणें.

नेसविणें, नेसे असें करणें; २, लेखनामध्यें कांहीएक मुख्य कलम, इ० वरतें लिहून तत्संबधाकांत कलम इ० क्रमें करून त्या त्या स्थळीं लिहिणें; उ० वर असुक कलम त्याहा त्या स्थळीं हीं कलमें नेसवा; ३, रा० असुक पदार्थानें असुक देश व्यापाचा असा जो संकेतसिद्ध असुक पदार्थ तो तितका न मिळाल्यामुळें अल्प पदार्थानेंच त्या देशाचे अवयव न सोडितां युक्तियुक्तीनें यथाकंथंचित तो देश व्यापे असें करणें; उ० पन्नास हजार गुंडया शिंवाया ला लागतात परंतु सालमअकुरीं गुंडया महाग म्हणून पांचशतानीच नेसवून घेतलें.

नेहेमी, अ० नित्यशः निरंतर, कालवृत्ति; उ० तो नेहेमी पठाथाला जातो.

नैय्यायिक, २लिं० न्यायशास्त्र पठला तो.

नैवेद्य, पु० देवास भक्षणार्थ अर्पितात जो भक्ष्य पदार्थ तो.

नैष्ठिक, २लिं० नियम निष्ठा जास आहे तो.

नैष्ठिकब्रह्मचर्य, न० मुंज सुटल्या नंतर ब्रह्मचारि धर्मानें राहाण्याचा जो प्रकार तें.

नैष्ठिकब्रह्मचारी, २लिं० नैष्ठिक ब्रह्मचर्य आहे जास तो.

नोक, स्त्री० खुबी; उ० त्याचे बालण्यांत नोक आहे, त्याचे पाहाण्यांत नोक आहे; २, चुणूक; उ० बरें आजचा दिवस तुलीं मौजा करा. इनकी नोक मारून गेला; ३, भाल्यादिकाची जी अणी ती.

नोकदार, २लिं० खुबीदार.

नोकझोंक, स्त्री० पु० नोक इ० हावभाव ती तो.

नोकानोकी, स्त्री० परस्परांचा मनांतील परस्परांस समजण्या विषयीं प्रयोजकजो परस्परांचा वक्रभाषण प्रकार, किं० नेत्रकटाक्ष संकेत प्रकार ती.

नोकीचा, २लिं० नोकदार.

नोडगा, नोडवा, २लिं० मुसलमानी निंदा कर्तव्य असतां

असतां त्यास स्म०.

नोंदणें, सराफाचे दुकानीं हुंडी लाबाचास नेली असतां तिची नक्कल करून ठेवणें.

नोर, पु० गलबतास जें भाडें पडतें तो.

नोरी, वि० भाडें करून केलें जें गलबत इ० तो.

नोवरा, पु० सं० नवरा.

नोवरी, स्त्री० सं० नवरी.

नौका, स्त्री० जलयान.

न्यग्रोध, पु० सं० वड म्हणून झाड आहे.

न्यात, स्त्री० ज्ञातिशब्दाचा अपभ्रंश

न्याय, पु० इनसाफ; २, नीति; उ० न्यायानें जो वर्ततो त्यास भय नाहीं; ३, एकशास्त्र आहे; ४, दृष्टांतासजी उपयोगी सर्वजन मसिद्ध गोष्ट तो; उ० सज्ञाचा पारधीस जावें परंतु वाघाचें सामान बाळगावें हा न्याय.

न्यायाधिशी, स्त्री० न्यायाधीशाचें जें कर्म, किं० अधिकार ती.

न्यायाधीश, पु० इनसाफ मनास आणाया साठीं जो अधिकारी करून ठेवितात तो.

न्याय्य, वि० न्याय संमत जी गोष्ट इ० तो.

न्यारा, वि० निराळा.

न्याव, पु० सं० न्याय प्रथमद्वितीयार्थी.

न्यास, पु० गणितामध्यें गुणाकार भागाकार कराया चा असतां तेने अंक मांडण्याचा जो व्यापार तो; २, बाणादिकावर मंत्रादिकें करून जें देवता स्थापन तो; उ० त्या बाणावर देवताचा न्यास करून बाण सोडिला.

न्याहार, वि० शुद्धगुळीत, साफ, चमत्कारिक जो पदार्थ

पदार्थ तो.

न्याहारणें, पदार्थ न्याहार होई असें करणें.

न्याहारी, स्त्री० प्रातःकाळीं क्षुधा बहुत असतां स्वल्प भोजन करण्याचा जो प्रकार ती; २, स्वल्प भोजनासही स्म०.

न्याहाल, वि० संपत्ति इ० कानीं जो वृद्धिंगत तो; उ० त्याणें त्याला न्याहाल केला; तो न्याहाल झाला; या० इतकेच प्रयोग दिसतात; तुली न्याहाल पाहाल एथें निधावा पाहाल असा अर्थ.

न्याहाली, स्त्री० वस्त्रामध्यें कापूस इ० घालून अंगारवालीं घालाया करितां करितात ती.

न्याहाळणें, सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करणें; उ० त्याचे डोळ्यावर चाळिशी आली त्यासुळें त्यास अक्षर न्याहाळत नाहीं. स्म० दिसत नाहीं.

न्यून, वि० कमी; उ० झारेकऱ्याचे कसवापेक्षां सोनाराचें कसवन्यून; न्यून पडणें स्म० कांहीं एक व्यापारांत वे गुण्य पडणें.

न्यूनाधिक, वि० उणें अधिक; उ० मीं बोलतों यांत न्यूनाधिक असेल तें काढा.

न्हाऊ, वि० न्हावी; स्म० माणसांत न्हाऊ आणि पक्ष्यांत काऊ.

न्हाण, न० नाहाण.

न्हाणघर, न० नाहाणघर.

न्हाणी, स्त्री० नाहाणी.

न्हाणुली, स्त्री० नाहाणुली.

न्हाणें. नाहाणें: स्म० वधू न्हाली झाली आणि वाघ शिंपलागेला.

न्हाणोली, स्त्री० नाहाणुली.

न्हातीधुती. स्त्री॰ नाहातीधुती॰
न्हावगंड. पु॰ नाहावगंड॰

न्हावी

न्हावी. १लिं॰ नाहावी: २. दे॰ एककिडा आहे. जो बाबळी इ॰ कांचे कांट्यांचें घर करीत असतो तो॰